REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ३ जानेवारी, १९४५ अंक १




**व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.**
**मुंबई.**
**मसाल्याचे व्यापारी**
पुणें एजंटः—
**द. ना. हेजीब**

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरीः** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे (मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते; सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एस्. ए. करीमभाई

## डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

# लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

**दोन वेळां उपयोग**

**दि मागोरा केमिकल कं. लि.**

— हिराबाग, पुणें २ —

# सांडू हार्टिना

छातीत धडधडणें, धाप लागणें, छातीत कळ अगर चमक मारणें, रक्ताचा दाब वाढणें व हृदयाची अशक्तता यांवर खास गुणकारी.

**ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.**

**द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.**
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
**मे. श्रीदत्त एजन्सी**
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
**मे. भागवत आणि कं.**
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
**मे. जोशी आणि मंडळी**
भवानी पेठ.

## विविध माहिती

**कपाशीच्या लागवडींत २४% घट**

हिंदी कपाशीच्या लागवडींत बरीच घट झाली आहे. गेल्या वर्षी १,४२,३४,४०० एकर कपाशीखालीं होते. चालू वर्षाचा सरकारी अंदाज १,१५,६०,००० एकरांचा आहे. म्हणजे, लागवडींत २४% घट झालेली आहे.

**चलनी नोटांत वाढ**

रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांत १५ डिसेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत ४ कोटि, ३३ लक्ष रुपये किंमतीच्या नोटांची भर पडली व त्यांची एकूण किंमत १०,०३,६१,१६,००० रुपये झाली.

**चलनवाढ व भावनियंत्रण ह्यांचे परिणाम**

मध्यम वर्गाच्या लोकांवर चलनवाढ व भावनियंत्रण ह्यांचा काय परिणाम झाला आहे, ह्याची चौकशी मुंबई विश्वविद्यालयाचें स्कूल ऑफ एकनॉमिक्स अँड सोशॉलजी हें करणार आहे. त्यासाठी एक प्रश्नपत्रिका तयार करण्यांत आली आहे.

**कोळशाच्या खाणींतील स्त्री-कामगार**

अखिल भारतीय स्त्री-परिषदेनें, कोळशाच्या खाणींत स्त्रियांना काम करावें लागतें, त्याच्या निषेधार्थ एक दिवस पाळण्याचें ठरविलें होतें. खाणींतील कोळसा काढण्यासाठी नवी यंत्रसामुग्री बसविण्यांत आली, म्हणजे स्त्रियांना खाणींत कामावर घेण्याचें प्रयोजन उरणार नाहीं असें समजतें.

**बरद्वान-असनसोल**

बरद्वान व असनसोल ह्या ५२३/४ मैल लांबीच्या रेल्वे फाटयावर चार आगगाड्या एकदम जाऊं शकतील, ह्या दृष्टीनें रूळ वाढविण्यांत आले आहेत, त्यास सुमारें १ कोटि रुपये खर्च आला. रूळ, स्लीपर्स, विटा, मुरूम, इत्यादि मिळून १५,००० वॅगनभर माल नवी लाइन टाकण्यासाठीं लागला. ९,२०० टन वजनाचे रूळ, १,२६,००० स्लीपर्स, ६० लक्ष घनफूट मुरूम, ७० हजार घनफूट खडी, १ कोटि १० लक्ष विटा, पुलांकरितां ४ हजार टन कॉंक्रीटच्या ओतलेल्या फरशा व ८ हजार टन सिमेंट इतक्या मालाचा वरील कामासाठी उपयोग करण्यांत आला.

**नफ्यांतील २७ लक्ष रुपये परत**

सरकारला मिलिटरी चासी पुरविण्याचें कंत्राट जनरल मोटर्स इंडिया लि. कडे होतें. अपेक्षेपेक्षा कंपनीस काम अधिक मिळालें व नफाहि पुष्कळ झाला. लष्करी कामावर भरमसाट नफा नको व सरकारच्या चलनवृद्धीस आळा घालण्याच्या प्रयत्नास सहाय व्हावें, ह्यासाठीं कंपनीनें आपल्या नफ्यांतील २७,००,००० रुपये सरकारास परत दिले आहेत, असें प्रसिद्ध झालें आहे. मग, नफा केवढा मोठा झाला ?

**बक्षिसाच्या रोख्यांचा निकाल**

पांच वर्षें मुदतीच्या बिनव्याजी बक्षिसाच्या रोख्यांतील बक्षिसाचे रोखे चिठ्ठ्या टाकून निवडण्याचें काम १ जानेवारी रोजीं मुंबई येथें सर कावसजी जहांगीर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालें.

**रेल्वे बजेट**

हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक ता. १५ फेब्रुवारी रोजीं दोन्ही विधिमंडळांस सादर करण्यांत येईल.

**श्री. श्री. प्र. ओगले ह्यांचें मराठा चेंबरमधील भाषण**

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या संस्थेच्या सभासदांची षण्मासिक साधारण सभा शनिवार दि. २३ डिसेंबरला सायंकाळीं ६ वाजतां भरली होती. त्याप्रसंगीं चेंबरचे अध्यक्ष श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले यांनीं देशापुढील कांहीं महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांचें दिग्दर्शन आपल्या भाषणांत केलें. हिंदुस्थानांत ब्रिटिश भांडवलवाल्यांनीं धंदे काढण्याला विद्यमान घटनेंत पूर्ण मुभा आहे व जें संरक्षण दिलें जाईल तें हिंदुस्थानांतील सर्व धंद्यांना मिळेल. सबब हिंदी कारखानदारांना हिंदुस्थानांतील ब्रिटिश कारखानदारांच्या चढाओढीला तोंड द्यावें लागेल. त्याकरतां हिंदी कारखानदारांनीं आपली कार्यक्षमता वाढवली पाहिजे व हिंदी गिऱ्हाइकांच्या भावना व आकांक्षा यांशीं समरस होऊन त्यांच्या स्वदेशी भावनेचें संरक्षण मिळविलें पाहिजे, असें ते म्हणाले. बँकांच्या व विमा कंपन्यांच्या नियोजित कायद्यांत त्यांनीं कांहीं सुधारणा सुचविल्या.

कारखान्यांच्या व मालाच्या युद्धधोक्याच्या विमाहुकुमांची मुदत ३१ मार्च १९४५ अखेर संपत आहे. या मुदतीपर्यंत कारखान्यांच्या युद्धधोका विमा फंडांत एकोणीस कोटींहून व मालाच्या युद्धधोका विमाफंडांत साडेएकवीस कोटि रुपयांहून अधिक रक्कम निव्वळ शिल्लक राहील. आता युद्धधोका पूर्वीपेक्षा निश्चितच कमी झाल्यामुळें सरकारनें आणखी एक वर्षपर्यंत कारखान्यांच्या व मालाच्या युद्धनुकसानीची जोखीम प्रिमियम न घेतां स्वीकारावी, अशीहि त्यांनीं सूचना केली.

**यु. किं. कमर्शिअल कॉर्पोरेशन**

ब्रिटिश सरकारची गाजलेली व्यापारी संस्था, दि युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन, ही जर्मनीच्या पराभवानंतर किमान १८ महिने तरी चालू राहील, असें सर जॉन अँडरसन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें. खासगी व्यापाऱ्यांशीं ही कंपनी स्पर्धा करणार नाहीं, उलट त्यांस ती मदत करील, असें आश्वासन त्यांनीं ब्रिटिश व्यापाऱ्यांस दिलें.


गेल्या ३० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले

**फिव्हर एस.**

सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २

- होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धी करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ८०
- बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय. किं. रु. २

पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.

तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.

एजन्सी नसलेल्या गावीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.

सुधा एजन्सी,

३८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

अनुक्रमणिका,


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २ | ६ इंग्रजांची निर्गत व्यापाराची भूक ... ... | ६ |
| २ भावी औद्योगिक संवर्धनाचें स्वरूप ... ... | ३ | ७ जयशंकर मिल्स ... | ७ |
| ३ यंत्रसामुग्रीच्या आयातीची व्यवस्था ... ... | ४ | ८ कोळशाच्या खाणींचें उत्पादन ... ... ... | ८ |
| ४ हिंदी आयुर्विमा व्यवसाय | ४ | | |
| ५ स्फुट विचार ... ... शेतीच्या धंद्याचा सर्वांगीण विचार—"आर्थिक योजनांची साथ"—हिंदी कपाशीचें भवितव्य. | ५ | | |



# अर्थ

बुधवार, ता. ३, जानेवारी १९४५


## भावी औद्योगिक संवर्धनाचें स्वरूप

हिंदी जनतेच्या रहाणींत सुधारणा होण्याकरितां देशांतील उद्योगधंदे, शेती, व्यापार इत्यादि आर्थिक व्यवहारांचीं साधनें अधिक विस्तृत आणि कार्यक्षम करणें अगत्याचें असून हें संवर्धन घडवून आणण्याच्या प्रयत्नाच्या मुळाशीं निश्चित योजनात्मक धोरण असलें पाहिजे ह्या बाबतींत सामान्यतः एकमत आहे. युद्धोत्तर काळांतील आर्थिक उन्नतीच्या योजना हिंदी धंदेवाले, कामकरीवर्गाचे प्रतिनिधी आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांनीं तयार केल्या आहेत आणि त्यांचे संबंधांतील स्वतःच्या मूलभूत कल्पनांचे खुलासे प्रसिद्ध केले आहेत. सर्व जातींच्या मालांचें उत्पादन वाढवणें आणि त्या उपायानें शेतकरी व कामकरी ह्यांच्या प्राप्तींत भर घालून एकंदर जनतेस अन्नवस्त्र व सुखसोयी ह्यांचा वाढता पुरवठा करणें हें आर्थिक संवर्धनाच्या योजनांचें मुख्य उद्दिष्ट आहे. पण तें साध्य होण्यास भांडवल, यंत्रसामुग्री, कुशल कारागीर, संघटन इत्यादि साधनें पुरवावीं लागतील त्यांची व्यवस्था कशी करावयाची हा येथें महत्त्वाचा प्रश्न आहे आणि शेती व निरनिराळ्या प्रकारांचे लहान-मोठे धंदे ह्यांच्या गरजांस अनुसरून तो तपशीलवार सोडवावा लागणार आहे. हा सबंद विषय गुंतागुंतीचा व अवघड होण्याचें कारण, धंद्यांची व त्यांच्या गरजांची विविधता आणि मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या धोरणांत त्याचबरोबर एकसूत्रीपणा असण्याची आवश्यकता हें होय. कित्येक मूलग्राही बाबींची व्यवस्था सर्वस्वी हिंदुस्थान सरकारच्या हातांत आहे. उदाहरणार्थ, जकाती, प्राप्तीवरील कर, चलन व हुंडणावळ ह्यांविषयींच्या धोरणांचा संबंध औद्योगिक प्रगतीशीं निकट असून त्या धोरणाची दिशा हिंदुस्थान सरकारच निश्चित करूं शकेल. पण शेतीसारख्या महत्त्वाच्या धंद्याबाबतचे प्रश्न प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत येतात. ह्याकरितां प्रांतिक व मध्यवर्ती योजनांत एकसूत्रीपणा निर्माण करणें आवश्यक ठरतें.

प्रमुख हिंदी कारखानदारांची आर्थिक संवर्धनाची योजना प्रसिद्ध झाल्यावर इंडिअन फेडरेशन ऑफ लेबरनें कामकरीवर्गाच्या वतीनें आपली जनता-योजना तयार करून देशापुढें मांडली आहे. भावी औद्योगिक संवर्धन केवळ मोठे भांडवलवाले व कारखानदार ह्यांच्या कल्पनेप्रमाणें व त्यांच्या फायद्यासाठी केलें न जातां कामकरीवर्गाच्या आकांक्षा, हितसंबंध व सत्ता ह्यांच्या दृष्टीनें पुनर्घटनेची योजना आखली गेली पाहिजे अशी वरील फेडरेशनची मागणी आहे. युद्धपरिस्थितींत सबंद हिंदी जनतेनें स्वार्थत्याग केला आहे आणि तिच्या हितासाठी राष्ट्रीय सरकाराच्या सहायानें उद्योगधंद्यांची प्रगति घडवून आणली जाणार असल्यानें विशिष्ट व अल्पसंख्याक वर्गाच्या हातीं आर्थिक व सामाजिक सत्ता एकवटली जातां कामा नये असा युक्तिवाद समाजसत्तावादी कामकरी वर्गाच्या बाजूनें केला जाणें स्वाभाविक आहे. औद्योगिक संवर्धनाची योजना पार पाडण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारावर मुख्यत्वेंकरून असल्याकारणानें तिच्या संबंधांतलें घटनात्मक सर्वसाधारण धोरण त्यास स्पष्ट करणें आवश्यक आहे. ही कामगिरी विशेषतः सर अर्देशीर दलाल व सर ए. रामस्वामी मुदलियार ह्या मंत्र्यांनीं उचलणें क्रमप्राप्त आहे. युद्धपरिस्थितीमधून शांततेच्या परिस्थितींत संक्रमण होत असतांना उद्योगधंदे व व्यापार ह्यांची घडी पुन्हां नीट बसवली जाण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें कोणत्या योजना आखल्या आहेत ह्याची माहिती सर ए. रामस्वामी ह्यांनीं नुकतीच दिली. ह्याचप्रमाणें सर आर्देशीर दलाल ह्यांनीं सरकारच्या औद्योगिक अभिवृद्धीविषयक पंचवार्षिक योजनेच्या स्वरूपाचें दिग्दर्शन केलें. उद्योगधंद्यांचा विस्तार झपाट्यानें करण्याचा सरकारचा निश्चय असल्याचें आणि पहिल्या पांच वर्षांच्या योजनेंत प्रांतिक सरकारांस स्वतःच्या उत्पन्नांतून द्रव्यसहाय देण्याचें त्यानें ठरवलें असल्याचें त्यांनीं सांगितलें.

हिंदी कारखाने, धंदे व शेती ह्यांची त्वरित व मोठ्या प्रमाणावर प्रगति घडवून आणली जावयाची आहे, ती खाजगी मालकीच्या भांडवलानें व सत्तेनें केली जावी किंवा तिच्यावर राष्ट्रीय सरकार व कामकरीवर्ग ह्यांची हुकमत असावी हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला आहे, त्याचा उल्लेख वर आलेला आहे. त्यासंबंधांतलें हिंदुस्थान सरकारचें धोरण सर आर्देशीर ह्यांनीं असंदिग्ध रीतीनें स्पष्ट केलें आहे. भांडवलवाले आणि औद्योगिक नियोजक व व्यवस्थापक स्वतःच्या फायद्याच्या हेतूनें धंदे काढीत व चालवीत असले तरी त्यांच्या धडाडीचा व कौशल्याचा फायदा सबंद राष्ट्रास त्याच्या आर्थिक उन्नतीस सहाय मिळाल्यानें होत असल्यास तो राष्ट्रानें वायां जाऊं न देतां अवश्य करून घेतला पाहिजे ही विचारसरणी त्यांनीं पुढें मांडली. देशांतील धंद्यांवरची सरकारची सत्ता त्यांच्या स्वरूपावर अवलंबून राहील. दारूगोळ्यासारखें लढाऊ सामान सरकारी कारखान्यांमध्येंच बनवलें गेलें पाहिजे; कित्येक धंदे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें आवश्यक असून खाजगी भांडवलानें चालवले जाण्याइतके फायदेशीर होण्यासारखे नसल्यास तेहि सरकारनें हातीं घेतले पाहिजेत. विजेचा पुरवठा, ट्राम्वेज, टेलिफोन ह्यांसारखे धंदे सरकारनें स्वतःच्या नियंत्रणाच्या कक्षेंत आणले पाहिजेत. राष्ट्रीय जीवनास जिव्हाळ्याचे असलेले किंवा मक्तेदारीच्या वर्चस्वाखालीं जाणारे धंदेहि ह्याच सदरांत येतात. ह्या रीतीनें युद्धोत्तर काळांत देशांतील धंद्यांत सरकारचा हात मोठ्या प्रमाणावर राहील, पण योजिलेलें औद्योगीकरण एवढ्या मोठ्या क्षेत्रांत व इतक्या त्वरित वेगानें व्हावें लागेल कीं खाजगी भांडवल आणि धडाडी ह्यांचें सहकार्य घेतल्यावांचून तें यशस्वी होऊं शकणार नाहीं अशी विचारसरणी अंगीकारून सर आर्देशीर ह्यांनीं शुद्ध भांडवलशाही व निवळ समाज-

सत्तामूलक आर्थिक घटना ह्यांच्यामधली भूमिका हिंदुस्थान सरकारनें घेतली असल्याचें सांगितलें आहे. देशी उद्योगधंद्यांची चौकशी करून त्यांस रक्षण देण्याच्या बाबतींत सूचना करण्यासाठी कायमचें टारिफ बोर्ड नेमणें, धंद्यांस लागणारी यंत्रसामुग्री देशांत तयार होण्याची व्यवस्था करणें, यांत्रिक शिक्षण देण्यासाठी मध्यवर्ती संस्था स्थापणें, धंदेवाल्यांस बाहेरून यांत्रिक उपकरणें आणावयाचीं असल्यास त्या कामीं सहाय देणें इत्यादि गोष्टी त्वरित औद्योगीकरणाच्या दृष्टीनें हातीं घेण्याचें सरकारनें ठरवलें असल्याविषयींची माहितीहि त्यांनीं दिली आहे.

### यंत्रसामुग्रीच्या आयातीची व्यवस्था

युद्धसमाप्तीबरोबर लोकांच्या नित्याच्या उपयोगाच्या वस्तूंस चोहोंकडे एकदम मोठी मागणी उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. लढाऊ मालाच्या बनावटीवर सध्या सर्व देशांत राष्ट्रीय उत्पादक शक्ति एकवटली जात आहे आणि त्या योगानें सामान्य जनतेच्या अनेक दैनंदिन गरजा आज अतृप्त स्थितींत रहात आहेत. ही तुंबलेली मागणी एकदम उसळी खाल्ल्यावांचून रहावयाची नाहीं. त्याचप्रमाणें ह्या मालाच्या उत्पादनास आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्रीसहि मोठी मागणी येणार आहे. कारण युद्धकाळांत यंत्रें व हत्यारें ह्यांचा पुरवठा झालेला नाहीं. तसेंच, जुन्या धंद्यांचा विस्तार आणि नवीन धंद्यांची स्थापना ह्यांचेसाठीहि यंत्रसामुग्री लागणार आहे. हिंदुस्थानांत यंत्रें तयार करण्याचे कारखाने नसल्यानें येथील धंदेवाल्यांस तीं बाहेरून आयात केलीं पाहिजेत. विशेषत: युद्धोत्तर औद्योगिक संवर्धनाच्या योजनेस अनुसरून देशाची प्रगति मोठ्या प्रमाणावर व्हावयाची असेल तर यंत्रसामुग्रीच्या आयातीची तरतूद एव्हांपासून आवश्यकतेप्रमाणें केली जाणें अपरिहार्य आहे. युद्धसमाप्तीनंतर आयात व्यापारावरील सध्याचें नियंत्रण कांहीं वर्षें कमी-अधिक चालू राहील आणि आयातींच्या किंमतीचा पैसा परदेशांत पाठवण्यासाठी परराष्ट्रीय हुंड्यांचा पुरवठा व्हावा लागेल. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें हिंदी धंदेवाल्यांस व कारखानदारांस त्यांनीं परदेशांतून आणावयाच्या यंत्रसामुग्रीच्या मागणीची माहिती पुरवावी आणि स्वत:च्या गरजा नोंदून घ्याव्या असें सुचवलें आहे. ह्यासंबंधांत अर्ज कोणास व कसे करावे ह्याचा ठोकळ तपशीलहि सरकारनें प्रसिद्ध केला आहे त्याकडे कारखानदारांचें लक्ष जाणें आवश्यक आहे. अमेरिका व स्वित्सर्लंड ह्या देशांवरील हुंड्यांचा पुरवठा मर्यादित असल्यानें त्यांचेकडून मागवण्यांत येणाऱ्या मालाची कसोशीनें चौकशी केली जाईल. स्टर्लिंगमधील हुंड्यांचे बाबतींत कोणतीच अडचण भासणार नाहीं; पण ब्रिटिश मालाचे संबंधांतहि तो योग्यवेळीं व हवा तसा मिळावा एवढ्यासाठी एव्हांपासून सरकार करीत असलेल्या यादींत तो दाखल केला गेला पाहिजे. नवीन देशी धंद्यांस लागणारीं यंत्रें, त्यांस संरक्षण व सवलती मिळण्याची शक्यता असल्यावांचून, आज मागवणें कारखानदारांस कठिण जाईल ही येथें अडचण आहे. त्याचप्रमाणें, जरूर त्या मालाच्या किंमती काय असतील ह्याची कल्पनाहि तो मागवूं इच्छिणारांस आली पाहिजे. हिंदी धंदेवाल्यांनीं आपल्या मागण्या सरकाराच्या यादींत विशेष प्रमाणांत नोंदवलेल्या दिसत नाहींत, ह्याचें कारण वरील अडचणींत सापडण्यासारखें आहे, असें वाटतें.

## हिंदी आयुर्विमा व्यवसाय

### १९४३ चे ताजे आकडे

हिंदी विमा वार्षिक प्रसिद्ध होण्यास फार उशीर होतो, त्याकारणानें त्यांतील आकडे शिळे झालेले असतात, अशी फार जुनी तक्रार आहे. १९४२ च्या वार्षिकापेक्षा १९४३ चें वार्षिक चार महिने लवकर म्हणजे १९४४ च्या जुलैंत प्रसिद्ध झालें. १९४४ चें वार्षिक त्याहिपेक्षा लवकर, म्हणजे १९४४ च्याच डिसेंबरांत प्रसिद्ध झालें आहे. ह्या वार्षिकांत नेहमीप्रमाणें आदल्या वर्षीच्या म्हणजे १९४३ च्या विमाव्यवसायाची माहिती आलेली आहे. पहिले हिंदी सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स ह्यांचा हा पहिलाच रिपोर्ट आहे. १९४३ च्या आकड्यांपैकी कांहीं महत्त्वाचे आकडे खालीं दिले आहेत:—

| | |
|---|---|
| देशी व विदेशी कंपन्यांचें हिंदुस्थानांतील नवें काम | ७२ कोटि १२ लक्ष रु. |
| हिंदुस्थानांतील कामांत हिंदी कंपन्यांचा वाटा | ६२ कोटि ९४ लक्ष रु. |
| ब्रिटिश कंपन्यांचा वाटा | ५ कोटि २९ लक्ष रु. |
| विम्याची सरासरी रकम ( हिंदी कं. ) | २,२२७ रु. |
| विम्याची सरासरी रकम ( विदेशी कं. ) | ६,७४९ रु. |
| १९४३ अखेर चालू काम | १४ कोटि ८४ लक्ष रु. |

हप्त्यांचे ३६९ कोटि रुपयांचे १८,२१,००० विमे.

| | |
|---|---|
| हिंदी कंपन्यांचें हिंदुस्थानाबाहेरील काम | २ कोटि ३० लक्ष रु. |
| १९४३ अखेर बाहेरील चालू काम | १६ कोटि ८७ लक्ष रु. |
| हिंदी कंपन्यांचें १९४३ मधील एकूण काम | ६५ कोटि २४ लक्ष रु. |
| विमासाठी फंड | ८४ कोटि २८ लक्ष रु. |

( ८ कोटि, २३ लक्ष रु. वाढ )

पडलेला व्याजाचा दर ( मुळांत इनकमटॅक्स कापून ) ३·८८% ( १९४२:३·९४%; १९३९:४·६८% )

व्यवस्थेचा खर्च ( हप्त्यांच्या उत्पन्नाशी प्रमाण ) २७·९% ( १९४२ : २६·७%; १९३९ : ३३·२% )

### मालाचा युद्धविषयक धोक्याचा विमा

वॉर रिस्क ( गुड्स ) इन्शुअरन्स योजनेस अनुसरून उतरावयाच्या विम्याचा हप्ता दर शेकडा दरमहा १ आ. ३ पै सध्या आहे, तो १९४५ च्या पहिल्या तिमाहींत १ आ. राहील. म्हणजे, हप्त्याचा दर ३ पैनीं उतरविण्यांत आला आहे.


**ढेकूण ठार ! ढेकूण ठार !! ढेकूण ठार !!!**

बाटलीची किंमत ... १–८–०

नमुना बाटली ... ०–६–०

आय. ए. सी. आय. लि.
कर्वे रोड, पुणें ४.

## स्फुट विचार

### शेतीच्या धंद्याचा सर्वांगीण विचार

शेती करणारे आणि त्या धंद्यावर चरितार्थाकरितां अवलंबून असणारे ह्या देशांत बहुसंख्य आहेत. जनतेपैकीं ऐशीं टक्के लोकांच्या दृष्टीनें जिव्हाळयाचा हा शेतीचा धंदा किफायतशीर झाला पाहिजे ही गोष्ट सर्वमान्य असून युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत तिला महत्त्वाचें स्थान देण्यांत येत आहे. तथापि, शेतीची परिस्थिति व शेतकरी वर्गाची अवस्था ही हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत भिन्नभिन्न आहेत आणि त्यांत सुधारणा करण्याचा एक व सोपा तोडगा उपयोगांत आणला जाणें कठिण आहे. यास्तव हिंदी शेतीची तपशीलवार आणि विश्वासनीय माहिती त्या धंद्याच्या सूक्ष्म अभ्यासानें मिळवली गेली पाहिजे आणि करावयाची उपाययोजना तिच्यावर आधारली गेली पाहिजे, हें उघड आहे. सध्या शेतीच्या सुधारणेविषयीं योजना प्रसिद्ध झालेल्या आहेत त्या ह्या दृष्टीनें अपुऱ्या आहेत. ह्या गोष्टीकडे सर मणीलाल नानावटी ह्यांनीं शेतीच्या आर्थिक अभ्यासाच्या उद्देशानें निघालेल्या संस्थेच्या यांच्या वार्षिक सभेंत केलेल्या अध्यक्षीय भाषणांत नुकतेंच लक्ष वेधलें आहे. जमीन धारणाच्या भिन्नभिन्न पद्धती ह्या देशांत रूढ आहेत आणि खंडानें जमिनी करणारे असंख्य लोक आहेत. शेतीच्या उत्पादकतेवर ह्या पद्धतींचा काय परिणाम होत आहे ह्याचा विचार व्हावा तसा झालेला नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. खेडेगावीं लोकांच्या पिढीजात कल्पना, जमिनीची होणारी विशिष्ट रीतीची वाटणी, शेतांची लहान व अनुत्पादक तुकड्यांत विभागणी, इत्यादि विविध अंगांचें यथातथ्य ज्ञान असल्यावांचून शेतीच्या धंद्याची सुधारणा करण्याचे प्रयत्न अपेक्षेप्रमाणें फलद्रूप होणें शक्य नाहीं असा अभिप्राय सर मणीलाल ह्यांनीं व्यक्त केला आहे. स्वतःच्या मालकीच्या जमिनींत पिकें करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संघटनाची पद्धति उपयोगी होईल असें त्यांचें मत आहे. जमीन धारणाच्या सध्याच्या कायदेशीर व्यवस्थेंत योग्य बदल घडवून आणणें ह्यासाठी आवश्यक होईल हें स्पष्ट आहे. शेतीच्या परिस्थितीविषयींची आकडेवार माहिती गोळा करण्याचें महत्त्व प्रतिपादण्यांत येत आहे त्याच्या रहस्याविषयीं अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

---

### " आर्थिक योजनांची साथ "

देशांतील उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांची घडी युद्ध संपतांच नीट बसवावी लागेल आणि त्यासाठीं विचारपूर्वक योजना तयार केल्या जाऊन त्यांच्या अंमलबजावणींत सरकारास पुढाकार घ्यावा लागेल, ह्या गोष्टींचेबाबत सार्वत्रिक एकवाक्यता आहे. तथापि, विचारवान लोक ह्या पुनर्रचनेचीं चित्रें आपापल्या कल्पनांप्रमाणें भिन्न भिन्न रीतींनीं रंगवीत आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्ते आणि समाजसत्तेचे पुरस्कर्ते ह्यांचेमध्यें आर्थिक योजनांच्या मूलभूत ध्येयांबाबत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. वैयक्तिक कर्तृत्वाची महती गाणारांसहि ह्यापुढें आपल्या उद्योगधंद्यांवर राष्ट्रीय राजसत्तेचें नियंत्रण कमी-अधिक प्रमाणांत यावें लागेल ह्याची जाणीव आहे. ह्याच्या उलट, समाजसत्तावाद्यांस अशी भीति वाटत आहे कीं सरकारी म्हणजे राष्ट्रीय सहायानें होणाऱ्या देशाच्या औद्योगीकरणाचा फायदा भांडवलवाल्यांच्या पदरांत पडेल आणि सामान्य जनतेस आर्थिक प्रगतीचा योग्य हिस्सा मिळणार नाहीं. ह्या तीव्र मतभेदांस अनुलक्षून सर होमी मोदी ह्यांनीं एम्प्लॉयर्स असोसिएशनच्या सभेंत भाषण करतांना आर्थिक योजनांस हिंदुस्थानांत अलीकडे ऊत आला आहे असें म्हणून देशाच्या औद्योगिकरणाचें तत्त्व कोणतें असावें ह्याविषयीं स्वतःचा अभिप्राय प्रकट केला. रशियानें आर्थिक क्रांति घडवून आणली आणि युद्धांत स्तुत्य पराक्रम केला आहे ह्यावरून त्या देशाचें अंध अनुकरण हिंदुस्थानांत केलें जावें ह्या कल्पनेस त्यांनीं विरोध केला. सर्वस्वी अनियंत्रित भांडवलशाही जशी त्याज्य आहे तशीच सर्वाधिकारी राजसत्तेची पद्धतिहि अनिष्ट आहे असें ते म्हणाले. ह्या देशांत उद्योगधंद्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर व्हावयाचा असेल तर वैयक्तिक कल्पकता आणि कार्यतत्परता ह्यांस पूर्ण वाव मिळाला पाहिजे आणि सरकारनें व्यक्ति-स्वातंत्र्य व स्पर्धा ह्यांचा दुरुपयोग होत नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेण्यांत आपल्या सत्तेचा उपयोग करावा व ह्या मर्यादेचें अतिक्रमण करूं नये असें त्यांनीं सुचवलें. सबंध राष्ट्राच्या आणि विशेषतः सामान्य बहुसंख्य जनतेच्या हिताचे दृष्टीनें राजसत्तेनें देशाच्या आर्थिक व्यवहारांत किती हात घालावा हा येथें मुख्य प्रश्न आहे; आणि त्याचें उत्तर देतांना दुसऱ्या देशांचा अनुभव व हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितीची जाणीव हीं हिशेबांत घेतलीं गेलीं पाहिजेत.

---

### हिंदी कपाशीचें भवितव्य

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या आणि पर्यायानें सबंध राष्ट्राच्या आर्थिक हिताच्या दृष्टीनें कपाशीचें पीक महत्त्वाचें आहे. पण त्याचेसंबंधांत दोन प्रमुख गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही आहे कीं हिंदी कापसापैकीं मोठा भाग आखूड धाग्याचा व कनिष्ठ प्रतीचा असतो आणि दुसरी ही आहे कीं हिंदी कपाशीचें मोठें गिऱ्हाईक युद्धापूर्वी जपान असे आणि त्या देशांत होणारी निर्गत आतां स्वाभाविक रीतीनेंच बंद पडली आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं हिंदी कपाशीस कमी मागणी येत असल्यानें ह्या मालाच्या किंमती उतरून त्या शेतकऱ्यांस फायदा देण्याचे ऐवजीं नुकसानकारक होत आहेत. त्याचबरोबर हिंदी गिरण्यांत लांब धाग्याच्या कापसास अधिक मागणी येत आहे. आणि ती देशांतल्या देशांत पुरवली जाणें अवघड होत आहे. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून आणि देशांत धान्याचा पुरवठा वाढवण्याच्या हेतूनें प्रांतिक सरकारांनीं आखूड धाग्याच्या कापसाचें पीक मर्यादित करण्याच्या योजना अमलांत आणल्या आहेत. ह्या कपाशीची जागा धान्यांच्या पिकानें कांहीं प्रमाणांत घेतली असली तरी हा उपाय अपेक्षेस अनुसरून यशस्वी झालेला नाहीं. कापसाच्या किंमती खाली जाऊन शेतकऱ्यांचें नुकसान होऊं नये ह्याकरितां हिंदुस्थान सरकारनें ठराविक भावानें पुष्कळसा कापूस खरेदी करून ठेवला आहे. ह्याशिवाय कापसाचे व्यापारी साठे पडून राहिले आहेत. ह्या सर्व मालाचा उठाव करण्याचा अवघड प्रश्न आतां उपस्थित झाला आहे. सेंट्रल कॉटन कमिटीनें ह्या विषयाचा सांगोपांग विचार करून आखूड धाग्याच्या कपाशीचें क्षेत्र मर्यादित होण्याबाबत विशिष्ट योजना सुचविली आहे. हिंदी कपाशीची पैदास आणि तिला असलेली व येऊं शकणारी मागणी ह्यांचा मेळ घालणें आवश्यक आहे.

## इंग्रजांची निर्गत व्यापाराची भूक भयंकर वाढणार

### ब्रिटिश सत्तेखालील हिंदुस्थानावर त्याचा परिणाम

युद्धापूर्वीच्या मानानें १९४३ सालीं ब्रिटिशांची निर्गत फक्त २७% झाली, असें ताज्या आकड्यांवरून दिसतें. ब्रिटिश निर्गत व्यापाराची शक्य तेवढी वाढ करण्याचा जोराचा प्रयत्न १९४० सालीं सुरू करण्यांत आला, परंतु युरोपांतील देश जर्मनीनें व्यापल्याकारणानें निर्गत कमीच झाली. १९४० मधील शत्रूच्या इंग्लंडवरील बॉंबहल्ल्यामुळें परिस्थिति आधिकच बिघडली. खंड-उसनवार पद्धतीच्या योजनेमुळें १९४१ सालीं परिस्थिति पालटली, परंतु कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें अगदीं जरूरीच्याच ठिकाणीं माल पाठविणें ग्रेट ब्रिटनला शक्य झालें. १९४२ सालीं आशियांतील बाजारपेठाहि ब्रिटिशांच्या हातून गेल्या आणि त्याचाहि निर्गत व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला. कोळसा, लोकर, लोखंड, पोलाद, यंत्रसामुग्री, कापड, मोटारी इत्यादींची निर्गत फारच थंडावली. १९४४ सालांतील निर्गतीचे आकडेहि ब्रिटिशांना समाधानकारक नाहींत व ही घसरगुंडी अद्याप चालूच आहे. ह्या उलट अमेरिकेचा ह्याच काळांत निर्गत व्यापार ३००% वाढला आहे ! ग्रेट ब्रिटननें सध्यांच्या निर्गतीच्या सहा पट तरी निर्गत युद्धसमाप्तीनंतर केल्याविना त्या देशांतील लोकांस पूर्वीचे सुखाचे दिवस दिसणार नाहींत. ब्रिटिश निर्गत वाढविण्याची त्या देशाचें सरकार शिकस्त करील, हें उघड आहे. अमेरिकेच्या स्पर्धेची ग्रेट ब्रिटनला सहाजीकच भीति वाटत आहे आणि ह्यासाठीं अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांनीं युद्धोत्तर धोरण सहविचारानें आखावें असा ब्रिटिश पुढाऱ्यांचा आग्रह आहे.

### अमेरिकेच्या हिताचा ब्रिटिश सल्ला

सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं लंडन येथील अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्समधील आपल्या भाषणांत अमेरिकेच्या तीव्र स्पर्धेचा उल्लेख केला. "अमेरिकेची उत्पादनशक्ति तयार मालाचे पाट सर्व जगभर सोडील, का निर्गत करणाऱ्या इतर राष्ट्रांच्या व्यापारास धक्का बसूं नये ह्या बेतानें आपलें निर्गतीचें धोरण आखील ?" असा प्रश्न विचारून अमेरिकेनें दुसरा मार्ग पत्करणें हेंच तिच्या हिताचें आहे, असा सल्ला त्यांनीं दिला. "न्यूयॉर्क टाइम्स" नें त्यास समर्पक उत्तर दिलें. तें पत्र म्हणतें, "युद्धानंतर अमेरिका इतरांपक्षां ज्यास्त उत्तम व स्वस्त माल तयार करूं शकली, तरी तिनें त्याचें उत्पादन व विक्री करूं नये, असें सर जॉर्ज शूस्टर सांगतात. ह्याचा सर्वच दृष्टींनीं वाईट परिणाम होईल व परदेशांतील गिऱ्हाइकाचेंहि त्यामुळें नुकसान होईल. चांगला जिन्नस स्वस्त मिळण्याचे ऐवजीं त्याचे पदरीं महाग व वाईट जिन्नस पडेल. जागतिक उत्पादन व संपत्ति पूर्वस्थितीवर आणण्याचा हा मार्ग खचित नाहीं. ज्या मानानें अमेरिका इतर देशांत माल खपवील त्या मानानें तिला तेथें खरेदीहि करावी लागेल. ब्रिटिश माल अमेरिकेस घ्यावाच लागेल. व्यापाराचा स्वाभाविक ओघ थांबविण्यांत कांहींच फायदा नाहीं." ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेमधील व्यापारी स्पर्धेचीं चिन्हें आतांच दिसूं लागलीं आहेत व त्याचा दुष्परिणाम इतर देशांवर काय होईल हें पहाणेंहि आजच अगत्याचें झालें आहे.

### इंग्लंडच्या प्रभुत्वाखालील हिंदी बाजारपेठ

हिंदुस्थानापुरता विचार करतांना, हा देश ब्रिटिश साम्राज्याचा एक अत्यंत मोठा घटक आहे आणि तो स्वतंत्र नसून, ब्रिटिश पार्लमेंटचें त्यावर प्रभुत्व आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. अमेरिकेप्रमाणें रशिया, कानडा, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशहि आपल्या स्वतःच्या भरभराटीचे दृष्टीनें आपल्या युद्धोत्तर योजना आखतील, हें उघड आहे आणि त्यांचेवर ग्रेट ब्रिटनचें प्रभुत्व नाहीं. हिंदुस्थानानें ब्रिटिश सरकारासाठीं युद्धकालांत केलेल्या खर्चाची अद्याप वसुली व्हावयाची आहे, आणि ग्रेट ब्रिटन ह्या कर्जाची फेड मालाच्या निर्गतीचे स्वरूपांतच करूं शकणार, हें उघड आहे. आपलें हिंदुस्थानाचें देणें फेडण्यासाठीं व आपल्या राष्ट्राची आर्थिक प्राप्ती वाढविण्यासाठीं हिंदुस्थानाकडे माल पाठविणें ग्रेट ब्रिटनला अपरिहार्य होईल. हिंदुस्थान सरकार हें ब्रिटिश-स्वाधीन असल्याकारणानें आपल्या सरकारचें धोरण ब्रिटिश मालाच्या आयातीस पोषक न झालें, तरच आश्चर्य. अमेरिकन मालाच्या स्पर्धेस ब्रिटिश मालास तोंड द्यावें लागेल व त्यास हिंदुस्थानावरील ब्रिटिश राजकीय सत्ता निश्चित उपयोगी पडेल. ग्रेट ब्रिटनच्या स्वतःच्या पूर्ण अधिकाराखालीं एवढी मोठी बाजारपेठ ब्रिटिश साम्राज्यांत दुसरी कोणतीहि नाहीं. हिंदुस्थानासहि आपलें कर्ज वसूल करावयाचें असल्यास ब्रिटिश मालच घ्यावा लागेल; नाहींतर कर्ज सोडून देण्याची तयारी ठेवावी लागेल.

### किंमतींचें मान इंग्लंडला अनुकूल होणार

युद्धसमाप्तीनंतरच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करतांना निरनिराळ्या देशांतील किंमतींचें मान लक्षांत घेणें आवश्यक आहे. यंत्रसामुग्री वगैरे पक्क्या मालाच्या उत्पादनाचा खर्च एकाएकीं उतरणार नाहीं व त्यांची किंमत खाली येण्यास बराच अवधि लागेल. शेतीच्या उत्पादनाची म्हणजे धान्य व कच्चा माल ह्यांची किंमत मात्र तावडतोब कमी होईल. म्हणजे, ब्रिटिश निर्गतीच्या मालाची भारी किंमत व हिंदी निर्गतीच्या मालाची उतरलेली किंमत ह्यांमध्यें देवघेव होऊन थोड्या ब्रिटिश जिनसांसाठीं अधिक हिंदी माल विनिमयांत द्यावा लागेल. त्यांत अर्थातच हिंदुस्थानाचा, त्याचप्रमाणें मागासलेल्या सर्वच देशांचा निश्चित तोटा आहे. कच्चा व पक्का माल ह्यांचे किंमतींत एकाच मापानें घट होणार नाहीं, ही गोष्ट अर्थात् ब्रिटिशांना अनुकूल अशीच आहे. युद्धसमाप्तीनंतर पक्क्या मालास सर्व जगभर प्रचंड मागणी येणार असल्याकारणानें पक्क्या मालाचा तुटवडा पडून, तो माल तयार करून विकणाऱ्या राष्ट्रांस नामी संधी प्राप्त होईल व परराष्ट्रीय व्यापार इंग्लंडसारख्या देशांस अनकूल होईल. गेल्या महायुद्धानंतरच्या काळांत अगदी असेंच घडलें. ब्रिटिश निर्गत व्यापार तावडतोब वाढला नाहीं, परंतु आयात होणारा माल इतका स्वस्त होता, कीं कमी निर्गतींत काम भागून ग्रेट ब्रिटनचा येण्या-देण्याचा हिशेब पुरा होऊं शकला. कच्चा माल पाठविणाऱ्या देशांत मंदीमुळें कहर झाला, तरी ब्रिटिश जीवनावर त्याचा फारसा वाईट परिणाम होऊं शकला नाहीं.

### आतांची परिस्थिति फार बिकट

त्या वेळच्या परिस्थितीपेक्षा आतां येणारी परिस्थिति किती तरी बिकट आहे. ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रांत गुंतलेलें भांडवल संपुष्टांत आलें असल्याकारणानें, व्याज व डिव्हिडंड ह्यांची कमाई बंद पडली आहे. आगबोटींच्या व विमानांच्या वहातुकीमधील

ग्रेट ब्रिटनचें स्थान दुय्यम दर्जाचें झालें आहे, त्यामुळें वहातुकीच्या व्यवसायांतील उत्पन्नाचा पूर्वीसारखा भरवसा राहिलेला नाहीं. कष्ट करून माल तयार करणें व त्याच्या निर्गतींतून कर्ज फेडून पोट भरणें ब्रिटिशांच्या नशिबीं येणार आहे. ही अडचण शक्य तेवढी दूर करण्याचा प्रयत्न ग्रेट ब्रिटन हरतऱ्हेनें करील हें उघड आहे. हिंदुस्थानासंबंधीं ब्रिटिश धोरणाचा विचार करतांना, ही पार्श्वभूमि आपण सदैव लक्षांत बाळगली पाहिजे.

### राष्ट्रीय सरकार असण्याचें आर्थिक महत्त्व

हिंदी शेतकऱ्यांच्या रहाणींत सुधारणा घडवून आणणें हें हिंदी बाजार पेठेंत आपला माल खपविण्याचें प्रमुख साधन आहे असें ब्रिटिश व्यापारी संस्थांचे पुढारी उघडच बोलून दाखवितात. त्याचें मर्म समजून घेतलें पाहिजे. आपल्या लोकांची रहाणी सुधारली पाहिजे, हिंदुस्थानचें ग्रेट ब्रिटनकडील येणें वसूल झालें पाहिजे, हिंदुस्थानास मोठ्या प्रमाणावर यंत्रसामुग्रीची आयात करावी लागेल, वगैरे गोष्टी वादग्रस्त नाहींत. परंतु त्या घडून येत असतांना हिंदी राष्ट्र आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या परावलंबी होऊं लागलें, तर मात्र परिस्थिति चिंतनीय होईल. ह्यासंबंधांत कितीहि जागरूक राहिलें, तरी तें पुरें होणार नाहीं. लोकमतानुवर्ती राष्ट्रीय सरकार युद्धानंतर केव्हांतरी नव्हे, तर आज तात्काळ स्थापन होण्याचें महत्त्व राजकीयपेक्षा आर्थिकच अधिक आहे, हें उघड आहे.

---

### धी जयशंकर मिल्स बार्शी, लिमिटेड

३० सप्टेंबर १९४४ अखेरच्या वर्षात सर्वसाधारण झिजेवद्दलची रु. ४१,१५०-०-० ची रक्कम वजा जातां, कंपनीचे कामकाजांत रु. ४,८६,९०७-०-१ निवळ नफा झाला आहे. करांकरितां व एक्सेस प्रॉफिटस टॅक्स ऑर्डिनन्स नंबर १६ सन १९४३ चे अन्वयें, आवश्यक ठेवीकरितां ४,५०,००० रुपये कंपनीनें बाजूस ठेविले असून, बाकी रकमेंतून प्रत्येक शेअरास रु. ४ म्हणजे शेंकडा चार रुपये प्रमाणें, डिव्हिडंड, (टॅक्स कापून न घेतां) देण्यासाठी ३९,४५१३ रुपयांचा विनियोग करण्यांत आला.

चालकांनीं, सर्व कामगार व नोकर यांना, कांहीं शर्तीवर, त्यांना त्या वर्षाच्या एकूण मिळालेल्या मूळ मजुरीच्या अगर पगाराच्या रकमेच्या ½ रकमेइतका, जादा महागाई भत्ता दिलेला आहे. अहवालाचे वर्षांत, डायरेक्टरांनीं सुमारें तेरा हजारांच्या देणग्या दिलेल्या आहेत.

---

### मुरबाड ता. (जि. ठाणें) सहकारी खरेदी-विक्री युनियन लि.

वरील युनियन ता. २३-९-४३ रोजीं नोंदण्यांत आली. तिच्या सभासदांची संख्या आतां १७२ वर गेली आहे. त्यांत ६ शेतकी सोसायट्या आहेत. अहवालाचे तारखेस सोसायटीचें वसूल भांडवल १४,८७५ रु. होतें. साल अखेर युनियननें मुरबाड तालुक्यांतील १७३ खेड्यांतील ७०,३८९ लोकवस्तीसाठी मुरबाड केंद्र धरून ७ शाखा निरनिराळ्या गांवीं उघडलेल्या आहेत व तेथें नियंत्रित व अनियंत्रित दरांच्या जीवनोपयोगी वस्तू ठराविक प्रमाणांत योग्य दरानें वांटण्याची व्यवस्था केली आहे. अहवालाचे वर्षीं युनियननें २,१६,४०१ रुपयांचा व्यवहार करून ८,६०८ रुपये नफा मिळविला, सभासदांस ५% डिव्हिडंड दिलें.


## —राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंगबाबतची अडचण लक्षांत घेऊन—

## -गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

**साठे बंधू, "गोल्डन कोको"**

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.



प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर



महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे पहिले व फक्त १ च

*गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट*

## पेन्टर बेडेकर, ए. जी.,

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**इंग्लंडमधील कोळशाच्या खाणींचें उत्पादन घटत चाललें**

१९३८ ते १९४३ ह्या मुदतींत ब्रिटिश कोळशाच्या खाणींचें उत्पादन ३ कोटि, २० लक्ष टनांनीं घटलें. उत्पादनांतील घट अद्याप थांबलेली नाहीं. खाणींत काम करणारे कामगार म्हातारे होत चालले आहेत व त्यांची जागा घेणारे नवे तरुण कामगार कमी पडत चालले आहेत. अनुभवी कामगारांची संख्या मृत्यु, निवृत्ति, अपघात व आजार ह्यांमुळें घटत आहे. दर माणशीं कोळशाचें उत्पादन वाढविल्याविना ब्रिटिश खाणींस तेजी येणार नाहीं. युद्धापूर्वीचे उत्पादनाचे आकडे पाहिले, तर अमेरिकन खाण कामगार ब्रिटिश कामगाराच्या चौपट, पोलंडमधील कामगार दुप्पट व डच कामगार दीडपट कोळसा खणून गोळा करीत असे. ह्याचें कारण फक्त एकच, आणि तें म्हणजे ह्या सर्व देशांत इंग्लंडचे मानानें फारच मोठ्या प्रमाणावर खाणींतून यंत्रसामुग्रीचा उपयोग केला जातो, हें होय. इंग्लंडमध्येंहि ही सुधारणा घडवून आणावयाची म्हटल्यास, तेथील खाणींचे धंद्यांतील ती एक क्रांतिकारक बाब होईल, कारण खाणींची मालकी बदलल्याविना हें जमणार नाहीं. युद्धकालांत सुधारणेची फारशी आशाच नाहीं. अमेरिकेनें इंग्लंडचें कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठीं पुष्कळ यंत्रसामुग्री पाठविली, त्यांतील पुष्कळशी अद्याप बसविण्यांत आलेली नाहीं. कोळशाच्या खाणी सरकारी मालकीच्या कराव्या अशी इंग्लंडमध्यें जोराची मागणी आहे, परंतु आज ती मान्य करणें हें संयुक्त मंत्रिमंडळाच्या तत्त्वाविरुद्ध आहे, अशी खाणींच्या मालकांची तक्रार आहे.

**नागपूर येथें शतसंवत्सरी**

प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक नागपूर, सेंट्रल बँक, लँड मॉर्गेज बँक, डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट व प्रिमिअर हौसिंग सोसायटी या सहकारी संस्थांच्या नोकरवर्गाची ता. २१-१२-४४ रोजीं प्रॉव्हिन्शिअल बँकेच्या दिवाणखान्यांत इंग्लंडांतील रॉकडेल परगण्यांतील सहकारी कार्यकर्त्यांचें, त्यांच्या एका शतकांतील कामगिरीबद्दल अभिनंदन करण्याकरितां सभा भरली होती. सभेंत पुढील ठराव पास झाला:—

" नित्योपयोगी वस्तूंचा सामान्य जनतेला पुरवठा करण्याच्या प्रयत्नांत जी रॉकडेलच्या म्होरक्यांनीं प्रगतिपूर्ण कामगिरी बजाविली आहे त्याबद्दल ही सभा त्यांचें अंतःकरणापासून अभिनंदन करते. ' राकडेल योजना ' म्हणून संबोधिलेल्या त्यांच्या योजनेचीं मूलतत्त्वें आजही सहकारी क्षेत्रांतील खाद्यवस्तु विभाजनाच्या कार्यप्रणालीला आधारभूत आहेत, असें या सभेस वाटतें."

**बेळगाव बँक लि., बेळगांव**

वरील बँकेचें वसूल भांडवल ९९,८८० रुपये व रिझर्व्ह १७,५८३ रुपये असून तिचेकडे सुमारें २० लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. ओव्हरड्राफ्टनें घेतलेली रकम ३ लक्ष, ८८ हजार रुपये आहे. बँकेच्या शिंदगीपैकी ३ लक्ष रुपये रोख असून ५½ लक्ष रुपये रोख्यांत आहेत व १८½ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. एका वर्षांत बँकेचें खेळतें भांडवल १५½ लाखांवरून २५½ लाखांवर गेलें व नफा १८ हजार रुपये उरला. ७½% डिव्हिडंड देण्यांत आलें. बँकेच्या १० ठिकाणीं शाखा आहेत. श्री. एन. रामराव हे बँकेचे चेअरमन आहेत. बँकेस कर्जाचा व्यवहार मोठ्या प्रमाणांत मिळत आहे व कमिशनचेंहि उत्पन्न चांगलें आहे.

**पूना गेस्ट हाऊस**
संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्यांचे व्यापारी
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**
( Approved Re-treaders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १० जानेवारी, १९४५ अंक २




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

मुख्य कचेरीः ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS ( ABC )

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १/८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

सांडू
होमेलो
कम्पाउन्ड
( ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त )
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## विविध माहिती

### येत्या वर्षी ७९ कोटि रुपयांच्या खर्चास मंजुरी

रेल्वे स्टँडिंग कमिटीनें १९४५-४६ सालाकरितां ७९ कोटि रुपयांच्या खर्चास मान्यता दिली. त्यापैकी रेल्वे फाट्यांच्या खरेदीसाठी २ कोटि, २५ लक्ष रुपये लागतील.

### चलनविस्तार—१९४४ व १९४५

१९४३ सालीं हिंदी चलनांत सुमारें २५७ कोटि रुपयांची वाढ झाली. १९४४ मध्यें त्यांत आणखी १५९ कोटींची भर पडली. म्हणजे १९४३ चे मानानें १९४४ सालीं चलनविस्ताराचा वेग कमी झाला.

### मुंबई प्रांताचें जंगल खातें

मुंबई प्रांताच्या जंगल खात्यास १९४३-४४ मध्यें २,१३,००,३३० रुपये उत्पन्न होऊन, १,१६,९९,९२९ रुपये खर्च वजा जातां ९६,००,४०१ रुपयांचा वाढावा उरला. १९४२-४३ मध्यें ४५,२७,२९१ रुपये वाढावा उरला होता.

### ब्रिटिश लायन फिल्म कॉर्पोरेशन लि.

वरील चित्रपट निर्मात्या ब्रिटिश कंपनीस गेल्या वर्षी १५ लक्ष रुपये निवळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ५०% डिव्हिडंड मिळालें.

### पंजाब नॅशनल बँक लि., लाहोर

पंजाब नॅशनल बँकेच्या पुणें शाखेचें उद्घाटन ता. २ रोजीं श्री. रतनचंद हिराचंद ह्यांनीं केलें. ह्या बँकेच्या स्थापनेचें श्रेय मुख्यतः सरदार दयाळसिंह मजिथया ह्यांस आहे. १९ मे १८९४ रोजीं ती नोंदण्यांत आली. तिच्या ठिकठिकाणीं सुमारें १६० शाखा असून तिचें खेळतें भांडवल ४२ कोटि रुपयांवर गेलें आहे.

### स्त्रिया आणि म्युनिसिपल कारभार

—म्युनिसिपॅलिट्यांच्या कारभाराशीं स्त्रियांचा अधिक निकट संबंध येणें इष्ट आहे, असें संयुक्त प्रांताच्या सरकारचें मत आहे. स्त्रियांना कमिट्यांवर कोऑप्ट करून घ्यावें अशी त्यानें एक सर्क्युलर काढून सूचना केली आहे.

### सुधारलेल्या जातींच्या धान्यांचें बीं

तांदूळ, बाजरी, गहू, ज्वारी, हरबरा, इत्यादींच्या सुधारलेल्या जातींच्या बियांचें उत्पादन मुख्यतः सरकारी फार्मावर मोठ्या प्रमाणावर करविण्याची युद्धोत्तर पुनर्घटनेची एक योजना मुंबई सरकारनें आखली आहे. त्यास ३,०३,००० रुपये खर्च येईल.

### बंगालमधील लोकांचें आयुष्यकंठन

"बंगालमधील बहुसंख्य लोक कसेंबसें पोट भरीत आहेत व त्यांतील बहुतेक लोक अर्धपोटींच आहेत. आपल्या बांधवांस मदत करण्याची बंगालमध्यें जेवढी संधि आहे, तेवढी सबंध जगांत कोठेंहि नसेल. ":—बंगाल प्रांताचे गव्हर्नर, मि. कॅसी.

### इंग्लंडमध्यें काळा बाजार

ग्रेट ब्रिटनमध्यें काळा बाजार मोठ्या प्रमाणावर चालू आहे, त्यास आळा घालण्याचें काम सर चार्लस टेगार्ट हे कांहीं कुशल अधिकाऱ्यांच्या सहाय्यानें करीत आहेत. काळ्या बाजारांत व्यवहार करणारे लोक चलन म्हणून हिरे उपयोगांत आणतात असें प्रसिद्ध झालें आहे.

## मुंबई सरकारची धान्य-लेव्ही योजना

### ठराविक दरानें, सक्तीनें धान्याची खरेदी

सोलापूर, विजापूर व अहमदनगर ह्या तीन जिल्ह्यांत सरकारी धान्य खरेदीची योजना मार्च १९४४ पासून अंमलांत होती, ती सुधारून दक्षिण कानडा, रत्नागिरी, कुलाबा, ठाणें, मुंबई उपनगर व इतर जिल्ह्यांतील तांदळाच्या पेरणीचीं क्षेत्रें हीं वगळून बाकी सर्व मुलुखास आतां लागू करण्यांत आली आहे. डिफेन्स ऑफ इंडिया नियमान्वयें तिची अंमलबजावणी केली जाईल. जे प्रत्यक्ष हातानें जमीन करतात, अशांवरच सरकारास धान्य विकण्याची सक्ती करण्यांत आली आहे. जेवढ्या जमिनींत धान्य पेरलेलें आहे, त्याच्या प्रमाणांत सरकार धान्य घेईल. वेगवेगळ्या जमिनींच्या उत्पादनशक्तींतील फरक सरकार विचारांत घेऊनच सक्तीच्या खरेदीचें धान्य निश्चित करील. साधारणतः ज्या दिवशीं जमिनीचा सारा सरकारास द्यावा लागतो, त्याच दिवशीं धान्यहि द्यावें लागेल, परंतु सोईसाठी ही तारीख बदलतां येईल. ठरलेल्या तारखेपूर्वी ठरलेलें धान्य पाटलाकडे पोंचतें केलें पाहिजे. सरकारच्या वाट्याचें धान्य त्यास दिल्याखेरीज खंड, व्याज, मुद्दल इत्यादि कशाचेहि पोटीं जमीनमालकास अथवा सावकारास प्रत्यक्ष धान्य देणें बेकायदा आहे. कुळास जरूर तेवढें धान्य शिल्लक रहात नसेल तर जमीन मालक खंडकऱ्यांकडून आपल्या सबंध खंडाची वसुली करूं शकणार नाहीं. ज्याचें उत्पादन २७½ मण किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशांकडून सरकार धान्य घेणार नाहीं. ३६ मण उत्पादनावर ४½ मण, ४३ मण उत्पादनावर ९ मण, ह्याप्रमाणें सरकारी लेव्ही वाढत जाईल. सरकारास द्यावयाचें धान्य थोडें असेल, तर गावांतल्या गांवांतच त्याचे पैसे सरकारचा अकौंटंट देऊन धान्य घेईल. जास्त धान्य असल्यास, तें सरकारी गुदामांत नेऊन दिलें पाहिजे. गुदामांत धान्य पोंचतें होईल, ह्या दृष्टीनेंच त्याचा दर ठरविला जाईल. गावांतल्या गावांत धान्य दिल्यास त्याची किंमत थोडी कमी भरेल. लेव्हीची मागणी पुरी पाडण्यासाठी कोणीं तांदूळ दिला, तरी तो स्वीकारला जाईल. मुंबई सरकारला आवश्यक तेवढें सर्व धान्य वरील लेव्हीपद्धतीनें मिळणार नसल्याकारणानें, बाकीचें धान्य सरकार खुषीनें विक्री करणारांकडून विकत घेईल. ह्यासाठी धान्याची इकडून तिकडे हालचाल थांबवून, प्रत्यक्ष गिऱ्हाइकांस लहान प्रमाणावर विक्री वगळून बाकी सर्व विक्री बंद करण्यांत आली आहे. जेथें तांदूळ हेंच प्रमुख पीक असून लेव्ही अंमलांत नाहीं, अशा ठिकाणीं खुषीच्या विक्रीवरच सरकारची मदार आहे, परंतु तांदूळ सरकारखेरीज इतरांस न विकण्याची सक्ती मात्र कायम आहे.

### प्रत्येकाची स्वतंत्र चौकशी—श्री. भागवत ह्यांची सूचना

शेतकऱ्यांपासून धान्य गोळा करण्यापूर्वी प्रत्येकाची नीट चौकशी करण्याकरितां सरकारनें स्वतंत्र "चौकशी अधिकारी" नेमावे अशी श्री. के. बा. भागवत, बी. एजी., ह्यांनीं सूचना केली आहे. लेव्ही पद्धतीच्या अंमलबजावणीचें हें पहिलेंच वर्ष असल्याकारणानें जरा जपूनच पाऊल टाकलें पाहिजे; रेव्हेन्यू खात्याच्या लोकांस प्रत्येक शेतकऱ्यांची स्वतंत्र चौकशी करतां येणार नाहीं, असें श्री. भागवत ह्यांचें म्हणणें आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १० | इंग्लंडमधील येण्याची वसुली आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद | |
| २ आयुर्विम्याचे हप्ते ... | ११ | ५ कोट्याधीशाचा मृत्यु ... | १४ |
| ३ टाटांच्या पाण्याचा उपयोग | १२ | ६ रशियन स्त्रियांची राष्ट्रभक्ति ... ... ... | १५ |
| ४ स्फुट विचार ... ... | १३ | ७ असोसिएटेड कंपनीज लि. | १५ |
| पैशाची बचत आणि गुंतवण–"राष्ट्रीय बचतीचा पंधरवडा"–हिंदी अर्थशास्त्रीय परिषद–इजिप्तच्या | | ८ गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म ... ... ... | १६ |



# अर्थ

बुधवार, ता. १०, जानेवारी १९४५


## आयुर्विम्याचे हप्ते वाढविल्याखेरीज गत्यंतर नाहीं

### सरकारी विमा सुपरिंटेंडेंटचा ताजा अहवाल

हिंदुस्थानांतील विमा व्यवसायाची माहिती देणारें एक पुस्तक हिंदुस्थान सरकारतर्फे दरसाल प्रसिद्ध होत असतें. ह्या विमा वार्षिकांतील आकडे व माहिती हीं शिळीं असतात व त्या कारणानें त्यांचा मार्गदर्शनास फारसा उपयोग होत नाहीं, ही तक्रार दूर करण्याचा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स (श्री. एल. एस. वैद्यनाथन्, एम. ए., एफ. आय. ए.) ह्यांनीं कसून प्रयत्न चालविला आहे, आणि मागील दिरंगाई भरून काढून १९४३ सालासंबंधीं माहितीचें पुस्तक १९४४ साल संपण्यापूर्वीच आतां प्रसिद्ध झालें आहे. हिंदी विमा कंपन्यांकडून माहितीचे तक्ते सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे जाण्याची शेवटची तारीख ३० जून ही आहे, तरी पण ७ ऑक्टोबर पर्यंत हातीं आलेली माहिती संकलित करून, सुपरिंटेंडेंटनें १५ ऑक्टोबर रोजीं आपला रिपोर्ट तयार केला व डिसेंबर अखेर त्याची छपाई पुरी होऊन तो प्रसिद्धहि होऊं शकला. अशा रीतीनें, विमा वार्षिक आतां जास्तींत जास्त ताजें झालें आहे. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनीं आपल्या तपशीलवार रिपोर्टांत १९४३ मधील आयुर्विमा व्यवसायाची माहिती देऊन व्याजाचे दर, विमे रद्द होण्याचें प्रमाण, मुंबईच्या गोदीमधील आगीपासून घ्यावयाचा बोध, डिव्हिडंड वाटण्याचें कंपन्यांचें धोरण, वाढाव्यानें शेअर्सची विक्री, दीर्घ व अल्प मुदतीच्या हयातींतील विम्यांची तुलना, इत्यादिबाबत उद्बोधक चर्चा केली आहे. त्यासंबंधांत उपयुक्त सूचनाहि त्यांनीं केल्या आहेत. युद्धोत्तर काळांत हिंदी कंपन्यांचे संबंधांत निर्माण होणाऱ्या अडचणींचाहि विचार त्यांनीं केला आहे. आयुर्विम्याचे हप्ते वाढविण्यासंबंधीं त्यांचा सकारण आग्रह आहे. ही गोष्ट सर्वच विमेदारांना कायम जाणवणारी असल्याकारणानें, त्या प्रश्नापुरता विचार येथें जरा तपशीलवार करण्यांत आला आहे.

### खर्चाचें प्रमाण व छोट्या कंपन्या

हिंदी कंपन्या विमेदारांकडून घेत असलेले हप्ते त्यांच्या विम्याच्या रकमेचे मानानें अपुरे पडत चालले आहेत, असें आतां स्पष्ट आढळून आलें आहे. विम्याचे हप्ते ठरवितांना विमेदारांतील मृत्यूचें प्रमाण, कंपनीस तिनें गुंतविलेल्या रकमांवर पडणारें अपेक्षित व्याज व व्यवस्थेचा खर्च ह्या तीन बाबी विचारांत घ्याव्या लागतात. ज्या कोष्टकांच्या आधारावर विमेदारांच्या आयुर्मर्यादेचा अंदाज केला जातो, तीं कोष्टकें हिंदुस्थानांतील पूर्ण अनुभवावर आधारलेलीं नाहींत आणि त्या बाबतींत पुष्कळच कार्य अद्याप व्हावयास पाहिजे. हप्त्यांची रकम ठरवितांना कंपनीच्या खर्चाचें प्रमाण लक्षांत घ्यावें लागतें; आणि विशेषतः लहान कंपन्यांत तें अवास्तव आढळतें ह्याकारणानें हप्त्यांचा मोठा भाग खर्चीपोटीं नाहींसा होऊन ठराविक मुदतीनंतर कंपनींत साठावयाची रकम शिल्लक पडत जात नाहीं. खर्चाचें प्रमाण १९३९ च्या मानानें आतां पुष्कळच उतरलें आहे, तरी ह्यापुढें तें आणखी खालीं जाण्यास फारशी कूस नाहीं, असें खालील आकडे दर्शवितात:—

| वर्ष | व्यवस्था खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण |
|---|---|
| १९३८ | ३१·७ |
| १९३९ | ३३·२ |
| १९४० | २८·९ |
| १९४१ | २७·४ |
| १९४२ | २६·७ |
| १९४३ | २५·९ |

लहान व तोट्यांत चालणाऱ्या कंपन्यांचें मोठ्या व चांगल्या कंपन्यांशीं योग्य अटींवर एकत्रीकरण होण्याची आवश्यकता विमा वार्षिकांतून सालोसाल प्रतिपादन करण्यांत येत असतांहि, लहान कंपन्यांच्या चालकांचा वैयक्तिक स्वार्थ आडवा येतो, असें विमा सुपरिंटेंडेंट ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे.

### व्याजाचा उतरता दर

हिंदी विमा कंपन्यांसंबंधीं आतां विचार करतांना त्यांना पडणारा व्याजाचा दर सालोसाल उतरत चालला आहे, ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे. खालील तक्त्यांत तिचा तपशील दिला आहे:—

| वर्ष | द. सा. द. शे. व्याज |
|---|---|
| १९३८ | ५·१५ |
| १९३९ | ४·६८ |
| १९४० | ४·३७ |
| १९४१ | ४·१७ |
| १९४२ | ३·९४ |
| १९४३ | ३·८८ |

विमा कंपन्यांनीं आपले हप्त्यांचे दर ठरविले, तेव्हांच्या मानानें आतां फारच कमी व्याज त्यांना पडूं लागलें आहे. ह्याचा अर्थ असा कीं अपेक्षेप्रमाणें शिलकी रकमांवर व्याज मिळत नाहीं आणि कराराप्रमाणें विम्याची रकम मात्र विमेदारांस द्यावी लागते. कंपनीच्या मूल्यमापनाचे वेळीं, कंपनीस पुढें मिळणाऱ्या व्याजाच्या दराचे अंदाजावरूनच जिंदगी तिच्या देण्याचे मानानें पुरी आहे किंवा नाहीं, हें पाहण्यांत येतें. पडणारा व्याजाचा दर ह्यापुढें ३½% इतकाहि राहणार नाहीं व त्याहिपेक्षा कमी दरानें मूल्यमापन करावें लागेल, असें विमा सुपरिंटेंडेंट सांगतात. अर्थातच, मूळ अपेक्षित व्याजाचा दर व प्रत्यक्ष अनुभवाचा दर ह्यांत कमालीची तफावत पडून,

नव्या व्याजाच्या दराच्या आधारावरच विमेदाराकडून हप्ते घेणें आवश्यक होईल व त्या प्रमाणांत वार्षिक हप्तेहि वाढतील.

### ३% दरावर हप्ते ठरवा

हिंदुस्थानांतील अपेक्षित आर्थिक व औद्योगिक प्रगति व कंपन्यांस द्यावा लागणारा जबर कर हीं लक्षांत घेतां ३% व्याजाच्या दरावरच हप्ते आधारण्यांत यावे, अशी विमा सुपरिंटेंडेंट ह्यांची स्पष्ट सूचना आहे. व्याजाचा दर दीर्घकाळपर्यंत इतका कमी राहील, हें कशावरून ? अशी शंका कोणी काढल्यास, तो तसा राहील असें गृहीत धरणें व्यावहारिक दृष्ट्या हिताचें व शहाणपणाचें आहे, आणि कदाचित् तो लवकर वरती गेलाच तर कंपनीस चांगला नफा उरून विमेदारांस त्याचा फायदा मिळेलच, असेंच त्याचें योग्य उत्तर आहे. हप्त्यांचे दर किती वाढवितां येतील, ह्यासहि निश्चित मर्यादा आहे. लोकांस परिचयाच्या झालेल्या दरांपेक्षा फार मोठे दर ठेवल्यास विम्याची लोकप्रियता नष्ट होऊन, लोक विमे उतरण्यास प्रवृत्तच होणार नाहींत, अशी भीति आहे. अशा परिस्थितींत, आवश्यक तेवढी वाढ हप्त्यांत तर केलीच पाहिजे परंतु ती लोकांच्या आवाक्याबाहेर मात्र जाऊं नये, अशीहि व्यवस्था झाली पाहिजे. हा सुवर्णमध्य काढण्याचा उपाय विमा सुपरिंटेंडेंट श्री. वैद्यनाथन ह्यांनीं सुचविला आहे.

### सुवर्णमध्य

" नफ्यासहित विम्याचा हप्ता जास्त असतो, कारण त्यांत बोनससाठी कांहीं रकमेची तरतूद केलेली असते. ३% दरानें हिशेब करून व बोनसची फारशी तरतूद न करतां हप्ते बनविण्यांत यावेत, म्हणजे सध्याच्या चांगल्या कंपन्यांच्या चालू हप्त्यांपेक्षा ते फारसे मोठे होणार नाहींत. हप्त्यामध्यें जी बोनसची तरतूद आज समजली जाते, तिचा विनियोग कांहीं अंशीं उतरत्या व्याजामुळें पडणारी तूट भरून काढण्याकडे केला व कांहीं अंशीं सुरक्षितपणासाठी कूस राखण्याकडे केला असा त्याचा अर्थ होईल. अशा प्रकारच्या हप्त्यांत बोनसला अर्थातच फार थोडा वाव उरेल हें खरें. परंतु, विमेदारानें विम्याच्या रकमेकडेच विशेष लक्ष पुरवावें; बोनसच्या आकर्षणास महत्त्व देऊं नये, हें तत्त्व त्यास पटवून दिलें पाहिजे. बोनसची चढाओढ ह्यापुढें शक्य होणार नाहीं अशीं चिन्हें दिसत आहेत. अशा रीतीनें नफ्यासहित व नफ्याविरहित ह्या दोन भिन्न प्रकारच्या विम्यांची फारशी आवश्यकताच उरणार नाहीं. सध्याच्या नफ्यासहित विम्याच्या हप्त्याचे दर साधारणपणें नफाविरहित विम्यास लागू होतील, एवढाच त्याचा परिणाम होईल. "

### हप्त्यांच्या वाढीचा परिणाम

अशा रीतीनें हप्त्यांचे दर वाढविणें सर्वच विमा कंपन्यांस अत्यावश्यक झालें असलें, तरी त्यांत फारशी वाढ करण्यास त्या तयार होत नाहींत. ह्याचें कारण, इतरांपेक्षा आपले दर ज्यास्त दिसूं नयेत, हें होय. तथापि, हप्ते वाढविल्याखेरीज गत्यंतर नाहीं, ह्याची जाणीव मात्र सर्वांस झालेली आहे व नव्या हप्त्यांचीं कोष्टकें तयार करण्याचें काम कांहींनीं पुरें केलें आहे, तर कांहींनीं चालू केलेलें आहे. उदाहरणार्थ, ओरिएंटल, कॉमनवेल्थ, औंध म्युच्युअल वगैरेंचे वाढलेलें दर अंमलांत आले आहेत. वेस्टर्न इंडियाहि आपले दर वाढविण्याच्या तयारींत आहे. हे नवे दर चालू विम्यांना अर्थातच लागू पडणार नाहींत; नव्यानें विमा उतरणारांवरच ते बंधनकारक होतील. सहाजीकच, ह्या वाढत्या उत्पन्नाचा कंपनीच्या एकूण आर्थिक स्थितीवर प्रभावी सुपरिणाम दिसूं लागण्यास थोडा अवधि लागेल. विमेदारानें दीर्घकाळ मुदतीचे विम्याचे करार केलेले असतात, व कित्येकांनीं आपली सर्व शिल्लक विम्यांत गुंतविलेली असते. व्याजाचे दर कांहीं वर्षांनीं वाढले, तर हप्त्यांतील वाढीची आवश्यकता पुढें उरणार नाहीं हें खरें असलें तरी ह्या अनिश्चित योगावर अशा विमेदारांनीं विसंबून बसणें योग्य होणार नाहीं. कंपन्यांवर हप्ते वाढविण्याची सक्ती विमा सुपरिंटेंडेंटला करतां आली नाहीं, तरी कमी व्याजाच्या मूल्यमापनाचा आग्रह त्यास केव्हांहि धरतां येतोच. तेव्हां, हप्ते भरपूर वाढविण्याची अळंटाळ करणाऱ्या कंपन्यांनीं पुढें विमा सुपरिंटेंडेंटकडून सहानुभूतीची अपेक्षा करूं नये. मधल्यामधे विमेदारांचें मात्र नुकसान व्हावयाचें. अशा रीतीनें, हप्ते वाढण्यांत विमेदारांचाच अंतिम फायदा आहे. मागून येणाऱ्या विमेदारांनीं भरावयाच्या मोठ्या हप्त्यांचा फायदा जुन्या विमेदारांसच प्रथम होणार असल्याकारणानें त्यांनीं तर विमा सुपरिंटेंडेंटच्या सूचनेस जोराचा पाठिंबा दिला पाहिजे !

## टाटांच्या पॉवर हाऊसमधून वहाणाऱ्या पाण्याचा उपयोग

### श्री. नगरकर इंजिनिअर ह्यांची योजना

मध्यमवर्गीय तरुणांची आर्थिक क्षेत्रांत होत असलेली कुचंबणा थांबविण्याच्या व त्यांच्या सहायानें शेती, उद्योगधंदे ह्यांची वाढ घडून यावी ह्या दृष्टीनें श्री. जी. एस. नगरकर, बी. ई. (सिव्हिल) ह्यांनीं टाटांच्या धरणांतील वाया जाणाऱ्या पाण्याच्या उपयोगाची एक व्यावहारिक योजना तयार केली आहे. टाटांच्या धरणाखालील पॉवर हाऊसमधून बाहेर पडणारें पाणी ठाणें आणि कुलाबा जिल्ह्यांतील प्रदेशांतून वाहून फुकट जातें. ही सुमारें ६०,००० एकरांची जमीन वरील पाण्याखाली भिजून उत्पन्न देण्याजोगी आहे. जमीन मुबलक आहे, पाण्याचा तुटवडा नाहीं आणि तें पाणी वर खेचण्यास लागणारी वीजहि स्वस्त व वाटेल तेवढी शेजारीच उपलब्ध आहे. हा प्रदेश वस्तीस सोईचा आहे आणि शेती व कारखाने ह्यांच्या वाढीस मुंबई व पुणें ह्यांच्या सान्निध्यामुळें पोषक आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीचा प्रश्न सोडविण्यास आवश्यक त्या बाबी येथें उपलब्ध आहेत.

नद्यांच्या खोऱ्यांचे प्रत्येकीं सुमारें ४०० एकरांचे ब्लॉक्स पाडतां येतील व डोंगराकडेची जागा वस्तीस उपयोगी पडेल. पातळगंगेच्या खोऱ्याचे माथ्याशी अशी पहिली वसाहत करण्यांत यावी. त्या योजनेस सुमारें २ लक्ष रुपये लागतील. त्यांत सुमारें ५० लोक शिकून तयार होतील. २ लाखांच्या गुंतवणुकीवर पहिल्या १० वर्षांत १ लक्ष, ३८ हजार रुपये उत्पन्न मिळून सुमारें ६% व्याज सुटेल, अशी अपेक्षा आहे. पहिल्या ब्लॉकची योजना सरकारनें तात्काळ हातीं घ्यावी, अशी श्री. नगरकर ह्यांची सूचना आहे.

## स्फुट विचार

### पैशाची बचत आणि गुंतवण

हिंदुस्थानांत चलनाचा विस्तार सारखा चालूच आहे आणि रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या अगदी अलीकडच्या आकड्यांवरून असें दिसतें कीं चलनी नोटांच्या प्रसाराचा आकडा आतां १,०२१ कोटि रुपयांपर्यंत चढला आहे. चलन विस्ताराचा परिणाम महागाई वाढण्यांत होत असतो हें आतां सामान्यतः सर्वांस कळून चुकलें आहे आणि तिला आळा घालण्यासाठीं निरनिराळे उपाय एकसमयावच्छेदेंकरून अंमलांत आणावे लागतात. मालाचा पुरवठा, विशेषतः नित्याच्या उपयोगी जिनसांचें अधिक उत्पादन व आयात, किंमतींचें नियंत्रण, रॅशनिंग, पैशाची बचत व सरकारी रोख्यांत गुंतवण ह्या मार्गांचा अवलंब केला असतां समाजांत खेळणाऱ्या चलनाचा ओघ उलटा वहातो आणि नवीन नोटांच्या पुरवठ्यास मर्यादा घातली जाते. जनतेच्या हातांत येणारा पैसा शक्य तितक्या कमी प्रमाणांत मालाच्या खरेदींत खर्च केला गेल्यास आणि त्याची बचत होऊन तो सरकारकडे कर्जाच्या स्वरूपांत परत गेल्यास चलनाचा पुरवठा आटोक्यांत येतो व त्याचें महागाईस मदत करण्याचें सामर्थ्य मर्यादित होतें. युद्धाप्रीत्यर्थ सरकारास खर्चावा लागणारा पैसा कर आणि कर्ज ह्यांच्या द्वारांनीं येतो आणि तो जरूरी इतका उभा रहात नसल्यानें चलनाचा त्यास उपयोग करावा लागून व्यवहारांत खेळणाऱ्या पैशाचा पुरवठा फुगतो. जनतेनें पैशाची बचत करून तो सरकारी कर्जांत घालावा ह्यासाठीं प्रचार केला जातो ह्याचें कारण हेंच आहे. लोकांस बचत करण्यास प्रोत्साहन देण्यांत येतें त्याचा हेतु चलनाचा फुगवटा कमी करून महागाईस आळा घालावा आणि युद्धसमाप्तीनंतर लोकांच्या गाठीं शिलकी पैसा रहावा हा आहे. हिंदुस्थानाप्रमाणें इतर देशांत बचतीविषयींचा प्रचार सारखा चालू असतो. इंग्लंडमधील अशा प्रकारच्या प्रयत्नास पांच वर्षें नुकतींच पुरीं झालीं आहेत. ह्या अवधींत ब्रिटिश जनतेनें आपल्या सरकारास दिलेल्या कर्जाची रकम ८५० कोटि पौंड (११,३०० कोटि रुपये) झाली. ह्यापैकीं ३०० कोटि पौंड (४,००० कोटि रुपये) सामान्य स्थितींतल्या लोकांनीं लहान लहान रकमांच्या सरकारी कर्जांत केलेल्या गुंतवणीच आहेत, हें येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. खर्चांत काटकसर करून पोस्टांतील ठेवी व सेव्हिंग सर्टिफिकिटें ह्यांसारख्या बचतीसाठीं सरकारनें प्रचलित केलेल्या सोयीच्या योजनांचा उपयोग सामान्य ब्रिटिश जनतेनें केला आहे. त्यावरून प्रचाराच्या यशस्वीपणाची कल्पना येते.

### "राष्ट्रीय बचतीचा पंधरवडा"

युद्धकाळांत जनतेनें आपल्या खर्चांत बचत करून अशा तऱ्हेनें वाचवलेला पैसा सरकारला कर्जाऊ देण्याची आवश्यकता कां आहे ह्याचें विवेचन वर आलें आहे आणि इंग्लंडमध्यें सामान्य स्थितींतील लोकांनीं केलेल्या बचतीचे आकडे उदाहरणार्थ देण्यांत आले आहेत. हिंदुस्थानांत सर्व प्रांतांत बचतीच्या प्रचाराचें विशेष कार्य एक स्वतंत्र पंधरवडाभर करण्याचा उपक्रम नुकताच झाला आहे. गेल्या ८ तारखेपासून ह्या पंधरवड्यास मुंबई प्रांतांत प्रारंभ झाला आहे आणि त्यासंबंधांत गव्हर्नर सर जॉन कॉलव्हिल ह्यांनीं लोकांस उद्देशून खास प्रस्ताव केला आहे. दारिद्र्याचे सीमेवर जीवन कंठणाऱ्या लोकांची संख्या ह्या देशांत मोठी असून त्यांस काटकसर करण्याचा उपदेश करण्याच्या वैयर्थ्याची जाणीव प्रकट करून सर जॉन ह्यांनीं अशा गरीब लोकांचें महागाईपासून रक्षण व्हावें म्हणून इतरांनीं स्वतःच्या खर्चास मर्यादा घालून त्यांस सहाय द्यावें असें सुचवलें. मध्यम आणि वरच्या आर्थिक दर्जाच्या लोकांस विशेषतः उद्देशून त्यांनीं असें म्हटलें आहे कीं अमूकच रकम जमवावयाची असें ठरवण्यांत आलें नाहीं. जनतेस बचतीची सवय लागावी आणि युद्ध लवकर जिंकण्यास व युद्धोत्तर आर्थिक प्रगतीस शक्य तेवढ्या लोकांनीं हातभार लावावा अशी इच्छा सर जॉन ह्यांनीं व्यक्त केली आहे. पैशाची बचत आणि त्याची सरकारी रोख्यांत व सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांत गुंतवण ह्यांचे योगानें लोकांस स्वार्थ व परमार्थ एकाच कृतीनें कसा साधतां येईल ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं केलें आहे.

### हिंदी अर्थशास्त्रीय परिषद

हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेचें सत्ताविसावें अधिवेशन नाताळांत दिल्ली येथें अलीगड विश्वविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. हैदर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यामध्यें युद्धपरिस्थितींतून शांततेच्या काळांत व्हावयाचें आर्थिक संक्रमण, आर्थिक आपत्तीमध्यें जनतेचें संरक्षण, आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य व हिंदुस्थानची आर्थिक प्रगति ह्या विषयांची चर्चा झाली. सर मॉरिस ग्वायर ह्यांनीं स्वागतपर भाषण केलें, त्यांत जगापुढें उभे राहिलेले अनेक अवघड प्रश्न सोडवण्यांत अर्थशास्त्रज्ञांस महत्त्वाचा सल्ला देतां येईल आणि विशेषतः हिंदुस्थानांत ह्या कार्याचें अगत्य मोठें आहे असें त्यांनीं सांगितलें. नंतर सर अर्देशीर दलाल ह्यांनीं प्रास्ताविक भाषण करून हिंदी जनतेच्या रहाणीचें मान सुधारण्यासाठीं सरकार कोणत्या प्रकारच्या योजना आखीत आहे ह्याचें विवेचन केलें आणि अर्थशास्त्रज्ञांचा त्यास सल्ला मिळावा म्हणून त्यांची एक लहान समिति नेमण्याचें आपण ठरवलें असल्याचें सांगितलें. ह्या देशाची आर्थिक अभिवृद्धी घडवून आणण्यास रशियाचें संपूर्ण अनुकरण करणें इष्ट किंवा शक्य नाहीं; तथापि जरूर तेथें सरकारचें नियंत्रण व सहाय उद्योगधंदे, व्यापार व शेती ह्यांची अभिवृद्धी करण्यास अपरिहार्य व अगत्याचें होईल असें सर अर्देशीर ह्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या योजनात्मक धोरणाचें स्पष्टीकरण केलें. ह्यापुढें अध्यक्षांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं पौरस्त्य देशांतील लोकांच्या रहाणीचें मान किती हीनदर्जाचें आहे ह्याचें विवेचन करून ह्या देशांत उद्योगधंद्यांची प्रगति होण्याची आवश्यकता आहे हें आकड्यांचा पुरावा देऊन दाखवलें. युद्धोत्तर काळांत जगांतील पुढारलेल्या व मागसलेल्या देशांमध्यें आर्थिक व राजकीय स्वास्थ्य नांदावयाचें असल्यास आंतरराष्ट्रीय संबंध, विशेषतः हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचे परस्पर संबंध, सहकार्याचे असले पाहिजेत असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. स्पर्धा व झगडे ह्यांचे ऐवजीं एकमेकांच्या संमतीनें श्रमविभागाच्या तत्वावर ह्या राष्ट्रांनीं आपला औद्योगिक उन्नतीचा कार्यक्रम आखला पाहिजे आणि एकंदर जगाचें संपत्तीचें उत्पादन वाढवून सर्व देशांच्या रहाणीचें मान सुधारण्यास सहाय दिलें पाहिजे ह्या संदेशांत डॉ. हैदर ह्यांच्या भाषणाचें सार होतें. परिषदेच्या अधिवेशनांत नेहमींप्रमाणें हिंदी

अर्थशास्त्रज्ञ मंडळाची वार्षिक सभा भरून तीमध्यें अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, चिटणीस वगैरेंच्या निवडणुकी झाल्या. प्रि. डी. जी. कर्वे ह्यांची चालू वर्षाकरितां असोसिएशनचे अध्यक्षपदाचे जागीं निवड करण्यांत आली. ह्या एकमतानें झालेल्या निवडणुकीबद्दल आम्हीं प्रि. कर्वे आणि एकॉनॉमिक असोसिएशन ह्यांचें हार्दिक अभिनंदन करतों.

## इजिप्तच्या इंग्लंडमधील येण्याची वसुली

हिंदुस्थानचें इंग्लंडमध्यें जसें मोठें येणें साठलें आहे, त्याचप्रमाणें इजिप्तचे सुमारें ४५० कोटि रुपये इंग्लंडमध्यें ब्रिटिश पौंडांत अडकून पडले आहेत. त्याच्या हिशेबाच्या व परतफेडीच्या संबंधांत ब्रिटिश व इजिप्शन सरकारांत बोलणीं पुरीं होऊन करारहि झाला आहे. सध्याच्या त्यांच्या कराराप्रमाणें इंग्लंडनें इजिप्तमध्यें दुप्पट माल १९४६मध्यें पाठविण्याचा आहे व इजिप्तमध्यें आयात होणाऱ्या मालावरील आजचे कांहीं निर्बंध दूर व्हावयाचे आहेत. इंग्लंडमधून इजिप्तमध्यें येणाऱ्या मालांत चैनीच्या जिनसांचाच भरणा होईल कीं काय व त्यामुळें इजिप्तमधील उद्योगधंद्यांवर त्याचा कितपत परिणाम होईल, ह्याबद्दल इजिप्तमध्यें चिंता व्यक्त करण्यांत येत आहे. किंमती ठरविणार त्या कोणत्या पायावर, हाहि महत्वाचा मुद्दा आहे. इजिप्तच्या येण्याच्या वसुलीच्या प्रश्नाकडे हिंदुस्थानाचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे. कारण हिंदुस्थानासहि आपलें येणें स्वतःचें नुकसान करून न घेतां वसूल करण्याचा अवघड प्रश्न लवकरच सोडवावा लागणार आहे.

## आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद्–हिंदी प्रतिनिधींचें कार्य

न्यूयॉर्क येथें गेल्या महिन्यांत आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद् भरली होती. तींत हिंदी प्रतिनिधींनीं भाग घेतला. प्रतिनिधी मंडळाचे पुढारी, सर चुनीलाल भाईचंद मेहता, ह्यांनीं कराचीस परत आल्यावर एका मुलाखतींत परिषदेच्या कार्याची थोडक्यांत माहिती सांगितली. रशिया व दक्षिण आफ्रिका ह्या देशांनीं प्रतिनिधी पाठविले नव्हते; त्यांचे फक्त निरीक्षक उपस्थित होते. जागतिक व्यापाराची वाढ, हा परिषदेपुढील चर्चेचा मुख्य विषय होता व त्या दृष्टीनेंच पोटसमित्यांत पोटविषयांवर चर्चा झाली. ठराव कोणत्याहि प्रकारचे झाले नाहींत. निर्गत व्यापारास कोणत्याहि सरकारनें द्रव्यसहाय देऊन स्पर्धा करणें इष्ट नाहीं, असा एक महत्त्वाचा मुद्दा हिंदी प्रतिनिधींनीं राष्ट्रांच्या व्यापारी धोरणावरील रिपोर्टांत समाविष्ट करविला. कपाशीच्या निर्गतीस प्रत्यक्ष सबसिडी देऊन चालना देण्याच्या विचारांत अमेरिका आहे, त्या धोरणास अशा रीतीनें नापसंती दाखविली गेली. बाकीच्या प्रश्नांवरहि हिंदी प्रतिनिधींनीं निर्भीडपणें विचार व्यक्त केले. हिंदुस्थानाच्या इंग्लंडमधील येण्याच्या वसुलीच्या प्रश्नास मात्र आंतरराष्ट्रीय सहकार्य लाभण्याचा रंग दिसत नाहीं.

## बेंगॉल कोल सप्लाइंग फर्म

वरील फर्मचे मालक, श्री. एम. व्ही. शिंगरे, ह्यांचेकडून दरसालप्रमाणें मोठ्या आकाराचीं, इंग्रजी ठळक तारखांचीं दोन कॅलेंडरें आमचेकडे भेट म्हणून आलीं आहेत. त्याबद्दल आम्हीं श्री. काकासाहेब शिंगरे ह्यांचे फार आभारी आहों.

## साभार स्वीकार

लिंब ( सातारा ) येथील कृष्णा–वेणी प्रेसमध्यें तयार झालेलें १९४५ सालचें मोठें कॅलेंडर त्याचे मालक श्री. अभ्यंकर ह्यांचेकडून आम्हांकडे भेट म्हणून आलें आहे. लिंबसारख्या खेडेगांवांतील ह्या प्रेसच्या छपाईच्या सुबकपणाची त्यावरून चांगली कल्पना येते. कॅलेंडर मराठी, ठळक आकड्यांचें, पाठपोठ छापलेलें असून सध्यांच्या दिवसांत त्याची उपयुक्तता विशेषच वाटेल.

## विमा एजंटांची संख्या

विमा एजंटाचें काम करण्यासाठीं १९३८ च्या विमा कायद्यांच्या ४२ व्या कलमाप्रमाणें लायसेन्स काढावा लागतो. १९४२ सालीं असे ५२,९५५ व १९४३ सालीं ६५,९२१ लायसेन्स देण्यांत आले.

## " दि इंडिपेंडंट " चा आकर्षकपणा वाढला

श्री. डब्ल्यू. जी. शेवडे ह्यांच्या बाणेदार व कुशल संपादकत्वाखालीं नागपूर येथें प्रसिद्ध होत असलेल्या " दि इंडिपेंडंट " ह्या इंग्रजी साप्ताहिकानें आपलीं पृष्ठें, आकर्षपणा व उपयुक्तता हीं सर्व आतां वाढविलीं आहेत. आंतरराष्ट्रीय डावपेच, राजकीय घडामोडी, युद्धविषयक आंदोलनें, इत्यादींची माहिती ह्या साप्ताहिकांत राष्ट्रीय दृष्टिकोनास धरून येत असते. साप्ताहिकाचें लिखाण उच्च दर्जाचें असून त्याचें धोरण पूर्णपणें राष्ट्रीय असतें. श्री. पी. वाय. देशपांडे ह्यांचे लेख इंडिपेंडंटमध्यें दर आठवड्यास प्रसिद्ध होणार आहेत.

## येवले येथील कोट्याधीशाचा मृत्यु

( लि. आ. म. )

येवलें येथें १५० वर्षांपासून चालत आलेल्या " श्री. गंगाराम छबिलदास " ह्या पेढीचे मालक शेठ वल्लभदास मुरलीधरदास हे ता. २७ डिसेंबर, १९४४ रोजीं दिवंगत झाले, हें नमूद करण्यास दुःख वाटतें. कै. वल्लभदास शेट हे अत्यंत धर्मपरायण गोभक्त असून, त्यांनीं दुष्काळांत जनावरांसाठीं केलेली सोय, गरीब येवलेकरांकरितां चालविलेला आयुर्वेदिक दवाखाना व पाण्याची तलाव बांधून केलेली व्यवस्था हीं त्यांच्या औदार्याचीं प्रतीकें होत. ते नेहमीं स्वदेशी वस्तूच वापरीत.


गेल्या ३० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले

**फिव्हर एस.**

सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २

- होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धी करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ८.
- बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय, किं. रु. २

पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.

तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.

एजन्सी नसलेल्या गांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.

सुधा एजन्सी,

३१८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

## रशियन स्त्रियांची राष्ट्रभक्ति व स्वार्थत्याग

**" रशियाकरितां माझे दोन्ही पाय तोडावे लागले, तरी त्यांत मला आनंदच आहे. "**

रशियाच्या युद्धप्रयत्नांस तेथील स्त्रियांनीं पुरुषांच्या बरोबरीनें हातभार लावलेला आहे. युनायटेड स्टेट्स चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, मि. एरिक जॉनसन, ह्यांनीं रशियन सरकारचे पाहुणे ह्या नात्यानें रशियास भेट दिली व त्या देशांत आपल्या इच्छेप्रमाणें सर्व ठिकाणीं हिंडून तेथील परिस्थितीचें निरीक्षण केलें. त्यांच्या मतें, रशिया आपल्या स्त्रियांचे उपकार कधीहि फेडूं शकणार नाहीं. अत्यंत हलक्या दर्जाच्या, अतिशय धोक्याच्या, त्याचप्रमाणें फार कष्टदायक अशा सर्व कामांत रशियन स्त्रियांनीं पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेतलेला आहे. कारखान्यांत त्या दररोज ११ तास काम करतात, आणि महिन्यांतून दोन दिवस साप्ताहिक सुटी असतांहि रशियन सैनिकांस स्वतःची देणगी म्हणून खुषीनें आणखी काम करतात. शेतावर राबून त्यांनीं रशियास धान्य कमी पडूं दिलेलें नाहीं. प्रत्यक्ष रणांगणांवरहि जीव देण्यास त्यांनीं कमी केलेलें नाहीं. हें सर्व चालू असतांना, भविष्यकाळीं रशिया प्रबळ व्हावा ह्या दृष्टीनें त्यास आवश्यक असणारीं मुलें त्यांनीं वाढत्या प्रमाणावर पुरविलीं आहेत.

" सध्याची विशेष बिकट परिस्थिति नष्ट होऊन बरे दिवस आले, म्हणजे पुन: गृहिणी म्हणून केव्हां आपल्याला सुखानें रहातां येईल, असा विचार तुझ्या डोक्यांत घोळत असेल, नाहीं ? " असें मि. जॉनसन ह्यांनीं एका स्त्री-कामगारास विचारलें. तिनें उत्तर दिलें, " कारखान्यांत अथवा शेतावर काम करावें लागणार नाहीं, असे दिवस आमच्या दृष्टिपथांतच नाहींत. किती लोक प्रत्यक्ष काम करीत आहेत, ह्यावरच त्या लोकांच्या राष्ट्राची प्रगति अवलंबून असते. युद्ध संपल्यावर, आम्हांस रशियाची अतिशय प्रगति घडवून आणावयाची आहे. आज आम्हीं दररोज ११ तास काम करतों, त्याऐवजी ८ तास करूं, एवढाच फार तर फरक होईल. " मुलें होत असतांच कामहि करणें फार कठीण होत असेल, ह्या शंकेस तिनें उत्तर दिलें, " बाळंत होण्याचे अगोदर ३५ दिवस व मागाहून ४५ दिवस आम्हांस सुटी मिळते. ह्या मुदतींत पगार, जादा रेशन, वगैरे सर्व प्रकारच्या सोई असतात. " मि. जॉनसन ह्यांना रशियांत सौंदर्यसाधनांचा बराच तुटवडा असल्याचें आढळून आलें. रशियन स्त्रियांना त्यामुळें सुचत नसेल, अशी शंका त्यांनीं व्यक्त करतांच, वरील स्त्री-कामगारानें त्यांस सांगितलें, " ही शंका मुर्खपणाची आहे. जगांतील सर्व देशांमधील स्त्री-स्वभाव सारखाच आहे; त्यां सर्वांनांच सुंदर दिसावेंसें वाटतें व त्याकरितां त्या प्रयत्न करतात. परंतु, राष्ट्राच्या यशाचे मानानें स्त्रियांच्या वैयक्तिक चेहऱ्यांचा प्रश्न अगदी दुय्यम दर्जाचा आहे. ! "

रशियन कामगारांपैकी ६५% कामगार स्त्रिया आहेत. ८५% शेतकाम स्त्रियाच करतात. डॉक्टरांपैकी ५५% डॉक्टर स्त्रिया असून प्रत्यक्ष आघाडीवरील डॉक्टरांत ३५% स्त्री-डॉक्टर आहेत. एका इस्पितळांत मि. जॉनसन ह्यांनीं एका मुलीचे दोन्ही पाय तोडलेले पाहून, तिला विचारलें, " तुला तुझ्या पुढील आयुष्यक्रमाबद्दल भीति वाटत नाहीं काय ? " तिनें उत्तर दिलें, " नाहीं. माझें वय फक्त २६ वर्षांचें आहे. अजून सबंद आयुष्य मला उपभोगावयाचें आहे. " " पण तुझे पाय कोठें आहेत ? " मि. जॉनसन ह्यांनीं विचारलें. "त्याचं काय मोठं ? रशियाकरितां माझे पाय तोडावे लागले, तर मला त्यांत आनंदच आहे. स्वतःच्या देशाकरितां कितीहि मोठा त्याग केला, तरी तो पुरेसा मोठा असूं शकत नाहीं. एका व्यक्तीचें आयुष्य फक्त कांहीं वर्षेंच असूं शकतें. रशियन राष्ट्र मात्र गुलाम म्हणून नव्हे, तर प्रबळ स्वतंत्र राष्ट्र म्हणून अजरामर राहिलें पाहिजे " असें स्वाभिमानपूर्वक तिनें उत्तर दिलें.


रशियांत स्त्री व पुरुष ह्यांस सारखे हक्क असल्याकारणानें स्त्रियांना पुरुषांचे बरोबरीनें वाव मिळून आपला स्वार्थत्याग आपली कर्तृत्वशक्ति, वगैरे दाखविण्याची संधि मिळते. अशा परिस्थितींत, " रशिया आपल्या स्त्रियांचें देणें लागतो " असें म्हणणें म्हणजे रशियन स्त्रियांच्या युद्धप्रयत्नांकडे, ती एक तात्कालिक व अजब बाब आहे अशा दृष्टीनें पहाण्यासारखें आहे; वस्तुस्थिति तशी नाहीं. राष्ट्राकरितां कष्ट व शारीरिक यातना भोगून प्रत्यक्ष प्राण अर्पण करण्याची स्त्रियांतील तळमळ मि. जॉनसन ह्यांस आश्चर्यकारक वाटली. मि. जॉनसन ह्यांनीं रशियांतील अनेक गोष्टींचें निरीक्षण केलें. रशिया व अमेरिका ह्यांचीं सामाजिक राजकीय मतें जुळलीं नाहींत तरी व्यापाराचे मार्गांत त्याची अडचण येणार नाहीं असें त्यांचें मत बनलें. युद्धोत्तर काळांत ह्या दोन देशांत व्यापार मोठ्या प्रमाणावर चालूं शकेल अशी पार्श्वभूमि तयार करण्याचा ते प्रयत्न करतील. रशियन स्त्रियांच्या राष्ट्रभक्तीबद्दल त्यांस अनुभव आला, तेवढ्याचेंच दिग्दर्शन वरती करण्यांत आलें आहे.

---

### दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

वरील कंपनीनें ३१ जुलै, १९४४ अखेर संपलेल्या वर्षीं ५ कोटि रुपयांचें सिमेंट विकलें. पगार व मजुरी ह्यांसाठी ५७ लक्ष रुपये खर्च आला. सिमेंटच्या उत्पादनाचा खर्च २ कोटि, ३५ लक्ष रुपये झाला. दुरुस्ती व डागडुजीसाठी १५ लक्ष रुपये लागले व विम्यासाठी १२½ लक्ष रुपये खर्च झाले. कचेरी खर्च ३½ लक्ष रुपये झाला. घसाऱ्यासाठी ४० लाखांची तरतूद करून व करांसाठी ६४ लक्ष रुपये बाजूस काढून निवळ नफा ६५½ लक्ष रुपये उरला. मॅनेजिंग एजंटसना ( सिमेंट एजन्सीज लि. ) १४½ लक्ष रुपये कमिशन मिळालें. प्रत्येक भागावर ७ रुपये करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

कंपनीचें वसूल भांडवल ७ कोटि, ५½ लक्ष रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ६६ लक्ष रुपये आहे. करासाठी रिझर्व्ह ९५ लाखांवर आहे. कंपनीच्या डायरेक्टरांची संख्या २५ असून सर एच. पी. मोदी हे बोर्डाचे चेअरमन आहेत. सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडियाकडे विक्रीची व्यवस्था आहे. तिच्या ३,६१० शेअर्सपैकी २,५२७ शेअर्स असोसिएटेड सिमेंट कं. धारण करीत आहे.



## गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म

### मुंबईच्या गव्हर्नरांची भेट

जळगांव तालुका शेतकी संघानें चालविलेल्या पिंपळे गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्मला मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जॉन कॉल-व्हील यांनीं ता. २९ नोव्हेंबर रोजीं सकाळीं भेट दिली. प्रथम व्यवस्थापक मंडळाच्या सभासदांची त्यांस ओळख करून देण्यांत आली. संस्थेचे सर्व विभाग दाखवून संस्थेचे सेक्रेटरी रावसाहेब सावंत यांनीं तपशीलवार माहिती सांगितली. नंतर बगिच्यांतील सुंदरशा मंडपांत सभा झाली. रावसाहेब सावंत यांनीं फार्मच्या कार्याचा खालील त्रोटक वृत्तांत वाचून दाखविला व गव्हर्नर-साहेबांचे आभार मानले.

" नेमाडी बैल खरेदींत परप्रांतीं जाणारा खानदेशांतील शेतकऱ्यांचा रु. ३० लाखांपर्यंतचा पैशांचा ओघ थांबविण्यासाठी सन १९३२ सालीं संस्थेनें ६,००० रुपये खर्चून २४ नेमाडी जनावरें ठेवण्यास प्रारंभ करून सदर गिलिगन कॅटल ब्रिडिंग फार्म सुरू केलें. आज त्यांत १७२ जनावरें आहेत व ७६ हजारांची जिंदगी आहे. आतांपर्यंत १२५ नेमाडी वळू व ७८ गाई शेतकऱ्यांस सवलतीच्या दरानें पैदाशीकरितां पुरविले.

"गाईचें दूध देण्याचें प्रमाण वाढविण्याचे प्रयत्नास यश आलें असून त्या दुधाचा जळगांवांतील लोकांस पुरवठा होतो. नुकतीच १४ म्हशी ठेवून म्हशीचें दूध पुरविण्याचीही सोय केली आहे. फार्मचा तोटा घालवून तें आर्थिक बाबतींत स्वावलंबी करण्याचा यांत चालकांचा उद्देश आहे.

"संघानें घेतलेली शेती व कुरण याचा फार्मकडे उपयोग होतो. जनावरांच्या पैदाशीचें काम अतिशय खर्चाचें असल्यामुळें असें फार्म फायद्यांत रहात नाहीं. आतांपर्यंत २४,००० रु. तोटा असून पूर्वी दरसाल ३,००० रु. फार्मास तोटा होत असे. परंतु लढाईमुळें दाणा-चाऱ्याच्या भावांत भरमसाट वाढ झाल्यामुळें गेल्या वर्षापासून तोटा वाढत आहे. म्हशींची डेअरी तोटा भरून काढण्यासाठींच काढली आहे.

"पोल्ट्री फार्मांत पैदा केलेले व्हा. ले. हार्न ५०० नर व ५०० माद्या पैदाशीकरितां सवलतीच्या दरानें देऊन १५,००० पिलें काढण्यासाठी अंडीं शेतकऱ्यांना पुरविलीं. येथील कॅटल डीपचा महिन्यांतून दोन वेळां शेतकऱ्यांच्या जनावरांना फुकट उपयोग करूं दिला जातो. गतवर्षी अशीं ८१३ जनावरें डीपमध्यें टाकण्यांत आलीं. अशा रितीनें शेतकऱ्यांना उपयुक्त असें कार्य या संस्थेमार्फत करण्यांत येत असतें. माजी व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनीं १९४० मध्यें फार्मला भेट देऊन जनावरें पाहिलीं व होत असलेल्या कामाची प्रशंसा केली. संस्थेच्या निकडीच्या गरजा खालीलप्रमाणें आहेत:—

(१) फार्मला दरसाल होणाऱ्या तोट्याइतकी सरकारी ग्रँन्ट मिळावी.

(२) फार्मवर जाण्याच्या रस्त्यावरील दोन नाल्यांना दोन कॉजवे बांधण्यांत यावेत. "

गव्हर्नर साहेबांनीं फार्मचीं सर्व कामें पाहून आनंद झाल्याचें व्यक्त केलें व नमुनेदारपणाबद्दल प्रशंसा केली.


**पूना गेस्ट हाऊस**

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ मांमुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांमुर्डा, घ. नं. ६२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १७ जानेवारी, १९४५ अंक ३




**व्ही. पी. बेडेकर**
**आणि सन्स लि.**
मुंबई.
**मसाल्याचे व्यापारी**
पुणें एजंटः—
**द. ना. हेजीब**

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरीः** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिल्लकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते; सव तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—पच्चु. ध. करीमभाई

**डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध**

# लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
**दोन वेळां उपयोग**
**दि मागोरा केमिकल कं. लि.**
— हिराबाग, पुणें २ —

**सांडू हार्टिना**

छातींत धडधडणें, धाप लागणें, छातींत कळ अगर चमक मारणें, रक्ताचा दाब वाढणें व हृदयाची अशक्तता यांवर खास गुणकारी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व फार्मसिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
**मे. श्रीदत्त एजन्सी**
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
**मे. भागवत आणि कं.**
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
**मे. जोशी आणि मंडळी**
भवानी पेठ.

# विविध माहिती

### मुंबई प्लॅन: दुसरा खंड

पंधरा वर्षांच्या टाटा-बिर्ला योजनेचा दुसरा खंड आज बुधवार ता. १७ रोजीं प्रसिद्ध होणार आहे.

### अमेरिकेंत सिगारेट्सचा तुटवडा

अमेरिकेंत सिगारेट्सचा भयंकर तुटवडा पडला आहे. कित्येक शहरांतून सिगारेट्सचें रेशन करण्यांत आलें आहे. प्रत्येकास दररोज एकच पाकीट मिळूं शकतें.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमधून १९४३ व १९४४ सालीं झालेल्या चेक्सच्या देवघेवींचे तुलनात्मक आकडे खालीलप्रमाणे आहेतः—

| वर्ष | चेक्सची संख्या | रकम ( कोटि रु. ) | प्रत्येक चेकची सरासरी रकम रु. |
|---|---|---|---|
| १९४३ | ६६,०३,२९२ | १८४८ | २,७९८ |
| १९४४ | ७२,४०,९९४ | २१७३ | ३,००१ |

### असोसिएटेड बस कं. लि., हुबळी

वरील नांवाची बस सर्व्हिसची कंपनी श्री. शिरूरकर ह्यांनीं रजिस्टर केली आहे.

### जर्मन अस्त्रापासून बचाव करण्याचे प्रयत्न

"व्ही टू" ह्या नव्या जर्मन अस्त्राची संहारक शक्ती नाहींशी करण्याचे प्रयत्न ब्रिटिश सरकारची तद्विषयक खातीं करीत आहेत. हें अस्त्र कोठें जाऊन पडलें, ह्याची पुरी माहिती जर्मनांना दोन-चार सेकंदांत कळूं शकते, असें म्हणतात. ह्या अस्त्रांत कोठेंतरी रेडिओनें संदेश पाठविणारें यंत्र असलें पाहिजे, व त्यामुळेंच जर्मनांना हा संदेश मिळत असला पाहिजे.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ५ जानेवारी अखेर संपलेल्या आठवड्यांत ५३ कोटि, ३० लक्ष रुपये किंमतीच्या १,२९,१४५ चेक्सची देवघेव झाली.

### बँक ऑफ बरोडा लि.

वरील बँकेस १९४४ सालीं गेल्या वर्षांतून ओढलेला ३,८६,४२३ रुपयांचा नफा धरून, एकूण २७,५०,१०५ रुपये नफा झाला. भागीदारांना ११% डिव्हिडंड मिळेल. नोकर वर्गास बोनस देण्याकडे २ लक्ष, १० हजार रुपयांचा विनियोग करण्यांत येईल.

### ईस्ट एशिॲटिक कंपनी

ईस्ट एशिॲटिक कंपनीची कोपनहेगन येथील मुख्य कचेरीची इमारत १९ डिसेंबर रोजीं जर्मन विध्वंसकांनीं उध्वस्त केल्याचें वृत्त डॅनिश वकिलानें बरोबर असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. संयुक्त राष्ट्रांस कंपनीचें सहकार्य मिळतें, म्हणून तिचें नुकसान करण्याचा हा प्रयत्न दिसतो.

### रशियांत कपाशीचें उत्पादन

रशियानें लांब धाग्याच्या कपाशीची लागवड पुष्कळच वाढविली असून, इजिप्शन व अमेरिकन जातींची कपास त्या देशांत मोठ्या प्रमाणावर होऊं लागली आहे.

### "बृहन्महाराष्ट्रा"चें अनुकरण ?

धुळें येथें स्थापन होऊं घातलेल्या कॉलेजास तेथील धुळें मिलनें ५० हजार रुपये देणगीदाखल द्यावे, अशी त्या मिलच्या डायरेक्टरांनीं भागीदारांस शिफारस केली आहे. भागीदारांची विशेष साधारण सभा त्याकरितां बोलावण्यांत येणार आहे.

### पंजाब विश्वविद्यालयाचा विक्रम

पंजाब विश्वविद्यालयाच्या लवकरच होणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षांस एकूण ८०,००० विद्यार्थी बसणार आहेत, त्यांपैकीं ४०,००० मॅट्रिकच्या परीक्षेचे आहेत. जगांतील कोणत्याहि विश्वविद्यालयानें इतके उमेदवार एका वर्षांत तपासले नसतील.

### बक्षिसाचे रोखे

हिंदुस्थान सरकारच्या बिनव्याजी पांच वर्षे मुदतीच्या बक्षिसांच्या रोख्यांतील बक्षिसाचे रोखे निवडण्याचें काम सोमवार ता. १५ रोजीं मुंबई येथें पार पडलें.

### १९३४ सालची डायरी वापरा

डायऱ्यांची उणीव दूर करण्याचा एक उपाय अकोला येथील श्री. पटवर्धन ह्यांनीं सुचविला आहे. १९३४ व १९४५ ह्या दोन्ही वर्षांचे वार व तारखा जुळतात, तेव्हां १९३४ च्या डायऱ्या मिळाल्यास त्या १९४५ साठी वापरण्यास हरकत नाहीं, अशी त्यांची सूचना आहे.

### मुंबईतील कोठारें

मुंबई विभागासाठी १०३ कोठारांत धान्य साठविण्यांत येतें, त्याची सर्व व्यवस्था करण्यासाठी २,००० कामगार कामावर आहेत. प्रत्येकास दरमहा सरासरीनें ८० रुपये मिळतात.

### "प्रगतीचें भडक वर्णन नको"

संयुक्त राष्ट्रांच्या प्रगतीचें भडक वर्णन केल्यामुळें कारखान्यांतील उत्पादन मंदावतें, तेव्हां असें वर्णन न करण्याची सूचना अमेरिकेचे अध्यक्ष मि. रूझवेल्ट ह्यांनीं लष्करी व बिनलष्करी अधिकाऱ्यांस पत्र पाठवून केली आहे.

### रक्तांतर

६ जून ते ३० सप्टेंबर १९४४ ह्या मुदतींत युरोपांतील युद्धांत जखमी झालेल्या ज्या सैनिकांस रक्तदानाची आवश्यकता भासली अशांना एकूण एक लक्ष पिंट रक्त पुरविण्यांत आलें. पहिल्या सहा आठवड्यांतच २७,७६६ जखमी सैनिकांच्या शरीरांत दुसऱ्याचें रक्त घालावें लागलें. "दि लान्सेट" ह्या ब्रिटिश वैद्यकीय पत्रांत वरील माहिती आली आहे.

### सुएझचा कालवा—१९६८ सालीं काय होणार ?

सुप्रसिद्ध सुएझच्या कालव्यांतून आगबोट वहातुक सुरू झाली, त्यास नुकतींच ७५ वर्षे पुरीं झालीं. कालव्याच्या खोदाईचे प्रारंभीं इंग्लंडनें त्यांत लक्ष घातलें नाहीं, परंतु पुढें डिझरॅलीनें इजिप्तच्या खेदिवकडून सुएझ कॅनॉल कंपनीचे तिच्या एकूण ४,००,००० भागापैकीं १,७६,६०२ भाग मिळविले. ह्या कालव्यानें इंग्लंडच्या साम्राज्यवाढीस व व्यापारवृद्धीस चांगलाच हातभार लावला आहे. चालू युद्धापूर्वीच्या दहा वर्षांची सरासरी पाहिली, तर कालव्यांतून जाणाऱ्या आगबोटींपैकी ५०% ब्रिटिशच होत्या, असें आढळतें. १७ नोव्हेंबर, १९६८ रोजीं हा कालवा कराराप्रमाणें इजिप्त सरकारच्या ताब्यांत जाईल, त्यापूर्वी कोशीस करून तो आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखालीं आणण्याचा इंग्लंड प्रयत्न करील, हें उघड आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १८ | अर्थशास्त्रज्ञांच्या सल्लागार समितीशीं चर्चा—अडचणी व त्यांतून मार्ग—शेतीचें उत्पादन आणि संततिनियमन—औद्योगिक आढावा. | |
| २ सायकलींच्या बनावटीचा धंदा ... ... ... | १९ | ६ भारतीय शास्त्र परिषद | २२ |
| ३ आयुर्विमा व्यवसायाचें लोणी... ... ... | २० | ७ बँकिंगचा नवा कायदा | २३ |
| ४ आयुर्विम्याचें नवें काम | २० | | |
| ५ स्फुट विचार ... ... | २१ | | |



# अर्थ

बुधवार, ता. १७, जानेवारी १९४५


## सायकलींच्या बनावटीचा धंदा

### ब्रिटिश आणि हिंदी कारखानदारांची स्पर्धा

विद्यार्थी, नोकर, कामकरी व लहानसहान धंदेवाले ह्यांस सायकलीचें स्वस्त आणि सोइस्कर साधन किती उपयोगी वाटत आहे ह्याची कल्पना पुण्यासारख्या शहरांतील रस्त्यांतून दुचाकी-स्वारांच्या अविरत वर्दळीवरून सहज येण्यासारखी आहे. स्वतःच्या उद्योगास जाण्यास आणि मालाची बोचकीं वाहून नेण्यासहि सामान्य लोक सायकली सर्रास वापरतांना दिसून येतात आणि त्या आतां अत्यंत आवश्यक वस्तूंच्या सदरांत मोडतात. हीच परिस्थिति कमी-अधिक प्रमाणांत सर्व हिंदुस्थानांत सध्या आहे. ह्या सायकली आजपर्यंत सर्वांशीं बाहेरच्या देशांतून, विशेषतः इंग्लंडांतून आयात होत आहेत. ज्यास अशी निश्चित आणि वाढती मागणी आहे असा हा माल स्वदेशी धंदा स्थापन करून ह्या देशांत कां काढला जाऊं नये ह्या कल्पनेनें हिंदी कारखान-दारांनीं त्याकडे अगदी अलीकडे लक्ष पुरवलें असून स्वदेशी सायकली आतां तयार होऊं लागल्या आहेत. यंत्रसामुग्री आणि कच्चा माल ह्यांच्या पुरवठ्याचे मार्गांतील अडचणींमुळें सायकलच्या सारख्या धंद्याचे उभारणीस व प्रगतीस युद्धकाल अनुकूल नाहीं. तथापि, ह्या मालास असलेली मागणी व त्याच्या चढीच्या किंमती ह्यांचे योगानें स्वदेशी सायकलींचें उत्पादन, मर्यादित प्रमाणांत कां होईना, शक्य झालें आहे. ह्या धंद्याची खरी अडचण परदेशी सायकलींच्या स्पर्धेंत आहे. नित्याच्या उपयोगाचा माल बाहेरून आणला जाण्यास उत्तेजन न देतां तो ह्या देशांत बनव-णाऱ्या कारखानदारांस यंत्रसामुग्री व कच्चा माल ह्यांचे बाबतींत सवलती देऊन असल्या जिनसांच्या स्वदेशी बनावटीची प्रगति होईल असें धोरण सरकारनें अंगिकारावें अशा आशयाच्या सूचना हिंदी धंदेवाल्यांनीं त्यास केल्या आहेत. पण युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडसारखे देश आपला स्वस्त माल हिंदुस्थानांत पाठवतील तेव्हां त्यांच्या स्पर्धेंत हिंदी स्वदेशी सायकलींचे कारखाने कसा टिकाव धरणार हा येथें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. सायकलींची लोक-प्रियता ह्या देशांत सारखी वाढत आहे पण ही मागणी स्वदेशी मालानें पुरवण्यास हिंदी कारखाने समर्थ होतील काय ?

हिंद सायकल्स लिमिटेडचे अध्यक्ष, श्री. बिर्ला, ह्यांनीं आपली कंपनी व इतर कारखानदार हिंदुस्थानची सबंद मागणी भागवण्या-इतक्या पांच लक्ष सायकली युद्धोत्तर काळांत बनवण्याची योजना हातीं घेणार असून ह्या कामीं ब्रिटिश धंदेवाल्यांनीं अनिष्ट अशी स्पर्धा त्यांच्याशीं करूं नये आणि हिंदी स्वदेशी धंद्यास पूर्ण वाव देण्याचें अभिवचन ब्रिटिश सरकारानें पाळावें असें म्हटलें आहे. सायकलींच्या ब्रिटिश कारखानदारांनीं तिकडे स्वतःच्या धंद्याच्या पुनरुज्जीवनाची योजना आखून ती ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडला सादर केली आहे. सायकलींचे कांहीं कारखाने पूर्वीप्रमाणें इंग्लंड-मध्यें माल काढीत आहेत, पण कित्येकांचा लढाऊ सामानाच्या निर्मितीसाठी सरकारच्या नियमानें उपयोग केला जात आहे. कामकरी आणि कच्चा माल उपलब्ध झाल्यास युद्ध थांबल्यापासून एक वर्षाचे आंत सायकलींचे सर्व कारखाने पुन्हां पूर्ववत् चालू करून त्यांत साठ लक्ष नग बनवण्याची ब्रिटिश कारखानदारांस उमेद वाटत आहे. मोटार सायकलींचा धंदा पुन्हां नीट प्रस्थापित होण्यास कुशल कारागिरांच्या अभावीं अधिक वेळ लागेल, पण ह्या गाड्याहि पांच लक्षांपर्यंत बनवण्याची ब्रिटिश कारखान-दारांची तयारी आहे. आपल्या कारखान्यांची बऱ्याच प्रमाणांत पुनर्रचना करावी लागून नवीन यंत्रेंहि उभारावीं लागतील असें त्यांचें म्हणणें आहे. ब्रिटिश पायसायकली आणि मोटार साय-कली ह्यांच्या धंद्याचे आकाराची कल्पना उत्पादन व निर्गत ह्यांच्या विषयींच्या खालील आकड्यांवरून येण्याजोगी आहे.

ब्रिटिश सायकलींचा धंदा ( १९३७ )

| | उत्पादन ( संख्या ) | निर्गत एकूण | निर्गत साम्राज्यांत |
|---|---|---|---|
| पाय सायकली | १८,५०,००० | ६,९२,००० | १,३८,६०० |
| मोटार सायकली | ७७,७०० | १५,८०० | ९,५०० |

इंग्लंडचें युद्धामुळें डळमळलेलें आसन पुन्हां स्थिरावण्यास ब्रिटिश मालाची निर्गत पूर्वीपेक्षा दीड पट होणें अगत्याचें आहे असा अंदाज आहे. त्यास अनुसरून ब्रिटिश सायकलींची निर्गत युद्धोत्तर काळांत वाढवण्याची इंग्लंडमधील कारखानदारांची मनीषा आहे. आपल्या मालास युद्धानें उध्वस्त झालेल्या युरोपि-अन देशांत चांगली मागणी येईल आणि इतर बाजारपेठांत जर्मनी व जपान ह्या देशांची पूर्वीसारखी चढाओढ होणार नाहीं अशी त्यांची अपेक्षा आहे. ब्रिटिश डोमिनिअन व हिंदुस्थान येथें साय-कलींचे भाग जोडून तयार केलेला माल विकणारांची थोडी स्पर्धा होईल, पण तिला आपण तोंड देऊं शकूं असें त्यांस वाटत आहे. ह्या त्यांच्या कल्पनांस आणि योजनांस अनुलक्षून श्री. बिर्ला ह्यांस हिंदुस्थानांत बनवल्या जाणाऱ्या सायकलींस संरक्षण हवें आहे. आपणांस विशेष सवलती किंवा संरक्षण नको; जगांतील बाजार-पेठांचा दरवाजा खुला रहावयास पाहिजे आहे असें त्यावर ब्रिटिश कारखानदारांचें म्हणणें आहे. सायकलीसारख्या मालास हिंदु-स्थानांत मज्जाव होणार असेल तर इंग्लंडनें ह्या देशाचें अवजड देणें ( स्टर्लिंग शिलक ) कसें फेडावयाचें ह्या पृच्छेनें त्यांच्या वतीनें प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. नवीन स्वदेशी उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याचे बाबतींत हिंदुस्थान सरकार कोणतें धोरण स्वीकारणार ह्या प्रश्नाचा प्रस्तुत विषय हा एक महत्त्वाचा भाग आहे. " नाक दाबलें म्हणजे तोंड उघडतें " ह्या म्हणीस अनुसरून ब्रिटिश धंदेवाले हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिल-कांचा उपयोग आपला निरनिराळ्या जातींचा माल ह्या देशांत खपवण्यास आधार म्हणून करणार असा रंग स्पष्ट दिसतो.

## आयुर्विमा व्यवसायाचें लोणी ब्रिटिश कंपन्यांच्या वांटयास !

आयुष्याच्या विम्याचे बंधांत तरी निदान हिंदी कंपन्यांनीं विदेशी कंपन्यांची हकालपट्टी केलेली आहे, अशी सर्वसाधारण समजूत आहे आणि विमा उतरतेवेळीं विदेशी कंपन्यांचें नांवहि समोर येत नाहीं, अशी बहुतेकांची परिस्थिति आहे. १९४३ सालीं हिंदी कंपन्यांनीं एकूण ६५ कोटि, २४ लक्ष रुपयांचे आयुर्विमे उतरले, त्यांपैकीं ६२ कोटि, ९४ लक्षांचें काम हिंदुस्थानांत पुरें झालें व बाकीचें काम त्यांना हिंदुस्थानाबाहेर मिळालें. विदेशी कंपन्यांनीं हिंदुस्थानांत ह्याच वर्षी ९ कोटि, १८ लक्ष रुपयांचें काम मिळविलें. म्हणजे, हिंदुस्थानांतील एकूण ७२ कोटि, १२ लक्ष रुपयांच्या विम्यापैकीं सुमारें १३% विमे विदेशी कंपन्यांकडे गेले. १९१ हिंदी कंपन्यांना ८७% काम मिळालें, तर १५ विदेशी कंपन्यांनीं १३% काम मिळविलें. हिंदी कंपन्या हिंदुस्थानांतच मुख्यतः व्यवहार करतात आणि त्या स्वदेशी आहेत, ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. ह्या उलट, विदेशी कंपन्यांपैकीं एक सोडून बाकी सर्व ब्रिटिश साम्राज्यांतील आहेत आणि हिंदुस्थान हा त्यांच्या व्यवहारक्षेत्राचा केवळ एक भाग आहे. ह्या गोष्टींवरून हिंदी आयुर्विमा क्षेत्रांत विदेशीयांस अद्याप केवढें महत्त्वाचें स्थान आहे, हें दिसून येईल. त्यांनीं हिंदुस्थानांत १९४३ सालीं केलेल्या कामाचे आकडे पाहिले तर त्यांत सन लाइफ ऑफ कॅनडा ( ३ कोटि, ६६ लक्ष रु. ) प्रूडेन्शिअल ( २ कोटि, १८ लक्ष ) व नॉर्विच युनियन ( १ कोटि, ३० लक्ष ) ह्या कंपन्या अग्रेसर दिसतात. त्या तिघांनीं मिळून १९४३ सालांतील विदेशी कंपन्यांच्या वाट्याच्या ९ कोटि, १८ लक्ष रुपयांच्या विम्यापैकीं ७ कोटि, १४ लाखांचे विमे उतरले.

### हिंदी कंपन्यांस थोडें काम

हिंदी विमा कंपन्यांपैकीं फक्त ४६ कंपन्यांना १९४३ सालीं प्रत्येकीं एक हजार विमेदार मिळूं शकले. ४० कंपन्यांच्या वाट्यास प्रत्येकी १०० विमेहि आले नाहींत. २७ कंपन्यांना प्रत्येकी १ लक्ष रुपयांचेंहि काम मिळालें नाहीं. १९४३ मध्यें १ कोटि रुपयांपेक्षा अधिक काम मिळविलेल्या हिंदी कंपन्यांची संख्या फक्त १७ आहे. ज्यांचेकडे १९४३ अखेर एकूण चालू विमे १० लक्ष रुपयांचेहि नाहींत, अशा ५२ कंपन्या आहेत. हिंदी कंपन्या संख्येनें विदेशी कंपन्यांच्या सुमारें १३ पट आहेत, परंतु त्यांस काम मात्र ७ पट सुद्धा मिळत नाहीं. आपल्या घरच्या विमा व्यवहारांतहि विदेशीयांस, आपणांस त्याची जाणीव न होतां, केवढा मोठा हिस्सा मिळत आहे !

### ब्रिटिश कंपन्यांच्या वाट्यास लोणी !

विदेशी कंपन्यांना हिंदुस्थानांत त्यांच्या संख्येच्या मानानें फाजील काम मिळत आहे, एवढेंच नव्हे तर त्यांतील सर्व लोणी त्यांच्या वाट्यास जात आहे, ही गोष्ट विशेष चिंतनीय आहे. १९४३ सालीं हिंदी कंपन्यांनीं उतरलेल्या विम्यांची प्रत्येकी सरासरी रकम २,२३७ रुपये भरली, म्हणजे त्यांची प्रत्येक विमा पॉलिसी सरासरीनें त्या रकमेची होती. ह्या उलट विदेशी कंपन्यांनीं हिंदुस्थानांत दिलेल्या पॉलिसींची सरासरी किंमत ६,७४९ रुपये होती. म्हणजे, विदेशी कंपन्यांनीं हिंदी कंपन्यांच्या मानानें फार थोड्या लोकांकडून पुष्कळच काम मिळविलें. सहाजीकच, तें काम मिळविण्यास व चालू ठेवण्यास त्यांना तुलनात्मक दृष्टीनें कमी खर्च येणें स्वाभाविक आहे आणि खर्चातील बचत ही विमा कंपन्यांच्या स्पर्धेतील एक अत्यंत महत्त्वाची अनुकूल अशी बाब आहे.

### त्याचा कंपन्यांवर परिणाम

विदेशी कंपन्यांच्या विमा पॉलिसीची रकम हिंदी कंपन्यांच्या पॉलिसीच्या रकमेच्या सुमारें तिपटीइतकी असते, ह्या गोष्टीचे त्यांना इतरहि कांहीं महत्त्वाचे फायदे आहेत. चांगल्या दर्जाचे, दीर्घायुषी विमेदार त्यांचे वाट्यास येतात ह्याकारणानें मृत्यूंचें प्रमाण त्या कंपन्यांस अनुकूल रहातें, त्यांचे विमे रद्द होण्याचें प्रमाणहि फार अल्प असतें आणि ह्या कारणांमुळें निवडक अशा विमेदारांच्या विम्यापासून त्यांची आर्थिक शक्ति वाढण्यास सहाय होतें. विम्याचें काम ज्यास्त मिळविण्यासाठी स्पर्धा करून खालच्या पातळीवर जाणें हिंदी कंपन्यांना भाग पडतें आणि त्यामुळें निकोप व दीर्घायुषी विमेदार अल्प खर्चांत मिळवून त्यांचे विमे टिकविण्याचें महत्त्वाचें काम त्या यशस्वी रीतीनें करूं शकत नाहींत. विदेशी कंपन्यांचे हिंदी विमेदार श्रीमंत व समाजाच्या वरच्या वर्गांतील असल्याकारणानें, पैशाची अभावीं त्यांचे विमे बंद पाडण्याची पाळी सहसा येत नाहीं. त्याचप्रमाणें, आजारीपणांत ते उत्कृष्ट वैद्यकीय सल्ला घेऊन उपचार करूं शकतात आणि विमा कंपनीस कराराप्रमाणें ते हप्ते भरत रहातात ! व्यवस्थेच्या खर्चातील बचत आणि वर सांगितलेले इतर फायदे, ह्यांमुळें विदेशी कंपन्यांचा कारभार अधिक कार्यक्षम व किफायतशीर होऊं शकतो.

### हिंदुस्थानांतील आयुर्विम्याचें नवें काम

| वर्ष | हिंदी कंपन्या ( कोटि रु. ) | विदेशी कंपन्या ( कोटि रु. ) | एकूण ( कोटि रु. ) |
|---|---|---|---|
| १९३८ | ४३·३ | ८·४ | ५१·७ |
| १९४० | ३२·३२ | ३·७९ | ३६·११ |
| १९४३ | ६२·९४ | ९·१८ | ७२·१२ |

### आयुर्विमा पॉलिसीची सरासरी रकम ( रुपये )

| | हिंदी कंपन्या | विदेशी कंपन्या |
|---|---|---|
| १९३८ | १,४६० | ३,२४४ |
| १९४० | १,६४५ | ३,९६३ |
| १९४३ | २,२३७ | ६,७४९ |

### 'चांदीची' किंमत म्हणजे 'शुद्ध चांदीची'

" स्टॅंडर्ड " किंवा " स्टर्लिंग " ह्या नांवाच्या चांदीची किंमत लंडनच्या बाजारांत नेहमी सांगितली जाई. ह्या चांदींतील १२ पैकीं ११ भाग शुद्ध चांदी व १ भाग भेसळ असे. अमेरिकेंतील चांदीचा भाव सांगितला जातो, तो शुद्ध चांदीचा. त्यामुळें, दोन्ही भावांचा हिशेब करतांना वरील गोष्ट लक्षांत घ्यावी लागे. ह्यापुढें, लंडनमधील चांदीचा भाव शुद्ध चांदीचाच सांगितला जाणार आहे. हिंदुस्थान, चीन, वगैरे देशांत अमेरिकेप्रमाणें शुद्ध चांदीचाच भाव सांगितला जातो. इंग्लंडनें आतां आपलें वैचित्र्य टाकून दिलें आहे. वेगवेगळ्या देशांतील भावांची तुलना करतांना अर्थातच हुंडणावळीचा दर लक्षांत घ्यावा लागेल.

# स्फुट विचार

## अर्थशास्त्रज्ञांच्या सल्लागार समितीशी चर्चा

आर्थिक अभिवृद्धीच्या योजनांचे बाबतींत उत्पन्न होणाऱ्या अडचणींच्या प्रश्नांसंबंधानें सरकारास सल्ला देण्यासाठी सर आर्देशीर दलाल ह्यांनीं निवडक हिंदी शास्त्रज्ञांची एक समिती नेमिली आहे. तिची एक बैठक दिल्ली येथें सर आर्देशीर दलाल ह्यांनीं नुकतीच भरविली होती आणि तीमध्यें अर्थशास्त्रज्ञांनीं उपस्थित केलेल्या मुद्यांचेविषयीं सरकारचें काय धोरण आहे ह्याचा खुलासा सर आर्देशीर ह्यांनीं केला. हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या जमीन धारणाच्या निरनिराळ्या पद्धतींमुळें शेतीच्या सुधारणेचे मार्गांत अडथळे येतात ह्या सर फेरोझ खारेघाट ह्यांच्या मुद्यास अनुलक्षून त्यांनीं असें सांगितलें कीं सदरहू पद्धतींची चौकशी करून त्यांत योग्य ते बदल घडवून आणणें इष्ट आहे. बंगालमधील जमीनदारी पद्धतीसंबंधानें फ्लाउड कमिशननें केलेल्या शिफारशींचा विचार त्या प्रांताचें सरकार करीत असून त्यांस अनुसरून विधायक कृती करण्यांत येईल तर प्रगतीच्या मार्गांत महत्त्वाचें पाऊल त्यासारखें होईल असं ते म्हणाले. शेतांच्या तुकड्यांचे एकीकरणाबाबत त्यांनीं मध्यप्रांताच्या धर्तीसर मुंबई सरकार करीत असलेल्या कायद्याच्या तजवीजीकडे बोट दाखविलें. युद्धसमाप्तीबरोबर देशांत तयार माल आणि यंत्रसामुग्री ह्यांस मोठी मागणी एकदम येईल, त्यावेळीं यंत्रांच्या पुरवठ्याकडे विशेष लक्ष पुरवावें लागेल असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

## अडचणी व त्यांतून मार्ग

सरकारच्या धोरणाचा रोख कांहींसा समाजसत्तावाद्यांकडे असल्याचा भास होतो ह्या उद्गारासंबंधानें सर आर्देशीर ह्यांनीं उत्तर दिलें कीं सामान्य जनतेच्या राहणीचें मान सुधारावयाचें म्हणजे तिची प्राप्ती वाढवयाचाच. निरनिराळ्या धंद्यांच्या प्रगतीचा प्रश्न सरकारनें सर्वस्वी धंदेवाल्यांवर सोपवलेला नाहीं; ते स्वतः ह्या बाबतींत पुढाकार घेत आहे असें म्हणून माहिती व आकडे यांच्याविषयींच्या असमाधानकारक स्थितीमुळें आर्थिक योजनांत अनिश्चितपणा उत्पन्न होतो ह्या टीकेंत तथ्य असल्याचें त्यांनीं कबूल केलें, पण ह्या अडचणीच्या स्थितींत शक्य तेवढ्या निश्चित रीतीनें प्रगति करण्याचें ठरलें आहे असा खुलासा सर आर्देशीर ह्यांनीं केला. अभिवृद्धीचीं स्पष्ट ध्येयें पुढें ठेवून त्यांवर नेम धरला जात नाहीं अशी टीका सरकारवर एका बाजूनें होत आहे तर दुसऱ्या बाजूनें लांबच्या ध्येयांच्या मार्गे न लागतां थोड्या वर्षांच्या अवधींत मूर्तस्वरूप देतां येईल असा कार्यक्रम हातीं घेण्यांत यावा असें सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकार ह्या दुसऱ्या मार्गाचा अवलंब करीत आहे आणि मुंबईचें अनुकरण इतर प्रांतांनीं करावें असेंहि तें सुचवीत असल्याची माहिती त्यांनीं दिली. सर्व माणसांस पुरेसें काम मिळेल अशी व्यवस्थाहि केली जात आहे असेंहि ते म्हणाले.

## शेतीचें उत्पादन आणि संततिनियमन

हिंदुस्थानची लोकसंख्या इतक्या झपाट्यानें वाढत आहे कीं अन्नाचें उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न ह्या वाढीपुढें व्यर्थ झाल्यावांचून रहावयाचे नाहींत अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. संततिनियमनावांचून जनतेची रहाणी सुधारण्याची आशा व्यर्थ आहे, कारण वाढणारें संपत्तीचें उत्पादन आणि वाढणारी लोकसंख्या ह्यांच्यामधील शर्यतींत लोकसंख्येसच विजय मिळून जनतेची रहाणी आहे तशीच समाधानकारक राहील असें कांहीं जणांस वाटत आहे. ह्यासंबंधांत सर फेरोझ खारेघाट ह्यांनीं असें मत प्रकट केलें आहे कीं, अन्नाचें उत्पादन वाढण्यास हिंदुस्थानांत एवढा वाव आहे कीं संततिनियमनाचा आजच विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. पांच दहा वर्षांत हिंदी शेतीचें उत्पादन निदान पन्नास टक्क्यांनीं वाढवितां येईल, इतकेंच नव्हे तर अनुकूल परिस्थिति निर्माण केली जाईल आणि शेतीच्या मालाच्या किंमती शेतकऱ्यांस किफायतशीर होतील अशी व्यवस्था होईल तर हें उत्पादन दुप्पटहि होऊं शकेल असें ते म्हणाले. असें असतांना हिंदुस्थानच्या लोकसंख्येचा बाऊ करण्याचें कारण नाहीं, निदान आज तरी तो प्रश्न तातडीचा नाहीं असा अभिप्राय सर फेरोझ ह्यांनीं व्यक्त केला आहे. शेतीचें उत्पादन वाढवण्याचे दृष्टीनें जमीनदारीच्या चालू पद्धतींत बदल करण्याच्या आवश्यकतेस अनुलक्षून त्यांनीं अशी माहिती दिली कीं, प्रांतिक सरकारांचें ह्या बाबतींत असें म्हणणें आहे कीं, सध्याच्या स्थितींत ह्या प्रश्नास हात लावण्यानें मालक व कुळें ह्यांच्यामध्यें तेढ मात्र उत्पन्न होऊन उत्पादनवाढीचा उद्देश सफल होणार नाहीं. तथापि, संयुक्त किंवा सहकारी संघटनाच्या सहायानें शेतीचा धंदा अधिक कार्यक्षम करण्याचे प्रयत्न हातीं घेण्यांत येतील असें आश्वासन त्यांनीं दिलें.

## औद्योगिक आढावा

संपत्तीच्या उत्पादनास कुशल मनुष्यबळ, नैसर्गिक अनुकूलता, भांडवल व संघटन ह्या चतुर्विध साधनांची आवश्यकता असते. त्यांचेविषयींची हिंदुस्थानांत आज काय स्थिति व शक्यता आहे ह्याचा आढावा हिंदुस्थान सरकारचे औद्योगिक सल्लागार, मि. व्हेसुगर, ह्यांनीं नभोवाणीवरील एक भाषणांत काढला आहे. मनुष्यबळास उद्देशून ते म्हणाले, कीं अलीकडच्या युद्धपरिस्थितीच्या अनुभवावरून हें सिद्ध झालें आहे कीं सामान्य हिंदी शेतकरीहि थोड्याशा शिक्षणानें गुंतागुंतीचीं आधुनिक लढाऊ यंत्रें चालवूं व वापरूं शकतो. म्हणजे मोठमोठ्या कारखान्यांत काम करण्यास कुशल माणसांचा तुटवडा पडण्याचें कारण नाहीं, हें उघड झालें. नैसर्गिक साधनांत दगडी कोळसा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचा पुरवठा ह्या देशांत आहे, पण चांगला कोळसा देशाच्या विशिष्ट भागांस मर्यादित आहे ही एक अडचण आहे. पण पाण्याच्या जोरानें विजेची प्रेरक शक्ती निर्माण करतां येईल ही गोष्ट अत्यंत अनुकूल आहे. आणखी एक महत्त्वाची बाब लोखंडाच्या पुरवठ्याविषयींची आहे. हिंदी लोखंड उच्च दर्जाचें आहे हें येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. मायका आणि मोनाझाइट ह्यांचाहि पुरवठा उत्कृष्ट आहे. पण शिसें, जस्त वगैरे महत्त्वाच्या धातू ह्या देशांत उपलब्ध नाहींत हें एक वैगुण्य आहे. राकेलचा पुरवठाहि मर्यादित आहे. आधुनिक धंद्यांत सल्फ्यूरिक ॲसिडला फार मोठें व जिव्हाळ्याचें महत्त्व आहे आणि गंधक तर ह्या देशांत मिळत नाहीं. ह्या कारणानें सदरहु बाबतींत हिंदुस्थानास इतर देशांवर अवलंबून रहाणें प्राप्त आहे. हीच गोष्ट फॉस्फोरसाची आहे. तथापि, जनावरांचीं कातडीं, गळिताचीं धान्यें, जंगलांत मिळणारे जिन्नस, ताग, इत्यादींचा पुरवठा येथें विपुल आहे आणि ह्या वस्तूंचा उपयोग उद्योगधंद्यांत केला गेल्यास हिंदुस्थानांत संपत्तीचें उत्पादन मोठ्या प्रमाणांत वाढवण्यास भरपूर वाव आहे.

## भारतीय शास्त्र परिषद, नागपूर

### ( ३२ वें अधिवेशन )

भारतीय शास्त्र परिषदेचें ३२ वें अधिवेशन नागपूर येथें ता. २ जानेवारी १९४५ रोजीं सर शांतिस्वरूप भाटनगर, डॉयरेक्टर, बोर्ड ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च यांचे अध्यक्षतेखालीं सुरू झालें. ही परिषद् प्रतिवर्षी इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन, कलकत्ता, ही संस्था भरविते व तीस अखिल हिंदुस्थानांतील सर्व विषयांतील शास्त्रज्ञ जमतात. गणित, संख्या, विज्ञान, रसायन, वनस्पति, जीव, भूगोल, भूगर्भ, मानववंश, पुराणवस्तुसंशोधन, मानस, शारीर, औषधी, कृषि, कीटक, स्थापत्य इ. इ. शास्त्रें बारा विभागांत वांटून प्रत्येक विभागास एकेक अध्यक्ष नेमून काम चालविलें जातें. परिषदेचीं अधिवेशनें निरनिराळ्या विश्वविद्यालयांतर्फे निमंत्रलीं जातात व त्याप्रमाणें यंदाचें अधिवेशन नागपूर विश्वविद्यालयानें बोलाविलें होतें. परिषद नेहमीं ता. २ जाने. ते ८ जानेवारी अशी सात दिवस भरवितात; परंतु सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें यंदाचें अधिवेशन दोन दिवस आखडतें घेतलें गेलें. परिषदेचें उद्घाटन मध्यप्रांताचे गव्हर्नर यांनीं ता. २ रोजीं केल्यावर परिषदेच्या कार्यास सुरवात झाली. नियोजित सर्वाध्यक्ष सर शांतिस्वरूप भाटनगर हिंदुस्थानतर्फे विलायतच्या दौऱ्यावर गेले असल्याकारणानें त्यांचें भाषण गतवर्षीच्या सर्वाध्यक्षांनीं वाचून दाखविलें. व्याख्यानांत युद्धोत्तर योजनांचा विशेष उल्लेख केला होता. ता. ३ रोजीं पासून वैयक्तिक विभागांच्या बैठकी सुरू झाल्या व त्यांत मागील वर्षी केलेल्या संशोधनांचें निबंधमय अहवालवाचन झालें व त्यावर चर्चा, उपचर्चा इ. झाल्या. त्याशिवाय देशांतील चालू घडामोडींतील महत्त्वाच्या विषयांवरही निरनिराळ्या विभागांच्या संयुक्त अगर पृथक चर्चा झाल्या. उदाहरणार्थः—हिंदुस्थान आणि जलशक्ती निर्मित विद्युत, हिंदुस्थानांतील औषधी कारखान्यांचे भवितव्य, भावी नॅशनल केमिकल व नॅशनल फिजिकल लॅबॉरेटरी यांचें कार्य, सूक्ष्म जीवजंतूंचें कृषिविषयक कार्य इ. यंदाच्या परिषदेचें वैशिष्ट्य म्हणजे युद्धोत्तर कालांतील पुनर्घटनेच्या चर्चा सर्व विभागांत झाल्या, इतकेंच नव्हे तर कित्येक विभागाध्यक्षीय भाषणांत हेच सूर वहात होते. या सर्व चर्चा व उल्लेख पाहून वाचकांची अपेक्षा यांत कांहीं विधायक योजना मांडल्या गेल्या असतील अशी असण्याचा संभव आहे परंतु या दृष्टीनें बरीच निराशा होण्याचा संभव वाटतो. ज्या शास्त्रज्ञांनीं या चर्चेत भाग घेतला त्यांच्या हातांत चर्चा करण्यापलिकडे कांहींच नसल्याकारणानें कित्येकवेळां अवास्तव सूचना करण्यापर्यंत मजल जाणें सहाजीकच होतें. अशा तऱ्हेनें ता. ६ जानेवारीपर्यंत निबंधवाचन, चर्चा, उपचर्चा व व्याख्यानें झाल्यावर ता. ७ रोजीं नागपूरच्या आसमंतात् सहल झाली. रामटेक, सिंसी तलाव आणि मनसार येथील मँगेनीजच्या खाणी इ. गोष्टींची पहाणी होऊन परिषद समाप्त झाली.

अशा अखिल भारतीय शास्त्र परिषदांच्या कार्यक्रमांत महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचें स्थान बरेंच खालच्या दर्जाचें आढळून येतें, ही मोठी दुःखाची बाब आहे. अगोदरच महाराष्ट्रांत शास्त्रीय संशोधन अल्प होत असतें. जे शास्त्रज्ञ थोडेंफार उत्तम संशोधन करीत असतात त्यांचा अशा परिषदांच्या कार्यावर विश्वास कमी दिसतो. या सर्व कारणांमुळें महाराष्ट्रीयांची अशा परिषदांस उपस्थिति फारच कमी असते. नाहीं म्हणावयास यंदा कृषिविभागाचे अध्यक्ष फर्ग्यूसन महाविद्यालयांतील ऑनररी प्राध्यापक श्री. रा. रा. ना. वि. जोशी हे होते. व रावबहादुर का. ना. दीक्षित, माजी डॉयरेक्टर, पुराणवस्तु संशोधन खातें, दिल्ली, यांचें "सिंधुनदाकांठची प्राचीन संस्कृति" या विषयावर जाहीर व्याख्यान झालें. यंदा परिषद नागपूर मुक्कामीं भरल्याकारणानें बरेचसे महाराष्ट्रीय शास्त्रज्ञ जमले होते. व हीच प्रथा इतर ठिकाणीं चालू राहिल्यास फार उत्तम होईल. पुढील अधिवेशन म्हैसूर विश्वविद्यालयातर्फे बंगलोर येथें भरविण्याचें ठरलें आहे. प्राणिशास्त्र या विभागाचे अध्यक्षांचे जागेवर नागपूर सायन्स कॉलेजमधील प्राणिशास्त्राचे प्राध्यापक डॉ. एम्. ए. मोघे, एम्. ए., एम्. एससी., पी.एच. डी. यांची निवडणूक झाली आहे.

के. के. डोळे





# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

विक्रीस काढलेलें नवीन दहा लाखांचें भांडवल सर्व विकलें गेलें आहे.

— भांडवल —

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. १०,०८,००० | रु. ७,५७,३८० |

खेळतें भांडवल रु. १,००,००,००० चे वर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## बँकिंगचा नवा कायदा

प्रत्येक बँकेनें रिझर्व्ह फंड निर्माण केला पाहिजे. प्रत्येक वर्षीच्या जाहीर केलेल्या नफ्याच्या, नफा वाटणीपूर्वी, किमान २०% रकम (रिझर्व्ह फंड वसूल भांडवला इतका होईपर्यंत) रिझर्व्ह फंडांत टाकलीच पाहिजे. शेड्यूल्ड बँकांस हा नियम लागू नाहीं. मागणीबरहुकूम परत करावयाच्या ठेवींच्या १½% व इतर ठेवींच्या ५% इतकी रकम प्रत्येक बिगर शेड्यूल्ड बँकेनें रोख राखली पाहिजे.

ट्रस्ट स्वीकारून तो एक्झिक्यूट करणें, एक्झिक्यूटर किंवा ट्रस्टी म्हणून इस्टेटीचें ॲडमिनिस्ट्रेटर होणें किंवा ६ व्या कलमांतील व्यवहारांपैकीं एकादा व्यवहार करणें, ह्या उद्देशांखेरीज इतर कोणत्याहि कारणास्तव बँकिंग कंपनीनें सबसिडिअरी कंपनी काढतां कामा नये; सबसिडिअरी कंपनी वगळून इतर कंपन्यांत तिचें ४०% पेक्षां जास्त भांडवल ( विक्रीस काढलेलें व खपलेलें ) असतां कामा नये. १५ जानेवारी, १९३७ पूर्वी धारण करीत असलेल्या भागांस हा नियम लागू नाहीं.

### विदेशी कंपन्यास लायसेन्सची अट

ब्रिटिश हिंदुस्थान किंवा ग्रेट ब्रिटन ह्यांचेबाहेर स्थापन झालेली परंतु कायदा अंमलांत येण्याच्या पूर्वी बँकिंगचा धंदा ब्रिटिश हिंदुस्थानांत करीत नसलेली कंपनी, रिझर्व्ह बँकेकडून लायसेन्स मिळाल्याखेरीज हिंदुस्थानांत नव्यानें व्यवहारास प्रारंभ करूं शकणार नाहीं किंवा त्यासाठी शाखा काढूं शकणार नाहीं. लायसेन्स देण्यापूर्वी रिझर्व्ह बँक खालीलप्रमाणें चौकशी करील:-

( १ ) ज्या देशांत कंपनी स्थापन झालेली आहे, त्या देशाचें सरकार किंवा कायदा हीं ब्रिटिश हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या कंपन्यांवर आप पर भावानें विशेष बंधनें घालतात काय ?

( २ ) ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या कंपन्यांसंबंधीच्या प्रस्तुत कायद्यांतील नियमांत ती कंपनी बसते काय ?

लायसेन्सच्या वरील अटी पार पडण्यांत खंड पडला किंवा कंपनीनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील बँकिंगचा व्यवहार बंद केला अथवा कंपनी लिक्विडेशनमध्यें गेली, तर रिझर्व्ह बँक लायसेन्स रद्द करील.

### ताळेबंद व नफातोटा पत्रक

ब्रिटिश हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या प्रत्येक बँकेनें आपल्या सर्व व्यवहाराचा वार्षिक ताळेबंद व नफा-तोटा पत्रक कायद्यांतील नमुन्याबरहुकूम तयार केलीं पाहिजेत व त्यावर मॅनेजरची व किमान तीन डायरेक्टरांची सही पाहिजे. बँकेचे तिहींपेक्षा ज्यास्त डायरेक्टर नसतील, तर तिघांनींहि सही केली पाहिजे. कंपन्यांचे ऑडिटर म्हणून काम करण्याचें सर्टिफिकेट असणाऱ्या ऑडिटरकडून बँकेचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हीं तपासून घेतलीं पाहिजेत. ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या परंतु ब्रिटिश हिंदुस्थानांत व्यवहार करणाऱ्या बँकेनें आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील शाखांमार्फत होणाऱ्या व्यवहाराचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हीं तयार केलीं पाहिजेत. त्यांवर, त्या बँकेच्या मुख्य कचेरीचा मॅनेजर किंवा एजंट ह्याची सही असली, म्हणजे पुरें. ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या बँकेचें हिशेब वरीलप्रमाणेंच ऑडिटरनें तपासावे किंवा ज्या देशांत बँक स्थापन झाली, त्या देशांतील कायद्याप्रमाणें ज्यास ते तपासण्याचा अधिकार आहे, अशानें ते तपासावे.


-राष्ट्रीय काटकसर-

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंगबाबतची अडचण लक्षांत घेऊन—

-गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, " गोल्डन कोको "

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

### बस्तर संस्थानाच्या आर्थिक सुधारणेस निजाम सरकारचा हातभार

बस्तर संस्थानांतील खनिज द्रव्यें खणून काढण्याचे अधिकार निजाम सरकारनें मिळविले आहेत, त्यास हिंदुस्थान सरकारनें मान्यता दिली आहे. बस्तरमधील लोकांच्या राहणीचें मान सुधारण्याचें निजाम सरकारनें मान्य केलें आहे. बस्तर हें संस्थान मध्यप्रांताच्या आग्नेयीस असून क्षेत्रफळाचे दृष्टीनें त्याचा हिंदी संस्थानांत बारावा नंबर लागतो. संस्थानांत दाट जंगलें आहेत. संस्थानाची राजधानी, जगदाळपूर, रायपूरपासून १८४ मैलांवर आहे.

### हिंदी लोकसंख्या फाजील आहे काय ?

" शेतीचें उत्पादन पुरेसें वाढविण्याकडे आपण लक्ष पुरविलें, तर लोकसंख्येची वाढ नियंत्रित करण्याचें हिंदुस्थानांत कारण नाहीं. पांच-दहा वर्षांत उत्पादन ५०% वाढविणें अगदीं शक्य आहे आणि उत्पादनवाढीसाठीं आवश्यक त्या सोई उपलब्ध करून मिळाल्या व किफायतशीर भावाची खात्री राहिली, तर तें १००% सुद्धां वाढेल. ":— सर पी. एम. खारेघाट ह्यांचें भाषण.

### बाँब हल्ले टाळण्यासाठीं जमिनीखालीं शहर

नवें टोकियो शहर जमिनीखालीं बांधून तेथें सध्याच्या टोकियो शहराच्या महत्त्वाच्या भागांचें स्थलांतर करण्याची जपानी सरकारची योजना आहे. बाँब हल्ल्यांपासून पूर्णपणें बचाव व्हावा ह्यासाठीं हा प्रयत्न आहे.

### सोनें-चांदी-शेअर्सचे तुलनात्मक भाव

| | ५ जानेवारी १९४४ | ५ जानेवारी १९४३ |
|---|---|---|
| | रु. आ. | रु. आ. |
| सोनें | ७५—३ | ७१—४ |
| चांदी | १२९-१४ | ११९-१२ |
| कपास | ४५०—० | ४८४—० |
| ३½% रोखे | ९९-११¾ | ९८-१५½ |
| टाटा डिफर्ड | २३२०-० | १,९४५-० |
| बाँबे डाइंग | १९६०-० | २०४६-४ |
| अ. सिमेंटस | २५८-४ | २३३-० |

### वाढण्यांची गर्दी

" हिंदी उत्पादन क्षेत्राचे मानानें व्यापारी क्षेत्रांत फारच लोकांची गर्दी झाली. तेव्हां लोकांनीं ज्यास्त किफायतशीर अशा कारखानदारीकडे वळावें. उपभोक्त्यांस आवश्यक असणाऱ्या जिनसांचें उत्पादन करणारांचा अनुभव सहसा निराशाजनक नसतो. ह्या क्षेत्रांतील लोकांनीं एकमेकांशीं सहकार्य करावें." मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, श्री. रामदेव पोद्दार ह्यांचें भाषण.

### अमेरिकन लष्करांत ८१ लक्ष सैनिक

अमेरिकेच्या लष्करांत आतां ८१ लक्ष लोक दाखल झालेले आहेत.


## पूना गेस्ट हाऊस
संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

## महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्यांचे व्यापारी
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
( Approved Re-treaders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाविलास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २४ जानेवारी, १९४५ अंक ४




**व्ही. पी. बेडेकर**
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
## ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
**BUG COILS ( ABC )**
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १॥८, ट. ख. निराळा.
**दि मागोरा केमिकल कं. लि.,**
**हिराबाग, पुणें २**

**डोंगरे** यांच्या **बालामृतानें** अशक्त मुलें सशक्त होतात.

गेल्या ३० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले
## फिव्हर एस.
सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २
● होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धि करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ८०
● बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय, किं. रु. २.
पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.
तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.
एजन्सी नसलेल्या गांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.
**सुधा एजन्सी,**
३१८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

**सांडू**
**होमिओ**
**कम्पाउंड**
(ए. बी. सी. व्हिटॅमिनयुक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्टस् व ड्रगिस्टस्.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
**मे. श्रीदत्त एजन्सी**
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
**मे. भागवत आणि कं.**
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
**मे. जोशी आणि मंडळी**
भवानी पेठ.

## विविध माहिती

### प्रो. सी. एन. वकील

हिंदुस्थान सरकारच्या नियोजन खात्याचे आर्थिक सल्लागार म्हणून मुंबईचे प्रो. सी. एन. वकील ह्यांची नेमणूक झाली आहे.

### हिंदुस्थानांत रेडिओ तयार होणार

रेडिओ सेटस तयार करणारी एक ५० लक्ष रुपयांची कंपनी लवकरच नोंदण्यांत येणार आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील सिनेमाचा शोक व त्याची किंमत

ग्रेट ब्रिटनमध्यें दर आठवड्यास सुमारें ३,५०,००,००० सिनेमाचीं तिकिटें खपतात व त्याचें २०,००,००० पौंड उत्पन्न होतें. प्रत्येक इंग्रज सरासरीनें दर पंधरवड्यास एकदां सिनेमा पहातो व त्यासाठी सव्वा रुपया खर्च करतो. ब्रिटिश थिएटरांस अमेरिकन चित्रपटांवरच मुख्यतः अवलंबून राहावें लागतें, व त्याप्रीत्यर्थ ग्रेट ब्रिटनला अमेरिकन कंपन्यांना दरसाल सुमारें ३० कोटि रुपये द्यावे लागतात! वार्तापटांच्या भाड्याचा ह्यांत समावेश नाहीं.

### ब्रिटिश निर्गतींत घट

कपाशीचें सूत व कापड ह्यांचे बाबतींत ग्रेट ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार गेल्या पांच–सहा वर्षांत किती उतरला आहे, ह्याचे खालील आकडे उद्बोधक आहेत:—

| | १९३८ | १९४२ | १९४३ |
|---|---|---|---|
| सूत (दश लक्ष पौंड) | १२२·९ | १८·८ | १९·२ |
| कापड (दश लक्ष चौ.वार) | १३८६·२ | ४८५·२ | ३७४·३ |

### श्वेतवर्णीय व निग्रो

अमेरिकेंत निग्रो लोकांना कसें बाजूस राखण्यांत येतें ह्याची माहिती देणारें एक पुस्तक ("पॅटर्न्स ऑफ निग्रो सेग्रिगेशन") नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे, त्यांत राहण्याच्या जागा, सामाजिक व्यवहार, करमणूक, प्रवास, दुकानांतील खरेदी, प्रार्थनेचें ठिकाण, होटेल्स, खाणावळी, इस्पितळें, इत्यादि बाबतींत निग्रो व श्वेत वर्णीय ह्यांत करण्यांत येत असलेला भेद तपशीलवार वर्णिलेला आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या ३३२ असून त्याची किंमत १८ शिलिंग आहे.

### ग्रेट ब्रिटनमध्यें बीरचा पुरवठा वाढला

ग्रेट ब्रिटनमध्यें बीर दारूचें उत्पादन वाढत आहे व त्याकारणानें लोकांची दारूची तहान आतां पूर्वीच्या मानानें चांगल्या प्रकारें भागूं शकते. अर्थात्, मागणी पुरवठ्यापेक्षाहि जास्त आहे. बीर कंपन्यांचे शेअर्स तेजींत आहेत. १९३६ नंतर आतां इतके तेजींत ते कधींच नव्हते.

### आयुर्विमा कंपन्यांच्या खर्चाची कमालमर्यादा

इन्शुअरन्स बिलावरील सिलेक्ट कमिटीनें बिलाचा तपशीलावर विचार करून आपल्या सूचना तयार केल्या आहेत, त्यांचा विचार मध्यवर्ती असेंब्लींत लवकरच होईल. चीफ एजंटाला यावयाच्या वेतनास इन्शुअरन्स बिलांतील ज्या कलमानें मर्यादा घातली आहे, त्या कलमाऐवजी सर्व प्रकारच्या विमा कंपन्यांच्या खर्चाचे प्रमाणावर नियंत्रण असावें, अशी सिलेक्ट कमिटीची शिफारस असल्याचें समजतें. त्यासंबंधांत कंपन्यांच्या वयाऐवजी त्यांच्या कारभाराचा विस्तार लक्षांत घेण्यांत यावा, अशीहि कमिटीची सूचना आहे. आयुर्विमा कंपन्यांच्या खर्चावरील नियंत्रण खालीलप्रमाणें ठेवण्यांत यावें, अशी कमिटीची शिफारस आहे:—

१ जानेवारी, १९४६ पूर्वी मिळविलेलें काम:–
(१) पहिल्या वर्षाच्या हप्त्यांच्या ८५%
(२) जुन्या कामावरील हप्त्यांच्या १२½% ते १९%
१ जानेवारी, १९४६ नंतरचें काम:—
(१) पहिल्या वर्षाच्या हप्त्यांच्या ७२½% ते ८४%
(२) जुन्या कामावरील हप्त्यांच्या १२% ते १७%

---

### बँकिंगच्या धंद्याचें ऑस्ट्रेलियांत राष्ट्रीयकरण

ऑस्ट्रेलियांत मजूर पक्षाचें सरकार अधिकारारूढ आहे आणि बँकिंगच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण व्हावें असें त्या पक्षाचें मत आहे. त्यास अनुसरून, कॉमनवेल्थ (मध्यवर्ती) बँकेवर पूर्ण ताबा मिळवून त्याचा उपयोग आपल्या युद्धोत्तर योजनास पैसे मिळविण्याकडे करण्याचा तेथील सरकारचा विचार आहे. ह्याबाबत आवश्यक तो कायदा करावा लागेल, त्याचा वास लागतांच ऑस्ट्रेलियांतील विरोधी पक्षानें व हितसंबंधी व्यापारी बँकांनीं विरोध दाखविण्यास प्रारंभ केला आहे. सरकारनें बँकांवर अधिकार मिळविल्यास लोकांचा त्यावरील विश्वास नष्ट होईल, असें नॅशनल बँक ऑफ ऑस्ट्रेलियानें जाहीर केलें आहे. सरकारी नियंत्रणामुळें कार्यक्षमता नष्ट होऊन कर भरणाऱ्या नागरिकांचें नुकसान होईल, असा इशारा बँक ऑफ ॲडीलेडच्या चेअरमननें दिला आहे. ऑस्ट्रेलियाच्या मध्यवर्ती बँकेच्या डायरेक्टर बोर्डाचे अधिकार कमी करून त्याचें केवळ सल्लागार मंडळांत रूपांतर करण्याचा आणि बँकेचें धोरण ठरविण्याचा खरा अधिकार तत्कालिन सरकारास देण्याचा तेथील आजच्या सरकारचा विचार दिसतो.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक: कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७३

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २६ |
| २ आयुर्विमा कंपन्यांच्या खर्चाची मर्यादा ... | २६ |
| ३ बँकिंगचा धंदा ... | २६ |
| ४ राष्ट्रीय प्राप्तीची वांटणी | २७ |
| ५ ब्रिटिश युद्धप्रयत्नाचा सरकारी आढावा ... | २८ |
| ६ स्फुट विचार ... ... सर हैदरी ह्यांचें शिष्टमंडळ— शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व— हिंदुस्थानांत अनास्था— राष्ट्रीय सरकारची आवश्यकता—प्रो. कॅसल— देशी उद्योगधंद्यांस संरक्षण | २९ |
| ७ आपल्यापुढील कांहीं प्रश्न | ३० |
| ८ बँक ऑफ इंडिया लि.... | ३१ |
| ९ टाटा बिर्ला योजना ... | ३१ |
| १० स्पेशल डायरेक्टर ... | ३१ |
| ११ आयुर्विमा कंपन्यांचे हप्ते | ३२ |



# अर्थ

बुधवार, ता. २४, जानेवारी १९४५


## राष्ट्रीय प्राप्तीची वांटणी

### " मुंबई योजने "चा दुसरा भाग

हिंदुस्थानास आर्थिक समृद्धि प्राप्त करून देण्याच्या उद्देशानें प्रमुख हिंदी कारखानदारांनीं आखलेली योजना प्रसिद्ध होऊन एक वर्ष झालें. ह्या अवधींत निरनिराळ्या विचारांच्या लोकांनीं त्या योजनेसंबंधानें स्वतःचे अभिप्राय व्यक्त केले. देशाच्या आर्थिक संवर्धनाच्या प्रश्नास व्यावहारिक आणि व्यापक रीतीनें तोंड फोडल्याबद्दल अनेकांनीं " मुंबई योजने " चें स्वागत केलें. कांहीं टीकाकारांनीं तिच्यामधील दोष दाखवून सुधारणा सुचवल्या. योजनाकर्त्यांशीं मूलग्राही मतभेद असणाऱ्या विशिष्ट विचाराच्या व परंपरेच्या कांहीं टीकाकारांनीं भांडवलवाल्यांची स्वार्थी योजना म्हणून ती त्याज्य ठरवली आणि स्वतःच्या स्वतंत्र कल्पनाहि तपशीलवार पुढें मांडल्या. हिंदी जनतेचें दारिद्र्य दूर करून तिची राहणी सुखमय करणें हें सर्व योजनाकारांचें व त्यांच्या टीकाकारांचें सामान्य ध्येय आहे; परंतु तें कोणत्या मार्गानें साध्य करावयाचें ह्याचेसंबंधांत मुख्यत्वेंकरून तीव्र मतभेद उत्पन्न झाले. मुंबई योजनेचें मुख्य वैगुण्य, तीमध्यें संपत्तीच्या उत्पादनाचाच केवळ विचार करण्यांत आला होता आणि ह्या वाढलेल्या राष्ट्रीय प्राप्तीची जनतेमध्यें कशी वाटणी होणार ह्याची चर्चा आलेली नव्हती, हें होतें. उद्योगधंद्यांच्या विस्तारामुळें आणि शेतीच्या सुधारणेच्या योगानें संपत्तीचें उत्पादन वाढावयाचें आणि सामान्य जनतेची राहणी सुधारावयाची तर बहुसंख्य लोकांची प्राप्ति वाढणें अपरिहार्यच होतें. तथापि, ह्या विषयांचें विवेचन मुंबई योजनेंत आलें नसल्यानें ती भांडवलवाल्यांनीं स्वतःच्या फायद्याचे दृष्टीनें बनवली आहे आणि तिचा परिणाम श्रीमान वर्ग अधिक श्रीमंत व गरीब जनता अधिक गरीब होण्यांत झाल्यावांचून रहावयाचा नाहीं असेंहि कांहीं टीकाकारांनीं म्हटलें होतें.

"मुंबई योजनें" तलें हें वैगुण्य तिच्या कर्त्यांनीं तिचा दुसरा भाग प्रसिद्ध करून काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी, कामकरी, नोकरवर्ग, कारागीर ह्यांची प्राप्ति आपल्या योजनेनें कशी वाढेल आणि त्यांची राहणी कशी सुधारेल ह्याचें दिग्दर्शन ह्या भागांत करण्यांत आलें आहे. तें अर्थातच अत्यंत स्थूल स्वरूपाचें असून त्यावरून सर्व लोकांस काम मिळून सध्याचे मानानें अधिक प्राप्ती व सुखसोयी उपलब्ध होतील हें सुचवण्यांत आलें आहे. ह्या बाबतींत दोन मुख्य गोष्टी स्पष्ट करण्यांत आल्या आहेत. देशांत मोठमोठाले कारखाने निघावयाचे आणि त्यांत प्रचंड प्रमाणांत संपत्तीचें उत्पादन व्हावयाचें. त्यावर सत्ता कोणाची रहाणार आणि त्याचा फायदा कोण घेणार ह्या प्रश्नास असें उत्तर देण्यांत आलें आहे कीं वैयक्तिक स्वार्थावर आधारलेली भांडवलशाही आणि राजसत्तेच्या हातीं एकवटलेली आर्थिक घटना ह्या दोन परस्पर विरुद्ध टोकांच्या मधील सुवर्णमध्य गाठण्याचा योजनाकर्त्यांचा उद्देश आहे. कित्येक धंदे सरकारला चालवावे लागतील, पण बाकीच्यामध्यें वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, कल्पनाचातुर्य व भांडवल ह्यांस वाव देणें राष्ट्राच्या हिताचें आहे अशी मुंबई योजनेच्या कर्त्यांची भूमिका आहे. लोकसंख्येपैकीं फार थोड्या लोकांच्या हातीं एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा हिस्सा आज जात आहे, ही परिस्थिति बदलली जाऊन त्याच्या वाटणींतील विषमता शक्य तेवढी नाहींशी करण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आहे. मोठ्या प्राप्तीवर व जिंदगीवर चढते कर बसवून सरकारास संपत्तीच्या विभागणीस समतेचें वळण लावतां येईल. त्याचप्रमाणें, शेतमालाच्या किंमतींत स्थिरता राखून, खेडेगावी धंद्यांस उत्तेजन देऊन आणि कामकऱ्यांच्या मजुरींत वाढ करून हें उद्दिष्ट साध्य करण्यांत आलें पाहिजे असें त्यांनीं सुचवलें आहे. भांडवलशाहींतले दोष टाळून तिला लोकशाहीच्या सत्तेखालील सामाजिक घटनेचें वळण लावण्याचें धोरण त्यांनीं पुरस्कारलें आहे.

इंग्लंड व अमेरिका ह्यांसारख्या देशांतहि भांडवलशाहीचें पहिलें व अनिष्ट स्वरूप बदलून गेलें असून रशिया सारख्या समाजसत्तावादी देशांत विषमता व व्यक्तिस्वातंत्र्य ह्यांस स्थान द्यावें लागत आहे असें म्हणून योजनाकर्त्यांनीं स्वतःच्या मध्यवर्ती धोरणाचें समर्थन केलें आहे. सबंध देशाच्या सहकार्यानें आणि स्वार्थत्यागानें उभारावयाची आर्थिक घटना केवळ स्वहितसाधू संपत्तिमान व्यक्तींच्या हातीं देणें अशक्य आहे ह्या जाणीवेनें त्यांनीं राजसत्तेच्या उद्योगधंदे व व्यापार ह्यांवरील नियंत्रणाचें तत्व मान्य केलें आहे आणि लोकशाही व औद्योगिक प्रगति ह्यांचेमध्यें विरोध असण्याचें कारण नाहीं असें प्रतिपादलें आहे. सरकारी नियंत्रण कोणी व कसें अंमलांत आणणें आवश्यक व व्यावहारिक आहे हें कांहीं उदाहरणें देऊन योजनाकर्त्यांनीं दाखवलें आहे. भांडवलवाल्यांची स्वार्थी योजना म्हणून तिच्यावर हल्ला चढवणारांस उत्तर देण्याचा हा प्रयत्न आहे. राष्ट्रीय वृत्तीच्या आणि प्रातिनिधिक सरकाराच्या सत्तेखालीं आणि एकजीवी व ऐनजिनर्स हिंदी राष्ट्राच्या व्यापक मर्यादांमध्येंच आपली योजना यशस्वी होणें शक्य आहे हा स्वतःचा अभिप्राय पुन्हां एकवार त्यांनीं नमूद केला आहे. आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें भारताच्या अखंडत्वाचें अगत्य ह्या रीतीनें अप्रत्यक्षपणानें सिद्ध करण्यांत आलें आहे. जमीन धारणाच्या पद्धतींत सुधारणा, सहकारी संघटनेचा विस्तार, कामकरी वर्गाच्या सुखसोयींची तरतूद इत्यादि गोष्टींचाहि पुरस्कार योजनाकर्त्यांनीं केला आहे.

## ब्रिटिश युद्धप्रयत्नाचा सरकारी आढावा

### मुख्य प्रधानांचें पार्लमेंटांत निवेदन

"ग्रेट ब्रिटनच्या युद्ध प्रयत्नासंबंधीं आकडेवार माहिती" ह्या नांवाचें ब्रिटिश सरकारचें एक तपशीलवार पत्रक मि. चर्चिल ह्यांनीं पार्लमेंटास सादर केलें. ह्या रिपोर्टांत मनुष्यबळ, उत्पादन, आगबोट वहातुक व व्यापार, जनतेनें केलेला मालाचा उठाव आणि उत्पन्न-खर्च असे पांच भाग आहेत. संयुक्त राष्ट्रांपैकी एकायानें एका, तर दुसऱ्यानें दुसऱ्या बाबतींत ग्रेट ब्रिटनपेक्षां अधिक कामगिरी केली असेल, परंतु ह्या पांचहि बाबींचा एकत्र विचार केला, तर ग्रेट ब्रिटन इतका स्वार्थत्याग व युद्ध प्रयत्न इतर कोणत्याहि राष्ट्रानें केलेला नसेल, अशी ब्रिटिशांची पक्की समजूत आहे. लोकसंख्येच्या मानानें पाहिलें, तर ब्रिटिश युद्धप्रयत्न इतर सर्वांपेक्षां प्रचंड आहे, असें लंडन टाइम्स म्हणतो. अमेरिकेच्या उत्पादनांत वाढ झाली, त्याचें कारण तेथें उत्पादनास मोठा वाव होता आणि उत्पादनाची गति सुधारलेल्या यांत्रिक पद्धतीमुळें भयंकर वाढूं शकली, हें होय. ह्या उलट, ग्रेट ब्रिटनला स्वार्थत्यागाचे भूमिकेवरच आपला युद्धप्रयत्न चालू ठेवावा लागला. लोकांनीं पूर्वीपेक्षां कमी खाऊन, कमी जिनसा वापरून व बचत करून, त्याचप्रमाणें शक्य तेवढ्यांनीं युद्ध-विषयक कामगिरीस वाहून घेऊन ब्रिटिश युद्धप्रयत्नाचें मान एवढें मोठें राखलें आहे. आगबोटींच्या तुटवड्यामुळें ग्रेट ब्रिटनला पूर्वीइतकी आयात चालू ठेवतां आली नाहीं, तरी उपलब्ध जिनसांचें नीट व प्रमाणशीर वाटप करून तेथील सरकारनें परिस्थिति सुसह्य केली.

### पुढील पिढ्यांस फायदा

युद्धांतील भारी मनुष्यहानि, युद्धविषयक मालाचें प्रचंड उत्पादन, आगबोटींचा नाश, रहाणीचें उतरलेलें मान, मालमत्ता मोडून व कर्ज उभारून भागविलेला युद्ध खर्च, इत्यादींचे आकडे ब्रिटिश सरकारच्या रिपोर्टांत दिलेले आहेत. युद्धसमाप्तीनंतर, झालेलें नुकसान भरून काढण्यासाठीं ब्रिटिश जनतेला विसावा घेण्यास फुरसत मिळणार नाहीं; नेटाचा प्रयत्न चालू ठेवून पूर्वस्थिति व वैभव प्राप्त करून घेण्याची शिकस्त करावी लागेल, असें रिपोर्टांतील आकडे ध्वनित करतात. एवढ्या मोठ्या स्वार्थत्यागाचें फळ, म्हणजे सुखसंपन्न स्वातंत्र्य, हें आपल्या लोकांना पिढ्यानपिढ्या उपभोगण्यास मिळणार, ही जाणीव ब्रिटिश जनतेच्या मनांत आहे, हें उघड आहे. युद्धखर्चाचा व प्रयत्नाचा अपूर्व ताण ह्या पिढीवर पडला असला, तरी त्याचा फायदा पुढील पिढ्यांसहि होणार आहे.

### खर्चाची तरतूद

युद्धविषयक खर्चांत भयंकर वाढ झाल्याकारणानें ब्रिटिश सरकाराचा वार्षिक खर्च १९३८ सालीं १०१ कोटि पौंड होता, तो १९४३ सालीं ५७८ कोटि पौंडांवर गेला. ह्या खर्चाची तरतूद मुख्यतः चालू उत्पन्नांतूनच करण्यांत आली, हें विशेष आहे. खर्चापैकी निम्मी रकम करांचे रूपानें उभारण्यांत आली व ३४% रकम लोकांच्या बचतींमधून मिळाली. १९३८–३९ मध्यें प्राप्तीवरील करांचें उत्पन्न ३३ कोटि पौंड झालें होतें, १९४३–४४ मध्यें त्याचा आकडा ११८ कोटि पौंडांवर गेला. पूर्वी ४० लक्ष लोकांवर प्राप्तीवरील कर आकारला जाई; आतां १ कोटि, ३० लक्ष लोक इनकम टॅक्स भरीत आहेत. इनकम टॅक्सच्या आकारणीची कल्पना खालील तक्त्यावरून येईल:—

| वार्षिक उत्पन्न ( पौंड ) | प्राप्तीवरील कर ( % ) १९३८ | १९४२ |
|---|---|---|
| २५० ते ५०० | ३ | १४३ |
| ५०० ते १,००० | ११ | २८ |
| २,००० ते १०,००० | २९ | ५२ |

### अप्रत्यक्ष कर

तंबाखू, दारू, इत्यादींवरील करांत म्हणजे अप्रत्यक्ष करांत पुष्कळच वाढ झालेली आहे. कांहीं चैनीच्या वस्तूंवर १००% कर आहे. अप्रत्यक्ष करांपासून ब्रिटिश सरकारास १९३८ सालीं ३७ कोटि पौंड मिळाले; १९४३ मध्यें त्यांची रकम १०३ कोटि पौंड झाली. अन्न व इतर आवश्यक जिनसांस सरकारनें मदत म्हणून १९ कोटि पौंड दिले. १९४३ सालीं ब्रिटिश सरकारास २९० कोटि पौंड कर्जरूपानें उभारावे लागले. कर व सरकारास दिलेलें कर्ज ह्यामुळें जनतेजवळील पैशाचा विनियोग भांडवली स्वरूपाच्या गोष्टी सुधारण्याकडे व दुरुस्त करण्याकडे झालेला नाहीं. युद्धासाठीं ज्यांचें उत्पादन अत्यावश्यक आहे, अशांच्या कारखान्यांतच फक्त जरूर तेवढी नवी यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आहे. खासगी मालमत्तेचें प्रचंड नुकसान झालेलें आहे, त्याची दुरुस्ती व भरपाई अंशतःच झालेली असणार.

### परदेशांतील मालमत्तेची विक्री

ब्रिटिश सरकारला स्वतःचें उत्पन्न, कर, कर्ज, खंड-उसनवार मदत, इत्यादि शक्य तेवढ्या प्रमाणांत मिळूनहि आपला खर्च भागवितां आला नाहीं आणि परदेशांतील १०६ कोटि पौंड किंमतीची मालमत्ता विकून त्याचे पैसे करणें भाग पडलें व तेथें २३० कोटि पौंडांचें कर्जहि उभारावें लागलें. शत्रूस उपयोगी पडूं नये, ह्यासाठीं परदेशांतील कांहीं मालमत्तेचा मुद्दाम नाश करण्यांत आला. अशा रीतीनें, आयात करीत असलेल्या मालाचा मोबदला देण्यास सहाय करणारें मोठें उत्पन्न तो देश आतां गमावून बसला आहे.

परदेशांतील मालमत्तेची विक्री व तेथील कर्ज उभारणी
( कोटि पौंड )

| | मालमत्तेची विक्री | कर्जांत वाढ |
|---|---|---|
| सप्टेंबर १९३९ ते डिसेंबर १९४१ | ९५ | ७७ |
| जानेवारी १९४२ ते जून १९४४ | ११ | १५३ |
| एकूण | १०६ | २३० |

# स्फुट विचार

### सर अकबर हैदरी ह्यांचें शिष्टमंडळ

ब्रह्मदेश आणि पॅसिफिक महासागर ह्यांमधील जपानच्या विरुद्ध चाललेल्या मोहिमांत लागणारें लढाऊ सामान शक्य तेवढ्या प्रमाणांत हिंदुस्थानांतून पुरवलें जात आहे. त्यामुळें हिंदी उद्योग-धंदे आणि कारखाने ह्यांमध्यें बिनलढाऊ माल पुरेसा तयार न होतां युद्धसामुग्री तयार करण्यांत त्यांचें उत्पादन-सामर्थ्य मोठ्या अंशांत खर्ची घालावें लागत आहे. ह्या परिस्थितीचा संबंध चलन-विस्तार, स्टर्लिंग शिलकांत वाढ आणि महागाई ह्यांच्याशीं येत आहे. हिंदुस्थानानें पुरवलेल्या लढाऊ मालाची किंमत ह्या देशास मिळते, पण त्या योगानें चलनवाढ होते आणि सामान्य जनतेच्या उपयोगाचे जिन्नस अपुरे पडून महाग होतात. ह्या अडचणीवर एक महत्त्वाचा उपाय, इंग्लंडहून कांहीं जरूरीच्या मालाचा पुरवठा होणें हा आहे. आज ह्या देशांतून होणाऱ्या लढाऊ मालाची जागा कांहीं प्रमाणांत ब्रिटनमधून येणाऱ्या मालानें घेतल्यास हिंदुस्थानांत कापड वगैरे जिनसांचा तुटवडा भासत आहे तो दूर होण्यास सहाय मिळेल. सर अकबर हैदरी आणि इतर सरकारी अधिकारी ह्यांचें शिष्टमंडळ इंग्लंडला जात असून तेथील अधिकाऱ्यांशीं विचारविनिमय करून प्रस्तुत विषयाचे बाबतींत ह्या देशास कोणती मदत मिळणें शक्य आहे हें पहाणार आहे. ब्रिटिश माल हिंदुस्थानांत खपण्यास उत्तेजन देणें हा सदरहु शिष्टमंडळाच्या उद्योगाचा परिणाम होऊन तो हिंदी कारखान्यांच्या हितसंबंधांस प्रतिकूल होईल ही भीति सर्वस्वीं निराधार आहे असें आश्वासन सर अकबर ह्यांनीं दिलें आहे. उलट, लढाऊ उपयोगाचा कांहीं माल इंग्लंड पुरवूं शकेल तर तो तयार करण्याऐवजी सामान्य जनतेस हवे असलेले जिन्नस बनवण्यास हिंदी कारखान्यांस वाव आणि संधी मिळेल असें त्यांचें म्हणणें आहे. आज हिंदुस्थानास पक्क्या मालापेक्षां यंत्रसामुग्रीच्या आयातीची अधिक आवश्यकता आहे. परंतु सर अकबर हैदरी ह्यांचें शिष्टमंडळ जो प्रश्न सोडवण्यासाठीं इंग्लंडला जात आहे तो तात्पुरत्या गरजेविषयींचा असून युद्धोत्तरकाळांतील औद्योगिक अभिवृद्धीच्या योजनेशीं त्याचा संबंध नाहीं, असा खुलासा करण्यांत आला आहे. लढाऊ उपयोगाच्या मालाच्या पुरवठ्याचा ताण हिंदी कारखान्यांवर आणि जनतेच्या क्रयशक्तीवर पडत आहे तो हलका करणें हा आपल्या शिष्टाईचा हेतु आहे असें सर अकबर ह्यांचें सांगणें आहे; आणि ह्या बाबतींत उत्पन्न होणारा गैरसमज नाहींसा करण्याचा प्रयत्न त्यांनीं मुद्दाम केला आहे.

### शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व

नागपूर येथें भारतीय शास्त्र परिषदेचें अधिवेशन ह्या महिन्याच्या प्रारंभीं भरलें होतें, त्यांत तिचे सर्वाध्यक्ष, सर शांतिस्वरूप भटनागर ह्यांचें समग्र अध्यक्षीय भाषण वाचून दाखविण्यांत आलें. सर शांतिस्वरूप हे इतर कांहीं हिंदी शास्त्रज्ञांबरोबर सरकारी निमंत्रणावरून परदेशीं दौऱ्यावर गेले आहेत, त्यामुळें ते परिषदेस उपस्थित होऊं शकले नाहींत. सर भटनागर ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रोफेसर हिल ह्या इंग्रज शास्त्रज्ञाच्या हिंदुस्थानांतील दौऱ्याचा उल्लेख केला व त्यामुळें शास्त्रीय संशोधनाच्या प्रश्नास चालना मिळाली आहे व हिंदुस्थान सरकार त्यांत लक्ष घालूं लागलें आहे, असें त्यांनीं सांगितलें. आपल्या विलायतच्या दौऱ्यांत आलेल्या अनुभवाचेंहि त्यांनीं वर्णन केलें. विशेषतः, शिक्षणसंस्था व विश्वविद्यालयें ह्यांतून संशोधनास चालना देण्याचें अगत्य व महत्त्व त्यांस पटलें आणि त्याचें प्रतिबिंब त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत पडलें. "इतर गोष्टींप्रमाणें संशोधन ही बाब नाहीं; काटेकोरपणानें त्याच्या खर्चाचें अंदाजपत्रक तयार करतां येणें अशक्य आहे. परिस्थितीस अनुसरून शक्य तेवढे पैसे शास्त्रीय संशोधनास उपलब्ध करून दिले जाणें आवश्यक आहे." वरील पद्धतीनें शास्त्रीय संशोधनाची व्यवस्था करण्यांत यावी, अशी इंग्लंडमध्यें संशोधकांची मागणी आहे, आणि तीप्रमाणें व्यवस्था झाल्यास दहा वर्षांत ५० कोटि रुपयांचा भांडवली खर्च तेथें करावा लागेल. त्यापैकीं बहुतेक सर्व खर्चाचा बोजा ब्रिटिश सरकारनें उचलावा, अशी अपेक्षा आहे.

### हिंदुस्थानांत अनास्था—राष्ट्रीय सरकारची आवश्यकता

हिंदुस्थानांत शास्त्रीय संशोधनाबाबत अनास्था कशी आहे, ह्याचें वर्णन करतांना सर शांतिस्वरूप ह्यांनीं दोन हिंदी विश्वविद्यालयांचें उदाहरण दिलें. संशोधन ही खर्चाची बाब आहे, ह्यासाठी काटकसर म्हणून तें शक्य तों बंद करण्याचा प्रयत्न त्यांत चालू आहे, असें त्यांनीं सांगितलें. संशोधनासाठी ब्रिटिश कारखानदार फार मोठ्या प्रमाणावर खर्च करतात. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजनें १९४२ सालीं सुमारें सवातीन कोटि रुपये संशोधनावर खर्च केले. हिंदुस्थानांत टाटांचे खेरीज इतर कारखानदार संशोधनासाठीं थोडासाहि खर्च करण्यास तयार नसतात, अशी परिस्थिति आहे. आतां कांहीं कारखानदार ह्या बाबतींत लक्ष घालूं लागले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. हिंदी जनतेच्या रहाणीचें मान सुधारण्यावर पुष्कळ गोष्टी अवलंबून आहेत, हें सांगतांना सर शांतिस्वरूप ह्यांनीं हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेच्या अगत्याचा उल्लेख केला, हें योग्यच झालें. "राष्ट्रीय प्रगति घडवून आणण्याचा सर्वांत उत्तम व कमी वेळ खाणारा उपाय, म्हणजे लोकांच्या प्रतिनिधींचें राष्ट्रीय सरकार हा होय." हे त्यांचे उद्गार महत्त्वाचे आहेत. विलायतच्या दौऱ्यांतील अनुभवावरच ते आधारलेले असतील, हें उघड आहे. अर्थात्, आहे ह्या परिस्थितींतहि आपल्या बांधवांची स्थिति सुधारण्याचे आपण प्रयत्न चालविले पाहिजेत, ही त्यांची सूचना रास्त असेच आहे.

### प्रो. कॅसल ह्या स्वीडिश अर्थशास्त्रज्ञाचा मृत्यु

प्रो. कॅसल ह्या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाच्या मृत्यूची वार्ता नुकतीच आली आहे. ता. १४ रोजी ते आपल्या वयाच्या ७८ व्या वर्षी निवर्तले. आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचा दर आणि राष्ट्रांतील पदार्थांच्या किंमती ह्यांच्या संबंधाची विशिष्ट उपपत्ति त्यांनीं लावली होती. अर्थशास्त्रांत पदार्थांच्या मोलास अवास्तव महत्त्व देण्यांत येतें, त्याचें उच्चाटन करून बाजारांत निश्चित होणाऱ्या किंमतीवरच सर्व भर देण्यांत यावा असें त्यांचें मत होतें—आपल्या अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांवरील ग्रंथांत त्यांनीं ह्या तत्त्वाचा आश्रय करून पदार्थांची दुर्मिळता व तुटवडा ह्यांच्या आधारावर सबंद शास्त्राच्या सिद्धांतांची उभारणी केली आहे. महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांसंबंधानें राष्ट्रीय सरकारांस त्यांनीं वेळोवेळ सल्ला दिला आहे. जुन्या परंपरेच्या अर्थशास्त्रास स्वतःच्या स्वतंत्र पद्धतीनें त्यांनीं उचलून धरलें हें प्रो. कॅसल ह्यांच्या विद्वत्तेचें वैशिष्ट्य आहे असें मानण्यांत येतें. त्यांच्या मृत्यूनें अर्थशास्त्राची मोठी हानि झाली आहे.

## देशी उद्योगधंद्यांस संरक्षण

हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटना योजना खात्याचे मंत्री, सर आर्देशीर दलाल, निरनिराळ्या प्रांतांत दौरा काढून तेथील सरकारांच्या अभिवृद्धीच्या योजनांचे बाबतींत चर्चा करीत आहेत आणि बिनसरकारी धंदेवाल्या पुढाऱ्यांशीं त्याच विषयावर विचारविनिमय करीत आहेत. हिंदुस्थान सरकार बनवीत असलेल्या योजना आणि निश्चित करीत असलेलें धोरण प्रांतिक सरकारांस व लोकांस किती पटतें आणि त्यासंबंधांत त्यांच्या काय सूचना आहेत ह्यांची कल्पना यावी हा त्यांच्या दौऱ्यांचा उद्देश आहे. रसायनांच्या उत्पादनासारखे कांहीं राष्ट्रीय महत्त्वाचे धंदे हिंदुस्थान सरकार स्वतः स्थापून चालवणार आहे हें प्रसिद्ध झालेंच आहे. त्याचबरोबर सरकारचें असेंहि धोरण आहे कीं इतर चालू आणि नवीन धंदे कारखानदारांनीं स्वतःच्या हिंमतीनें व भांडवलानें काढावे व चालवावे. ह्याकरितां धंदेवाल्यांस यंत्रसामुग्री लागेल तिच्या खरेदीची व आयातीची तरतूद आतांपासून करावी लागेल. ह्या कामीं सरकार धंदेवाल्यांस सहाय करण्यास तयार आहे ही गोष्ट सर अर्देशीर ह्यांनीं जाहीर केली आहे. युद्ध समाप्तीबरोबर यंत्रसामुग्रीस एकदम मोठी मागणी येणार आहे. युद्धामुळें उध्वस्त झालेल्या देशांस ही उत्पादन सामुग्री फारच विस्तृत प्रमाणावर पुरवली जावी लागेल, आणि ह्या पुरवठ्याचा ताण इंग्लंड व अमेरिका ह्या देशांवरच पडणें अपरिहार्य आहे. ह्या परिस्थितींत हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीस आवश्यक असलेली युद्धसामुग्री मिळवण्याची व्यवस्था येथील कारखानदारांनीं सरकारच्या सहकारित्वानें केली पाहिजे. स्वदेशी धंद्यांच्या विस्ताराची तयारी करतांना कारखानदारांची आपल्या साहसाच्या यशस्वितेविषयीं साशंकवृत्ति असणें स्वाभाविक आहे. युद्धोत्तर काळांत विदेशी मालाची स्पर्धा आपल्या धंद्यांस बाधक होण्याची भीति त्यांस वाटत असली तर त्यांत नवल नाहीं. ह्या संबंधांतील शंका असंदिग्ध रीतीनें दूर करण्याचा प्रयत्न सर आर्देशीर दलाल ह्यांनीं केला आहे हें चांगलें आहे. नागपुरांत गेल्या आठवड्यांत केलेल्या भाषणांत स्वदेशी धंद्यांस संरक्षण देण्याचें हिंदुस्थान सरकारचें निश्चित धोरण असल्याचें आश्वासन त्यांनीं दिलें असून कायमचें टारिफ बोर्ड ह्या कामाकरितां नेमण्याचा आपला बेत त्यांनीं मागेंच व्यक्त केला आहे.

---

### कॅनडाचा दर माणशी निर्गत व्यापार सर्व देशांत मोठा

प्रत्येक देशाच्या निर्गत व्यापाराचें त्या देशांतील दर माणशी प्रमाण पाहिलें, तर कॅनडाचें तें प्रमाण सर्वांत मोठें असल्याचें आढळून येतें.

### प्रा. धनंजयराव गाडगीळ

हिंदुस्थान सरकारनें देशांतील शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणासंबंधीं चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली आहे, तिचें अध्यक्षस्थान प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं स्वीकारलें आहे.

### मि. मास्टर

सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. चे जनरल मॅनेजर, मि. एम. ए. मास्टर ह्यांस मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष निवडण्यांत आलें आहे.

### अमेरिकेंतील कागदाचें रेशनिंग

" अमेरिकेंत कागदाचें रेशनिंग अंमलांत असतांहि, तेथील ' न्यूयॉर्क हेरल्ड ' ह्या वर्तमानपत्रांत ३० ते ४० पृष्ठें असतात. समग्र वृत्तपत्र वाचण्यास लोकांना वेळच नसतो ! ":—सर चुनीलाल बी. मेहता.

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय ' अर्थ ' यांसी, सा. न. वि. वि.

"आम्ही त्यांच्याकरितां काय केलें आहे "?—एका अमेरिकन व्यापारी मासिकांतील ती जाहिरात होती. लढाईवरून परत येणाऱ्या सैनिकांचीं रंगीत चित्रें काढून त्याखालीं लिहिलें होतें:—राष्ट्राच्या संरक्षणाकरितां ज्यांच्या रक्ताचे पाट वाहिले ते सैनिक परत आल्यावर त्यांच्याकरितां राष्ट्रानें काय व्यवस्था केली आहे? —ज्या पोलादाच्या कारखान्यातर्फे ही जाहिरात देण्यांत आली होती त्याचें नांव माझ्या नीटसें ध्यानांत नाहीं. पण चित्रांतील परतणाऱ्या सैनिकांचे आसावलेले चेहेरे मला अजून स्पष्ट दिसत आहेत ! आम्हीं त्यांचेकरितां काय केलें आहे ?— हा सवाल कानांत घुमत आहे !!

अव्वल दर्जाचे म्हणून त्रिखंड गाजलेले हिंदी सैनिक उद्यां युद्ध-समाप्तीनंतर परत येतील. लष्करी जीवन सोडून पूर्वीच्या जीवनांत त्यांची समरस होण्याची, त्यांच्या योगक्षेमाची आम्हीं काय व्यवस्था केली आहे ?

हिंदुस्थानभर विखुरलेल्या हजारों खेड्यांतून लक्षावधींनीं लष्करं भरती झाली-होत आहे. असें वाटतें कीं, आजचा अन्न-तुटीचा प्रश्न उत्पादन घटल्यामुळें उपस्थित झालेला नसून त्याचीं कारणें इतर आहेत. एवढें प्रचंड मनुष्य-बळ शेतांवरून काढून रणांगणांत ओतलें तरी शेतीचें उत्पादन त्या मानानें कमी होत नाहीं यावरून, मला वाटतें, हें स्पष्ट होईल कीं हें मनुष्य-बळ शेतींत-खेडेगांवांत अवश्य आहे असें नाहीं ! युद्धोत्तर त्याची सोय इतरत्र झाल्यास अधिक बरी ! अर्थात् तसें करावयाचें झाल्यास आपल्याला देशी उद्योग-धंद्यांचा, कारखान्यांचा विचार करणें अपरिहार्य आहे.

मध्यवर्ती व प्रांतिक सरकार यांच्या युद्धोत्तर काळच्या योजना जाहीर होत आहेत. त्यांत भर दिलेला दिसतो ग्रामीण जीवन सुधारण्याकडे व रस्ते, रेल्वे, तलाव, कालवे बांधण्याकडे. ह्या योजना प्रत्यक्षांत आणून राबविण्याकरतां असंख्य माणसें लागतील असा अंदाज आहे. योजना तत्त्वतः मान्य होण्यासारख्या असल्या तरी विचार येतो-हें सर्व सुरळीत कसें होईल ? अन् त्यानें आपले प्रश्न कसें सुटतील ? आधुनिक यंत्र-युगांत राहण्यास सरावत असलेल्या सैनिकांचें समाधान आपणांस केलें पाहिजे.

युद्धाच्या आघाडीवर अधिकारी म्हणून काम करीत असलेले कांहीं सुशिक्षित तरुण मला माहीत आहेत. बुद्धिमान, तडफदार, महत्त्वाकांक्षी. उद्यां ते परत येतील ते नवीं क्षितिजें पाहून आकांक्षांनीं भारावलेले. मला आशा आहे भविष्य काळ त्यांच्या अपेक्षा पुऱ्या करील.

युद्धजन्य परिस्थितीमुळें पैसा नि नोकऱ्या सवंग झाल्या आहेत. कित्येक तरुणी नोकऱ्या करतांना आढळतात. स्वतः पैसा कमावण्याचें समाधान, नि तो खर्च करतांना वाटणारा अभिमान मनोहारी आहे. त्याबरोबरच जीवनाकडे पाहाण्याचा बदलता दृष्टिकोण अभ्यास करण्यासारखा आहे. सवंग पैसा-नोकऱ्यांची किमया उद्यां नाहींशी झाल्यावर ह्या तरुणींचे जीवनक्रम आजच्या सुखासमाधानानें चालतील का ? त्यांचे संसार दुःखाचे नाहीं ना होणार ? आर्थिक नि सामाजिक प्रश्नांची गम्मत मजेदार आहे खरी !

—संजय

### बँक ऑफ इंडिया लि.

३१ डिसेंबर १९४४ अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास मागील वर्षांतील ओढलेले ९,८५,८२७ रु. ४ आ. ५ पै धरून एकूण झालेला नफा:—

| | रु. आ. पै |
|---|---|
| | ७५,२३,२६२—९—७ |
| चालू वर्षाचा प्राप्तीवरील कर, सुपर टॅक्स व एक्सेस प्रॉफिट टॅक्स देण्यासाठी तरतूद | ३१,००,०००—०—० |
| ३० जून, १९४४ रोजीं पहिल्या सहामाहीचें ११% दरानें इंटेरिम डिव्हिडंड दिलें. | ५,५०,०००—०—० |
| ३१ डिसेंबर, १९४४ अखेरच्या सहामाहीचें ११% दरानें करमाफ डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें सुचविलें आहे. | ८,१३,८८७—८—० |
| प्रत्येक भागास ८ आणे ( १% ) करमाफ बोनस | १,४७,९७९—८—० |
| रिझर्व्ह फंडाकडे वर्ग | ४,००,०००—०—० |
| मुख्य कचेरीच्या नव्या मालमत्तेच्या खातीं वर्ग | २,५०,०००—०—० |
| इन्व्हेस्टमेंटस ( सरकारी व इतर ) खातीं | ७,००,०००—०—० |
| पुढील वर्षात ओढण्यासाठी ( नोकरवर्गास बोनस दिल्यास तो यांतून द्यावयाचा आहे ) | १४,६१,३९५—९—७ |
| | ७५,२३,२६२—९—७ |

### टाटा बिर्ला योजनेचें स्वरूप व तिच्या यशस्वितेची शक्याशक्यता*

फ्रीलान्स सिरीज नं. ३ ( मराठी ) म्हणून वरील पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. त्यांत टाटा-बिर्ला योजनेचा सारांश दिलेला असून त्या योजनेवरील टीका-प्रतिटीकांचा थोडक्यांत विचार करण्यांत आलेला आहे. प्रस्तुत योजना ही भांडवलवाल्यांचीच स्वार्थी योजना आहे, असा तिचेवर प्रमुख आक्षेप असून योजनेस इंग्लंडमध्यें स्वागत मिळालें ही गोष्टच तिच्याविरुद्ध लोकमत निर्माण होण्यास कारणीभूत झाली, असें लेखकानें प्रस्तावनेंत म्हटलें आहे. पुस्तकांतील भाषा सोपी व आकर्षक असून, मराठी वाचकांस योजनेचें स्वरूप लक्षांत येण्यास त्याचा चांगला उपयोग होईल. "दोस्तहो, आज फराळाच्या जिनसांऐवजीं अन्नयोजनांवरच आपली भूक भागविली पाहिजे !" अशी परिस्थिति दर्शविणारें, फराळास बसलेल्या स्त्री-पुरुषांचें चित्र मुखपृष्ठावर छापलेलें आहे.

* पृ. सं. ३२ ले. डी. टी. देशपांडे, चौधरी बंगला, श्रद्धानंद नगर, नागपूर.

### विन अधिकाराचा 'स्पेशल' डायरेक्टर

डॉर्मन, लाँग अँड कंपनी ह्या एका ब्रिटिश कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें भागीदारांच्या संमतीसाठी कांहीं ठराव सुचविले आहेत, ते मनोरंजक व उद्बोधक आहेत. आपल्या अधिकारी व नोकरवर्गापैकी कांहींचा दर्जा सुधारून त्यांचा अनुभव वाढावा, ह्या दृष्टीनें त्यांस स्पेशल डायरेक्टर म्हणून नेमण्याचा अधिकार डायरेक्टर बोर्डास हवा आहे. कंपनी कायद्यानें 'डायरेक्टर' ह्या शब्दाची व्याख्या सांगितलेली नसल्याकारणानें, कोणासहि डायरेक्टर म्हणण्यांत कायदेशीर अडचण नाहीं, अशी परिस्थिति आहे. कंपनी कायद्याप्रमाणें नेमण्यांत येणाऱ्या डायरेक्टरास जे अधिकार व जीं कर्तव्यें सांगितलेलें असतात, ते ह्या 'स्पेशल' डायरेक्टरांस लागू नाहींत. उदाहरणार्थ, ते स्वतः भागीदार नसले तरी चालतील; त्यांची नेमणूक बोर्ड करील व त्या नेमणुकीस भागीदारांच्या संमतीची आवश्यकता नाहीं. नेहमीच्या डायरेक्टर बोर्डाच्या इच्छेवर त्यांची नेमणूक अवलंबून राहील व तें ठरवील तेवढें वेतन त्या 'स्पेशल' डायरेक्टरांस मिळेल. बोर्डाच्या सभेची आगाऊ सूचना त्यांस मिळेलच असें नाहीं, डायरेक्टर बोर्डानें बोलाविलें तरच त्यांनीं सभेस जावयाचें व विचारलें तरच मत द्यावयाचें, असा त्यांचा अधिकार (!) आहे. कंपनीच्या कांहीं नोकरांस तरी भारी पगारापेक्षा, 'स्पेशल' डायरेक्टर हें नांव व बोर्डाच्या सभेस हजर रहाण्यास बोलावणें येण्याचा हक्क ज्यास्त श्रेयस्कर वाटेल. कागदी बढती देण्याचा व डायरेक्टर बोर्डाचा विश्वास दाखविण्याचा हा नवा प्रकार भागीदारांच्या दृष्टीनें तरी कुचकामाचा आहे.

### हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न खर्च

| पहिले सात महिने | उत्पन्नापेक्षां ज्यास्त खर्च (रु.) |
|---|---|
| १९४३-४४ | ७०,५०,००,००० |
| १९४४-४५ | १०३,००,००,००० |

सरकारच्या कर्जाचे रकमेंत वरील मुदतींत १,२९,५०,००,००० रुपयांची भर पडली आहे.

### रद्द केलेल्या शेअरची फेर-विक्री

पूर्वी अलॉट केलेले परंतु मागाहून रद्द केलेले शेअर हिंदुस्थान-सरकारच्या संमतीशिवाय पुनः विकणें डिफेन्स ऑफ इंडिया नियमांनीं बेकायदा ठरविलें होतें. नियमांतील शेअर-विक्रीच्या व्याख्येंत वरील प्रकारच्या शेअरची विक्री बसत नाहीं, असें आतां आढळून आलें आहे. तेव्हां रद्द केलेले शेअर नव्यानें देण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक नाहीं, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

### ब्रिटिश सुटे भाग, ब्रिटिश देखरेख, हिंदी मजूर

ग्रेट ब्रिटनमधून पाठविण्यांत येणाऱ्या सुट्या भागांच्या मोटारी तयार करण्याचा कारखाना हिंदुस्थानांत काढण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं ब्रिटिश तज्ज्ञ हिंदुस्थानच्या मार्गावर आहेत.

## आयुर्विमा कंपन्यांचे हप्ते कसे ठरावितात !

### विमेदाराचें आयुष्य, व्याजाचा दर व व्यवस्थेचा खर्च

आज जर आपण १,००० रुपये द. सा. द. शें. ५ टक्के चक्रवाढ व्याजानें गुंतविले, तर २० वर्षांनीं त्याचे २,६५० रुपये होतील. ह्याचा अर्थ, २० वर्षांनीं मिळावयाच्या २,६५० रुपयांची आजची किंमत १,००० रुपये आहे. एकायास २० वर्षांनीं २,६५० रुपये मिळणार असतील तर त्यानें आज त्याच्याऐवजीं फक्त १,००० रुपये स्वीकारले तरी त्यांत त्याचें नुकसान नाहीं. तथापि तो २० वर्षें जगला तरच त्याला २,६५० रुपये मिळावयाचे असा करार असला तर आज फक्त १,००० रुपयेच त्यानें देऊन भागणार नाहीं. कारण ह्या २० वर्षांत तो मरण पावण्याचा संभव आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे आणि म्हणून २,६५० रुपयांची आजची किंमत १,००० रुपयेच आहे असें म्हणतां येणार नाहीं. म्हणजे २० वर्षांनीं २,६५० रुपये मिळावेत असा विमा उतरावयाचा असला तर आज त्याकरितां फक्त १,००० रुपये देऊन भागणार नाहीं. मधेंच केव्हां तरी विमेदार मरण पावल्यास विम्याची सबंद रकम त्यास द्यावी लागेल आणि ह्याची तरतूद व्हावी ह्यासाठी १,००० रुपयांपेक्षा ज्यास्त मोठी रकम त्याचेकडून आज घ्यावी लागेल. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे विम्याचे हप्ते ठरवितांना व्याज आणि विमेदार केव्हां मरेल ह्याचा अंदाज ह्या दोनाहि गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. व्याजाचा दर देशांतील आर्थिक परिस्थितीप्रमाणें थोडा-फार बदलतो त्याचप्रमाणें कांहीं विमेदार फारच लवकर मरण पावतात तर कांहीं पुष्कळच वर्षें जगतात. विमेदाराचा मृत्यु केव्हां घडून येईल, ह्याचा सरासरी अंदाज करून म्हणजे विम्याची रकम केव्हां द्यावी लागेल ह्याचा अंदाज बांधून हप्ते ठरविले जातात. वेगवेगळ्या गटांतील व वयांचे विमेदार सरासरीनें किती वर्षें जगतील हें आयुर्मर्यादेच्या तक्त्यांचे आधारें काढून विमागणिति हप्ते निश्चित करतात. एकादा विमेदार विमा उतरल्याबरोबर मरण पावला, तर त्याचे हप्ते विम्याची रकम पुरी करण्यास अपुरे पडतील व कंपनीचें त्या मानानें नुकसान होईल. ह्या उलट एकादा विमेदार दीर्घायुषी झाला तर त्यानें भरलेले हप्ते विम्याच्या रकमेच्या मानानें पुष्कळच मोठे ठरतील. कांहीं विमेदारांचे बाबतींत नफा, तर कांहींचे बाबतींत तोटा, अशा प्रकारें कंपनीचा व्यवहार चालतो व नफ्या-तोट्याची वजावाट होते. कंपनी चालविण्यास जो खर्च येतो, तोहि सर्व विमेदारांवर वाटून दिला जातो व त्या मानानें हप्त्यांची रकम वाढते. साधारणतः, एकाच क्षेत्रांतील कंपन्यांच्या हप्त्यांचे दरांत फारशी तफावत आढळत नाहीं, त्याचें कारण मृत्यूंबाबत अपेक्षा व व्याजाचा दर हीं सर्वांस सारखींच अनुभवास येतात. कंपनीच्या कामाचा विस्तार, तिचें चालू काम, इत्यादींवर तिच्या खर्चाचें प्रमाण अवलंबून असतें व त्याच्या तरतुदींत कंपनी-कंपनीमध्यें फरक पडतो व त्या मानानेंच मुख्यतः हप्ते अंशतः कमी-ज्यास्त आढळतात.

---


## —राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्यांची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

## -गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

**साठे बंधू, "गोल्डन कोको"**

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

विक्रीस काढलेलें नवीन दहा लाखांचें भांडवल सर्व विकलें गेलें आहे.

**— भांडवल —**

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. १०,०८,००० | रु. ७,५७,३८० |

खेळतें भांडवल रु. १,००,००,००० चे वर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

**डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ मांमुडां घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांमुडां, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ३१ जानेवारी, १९४५ अंक ५




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

**BUG COILS ( ABC )**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

गेल्या २० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले

## फिव्हर एस.

सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. १

● होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धि करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ८-

● बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय, किं. रु. २

पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.

तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.

एजन्सी नसलेल्या गांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.

सुधा एजन्सी,
१८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

सांडू हार्टिना

छातीत धडधडणें, धाप लागणें, छातीत कळ अगर चमक मारणें, रक्ताचा दाब वाढणें व हृदयाची अशक्तता यांवर खास गुणकारी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## विविध माहिती

### म्हैसूर चेंबरचे महाराष्ट्रीय प्रतिनिधी

म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या येत्या अधिवेशनास उपस्थित रहाण्याकरितां निवडलेल्या प्रतिनिधींत श्री. नारायणराव नाईक व श्री. शंकरराव ओगले हीं नांवें आहेत.

### मुंबई शहरांत दुधाचा खप

मुंबई शहरांत दररोज ७,५०० मण दूध खपतें, त्यापैकीं २,८५० मण दुधाचा उठाव रेस्टॉरंटस, हॉटेल्स, व चहाचीं दुकानें ह्यांत होतो. त्यापैकी ९०% दुधाचा उपयोग चहा व कॉफी करण्याकडे होतो.

### ॲक्चुअरीची प्राथमिक परीक्षा

इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची पहिली परीक्षा ३० व ३१ जुलै रोजीं होणार आहे. उमेदवारांनीं त्यापूर्वी १० आठवडे अर्ज पाठवावे. युद्धपरिस्थितीमुळें मध्यंतरीं ही परीक्षा घेण्याचें बंद होतें. मुंबई केंद्राची व्यवस्था प्रो. पाणंदीकर, प्रिन्सिपॉल, सिडनहॅम कॉलेज, ह्यांचेकडे आहे.

### अमेरिकेची लोकसंख्या

अमेरिकेची लोकसंख्या आतां १३,८१,००,९७४ झाली आहे. १९४० सालीं ती १३,१६,६९,२७५ होती.

### विमा एजंटाची फसवणूक

गेल्या जुलै महिन्यांत एका विमा एजंटास तोतया जमीनदारांच्या व व्यापाऱ्यांच्या टोळीनें कसें बनविलें, ह्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. ह्या टोळींतील एकानें मुंबई येथें मलबार हिलवरील बंगल्यांतील "जमीनदारास" २,००,००० रुपयांचा विमा उतरावयाचा आहे, असें एका विमा एजंटास सांगून बंगल्यांवर नेलें. "जमीनदारा" चा विमा मिळवून देण्यासाठी "जमीनदाराच्या सेक्रेटरी" स २,००० रुपये देण्याचें ठरलें, "जमीनदारा" स खुष करण्यासाठी त्यांचेबरोबर टेबल रेस नांवाचा खेळ पैसे लावून खेळण्यास त्या एजंटास प्रवृत्त करण्यांत आलें. पहिले चार डाव एजंटास जिंकू देऊन, "जमीनदारा" नें पांचवा डाव जिंकला व एजंट १६,००० रुपयांस बुडाला! टोळीनें पैसे घेऊन पोबारा केला. टोळीपैकी एकास अटक झाली आहे.

### चहांत दुध घालण्यास बंदी

मुंबई शहरांतील हॉटेलांत दूध विकण्याची बंदी करण्यांत आली आहे. चहा, कॉफी, दहीं, ताक, इत्यादींसाठी गाईचें अगर म्हशीचें दूध वापरतां कामा नये; अशा दुधाची चहा कॉफी वगैरे विकतां कामा नये. रहाण्याची व्यवस्था असणारा क्लब, लॉजिंग हाऊस, आगगाडींतील फराळाचा डबा, ह्यांस हा नियम लागू नाहीं. १५ फेब्रुवारीपासून हा नियम अमलांत येईल. स्किम मिल्क पावडर म्हणजे मलई काढलेल्या दुधाची पूड हॉटेलवाल्यांस पुरविण्यांत येईल. नऊ भाग पाण्यांत एक भाग ही पूड टाकल्यास त्याचें दूध तयार होतें व त्यापासून दहीं व ताकसुद्धां होऊं शकतें. सहा वर्षांखालील मुलें व गर्भवती आणि बाळंत स्त्रिया ह्यांस मुबलक सकस दूध मिळावें, ह्याकरितां ही योजना आहे. तीन महिन्यांपुरता स्किम पावडरचा सरकारजवळ सांठा आहे व पुरवठा पुढें सतत चालू राहील असें आश्वासन आहे. हॉटेलवाल्यांखेरीज इतरांस ही पूड मिळणार नाहीं. ह्या पुडीच्या वापरामुळें २,८५० मण दूध जादा उपलब्ध होईल.


## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची दहावी साधारण सभा रविवार ता. २५ फेब्रुवारी १९४५ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां (नवीन स्टँ. टा.) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठी भरेल.

(१) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४४ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा व ऑडिटरांचा रिपोर्ट याचा विचार करणें.

*(२) डिव्हिडंड व बोनस मंजूर करणें.

(३) निवृत्त होणाऱ्या (फेर निवडणुकीस पात्र असलेल्या) चार डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.

(४) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(५) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारी इतर कामें.

पुणें शहर } बोर्डाचे हुकुमावरून
ता. २२-१-१९४५ } सी. व्ही. जोग
मॅनेजर

वि. सू.:—बँकेचीं शेअर ट्रॅन्फर बुकें ता. १६ फेब्रुवारी, १९४५ ते २ मार्च १९४५ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

* डिव्हिडंड व बोनस मंजूर झाल्यानंतर तें शुक्रवार ता. २३ मार्च १९४५ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरन्टस भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविली जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

—सुशिक्षित, त्रिलोकसुंदरी व मोहिनी—

सुशिलाराणीची

रंगीत नृत्यें पाहून रोज हजारों पुणेंकर रसिकांच्या 'डोळ्याचें पारणें' फिटत असतें!

नवहंसचा अप्रतिम पौराणिक बोलपट

द्रौपदी

हाऊसफुल्ल ११ वा दिवस!

रोज ६॥ व १० वा.

रिझर्व्हेशन सकाळीं १० ते १२] —[ डायमंड प्रकाशन

प्रभात

[ पुणें भूषण बोलपटगृह ]

मुंबईंत १५ वा सातवडा!

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३४ | ५ खेडेगांवीं उद्योगधंद्यांचें स्थान ... | ३८ |
| २ पदार्थ-वाटणीचें कार्य... | ३५ | ६ आर्थिक अभिवृद्धीची योजना ... | ३९ |
| ३ धान्यांतील किडीवर प्रयोग ... | ३६ | ७ घर भाडेकरू परिषदेची फलश्रुति ... | ४० |
| ४ स्फुट विचार ... ... | ३७ | ८ आपल्यापुढील कांहीं प्रश्न | ४१ |
| सद्यःस्थितील परराष्ट्रीय व्यापार—अर्वन बँकांवर युद्धाचे परिणाम—हिंदी बँकांसंबंधीं ताजे आंकडे | | ९ सरचार्ज कमी झाला ... | ४१ |
| | | १० माणुसकी व व्यवहार यांचा समन्वय ... | ४२ |
| | | ११ सहकारी वृत्त ... | ४३ |



# अर्थ

बुधवार, ता. ३१, जानेवारी १९४५


## सहकारी संस्थांचें पदार्थ-वाटणीचें कार्य

सामान्यतः सर्वच हिंदुस्थानांत आणि विशेषतः मुंबई प्रांतांत जिनसांची खरेदी व विक्री करण्याचा व्यवहार सहकारी संस्थांनीं म्हणण्यासारखा हातीं घेतला नव्हता; परंतु युद्धपरिस्थितीमुळें ह्या व्यवहाराला चालना मिळून त्याचा विस्तार आतां बराच झाला आहे. बेताच्या व निश्चित भावानें जरूरीचे जिन्नस मिळण्याची अडचण लोकांना तीव्रतेनें भासूं लागल्याकारणानें आणि त्यांच्या विक्रींत नफेबाजी बोकाळूं लागल्यामुळें योग्य किंमतीनें धान्य, साखर, रॉकेल, कापड इत्यादि माल विकण्याची खास व्यवस्था करणें सरकारास आवश्यक झालें. जिल्ह्यांमधून ठिकठिकाणीं, लहान-मोठ्या शहरांत व गांवांत नियंत्रित अशीं दुकानें चालू करण्यांत आलीं आणि त्यांमध्यें जरूरीचे जिन्नस ठराविक किंमतीनें मिळण्याची सोय झाली. स्वतःच्या कार्याचा विस्तार करण्याच्या आणि जनतेस अडचणीच्या प्रसंगीं मदत देण्याच्या ह्या संधीचा उपयोग सहकारी संस्थांकडून निरनिराळ्या प्रांतांत करण्यांत आला आहे. मुंबई प्रांतांतहि अशीच इष्ट प्रगति झाली आहे आणि तीमध्यें सरकारी अधिकारी व सहकारी कार्यकर्ते ह्यांनीं परस्पर सहाय्याचें धोरण अंगिकारलें आहे. नियंत्रित जिनसांच्या विक्रीचे परवाने व सवलती देतांना सहकारी संस्थांस अग्रतेनें वागवण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें असून त्याप्रमाणें जिल्हाधिकारी व्यवस्था करीत आहेत. " इंडियन कोऑपरेटिव्ह रिव्ह्यू " च्या ताज्या अंकांत मध्यप्रांत, ओरिसा, त्रावणकोर व मुंबई ह्यांमध्यें सहकारी पद्धतीच्या माल-विक्रीची प्रगति कशी झाली आहे ह्याची माहिती निरनिराळ्या लेखांत प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तीवरून मालविक्रीचें कार्य कोणत्या परिस्थितींत सहकारी संस्थांनीं स्वतःच्या अंगावर घेतलें आहे, त्यांच्या अडचणी काय आहेत आणि हा व्यवहार यशस्वी रीतीनें चालण्यासाठीं कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ह्याची कल्पना येते.

### मुंबई प्रांतांतील सहकारी विक्रीची व्यवस्था

वरील लेखांमध्यें श्री. एन्. व्ही. नायक, असिस्टंट रजिस्ट्रार, ह्यांनीं मुंबई प्रांतांत सहकारी मालविक्रीची व्यवस्था कशी झाली आहे ह्याचें वर्णन संगतवार व बोधप्रद रीतीनें केलें आहे त्याचा समावेश झालेला आहे. युद्धपरिस्थितीमुळें बाजारभाव कडकूं लागले तेव्हां बेताच्या किंमतीनें जरूरीचा माल विकणारीं दुकानें स्थानिक कमिट्या, म्युनिसिपालिट्या, पंचायती ह्यांनीं चालू केलीं आणि जिल्ह्यांतून बाहेर खाद्यपदार्थ जाण्याची बंदी झाली तेव्हां त्यांस कलेक्टरांनीं माल दुसरीकडून आणण्याच्या सवलती दिल्या. ह्या स्थितींत सहकारी रजिस्ट्रारनीं सहकारी बँका, नोकरांच्या सोसायट्या व स्टोअर्स ह्यांनीं सदरहु व्यवहार आपल्या हातीं घ्यावा ह्यासाठीं त्यांस उत्तेजन दिलें, त्याची माहिती देऊन श्री. नायक ह्यांनीं बेळगांव आणि भडोच ह्या जिल्ह्यांत सहकारी कार्यकर्त्यांनीं मालाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवस्थेच्या केलेल्या योजनांचें वर्णन केलें आहे. सभासदांच्या मागण्यांस अनुसरून मालाची खरेदी व पुरवठा करणें हा प्रारंभाचा व्यवहार होता. सहकारी संस्थांनीं स्वतःच्या जबाबदारीवर व भांडवलानें मालाची खरेदी करण्याचीहि प्रथा पाडली. शहरांतील व खेडेगांवांतील सोसायट्या, बँका, स्टोअर्स, खरेदी-विक्री संस्था ह्यांच्या उपयोगासाठीं जुळतील असे पोटनियम सहकारी खात्यानें तयार करून त्यांच्या व्यवहाराबाबत विशिष्ट सवलतीहि दिल्या. नियंत्रित मालाच्या खरेदी-विक्रीसाठीं जरूर ते परवाने जिल्हाधिकाऱ्यांनीं दिल्या कारणानें सहकारी संस्थांचें कार्य सुकर झालें. बेळगांव जिल्ह्यांत निवडक शहरीं व खेडेगांवीं सोसायट्या व बँकांकडे योग्य किंमतीनें मालाची विक्री करणाऱ्या दुकानांचें काम सोंपविण्यांत आलें आणि त्यांच्यावर देखरेख करण्यासाठीं सरकारी अधिकारी व बिनसरकारी कार्यकर्ते ह्यांच्या समित्यांची योजना झाली. १९४२ सालीं ह्या कार्यास प्रारंभ होऊन सहकारी माल-विक्रीच्या संस्थांची संख्या वाढत गेली व १९४४ मध्यें ती ७३ चे वर गेली. १९४३-४४ सालांत त्यांची विक्री सुमारें २८ लक्ष रुपयांची झाली असावी. भडोच जिल्ह्यांत निराळ्या तऱ्हेनें उपक्रम करण्यांत आला. भडोच को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स ह्या एका मध्यवर्ती संस्थेनें जिल्हाभर शाखा स्थापून मालविक्रीची व्यवस्था केली. तिनें १९४३ मध्यें २४ लक्षांचा व्यवहार करून ३२ हजार रुपये नफा मिळवला. वरील दोन्ही जिल्ह्यांत सेंट्रल बँकेचें उत्कृष्ट सहाय मिळालें आहे. इतर जिल्ह्यांत मालाच्या सहकारी वाटणीचा विस्तार कसा झाला आहे ह्याची बोधप्रद माहिती श्री. नायक ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. ह्या वाटणीच्या व्यवस्थेस रॅशनिंगमुळें कसें उत्तेजन मिळालें आहे ह्याचें त्यांनीं केलेलें वर्णन वाचनीय आहे. मुंबई शहरांत रॅशनिंगला ता. ९ मे १९४३ रोजीं प्रारंभ झाला; ४ जून रोजीं मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कांहीं भागांत तें पसरलें आणि ता. ५ जुलै रोजीं पुण्यांत त्यास सुरवात झाली. कित्येक सोसायट्यांनीं रॅशनच्या दुकानाचे लायसेन्स मिळविले व नव्या स्टोअर सोसायट्याहि स्थापन झाल्या. खेडेगांवांतहि सोप्या पद्धतीचें रेशनिंग अमलांत आल्यामुळें सहकारी वाटणीचा प्रश्न तेथेंहि महत्त्वाचा झाला.

### खेडेगांवांतील माल वाटणी

मुंबई सरकारनें शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करण्याची योजना अंमलांत आणली आहे आणि खेडेगांवांतून मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें त्यास आवश्यक झालें आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांत हीं दुकानें किती ठिकाणीं आहेत आणि

त्यांपैकीं सहकारी व्यवस्थेखालीं किती आहेत, तसेंच विक्रीबद्दल किती कमिशन देण्यांत येतें ह्याविषयींचे सप्टेंबर १९४४ मधले आकडे खालीं दिले आहेत:—

| जिल्हा | दुकानें | | सहकारी सोसायट्यांच्या ताब्यांतील दुकानें | | |
|---|---|---|---|---|---|
| | पसंत केलेलीं | चालू | संख्या | मासिक सरासरी विक्री | विक्रीवर कमिशन |
| अहमदाबाद | १४२ | १३४ | ६८ | १००ते१५०मण (लहान ठिकाणीं) ८०० ते १००० मण ( मोठीं ) | ३½% + गाडी-भाडें ( दर मैलीं दर मणीं = २½आणे) |
| खेडा | २५९ | २३९ | १०८ | ... | दर मणीं ८ आणे ते १ रु. +गाडी-भाडें. |
| भडोच | ६४ | ६४ | ४९ | १०० मण | |
| पंचमहाल | ४४ | ३९ | २४ | ... | ४% खेडीं ५% गोध्रा |
| सुरत | १५८ | १४९ | २१ | १०० मण | ... |
| ठाणा | १३९ | १३९ | ९३ | ... | १२½% |
| नगर | ३६७ | २९२ | ४२ | ५ ते २५० मण | ३ ते ६½% |
| पू. खानदेश | १५१ | १४७ | ३८ | १२५ मण | ७ १३/१६% |
| प. खानदेश | १२१ | ९६ | ५८ | १२५ मण | ५% ज्वार २½% गहूं |
| नाशिक | १६४ | १५७ | ७३ | १९३ मण | दर पोत्यास १रु. |
| पुणें | १८९ | १२८ | ४९ | ... | ६¼% |
| सातारा | २३० | २१७ | ११९ | १६० मण | ... |
| सोलापूर | १०६ | १०१ | १३ | ५०० ते ७५० मं. | ... |
| बेळगांव | ८१९ | ७०१ | ४९ | २५ ते ३७ मण | ४ ते ५% |
| विजापूर | १२४ | ८४ | ३७ | ५० ते ७५मण | ... |
| धारवाड | १३६ | १०५ | ९१ | १६३ मण | ... |
| कानडा | १८२ | १५२ | ४७ | ... | नादुरुस्त पोतें १½ रु. इतर धान्यें २रु. |
| कुलाबा | १५९ | १५९ | २० | ... | रोखीनें ६% उधार ४ ११/१६% |
| रत्नागिरी | ३९५ | ३९५ | ५ | ... | ४% + दर मैलीं पोत्यास १ आ. |

### सल्फेट ऑफ अमोनियाचा कारखाना

सल्फेट ऑफ अमोनियाचें उत्पादन करणारा पहिला हिंदी कारखाना बिहारमध्यें धनबादशेजारीं उभारण्यांत येईल. प्रत्यक्ष उत्पादनास १९४७ सालीं प्रारंभ होईल. शेतकऱ्यांस १२५ रुपये टन भावानें खत मिळावें, अशी अपेक्षा आहे. कारखाना सरकारी मालकीचा राहील व त्याची व्यवस्थाहि सरकार पाहील.

### अलाइड ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज, लि., पुणें

वरील नांवाची खाजगी लिमिटेड कंपनी श्री.त्रिं. रा. चिपळूणकर व श्री. द. ग. घाणेकर ह्यांनीं नुकतीच नोंदली आहे. तिचें अधिकृत भांडवल १ लक्ष रुपये आहे. व्यापारी पद्धतीनें शेती करणें हा तिचा उद्देश आहे. वरील दोघे व श्री. न. गं. आपटे हे कंपनीचे डायरेक्टर व श्री. स. बा. दातार हे कंपनीचे सेक्रेटरी आहेत. कंपनीचा नोंदलेला पत्ता ९५२ सदाशिव, पुणें २ असा आहे. कांदे व बटाटे वाळवून वेगवेगळया प्रकारांत ते विकणें, हा कंपनीचा व्यवहार राहील व त्यासाठी कंपनीनें नांदगाव व उरुळी येथें शेतें घेतलीं आहेत, असें समजतें.

## धान्यांतील कीड वाढूं न देण्याचे यशस्वी प्रयोग

**किर्लोस्करवाडी येथील कोठारांतील उत्तेजनकारक अनुभव**

पाऱ्याच्या वायूचा धान्याचें किडीपासून संरक्षण करण्याकडे काटकसरीनें कसा उपयोग करतां येईल, ह्यासंबंधीं फर्ग्युसन कॉलेजांतील प्राध्यापक डॉ. के. के. ढोळे, एम्. एसी., पीएच. डी., ह्यांचें संशोधन चालू आहे. लहान प्रमाणावरील त्यांचे प्रयोग यशस्वी झाल्यानंतर त्यांनीं किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर बंधु लि. च्या कोठारांत नुकतेच मोठ्या प्रमाणावरील प्रयोग पुरे केले आहेत. सुमारें ४०८ पोत्यांवर पाऱ्याच्या भुकटीचा प्रयोग करून, तीं पोतीं जून अखेर ते डिसेंबर प्रारंभापर्यंत म्हणजे सुमारें पांच महिने साठवून ठेवलीं. ज्वारी, हरबरे, गहू, तुरीची डाळ, इत्यादींचीं तीं पोतीं होतीं. प्रत्येक पोत्याचें वजन २०० ते २२५ पौंड असून तीं ६५'×३०'×१५' अशा कोठारांत ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांचेबरोबरच, साधें ( ज्यावर पाऱ्याचा प्रयोग केलेला नव्हतें असें ) धान्य भरलेलीं २,५०० पोतीं होतीं. पांच महिन्यांनंतर सर्व प्रकारच्या पोत्यांचे नमुने तपासून पहातां, खालील-प्रमाणें त्यांची परिस्थिति आढळली:—

| धान्याचें नांव | मूळ परिस्थिति | पांच महिन्यांनंतर परिस्थिति | पाऱ्याचा प्रयोग न केलेल्या धान्याची पांच महिन्यांनंतर परिस्थिति |
|---|---|---|---|
| हरबरा | दाण्यांवर थोडीं अंडीं | एकाहि दाण्यास भोक नाहीं | प्रत्येक दाण्यावर भोकें. कांहींवर दोन किंवा तीन |
| ज्वारी | दाणे थोडेसे किडलेले | ३% दाणे किडले | ३४% दाण्यांस भोकें व कांहीं भुगा |
| गहू | चांगला | एकाहि दाण्यास कीड नाहीं | ” |
| तूरडाळ | ” | ” | थोडीशी कीड व नुकसान. थोडा भुगा. |

पाऱ्याचा प्रयोग केलेलें व न केलेलें धान्य एकाच कोठारांत शेजारीं ठेवलेलें होतें, हें लक्षांत घेतलें असतां, प्रयोगाचें यश लक्षांत येईल. जुलै ते डिसेंबर हा मोसम किडीचे वाढीस पोषक असतो, हेंहि विसरतां कामा नये. अंडीं व बारीक जंतू मारण्यास पाऱ्याचा उपयोग होतो; मोठ्या किडीचा संपूर्ण नाश करण्याची त्यांत शक्ति नाहीं. ज्या धान्यास अद्याप कीड लागलेली नाहीं, असें धान्य किंवा वाढल्यानंतर धान्याचा फारसा नाश करीत नाहीं असें कीड लागलेलें धान्य पाऱ्याच्या उपयोगास विशेष अनुकूल ठरेल, हें उघड आहे. धान्यास थोडीशी कीड लागलेली असेल, तर त्याची वाढ थांबते, परंतु, अगोदरच फार कीड लागलेल्या धान्याचा बचाव करण्यास पाऱ्याच्या उपयोगाबरोबर ज्यामुळें कीड मरेल, नाहींशी होईल किंवा चाळणींतून गळून जाईल अशी इतरहि कांहीं योजना करावी लागेल. कीड घालवून देणारें एक द्रव्य तयार करण्यांत येत आहे, त्याची हकीकत पुढें प्रसिद्ध करण्यांत येईल. सुमारें १०,००० रुपये किंमतीचें धान्य प्रयोगासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल व इतरहि सवलती दिल्याबद्दल डॉ. ढोळे ह्यांनीं किर्लोस्कर बंधु लि. चे आभार मानले आहेत.

## स्फुट विचार

### सहामाहींतला परराष्ट्रीय व्यापार

चालू सरकारी वर्षाच्या पहिल्या सहामाहींतल्या (एप्रिल–सप्टेंबर, १९४४–४५) हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं ह्या सहा महिन्यांच्या अवधींत आयात व निर्गत व्यापारांत वाढ झाली. पूर्वीच्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीच्या मानानें आयात ४२ कोटि रुपयांनीं आणि निर्गत १६ कोटींनीं वाढली. आयात ५२ कोटींची ९४ कोटि झाली आणि निर्गतीचे आकडे अनुक्रमें करून ९३ व १०९ कोटि असे होते. लढाऊ सामुग्रीच्या आयात–निर्गतीचा समावेश ह्या आकड्यांत केलेला नाहीं हें येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. धान्यांच्या आयातींत वाढ झाली आणि त्यांची निर्गत घटली. कच्च्या मालाच्या आयातींमधील वाढ डोळ्यांत भरण्यासारखी होती पण त्यांची निर्गत अगदी अल्प प्रमाणांत वाढली. पक्क्या मालाच्या आयातींत थोडी वाढ दिसून आली, पण त्याच्या निर्गतींतली वाढ मात्र बरीच मोठी होती. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांशीं हिंदुस्थानचा आयातीचा व निर्गतीचा व्यापार अधिक झाला. इतर देशांतून अधिक माल हिंदुस्थानांत आला, पण त्यांचेकडे निर्गत झालेल्या मालांत मात्र अल्प अशी वाढ झाली. निर्गतीच्या किंमतीपेक्षा आयातींची किंमत अधिक प्रमाणांत वाढल्याकारणानें ह्या देशाचें परदेशांकडून व्यापारमूलक येणें घटलें आहे. १९४३–४४ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत देण्यापेक्षा येणें ४४ कोटि, ५२ लक्ष अधिक होतें, तें चालू वर्षाच्या तत्सम मुदतींत २० कोटि, ४२ लक्ष भरलें. साम्राज्यांतर्गत देशांतून आलेल्या मालाची किंमत वाढली आणि तीहि पेक्षा अधिक वाढ इतर देशांतून झालेल्या आयातीमध्यें दिसून आली. उदाहरणार्थ, इराणमधून झालेली आयात १०½ कोटींची २६ कोटि रुपयांवर गेली, इजिप्तमधली ६½ कोटींपासून सुमारें १० कोटिपर्यंत चढली आणि अमेरिकेचा आकडा दुप्पट होऊन १७½ कोटिवर गेला. हिंदुस्थानच्या निर्गतींतील वाढींत साम्राज्यांतर्गत देशांचा हिस्सा मोठा आहे. अमेरिका, इजिप्त व इराण ह्या देशांनीं हिंदुस्थानचा अधिक माल घेतला. तुर्कस्तान, इराक, इराण, अरेबिया व सीरिया ह्या देशांचा हिस्सा मात्र घटला.

---

### सहकारी अर्बन बँकांवर युद्धाचे परिणाम

बॉंबे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें आपल्या सभासद बँकांच्या माहितीकरितां आणि मार्गदर्शनाच्या हेतूनें, प्रांतिक व सेंट्रल सहकारी बँकांच्या व्यवहारांची दिशा युद्धपरिस्थितीमुळें कशी बदलली आहे हें दर्शवणारे तुलनात्मक आकडे एक महिन्यामागें प्रसिद्ध केले होते आणि त्यांच्या स्वरूपाचें दिग्दर्शन "अर्था" मध्यें आम्हीं गेल्या महिन्यांत केलें आहे. असोसिएशनच्या ह्या पत्रकांतील माहितीची मांडणी प्रो. काळे ह्यांनीं केली होती. तशाच प्रकारची छाननी त्यांनीं आतां अर्बन सहकारी बँकांच्या बाबतींत केली असून असोसिएशननें त्यांनीं मांडलेले आकडे व त्यांवरून सुचवलेले विचार ग्रथित केलेलें दुसरें पत्रक पहिल्याच्या जोडीस प्रसिद्ध केलें आहे. (Recent Trends in Co-operative Banking in Bombay Province II—Urban Banks). ठेवींमध्यें वाढ, ह्या वाढलेल्या पैशाचा कर्जे देण्याकडे विनियोग होण्याच्या मार्गांत अडचणी, पूर्वींच्या प्रमाणबद्धतेच्या मर्यादेच्या पलीकडे करावी लागणारी रोख्यांतली गुंतवण आणि तरल्या पैशाची व रोकडीचा अमर्याद विस्तार हे युद्धजन्य परिणाम ब्रिटिश व हिंदी जॉइंट स्टॉक बँकांप्रमाणेंच सहकारी सेंट्रल बँकांच्या व्यवहारांत आढळतात असें प्रो. काळे ह्यांनीं त्यासंबंधांतले तुलनात्मक आकडे देऊन पहिल्या पत्रकांत दाखवलें होतें. प्रस्तुतच्या दुसऱ्या पत्रकांत मुंबई प्रांतांतील १८ प्रातिनिधिक बँकांच्या हिशेबाच्या आकड्यांची छाननी करून त्यांनीं असें दाखवलें आहे कीं युद्धाचे हेच परिणाम पण अधिक ठळक रीतीनें अर्बन बँकांवर घडून आले आहेत. ह्या बँकांचें कार्यक्षेत्र व सभासदत्व मर्यादित असल्यानें ठेवी वाढल्या असतांना कर्जांमध्यें त्यांस प्रगति करतां आलेली नाहीं आणि त्यांपैकीं कांहींची तर ह्या बाबतींत पीछेहाटच झाली आहे. सेंट्रल व अर्बन बँका ह्यांच्या ठेवींशीं १९३९ व १९४४ ह्या सालीं त्यांच्या कर्जांचें व गुंतवणुकीचें प्रमाण कसें बसतें हें खालीं दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल:—

**ठेवींशीं कर्जे व गुंतवणूक ह्यांचें प्रमाण**

| | अर्बन बँका | | सेंट्रल बँका | |
|---|---|---|---|---|
| | १९३९ | १९४४ | १९३९ | १९४४ |
| दिलेल्या कर्जांचें ठेवींशीं प्रमाण | ७०% | २८.३% | ५८% | ४१% |
| रोख्यांतील गुंतवणुकीचें ठेवींशी प्रमाण | २६.७ | ४६.९% | ३६% | ४८% |

---

### हिंदी बँकांसंबंधीं ताजे आकडे

हिंदी बँकांसंबंधींचे ३१ डिसेंबर, १९४४ अखेरचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून हिंदी बँकांच्या व्यवहारावर चांगला प्रकाश पडतो. ह्या तिमाहींत बरेली कॉर्पोरेशन बँक, महाराष्ट्र बँक व इंडो-मर्कंटाइल बँक ह्या तीन बँका शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल झाल्या. शेड्यूल्ड बँकांची संख्या १९४३ अखेर ६० होती, ती गेल्या बारा महिन्यांत ११ नें वाढून ७१ झाली. त्यांपैकीं १६ बँका एक्सचेंज बँका आहेत. ३०-९-४३ रोजीं शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या १,७२५ होती, ती ३०-९-४४ रोजीं २,२३९ झाली. म्हणजे, त्यांत ५१४ ची भर पडली. शेड्यूल्ड बँकांजवळील एकूण ठेवींचा आकडा बारा महिन्यांत १६१ कोटि रुपयांनीं वाढून वर्षअखेर तो ८१९ कोटि रुपयांवर गेला. बँकांनीं दिलेल्या कर्जांचें एकूण देण्यांशीं प्रमाण २५·४७% होतें, तें ३०·४३% झालें; आणि त्याचा परिणाम म्हणजे रिझर्व्ह बँकेकडे त्यांनीं जरूरीपेक्षा ६० कोटि रुपये ज्यास्त ठेवले होते, त्याऐवजीं आतां ३९ कोटि रुपयेच ज्यास्त ठेवले गेलेले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या नोटा ८४० कोटि रुपयांवरून १,००९ कोटि रुपयांवर गेल्या आहेत, आणि सहाजीकच स्टर्लिंगमधील रकम ७३४ कोटींची ९०४ कोटि रुपये झाली आहे.

---

## आर्थिक नियोजनांत खेडेगावी उद्योगधंद्यांचें स्थान

श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे विचार

### जीवनोपयोगी वस्तूंची समप्रमाणांत वाटणी

युद्धोत्तर आर्थिक योजना आतांपर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांत खेडेगांवी लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांना त्यांच्या महत्त्वास योग्य असें स्थान मिळालेलें दिसत नाहीं. एका योजनेंत खेडेगांवी उद्योगधंद्यांची उपयुक्तता काल व विस्तार ह्या दोन्ही दृष्टींनीं मर्यादित आहे, तर दुसऱ्या योजनेंत त्याचा ओझरता उल्लेखहि नाहीं. मुंबई सरकारच्या योजनेंतहि, आगामी मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या क्षेत्रांत खेडेगांवी उद्योगधंद्यांस कोणतें स्थान मिळणार, हें निश्चित सांगितलेलें नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या घोषणाहि ह्याबाबत खुलासा करीत नाहींत. कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें खऱ्या हिंदी प्रश्नाच्या–आपल्या कोट्यवधि बांधवांस उद्योग मिळवून देण्याच्या–पार्श्वभूमीवर आपलें काम सुरू केलें होतें. उद्दिष्टाचें दूरगामित्व व स्पष्टपणा ह्या बाबतींत त्या कमिटीची बरोबरी कोणतीहि योजना करूं शकलेली नाहीं.

### राजकीय व आर्थिक शक्ति

हिंदुस्थानांत केवळ मोठे कारखाने स्थापल्यानें प्रश्न सुटणार नाहीं. शेतीवरील लोकसंख्येचें अवलंबन दूर करण्याचें त्यांचें सामर्थ्य अति मर्यादित आहे. इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें आपल्या जनतेच्या रहाणीचें मान सुधारूं शकलीं, त्याचें मुख्य कारण त्यांचेजवळ असलेली प्रचंड राजकीय व आर्थिक शक्ति हें होय. तिचे जोरावर परराष्ट्रांतील बाजारपेठा काबीज करणें व मागसलेल्या लोकांचा स्वस्त मजूर म्हणून उपयोग करून घेणें, हें त्यांस साधलें. हिंदुस्थानची आजची परिस्थिति व आपली आजवरची रूढी ह्या दोन्ही गोष्टी वरील धोरणास पोषक नाहींत.

वाढत्या उत्पादनाची वांटणी विषम प्रमाणांत होऊं नये, अशी योजना करावयाची, तर मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीच्या पद्धतीपेक्षा लहान प्रमाणावरील खेडेगांवी उत्पादनपद्धति जास्त सोईची आहे, कारण तींत नफ्याचें उद्दिष्ट योग्य मर्यादेंत राहूं शकतें आणि वेगवेगळ्या घटकांतील हितसंबंधांचा विरोध बोथट होतो.

### खरा प्रश्न व त्यावर उपाय

यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानें उत्पादन करणें जास्त किफायतशीर असलें, तरी यंत्रांच्या उपयोगामुळें उत्पादन खर्च कमी होतोच, असें म्हणतां येणार नाहीं. हा प्रश्न बाजूस ठेवला, तरी सुचविल्यांत येणाऱ्या योजनांमुळें, जो मुख्य हिंदी प्रश्न सोडविण्याचा तो अधिकच बिकट होत नाहींना हें आधीं पाहिलें पाहिजे. हिंदी लोकांना आज पुरेसें काम मिळत नाहीं, तेव्हां तें मिळवून देणारे उद्योगधंदे सुरू करणें श्रेयस्कर, कीं कारखाने वाढवून बेकारींत भर घालणें श्रेयस्कर ? यंत्रसामुग्रीच्या उपयोगामुळें तिचे दास होण्याची पाळी येते ती वेळींच टाळली पाहिजे.

कारखान्यांत मजुरी करण्याऐवजी, लहान प्रमाणावर उत्पादन करण्यांत कामगारांचें मनुष्यत्व टिकूं शकतें व त्यांचें जीवन सुसह्य व सुखदायक होण्यास सहाय होतें. यंत्राशीं काम करणारा मनुष्य त्याचाच एक भाग होऊन बसतो, तर खेडेगांवी उद्योगधंद्यांतील कामगार डोकें चालवून जिवंतपणा राखूं शकतो.

कारखान्यांतील यांत्रिक उत्पादनापेक्षां लहान प्रमाणावरील उद्योगाचें दर माणशीं दर दिवशीं उत्पादन साधारणतः कमी भरेल हें उघड आहे. त्यामुळें एकूण उत्पादनहि कमी येईल. परंतु आर्थिक नियोजनाचें ध्येय दर माणशीं उत्पादन हें नाहीं. प्रत्येकास जीवनोपयोगी वस्तू भरपूर प्रमाणांत मिळाव्यात, ह्या दृष्टीनें उत्पादनांत वाढ झाली पाहिजे, आणि लहान प्रमाणावरील गटांचें उत्पादन चांगल्या तऱ्हेनें आखलें व मालाची वाटणी नीट झाली तर तें अपुरें पडण्याचें कारण नाहीं. मानव जातीच्या कांहीं भागाच्या किंवा देशांतील कांहीं वर्गांच्या गरजा वाढविण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी जीवनास आवश्यक अशा गोष्टी सर्वांस समप्रमाणांत मिळाव्यात. असा प्रयत्न अगोदर झाला पाहिजे; तें समाजाच्या ज्यास्त आणि खऱ्या हिताचें आहे.

### खेडेगावी उद्योगधंद्यांची आवश्यकता

कांहीं माल, विशेषतः उत्पादनोपयोगी वस्तू खेडेगांवांत लहान प्रमाणावर तयार करतां येणार नाहींत. कांहीं कामें हातांनीं करण्यामध्यें फार धोका असेल. कांहीं प्रकारचे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावरच चालविणें क्रमप्राप्त असेल. अशा सर्व उद्योगांचें राष्ट्रीयकरण होणें आवश्यक आहे. अर्थात् सरकारची खातीं म्हणून ते चालविण्यांत येऊं नयेत. त्यांत उपभोक्ते, उत्पादक, कामगार व कर देणारे ह्या सर्वांचे हितसंबंध पाहिले गेले पाहिजेत. असे व्यवहार सोडले, तर बाकीच्या मालाचें उत्पादन खेडेगांवांतील लहान प्रमाणावरील पद्धतीनें यशस्वी रीतीनें चालू ठेवणें अगदीं शक्य आहे.

अर्थात्, खेडेगांवी उद्योगधंद्यांची पुनर्घटना केल्याखेरीज त्यांचेकडून अपेक्षित कार्य घडून येणें शक्य नाहीं. गेल्या शतकांतील औद्योगिक क्रांतीमुळें नवी परिस्थिति निर्माण झाली आहे, तीस अनुसरून आर्थिक पुनर्घटना करणें खेडेगावी धंद्यांस जमलें नाहीं. ती पुनर्घटना घडवून आणण्यास राष्ट्रीय प्रमाणावर प्रयत्न झाले पाहिजेत. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास स्वस्त कच्चा माल, स्वस्त भांडवल पुरवठा, विक्रीच्या सवलती व शास्त्रीय ज्ञानाचा फायदा हीं उपलब्ध होतात, तीं लहान उद्योगधंद्यांनाहि मिळवून दिलीं पाहिजेत. ह्या सर्व गोष्टी घडवून आणण्यास सहकारी संघटनेइतकी सोईची दुसरी संघटना नाहीं. खेडेगावांतील उत्पादनास मोठ्या प्रमाणावरील उपक्रमांस मिळणारा फायदा मिळवून देण्याचें काम सहकारी संस्था करूं शकतील. लोकशाही तत्त्वावर त्यांचा कारभार चालतो, ही गोष्टहि महत्त्वाची आहे.


**दि मागोरा केमिकल कं. लि.,**

**पुणें २.**

अपेक्षेप्रमाणें 'डिपॉझिटस्' आल्यामुळें ता. १५-१-४५ पासून आम्हीं डिपॉझिटस् घेण्याचें बंद केलें आहे.

या बाबतींत जनतेनें दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

पुणें, ता. १५-१-४५. | रा. य. रानडे, मॅनेजिंग एजंटस्.

## हिंदुस्थानाच्या आर्थिक अभिवृद्धीची योजना

### (दुसरा खंड)

सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृतींच्या हिंदुस्थानाच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनेचा दुसरा खंड नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ह्या योजना-पत्रकांत राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी व तदनुषंगिक राष्ट्रीय सरकारची भूमिका या प्रश्नांचा विचार करण्यांत आला आहे. अर्थशास्त्राचा अभ्यास नसलेल्या सर्वसामान्य वाचकालाहि सुबोध होईल अशा अत्यंत सुस्पष्ट पण मोजक्या शब्दांत अर्थ-व्यवहारांतील गुंतागुंतीच्या व अवघड विषयांचें सुगम विवेचन ३४ पृष्ठांत सामावलेल्या ४८ परिच्छेदांत केलेलें आहे.

योजना अंमलांत आल्यापासून १५ वर्षांत दर माणशीं उत्पन्न दुपटीचें झालें पाहिजे, रहागीचें मान वाढलें पाहिजे, हें या आर्थिक नियोजनाचें मुख्य उद्दिष्ट; त्याप्रत जाण्याचे मार्ग व त्याकरितां लागणारी साधनसामुग्री या मूल-प्रश्नांचा विचार, एक वर्षापूर्वी प्रसिद्ध झालेल्या, पहिल्या खंडांत केलेला आहे.

राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी योग्य झाली नाहीं तर निव्वळ उत्पादन वाढविल्यानें दारिद्र्याचा प्रश्न सुटतो असें होत नाहीं; याची जाणीव योजनाकारांना असून त्यांनीं त्यांच्या मतानें विभागणी कशी केली असतां योग्य होईल, त्याकरितां आजच्या आर्थिक व्यवस्थेंत कोणते व कसे बदल करावे लागतील, मध्यवर्ती राष्ट्रीय सरकार असणें कां आवश्यक आहे, इत्यादि महत्त्वाचे प्रश्न दुसऱ्या भाग-पत्रकांत त्यांनीं चर्चिले आहेत.

खाजगी प्रयत्न व खाजगी मालकी यांवर आधारलेल्या आजच्या आर्थिक व्यवस्थेंत राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी जरी समाधानकारक झालेली नसली तरी इतर कित्येक दृष्टींनीं ही व्यवस्था योजनाकारांच्या मतें अंशतः यशस्वी झालेली आढळते. म्हणून त्यांची सूचना अशी कीं ही आर्थिक व्यवस्था उन्मूलित करूं नये. आपल्याला सुधारणा हवी आहे; आपल्याला शाश्वति, आणि शिस्तवार प्रगति हवी आहे.

### योजनेचे दोन हेतु व त्यांची सिद्धी

ही योजना "उत्पादनवृद्धीची" आहे. "उत्पादनवृद्धी"च्या पोटांत 'योग्य विभागणी'चा समावेश होतो. योजनेचे हेतु दोन आहेत. पहिला, सर्वसाधारण योग्य अशा रहाणीच्या मानांत रहातां येण्याकरितां लागणारें दर माणशीं किमान उत्पन्न मिळविणें; दुसरें, निरनिराळ्या व्यक्ती व वर्ग यांच्या उत्पन्नांतील फाजील विषमता टाळणें.

पहिला हेतु साध्य करावयाचा तर त्याकरितां (१) ज्यामुळें सार्वत्रिक उत्पन्न वाढेल अशी व्यवस्था केली पाहिजे, (२) जीवनाला नित्योपयोगी लागणाऱ्या वस्तू व शिक्षण, आरोग्य इ. वर होणारा वैयक्तिक खर्च कमी झाला पाहिजे.

भरपूर कामकाजाची व्यवस्था, कार्यक्षमतेंत वाढ, शहरी व खेडेगांवी वेतनांत सुधारणा; शेतीच्या मालाच्या किंमतींची स्थिरता, सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रांत वाढ, शेतसारा व जमिनींची मालकी याबाबत सुधारणा इत्यादि केल्यानें उत्पन्न वाढेल.

प्राथमिक, मध्यम व प्रौढ शिक्षण, औषधपाणी, वैद्यकीय तपासणी मोफत मिळण्याची व्यवस्था, वीज व वहातुकीचीं साधनें इत्यादि पुरेशीं व शक्य तितक्या कमी खर्चांत मिळाल्यानें रहाणीचा खर्च कमी होईल.

दुसरा हेतु साध्य करावयाचा तर त्याकरितां उत्पन्नावरील कर व वारसावरील कर बसविण्यांत यावेत. तसेंच, जमीनदारी पद्धति बदलून ती रयतवारी करावी. विशेषतः दैनंदिन उपयोगाकरितां लागणाऱ्या वस्तू बनविणाऱ्या लहान व खेडेगांवी उद्योगधंद्यांना शक्यतों वाव द्यावा, कंपन्यांचे शेअर्स शक्य तितक्या अधिक भागीदारांच्या हातांत जाण्यास उत्तेजन द्यावें; उद्योगधंद्यांची प्रादेशिक विभागणी असावी; सहकारी संस्थांत अधिक सुधारणा करण्यांत याव्यात, तसेंच सरकारी मालकीचे आद्य महत्त्वाचे उद्योगधंदे वगैरे सरकारनें चालविले असतां उत्पन्नांतील विषमता कमी होण्यास मदत होईल.

### राष्ट्रीय सरकार व त्याचें कडक नियंत्रण आवश्य

या सर्व योजना प्रत्यक्षांत उतरविण्यासाठी देशांतील प्रमुख राजकीय गटांचें प्रातिनिधिक मध्यवर्ती सरकार आवश्यक आहे. मध्यवर्ती सरकारनें नियंत्रण व एकसूत्रीपणा रहाण्याकरितां आवश्यक तेवढे अधिकार स्वतःकडे ठेऊन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रांतिक व स्थानिक सरकारकडे सोंपवावी. निरनिराळीं नियंत्रणें यशस्वी होण्याकरितां ज्यांत विशिष्ट शिक्षण घेऊन तयार झालेलीं अनुभवी माणसें असतील असें एक स्वतंत्र खातें सरकारला ठेवावें लागेल. तसेंच नियोजन यशस्वी होण्यास ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांचा एकत्र विचार केल्याविना प्रादेशिक उन्नति होणार नाहीं.

नियोजन म्हटलें म्हणजे त्यांत सरकारी हात नि नियंत्रण आलेंच. योजनाकारांच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली भांडवलशाही व सरकारला सर्वसत्ता देणारा समाजसत्तावाद यांतील तफावत कमी कमी होत असून त्यांच्या ह्या योजनेला दोन्हींचा समन्वय श्रेयस्कर होईल असें त्यांचें मत आहे.

योजना प्रत्यक्ष अंमलांत आणली जात असतांना व ती पुरी झाली असतां अशा दोन भूमिका सरकारच्या आहेत. पहिली भूमिका विशिष्ट कालापुरती असून त्यांत सरकारी नियंत्रण विशेष—आजच्या युद्धमान परिस्थितींत जितकें आहे तितकें—कडक राहील. या नियंत्रणाची व्याप्ति मुख्यतः (१) उत्पादन, (२) विभागणी, (३) उपभोग, (४) पैशाची गुंतवण, (५) परदेशी व्यापार नि हुंडणावळ आणि (६) वेतन व कामाची तरतूद ह्या क्षेत्रांपुरती आहे.

दुसरी भूमिका अधिक महत्त्वाची असून त्यांत आर्थिक व्यवहाराची (१) मालकी (२) नियंत्रण आणि (३) कारभार हीं सरकारी असावींत, त्याचें प्रमाण किती, कसें व कोठें असावें या प्रश्नांचा समावेश होतो.

आंखलेल्या योजना पुऱ्या झाल्या तर हळुहळू समाजांतील विषमता नाहींशी होईल व महत्त्वाच्या व्यापार-धंद्यांचें राष्ट्रीयकरण झालेलें दिसेल असें योजनाकारांचें जागतेपणचें स्वप्न आहे.

## घर भाडेकरू परिषदेची फलश्रुति

लेखक—श्री. ना. ह. ठाकूर, उपाध्यक्ष, पुणें घरभाडेकरू संघ.

पुणें घरभाडेकरू परिषदेचें पहिलें अधिवेशन रविवार ता. २१ जानेवारी रोजीं पुणें नगरपालिकेच्या सभागृहांत मुंबई भाडेकरू संघाचे अध्यक्ष ॲड. एस. सी. जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें पार पडलें. स्थानिक भाडेकरूंना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचें, तसेंच त्यांच्या अनेक तक्रारींची दाद लावण्याचें कार्य पुणें घरभाडेकरू संघानें वर्षभर कसोशीनें केलेलें आहे. या जागृतीचें फल म्हणजेच संघातर्फे साजरी झालेली भाडेकरू परिषद होय. पुणें भाडेकरू संघानें आतांपर्यंत शहराचे प्रमुख पेठांतून संघाच्या मासिक सभा घेतल्या, तसेंच निरनिराळ्या पेठांतून सभासद नोंदणीचें, त्याचप्रमाणें भाडेकरूंच्या प्रश्नांची चौकशी करण्याचें कार्य केलें व पांचशेंवर नागरिकांचें या कार्यांत प्रत्यक्ष सहकार्य मिळविलें. पण जाहीर सभांवरील सरकारी नियंत्रणामुळें जनताजनार्दनाच्या वेशीवर भाडेकरूंची गाऱ्हाणीं टांगणें यापूर्वी संघास अवघड झालें होतें. आतां परिषदेच्या निमित्तानें भाडेकरू चळवळीचें लोण सर्व समाजापर्यंत जाऊन पोहोंचलें आहे.

### एका वर्षांतील परिवर्तन

भाडेकरूंचा प्रश्न बहुसंख्य नागरिकांच्या जिव्हाळ्याचा असला तरी विषयाच्या रुक्षतेमुळें तसेंच 'मला काय त्याचें' अशा सर्वसामान्य वृत्तीमुळें या विषयास चालना देण्यास संघाच्या कार्यकारी मंडळास बरेंच श्रम करावे लागले. पण ते प्रयत्न सार्थकी लागले असें या बाबतींत एका वर्षाचे अवधींत घडलेल्या स्थित्यंतरावरून म्हणणें भाग पडेल. वर्षापूर्वी भाडेकरूंची अवस्था 'मुकीं बिचारीं कुणी हाका' अशा स्वरूपाची होती. मुंबई सरकारनें घरभाड्याचा कायदा त्यापूर्वीच करून तो पुण्यास जारी केला होता, पण सामान्य जनतेला त्याची दखलही नव्हती. बहुतेक घरमालकांनीं भाड्यासंबंधींचा कायदा 'स्टँडर्ड किंवा ठराविक' भाड्यांत भरमसाट वाढ करून धाब्यावर बसविलेला होता. रहावयाला जागाच नाहीं तर काय करावयाचें म्हणून भाडेकरूंचे 'अडले नारायण' मालकांच्या हव्या त्या मागण्या मान्य करून त्यांचे पाय धरत अशी स्थिति उत्पन्न झाल्याचें संघाच्या नजरेस आलें. कायदा बहुंशीं भाडेकरूंना अनुकूल असूनही कित्येक भाडेकरू साधारणतः अज्ञानानें, तर कधीं भांडणांना वैतागून मालकांच्या बेकायदेशीर मागण्यांना मान तुकवीत. राजकीय बाबतींत भारत संरक्षण नियमांची हवी तशी ओढाताण करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांतहि भाडेकरूंच्या बाबतींत त्यांना मिळालेल्या अधिकारांची जाणीव दिसली नाहीं. संघानें प्रथम या बाबतींत पुढाकार घेऊन अधिकाऱ्यांना कायद्यानें मिळालेल्या दंडुक्याचा भाडेकरूंवरील अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठी उपयोग करण्यास शिकवलें असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. भाडेकरूंच्या विनंति-तक्रारींना न बधणारे घरमालक कांहीं टेस्ट केसेस होतांच खडबडून जागे झाले व त्यांचेकडून बेकायदेशीर होणाऱ्या कृत्यांना आपोआपच आळा पडूं लागला. संघाकडे घरभाड्यासंबंधीं जी माहिती सभासदांनीं पाठविली आहे त्यावरून असें दिसून येतें कीं कित्येक घरमालकांनीं प्रमाणित भाड्यावर शेंकडा २५ ते ५० टक्के अन्याय्य वाढ केलेली आहे. भाडेकरू 'आंधळा दळतो व कुत्रें पीठ खातें' अशा तऱ्हेनें वागल्यामुळें मालकांना पूर्वी चांगलेंच फावलें, पण संघाच्या खटपटीमुळें भाडेकरूंचे डोळे उघडले व मालकांना बेकायदा केलेली भाडेवाढ पचविणें अवघड होऊं लागलें. संघानें या विषयावर वेळोवेळ ठराव करून जे प्रकार बाहेर आणले त्यामुळें भाडेकरू व घरमालक यांना त्यांचेवरील जबाबदारीचें यथार्थ ज्ञान होण्यास पुष्कळच मदत झाली. भाडेकरू संघाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. गाडगीळ वकील यांनीं 'भाडेकरू व घरमालक' हें पुस्तक प्रसिद्ध करून विधायक मार्गानें पुण्यांतील जनतेसाठी या प्रश्नावर लखलखित प्रकाश पाडला. त्याचा परिणाम इष्ट असाच झाला. संघाच्या वर्षाच्या कार्यानें भाडेकरू परिषदेस योग्य अशी पार्श्वभूमि निर्माण केली होती त्यामुळें परिषद यशस्वी होण्यास विशेष मदत झाली.

### ॲड. जोशी यांचें प्रशंसनीय नेतृत्व

मुंबई-पुण्यासारख्या शहरांतून भाडेकरूंचे होणारे हाल परिषदेचे अध्यक्ष ॲड. जोशी यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें. शंभर चौ. फूट जागेंत २·५ इसमांपेक्षा अधिक माणसांना ठेवण्यास तुरुंगांतील नियमाप्रमाणें बंदी आहे. पण मुंबईसारख्या शहरांतून माणसांना यापेक्षा पुष्कळच कमी जागा मिळत आहे हें श्री. जोशी यांचें मत परिस्थितीची गंभीर कल्पना आणून देण्यास पुरेसें आहे. शहरांतील बालमृत्यूंचे उद्बोधक आकडे श्री. जोशी यांनीं आपल्या भाषणाच्या परिशिष्टांत जे मांडले आहेत त्यावरून शहरांच्या वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम कसे भोगावे लागतात याची कल्पना येईल. प्रचलित घरभाडेकरू कायद्यांत दुरुस्त्या सुचविणारा ठराव करण्यास श्री. जोशी यांच्या नेतृत्वाचा परिषदेस चांगलाच फायदा झाला. घरमालकास भाड्याची पावती देण्यास सक्ती करावी, पावतींत 'स्टँडर्ड' भाडें कोणत्या कलमाप्रमाणें आकारण्यांत आलें याचा स्पष्ट निर्देश असावा, पावतीवर इतर कोणत्याहि अटी मालकानें छापूं नयेत इ. ज्या शिफारशी भाडेकरू परिषदेनें सुचविल्या आहेत त्या न्यायाच्या ठरतील. ठराविक भाड्याखेरीज इतर कोणतीही रकम मालक घेईल तर तो दंड वा तुरुंग अशा शिक्षेस पात्र होईल अशीहि दुरुस्ती सुचविली आहे. तसेंच वीज, नळ वगैरे जीवनास आवश्यक सोयी मालकानें तोडल्यास तो गुन्हा समजला जावा असेंहि परिषदेनें सुचविलें आहे. युद्धानंतर भाडेकरू कायद्यास योग्य त्या दुरुस्त्यासह कायम स्वरूप दिलें जावें म्हणून परिषदेनें जो ठराव केला तो निःसंशय दूरदृष्टीचा आहे.

### पुणें नगरपालिकेसाठी शिफारशी

या परिषदेंत प्रस्तुत लेखकानें पुणें नगरपालिकेला भाडेकरूंच्या अडचणी व सोयी यांकडे जागरूकतेनें लक्ष द्यावें अशी विनंती करणारा ठराव आणला होता त्यावरील चर्चा उद्बोधक झाली. शहराच्या दृष्टीनें घरांची वर्षांतून एकदां तरी रंगसफेती करण्यास मालकांना सक्ती करावी अशी या ठरावांत मागणी करण्यांत आली आहे. याखेरीज अपुरा पाणीपुरवठा, व कांहीं भागांत पाण्याचा दाब नसल्यामुळें होणारे हाल याकडेहि नगरपालिकेचें लक्ष वेधण्यांत आलें. पुणें नगरपालिका या ठरावाकडे काळजीपूर्वक लक्ष देईल अशी आशा वाटते.

एकंदरीत भाडेकरू परिषदेनें संघटित रीत्या शहरांतील भाडेकरूंच्या मागण्या मांडून मोठीच कामगिरी केली असून तिकडे सरकार आणि नगरपालिका यांनीं तांतडीनें लक्ष देणें अगत्याचें आहे. भाडेकरूंचे नागर जीवन सुसह्य करावें यासाठी या मागण्या आहेत, घरमालकांना त्रास देण्यासाठी नव्हेत हें मालकांहि उमगतील तर ते भाडेकरूपरिषदेचे ठरावाशीं सहमत होतील. पण अशी अपेक्षा करणें मानवी स्वभावाला धरून होईल काय ?

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसी

सा. न. वि. वि.

मि. विंडेल विल्की यांची 'एक जग' ही कल्पना मोठी आकर्षक वाटते. वहातुकीचीं साधनें अधिकाधिक वेगवान् होत असल्यानें दोन स्थळांतील अंतर जरी प्रत्यक्ष नाहीं तरी वेळेच्या दृष्टीनें झपाट्यानें कमी होत आहे. तसेंच वैचारिक भूमिकेंतील फरकहि नाहींसा होत आहे. हिंदुस्थानांत इंग्लंडांतून कापड नि यंत्रें येतात; अमेरिकेंतून कागद नि मोटारी येतात; जर्मनींतून रंग नि मौलिक रसायनें येतात; जपानांतून हे सारेच पदार्थ कमाल स्वस्ताईत येतात. आम्हीं स्वतः ते कां तयार करूं नयेत? आपल्याच मंडळींना रोजगार कां पुरवूं नये? इतरांहून आम्हीं कोठें नि किती कमी आहोंत? समतेची नि आत्मविश्वासाची ही जाणीव किती मनोहारी आहे!

स्वसामर्थ्याची जाणीव खरी; पण तीं स्वप्नें प्रत्यक्षांत उतरावयाचीं तर वस्तुस्थितीचें यथार्थ अवलोकन नको कां व्हावयाला? नुकतीच अमेरिकेंत अटलांटिक सिटी येथें आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद् झाली. कलकत्याचे सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे श्री. गगनविहारी मेहता हे परिषदेला गेलेल्या हिंदी प्रतिनिधींचे उपाध्यक्ष होते. हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें कीं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या पुढील युद्धोत्तरच्या कपाळशूळ उठवणाऱ्या अनेक प्रश्नांपैकीं सहा कोट बेकारांना नोकऱ्या पुरवणें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्धजन्य उत्पादन शांतता उत्पादनावर नेणें व त्याचा उठाव करण्याकरितां बाजारपेठा वाढविणें ह्या प्रश्नांचा अमेरिकन सरकार, उद्योगपती, व्यापारी संस्था नि अर्थशास्त्रज्ञ हिरीरीनें विचार करीत आहेत. अमाप पैसा नि माल हातीं असल्यानें आंतरराष्ट्रीय व्यापार अनिर्बंध असावा असे विचाराचे वारे वहात आहेत. परकी सत्तेखालीं जगण्याकरितां धडपडणारे लहान-मोठे हिंदी धंदे या झंझावातापुढें टिकतील का?

भविष्यकाळांत हिंदुस्थानाच्या राजकीय दर्जावर त्याचे परराष्ट्रीय व्यापार-संबंध व आर्थिक परिस्थिति अवलंबून राहील असा निर्वाळा श्री. मेहता यांनीं दिला आहे.

लंडनमध्यें स्टर्लिंग शिलका पडून आहेत. त्याबद्दल आपल्याकडे बरीच चर्चा झाली-होत आहे. अमेरिकेंतून यंत्रें वगैरे आणण्याचे विचारहि पुष्कळ बोलले जात आहेत. ह्या खरेदीकरितां हिंदुस्थानाला अमेरिका उधार माल-कर्ज देईल का? या प्रश्नाबाबत सध्या अमेरिकेंत असलेले ईस्टर्न इकॉनमिस्टचे संपादक, डॉ. लोकनाथन् यांनीं दिलेली माहिती, उद्‌बोधक आहे.

ऋणको राष्ट्रांतील राजकीय वातावरण प्रक्षुब्ध असणार नाहीं आणि अमेरिकन निर्मितींत येणाऱ्या वस्तूंशीं स्पर्धा करणार नाहीं अशा वस्तूंच्या उत्पादनासाठी फक्त दिलेल्या कर्जाचा उपयोग केला जाईल अशी ऋणको राष्ट्रांनीं खात्री दिल्यानंतर कर्ज देण्याचा प्रश्न विचारांत घेतला जाईल असें अमेरिकन सरकारी अधिकाऱ्यांचें मत असल्याचें डॉ. लोकनाथन् यांना दिसून आलें. राजकीय कारणाकरितां कर्ज देण्याची अमेरिकन सरकारची विचारसरणी असल्याचेंहि त्यांनीं स्पष्ट केलें आहे.

'मुंबई योजने'च्या लेखकांपैकीं एक नि हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर वाढ आणि नियोजन खात्याचे प्रमुख सर अर्देशिर दलाल यांनीं इंग्लंड-अमेरिकेकडून भांडवली स्वरूपाच्या साहित्य-सामग्री खरीदण्याबाबत पुढील शब्दांत विचार मांडले आहेत.

"यंत्र-सामग्रीकरितां इंग्लंड-अमेरिकेच्या दाराशीं प्रत्येक राष्ट्र आज ठोठावीत आहे. हिंदुस्थाननें यावेळीं उताळ्या-पाताळ्या काढूं नये. उद्योगपतींनीं वेळींच विचार करावा. नको असलेली यंत्र सामग्री त्यांच्यावर कोणीच लादणार नाहीं."

युद्धोत्तर 'एक जग' होण्याला आवश्यक तें वातावरण निर्माण करण्याला डॉ. लोकनाथन् यांनीं सुचविलेला मार्ग मला योग्य वाटतो. ते म्हणतात, "हिंदुस्थानांतील आर्थिक नि राजकीय परिस्थितीची अमेरिकेंतील व्यापारी नि सरकार यांना माहिती करून देण्यासाठीं आणि त्याचे अमेरिकेंत काय काय प्रतिध्वनि उठतात हें हिंदुस्थानला कळविण्यासाठीं हिंदी तज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ अमेरिकेंत पाठवावेत." —संजय.

---

### स्टँप ड्यूटीवरील सरचार्ज कमी झाला

१९४३ च्या बाँबे इनक्रीज ऑफ स्टँप ड्यूटीज ॲक्टाच्या परिशिष्टान्वयें कांहीं बाबतींत स्टँप ड्यूटी वाढविण्यांत आली. बिल्स ऑफ एक्सचेंज, चेक, प्रॉमिसरी नोटा, बिल्स ऑफ लेडिंग, लेटर्स ऑफ क्रेडिट विमा पॉलिसी, प्रॉक्झी व पावत्या ह्यांवरील स्टँप ड्यूटींत मात्र फरक करण्यांत आला नाहीं. वरील शेड्यूलमध्यें सांगितलेला सरचार्ज मूळ १८९९ च्या कायद्यांतील ड्यूटीचे मानानें कांहीं ठिकाणीं फारच जास्त आहे असें आढळून आल्यावरून एक नवें परिशिष्ट जुन्याचे जागीं घालण्यांत आलें आहे. त्याचा परिणाम असा आहे, कीं सरचार्जचे दर नव्या परिशिष्टाप्रमाणेंच आकारण्यांत येतील.

सरचार्जचे नवे दर

| स्टँप ड्यूटी | सर चार्जचा दर |
|---|---|
| (१) एक आणा किंवा त्याखालील रुपयाचा भाग | ½ आणा |
| (२) १ आण्यापेक्षा ज्यास्त, २ आण्यांपर्यंत | १ आणा |
| (३) २ आण्यांपेक्षा ज्यास्त, ४ आण्यांपर्यंत | २ आणे |
| (४) ४ आण्यांपेक्षा ज्यास्त, ८ आण्यांपर्यंत | ४ आणे |
| (५) ८ आण्यांपेक्षा ज्यास्त | ६ आणे |
| (६) सबंद रुपया | ८ आणे |

---

### कॅलेंडरें

किराणा व सुका मेवा ह्यांचे व्यापारी वृ. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें, ह्यांचें इंग्रजी ठळक तारखांचें कॅलेंडर मोठ्या परंतु सुटसुटीत आकाराचें आहे. रिकाम्या जागीं इंग्रजी सोपीं सुभाषितें दिलीं आहेत. प्रत्येक महिन्यास स्वतंत्र पृष्ठ आहे.

दत्तात्रेयाच्या रंगीत चित्रानें व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि., मसालेवाले, मुंबई, ह्यांचें कॅलेंडर विभूषित झालें आहे. चित्राचे दोन्ही बाजूंस उभ्या महिनावार इंग्रजी तारखा आहेत.

पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचें कॅलेंडर नेहमीप्रमाणें उपयुक्त असून, पंचांगाचीहि सामान्य गरज तें भागवूं शकतें. संस्थेची आठवण सतत करून देण्याचें कार्य त्यामुळें चांगलें होतें.

## सहकारी संस्था म्हणजे माणुसकी व व्यवहार ह्यांचा समन्वय

( लेखक:—श्री. एस. एन. लाठोरे )

भाई माधवराव बागल यांचा तारीख ७-११-४४ च्या ' अखंड भारत ' वृत्तपत्रांत रशियांतील सहकारी संस्था व हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांचें धोरण यांत तफावत आहे याबाबत जो लेख प्रसिद्ध झाला आहे त्यांत त्यांनीं जे विचार मांडले ते वाचावयास मिळाले. ते म्हणतात—" हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांचा कारभार पाहातां पत असणाऱ्यालाच पैसा मिळूं शकतो, पण पत म्हणजे केवळ स्वभावाचा चांगुलपणा, इमानिपणा असें इकडे समजलें जात नाहीं; तर त्याची इस्टेट किती, तो पैसा फेडेल कीं नाहीं याचा विचार करून येथील सहकारी संस्था पैसे देत असतात. म्हणजे या संस्था छोट्या छोट्या भांडवलवाल्यांचा एक सहकारी गट असतो एवढेंच.

" खरोखरच ज्याला गरज आहे, ज्याचें पैशावांचून अगदी नडल आहे, ज्यांना घरदार, जमीन, नोकरी व कसलाही आधार नाहीं अशांना म्हणजे खऱ्या गरजवंतांना या इकडील सहकारी संस्था मदत करूं शकत नाहींत. त्यांना सहकारी संस्थांच्या दुकानांतून निव्वळ आंगच्या पतीवर माल मिळूं शकत नाहीं. "

सहकारी चळवळीचा उगम दारिद्र्यांतून झालेला आहे. आपलें दुःख, आपल्या अडचणी, आपल्या गरजा भागवावयाच्या असतील, आपली सुधारणा करावयाची असेल तर ती आपणच केली पाहिजे. हें समजून व " सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील त्याचें, परंतु तेथें संघटनेचें अधिष्ठान पाहिजे " ह्याप्रमाणें संघटणेनें एकत्र येऊन ही चळवळ इंग्लंड, जर्मनी, आयर्लंड, डेन्मार्क, रशिया, येथें प्रथम जनतेनें सुरू केली व संघटनेच्या द्वारें आपली परिस्थिति सुधारतां येऊन आपली सर्वांगीण उन्नती करतां येते हें सिद्ध केलें.

त्यावरून याच तत्त्वावर ही चळवळ इकडे सुरू केली तर जनतेची परिस्थिति सुधारेल म्हणून ती सरकारनें सुरू केली. कोणत्याहि संस्थेंत तत्त्वें हीं चांगलीं असतातच परंतु तेवढ्यावर भागत नसून त्याला कार्यकर्त्यांची व व्यवहाराची जोड असावी लागते. माझ्या मतें तर सहकारी चळवळ ही लोकशाही स्वराज्याचा पाया आहे. परंतु तीं तत्त्वें ज्या प्रमाणांत जनतेस पटतील त्या प्रमाणांतच चळवळीचा विकास अवलंबून आहे. एकमेकांनीं आपलेपणानें, समतेच्या नात्यानें एकत्र येऊन आपली संघटना करून आपली सर्वांगीण उन्नति करणें हें सहकारी चळवळीचें कार्य आहे. परंतु हें कार्य व हें ध्येय गाठतांना सहकारी चळवळीचा, प्रामाणिकपणा व दानत हा जो प्राण आहे, हें ध्येयनिष्ठ तत्त्व जोंपर्यंत चळवळींतील बहुजनसमाजाच्या अंगीं बाणणार नाहीं तोंपर्यंत ध्येय चांगलें असून चळवळीची उन्नति होणार नाहीं व हें सर्व साध्य होण्यास शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. ज्या बहुजन समाजाकरितां ही चळवळ आहे, त्या जनतेकरितां चळवळीचें उपयुक्ततेचें, मार्गदर्शनाचें व माहितीचें वाङ्मय जास्तींत जास्त निर्माण करून त्या द्वारें त्यांना चळवळीची माहिती असणें अत्यंत जरूरीचें आहे. अशा तऱ्हेचें मातृभाषेंतील वाङ्मयही आपल्याकडे तितकेसें निर्माण झालें नाहीं. शिवाय इतर देशांशीं शिक्षणासंबंधीं आपल्या भारत देशाची आज तुलना केली तर इतर ठिकाणीं शेंकडा ५ टक्के निरक्षर नसतील तर आपल्या देशांत १० टक्के पेक्षां जास्त साक्षर आढळणार नाहींत. केवढें हें अंतर आहे बरें ! शिक्षणाच्या दृष्टीनें जो देश पुढें गेला तो सुधारणेच्या दृष्टीनेंही पुढें पाऊल टाकणारच हें उघड आहे.

सहकारी चळवळींत भांडवलापेक्षां माणुसकी, प्रामाणिकपणा-विश्वास व दानत यालाच महत्त्व आहे. कारण भांडवल हें माणुसकी निर्माण करूं शकत नाहीं, तर वरील सद्गुणांच्या द्वारें भांडवल निर्माण होऊं शकतें. रशिया व आपल्या देशांत या चळवळीला भांडवल मिळण्याचें कार्य पाहिलें तर रशियांत ही जबाबदारी सरकारनें स्वतःवर घेतलेली आहे तर आपल्या देशांत बहुजन समाजानें आपलें भांडवल एकत्र करून तें या चळवळीस पुरविण्याचें कार्य, शहरांतील सहकारी बँका करीत आहेत. ज्या बहुजन समाजानें आपलें भांडवल ज्या संस्थेंत सुरक्षिततेकरितां ठेवलें असेल त्याची जबाबदारी घेऊन त्याचा विनियोग या चळवळीस करतां यावा अशी दुहेरी जबाबदारी या संस्थांवर पडत असल्यामुळें, देण्यांत येणारा पैसा हा वसूल झालाच पाहिजे ही खबरदारी घेणें अत्यंत जरूर आहे.

या देशांत प्रथम सभासदांची मिळकत लक्षांत न घेतां त्यांच्या पतीवर कर्ज देण्यांत येई; परंतु असें कर्ज आपल्या चांगुलपणावर, आपल्या माणुसकीवर, दानतीवर, विश्वासावर दिलें आहे; हा जनतेचा पैसा आहे व तो सुरक्षित ठेवून तो परत करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे हें तत्त्व सहकारी चळवळींतील बहुजन समाज विसरला व त्यामुळें वसुलीस कांहीं साधन न राहिल्यामुळें बऱ्याच संस्था बुडाल्या व त्याचा परिणाम चळवळीस भोगावा लागला.

समान गरजा असणारे लोक एकत्र येऊन, आपल्या गरजा, एकमेकांच्या पतीवर भागवूं शकतील. अर्थात् एकमेकांनीं एकमेकांचा विश्वास संपादन केलाच पाहिजे. अशा एकत्र येणाऱ्यांच्या पतीचा उपयोग गरीब माणसांस करून घेतां येईल. ज्यानें आपली थोडी पत, थोडा विश्वास निर्माण केला, त्याला ही चळवळ आधार देऊं शकेल, हातभार लावूं शकेल, मदत करूं शकेल. अगदींच निराश्रित माणसाला—ज्याला कसलाही आधार नाहीं, कर्ज परत फेडीन अशी उमेद नाहीं अशाला या चळवळीचे द्वारें आपली सुधारणा करतां येणार नाहीं. हें कार्य भूतदयेनें प्रेरित झालेल्या संस्था अगर लोकप्रिय सरकारच करूं शकेल. मिळकतीवर जर व्यक्तीची पत अजमावयाची असेल तर सावकार व सहकारी संस्थांत काय फरक आहे, हा भाई बागल यांचा दृष्टिकोन बरोबर आहे; व हें कार्य शिक्षण, आपल्यावरील जबाबदारी ओळखून करणें अत्यंत जरूर आहे. त्या दृष्टीनें शेतकी सोसायट्यांत स्थावर मिळकत गहाण घेऊन पैसे देण्यामुळें, अगर मिळकत पाहून पैशाचा व्यवहार होत असल्यामुळें सभासदांत आपोआपच एकमेकांबद्दल प्रेम व जिव्हाळा न राहातां जे पैसे दिले ते आम्हांस पाहून दिले नसून आमच्या मिळकतीवर दिले आहेत असें वाटेल तर त्यांत माणुसकीला वावच राहात नाहीं व म्हणून मध्यंतरीं मे. भनसाळी साहेब व मे. वैकुंठराय मेहता यांनीं या चळवळींतील खेडगावांच्या पतपेढ्यांची चौकशी करून पोटनियमांतच कर्जे जामिनकीवर द्यावींत व वाटल्यास जादा तारण घ्यावें अशी दुरुस्ती केली. उद्देश हाच कीं, माणुसकी व दानत यापेक्षा मिळकतीला जास्त महत्त्व असूं नये. हें करतांना मात्र ध्येय व व्यवहार या दोन्ही बाबींकडे लक्ष देणें जरूर आहे व म्हणून आपल्या देशांत ही प्रगती हळूहळूच झाली आहे. यास शिक्षणाची सांगड देणें व चळवळीचें वाङ्मय निर्माण करणें जरूर आहे.

## महाळुंग, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर

### सहकारी संस्थेमार्फत झालेली ग्रामीण सुधारणा

ता. १९।१२।४४ रोजीं सायंकाळीं ९ वाजतां मामलेदार मि. शेख यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. आरंभीं मि. अवचट सुपरवायझर हे म्हणाले, "आपले गांवची संस्था सतत "अ" वर्गांत असून तिनें लोकांचीं आर्थिक स्थिति सुधारणेबाबत जें कार्य केलें तें प्रसंशनीय आहे. तसेच हल्लीं आपण ग्रामीण सुधारणेबाबत कार्य मोठ्या उत्सुकतेनें करून गांवांतील सर्व रस्ते साफ केलेत, शिक्षणाचे बाबतींत मुलांची संख्या वाढवीत आहांत, गांवाच्या कडेचे रस्ते, कॅनाल भाग असल्यामुळें अत्यंत दलदलीचे होते. हे रस्ते आपण मुरूम टाकून व पाण्याचा निचरा होणेस चर काढून दिलेत. हें आपल्या एकीनें झालें तशीच एकी आपण प्रत्येक सार्वजनिक कामांत करीत गेल्यास आपलें खेडें लौकरच एक नमुनेदार बनेल. याची मला खात्री वाटते."

गांवचे लोकांस धान्य आणणेस अकलुज येथें ७ मैल लांब जावें लागत असे म्हणून सो.नें याबाबत मे. मामलेदार यांना ह्या अडचणी पटवून दिल्यामुळें त्यांनीं गांवास धान्य वाटणीचें सेंटर मिळवून दिलें.

त्यानंतर मि. पाटील रू. डे. इन्स्पेक्टर यांनीं अधिक धान्य पिकविणे बाबत भाषण करून त्याचें महत्त्व व हल्लींच्या काळांत त्याची किती जरूरी आहे हें पटवून दिलें.

त्यानंतर मि. शेख मामलेदार यांचें भाषण झालें. त्यांनीं गांवांत एकीनें सहकारी सोसायटी "अ" वर्गांत असलेबद्दल आनंद व्यक्त केला. "दुसऱ्यावर अवलंबून न राहातां आपण आपलीं कामें एकीनें करीत आहांत आणि कोणाच्याही आर्थिक मदतीची अपेक्षा न करतां हीं कामें करीत आहांत याबद्दल मला हार्दिक आनंद वाटतो" असें ते म्हणाले.

### माळशिरस ता. का. सु. युनिअन

माळशिरस तालुका सोसायट्यांचे सेक्रेटरींना सरकारी गोडाऊन कीपर यांना कंट्रोल जिनसांचे जमाखर्च कसे ठेवावेत, शिकविण्याचा ट्रेनिंग क्लास ता. ७ ते ९ जानेवारी १९४५ अखेर भरविण्यांत आला होता. क्लासचें उद्घाटन मि. शेख (मामलेदार) यांनीं केलें. त्या वेळीं ९ सोसायट्यांचे निवडक सेक्रेटरी व ७ गोडाऊन कीपर हजर होते. आरंभीं मि. अवचट सुपरवायझर यांनीं क्लासचें महत्त्व समजावून सांगितलें त्यानंतर नानासाहेब प्रेसिडेंट यांनीं या क्लासला शिक्षण देण्यांत मुलकी अधिकारी आमचे विनंतीस मान देऊन भाग घेत आहेत हें विशद करून सांगितलें. उत्तरादाखल मे. मामलेदारसाहेब यांनीं भाषण करतांना व्यक्तिशः व्यापाऱ्याकडे कंट्रोल जिनस वांटणी करण्याचे कामापेक्षा सहकारी संस्थांना हें काम मिळालें तर शेतकऱ्यांच्या पैशाचा मोबदला त्यांनीं ग्रामीण सुधारणा करण्याकरितां कसा होईल हें सांगितलें. हल्लीं माळशिरस तालुक्यांत धान्यवांटणी, साखर वाटणी, हीं कामें सहकारी संस्थेकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सोंपविलीं आहेत त्यामुळें संस्थेच्या सेक्रेटरींना पद्धशीर जमाखर्च ठेवतां यावेत याची माहिती जरूर असल्यानें हा क्लास ठेवण्यांत आला. यावेळीं मीं तालुक्यांतील नवीन गोडाउन कीपर यांना माहिती घेण्यांस बोलाविलें आहे असें ते म्हणाले.

सदर क्लासला १६ लोक ३ दिवस शिक्षण घेत होते. मे. मामलेदार सो, मे. कुलकर्णी डि. सुपरवायझर, मि. अवचट सुपरवायझर, मि. देशपांडे, क्लार्क मामलेदार कचेरी, मि. जोशी व मि. माने फेअर प्राईस शाप म्यानेजर अकलूज यांनीं ३ दिवस सतत माहिती दिली.

## "रॉकडेल पायोनिअर्स" शतसांवत्सरिक उत्सव, जळगांव

पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग युनियन्स लि. जळगांवच्या एज्युकेशनकमिटीनें "रॉकडेल पायोनिअर्स" शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांची सभा जळगांव येथें पू. खा. सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँकेच्या मिटींग हॉलमध्यें ता. २१-१२-१९४४ रोजीं दुपारीं ५ वाजतां मे. रघुनाथराव ऊर्फ अप्पासाहेब पाटील, प्रेसिडेन्ट जिल्हा लोकलबोर्ड पू. खा. यांचे अध्यक्षतेखालीं भरवून उत्सव साजरा केला. एज्युकेशन कमिटीचे चेअरमन मे. मीरसाहेब यांनीं "रॉकडेल पायोनिअर्स" बाबत संपूर्ण अशी माहिती करून दिली. त्यानंतर अध्यक्षांनीं आपल्या समारोपीय भाषणांत आपल्याकडे सहकारी चळवळ पाहिजे तितकी यशस्वी न होण्याचीं कारणें सांगतांना ती इकडे लोकांच्या स्वयंस्फूर्तीनें निर्माण झालेली नसून सरकारनें सावकार व कर्जदार शेतकरी यांच्यांतील भांडणतंटे शमविण्यासाठी सुरू करण्यांत आली आहे. शिवाय सहकार्याला पोषक असें शिक्षणही दिलें जात नाहीं. सहकारी चळवळ यशस्वी करून दाखवावयाची असेल तर स्वतःचे पायावर उभे राहाण्यास लावणारें शिक्षण लोकांना दिलें पाहिजे. प्राथमिक शाळांमधून सहकारी शिक्षण सुरू करावयास पाहिजे. खेडोपाडीं कन्झुमर्स स्टोअर्स व सोसायट्या निघावयास पाहिजेत इत्यादि गोष्टी सांगून त्यांनीं आपलें भाषण आटोपलें.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स**
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
**पूना गेस्ट हाऊस**
टेलिफोन नं. ७७१

## —राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

## —गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

**साठे बंधू, "गोल्डन कोको"**

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

## मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट*

## पेन्टर बेडेकर, ए. जी.,

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार, अगर पोस्टानें पाठवूं.


### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)
स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ — तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,००,००० |
| काढलेलें भांडवल | रु. १२,२५,००० |
| भरलेलें भांडवल | रु. १२,११,५०० |

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७३ लक्ष

**शाखा व उपशाखा**

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | २३ नाशिक (जि. नाशिक) |
| २ नीरा " | २४ लासलगांव " |
| ३ सातारा (जि. सातारा) | २५ मालेगांव " |
| ४ कऱ्हाड " | २६ नांदगांव " |
| ५ किर्लोस्करवाडी " | २७ घोटी " |
| ६ कोरेगांव " | २८ सटाणा " |
| ७ इस्लामपूर " | २९ येवलें " |
| ८ शिराळें " | ३० धुळें (जि. पश्चिम खानदेश) |
| ९ तासगांव " | ३१ दोंडाईचें " |
| १० वाई " | ३२ नंदुरबार " |
| ११ भिवंडी (जि. ठाणें) | ३३ साक्री " |
| १२ कल्याण " | ३४ शहादें " |
| १३ पालघर " | ३५ शिरपूर " |
| १४ अकलूज (जि. सोलापूर) | ३६ शिंदखेडें " |
| १५ अहमदनगर (" अहमदनगर) | ३७ तळोदें " |
| १६ बेलापूर रोड " | ३८ दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १७ कोपरगांव " | ३९ गोध्रा " |
| १८ पाथर्डी " | ४० झालोद " |
| १९ राहुरी " | ४१ पनवेल (जि. कुलाबा) |
| २० शेवगांव " | ४२ नडियाद (जि. खेडा) |
| २१ वांबोरी " | ४३ आनंद " |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ७ फेब्रुवारी, १९४५ अंक ६

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
**पहिले व फक्त १ च**
*गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट*
## पेन्टर बेडेकर, ए. जी.,
**बुधवार चौक, पुणें २ (सिटी)**
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,७४,८५,५५० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ¼% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

## दि मागोरा केमिकल कं. लि.,
**पुणें २.**

अपेक्षेप्रमाणें 'डिपॉझिटस्' आल्यामुळें ता. १५-१-४५ पासून आम्हीं डिपॉझिटस् घेण्याचें बंद केलें आहे.

या बाबतींत जनतेनें दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोंत.

पुणें, ता. १५-१-४५.

रा. य. रानडे,
मॅनेजिंग एजंटस्.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( शेड्यूल्ड बँक )

**हेड ऑफिस : पुणें शहर**

**विक्रीस काढलेलें नवीन दहा लाखांचें भांडवल सर्व विकलें गेलें आहे.**

**— भांडवल —**

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ७,५७,३८० |

खेळतें भांडवल रु. १,००,००,००० चे वर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

**डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## विविध माहिती

### पोलिसांसाठी खास आहार

ठाणें येथें पोलिस लाइन्समध्यें एक कँटीन उघडून त्यांत सुमारें ५० अविवाहित पोलीस लोकांस चांगला आहार देण्यांत येतो. त्याचा पोलिसांवर होणारा परिणाम पहाण्यांत येत आहे. आहारांत आवश्यक असलेलीं सर्व द्रव्यें त्यांच्या अन्नांत आहेत, ह्याबद्दल विशेष दक्षता घेण्यांत येते. ह्या प्रयोगाप्रमाणें इतर सरकारी नोकरांसाठीहि व्यवस्था करण्याचा सरकारचा विचार आहे.

### जज्जांचीं नवीं नांवें

बॉंबे सिव्हिल कोर्टस ॲक्ट दुरुस्त करून, जज्जांचीं नांवें खालीलप्रमाणें बदलण्यांत येणार आहेत:—

| हल्लींचें नांव | नवें नांव |
|---|---|
| १ सबॉर्डिनेट जज्ज | सिव्हिल जज्ज |
| २ जॉइंट सबॉर्डिनेट जज्ज | जॉइंट सिव्हिल जज्ज |
| ३ फर्स्टक्लास स. जज्ज | सि. जज्ज ( सीनिअर डिव्हि. ) |
| ४ सेकंडक्लास स. जज्ज | सि. जज्ज (ज्युनिअर डिव्हि. ) |

### चीन–अमेरिका रेडिओ फोन

चीन व अमेरिका ह्यांचेमध्यें रेडिओ–टेलिफोनचें दळणवळण लवकरच सुरू होणार आहे.

### असेंब्लीच्या समासदांच्या भत्त्यांत वाढ ?

मध्यवर्ती असेंब्लीच्या सभासदांस हल्लीं रोजचा भत्ता ३० रुपये आहे, तो सध्यांची आर्थिक अडचणींची परिस्थिति लक्षांत घेऊन वाढविण्यांत यावा, असा ठराव असेंब्लींत मांडण्यांत येणार आहे.

### हिंदुस्थानाबद्दल आस्था

हिंदुस्थानांतील दुष्काळ निवारण कार्यासाठीं १९४५–४६ करितां अमेरिकेंतील चर्चेसनीं ५०,००० डॉलर मंजूर केले आहेत.

### मोटवाणे रेडिओ मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

रेडिओ व तत्सम माल तयार करण्यासाठीं वरील कंपनी स्थापन झाली आहे, तिचे सर चुनीलाल बी. मेहता हे अध्यक्ष, श्री. व्ही. जी. मोटवाणे हे उपाध्यक्ष व श्री. एन. जी. मोटवाणे हे मॅ. डायरेक्टर आहेत. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील चांगल्या रेडिओंची पेटंट्स व लायसेन्स मिळवून नंतर त्यांचें उत्पादन येथें सुरू होईल. त्यासंबंधीं बोलणीं करण्यासाठीं श्री. व्ही. जी. मोटवाणे हे परदेशीं लवकरच जातील.

### कराची येथें ब्रॉडकास्टिंग स्टेशन

युद्धसमाप्तीनंतर लवकरच कराची येथें नभोवाणीचें केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे.

### ग्रामोफोनच्या तबकड्यांच्या नियंत्रित किंमती

• हिज मास्टर्स व्हॉइस, कोलंबिया इत्यादींच्या इंग्रजी तबकड्यांची नियंत्रित किंमत १ रु. ८ आणे व देशी भाषांतील तबकड्यांची नियंत्रित किंमत २ रु. आहे. ट्विन, रीगल, रीगल झोन, रेक्स, ओरिअंट, इत्यादींच्या तबकड्यांची नियंत्रित किंमत १ रु. १० आ. आहे. एक इंचाखालील मेन स्प्रिंग ६ रुपयांस मिळाली पाहिजे.

### नवी फिल्म कंपनी

एक कोटि रुपये अधिकृत भांडवलाची व ४० लक्ष रुपये वसूल भांडवलाची एक सिनेमा कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम. लिमये, आणि कं. पुणें ४ ह्यांजकडून )

| कंपनीचें नांव | मूळ भरलेले रु. | दि. २।२।४५ चे बंद भाव | १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज | व्याज केव्हां मिळतें |
|---|---|---|---|---|---|
| टाटा डिफर्ड ... | ३० | २१४३–१२–० | २३१५;१९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट |
| टाटा आर्डिनरी ... | ७५ | ४०५–८–० | ४३५;३६९ | ७३–०–० | ऑगस्ट |
| बॉम्बे डाईंग ... | २५० | १८२०–०–० | २२०१;१६५५ | २५–०–०† | मार्च–सप्टेंबर |
| कोहिनूर ... | १०० | ६१०–०–० | ७६५;५३३ | १२–०–०† | मार्च–सप्टेंबर |
| स्वदेशी ... | १०० | ५४६–०–० | ६५३;४७५ | ३५–०–०‡ | मे |
| नागपूर ... | १०० | ३९७–८–० | ४९८;३६१ | १०–०–०‡ | नोव्हेंबर–एप्रिल |
| फिनले ... | १०० | ३०८–०–० | ३७७;२६५ | २५–०–० | एप्रिल |
| गोकाक ... | १०० | २९७–०–० | ३९४;२८२ | ६–०–०† | ऑक्टोबर–एप्रिल |
| सिंप्लेक्स ... | ५० | २६३–०–० | ३०५;२१८ | ४–०–०† | जानेवारी–जुलै |
| अपोलो ... | २ | ४–१–९ | ५-१०-६;३-६ | ०–३–०‡ | मे |
| इंडि. यु. ऑर्डिनरी ... | १० | १५–५–६ | २१-१४;१३-४-६ | १–४–० | मे |
| ,, डिफर्ड ... | १ | ३–६–९ | ४-९;२-७ | ०–५–० | मे |
| इंदूर माळवा ... | १०० | ७३६–४–० | १२७०;६३० | १११–०–० | जुलै |
| असो. सीमेंट ... | १०० | २३३–०–० | २५४;२१६ | ७–०–० | जानेवारी |
| बेलापूर शुगर ... | ५० | २२०–०–० | २५९;२१९ | ९–०–० | जानेवारी |
| बॉम्बे बर्मा ... | १२५ | ५४७–८–० | ५७५;३७६ | ७–८–० | डिसेंबर |
| न्यु इंडिया ॲ. ... | १५ | ८१–०–० | ९३-१२;७३ | २–०–० | जुलै |
| शिंदिया स्टीम ... | १५ | ३४–१४–० | ३८;२९-२ | १–४–० | जानेवारी |
| शिवराजपूर ... | १० | ५४–८–० | ८५;४८ | ३–४–० | एप्रिल |
| टाटा केमिकल ... | १० | २०–२–० | ३३;१९ | ... | ... |
| टाटा ऑईल ... | २५ | ६९–८–० | ९०;६८-१२ | ३–०–० | सप्टेंबर |

† संहित व्याज.
‡ अंतिम व्याज.

३½% = ९९ रु. ६ आ. ६ पै चांदी = १२३ रु. ८ आ.
सोनें = ६९ रु. ६ आ. कपास = ४४३ रु. ४ आ.

अर्थ

## पाचवी मध्यवर्ती अन्नपरिषद्

### धान्याचें उत्पादन आणि पुरवठा

अन्नाचें उत्पादन, पुरवठा व वाटणी ह्यासंबंधांतील प्रश्न हिंदी जनतेस अत्यंत जिव्हाळ्याचे असल्यानें आणि त्यांचे विषयींची परिस्थिति देशाच्या निरनिराळ्या भागांत भिन्नभिन्न असल्या-कारणानें मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक व संस्थानी सरकारांशीं वेळोवेळ विचारविनिमय करणें, परिस्थितीचा आढावा घेणें व प्रगतीचा कार्यक्रम आखणें स्वाभाविक व आवश्यक झालें आहे. धान्यांच्या पिकांचें क्षेत्र वाढवणें, त्यांच्या उत्पादनांत वाढ घडवून आणणें, त्यांच्या साठ्याची व वाटणीची व्यवस्था लावणें ह्या बाबींचा सरकारच्या अन्नपुरवठा विषयक कार्यक्रमांत प्रामुख्यानें अंतर्भाव झालेला आहे. गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें अखिल भारतीय अन्नपरिषद् भरली होती, तीमध्यें झालेल्या चर्चेचा गोषवारा प्रसिद्ध झाला आहे त्यावरून धान्यांचें उत्पादन आणि वाटणी ह्यांचे बाबतींत काय प्रगति झाली आहे आणि त्यांचे संबंधांत कोणत्या अडचणी व प्रश्न हीं उपस्थित झालीं आहेत ह्याची स्थूलमानानें कल्पना येते. परिषदेचें उद्घाटन करतांना हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्री सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांनीं असें सांगितलें कीं, सामान्य जनतेस पुरेशा व पौष्टिक अन्नाचा पुरवठा करण्याचें ध्येय गाठलें जाईपर्यंत नेटानें प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. हरबरा, डाळी, गोडें तेल इत्यादि खाण्याच्या पदार्थांचा पुरवठा तुटीच्या प्रांतांस करण्याच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता प्रतिपादून सरकारच्या धान्य-खरेदीच्या अग्रहकाविषयींच्या पद्धतीचाहि त्यांनीं उल्लेख केला. अन्न खात्यांत भावी गरजा आणि पुरवठा ह्यासंबंधांत योजना आखण्यासाठीं एक स्वतंत्र विभाग चालू करण्यांत आला आहे त्याची माहिती सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं दिली आणि ते धान्याच्या साठ्याच्या व्यवस्थेकडे वळले. लोकांस धान्य मिळतांना तें स्वच्छ व निवडक असणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. ह्याकरितां अन्न खात्यांत एका डायरेक्टराची नेमणूक झाली असून साठ्यांची तपासणी करण्याकरितां अधिक नेमणूक केली जावयाची आहे. ह्या अधिकाऱ्यांचा सल्ला व इतर मदत प्रांतिक सरकारांस मिळण्यासारखी आहे असें त्यांनीं सांगितलें.

खाद्य पदार्थांच्या समाधानकारक वाटणीचे संबंधांतील मुख्य प्रश्नांचा सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं उल्लेख केला. ते सुटले जाण्याच्या मार्गांतील अडचणी प्रांतिक सरकारांच्या परस्पर सहाय्यानें व मध्यवर्ती सरकारच्या सहकारितेनें सुटले जाण्याची अपेक्षा जनता करीत आहे. ती पुरी होण्यास सरकारनें अधिक नेटानें प्रयत्न करण्याची आवश्यकता स्पष्ट आहे. हिंदुस्थान सरकारच्या कृषिमंत्र्यांनीं म्हणजे सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं अन्न-परिषदेंत केलेल्या भाषणावरूनहि ही गोष्ट उघड होत आहे. हिंदी लोकसंख्येपैकीं ३०टक्के लोकांस पुरेसें अन्न खावयास मिळत नाहीं, मग तें अन्नाच्या तुटवड्यामुळें असो किंवा त्यांच्या अल्पप्राप्तीमुळें असो, आणि ही संख्या सध्याप्रमाणें वाढत राहिल्यास १९५१ मध्यें ४३-४४ कोटि आणि १९७१ मध्यें ५८ कोटि माणसांस पुरेल इतक्या अन्नाची तरतूद करावी लागेल ह्या गोष्टीचें स्मरण करून देऊन प्रस्तुत विषयाचें गांभीर्य केवढें आहे हें त्यांनीं निदर्शनास आणलें. ह्या भावी घटनेच्या दृष्टीनें अन्नपुरवठा वाढवण्याच्या प्रयत्नाची प्रगति कशी होत आहे ह्याची कल्पना येण्यासाठी सर जोगेंद्र ह्यांनीं असें सांगितलें कीं युद्धापूर्वीच्या सरासरीच्या मानानें १९४३-४४ मध्यें ११० लक्ष अधिक एकरांत धान्यांचीं पिकें करण्यांत येऊन त्या योगानें अन्नाच्या उत्पादनांत व पुरवठ्यांत ४० लक्ष टनांची भर पडली. चालू सालचे आकडे अजून उपलब्ध नाहींत, तथापि, कपाशीखालचें क्षेत्रफळ कमी होऊन तांदुळाच्या क्षेत्रफळाची ८ कोटि एकरांची मर्यादा ओलांडली गेली आहे. ह्यावरून परिस्थितींत सुधारणा झाली असली पाहिजे असें त्यांनीं सुचवलें. विहिरी खोदण्यासाठी व चांगल्या बियाचा पुरवठा शेतकऱ्यांस व्हावा म्हणून शेतकऱ्यांस द्रव्यसहायहि मध्यवर्ती सरकारनें दिलें असल्याचें त्यांनीं सांगितलें.

पाश्चात्य देशांच्या मानानें हिंदुस्थानच्या जमिनींत सरासरीनें कमी उत्पन्न येतें असा एक चुकीचा समज रूढ आहे असें म्हणून त्याच्या निराकरणाचा प्रयत्न कृषिमंत्र्यांनीं केला. बागायत जमिनींत दर एकरीं उत्पन्न इतर देशांप्रमाणेंच हिंदुस्थानांत येतें, पण कोरडवाहू जमिनींचें क्षेत्र किती तरी पटीनें विस्तृत असलेमुळें सबंध देशाची सरासरी कमी होते असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. हिंदी शेतीचें उत्पन्न असमाधानकारक आहे असें म्हणणारांस ही कारणमीमांसा माहीत आहे आणि ती पुढें मांडण्यांत सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं नवें कांहींच सांगितलें नाहीं. जमिनीस पाणी, खतें वगैरेचा पुरवठा होत नाहीं म्हणून हिंदी शेती हलक्या प्रतीची ठरते असेंच लोकमत आजपर्यंत व्यक्त करण्यांत आलेलें आहे. सरकारी सहायाचे आकडे त्यांनीं दिले त्यांवरून सदरहु वैगुण्य कितपत दूर होण्यासारखें आहे ह्याचा त्यांनीं विचार करावा. पाण्यावांचून उंची खतें निरुपयोगी आहेत आणि शेतमालाच्या किंमती योग्य असल्यावांचून खतें वापरणें नुकसानीचें आहे असा शेरा त्यांनींच स्वतःच्या भाषणांत मारला आहे. अन्नपुरवठ्याचा प्रश्न किती गुंतागुंतीचा व अवघड आहे आणि तो सोडवण्यास व्यापक व मूलग्राही प्रयत्न सरकारनें करणें कसें अगत्याचें आहे हें त्या भाषणावरूनच उघड होत आहे. निकडीची व्यवस्था तातडीनें केली पाहिजे हें खरें असलें तरी ही तरतूदहि ज्या परिस्थितीवर तोड काढावयाची तिच्या स्वरूपास व महत्त्वास साजेल अशी मोठ्या आकाराची असणें आवश्यक आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. सध्याच्या योजना ह्या प्रकारच्या आहेत कीं काय ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

---

### कंपन्यांच्या भांडवलविक्रीची प्रसिद्धी

सरकारनें मंजूर केलेल्या शेअर वगैरेची विक्रीची जाहिरात करण्यास खालील परिस्थितींत बंदी करण्यांत आलेली आहे:— (१) शेअर वगैरेची विक्री खासगी कंपनीची आहे अथवा (२) शेअर विक्रीस मान्यता देतांना, शेअर्सची विक्री खाजगी रीतीनेंच व्हावी, अशी सरकारनें अट घातलेली आहे.

## औद्योगिक उन्नतीसाठी खडतर तपश्चर्या

### श्री. आत्मारामपंत ओगले ह्यांचें भाषण

( ओगले बंधूंपैकी प्रमुख भागीदार श्री. आत्मारामपंत ओगले ह्यांनीं प्रा. कर्वे ह्यांच्या विनंतीवरून बृहन्महाराष्ट्र कॉलेजाच्या विद्यार्थ्यांस आपल्या औद्योगिक तपश्चर्येची माहिती एका व्याख्यानांत ता. २१ जानेवारी रोजीं सांगितली, ती तेथील तरुण उद्योगोन्मुख विद्यार्थ्यांस मनोवेधी आणि उद्बोधक वाटली, ह्यांत नवल नाहीं. कॉलेजांतील पहिल्या वर्षाचे विद्यार्थी श्री. सी. अ. जोशी ह्यांनीं " अर्था " करितां त्याचा खालील सारांश पाठविला आहे. )

कॉलेजचे प्राचार्य कर्वे यांनीं श्री. ओगले यांची आपल्या विद्यार्थ्यांना ओळख करून देतांना सांगितलें कीं, विसाव्या शतकाच्या सुरवातीस लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेनें ज्या तरुणांनीं औद्योगिक क्षेत्रांत उडी घेतली त्यांत श्री. ओगले यांचें स्थान निःसंशय श्रेष्ठ दर्जाचें आहे. जर तपश्चर्या म्हणजे ध्येयासाठी खडतर हालअपेष्टा सोसणें असेल, तर ओगले यांनीं गेल्या चाळीस वर्षे केलेली तपश्चर्या बृहन्महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी आहे. नंतर श्री. ओगले यांनीं आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणास सुरवात केली. ते म्हणाले:—

### श्री. ओगले ह्यांचें भाषण

" १९०४ सालीं मी मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर इतरांच्या प्रमाणें विश्वविद्यालयीन शिक्षण घेऊन मामलेदारीचा मळलेला मार्ग जर स्वीकारला नसेल तर त्यास कारण माझे वडील बंधू नागूदादा हे होत. त्यांनीं मला नवीन उघडलेल्या तळेगांवच्या कांच शाळेंत उमेदवार म्हणून शिक्षण घेण्यास सांगितलें. पुस्तक वाचून मिळेल तेंच शिक्षण अशी माझीहि कल्पना नसल्यानें त्यांच्या आज्ञेप्रमाणें मी कांच कारखान्यांत गेलों. तेथें चित्रशाळेचे वासुकाका जोशी यांच्या देखरेखीखालीं शिक्षणास सुरवात केली. माझ्या वडील बंधूंच्यासारखी कल्पकता माझ्यांत नसली तरी चिकाटी मात्र होती. हलकीसालकीं शारीरिक कष्टाचीं झाडण्यासारखण्याचीं कामें करण्यांत सुद्धा मी कमीपणा मानला नाहीं. बढवे नांवाच्या गृहस्थांशीं मी बढोद्यास नोकरी धरल्यावर चर्चा करीत असतां आम्ही कांचकारखान्याचा आराखडा तयार केला. वडील, थोरले बंधू, लक्ष्मणराव किर्लोस्कर उर्फ लखूनाना इत्यादींचा सल्ला घेऊन कामास सुरवात केली. तयार केलेला कांचेचा गोळा टिळकांना दाखवल्यावर व एकंदर माहिती सांगितल्यावर त्यांनीं ३००० रु. आम्हाला पैसाफंडांतून उसने दिले. तसेंच औंधकरांनीं ओगलेवाडी स्थापन करण्यासाठी १००० रु. देणगी म्हणून दिले. नंतर डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज 'मीड' साहेबानें नागूदादांस शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडला औद्योगिक शिक्षणासाठी पाठवलें. पुढें ते २ वर्षे अमेरिकेंतहि होते. त्यावेळेस कंदीलाची योजना त्यांनीं आखली. पंतप्रतिनिधींनीं ९० हजार रुपये यंत्रांकरतां दिले व कंदील तयार होऊं लागले. ' प्रभाकर ' हें त्यास अर्थपूर्ण असें नांव देऊन वडलांचेंहि तें स्मारक बनवलें. मंदी, परकीय मालाची स्पर्धा, स्वकीय व्यापाऱ्यांची आमचा माल पाहून घेण्यासाठी ' स्वदेशी ' म्हणून त्यास हिणविण्याची पद्धत, परदेशी हुंडणावळ, इत्यादींमुळें पुष्कळच ठोकरी आम्हाला बसल्या. अशा गटांगळ्या खाऊनहि त्यांतून ज्यावेळेस माणूस तरून येतो त्यावेळेस त्याचीं अशीं कॉलेजांत व्याख्यानें होतात ! १९३३ मध्यें अमेरिकन डॉलर एकदम घसरला व डझनास एकवीस रुपये पडणारा कंदील एकदम अकरा रुपये डझन मिळूं लागला. त्यामुळें पन्नास हजाराचा पहिल्या सहामाहींत दिसणारा फायदा वर्षअखेरीस तोटा ठरला. लोकांना असें वाटतें कीं कारखानदार म्हणजे युद्धकालीन अडचणींचा फायदा घेऊन गब्बर होणारा प्राणी. पण तेजीच्या काळांत जर आम्हीं दोन पैसे मिळवले नाहींत तर मंदीच्या काळांत सोसलेले तोटे व हाल भरून निघायचे तरी केव्हां व कसे ? मोठमोठे कायदे कौन्सिलांतील लोकहि आम्हांला विचारतात कीं युद्ध संपल्यावरचे तुमचे बेत काय आहेत ? मोठमोठे गोरे साहेबहि आम्हांला यंव करायला पाहिजे त्यंव करायला पाहिजे म्हणून उपदेशाचे डोस पाजतात. पण संरक्षण किती देणार या प्रश्नावर मात्र प्रत्येकानें मूग गिळले आहेत.

### धंद्यांत पतीचें महत्त्व

"शेवटीं, महत्त्वाची अशी एकच गोष्ट मी आपल्याला सांगणार आहे व ती म्हणजे धंद्यांत पत राखण्याची आवश्यकता. एकदा एखाद्या माणसाचे पैसे अमक्या वेळेस देईन म्हणून मी म्हटल्यावर मी ते नेहमी एक दोन दिवस अगोदरच देतों. त्यामुळें माणसाचा विश्वास वाढतो. सहाजीकच तो, ' इतकी घाई कां केली, मला कांहीं त्याची विशेष गर्दी नव्हती ' म्हणून म्हणतो. 'असें होय !' असें म्हणून लगेच तेच पैसे त्याच्याकडून आपणांस जरूर असल्यास परत घ्यायचे. म्हणजे आपलेंहि काम होतें व त्यालाहि पैशाच्या सुरक्षिततेविषयी डोळ्यांनीं बघितल्यावर खात्री होते. आपला जीव गहाण टाका पण वायदा सरायच्या अगोदर पैसे परत करा. एक तारखेला चुकते करायचे पैसे मी आदल्या महिन्याच्या २५ तारखेपासूनच द्यायला सुरवात करतों. माझ्या आयुष्यांत लेक्चरर होण्याची एक इच्छा माझ्या मनांत होती ती आज निराळ्या रीतीनें प्रि. कर्वे यांनीं पुरी केली म्हणायाची !"

---

### हिंदी चित्रपटांचा दर्जा उतरला

" हिंदी चित्रपट व्यवसायाचें १९४२ व १९४३ सालीं उत्पन्न वाढलें तरी चित्रपटांचा दर्जा मात्र सुधारला नाहीं. चित्रपट व्यवसायानें एक नामी संधि गमावली आहे. सुधारणेच्या मार्गांत युद्धजन्य अडचणी थोड्याफार आल्या असल्या तरी दर्जा कमी होण्याचें तरी कांहीं कारण नव्हतें. निदान, १९३६-३७ मधील दर्जा तरी कायम राहावयास हवा होता. सध्या आपल्या सामाजिक चित्रपटांत समाजाचें चित्र अत्यल्प प्रमाणांतहि प्रतिबिंबित होत नाहीं, असें म्हटलें पाहिजे. चित्रपटांत कामें करणाऱ्या नट-नटींनीं एकाच वेळीं अनेक चित्रपटांत काम चालू ठेवून निर्मात्यांवरील ताण कमी केला पाहिजे. स्टुडिओंत आपण दाखल झाल्यानंतर कांहीं ठराविक वेळांत शूटिंग संपलें पाहिजे, अशी त्यांनीं निर्मात्यांवर अट घालावी. निर्मात्यांनींहि प्रमुख नटनटांचा जवळून घ्यावयाच्या चित्रापुरताच उपयोग करून बाकीचें काम तत्सम इतर नट-नटींकडून उरकून घेण्याच्या अमेरिकन पद्धतीचा अवलंब करावा. "—मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष सर रहिमतुल्ला चिनॉय, ह्यांचें सोसायटीच्या वार्षिक सभेंत भाषण.

## स्फुट विचार

### अन्नपुरवठ्याविषयीं सूचना

दिल्लीमध्यें भरलेल्या अन्न परिषदेंतील चर्चेची पार्श्वभूमि आम्हीं आमच्या अग्र लेखांत हिंदुस्थान सरकारच्या दोन मंत्र्यांच्या भाषणांच्या स्वरूपांत दिग्दर्शित केली आहे. परिषदेनें केलेल्या सूचनांचा उद्देश अन्नपुरवठाविषयक सर्वसंमत धोरणास मूर्त स्वरूप देण्यासाठी योजावयाच्या व्यावहारिक उपायांची रूपरेखा आखणें हा होय. लोकांस पुरवावयाचें अन्न अधिक पौष्टिक कसें होईल व त्यांत कोणते फेरबदल करणें जरूर आहे ह्याचा विचार करण्याची आवश्यकता परिषदेनें प्रतिपादिली आहे. धान्यांचें उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न जारीनें चालू ठेवले पाहिजेत इतकेंच नव्हे तर भाजीपाला, फळें, दूध, अंडीं व मासे ह्यांचा पुरवठा अधिक होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे असें म्हणून तिचा तपशीलहि परिषदेनें सुचविला आहे. दुधाचें उत्पादन वाढविण्याकरितां विशेष प्रयत्न कसे करावे हें तिनें सांगितलें आहे. शेंगदाण्याच्या उत्पादनास उत्तेजन देण्यांत यावें, एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत व्हावयाच्या ह्या मालाच्या हालचाली निश्चित केल्या जाव्या आणि निर्यात आवश्यक असेल तर ती तेलाची व्हावी, दाण्यांची होऊं नये असा परिषदेचा अभिप्राय आहे. धान्य वगैरेचें उत्पादन वाढवावयाचें तर खतें, पाणी पुरवठा, शेतीचीं हत्यारें इत्यादि साधनें शेतकऱ्यांस उपलब्ध करून दिलीं पाहिजेत ही गोष्टहि परिषदेनें पुढें मांडली. अन्न पुरवठ्याविषयींचा आपला दोन वर्षांचा अंदाजी कार्यक्रम प्रांतांनीं मध्यवर्ती सरकारास पुरवावा आणि तो पुरा करण्यासाठी योजावयाच्या उपायांची कल्पनाहि त्यांस यावी असें ठरलें.

---

### देशी उत्पादन, का मालाची आयात?

ब्रिटिश अधिकाऱ्यांशीं वाटाघाट करून इंग्लंडमधून कांहीं जरूरीचा माल हिंदुस्थानांत आणवून त्यासंबंधांत भासत असलेली टंचाई दूर करण्यासाठी हैदरी शिष्टमंडळ नुकतेंच तिकडे गेलें आहे. ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारचें काय धोरण आहे ह्याचा सर अकबर ह्यांनीं केलेला खुलासा आम्हीं प्रसिद्ध केलाच आहे. इंग्लंडमधून दर महिन्यास पन्नास हजार टन पोलाद, सिमेंट व विशिष्ट जातीचें कापड ह्या देशांत आणण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें असल्याची बातमी ऐकून हिंदी कारखानदारांमध्यें खळबळ उडाली आहे असें दिसतें. बाहेरून आयात करावयाची तर ती यंत्रसामुग्रीची व उत्पादक साधनांची करा; तयार, पक्क्या मालाची नको असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदी कारखानदारांशीं अगोदर चर्चा करून त्यांस तयार करतां येण्यासारखा नसेल असाच माल आयात करणें सयुक्तिक होईल, पण ह्या प्रकारचा विचारविनिमय न करतांच सरकारनें सिमेंट, कापड इत्यादि जिन्नस इंग्लंडमधून आणण्याचें ठरवलें असल्यास ह्या धोरणावरील टीका योग्य होईल. पण ज्यास तातडीची मागणी आहे आणि ज्याचा पुरवठा हिंदुस्थानांतील कारखाने वेळेवर करूं शकत नाहींत असा माल आयात न केल्यास केवळ महागाई व नफेबाजी ह्यांस ऊत येईल हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्याकरितां कोणता माल इंग्लंडहून आयात व्हावयाचा आहे आणि तो कां आणण्यांत येणार आहे ह्याचा खुलासा सरकारनें करणें अगत्याचें आहे. हिंदी औद्योगीकरणास प्रतिकूल होईल असें धोरण त्यानें अवलंबतां कामा नये. यंत्रसामुग्रीच्या आयातीस प्राधान्य देऊन देशांतील कारखान्यांचें उत्पादन वाढवण्यास आणि ह्या मार्गानें महागाईस आळा घालण्यास सरकारनें मदत करावी अशी मागणी हिंदी धंदेवाले सारखी करीत आले आहेत. ती पुरी कां होऊं शकलेली नाहीं आणि तयार माल आयात करणें अपरिहार्य असल्यास तें कसें आहे व ही नियोजित आयात देशाच्या हिताची कशी आहे ह्याचें स्पष्टीकरण सरकारनें केलें पाहिजे.

---

### भोर स्टेट बँक लि., भोर

ता. १९-८-१९४४ ते ३१-१२-४४ च्या काळांतील स्टॅच्युटरी रिपोर्टाचा विचार करण्याकरितां वरील बँकेच्या भागीदारांची सभा ता. ११ फेब्रुवारी रोजीं भरणार आहे. त्याच दिवशीं ३१-१२-४४ अखेरचे हिशेब मंजूर करण्यासाठी पहिली वार्षिक सभाहि बोलाविलेली आहे. हे हिशेब पहिल्या साडेचार महिन्यांचेच आहेत. बँकेचे २,५०,००० रुपयांचे सर्व भाग खपले असून वसूल भांडवल १,२५,००० रुपये आहे. बँकेकडे अल्पावधींत दोन लाखांच्यावर ठेवी आल्या आहेत व एकूण ताळेबंद ३,३८,८३१ रुपयांचा आहे. बँकेनें ३ लक्ष रुपये ३% व्हिक्टरी लोनमध्यें गुंतविलेले आहेत. कर्जें फक्त ४०२ रुपयांचींच येणें आहेत; "अहवालाच्या काळांत मंदी असलेमुळें बँकेकडून पैशाची उचल झाली नाहीं, असें वाटतें." प्राथमिक खर्च व ऑर्गेनायझिंगबद्दलचा खर्च हा १,७८६ रुपयांच्या प्रत्यक्ष तोट्यांत मिळवून ३,९२७ रुपये नफा-तोटा खातीं जिंदगीचे बाजूस आहेत. एकूण खपलेल्या भरपाई भांडवलावर पहिलीं पांच वर्षेंपर्यंत भोर दरबारनें ३% व्याजाची हमी दिलेली आहे. त्याप्रमाणें, रक्कम मंजूर झाल्यानंतर भागीदारांस डिव्हिडंड वाटलें जाईल. संस्थानाचे दिवाण हे बँकेचे अध्यक्ष असून नावर कंपनीचे मालक श्री. वा. पुं. वर्दे हे तिचे उपाध्यक्ष आहेत. महाराष्ट्र बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेचे पूर्वीचे एजंट श्री. श्री. वा. काळे हे मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. जनतेस बँकेची उपयुक्तता पटून तिचा फायदा भोर संस्थान व त्याच्या लगतचा प्रदेश ह्यांस मोठ्या प्रमाणावर मिळूं लागण्यास सहाजीकच थोडा वेळ लागेल. तज्ञ संचालक व व्यवस्थापक ह्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेस मिळत आहे ही गोष्ट बँकेच्या प्रगतीस चांगली पोषक आहे.

---

### भाडेकरू गेल्यास तात्काळ सरकारला वर्दी द्या

"मद्रास शहरांतील घरामधील भाड्याची जागा रिकामी होतांच २४ तासांचे आंत घरमालकानें सरकारला कळविलें पाहिजे. सरकारी नियंत्रक अधिकारी सांगेल त्या भाडेकरूस घरमालकानें रहावयास जागा दिली पाहिजे." मद्रास सरकारनें वरील प्रकारचा हुकूम काढला आहे.

### नवी सिमेंट कंपनी

जामनगर संस्थानांत २ कोटि रुपये अधिकृत भांडवलाची व १ कोटि रुपये वसूल भांडवलाची सिमेंट कंपनी निघणार आहे. तिचे ब्रिटिश हिंदुस्थानांत भाग विकण्यास परवानगी मिळाली आहे. संस्थान स्वतः १८ लाखांचे भाग घेणार आहे.

### कलकत्ता क्लब चटणी

वरील नांवाची चटणी न्यूयॉर्क येथें बनविण्यास प्रारंभ झाला आहे. त्यासाठी एका कंपनीची स्थापना करण्यांत आली आहे.

## डॉलर, पौंड आणि हिंदुस्थान

अमेरिका जगांतील इतर देशांकडे फार मोठ्या प्रमाणावर आज कित्येक वर्षे माल निर्गत करीत आहे, परंतु त्या मानानें तिची इतर देशांतील खरेदी अत्यल्प आहे. ह्याचा अर्थ असा आहे, कीं अमेरिकेचें येणें सर्व ठिकाणीं निर्माण झालें आहे; देणें मात्र फारच थोडें निघत आहे. इतर देशांनीं अमेरिकेकडे माल पाठविला, तर त्यांचा त्या प्रमाणांत अमेरिकन चलनावर–डॉलरवर–अधिकार निर्माण होतो, परंतु त्यांची अमेरिकन मालाची खरेदीच सध्या ज्यास्त असल्याकारणानें डॉलर त्यांच्या वाट्यासच येऊं शकत नाहीं. अमेरिकन मालाच्या खरेदीसाठी यावे लागणारे डॉलर उपलब्ध करावयाचे, म्हणजे इतर देशांनीं अमेरिकेकडे मोठ्या प्रमाणावर माल पाठवून तेथें आपलें येणें निर्माण केलें पाहिजे. परंतु, तसें होत नाहीं व अमेरिकन मालाची किंमत देण्यास लागणाऱ्या डॉलर्सचा तुटवडा पडतो. अशा रीतीनें, जगांतील सर्वच देशांना डॉलर ही चीज दुर्मिळ होऊन बसली आहे. युद्धसमाप्तीनंतर, अमेरिकेचा निर्गत व्यापार आणखी वाढेल, अशीं चिन्हें दिसत आहेत. मोटारी, विमानें, यंत्रसामुग्री, कापड, इत्यादींची अमेरिकन निर्गत वाढेल व तिची कपास आणि तंबाखू ह्यांची निर्गत पूर्वीप्रमाणेंच चालू राहील. अमेरिकेची निर्गत वाढेल, त्या प्रमाणांत आयात वाढली असती, तर फारशी कठीण परिस्थिति निर्माण झाली नसती. परंतु, युद्धकाळांत अमेरिकेस कित्येक मालाचे बाबतींत स्वावलंबी होणें भाग पडल्याकारणानें, तिची आयात कमीच होण्याचा रंग दिसतो. अमेरिकेंतील उत्पादन अत्यंत कार्यक्षम व मोठ्या प्रमाणावर म्हणून स्वस्त होत असल्यामुळें, इतर देशांना अमेरिकेंत आपला माल किफायतशीर विकतां येईल, असें वाटत नाहीं.

### अमेरिकेकडे सोन्याचा ओघ

ह्या सर्व गोष्टींचा परिणाम इतर देशांच्या चलनावर झाल्याखेरीज रहाणार नाहीं. कोणत्याच देशास आपलें अमेरिकेचें देणें देतां येणार नाहीं. प्रत्येक देश डॉलर मिळविण्यासाठी खटपट करील व त्याकरितां त्यास स्वतःच्या चलनावर व हुंडणावळीवर कडक नियंत्रण ठेवावें लागेल. त्यांत यश किती येईल, हें सांगतां येणार नाहीं. १९३९ सालापूर्वीच्या काळांत अमेरिकेनें आपलें येणें सोन्याच्या स्वरूपांत गोळा केलें. जगांतील सर्व चलनी सोन्याचा ओघ अमेरिकेकडे लागून राहिला आणि लवकरच अमेरिकेच्या तिजोरींत सोनें येऊन साठून राहिलें. अमेरिकेचें देणें फेडण्यास इतर देश मालहि पाठवूं शकत नव्हते आणि आतां त्यांचेजवळील सोनेंहि संपलें. निर्माण झालेल्या युद्धपरिस्थितीमुळें इंग्लंड व युरोपांतील देश ह्यांना चलनांवर तात्काळ कडक बंधनें घालावीं लागलीं, म्हणून चलनविषयक परिस्थितीचें गांभीर्य लोकांच्या तेव्हां लक्षांत आलें नाहीं. १९३९ मध्यें लष्करी युद्ध सुरू झालें नसतें, तरी आर्थिक व चलनविषयक युद्धपरिस्थिति निर्माण झालीच असती, असें मि. पीटर ड्रूकर ह्यांनीं "रशियानें आर्थिक तटस्थता सोडली" ह्या सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्टमधील आपल्या लेखांत जें विधान केलें आहे, त्याची पार्श्वभूमि वरील प्रकारची आहे.

### अमेरिकेच्या येण्याची वसुली

अमेरिकेपुढील प्रश्न सुटण्याचे आतां दोन मार्ग आहेतः–( १ ) अमेरिकेनें आपली निर्गत एकदम कमी करावी, किंवा ( २ ) अमेरिकेनें आपलें येणें एकदम वसूल करण्याचा प्रयत्न न करतां तें इतर देशांतील कर्जरोख्यांत गुंतवावें. ह्यांपैकी पहिला मार्ग अमेरिकेस पसंत पडणें शक्य नाहीं. आजच इतर देशांवर आपली कपास लादण्यासाठी तिच्या निर्गतीस पैशाचें सहाय देण्यास अमेरिकन सरकार तयार झालें आहे. अमेरिकेनें आपली येणें रकम इतर देशांत व्याजी लावावयाची म्हटलें, तरी त्या व्यवहाराचा तपशील कोणी ठरवावयाचा, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. पैशाचे मालक अमेरिकेंतील धनको लोक व ते वापरणारे परदेशांतील ऋणको लोक, ह्यांपैकी कोणाच्या म्हणण्यास महत्त्व मिळावयाचें व त्या दोघांच्यामध्यें एकवाक्यता निर्माण कशी व्हावयाची ?

### इंग्लंडच्या कर्जाची फेड

अमेरिकन डॉलरचा प्रश्न अमेरिकेचें इतर देशांकडून निघत असलेल्या प्रमाणाबाहेरील प्रचंड येण्यामुळें निर्माण झाला आहे, ह्या उलट ब्रिटिश पौंडाचा प्रश्न इंग्लंडच्या निर्गतीमधील घटीमुळें व इंग्लंडचें परराष्ट्रीय देणें त्याच्या आजच्या आवाक्याबाहेर गेल्यामुळें निर्माण झाला आहे. पूर्वी इंग्लंडला एक आगबोट भरून माल बाहेर पाठवून दोन आगबोटी माल परत मिळवितां येत असे आणि त्या कारणानें ब्रिटिश लोकांचा संसार सुखानें चालत असे. १९ व्या शतकांत ग्रेट ब्रिटननें परराष्ट्रांत निर्माण केलेल्या आपल्या भांडवलाचे व्याजाच्या व डिव्हिडंडच्या पोटीं आणि ब्रिटिश आगबोट कंपन्यांच्या व विमा कंपन्यांच्या उत्पन्नाच्या पोटीं ग्रेट-ब्रिटन बराचसा माल मिळवीत असे आणि ह्या कारणानें कमी निर्गतींत पुरेशी आयात मिळविणें त्यास शक्य होई. चालू युद्धाचे काळांत ग्रेट ब्रिटनचें हें भांडवल संपुष्टांत आलें आहे इतकेंच नव्हे, तर ग्रेट ब्रिटनचे पूर्वींचे देणेकरी त्यांचे आतां सावकार बनले आहेत. ह्या भांडवलावरील व्याज व डिव्हिडंड येणें सहाजीकच कमी पडलें आहे. उलट, ग्रेटब्रिटनकडून आपलें येणें वसूल कसें करावयाचें, असा बिकट प्रश्न इतर देशांपुढें येऊन पडला आहे.

### धनको देशांस विवंचना

प्रत्येक देश आपलें ग्रेट ब्रिटनमध्यें पौंडाच्या चलनांत साठलेलें येणें शक्य तितक्या लवकर व कमींत कमी नुकसान सोसून वसूल करण्याचा प्रयत्न करील, हें उघड आहे. त्यामुळें पौंडाचें मुबलक चलन उपलब्ध होईल आणि त्याचा जागतिक चलनपरिस्थितीवर होणारा परिणाम हितावह ठरणार नाहीं. आपल्या निर्गत व्यापाराच्या विनिमयांत जेवढा माल बाहेरून आणतां येईल, तेवढाच आणून उदरनिर्वाह करावयाचा, का आपली निर्गत अनेक पट वाढवून आपली आयात कायम राखावयाची, हा ग्रेट ब्रिटनपुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. अर्थात, ग्रेट ब्रिटन निर्गत व्यापार वाढविण्याचा प्रयत्न करील व त्यामुळें भयंकर आंतरराष्ट्रीय व्यापारी स्पर्धा निर्माण होईल, हें स्पष्ट आहे. म्हणजे, अमेरिकन डॉलर कसा मिळवावयाचा व साठलेल्या ब्रिटिश पौंडांची वासलात कशी लावावयाची, अशी दोन प्रकारची विवंचना सर्व देशांच्या चलनाधिकाऱ्यांस लागून राहील. सर्व जगास ग्रासणाऱ्या ह्या बिकट प्रश्नाचें उत्तर ब्रिटिश हितसंबंधाचे दृष्टीनें पुढें मांडण्यांत आलें, तें अमेरिकन हितसंबंधांस मारक असल्याकारणानें, त्यांत एकवाक्यता होणें अवघड आहे.

### " पौंडाचे बदली डॉलर द्या "

ब्रेटन वुडस परिषदेंत वरील प्रश्नाचा विचार चालू असतांना मुख्य अडचणी टाळूनच बहुतेक चर्चा चालली होती. हिंदुस्थानाचें येणें ग्रेट ब्रिटनमध्यें वाढत चाललें आहे. त्या पौंडांतील येण्याचें डॉलरमध्यें रूपांतर करतां यावें, अशी व्यवस्था होण्याचें अगत्य हिंदुस्थानतर्फे परिषदेंत प्रतिपादन करणाऱ्या " नव्या दिल्लीच्या तारतम्यशून्य प्रतिनिधीस—तो स्वतः इंग्रज गृहस्थ होता—इतर प्रतिनिधींनीं "हुश हुश" करून तात्काळ खालीं बसविलें." व्यावहारिक महत्त्वाचे प्रश्न बाजूस सारून चलनव्यवस्था स्थिर झाल्यावर करावयाच्या गोष्टींचेंच अवडंबर माजविण्यांत परिषद कशी गुंगली होती, ह्याचें थोडक्यांत वर्णन वरील प्रकारें मि. ड्रकर ह्यांनीं केलें आहे. हिंदुस्थानावर त्याचा परिणाम काय होईल, हें पहाणें आतां बोधप्रद होईल. जगांतील राष्ट्रांत स्वतंत्रपणें खुला व्यापार लवकर सुरू होण्याची आतां शक्यता उरली नसल्याकारणानें आंतरराष्ट्रीय व्यापार व चलनविषयक व्यवहार ह्यांवरील सरकारी नियंत्रणें वाढतील व तीं दीर्घ काळ टिकतील. स्वस्त व चांगला माल जेथें मिळेल, तेथें तो घेतां येईलच, असें नाहीं. उदाहरणार्थ, हिंदुस्थानास लागणारी यंत्रसामुग्री,मोटारी, वगैरे माल अमेरिकेंतून घेणें किफायतशीर झालें तरी आपणांस तो माल तेथून आणतां येणार नाहीं. अमेरिकेस त्याच्या किंमतीबद्दल डॉलर कसे द्यावयाचे? ग्रेट ब्रिटनमध्यें आपलें येणें शिल्लक आहे, तेव्हां तें वसूल करण्यासाठी ब्रिटिश मालच आपणास घ्यावा लागेल; डॉलर उपलब्धच होणार नाहींत. ग्रेट ब्रिटनमधील आपल्या पौंडांतील येण्याचा उपयोग डॉलर मिळण्यांत व त्यामुळें अमेरिकन माल मिळण्यांत होण्याजोगा नाहीं.

### अडचण, परंतु ती बलिष्ठ ऋणकोची

आपल्या परराष्ट्रीय व्यापारी धोरणाचें नेतृत्व स्वतःचे हातीं यशस्वी रीतीनें ठेवून सरकारी नियंत्रणाखालीं परराष्ट्रांशीं व्यापार करणाऱ्या देशांसच ह्यापुढें कांहीं काळ तरी आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत स्थान मिळूं शकेल. हिंदुस्थान सरकार ब्रिटिश हितसंबंधांस विरोध करूं शकणार नाहीं; त्यामुळें ब्रिटिश पौंडाच्या वर्चस्वाखालील देशांचा एक गट निर्माण होईल, त्यांतच हिंदुस्थानास सामील व्हावें लागेल. परराष्ट्रांशीं परस्पर व्यापारी करार करून व आपल्या साम्राज्याचा ब्रिटिश निर्गतीच्या वाढीस वाव मिळविण्याकडे उपयोग करून ग्रेट ब्रिटन जी व्यापारी योजना आखील, तीमध्यें हिंदुस्थानास ब्रिटिश मालाचा बराच मोठा बोजा उचलावा लागेल, असें दिसतें. ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानांत कोणता माल पाठवावा म्हणजे त्यापासून हिंदी उद्योगधंद्यांचें नुकसान होणार नाहीं व नव्यांच्या स्थापनेस अडचण पडेल हें आतां काळजीपूर्वक पहावें लागेल.

---

### घोडा मेला; १ लक्ष रुपयांचा विमा

इंदुरच्या महाराजांचा " व्हॉट अगेन " ह्या नांवाचा घोडा महालक्ष्मी रेस कोर्सवर एकाकी पळत असतां, त्यास पकडून नेण्यांत येत होतें. वाटेंतच तो एकदम मरण पावला. घोड्याचा १ लक्ष रुपयांचा विमा उतरलेला होता.

## आयुर्विम्याचे व्यवसायांत विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें सुधारणा

### इन्शुअरन्स अॅडव्हायसरी कमिटीच्या सूचना

इन्शुअरन्स अॅडव्हायसरी कमिटीनें आयुर्विमा व्यवसायाचे बाबतींत खालील सुधारणा सुचविल्या आहेतः—

(१) विमा कायदा अंमलांत येण्यापूर्वी रद्द झालेल्या विम्यांसहि विमा कायद्यांतील ११३ वें कलम लागू पडावें; त्यांत विमेदारांचें हित आहे.

(२) एक हजारापर्यंतच्या विम्यास डाक्टरी तपासणीची आवश्यकता असूं नये. हा प्रयोग यशस्वी ठरल्यास, दोन हजारांपर्यंतच्या विम्यांसहि तिची आवश्यकता राहूं नये.

(३) विमा कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डावर विमेदारांस प्रतिनिधित्व देण्यांत आलें असलें, तरी त्याचे अपेक्षित सुपरिणाम प्रत्यक्ष दिसून येत नाहींत; कंपन्यांचे अधिकारी लाइफ फंडांतील रकम स्वतःच्या उपक्रमांसाठी वापरीत असल्याचें आढळलें आहे. सबब, कोणत्याहि एका भागीदारास १० पेक्षां ज्यास्त मतें असूं नयेत व प्रॉक्सींच्या सहायानें मतें नोंदण्याचा अधिकार मर्यादित असावा.

(४) विमा कंपन्यांस नफा होतो, तो विमेदारांनीं भरलेल्या जादा हप्त्यांमुळेंच होतो. तेव्हां, कंपन्यांस येणाऱ्या वाढाव्यापैकीं भागीदारांचा हिस्सा १०% पेक्षा ज्यास्त असूं नये व कालांतरानें तो ७½% व ५% करण्यांत यावा.

(५) विमेदारांना त्यांनीं भरलेल्या हप्त्यांपैकी १०,००० रुपयांच्या प्रीमियमवर कर माफ असावा.

---


चंद्रमोहनचा पुकार ऐकून—

'द्रौपदी' घाबरली कां नाहीं?

ती वीररमणी होती—

आजकालची तरुणी नव्हती



नवहंसचा अतिप्रचंड बोलपट

द्रौपदी

कथानक-पटकथा

सुशिलाराणी M.A.L.T.

निर्माता—दिग्दर्शक

बाबूराव पटेल.

प्रमुख भूमिका

सुशिलाराणी

M. A. L. T.

३ तिसरा हाऊस-फुल्ल सातवडा

रोज—६॥ व १० वा.

डायमंड प्रकाशन

प्रभात (किबे लक्ष्मी थिएटर)

फो. ५५६

रविवार ता. ११ रोजीं सकाळीं १० वाजतां प्रभातमध्यें

आर. के. ओ. रेडिओ पिक्चर —जोन ऑफ पॅरिस.

सोलापूर—भागवत चित्रमंदिरांत ता. १० पासून सुरू होणार!




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

गेल्या ३० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले
फिव्हर एस.
सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २
● होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धि करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ८०.
● बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय. किं. रु. २
पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.
तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.
एजन्सी नसलेल्या गांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.
सुधा एजन्सी,
१८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

सांडू
टोमॅटो
कम्पाऊन्ड
(ए. बी. डी. व्हिटॅमिन्युक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्टस व ड्रगिस्टस.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.
कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन
सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

डोंगरे याच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७९


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १४ फेब्रुवारी, १९४५ अंक ७

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
## ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
BUG COILS ( ABC )
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २




## सांडू हार्टिना
छातींत धडधडणें, धाप लागणें, छातींत कळ अगर चमक मारणें, रक्ताचा दाब वाढणें व हृदयाची अशक्तता यांवर खास गुणकारी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

तयार कपड्यांचे व्यापारी
## महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
## पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७१

## विविध माहिती

### झारापकर साप्ताहिक

मुंबईंत झारापकर बंधूंनीं गेलीं ६ वर्षें अव्याहत चालविलेल्या झारापकर मासिकाचें रूपांतर साप्ताहिकांत होणार असून दि. १८ फेब्रुवारीपासुन प्रत्येक रविवारीं ह्या साप्ताहिकाचा अंक निघणार आहे.

### ऑ. इं. मॅं. ऑर्गनायझेशनचें अधिवेशन

ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशनचें पाचवें अधिवेशन दिल्ली येथें वाय. एम. सी. ए. हॉलमध्यें सर एम. विश्वेश्वर-अय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली ता. २४ व २५ रोजीं भरणार आहे. १९४५ सालाकरितां ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष सर विश्वेश्वर अय्या हे आहेत.

### इजिप्तमधील विदेशीयांचे विमानतळ

युद्धसमाप्तीनंतर, विदेशीयांचा एकहि वैमानिक तळ इजिप्तच्या भूमीवर राहूं दिला जाणार नाहीं, असें इजिप्तच्या मुख्य प्रधानांनीं सांगितलें.

### ब्रिटिश मालकीचा नवा कालवा

सुएझचा कालवा १९६८ मध्यें इजिप्तच्या मालकीचा होतो. त्यापूर्वी, आपल्या मालकीचा तत्सम कालवा दुसरीकडे खोदण्याचें इंग्लंडनें योजिलें आहे.

### विजेचा हिंदुस्थानांत खप

हिंदुस्थानांत १९४३ मध्यें एकूण ३ अब्ज, ५८ कोटि युनिटस वीज निर्माण झाली. ही निर्मिति अमेरिकेंतील विजेच्या साप्ताहिक उत्पादनाच्या बरोबरीची आहे ! दर माणशी विजेचा खप पाहिला तर अमेरिकेंत तो १८० पट आहे; ग्रेट ब्रिटनमधील खप १०० पट आहे. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या एकूण विजेपैकीं ४९% विजेचा खप मुंबई व कलकत्ता ह्या दोनच शहरांत होतो. कानपूर व अहमदाबाद मिळून ह्या चार शहरांत सर्व उत्पादनाच्या निम्मी वीज खपते. विजेच्या एकूण खपापैकीं ७% वीज घरगुती कामीं खर्च होते.

### रबराचें उत्पादन फाजील होणार ?

नैसर्गिक व कृत्रिम रबराचें उत्पादन युद्धसमाप्तीनंतर फाजील होण्याचा संभव आहे व ह्या अरिष्टावरील उपायाची योजना आखली पाहिजे, ह्याविषयीं ग्रेट ब्रिटन, अमेरिका, नेदरलंडस, इत्यादि देशांच्या प्रतिनिधींची एका परिषदेंत चर्चा चालू आहे.

### मुंबई प्रांतांतील पाणीपुरवठा व ड्रेनेज ह्यांचीं कामें

भारी किंमती व माल मिळण्याच्या अडचणी ह्याकारणानें १९४२-४३ प्रमाणें १९४३-४४ मध्येंहि पाणीपुरवठा व ड्रेनेज ह्यांसंबंधांतील कामांत फारशी प्रगति होऊं शकली नाहीं. युद्ध-प्रयत्नाशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या कामांची गोष्ट अर्थातच वेगळी-

## मुंबई शेअर बाजार

('मेसर्स व्ही. एम्. लिमये, आणि कं. पुणें ४ ह्यांजकडून)

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित ‡ अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | दि. ६।२।४५ | ७।२।४५ | ८।२।४५ | ९।२।४५ | १२।२।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २०९१-४ | २०८६-४ | २०९७-८ | २०७२-८ | २०९५-० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९१ | ३८९-८ | ३९०-८ | ३८७ | ३९२-८ |
| २२०१; १६९५ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १७८१-४ | १७७७-८ | १७९३-१२ | १७८० | १७८३-१२ |
| ७६५; ५३३ | १२-०-० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९३ | ५९३ | ५९७ | ५९१ | ५९७ |
| ६५३; ४७५ | ३५-०-० ‡ | मे | स्वदेशी | १०० | ५३० | ५३४ | ५३५ | ५२८ | ५३३ |
| ४९८; ३६१ | १०-०-० ‡ | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३८७ | ३८८ | ३८६-८ | ३८१ | ३८४ |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०० | २९९-८ | ३०३ | ३०३ | ३०२ |
| ३९४; २८२ | ६-०-० † | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९५ | २९५ | २९९-८ | २९६ | २९७ |
| ३०५; २१८ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २५३ | २५७-८ | २५८-१२ | २५४ | २६०-८ |
| ५-१०-६; ३-६ | ०-३-० ‡ | मे | अपोलो | २ | ४-०-६ | ४ | ४-०-६ | ४-०-६ | ४-२ |
| २१-१४; १३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-११ | १४-१३ | १४-१४ | १४-१३-६ | १४-१२ |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३-०-६ | ३-१ | ३-०-६ | ३-०-६ | ३-२ |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७०६-४ | ७०६-४ | ६९८-१२ | ६९० | ६८५ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२७-८ | २२७-४ | २२६ | २२७-८ | २३०-८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२० | २२० | २२० | २२० | २२० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५३-१२ | ५५० | ५५० | ५५० | ५४७-८ |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८० | ७९-८ | ८० | ८०-४ | ८०-४ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४-१ | ३४ | ३४-४ | ३४-४ | ३४-२ |
| ८५; ४८ | ३-१४-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५४-१२ | ५४-८ | ५४-८ | ५४-८ | ५५ |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०-४ | २०-८ | २०-८ | २०-५ | २०-९ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ७०-४ | ६९-८ | ७० | ७० | ६८-१२ |
| | | | ३½ रोखे | १०० | ९९-६ | ९९-६ | ९९-७ | ९९-७ | ९९-९ |

वर्ग पुस्तकें (ट्रा. बुकें) बंद

कोहिनूर मिल्स १६-२-४५ ते १४-३-४५ बँक ऑफ बरोडा १६-२-४५ ते ८-३-४५
बी. आय. सी. २८-२-४५ ते २८-३-४५ न्यू मेट मिल्स " "
बँक ऑफ इंडिया १६-२-४५ ते १-३-४५

दि. १२-२-४५

३% व्हिक्टरी लोन = ९९ रु. ९ आ. ६ पै.

# अर्थ

## वारसास मिळणाऱ्या मालमत्तेवरील नवा कर

### नियोजित कराचें स्वरूप

१९३५ च्या घटना कायद्यानें मध्यवर्ती सरकारास सक्सेशन ड्यूटी बसविण्याचा अधिकार दिला आहे. मरण पावलेल्या मनुष्याची मालमत्ता वारसास मिळते. वारसाच्या वाट्यास येणाऱ्या मालमत्तेवर बसविण्यांत येणाऱ्या करास सक्सेशन ड्यूटी म्हणण्यांत येतें. हिंदुस्थान सरकारला वारसा कर बसविण्याचा आहे, तो सक्सेशन ड्यूटीच्या स्वरूपाचा नाहीं, असें दिसतें. घटना कायद्यांत उल्लेख केलेल्या सक्सेशन ड्यूटीमध्यें एस्टेट ड्यूटीचा समावेश होतो. किंवा नाहीं, ह्याविषयीं खुलासा होण्याचे दृष्टीनें व्हाइसरॉयनें फेडरल कोर्टाकडे विचारणा केली. फेडरल कोर्टानें ह्या प्रश्नाचा विचार करून, घटना कायद्यान्वयें हिंदुस्थान सरकार एस्टेट ड्यूटी बसवूं शकत नाहीं, असा बहुमतानें निर्णय दिला. मरण पावलेल्या मनुष्याच्या मालमत्तेवरील मालकी हक्क दुसऱ्याकडे जातो, ह्या निमित्तानें बसविण्यांत येणाऱ्या मालमत्तेवरील करास एस्टेट ड्यूटी असें म्हणतात. प्रस्तुत मालकी हक्क कोणास प्राप्त होतो हा प्रश्न येथें महत्त्वाचा नाहीं. सक्सेशन ड्यूटी मात्र वारसाच्या प्रत्यक्ष वाट्यास येणाऱ्या मालमत्तेवर लादण्यांत येते. हिंदुस्थान सरकारच्या मनांत एस्टेट ड्यूटीच्या स्वरूपाचा कर बसविण्याचें असल्याकारणानें, सरकारनें ब्रिटिश सरकारामार्फत घटना कायद्यांत दुरुस्ती करवून एस्टेट ड्यूटी बसविण्याचा आपला अधिकार पक्का करून घेत आहे. मार्च, १९४५ च्या पूर्वींच ह्यासंबंधांत बिल पुढें आणण्याचें हिंदुस्थान सरकारनें योजिलें आहे.

### लोकशाही कर!

वारसा कर, मग तो सक्सेशन ड्यूटीच्या स्वरूपांत असो किंवा एस्टेट ड्यूटीच्या स्वरूपांत असो, जगांतील बहुतेक सर्व प्रगमनशील देशांत बसविण्यांत आलेला आहे. मोठाल्या मिळकती पुढील पिढ्यांना विनाकष्ट मिळाव्यात, ही गोष्ट लोकशाहीस धरून नाहीं. त्याचप्रमाणें, कर देण्याच्या पात्रतेप्रमाणें त्याची आकारणी व्हावी, ह्या तत्त्वास धरूनच वारसा कर असल्याकारणानें लोकशाहीच्या प्रगतीबरोबर वारसा करहि पसरत चाललेला आहे. ह्या दृष्टीनें, हिंदुस्थानांत वारसा कर बसविल्यानें येथें लोकशाही निर्माण झाली असा मात्र उलट अर्थ काढतां येणार नाहीं!

### टॅक्सेशन कमिटीचा अभिप्राय

वारसा कर हिंदुस्थानांत बसविण्याची शक्यता व इष्टता कितपत आहे, ह्याचा विचार इंडियन टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटीनें वीस वर्षांपूर्वींच करून, अशा करास अनुकूल अभिप्राय व्यक्त केलेला होता. वारसा कर जमिनीच्या मालकांस विशेष जाचक होतील; गुरें–जनावरांची किंमत ठरविणें अवघड आहे; हिंदुस्थानांत बचतीची सवय अद्याप दृढमूल झालेली नाहीं; व्यापारी वर्गाच्या मालमत्तेची मोजदाद करण्यास सोईचें साधन उपलब्ध नाहीं; मिताक्षर अविभक्त कुटुंबपद्धतीमुळें वारसा कर बसविण्यांत अडचणी निर्माण होतील, असें पांच प्रमुख आक्षेप वारसा करास घेण्यांत आले त्यांचा कमिटीनें विचार केला व खालीलप्रमाणें ते निकालांत काढले:—

### आक्षेप व त्यांचें निरसन

(१) जमिनींची किंमत एकसारखी वाढत चालली आहे व एकूण करांच्या आकारणींतील शेतीवरील कराचें प्रमाण कमी होत चाललेलें आहे. कस्टम्स, इनकमटॅक्स, वगैरे करांत वाढ होत आहे, परंतु जमीन महसुलांत फारच थोडी वाढ झालेली आढळेल. जमीन वगळली, तरी शेतकऱ्यांजवळ इतर मालाचे स्वरूपांत मालमत्ता जमा होत आहे तीवर कर बसविण्यांतील पूर्वींच्या अडचणी आतां उरलेल्या नाहींत. (२) जनावरांची किंमत ठरविण्याची अडचण खरोखरच तीव्र आहे. सर्वच देशांत त्या अडचणींचा अनुभव येतो आणि हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितींत, जनावरांच्या किंमती मालमत्तेच्या मोजणींत निसटून जाण्याचा संभव फार आहे. ज्यांना आपली मालमत्ता लपवितां येणें अशक्य आहे, अशांवर कराचा बोजा अधिक प्रमाणांत बसणें त्यामुळें क्रमप्राप्त आहे. परंतु तेवढ्यासाठी वारसा कर अजिबात बसवूं नये, असें म्हणतां येणार नाहीं. (३) लोकांची सरकारी रोख्यांतील गुंतवण, पोस्टल सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी, विमा पॉलिसींची दरसाल वाढती संख्या, इत्यादि गोष्टींवरून बचतीची सवय वाढत चालली आहे, असें दिसतें. (४) इनकमटॅक्स खात्याच्या कार्यपद्धतींत सुधारणा झाली असल्याकारणानें व्यापारी वर्गाची मालमत्ता वारसा करांतून निसटण्याचा संभव फारसा उरलेला नाहीं. वीस वर्षांपूर्वीं टॅक्सेशन कमिटीनें व्यक्त केलेला हा अभिप्राय आजच्या परिस्थितीहि लागू पडत आहे, असें आढळून येईल.

### अविभक्त कुटुंब पद्धति

वारसा करास प्रमुख आक्षेप येईल, तो अविभक्त कुटुंब पद्धतीमुळें निर्माण होणाऱ्या वारसाविषयक परिस्थितीसंबंधाचा आहे. तथापि, सक्सेशन ड्यूटीऐवजी एस्टेट ड्यूटी बसविण्याचें हिंदुस्थान सरकारनें योजिलें असल्याकारणानें, ह्या आक्षेपाची तीव्रता कमी होणार आहे. हिंदू आणि मुसलमान ह्या दोन्हीं समाजांत, मृत मनुष्याच्या मालमत्तेस अनेक वारस असतात आणि सर्व वारसांचा वाटा सारखा नसतो. तेव्हां, ह्या सर्व वारसांच्या हिश्यास वारसा कराच्या योजनेप्रमाणें वेगवेगळा दर्जा ठरवून देणें ही गोष्ट अशक्यप्राय आहे. तेव्हां, प्रत्येक वारसाकडून विशिष्ट प्रमाणांत सक्सेशन ड्यूटी वसूल करण्याचा हिंदुस्थानांत प्रश्नच उद्भवत नाहीं. वारसांस मिळावयाच्या एकूण मालमत्तेच्या किंमतीवर कर आकारून तो वसूल करण्याचा म्हणजे एस्टेट ड्यूटी बसविण्याचा विचार हिंदुस्थान सरकारनें केला आहे तो टॅक्सेशन कमिटीच्या शिफारसीस अनुसरूनच आहे.

### कराचें ब्रिटिश समर्थन

हिंदुस्थानांतील फाजील क्रयशक्तीचा नाशवंत जिनसांच्या खरेदीकडे उपयोग होऊन त्यामुळें किंमतींचें मान वाढत जातें, त्यास आळा घालून चलनविस्तार मर्यादित करण्याचें महत्त्वाचें काम सरकारचा हा नवीन कर करील; त्याचप्रमाणें प्रांतिक सरकारांना आपल्या युद्धोत्तर योजना पार पाडण्याकरितां लागणारा

पैसा हा कर पुरवील, असें प्रस्तुत वारसा कराचें समर्थन ब्रिटिश लॉर्डांच्या सभेंत उपभारत मंत्री लॉर्ड लिस्टोवेल ह्यांनीं केलें. अर्थात एकदा हा कर बसला, म्हणजे तो पुनः कधींहि उठण्याचा संभव नाहीं. तातडीनें कर बसविण्याची आवश्यकता सिद्ध करण्यापुरतेंच लॉर्ड लिस्टोवेल ह्यांच्या समर्थनाचें महत्त्व आहे. कराच्या लोकशाही स्वरूपाचा उल्लेख त्यांनीं केला नाहीं.

### व्यावहारिक अडचणी

शेतजमिनींवर वारसा कर बसविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देण्यांत यावयाचा असून बाकीच्या मालमत्तेवरील वारसा कराचा अधिकार मध्यवर्ती सरकारकडे रहाणार आहे. मध्यवर्ती सरकारनें गोळा केलेल्या कराचा कांहीं भाग प्रांतिक सरकारांत वाटून दिलाच पाहिजे, असें त्यावर बंधन घालण्यांत आलेलें आहे. अशा रीतीनें, कराच्या आकारणीच्या अधिकाराची व जमा होणाऱ्या कराच्या रकमेची वाटणी केलेली आहे. आतां, ह्या कराच्या आकारणीचा दर काय असावा, कर बसवितांना मालमत्तेची किंमत कशी ठरविण्यांत यावी, ह्या वाढलेल्या कामाची व्यवस्था कशी करावी, इत्यादि प्रश्न प्रत्यक्ष व्यवहारांत फारच अवघड जाणार आहेत. लोकांवर खालच्या नोकरवर्गाचा जुलूम व अन्याय होऊं नये, ह्यासाठीं तर सरकारला विशेष तरतूद करावी लागेल.

### मिळकत मोठी, तर कर जास्त

कांहीं किमान रुपयांपर्यंतच्या मालमत्तेवर कर आकारला जाणार नाहीं व जसजशी मालमत्ता मोठी, तसतसा आकार ज्यास्त, अशा रीतीनें कर वसूल केला जाईल. कराची आकारणी शतमानानें प्रत्यक्ष किती होईल, हा तपशीलाचा प्रश्न आहे, परंतु इनकमटॅक्सच्या तत्त्वाप्रमाणेंच वाढत्या मिळकतीस वाढत्या दरानें वारसा कर द्यावा लागणें हें योग्यच आहे. प्रोबेट, लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन, सक्सेशन सर्टिफिकेट, इत्यादींवर कोर्ट फी ॲक्टाखालीं आजच फीचे स्वरूपांत कर बसविण्यांत आलेला आहे. ह्या फीचा कांहीं जातींवरच बोजा बसतो व फीची आकारणीहि प्रमाणशीर होत नाहीं, अशी हिंदुस्थानांत परिस्थिति आहे. वारसा कर सर्वांवर बसविणें म्हणजे एक प्रकारें वरील कोर्ट फी कांहीं प्रमाणांत सर्वांस लागू करण्यासारखेंच होणार आहे.

### भांडवलावरील कर

वारसा कर हा भांडवलावरील कर आहे. तेव्हां त्या कराचा विनियोग सरकारच्या चालू उत्पन्न-खर्चांतील तूट भरून काढण्याकडे करणें श्रेयस्कर होणार नाहीं. लोकांनीं बचत केलेल्या भांडवलाचा विनियोग भांडवली स्वरूपाच्या उपक्रमाकडेच करण्यांत आला पाहिजे, म्हणजे त्या खर्चांतून पुढें उत्पन्नाच्या बाबी निर्माण होऊन समाजाची संपत्ती वाढण्यास सहाय झालें पाहिजे. "लोकांनीं युद्धपरिस्थितीचा फायदा घेऊन साठवलेल्या रकमा वारसा कराच्या द्वारा समाजास परत मिळणें युक्त आहे." असें लॉर्ड स्टॅबॉल्गी ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें, तें योग्यच आहे. "वारसा कर भागविण्यासाठीं शेतकऱ्यांवर जमीन विकून टाकण्याचा प्रसंग येऊं नये" ही त्यांची भयसूचना महत्त्वाची आहे.

### राष्ट्रीय सरकारचें महत्त्व

राष्ट्रीय सरकारच्या अस्तित्वाखेरीज कोणतेंहि राष्ट्रीय आर्थिक किंवा औद्योगिक नियोजन इष्ट होणार नाहीं, असें "मुंबई योजना" कारांनीं स्पष्टच सांगितलें आहे. ज्या नियोजनास राष्ट्रीय सरकारची बैठक नाहीं, त्याच्या खर्चाच्या तरतुदीसहि लोकांचा हार्दिक पाठिंबा मिळणें कठीण आहे. ह्या मुद्यावर मालमत्तेवरील करास कसून विरोध झाला, तर त्यांत आश्चर्य नाहीं. हिंदुस्थान सरकार असेंब्लीच्या चालू बैठकींत ह्या करास कायदेशीर स्वरूप प्राप्त करून देणार आहे असें समजतें. अशा तऱ्हेचा कर तात्त्विक दृष्ट्या कितीहि श्रेयस्कर असला तरी ह्या प्रकारच्या दूरगामी कर योजनेस सामान्य जनतेचा पाठिंबा अगाऊ मिळविणें नेहमींच इष्ट असतें.

## पांच वर्षांत ६० कोटि रु. खर्चाची योजना

मुंबई सरकारनें ऑगस्ट, १९४४ मध्यें आपल्या युद्धोत्तर ग्रामोन्नतीच्या योजनांचें चोपडें प्रसिद्ध केलें होतें. त्यांतील पहिल्या पांच वर्षांच्या काळांत ५० कोटि रुपये खर्चाची तरतूद होती, ती आतां ६० कोटि रुपये करणें सरकारास शक्य वाटत आहे. "मुंबई योजना" व हिंदुस्थान सरकारची योजना ह्यांतील खर्चाच्या तरतुदींचे मानानें, मुंबई सरकारची ६० कोटि रुपयांची तरतूद अव्यवहार्यहि नाहीं व अत्यंत कमीहि नाहीं, असें प्रांतिक सरकारचें म्हणणें आहे. ह्या ६० कोटि रुपयांची वाटणी स्थूलमानानें खालीलप्रमाणें केली जाईल:—

| | कोटि रु. |
|---|---|
| वहातुकीचे मार्ग | २० |
| शेती | १७½ |
| वीज उत्पादन | ४ |
| शिक्षण व आरोग्य | ३½ |
| इतर | १½ |
| इतर योजना ( ज्यांच्या खर्चाचे आकडे तयार नाहींत ) | १० |
| | ६० |

वरील ६० कोटि रुपयांपैकीं ५० कोटि रुपये पांच वर्षांत भांडवली स्वरूपाच्या कामाकडे खर्च होतील व १० कोटि रुपये वार्षिक चालू खर्चाच्या रकमांची बेरीज आहे. ह्या सर्व खर्चाची तरतूद मुख्यतः खालीलप्रमाणें होईल:—

| | कोटि रु. |
|---|---|
| मध्यवर्ती सरकारची मदत | २० |
| पोस्ट वॉर री. फंड | १५ |
| पांच वर्षांतील उत्पन्न-खर्चामधील वाढावा | १० |
| कर, कर्ज | १५ |
| | ६० |

पहिल्या पांच वर्षांतील योजनांच्या खर्चाची वाटणी व उत्पन्नाचा मार्ग ह्यांची रूपरेषा वर दिली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक खंडांतील भांडवली खर्चाच्या तरतुदींची काळजी आजच करण्याचें कारण नाहीं. तथापि, पहिल्या पांच वर्षांतील सुधारणा पुढें नुसत्या चालू ठेवण्यासच दरसाल २½ कोटि रुपये लागतील. मद्रास प्रांतांतील विक्रीवरील करासारखा सेल्स टॅक्स मुंबई प्रांतांत सुरू करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

## स्फुट विचार

### स्टर्लिंग शिलकांचा वाद

लंडनमध्यें हिंदुस्थानच्या शिलका अडकून राहिल्या आहेत, त्या ह्या देशाच्या पदरांत कशा व केव्हां पडावयाच्या ह्या प्रश्नाची पुष्कळ चर्चा झाली आहे. ह्या पैशाचा विनियोग हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या योजना पार पाडण्याचे कामीं होईल ह्या रीतीनें तो मोकळा होण्याची व्यवस्था इंग्लंडनें करावी अशी ह्या देशाची मागणी आहे. स्टर्लिंग शिलकांचे बाबतींत इजिप्तची स्थिति हिंदुस्थानप्रमाणेंच झालेली आहे आणि ब्रिटिश लोकमताच्या पुरस्कर्त्यांचें दोन्ही देशांस सारखेंच उत्तर आहे. "इंग्लंडमध्यें इतर देशांच्या शिलका साचल्या आहेत, त्यांस कारण युद्धप्रयत्न असून त्याचे संबंधांत इंग्लंडला जबर स्वार्थत्याग करावा लागला आहे. ह्या शिलकांचा बोजा एवढा मोठा झाला आहे कीं तो सहन करणें व मोकळा करणें इंग्लंडच्या युद्धोत्तर व्यापारी व औद्योगिक भरभराटीवर अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. यास्तव आपल्या शिलका मोकळ्या करण्यास धनको देशांनीं इंग्लंडला सहाय दिलें पाहिजे आणि तडजोडीनें व सवडीनें हा कार्यक्रम पार पाडून घेतला पाहिजे. प्रस्तुत व्यवहारांत धनको देशांस त्यांनीं पुरवलेल्या मालाच्या अवाच्या सवा किंमती मिळाल्या आहेत आणि त्यांच्या शिलका मोकळ्या होण्यांत अडचणी व गैरसोयी उत्पन्न होत असल्या तरी इंग्लंडच्या युद्धत्यागाचे मानानें त्या कांहींच नव्हत." इंग्लंडच्या वतीनें वरील प्रकारचा युक्तिवाद मांडण्यांत आलेला आहे. हिंदी स्टर्लिंग शिलका लंडनमध्यें सुखासुखी किंवा अवास्तव नफ्याच्या स्वरूपांत साठलेल्या नसून त्यांच्या बाबतींत ह्या देशाच्या लोकांस महामाईची आपत्ति सोसावी लागली आहे आणि त्या पैशाची गरज त्यांस तीव्रतेनें भासत आहे ही गोष्ट ब्रिटिश कोटिक्रमास उत्तर म्हणून स्पष्टपणानें सांगण्यांत आली आहे. तथापि ब्रिटिश वृत्तपत्रें आणि व्यवहार-नेते ह्यांनीं आत्मसमर्थनाचा आणि विरुद्ध बाजूवरील टीकेचा क्रम चालूच ठेवला आहे.

---

### हुंडणावळीचा दर आणि स्टर्लिंग

इजिप्त देशाच्या स्टर्लिंग शिलकांची स्थिति हिंदुस्थानच्या लंडनमधील अडकलेल्या येण्यासारखी झाली आहे असें वर म्हटलें आहे. अमेरिकेंत भरलेल्या चलन परिषदेस इजिप्तच्या वतीनें शिष्टमंडळ गेलें होतें त्याचें नेतृत्व मि. लॅकनीबे ह्यांचेकडे होतें. त्यांनीं ब्रिटिश पुरस्कर्ते, डॉ. ऐंझिग, ह्यांच्याशी केलेल्या वादविवादाचें इतिवृत्त प्रसिद्ध झालें आहे तें बोधप्रद आहे. डॉक्टर मजकुरांचें असें म्हणणें आहे कीं इजिप्त, हिंदुस्थान वगैरे देशांनीं इंग्लंडला युद्धसामुग्री पुरवली ती विलक्षण चढलेल्या किंमतींनीं विकली आणि मालाबद्दल लंडनमध्यें दिल्या गेलेल्या स्टर्लिंगचा हिशेब मात्र जुन्या व स्थिर हुंडणावळीच्या दरानें करण्यांत आला. ह्या योगानें स्टर्लिंगच्या रकमा फुगल्या असून इंग्लंडमधील बाजारभाव अल्प प्रमाणांत चढले असल्यानें त्या इंग्लंडला डोईजड झाल्या आहेत. चढलेल्या भावांनें खरेदी केलेल्या मालाच्या मोबदल्यांत इंग्लंडला स्वस्त किंमतीनें माल द्यावा लागून भयंकर नुकसान सोसावें लागणार आहे ह्याचा विचार इजिप्त व हिंदुस्थान ह्यांचे-सारख्या धनको देशांनीं व्यवहारी भावनेनें केला पाहिजे असा डॉ. ऐंझिग ह्यांचा युक्तिवाद आहे. ब्रिटिश आणि इजिप्शन व हिंदी बाजारभाव ह्यांच्या परस्पर-प्रमाणास अनुसरून हुंडणावळीचा दर बदलला गेला असता तर इंग्लंडचें देणें मर्यादित झालें असतें ह्या त्यांच्या मुद्यास अनुलक्षून मि. लॅकनीबे म्हणतात कीं हुंडणावळीचा दर डांबून न ठेवला जातां मोकळा सोडला गेला असता तर तो इंग्लंडला अधिक प्रतिकूलच झाला असता. इंग्लंडची निर्गत मर्यादित झालेली असतां स्टर्लिंगची किंमत उतरणें अपरिहार्यच होतें. इजिप्तनें सोन्यावर आपलें चलन आधारलें असतें किंवा इराणप्रमाणें सोनें मिळण्याचा व त्याचा निधी बनवण्याचा आग्रह धरला असता तर हुंडणावळ आपल्या देशास अनुकूल झाली असती आणि इजिप्शन बाजारभाव चढले नसते. परंतु वस्तुस्थिति अशी झाली आहे कीं इजिप्तच्या हातीं त्याच्या मालाच्या मोबदल्यांत ब्रिटिश रोखे पडले आहेत आणि त्या देशाचे वाटेल त्या बाजारांत व इच्छेप्रमाणें खरेदी करण्याचें सामर्थ्य नष्ट झालें आहे. ही विचारसरणी ब्रिटिश तज्ञांनीं मान्य केली आहे, पण इंग्लंडच्या आर्थिक अडचणींवर ते जोर देत आहेत आणि त्यांच्या अनुरोधानें स्टर्लिंग शिलकांचा अवघड प्रश्न सर्वांच्या, विशेषतः अमेरिकेच्या सहकार्यानें देवाण-घेवाणच्या भावनेनें सोडवला जावा असें त्यांचें म्हणणें आहे.

---

### महाराष्ट्र बँकेची गेल्या वर्षांतील प्रगति

बँक ऑफ महाराष्ट्रानें गेल्या वर्षी आपलें भाग भांडवल दोनदां वाढविलें. आतां तिचें २० लक्ष रुपयांचे भाग खपलेले आहेत. प्रत्येक भागावर दोन्ही वेळेस ५ रुपये वाढावा घेण्यांत आला, त्याची रकम १,३२,९९५ रुपये भरली ती रिझर्व्ह फंडांत जमा करण्यांत आली. रिझर्व्ह व कॉन्टिन्जन्सी फंड आतां २,०८,९९५ रुपये झाला आहे. बँकेचें खेळतें भांडवल १ कोटि रुपयांवर गेलें आहे. गेल्या वर्षी बँक आपलें पैसे कर्जांत किफायतशीर गुंतवूं शकली व त्यामुळें सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीचें प्रमाण प्रमाणांत आलें आहे. गिरगांव (मुंबई) व खडकी येथें बँकेनें शाखा उघडल्या. १९४४ सालांतील व्यवहारांत बँकेस ८६,७३३ रुपये नफा झाला. त्यांतील ४०,००० रुपये इनकमटॅक्स व सुपरटॅक्स खाणार असून भागीदारांस ४½% डिव्हिडंड व १% बोनस मिळावयाचें आहे. वर्षअखेर बँकेचें नांव शेड्यूल्ड बँकांच्या यादींत रीतसर दाखल झालें.

---

### बँकेच्या शाखांचें ऑडिट सक्तीनें होण्याची आवश्यकता

सध्याच्या कंपनी कायद्याप्रमाणें, आपल्या शाखांचे हिशेब कंपनी कायद्यांत सांगितलेल्या ऑडिटरमार्फत तपासून घेण्याची जबाबदारी बँकांवर नाहीं. बँकेच्या मुख्य कचेरींतील हिशेबाची पुस्तकेंच फक्त त्यास दाखविलीं तरी चालतात. शाखांच्या हिशेबांचे बाबतींत बँकेनें दिलेले तक्ते त्यास स्वीकारावे लागतात. शाखांकडील हिशेब चुकीचे असल्यामुळें बँकेचा सबंद ताळेबंद खोटा ठरला, तर ऑडिटरला त्यासाठी जबाबदार धरतां येणार नाहीं. चांगल्या बँका आपल्या शाखांचें ऑडिट मध्यवर्ती कचेरीच्या ऑडिटप्रमाणेंच करून घेतात, परंतु सर्व बँकांवर त्याची सक्ती आज नाहीं, ती करण्यांत यावी, असें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें सुचविलें आहे.

## युद्धोत्तर व्यापारी धोरणाचें स्वरूप

"अमेरिकन सरकारनें कापूस निर्गत करण्याकरितां विशेष सवलती दिल्या आहेत त्यांचा मुख्य हेतू हिंदुस्थान-ब्राझीलासारख्या कपास पिकविणाऱ्या इतर देशांतील कपाशीची लागवड कमी व्हावी असा आहे.......अन्न-टंचाईमुळें पूर्वी कपाशीखालीं असलेली जमीन जरी आज अन्न-उत्पादक-पिकें काढींत असली तरी हिंदुस्थाननें कपाशीची परराष्ट्रीय बाजारपेठ युद्धोत्तर गमावणें इष्ट नाहीं." :—सर चुनिलाल बी. मेहता.

* * *

इंग्लंड, फ्रान्स, बेल्जिअम आणि हॉलंड या देशांतील युद्धामुळें उध्वस्त झालेल्या प्रदेशांची आर्थिक पहाणी करण्याकरितां प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं जज्ज सॅम रोझेन्मन यांची नेमणूक केली आहे.

* * *

"इंग्लंडांतील बँका, विमा कंपन्या व उद्योग-धंद्यांत रकम गुंतविणाऱ्या व्यापारी पेढ्या ह्यांनीं पुढाकार घेऊन युद्धोत्तर उद्योग-धंद्यांना भांडवल पुरविण्याचें कार्य करणाऱ्या दोन कंपन्या स्थापन केल्या आहेत.

पहिल्या कंपनीचें नांव 'फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेड' असें आहे. भांडवल २½ कोटि पौंड. भांडवलाच्या चौपट म्हणजे १० कोटि पौंडपर्यंत कर्ज काढण्याचा अधिकार. राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें धंदे-कारखान्यांची पुनर्घटना नि वाढ झपाट्यानें होणें इष्ट असून त्यामुळें आज असलेला रोजगार कायम राहून तो वाढविण्यास मदत होईल. त्याकरितां उद्योग-धंद्यांना अल्प अगर दीर्घ मुदतीचें भांडवल पुरविणें हा या कंपनीचा मुख्य उद्देश आहे. सरकारच्या आर्थिक धोरणास अनुसरून नि त्याला विश्वासांत घेऊन कंपनीचें काम चालणार आहे.

"दुसऱ्या कंपनीचें नांव इंडियन इंडस्ट्रिअल अँण्ड कमर्शिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन लिमिटेड' असें आहे, भांडवल १½ कोटि पौंड. भांडवलाच्या दुप्पट म्हणजे ३ कोटि पौंडांपर्यंत कर्ज काढण्याचा अधिकार. लहान व मध्यम व्यापार-उद्दीमांना ५ हजारांपासून २०० पौंडांपर्यंत मध्यम आणि दीर्घ मुदतीचें भांडवल पुरविणें हा या कंपनीचा उद्देश आहे." :—सर जॉन अँडरसन, ह्यांचें कॉमन्स सभेंतील भाषण.

* * *

"युद्धकाळांत गमावलेला परदेशचा व्यापार परत मिळविण्याकरितां ब्रिटिश सरकार व व्यापारी यांनीं एकजुटीनें प्रयत्न केले पाहिजेत. ब्रिटिश सरकार निरनिराळ्या बाजारपेठांचा अभ्यास करीत असून २६ राष्ट्रांतील आर्थिक पहाणीचे अहवाल तयार होत आले आहेत. निरनिराळ्या देशांत सरकारतर्फें बाजारपेठ-अधिकारी नेमण्यांत येणार आहेत. निर्गत व्यापार करणाऱ्या मंडळींनीं गट बनवून आपले स्वतंत्र प्रतिनिधीहि परदेशी पाठवावेत. ब्रिटिश बनावटीचा छाप असलेल्या कांहीं उच्च दर्जाच्या वस्तू निरनिराळ्या देशांत पाठविण्यांत कां येऊं नयेत?" :—लॉर्ड वूल्टन, पुनर्घटना मंत्रि.

### मुंबई शहरांतील चहा-कॉफीचे दर

१५ फेब्रुवारीपासून मुंबई शहरांतील तयार चहा-कॉफीचे नियंत्रित दर खालीलप्रमाणें रहातील:—

६ औंस चहाचा पेला : १ आणा

६ औंस कॉफीचा पेला : १॥ आणा

दही-ताक करण्यासाठीं हॉटेलांना दूध विकत घेतां येणार नाहीं; तयार दही किंवा दूध बाजारांतून विकत घेण्यास हरकत नाहीं. चहा-कॉफींत "स्किम" दुधाची पूडच वापरली पाहिजे.

—कोको प्या—

कोको हे उत्कृष्ट पेयाच आहे. सध्यांच्या अन्नटंचाईच्या दिवसांत तर अशा पेयाची अधिक जरूरी आहे.

"सॅचवर्क"

कोकोची मागणी करा. म्हणजे स्वस्त, उत्कृष्ट व शुद्ध कोको मिळेल.

—साठे चॉकोलेट वर्क्स,
पुणें २.

आंतरराष्ट्रीय कीर्ति—
मिळविलेल्या नृत्यकार
रामगोपाल व जानकी
यांचे अपूर्व नृत्य पहाण्यास मिळतें.



द्रौपदी —रोज ६॥ व १० व

प्रमुख भूमिका—सुशिलाराणी M.A.L.T.
डायमंड प्रकाशन. नवहंस चित्र.

प्रभात (किंवा लक्ष्मी थिएटर) फो. ५५६ पुणें.

रविवार ता. १८ रोजीं सकाळीं १० वाजतां
'GREAT GUNS' भूमिका—लॉरेल व हार्डी

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसी
सा. न. वि. वि.

यापुढें आपणांस उदासीन राहून चालणार नाहीं. डोळे मिटून आंधळेपणानें वागून चालणार नाहीं. दीन-दुबळं राहून टिकाव लागणार नाहीं.—जगांत जर मानानं, वैभवानं राहावयाचं असेल तर !

जीवनांतील गतिमानता झपाट्यानें वाढत आहे. अंतर आतां तासांत मोजलं जात आहे. जीवित नि संपत्ति अल्पावधींत धुळीस मिळत आहेत. अन् तितक्याच द्रुत गतीनं नवीन जग निर्माण करण्याचे प्रयत्न चाललेले दिसतात. जादूची कांडी फिरविल्या-प्रमाणें रंकाचा राव झाल्याचं दिसतं. पिढ्यान् पिढ्या राज-शाही ऐश्वर्यानें—दिमाखानं नटलेले प्रासाद उध्वस्त होऊन त्या जागीं चिखल-माती-प्रेतं यांचा खच पडल्याचंहि वाचण्यांत येतं. विजयाचा कैफ चढतो ना चढतो तोंच पराभवाची दारुण निराशा पदरीं आलेली प्रत्यहीं पाहण्यांत येत आहे. ही जगड्व्याळ गतिमानता आपणां सर्वांच्या जीवनावर दूरगामी परिणाम केल्याखेरीज राहणार नाहीं !

स्वातंत्र्य टिकविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या बलिदानाच्या रक्तानं लिहिलेल्या रोमांचकारी कथा आपण गेलीं पांच वर्षे वाचीत आहोंत. त्यावरून गमावलेलं स्वातंत्र्य मिळविण्याकरितां युरोपिअन राष्ट्रांस लागणाऱ्या तपस्येची नि त्यागाची मनोमय कल्पना येते.

सध्या अमेरिकेंत असलेल्या श्री. विजयालक्ष्मी पंडित दोस्त राष्ट्रांच्या युद्धहेतूंबद्दल म्हणतात :—

दोस्त राष्ट्रांचं, शांतता-प्रिय नि सरळ-मनाचीं असं वर्णन असल्याचं मी ऐकलं आहे. तूर्त सत्ताधारी असंच वर्णन करणं मला बरं वाटतं: विजय-प्राप्तीच्या वेळीं आपल्याला अधिक सत्ता कशी बळकवतां येईल हेंच त्यांना ठरवावयाचं आहे असें दिसतें. या युद्धाचे मौलिक हेतू काय हें अजून न समजलेल्या असुखी मंडळींपैकीं मी एक आहें. जेव्हां हें युद्ध संपेल तेव्हां तें एका राष्ट्र-गटाजवळ दुसऱ्या राष्ट्र-गटापेक्षा अधिक मनुष्य-बळ, पैसा नि युद्ध-साहित्य असल्यामुळेंच. त्यामुळें ही शांतता मानव्याचे मूलभूत हक्क कोणते हें दर्शविणारी ठरणार नाहीं.

आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा विचार करण्याकरितां अमेरिकेंत निर-निराळ्या परिषदा भरल्या-भरत आहेत. या परिषदांना हिंदी प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याकरितां सर चिंतामणराव देशमुख, मि. ए. डी. श्रॉफ, सर रघुनाथराव बेवूर, सर चुनीलाल वी. मेहता, श्री. गगनविहारी मेहता, डॉ. हृदयनाथ कुंझरू यांसारखी हिंदी आकांक्षांबद्दल जागृत असलेली मंडळी गेली होती. त्यांच्या अमेरिकेंतील भाषणांचा इकडील वृत्तपत्रांत देण्यांत आलेला गोषवारा नि हिंदुस्थानांत परत आल्यावर प्रसिद्ध झालेल्या मुलाखती यांचा अभ्यास केला असतां ही गोष्ट स्पष्ट होते कीं दोस्त राष्ट्रांतहि हिंदुस्थानाला देण्यांत आलेलें स्थान त्याच्या राजकीय दर्जानुरूप असेल कदाचित्, पण त्याच्या आकांक्षांनुसार तें खास नाहीं. हिंदी संस्कृति, हिंदी सैनिक, हिंदी युद्धकार्य यांबद्दल कितीहि स्तुति-सुमनें गाइलीं जात असूं देत: हिंदी राजकीय आकांक्षांबद्दल कितीहि सहानुभूति दाखविली जात असूं दे—आम्ही आभारी आहोंत त्याबद्दल—पण त्यानं आमचं समाधान होत नाहीं.

ह्या घटनांचा अभ्यास आम्हीं करायला हवा. आंतरराष्ट्रीय परिस्थिति-विचारप्रवाह बदलण्याची कुवत आमच्यांत आज आहे असं मला वाटत नाहीं. तथापि बदलणाऱ्या परिस्थित्यनुरूप आपलं घर ठाकठीक ठेवण्याचं कार्य आपल्याला करावयालाच हवं. प्राप्त परिस्थितीचं ज्ञान तर हवंच पण त्याबरोबरच 'हें नको तें नको' असं म्हणत न बसतां इष्ट असेल तितकं पदरांत पाडून घेऊन मग आपल्याला काय हवं, काय नको हें सांगा—कानीं-कपाळीं ओरडून सांगा. पण अडून बसूं नका. नाहींतर 'आंधळी दळते नि कुत्रा पीठ खातो' असं व्हावयाचं ! रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामणराव देशमुख नि हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर वाढ व पुनर्घटना खात्याचे प्रमुख सर अर्देशीर दलाल यांनीं याच अर्थाचा उपदेश वेळोवेळीं केला असून त्याचें महत्त्व आपण विसरून चालणार नाहीं.

राजकीय, आर्थिक नि सामाजिक प्रश्न परस्परावलंबी आहेत. प्रसिद्ध झालेल्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनांच्या निमित्तानं या परस्पर-संबंधाचें स्पष्टीकरण होत आहे. जनतेला जबाबदार असलेलें राष्ट्रीय सरकार असल्याखेरीज राष्ट्रीय प्रगतीच्या दिशा उजळत नाहींत, हा मूलभूत सिद्धांत आहे. तथापि, मला वाटतं, आपण प्रथम अर्थजीवि आहोंत; नंतर सारं कांहीं. म्हणूनच सुचवावंसं वाटतं कीं, शक्य झाल्यास आपल्या वतीनं आर्थिक प्रश्नांचा विचारविनिमय करणारीं अभ्यास-मंडळें स्थापन व्हावीत. गुंतागुंतीच्या आर्थिक व्यवहारांची उकल सर्वांना समजेल अशा शब्दांत व्हावी. जागतिक आर्थिक घडामोडी व त्याचे आपल्या जीवनावर होणारे परिणाम यांची माहिती करून घेण्याच्या सर्वांच्या अपेक्षा उंचावत आहेत !

—संजय

## मद्रास हायकोर्टाचा 'ॲडव्होकेट' संबंधीं निर्णय

मद्रास हायकोर्टाव्यतिरिक्त इतर हायकोर्टांची सनद असलेल्या ॲडव्होकेटना मद्रास हायकोर्ट व त्याच्या कक्षेखालीं येणाऱ्या इतर कोर्टांतून वकिली करतां येईल कीं नाहीं याचा निर्णय मद्रास हायकोर्टाच्या फुलबेंचनें नुकताच दिला आहे. इंडियन बार कौन्सिल्स ॲक्टप्रमाणें जे ॲडव्होकेट नोंदले गेले असतील तें जरी दुसऱ्या कोणत्याही हायकोर्टांत नोंदले गेले असले तरी त्यांना नुसत्या मद्रास हायकोर्टांतच नव्हे तर मद्रास इलाख्यांतील दुसऱ्या कोणत्याही कोर्टांत काम चालवितां येईल असें निर्णयात्मक मत फुलबेंचनें दिलें आहे; अर्थात् लीगल प्रॅक्टिशनर्स ॲक्टप्रमाणें सनद मिळालेल्या वकिलांना याप्रमाणें काम करतां येणार नाहीं.

### हिंदुस्थान सरकारचें अपील फेटाळलें

मद्रास सरकारनें बसविलेला सेल्स टॅक्स ही त्या सरकारच्या अधिकारांतील बाब आहे; तो कर बसविल्यामुळें मध्यवर्ती सरकारच्या अधिकारावर अतिक्रमण झालेलें नाहीं, असा हिंदी फेडरल कोर्टानें निवाडा केला होता, त्यावर हिंदुस्थान सरकारनें प्रिव्हि कौन्सिलकडे अपील केलें होतें, तें फेटाळण्यांत आलें आहे. मेसर्स बोड्ड पैद्दण्णा ॲंड सन्सवर मद्रास सरकारनें भुईमुगाच्या तेलाचे विक्रीबाबत बसविलेल्या १६० रु. ११ आ. करावरून हें प्रकरण उपस्थित झालें. विजयानगरमच्या कोर्टानें कर बेकायदा ठरविला, त्यावर मद्रास सरकारनें हायकोर्टांत अपील केलें. हायकोर्टानें अपील फेटाळल्यावर प्रकरण फेडरल कोर्टांत गेलें व तेथून तें अखेर प्रिव्हि कौन्सिलपर्यंत पोंचलें.

### वाढलेला नफा करानें खाल्ला

हिंदी बँकांस १९४४ सालीं फायदा खूपच झाला आहे. खालील तक्त्यांत चार प्रमुख हिंदी बँकांसंबंधीं आकडे दिले आहेत, त्यांवरून बँक ऑफ बरोडानेंच फक्त डिव्हिडंड १%नें वाढविलें आहे. सेंट्रल बँक व बँक ऑफ इंडिया ह्यांनीं आपलें भांडवल वाढविलें असल्याकारणानें, त्यांस पूर्वीचाच डिव्हिडंडचा दर कायम ठेवण्यास जास्त रकम लागली व डिव्हिडंड वाढविण्यास कूस राहिली नाहीं. सेंट्रल बँकेनें रिझर्व्ह फंडांत फारच थोडी भर टाकली व बँक ऑफ बरोडानें तर मुळींच भर घातली नाहीं. सेंट्रल बँकेचा नफा वाढला, तरी त्यापेक्षा ज्यास्त प्रमाणांत कराची तरतूद करावी लागून नफावाटणीस रकम कमीच उरली. युनायटेड कमर्शिअल बँकेस डिसेंबर, १९४४ अखेर नऊ महिन्यांत १२ लक्ष, ८४ हजार रुपये नफा झाला, परंतु नफा-वाटणी न करतां ७¾ लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्याचें तिच्या डायरेक्टरांनीं ठरविलें आहे.

आकडे लक्ष रुपयांचे आहेत.

| | नफा | करासाठीं रिझर्व्ह | गंगाजळी व इतर रिझर्व्ह | डिव्हिडंड रक्कम | डिव्हिडंड % | पुढील हिशेबांत ओढले |
|---|---|---|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | | करासाठीं तरतूद करून नफा काढला | | | | |
| १९४२ | ९१ | | १२¾ | ६७½ | १२ | ४५½ |
| १९४३ | ९० | | १० | ६७½ | १२ | ४७½ |
| १९४४ | ९८ | | १५ | ६७½ | १२ | ४३½ |
| सेंट्रल बँक | | | | | | |
| १९४२ | ४८ | १० | १५ | १७ | १० | १० |
| १९४३ | १०७ | ६० | २१ | २० | १२ | १०½ |
| १९४४ | ११७ | ७५ | ४ | २५¼ | १२ | १५¾ |
| बँक ऑफ इंडिया | | | | | | |
| १९४२ | २६½ | ६ | ६½ | १२ | १२ | ११¾ |
| १९४३ | ४३ | १५ | १२ | १२ | १२ | १३½ |
| १९४४ | ६५½ | ३१ | १४½ | १५ | १२ | १४½ |
| बँक ऑफ बरोडा | | | | | | |
| १९४२ | ९½ | २ | ० | ६ | १० | ३ |
| १९४३ | १८¾ | ८ | १ | ६½ | १० | ४ |
| १९४४ | २३½ | १० | ० | १०¼ | ११ | ४½ |

### सरकारच्या बिनहिशेबी उधळपट्टीवर कडक टीका

युद्धप्रचारासाठी केलेल्या बिनहिशेबी खर्चावर मध्यवर्ती असेंब्लींत खालीलप्रमाणें कडक टीका झाली. प्रांतिक सरकारांकडून समाधानकारक हिशेब मिळविणें आपणांस फार कठीण गेलें, असें ऑडिटर जनरलनीं आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे. बंगाल सरकारनें हिंदुस्थान सरकारतर्फे खर्च करतांना सुमारें ३ कोटि रुपये नासले. हिंदुस्थानांत येणाऱ्या बिगर हिंदी निर्वासितांस दिलेल्या रकमांची ब्रिटिश सरकारनें जबाबदारी पत्करली, परंतु चोख हिशेब व पावत्या ह्यांचे अभावीं त्या सरकारकडून पैसे मिळविणें कठीण होत आहे. फडनवीसांनीं वरील टीकेस उत्तर देतांना, वस्तुस्थिति मान्य केली; परंतु त्याबरोबरच त्यावेळच्या विशिष्ट संकटकालाची जाणीवहि करून दिली. तथापि, घडलेल्या गोष्टींची सारवासारव करण्यास मात्र ते तयार नव्हते.

### मुंबईसाठी निर्जल दूध

मुंबई शहरांतील अर्भकें व वाढतीं मुलें यांस पुरेसें सकस दूध मिळावें म्हणून हॉटेलांस निर्जल दूध म्हणजे मलई काढलेल्या दुधाची पूड पुरविण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. हें ऐकतांचें "आम्हांस शुष्क निःसत्त्व दूध मिळणार" अशी कांहीं ठिकाणीं हाकाटी सुरू झाली आहे. शास्त्रीय रीत्या विचार केल्यास ही भीति फोल आहे हें दिसून येईल.

शुद्ध दुधांत पाणी, अल्बुमेन, लॅक्टोज (मिल्क शुगर), प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स (मुख्यतः "डी"), क्षार व चरबी हे घटक असतात. लहान मुलांस इतर कोणतीहि चरबी वा स्निग्ध पदार्थ दुधांतील चरबीइतके सहजगत्या पचत नाहींत. मोठ्या माणसांस इतर पुष्कळ मार्गीं चरबी मिळते व चहाच्या कपांत घातलेल्या दोन चमचे दुधांतील चरबीचें महत्त्व त्यांच्या दृष्टीनें गौण आहे. चहाकडे उजेडांत बघितलें म्हणजे वर जो तेलकट तवंग दिसतो ती दुधांतील चरबीच होय. दूध "स्किम" केलें (घुसळलें) कीं त्यांतील स्निग्ध पदार्थ लोण्याच्या रूपानें वर येतात व खालीं "स्किम" दूध राहतें. दुधाचे मुख्य घटक जे प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स व क्षार, ते या दुधांत पुरेपूर असतात.

नंतर या दुधांतील पाणी व्हॅक्यूमनें काढण्यांत येतें. बाकी सर्व द्रव्यें तशींच राहतात, मात्र दुधाची पूड होते व वजनानें व आकारानें दूध ९० टक्के कमी भरतें (कारण दुधांत सुमारें ९० टक्के पाणी असतें!) या विद्रवीकरणानें बरेच फायदे होतात. त्यामुळें दूध वाहतुकीस फारच सोपें जातें, बराच काळ टिकतें व दुधाच्या शुद्धतेबद्दल शंका रहात नाहीं. शिवाय दूध पातळ असल्याची तक्रार उरत नाहीं! सध्या ही पूड बाहेरील देशांतून आणावयाची आहे. हिंदुस्थानांत ही पूड तयार करण्याची खटपट चालू आहे. ती यशस्वी झाल्यास सर्वांचाच फायदा होईल यांत शंका नाहीं.

श्री. चिं. का.

### ग्रामोद्योग संवर्धक मंडळ लि., लिंब-गोवा

मंडळाचे व्यवस्थेखालीं चालू असलेल्या 'लोकसेवा वीव्हिंग मिल्स' मध्यें अहवालाचे सालीं ८ मागच चालू होते. मिलची १० मागांची वाढ याच सालांत झाली, परंतु शेड वाढविणें, माग बसविणें यांत बरेच दिवस गेल्यानें या सालांत वाढीचे माग चालू होऊं शकले नाहींत. चालू सालीं चालू मागांचें सरासरी प्रमाण ६ पडलें व त्यावर एकूण कापड ४५,००० वार निघूं शकलें. मशिनरी वगैरेचा घसारा ७३१ रु. काढून निव्वळ नफा रु. ११८५८२ इतका झाला आहे. सदर नफ्यांतून भागीदारांना ९ टक्के प्रमाणें डिव्हिडंड द्यावें अशी शिफारस डायरेक्टर बोर्डानें ता. २१-१२-४४ चे सभेंत केली आहे. रिझर्व्ह फंडांत १५० रुपये जातील. मंडळाचें वसूल भांडवल ५,९०० रुपये असून त्याचेकडे ठेवी ४६,००० रुपयांच्या आहेत. लहान प्रमाणावरील हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल चालकांचें अभिनंदन केलें पाहिजे.

### दि लासलगांव मर्चंटस को. बँक लि.

ह्या बँकेचा उद्घाटन समारंभ बुधवार ता. १७-१-४५ रोजीं श्री. वैकुंठ एल. मेहता ह्यांचे हस्तें होऊन सदर बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली.

श्री. वैकुंठराय यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सहकारी बँका व जॉइंट स्टॉक बँका यांमधील फरक विशद करून सांगितला आणि संस्थेच्या स्थापनेबद्दल आनंद प्रदर्शित करून सर्वत्र अशा संस्था निघणें अत्यंत इष्ट आहे असें सांगितलें.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २१ फेब्रुवारी, १९४५ अंक ८

## नोटीस.

### दी बँक ऑफ औंध लिमिटेड औंध.

नोटीस देण्यांत येते कीं :—

बँकेच्या भागीदारांची सातवी सर्वसाधारण सभा रविवार ११ मार्च, १९४५ रोजीं दुपारीं ४ वाजतां ( स्टँ. टा. ) औंध येथें श्रीयमाई देवींचे मंडपांत खालील कामाकरितां भरणार आहे.

१ ३१ डिसेंबर, १९४४ असेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

*२ डिव्हिडंड व बोनस जाहीर करणें.

३ व्यक्तिशः भागीदारांतर्फे दोन डायरेक्टर्स व सहकारी सोसायट्यांतर्फे एक डायरेक्टर यांची निवडणूक करणें.

४ श्री. वा. रा. वर्तक, जनरल मॅनेजर, यांची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून बँकेचे आर्टिकल नं. ५८ ला अनुसरून नेमणूक करणें.

५ नवीन सालाकरितां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाचे हुकुमावरून
वा. रा वर्तक,
जनरल मॅनेजर.

औंध,
ता. १५ फेब्रुवारी, १९४५

वि. सू.:—बँकेचीं ट्रॅन्सफर बुकें ता. ११-३-४५ ते ता. २४-३-४५ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

* डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें सोमवार ता. २६ मार्च १९४५ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागिदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## भोर स्टेट बँक, लिमिटेड

भोर येथें स्थापन झालेली भागिदारांची बँक
हेड ऑफिस : राजवाडा चौक, भोर.
( स्थापना—ऑ. १९४४ )

—भांडवल—

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. ५,००,००० | रु. २,५०,००० | रु. १,२५,००० |

खेळतें भांडवल रु. ३,५०,०००

—डायरेक्टर बोर्ड—

*रावबहादूर कृष्णराव रामराव शितूत, बी. ए., चेअरमन.*
श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. ल. र. साने, श्री. ग. मे. साठे,
श्री. ल. रा. मोडक, श्री. शं. ना. कर्पे, श्री. म. व्यं. शिंगरे,
श्री. वि. वि. बावडेकर, श्री. य. वि. लोणकर.

बँकेची पहिली शाखा
लवकरच पाली, ता. सुधागड (भोर स्टेट)
येथें उघडली जाणार आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. वा. काळे,
मॅनेजर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स**
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
**पूना गेस्ट हाऊस**
टेलिफोन नं. ७७१

# विविध माहिती

### " प्रवासांत टापटीपीकडे लक्ष पुरवा "

प्रवासांत लष्करी सैनिकांनीं स्वच्छता, लष्करी छाप व सर्वसाधारण हुशारी ह्यांकडे विशेष लक्ष पुरवावें, अशी कमांडर-इन-चीफनीं हिंदी लष्करांतील सैनिकांना सूचना केली आहे. रेल्वे स्टेशनांवर व आगगाडीच्या डब्यांत सैनिक हे बिनलष्करी लोकांचें लक्ष वेधतात व त्या लोकांच्या होणाऱ्या ग्रहावर जनतेचें लष्करासंबंधीं होणारें मत अवलंबून आहे. म्हणून स्वच्छता आणि टापटीप राखण्याचा सैनिकांनीं शक्य तो प्रयत्न करावा, अशी कमांडर-इन-चीफची सूचना आहे.

### रंगीत कपाशीचें उत्पादन

रशियांत रंगीत कपाशीच्या लागवडीस प्रारंभ झाला आहे. चालू वर्षी ३,७०० एकरांत रंगीत कपाशीची लागवड होईल व तिचें १० लक्ष वार रंगीत कापड निघेल.

### रहाणीच्या खर्चाचें मान

इंग्लंडमध्यें युद्धकाळांत रहाणीच्या खर्चाचें मान ३३% वाढलें, परंतु कामगारांच्या वेतनांत ४५% वाढ झाली. हिंदुस्थानांत रहाणीच्या खर्चाचें मान २५०% वाढलें आहे व वेतनांतील सरासरी वाढ ५०% आहे.

### म्हैसूर संस्थानांतील सोन्याचें उत्पादन

म्हैसूर संस्थानांतील खाणींतून सोनें काढण्याचा धंदा चार कंपन्यांच्या हातीं आहे. ह्या चारहि कंपन्या इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या आहेत. खाणींपैकी सर्वांत खोल खाणीची खोली ९,०९१ फूट आहे. खाणींत सुमारें २० हजार लोक कामावर आहेत. त्यापैकी २१८ युरोपियन, ४०३ अँग्लो-इंडियन व बाकीचे हिंदी आहेत. म्हैसूरमधील खाणींतून आतांपर्यंत १५३ कोटि रुपयांचें सोनें निघालें आहे. १९४३ सालीं म्हैसुर सरकाराला खाणींच्या धंद्याबद्दल १ कोटि, ९२ लक्ष रुपये मिळाले व कंपन्यांनीं ५% ते ४०% डिव्हिडंड जाहीर करून ४५ लक्ष रुपये नफा वाटला.

### विचित्र अपघात

फुटबॉलचा सामना बघणारा एक प्रेक्षक काडीनें कान कोरीत असतां, चेंडू त्याचे हातावर आदळला व काडी कानांत खुपसली जाऊन त्या कानानें तो कायमचा बहिरा झाला.

### सोन्याचा साठा

फेडरल रिझर्व्ह बुलेटिननें गेल्या पांच वर्षीतील चलनी सोन्याच्या साठ्याचे आकडे प्रसिद्ध केले आहेत. युद्धापूर्वी अमेरिकेजवळ २,२०४ कोटि डॉलरचें चलनी सोनें होतें. आतां तें कमी होऊन २,०८२ कोटि डॉलरवर आलें आहे. इतर देशांजवळील चलनी सोन्याचा साठा वाढला आहे. इंग्लंड, जर्मनी, इटली व जपान ह्या देशांचे बाबत आकडे देण्यांत आलेले नाहींत.

### चिनी व रशियन भाषा

अलाहाबाद विश्वविद्यालयांत रशियन व चिनी भाषांच्या अभ्यासाची व्यवस्था करण्यांत येत आहे.

### ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांतील पहिली स्त्री-प्रोफेसर

डॉ. इडा मॅन ह्यांस वार्षिक २,००० पौंड वेतनावर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें प्रोफेसर नेमलें आहे. प्रोफेसरचा दर्जा प्राप्त होणारी ऑक्सफर्डमधील ही पहिलीच स्त्री आहे.

### म्यूच्युअल व सहकारी विमा कंपन्यांसच लहान विम्यांची सवलत

" जॉइंट स्टॉक विमा कंपन्यांना १,००० रुपयांखालील विमे स्वीकारतां येऊं नयेत, अशी कायद्याची तरतूद केली पाहिजे. म्यूच्युअल कंपन्या व सहकारी सोसायट्यांवर मात्र हें बंधन असूं नये. अशा कंपन्या व सोसायट्या ह्यांचें कार्य विम्याचे सत्या तत्त्वास धरून असल्याकारणानें त्यांचें इतर कंपन्यांपेक्षा जास्त महत्त्व आहे. ":- विमा कायदा दुरुस्तीच्या बिलावरील सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टास सर विठ्ठलराव चंदावरकर ह्यांची भिन्नमतपत्रिका

### जोधपूर कमर्शिअल बँक, लि., जोधपूर

वरील नव्या बँकेनें १ कोटि रुपयांचे भाग विक्रीस काढले आहेत, त्यांपैकी ५० लाखांचे भाग डायरेक्टर व त्यांचे स्नेही ह्यांनींच घेतले आहेत. मेसर्स कुळकर्णी आणि खानोलकर ह्या महाराष्ट्रीय ऑडिटरांच्या फर्मचें नांव बँकेच्या दोघां ऑडिटरांत पहिलें आहे.

### आठ कोटि रुपयांच्या यंत्रसामुग्रीची खरेदी

—कृत्रिम खतांच्या कारखान्यासाठीं हिंदुस्थान सरकारतर्फे ८,००,००,००० रुपयांची यंत्रसामुग्री परदेशांत खरेदी करावयाची आहे, त्याकरितां एक मंडळ इंग्लंड व अमेरिका येथे दौऱ्यावर जाणार आहे.

### " तंबाखूची राख जमा करा "

धूम्रपान करणारांनीं तंबाखूची राहिलेली राख टाकून न देतां जमा करून ठेवली तर, थोड्या काळांत पुष्कळ राख जमा होऊं शकेल. ह्या राखेंत खताचे गुणधर्म असतात. तेव्हां " राख जमा करा " असा प्रचार करणें फायदेशीर होईल. तंबाखूच्या वाया जाणाऱ्या गोष्टींचा किफायतशीर उपयोग वर्णन करतांना श्री. टी. नारायणराव ह्यांनीं वरील सूचना केली आहे.

### राष्ट्रीय युद्ध आघाडी

ह्या आघाडीचा राजकीय व वैयक्तिक पक्षांच्या प्रचारार्थ कांहीं प्रांतांत उपयोग केला असल्याचें सरकारास आढळून आल्यावरून ही आघाडी बंद करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### कोळशाच्या तुटवड्याचा कापडाचे उत्पादनावर परिणाम

कोळशाच्या तुटवड्यामुळें कापडाच्या गिरण्या बंद पडण्याचा प्रसंग कांहीं ठिकाणीं आला, त्यामुळें जानेवारी महिन्यांत २ कोटि ३७ लक्ष वार कापडाचें उत्पादन कमी पडलें. साहाजिकच त्या प्रमाणांत लोकांस होणारा कापडाचा पुरवठा मर्यादित होईल.

### ग्रेट ब्रिटनमधील इनकमटॅक्स

| कर वजा करण्यापूर्वी उत्पन्न ( पौंड ) | इनकमटॅक्स व सरटॅक्स % १९३८ | १९४२ |
|---|---|---|
| २५० खालीं | ०·२ | ३·० |
| २५० ते ५०० | २·९ | १४·६ |
| ५००–१,००० | ११·१ | २८·० |
| १,०००–२,००० | १७·० | ३८·७ |
| २,०००–१०,००० | २८·९ | ५१·९ |
| १०,०००–२०,००० | ४३·७ | ७३·७ |
| २०,००० वर | ५६·७ | ८४·४ |

# अर्थ

## युद्धोत्तर काळांतील वहातुक-प्रश्नांची रूपरेषा

वहातुकीचे मार्ग नि साधनें हा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न आहे. किप्लिंगनें ' वहातुक म्हणजे संस्कृति ' असें म्हटलें आहे. हिंदुस्थानचे लष्करी व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हल यापुढें जाऊन म्हणतात, ' युद्ध म्हणजे वहातुक. ' या समन्वयाचा पडताळा ह्यी युद्धांत चांगला येत आहे! मालाच्या आजच्या दुर्भिक्षाचें, दुष्काळाचें एक प्रमुख कारण वहातुकीच्या अडचणींतच सांपडतें असें सांगण्यांत येतें. सतत पांच वर्षे चौफेर लढाई देणाऱ्या जर्मनींत साहित्य नि सैनिक यांची प्रचंड ने-आण करण्याकरितां वहातुकीची व्यवस्था उत्कृष्ट असल्याचें सांगण्यांत येतें. वहातुकीच्या मार्गांवर नि साधनांवर सतत बॉंबवृष्टि करण्यांतील मर्महि यावरून लक्षांत येण्यासारखें आहे.

परस्पर वैचारिक नि व्यावहारिक देवघेवींचे संबंध वाढण्यास सुलभ नि स्वस्त वहातुकीची व्यवस्था असल्यास मदत होते. युद्धापूर्वी आपल्या रोजच्या वापरण्यांत असलेल्या अनेक वस्तू निरनिराळ्या देशांत तयार झालेल्या असत. आज निरनिराळ्या देशांतील प्रत्यक्ष माणसेंच आपल्या पहाण्यांत, ऐकण्यांत, परिचयांत येत आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळें आपल्या बदलणाऱ्या आचारांत कपडा-लत्ता, जेवण-खाण, समारंभ इत्यादींत परप्रांतीय नि परदेशीय यांच्या परस्पर संबंधानें—सहवासानें आपल्या बदलणाऱ्या विचारांची भर पडत आहे. न कळत पण निश्चित आपण औद्योगिक संस्कृतीचा अंगिकार करीत आहोंत!

युद्धोत्तर सरकारी नि बिनसरकारी पुनर्घटनांच्या योजनांत वहातुकीच्या प्रश्नाला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे, त्याचें कारण उघडच आहे. आजच्या प्रवासाचे हाल आपणा सर्वांच्या परिचयाचे आहेत. ह्या परिस्थितींत सुधारणा होणें निकडीचें आहे. आजच तसें करतां येत नाहीं. ह्याला कारणें अनेक आहेत. रेल्वे, रस्ते तयार करण्याकरितां लागणारी साधन-सामुग्री, मोटारी, आगबोटी, जहाजें, विमानें— हीं तयार करण्याचे कारखाने येथें हिंदुस्थानांत नाहींत! वाहनें चालू ठेवण्यासाठी लागणारा किरकोळ माल हिंदुस्थानांत तयार करणारे सुसज्ज कारखाने फारच थोडे आहेत. त्यांच्या कामाची सुरुवात मुख्यत: युद्धकाळांतीलच आहे. रेल्वेची मालकी आतां हिंदुस्थान सरकारची झालेली आहे. सरकारचें धोरण खाजगी कंपन्यांची मालकी आपणाकडे घेण्याचें आहे. मोटारचा धंदा प्रामुख्यानें हिंदी असणाऱ्या असंख्य लहान-मोठ्या कंपन्यांच्या हातांत आहे. तथापि त्यांचेवर मध्यवर्ती नियंत्रण नसल्यानें सारी बुद्धि, कष्ट नि पैसा आपसांत चढाओढ करण्यांत खर्च झालेला दिसतो. रेल्वेशीं चढाओढ हा प्रश्नहि महत्त्वाचा आहे. दर्यांच्या वहातुकींत सिंदिया कंपनीशिवाय दुसरी कोणतीहि हिंदी कंपनी परदेशी कंपन्यांच्या चढाओढींत टिकूं शकली नाहीं. हवाई वाहतुकीस नुकतीच सुरुवात झाली असून फक्त टाटा कंपनीचें हिंदी नांव हवाई वहातुक करणाऱ्या कंपन्यांत आढळतें.

हल्लींचें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच रेल्वेला मोटारीची स्पर्धा जाणवूं लागली होती. दोन्हींचा समन्वय घडवून आणण्याचे पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आले. त्याचे इष्ट परिणाम झाले; तथापि स्पर्धा नाहींशी झाली नाहीं. युद्ध सुरू झाल्यापासून वहातुकीचीं साधनेंच अपुरीं पडत असल्यानें स्पर्धेचा प्रश्नच राहिला नाहीं. तथापि युद्धोत्तरच्या काळांत रेल्वे-मोटार स्पर्धेचा प्रश्न पुन: उपस्थित होण्याची शक्यता असल्यानें समन्वयाचे प्रयत्न आजपासूनच सुरू झाले आहेत. गेल्या महिन्यांत दिल्ली येथें हिंदुस्थान सरकारचे युद्ध-वहातुक प्रमुख सर एडवर्ड बेंथॉल यांनी आपल्या एका भाषणांत वहातुकीबाबतचे सरकारचे विचार मांडले आहेत. ज्या ठिकाणीं रस्त्यानें मोटार वहातुकीनें काम भागण्यासारखें आहे तेथें नवीन रेल्वे नकोत. नागपूर योजनेप्रमाणें ४,००,००० मैल लांबीचे नवीन रस्ते हिंदुस्थानभर बांधण्याचा सरकारी संकल्प आहे. रस्ते आणि रेल्वे यांवर एकाच वेळीं कोट्यवधि रुपये खर्च करणें योग्य नाहीं. रेल्वे बोर्डाचा कार्यक्रम दर वर्षी ५०० मैल रेल्वे रस्ते बांधण्याचा आहे. वाहून न्यावयाला अवजड पण किंमतीनें कमी अशा कोळसा वगैरेसारख्या मालाकरितां रेल्वे रस्ते करण्याचा विचार करण्यांत येईल. युद्धोत्तर मोटार वहातुकीचें महत्त्व अधिक वाढेल.

रेल्वे हा मध्यवर्ती सरकारचा प्रश्न आहे तर रस्ते हें प्रांतिक सरकारचे खातें आहे. तेव्हां रेल्वे-मोटारीचा प्रश्न दोन्ही सरकारांच्या सल्लामसलतीनें सोडविण्यांत यावयाचा आहे. मोटार-प्रवासाचें भाडें, मार्ग नि माल यांचें नियंत्रण करून उतारूंच्या सुखसोईकडे अधिक लक्ष देण्यांत येईल. त्याकरितां प्रांतिक सरकारचे वहातुक-अधिकारी नेमण्यांत येतील. ज्या ठिकाणीं मोटार नि रेल्वे यांच्यांत स्पर्धा होण्याचा संभव आहे त्या ठिकाणीं मोटारचीं भाडीं व रेल्वेचीं भाडीं यांत समन्वय करण्यांस येऊन त्याप्रमाणें वहातुकीची व्यवस्था करण्यांत येईल. मोटार कंपन्यांच्या भांडवलांत कांहीं भाग सरकारी मालकीच्या रेल्वे कंपन्या घेऊन रेल्वे-मोटार कंपन्यांचे संबंध एकमेकांना पूरक करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. मोटार कंपन्यांत मध्यवर्ति सरकारचा किती हात असावयाचा हें निरनिराळ्या परिस्थितीवर अवलंबून राहील. त्याबाबत हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें यांचा विचारविनिमय होऊन यथाकाल काय तें जाहीर होईल. तथापि सरकारी नियंत्रणाचें तत्त्व सर्वसंमत असल्याचा निर्वाळा देण्यांत आला आहे. रेल्वे मोटारीप्रमाणेंच -अंतर्गत जल-वहातुकीचे दर, तसेंच किनारी जल-वहातुकीचे दर ठरविण्यांत येणार आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळें जल-विम्याचे दर वाढल्यामुळें रेल्वेपेक्षां बोटीनें माल नेण्याचें महाग पडूं लागलें. त्याबाबत सरकारनें जबाबदारी स्वीकारून दोन्ही दर समान होतील अशी व्यवस्था केल्याचें गेल्या महिन्यांत जाहीर केलें आहे.

हिंदुस्थानांत रेल्वेचे बॉयलर तयार करण्याकरितां टाटांना परवानगी मिळाली आहे. मोटारी बनविण्याकरितां वालचंद-बिर्ला यांच्या कंपन्या स्थापन झाल्या आहेत. हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें सुरू करावयाच्या उद्योग धंद्यांत प्रमुख असे बोटी बांधण्याचे कारखाने हिंदुस्थानांत काढण्यांत येतील असें हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर वाढ आणि नियोजन खात्याचे प्रमुख सर अर्देशीर दलाल यांनीं आश्वासन दिलें आहे. विमानें तयार करणाऱ्या कारखान्यांचें महत्त्व त्यांच्या ध्यानांत आहे असेंहि त्यांनीं सांगितलें आहे. वहातुकीचा प्रश्न राष्ट्रीय महत्त्वाचा असल्यानें वहातुकीचीं साधनें कोणाच्या मालकीचीं आहेत आणि तीं कोण पुरवितो ही गोष्ट जिव्हाळ्याची नि राष्ट्राचें भवितव्य ठरविणारी आहे.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें)

हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक लवकरच सादर होणार असल्यानें शेअर बाजार अंदाजपत्रकांत येणाऱ्या कमीजास्त करासंबंधीं तर्क करण्यामध्यें गढून गेलेला दिसत आहे. त्यामुळें अंदाजपत्रक होऊन गेल्याशिवाय विशेष कोठल्याही प्रकारची हालचाल होईल असें दिसत नाहीं. इकडे त्रिराष्ट्र प्रमुखांच्या बैठकीवरून जर्मनीचा निकाल लागला जाण्याची अगदीं नजिकच्या काळांतील शक्यता व त्यामुळें युद्धसमाप्तीस अनुलक्षून घेण्यांत येणारी दक्षता व नुकत्याच कोहिनूर गिरणीनें अपेक्षेविरुद्ध कमी दिलेलें दुसऱ्या सहामाहीचें व्याज (रु. ११+५) तसेंच मोरारजीचेंही नुकतेच जाहीर झालेले रु. १२ यामुळें बाजारांतील वातावरण स्वस्थ राहण्याकडे झुकत आहे. नुकत्याच बाहेर पडलेल्या रेल्वेच्या 'नाणा-खर्च्यातील' टाटा कंपनीला मिळणाऱ्या कंत्राटाच्या निश्चित बातमीमुळें टाटा डिफर्ड ऑर्डिनरी विशेष मजबुती दाखवीत आहे. नुकतेंच हे दोन्ही बरेच पडून गेले असल्या कारणानें यांची खरेदी नजिकच्या काळांत थोडीफार फायदेशीर ठरल्याखेरीज राहणार नाहीं असें वाटतें. सिमेंट कंपनीला नवीन भाग विकण्याला परवानगी मिळालेली आहे व कोणी एका मोठ्या मारवाडी आसामीनें ४० हजार शेअर्स उचलले या बातमीनें सिमेंटचे भाव झपाट्यानें २२८ वरून २३९ पर्यंत चढले. मात्र या भावामध्यें नवीन शेअर मिळाला तरीसुद्धां सिमेंटला आकर्षकपणा दिसत नाहीं. देशांतल्या मारवाडी मंडळींनीं या लढाईमध्यें अपरंपार पैसा मिळविला असल्याकारणानें चांगल्या कंपनीच्या शेअर्सला त्यांच्याकडून निश्चित टेका मिळेल असें धरून चालण्यास हरकत नाहीं.

मद्रासच्या बाजारामध्यें शेतीवर प्राप्तीचा कर बसविणार अशी बातमी आहे. तसेंच म्हैसूर सरकार पुढील वर्षापासून जादा नफ्यावर कराची आकारणी करणार या बातमीमुळें मद्रासचे शेअर्स अगदीं थंड आहेत. तिकडील 'वसंत' ३०० च्या आसपास, 'पंकज' २८० चे आसपास, 'बकिंगहॅम' ३०० चे आसपास, 'मदुरा' ७० चे सुमारास, 'म्हैसूर फिलेचर' २० चे सुमारास आणि 'दख्खन शुगर' आणि 'अबकारी' ८५ ला गुतविणारांना सुचविले जात आहेत.

ज्यांना थोडासा नफा अगदीं बेताचे जोखमीवर मिळविण्याची इच्छा आहे त्यांना चालू भावांत बेलापूर, प्रीमिअर कंस्ट्रक्शन, आणि टाटा ऑर्डिनरी हे सहकार्य करतील अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं.

## मुंबई शेअर बाजार

(मेसर्स व्ही. एम्. लिमये, आणि कं. पुणें ४ ह्यांजकडून)

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित ‡ अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | दि. १३।२।४५ | १४।२।४५ | १५।२।४५ | १६।२।४५ | १९।२।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २१००-०-० | २०९२-८-० | २१०७-८-० | २१३३-१२-० | २१४०-०-० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा ऑर्डिनरी | ७५ | ३९१-०-० | ३८९-०-० | ३९१-८-० | ३९७-०-० | ३९८-०-० |
| २२०१; १६९५ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १७८५-०-० | १७६५-०-० | १७७०-०-० | १७८०-०-० | १७८३-१२-० |
| ७६५; ५३३ | १६-०-० ‡ | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९५-०-० | ५८४-०-० | ५८७-०-० | ५९६-०-० | ५९९-०-० |
| ६५३; ४७५ | ३५-०-० ‡ | मे | स्वदेशी | १०० | ५३३-०-० | ५२८-०-० | ५३१-०-० | ५३३-०-० | ५३६-०-० |
| ४९८; ३६१ | १०-०-० ‡ | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३८५-०-० | ३८०-८-० | ३८२-०-० | ३८५-०-० | ३८५-०-० |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०३-०-० | २९९-०-० | ३०४-०-० | ३०७-०-० | ३०८-०-० |
| ३९४; २८२ | ६-०-० † | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९८-०-० | २९५-८-० | २९४-०-० | २९६-०-० | २९८-८-० |
| ३०५; २१८ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६०-०-० | २५४-८-० | २५६-८-० | २६०-०-० | २६०-०-० |
| ५-१०-६; ३-६ | ०-३-० ‡ | मे | अपोलो | २ | ४-१-६ | ४-१-० | ४-१-० | ४-२-६ | ४-२-० |
| २१-१४; १३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-१२-० | १४-८-६ | १४-१०-६ | १४-१५-० | १४-१५-० |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३-१-९ | ३-२-० | ३-१-६ | ३-२-६ | ३-२-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९२-८-० | ६८०-०-० | ६८२-८-० | ६९३-१२-० | ६९०-०-० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३४-१२-० | २३६-०-० | २३८-०-० | २३९-०-० | २३६-८-० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२०-८-० | २२२-०-० | २२७-०-० | २२७-०-० | २२४-८-० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५०-०-० | ५४७-८-० | ५४५-०-० | ५५०-०-० | ५४७-८-० |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८०-०-० | ८०-८-० | ८०-८-० | ८१-०-० | ८१-४-० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४-४-० | ३३-१५-० | ३४-०-० | ३४-८-० | ३४-६-० |
| ८५; ४८ | १-४-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५५-०-० | ५३-८-० | ५४-०-० | ५५-८-० | ५५-८-० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०-४-० | २०-४-० | २१-१२-० | २१-१२-० | २०-१४-० |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६९-१२-० | ६९-८-० | ६९-८-० | ६९-८-० | ६९-१२-० |
| | | | ३½ रोखे | १०० | ९९-८-६ | ९९-८-० | ९९-८-३ | ९९-८-३ | ९९-१०-६ |

वर्ग पुस्तकें (ट्रा. बुकें) बंद दि. १९-२-४५

कोहिनूर मिल्स १६-२-४५ ते १४-३-४५ बँक ऑफ बरोडा १६-२-४५ ते ८-३-४५

बी. आय. सी. २८-२-४५ ते २८-३-४५ न्यू शेट मिल्स " "

बँक ऑफ इंडिया १६-२-४५ ते १-३-४५ ३% व्हिक्टरी लोन = ९९ रु. १२ आ.

## स्फुट विचार

### विमान वहातूक आणि हिंदुस्थान

हवाई वहातुकीच्या प्रश्नांचा विचार करण्याकरितां अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय परिषद् नुकतीच भरली होती. परिषदेस हजर रहाण्याकरितां गेलेल्या हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींत सर गुरुनाथ बेवूर हे एक होते. पौर्वात्य नि पाश्चिमात्य देश यांमधील दुवा या नात्यानें हिंदुस्थानचें आंतरराष्ट्रीय हवाई मार्गातील भौगोलिक स्थान विशेष महत्त्वाचें आहे. त्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय परिषदेनें नेमलेल्या कौन्सिलवर हिंदुस्थानचा प्रतिनिधि असणें क्रमप्राप्त होतें. तथापि तसें प्रथम झालें नाहीं; नंतर, निवडून आलेल्या क्यूबाच्या प्रतिनिधीनें आपलें नांव मागें घेऊन हिंदुस्थानला कौन्सिलवर जागा मिळवून दिली. या परिषदेंत हवाई-स्वातंत्र्याबाबत पुढील ठराव संमत झाले. (१) प्रत्येक देशाला आपली अंतर्गत वहातूक स्वतःकडे ठेवण्याचा व ती वहातूक कोणी करावयाची हें ठरविण्याचा अधिकार आहे. (२) प्रत्येक देशाची त्याच्या हद्दींतील हवाईमार्गावर मालकी आहे. (३) न उतरतां पर मुलखावरून विमान नेणें, तेलपाणी करण्याकरितां किंवा कांहीं विशेष कारणाकरितां परमुलखांत उतरणें, ज्या देशाचें विमान असेल त्या देशांतील उतारू नि माल परमुलखांत उतरविणें या तीन हवाई स्वातंत्र्याबाबत एकमत झालें.(४) परमुलखांतील उतारू नि माल विमानांत घेणें या व्यापारी स्वातंत्र्याबाबत-चवथ्या हवाई स्वातंत्र्याबाबत-तीव्र मतभेद दिसून आले. विमानउत्पादनांत मागसलेल्या हिंदुस्थानसारख्या देशांना नि सध्या लष्करी विमान-निर्मितींत गुंतलेल्या इंग्लंडसारख्या देशांना व्यापारी हवाई वहातुकींत योग्य तो भाग घेण्यास कालावधि लागेल. त्याकारणाकरितांच त्यांनीं वरील मुद्याबाबत आपला विरोध स्पष्ट करून त्याबाबत आग्रह धरला. ह्या प्रश्नाचा परिषदेनें नेमलेल्या कौन्सिलनें विचार करावयाचा असल्यानें विषय संपलेला नाहीं. हिंदुस्थानांत हवाई वहातूक बरीच वाढली असून युद्धोत्तर काळांत अधिक शक्तीचीं नि सुखसोईंनीं युक्त अशीं विमानें येतील. मालाची ने-आण करण्याकरितां जरी विमानांचा फारसा उपयोग करण्यांत आला नाहीं तरी उतारू नि टपाल न्यांण्याकरितां बराच उपयोग होईल. तीनशे पायलट तरी युद्धोत्तर हवाई वहातुकीकरितां लागतील असा सरकारी अंदाज आहे.

---

### हातमागाच्या कापडावर नियंत्रण कां नाहीं?

गिरण्यांस थोडें कमी सूत मिळालें तरी चालेल, परंतु हातमागांची गरज पूर्णपणें भागावी ह्या दृष्टीनें गिरण्यांतील मागांच्या संख्येवर व माग चालविण्याच्या काळावर बंधनें घालण्यांत आलीं आहेत. सप्टेंबर, १९४४ मधील माग व त्यांचे उत्पादन ह्यांपेक्षा ज्यास्त माग व उत्पादन कायदेशीर नाहीं. हातमागाच्या कापडाची किंमत मात्र नियंत्रित नाहीं. "हातमागांस सूत मिळवून देऊन त्यांच्या नफेबाजीस सहाय दिल्यासारखें होत आहे; हातमागावरील कापडाच्या किंमतीवर कांहींतरी नियंत्रण बसवून नियंत्रित किंमतीच्या कापडाचें बाजारांतील प्रमाण वाढविणें इष्ट आहे, असा गिरणीवाल्यांचा अभिप्राय आहे."

---

### दि बँक ऑफ औंध लि., औंध

वरील बँकेच्या भाग भांडवलांत ३१ डिसेंबर १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १,८२० रुपयांची वाढ झाली. मुदती ठेवी परत केल्यामुळें बँकेचें खेळतें भांडवल तीन लक्ष रुपयांनीं कमी झालें. इतर ठेवींत चांगली वाढ झाली आहे. मुदती ठेवींवरील व्याजाचा दर जास्त असतो, ह्या दृष्टीनें ठेवींच्या खात्यांतील हा फरक बँकेचा धंदा अधिक किफायतशीर होण्यास सहाय्यकारक आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १५,८६० रुपये निव्वळ नफा झाला. बँकेच्या खेळत्या भांडवलाचे मानानें नफ्याचा हा आंकडा अतिशय समाधानकारक आहे. कमिशन व हुंडणावळ आणि किरकोळ उत्पन्न ह्यांचे जमेचे आंकडे अनुक्रमें १३,२६६ रु. व ६,०६२ रु. असे आहेत. इतर बँकांशीं तुलना करतां बँक ऑफ औंधनें १०३ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलावर मिळविलेलें उत्पन्न व नफा ह्यांचे आकडे निश्चित उठून दिसतील. नफ्यांपैकी ६,००० रुपये रिझर्व्ह फंडांत जाणार असून भागीदारांस ४% डिव्हिडंड व २% बोनस असे देण्यासाठीं ८,२२७ रुपयांचा विनियोग होणार आहे. ओगले ग्लास वर्क्स लि.चे मॅनेजिंग एजंट श्री. श्री. प्र. ओगले हे बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष असून श्री. बा. रा. वर्तक हे जनरल मॅनेजर आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेनें गेल्या वर्षी मिळविलेलें यश अभिनंदनीय आहे.

---

### हिंदी रेल्वे बजेट

१९४४-४५ च्या हिंदी रेल्वेजच्या हिशेबांत ४२ कोटि रुपयांचा व १९४५-४६ च्या हिशेबांत ३६३ कोटि रुपयांचा वाढावा राहील, असा अंदाज आहे. रेल्वेजचें उत्पन्न वाढलें आहे, त्याचा विनियोग, रेल्वेजची भारी दराची खरेदी व भारी दरानें केलेलीं कामें ह्यांचा बोजा हलका करण्याकडे करण्यांत यावयाचा आहे. त्याकरितां मोठाल्या रकमा खर्ची टाकल्या जातील. उरणाऱ्या वाढाव्यांतून चालू वर्षी मध्यवर्ती सरकारास ३२ कोटि रुपये मिळतील. पुढील वर्षीहि तितकेच मिळावेत, अशी अपेक्षा आहे. रेल्वेजच्या दरांत वाढ होईल अशी भीति कांहीं ठिकाणीं व्यक्त केली जात होती, परंतु अशी वाढ करण्याचा सरकारचा विचार नाहीं. हिंदी रेल्वेजनीं गेल्या सहा वर्षांत दाखविलेल्या वाढाव्याची रकम २७५ कोटि रुपये भरते! तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल कमी होण्यास त्या वाढाव्याचा आज कांहींहि उपयोग होऊं शकत नसल्याकारणानें, रेल्वेजच्या किफायतशीर कारभाराबद्दल सामान्य मनुष्यास विशेष आनंद वाटण्याजोगा नाहीं.

---

### म्यूर मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें भागीदारांस ४०% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. १९४१ सालीं ३०%, १९४२ सालीं ५०% व १९४३ सालीं ७०% डिव्हिडंड देण्यांत आलें होतें.

### म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि.

ओगले ग्लास वर्क्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीचा कारखाना कोळशाचा तुटवड्यामुळें १९४४ सालीं सात महिने बंद होता. तथापि, पांच महिन्यांत ४,६६,२०० रुपयांचें उत्पादन झालें व ३९,४७५ रुपये निव्वळ नफा उरला. भागीदारांस १०% नफा मिळाला. मॅनेजिंग एजंट कंपनीचे वाट्यास १३,१४२ रुपये कमिशन आलें.

## बँकेचा निष्काळजीपणा

साउथ इंडिया मॅच फॅक्टरी लिक्विडेशनमध्यें गेल्यामुळें मद्रास हायकोर्टानें तिचा कारभार गुंडाळण्याच्या दृष्टीनें मद्रास हायकोर्टाचे ॲडव्होकेट एम्. रामचंद्रराव यांना ऑफिशिअल लिक्विडेटर म्हणून नेमलें; त्यांनीं लिक्विडेटर म्हणून कंपनीची मालमत्ता शमसुद्दीन शैथरे यांस विकली; शमसुद्दीन शैथरे यांनीं लिक्विडेटर यांस एक रु. २०० चा चेक दिला व रु. ५०५० चा साधा चेक ' एम. रामचंद्रराव ऑफिशिअल लिक्विडेटर दावा नं. ३३५३ अन्वयें ' याप्रमाणें दिला; सदरचा चेक ' मद्रास प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ' या बँकेवर दिला होता. सदरच्या बँकेंत चेक वटवून त्याचे पैसे एम. रामचंद्रराव यांनीं वसूल केले; त्यामुळें हायकोर्टानें आपला स्वतःचा दुसरा ऑफिशिअल लिक्विडेटर नेमला व त्यानें म. प्रॉ. को. बँकेवर सदर रुपयांबाबत दावा लावून पैसे वसूल केले. ऑ. लिक्विडेटरचें असें म्हणणें पडलें कीं बँकेनें एम. रामचंद्रराव यांस पैसे देण्यांत हलगर्जीपणा दाखविला. चेकवर एम. रामचंद्रराव ऑफिशिअल लिक्विडेटर असें वर्णन असतां एम. रामचंद्रराव यांस व्यक्तिशः पैसे देण्यांत बँकेनें निष्काळजीपणा दाखविला. कारण इंडियन कंपनीज ॲक्ट कलम २४४ एफ प्रमाणें लिक्विडेटरनें अशा परिस्थितींत लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपन्यांच्या नांवें शेड्यूल्ड बँकेंत खातें उघडावें आणि सर्व रकमा तेथें जमा कराव्यात. तेव्हां कोणत्याही बँकेवर लिक्विडेटरच्या नांवें चेक आला तरी अशा बँकांनीं स्वतः पैसे न देतां अशा शेड्यूल्ड बँकेमार्फत सदरच्या चेकसची वटघट करावी. याप्रमाणें मद्रास प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेनें जाणीव न ठेवल्यानें तिला पुनः सदर रुपयांची भरपाई करून द्यावी लागली. याप्रमाणें कायद्यानें केलेली तरतूद बँकेनें लक्षांत न घेतल्यानें तिच्याकडून हलगर्जीपणा झाल्याचें गृहीत धरण्यांत आलें. म. प्रॉ. को. बँकेच्या अधिकारीवर्गानें सदरच्या कायद्याची आपणास जाणीव नव्हती असें कोर्टास सांगितलें, परंतु कायद्याचें अज्ञान हें कायद्याच्या कचाट्यांतून सुटण्याची सबब होत नाहीं असा निर्णय देऊन हायकोर्टानें बँकेविरुद्ध हुकूमनामा केला.

## " ट्रस्ट ऑफ इंडिया "चे श्री. जगन्नाथमहाराज ह्यांस चहापार्टी

सोमवार ता. ५ फेब्रुवारी १९४५ रोजीं दि ट्रस्ट ऑफ इंडिया कंपनीचे चेअरमन श्री. सरदार जगन्नाथ महाराज यांना नागपूरचे त्यांचे मुक्कामांत कंपनीचे नागपूर येथील डायरेक्टर रा. सदाशिव कृष्णराव फाटक यांनीं चहापार्टी दिली. महाराज, उत्तरादाखल भाषण करतांना म्हणाले:—' कंपनीचे खर्चाचें प्रमाण योग्य त्या मर्यादेंत राहावें, याबद्दल बोर्ड विशेष दक्षता घेत आहे. खर्चाचें अंदाजपत्रक ॲक्चुअरीचे सल्ल्यानें केलें जातें. अंदाजपत्रकाचे बाहेरील खर्चाची भरपाई बोर्ड व व्यवस्थापक यांचे फी व मुशाहिरा ह्यांतून केली जावी, असें बोर्डानें ठरविलें आहे. १९४४ सालीं कंपनीस एकंदर अकरा लाखांचें नवीन पॉलिसींचें काम मिळालें, त्यापैकी एक लाखापेक्षा जास्त काम नागपूर विभागातर्फे आलें. " अध्यक्षांचे आभार मानतांना रा. सदाशिवराव-फाटक यांनीं नागपूर इन्व्हेस्टर्स लि. या नांवाची कंपनी रजिस्टर करण्याचा आपला उद्देश जाहीर केला.

## शिवाजीच्या स्थानिक आख्यायिका कळवा

व्यक्तीच्या चरित्रांत आठवणींचा जो उपयोग त्याच प्रकारचा छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांच्या आख्यायिकांचा. म्हणून त्यांचा शोध काळजीपूर्वक झाला पाहिजे. परंपरेनें चालत आलेल्या अशा आख्यायिका कळविल्यास येत्या ' हिंदवी स्वराज्य स्मृति ' प्रसंगानें प्रसिद्ध व्हावयाच्या ' सह्याद्रीच्या विशेषांकांत ' त्याचा तारतम्यानें समावेश करण्याचा विचार आहे. अशा गोष्टींचा संग्रह शिवकालच्या सर्वांगीण इतिहासाच्या दृष्टीनें कमी उपयोगाचा नाहीं. माहिती पाठवितांना आख्यायिकेंतील स्थळ, व्यक्ति व शक्य तर काल यांचा शक्य तितका स्पष्ट निर्देश करावा. माहिती कोणाकडून व केव्हां मिळाली हें न चुकतां लिहावें.

दि. वि. काळे,
संपादक, सह्याद्रि



## डॉ. सर राधाकृष्णन् यांची श्रीधूतपापेश्वर कारखान्यास भेट

डॉ. सर राधाकृष्णन् यांनीं श्रीधूतपापेश्वर कारखान्यास नुकतीच भेट दिली त्याप्रसंगीं श्री. वै. नानासाहेब पुराणिक हे डॉ. सर राधाकृष्णन् यांना श्रीधूतपापेश्वरची हस्तिदंती मूर्ति अर्पण करीत असतांना घेतलेलें छायाचित्र.

## पुण्यांत क्लिअरिंग हाऊसची आवश्यकता

लि. आ. म.

सध्या पुण्यामध्यें एकंदर १६ बँका आहेत व कँपमध्यें ५ आहेत. आणखी नवीन बँका येत आहेत व येणार आहेत. जसजशी बँकांची संख्या वाढूं लागेल तसतसें प्रत्येक बँकेचें दुसऱ्या बँकेवर रोजचे स्थानिक वसुलीचें प्रमाण वाढणार व त्याचें पैसे-देवघेवीचें प्रमाणही वाढणारच.

लोकांमध्यें बँकिंगचा इतका प्रसार वाढला आहे कीं, साधारण व्यापार करणारा व्यापारीसुद्धां बँकेंत खातें उघडतो आणि एकाच बँकेंत खातें उघडून थांबतो असें नाहीं, तर शक्य असेल तर एक ना अनेक बँकेंत तो आपलें खातें ठेवितो. या व इतर अनेक कारणांमुळें सध्या स्थानिक वसुलीचें सुद्धां इतकें काम वाढलें आहे कीं, रोजच्या रोज प्रत्येक बँकेस, प्रत्येक बँकेंत आपला स्वतःचा मनुष्य पाठवून पैसे आणावे लागतात. असे पैसे आणणें एक तर फारच त्रासाचें होतें व त्यांत धोकाहि फार आहेच. शक्य तितका त्रास टाळण्याकरतां कांहीं कांहीं बँका आपसा-आपसांतील देणें-घेणें चेकच्या व इतर अन्य गोष्टीनें भागवून घेतात, परंतु देणें घेणें जर परस्पर कांहीं कारणानें सर्वांसच भागवतां आलें तर त्यापासून बँकांना सारखा फायदा होणार आहे, आणि असें परस्पर देणें घेणें भागवण्याचा मार्ग एकच आहे व तो म्हणजे " क्लिअरिंग हाऊस"ची योजना हा होय.

मुंबईमध्यें अर्थात पुण्यापेक्षा कितीतरी पटीनें अनेक बँका आहेत, व त्यामुळें तेथें क्लिअरिंगची योजना आवश्यक होतेच व त्याप्रमाणें तेथें आहेही. पण दिवसेंदिवस पुण्यामध्येंहि बँका वाढत आहेत व आणखी वाढणार आहेत, त्यामुळें आतां पुण्यासहि " क्लिअरिंग हाऊस "ची उणीव भासूं लागली आहे व त्याची आतां जरूरी आहे. मागें एकदा या बाबतींत इंपीरिअल बँकेनें प्रयत्न केला होता व योजनाही तयार झाली होती पण पुढें कांहींच प्रगती झाली नाहीं. या बाबतींत इंपीरिअल बँकेनेंच पुढाकार घेऊन " क्लिअरिंग हाऊसची " योजना तयार केली पाहिजे. त्यामुळें सर्वच बँकांना आपलें देणें-घेणें परस्पर क्लिअरिंग हाऊसचे मार्गे भागावितां येऊन सर्वांचा त्रास वाचेल, व त्या दृष्टीनें इतर बँकांनींहि त्यांत पुढाकार घेऊन " क्लिअरिंग हाऊस"ची योजना अमलांत आणण्याची खटपट अवश्य केली पाहिजे.

---

### आकड्यांची कसरत

( १ ) इंग्रजी लिपीचीं २६ अक्षरें

६२०,४४८४०१७,३३२३९४३,९३,००,०००

( ६२० कोटी, कोटी, कोटी )

वेगळाल्या पद्धतींनीं जुळवितां येतात.

( २ ) इसवी सनाच्या सुरवातीला १ रुपया ३½% चक्रवाढ व्याजानें गुंतवला असतां, तर त्याचे आतां

११,४५०००००,०००००००,०००००००,०००००००

( सुमारें ११½ कोटी, कोटी, कोटी, कोटी ) रुपये झाले असते.

### रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर

श्री. के. जी. आंबेगांवकर, आय. सी. एस., ह्यांची हिंदुस्थान सरकारनें रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर म्हणून नेमणूक केली आहे.


# महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें ?**

या भाग्यवर्धक पुस्तकांत संपत्ति मिळविण्याचे सुंदर मार्ग दिले आहेत. हें तुमचें कौटुंबिक जीवन सुखी करून हजारों रु. मिळवून देईल ! संकटांत मार्गदर्शक होईल व आर्थिक स्वातंत्र्याच्या पायावर उभें राहाण्यास शिकवील ! अर्थशास्त्रांतील निवडक बेचे, नवीं तरतें व नवे सिद्धांत तुम्हांला औद्योगिक क्षेत्रांत यशस्वी करतील. किं. १॥ रु. व्ही. पी. नें १८१४ रु.

**१०० टक्के यश !**

अर्थात् यशाचा सूर्योदय. हें पुस्तक व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील व कर्तबगार बनवील ! उत्साही तरुणाना अत्यंत उपयुक्त व वाचनीय आहे. किं. १ रु. ४ आ. व्ही. पी. नें १ रु. १० आ.

**काम आणि कामिनी**

तरुण स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें. यांतील काम देवतापूजन, वधूवर संशोधन, आणि विश्वसौंदर्याची बाजारपेठ ही प्रकरणें तुम्हांला फारच आवडतील ! चित्ताकर्षक व गोड विचारसरणी यामुळें आबालवृद्धांना सारखेंच प्रिय बनलें आहे. किं. १॥ रु. व्ही. पी. नें १ रु. १४ आ.

**मृत्युलोकचा प्रवास !**

मृत्युशास्त्रावरील अपूर्व कथानक ! यांत मानवी जन्ममृत्यूचें द्वंद्व युद्ध, मरणोत्तर आत्म्याच्या विलक्षण हालचाली, स्मशानांतील सांवळा गोंधळ, अस्थिसंदेश, आत्म्याचें अमरत्व व तुमचें स्वर्गावरोहण इ. कुठेंही न वाचलेली आश्चर्यकारक माहिती आली आहे. किं. १ रु. व्ही. पी. नें १ रु. ६ आ.

चारी पुस्तकांसाठीं फक्त ५ रु. ४ आ. ची म. ऑ. करा. पुस्तकें घरपोंच पाठवूं.

**मेसर्स विपट आणि मंडळी, कराड, जि. सातारा.**


---

### कांहीं ताजीं पुस्तकें

**दि टाइम फॉर डिसिजन** ( ले. सम्नर वेल्स, अमेरिकेचे माजी अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट, किं. ९ रु. १२ आ. ) आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक योजना मि. वेल्स ह्यांनीं सुचविली असून ती ह्या पुस्तकांत वर्णिली आहे व गेल्या २५ वर्षांतील अमेरिकन धोरणाची त्यांनीं पहाणी केली आहे. मि. वेल्ससारख्यांच्या पहिल्या दर्जाच्या लेखणींतून उतरलेलें हें पुस्तक मनोरंजक व उद्बोधक झालें असून त्यांची भाषा सडेतोड व विचार निर्भीड आहेत.

**रिफॉर्म ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन इंडिया** ( ले. एम. पी. शर्मा, एम. ए., डी. लिट्, अलाहाबाद युनिव्हर्सिटी किं. २ रु. ८ आ. ) ह्या पुस्तकांत लेखकानें हिंदी स्थानिक स्वराज्य संस्थांची तपशीलवार माहिती दिली असून त्यांच्या सुधारणेचा मार्ग दर्शविला आहे.

**दि फ्यूचर ऑफ दि रुपी** ( ले. प्रो. सी. एन. वकील व प्रो. जे. जे. अंजारिया, किं. १ रु. ४ आ. ) रुपयाची अंतर्गत व परदेशांतील किंमत किती असावी, ह्यासंबंधीं युद्धोत्तर प्रश्न उपस्थित होतील, त्यांची शास्त्रशुद्ध चर्चा प्रस्तुत पुस्तिकेंत करण्यांत आलेली आहे.

**डेक्कन बुक स्टॉल, पुणें ४**




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

---

—कोको प्या—

कोको हे उत्कृष्ट पेयाच आहे. सध्यांच्या अवटंच्या ईच्या दिवसांत तर अशा पेयाची अधिक जरूरी आहे.

" सॅचवर्क "

कोकोची मागणी करा. म्हणजे स्वस्त, उत्कृष्ट व शुद्ध कोको मिळेल.

—साठे चॉकोलेट वर्क्स,
पुणें २.

---

" मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)
**BUG COILS (ABC)**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

---

सांडू
टोमॅटो
कम्पाउन्ड
(ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त)

स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.

ओरिजिनल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

---

डोंगरे
यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात

---

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २८ फेब्रुवारी, १९४५ अंक ९

सांडू हार्टिना

छातीत भरभरणें, धाप लागणें, छातीत कळ अगर धमक मारणें, रक्ताचा दाब वाढणें व हृदयाची अशक्तता यांवर फार गुणकारी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

—कोको प्या—

कोको हें उत्कृष्ट पेयास आहे. सध्यांच्या अवर्षणाच्या दिवसांत तर अशा पेयाची अधिक जरूरी आहे.

"सॅचवर्क"

कोकोची मागणी करा. म्हणजे स्वस्त, उत्कृष्ट व शुद्ध कोको मिळेल.

—साठे चॉकोलेट वर्क्स,
पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९

# विविध माहिती

### पशुवैद्यक शिक्षणाची स्त्रियांस सोय

मद्रास सरकारनें मद्रास येथील व्हेटरनरी कॉलेजांत प्रतिवर्षी तीन स्त्री विद्यार्थी घेण्याचें ठरविलें आहे. सरकारी शिक्षण संस्था व नोकऱ्या ह्यांत स्त्री-पुरुष असा भेद राहूं नये, ह्या धोरणास अनुसरून वरील हुकूम सरकारनें काढला आहे.

### वारसा कर लादण्यास सरकारला अधिकार

हिंदुस्थान सरकारला वारसा कर बसविण्याचा अधिकार देणारें बिल ब्रिटिश लॉर्डांच्या सभेनें मंजूर केल्यानंतर तें कॉमन्स सभेंत आलें. तेथें त्याचीं तीनहि वाचनें झालीं. राजेसाहेबांची संमति मिळतांच, त्याचें कायद्यांत रूपांतर होईल.

### ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या वाढविण्यासाठी मुलांची आयात

सहा ते १४ वर्षांचीं ब्रिटिश व सहा ते १२ वर्षांचीं इतर देशांतील अशीं १७,००० मुलें ऑस्ट्रेलियांत दरसाल आणविण्याच्या योजनेस ऑस्ट्रेलियाच्या प्रधान मंडळानें मान्यता दिली आहे.

### भुइमुगापासून "लोकर" तयार करणार

भुइमुगापासून लोकरीसारखा धागा निर्माण करण्याचे प्रयोग इंग्लंडमध्यें यशस्वी झाले आहेत. लोकरीचे गुण त्यामध्यें असल्यामुळें कमी वजनाचे गरम कपडे बनविण्यास त्याचा चांगला उपयोग होण्याजोगा आहे.

### सहकारी चळवळीच्या वाढीच्या योजनेसाठी कमिटीची स्थापना

सहकारी चळवळीच्या वाढीची योजना आखण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे, तिचे श्री. आर. जी. सरय्या ( मुंबई प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन ) हे अध्यक्ष आहेत. कमिटीची कचेरी मुंबई येथें रिझर्व्ह बँकेंत राहील. रिझर्व्ह बँकेचे मि. शेर जंग खान हे कमिटीचे सेक्रेटरी आहेत.

### नॅशनल न्युट्रिमेंटस लि., कलकत्ता

"व्हिटामिल्क" बनविणाऱ्या वरील कंपनीस ३१ मार्च, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १,७५,४७५ रु. नफा झाला. प्रेफरन्स भागीदारांना करमाफ ७½%, ऑर्डिनरी भागीदारांना करमाफ १०% व डिफर्ड भागीदारांस २५% करमाफ डिव्हिडंड मिळालें. कंपनीनें मागविलेली यंत्रसामुग्री चालू झाली म्हणजे तिचें उत्पादन पुष्कळच वाढेल. कंपनीच्या चार कारखान्यांना मिळून दररोज १,००० मण दूध लागेल तें स्वतःच्या डेअरींतूनच घेण्याची कंपनीची योजना आहे. त्याकरितां गोठे बांधणें व जनावरें विकत घेणें ह्यांस ५० लक्ष रुपये लागतील.

### बॉंबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा डिसेंबर, १९४४ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. शेतकऱ्यांच्या जीवनांत आर्थिक लोकशाही निर्माण करावयाची असल्यास सहकारी चळवळ त्यास कशी सहायकारक होईल, ह्याचें वर्णन पहिल्या संपादकीय लेखांत आलेलें आहे. १८ व्या प्रांतिक सहकारी परिषदेचा वृत्तांत श्री. जी. एच. ठाकोर ह्यांनीं कथन केला आहे. इन्स्टिट्यूटच्या पोस्टवॉर डेव्हलपमेंट कमिटीच्या रिपोर्टाचा परामर्श श्री. पी. एन. ड्रायव्हर ह्यांनीं घेतला आहे. श्री. बी. व्ही. कुंभारे ह्यांनीं "अमेरिका खंडांतील सहकारी चळवळ" ह्या इं. ले. ऑफिसनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेचें परीक्षण केलें आहे. त्रैमासिकानें आपल्या मर्यादित पृष्ठसंख्येंतहि पूर्वीचें स्वरूप कायम राखलें आहे.

### महाराष्ट्र बँकेची वार्षिक सभा

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा रविवार, ता. २५ रोजीं भरली होती. सभेनें डायरेक्टरांनीं सुचविलेली नफावाटणी मंजूर केली व निवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांची आणि ऑडिटरांची फेरनिवड केली. अध्यक्ष, श्री. धों. कृ. साठे, ह्यांनीं बँकेच्या प्रगतीचा आढावा घेऊन भागीदार व ठेवीदार ह्यांनीं बोर्डावर दर्शविलेल्या विश्वासाचें तें फळ आहे, असें सांगितलें.

### हिंदुस्थानाचें व्यापारी दृष्ट्या अविभाज्यत्व

आंध्र बँक लि. च्या मद्रास येथील शाखेचें उद्घाटन करतांना श्री. सी. राजगोपालाचार्य ह्यांनीं खालील उद्गार काढले:—

"कशाचाच अभिमान नसण्यापेक्षा प्रांतिक अभिमान परवडला. प्रांतिक अभिमानाचें राष्ट्रीय अभिमानांत पुढें रूपांतर होऊं शकतें. व्यापार व बँकिंग ह्यांना सर्व अनुकूल गोष्टींपासून फायदा करून घ्यावयाचा असतो. तेव्हां प्रांतिक वृत्तीच्या पायावर बँकेनें प्रादेशिक हित केलें, हें ठीकच आहे. २२ वर्षें हें करून आतां बँक मद्रासला शाखा उघडीत आहे व प्रांतिक कवच फोडीत आहे. भाषेमुळें लोकांचे वेगळे गट पडले तरी व्यापार, उद्योगधंदे, आर्थिक देवघेवी हीं सर्वव्यापी असतात. देश कितीहि प्रांतांत विभागलेला असो, कितीहि भाषा देशांत बोलल्या जावोत व राज्यघटना कितीहि भिन्न असोत, हिंदुस्थान हा व्यापारी व सांस्कृतिक दृष्ट्या अविभाज्यच राहील, हें उघड आहे."

### वाघिणींची आयात

हिंदुस्थानांत दरमहा १,२०० वॅगन्स तयार होऊं शकतील, परंतु प्रत्यक्ष मासिक उत्पादन ५०० वॅगन्सच्यावर जात नाहीं. तें ७०० वॅगन्सपर्यंत वाढविण्याचा प्रयत्न चालू आहे. सरकारनें परदेशांतून एकूण ४६,७३० ब्रॉड गेज वॅगन्स, १२,४८१ मीटर गेज वॅगन्स, ९३७ ब्रॉड गेज इंजनें व ४१५ मीटर गेज इंजनें मागविलीं आहेत.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

डोंगरे यांचा डोंगरे छाप शुद्ध निलगिरी तेल.

अर्थ

## कृषिसंवर्धनांत सहकाराचें स्थान

### व्यक्ती, सहकार आणि सरकार

युद्धसमाप्तीनंतर हातीं घेण्यांत यावयाच्या आर्थिक संवर्धनाच्या योजनांची बनावट आणि चर्चा हिंदुस्थानांत सध्या जोरानें चालू आहेत. उद्योग-धंदे, व्यापार, वहातूक ह्यांचा विस्तार व त्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठी लागणारें भांडवल व कुशल मनुष्यबल ह्यांचा पुरवठा कसा करतां येईल ह्याचा सदरहु योजनांच्या अनुषंगानें विचार होत आहे. हिंदी जनतेची प्राप्ती वाढवून तिची रहाणी सुधारणें हा सर्व आर्थिक अभिवृद्धीच्या योजनांचा मुख्य उद्देश आहे आणि त्यासंबंधांत विचार व चर्चा करणारांची संपूर्ण एकवाक्यता आहे. तथापि, उद्योग-धंद्यांच्या विस्ताराचे मानानें तो हेतू साध्य करण्यांत व्यक्ती, त्यांचे संघ व सरकार ह्यांचा हात किती असावा आणि त्यांच्या कर्तृत्वास कोणत्या मर्यादा घालण्यांत आल्या पाहिजेत ह्याविषयीं तीव्र मतभेद आहेत असें स्पष्ट दिसून येतें. नफ्याच्या लाभासाठी व्यवहार करणारांच्या हातीं धंदे-व्यापार असावा का तो कामगार वर्गांच्या सत्तेनें चालावा आणि राष्ट्रीय सरकारचें नियंत्रण व नियमन ह्या औद्योगिक संघटनांत कोठें व किती असावें हे प्रश्न येथें उपस्थित होतात. व्यक्तींचें आर्थिक नेतृत्व स्वार्थमूलक असलें तरी तें राष्ट्राच्या कल्याणास उपकारक होत असल्यानें तें नाकारणें किंवा दूर करणें समाजाच्या हितास विघातक आहे. ह्याकरितां अपरिहार्य दिसेल तेथेंच व तेवढ्यापुरतेंच राजसत्तेचें नियंत्रण व नियमन अंगिकारण्यांत यावें असें मत "मुंबई योजने"च्या कर्त्यांनीं व्यक्त केलें आहे. स्वतःच्या व्यक्तिगत नफ्याच्या मागें लागलेल्या लोकांच्या हातीं हिंदी राष्ट्रानें आपलें आर्थिक भवितव्य जाऊं न देतां त्याची घडण आपल्या सत्तेनें करावी अशी विचारसरणी त्या विरुद्ध मांडण्यांत आलेली आहे.

हिंदुस्थानांत शेतीचा धंदा अत्यंत महत्वाचा आहे आणि तो पुढें तसाच राहणें अपेक्षित आहे. ह्यामुळें त्याचा विस्तार कोणत्या प्रकारच्या संघटनेच्या मार्गानें घडवून आणला जावा ह्याचा विचार होणें अत्यंत अगत्याचें झालें आहे. जमिनदारी, कुळवारी व रयतवारी अशा जमीन धारणाच्या पद्धती ह्या देशांत रूढ आहेत आणि बहुसंख्य शेतकरी अल्प प्रमाणावर धंदा करणारे आहेत. ह्या लोकांच्या हातून स्वतःच्या धंद्याची सुधारणा व उन्नति, भांडवल व शिक्षण ह्यांचे अभावीं, कशी घडून येणार ? हा प्रश्न येथें उद्भवतो. सहकारी संघटनाचे सहायानें हा कार्यभाग पार पडतां येईल ह्या त्याच्या उत्तरास अनेक विचारवंतांकडून मान्यता मिळाली आहे व मिळण्यासारखी आहे. सहकाराचें ह्यासंबंधांतलें औचित्य आणि कार्यक्षमता ह्यांचें दिग्दर्शन श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं गेल्या नाताळांत अलाहाबाद येथें भरलेल्या शेतीविषयक अर्थशास्त्राचा विचार करणाऱ्या तज्ज्ञांच्या परिषदेंत वाचलेल्या निबंधांत केलें, त्याची कल्पना येथें दिली असतां ती बोधप्रद होण्यासारखी आहे. निबंधाचा विषय "कृषिसंवर्धनांत व्यक्ती, सहकार व सरकार ह्यांचें स्थान" हा होता.

कृषिसंवर्धन योजनेच्या मुळाशीं दोन तत्त्वें असलीं पाहिजेत असें गृहीत धरून श्री. वैकुंठराय ह्यांनीं आपल्या विचारांची मांडणी केली आहे. योजनात्मक धोरण म्हटलें म्हणजे आर्थिक व्यवहारांचे बाबतींत राजसत्तेच्या तटस्थ वृत्तीचा अंत, ही पहिली गोष्ट आणि दुसरी गोष्ट, उद्योग-धंद्यांत वैयक्तिक जबाबदारीची भावना व प्रातिनिधिक सत्ता ह्यांस योग्य स्थान असण्याची आवश्यकता ही होय. आर्थिक योजना सक्तीनें लोकांवर लादणें आणि ती त्यांनीं स्वेच्छेनें अंगिकारावी ह्याकरितां त्यांचें मत वळवणें ह्या दोहोंत मोठा फरक आहे. सहकारी संघटनेंत वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकसत्ता ह्या दोन्ही गोष्टी साधतां येतात हें दाखवून त्याचा उपयोग, धान्याचें उत्पादन वाढवणें व त्याची नीट वाटणी करणें ह्या कामीं सध्याच्या नडीच्या व तुटवड्याच्या परिस्थितींत कसा करतां येईल आणि युद्धोत्तर काळांतील आर्थिक पुनर्घटनेंत सहकारी संस्था कोणतें कार्य विधायक रीतीनें करूं शकतील ह्याचें विवेचन श्री. वैकुंठराय ह्यांनीं केलें आहे. मुंबई सरकारनें धान्याच्या पिकांचें बाबतींत सक्तीचे कायदे केले आहेत, त्यांची आवश्यकता युद्धोत्तर काळांत राहणार नाहीं. परंतु ह्या प्रकारची व्यवस्था जरूर वाटल्यास ती सहकारी सोसायट्यांसारख्या संस्थांवर सोपविणें इष्ट होईल. शास्त्रीय संशोधनें, शिक्षण, प्रात्यक्षिकें, पाणी, बीं-बियाणें, खतें, सुधारलेलीं औतें इत्यादि बाबतींत शेतीस सहाय देण्याची जबाबदारी सरकारनें पत्करली पाहिजे. तथापि, शेतजमीनीचें एकत्रीकरण, शेतमालाची विक्री व साठवण, चांगल्या जनावरांची पैदास इत्यादि बाबींचें संघटन सहकारी पद्धतीचें असलें पाहिजे. सरकार व सहकारी संस्था ह्यांच्या कार्याच्या मर्यादा आणि व्याप हीं दाखले देऊन श्री. वैकुंठराय यांनीं विशद केलीं आहेत. शेतमालाच्या किंमती शेतकऱ्यांस किफायतशीर होतील अशा आणि स्थिर राखणें, नियंत्रित व नियमित शेतमालाचे बाजार स्थापणें, जमीन धारणाच्या पद्धतींत सुधारणा करणें, कालवे-पाटबंधारे व रस्ते बांधणें इत्यादि गोष्टी सरकारी कायद्याच्या व जबाबदारीच्या क्षेत्रांत येतात. परस्पर सहायानें व स्वावलंबनानें शेतकऱ्यांनीं स्वतःची सुधारणा करून घ्यावी ह्यासाठी सरकारनें उत्तेजन द्यावें आणि सहाय व मार्गदर्शन करावें म्हणजे योजनात्मक आर्थिक संवर्धन योग्य रीतीनें व लोकसत्तेच्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वांवर घडून येईल. हें इष्ट साध्य फलद्रूप करण्याचें सामर्थ्य सहकारी संघटनेंत आहे. आत्यंतिक भांडवलशाही आणि दुसऱ्या टोकास जाणारा समाजसत्तावाद यांचेमध्यें सहकारी संस्था राहतात आणि त्या दोहोंतले ग्राह्य गुण आचरणांत आणतात हें श्री. वैकुंठराय ह्यांच्या निबंधांत तपशीलवारपणानें दाखवण्यांत आलें आहे.

---

### सिंधू नदीच्या पाण्याची वाटणी

सिंधू नदीच्या पाण्याच्या वाटणीबद्दल पंजाब व सिंध ह्या प्रांतांच्या सरकारांतील वांधा अद्याप मिटलेला नाहीं. तो मिटविण्याचा आतां पांचव्यांदा प्रयत्न चालू आहे. वांधा आपसांत मिटला नाहीं, तर भारतमंत्र्यांच्या हुकुमाप्रमाणें पाण्याची वाटणी केली जाईल.

## प्रिव्हि कौन्सिलच्या निकालानें उत्पन्न केलेला गोंधळ

**( हिंदुस्थान सरकार ह्या संबंधांत प्रांतिक सरकारें व हायकोर्टें ह्यांचीं मतें मागवून ह्य ती दुरुस्ती करणारें बिल मध्यवर्ती विधिमंडळांत मांडणार आहे. )**

जन्मास न आलेल्या मुलांच्या बाबतींत मृत्यूपत्र किंवा ट्रस्ट-द्वारें दिलेल्या देणग्यांच्या योग्यायोग्यतेविषयीं प्रिव्हि कौन्सिलनें नुकताच एक निकाल दिल्यानें त्यांचे बाबतींत उलथापालथ होण्याचा संभव निर्माण झाला आहे. आपल्या जन्मास येणाऱ्या मुलाबाळांच्या करतां कोणीहि आपण मृत्यूपत्रानें किंवा ट्रस्टडीडअन्वयें कांहींतरी योजना करून ठेवीत असतो. अनिश्चित कालपर्यंत एकाच कुटुंबांत किंवा घराण्यांत मिळकत डांबली जाऊं नये म्हणून कायद्यानें या बाबतींत कांहीं निर्बंध घातले आहेत. समाजाच्या सुस्थितीच्या दृष्टीनें असे निर्बंध आवश्यक आहेत. सध्याच्या कायद्याप्रमाणें जर जन्मास येणाऱ्या मुलांनातवांकरतां मृत्यूपत्र किंवा ट्रस्ट यांचे अन्वयें कांहीं तरतूद करावयाची असेल तर एकाद्या माणसास आपली इस्टेट हयात असलेल्या त्याच्या नातेवाइकास त्याचे हयातीपर्यंत देऊन तदनंतर ती मिळकत अद्याप जन्मास येणाऱ्या मुलांना किंवा दुसऱ्या कोणाला देतां येत असे. अशावेळीं जन्मास येणारा जर १८ वर्षेपर्यंत जगेल किंवा एखाद्या विवक्षित गृहस्थाच्या पाठीमागेंही तो हयात असेल तर त्यास वरीलप्रमाणें मिळकत द्यावी अशी अट मृत्युपत्र करणारा किंवा ट्रस्टडीड करणारा मृत्युपत्रांत किंवा ट्रस्टडीडमध्यें घालीत असे व त्यावर कायद्यान्वयें आक्षेपही घेतला गेला नव्हता. तसेंच, ट्रस्टडीड करून ठेवणारा त्याच्या हयातीपर्यंत ट्रस्टडीडमधील मिळकतीवर स्वतःचा ताबा ठेवीत असे. ती अटही आतां नवीन प्रिव्हि कौन्सिलच्या निर्णयानें मुंबई हायकोर्टानें बेकायदेशीर ठरविली असल्यानें सदर ट्रस्टस बेकायदेशीर होणार आहेत व वरीलप्रमाणें जन्मास येणाऱ्यांना सनिर्बंध अशा दिलेल्या देणग्याही बेकायदेशीर ठरणार आहेत. प्रिव्हि कौन्सिलचे या बाबतींत असें मत आहे कीं याप्रमाणें दिलेल्या देणग्या किंवा केलेली तरतूद ही सनिर्बंध असून मृत्युपत्र करणाराची मिळकतीवर ज्याप्रमाणें पूर्णत्वानें मालकी असते तशी मालकी विनाअट न जन्मलेल्यांकडे जात नाहीं म्हणून सदरची तरतूद बेकायदेशीर आहे.

प्रिव्हि कौन्सिलच्या या निर्णयानें अनेक मृत्युपत्रांत व ट्रस्टडीडमध्यें या प्रकारें दिल्या गेलेल्या देणग्यांचे बाबतींत फार घोटाळे माजण्याचा संभव आहे व अनेक लोकांना निष्कारण नुकसान सोसावें लागणार आहे. आतांपर्यंत अनेक न्यायाधीश व कायदेपंडित यांनीं अशा सनिर्बंध दिलेल्या देणग्या कायदेशीर धरल्या आहेत; व त्याप्रमाणें अनेकांनीं आपल्या मृत्यूपत्रांत व ट्रस्टडीडमध्यें तदनुसार योजना केल्या आहेत. सन १९२६ सालीं ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टीच्या कलम ५९ अन्वयें विक्रीचा करार सुद्धा रजिस्टर करावयास पाहिजे असा निर्णय देऊन प्रिव्हि-कौन्सिलनें ज्याप्रमाणें खळबळ उडवून दिली होती व शेवटीं कायदेमंडळाला सदरच्या निर्णयानें उडविलेला घोटाळा दूर करावा लागला त्याचप्रमाणें सध्याही कायदेमंडळानें तातडतोब कायद्याची दुरुस्ती करून सनिर्बंध देणग्या कायदेशीर आहेत अशी स्पष्ट घोषणा केली पाहिजे असें दिसतें.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
( शेड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस : पुणें शहर
विक्रीस काढलेलें नवीन दहा लाखांचें भांडवल सर्व विकलें गेलें आहे.
— भांडवल —

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. ५०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ७,५७,३८० |

खेळतें भांडवल रु. १,००,००,००० चे वर
—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कु. साठे, चेअरमन
श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.
—शाखा—
डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
सी. व्ही. जोग, मॅनेजर

# स्फुट विचार

## ब्रिटिश सहकाऱ्यांनीं संधि गमावली

इंग्लंड, वेल्स, व उत्तर आयर्लंड ह्या ग्रेट ब्रिटनच्या विभागांत सभासदांस माल पुरविणाऱ्या सहकारी संस्थांचें विस्तृत जाळें पसरलेलें आहे आणि "को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटी" हा त्यांचा घाउक व्यवहार करणारा मध्यवर्ती संघ आहे. ह्याच प्रकारची मध्यवर्ती संस्था ग्रेट ब्रिटनच्या राहिलेल्या भागांत म्हणजे स्कॉटलंडमध्यें स्वतंत्र रीतीनें काम करीत आहे. ह्या दोन संस्थांचें एकीकरण करून ब्रिटिश सहकारी संघटन अधिक बलवान् आणि कार्यक्षम बनवावें अशा विषयींचा विचार गेल्या वर्षीचे अखेरीस चालला होता. १९१२ सालीं त्यांनीं को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी संयुक्त व्यवस्थेखाली घेतली आणि तिला ग्रेट ब्रिटनमध्यें वरचें स्थान मिळवून दिलें. हिंदुस्थान व सिलोन ह्या देशांत चहाचे मळे त्यांच्या संयुक्त मालकीचे आहेत. इंग्लिश व स्कॉटिश होलसेल सोसासायट्यांच्या एकीकरणानें त्यांच्या धंद्यांत त्याच तत्त्वावर मोठ्या प्रमाणावर प्रगति घडून येण्यासारखी होती. इंग्लंडमधील सोसायटीच्या सभासदांनीं मोठ्या बहुमतानें एकीकरणाची योजना मान्य केली. पण ती स्कॉटिश सोसायटीस अखेर मान्य झाली नाहीं. त्या देशांतील कांहीं सहकारी संस्थांचा उघड विरोध होता, परंतु ती बहुमताकडून अमान्य केली जाईल असें कोणास वाटत नव्हतें. हा नकार ४४२ विरुद्ध २०९ मतांनीं दिला. ह्याचें इंग्लंडमधील सहकारी कार्यकर्ते आणि सामान्य जनता ह्यांस आश्चर्य वाटत आहे. संयुक्त संघटनाची चर्चा बऱ्याच काळपर्यंत चालली होती आणि ती यशस्वी होण्याची आशा सामान्य रीत्या उत्पन्न झाली होती. "रॉकडेल पायोनिअर्स"च्या शतसंवत्सरीच्या वर्षांत आलेली प्रगतीच्या मार्गांत महत्वाचें पाऊल टाकण्याची उत्कृष्ट संधि ब्रिटिश सहकाऱ्यांनीं घालवली ह्याविषयीं अनेकांस सखेद निराशा वाटणें स्वाभाविक आहे.

## द्वैत, अद्वैत व सहकार

दिवंगत श्री. रामदास पंतुलु हे मद्रासमध्यें वकील होते, पण सहकारी चळवळीचे आरंभशाईक व दीर्घोद्योगी नेते ह्या नात्यानें त्यांची ह्या देशांत व बाहेरहि प्रसिद्धी होती. श्री. राममूर्ती, मद्रास गव्हर्नरचे सल्लागार, ह्यांनीं श्री. पंतुलू ह्यांच्या चित्राचें सेंट्रल लँड मॉर्गेज बँकेच्या दिवाणखान्यांत अनावरण करतांना, मद्रास प्रांतांत कित्येक ख्यातनाम वकीलांनीं सहकारी चळवळींत पुढाकार घेतला आहे ह्या गोष्टीच्या मुळाशी कायदा व सहकार ह्यांमध्यें असलेल्या सामान्य तत्त्वाचा उल्लेख केला. मानवी जीवनांत समतोलपणा राखणें हें दोहोंचें उद्दिष्ट आहे. कायदेपंडित बुद्धिप्रेरित असतात आणि सहकारी कार्यकर्ते प्रेमळ भावनायुक्त असतात, हा त्यांचेमध्यें भेद असला तरी दोघेहि समष्टीवृत्तीनें वागतात असें श्री. राममूर्ती म्हणाले. सहकारी तत्त्वासंबंधानें त्यांनीं असें सांगितलें कीं द्वैताशिवाय समाज शक्य नाहीं तरी त्यांत अद्वैत अथवा एकत्व निर्माण करणें हें सहकारी संघटनाचें कार्य आहे. ह्या रीतीनें हिंदी संस्कृतीचें व सहकाराचें आदितत्त्व एकच आहे. सध्या जगांत सर्वच द्वैत माजून राहिलें असतां आणि भिन्न भिन्न तत्त्वप्रणालींमध्यें अहमहमिका चालू असतांना सहकार व लोकशाही ह्यांच्या पायावर उभारलेल्या सामाजिक संघटनेचा पुरस्कार करून हिंदुस्थानानें इतरांस धडा घालून दिला पाहिजे अशी सूचना त्यांनीं केली. सहकाराची तात्त्विक व मूलग्राही कल्पना श्री. राममूर्ती ह्यांनीं विशद करून सांगितली आणि ती हिंदी तत्त्वज्ञानावर आधारली असल्याचें स्पष्ट केलें तें चिंतनीय आहे. आमच्या सहकारी संस्थांचें बाह्य स्वरूप पाश्चात्य असलें तरी त्यांचें अंतरंग पूर्णपणानें स्वदेशी आहे हें त्यांनीं दाखवलें आहे.

## लँड मॉर्गेज बँकेच्या कर्जावरील व्याजाचे दर

मद्रास प्रांतांतील लँड मॉर्गेज बँकांची वार्षिक परिषद् मद्रास येथें नुकतीच भरली होती. मध्यवर्ती बँकेस आतां पूर्वीपेक्षा स्वस्त दरानें पैसा उभारतां येतो, त्याचा फायदा शेतकऱ्यांस मिळावा ह्या दृष्टीनें द्यावयाची कर्जें व घ्यावयाची कर्जें ह्यांच्या व्याजामधील तफावत कमी करण्यांत यावी, असें दि. ब. रत्नसभापति मुदलियार ह्यांनीं परिषदेंतील आपल्या भाषणांत सुचविलें. डिबेंचरवरील व्याजाचा दर ३ किंवा ३½ टक्के पडतो. परंतु शेतकऱ्यांस ६ किंवा ६½ टक्के व्याज पडतें. सरकार बँकेनें दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर उतरवूं देण्यास तयार नाहीं. खासगी सावकारांच्या व्याजाच्या दरापेक्षा सहकारी संस्थांचा व्याजाचा दर कमी राहणें अगत्याचें आहे असें ते म्हणाले. अमेरिकेंतील व्याजाच्या दरांची तुलना करून, हिंदुस्थानासारख्या शेतीप्रधान देशांत व्याजाचा दर कमी असण्याचें महत्त्व अधिकच आहे, असें त्यांनीं प्रतिपादलें व ३ टक्क्यांऐवजीं २ टक्क्यांची तफावत असावी, असें सुचविलें. गव्हर्नरांचे सल्लागार, सर नॉर्मन स्ट्रेथी, ह्यांनीं दि. ब. मुदलियार ह्यांच्या सूचनेस उत्तर देतांना, सावकाराकडून ६ टक्क्यांपेक्षा कमी व्याजानें शेतकऱ्यांस इतरत्र कर्ज मिळूं शकत नाहीं, व बँकेचा व्याजाचा दर ५½% केल्यामुळें तिच्याकडे कर्जासाठी अधिक अर्ज येण्याचा संभव नाहीं, असें सांगितलें. सध्याच्या बाजारभावांमुळें कर्जदार कर्जफेडच करीत आहेत, तेव्हां व्याजाचा दर १ टक्का कमी केला, तर तें शेतकऱ्यांस आकर्षक वाटणार नाहीं, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. रिझर्व्ह बँकेनें लँड मॉर्गेज बँकेच्या भक्कमपणाची कसोटी म्हणून १०% ची मर्यादा घातली आहे, ती गाठेपर्यंत रिझर्व्हज वाढवीत राहणेंच शहाणपणाचें होईल, असा सल्ला त्यांनीं दिला. परिषदेनें अखेर ठराव मंजूर केले, त्यांत शेतकऱ्यांस ५% दरानें कर्ज मिळावें, असा ठराव पास झाला.

## होळकर संस्थानच्या सहकारी खात्याचा अहवाल

सप्टेंबर, १९४३ अखेरचा १९४२-४३ चा इंदूर संस्थानाच्या सहकारी खात्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ह्या खात्यांतील अनुभवी अधिकाऱ्यांस धान्यव्यवस्थेच्या कामाकडे वर्ग करावें लागले व कित्येक जागा रिकाम्या राहिल्या, त्याचा खात्याचे कामावर साहजिक परिणाम झाला. बजेटांत तरतूद असूनहि खात्यास त्याचा फायदा घेणें अशक्य झालें. अहवालाचे वर्षी सोसायट्यांची संख्या ८७८ ची ८९१ झाली. सहकारी चळवळींत खेळतें भांडवल ९५ लक्ष रुपयांवरून ९० लक्ष रुपयांवर आलें. सोसायट्यांच्या व्यक्तिशः सभासदांची व सोसायट्यांची कर्जफेड समाधानकारक होती; परंतु शहरी सोसायट्यांच्या वसुलींत प्रगति दिसली नाहीं. सहकारी स्टोअर्सच्या स्थापनेस चालना मिळत आहे, असें दिसतें. रजिस्ट्रार, श्री. शेळके हे सहकारी चळवळीच्या प्रसारासाठी शक्य तो प्रयत्न करून करीत आहेत. सध्याच्या अनुकूल परिस्थितीचा पूर्ण फायदा हातीं यावा, ह्या दृष्टीनें त्यांची खटपट आहे.

## असेंब्लींत रेल्वे अंदाजपत्रकावर चर्चा

युद्ध-वहातुक-खात्याचे मध्यवर्ती सरकारचे मंत्री सर एडवर्ड बेंथॉल यांनीं १९४५-४६ चें रेल्वेचें अंदाजपत्रक ता. १५ रोजीं कायदेमंडळापुढें मांडलें. पुढील वर्षाचें उत्पन्न २२० कोटींचें होईल असा अंदाज आहे. खर्चाचा आकडा १५९.८७ कोटीं-पर्यंत येईल. उरलेल्या रकमेपैकीं ३२ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारास देण्यांत येतील.

वरील अंदाजपत्रकावर जी टीका झाली त्यांत प्रवासांत तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे होणारे हाल, रेल्वे खात्यांत हिंदी लोकांची अधिक भरणा करण्याची आवश्यकता आणि रेल्वे मजुरांचा महागाई भत्ता या गोष्टी प्रमुख होत्या.

### रेल्वे कारभारावर टीका

" तिसऱ्या वर्गाचें उत्पन्न पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाच्या उत्पन्नापेक्षा १८ पटींनीं अधिक असतें आणि तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची संख्या इतर सर्व उतारूंच्या ९० पट असते. असें असतां तिसऱ्या वर्गाची हेळसांड केली जात आहे. आगगाडीच्या तीन वर्गांमध्यें होणारी जागेची विभागणी उतारूंच्या प्रमाणांत असत नाहीं. तिसरा वर्ग जवळ जवळ अंधारांतून प्रवास करतो. गाडी थांबण्याच्या वेळा युरोपीय पद्धतीनें खाना घेणाऱ्या लोकांच्या सोयीवरून ठरविण्यांत येतात. अमेरिकेंतील आणि हिंदुस्थानांतील दरमाणशीं उत्पन्नाचें प्रमाण आणि प्रवासांतील सोयींचा विचार करतां हिंदी उतारू अमेरिकेंतील उतारूच्या सात पट भाडें देतो. तिसऱ्या वर्गाच्या उतारूस जागेचा अभाव व प्रवासांत होणारे हाल दिसत असतां सुद्धां वरिष्ठ वर्गाची मिरासदारी कमी झालेली नाहीं. प्रवासांत होणाऱ्या अपघातांकडे सरकारनें लक्ष पुरविलेलें दिसत नाहीं.

" रेल्वे-वहातुक-व्यवस्थेंत ९९½ टक्के लोक हिंदी आहेत. पण वाद आहे तो राहिलेल्या ½ टक्क्याचा. हे ½ टक्के सर्वांत उच्च अधिकाराच्या जागा धरून बसले आहेत आणि ते युरोपीय आहेत. त्या जागीं हिंदी लोकांचा भरणा झाला पाहिजे.

" चालू वर्षी ८० कोटींचा रु. नफा होईल असा अंदाज आहे. त्यापैकीं २० कोटि रेल्वेमजुरांना महागाईभत्ता म्हणून देण्यांत यावे. रेल्वे वहातुक खात्यांत एक कोट हिंदी लोक गुंतले आहेत. या गोष्टीचा विचार करतां वरील भत्त्याचें महत्त्व कळून येईल. राव कमिटीच्या शिफारशी मंजूर झाल्या पाहिजेत. कामाचे तास कमी करणें आवश्यक आहे. "

### टीकेस सरकारी उत्तर

रेल्वे बोर्डाचे सभासद कर्नल वॅगस्टाफ आणि युद्ध-वहातुक-खात्याचे मंत्री सर एडवर्ड बेंथॉल यांनीं वरील टीकेस वेळोवेळीं खालीलप्रमाणें उत्तरें दिलीं:—" तिसऱ्या वर्गांतील उतारूंचे हाल होतात हें खरें असलें तरी इतर वर्ग सुखानें प्रवास करतात असें नव्हे. उतारूंच्या हालांचें मनोवेधक वर्णन करणें वेगळें आणि त्यावरील उपाययोजना सुचविणें वेगळें. सध्यांच्या परिस्थितींतहि रेल्वेचे अधिकारी उतारूंची जी सोय करीत आहेत त्यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं युद्धानंतर सर्व इष्ट सुधारणा घडून येणार आहेत. महागाईभत्ता म्हणून २० कोटींची रकम सध्या खर्ची घालण्यांत येते. मजुरांच्या सोईसाठी धान्याचीं ७०० दुकानें चालली आहेत. अगदीं वरच्या अधिकाराच्या जागीं परकी लोकांची संख्या घटत असून, हिंदी लोकांचें प्रमाण वाढत आहे. सध्यां युरोपीय अधिकारी ६२५ आहेत. पुढील चार वर्षांत ती संख्या २०० पर्यंत उतरेल. सबंध रेल्वे खातें खालपासून वरपर्यंत हिंदी लोकांच्या हातीं राहील असा काळ फारसा दूर नाहीं. "

### बँकिंग बिलांतून सहकारी बँका कां वगळल्या ?

बँकिंगचा नियोजित कायदा सहकारी बँकांना लागू पडणार नाहीं. सहकारी बँकांचें कार्यक्षेत्र विशिष्ट कार्यापुरतें मर्यादित असलें, तरी शेतीच्या धंद्यास भांडवलाचा पुरवठा, शेतीच्या माल-विक्रीस पैशाचें सहाय, इत्यादि गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि त्या बाबींचा व्यापक बँकिंग कायद्यांत समावेश होणें आवश्यक आहे, असा अभिप्राय इंडियन बँकर्स चेंबरनें व्यक्त केला आहे. सहकारी बँकिंगचा समावेश हिंदी बँकिंग कायद्यांत करणें व्यवहार्य होत नसेल, तर मुख्यतः कारखान्यांना भांडवल पुरविणाऱ्या विशिष्ट औद्योगिक बँकिंग कंपन्यांनाहि कायद्यांतून वगळण्यांत यावें, अशी त्या चेंबरची सूचना आहे. व्यापारी बँकांच्या व्यवहारापेक्षा ह्या संस्थांचा व्यवहार भिन्न प्रकारचा असतो, हें विसरतां कामा नये. चेंबरचा खरा प्रश्न औद्योगिक बँकांस जर कायदा लागू आहे, तर सहकारी बँकांसहि तो लागू कां नसावा, असा आहे. कायदा जरूर तेवढा व्यापक करा, असें चेंबरचें म्हणणें आहे.

---

### बारामती-निरा विभागांतील सोसायट्या पुणें सें. बँकेकडे जाणार

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या बारामती व निरा शाखांखालील सुमारें ३० सोसायट्यांच्या कर्जाच्या देवघेवीचा व्यवहार व बँकिंगचे सर्व व्यवहार पुणें सें. को. बँकेकडे ता. १ एप्रिलपासून देण्यांत यावयाचे आहेत, असें समजतें. पुणें जिल्ह्यांतील एवढाच भाग मुंबई प्रां. बँकेकडे होता, तो पुणें सें. बँकेकडे वर्ग झाला, म्हणजे जिल्ह्यांतील सर्व सोसायट्या जिल्हा बँकेकडेच येतील. ह्यासंबंधांत अॅ. रजिस्ट्रार श्री. चिनमुलगुंद ह्यांनीं बारामतीस नुकतीच भेट दिली होती. पुणें सें. बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर श्री. वा. चिं. भानू हे ह्या नव्या भागाकरितां सी. इन्स्पेक्टर म्हणून प्रारंभीं काम करणार आहेत. सोसायट्यांच्या व्यवहारावर ह्या बदलामुळें मुळींच फरक पडण्याचें कारण नाहीं. व्यक्तिशः ठेवीदारांसहि पुणें सें. बँकेचा भरपूर फायदा घेतां येईल.

---


## बार्शी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

## नोटीस

या बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येतें कीं, मे. साधारण सभेकडील ठराव नंबर ८/२०-९-४४ अन्वयें नेमलेल्या कमिटीनें पोटनियमांस दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्यांचा विचार करण्याकरतां सर्व सभासदांची एक्स्ट्रा ऑर्डिनरी सभा रविवार ता. ११-३-४५ इ. रोजीं दुपारीं ३ वाजतां बँकेच्या खाने मेमोरिअल हॉलमध्यें भरणार आहे. तरी सर्व सभासदांनीं सभेचे वेळीं अगत्यपूर्वक हजर रहावें, कळावें.

बोर्डाच्या हुकुमावरून

बार्शी, ता. १९-२-४५ — र. प. पटवर्धन, मॅनेजर

टीपः—( १ ) वरील सभेकरतां सोसायट्यांनीं नेमून पाठवावयाच्या प्रतिनिधींबाबत ठराव बँकेचे ऑफिसांत ता. १-३-४५ रोजीं दुपारीं ३ वाजेपर्यंत दाखल केले पाहिजेत. त्यानंतर आलेल्या ठरावांचा विचार केला जाणार नाहीं.

( २ ) कमिटीनें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा मसुदा बँकेमध्यें पहाण्याकरतां ठेवला आहे.

## औद्योगीकरण—दारिद्र्यावर तोडगा

### सर विश्वेश्वर अय्या यांचें भाषण

आखिल भारतीय कारखानसंघाची पांचवी वार्षिक परिषद दिल्ली येथें ता. २४ व २५ रोजीं भरली होती. तिचे अध्यक्ष सर एम. विश्वेश्वर अय्या यांनीं आपल्या भाषणांत मूलग्राही महत्त्वाचे कारखाने हिंदुस्थानांत स्थापन होण्याचें अगत्य प्रतिपादन केलें. देशाच्या आर्थिक उद्धाराचें तें आद्य महत्त्वाचें साधन आहे आणि औद्योगीकरणाखेरीज शेतीचा धंदाहि उर्जितावस्थेस येणार नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. यंत्रसामुग्रीच्या उत्पादनास तात्काळ आरंभ केला पाहिजे; शिक्षणासाठी विद्यार्थी परदेशी रवाना करण्यापेक्षा त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था हिंदुस्थानांतच टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूट स्थापून करावी; हिंदुस्थानांत संयुक्त राष्ट्रांनीं स्थापन केलेले लष्करी कारखाने बिनलष्करी जिनसांच्या उत्पादनास योग्य कसे करतां येतील ह्याची मुख्यतः हिंदी तज्ञांकरवी चौकशी करवून त्यांचें योग्य रूपांतर करण्यांत यावें; इत्यादि सूचना सर विश्वेश्वर अय्या ह्यांनीं केल्या. त्यांच्या भाषणांत हिंदी औद्योगिक उत्कर्षाबद्दल कळकळ, उपाययोजनेविषयीं स्वच्छ कल्पना, इत्यादि गोष्टी स्पष्ट दिसून येतात. सरकारी धोरणांत तडफ व संकलित विचार ह्यांचा अभाव त्यांस आढळला.

### शरीरपोषण व पोट भरणें ह्यांतील फरक

## चुकीचा समज

" आरोग्याच्या अपेक्षेनुसार, श्रमांच्या कराव्या लागणाऱ्या कामानुसार, वयानुसार व स्त्री-पुरुष भेदानुसार, तसेंच गर्भारपण, बालपोषण वगैरे शरिरावर पडणाऱ्या जबाबदारीनुसार, शरिरास लागणाऱ्या अन्नपदार्थांत फेरबदल करावे लागतात. शरीरपोषण योग्य होत असेल तर आरोग्य राखणें सुलभ जातें; हें सर्वांस समजत असूनहि युद्धपूर्वकाळीं फारसें उमजत नव्हतें. पोट भरलें किंवा भूक शमली म्हणजे पोषण नीट होत असलें पाहिजे असा अनेकांचा विशेषतः गरीबांचा युद्धपूर्वकाळीं समज होता. हल्लींच्या परिस्थितींत पोट भरलें असें वाटलें तरी कुठेंतरी चुकत आहे, अन्नपदार्थ जसे सकस असावेत तसें नाहींत, दूध भाजीपाला वगैरे जे आवश्यक ते मुळींच मिळत नाहींत, किंवा फार थोड्या प्रमाणांत कधींतरी मिळतात वगैरे अनुभवांमुळें योग्य शरीरपोषण व पोट भरणें ह्यांत जमीनअस्मानाचा फरक आहे असें आतां समजूं लागलें आहे. संकटांतूनहि कधीं कधीं सुखाचे किरण दिसूं लागतात. तशापैकींच हा एक युद्धजन्य परिस्थितींतला अनुभव होय. हल्लीं अन्नपदार्थ, महागाई व शरीरपोषण हा खेडेगांवींसुद्धां एक चर्चेचा विषय झाला आहे." डॉ. के. एम. म्हसकर, एम. ए., एम. डी., डी. पी. एच. ह्यांचा " आरोग्य मंदिर शारीरिक शिक्षण विशेष अंक " ह्यांतील लेख.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित ‡ अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २०।२।४५ | बुधवार २१।२।४५ | गुरुवार २२।२।४५ | शुक्रवार २३।२।४५ | सोमवार २६।२।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३३५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१६५—० | २१५१—४ | छ. शि. फत्तुरला शिवाजी मिल शेअर विभाग बंद | २१४३–१२ | सार्वजनिक सुट्टी |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०५—० | ३९८—८ | | ३९५—८ | |
| २२०१; १६९५ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८१८–१२ | १७९७—८ | | १७८०—० | |
| ७६५; ५३३ | १६–०–०‡ | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१२—० | ६०६—० | | ६०५—० | |
| ६५३; ४७५ | ३५–०–०‡ | मे | स्वदेशी | १०० | ५४४—० | ५४१—० | | ५३८—० | |
| ४९८; ३६१ | १०–०–०‡ | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३९२—८ | ३८९—० | | ३८५—० | |
| ३७७; २६५ | २५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | ३११—० | ३०८—८ | | ३०४—० | |
| ३९४; २८२ | ६–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३०१—८ | ३००—० | | २९५—८ | |
| ३०५; २१८ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २७४—० | २७०—० | | २६७—० | |
| ५-१०-६; ३-६ | ०–३–०‡ | मे | अपोलो | २ | ४—३ | ४-२-३ | | ४—२ | |
| २१-१४;१३-४-६ | १–४–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५—२ | १५—० | | १४–१४ | |
| ४-९; २-७ | ०–५–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—३ | ३-२-६ | | ३–१–६ | |
| १२७०; ६३० | १११–०–० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९८–१२ | ६९५—० | | ६८७—८ | |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३२—८ | २३५—४ | | २३५—० | |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२५—९ | २२३—८ | | २२३—० | |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५४६—४ | ५४२—८ | | ५४५—० | |
| ९३-१२; ७३ | २–०–० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८१—० | ८०–१२ | | ८०—८ | |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४–१० | ३४—७ | | ३४—१ | |
| ८५; ४८ | ३–४–० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५६—० | ५६—० | | ५६—० | |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २१—२ | २१—० | | २१—० | |
| ९०; ६८-१२ | ३–०–० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ७०–१२ | ७१—८ | | ७१—० | |
| | | | ३½ रोखे | १०० | ९९–१० | ९९–१० | ९९—१०—३ | ९९–१०–६ | |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद

कोहिनूर मिल्स १६–२–४५ ते १४–३–४५ बँक ऑफ बरोडा १६–२–४५ ते ८–३–४५

बी. आय. सी. २८–२–४५ ते २८–३–४५ न्यू ग्रेट मिल्स ,, ,,

बँक ऑफ इंडिया १६–२–४५ ते ३–३–४५

दि. २३–२–४५

३% व्हिक्टरी लोन = ९९ रु. १२ आ.

सोनें = ७३—३

चांदी = १२८—०

## "सहकार—ज्ञान, भक्ति व योग ह्यांचा समन्वय"

### जुन्या धर्माचा नव्या नांवाखाली पुरस्कार

मद्रास येथील सेंट्रल लँड मॉर्गेज बँकेमध्यें कै. श्री. रामदास पंटुलू ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण मद्रासच्या गव्हर्नरांचे सल्लागार, श्री. राममूर्ती, ह्यांनीं नुकतेंच केलें. श्री. पंटुलू ह्यांनीं हिंदी सहकारी चळवळीचें मार्गदर्शन केलें, त्याबद्दल आदर व्यक्त करून श्री. राममूर्ती म्हणाले, "ज्ञान, भक्ति आणि कर्म ( दृष्टि, विश्वास आणि कार्य ) ह्या तीनहि योगांचा समन्वय सहकारांत होतो. निर्जीव कायद्याचा कीस काढीत बसणाऱ्या वकिलांना सहकारी चळवळींत समाधान लाभतें, त्यामुळेंच खऱ्या सहकारी कार्यकर्त्यांत एवढी अढळ निष्ठा दिसून येते. श्री. पंटुलू ह्यांनीं वकिलींतील पैशावर पाणी सोडून सहकारी चळवळीचें नेतृत्त्व स्वीकारलें. कॉंग्रेसच्या धोरणाकडे त्यांचा कल असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ते खरेखुरे सहकारीच होते. सहकार आणि लोकशाही ह्यांचा समन्वय हिंदी संस्कृतीस धरून असल्याकारणानें, जुन्या धर्मीचा "सहकार" हा बाह्यात्कारीं नवा अवतार हिंदुस्थानांत मूलतः नवीन नाहीं. ह्या पुनरुज्जीवनाचे एक आद्य पुरस्कर्ते, ह्या दृष्टीनें श्री. पंटुलू ह्यांचें महत्त्व विशेष आहे. सध्या वेगवेगळे दृष्टिकोन यशस्वी होण्यासाठी झगडत असतांना, हिंदी संस्कृतीस धरून असलेल्या सहकारी भूमिकेचा आत्मविश्वासानें पुरस्कार करण्याचें धाडस केलें पाहिजे. आपला जुना खरा धर्म नव्या नांवाखाली पसरविणारे सहकारी नेते हिंदुस्थानाचें एका दृष्टीनें पुनरुज्जीवन करीत आहेत."

### सैनिकांचें शारीरिक स्वास्थ्य

हिंदी नि ब्रिटिश सैनिकांच्या आरोग्याचा गेल्या चार वर्षांचा आढावा निरखून पाहिला असतां १९४३ मधील आरोग्यमान समाधानाची परिस्थिति दाखवीत आहे असें आकड्यांवरून सिद्ध होत आहे. १९४०-४१-४२ या कालखंडाच्या अवधींत ब्रिटिश सैनिकांच्या आरोग्यांत बराच बिघाड असल्याचें आढळून आलेलें होतें. पण १९४३ च्या हातीं आलेल्या ताज्या आरोग्य इतिवृत्तांत ही परिस्थिति बदललीं असल्याचें दिसून आलें आहे. हिंदी सैनिकांनाहि १९४३ साल चांगलें गेलें असल्याचें या इतिवृत्तांतील आकडे दाखविण्यास समर्थ आहेत. मात्र १९४१-४२ नि तत्पूर्वीचा काळ हिंदी सैनिकांना अधिक सुखावह गेलेला होता. १९४२ सालीं ब्रिटिश अधिकारी नि इतर सैनिक दर हजारीं अनुक्रमें १०९९.८ व ९८९.१ उपचाराकरितां जात. हिंदी सेनेच्या बाबतींत हेंच प्रमाण ७०८.९ नि ७४६.५ असें होतें. १९४३ मधील हेच आकडे अनुक्रमें ९३७.४ व ८४७.२ नि ६५५.०, ७४२.७ असें आहेत. हिंदुस्थानच्या सीमान्त प्रांतांतील हवा अत्यंत वाईट नि तेथेंच या सैनिकांना या अवधींत झगडावें लागलें होतें. सर्वांत अधिक भयंकर पीडा मलेरिया तापानें दिलेली आहे.

### पुराणवस्तु संशोधन खात्यांत युरोपियन

पुराणवस्तु संशोधन खात्यांत बऱ्याच युरोपियनांस नोकरी मिळणार आहे असें दिसतें. बंगालच्या गव्हर्नरांचे धाकटे बंधु, मि. केसी ह्यांच्या नेमणुकीनें त्यास प्रारंभ होत आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | रु. १५,००,००० |
| काढलेलें भांडवल | :: | रु. १२,२५,००० |
| भरलेलें भांडवल | :: | रु. १२,११,५०० |

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७२ लक्ष

शाखा व उपशाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | २३ नाशिक ( जि. नाशिक ) |
| २ नीरा " | २४ लासलगांव " |
| ३ सातारा ( जि. सातारा ) | २५ मालेगांव " |
| ४ कऱ्हाड " | २६ नांदगांव " |
| ५ किर्लोस्करवाडी " | २७ घोटी " |
| ६ कोरेगांव " | २८ सटाणा " |
| ७ इस्लामपूर " | २९ येवलें " |
| ८ शिराळें " | ३० धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ तासगांव " | ३१ दोंडाईचें " |
| १० वाई " | ३२ नंदुरबार " |
| ११ भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ साक्री " |
| १२ कल्याण " | ३४ शहादें " |
| १३ पालघर " | ३५ शिरपूर " |
| १४ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिंदखेडें " |
| १५ अहमदनगर ( " अहमदनगर ) | ३७ तळोदें " |
| १६ बेलापूर रोड " | ३८ दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १७ कोपरगांव " | ३९ गोधा " |
| १८ पाथर्डी " | ४० झालोद " |
| १९ राहुरी " | ४१ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २० शेवगांव " | ४२ नडियाद ( जि. खेडा ) |
| २१ वांबोरी " | ४३ आनंद " |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


इं पथ पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. गोविंद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन-आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ — पुणें, बुधवार तारीख ७, मार्च १९४५ अंक १०

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही.पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

## १९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी.ए.
अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

ग्रंथिशोथ, गजकर्ण इ. वर गुणकारी
आयोडिनचें मलम

## "आयडोनेल"

श्रीधूतपापेश्वर आद्य औषधि पनवेल
पनवेल लि. कारखाना जि. कुलाबा.

सरकारी मंजुरीनें पास झालेल्या ले-औटची

## ७५ प्लॉटस्‌ची मॉडर्न कॉलनी

बारा हजार स्क्वेअर फुटांहून अधिक क्षेत्रफळ असलेले टेकडीखालील हवेशीर प्लॉटस्.

किंमत प्रत्येकीं रु. ९०० ते १६००.

सरकारी रस्त्यावरील ही कॉलनी आयडियल कॉलनीसमोरील रामबाग कॉलनीस चिकटून आहे.

सूचनाः—आयडियल कॉलनींतील सर्व प्लॉटस् खपले.

त्वरित भेटा अगर लिहाः—

"दयानिवास" कॉमनवेल्थ कॉलनी. नारायण पेठ, पुणें नं. २ } म. य. दातार.

अगर

मॅनेजर— मॉडर्न कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट कंपनी, जीवन छाया, पुणें नं. ४.

## विविध माहिती

### कापडाचा तुटवडा—प्रेतावरील कापडाची बाजारांत विक्री

दहनासाठी स्मशानांत नेलेल्या प्रेतांवरील कापड काढून आणून तें बाजारांत विकलें जात आहे, अशी कलकत्ता शहरांत परिस्थिति निर्माण झाली आहे. हिंदुस्थान सरकार बंगालकडे पुरेसें कापड पाठवीत असतां, कापडाचा एवढा तुटवडा कां पडावा, हें त्या सरकारास समजत नाहीं. दर माणशीं वार्षिक १० वार कापडाच्या हिशेबानें बंगालच्या वाट्यास जेवढें कापड यावयाचें त्यापेक्षा ज्यास्त कापड तिकडे पाठविण्यांत आलेलें आहे, असें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें आहे.

### पुणें शहर म्युनिसिपॅलिटी कर्ज उभारणार

पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें मुंबई सरकारकडे ९ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स विकून कर्ज उभारण्यासाठीं परवानगी मागितली आहे. सरकारकडून ड्रेनेज सुधारण्यासाठीं पूर्वी घेतलेल्या भारी दराच्या कर्जाची फेड करण्यासाठीं हलक्या दरानें कर्ज काढण्याचा म्युनिसिपॅलिटीचा विचार आहे. ह्या डिबेंचरांच्या कर्जास म्युनिसिपल करांचें व उत्पन्नाचें तारण राहणार आहे. व्याजाचा दर ४% असेल. कर्जाची मुदत १५ वर्षे असेल. सरकारची मंजुरी मिळाल्यानंतर कर्ज उभारणी केली जाईल.

### शेअर विक्रीस परवानगी

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनीस ८० रद्द केलेले व २५० नवे शेअर जून, १९४५ पूर्वी विकण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारकडून मिळाली आहे.

### बँकेच्या नोकरांची लष्करांत नोकरी

बार्कलेज ह्या ब्रिटिश बँकेच्या नोकरवर्गांपैकीं १,०४८ नोकर लष्करांत दाखल झाले आहेत. १०८ नोकर युद्धांत मृत किंवा बेपत्ता झाले.

### लोकरीच्या कारखान्यास सरकारी मदत

दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें सुमारें १ कोटि रुपये गुंतवून एक लोकरीचा कारखाना स्थापन केला आहे.

### प्रेसिडेन्सी इं. बँक, लि. पुणें

वरील बँकेस १९४४ सालीं ४७,८३९ रुपये नफा झाला. त्यांपैकी २०,४०० रुपये गंगाजळी व इतर फंडांत टाकून व २०,६१३ रुपये पुढील वर्षाचे हिशेबांत ओढून भागीदारांस ४% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठीं ६,८२३ रुपयांचा विनियोग करण्यांत येईल.

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँकेनें १९४४ सालीं १२ नव्या शाखा स्थापन केल्या. ३० लक्ष रुपयांचें भांडवल १५ रु. वाढाव्यानें विक्रीस काढलें. वाढाव्याचे ९ लक्ष रुपये मिळाले, ते रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केले. बँकेनें ४,११,५६६ रुपये निवळ नफा मिळविला. भागीदारांस ६% करमाफ डिव्हिडंड, मिळालें. गेल्या वर्षांतील प्रगति खालील तक्ता दर्शवितो.

| | ३१-१२-४३ | ३१-१२-४४ |
|---|---|---|
| खात्यांची संख्या | १८,४०७ | ३२,९५१ |
| ठेवी ( रु. ) | ३,७९,६४,६७८ | ७,२३,९०,७४३ |
| कर्जें ( रु. ) | ६३,८६,३७८ | १,१६,७६,२४६ |
| गुंतवणूक ( रु. ) | २,४७,६१,४८६ | ५,३०,९०,३८५ |
| एकूण खेळतें भांडवल रु. | ४,२२,०३,७१३ | ८,१९,०९,३४४ |
| शाखांची संख्या | २० | ३२ |
| नोकरांची संख्या | ४६७ | ६२२ |
| दिलेला पगार ( रु. ) | ३,१६,४०४ | ५,३४,०५८ |

### 'उद्यम' ऊस-गूळ-साखर विशेषांक

उद्यम मासिकाचा ऊस-गूळ-साखर विशेषांक जानेवारींत प्रसिद्ध झाला आहे, त्यांत उसाची लागवड, गूळ तयार करणें, हिंदी साखरेचा पूर्वेतिहास, साखर तयार करणें, महाराष्ट्रांतील साखर कारखानें, इत्यादि विषयावर आकडेवार माहितीपूर्ण लेख आले आहेत, ते वाचून सामान्य वाचकासहि ह्या धंद्याची उत्कृष्ट कल्पना येऊं शकेल. उसाची लागवड व साखरेचें उत्पादन, ह्याबाबत हिंदुस्थानानें पुष्कळच प्रगति केली असून त्यांत महाराष्ट्राचें स्थान महत्त्वाचें आहे. ह्या दृष्टीनें महाराष्ट्रीयांना ह्या धंद्याविषयीं थोडी जिज्ञासा व आपुलकी वाटणें स्वाभाविक आहे. "उद्यम"चा हा खास अंक वाचनीय व संग्राह्य असा झाला आहे.

### लोकल गाड्यांत गर्दी कां ?

जी. आय. पी. रेल्वेच्या सबर्बन लोकल गाड्यांतून १९३८-३९ सालीं ३ कोटि, ३६ लक्ष उतारूंनीं प्रवास केला होता. १९४३-४४ मध्यें त्यांची संख्या ७ कोटि झाली. म्हणजे, उतारूंच्या संख्येंत १०९% वाढ झाली.

### सहकारी परीक्षांचे निकाल

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे नोव्हेंबर १९४४ मध्यें घेण्यांत आलेल्या परीक्षांत पुणें केंद्रांतून खालील उमेदवार उत्तीर्ण झाले:—

सर्टिफिकेट परीक्षा

१. कुळकर्णी अनंत एकनाथ

डिप्लोमा परीक्षा

१. महसबुद्धे हरि वासुदेव द्वि. वर्ग
२. कुळकर्णी शंकर पुरुषोत्तम ति. वर्ग

## हिंदुस्थानाचा खर्च युद्धापूर्वीच्या मानानें सहापट झाला

### अंदाजपत्रकांतील तुलनात्मक आकडे

( कोटि रु. )

| | १९३८-३९ (युद्धापूर्वी) | १९४१-४२ (जपानी युद्धापूर्वी) | १९४४-४५ बजेट | १९४४-४५ दुरुस्त | १९४५-४६ बजेट |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न ... ... | ८५·५२ | १३४·५७ | ३०८·४७ | ३५६·८८ | ३५३·७४ |
| खर्च ... ... | ८५·१५ | १४७·२६ | ३६३·१७ | ५१२·६५ | ५१७·६३ |
| मुलकी ... ... | ३८·९७ | ४३·३३ | ८६·५६ | ११५·४२ | १२३·४० |
| लष्करी ... ... | ४६·१८ | १०३·९३ | २७६·६१ | ३९७·२३ | ३९४·२३ |
| तूट ... ... | ०·६३ | १२·६९ | ५४·७० | १५५·७७ | १६३·८९ |
| ब्रिटिश सरकारकडून वसूल व्हावयाचा युद्धखर्च | नाहीं | १९४·०० | ४४३·०२ | उपलब्ध नाहीं | |
| युद्धाप्रीत्यर्थ एकूण खर्च ... | ४६·१८ | २९७·९३ | ७४४·२३ | उपलब्ध नाहीं | |

अर्थ

## आयुर्विमा कंपन्यांच्या खर्चावर कडक बंधनें

### सिलेक्ट कमिटीच्या शिफारसी

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें विमा कायद्याची दुरुस्ती करणारें एक बिल मांडण्यांत आलें, त्यांत "विमा एजंट नेमणारांचे बाबत कांहीं इष्ट तरतुदी" करणारें म्हणजे चीफ एजंट व स्पेशल एजंट ह्यांचे वेतनावर मर्यादा घालणारें एक कलम होतें. हें बिल तपशीलवार विचारासाठी सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्यांत आलें, तेव्हां तिनें वरील कलम अजिबात गाळून त्या ऐवजीं आयुर्विमा कंपन्यांचे मुख्यतः एकूण खर्च नियंत्रित करणारें एक क्रांतिकारक व व्यापक स्वरूपाचें नवें कलम दाखल केलें! १ जानेवारी, १९४६ पूर्वी कंपन्यांनीं मिळविलेल्या कामावर व त्यानंतर मिळविलेल्या कामावर कंपन्यांस कमाल खर्च किती करतां यावा हें त्या नव्या कलमानें सांगितलें आहे. कंपनीकडील एकूण चालू कामाच्या वाढत्या आकड्याबरोबर खर्चाचें प्रमाण उतरत जावें, अशी त्याची कल्पना आहे. खर्चाचे नियोजित नियंत्रित दर खाली दिले आहेत.

| | कमाल खर्चाचें प्रमाण |
|---|---|
| १ जाने. १९४६ पूर्वीचें काम | पहिल्या वर्षाच्या हप्त्यांवर ८५% व रिन्युअल हप्त्यांवर १२½% ते १९% |
| १ जाने. १९४६ नंतरचें काम | पहिल्या वर्षाच्या हप्त्यांवर ७२½% ते ९४% व रिन्युअल हप्त्यांवर ११% ते १६½% |

### दोन तज्ज्ञांचा अभिप्राय

कांहीं कंपन्या काम मिळविण्यासाठी भरमसाट खर्च करीत आहेत व तो थांबविण्यासाठी कायदेशीर योजना करणें आवश्यक आहे, ह्या भूमिकेवरूनच सिलेक्ट कमिटीनें कमाल खर्चाच्या वरील मर्यादा सुचविल्या आहेत. तथापि सिलेक्ट कमिटीच्या शिफारसी अत्यंत अव्यवहार्य आहेत, असा विमाव्यवसायी मंडळींचा अभिप्राय आहे. विमा कंपन्यांचा कारभार किफायतशीर व्हावा, ह्याबद्दल कुणाचेंच दुमत नाहीं. परंतु सिलेक्ट कमिटीची योजना अंमलांत आल्यास त्यामुळें कंपन्यांच्या कारभारांच्या तपशीलांत अनिष्ट ढवळाढवळ होईल आणि विम्याच्या धंदास ती पोषक होणार नाहीं, असें मत व्यक्त केलें जात आहे. ओरिएंटल कंपनीचे अनुक्रमें मॅनेजर व ॲक्चुअरी मि. एच. ई. जोन्स, एफ. एफ. ए., ए. आय. ए. व श्री. के. आर. श्रीनिवासन्, बी. कॉम., एफ. आय. ए., ह्या दोघांनीं एका १५ पृष्ठांचे पुस्तिकेंत सिलेक्ट कमिटीच्या वर निर्दिष्ट केलेल्या शिफारसीची काळजीपूर्वक छाननी केली आहे आणि विमा जगांत खळबळ उडवून देणाऱ्या ह्या प्रश्नावर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे.

### सध्याच्या कायद्याची तरतूद पुरेशी आहे

विमा पॉलिसीचे दर ठरवितांना मृत्यूंचें अपेक्षित प्रमाण, अपेक्षित व्याज व येणाऱ्या खर्चाचा अंदाज, हीं विचारांत घेतलेलीं असतात. अशा रीतीनें योग्य ठरणारे दर आकारून कंपनी काम मिळविते, परंतु कंपनीचा कारभार व्यवस्थित चालला आहे किंवा नाहीं हें पाहण्यासाठी तिचें कालांतरानें मूल्यमापन करण्यांत येतें. कंपनीचे हप्त्यांचे दर पुरेसे आहेत किंवा नाहींत व मूल्यमापनाच्या कसोटीस कंपनी उतरते किंवा नाहीं, ह्यावरून तिच्या कारभाराचा भक्कमपणा समजून येतो. कंपनी नोंदतांना, प्रत्येक कंपनीला आपले हप्त्यांचे दर योग्य असल्याचा ॲक्चुअरीचा दाखला पुढें करावा लागतो. हप्त्यांमध्यें खर्चासाठी केलेली तरतूद पुरेशी आहे, असाच त्याचा अभिप्रेत अर्थ आहे. मूल्यमापनांत खर्चासाठी धरलेली तरतूद बरोबर नाहीं, असें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला आढळल्यास त्यास स्वतःच्या पसंतीच्या ॲक्चुअरीकडून कंपनीचें पुनः मूल्यमापन करवून घेतां येतें. पांच वर्षांतून एकदां तरी प्रत्येक कंपनीस स्वतःचें मूल्यमापन करून घ्यावेंच लागतें; तेव्हां पांच वर्षांपेक्षा दीर्घकाळ कोणत्याच कंपनीस भरमसाट खर्च करतां येणार नाहीं, अशी आजचीहि परिस्थिति आहे. कंपनीचे हप्त्यांचे दर योग्य असल्याचा ॲक्चुअरीचा दाखला तिनें दरसाल मिळवला पाहिजे; निदान मूल्यमापनाचे वेळीं तरी तिनें तो सादर केला पाहिजे, अशी कायद्यांत सुधारणा केल्यास भरमसाट खर्चाचा एवढा बाऊ वाटण्याचें कारण नाहीं असा मि. जोन्स व श्री. श्रीनिवासन् ह्यांचा अभिप्राय आहे.

### शिफारसी शास्त्रशुद्ध नाहींत

सिलेक्ट कमिटीनें सुचविलेल्या खर्चाच्या प्रमाणाच्या कमाल मर्यादा शास्त्रशुद्ध नाहींत व प्रत्येक कंपनीच्या वैयक्तिक परिस्थितीचा विचार त्यांत संभवत नाहीं, ही गोष्ट पुस्तिकेंत स्पष्ट करून दाखविलेली आहे. कमी कामाच्या कंपनीस जास्त खर्च करण्याची मुभा ठेवणें व मोठ्या कामाच्या कंपनीस कमी खर्चांत कारभार करण्यास सांगणें, हें विम्याचे तत्त्वाशीं विसंगत आहे. कमी कामाच्या कंपनीच्या व्यवहारांतच काटकसरीची आवश्यकता तीव्र असते व त्याचा खर्च आवाक्यांत येण्याचें महत्त्व अधिक असतें. कंपनीनें उतरविलेले विमे किती प्रकारचे आहेत, चालू जुनें काम व नवें काम ह्यांचें परस्पर प्रमाण काय आहे, हप्त्यांत किती खर्चाची तरतूद आहे, इत्यादि गोष्टींवरच कंपनीनें व्यवस्थेचा खर्च किती करावा, हें अवलंबून राहतें. सर्व कंपन्यांना लागू पडणारा सोपा नियम तयार करणें कसें अशक्य आहे, ह्याचें स्पष्टीकरण वरीलप्रमाणें करण्यांत आलें आहे.

### बंधनें अव्यवहार्य

१९% पेक्षा अधिक रिन्युअल खर्च असूं नये, इतकीच किमान अपेक्षा असली तरी २५% पेक्षा अधिक रिन्युअल खर्च करणाऱ्या कंपनीसच भरमसाट खर्चाची कंपनी आपण मानलें तरीहि नियोजित बंधन कसें अव्यवहार्य ठरतें हें पहाणें आतां बोधप्रद होईल. डिसेंबर, १९४३ अखेर एकूण १९१ हिंदी कंपन्या आयुर्विम्याचें काम करीत होत्या व त्यांच्या एकूण चालू कामाचा आकडा ३११ कोटि रुपये होता. फक्त ४२ कंपन्यांच्या रिन्युअल खर्चाचें प्रमाण २५% पेक्षा अधिक होतें व त्यांचें चालू काम ८ कोटि रुपये म्हणजे एकूण चालू कामाच्या २·६% होतें. म्हणजे भरमसाट खर्च करणाऱ्या ४२ कंपन्यांना जनतेचा फारसा आश्रय मिळालेला नाहीं हें स्पष्ट आहे. त्यांचेवर उपाययोजना करून

सरकारनें त्यांस मार्गावर आणणें युक्त होईल, परंतु चांगल्या तऱ्हेनें चालेल्या कंपन्यांवरहि खर्चाच्या अशास्त्रीय कमाल मर्यादेचें बंधन घालणें योग्य होणार नाहीं, हें मि. जोन्स व श्री. श्रीनिवासन् यांचें म्हणणें चांगल्या कंपन्यांच्या तरफदारीचें असलें तरी व्यवहारास धरूनच आहे.

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक
## ( १९४५–४६ )

हिंदुस्थान सरकारचे अर्थसचिव, सर जेरेमी रेसमन, ह्यांनीं ता. २८ रोजीं १९४५-४६ सालाबाबतचें अंदाजपत्रक मध्यवर्ती कायदेमंडळापुढें मांडलें. अंदाजपत्रकावरील भाषणांत त्यांनीं कांहीं गोष्टींचें नेहमीप्रमाणें विशदीकरण केलें आहे. १९४४-४५ च्या अंदाजपत्रकांत खर्चाचे आणि उत्पन्नाचे आकडे अनुक्रमें ३६३·२ आणि २८४·९ कोटि रु. असे होते. दुरुस्त केलेल्या अंदाजपत्रकांत हेच आकडे ५१२·६५ रु. आणि ३५६·८८ रु. होऊन एकंदर १५५·७७ कोटींची तूट आली. त्या वर्षाच्या अंदाजपत्रकांतील अपेक्षित तूट फक्त ७८·२ कोटींची होती. १९४४-४५ या सालांत खर्च अंदाजाबाहेर कां वाढले त्याचीं कारणें अर्थसचिवांनीं दिलीं आहेत. जपानशीं होणारा लढा हिंदुस्थानच्या भूमीवर होत असल्यामुळें परदेशीं पाठवावयाचें सैन्य तर देशांतच ठेवावें लागलें आणि बाहेरूनहि सैन्य मागवावें लागलें; ब्रिटिश आणि हिंदी सैनिकांना पगारवाढ; अमेरिकेकडून मालाची आणि माणसांची वाढती मागणी, वगैरे कारणांमुळें लष्करी खर्च वाढला. बिनलष्करी खर्चांत वाढ होण्याचीं कारणें अशीं, कीं बंगालच्या दुष्काळासाठी मदत द्यावी लागली; मुंबईमध्यें घडलेल्या गोदींतील स्फोटामुळें जें नुकसान झालें त्यांतील कांहींची भरपाई करावी लागली, निर्वासितांस आर्थिक मदत केली, यू. एन. आर. आर. ए. ला हिंदुस्थानची वर्गणी दिली, तसेंच राहणीचा खर्च वाढल्यामुळें मध्यवर्ती सरकारच्या नोकरांस महागाई भत्ता वगैरे मदत द्यावी लागली.

पुढील वर्षाच्या खर्च–उत्पन्नाबाबतच्या आकड्यांत १९४४-४५ च्या सुधारलेल्या आकड्यापेक्षा फारसा फरक दिसत नाहीं. ते आकडे ढोबळपणें असे देतां येतील:—

१९४५–४६ चें अंदाजपत्रक ( कोटि रुपये )

| | |
|---|---|
| लष्करी खर्च | ३९४·२३ |
| बिनलष्करी खर्च | १२३·४० |
| एकूण | ५१७·६३ |
| चालू करांच्या आधारें उत्पन्न | ३५३·७४ |
| तूट | १६३·८९ |

नव्या अंदाजपत्रकांतील ही १६३·८९ कोटींची तूट कशी भरून काढावयाची तें फडणवीसांनीं दाखवून दिलें आहे. करभारावर फारसा भर देऊन भागणार नाहीं; जुने कर अधिक कसोशीनें लागू करणें आणि कर चुकविण्याची शक्यता न ठेवणें. ह्या गोष्टी करतां येतील. फाजील नफ्यावरील कर आणि सक्तीच्या ठेवी आणखी एक वर्ष चालू दरानेंच लागू करण्यांत येतील. प्राप्तीवरील कर आकारण्यांत विशेष चतुराई दाखविण्यांत आली आहे असें अर्थसचिवांनीं सांगितलें. प्राप्तीमध्यें श्रमानें मिळविलेलें धन आणि विनाश्रम प्राप्त झालेलें धन असा फरक करण्यांत आला आहे. पहिल्या प्रकारच्या प्राप्तीच्या १/१० भागावर ( पण तो अधिकाधिक २००० रु. असला तर ) कर बसविण्यांत येणार नाहीं. या योजनेमुळें मध्यवर्ती सरकारास जी ३½ कोटींची बूड येईल ती भरून काढण्यासाठी १५,००० रु. प्राप्तीवरील सरचार्ज रुपयामागें तीन पैनीं वाढविण्यांत येईल. तंबाखूवरील कर वाढवावयाचे आहेत. उत्कृष्ट तंबाखूचे तीन प्रकार समजण्यांत येतील आणि त्यांवर दर पौंडास अनुक्रमें ७ रु. ८ आ., ५ रु. आणि ३ रु. ८ आ. असा कर ठेवण्यांत येईल. पोस्टानें पाठवावयाच्या पार्सलांवरील आकार पहिल्या ४० तोळ्यांस ६ आणे आणि पुढील प्रत्येक चाळीस तोळ्यास ४ आणे असा होता, त्याऐवजीं सरसकट दर चाळीस तोळ्यास ६ आ. असा होईल. टेलिफोन रेन्टलसवरील सरचार्ज ⅙ ऐवजीं ⅓ आणि ट्रंक कॉलवरील सरचार्ज २० टक्क्यांऐवजीं ४० टक्के असे आकारण्यांत येतील. साध्या तारेवरील सरचार्ज १ आण्यानें आणि तातडीच्या तारेवरील सरचार्ज २ आण्यांनीं वाढावयाचा आहे. बाकीची रक्कम कर्जानें उभारावी लागेल.

अर्थमंत्र्यांच्या भाषणांत आणखी कांहीं मुद्यांचा विचार करण्यांत आला आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांसंबंधीं युद्ध संपेपर्यंत कांहींच निश्चित करतां यावयाचें नाहीं. ब्रेटन वुडस येथें जें हिंदी शिष्टमंडळ गेलें होतें त्याच्या कामगिरीसंबंधींचें पत्रक अजून निघावयाचें आहे. युद्ध संपल्यानंतर शांतता प्रस्थापित करावयाची म्हणजे जो मधला संक्रमणाचा काळ जाईल, त्या काळामध्यें कदाचित् आजच्यापेक्षांहि मोठे आर्थिक प्रश्न निर्माण होतील. कांहीं वर्षें आर्थिक तूट सोसावी लागेल. सध्यां प्रांतांनीं पुनर्रचना–निधि तयार करावयास आरंभ केला आहे, तो निधि त्यांस उपयोगी पडेल. आपल्या कारकिर्दींचीं गेलीं सहा वर्षें कशीं आणीबाणीचीं होतीं तें सांगून सर जेरेमींनीं आपलें भाषण आटोपलें.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.च्या सभासदांस विनंती

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही चर्चात्मक साधारण सभा रविवार तारीख २५ मार्च १९४५ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या दिवाणखान्यांत ( बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें शहर ) भरणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

बोर्डाच्या हुकुमावरून
द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

पुणें शहर,
तारीख २ मार्च, १९४५.

## स्फुट विचार

### मध्यवर्ती सरकारच्या तुटीची तजवीज

हिंदुस्थान सरकारच्या हिशेबांत उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी युद्धपरिस्थितीमुळें अशक्य झाली असून सुमारें दीडशें कोटि रुपयांची वार्षिक तूट कर्जानें भरून काढावी लागत आहे. युद्धाच्या प्रारंभापासून गेल्या जानेवारी अखेरपर्यंत ह्या कर्जाची रकम ८३३ कोटि रुपये झाली आहे. फेब्रुवारी १९४४ ते १९४५ जानेवारी अखेरच्या एक वर्षाचे अवधींत निरनिराळ्या प्रकारांच्या कर्जांचे मार्गांनीं सरकारास २८६ कोटि रुपये मिळाले. परंतु हिंदुस्थान सरकारास कर्ज काढावें लागत आहे तें त्याच्या प्रत्यक्ष उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितांच नसून ब्रिटिश व अमेरिकन सरकारांच्या वतीनें युद्धाप्रीत्यर्थ पैसा पुरवावा लागतो त्याची भरपाई करण्यासाठीहि जनतेच्या बचतीचा ओघ सरकारी तिजोरीकडे वळवणें आवश्यक झालें आहे. वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नांतली ही तूट नसली तरी जादा पैसा सरकारास उभा करावा लागतो, तो कर्जाच्या स्वरूपांत लोकांकडून आला नाहीं तर त्यास चलनविस्ताराचें स्वरूप धारण करावें लागतें आणि ह्या फाजील चलनाचा परिणाम महागाई वाढण्यांत होतो. हें चलन शोषून घेण्यासाठी सरकारनें अनेकविध उपाय योजिले आहेत. करांचा पैसा अगाऊ गोळा करणें, सोनें-चांदी बाजारांत विकून चलन खेचून घेणें, इत्यादि मार्ग सरकारनें अवलंबले आहेत आणि त्यांचेच बरोबर बचतीविषयी सामान्य जनतेंत प्रचार करून तिला कर्जांत पैसा गुंतवण्यास उद्युक्त केलें आहे. ह्या योगानें बाजारभाव चढण्याचे थांबून त्यांस बरीच स्थिरता आली आहे. स्वतःच्या शेवटल्या अंदाजपत्रकाविषयींच्या भाषणांत सर जरेमी राइसमन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत ह्या विषयाची विस्तृत चर्चा केली. सरकारास पुरवावें लागणारें एकूण चलन आणि कर व कर्ज ह्यांचे स्वरूपांत त्याच्याकडे परत येणारा पैसा ह्यांचेमध्यें अजूनहि मोठी तफावत रहात आहे आणि ती भरून काढण्याचा जनतेची खर्चांतली बचत हाच एक परिणामकारक मार्ग आहे असें त्यांनीं बजावलें. महागाईस आळा घालण्याचा सरकार कसून प्रयत्न करीत आहे. तरीहि त्याचा खरा उपाय लोकांच्याच हातीं आहे असें त्यांचें म्हणणें आहे.

---

### युद्धोत्तर पुनर्घटना युद्धोत्तरच होणार

युद्धसमाप्तीनंतर व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या योजना आखल्या जात आहेत, त्यांच्या अंमलबजावणीस शक्य तितक्या लवकर प्रारंभ केला जाईल अशी अनेकांची समजूत होती ती निराधार असल्याचें हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं स्पष्ट सांगितलें आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका इंग्लंडमध्यें साचल्या आहेत, त्यांचा उपयोग त्या देशांतून यंत्रसामुग्री वगैरे आणण्याकडे करतां येईल असें हिंदी धंदेवाल्यांस वाटत होतें. रिझर्व्ह बँकेच्या लंडनमधील खात्यांत आतां १०३ कोटि पौंड (सुमारें १३७५ कोटि रुपये) जमा झाले आहेत त्यांचा विनियोग कसा व्हावा ह्याविषयीं ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींशीं सर जरेमी राइसमन ह्यांनीं कांहीं महिन्यांमागें विचार-विनिमय केला होता. ह्या चर्चेमधून निश्चित अशी कोणतीच योजना बाहेर आलेली नाहीं. युरोपमधील युद्ध संपल्यावांचून ह्या बाबतींत कांहींच करतां येणें शक्य नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. इंग्लंडला किती माल बाहेर पाठवतां येईल आणि हिंदुस्थानास किती व कोणता माल स्वीकारणें शक्य होईल ह्याविषयीं आज अंदाज करणें कठिण आहे. युद्धाचा यशस्वी शेवट गाठण्यावर कांहीं काळपर्यंत शक्तिसर्वस्व एकवटावें लागणार असल्यानें शांततेच्या काळांतील आर्थिक अभिवृद्धीच्या योजना हातीं घेण्याची भाषा बोलण्यांत अर्थ नाहीं असें सर जरेमींचें स्पष्ट सांगणें आहे. प्रांतिक सरकारांनीं युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी पैशाची आणि योजनांची तयारी चालवली आहे ती योग्यच आहे आणि युद्धसमाप्तीनंतर योग्य संधी येतांच तिचा उपयोग करतां येईल. ह्या बाबतींतली सर्व तयारी महत्त्वाची असून मध्यवर्ती सरकार तिला सहाय देण्यास अत्यंत उत्सुक असल्याचें अभिवचन फडनवीसांनीं दिलें आहे.

---

### विनाश्रम मिळणाऱ्या उत्पन्नावर ज्यास्त इनकमटॅक्स

प्राप्तीवरील कराचे पद्धतींत सुधारणा करण्याची सरकारची जी योजना आहे, त्या योजनेप्रमाणें; (१) स्वतःच्या मेहनतीनें मिळविलेलें व (२) डिव्हिडंड, व्याज, भाडें, इत्यादि मार्गांनीं घरबसल्या मिळणारें उत्पन्न ह्यांत फरक करण्यांत आला आहे. असा फरक इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत कित्येक वर्षांपासून करण्यांत येत आहे. "मिळविलेल्या" उत्पन्नाच्या एक दशांश उत्पन्नावर कराची माफी देण्यांत यावयाची आहे. अशा माफीच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा २,००० रुपये ठरविण्यांत आलेली आहे. कंपन्यांच्या उत्पन्नास ही माफीची सवलत मिळणार नाहीं; त्याचप्रमाणें इनकम टॅक्स माफ झाला तरी सुपरटॅक्स चुकणार नाहीं. अशा तऱ्हेनें एकूण ३½ कोटि रुपयांच्या करास सरकार मुकेल, तो भरून काढण्याकरितां १५,००० रुपयांवरील प्राप्तीच्या टप्प्यांवरील सरचार्जमध्यें ३ पैंची वाढ सुचविलेली आहे. ह्या सरचार्जचें उत्पन्न ४ कोटि रुपये होईल. आयुर्विमा कंपन्यांवरील ६२ पैंचा कर कायम रहाणार आहे.

---

### सुधारणा, का अडथळा ?

विमा कायद्यांतील ४० व्या कलमाच्या दुरुस्तीपुरताच विचार असेंब्लींत करण्यांत आला आहे. नियोजित दुरुस्ती ही खरोखरच सुधारणा आहे किंवा नाहीं, हा प्रश्नच आहे, असें तेथील विवेचनावरून स्पष्ट होईल. विमा व्यवसायास दीर्घकाळ वाटेल त्याप्रमाणें मोकळीक देऊन त्यास एकदम आवळूं पहाणें व्यावहारिक ठरणार नाहीं, हें उघड आहे. कंपन्यांच्या अंतर्गत धोरणांत व व्यवसायाच्या तपशीलांत सरकारनें शक्य तोंवर हात घालूं नये; परंतु नाइलाज असेल तेवढ्यापुरती शस्त्रक्रिया त्यानें करण्यास हरकत नाहीं; इतकेंच नव्हे तर जरूर करावी. कंपन्यांवर अधिक कडक देखरेख ठेवून, तात्काळ त्यांस मार्गावर आणण्याचें काम सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें अवश्य करावें; दिरंगाई टाळावी परंतु अव्यवहार्य आणि सर्वांस एकजात सारखे असे बेसुमार नियम करून कंपन्यांच्या चालकांचें स्वतःच्या परिस्थित्यनुसार व्यवहाराचें धोरण आखण्याचें स्वातंत्र्य हिरावून घेऊं नये, अशी विमा व्यवसायी लोकांची मागणी आहे.

## औंध म्यूच्युअल ला. ॲशुअरन्स सोसायटी, लि., पुणें

### खर्चाचें प्रमाण १२ वर आलें

वरील आयुर्विमा कंपनीनें १९४४ सालीं ६,५८,३०१ रुपयांचें काम पुरें केलें. म्हणजे, १९४३ चे मानानें नव्या कामांत ७०% वाढ झाली. एकूण हप्त्यांचें उत्पन्न ६४,१७१ रुपये भरलें. व्यवस्थेचा खर्च ३१,५७३ रुपये होऊन लाइफ ॲशुअरन्स फंडांत २६,५३४ रुपयांची भर पडली व तो ५५,६०४ रुपये झाला. १,७३४ रुपयांचा प्राथमिक खर्च व २,४५९ रुपयांचा ऑर्गनायझेशन खर्च अहवालाचे सालीं लिहून टाकूनहि लाइफ फंड इतका वाढला आहे. कंपनीजवळील रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदांतील आकड्यांपेक्षा अधिक आहे. कंपनीनें ३½% व्याजाच्या दरावर हिशेब करून आपले हप्त्यांचे दर ॲक्युअरी, प्रो. दिवाण, ह्यांच्या सल्ल्यानुसार सुधारून घेतले आहेत. अहवालाचे वर्षीं प्रामुख्यानें लक्षांत येणारी बाब म्हणजे, कंपनीचा अत्यंत पद्धतशीर कारभार, ही होय. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें कंपनीच्या पहिल्या वर्षाच्या हप्त्यांवर ९०% व सिंगल प्रीमियमवर ५% खर्च आकारून रहाणाऱ्या खर्चाच्या आकड्याचें रिन्युअल हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण फक्त १२% पडत आहे. खर्चाचें हें अगदी अल्प प्रमाण अत्यंत अभिनंदनीय आहे. कंपनीनें आपल्या चवथ्याच वर्षीं व्यवस्था खर्च इतक्या आटोक्यांत आणला आहे आणि कार्यक्षमतेबद्दल तर कंपनीनें लौकिक मिळविलेला आहेच. लहान आकाराची, परंतु प्रगमनशील व योग्य मर्यादेंत खर्च करणारी नमुनेदार कंपनी असा लौकिक मिळविल्याबद्दल तिचे डायरेक्टर बोर्ड व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वि. गो. जोशी हे अभिनंदनास पात्र आहेत. १९४४ हें वर्ष कंपनीच्या मूल्यमापनाचें वर्ष नाहीं, असें असूनहि रिन्युअल उत्पन्नाशी खर्चाचें प्रमाण इतकें कमी पडलें आहे, ह्यावरून हें प्रमाण कंपनीस पुढेंहि कायम राखतां येईल, अशी अपेक्षा आहे. प्रत्येक टप्प्यागणिक हिशेबाचा आढावा घेऊन व मर्यादेंत खर्च राखूनच काम मिळविण्याचें कंपनीचें सावधगिरीचें धोरण धडाडीचें दिसलें नाहीं, तरी तें अखेर सुपरिणामी झाल्याविना रहाणार नाहीं.

---

### फॅक्टरी ओनर्स असोसिएशन
### ( मध्य प्रांत आणि वऱ्हाड )

सध्या वरील असोसिएशनचे पटावर १४५ सभासद आहेत. दरसाल सभासदांची संख्या वाढत आहे. सध्याचा कायदा व त्याखालील नियम सभासदांस समजावून सांगणें, खटले झाल्यास कोर्टांत दाखल करावयाचे कागद भरण्यास मदत करणें, कायदा व नियम ह्यांचा मामुली भंग झाल्यास अधिकाऱ्यांकडे योग्य तीं कारणें दाखल करणें, ठराविक काळीं पाठवावयाचे तक्ते भरून देणें व त्याबाबत काम करणें, कोळसा, क्रूड ऑईल, पेट्रोल, पोलाद इत्यादि योग्य त्या अधिकाऱ्यांमार्फत मिळवून देणें, कामगारांना द्याव्या लागणाऱ्या वेतनासाठी चिल्लर मिळवून देणें, इत्यादि कामें असोसिएशननें आपल्या सभासदांसाठी केलीं. अधिकाऱ्यांकडे पाठवावयाच्या तक्त्यांत एकवाक्यता यावी, यासाठी असोसिएशननें छापील तक्ते तयार केले आहेत. सभासदांस वेळोवेळ सर्क्युलरें पाठविणें, सरकारकडे आपले विचार कळविणें व दाद मागणें, इत्यादि कामेंहि असोसिएशननें केलीं. सुप्रसिद्ध व्यापारी व बँकर शेठ गोपाळदास मोहता, एम. एल. ए. हे असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. असोसिएशनच्या कार्याच्या उपयुक्ततेची कल्पना वरील त्रोटक वृत्तान्तावरून येईल.


# NOTICE

**The Presidency Industrial Bank Ltd., Poona.**

Notice is hereby given that the Eighth Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank Ltd., Poona, will be held at the registered office of the Bank on Sunday the 18th March 1945. at 5-30 p. m. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1944.
2. To declare a Dividend.
3. To elect Three Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election. Messrs. W. P. Vaidya, L. R. Dhadphale and G. U. Chitale retire and offer themselves for re-election.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.
5. To transact any other business as may be allowed by the Chairman.

By order,
Poona City. 10-2-45.
C. T. Chitale,
Managing Director.

The transfer books of the Bank will be closed from 10th to 24th March 1945.

The dividend, when sanctioned by the General Meeting, will be payable on or after 9-4-1945 and the Dividend Warrants will be posted to the registered addresses of the Share-holders. Any change in address should be immediately intimated.

**The Presidency Industrial Bank, Ltd., Poona.**

# NOTICE

Notice is hereby given that an Extra Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank will be held at the Rtgistered Office of the Bank, 10 Budhwar Peth, Presidency Bank Building, Poona, on Sunday the 18th March 1945, at 5 P. M. to consider and if thought fit to pass the following resolution amending the Memorandum and Articles of Associations of the Bank which will be moved as a special resolution.

**Resolution :—**

Resolved that the authorised Capital of the Bank be raised from Rs. 10,00,000 divided into 10,000 shares of Rs. 100 each to Rs. 30,00,000 divided into 30,000 shares of Rs. 100 each, and that clause 5 of the Memorandum, and Article 4 of Articles of Association of the Bank be amended accordingly.

By order of the Board,
POONA, 15-2-1945.
C. T. Chitale,
Managing Director.

The transfer books of the Bank will be closed from the 10th March 1945 to the 24th March 1945, both days inclusive.

## डीडीटी—एक प्रभावी कृमिनाशक

ले.— डॉ. गो. रा. केळकर, एम. एस्सी., पीएच्. डी.

एखाद्या रोगाचा फैलाव थांबवावयाचा असेल तर त्या रोगाचे जंतू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणाऱ्या कृमि-कीटकांचा संहार करणें अत्यावश्यक असतें. या कामीं डीडीटी नांमक एक प्रभावी द्रव्य शास्त्रज्ञांना अगदी अलिकडे सापडलें आहे.

वास्तविक हा पदार्थ १८७४ सालींच ऑथमर त्सीडलर ह्या जर्मन संशोधकानें प्रथम बनविला. शास्त्रीय परिभाषेप्रमाणें त्याचें संपूर्ण नांव डायक्लोरो–डायफिनिल–ट्रायक्लोरोईथेन असें आहे आणि त्यांतील पदांची अद्याक्षरें घेऊनच डीडीटी हें संक्षिप्त नांव बनलें आहे. या पदार्थाचा कृमिनाशक गुण मात्र त्यावेळीं कोणाच्याच नजरेस आला नाहीं. अगदी अलिकडे स्वित्झर्लंडमधील गीगी या संशोधकाचें लक्ष या गुणाकडे गेलें व त्याच्या उपयोगानेंच एका वर्षीच्या बटाट्याच्या पिकाचें किडीपासून संरक्षण करणें शक्य झालें. १९४४ सालीं ह्या द्रव्याचा उपयोग विषमज्वराचा प्रतिबंध करण्याकरतां चांगल्या तऱ्हेनें करितां येतो असें दिसून आल्यापासून त्याच्या कृमिनाशक गुणधर्मांचा अभ्यास जास्त जास्त होऊं लागला. अमांश व अतिसार यांचा प्रसारहि याच्या योजनेनें थांबवितां येईल असें आतां दिसून आलें आहे.

कृमि-कीटकांना केवळ हाकलून देण्याचें कार्य डीडीटी करीत नाहीं, तर त्यांच्याशीं संसर्ग झाल्याबरोबर क्रमशः पण निःसंशय त्यांचा तें प्राणघात करितें, आणि याकरितां अर्ध्या किंवा एक मिनिटाचा संसर्गहि पुरेसा असतो. वनस्पतींच्या पालवीवर त्यांचे कांहींहि दुष्परिणाम होत नसल्यामुळें पिकांवरील कीड मारण्यास हें फार उपयोगी पडण्यासारखें आहे.

आतांपर्यंतच्या अनुभवावरून डास, पिसवा, माशा, गोमाशा, झुरळें, ढेंकूण यासारख्या कीटकांवर तें फार प्रभावी दिसून आलें आहे. एखाद्या गोठ्याच्या भिंतींना डीडीटी-मिश्रित द्रवाचा जर एक हात दिला तर तेथें गुरें असतांनाहि आणि जवळपास माशांनीं बुजबुजलेला सताचा ढीग असला तरी माशा महिना–महिना फिरकणार नाहींत. डीडीटी-मिश्रित द्रवांत एकदा बुडविलेले कपडे आठ वेळां भट्टीला देऊन आणले तरी पिसवांचा प्रतिबंध करू शकतात असाहि अनुभव आहे.

सध्या हें द्रव्य सैनिकांच्या उपयोगाकरितांच विशेषतः तयार केलें जात असल्यामुळें नागरिकांस उपलब्ध नाहीं. शिवाय अशा प्रभावी द्रव्याचा सररहा उपयोग होण्यापूर्वी त्याच्या गुणधर्मांचें सांगोपांग संशोधन होणेंहि सुरक्षितपणाच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

### शत्रूच्या हल्ल्यांमुळें ब्रिटिश घरांचें नुकसान

| | मे, १९४४ पर्यंत | जून, १९४४ ते सप्टें. १९४४ | एकूण |
|---|---|---|---|
| जीं दुरुस्त होणें अशक्य | १,७५,००० | २७,००० | २,०२,००० |
| जीं रहाणीस निरुपयोगी | २,०१,००० | ५४,००० | २,५५,००० |
| जींत रहाणें अशक्य न झालेलीं | ३०,३४,००० | १०,३९,००० | ४०,७३,००० |
| | ३४,१०,००० | ११,२०,००० | ४५,३०,००० |

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १-८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

सांडू टोमॅटो कम्पाउन्ड
(ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.
पुणें चीफ एजंट: मे. श्रीदत्त एजन्सी १०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.
कोल्हापूर विक्रेते: मे. भागवत आणि कं. कांच लाइन
सातारा जिल्हा एजंट: मे. जोशी आणि मंडळी भवानी पेठ.
अहमदनगर विक्रेते: मे. देशमुख आणि कं. नवी पेठ.

—कोको प्या—
कोको हें उत्कृष्ट पेयपान आहे. सध्यांच्या अन्नटंचाईच्या दिवसांत तर अशा पेयाची अधिक जरूरी आहे.
"सॅचवर्क"
कोकोची मागणी करा. म्हणजे स्वस्त, उत्कृष्ट व शुद्ध कोको मिळेल.
—साठे चॉकोलेट वर्क्स,
पुणें २.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें )

शेअर बाजाराच्या दृष्टीनें रेज्मनसाहेबांनीं सादर केलेलें चालू युद्धांतील सहावें अंदाजपत्रक बरें निघालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. बाजाराची अपेक्षा जमाखर्चीत पडणारी मोठी तूट भरून काढण्याकरतां नवे कर व कंपन्यांकडून मिळणाऱ्या व्याजांना कात्री लागणार अशी होती व म्हणून पत्रक येण्यापूर्वी बाजार बराच दबकून होता. पण जाहीर झालेल्या नव्या करांचा कंपन्यांशीं कांहीं संबंध येणार नाहीं व पडणारी दीड अब्जावरील तूट बहुतांशीं नवीं कर्जें थाटून भरून काढण्यांत येणार त्यामुळें बाजार झटकन वर आले. डिफर्ड २१४२।८ वरून २२४०, डाईंग १७८० वरून १८७२, कोहिनूर ५९५ वरून ६३७, ऑर्डिनरी ३९५ वरून ४१५ असे भाव सुधारले. मात्र मागच्या शुक्रवारीं नफावेचाणीमुळें भाव पुन्हा थोडे फार नरमले आहेत. ही नरमाई तात्पुरतीच रहावी. कारण सध्यां तरी बाजाराला खालीं जाण्याला कोठलेंच कारण नाहीं. वेढीवोंकडी युद्धाची बातमी आली तर वेगळें.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज संचित अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २७।२।४५ | बुधवार २८।२।४५ | गुरुवार १।३।४५ | शुक्रवार २।३।४५ | सोमवार ५।३।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | सार्वजनिक सुट्टी | २१८८-१२ | २२४०-०-८ | २२१२-८ | २१९५-० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ४०५-८ | ४१५-० | ४०९-० | ४०५-८ |
| २२०१; १६९५ | २५-०-० | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | १८१७-८ | १८७२-८ | १८६१-४ | १८६३-१२ |
| ७६५; ५३३ | १६-०-० | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ६२०-० | ६३३-० | ६२३-० | ६१९-० |
| ६५३; ४७५ | ३५-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ५५४-० | ५६५-० | ५५४-० | ५४४-० |
| ४९८; ३६१ | १०-०-० | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | | ३९१-८ | ४०५-० | ३९६-८ | ३९१-८ |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | | ३०९-२ | ३१५-० | ३१०-० | ३०९-० |
| ३९४; २८२ | ६-०-० | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ३०२-० | ३०८-८ | ३०४-० | ३०२-० |
| ३०५; २१८ | ४-०-० | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | २७३-८ | २७९-८ | २७३-० | २७०-० |
| ५-१०-६; ३-६ | ०-३-० | मे | अपोलो | २ | | ४-३-६ | ४-४ | ४-४ | ४-४-० |
| २१-१४; १३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | १५-४ | १५-८ | १५-५-६ | १५-३-० |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | | ३-३ | ३-३-६ | ३-३-० | ३-२-६ |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | | ६९५-० | ६९५-० | ७०७-८ | ७०५-० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २३५-० | २३६-१२ | २३६-४ | २३३-० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २२५-० | २२६-० | २२५-८ | २२४-० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ५४५-० | ५४०-० | ५३७-८ | ५३७-८ |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | | ८०-८ | ८१-४ | ८१-८ | ८१-० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | ३४-९ | ३४-१४ | ३४-८ | ३४-२ |
| ८५; ४८ | ३-४-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | | ५६-० | ५६-० | ५७-० | ५७-० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | | २१-४ | २१-४ | २१-४ | २१-४ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | | ७१-० | ७१-८ | ७१-८ | ७०-८ |
| | | | ३½ रोखे | १०० | | ९९-९ | ९९-१० | ९९-१० | ९९-६ |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद — दि. ५-३-४५

कोहिनूर मिल्स १६-२-४५ ते १४-३-४५ बँक ऑफ बरोडा १६-२-४५ ते ८-३-४५

बी. आय. सी. २८-२-४५ ते २८-३-४५ न्यू ग्रेट मिल्स ,, ,,

३% व्हिक्टरी लोन = रु. ९९-१०-६

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स**

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार

**पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७१

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ६२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

| | | |
|---|---|---|
| जाहिरातींचे दर, खालील पत्त्यावर चौकशी करावी. – व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४. | # अर्थ | वर्गणीचे दर. वार्षिक वर्गणी रु. ४ ( टपाल हंशील माफ ) किरकोळ अंकास दोन आणे. |

'अर्थ एव प्रधान:' इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १४ मार्च, १९४५ अंक ११

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः— द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.

नोगी आणि कं. मुंबई ४

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरीः ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

## १९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर

१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए. — अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

ग्रंथिशोथ, गजकर्ण इ. वर गुणकारी आयोडिनचें मलम

## "आयडोनेल"

श्रीधूतपापेश्वर आद्य औषधि पनवेल — शोध चिन्ह — पनवेल लि. कारखाना जि. कुलाबा.

# विविध माहिती

### कोपरगांव ट्रेडर्स कं. लि.

श्री. आर. एच. गिरमे ह्यांनीं वरील नांवाची कंपनी रजिस्टर केली आहे, तिचा उद्देश " सर्वसाधारण व्यापार " असा आहे.

### बँकिंग बिलाच्या चर्चेसाठीं तज्ञाची मदत

रिझर्व्ह बँकेंतील एक अधिकारी, श्री. रामनाथ, ह्यांस हिंदुस्थान सरकारच्या फडणविशी खात्यांत तात्पुरतें घेतलें आहे. मध्यवर्ती असेंब्लीमधील नव्या बँकिंग बिलाबाबत सरकारास त्यांनीं सहाय करावयाचें आहे.

### बी. ई. एस. टी. कं. लि.

बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रामवेज कं. लि. आणि मुंबई कॉर्पोरेशन ह्यांचेमधील करार ७ ऑगस्ट १९४७ रोजीं संपुष्टांत येतो. त्यावेळीं कंपनीला सुमारें १० कोटि रुपये ( तिच्या मालमत्तेची किंमत ) व ४० लक्ष रुपये ( गुडविलचे ) देऊन कंपनी विकत घ्यावयाची, का करार आणखी कांहीं वर्षे लांबवावयाचा, असा प्रश्न कॉर्पोरेशनपुढें आहे.

### भोर स्टेट बँक लि. ची पाली येथें शाखा

भोर स्टेट बँक लि. च्या पाली येथील शाखेचा उद्घाटन समारंभ पाडव्याचे मुहूर्तावर ता. १५ मार्च रोजीं श्रीमंत सर राजा रघुनाथराव बाबासाहेब पंडित पंतसचिव, के. सी. आय. ई., राजासाहेब, संस्थान भोर, ह्यांचे हस्तें होणार आहे.

### पुणें अनाथ विद्यार्थि गृह

या संस्थेंत नवीन विद्यार्थी दाखल करावयाचे आहेत. प्रवेश मिळवूं इच्छिणारांनीं ४ आण्याचीं पोस्टाचीं तिकिटें पाठवून छापील अर्जनमुना व नियम मागवून घेऊन ता. १५ एप्रिलचे आंत अर्ज भरून पाठवावा. या संस्थेंत गरीब पण बुद्धिमान् अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळूं शकतो. अशांची राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची सर्व व्यवस्था मोफत केली जाते.

### महारोग्यांची वसाहत

मद्रास येथील डॉ. चेटिअर यांनीं दिलेल्या तीस एकर जमीनीवरील वसाहत करण्याची योजना मद्रास कार्पोरेशन आखीत आहे. वसाहतीसाठीं तीन लक्ष रुपये खर्चाचा अंदाज आहे. या वसाहतींत पांचशें महारोगी राहण्याची व्यवस्था होऊं शकेल. वसाहतीला जोडूनच पन्नास रुग्णांच्या शुश्रूषेस पुरेल एवढें इस्पितळ पण बांधण्यांत येणार आहे.

### डी. डी. टी. च्या उत्पादनाची योजना

निजाम सरकारच्या हैद्राबाद् येथील प्रयोग शाळेंत व इतरत्रहि डी. डी. टी. तयार करण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत, आणि मोठ्या प्रमाणावर त्याचें उत्पादन करण्याची योजना निजाम सरकार आखीत आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

### कॅश मेमोवरील सही

खरेदी-विक्रीचे वेळीं घेतल्या व दिल्या जाणाऱ्या प्रत्येक कॅश मेमोवर, विक्रेत्याची सुवाच्य संपूर्ण स्वाक्षरी असली पाहिजे असें मध्यवर्ती सरकारनें जाहीर केलें आहे.

### महाराष्ट्र बँकेची रत्नागिरी शाखा

" बँक ऑफ महाराष्ट्र "ची रत्नागिरी शाखा गुरुवार, ता. १५ मार्च रोजीं सुरू होणार आहे. श्री. पां वा. फडके हे तेथें एजंट म्हणून जात आहेत.

### अमेरिकेंतील स्पिनिंग मिल्स

सूत कातणाऱ्या गिरण्यांची संख्या अमेरिकेंत १९२५ सालीं १,०४६ होती, ती आतां ८६७ वर आली आहे.

### शहरांतील कचऱ्यापासून खत करण्याचा उपक्रम

" अधिक धान्य पिकवा " मोहिमेचा एक भाग म्हणून निजाम सरकारनें, शहरांतील कचऱ्यापासून खत करण्याची योजना अंमलांत आणली आहे. १८ म्युनिसिपॅलिटीच्या आतांपर्यंत तींत सामील झाल्या असून त्यांच्या कचऱ्यापासून १,३३७ टन खत तयार करण्यांत आलें आहे.

### अमेरिकेची संयुक्त राष्ट्रांस खंड-उसनवार मदत

मार्च, १९४१ मध्यें अमेरिकेनें खंड-उसनवार पद्धतीनें संयुक्त राष्ट्रांस मदत देण्यास प्रारंभ केला. त्या मदतीची पैशांत किंमत डिसेंबर, १९४४ अखेर ३५½ अब्ज डॉलर्स भरली.

### बस-वाहतुक सरकार घेणार

गुजरातमधील बसची सर्व वहातुक एप्रिलपासून सरकार ताब्यांत घेणार आहे. सर्व बस कंपन्या विकत घेऊन त्यांतील ३० टक्के शेअर्स मध्यवर्ती सरकार घेईल, ३० टक्के प्रांतिक सरकारकडे आणि बाकी खाजगी कंपन्यांकडे जावयाचे आहेत. युद्धानंतर लाखों सैनिक बेकार होतील त्यांस काम मिळावें म्हणून ही योजना करण्यांत आली आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

### मोठ्या वर्तमानपत्रांस ज्यास्त कागद मिळणार

ज्या वर्तमानपत्रांस नियंत्रणापूर्वी दरसाल ७५ टन कागद लागत होता, अशांच्या वाट्यांत आणखी २५% ची वाढ करण्यांत आली आहे.

### सहज हालवितां येण्याजोगीं घरें

दरमहा १,००० फिरतीं घरें अमेरिकेहून ब्रिटनमध्यें रवाना व्हावयाचीं आहेत. अडीच लक्ष अमेरिकन कुटुंबें असल्या तकलुबी घरांत रहात आहेत. राहण्याच्या दृष्टीनें हीं घरें सोईस्कर असून कांहीं तासांत उभारतां येतात.

### चीनमध्यें क्षयाची वाढती बाधा

स्वतंत्र चीनमध्यें हजारों विद्यार्थी अन्न-कमतरतेमुळें क्षयाला बळी पडत आहेत. चुंकिंग येथील राष्ट्रीय मध्यवर्ती विद्यापीठांतील शेकडा १५ टक्के पुरुष-विद्यार्थ्यांना आणि ४३·२ टक्के अध्यापकांना क्षयाची बाधा झालेली दिसून आली.

### " मिळविलेल्या " उत्पन्नावरील करमाफी

इनकमटॅक्सच्या आकारणींत, " मिळविलेल्या " उत्पन्नाच्या १०% रकमेवर कराची माफी मिळणार आहे. ह्या माफीचा खुलासा खालील उदाहरणावरून होईल. " मिळविलेलें " उत्पन्न १०,००० रुपये असेल, तर ९,००० रुपयांवरच कराची आकारणी होईल. मिळविलेलें उत्पन्न ३०,००० रुपये असेल, तर २८,००० रुपयांवर कर बसेल; कारण माफी दिलेल्या उत्पन्नाची कमाल मर्यादा २,००० रुपये आहे. सुपर टॅक्सला माफी लागू नसल्याकारणानें, २५,००० रुपयांवरील उत्पन्नावर, म्हणजे वरील उदाहरणांत ५,००० रुपयांवर सुपरटॅक्स बसेलच.

### इंडिया युनायटेड मिल्सवरील हुकूम रद्द

इंडिया युनायटेड मिल्सच्या कापड उत्पादनाचें वाटप सरकारनें स्वतःकडे घेतलें होतें, तें २ मार्चपासून पुनः मिल्सकडे आलें आहे.

# अर्थ

## स्टर्लिंग गट आणि डॉलर

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांचीं चलनें इंग्लिश पौंड स्टर्लिंगवर आधारलेलीं असून आणि कांहीं इतर देशांचाहि समावेश ह्या गटांत झालेला आहे. ह्या सर्व देशांच्या चलनांचें आंतरराष्ट्रीय मोल स्टर्लिंगच्या मोलाशीं प्रमाणबद्ध झालेलें आहे. आज जगाच्या बाजारपेठांत सर्वांत महत्त्वाचें व प्रभावी असें चलन अमेरिकन डॉलर हें आहे आणि त्यास सोन्याचा भरभक्कम आधार आहे. पौंड स्टर्लिंगची आंतरराष्ट्रीय किंमत स्थिर राखावयाची म्हणजे त्याचें डॉलरशी असलेलें मोलाचें प्रमाण किंवा डॉलर हुंडणावळीचा दर अबाधित राहील अशी व्यवस्था करावयाची हें उघड आहे. आंतरराष्ट्रीय देवघेवींत अमेरिकेस द्यावयाचें देणें त्या देशांकडून यावयाच्या येण्यापेक्षां अधिक झाल्यास स्टर्लिंग स्वस्त व डॉलर महाग होऊन स्टर्लिंग देशांचा गट व अमेरिका ह्यांचेमधील हुंडणावळ अस्थिर होणार. ह्याकरितां स्टर्लिंग चलन क्षेत्रांतील देशांचें अमेरिकेकडून घ्यावयाचें येणें म्हणजे डॉलरमध्यें काढलेल्या हुंड्या ब्रिटिश सरकार एकत्र करून त्यांचा एक निधी बनवतें आणि त्याच्या आधारावर स्टर्लिंगची किंमत स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करतें. ह्याचा परिणाम असा होतो कीं हिंदुस्थानासारख्या देशांच्या अमेरिकेकडून मिळावयाच्या येण्याचा उपयोग स्वतंत्र रीतीनें अमेरिकन माल खरेदी करण्याकडे त्यांस करतां येत नाहीं, कारण त्यांनीं काढलेल्या डॉलर हुंड्या स्टर्लिंगच्या स्थैर्यासाठीं जमवलेल्या फंडांत जमा केल्या जातात. हिंदुस्थानचें अमेरिकेकडून निघणारें डॉलरमधलें येणें हिंदी कारखानदारांस अमेरिकन माल आयात करण्यासाठी वापरतां येणें आवश्यक असून तें निराळें काढून ठेवलें जावें आणि तें स्टर्लिंगच्या गंगाजळींत टाकण्यांत येऊं नये अशी त्यांची मागणी सरकारपुढें मांडण्यांत आली आहे. औद्योगिक अभिवृद्धीसाठी केवळ इंग्लंडकडूनच नव्हे तर अमेरिकेकडूनहि हिंदुस्थानास यंत्रसामुग्री घ्यावी लागेल आणि त्याकरितां डॉलर्सची आवश्यकता भासेल. ते उपलब्ध न झाल्यास हिंदी कारखानदारांस जरूर मालासाठी सर्वस्वी इंग्लंडवर अवलंबून रहाणें भाग पडेल ह्या प्रमुख मुद्यावर वरील मागणी करण्यांत आली आहे.

### डॉलर्सचा पुरवठा आणि फडनवीसांचें निवेदन

देवघेवींत अमेरिकेकडून मिळावयाच्या डॉलर्सची व्यवस्था हिंदी उद्योगधंद्यांच्या गरजेस अनुसरून केली जावी अशा अर्थाच्या मागणीचा वर उल्लेख आला आहे. त्यास अनुलक्षून हिंदुस्थान सरकारच्या धोरणाचा खुलासा सर जेरेमी राइसमन ह्यांच्या अंदाजपत्रकासंबंधांतल्या भाषणांत येणें अपेक्षितच होतें. हिंदुस्थानास अमेरिकेकडून यावयाच्या डॉलर्सपैकीं कांहीं रकम युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी बाजूस काढून ठेवण्याची तयारी ब्रिटिश सरकारनें दर्शवली असल्याचें त्यांनीं गेल्या वर्षी सांगितलें होतें. त्यानंतर ह्या प्रश्नाचा त्यांनीं इंग्लंडांत खल केला आणि अखेरीस १९४४ सालासाठी दोन कोटि डॉलर व १९४५ करितां तेवढीच रकम वेगळी ठेवली जावी अशी तजवीज हिंदुस्थान सरकारनें मान्य केली असल्याचें फडनवीसांनीं सांगितलें. चालू गरजेसाठी मिळावयाच्या डॉलर्सचा अंतर्भाव वरील रकमांत केलेला नाहीं असा खुलासाहि त्यांनीं केला. वार्षिक साडेसात कोटि रुपये किंमतीच्या डॉलर्सची दोन वर्षांपुरती तरतूद अगदी योग्य आहे आणि हिंदुस्थानची मागणी तिच्यापुढें दामटणें सयुक्तिक होणार नाहीं असें सरकारचें म्हणणें आहे. हिंदुस्थानचें चलन स्टर्लिंगवर आधारलें असल्यानें ह्या देशाचें हित स्टर्लिंगच्या स्थैर्यांत आहे आणि ह्या स्थैर्यास डॉलर्सचा भक्कम आधार हवा; तेव्हां आपल्या डॉलर्समधील येण्याविषयीं आपण आग्रह धरला असतां तें सर्वांसच अनिष्ट होईल अशी सर जरेमी ह्यांची विचारसरणी आहे. युद्धपरिस्थितीमुळें स्टर्लिंगवर ताण पडत आहे आणि त्या चलनास टेकू देणें हें हिंदुस्थानचें कर्तव्य आहे; तरीहि हिंदुस्थानची युद्धोत्तर गरज भागावी ह्यासाठी डॉलर बाजूस काढून ठेवले जात असल्यानें ह्या देशाची सोयहि पहाण्यांत येत आहे. शिवाय, सध्या ठरवण्यांत आलेली वार्षिक साडेसात कोटि रुपये किंमतीच्या डॉलर्सची तरतूद अपुरी आहे असें अनुभवानें दिसून आल्यास तिचा फेरविचार करतां येईल असें आश्वासन सर जेरेमी ह्यांनीं दिलें आहे. युद्धोत्तर अभिवृद्धीप्रीत्यर्थ हजारो कोटि रुपये खर्चले जाण्याची भाषा बोलली जात आहे आणि स्टर्लिंग शिलकांचें भिजत घोंगडें अजून पडलेंच आहे. अशा स्थितींत दोन वर्षांत चार कोटि डॉलर्सची होणारी तरतूद हिंदी धंदेवाल्यांस कशी समाधानकारक वाटावी हा प्रश्नच आहे.

### हिंदी व्यापारी वर्गाची मागणी

प्रस्तुत स्टर्लिंग-डॉलर प्रश्नासंबंधानें हिंदी व्यापारी मंडळांच्या मध्यवर्ती संघाच्या ( फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ) दिल्ली येथें भरलेल्या वार्षिक सभेंत एक विस्तृत ठराव मान्य करण्यांत आला. मित्रराष्ट्रांसाठी हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर मालाची खरेदी होत आहे, त्याच्या किंमतीच्या फेडीची व्यवस्था मात्र ह्या देशाच्या हितास अनुकूल अशी नसल्याची तक्रार सदर ठरावांत केली असून लंडनमधील साठलेल्या स्टर्लिंगच्या मोबदल्यांत डॉलर अगर इतर चलन दिलें जाण्याची तजवीज ब्रिटिश सरकारनें करावी ह्यासाठी त्यांच्याशीं तात्काळ बोलणीं चालू केलीं जावीं असें सुचवण्यांत आलें आहे. साम्राज्यांतर्गत देशांस देवघेवींत येणें होणारे सर्व डॉलर एकत्रित केले जातात, ही व्यवस्था बंद करण्यांत यावी आणि हिंदुस्थानास मिळालेल्या डॉलरच्या रकमा ह्या देशास अमेरिका वगैरे राष्ट्रांतुन मालाची आयात करण्यास वापरण्यास दिल्या जाव्या असेंहि ठरावांत म्हटलें आहे. आणखी एक महत्त्वाची बाब त्यांत अंतर्भूत आहे तिच्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. हिंदी चलनाची किंमत स्टर्लिंगवर आधारली असल्यानें स्टर्लिंगचें आंतरराष्ट्रीय मोल उतरल्यास हिंदी चलनाचीहि किंमत कमी होईल. एतद्‌र्थकरितां अशी परिस्थिति निर्माण झाल्यास स्टर्लिंग शिलकांचे बाबतींत हिंदुस्थानास नुकसान येईल त्याची भरपाई मिळण्याचें आश्वासन ब्रिटिश सरकारकडून मिळवावें असेंहि ठरावांत सुचविलें आहे.

## प्रेसिडेन्सी इं. बँक लि., पुणें

### नफ्याची रकम तिप्पट झाली

चेअरमन श्री. ग. रा. साठे, मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सी. टी. चितळे व मॅनेजर जी. डी. जोगळेकर, बी. ए., (ऑ.) बी. कॉम., एलएल. बी., ह्यांच्या नेतृत्वाखाली प्रेसिडेन्सी बँकेनें १९४४ सालीं सर्वच बाबतींत चांगली प्रगति केली आहे. एप्रिलमध्यें बँकेनें मुंबई येथें शाखा उघडली, तिचा व्यवहार समाधानकारक आहे. १९४४ चे आंकड्यांची १९४३ च्या आंकड्यांशीं तुलना करतां वसूल भांडवल तिपटीहून जास्त झालें, ठेवींत १० लाखांची भर पडून त्यांची रकम २८½ लक्ष रुपये झाली, नफा १८ हजारांचा ५३ हजारांवर गेला, इत्यादि गोष्टी ठळकपणें दिसून येतात. बँकेची स्वतःची "प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग" असल्याकारणानें भाडेखर्चांत मोठीच बचत होऊन वाढीस पुरेपूर वाव मिळत आहे, ही विशेष महत्त्वाची बाब आहे. बँकेच्या ३३½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं १० लक्ष रुपये रोख्यांत व ४½ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत आहेत. १८½ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. ह्याप्रमाणें, पैसे तरते राखूनहि बँकेनें आपल्या खेळत्या भांडवलावर सुमारें १.६% नफा मिळविला आहे. हिशेबांत खर्चाचे बाजूस ६३,६६२ रुपये व्याज व जमेचे बाजूस १,२०,६४९ रुपये व्याज, १३,२९८ रुपये कमिशन व २६,५१३ रुपये रोखे विक्रींत नफा; असे आकडे आहेत. नफा वाटणींत, डिव्हिडंडचा दर योग्य परंतु मर्यादेत (करमाफ ४%) राखून गंगाजळी व रिझर्व्ह वाढविण्याचें चालकांचें धोरण योग्यच आहे.

बँकेचें अधिकृत भांडवल १० लाखांचें ३० लाख करण्यासाठी आवश्यक ती मेमोरँडममध्यें दुरुस्ती बँकेच्या येत्या सभेंत सुचविण्यांत येणार आहे. बँकेच्या प्रगतीस अशा रीतीनें चांगली गति मिळालेली असून, लवकरच ती शेड्यूल्ड बँकांच्या यादींत समाविष्ट होईल. ठेवींतील मुदती ठेवींचें प्रमाण जनतेच्या विश्वासाचें निदर्शक असलें, तरी करंट ठेवींचें प्रमाण वाढणें किफायतशीरपणाच्या दृष्टीनें इष्ट होईल. गेल्या वर्षीच्या साधारण सभेंत अध्यक्ष, श्री. साठे, ह्यांनीं बँकेनें महाराष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीसाठीं आपुलकीनें केलेल्या कामगिरीचा तपशीलवार आढावा घेतला व त्यावरून बँकेच्या उपयुक्ततेची नीट कल्पना करून दिली. त्याचा येथें नुसता उल्लेख केला असतां पुरें होईल.

### लंडन टाइम्सची मुंबई-योजनेवर टीका

लंडन टाइम्सनें मुंबई-योजनेवर खालीलप्रमाणें टीका केली आहेः—"योजना"कारांनीं धार्मिक समजुतींचा आणि आचारांचा विचार केलेला नाहीं. रूढि म्हणजे राजा अशी हिंदुस्थानांतील स्थिति आहे. योजना यशस्वी व्हावयाची असेल तर धार्मिक नेत्यांचें सहकार्य मिळवावयास हवें."

हिंदुस्थानांत रीतिरिवाजांचें बंधन मोठें आहे व व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित असलेली, नफेबाज पाश्चिमात्य अर्थपद्धति येथें पूर्णपणें खरी ठरावयाची नाहीं असें न्या. मू. रानडे यांच्यापासून आतांपर्यंत सर्व हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं प्रतिपादन केलें आहे. पण टाइम्सच्या टीकेंत रीतिबंधनास अवाजवी महत्त्व दिलेलें दिसतें.

### लष्करी खर्च आणि स्टर्लिंग शिलका

मध्यवर्ती असेंब्लींत सर जेरेमी राइसमन ह्यांच्या अंदाजपत्रकावर नेहमींप्रमाणें सभासदांचीं टीकात्मक भाषणें झालीं. त्यांमध्यें अनेक मुद्दे उपस्थित करण्यांत आले आणि फडनवीसांनीं त्यांस सरकारच्या वतीनें उत्तरें दिलीं. युद्धखर्चाचे संबंधांत इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें वाटणीची व्यवस्था झालेली आहे तिला अनुसरून ह्या देशावर पडणारा पैशाच्या जबाबदारीचा बोजा मोठा आहे अशी तक्रार करण्यांत आली. हिंदी सैन्य ह्या देशाच्या बाहेर लढण्यास गेलें असतां त्याचा खर्च ब्रिटिश सरकार सोसतें, परंतु गेल्या वर्षी जपाननें प्रत्यक्ष हिंदुस्थानांत शिरून तेथें लढाया चालू केल्याकारणानें हिंदी व दुसऱ्या सैन्याच्या त्यांचे विषयींचा खर्च हिंदुस्थान सरकारास करावा लागला आणि त्या योगानें गेल्या वर्षी लष्करी खर्चाचें प्रमाण अपेक्षेपेक्षां वाढलें ही गोष्ट फडनवीसांनीं असेंब्लीचे नजरेस आणली आहे. तसेंच स्टर्लिंग शिलका वाढल्या आहेत आणि वाढत आहेत ह्याचें मुख्य कारण हिंदी युद्धखर्चाचा मोठा हिस्सा ब्रिटिश सरकार स्वतःच्या अंगावर घेत आहे हें होय असें तें म्हणाले. त्या सरकारानें ह्या देशाच्या लष्करी खर्चास हातभार लावला नसता तर तो सर्वच हिंदुस्थान सरकारास करावा लागून इंग्लंडला ह्या देशाचें देणें झालें नसतें आणि स्टर्लिंग शिलका लंडनमध्यें साचल्या नसत्या. इंग्लंड हिंदुस्थानांतील युद्धखर्चाचा मोठा हिस्सा स्वतः उचलीत असल्यानें त्याच्या रकमा ह्या देशाच्या खात्यावर लंडनमध्यें जमत आहेत. तेव्हां, खर्चाचा बोजा व स्टर्लिंग शिलका ह्या दोहोंचे बाबतींत एकाचवेळीं तक्रार करणें विसंगतीच्या दोषास पात्र आहे, हा फडनवीसांचा कोटिक्रम पटण्यासारखा नाहीं. युद्धखर्चास लागणारा पैसा कर व कर्जे ह्यांचे मार्गानें उभा न झाल्यानें आवश्यक झालेलें जादा चलन आणि स्टर्लिंग शिलकांचें प्रमाण मर्यादित करण्यावरचे उपाय व त्या शिलकांचा उपयोग ह्या गोष्टी स्वतंत्र असून त्यांचा विचार निराळ्या रीतीनें झाला पाहिजे व होत आहे. असें असल्यानें सर जेरेमी राइसमन ह्यांनीं दाखवलेली विसंगती भ्रामक ठरते.

### ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी

आठ लक्ष रुपये भांडवलावर तीन लक्ष रुपये निवळ नफा

वरील कंपनीनें १९४४ सालीं २०,५०,८९५ रुपयांची विक्री करून ६,२९,५०३ रुपये अव्वल नफा मिळविला. म्हैसूर ग्लास व एनॅमल वर्क्स, बंगलोर यांजकडून मिळालेल्या १९४३ सालच्या नफ्याची त्यांत १७,२९४ रुपयांची भर पडली. सर्व खर्च, घसारा, मॅनेजिंग एजंटांचें कमिशन, बाद झालेली मालमत्ता, इत्यादि वजा जातां निवळ नफा ३,०४,७७७ रु. उरतो. इंटेरिम डिव्हिडंडचे ६४,००० रु. वजा जातां बाकी २,४०,७७७ रु. रहाते. त्यांतून फायनल डिव्हिडंड देण्यास ६४,००० रुपये लागतील; म्हणजे सबंद वर्षाचें डिव्हिडंड शेअरवर २ रु. + २ रु. = ४ रु. असे १६% होईल. औंध संस्थानाच्या करासाठी ३५ हजार रु., डि. ई. फंडांत ३५ हजार रु., प्रॉ. व ग्रॅ. फंडांत २० हजार रु., रिझर्व्ह फंडांत ५० हजार रु., कारखान्यांतील लोकांस बोनससाठी ५० हजार रु., अशी नफ्याची वांटणी होईल. कंपनीचें भांडवल ८ लक्ष रुपये असून रिझर्व्ह आणि इतर फंड आतां पावणेतीन लाखांचे घरांत जातील. "कच्च्या मालाचे स्टॉक्स ऑडिटर्स ह्यांनीं तपासले असून सदर मालाचा पुरवठा भरपूर आहे." कंपनीची वार्षिक सभा ता. १८ मार्च रोजीं आहे.

## स्फुट विचार

### घटना कायद्यांतले व्यापारी निर्बंध

हिंदुस्थानच्या राज्यघटनेच्या १९३५ च्या कायद्यांत ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हितसंरक्षणाची तरतूद केलेली आहे. ह्या निर्बंधांचे योगानें हिंदुस्थान सरकारचें स्वतःचें औद्योगिक व आर्थिक धोरण आखण्याचें स्वातंत्र्य मर्यादित झालें आहे. घटनेच्या कायद्याची चर्चा चालू असतांना हिंदी लोकमताच्या पुरस्कर्त्यांनीं असल्या निर्बंधांस कसून विरोध केला होता, परंतु ब्रिटिश धंदेवाल्यांचें भांडवल ह्या देशांत गुंतलें होतें आणि त्यांचा व्यापार व उद्योग येथें चालला होता, त्यास विघातक असे कायदे किंवा धोरण ह्यांचा अवलंब केला जाऊं नये ह्यासाठी योग्य तजवीज करणें अगत्याचें आहे, ह्या मुद्यावर त्या विरोधास न जुमानतां ब्रिटिश पार्लमेंटनें संरक्षक योजनेचा अंतर्भाव कायद्यांत केला. हिंदुस्थानांत गुंतलेल्या ब्रिटिश भांडवलाची फेड होऊन इंग्लंडच्याच उलट ह्या देशाचें मोठ्या प्रमाणांत देणें झालें आहे आणि येथें युद्धोत्तर पुनर्रचनेंत नवीन धंदे काढणें व जुन्यांचा विस्तार करणें निश्चित झालें असल्यानें कायद्यांतले वर उल्लेखिलेले निर्बंध अनावश्यक व अनिष्ट झाले आहेत. तेव्हां ते काढून टाकले पाहिजेत अशी मागणी करणारा ठराव श्री. मनु सुभेदार ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत नुकताच पुढें मांडला. हिंदुस्थान सरकारास आर्थिक स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे, असें ब्रिटिश मुत्सद्दी नेहमी म्हणत असतात. त्या विधानाच्या सत्यतेस ह्या ठरावानें कसोटी लावली आहे. सरकारच्या वतीनें भाषण करतांना सर अर्देशीर दलाल ह्यांनीं निर्बंध दूर केले जाण्याचें अगत्य मान्य केलें, पण घटना कायद्यांत आवश्यक होणारी दुरुस्ती घडवून आणण्याच्या मार्गांतील अडचणींची सबब सांगितली. हा कायदा अलीकडे अनेकदां पार्लमेंटनें दुरुस्त केलेला आहे आणि प्रस्तुत बाबतींतल्या बदलासच कां हरकत घेण्यांत यावी असा प्रश्न विचारण्यांत आला होताच. ही दुरुस्ती एकदेशी व वादग्रस्त ठरणार असल्यानें तिचा उद्देश कांहीं तरी व्यावहारिक स्वरूपाच्या तडजोडीनें साध्य करून घेणें अधिक युक्त असून त्या दिशेनें सरकार प्रयत्न करील असें उत्तर सर अर्देशीर ह्यांनीं दिलें. राजकीय सत्तेशिवाय आर्थिक स्वातंत्र्य शक्य नसल्यानें प्रस्तुत प्रश्न हिंदुस्थाननें आतांच धसास लावूं नये आणि दमादमानें व सामोपचारानें प्रकरण निकालांत काढावें असा सल्ला त्यांनीं स्वबांधवांस दिला.

### प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत बदल

हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं आपल्या १९४५-४६ सालाच्या अंदाजपत्रकांत प्राप्तीवरील करांतील कांहीं बदल समाविष्ट केले आहेत. त्यांस कायदेशीर स्वरूप देण्यासाठी प्राप्तीवरील कराच्या संबंधांतील कायद्यांत दुरुस्ती होणें आवश्यक आहे. त्या हेतूनें सर जेरेमी राइस्मन ह्यांनीं एक मसुदा असेंब्लींत मांडला आहे आणि त्याचा विचार करण्यासाठी एका कमिटीकडे तो सोंपविण्यांत आला आहे. ह्या संबंधांत असेंब्लींत भाषणें झालीं त्यांवरून बिलाच्या कांहीं तत्त्वांस सभासदांचा तीव्र विरोध असल्याचें दिसून येतें. प्राप्तीमध्ये श्रमानें मिळवलेली आणि विनाश्रमें आलेली असा महत्त्वाचा भेद करण्यांत येऊन पहिल्या प्रकारच्या प्राप्तीचे बाबतींत थोडी सवलत देण्यांत आली आहे. ती सर्वमान्य झाली असून तिचें स्वागत करण्यांत आलें आहे, पण कारखान्यांच्या नव्या इमारती व यंत्रसामुग्री ह्यांचे संबंधांत देण्यांत येणारी सवलत अपुरी असल्याची तक्रार आहे. कर चुकवणारांचा पिच्छा पुरवून त्यांच्या घरांत जाणें व कागदपत्रांची तपासणें इत्यादि बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांस मुभा दिली आहे तिला तीव्र विरोध दर्शविण्यांत आला आहे. अशा प्रकारच्या योजनेवांचून कराची चुकवाचुकवी थांबणार नाहीं आणि सभासदांनीं तितकेच परिणामकारक उपाय सुचवल्यास त्यांचा आपण विचार करूं असें फडणवीसांनीं सांगितलें. करवसुली कडक रीतीनें केली जाण्यास असेंब्लीनें सरकारास सहाय दिलें पाहिजे असे ते म्हणाले.

### ॲबिसिनियानें सशर्त आर्थिक मदत नाकारली

ग्रेट ब्रिटन व ॲबिसिनिया ह्यांचेमध्यें १९४२ सालीं झालेला करार ॲबिसिनियाच्या बादशहानें त्रागा करून बदलून घेतला आहे. बादशहाचे सल्लागार फक्त ब्रिटिशच असावे, पूर्व आफ्रिकेच्या कमांडर-इन-चीफचा अधिकार ॲबिसिनियाच्या फौजेवर चालावा, सरहद्दीचा बराचसा मुलूख ब्रिटिश लष्कराच्या ताब्यांत रहावा, जिबुती रेल्वे ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं चालवावी, आणि ह्या सर्व सत्तात्यागासाठी तीन वर्षांत ॲबिसिनियास ग्रेट ब्रिटननें ३० लक्ष पौंड द्यावे, ह्या अटी बादशहास सह्य वाटल्या नाहींत. कराराचा फेरविचार व्हावा, असा त्यानें प्रयत्न चालविला, तो अयशस्वी झाल्याकारणानें त्यानें करार रद्द करण्याचा विचार जाहीर केला. तात्काळ ब्रिटिश सरकारनें आपला प्रतिनिधी पाठवून, ॲबिसिनियास पसंत पडणाऱ्या नव्या अटींवर नवा करार केला. ॲबिसिनियाचा बादशहा ब्रिटिश सल्लागारांचाच सल्ला घेण्यास आतां बांधलेला नाहीं. कांहीं मुलुखावरील आपला लष्करी ताबा ब्रिटिश सरकारनें सोडला आहे. ॲबिसिनियाचें लष्कर ब्रिटिश पैशानें ब्रिटिश देखरेखीखाली तयार करण्यांत आलें, तरी तें ॲबिसिनियाच्या लष्करी मंत्र्याचे हुकुमाखालीं येईल. ब्रिटिश सरकारचे ३० लक्ष पौंड कसे खर्च करावे, हें ठरविण्यासाठी ब्रिटिश व ॲबिसिनिअन संयुक्त मंडळ नेमण्यांत यावें, ही ब्रिटिश सरकारची अट ॲबिसिनियाच्या बादशहास मान्य नाहीं. ब्रिटिश सरकारची थोडीफार आर्थिक मदत मिळाली, तरी त्यासाठीं आपला राजकीय अधिकार मर्यादित करण्यास ॲबिसिनिया कसा नाखूष आहे, हें वरील करारांतील अटींवरून लक्षांत येईल. ॲबिसिनियामधील आपला अधिकार कमी होत आहे, ही गोष्ट ब्रिटिशांना सहाजीकच सुखदायक नाहीं.

### सैनिकांची वाढलेली उंची काय दर्शविते ?

गेल्या महायुद्धाच्या वेळचे व आतांचे अमेरिकन सैनिक ह्यांची तुलना केली, तर आतांच्या सैनिकांची उंची सरासरीनें एक इंच जास्त भरते. गेल्या वीस वर्षांत आहार व आरोग्य ह्यांत घडून आलेल्या सुधारणेचा हा परिणाम आहे. मेट्रॉपॉलिटन लाइफ इं. कंपनीनें जमा केलेल्या आकड्यांवरून असें दिसतें कीं, गेल्या युद्धाचे वेळीं लष्करांत दाखल होणाऱ्या उमेदवारांची सरासरी उंची ६७.४९ इंच होती, ती आतां ६८.१५ इंच भरते. पूर्वी शेंभरांत ६.५ उमेदवार ६ फूट उंच होते; आतां ८.७ उमेदवार त्या उंचीचे आढळतात. ५ फूट १० इंच उंचीच्या उमेदवारांचें शेंकडा प्रमाण २४.४ वरून २७.५ वर गेलें आहे.

## हिंदी कपास कापडाच्या गिरण्या

### युद्धानंतर कांहीं काळ तेजी रहाणार

#### सर जोसेफ के ह्यांचे विचार

" येतीं कांहीं वर्षे तरी हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांस परदेशी गिरण्यांच्या स्पर्धेची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. देशांतील कापडाची मागणी पुरविण्यास हिंदी गिरण्या समर्थ होतील व उत्पादनक्षमता वाढली तर निर्गतीसहि वाव मिळेल.

" नवीन नवीन धागे व कापड तयार होऊं लागलीं आहेत. लोकांच्या आवडीतहि फरक पडत आहे. कामगारांच्या सुखसोयींच्या योजना पुढें येत आहेत आणि भावनियंत्रण युद्ध संपतांच नाहींसें होण्याचा संभव नाहीं. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत.

" युद्धविषयक मागणी संपतांच चलनविस्तार आणि काळा बाजार बंद पडतील आणि गिरण्यांमधील योग्य स्पर्धेमुळें लोकांना वाजवी किंमतीस कापड मिळूं लागेल.

" हिंदी गिरण्यांतील पुष्कळशी यंत्रसामुग्री बदलून नवी बसविण्याची वेळ आली आहे. गेल्या मंदीनंतर कित्येक वर्षे यंत्रसामुग्री बदललेली नाहीं. आतां, तींत सुधारणा केल्याविना स्पर्धेस तोंड देतां येणार नाहीं. तथापि, किंमतीचा नीट विचार करूनच पाऊल टाकलें पाहिजे.

" गिरणीमालक व कामगार ह्यांमध्यें चांगला समजोता निर्माण होणें आवश्यक आहे. ह्याबाबत आतां बरीच प्रगति झाली असली, तरी अद्याप सुधारणेस पुष्कळच वाव आहे. वांधे तडजोडीनेंच मिटविले जाणें अगत्याचें आहे.

" आपण फार जातींचें कापड काढतों, त्यामुळें कार्यक्षमता कमी होते आणि उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. वाढत्या मागणीस पुरें पडणारें उत्पादन मोठ्या प्रमाणावरच केलें पाहिजे आणि त्या दृष्टीनें ऑटोमॅटिक मार्गांच्या उपयुक्ततेचा विचार केला पाहिजे. "

---

### विमा एजंटांच्या कमिशनमध्यें छाट ?

विमा एजंटांच्या कमिशनचा कमाल दर पहिल्या वर्षाच्या हप्त्यांच्या २५% ते ३२% असावा आणि रिन्युअल हप्त्यांच्या २३% पेक्षा जास्त कमिशन त्यांस मिळूं नये, असें सुचविण्यांत येत आहे. त्याचा विमा एजंटांवर आणि त्यामुळें कंपन्यांस मिळणाऱ्या कामावर काय परिणाम होईल, हें काळजीपूर्वक पाहिलें पाहिजे. विमा एजंटांस विमा एजन्सीच्या व्यवसायांतून पुरेसे पैसे मिळाले, तर तो एजन्सीचें काम जितकें चांगलें करील तितकें जोडधंदा म्हणून करणार नाहीं ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे. कमिशनच्या आजच्या दराप्रमाणेंहि बहुसंख्य विमा एजंटांची प्राप्ती पुरेशी होत नाहीं. तेव्हां, कमिशनचा दर अगदी कमी करणें श्रेयस्कर होणार नाहीं. एजंटांचें कमिशन फार खाली उतरविल्यास, त्याचा परिणाम घातुक होईल, असा इशारा मि. जोन्स व श्री. श्रीनिवासन् ह्यांनीं दिला आहे. एजंट नेमणाऱ्या चीफ एजंटांच्या कमिशनवर कायदा मर्यादा घालीत नसल्याकारणानें कित्येक कंपन्या चीफ एजंट ह्या नांवाखाली वस्तुतः साध्या एजंटांसहि फाजील कमिशन देऊं शकतात. ह्या संबंधांत सुधारणा करून, चीफ एजंटांची व्याख्या कडक करण्याची आवश्यकता आतां तीव्रतेनें भासूं लागली आहे.

## इंग्लंडमधील मोटारींवरील कर

कर बसविण्याच्या पद्धतीचा देशांतील उद्योगधंदे व व्यापार यांवर कसा परिणाम होतो याचें एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे इंग्लंडमधील मोटारींचा धंदा होय. इंग्लंडमध्यें मोटारींवर बसविलेला कर मोटारींतील सिलिंडरचा व्यास × त्यांची संख्या = सिलिंडरांचें क्षेत्रफळ यांवर आधारलेला आहे. वास्तविक पाहतां मोटारीची अश्वशक्ति सिलिंडरचा व्यास × उंची × त्यांची संख्या यांवर म्हणजेच सिलिंडरांचे एकूण घनफळावर अवलंबून असते. जगांतील बहुतेक सर्व देशांत कर सिलिंडरांच्या घनफळावरच आधारलेला आहे. इंग्लंडमधील अशा चमत्कारिक करकायद्यामुळें तेथील मोटारींचे कारखानदार मोटारीच्या सिलिंडरचा व्यास कमी परंतु उंची जास्त ठेवतात. हें ब्रिटिश मोटारींचें वैशिष्ट्य आहे. अर्थात् त्यांत नुकसानच आहे.

तेथील करयोजनेंतील इतरहि कांहीं कलमांमुळें इंग्लंडमध्यें मोठी मोटार ठेवणें फार महाग पडतें. यामुळें तेथील कारखानदार बहुधा लहान मोटारी तयार करतात.

वरील दोन कारणांमुळें ब्रिटिश मोटारी बाहेरील देशांत खपण्यास जड जातात व त्याचप्रमाणें बाहेरील मोटारी इंग्लंडमध्यें विकणें अवघड पडतें.

या कायद्यांत नुकताच बदल करण्यांत आला आहे, त्याअन्वयें यापुढें कर घनफळावर बसविला जाईल. परंतु अजूनहि मोठ्या मोटारींवरील कर कमी झालेला नाहीं.

या नवीन कायद्यामुळें ब्रिटिश मोटारी लहानच राहतील; पण त्यांचा सिलिंडरें इतरत्र केलेल्या सिलिंडरसारखीं होतील. कर वाचविण्यासाठीं तीं मुद्दाम उंच करण्यांत येणार नाहींत.

यामुळें ब्रिटिश कारखान्यांस मोटारी निर्यात करण्यास थोडें सोपें जाईल असा कांहीं कारखानदारांचा अंदाज आहे. कारण त्यांच्या मतें जगभर हल्लीं लहान इंजिनें बांधण्याकडे प्रवृत्ति आहे व त्याच प्रवृत्तीस स्वदेशांत उत्तेजन यावें. परंतु कांहींना असें वाटतें कीं मोठ्या मोटारीवरील करहि कमी असतां तर बरें. कारण बाहेरील बऱ्याच देशांत मोठ्या मोटारी लागतात व तशाच ब्रिटनमध्यें खपाव्यात म्हणजे कारखानदारास निर्यातीसाठीं खास " मॉडेल " काढावें लागणार नाहीं.

श्री. चिं. का.

---

### " जगांतील सर्वांत मोठी डेअरी हिंदुस्थानांत आहे "

जगांतील सर्वांत मोठी डेअरी हिंदुस्थानांत आहे. " लष्करी लोक व सिव्हिल सर्व्हिसमधील युरोपियन लोक ह्यांच्या कुटुंबीयांना ताजें दूध व लोणी पुरविण्यासाठीं कांहीं वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या सुमारें सहा मिलिटरी डेअरींपैकींच ती एक आहे. " तिचें क्षेत्र ९६,००० एकर आहे. " हिंदुस्थानची लोकसंख्या ४०,००,००,००० आहे व त्यापैकी ९०% पेक्षा जास्त लोकांचें पोट शेतीवर अवलंबून आहे. बहुसंख्य लोक निरक्षर आहेत. गेल्या दोन हजार वर्षांत त्यांच्यामध्यें प्रगति झालेली नाहीं. शिकलेल्या हिंदी लोकांना शेतीचा व्यवसाय आवडत नाहीं. शाळांतून बाहेर पडलेल्यांना कारकुनाची नोकरी मिळविण्यापलीकडे दुसरें कांहीं सुचत नाहीं."—जनरल ह्यूजेस ह्यांनीं दि फार्मर अँड स्टॉक ब्रीडर ह्या ब्रिटिश साप्ताहिकांत लिहिलेला लेख.

## नव्या अंदाजपत्रकावर कायदेमंडळांत टीका

मध्यवर्ती कायदेमंडळामध्यें नव्या अंदाजपत्रकावर टीका चालू आहे. वाढता युद्धखर्च, स्टर्लिंग शिलकांचें भवितव्य याणि प्राप्तीवरील कराच्या कायद्यांतील बदल हे वादाचे मुख्य प्रश्न होत. प्राप्तीवरील कर बसवितांना सश्रम मिळविलेलें आणि विनायास मिळविलेलें धन अशी जी विभागणी करण्यांत आली आहे तिचें स्वागत झालें. पण हा फरक अधिक निश्चित झाला पाहिजे असें श्री. भुलाभाई देसाईनीं सांगितलें. प्राप्तीवरील कर आकारणाऱ्या अधिकाऱ्यास जे अधिकार देण्यांत आले आहेत त्यांच्यावर खूप टीका झाली. वरील अधिकाऱ्यास खाजगी जागेंत देखील प्रवेश मिळावयाचा ही गोष्ट अनिष्ट होय. अशी योजना इंग्लंडमध्येंसुद्धां नाहीं. खाजगी हक्कांची त्यामुळें पायमल्ली होते. अधिकारी वर्ग अधिक उन्मत्त बनेल. सांठविलेलें धान्य शोधून काढावें म्हणून जे अधिकारी घरांत प्रवेश करतात, त्यांचे अत्याचार लक्षांत घेतां वरील अधिकार किती घातुक होणार आहे तें कळून येईल. मद्रास इलाख्यांत अशी योजना चालू असली तरी ती लोकमताच्या विरुद्ध गव्हर्नरांनीं प्रस्थापित केली आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे खाजगी घरांत शिरून परत एकदां प्राप्तीसंबंधीं आढावे पहावयाची योजना सहा वर्षांपूर्वीं फेटाळून लावण्यांत आली होती तीच आतां पुढें करण्यांत येत आहे.

अर्थमंत्र्यांनीं वरील आक्षेपांस उत्तरें दिलीं. युद्धखर्च वाढतो आहे अशी इकडे तक्रार करून स्टर्लिंग शिलका फुगत चालल्या आहेत अशीं ओरड करण्यांत अर्थ नाहीं. हिंदुस्थाननें किती युद्धखर्च पेलावा तें पूर्वीं झालेल्या करारावाचून दुसरें कोणीच बदलूं शकत नाहीं. प्राप्तीवरील कराच्या बाबतींत बरीच टीका झाली लोकांस कायद्यानें सवलत द्यावयाची पण कायदा चुकवूं द्यावयाचा नाहीं अशा तत्त्वांवर दुसरी अधिक चांगली कोणती योजना सुचली असती? शेवटीं हा प्रश्न फडणविसांनीं एका निवडक मंडळाकडे सोपविण्याचें कबूल केलें.

---

## नवे शेअर विक्रीस काढण्यास विरोध

### हायकोर्टांत भागीदारांचा अर्ज

बाँबे लाइफ अॅशुअरन्स कं. लि. नें आपलें भांडवल ४,५९६ नवे ऑर्डिनरी शेअर्स विक्रीस काढून तें ५,४०,४०० रुपयांचें १०,००,००० रुपये करण्याचें ठरविलें व प्रथम ते शेअर्स भागीदारांना प्रत्येक भागास ७५ रुपये वाढाव्यानें देऊं केले. "कंपनीची आर्थिक स्थिति चांगली आहे; नवे शेअर्स काढणें कंपनीच्या हिताचें नाहीं; कंपनीचा ताबा स्वतःकडे राखण्याचा कांहीं डायरेक्टरांचा हेतु आहे तो सिद्धीस नेण्यासाठीच भांडवल वाढविण्यांत येत आहे" वगैरे मुद्यांवर नानालाल झवेर वगैरे भागीदारांनीं मुंबई हायकोर्टांत अर्ज करून कंपनीच्या डायरेक्टरांवर शेअर भांडवल वाढविण्यास तात्पुरता मनाई हुकूम मिळावा, अशी विनंति केली. त्या अर्जाचा विचार ९ मार्च रोजीं व्हावा असें ठरलें. शेअर अॅलॉट करणें तहकूब करण्याचें डायरेक्टरांनीं आश्वासन दिल्यावरून अर्जाचा विचार ९ मार्च रोजीं न करतां १२ मार्चपर्यंत पुढें ढकलल्याचें न्या. भगवति ह्यांनीं जाहीर केलें.


डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

—कोको प्या—
कोको हें उत्कृष्ट पेयास आहे. सध्यांच्या अवटंचाईच्या दिवसांत तर अशा पेयाची अधिक जरूरी आहे.
"सॅचवर्क"
कोकोची मागणी करा. म्हणजे स्वस्त, उत्कृष्ट व शुद्ध कोको मिळेल.
—साठे चॉकोलेट वर्क्स,
पुणें २.

सांडू हार्टिना
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्टस् व ड्रगिस्टस्.
चेंबूर, मुंबई.
पुणें चीफ एजंट : मे. श्रीदत्त एजन्सी १०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.
कोल्हापूर विक्रेते : मे. भागवत आणि कं. कांच लाइन
सातारा जिल्हा एजंट : मे. जोशी आणि मंडळी भवानी पेठ.
अहमदनगर विक्रेते : मे. देशमुख आणि कं. नवी पेठ.

## आगपेट्यांच्या धंद्याची हिंदुस्थानांत स्थापना

गेल्या महायुद्धापूर्वी हिंदुस्थानांत आगपेट्या खपत त्यांपैकी बहुतेक पेट्या स्वीडन व जपान ह्या देशांतून येत असत. स्वीडनच्या आगपेट्या चांगल्या असल्या तरी जपानी माल स्वस्त असल्याकारणानें तो जास्त लोकप्रिय होता. शहरांतील लोक मात्र स्वीडिश आगपेट्याच पसंत करीत. महायुद्धाचे काळांत जपानी आगपेट्यांच्या स्पर्धेपुढें स्वीडिश आगपेट्या टिकूं शकल्या नाहींत व १९१७ सालीं जपानी मालानें हिंदी बाजारपेठ पूर्णपणें काबीज केली. सरकारनें आपलें उत्पन्न वाढविण्यासाठी आगपेट्यांवर जबर जकात बसविण्यास प्रारंभ केला व त्यांतूनच आगपेट्यांच्या उत्पादनास हिंदुस्थानास जोराची चालना मिळाली.

युद्धानंतरच्या काळांत, जपानचे प्रतिस्पर्धी पुनः बाजारपेठेंत उतरले व जपानचें महत्त्व कमी झालें. पुढें जकातीचा दर १००–२००% करण्यांत आला, त्यामुळें आयात एकदम उतरली. १९२१–२२ सालीं १ कोटि, २६ लक्ष ग्रोस आगपेट्यांची आयात झाली होती; १९२६–२७ मध्यें हा आकडा ६१ लक्ष ग्रोसवर उतरला. आयातीमधील ही तफावत देशी आगपेट्यांनीं भरून काढली. १९२२ पूर्वी हिंदी आगपेट्या अगदी लहान प्रमाणावर तयार करण्यांत येत असत. त्यानंतरच स्वत्या आगपेट्यांच्या धंद्यास प्रारंभ झाला व सर्व स्थानिक गरजा भागविण्याइतका तो १९३० मध्यें मोठा झाला. प्रारंभीं बिन गुलाच्या काड्या व पेट्या ह्यांवर जकात नव्हती, त्यामुळें जपानमधून काड्या मागवून त्यांवर गूल चढवून त्या पेट्यांत भरण्याचें काम हिंदुस्थानांत सुरू झालें. हीं कामें बव्हंशीं हातानेंच होत. ऑटोमॅटिक यंत्रांचीहि पुढें जपानमधून आयात होऊन तीं हिंदी कारखान्यांत बनविण्यांत आलीं. बिन गुलाच्या काड्या व मोकळ्या पेट्या ह्यांवर हिंदुस्थान सरकारनें जकात बसविल्यानंतर कारखानदारांना लाकडापासूनच्या सर्वच क्रिया स्वतः करणें भाग पडूं लागलें. १९२४ नंतर आगपेट्यांचें उत्पादन पूर्णत्वानें हिंदी बनलें, असें म्हणतां येईल. कांहीं प्रमुख हिंदी कारखान्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेतः—

| | स्थापना |
|---|---|
| एसावी कं. कलकत्ता | १९२३ |
| अदमजी हाजी दाउद अँड कं. रंगून | १९२४ |
| महालक्ष्मी फॅक्टरी, कलकत्ता | १९२५–२६ |
| बरेली मॅच वर्क्स, बरेली | १९२५–२६ |

दि स्वीडिश मॅच कंपनी ही स्वीडनमधील अग्रेसर कंपनी होय. तिनें हिंदुस्थानांत अनेक वर्षें जपानी स्पर्धेस टक्कर दिली होती. तिनेंच आतां हिंदुस्थानांत, संरक्षक जकातीच्या भिंतीच्या आंत, कारखाने काढण्याचें ठरवून खालील कारखान्यांची स्थापना केली:—

| हिंदुस्थानांतील स्वीडिश कारखाने | स्थापना |
|---|---|
| अंबरनाथ | जुलै १९२४ |
| कलकत्ता | सप्टेंबर १९२४ |
| परेळ | सप्टेंबर १९२४ |
| आसाम | जुलै १९२६ |
| बर्मा | ऑगस्ट १९२५ |
| मंडाले | ऑक्टोबर १९२५ |

वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि. ह्या मॅनेजिंग एजन्सी फर्मकडे वरील बहुतेक कारखान्यांची व्यवस्था आहे.

आगपेट्यांवरील जबर जकातीमुळें आगपेटीच्या कारखान्यांना एक प्रकारें जबर संरक्षण मिळालें, तरी हीं जकात वार्षिक कराच्या स्वरूपाची व म्हणून केव्हांहि सरकारास कमी–ज्यास्त करण्याजोगी होती. तेव्हां तिला कायम संरक्षक जकातीचें स्वरूप देण्याबद्दल कारखानदारांची मागणी होती. १९२६ सालीं सरकारनें टारिफ बोर्डामार्फत ह्या धंद्याची चौकशी करविली. १९२८ सालीं हिंदुस्थानांत दररोज ५०० पेक्षा ज्यास्त ग्रोस पेट्या करणारे २७ कारखाने होते. वार्षिक उत्पादनाची शक्ति १ कोटि ८० लक्ष ग्रोस टनांची होती, त्यांपैकीं सुमारें ६० लक्ष ग्रोस स्वीडिश मालकीच्या कारखान्यांत तयार होत असत. टारिफ बोर्डानें १ रु. ८ आ. जकात ही संरक्षक जकात म्हणून कायम करावी, असें सुचविलें व सरकारनें त्यास मान्यता दिली. १९३४ सालीं हिंदुस्थानांतील उत्पादनावर एक्साइज ड्यूटी बसविण्यांत आली, व तींत वेळोवेळ बदल करण्यांत आला. सरकारचें एक्साइजचें उत्पन्न कसें वाढत गेलें, हें खालील आकडे दर्शवितातः—

| वर्ष | रुपये |
|---|---|
| १९४१ | ३,०५,०४,००० |
| १९४२ | ३,३१,००,००० |
| १९४३ | ४,२४,८५,००० |

### युनायटेड कमर्शिअल बँक लि., कलकत्ता
### प्रत्येक शाखेची ऑडिटरमार्फत हिशेबतपासणी

वरील बँकेस ३१-१२-४४ अखेर संपलेल्या नऊ महिन्यांत १२,८४,५५३ रुपये नफा झाला. वसूल भांडवल १ कोटि रु., ठेवी १७½ कोटि रु., रोखे व शेअर्स ह्यांत गुंतवण ७½ कोटि रु., कर्जें ७½ कोटि रुपये, असे ताळेबंदांत आंकडे आहेत. रोख्यांच्या विक्रीचे व्यवहारांतील नफा ताळेबंदांत घेतलेला नाहीं, असा खुलासा ताळेबंदाखालीं मुद्दाम केलेला आहे. शाखा काढण्यासाठी आलेला खर्चहि हिशेबांत खर्ची टाकलेला आहे. भागीदारांनीं निवडलेल्या ऑडिटरांनीं शाखांच्या मॅनेजरांनीं दिलेल्या हिशेबाचे तक्त्यांवर अवलंबून राहूं नये व प्रत्येक शाखेच्या हिशेबाची तपासणी योग्य ऑडिटरकडून करवून घ्यावी, असें डायरेक्टरांचें धोरण आहे. सहाजीकच ऑडिट फी खातीं २०,९०० रुपये खर्ची पडले आहेत.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७९

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२८।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २१ मार्च, १९४५ अंक १२

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुले सशक्त होतात.



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:— द. ना. हेजीब

नोगीचे डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

## दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव
शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापुर

खेळतें भांडवल १५ लाखांवर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, B. A., LL. B. चेअरमन.

श्री. एल. एस. आजगांवकर, श्री. एस. के. सामंत, श्री. एन. व्ही. सामंत, श्री. पी. ए. तेंडोलकर, श्री. जी. एन. कलघटगी, श्री. डी. आय. गाडवी, श्री. आय. एम्. हुंगुरवाडी, श्री. टी. व्ही. पोरवाल, श्री. डी. आर. अनगोळकर, श्री. आर. डी. गुर्लहोसूर, श्री. जी. जी. वेर्लिंग.

आकर्षक दरानें मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

एस. एन. सामंत,
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड,

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ३,६७,९५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ,, २५,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्ट्स् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

# विविध माहिती

### हिंदुस्थानांत ब्रिटिश मोटारींची आयात

दहा अश्वशक्तीच्या दोन हजार ऑस्टिन मोटार गाड्या हिंदुस्थानांत येण्याचा संभव आहे. सदरहू गाड्यांच्या किंमतीची फेड इंग्लंडकडून येणें असलेल्या स्टर्लिंगमधून व्हावयाची अगर कसें, हें समजत नाहीं.

### मुंबई शहरांतील दिवे

मुंबईतल्या २३५ मैल लांबीच्या रस्त्यांवर १०,८०० दिवे असून त्यांपैकीं फक्त २,००० दिवे विजेचे आहेत. दर १२० फुटांस एक दिवा असें सध्यांचें दिव्यांचें प्रमाण आहे. मुंबई शहराला या कामासाठी दरसाल ११,००,००० रुपये खर्च येतो. जगांतील प्रमुख शहरांशीं तुलना करतां सध्यांची मुंबई शहरांतील दिव्यांची योजना अगदींच अपुरी आहे.

### चित्रपट धंद्याचा आढावा

हिंदुस्थानांतील चित्रपट धंद्याचा औद्योगिक, शास्त्रीय, व कलात्मक दृष्टीनें गेल्या ३० वर्षांचा आढावा घेणारें एक पुस्तक इंडिपेन्डन्ट फिल्म प्रोड्यूसर्स असोसिएशनमार्फत प्रकाशित केलें जाणार आहे.

### सक्तीचा युद्धविषयक धोक्याचा विमा

सक्तीच्या वॉर रिस्क इन्शुअरन्सच्या योजनेमुळें मध्यवर्ती सरकारकडे सुमारें ३५ कोटि रुपये जमा झाले, परंतु दिलेल्या क्लेम्सची रकम ५ लक्ष रुपयेहि होत नाहीं.

### मोटारींच्या लायसेन्स पाट्या—कुत्र्यांचें खाद्य

अमेरिकेंत कांहीं ठिकाणीं धातूंची बचत करण्यासाठी, मोटारींच्या लायसेन्सच्या पाट्या सोयाबीनच्या करण्यांत आल्या. कुत्र्यांना त्या आवडल्या व त्यांनीं त्या खाण्यास प्रारंभ केला!

### मुंबई–बडोदें विजेच्या आगगाड्या!

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेच्या मुंबई–बडोदे फाट्यावरील आगगाड्या विजेच्या करण्याची युद्धोत्तर योजना आहे. तीस वीज पुरविण्याकरितां चार स्टीम टर्बाइन्स बसवून आपली वीजपुरवठाशक्ति २०,००० किलोवॅट करण्याचा सुरत इ. कंपनीचा विचार आहे.

### युद्धकैद्यांवर २८ कोटि रुपये खर्च

हिंदुस्थानांत ठेवलेल्या युद्धकैद्यांबाबत १९४४–४५ अखेर एकूण २८ कोटि रुपये खर्च झाला, तो सर्व ब्रिटिश सरकारनें सोसला.

### जर्मन उद्योगधंद्यांची मुसकटदाबी

युद्धसमाप्तीनंतर जर्मनीला पुनः डोकें वर काढून दोन पिढ्या तरी जागतिक शांतता बिघडवतां येऊं नये, ह्या दृष्टीनें कित्येक सूचना अमेरिकेंत पुढें येत आहेत. जर्मनीला पूर्णपणें शेतकऱ्यांचा देश बनविणें जागतिक व्यापारवृद्धीस पोषक होणार नाहीं, ह्यासाठी त्या योजनेस तेथें पाठिंबा मिळत नाहीं. पांच इंजिनिअरिंग सोसायट्यांच्या अध्यक्षांनीं एक योजना आखली आहे, तिचे अन्वयें जर्मनीचें कृत्रिम तेल व पेट्रोल, स्फोटक द्रव्यें, विमानें, हलके धातू, पोलाद, नैट्रोजन, इत्यादींचें उत्पादन नियंत्रित केलें जाईल. ही योजना अंमलांत आल्यास, जर्मनीला शांततेच्या काळीं जरूर लागणारें उत्पादन कसेंबसें करतां येईल.

### रुपयाच्या नोटा

प्रत्येक रुपयावाल्या नोटेस कागद व छपाई मिळून दोन तृतीयांश पै एवढा खर्च येतो. आतां खेळते रुपये व रुपयाच्या नोटा ह्यांची संख्या सारखी झाली आहे आणि रुपयाच्या नाण्यांची संख्या वाढत आहे. रुपयांचें प्रमाण वाढविण्याचें सरकारचें धोरण आहे.

### मोटार वाहतुकीची प्रचंड कंपनी!

रेल्वे बोर्ड, प्रांतिक सरकार व सध्या अस्तित्वांत असलेल्या खाजगी मोटार कंपन्या, या सर्वांच्या मालकीची एक संयुक्त प्रचंड वाहतुक कंपनी लवकरच, जवळ जवळ एक महिन्यांत, स्थापन होणार असून त्या योजनेबद्दल सरकारकडून येत्या पंधरवड्यांत कांहींतरी खुलासा होईल असा अंदाज आहे. या कंपनीच्या शेअर्सपैकीं ३०% शेअर्स सरकार खरेदी करणार असून ३०% शेअर्स रेल्वे बोर्ड घेईल व उरलेले ४०% शेअर्स इतर वाहतुक कंपन्यांना देण्यांत येणार आहेत. ही कंपनी स्थापन झाल्यावर गिरणीवाले, कारखानदार व लढाईच्या कामांत गुंतलेले लोक यांपैकीं ज्यांना खाजगी परवाने दिले असतील त्या लोकांखेरीज इतरांना माल व उतारू यांची वाहतुक करण्यास बंदी करण्यांत येईल.

### स्वस्त दरानें खताचा पुरवठा

गतवर्षीप्रमाणेंच १९४५–४६ सालींहि मुंबई सरकारनें शेतकऱ्यांना स्वस्त दरानें पेंडपुरवठा करण्याचें ठरवलें आहे. गतवर्षी सरकारनें तांदूळ व गहूं पिकविणारांस ४३,३०० टन पेंड स्वस्त दरानें विकली. चालू सालीं ६०,००० टन पेंड मुंबई सरकार खरेदी करून व सांठवून विकणार असून सवलतीचा दर ३५ रुपये टन प्रमाणें ठेवण्यांत येईल. त्यासाठीं प्रांतिक सरकारला २१,००,००० रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकीं निम्मा खर्च हिंदुस्थान सरकार सोसणार आहे.

### मद्रास प्रांतांतील कंझ्युमर्स सहकारी सोसायट्या

मद्रास प्रांतांत १९३८ सालीं फक्त ११३ कंझ्युमर्स को. सोसायट्या अस्तित्वांत होत्या; आतां त्यांची संख्या १,१९१ झाली आहे. १९३८ सालीं त्यांनीं ३३ लक्ष रुपयांच्या मालाची विक्री केली; १९४४ मध्यें त्यांनीं ८ कोटि, ९४ लक्ष रुपयांच्या मालाची विक्री केली.

### मिडलंड बँकेची जिंदगी

मिडलंड बँक ह्या ब्रिटिश मोठ्या बँकेच्या ताळेबंदानें नोव्हेंबर १९४४ मध्यें १५ अब्ज रुपयांची जिंदगी दाखविली. कोणत्याहि दुसऱ्या ब्रिटिश बँकेची जिंदगी अद्याप एवढी मोठी झालेली नाहीं.

### डी. डी. टी. द्रव्य प्राणघातक कसें?

प्रथम कृमींच्या पाठीमागील पायास तें बधिरता आणतें आणि थोड्याच अवधींत कृमीस अर्धांग वायू होऊन मरण येतें. ह्या द्रव्याचा तेल किंवा एखादी पूड ह्यांतून उपयोग करावयाचा असतो; स्वतंत्रपणें तें द्रव्य इतकें प्राणघातक नाहीं. साधारणतः १% ते ५% डी. डी. टी. चा डोस पुरतो, व त्या प्रमाणांत तें मनुष्यास अपायकारक नाहीं. हें द्रव्य इतकें प्रभावी असलें, तरी सर्वच कीटकांचा नाश तें करूं शकेलच असें नाहीं. कांहीं कीटक ह्या द्रव्यास दाद न देणारे आहेत!

# अर्थ

## बँकांचें सरकारी नियंत्रण इष्ट होईल काय ?

### मि. ब्रँबल ह्यांचे विचार

बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्स ह्या युरोपियन व्यापारी संस्थेची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं तिचे अध्यक्ष मि. सी. पी. ब्रँबल ह्यांनीं आपल्या भाषणांत चालू आर्थिक घडामोडींवर आपले विचार व्यक्त केले. बँकिंग बिल व विमा कायदा दुरुस्तीचें बिल ह्यांचें कायद्यांत रूपांतर झाल्यास त्याचा व्यापारी वर्गावर दिर्घगामी परिणाम होईल, आणि आपल्या स्वतःच्या चेंबरच्या सभासदांचें त्यांत नुकसान आहे, असें त्यांनीं सांगितलें. बँकिंग बिलाच्या प्रस्तावनेंत स्वतंत्र व तपशीलवार बँकिंग कायद्याची आवश्यकता निर्माण झाली आहे असें म्हटलें आहे; परंतु अशी आवश्यकता सिद्ध मात्र करण्यांत आलेली नाहीं असें मि. ब्रँबल ह्यांचें म्हणणें आहे. भागीदारांपेक्षा ठेवीदारांच्या हितास जपणें हा बँकिंग बिलाचा हेतु आहे, परंतु तो हेतु कायद्यानें साध्य होईल अशी ठेवीदारांची चुकीची समजूत होणें अनिष्ट आहे, असें त्यांचें मत आहे. केवळ शेड्यूल्ड बँकांच्या ठेवीदारांच्या हिताची जपणूक आजचा कायदाहि करीत आहे, तेव्हां सर्वच बँका शेड्यूल्ड होण्यास काय हरकत आहे ? असा त्यांचा प्रश्न आहे. लहान बँकांचें अस्तित्व अशक्यप्राय व्हावें व पुरेशा मोठ्या बँकांचीच वाढ होऊं द्यावी, म्हणजे आजच्या कायद्याप्रमाणेंहि त्यांचेवर पुरेसें नियंत्रण ठेवतां येईल, असा मि. ब्रँबल ह्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. मागसलेल्या भागांत नव्यानें स्थापन होणाऱ्या लहान बँकांबद्दल त्यांस सहानुभूति वाटण्याचें कारण नसल्यामुळें, मोठ्या बँकांपुरतेंच त्यांचें लक्ष मर्यादित होणें स्वाभाविक आहे.

### नियंत्रण प्रभावी कसें होईल ?

नव्या बँकिंग बिलानें बँकांवर देखरेख ठेवण्याचा व्यापक अधिकार रिझर्व्ह बँकेस व सरकारास दिला आहे. सरकारी नियंत्रण प्रभावी होऊं शकत नाहीं आणि त्या कारणानें तें मुळी नसलेलेंच बरें, असा मि. ब्रँबल ह्यांचा अभिप्राय आहे. रिझर्व्ह बँकेस नियंत्रणासाठी आणखी अधिकार देणें आवश्यक असेल, तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट दुरुस्त करून ते अधिकार तिला द्या, परंतु नियंत्रण ठेवणें त्या बँकेस जमणार नसेल तर नव्या बिलानें तिला ज्यास्त अधिकार दिले तरी त्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं, असें बॉंबे चेंबरचे अध्यक्ष म्हणतात. नियंत्रण करणारास सारासार विचार करण्याची मुभा ठेवल्यास, नियंत्रण वेळींच व परिणामकारक होऊं शकत नाहीं; कांहीं विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट उपाय योजना करावयाची, असें कायद्यानेंच सांगितलें म्हणजे आपोआप देखरेख चांगली होते, अशी सरकारची बाजू दिसते. विमा व्यवसायाच्या नियंत्रणाचे बाबतहि हीच सरकारची भूमिका असली पाहिजे. बँका व विमा कंपन्या ह्यांस त्यांच्या कल्पनेप्रमाणें व्यवसाय करूं देणें ठेवीदारांच्या व विमेदारांच्या हिताचें नाहीं, ह्या गोष्टीवरच दोन्ही व्यवसायांचें अनुभवांतीं नियंत्रण आवश्यक झालें, ही गोष्ट विसरतां कामा नये.

### सामान्य जनतेच्या हिताचें रक्षण

बँकिंग व विमाव्यवसाय धरून सर्वच आर्थिक व्यवहारांत व व्यापारांत व्यक्तींस व्यवहार-स्वातंत्र्य असावें आणि त्यांत राजसत्तेची अत्यंत आकुंचित मर्यादेच्या बाहेर ढवळाढवळ चालू देऊं नये असें मत एका टोकास व्यक्त केलें जातें तर सामान्य जनतेच्या आर्थिक जीवनाशीं जिव्हाळ्यानें संबद्ध झालेल्या व्यवहारांत सरकारची सत्ता प्रभावी झाल्यावांचून लोकांची समृद्ध व बलवान धंदेवाल्यांकडून होणारी पिळवणूक थांबणें शक्य नाहीं असा सिद्धांत दुसऱ्या टोकास मांडला जातो. विमा व बँकिंगसारखे व्यवसाय व्यक्ती व मंडळ्या ह्यांचे हातीं असूंच नयेत आणि ते लोकहिताच्या ज..णुकीसाठी व त्याच्या अभिवृद्ध्यर्थ सरकारनें स्वतःच्या कारभाराचे कक्षेंत आणावे असें म्हणणारा एक वर्ग आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. व्यक्ति-स्वातंत्र्याच्या कल्पनेवर आधारलेल्या समाजांतहि सामान्य जनतेच्या हिताचें रक्षण करण्यासाठी सरकारास आपल्या नियंत्रणाचा अंगिकार करावा लागत आहे हें विसरून चालणार नाहीं. सावकारी नियंत्रणाचे कायदे सर्व देशांमध्यें अमलांत आहेत ते कशासाठी ? हिंदुस्थानांत मध्यम व लहान आकारांच्या बँकांची व विमामंडळ्यांची आवश्यकता आहे. पण त्यांचे व्यवहार ठेवीदार व विमेदार ह्यांच्या हितास बाधक होणार नाहींत, पोषकच होतील ह्या विषयीं काळजी घेण्यांत आली पाहिजे ती सरकार व कायदा ह्यांचे वांचून दुसरें कोण घेणार ? व्यक्तिविषयक व सामुदायिक धंदे आणि जनतेचें हित ह्यांचा मेळ राजसत्तेनेंच घालावयाचा असतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदी जनतेची परिस्थिति व गरजा ह्यांची प्रत्यक्ष माहिती व अनुभव ह्यांचा अभाव, हेंच मि. ब्रँबल सारख्यांच्या टीकेचें मूळकारण होय.

---

## रिझर्व्ह बँकेचीं पहिलीं दहा वर्षें

रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेस पुढील महिन्यांत १० वर्षें पुरीं होतात. बँकेच्या १० वर्षांच्या कामगिरीचा आढावा घेतांना, "ईस्टर्न एकॉनॉमिस्ट" हें साप्ताहिक म्हणतें:—"पहिलीं चार वर्षें ही मंदी नुकतीच संपून जाऊन आलेल्या परिस्थितीचीं होतीं. स्वतःच्या जबाबदारीबद्दल अधिक स्पष्ट कल्पना बँकेनें करून घेतली असती, तर ती परिस्थिति सुधारण्यास बँक हातभार लावूं शकली असती. चालू युद्धाच्या सहा वर्षांत ह्या देशांत झालेल्या चलनविषयक स्थित्यंतरांकडे बँकेनें तटस्थपणानें पहाण्यापलीकडे फारसें कांहीं केलेलें दिसत नाहीं. रिझर्व्ह बँकेनें ही वृत्ति सोडली पाहिजे. विशेषतः आतां चलनविस्तार आटोक्यांत आणण्याचे दृष्टीनें व परदेशी हुंडणावळीची समाधानकारक व्यवस्था लावण्याचे दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें योजना आखल्या पाहिजेत. रिझर्व्ह बँक ही हिंदुस्थान सरकारची आर्थिक व तांत्रिक सल्लागारहि आहे; अगोदरच दुसऱ्यानें केलेल्या निर्णयांची केवळ अमलबजावणी करण्यासाठी तिचें अस्तित्व नाहीं. अर्थात, ह्या भूमिकेचें अद्याप व्यवहारांत रूपांतर झालेलें नाहीं."

## काळा बाजार

### इंग्लंडमधील काळा बाजार

बॉम्ब वर्षावाखालील दक्षिण इंग्लंडपेक्षा सुरक्षित उत्तर इंग्लंड-मध्यें काळा बाजार जोरांत चालू आहे. मँचेस्टरमध्यें ३००% ते ४००% अधिक किंमती घेऊन कापड काळया बाजारांत विकलें जातें. तेथील एका दुकानदारानें गिऱ्हाइकास सांगितलें, "मला कूपन्स किंवा पैसे नकोत. प्रत्येक २ पौंड किंमतीच्या विनिमयांत मला व्हिस्कीची एक बाटली दे, म्हणजे झालें." कित्येक दुकानदार सुटाच्या दोन किंमती सांगतात. कूपन्स नसलीं तर ३ पौंड जास्त मागण्यांत येतात. इन्स्पेक्टर फ्रँक स्टेंटननें लँकेशायरमधील काळया बाजारास पुष्कळच आळा घातला आहे. "कारागृहवासाची शिक्षा, हा एकच काळया बाजारावरील खरा प्रभावी उपाय आहे" असें तो म्हणतो. काळया बाजारांत मिळण्यास सर्वांत अवघड जिन्नस म्हणजे साखर. शेरास २½ ते ४ रुपये पडतात. व्यापारी एकमेकांस पैशाचे ऐवजी परस्पर मालाची देवघेव करून काळा बाजार फैलावतात. कूपन न घेतां मांस विकून दुकानदार कूपन न देतां सूट मिळवूं शकतो. कारखान्यांतील कँटीनमधून पुष्कळसें अन्न काळया बाजारांत जातें, असें आढळून आलें आहे.

---

### पॅरिसमधील काळा बाजार

मनुष्यास दररोज किमान २,५०० कॅलरी अन्न तरी पाहिजे, परंतु फ्रेंच सरकार पॅरीसमधील जनतेस १,५०० कॅलरीपेक्षां अधिक अन्न पुरवूं शकत नाहीं. कायदेशीरपणें न मिळणाऱ्या जिनसा त्यांस काळया बाजारांत घ्याव्या लागतात व तेथें खऱ्या किंमतीच्या २ ते १५ पट किंमत द्यावी लागते. पॅरीसनें चार वर्षे जर्मन अंमलाखालीं काढल्याकारणानें, बेकायदा जीवनाची लोकांस सवय झालेली आहे. भूक तर भागविलीच पाहिजे व त्यासाठीं काळया बाजाराचा अवलंब करणें पॅरिसकरांना क्रमप्राप्त झालें आहे. वेतनांत वाढ हा जादा खर्च भागविण्याचा उपाय होय; कारण काळया बाजारांतील महागाईस नेहमींची प्राप्ति अपुरी पडणें स्वाभाविक आहे. काळया बाजारांतील गिऱ्हाइकांची संख्या वाढली कीं, जिनसा आणखी महाग होत जातात आणि त्यामुळें वेतनहि वाढवावें लागतें. हें चक्र असेंच फिरत राहून, बेकायदा काळा बाजार फोफावतो. फ्रँक नाण्याची परदेशांतील किंमत कमी होऊन, फ्रान्सच्या परराष्ट्रीय व्यापारावर त्याचा घातुक परिणाम होईल, असें सांगण्यांत येत आहे. पॅरीसमधील परिस्थितीप्रमाणेंच इतर फ्रेंच शहरांतहि परिस्थिति असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

## भारत इं. बँक लि.

### डिव्हिडंड ४% करमाफ झालें

वरील बँकेनें १९४४ सालीं आपलें वसूल भांडवल ९९,४४० रुपयांवरून १,६९,२८५ रुपयांवर नेलें. ठेवींतहि ६½ लक्ष रुपयांची भर पडली. खेळतें भांडवल १७ लक्ष, ८० हजारांचें २५ लक्ष, १९ हजार रुपये झालें. बँकेचे ७ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत आणि ८½ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत आहेत; म्हणजे तरते पैसे भरपूर आहेत. रोख्यांची बाजारी किंमत त्यांस पडलेल्या किंमतीपेक्षां ज्यास्त आहे. येणें कर्जांचा आकडा ८ लक्ष, ३९ हजार रु. आहे. ब्रँच ऑर्गनायझेशन खात्यांत अहवालाचे वर्षी ३,५०७ रुपयांची भर पडून, त्या खात्यांत आतां ७,७९९ रुपये झाले आहेत. बँकेचें कमिशन, डिस्कौंट, वगैरेचें उत्पन्न वाढलें असून तें गेल्या वर्षी ११,९६१ रुपये भरलें. वर्षअखेर निवळ नफा ११,५७० रुपये झाला. रिझर्व्ह फंडांत २३,२० रुपये जातील व ६% क्यु. रि. प्रे. भागांवर ६% डिव्हिडंड देण्यास १,६२६ रुपये लागतील. ऑर्डिनरी भागांस ४% करमाफ देण्याकडे ३,०२० रुपयांचा विनियोग करावा व ५,००० रुपये करासाठीं राखून ठेवावे, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें लोणावळा व बेलापूर रोड येथें शाखा उघडल्या. चेअरमन श्री. के. वि. केळकर व उभयतां मॅ. डायरेक्टर्स श्री. क्षीरसागर व साळवेकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेनें गेल्या दोन वर्षांत चांगली प्रगति केली आहे.

---

## हिंदुस्थान सरकारचें दुसरें व्हिक्टरी लोन

### १९ मार्चपासून विक्रीस प्रारंभ झाला

व्याजाचा दर: ३% १५-२-४५ पासून.

व्याज केव्हां मिळणार: १५ ऑगस्ट व १५ फेब्रुवारी.

कर: इनकमटॅक्स व सरचार्ज लागू.

परतफेड: १५ ऑगस्ट १९५९ पूर्वी नाहीं, परंतु १५ ऑगस्ट १९६१ पूर्वी निश्चित.

खरेदीची किंमत: १९-३-४५ ते २४-३-४५ = १००-२-८.
२६-३-४५ ते ३१-३-४५ = १००-३-४.
याप्रमाणें दर आठवड्यास ८ पै वाढ.

रोख्याचें स्वरूप: स्टॉक सर्टिफिकेट किंवा प्रॉमिसरी नोट (अर्जाप्रमाणें)


**आम्ही नाहीं, आपणच!** सह्याद्रीनें १९४४ सालीं केलेली प्रगति ही आपल्याच विश्वासाचें प्रतीक असल्यानें या प्रगतीच्या श्रेयाचे भागीदार आपणच आहांत; आम्ही नाहीं.

आलेलें काम—३१,१८,९३८
मंजूर काम —२८,२२,७६९
पूर्ण काम —२५,१४,९२३

आयुष्यावरील विमा याच कंपनींत उतरून आपल्या आर्थिक सुखांत भर घाला. भरपूर कमिशनवर एजन्सी दिली जाते.

सह्याद्रि विमा कंपनी, लि. नासिक.

गो. ग. सौंदणकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### डंबार्टन ओक्स–याल्टा–फ्रॅन्सिस्को

पुढच्या महिन्यांत अमेरिकेंत सॅनफ्रॅन्सिस्को येथें युद्धोत्तर चिरशांततेची जागतिक व्यवस्था लावण्याच्या हेतूनें आंतरराष्ट्रीय परिषद भरण्याचें ठरलें आहे, ती अपूर्व महत्त्वाची ठरणार आहे ह्यांत शंका नाहीं. ह्या व्यवस्थेचा आराखडा गेल्या आक्टोबर महिन्यांत डंबार्टन ओक्समध्यें इंग्लंड, अमेरिका, रशिया व चीन ह्यांच्या प्रतिनिधींनीं तयार केला आणि त्याची अधिक चर्चा होऊन पुढें त्यास जागतिक सनदेचें स्वरूप दिलें जावें असें ठरलें. त्यानंतर क्रायमिन समुद्रांत याल्टा येथें प्रेसिडेंट रूझव्हेल्ट, मि. चर्चिल व मार्शल स्टालिन ह्यांनीं युद्धपरिस्थितीविषयीं वाटाघाटी करून जर्मनीचा त्वरित पाडाव होण्यासाठी आवश्यक असलेल्या योजना आखल्या आणि युद्धोत्तर पुनर्घटनेसंबंधानेंहि कांहीं कार्यदिशा निश्चित केल्या. ह्यापुढची चर्चा व विधायक रचनाकार्य सॅनफ्रॅन्सिस्को येथें व्हावें आणि युद्धोत्तर शांतता मंदिराची उभारणी तेथें केली जावी असा संकेत ठरला. त्याप्रमाणें जगाचें राजकीय, आर्थिक व सामाजिक भवितव्य निश्चित करण्याच्या हेतूनें सॅनफ्रॅन्सिस्कोची परिषद भरावयाची आहे. गेल्या महायुद्धाचे अखेरीस राष्ट्रसंघ स्थापन करण्यांत आला आणि जगाच्या शांततेचें रक्षण करण्याचें काम त्याचयाकडे सोपवण्यांत आलें होतें, पण त्यांत ह्या संघटनेस यश आलें नाहीं आणि जर्मनी व जपान ह्यांनीं प्रस्तुत महायुद्धाची भयंकर आपत्ति आणलीच. असल्या आक्रमक राष्ट्रांच्या दुष्कृत्यांची पुनरावृत्ति होणार नाहीं अशी खबरदारी होऊं घातलेल्या नव्या जागतिक रचनेंत घेतली जाणार आहे. शांततेचें रक्षण, व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे बाबतींत आंतरराष्ट्रीय सहकार्य इत्यादि बाबतींत सर्व राष्ट्रांनीं आपापल्या परीनें हातभार लावावयाचा आहे. हें काम अर्थातच सोपें नाहीं, पण लहानमोठ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें व हितसंबंधांचें संरक्षण होईल अशी घटना व कार्यपद्धति निश्चित करण्याचें व विशेषतः ती अंमलांत आणण्याचें अगत्य मात्र सर्वमान्य आहे. हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी सॅनफ्रॅन्सिस्कोस जावयाचे आहेत. ते बिनसरकारी लोकप्रतिनिधी असावे अशी मागणी केली जात आहे तिचा उद्देश उघड आहे.

### विमा एजंटांचें कमिशन कमी करण्याचा सरकारचा विचार नाहीं

विमा कायद्याच्या ४० व्या कलमाची दुरुस्ती करून विमा एजंटांचें कमिशन मर्यादित करण्यासंबंधीं सध्या सूचना पुढें आलेल्या आहेत, त्यासंबंधांत विमा एजंटांनीं आपलें म्हणणें एका शिष्टमंडळाचे मार्फत सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स, श्री. वैद्यनाथन, ह्यांचेपुढें मांडलें. "सरकारनें सुचविलेल्या मूळ दुरुस्तींत एजंटाचें कमिशन मर्यादित करण्याची व्यवस्था नव्हती, पहिल्या वर्षाचें कमिशन कमी करण्याचा सरकारचा विचार नाहीं; निदान रिन्युअल कमिशनला तरी अजिबात हात लावला जाऊं नये असा सल्ला मी सरकारला देईन" असें उत्तर सुपरिंटेंडेंटनें शिष्टमंडळास दिलें. एजंट नेमणाऱ्या चीफ एजंटांच्या कमिशनवर कायदा मर्यादा घालण्यास धजत नाहीं; गरीब एजंटांचें कमिशन मात्र कापण्याचा विचार चालू आहे, ह्या गोष्टीवर सर्वत्र टीका झालेलीच आहे. पहिल्या वर्षाच्या हप्त्यावर २५% ते ३२% व रिन्युअल हप्त्यावर २३% हे सुचविलेले कमाल कमिशनचे दर अन्यवहार्य आहेत, अशीच त्यांवरील सर्वांची तक्रार आहे.

### युद्ध लांबलें, तरी इंग्रजांचें आरोग्य सुधारलें

प्रखर युद्धाच्या पांच वर्षांनंतर, इंग्लंडमधील लोकांच्या आरोग्याची पहाणी केली तर आश्चर्य वाटण्याजोगी सुस्थिति आढळते. बालमृत्यूंचें प्रमाण हें देशाच्या आरोग्याचें नेहमीं निदर्शक समजलें जातें, ह्या दृष्टीनें पाहतां १९४३ सालीं इंग्लंडमध्यें जेवढे बालमृत्यु घडले तेवढे कमी ह्यापूर्वी कोणत्याहि वर्षी घडले नव्हते. बाळंतपणामुळें मरण पावणाऱ्या स्त्रियांची संख्याहि उतरली आहे. १९४४ सालींहि ही सुधारणा कायम आहे. लष्करांत दाखल झालेल्या तरुणांचें आरोग्य तर खचितच सुधारलेलें आढळेल. मोठ्या प्रमाणावरील बॉम्बहल्ल्यांमुळें टायफॉइड वगैरेंच्या साथी पसरतील ही अपेक्षा चांगल्या दक्षतेमुळें निराधार ठरली आहे. क्षयरोग व गुप्त रोग ह्यांचा फैलाव मात्र वाढला आहे. अर्भकांस सकस दूध, मुसंब्याचा रस, कॉडलिव्हर तेल, इत्यादि पुरवून क्षयरोगाचा प्रतिकार सरकार करीत आहे. मांसल अन्न कमी पडल्यामुळें भाजीपाला खाण्यांत अधिक येतो, वहातुकीच्या अडचणीमुळें लोकांस जास्त चालावें लागतें इत्यादि युद्धजन्य अडचणींचा परिणाम आरोग्य सुधारण्यांत झाला आहे! रेशनिंग, बॉम्बहल्ले, मानासिक ताण, इत्यादींस तोंड देऊन इंग्रज आज पूर्वीपेक्षाहि ताकदवान व निरोगी आहेत, ही गोष्ट ब्रिटिश सरकारास निःसंशय अभिमानास्पद आहे.

### मुंबईत रहाण्याच्या जागेची टंचाई

मुंबई शहराची वस्ती १९४१ च्या शिरगणतीच्या वेळीं १५ लाख होती ती गेल्या चार वर्षांत २२ लाखांच्या घरांत येऊन ठेपली आहे. वस्ती दीड पट वाढली तरी रहाण्याची सोय त्या प्रमाणांत वाढली नाहीं. शहरांतील घरांची संख्या ३५,८०० असून स्वतंत्र खोल्यांची संख्या ४०,००० भरेल. एका घरांत ६३ माणसें आणि एका खोलींत १० माणसें रहात असलीं पाहिजेत असें प्रमाण बसतें. दुकानें, सिनेमा–नाटकगृहें, कारखाने वगैरेंनीं अडविलेली जागा व सरकारनें घेतलेलीं ६०० घरें वर दिलेल्या घरांच्या संख्येतून कमी केलीं आणि मलबार हिल, खंबाला हिल येथील बंगले किती रिकामे असतात ह्याचा विचार केला असतां, दर घरांतील आणि खोलींतील गर्दी वरील प्रमाणापेक्षां अधिक भरेल. जानेवारी महिन्यांतील जन्मसंख्या मृत्युसंख्येपेक्षां १,६१४ नें अधिक होती. ही वाढ लक्षांत घेतली असतां गर्दीचें प्रमाण किती वाढत जाईल त्याचा अंदाज करवत नाहीं. बांधकामाचें सामान दुर्मिळ असल्यामुळें मोठ्या प्रमाणांत नवीं घरें बांधणें अशक्य दिसतें. मुंबई शहराचे इंजिनिअर श्री. मोडक यांनीं एक योजना मांडली आहे. वाढत्या गर्दीची सोय लावण्याकरितां घरें कांहीं काळ सरकारकडे ध्यावयाच्या बोलीनेंच नवीं घरें बांधण्यास सरकारनें परवानगी, द्यावी असें त्यांनीं सुचविलें आहे.

## भाषणें व चर्चा ह्यांचें कृतींत रूपांतर केव्हां होईल ?

( ले.:—एक आशावादी )

गेल्या ८-१५ दिवसांत सभा नि भाषणांच्या फैरी झडत आहेत. वाग्युद्धेंच तीं ! मध्यवर्ती विधिमंडळाच्या बैठकी, अखिल भारतीय कारखानदार संघ नि फेडरेशन ऑफ इंडिअन् मर्चंट्स चेंबर्स यांचीं वार्षिक अधिवेशनें दिल्लींत झालीं. लंडनमध्यें कॉमनवेल्थ परिषद् भरली—या निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या मंडळींचीं झालेलीं भाषणें वाचलीं, ठराव पाहिले, तर हिंदी आशा-आकांक्षा, अपेक्षा-निराशा, भूत नि भविष्य यांचीं मनोमय चित्रें डोळ्यांसमोर उभीं रहातात.

आपल्या शेतीप्रधान देशांत खायला अन्न नाहीं म्हणून माणसं मरतांना दिसतात; सकस अन्न नाहीं म्हणून जीवन्मृतावस्थेंतील माणसं आढळतात; शेकडों गिरण्या रात्रं-दिवस कापड काढीत असूनसुद्धां वस्त्रप्रावरणाचा दुष्काळ पडत असल्याचं वाचतों-ऐकतों. रहायला पुरेशी जागा नाहीं, खायला पुरेसं व सकस नि स्वस्त अन्न मिळत नाहीं, नेसायला भरपूर वस्त्र मिळत नाहीं. आधुनिक सुधारलेल्या काळांतील ही घटना असह्य, अपमानास्पद नि लाजिरवाणी आहे ! सरकारी व्यवस्था अपुरी आहे; आपल्या समाजव्यवस्थेंत कांहींतरी कोठेंतरी चुकत आहे ! !

सर झाफरुल्लाखान आणि मंडळींनीं ब्रिटिश साम्राज्यांतील हिंदुस्थानाच्या स्थानाची जाणीव सर्वांना करून दिली. हिंदी आकांक्षा स्पष्ट केल्या. वर्णद्वेषानं भारावलेल्या आफ्रिकन सरकारला हिंदी मनाची समज दिली.

हिंदुस्थानचा पूर्ण सहकार पाहिजे असेल तर हिंदी पुढाऱ्यांची सुटका नि राष्ट्रीय सरकारची स्थापना केली पाहिजे ही गोष्ट ब्रिटिश मुत्सद्यांना फेडरेशनचे अध्यक्ष श्री. सेटलवाड यांनीं असंदिग्ध शब्दांत सांगितली. हिंदी व्यापारी मंडळींना राजकारण वावडं नाहीं याचंहि या निमित्तानं स्पष्टीकरण झालं.

सरकारी नियंत्रणाच्या योजना वास्तविक पहातां देशांतील उत्पादन जास्तींत जास्त व्हावं या दृष्टीनं आखल्या गेल्या पाहिजेत. परंतु आपल्याला जें प्रत्यक्ष अनुभवास येतं तें असं कीं सरकारी नियंत्रण कायद्यांच्या जंजाळानं उत्पादनांत प्रत्यहीं अडचणी येत आहेत. धंदा करणं जिकीरीचं होत आहे. माल गिऱ्हाईकाच्या हातीं पडणं मुष्किलीचं झालं आहे.

औद्योगीकरणाचा महामंत्र सतत सांगणारे ज्ञानवृद्ध नि वयोवृद्ध सर एम. विश्वेश्वरअय्या यांच्या कारखानदार संघापुढें झालेल्या अध्यक्षीय भाषणांत देशांत मौलिक धंदे सुरू झाले पाहिजेत; औद्योगीकरणाखेरीज शेतीचा धंदा ऊर्जितावस्थेस येणार नाहीं या मूलभूत सिद्धान्ताचा पुनरुच्चार करण्यांत आला.

हिंदुस्थान सरकारचे फडणवीस सर जेरेमी राइस्मन यांनीं मध्यवर्ती विधिमंडळांत इनकमटॅक्स व उद्योगधंदे याबाबत खुलासा केला. उत्पादनाकरितां लागणारी जुनी यंत्रसामुग्री काढून टाकून आज भारी किंमतींत नवीन घेतली, तींत नवीन यंत्रांची भर घातली तर त्यांवरील घसाऱ्याची व्यवस्था, तसेंच धंद्यांतील शास्त्रीय संशोधनाकरितां कारखान्यांनीं केलेले खर्च याबाबत सूट वगैरे बाबत अंदाजपत्रकांत व्यवस्था करण्यांत आल्याचें सांगितलें. एक्सेस प्रॉफिट टॅक्स कायम आहे. तथापि धंद्याबाबतचा सरकारचा दृष्टिकोन विचारार्ह वाटतो.

शब्द, तर खरेच, त्यांना कृतीनं मोल चढतं—हीच आपली आशा !


"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

**ढेकणांच्या उदबत्त्या**

(ABC)

**BUG COILS ( ABC )**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १-८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २



**दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०**

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखा:—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती
(३) लोणावळा (४) बेलापूर.
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर,
नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर

बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण

**महाराष्ट्र भुवन**

लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय

बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें ५ )

मागील पंधरवडाभर शेअर बाजार तहाच्या उठणाऱ्या गप्पांवर खालती वरती उलट सुलट असा एकसारखा हालत होता. टाईग १८५६ वरून एकदम १८०० ते पुन्हा १८८५, कोहिनूर ६२५ वरून ५९८ ते पुन्हा ६२१, डिफर्ड २१२७ वरून २०७० व ऑर्डिनरी ३८२ ते ३९३ व फिरून ३८४, स्वदेशी ५६५ वरून ५२० ते ५४० या हालचाली पाहिल्या म्हणजे रोज घे वीक करणाऱ्या सटोडियांनी मार खाल्ला असलाच पाहिजे यांत शंका नाहीं.

वास्तविक युरोपांतील युद्ध संपत आलें आहे याबद्दल बाजाराची मनाची तयारी केव्हांच होऊन चुकली आहे, व त्या हिशोबानें बाजार आज आहेत ते खालींच आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. म्हणजे उद्या एकदम खरोखरीच तह झाला तर बाजार आणखी खालीं किती पडेल याची शंकाच वाटते. आजचा टाटा ऑर्डिनरीचा ३८४ भाव हा फार वरचा वाटतो कीं काय याचा मंदीवाल्यांनीं विचार करण्यासारखा आहे. देशांतला कापडाचा चालू तीव्र दुष्काळ पाहतां आणि या पुढील ३ वर्षें तरी गिरण्यांचीं व्याजें फारच थोड्या फरकानें कायम राहण्याची शक्यता असतांना कोहिनूर ६१५ ला, ( १६ रु. व्याजासह ), टाईग १८५० ( ५० रु. व्याजासह ) मंदी करण्यासारखा आहे कीं काय असा प्रश्न विचारावासा वाटतो. अर्थात ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं जेव्हां बाजारांतील बाजारबुणगे भावनेच्या आहारीं गेलेले असतात त्यावेळेस प्रज्ञांच्या मतांना कोणी विचारीत नाहीं. मात्र या परधुरीण खेळवाल्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं बाजारांतील शक्तिमान सटोडिये अशाच वेळेस जनतेला वाटतें त्याच्या बरोबर उलट करून ठेवतात. म्हणजे आज जो सगळीकडून मंदीचा सूर निघतो आहे तो जर जर्मनीच्या एखाद्या फॉन बॉकर्नें बालाटान सरोवर अथवा एखाद्या कोपऱ्यांत चढाई केल्याची बातमी आली तर झटक्यास बदलून ' लाव ' ' लाव ' चा गोंगाट सुरूं व्हावयाचा. तेव्हां सावधान.

## पूना मर्चंट्स को. बँकेची पानसुपारी

पूना मर्चंट्स को. बँक लि. नें गुरुवार, ता. १५ मार्च रोजीं आपल्या कचेरींत सायंकाळीं गतवर्षीप्रमाणेंच श्रीलक्ष्मी-सरस्वती पूजनानिमित्त पानसुपारी समारंभ घडवून आणला. त्यावेळीं डायरेक्टरांतर्फे चेअरमन दा. वा. पोतदार ह्यांनीं सर्वांचें स्वागत केलें. सभासदांस बँकेचा अधिकाधिक उपयोग कसा होईल ह्या दृष्टीनें आस्थापूर्वक व मित्रत्वानें विचारविनिमय होण्यास ही चांगली संधि मिळाली.

## " व्यापाऱ्यांनीं फारसा नफा घेऊं नये "

संगमनेर मर्चंटस असोसिएशनचे सभासदांनीं श्री. अमृतलाल ठक्कर ( ठक्कर बापा ) यांचें असोसिएशनतर्फे ता. २२-१--४५ रोजीं स्वागत केलें. पाहुण्यांनीं सभासदांना उपदेश खालीलप्रमाणें केला:—" व्यापाऱ्यांनीं व्यापारांत फारसा नफा घेऊं नये. अवश्य तेवढा नफा घेणें हा सेवाधर्म आहे. असें वागल्यास व्यापार नीट चालेल. आपण कस्तुरबा फंडास चांगली मदत केली याबद्दल मी फार आपला आभारी आहे. "


# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( शेड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस : पुणें शहर

विक्रीस काढलेलें नवीन दहा लाखांचें भांडवल सर्व विकलें गेलें आहे.

— भांडवल —

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ७,५७,३८० |

खेळतें भांडवल रु. १,००,००,००० चे वर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर, रत्नागिरी, फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



सांडू टोमॅटो कम्पाउन्ड

(ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त)

स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणे, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड. मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स. चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट : मे. श्रीदत्त एजन्सी १०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते : मे. भागवत आणि कं. कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट : मे. जोशी आणि मंडळी भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते : मे. देशमुख आणि कं. नवी पेठ.

## स्वतःच्या मुठींत व्यापार ठेवणारे बंदिस्त संघ

हिऱ्यांचा व्यवहार करणाऱ्या नऊ कंपन्यांवर, व्यापार स्वतःच्या मुठींत ठेवून स्पर्धा नाहींशी करणें व कृत्रिम रीतीनें किंमती वाढवणें ह्या कारवायांबद्दल अमेरिकन सरकार खटले भरणार असें प्रसिद्ध झालें आहे. विशिष्ट मालाचे उत्पादक आणि व्यापारी संगनमत करून सबंद धंदे स्वतःच्या नियंत्रणाखाली पूर्णत्वानें आणतात आणि बाजारपेठा व किंमती आपल्या कह्यांत ठेवतात. ह्या योगानें खरेदी-विक्री चढाओढीच्या व मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वानुसार न होता कटवाल्या धंदेवाल्यांच्या हातीं जाते आणि सामान्य जनतेस भलत्या किंमती देऊन माल विकत घेणें प्राप्त होतें. असल्या कारवाया अशा थरास गेल्या कीं त्या बंद पाडण्यासाठीं अमेरिकन सरकारास खास कायदे करावे लागले. वास्तविक पहातां, धंदे मोठ्या प्रमाणावर चालले तर व्यवस्थेचा खर्च मर्यादित होऊन गिऱ्हाइकांस माल स्वस्त मिळावा, पण कारखानदार आणि व्यापारी ह्यांस एकत्रीकरणाचा अनिष्ट फायदा स्वार्थासाठीं करून घेण्याचा मोह होतो आणि ते एकमेकांस सहाय देऊन किंमती चढवतात व जनतेस लुबाडतात. भांडवलशाहींतील वैयक्तिक स्वार्थ व स्पर्धा ह्यांच्या विडंबनाचें हें ढळढळित उदाहरण आहे. असल्या लुटारू व्यापारी संघांस "ट्रस्ट्स" व "कार्टेल्स" म्हणतात. त्यांची घटना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयहि असते, आणि कित्येक वेळां त्यांस औद्योगिक संरक्षणाचें सरकारी सहाय मिळतें. जर्मनींत असे "कार्टेल्स" अनेक होते व आहेत आणि पोलादाच्या धंद्यांत आंतरराष्ट्रीय संघहि कांहीं वर्षांमागें स्थापन झाला होता. प्रस्तुत उदाहरणांत जगांतील हिऱ्यांचें एकूण उत्पादन व व्यापार ह्यांचेपैकीं ९५ टक्के धंदा नऊ कंपन्यांनीं स्वतःच्या कह्यांत आणला आहे. युद्धसामुग्री बनवण्यांत व एरव्हींहि हिऱ्यांचा उपयोग उद्योगधंद्यांत होत असतो आणि ह्या मालाच्या व्यापारांतील स्पर्धा नष्ट करून त्याची मक्तेदारी बनवण्याचा कट केल्याबद्दल व अशा रीतीनें ह्या विषयींच्या कायद्याचा भंग केल्याच्या आरोपासाठीं सदरहु कंपन्या व त्यांच्या मालाचा साठा करणारे व्यापारी ह्यांचेवर अमेरिकेंत खटला भरण्यांत आला आहे. आफ्रिकेंतील खाणींतले हिरे एकमुखी व्यवस्थेखालीं विकण्याची व्यवस्था केल्याचा त्यांचेवर आरोप आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय देवघेवीनें गिऱ्हाइकांस माल योग्य भावानें मिळण्याऐवजी "कार्टेल्स"च्या योगानें तो महाग पडतो हें व्यापाराचें स्वार्थमूलक विकृत स्वरूप होय. म्हणून असल्या संघांचे विरुद्ध मोहीम करून त्यांचें निर्मूलन करणें अगत्याचें आहे असें मत व्यक्त केलें जात आहे तें योग्यच आहे. मागील महायुद्धानंतर जर्मनीनें "कार्टेल्स"च्या जोरावर स्वतःचें औद्योगिक बळ वाढवलें आणि त्याचें फळ आज जगास मिळत आहे. युद्धोत्तर काळांत ह्या अनुभवाची पुनरावृत्ति होतां कामा नये अशा आशयाचा हा अभिप्राय आहे.

### सिगारेटचा दुष्काळ

युद्धाच्या काळांत अनेक प्रकारचे दुष्काळ उद्भवतात. मुंबई शहरांत सिगारेटचा दुष्काळ पडला आहे आणि नाक्यानाक्यावरील दुकानांपुढें धूम्रपान करूं इच्छिणारांची गर्दी दिसते. एका सरकारी पत्रकान्वयें सिगारेटचे भाव सुद्धा १ मार्चपासून वाढविण्यांत आले आहेत.

## बँकिंग बिलावर श्री. ग. रा. साठे ह्यांचे विचार

"बंधनें बसवा, परंतु सवलतीहि द्या"

(प्रेसिडेन्सी इं. बँकेचे अध्यक्ष, श्री. ग. रा. साठे, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेंत भाषण केलें, त्यांतील उतारा.)

"बँकिंग कायदा दुरुस्त होऊं घातला आहे. भागीदारांचा व ठेवीदारांचा पैसा सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीनें बँकिंग कंपन्यांनीं आपणहून आपणांवर कांहीं विशिष्ट बंधनें घालून घ्यावयास पाहिजेत. तसें होत नाहीं असें दिसल्यास देशहिताच्या दृष्टीनें बँकिंग कंपन्यांवर कांहीं सक्तीनें बंधनें सरकारनें घालावीं यासही कोणाचा विरोध येणार नाहीं. पण अशीं नियंत्रणें घालतांना "मूले कुठारः" असें धोरण ठेवलें जाऊं नये असें म्हणण्याचा प्रत्येकास हक्क आहे. अशा घातक नियंत्रणांस सर्व बँकांनींच नव्हे तर जनतेनेंही विरोध केला आहे.

"रिझर्व्ह बँकेनें सुचविलेलीं बंधनें अमलांत येत असतांनाच बँकांस त्यांचे व्यवहार सुकर होण्याचे दृष्टीनें कांहीं सवलती मिळणेंही जरूर आहे. उदाहरणार्थ, प्रचलित पद्धतीप्रमाणें नाठाळ कुळांकडील थकबाकी वसूल करण्याकरतां कोर्टीत जाण्याची वेळ आली तर कोर्ट खाजगी सावकार व बँक यांत कांहीं फरक करीत नाहीं. बँकांकडून दिल्या जाणाऱ्या कर्जाबाबत पोकळ रकमांचे दस्तऐवज केले जाणें, भरमसाट व्याजआकारणी, वगैरे प्रकार अगर कुळाची लुबाडणूक होण्याचा यत्किंचितही संभव नसतो, असें असतां बाकी वसुलीबाबत अगदीं नाममात्र हप्तेबंदी देणें वगैरे व असेच दिरंगाईचे प्रकार बंद व्हावयास पाहिजेत. रिझर्व्ह बँकेनें याबाबत बँकांच्या अडचणी समजावून घेऊन वसुलीबाबत व्यवहारांत अधिक सुकरता आणतां येईल असे नियम सरकारास सुचविणें जरूर आहे. बँकांना अशा प्रकारची मदत जितक्या प्रमाणांत मिळेल तितक्या प्रमाणांत जनतेची आर्थिक गरज अधिक भागवणें सोपें होईल व त्यायोगें खाजगी सावकारींतील काळा बाजार होण्यास आळा बसेल हें उघड आहे."

### शेअरविक्री बंद ठेवणारें हायकोर्टाचें इंजंक्शन

बॉंबे लाइफ अॅशुअरन्स कं. लि. च्या नव्या शेअरविक्रीस बंदी करावी, असा अर्ज हायकोर्टांत नानालाल झवेर प्रभृति भागीदारांनीं केला होता, त्याचा विचार करून न्या. भगवति ह्यांनीं खालीलप्रमाणें निवाडा केला:—

"ही शेअरविक्री कंपनी कायद्याच्या १०५ (क) कलमास धरून आहे. ती बेकायदा नाहीं. तथापि अलॉट न केलेले २७२ नवे शेअर, त्याचप्रमाणें ज्यांकरितां अर्ज अजून आलेले नाहींत असे ३२९ नवे शेअर डायरेक्टरांनीं अलॉट करूं नयेत. ३१ भाग धारण करणाऱ्या भागीदारांनीं स्वतःस भाग मिळण्याचा असलेला अधिकार बिगर भागीदारांस वर्ग केला होता; हे ३१ भागहि अलॉट करण्यांत येऊं नयेत."

### धोतरें व साड्या ह्यांवर मुंबईंत नियंत्रण

मुंबई शहरांत व मुंबई उपनगर जिल्ह्यांत, गिरण्यांत तयार झालेली धोतरें व साड्या ह्यांच्या वाटपावर नियंत्रण घालण्याचें मुंबई सरकारनें योजिलें आहे. प्रत्येक कुटुंबाच्या प्रमुखास दर सहामाहीस धान्य रेशनकार्ड दाखविल्यावर एक धोतरजोडी व दोन साड्या मिळतील. सुमारें ३०० सरकारमान्य दुकानांत त्यांची विक्री होईल. २१ मार्चपासून ही योजना अमलांत यावयाची आहे. रेशनिंगचा हा प्रयोग यशस्वी झाल्यास त्याचें इतरत्र अनुकरण करण्यांत येईल.

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसी
सा. न. वि. वि.

राष्ट्रीय चळवळीच्या द्रष्ट्यांनीं आपल्या देशांतील दारिद्य नि बेकारी यांवर स्वराज्य नि स्वदेशी यांचा तोडगा सुचविला. या महामंत्राचा पुनरुच्चार सध्या राष्ट्रीय सरकार नि देशी उद्योग-धंद्यांची वाढ या शब्दांत करण्यांत येत आहे. टाटा-बिर्ला या भांडवलदारांची 'मुंबई योजना,' भाई रॉय यांची समाजसत्तावादी 'जनता योजना' नि सत्य-अहिंसा द्दृष्टीवर आधारलेली गांधीजीप्रणीत श्रीमान आग्रवाल यांनीं मांडलेली योजना यांचा अभ्यास केला असतां ही गोष्ट स्पष्ट होते कीं या मूलभूत सिद्धांताबाबत सर्वांचें मतैक्य आहे. तपशिलाबाबत मतभेद असतील! युद्धोत्तर काळांत सर्व पुढारलेल्या राष्ट्रांत या नाहीं त्या स्वरूपांत आर्थिक नियोजन येणार असल्याचें निश्चित आहे. हिंदुस्थान त्याला अपवाद असणार नाहीं अशी आशा आहे.

शांततेच्या काळांत बेकार लोकांना रोजगार पुरविणें हा आपला मुख्य प्रश्न आहे. शेती हा आपला मुख्य धंदा. त्यांत गर्दी आहेच. शिवाय ह्या धंद्यांत वर्षांतील सहा-एक महिनेतरी काम असूं शकत नाहीं. म्हणून खेडेगांवांतील लोकांस बाराहि महिने पुरेल असा रोजगार पुरविणें हें कार्य निकडीचें आहे. त्याकरितां लहान व मध्यम आकाराचे उद्योगधंदे खेडेगांवांत सुरू करणें आवश्यक आहे. तसेंच प्रत्यक्ष मेहनत करणाराच्या हातांत त्याच्या श्रमाचें जास्तींत-जास्त माप पडेल अशी अर्थ व्यवस्था असल्याशिवाय आपला हेतु साध्य होणार नाहीं. प्रत्येक खेड्यानें-शक्य नसल्यास, खेड्यांच्या गटांनीं-स्वयंपूर्ण व्हावें हें गांधीजींचें म्हणणें मला पटतें. त्याबाबत त्यांनीं केलेली तात्त्विक चिकित्सा योग्य वाटते. तथापि त्यांच्या कार्यक्रमाकडे केवळ ध्येय द्दृष्टीनें पाहून चालणार नाहीं. त्याकरितां परिस्थितिनुसार आवश्यक असे फेरफार करावे लागतील. 'सुतानें स्वर्गास जाणें' या उक्तींतील शब्दांचा फुलोरा सोडला तरी त्यांत गूढार्थ आहे अशी माझी श्रद्धा आहे.

ज्या आपल्या शेतीप्रधान देशांत भूकबळींची संख्या लाखांनीं भरावी अशी अत्यंत हृदयविदारक घटना होते त्या देशांत या युद्धकाळांत आधुनिक जीवनास आवश्यक असलेल्या नित्योपयोगी वस्तूंचें दुर्भिक्ष्य असावें यांत आश्चर्य आहे का? या युद्धानें आपलीं वर्मस्थानें अचानक उघडकीस आलीं. या परिस्थितीचा कार्यकारणभाव आपण लाविला पाहिजे; या अनुभवांनीं आपण शिकलें पाहिजे; विधायक कार्याकरितां जनमत निर्माण केलें पाहिजे.

या महायुद्धाचे काळांत आपल्या येथें किती तरी नवीन उद्योग-धंदे नव्यानेंच सुरू झाले आहेत. आधींपासूनच चालू असलेल्या कारखान्यांना बरकत आली आहे. खाजगी प्रयत्नानें चाललेले बहुतेक कारखाने नित्योपयोगी वस्तू बनविण्यांत गुंतलेले आहेत. त्यांचें बहुतेक उत्पादन सरकार युद्धकार्याकरितां घेत आहे. मौलिक धंदे फारसे नाहींत. जे आहेत ते बहुतेक सर्व सरकारच्या ताब्यांत आणि / किंवा सरकारी मालकीचे आहेत.

जपानशीं जोराचें युद्ध आतां कुठें सुरू झालें आहे. घनचक्कर अजून व्हावयाची आहे. तथापि आजच हिंदी औद्योगिक उत्पादन शक्तीवर विलक्षण ताण पडलेला असून जनतेला नित्योपयोगात लागणाऱ्या वस्तू मिळण्याची मुष्किल झाली आहे. ह्या वस्तू परदेशांतून आणून ही परिस्थिति सुधारण्याच्या खटपटींत सध्या सरकार आहे. हिंदी उत्पादन युद्धकार्याकरितां व परदेशी माल जनतेकरितां अशी वाटणी करण्याचा विचार दिसत आहे. या धोरणानें हिंदी बाजारपेठेंत परदेशी माल भरलेला दिसेल अन् देशी माल बाजारांत आणण्याकरितां युद्धोत्तर पुनः प्रयत्नांची कोशीस करावी लागेल अशी भीति हिंदी कारखानदारांना वाटत असल्यास ती अस्थानीं आहे असा खुलासा सरकारनें आगत्यपूर्वक केला आहे.

पाश्चिमात्य देशांत युद्धोत्तर काळांतील निरनिराळ्या गरजांचा अभ्यास करण्यांत आला असून त्या द्दृष्टीनें आज युद्धोपयोगी साधन-सामुग्री तयार करणाऱ्या कारखान्यांत शांतता-काळांतील लागणाऱ्या वस्तू तयार करण्याच्या योजना पुऱ्या झाल्या आहेत. जर्मनीचा पराभव झाल्याबरोबर इंग्लंड-अमेरिकेंतील कारखान्यांत तयार झालेला माल फार मोठ्या प्रमाणांत देशी व परदेशी—हिंदुस्थान त्यांत आलाच—पाठविण्यांत येईल असें मत सर रहिमतुल्ला चिनॉय यांनीं प्रदर्शित केलें आहे. स्थानिक बाजाराकरितां नि परदेशीं निर्गत करण्याकरितांसुद्धां इंग्लंड-अमेरिकेंतील कारखानदार माल बनवूं लागतील अन् आम्ही इकडे हिंदुस्थानांत जपानी चढाईकरितां तयारी करण्यांत व सरकारी नियंत्रणें वगैरेंत अडकून पडूं. युद्धपरिस्थितीमुळें आधींच तुंबलेली जनतेची मागणी हिंदी कारखानदारांना सरकारी नियंत्रणामुळें निरनिराळ्या वस्तूंची पुरी करणें शक्य होणार नाहीं अन् परदेशी कारखानदार हिंदुस्थानांत माल पाठवून ती मागणी पुरी करतील अशी भीतिहि त्यांनीं व्यक्त केली आहे.

परदेशांतील व हिंदुस्थानांतील सरकारी नियंत्रणांची तुलना करून ते पुढें म्हणतात कीं, येथील सरकारी नियंत्रणें अशीं आहेत अन् त्यांची अंमलबजावणी अशी करण्यांत येते कीं, त्यामुळें युद्धजन्य परिस्थितीमुळें वाढलेलें उत्पादन कायम टिकविण्याकरितां कारखानदारांना पुरेसा अवसरच राहत नाहीं!

कारणें अनेक असतील; पण उत्पादनांत खंड पडून पुरेपूर उत्पादन न होऊन युद्धकाळांतील वाढती मागणी पुरविणें आमच्या कोळसा, सीमेंट, कांच, कापड, कागद, साखर गिरण्यांना कठीण जात आहे—कांहींचें उत्पादन प्रत्यक्ष कमी होत आहे ही गोष्ट निरनिराळ्या औद्योगिक कंपन्यांच्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषणांतून स्पष्ट होत आहे.

आम्ही परिस्थिति बदलूं शकतो कां? युद्धकाळांतील महर्गता नि टंचाई या द्दृष्टींनीं आर्त झालेल्या हिंदी जनतेसमोर विदेशी, सुबक नि स्वस्त माल टाकल्यास तो न घेण्याचा संयम आपण दाखवूं का? स्वदेशीच्या व्रताचा मला अभिमान असला नि त्याच्याआड लपलेलें अर्थशास्त्र समजत असलें तरी बहुजनसमाज आपल्या गरजा-चैनी म्हणा वाटल्यास-भागविण्याकरितां माल डोळ्यासमोर आला असतां तो हातीं न धरतां टाकून देईल का? मग तो देशी असो वा विदेशी असो! देशी धंद्यांना उत्तेजन द्या, देशी माल वापरा हा आमचा जयघोष! देशी धंदा-कारखान्यांवर पैसा नि मानमरातब मिळविणारे किती देशी उद्योगपती स्वतः स्वदेशी माल वापरण्याबद्दल दक्ष असतात? इंग्रज लोक देशाभिमानी, पण त्यांच्या देशांतहि युद्ध सुरू होण्यापूर्वी कमाल

स्वस्ताईचा जपानी माल हातोहात खपत होता ही गोष्ट मी नजरेआड करूं शकत नाहीं. देशप्रेमाची महती मला पटते. तथापि मनुष्यस्वभावाचें मूळ स्वरूप मी विसरूं शकत नाहीं !

युद्धोत्तर यथाकाळीं देशी धंदे-कारखाने आपल्या सर्वसामान्य जनतेच्या सेवेला हजर होतील. त्यावेळीं हिंदुस्थानांत परदेशी मालाचा प्रचंड ओघ सुरू झालेला असेल. त्याला तोंड देण्याची तयारी नि कुवत आमची आहे का ? युद्धकाळांत मिळालेला बहुमोल अनुभव नि अमाप पैसा यांच्या समन्वयानें आम्हींहि गुणांनीं सरस नि किंमतीनें स्वस्त असा माल गिऱ्हाइकापुढें ठेवूं शकूं का ? उत्पादनाइतक्याच महत्त्वाच्या विक्रीच्या व्यवस्थेचा विचार आम्ही करीत आहोंत का ?

गेल्या तपा-दोन-तपांची आपली औद्योगिक तपस्या मी पहातों. औद्योगिक महर्षी पहातो. देशप्रेमानें स्वदेशीचें कंकण बांधून ध्येयनिष्ठ जीवन व्यतीत करणारी आदरणीय मंडळी पहातों. सारा जन्म कष्ट करून पैसा पैसा जोडून जमा केलेल्या रकमेची पिशवी डोळ्यांना पाणी आणून नि आशीर्वाद युक्त अंतःकरणानें तरुणांच्या हातीं देणारी वृद्ध मंडळी पहातों. औद्योगिक जीवनांत हिरीरीनें पडणारे उत्साही तरुण पहातों–अन् विश्वास वाटतो कीं आपलें भवितव्य उज्ज्वल आहे !

—संजय

## डायरेक्टरांसाठी प्रॉक्झी गोळा करणारा कंपनीचा नोकर

### कंपनीचें अपील फेटाळण्यांत आलें

श्री. चंद्रशेखर द्विवेदी हे एशिअन ॲशुअरन्स कं. लि. चे मुंबईमधील ॲक्टिंग एजन्सी मॅनेजरचें काम करीत होते, त्यांस जुलै १९४१ मध्यें कंपनीनें कामावरून काढलें. ही गोष्ट कंपनीनें अयोग्य केली, असा श्री. द्विवेदी यांचा मुंबई हायकोर्टांत दावा होता. १९४१ च्या वार्षिक साधारण सभेसाठी डायरेक्टरांकरितां प्रॉक्झी गोळा करण्याकरितां वास्तविक परगांवीं जात असतांहि कंपनीच्या कामासाठीं आपण जात आहों, असा श्री. द्विवेदी ह्यांचा बहाणा होता, हें श्री. द्विवेदी ह्यांच्या बडतर्फीचें कारण होतें व तें सयुक्तिक आहे, असा कंपनीतर्फे युक्तिवाद करण्यांत आला. न्यायमूर्ति कोयाजी ह्यांनीं श्री. द्विवेदी ह्यांच्या बाजूनें निवाडा केला व त्यांस तीन महिन्यांचा पगार, प्रॉव्हिडंड फंडास कंपनीची कॉंट्रिब्यूशन आणि कोर्टखर्च हीं देवविलीं. न्यायमूर्ति आपल्या निवाड्यांत म्हणाले–" प्रतिवादी कंपनीच्या नोकरांची स्थिति बिकट होती. डायरेक्टरांकरितां प्रॉक्झी गोळा करा नाहींतर त्रास सोसावा लागेल, अशी त्यांस ताकीद होती, असें कंपनीचे डायरेक्टर व मॅनेजर मि. हेरोडिया ह्यांनीं सांगितलें. अशी वस्तुस्थिति असतांना, नोकराच्या कृत्यास गैरवर्तन म्हणणें कंपनीस शोभत नाहीं. "

वरील निवाड्यावर एशिअन कंपनीनें अपील करून, " २ जुलै रोजीं कामावर हजर रहाण्याचा हुकूम केला असतांहि श्री. द्विवेदी हे गैरहजर राहिले व बोर्डावरील आजी डायरेक्टरांना निवडणुकींत पाडण्यासाठीं प्रॉक्झी गोळा करून त्यांनीं आपल्या स्थानाचा दुरुपयोग केला " असा युक्तिवाद मांडला. " २ जुलै रोजीं कामावर हजर न रहाणें समर्थनीय होतें. दुसऱ्या मुद्याच्या तपशीलांत शिरतां येत नाहीं, कारण प्रॉक्झीबद्दलचें संगनमत सिद्ध झालेलें नाहीं " असें म्हणून हायकोर्टानें कंपनीचें अपील फेटाळलें.


प्रगतिपथावरील नवा

मैलाचा — दगड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

१९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर

१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए. — अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

—कोको प्या—

कोको हें उत्कृष्ट पेयाच आहे. सध्यांच्या अवर्टंचाईच्या दिवसांत तर अशा पेयाची अधिक जरूरी आहे.

" सॅंचवर्क "

कोकोची मागणी करा. म्हणजे स्वस्त, उत्कृष्ट व शुद्ध कोको मिळेल.

—साठे चॉकोलेट वर्क्स, पुणें २.

# मुंबई शेअर बाजार

बाजार सुट्टीः— ३०-३-४५ गुड फ्राय डे

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

बाजार सुट्टीः— २१-३-४५ जमशेदी नवरोज

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संचित ‡ अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. ६।३।४५ | बुधवार ७।३।४५ | गुरुवार ८।३।४५ | शुक्रवार ९।३।४५ | सोमवार १२।३।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१४५-० | २१५२-८ | २१३२-८ | २०८२-८ | २१०७-८ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९३-० | ३९४-८ | ३९०-८ | ३८५-० | ३९०-८ |
| २२०१; १६९५ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | १८४७-८ | १८६६-४ | १८५८-१२ | १८००-० | १८६५-० |
| ७६५; ५३३ | १६-०-०‡ | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१५-० | ६२५-० | ६२१-० | ६०८-० | ६२१-० |
| ६५३; ४७५ | ३५-०-०‡ | मे | स्वदेशी | १०० | ५३७-० | ५४४-० | ५३८-० | ५२१-० | ५३९-० |
| ४९८; ३६१ | १०-०-०‡ | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३८४-८ | ३८७-० | ३८३-० | ३७१-० | ३८०-० |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०८-० | ३०९-८ | ३१०-० | ३१०-० | ३०८-० |
| ३९४; २८२ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९८-० | २९९-८ | २९९-० | २९९-० | ३०७-० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६७-८ | २६९-८ | २६६-८ | २६६-८ | २६६-० |
| ५-१०-६; ३-६ | ०-३-०‡ | मे | अपोलो | २ | ४-५-६ | ४-५-० | ४-५-० | ४-२-० | ४-४-६ |
| २१-१४;१३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | ३-२-० | ३-२-० | ३-२-० | ३-१-० | ३-२-३ |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | ,, डिफर्डस् | १ | १५-०-६ | १५-१-० | १५-१-० | १४-७-० | १४-१४-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९०-० | ६९३-४ | ६९२-८ | ६७२-८ | ६८१-४ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३१-० | २३२-८ | २३२-१२ | २३०-८ | २३२-८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२४-० | २२३-० | २२२-० | २२२-० | २२०-० |
| ५७५; ३७९ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३५-० | ५३५-० | ५३३-१२ | ५३३-१२ | ५३७-८ |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८०-१२ | ८०-८ | ८०-१२ | ८०-४ | ८०-४ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४-१ | ३४-२ | ३४-१ | ३४-१ | ३३-१५-० |
| ८५; ४८ | ३-४-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५६-८ | ५६-८ | ५६-० | ५६-० | ५४-८-० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २१-४ | २०-१४ | २०-८ | २०-४ | २०-४-० |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑइल | २५ | ७०-० | ७०-० | ७०-० | ७०-० | ७०-०-० |
| | | | ३½% रोखे | १०० | ९९-९-६ | ९९-९-६ | ९९-११-६ | ९९-१० ६ | ९९-११-० |

व्याज-वजा ( xd )

कोहिनूर २२-३-४५

अपोलो २६-३-४५

# मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )

बॉंबे डाइंग ७-४-४५

नागपूर २३-४-४५

स्वदेशी २७-४-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संचित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १३।३।४५ | बुधवार १४।३।४५ | गुरुवार १५।३।४५ | शुक्रवार १६।३।४५ | सोमवार १९।३।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २०८०—० | २०९२-८ | २०९३-१२ | २०८०-० | २०८५—० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८४—० | ३८६-० | ३८६-८ | ३८४-० | ३८५—० |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | १८६२—८ | १८७५-० | १८११-४ | १८५५-० | १८४८-१२ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१८—० | ६२०-० | ६२१-० | ६१८-० | ६१९—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | एप्रिल | स्वदेशी | १०० | ५३४—० | ५३७-० | ५३९-० | ५४०-० | ५४३—० |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३७५—० | ३७८-० | ३७७-० | ३७७-० | ३७७—० |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०५—० | ३०६-० | ३०५-० | ३०५-० | ३०५—० |
| ३९४; २८२ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०४—० | ३०४-० | ३०४-८ | ३०३-० | ३०३—० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६२—८ | २६५-८ | २६४-० | २६४-० | २६३—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-४-० | ४-४-० | ४-४-० | ४-४-० | ४—३-९ |
| २१-१४;१३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-११-० | १४-११-० | १४-९-६ | १४-७-६ | १४-९-० |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३-१-६ | ३-१-६ | ३-२-० | ३-१-३ | ३—१-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९३-१२ | ७०१-४ | ७०६-४ | ७०६-४ | ७०८—१२ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३१—८ | २३१-८ | २३१-८ | २३१-८ | २३१—८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२०—० | २१९-० | २१९-० | २१८-८ | २२०—० |
| ५७५; ३७९ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३५—० | ५३१-४ | ५२७-८ | ५२७-८ | ५१०—० |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८०—० | ८०-४ | ८०-४ | ८०-० | ८०—८ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३३-१४ | ३४-४ | ३४-४ | ३४-२ | ३४—२ |
| ८५; ४८ | ३-४-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५३—४ | ५२-० | ५३-० | ५३-० | ५३—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०—४ | २०-४ | २०-४ | २०-४ | २०—८ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑइल | २५ | ६८—० | ६८-० | ६८-० | ६७-८ | ६७—८ |
| | | | ३½ रोखे | १०० | ९९-११ | ९९-११ | ९९-१०-६ | ९९-९-६ | ९९—९ |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद

बॉंबे डाइंग १६-३-४५ ते २९-३-४५

शिवराजपुर २३-३-४५ ते ७-४-४५

नागपूर २३-३-४५ ते ७-४-४५

स्वदेशी ३१-३-४५ ते १९-४-४५

दि. १९-३-४५

३% व्हिक्टरी लोन = रु. ९९-१४-०

४% १९६०-७० रु. ११२-१४-०

सोनें ७०-८-० चांदी १२६-८-०

कपास ४४९-८-०

### यंत्रविद्येसाठीं हिंदी विद्यार्थी

यंत्रविद्या शिकण्यासाठी हिंदी विद्यार्थी इंग्लंड आणि अमेरिका ह्या देशांकडे पाठविण्याचें हिंदुस्थान सरकार आणि त्या देशांचीं सरकारें ह्यांच्यांत मुक्रर झाल्याचें दिसतें. इंग्लंडला जाणारे विद्यार्थी जून १९४५ पर्यंत आणि अमेरिकेस जाणारे विद्यार्थी जानेवारी १९४६ पर्यंत त्या देशांत पोंचले पाहिजेत. पहिल्या विद्यार्थ्यांचे अर्ज आणि त्यासाठीं शिफारसी २० मार्च १९४५ पर्यंत आणि दुसऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज फेब्रुवारी १९४६ पर्यंत पोंचले पाहिजेत.

### जॉन मथाईंचें भाषण

" स्वयंपूर्ण उद्योगधंद्यांचें महत्त्व किती असतें, तें ह्या युद्धानें हिंदुस्थानला चांगलें कळून चुकलें आहे. यंत्रादि अवजारें, रसायनें वगैरेंची दुर्मिळता असल्यामुळें हिंदुस्थानची फारशी प्रगति होऊं शकली नाहीं. युद्धामुळें संशोधनाला जोर मिळाला. हिंदुस्थान आणि मित्रराष्ट्रें ह्यांच्यामध्यें शास्त्रीय प्रगतीसाठीं एकोपा वाढावा ही सूचना स्वागतार्ह आहे. "

### विद्यार्थ्यांकरितां वह्या

मुंबई सरकारनें शाळा आणि कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां लागणाऱ्या वह्यांसाठी कांहीं ठराविक कागद बाजूला काढून ठेवण्याचें ठरविलें आहे. अशा प्रकारच्या वह्या पुरविण्याचें कंत्राट कांहीं हिंदी कागदाच्या गिरण्यांचे एजंटांनीं अंगावर घेतलें आहे. ह्या वह्या पुढें हेडमास्तरांच्या वेगवेगळ्या संघांतर्फे किंवा शाळा-कॉलेजांतील प्रमुखांच्यातर्फे वाटण्यांत येतील.

### रेशनिंग इन्स्पेक्टर्सना गणवेष मिळणार

मुंबई सरकारनें रेशनिंग इन्स्पेक्टर्सना विशिष्ट प्रकारचे कोट व विजारी देण्याचें ठरविलें आहे आणि त्याप्रमाणें अंमलबजावणीहि सुरू झाली आहे. अशा प्रकारची योजना करण्याचें कारण कीं, अलिकडे स्वतःस रेशनिंग इन्स्पेक्टर्स म्हणवून फसविणारांची संख्या वाढल्यामुळें ह्या प्रकारास आळा घालणें जरूर वाटूं लागलें आहे. ह्यापुढें रेशनिंग इन्स्पेक्टर्स बस इन्स्पेक्टर्सप्रमाणें गणवेष घालून हिंडतांना दिसतील. प्रत्येक इन्स्पेक्टरला वर्षांतून तीन गणवेष देण्यांत येतील आणि अशा ७०० गणवेषांना सरकारला सुमारें रु. २०,००० वार्षिक खर्च येईल.

### तुंगभद्रा नदीवरील धरण

मल्लपुरम येथें तुंगभद्रा नदीला धरण बांधण्यांत येणार आहे. धरणाची भिंत १५० फूट उंच आणि ८,२०० फूट रुंद असेल. धरणाचा खर्च ७ कोटी रुपये येऊन शिवाय कालव्यांचा खर्च ६ कोटींपर्यंत येईल असा अंदाज आहे. हैद्राबाद संस्थान आणि मद्रास सरकार ह्यांच्यामध्यें प्रस्तुत योजनेसंबंधीं गेलीं चाळीस वर्षे वाटाघाटी चालल्या होत्या, त्या संपुष्टांत येऊन धरणाच्या योजनेस प्रारंभ झाल्याचें उभयपक्षांकडून जाहीर करण्यांत आलें आहे.

### म्हशींस प्लेगची लस टोंचणार

मुंबई शहरांत आणि आसपासच्या भागांत दरवर्षी कित्येक दुभतीं जनावरें प्लेगाला बळी पडतात आणि दुधाची टंचाई भासते. ती दूर व्हावी म्हणून ४०,००० म्हशींस लस टोंचावयाची आहे.


# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ.

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २८ मार्च, १९४५ अंक १३

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

जोगींचें डोंगर छाप 'शुद्ध निलगिरी तेल.'
जोगी आणि कं. मुंबई ४

सांडू हार्टिना
[illegible] गुणकारी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट : मे. श्रीदत्त एजन्सी १०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.
कोल्हापूर विक्रेते : मे. भागवत आणि कं. कांच लाइन
सातारा जिल्हा एजंट : मे. जोशी आणि मंडळी भवानी पेठ.
अहमदनगर विक्रेते : मे. देशमुख आणि कं. नवी पेठ.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०
हेड ऑफिसः—पुणें शहर
—शाखाः—
(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती
(३) लोणावळा (४) बेलापूर.
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)
चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर,
नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## विविध माहिती

### हिंदुस्थानाची राष्ट्रसंघास वर्गणी

१९४० ते १९४४ ह्या मुदतींत हिंदुस्थानानें राष्ट्रसंघास ४३ लक्ष रुपये वर्गणी दिली.

### सी. पी. अँड बेरार चेंबर ऑफ कॉमर्स

सी. पी. अँड बेरार चेंबर ऑफ कॉमर्स ही संस्था एका वर्षापूर्वी स्थापन झाली, तिला फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें संलग्न करून घेतल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. संलग्न करून घेण्यापूर्वी संस्था दोन वर्षे तरी अस्तित्वांत पाहिजे, ही अट वरील चेंबरचे बाबतींत सैल करण्यांत आलेली आहे.

### वॉररिस्क इ. फंडांतून मुंबईतील नुकसानभरपाई ?

मुंबई शहरांत गेल्या एप्रिलमधील स्फोटामुळें नुकसान झालें; त्याच्या नुकसानीच्या भरपाईस १६ कोटि रुपये लागतील. वॉररिस्क इन्शुअरन्स फंडांत ३५ कोटि रुपये पडून आहेत, त्यांतून ही रकम भागविण्याचा सरकारचा विचार दिसतो. वॉररिस्क इन्शुअरन्स फंडाचा एक ठराविक उद्देश होता व त्यालेरीज बाकी कोणत्याहि कारणाकडे मध्यवर्ती विधिमंडळाच्या संमतीशिवाय त्याचा विनियोग करणें उचित होणार नाहीं, असा आक्षेप या सरकारी धोरणाविरुद्ध घेण्यांत येत आहे.

### भूकबळींचा मृत्यु

गेल्या वर्षाच्या अखेरच्या दहा महिन्यांत कलकत्ता शहरांतील इस्पितळांत दाखल झालेल्या ७,१६२ भूकबळींपैकीं २,१४४ भूकबळी मरण पावले.

### फ्रान्समधील काळ्या बाजारांतील कांहीं बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| लोणी : | ( शेरास ) | ४५ रुपये |
| ओव्हरकोट : | ( नगास ) | १११० रुपये |
| कोळसा : | ( टनास ) | ६०० रुपये |

### युद्धकैदी

संयुक्त राष्ट्रांच्या लष्करानें शत्रुपक्षाचे सुमारें १०,००,००० सैनिक कैद केले आहेत. ब्रिटिश साम्राज्याचे १०,४३,००० सैनिक १३ नोव्हेंबर, १९४४ अखेर कामास आले. त्यांत मृत, जखमी, बेपत्ता व युद्धकैदी ह्या सर्वांचा समावेश होतो.

### रेडिओ लायसेन्स

हिंदुस्थानांत रेडिओचे परवाने असणारांची संख्या जानेवारी, १९४५ अखेर १,९६,५८५ इतकी होती. जानेवारी, १९४४ अखेर ती फक्त १,७७,५३९ इतकीच होती. जानेवारी, १९४५ मध्यें ४,३७८ नवे लायसेन्स देण्यांत आले.

### युद्धकार्यासाठी जपानी शाळा-कॉलेजें बंद

एप्रिलच्या १ तारखेपासून जपानमधील सर्व शाळा, कॉलेजें व विश्वविद्यालयें बंद ठेवण्यांत यावयाचीं आहेत. विद्यार्थ्यांचा युद्धकार्याकडे अधिकांत अधिक उपयोग करून घेतां यावा, ह्याकरितां ही योजना आहे.

### ६६,००० एकर जमिनीस पाणीपुरवठा

म्हैसूर सरकार २ कोटि रुपयांची, शेतीस पाणीपुरवठ्याची योजना आखीत आहे. ती पुरी झाली, म्हणजे ६६,००० एकर जमीन नव्यानें पाण्याखालीं येईल.

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक अर्थ यांसी—

सा. न. वि. वि.

मध्यवर्ती विधिमंडळांत परवां एका युरोपिअन सभासदानें हिंदुस्थान सरकारच्या खात्यांतून युद्धपरिस्थितीच्या नांवावर झपाट्यानें वाढत असलेल्या खर्चास लगाम लावण्याबाबत ठराव मांडला व तो पासहि झाला.

ही झाली दिल्ली सरकारची गोष्ट. निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं युद्धोत्तर काळांत पुनर्घटना करण्याच्या उद्देशानें योजना केल्या असून त्यांत प्रत्यहीं भर पडत आहे. या योजनांचा सर्वसाधारण उद्देश ग्रामीण जीवन सुधारणें व लढाईवरून परत येणाऱ्या लढवय्यांची सोय करणें असा आहे. त्या दृष्टीनें रस्ते बांधणें, शेती सुधारणें, आरोग्य सुधारणें, वीज खेळविणें इत्यादि बाबत कार्यक्रमाची थोडीबहुत माहिती जाहीर झालेली आहे. या झाल्या कोट्यावधि रुपयांच्या साऱ्या खर्चाच्या बाबी. राष्ट्रीय उत्पन्न वाढवावयाचें तर शेतीचें उत्पन्नहि वाढलें पाहिजे व त्या दिशेनेंच प्रयत्न चालू आहेत असा बिनतोड युक्तिवाद आहे. तथापि शेती सुधारण्यास कालावधि लागतो ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे.

रस्ते बनविण्याकरितां लागणारीं यंत्रें व इतर साहित्य, शेतीकरितां योजिलेलीं खतें, ट्रॅक्टर्स, पंप इत्यादि साधनें, दवाखान्यांत लागणारीं औषधें व उपकरणें, वीज तयार करण्याकरितां लागणारीं यंत्रसाधनें व इतर माल, रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारी, बसेस व इतर रेल्वेचीं इंजिनें व डबे—यांतील किती माल हिंदुस्थानांत तयार होतो? सहजच आहे, ब्रिटनकडून आपल्याला यांचा पुरवठा होईल! अन् पुढें काय ?— या प्रश्नाचें उत्तर अजून प्रसिद्ध झालेल्या योजनांत नाहीं. राष्ट्रीय उत्पन्न औद्योगीकरणानें वाढतें, राष्ट्रीय संपत्तीच्या योग्य विभागणीनें जनता सुस्थित होते. त्या बाबतच्या सरकारी योजना प्रसिद्ध व्हावयाच्या आहेत अजून. शिवाय उद्योग-धंदे हा मुख्यतः मध्यवर्ती सरकारचा विषय आहे. त्याचा विचार प्रांतिक सरकारें पूर्णपणें करूं शकत नाहींत.

तथापि प्रसिद्ध झालेल्या योजनांनुसार प्रांतिक सरकारांच्या हालचालीस प्रारंभ झाल्याचीं चिन्हें दिसत आहेत. उद्यांचें जग लोकशाही तत्त्वावर चालणार असल्याचें दिसतें. आजच्या योजनांना उद्यांचीं राष्ट्रीय मंत्रीमंडळें मान देतील कां ?

वायव्य सीमा प्रांतांत राष्ट्रीय सभेच्या वतीनें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्याचें नुकतेंच वाचण्यांत आलें. इतर प्रांतांतहि अशीं मंडळें स्थापन व्हावींत असेंच मला वाटतें. काळ झपाट्यानें पुढें जात आहे. आपली बस चुकतां उपयोगी नाहीं !

—संजय

### काळ्या बाजारास आळा घालण्यासाठी मोठ्या चलनी नोटा बंद

बँक ऑफ इंग्लंड, १० पौंडांच्या व त्यावरील किंमतीच्या चलनी नोटांचा प्रसार बंद करणार आहे. मोठ्या नोटांच्या देवघेवीनें चालणाऱ्या काळ्या बाजारास आळा घालण्याचा त्यांत हेतु आहे. ह्या चलनी नोटा बंद पडल्या, तरी त्यांची किंमत नाहींशी होणार नाहीं; त्यांची मोड मात्र सुलभतेनें मिळणार नाहीं.

# अर्थ

## सहकारी पुनर्घटनेची योजना

### समितीच्या कार्यास प्रारंभ

युद्धोत्तर काळांतील आर्थिक पुनर्घटनेच्या निरनिराळ्या अंगांचा विचार करून त्यांचे संबंधांत योजना आखण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें अनेक समित्या नेमल्या आहेत. प्रांतिक सरकारांनीं आपापल्या पुरत्या योजना तयार करण्याचें काम चालू ठेवलें आहे. मध्यवर्ती सरकारच्या योजनाखात्याशी कायदेमंडळ संलग्न व्हावें आणि त्यांच्या सभासदांस माहिती करून घेण्याची व सल्ला देण्याची संधि मिळावी म्हणून त्यांचीहि समिति नेमण्यास सर आर्देशीर दलाल ह्यांनीं संमति दिली आहे. शेती आणि खेडेगावी धंदे, व्यवसाय व व्यापार ह्यांच्या पुनर्रचनेचें महत्त्व सर्व योजनाकर्त्यांनीं मान्य केलें आहे. आणि सहकारी संघटनेचा ह्या कामीं अधिकांत अधिक उपयोग केला जावा असेंहि सुचवण्यांत आलें आहे. मोठमोठाले कारखाने आणि उद्योगधंदे सर्वस्वी भांडवलवाल्यांच्या मालकीचे असावे किंवा त्यांपैकी कांहीं सरकारनें स्वतः चालवावे अथवा विशिष्ट मर्यादेंत आपल्या नियंत्रणाखाली आणावे, ह्याविषयीं मतभेद आहेत. परंतु शेती आणि खेडेगावी आर्थिक व्यवसाय शक्य तोंवर सहकारी स्वरूपाचे असले पाहिजेत ह्याविषयीं एकमत आहे. तथापि, हा विषय प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत येत असल्यानें त्याचा विचार अखिल भारतीय भूमिकेवर करण्यांत आलेला नाहीं. निरनिराळ्या प्रांतांत व संस्थानांत स्वतंत्र सहकारी कायदे आहेत आणि स्थानिक परिस्थिति व गरजा ह्यांस अनुलक्षून त्यांची अंमलबजावणी होत आहे. प्रांतिक व संस्थानी रजिस्ट्रार्सच्या परिषदा मधून मधून भरविण्यांत येऊन त्यांमध्यें सहकारी चळवळीविषयींच्या प्रश्नांची चर्चा केली जाते आणि ती सर्वांसच सहाय्यक व सूचक होते. हिंदुस्थानच्या युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या योजना आखल्या जात असतांना सहकारी संघटनाचा विचार अखिल भारतीय भूमिकेवरून केला जावा असें तत्संबंधी लोकांस वाटणें स्वाभाविक आहे. कांहीं महिन्यांमागें मुंबई येथें रजिस्ट्रार्सची परिषद भरली होती, तीमध्यें ह्या संबंधांत शिफारस करणारा ठराव मान्य झाला आणि त्यास अनुसरून समिती नेमण्यांत आली असून तिच्या कामास प्रारंभहि झाला आहे. मुंबई प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या, हे त्या समितीचे अध्यक्ष आहेत.

गेल्या कांहीं वर्षांत कित्येक प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं आपापल्या समित्या नेमून स्वतःच्या सहकारी संस्थांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. मद्रास, मध्यप्रांत, बिहार, सिंध, त्रावणकोर, ग्वालेर, म्हैसूर ह्यांमध्यें समित्यांनीं चौकशा व शिफारशी केल्या आहेत. युद्धोत्तर पुनर्घटनेच्या अनुषंगानें मुंबई प्रांतांत व इतरत्र मर्यादित स्वरूपांत कांहीं योजनाहि सुचवल्या गेल्या आहेत. परंतु मध्यवर्ती आणि व्यापक स्वरूपाची अशी चौकशी गेल्या तीस वर्षांत झालेली नव्हती. सहकारी संस्थांचा पहिला कायदा १९०४ मध्यें झाला आणि त्याचें स्वरूप व्यापक करणारा कायदा आठ वर्षांनीं १९१२ मध्यें झाला. ह्या कायद्यांत ग्रथित झालेलीं तत्त्वें आणि कार्यपद्धति ह्यांचा विचार करण्यासाठी नेमलेल्या मॅक्लॅगन कमिटीचा रिपोर्ट १९१५ मध्यें प्रसिद्ध झाला. हा रिपोर्ट सर्व देशभर कित्येक वर्षें मार्गदर्शक होता. पुढें १९१९ मध्यें राज्यघटनेंत महत्त्वाच्या सुधारणा झाल्या, त्यांचे अन्वयें सहकार हा विषय प्रांतिक सरकारांच्या आणि लोकनियुक्त मंत्र्यांच्या कक्षेंत गेला. प्रांतांनीं आपापले सहकारी कायदे केले आणि वर सांगितल्याप्रमाणें रजिस्ट्रार्सच्या परिषदा हेंच हिंदी सहकारी चळवळीची साकल्यानें व तुलनात्मक रीतीनें चर्चा करण्याचें एक साधन उरलें. ह्या परिषदांमध्यें बिन सरकारी कार्यकर्तेहि उपस्थित रहाण्याची व्यवस्था असल्यानें त्यांचे ठराव उपयुक्त आणि सहायकारक झाले आहेत. प्रांतिक सहकारी बँका आणि इंस्टिट्यूटस ह्यांनीं स्वतःचीं अखिलभारतीय व मध्यवर्ती मंडळें स्थापून त्यांच्या सभा भरवण्याची व त्यांमध्यें महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्याची प्रथा चालू केल्यानेंहि ह्या बाबतींत महत्त्वाचें वैचारिक व व्यवहारिक कार्य झालें आहे आणि होत आहे.

ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां सहकारी अभिवृद्धीची योजना आखण्यासाठी नेमलेली अखिल भारतीय स्वरूपाची समिति कार्यास लागली आहे हें समाधानकारक आहे. ही समिति प्रातिनिधिक असून तीमध्यें अनुभवी कार्यकर्त्यांचा समावेश करण्यांत आला आहे. तीमध्यें प्रांतिक रजिस्ट्रार्स आणि बिनसरकारी कार्यकर्ते आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या लष्करी खात्याचा व योजना खात्याचा असे प्रतिनिधीहि तीमध्यें नेमले आहेत. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत सहकारी संघटनेस योग्य स्थान देण्याचा प्रश्न त्यांचेकडून योग्य रीतीनें सोडवला जाईल अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत भिन्न भिन्न परिस्थिति आहे आणि प्रांतिक व संस्थानी सरकारांस तिचा परामर्श घ्यावा लागेल. तथापि, सर्वसाधारण व मूलग्राही महत्त्वाचे अनेक प्रश्न आहेत ते सोडवण्याचे मार्ग समितीस सुचवतां येतील. युद्धोत्तर पुनर्घटनेच्या उच्च व व्यापक अपेक्षांस धरून पुरोगामी, धडाडीच्या व रचनात्मक स्वरूपाच्या शिफारसी तिच्याकडून येतील अशी आशा आहे. शेती, लहान धंदे व खेडेगावी आर्थिक जीवन ह्यांस सहकारी पद्धतीचें वळण लावण्याचें होऊं घातलेलें कार्य मोठें, श्रमाचें, खर्चाचें व संघटनेचें आहे. तसेंच तें विशिष्ट ध्येयवादाचेंहि आहे ही गोष्ट समितीनें लक्षांत ठेवून योजना सुचवणें आवश्यक आहे.

### मॉरिशसमध्यें दंगे का झाले

मॉरिशसमध्यें १९४३ सालीं धंगेधोपे झाले, त्यांची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत आलें होतें, त्याचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. ह्या रिपोर्टाकडे ब्रिटिश पार्लमेंटचें लक्ष वेधलें जाणें अगत्याचें आहे इतका तो स्थानिक कारभारास दोष देणारा आहे. "मालक व मजूर ह्यांतील संबंध सलोख्याचे नाहींत; काम व राहणी हीं दोन्हीं अत्यंत त्रासदायक आहेत; मजुरी फारच कमी असून किमान मजुरीची अट पाळली जात नाहीं; राहणीच्या खर्चाचें मान वाढलें त्या प्रमाणांत भत्ता मिळत नाहीं; वसाहतीचा कारभार तडफदार नाहीं; कित्येक सरकारी अधिकारी व पोलिस ह्यांचें वर्तन योग्य नव्हतें" इत्यादि गोष्टी रिपोर्टानें नमूद केल्या आहेत. हिंदी महासागरांतील, मादागास्करच्या पूर्वेस ५०० मैलांवरील मॉरिशस हें बेट ब्रिटिश सत्तेखाली असून, त्यांतील सुपीक खोऱ्यांत उंसाचें पीक चांगलें येतें. ४ लक्ष लोकसंख्येपैकी बहुसंख्य हिंदु आहेत.

## सहकारी चळवळींत ता. को. सुपरवायझिंगचें स्थान व आजचें देखरेखीचें स्वरूप

(ले.:- श्री. डी. जे. झुंजारराव, डिस्ट्रिक्ट ऑ. ऑर्गनायझर व डायरेक्टर बी. पी. को. बँक, मुंबई )

( १ )

सहकारी चळवळीचा पाया म्हणजे प्राथमिक स्वरूपाच्या संस्था हा होय व या संस्था ज्या जोमानें कार्य करतील व यशस्वी-रीत्या पायाशुद्ध मजबूत होतील त्यावरच या चळवळीचें यश अवलंबून आहे. माल उत्पादन करणाऱ्या, खरेदी-विक्री करणाऱ्या, गिऱ्हाइकांच्या गरजा भागविणाऱ्या व पैशाचा पुरवठा करणाऱ्या संस्था, यांची दिसणारी टोलेजंग इमारत ही प्राथमिक स्वरूपाच्या संस्थांच्या पायावरच उभारली आहे हें दिसून येईल. यावरून प्राथमिक संस्थांत ज्या प्रमाणांत सहकार्याची वाढ होऊं शकेल तितकी ही चळवळ सुधारणेला जवळ आली, कार्यतत्पर झाली, ध्येय गाठलें गेलें असें म्हणावें लागेल.

या चळवळीच्या द्वारें बहुजनसमाजाची आर्थिक, सामाजिक उन्नति करतां येते एवढेंच नव्हे तर नैतिक बाबींचाहि विकास करतां येतो हें पाश्चात्य राष्ट्रांतील जनतेनें दाखवून दिलें. यावरून ही चळवळ या देशांत प्रथम सरकारनें सुरू केली. अशा लोको-पयोगी संस्था निर्माण केल्यानंतर त्यांची अंगें म्हणून पैशाचा पुरवठा करणें, देखरेखीची स्वतंत्र व्यवस्था करणें अशा प्रकारच्या चळवळीस पोषक अशा महत्त्वाच्या सुधारणा करण्यांत आल्या. त्यांत देखरेख हें महत्त्वाचें अंग निर्माण केलें गेलें.

ही चळवळ जनतेची आहे व म्हणून जनतेचे कार्यकर्ते या चळवळींत यावे अशी प्रथम सरकारची इच्छा होती. परंतु ज्या-अर्थी ही चळवळ सरकारनें सुरू केली त्याअर्थी ही सरकारीच आहे; किंवा या चळवळींत कांहीं दोष तरी असावा म्हणून देशां-तील त्यावेळचे सामाजिक कार्यकर्ते त्या दृष्टिकोनांतून त्यावेळीं पहात होते व हा आक्षेपही होता. परंतु ही जनहिताची चळवळ आहे हें लक्षांत आल्यावर कार्यकर्ते या चळवळींत भाग घेऊं लागले व आपलेपणानें या चळवळीकडे पाहाण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला.

देखरेखीचें कार्य करण्याकरितां सुपरवायझिंग युनिअन्स काढ-ण्यांत आल्या. या युनिअन्सचें कार्य प्राथमिक संस्थांवर आपले-पणानें देखरेख करणें, मित्रत्वाच्या नात्यानें वागून मार्गदर्शन करणें, चुका असतील त्या सुधारणें, तपासणी करणें व त्या संस्था स्वावलंबी कशा होतील हें कार्य करणें, चळवळींतील बहुजन-समाजाची बाजू सरकारपुढें मांडणें, धनको ( बँका ) सरकार (खातें) व प्राथमिक संस्था यांच्यांत दुवा म्हणून काम करणें असून त्यांचा बहुमोल असा फायदा झाला व संस्था स्वावलंबी होण्याचें कार्य फक्त या सु. युनिअन्स करूं शकल्या.

त्यानंतर या देखरेख करणाऱ्या युनिअन्स बंद करून हा कार-भार खात्यानें सब ऑडिटर्स नेमून आपलेकडे घ्यावा असा थॉमस कमेटीचा सरकारला रिपोर्ट सादर करण्यांत आला व त्यावर विचार करण्याकरितां व लोकमत अजमावणेकरितां त्यावेळचे नेक नामदार गव्हर्नरसाहेब यांनीं उद्घाटन केलेली सहकारी परिषद् ऑनरेबल मिनिस्टरसाहेब इनचार्ज यांचे अध्यक्षतेखालीं पुणें येथें ता. ३१६।१९३३ ला भरविली गेली व कमेटीच्या शिफारशी अमलांत आणण्याकरितां मे. रजिस्ट्रार साहेब ब. यांनीं आपली योजना समजावून सांगितली. परंतु देखरेखीचा हा मह-त्त्वाचा विषय असल्यामुळें स्वतंत्र विचार करण्याकरितां सरकारनें ता. ४।८।१९३३ च्या नं. १००५६ अ २८ नें एक कमेटी नेमली. कमेटीनें आपला महत्त्वाचा निर्णय खालीलप्रमाणें दिला.

( १ ) सहकारी कार्यकर्त्यांकडून देखरेख काढून, सरकारी नोकरांकडे सोंपविल्यास एका नियंत्रणाखालीं येणाऱ्या चळव-ळीची वाढ खुंटेल. ( २ ) आंतर्गिक देखरेख खात्याकडे गेल्यास आपलेपणाची भावना नष्ट होईल. ( ३ ) चळवळीची जनतेची बाजू मांडणारी संस्था नष्ट होईल. तरी युनिअन्स व तिची देख-रेख तशीच ठेवून इतर महत्त्वाचे फेरबदल सुचविण्यांत आले. त्यांत नोकरवर्गाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याची तरतूद, पगाराचे, प्रा. फंड, रजेचे नियम व युनिअन्सना अंतर्यामीं ताबा ठेवण्यास बरेच अधिकार दिले गेले व सुपरवायझिंग युनिअन्सचें कार्य व महत्त्व जनतेचे पुढारी व नेमलेल्या कमिटीनें सरकारचे नजरेस आणलें. सन १९३३ ते १९३८ च्या मंदीच्या काळांत वसुलाकडे लक्ष पुरविणें, थकबाक्या वसूल करणें हें कठीण कार्य कार्यकर्ते व नोकर वर्गास करावें लागलें व चळवळीला त्या काळांत तगवून धरलें एवढेंच नव्हे तर चळवळीवरील विश्वास वाढविण्याचें कार्यही पार पाडलें.

त्यानंतर देखरेखीचा एकसूत्रीपणा जिल्ह्यांत निर्माण होण्यास डिस्ट्रिक्ट बोर्डस स्थापन केले. व इकडे पुढारी वर्गाचें लक्ष वेध-ण्यांत आलें. परंतु कांहीं काळ जातो न जातो तो पुनः एक कमिटी या युनिअन्स बंद कराव्यात म्हणून नेमली गेली व वरीलप्रमाणें निर्णय या कमिटीनें तारीख ८।६।३९ ला पुणें येथें भरलेल्या कौन्सिल हॉलमध्यें दिला. त्यावर पुन्हां उहापोह होऊन युनिअन्स राहूं द्यावेत असें ठरलें. देखरेखीच्या धोरणांत अशा प्रकारचें 'आशा-निराशेचें' वातावरण चालूच राहिलें.

चळवळीच्या दृष्टीनें ती कार्यक्षम होण्यास तिच्या कार्यरचनेंत फेरफार होणें जरूर आहे. परंतु त्यामुळें असें होऊं नये कीं, कार्य-कर्त्यांची चळवळीवरील आपलेपणाची भावना कमी व्हावी, आपली जबाबदारी कमी झाली असें वाटावें. चळवळीचा खरा विकास जनतेवरच अवलंबून आहे. सहकारी चळवळीची घटना लोकशाही तत्त्वावर आधारलेली आहे व म्हणूनच, चळवळीचें ज्ञान, आपली जबाबदारी ओळखणें, चळवळीचे अभ्यासु असे जनतेचेच कार्यकर्ते मिळतील तर ही चळवळ खरे लोककल्या-णाच्या हेतूनें यशस्वी होऊं शकेल. ज्यावेळीं डिस्ट्रिक्ट युनिअन बोर्डे अस्तित्वांत आलीं त्याचवेळीं बरेचसे अधिकार या बोर्डाकडे गेले. युनिअन्सच्या प्रतिनिधींनीस आपली सत्ता काढून घेतली असें वाटलें व सत्या कार्यकर्त्यांची कामाची दिशा पोटनियमानें जरी नसली तरी लक्ष उडाल्यामुळें मनानें बदलत गेली हें सत्य आहे.

चळवळींतील संस्थेचा सेक्रेटरी हा त्या संस्थेचा सुकाणु सम-जला जातो व त्याच्या कर्तबगारीवरच संस्थेचें यशापयश अव-लंबून असतें; अशा सेक्रेटरीस संस्थेस मार्गदर्शन करणारा सुपर-वायझर यांचें जास्त महत्त्व आहे. चळवळीच्या प्रगतींत या वर्गाचा मोठा हिस्सा आहे हें कबूल करावें लागेल. या वर्गाच्या जीवनाकडे आतांपर्यंत दुर्लक्ष केलें होतें तिकडे सरकारनेंही लक्ष

देऊन पगाराचें स्केल, व त्यांना स्थाइकत्व येईल असे नियम करून अंमलांत आणले. एवढेंच नव्हे तर तारीख ११-११-४४ व १२-११-४४ ला नेक नामदार गव्हर्नरसाहेब यांनीं उद्घाटन केलेल्या मुंबई येथें प्रांतिक परिषदेंत या देखरेखींत पुन्हां फेरफार झाले. परंतु स्टाफच्या हिताच्या दृष्टीनें देखरेखीच्या उत्पन्नांतून त्यांना पुरेसें वेतन देतां येत नाहीं व खात्यांस दरवर्षी याकरितां ज्यादा ग्रँन्ट यावी लागत आहे व म्हणून सुपरवायझर्स हे सरकारी नोकर म्हणून खात्याकडे घ्यावेत असें ठरलें; पुन्हां डिस्ट्रिक्ट-बोर्डसच्या घटना बदलून, शिक्षण व प्रचार हें कार्य इन्स्टिट्यूटच्या मदतीनें करावें असें ठरलें. मात्र सुपरवायझिंग युनिअन्सचें महत्त्व पूर्वीप्रमाणेंच कायम ठेवण्यांत आलें.

थॉमस कमेटीच्या रिपोर्टावर सहकारी चळवळींतील कार्यकर्ते एकरूप होऊन तुटून पडले व तो रिपोर्ट सरकारला मागें घ्यावा लागला. त्या रिपोर्टांत व आताच्या ठरावांत तर कांहीं फरक आहे असें दिसत नाहीं. त्यावेळीं सब ऑडिटर्स नेमून जी देखरेख होणार होती ती आतां आपल्याच सुपरवायझर्सकडून मात्र ते सरकारी नोकर म्हणून होणार आहे. माणसें आपलींच पण नियंत्रण सरकारचें, तत्वांत फरक पडला नाहीं काय ? सुपरवायझिंग युनिअनच्या घटनेंत जरी फरक केला नसला तरी आत्म्याशिवाय शरीर असेंच नाहीं कां ? लोकशाही तत्त्वानुसार चालवलेल्या संस्थांचा नोकरवर्ग सरकारी झाल्यावर तत्व तरी शिल्लक राहिलें काय ? तसेंच आपण जनतेचे सेवक आहोंत, आपण आपल्या कार्यकर्त्यांस जबाबदार आहोंत, ही सद्भावना तरी खात्याचे नोकर झाल्यावर त्यांच्या मनांत राहील काय ? जनसेवेचें स्मरण कसें राहाणार ?

तरी माझी सरकारला, खात्याला, सहकारी बंधूंस अशी विनंती आहे कीं, नोकरवर्गाचें हित साधणें हें तर पहिलें कार्य आहे परंतु तें जनतेच्या कार्यकर्त्यांना जबाबदार ठेवून त्यांचें हित करणें चळवळीच्या दृष्टीनें हितावह आहे. सरकारी नोकर म्हणून जे हक्क त्यांना दिले जाणार आहेत ते जर या घटनेंतच दिले गेले, ग्रन्टची रकम प्राव्हिन्शियल बोर्डाकडे दिली तर खर्चांत कांहींच फरक पडणार नाहीं व आजही प्रा. बोर्डाचा ताबा आहेच.

चळवळींतील जनतेचे पुढारी आपल्या परिश्रमाची पराकाष्ठा करून, कन्झुमर्स चळवळ, अन्न धान्य वाटप पद्धतीची जबाबदारी या युद्ध काळांत स्वतःच्या अंगावर घेऊन हें बिकटकार्य यशस्वीरित्या पार पाडीत आहेत व चळवळीचें एक नवीन दालन उघडीत आहेत. चळवळ सर्व बाजूंनीं कशी यशस्वी होईल म्हणून प्रयत्न सुरू आहेत. ठाणे जिल्ह्यांत तर हें कार्य सर्व सहकारी संस्थांनीं व कार्यकर्त्यांनीं आपल्या शिरावर घेतलें आहे; बँकिंग युनिअनची ( आर्थिक पाया ) पायाशुद्ध इमारत बांधण्याचें कार्य माझे सहकारी मित्र लडकू पाटील हें वाढे येथें करीत आहेत. त्यांचेप्रमाणेंच चळवळीच्या कार्याचा विस्तृतपणा व त्याचा विकास होण्यास इतर कार्यकर्ते श्रम करीत आहेत. सहकारी चळवळींत, मार्गदर्शक, अभ्यासू, म्हणून हिंदुस्थानांत, मुंबई सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता यांना बरेंच वरचें स्थान आहे व त्यांनीं—युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत न्याय्य व समतोल अशी समाज रचना सहकारी संघटनांच घडवून आणू शकेल असा विश्वास व्यक्त केला आहे. अशा परिस्थितींत देखरेखीचा सुकाणु जो सुपरवायझर यांस सरकारनें खात्याकडे न देतां युनिअन्सच्या लोकप्रतिनिधी व प्रा. बोर्डाचे नियंत्रणाखालील कार्य करण्याची संधि द्यावी असें झालें तरच ही लोकशाही चळवळ असून शुद्ध स्वरूपाची व आपलेपणाची देखरेख कायम राहील. चळवळ दिवसें दिवस कार्यक्षम होण्यास हळहळू नियंत्रण व अधिकार लोकप्रतिनिधीकडेच सरकार देत आहे हेंही दिसून येईल व सरकारी चळवळ म्हणून जनतेचा आक्षेपहीं राहणार नाहीं. भविष्य काळांत तालुका युनिअन्सचा जो खरा विकास व्हावयाचा आहे तोही सरकारचे नजरेस आल्याशिवाय राहणार नाहीं.

## स्फुट विचार

### " शक्य तें सर्व कांहीं करण्यांत येत आहे "

हिंदुस्थानांतील अन्नपरिस्थितीसंबंधानें ब्रिटिश कॉमन्स सभेंत गेल्या आठवड्यांत प्रश्नोत्तरें झालीं. भारतमंत्रि, मि. एमरी, ह्यांनीं " गेल्या तीन वर्षांतील हिंदी धान्यांचें वार्षिक सरासरी उत्पादन ५,५२,५२,००० टन असून मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानांचीं सरकारें त्याचप्रमाणें उत्पादक कांहीं साठे शिलक ठेवीत आहेत " असें सांगितलें. नाश पावणाऱ्या धान्याचें प्रमाण ५% भरेल आणि साठवणींत सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत, अशीहि माहिती त्यांनीं दिली. धान्याच्या लागवडीचें क्षेत्र१, १०,००,००० एकरांनीं वाढलें आहे, असेंहि ते म्हणाले. ऑक्टोबर, १९४३ ते डिसेंबर १९४४ ह्या मुदतींत ब्रिटिश सरकारनें ११,००,००० टन धान्य हिंदुस्थानकडे पाठविण्यासाठी आगबोटींत चढविण्याचें योजिलें होतें. हा कार्यक्रम जानेवारी, १९४५ च्या मध्याचे सुमारास पुरा झाला. आणखीहि धान्य पाठविणें चालू आहे, असें त्यांनीं सांगितलें. " शक्य तें सर्व कांहीं करण्यांत येत असल्याबद्दल माझी खात्री आहे " असा त्यांनीं निर्वाळा दिला.

### उद्योगपति कै. काकासाहेब सुपणेकर

सदर्न निटिंग वर्क्स लि. चे प्रमुख संस्थापक व चालक आणि एस. व्ही. सुपणेकर, कुळकर्णी अँण्ड सन्स लि. ह्या कंपनीचे कर्तबगार चेअरमन श्री. श्रीधर विठ्ठल सुपणेकर ह्यांस शनिवार, ता. २४ रोजीं मुंबई येथें आकस्मिकरणें देवाज्ञा झाली, हें नमूद करण्यास अतिशय दुःख होतें. शेतीला जोडधंदा म्हणून के. श्री. काकासाहेब व श्री. रा. गो. उर्फ भाऊसाहेब कुळकर्णी ह्यांनीं सुमारें २७ वर्षांपूर्वी कऱ्हाडजवळ सुपणें ह्या खेड्यांत होजिअरीचा धंदा सुरू केला. १९३४ सालीं कारखाना पुणें येथें आणण्यांत आला व त्याचें खाजगी लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें. नंतर कै. काकासाहेब हे जपानला जाऊन तेथील होजिअरीच्या धंद्याचें सूक्ष्म अवलोकन करून आले. गेल्या पांच-सहा वर्षांत कंपनीनें भागीदारांचा व ठेवीदारांचा कमालीचा विश्वास संपादन केला व तिनें मालाची विविधता व उत्पादन हीं वाढवून होजिअरीचे धंद्यांत अग्रेसरत्व मिळविलें. कै. काकासाहेब ह्यांनीं अविश्रांत मेहनत करून इतरहि अनेक उद्योगधंदे सुरू केले, कंपन्या काढल्या व आपल्या नेतृत्वाचा व अनुभवाचा फायदा इतरांस उपलब्ध करून दिला. गोड भाषा, मनमिळाऊ स्वभाव, उपकारी वृत्ति, निगर्वीपणा, कल्पकता, मेहनतीपणा, इत्यादि गुणांमुळें ते सर्वांसच प्रिय झाले होते. त्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रांतील एक धडाडीचा उद्योगपति नाहींसा झाला आहे.

## बँकांचा लहान गावांतील माल तारणावरील कर्जे देण्याचा धंदा

बँकांजवळील ठेवींमध्यें जसजशी वाढ होत आहे तसतशी बँकांच्या शाखांची वाढही झपाट्यानें होत आहे. शहरांबाहेरील लहान गावांतील उद्योगधंद्यांना व व्यापाराला भांडवल पुरवून आपला पैसा सुरक्षित गुंतवण्याचा प्रयत्न आपल्या शाखांमार्फत बँका करीत आहेत. लहान गावांतील बँकांनीं बँकिंगचा प्रसार व्हावा या दृष्टीनें कायदा व व्यवहार संभाळून आपल्या गिऱ्हाइकांना जास्तींत जास्त सवलती देण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें त्यांना धंदा वाढवतां येऊन त्यायोगें त्या गावांतील लोकांना औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांतील त्यांचा दर्जा वाढवतां येत असल्याची खात्री पटत चालली आहे. शहरी बँकांत जितके सेलीमेलीचे व आपुलकीचें संबंध आपल्या खातेदारांशीं सांपडणार नाहींत इतके सेलीमेलीचे संबंध येथें राहूं शकतात. सरोखरीच एकमेकांतील विश्वास व पत यांचे आधारावरच लहान गावांतील बँकांचे व्यवहार अत्यंत सुकर रीतीनें दोघांनाहि फायदेशीर होतात.

### सावधगिरीची आवश्यकता—धोक्याची सूचना

परंतु सर्वच व्यवहार विश्वास व पत यांचे आधारावर सर्वांशीं चालतीलच असें नाहीं. ह्या संबंधांत खालील उदाहरण उद्बोधक होईल. एका व्यापाऱ्यानें आपल्या गोडाऊनमधील माल एका बँकेच्या ताब्यांत देऊन त्याचे तारणावर कर्ज काढलें. नेहमीच्या पद्धतीप्रमाणें त्या बँकेनें त्या मालाचा नाममात्र ताबा घेतला. आपलें नांव व गोडाऊन नंबर खडूनें त्यावर लिहिला. बँकेनें त्या मनुष्यावर ठेवलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेण्याच्या दृष्टीनें त्याच गोडाऊनमधील त्याच मालाचे तारणावर त्याच गावांतील एका बँकेकडून कर्ज त्यानें उचललें. खडूनें टाकलेले नंबर पुसून टाकण्याची खबरदारी घेण्याचें मात्र तो मनुष्य विसरला नाहीं! ती गोष्ट दोन्ही बँकांच्या लक्षांत येण्यास कित्येक दिवस लागले.

तात्पर्य, बँकिंगचा प्रसार लहान गावांत जसजसा होत जाईल त्या त्या प्रमाणांत अशा प्रकारें येणाऱ्या अडचणी व धोके टाळण्याची खबरदारी बँकांनीं घेतली पाहिजे. नाहींतर पुढें मंदीच्या काळांत बँकांना ज्या अडचणींना तोंड द्यावयाचें आहे त्यांतच आणखी अशा तऱ्हेच्या अडचणींची भर पडावयाची.

---

### परस्पर सहकारी मंडळी, बुधोंडी ( सं. सांगली )

वरील अनलिमिटेड मंडळीला ३१-५-४४ च्या असेरच्या अहवालाचे वर्षी बाहेरील भारी व्याजाचीं कर्जे बरीचशी कमी करितां आलीं. थकबाकीचें प्रमाणहि ५३% वरून १६% वर आलें. सभासद, शेअरभांडवल, वगैरे बाबतींत समाधानकारक वाढ झाली आहे. विहिरींची संख्या ४१ वरून ४८ वर गेली. अहवालाचे वर्षी मंडळीस २,१६४ रु. नफा झाला. मंडळीच्या मालकीचें 'सहकार मंदिर' बांधणें व हल्लीच्या स्वस्त मालाच्या दुकानाचें 'कंझ्युमर्स सोसायटी'मध्यें रूपांतर करणें, अशा मंडळीच्या योजना आहेत. वार्षिक सभेचे अध्यक्ष, श्री. ह. ब. कुलकर्णी, रजिस्ट्रार को. सो. सांगली, ह्यांनीं मंडळीच्या कामगिरीबद्दल आनंद प्रदर्शित करून कांहीं उपयुक्त सूचनाहि केल्या.

## शिरपूर तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग

हल्लीं शेतकी सोसायट्या भावनियंत्रित वस्तूंच्या पुरवठ्याचें काम करूं लागल्या आहेत. सदर काम दक्षतेनें केलें जावें व त्या बाबतींत वेळोवेळीं करण्यांत आलेल्या नियमांचें उल्लंघन त्यांचे हातून होऊं नये म्हणून शिरपूर तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनिअननें तिला सामील असलेल्या सर्व सोसायट्यांचे सेक्रेटरींसाठी तारीख ७-२-१९४५ ते १०-२-१९४५ असेर चार दिवसांचा शिक्षणवर्ग शिरपूर येथें सुपरवायझिंग युनिअनचे ऑफिसांत भरविला होता. सदर शिक्षणवर्गास एकूण २२ सेक्रेटरींपैकीं २० सेक्रेटरी हजर होते.

सदर शिक्षणवर्गाचें उद्घाटन व समारोप मे. मामलेदारसाहेब तालुका शिरपूर यांचे हस्तें करण्यांत आले. मे. डिस्ट्रिब्युशन सुपरवायझर, मे. डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, मे. सब-ऑडिटर को. सो. शिरपूर, मे. बँक इन्स्पेक्टर शाखा शिरपूर व सुपरवायझिंग युनिअनचे सुपरवायझर्स यांनीं भावनियंत्रित वस्तु-पुरवठ्याबाबत सविस्तर माहिती सांगितली. नंतर सेक्रेटरींकडून मांडण्यांत आलेल्या अडीअडचणीबद्दल चर्चा करण्यांत येऊन त्यांच्या शंका दूर करण्यांत आल्या.

---

### माढें ता. को. सुपरवायझिंग यूनियन लि.

माढें तालुक्यांतील सोसायट्यांच्या सेक्रेटरींना सरकारच्या नवीन धोरणानुसार फेअर प्राइस शॉप, सरकारमान्य कापड दुकान, साखर व रॉकेल वाटपाचे कामांतील जमाखर्च, वगैरेबद्दल सहकारी सोसायट्यांच्या भावी कालांतील उपयुक्त कामगिरीबद्दल माहिती देण्यासाठी ता. २०-२-४५ ते २४-२-४५ असेर एक क्लास भरविण्यांत आला होता. क्लासांत यूनिअन प्रेसिडेंट मे. शाहूराव रंगराव पाटील प्रभृति १०।१२ कार्यकर्त्यांनीं शिक्षण देण्याचें काम केलें. असि. रजिस्ट्रार वगैरेंनीं क्लासला भेट देऊन समाधान व्यक्त केलें. समारोप समारंभ मे. जी. डी. साठे, ऑनररी ऑर्गनायझर, ह्यांच्या हस्तें झाला. सहकारी चळवळीबाबत माढें तालुका नमुनेदार करून दाखविण्याचा त्यांनीं उपदेश केला.

---

### मौजे उपळाई खुर्द, ता. माढें, जि. सोलापूर

येथें ता. ७-२-४५ रोजीं उपळाई खुर्द अॅ. को. क्रे. सोसायटीच्या व सरकारनें लार्ज स्केल बंडिंग बरोबरच जी ड्राय फार्मिंग (दुर्जल शेती)ची योजना चालू केली आहे, त्यांतील अधिकारी वर्गाच्या सहाय्यानें एक प्रात्यक्षिक भरविलें होतें. प्रात्यक्षिकाकरितां जीं पिकें आलीं होतीं, त्यांना उपळाई खुर्द को. क्रे. सोसायटी व ड्राय फार्मिंग योजना ह्या दोघांतर्फे रुपये ६३ चीं बक्षिसें वाटण्यांत आलीं. शेतकी, दुर्जल शेती, बंडिंगची योजना, याबाबत स्वतःचे अनुभव सांगून सुधारलेल्या पद्धतीनें शेती करून अधिक धान्य पिकविणेची गरज कशी आहे, याचें सांगोपांग विवेचन त्या वेळेच्या भाषणांत करण्यांत आलें. सुधारलेल्या पद्धतीनें घेतलेली कोरडवाहू पिकें व शेतकऱ्यांच्या पद्धतीनें घेतलेली कोरडवाहू पिकें यांतील फरक शेतकऱ्यांच्या नजरेस आणणें हें ह्या प्रात्यक्षिकाचें मुख्य उद्दिष्ट होतें.

## " अधिक धान्य पिकवा " मोहिमेस हिंदुस्थान सरकारचें सहाय

मध्यवर्ती सरकारनें प्रांतांस व संस्थानांस " अधिक धान्य पिकवा" मोहिमेच्या खर्चासाठीं १९४४-४५ मध्यें दिलेल्या रकमांचा तपशील खालीं दिला आहे:-

| योजनेचें वर्णन | मद्रास | मुंबई | बंगाल | सं. प्रांत | पंजाब | बिहार | मध्यप्रांत वऱ्हाड | आसाम | सरहद्द प्रांत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| १ कपाशीऐवजीं धान्य पेरणें | ... | ५९,५०० | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २ सुधारलेलें बीं वाटणें | १,२०,१३८ | ५,२६,८७५ | ५,११,०५० | १,०८,८५० | ... | २,३०,००० | १,९९,६६६ | २,०१,५०० | २,०९,५० |
| ३ खत सुधारणा व पुरवठा | ३,९१,००० | ६,२१,००० | ५४,००० | २,५७,१४० | २,५४,११० | ६०,००० | ३,३८,००० | ३५,२५० | ... |
| ४ पाणीपुरवठा | ९८,२५० | ११,५१,८३० | २,५८,०९५ | ५,३४,५०० | ७,००,००० | ८,७६,९७० | ७४,००० | १,१५,००० | ६,६३,५० |
| ५ जमीन सुधारणा | १,९९,९६६ | ... | ... | ... | ६,००,००० | ... | ७०,११० | ... | ... |
| ६ ताली व कोरडवाहू शेती | ... | १५,००,००० | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७ मासे वाढ | ... | ... | २१,९५० | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ८ संशोधन | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ९ इतर | ४,०१,९०० | ८४,२०० | २,००,००० | २,००० | ... | १,७९,८०० | ... | १,२५,४०० | ... |
| एकूण ( रु. ) | १२,०२,४५५ | ३९,४३,४०५ | १०,४५,०९५ | ९,०२,४९० | १५,५४,११० | १३,४६,७७० | ६,८१,७७६ | ४,८५,१५० | ८,२४,०० |


## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व शूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशी परगांवचे ग्राहकांसहि हलु हलु मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २


## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
कोहिनूर २२-३-४५
अपोलो २६-३-४५

व्याज-वजा ( xd )
बाँबे डाइंग ७-४-४५
नागपूर २३-४-४५
स्वदेशी २७-४-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २०।३।४५ | बुधवार २१।३।४५ | गुरुवार २२।३।४५ | शुक्रवार २३।३।४५ | सोमवार २६।३।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१०१-४ | सार्वजनिक सुट्टी | २०९८-८ | २१०२-८ | २०७६-४ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८८-० | | ३८६-० | ३८८-० | ३८४-८ |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८५७-८ | | १८६२-८ | १८५५-० | १८४२-८ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६२४-० | | ६१५-० | ६१२-० | ६११-० |
| ६५३; ४७५ | २२-०-०S | एप्रिल | स्वदेशी | १०० | ५४४-० | | ५४९-० | ५५०-० | ५४८-० |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३७८-८ | | ३७९-८ | ३८१-० | ३८०-० |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०६-८ | | ३०६-० | ३०६-० | ३०४-० |
| ३९४; २८२ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०४-० | | ३०४-० | ३०४-० | ३००-० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६४-८ | | २६३-० | २६३-० | २६१-० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-०S | मार्च | अपोलो | २ | ४-३-९ | | ४-४-० | ४-०-० | ३-१४-६+ |
| २१-१४; १३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-११-० | | १४-१०-० | १४-१०-० | १४-०-० |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३-१-६ | | ३-१-६ | ३-१-६ | २-१४-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७१२-८ | | ७१३-१२ | ७१५-० | ७१०-० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३१-१२ | | २३१-८ | २३१-८ | २३०-८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२०-८ | | २१९-८ | २१९-८ | २१९-० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५१०-० | | ५१३-१२ | ५२०-० | ५२३-१२ |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८०-४ | | ८०-० | ८०-० | ८०-४ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४-४ | | ३४-२ | ३४-१ | ३३-१४ |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५४-० | | ५३-८ | ५३-८ | ५३-८ |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०-८ | | २०-५ | २०-५ | २०-५ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६७-८ | | ६६-१२ | ६६-१२ | ६६-१२ |
| | | | ३½ रोखे | १०० | ९९-९ | | ९९-९-६ | ९९-९-६ | ९९-९-३ |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
बाँबे डाइंग १६-३-४५ ते २९-३-४५
शिवराजपुर २३-३-४५ ते ७-४-४५
नागपूर २३-३-४५ ते ७-४-४५
स्वदेशी ३१-३-४५ ते १९-४-४५

+ व्याजवजा

दि. २६-३-४५
३% व्हिक्टरी लोन = रु. ९९-१५-०
सोनें ७२-४ चांदी १२८-१२
४% १९६०-७० = रु. ११२-१३-०
कपास ४४८

### खंबाळा येथील ढांगी जनावरांचें प्रदर्शन

नाशिक जिल्ह्यांतील ढांगी जनावरांचें प्रदर्शन, खंबाळा तालुके इगतपुरी येथें मोठ्या प्रमाणावर उघडण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत नाशिक डिस्ट्रिक्ट एज्युकेशन कमेटीच्या विद्यमानें सहकारी स्टॉल मांडण्यात आला होता. सहकारी स्टॉल निरनिराळे नकाशे माहितीचे तक्ते, चित्रें व प्रात्यक्षिकें यांनीं सुशोभित करण्यांत आला होता. सहकारी विभागानें एकूण तीस फूट जागा व्यापली होती. सहकारी विभागाचे प्रामुख्यानें खालीलप्रमाणें तीन भाग पाडण्यांत आले होते.

( १ ) सहकारीदेवी व भांडवलशाहीरूपी राक्षसांचा नाश.
( २ ) मार्केटिंग व फ्रूट ग्रेडींग.
( ३ ) लँड मार्गेज बँकेपासून होणारे फायदे.

त्याबरोबरच संघटित बागाईत, कुंपण घालणें व तसेंच एकत्रित शेती यांपासुन होणारे फायदे दाखविणारीं प्रात्यक्षिकें व त्याविरुद्ध परिस्थिति असल्यामुळें होणारें शेतकऱ्यांचें नुकसान दाखविणारीं प्रात्यक्षिकें जवळ जवळ दाखविलेमुळें त्याचा शेतकऱ्यांचे मनावर फारच इष्ट असा परिणाम झाला. त्याचप्रमाणें निरनिराळीं परिणामकारक पेन्टींग्जही स्टॉलमध्यें ठेवण्यांत आलीं होतीं. एकंदरींत 'को-ऑपरेटिव्ह स्टॉल' फारच प्रेक्षणीक व उद्बोधक असा झाला व सदर स्टॉल पाहून सर्व अधिकाऱ्यांनीं समाधान व्यक्त केलें.

### सातारा जिल्हा को. सुपरवायझर्स असोसिएशन

ता. ११-२-४५ रोजीं सातारा जि. को. सुपरवायझर्स असोसिएशनची सभा कराड येथें युनियनचे ऑफिसमध्यें श्री. जी. एम्. शिंदे, सुपरवायझर बोरगांव को. सु. यूनियन, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

सदर सभेंत सुपरवायझर यांना नियमितपणें पगारवाढ मिळाली नाहीं ती मिळणेबद्दल, तसेंच हल्लींच्या परिस्थितींत मिळणारा कायम भत्ता व महागाई भत्ता फारच अपुरा असून तो वाढवून मिळण्याबद्दल प्रांतिक बोर्डकडून दाद मिळवून घ्यावी अशाबद्दल मुख्य ठराव पास झाले. तसेंच सोसायट्यांकडे धान्य, साखऱ्या, रॉकेल वगैरे वाटणीचे दिलेल्या कामाबद्दल योग्य तो मोबदला सेक्रेटरी व सुपरवायझर यांना मिळणेबद्दल ठराव पास झाले. सदर असोसिएशननें सन १९४४-४५ सालाकरतां खालील कार्यकारी मंडळ निवडलें आहे:—

रा. जी. एम. शिंदे, सुपरवायझर बोरगांव युनियन
रा. आर. के. पाटोळे, „ सातारा „
रा. एच. आर. पाटील, „ कराड „
रा. डी. एन. कुळकर्णी, „ तासगांव „
रा. के. एल. कासार, „ येलूर „

तसेंच सन १९४४-४५ सालाकरितां चेअरमनचे जागीं रा. के. एल. कासार, सुपरवायझर येलूर को. सु. यूनियन व सेक्रेटरीचे जागीं रा. एम्. ए. काणे, सुपरवायझर, सातारा जावळी को. सु. युनियन यांचीं निवड झाली आहे.

### रौप्य ज्युबिली

अर्बन को. क्रेडिट पतपेढी लि., इचलकरंजी ह्या संस्थेचा रौप्य ज्युबिली समारंभ ता. २८-२-४५ रोजीं कोल्हापूरचे महसूल मंत्रि ना. भास्करराव जाधव ह्यांचे अध्यक्षतेखालीं श्रीनारायण समागृहांत पार पडला.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेंक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४९१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. १५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. १३,२५,०००
भरलेलें भांडवल :: रु. १३,११,५००

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७२ लक्ष

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | २३ नाशिक ( जि. नाशिक ) |
| २ नीरा „ | २४ लासलगांव „ |
| ३ सातारा ( जि. सातारा ) | २५ मालेगांव „ |
| ४ कऱ्हाड „ | २६ नांदगांव „ |
| ५ किर्लोस्करवाडी „ | २७ घोटी „ |
| ६ कोरेगांव „ | २८ सटाणा „ |
| ७ इस्लामपूर „ | २९ येवलें „ |
| ८ शिराळें „ | ३० धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ तासगांव „ | ३१ दोंडाईचें „ |
| १० वाई „ | ३२ नंदुरबार „ |
| ११ भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ साक्री „ |
| १२ कल्याण „ | ३४ शहादें „ |
| १३ पालघर „ | ३५ शिरपूर „ |
| १४ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिंदखेडें „ |
| १५ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | ३७ तळोदें „ |
| १६ बेलापूर रोड „ | ३८ दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १७ कोपरगांव „ | ३९ गोधा „ |
| १८ पाथर्डी „ | ४० झालोद „ |
| १९ राहुरी „ | ४१ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २० शेवगांव „ | ४२ नडियाद ( जि. खेडा ) |
| २१ वांबोरी „ | ४३ आनंद „ |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ४, एप्रिल १९४५. अंक १४

## —: साठे बिस्किटें :—

**ऑरेंज व स्ट्रॉबेरी**

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तस-तशी परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,७८,८५,५५० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणेक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर

बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण

## महाराष्ट्र भुवन

**लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय**

बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

## सांडू टोमॅटो कम्पाउन्ड

( ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त )

स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्टस् व ड्रगिस्टस्.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

## विविध माहिती

### चहाच्या वांटणीची व्यवस्था

हिंदुस्थान, सीलोन आणि पूर्व आफ्रिका ह्यांतून निर्गत होण्याजोगा सर्व चहा संयुक्त राष्ट्रांसाठी विकत घेण्याची व्यवस्था पुरी झाली आहे. हा चहा संयुक्त व तटस्थ राष्ट्रें ह्यांत वांटून दिला जाईल. युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत ब्रिटिश घाऊक व्यापारी फर्म्सनीं २ अब्ज, २० कोटि पौंड चहाचा व्यवहार केला आहे.

### स्त्री ऑनररी ऑर्गनायझर

सहकारी ऑनररी ऑर्गनायझर म्हणून अहमदनगर शहरासाठी सौ. चंपूताई साठये व धुळें शहरासाठी सौ. सुशिलाबाई रानडे ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. नेमणुकीची मुदत ३० जून, १९४६ अखेर आहे. मागील वर्षी नेमलेल्या स्त्री-ऑर्गनायझर्सच्या नेमणुकीची मुदत वाढविण्यांत आली आहे.

### वेस्टर्न इंडिया बिल्डर्स असोसिएशन

वरील असोसिएशनची वार्षिक साधारण सभा नुकतीच भरली होती, तींमध्यें १९४५ सालाकरितां श्री. एन. जी. (नानूकाका) रानडे हे अध्यक्ष व श्री. जे. व्ही. दातार हे सेक्रेटरी निवडण्यांत आले. असोसिएशनचें वार्षिक जेवण मुंबई येथें ताजमहाल हॉटेलांत ता. २९ रोजीं झालें.

### खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन

खादी व ग्रामोद्योग प्रदर्शन पुणें येथें ता. ६ ते १२ एप्रिल अखेर भरविण्यांत येणार आहे, त्याचा उद्घाटन समारंभ श्री. जे. सी. कुमाराप्पा हे करतील.

### चार्ली चॅपलिनच्या मिशा जाणार !

चार्ली चॅपलीन आपल्या नव्या बोलपटाची तयारी करीत आहे, त्याची कथा तोच स्वतः लिहीत आहे. बोलपटाचें दिग्दर्शनहि तोच करील व मुख्य नटहि तोच होईल. त्याच्या सुप्रसिद्ध मिशा, गवाळी विजार व बांकडी काठी हीं ह्या बोलपटांत दिसणार नाहींत.

### सुएझचा कालवा सुरक्षित

बॉंबहल्ले व सुरुंगपेरणी ह्यांचा पुष्कळ उपद्रव झाला, तरी सुएझच्या कालव्यांत युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत फक्त तीनच आगबोटींचा शत्रूस बळी घेतां आला, अशी पॅरिसची बातमी आहे.

### सिमेंटचा प्रचंड कारखाना

जाफना द्वीपकल्पांत उच्च प्रतीची चुनखडी फार मोठ्या प्रमाणांत असल्याचें आढळल्यावरून तेथें ८॥ कोटि रुपयांचा भांडवली खर्च असणारा एक सिमेंटचा कारखाना काढण्याचा सीलोन सरकारचा विचार आहे. युद्धपूर्व सीमेंटच्या सीलोनमधील आयातीची सरासरी प्रतिवर्षी ७०,००० टन होती.

### सायकलींच्या पाठीमागें तांबडा दिवा

सायकलींच्या मागील बाजूस रात्रीचेवेळीं तांबडा दिवा जळत ठेवणें आवश्यक करणारें एक बिल ब्रिटिश पार्लमेंटमध्यें सरकारनें मांडलें आहे, त्याचें दुसरें वाचन नुकतेंच मंजूर झालें. सायकलवाल्यांचा ह्या बिलास कसून विरोध आहे. मोटारवाले सायकलींच्या तांबड्या दिव्याचे अनुरोधानें अधिकच निष्काळजीपणानें बेफाम मोटारी हाकूं लागतील व सायकलवाल्यांचा जीव धोक्यांत येईल, असें त्यांचें म्हणणें आहे. अपघाताचेवेळीं तांबडा दिवा विझून जाणें अगदीं शक्य आहे. असें झाल्यावर, दिवा तेवत होता कीं नव्हता, हा वादग्रस्त प्रश्न उपस्थित होईल व मोटारवाल्याच्या शब्दावरच विश्वास ठेवला जाईल, अशी त्यांस भीति वाटत आहे.

### बहुपत्नीकत्वावर आणि घटस्फोटावर बंधन

बहुपत्नीकत्वावर आणि घटस्फोटावर बंधनें घालण्याचा प्रश्न इजिप्तमध्यें परत एकदां पुढें आला आहे. त्यासंबंधीं नवीन कायदे होऊं घातले आहेत. न्यायाधीशाच्या संमतीवांचून, एक पत्नी असतांना दुसऱ्या स्त्रीशीं लग्न करतां यावयाचें नाहीं. घटस्फोट घ्यावयाच्या आधीं पति-पत्नीमध्यें सलोखा घडवून आणण्याचे प्रयत्न न्यायाधीशाकडून केले जातील. न्यायाधीशाच्या संमतीवांचून घटस्फोट केल्यास तुरुंगवासाची किंवा दंडाची शिक्षा देण्यांत येईल.

### मिडलंड बँक लि. चे भागीदार व त्यांचें भांडवल

ब्रिटिश बँकांत ब्रिटिश मोठ्या जिंदगीच्या, वरील प्रचंड बँकेच्या भागीदारांची संख्या ७८,००० आहे. प्रत्येक भागीदारानें भरलेल्या भांडवलांची सरासरी रकम सुमारें २,९०० रुपये आहे व त्यावर त्यास दरसाल सुमारें ४५० रुपये डिव्हिडंड (कर वजा करावयाचा) मिळतें. प्रत्येकीं १,५०० रुपयांपेक्षा कमी भांडवल असणाऱ्या भागीदारांची, संख्या ४०,००० आहे. चाळिसांत एक भागीदार १५,००० रुपयांपेक्षा जास्त भांडवलाचा मालक आहे.

### टेलिफोनवरील बोलण्यावर सरकारी देखरेख

लष्करी योजना म्हणून, लोकांचीं टेलिफोनवर चालणारीं बोलणीं ऐकलीं जातील, असें मद्रास सरकारनें जाहीर केलें आहे. निष्काळजीपणानें किंवा अन्य कारणानें लष्करी दृष्ट्या अनिष्ट बातचीत करणाराचा टेलिफोन तोडून टाकण्यांत येईल व त्यावर खटला भरला जाईल.

### तारेचे नवे दर

| | |
|---|---|
| पहिले ९ शब्द | १३ आणे |
| पुढील प्रत्येक शब्द, प्रत्येकीं : | १ आणा |
| एक्सप्रेस तार : | ऑर्डिनरी तारेच्या दुप्पट. |

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९

अर्थ

## इंजिनिअर्सचा दृष्टिकोन व्यापक असण्याची आवश्यकता

"परदेशी माल आयात करणारे हस्तक बनूं नका"

### श्री. सी. बा. जोशी ह्यांचे निर्भीड विचार

मेकॅनिकल इंजिनिअर्स असोसिएशन (इंडिया) ह्या संस्थेची २५ वी (रौप्य ज्युबिली) वार्षिक परिषद् मुंबई येथें गेल्या महिन्यांत भरली होती. इंजिनिअर्सच्या संघटनेंत उत्साहानें भाग घेणारे राष्ट्रीय वृत्तीचे इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर श्री. सी. बा. जोशी हे परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या भाषणांत, इंजिनि. अर्सच्या कार्यक्षेत्रासंबंधीं काढलेले उद्गार अत्यंत महत्त्वाचे आहेत. केवळ विलायती पदवीच्या किंवा सरकारी नोकरीच्या भांडवलावर उत्कर्ष पावणाऱ्या इंजिनिअरांतहि श्री. जोशी ह्यांनीं स्वतःच्या व्यवसायांतील कार्यक्षमता व राष्ट्रीय वृत्ति ह्यांच्या जोड गुणामुळें अत्यंत मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. त्यांचे विचार निर्भीड, राष्ट्रीय हितास पोषक व कांहींसे अप्रिय असले तरीं ते पथ्यकारक असेच आहेत.

### परदेशी पदव्यांचें स्तोम

श्री. जोशी ह्यांनीं मेकॅनिकल इंजिनिअर्सच्या परिषदेंत भाषण केलें असलें, तरी त्यांच्या उद्गारांस व्यापक महत्त्व आहे. सरकार व जनता ह्या दोघांसहि इंजिनिअर्सच्या कार्याचें महत्त्व पटलें पाहिजे; परंतु "आम्हांस महत्त्व द्या" असें म्हणून केवळ भागणार नाहीं; आपण चालू प्रश्नांवर आपल्या दृष्टीनें आपले विचार निर्भीडपणें व्यक्त केले पाहिजेत व आपल्या सूचना पुढें मांडल्या पाहिजेत; सरकार व जनता ह्या दोघांसहि आपण भितां कामा नये, असें श्री. जोशी ह्यांनीं सांगितलें. कारखाने व गिरण्या ह्यांतील कार्यक्षमता वाढण्याचे दृष्टीनें संशोधनास केवढा प्रचंड वाव आहे व मोठाल्या कारखान्यांतील कामगारांच्यासाठीं विशिष्ट ट्रेनिंग योजना अंमलांत आणणें कसें आवश्यक आहे, हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें. "इंजिनिअर (त्याला कितीहि परदेशी पदव्या असोत) कच्चा असेल, तर त्याच्यामध्यें चौकसपणा व संशोधनवृत्ति निर्माण होणें अशक्य आहे. त्यानें सर्व काम हातानें केलेलें असेल, तर गोष्ट वेगळी. परदेशांत शिक्षणासाठीं एंजिनिअरांनीं जाऊं नये, असें मी म्हणत नाहीं; परंतु प्रत्यक्ष काम करीत असलेल्या तज्ञ नोकरांना विलायतेस पाठविणें अधिक श्रेयस्कर होईल" हे श्री. जोशी ह्यांचें म्हणणें मेकॅनिकल एंजिनिअर्सप्रमाणें इतरांसहि उद्देशून आहे. परदेशी पदव्यांचें स्तोम इंजिनिअरिंगप्रमाणें इतर व्यवसायांतहि माजलेलें असल्याकारणानें, त्यासंबंधांतील श्री. जोशी ह्यांचे विचार अधिक विस्तारानें स्पष्ट करणें आवश्यक आहे.

### शिक्षणक्रम तोच; महत्त्व अवास्तव

इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्सच्या मुंबई शाखेतर्फे एक शिष्टमंडळ मुंबई सरकारच्या पी. डब्ल्यू. डी. चे त्यावेळचे मंत्री, मि. नूरी, ह्यांस भेटावयास कांहीं वर्षांपूर्वी गेलें होतें. त्याचा हेतु, परदेशी पदव्यांना अकारण महत्त्व देऊन त्यांना देशी विश्वविद्यालयाच्या पदव्यांपेक्षा जास्त मानूं नये ही गोष्ट सरकारचे ध्यानांत आणणें, हा होता. शिष्टमंडळांत मुंबई म्युनिसिपॅलिटीचे इंजिनियर, श्री. एन. व्ही. मोडक, मि. पी. ई. गोलवाला, दिवाण बहादूर शेटे व श्री. सी. बा. जोशी ही मंडळी होती.

इंजिनिअरिंग शास्त्रामध्यें परदेशांत प्रत्यक्ष कारखान्यांतून, कामावर व मोठाल्या फर्ममध्यें पुष्कळच शिकण्यासारख्या गोष्टी आहेत, परंतु आपली तरुण मंडळी हिंदुस्थानांतील शिक्षणक्रम पुरा करून पुन्हा तोच शिक्षणक्रम विलायतेंत शिकून तेथील पदव्या घेऊन येतात, असेंच बहुधा घडतें. उदाहरणार्थ, मुंबई विश्वविद्यालयाची बी. ई. परीक्षा पास झाल्यावर पुन्हां लंडनला बी. एससी. इंजिनीअरिंग शिकण्यास जाणें, ह्यांत काळाचा व पैशाचा अपव्यय होतो. परंतु आपलेकडे आपले कारखानदार, व्यापारीवर्ग व सरकार विलायती पदव्यांना अवास्तव महत्त्व देत असल्यामुळें चांगली नोकरी मिळण्यास त्याचा उपयोग होतो. राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांतहि अशा प्रवृत्तीचीं माणसें सांपडतात. सिव्हिल इंजिनीअरिंगमध्यें परदेशांत बी. एससी. होण्यासारखें कांहींहि नाहीं, असें शिक्षणक्रमाची तुलना करून दाखवितां येतें. यापुढेंहि विनाकारण विलायतेंत शिक्षण घेण्याची प्रवृत्ती वाढणार असें दिसते. तरी यास आळा घालणें जरूर आहे. इकडे मिळणारें सर्व शिक्षण घेऊन, येथें कांहीं दिवस काम करून मग पुढील शिक्षणास तेथील वर्कशॉप्समध्यें गेले तर योग्य होईल व आपले विद्यार्थ्यांना तशा सवलती मिळवून देणें हें सरकारचें व व्यापाऱ्यांचें काम आहे. यंत्रसामुग्री वगैरे माल आयात करतांना आमची माणसें उमेदवार म्हणून घेतलीं पाहिजेत अशी अट तेथील कारखानदारांस घालतां येईल.

### परिस्थितीस अनुसरून योजना करा

जागतिक व्यापारास लागत असलेल्या वळणाचा आपण विचार करावयास नको काय? ग्रेट ब्रिटन निर्गत व्यापार वाढविण्याची पराकाष्ठा करीत आहे, तर हिंदुस्थानांत मालाच्या आयातीबद्दल चिंता लागून राहिली आहे! आयात होणारा माल उत्कृष्ट दर्जाचा व अद्यावत् प्रकारचा असेल, ह्यासंबंधीं एंजिनिअर्सनीं दक्षता बाळगली पाहिजे, असा श्री. जोशी ह्यांनीं इशारा दिला आहे. आयात होणाऱ्या इंजिनिअरिंग विभागापुरताच आपला संबंध मर्यादित न करतां, स्वदेशाच्या खऱ्या हिताचें संवर्धन कसें होईल, ह्याकडे आपण लक्ष पुरविलें पाहिजे, असा ह्या बाबतींत त्यांचा सल्ला आहे. केवळ आयात करणारे इंजिनिअर्स म्हणून रहाणें आपणांस भूषणावह नाहीं. आयात करतांना डोकें वापरलें पाहिजे व आपल्या गिऱ्हाइकांच्या गरजेप्रमाणें किफायतशीरपणें आपण उत्पादन केलें पाहिजे असें त्यांनीं कळकळीनें सांगितलें. हिंदुस्थानांतील मोठ्या लोकसंख्येस काम मिळेल, ह्या दृष्टीनें खेडेगांवीं लहान प्रमाणावर कारखाने व धंदे ह्यांस चालना देतां येईल; स्वस्त विजेच्या पुरवठ्यानें ह्यांस सहाय होईल परंतु विजेच्या उत्पादनास व वापरास लागणारें साहित्य स्वदेशांत तयार झालें पाहिजे, हा श्री. जोशी ह्यांचा आग्रह योग्य असाच आहे.

### राष्ट्रीय वृत्ति व विचारसरणी

इंजिनिअर्सनीं व्यापक राष्ट्रीय वृत्तीनें आपल्या व्यवसायाकडे पाहिले पाहिजे; परदेशी मालाची आयात वाढविण्यास सहाय करणारे केवळ हस्तक त्यांनीं बनतां कामा नये; यंत्रसामुग्रीच्या उपयोगाचा देशास अधिकांत अधिक फायदा कसा होईल, ह्याकडे त्यांनीं लक्ष पुरविलें पाहिजे आणि ह्यासंबंधीं सरकारवर किंवा जनतेवर टीका करण्याची आवश्यकता असल्यास निर्भीडपणें ती केली पाहिजे, हें श्री. जोशी ह्यांच्या भाषणाचें सार आहे. एंजिनिअर्सच्या बैठकीमधील तें भाषण आहे, हें त्याचें विशेष महत्त्व आहे. इंग्लंडमधील अशाच प्रकारच्या परिषदांतून होणाऱ्या भाषणांत निर्गत व्यापार, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांतील परिस्थिति, वगैरे प्रश्न जिव्हाळ्याचे म्हणून चर्चिले जातात. श्री. जोशी ह्यांनीं आपल्या विशिष्ट स्थानावरून काढलेल्या उद्गारांकडे "हा प्रश्न आपल्या कक्षेंतील नाहीं" असें म्हणून सोइस्करपणें दुर्लक्ष केलें जाऊं नये, एवढ्याच दृष्टीनें ब्रिटिश परिषदांचा उल्लेख येथें केला आहे.

### रस्तेवाढीच्या धोरणाबद्दल साशंकता

परिषदेचें उद्घाटन मुंबईच्या गव्हर्नरांचे एक सल्लागार, मि. जी. एफ. एस. कॉलिन्स, ह्यांनीं केलें. मुंबई प्रांतांतील विशिष्ट अडचणींकडे त्यांनीं परिषदेचें लक्ष वेधणें स्वाभाविकच होतें. आपल्या अखेरच्या भाषणांत त्यांनीं स्वागताध्यक्ष, श्री. जोशी, ह्यांनीं केलेल्या अनेक सूचनांचा उल्लेख करून त्यांपैकी सोइस्कर तेवढ्या सूचनांचा परामर्श घेतला. अधिवेशनाचे अध्यक्ष, मि. टी. आर. एस. किनरर्स्ली ह्यांनीं आपल्या भाषणांत रस्ते व वहातुकीचे मार्ग ह्यांच्या आवश्यकतेवर विशेष भर दिला. रस्त्यांच्या वाढीसंबंधांतील विचारांची पार्श्वभूमि लक्षांत घेण्यासाठी, सुमारें पाच वर्षांपूर्वी ह्या विषयावर झालेल्या एका चर्चेकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. त्यावेळीं रबरी धावांचा प्रचार सुरू झाला होता परंतु युद्धसमाप्तीनंतर तो पुनः सुरू होईल असें दिसतें.

१९३९ सालीं मुंबई येथें भरलेल्या "इंडियन रोड काँग्रेस" च्या अधिवेशनांत बिहारचे सुपरिंटेंडिंग इंजिनिअर मि. मरेल ह्यांनीं ऑस्ट्रेलियांतील व हिंदुस्थानांतील रस्त्यांचें तौलनिक परीक्षण ह्या विषयावर एक निबंध वाचला होता. "सर्व बैलगाड्यांची नोंद करून, लोखंडी धावा वापरणारावर जबर कर ठेवावा. रबरी धावा वापरणारांस आर्थिक सहाय करावें व अशा रीतीनें लोखंडी धावा वापरणाऱ्या बैलगाड्यांचा नायनाट करण्याकरितां सरकारनें, सर्व इंजिनियर लोकांनीं व मोटारीच्या असोसिएशन्सनीं कंबर कसावी. अशा रीतीनें सुरवात झाल्यावर, बैलांचा अंत फार लांब नाहीं. बैलगाड्यांना निराळे स्वस्त रस्ते तयार करून देऊन बैलगाड्यांचें आयुष्य वाढविण्याचें पाप कोणींहि करूं नये." अशा आपल्या विचारसरणीला अनुसरून, हिंदुस्थान सरकारला शिफारस करणारा ठराव मि. मरेल ह्यांनीं सभेपुढें मांडला. विषय चर्चेला ठेवल्याबरोबर, श्री. सी. बा. जोशी ह्यांनीं निबंधांतील विचारसरणीला विरोधदर्शक असें सडेतोड भाषण केलें. ते म्हणाले, "काँक्रीटचे रस्ते, डांबरी रस्ते, वगैरे खार्चिक रस्ते मोटारी आल्या म्हणून आपणांस करावे लागतात. त्याबद्दल, बैलगाड्यांस 'कर' रूपानें भुर्दंड, हा कोठला न्याय! युरोपियन इंजिनिअरांनीं ध्यानांत ठेवावें, कीं आम्हीं त्यांचेकडे साशंक दृष्टीनें पहातों. त्यांचें मनांत ब्रिटिश माल हिंदी खेड्यांत जलदीनें पोचविण्याचा विचार तर प्रामुख्यानें नसेलना? मी तोंडावर बोलतों. इतर तुमचे पाठीमागें असेंच म्हणत असतील." मि. मरेल ह्यांनीं आपल्या निबंधांतील बैलांचें उच्चाटन करण्याचे बाबतींत लिहिलेल्या मजकुराबद्दल खेद व्यक्त केल्यावर, श्री. जोशी ह्यांच्या उपसूचनेस अनुसरून ठराव मंजूर झाला. केवळ राजकीय दृष्ट्या पुढाऱ्यांनीं सरकारी धोरणावर टीका करणें व आंतील माहिती असणाऱ्या व प्रत्यक्ष परिचय असणाऱ्या तज्ञ व्यवसायी मनुष्यानें प्रतिकूल वातावरणांतहि स्पष्ट उद्गार काढणें, ह्यांत फार फरक आहे. यांत्रिक गोष्टींकडे पहातांना केवळ तांत्रिक दृष्टी उपयोगी नाहीं; त्याची व्यापक राष्ट्रीय आर्थिक बाजूहि लक्षांत घेतली पाहिजे, हा श्री. जोशी ह्यांचा आग्रह कृतींत उतरविण्याची शक्ति आपल्या लोकांत आली पाहिजे.

### विमुक्त ब्रह्मदेशांत पुनः व्यापारधंद्याला आरंभ

ब्रह्मदेशाचा कांहीं भाग आतां जपानी राक्षसांच्या तडाख्यांतून विमुक्त झालेला असून त्या विभागांतील मानवता आतां फिरून विकसित होऊं लागलेली आहे. शत्रूला हाकून देत असतांना तेथें बराच बॉंबवर्षाव करावा लागला होता नि त्यामुळें बऱ्याचशा घरांची नासधूस झालेली होती. पण जपानी आतां कायमचे गेले आहेत याची खात्री पटल्यामुळें येथील जनतेचा उत्साह बराच वाढलेला असून त्यांनींच आपापलीं घरें पुनः नीट करण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. लहान लहान कारखानेहि पुनः उभे होत आहेत. तालुका पेठ्यांतील मंड्या पुनः चालू झालेल्या आहेत. फळें, भाज्या, अंडीं वगैरे मंड्यांतून विकलीं जात आहेत. 'बर्मा चिरूट' हि मंडईत दिसूं लागला आहे. संथपणानें तेथील जनता पुनः आपल्या मानवी जीविताकडे वळली असल्याचें दिसूं लागलें आहे.


**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

**तारीख १ एप्रिल १९४५ पासून**

—या बँकेच्या शाखा—

**बारामती व निरा**

येथें सुरू झाल्या आहेत. त्या भागांतील सहकारी संस्थांनीं व व्यापारी मंडळींनी या शाखांचा उपयोग करून घ्यावा अशी विनंती आहे.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर
पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

# स्फुट विचार

## लॉर्ड वेव्हल ह्यांची इंग्लंडला भेट

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, ब्रिटिश मंत्रिमंडळाशीं विचार-विनिमय करण्यासाठीं लंडनला जाऊन पोहोचले आहेत. ह्या भेटीचा उद्देश आणि तीमध्यें व्हावयाची चर्चा ह्यांचेसंबंधांत अपेक्षामय कुतूहल उत्पन्न झालें आहे. युरोपमधील युद्ध संपण्याचा क्षण जवळ येत चालला असून जपानशीं व्हावयाच्या निर्णायक सामन्यास आतां रंग चढावयाचा आहे. पूर्व एशियांतील ह्या युद्धांत हिंदुस्थानास लढाऊ साधनें पुरवण्याचें कार्य मोठ्या प्रमाणावर करावें लागणार आहे हें उघड आहे. ह्या देशाच्या आर्थिक परिस्थितीवर युद्धाचा परिणाम आजवर काय झालेला आहे हें सुप्रसिद्धच आहे. व्हाइसरॉय म्हणून इकडे येण्यास निघण्याचे सुमारास लॉर्ड वेव्हल ह्यांनीं सैनिक व युद्धसामुग्री पुरवण्यांत हिंदुस्थाननें केवढी महत्त्वाची कामगिरी चालवली आहे ह्याविषयीं धन्यतापूर्वक उल्लेख करून हिंदी जनतेनें सोसलेल्या आर्थिक बोजाविषयीं सहानुभूतियुक्त उद्‌गार काढले होते. चलनविस्तार, महर्गता, अन्नवस्त्रादिकांची टंचाई वगैरेंच्या स्वरूपांत हिंदुस्थाननें केलेल्या अपूर्व स्वार्थत्यागाची कल्पना त्यांचे उद्‌गारांत प्रतीत झाली होती. जपानशीं व्हावयाच्या ह्या पुढील निकराच्या युद्धांत हिंदी आर्थिक व्यवस्थेवर आणखी दुःसह असा ताण पडूं नये ह्याविषयीं काळजी घेणें अत्यंत अगत्याचें असून त्यासंबंधांत काय तजवीज करावी ह्याची चर्चा मुख्यत्वेंकरून लॉर्ड वेव्हल ब्रिटिश मंत्रिमंडळाशीं करतील असें वाटतें. युद्धसामुग्री आणि इतर माल ह्यांचा पुरवठा इंग्लंडनें मोठ्या प्रमाणावर केल्यास चलनविस्तार, स्टर्लिंग शिलकांत वाढ, महागाई, लोकांच्या जीवितास लागणाऱ्या वस्तूंची टंचाई इत्यादि अडचणी दूर किंवा निदान कमी जाचक झाल्याविना रहाणार नाहींत. ह्या भूमिकेवर लॉर्ड वेव्हल वाटाघाट करतील असें मानण्यास जागा आहे. हिंदी राजकारणांतील लढा मिटवण्याबाबतहि कांहीं विशिष्ट योजना ते निश्चित करून येतील अशी ह्या देशांत व इंग्लंडमध्यें अपेक्षा आहे तीहि सर्वस्वी निराधार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं.

## अर्थकारण आणि राजकारण

निकडीचे व बिकट आर्थिक प्रश्न हिंदुस्थान सरकारपुढें दत्त म्हणून उभे आहेत आणि ते समाधानकारक रीतीनें सुटण्यास आणि जपानचा पूर्ण पराभव त्वरित केला जाण्यास लागणारें ह्या देशाचें सहाय व्यवस्थितपणानें दिलें जाण्यास येथील राजकीय परिस्थिति सुधारण्याचें महत्त्व लॉर्ड वेव्हेल ह्यांस खचित वाटत असलें पाहिजे आणि ते आपलें म्हणणें मि. एमरी व ब्रिटिश मंत्रिमंडळ ह्यांस पटविण्याची शिकस्त केल्यावाचून राहणार नाहींत. सॅन फ्रॅन्सिस्कोच्या परिषदेंत हिंदुस्थानास योग्य स्थान मिळणें आणि ह्या देशाची बाजू तीमध्यें स्वतंत्र रीतीनें मांडली जाणें अगत्याचें आहे ह्याची जाणीव त्यांस असलीच पाहिजे. अलीकडे मध्यवर्ती असेंब्लींत सरकारचे एका मागून एक पराभव झाले आहेत, ही गोष्ट नेहमीच्या अनुभवाची असली तरी त्यांचा प्रतिकूल परिणाम अमेरिकन मतावर झाल्यावांचून राहावयाचा नाहीं ह्याची कल्पना त्यांस आहे. प्रांतिक मंत्रिमंडळांत चाललेल्या घडामोडी ह्यासंबंधांत अर्थपूर्ण आहेत. सर्व प्रांतांत आणि मध्यवर्ती राज्यकारभारांत लोकनियुक्त मंत्रिमंडळें असण्याची आवश्यकता, युद्धप्रयत्नाची कार्यक्षमता आणि युद्धोत्तर पुनर्घटना ह्यांचे दृष्टीनें तीव्रतेनें भासत आहे. आर्थिक पुनर्रचना राष्ट्रीयवृत्तीच्या व लोकनियुक्त मंत्र्यांचे हातूनच पार पडूं शकेल असें हिंदी धंदेवालेच केवळ प्रतिपादित नसून प्रत्यक्ष सर आर्देशीर दलालहि तसा अभिप्राय व्यक्त करीत आहेत. ब्रिटिश वृत्तपत्रें लॉर्ड वेव्हेल ह्यांच्या इंग्लंडमध्यें चाललेल्या वाटाघाटीस राजकीय महत्त्व देत आहेत त्यावरून ब्रिटिश सरकारनें हिंदी राजकारणाचा डाव कुजत पडूं देऊं नये आणि विधायक कृतीनें तो पुढें चालू करावा अशी भावना इंग्लंडमध्यें दृढ होत आहे असें दिसतें. ह्यासंबंधांत लॉर्ड वेव्हेल यांनीं कित्येक जबाबदार हिंदी पुढाऱ्यांशीं विचारविनिमय केला असून त्यामधून निष्पन्न झालेली योजना ब्रिटिश मंत्रिमंडळापुढें मांडण्यासाठीं बरोबर नेली आहे अशा प्रसिद्ध झालेल्या बातमींत तथ्य असो व नसो, हिंदी अर्थकारण राजकारणापासून आतां अलिप्त ठेवणें शक्य वा इष्ट नाहीं ह्याविषयीं येथील व इंग्लंडमधील राज्यकर्त्यांची खात्री पटत चालली असली पाहिजे. इंग्लंडमध्यें पार्लमेंटच्या निवडणुकी व्हावयाच्या असून तेथें निरनिराळे पक्ष आपापलीं उद्दिष्टें व कार्यक्रम पुढें मांडू लागले आहेत. अशा परिस्थितींत हिंदुस्थानांतहि नव्या निवडणुकी होणें व जबाबदार मंत्रिमंडळांनीं राज्यकारभार करणें ह्या गोष्टी ओघानेंच प्राप्त होतात. राज्यघटनात्मक फेरफार होण्याची शक्यता कल्पण्यांत फाजील आशावाद दृग्गोचर होत असला तरी हिंदुस्थानांतील आर्थिक परिस्थिति व भावी घटना ह्यांस योग्य वळण लागण्यास राजकीय क्षेत्रांतील प्रगति अपरिहार्य आहे ह्यांत शंका नाहीं. जागतिक घडामोडींचा परिणाम त्याच दिशेनें झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

## कंपन्यांच्या भांडवल उभारणी-अर्जांतील प्रश्नसंख्या वाढली

कंपन्यांना नवी भांडवल उभारणी सरकारच्या पूर्वसंमतीशिवाय करतां येत नाहीं. ही संमति मिळविण्याकरितां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली ह्या पत्त्यावर कांहीं ठराविक प्रश्नांची माहिती देऊन अर्ज करावा लागतो. ह्या प्रश्नांची यादी ऑगस्ट, १९४३ मध्येंच प्रसिद्ध झालेली आहे, त्यांस आणखी कांहीं प्रश्नांची जोड देण्यांत आली असल्याचें नुकतेंच जाहीर झालें आहे. मूळ प्रश्न ४ ( अ ) हा नियोजित उद्योगधंद्याच्या स्वरूपासंबंधीं आहे. "कंपनीच्या मेमोरॅंडममधील उद्देशांकडे केवळ बोट दाखवून आतां चालणार नाहीं." धंदा कोठें चालविणार, ह्या "४ ( ब ) प्रश्नाचें उत्तर देतांना कंपनीच्या मुख्य कचेरीचा पत्ता न देतां कारखान्याची जागा वगैरेचा तपशील दिला पाहिजे." ५ ( अ ) प्रश्नांत "मॅनेजिंग एजंटस" ची भर आतां घातली आहे व "त्यांचीं नांवें, पत्ते वगैरे दिलीं पाहिजेत." शेअर्स, डिबेंचर्स इत्यादींच्या स्वरूपांत उभारावयाच्या रकमेचा तपशील ( ऑर्डिनरी, प्रेफरन्स, डिफर्ड इ. ) ६ व्या प्रश्नानें विचारला आहे. "प्रत्येक प्रकारच्या शेअरचे मदतदानाचे हक्क तपशीलवार द्या" अशी आतां त्यासंबंधांत मागणी करण्यांत आलेली आहे. ८ व्या प्रश्नास ( ड ) म्हणून खालील नवे प्रश्न जोडण्यांत आले आहेत. "भांडवली मालाचे संबंधांत चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टसकडे रजिस्ट्रेशनसाठीं अर्ज केला आहे काय ? रजिस्ट्रेशन झालें आहे काय ?" रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळालें असल्यास त्याची तारीख व नंबर हीं नमूद केलीं पाहिजेत. भांडवल उभारणीसाठीं जुन्या-नव्या कंपन्यांनीं केलेल्या अर्जांच्या विचारास विलंब लागू नये, ह्या दृष्टीनें प्रश्नमालिकेंतील वाढ हितसंबंधी लोकांच्या नजरेस येणें आवश्यक आहे.

## मुंबई सरकारच्या उत्पन्न-खर्चातील युद्धकालीन वाढ

( आकडे हजार रुपयांचे आहेत. )

| | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|
| १९३९–४० | १२,८३,२७ | १२,१४,२२ |
| १९४०–४१ | १३,६०,८१ | १४,४८,२१ |
| १९४१–४२ | १५,२५,३८ | १६,८६,२९ |
| १९४२–४३ | १७,७८,७८ | १९,७०,३१ |
| १९४३–४४ | २१,५०,०० | २४,८९,६६ |
| १९४४–४५ (दुरुस्त अंदाज) | ३१,९२,५९ | ३१,१२,२७ |
| १९४५–४६ ( अंदाज ) | २९,०८,९५ | २९,०९,१९ |

### कापडाची टंचाई

अन्नाच्या दुर्मिळतेनें बंगालमध्यें लक्षावधि बळी घेतल्यानंतर त्यासंबंधांतली परिस्थिति ताळ्यावर आली. आतां त्याच प्रांतांत कापडाच्या टंचाईची ओरड ऐकूं येत आहे. अन्नपुरवठ्याच्या तुटवड्याचे बाबतींत बंगाल सरकारची अव्यवस्था व कार्यक्षम नियंत्रणात्मक धोरणाचा अभाव हीं कारणें जबाबदार असल्याविषयीं तक्रार झाली होती. मध्यवर्ती सरकारावर ह्या घोटाळ्याची जबाबदारी टाकून स्वतः मोकळें होण्याची बंगाल सरकारची प्रवृत्ति त्यावेळीं दिसून आली. मध्यवर्ती सरकारच्या अन्नमंत्र्यांनीं आपण बंगालला केलेली मदत अनेक वेळां स्पष्ट करून सांगितली आहे. कापडाच्या पुरवठ्याचें असेंच झालें आहे. बंगालच्या वाट्यास येणारें कापड त्या प्रांतास पुरवण्यांत आलें आहे आणि जादा पुरवठाहि केला जात आहे. पण हें कापड सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोहोंचत नाहीं आणि सामान्य व कनिष्ठ स्थितींतल्या लोकांस अंग झाकण्यासाठी वस्त्र मिळण्याची मारामार झाली असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. बंगालमध्यें कापडाचा काळा बाजार बोकाळला आहे आणि त्याचें नियंत्रण आजवर प्रांतिक सरकारच्या हातून झालेलें नाहीं ह्याचें प्रत्यंतर अनधिकारानें अनेक व्यापाऱ्यांनीं साठवलेल्या कापडाच्या हजारों गांठी पोलिसांच्या छाप्यांत उघडकीस आल्या आहेत त्यावरून मिळत आहे. देशांतील कापडाच्या एकूण उत्पादनाचे आकडे सरकारी रीत्या प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून सहाशे कोटि वार कापड, त्याची वाटणी व्यवस्थित रीतीनें झाल्यास, जनतेच्या सामान्य गरजा भागण्यास पुरेसें व्हावें. परंतु कापडाच्या व्यापाराची घडी समान व व्यवस्थित वाटणीच्या दृष्टीनें बसलेली नाहीं हें स्पष्ट आहे. विशेषतः धोतरें आणि साड्या ह्यांची टंचाई मुंबई प्रांतांतहि तीव्रतेनें भासत आहे. गिरणीवाले, व्यापारी व सरकार ह्यांनीं लोकांची विशेष जरूरीच्या कापडाविषयींची गरज भागवली जाईल अशा योजना उत्पादनांत व वाटणींत अंमलांत आणल्या पाहिजेत. धान्यांचे बाबतींत अवलंबिल्या गेलेल्या नियंत्रणात्मक व्यवस्थेस बरेंच यश आलें आहे. अन्नाच्या बरोबरीनें वस्त्राचें महत्त्व जनतेस वाटत असल्यानें जरूरीच्या कापडाचा एकूण पुरवठा वाढवून तें सर्वांस प्रमाणबद्ध रीतीनें उपलब्ध होईल अशी तजवीज सरकारनें करणें अगत्याचें आहे. कापडाचें रेशनिंग अवघड आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि, धोतरें, पातळें, सध्याचें कापड व इतर सामान्य उपयोगाचा माल ह्यांच्या उत्पादनावर व पुरवठ्यावर भर दिला गेल्यास सध्या भासत असलेली टंचाई दूर होण्यासारखी आहे.

### मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

मुंबई प्रांताचें १९४५-४६ चें अंदाजपत्रक प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून येत्या वर्षी करवाढ होणार नाहीं व चालू कर कमीहि होणार नाहींत, ही गोष्ट तात्काळ प्रामुख्यानें लक्षांत येते. चालू (१९४४-४५) वर्षाचे मानानें उत्पन्न व खर्च हीं दोन्हीं कमी होतील, अशी अपेक्षा आहे. मुंबई सरकारनें लोकांकडून १०½ कोटि रुपये कर्जाऊ घेतले आहेत व त्यानें हिंदुस्थान सरकारचे १०½ कोटि रुपये देणें आहेत. कर्जांच्या फेडीसाठी वेगळे फंड निर्माण करण्यांत येत आहेत व पुनर्घटनेसाठी नवीं कर्जे उभारण्याची वेळ येण्यापूर्वी जुन्या कर्जांच्या परतफेडीची तरतूद पुरी होईल, अशी अपेक्षा आहे. १९४५-४६ सालीं युद्धोत्तर पुनर्घटना फंडांत ४ कोटि रुपयांची भर घालण्यांत येईल; म्हणजे वर्षअखेर त्या फंडांत ११ कोटि रुपये सांठतील. १९४६–४७ मध्यें आणखी ४ कोटि रुपये त्या फंडांत टाकले, म्हणजे पुनर्घटनेच्या मुख्य खर्चास प्रारंभ होण्याच्या सुमारास तो फंड सुमारें १५ कोटि रुपयांचा होईल. युद्धोत्तर पुनर्घटनेस प्रारंभ झाल्यानंतरच्या पहिल्या पांच वर्षांत त्याप्रीत्यर्थ ५० कोटि रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी १५ कोटींची ही तरतूद झाली. २० कोटि रुपये मध्यवर्ती सरकार देईल, १० कोटि रुपये मुंबई प्रांताच्या ५ वर्षांच्या अंदाजपत्रकांतील वाढाव्यांतून मिळूं शकतील व बाकीच्या १५ कोटींसाठी कर किंवा कर्ज ह्यांचा अवलंब केला जाईल, अशी आजची योजना आहे. राष्ट्रोद्धारक योजनांवरील खर्चाचा आकडा १९४०-४१ च्या मानानें दुप्पट होणार आहे व १९४४-४५ च्या दुरुस्त अंदाजाच्या आकड्यापेक्षा तो १ कोटीनें मोठा आहे. शिक्षण, वैद्यक, आरोग्य, पाणीपुरवठा, शेती, पशुवैद्यक, सहकार, ग्रामोद्धार इत्यादि बाबींचा वरील योजनांत समावेश होतो व त्यावर येत्या वर्षी ६ कोटि, ४५ लक्ष रुपये खर्चण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. अन्नपुरवठाविषयक व्यवहारांत सरकारनें आपल्या शिलकीपैकी ११½ कोटि रुपये गुंतविले आहेत, ते कालांतरानें सर्व वसूल होण्यासारखे आहेत.

मुंबई प्रांताच्या १९४५-४६ च्या अंदाजपत्रकांत खालील खर्चाची तरतूद करण्यांत आलेली आहेः—

| हजार रुपये | |
|---|---|
| ४,६८ | कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची वाढ |
| ५,१५ | शेतकी कॉलेजची वाढ |
| ३,०० | मांजरी शेतकी शिक्षणकेंद्रासाठी इमारती |
| ७९ | धुळें व देवीहसूर „ „ „ |
| १,५६ | सोलापूर कुर्जल शेती शिक्षण केंद्रासाठी इमारती |
| १,०० | व्हिक्टोरिया ज्यु. टे. इन्स्टिट्यूटला ग्रँट |
| ३,७० | इलेक्ट्रिक ग्रिड कचेरी खर्च |
| २५,०० | पी. डब्ल्यू. डी. प्रॉजेक्ट सर्कल |
| १२,०० | „ „ सर्व्हेचीं कामें |
| २,६३ | पशुसुधारणेचा प्राथमिक खर्च |
| ६५,०० | " आधीं करावयाचीं खास " कामें |
| २,६३,०० | शिक्षण खातें |
| १,४७,०० | वैद्यक व आरोग्य खातें |
| २,३४,०० | शेती, इरिगेशन, सहकारी खातें |
| २२,७० | उद्योग खातें |
| ४०,०५ | रस्ते बांधणें, सुधारणें. |

## वीज कंपनीचा लायसेन्स रद्द करण्याचा सरकारचा अधिकार

हुबळी इ. कं. वि. मुंबई सरकार

मुंबई सरकारच्या पब्लिक वर्क्स खात्याच्या डे. सेक्रेटरीनें ३ एप्रिल, १९४३च्या पत्रानें, हुबळी इलेक्ट्रिक कं. लि. ला तिचा लायसेन्स रद्द करण्यास पुरेशीं कारणें आहेत, अशी इलेक्ट्रिसिटी ॲक्टाच्या ४ (१) कलमान्वयें समज दिली. सहा महिन्यांचे अवधींत कंपनीनें आपली यंत्रसामुग्री चांगल्या दुरुस्तींत आणावी व ती दुरुस्ती राखण्याची तात्काळ व्यवस्था करावी, ह्या दोन अटींवर सरकार लायसेन्स चालू ठेवील, असेंहि कंपनीस कळविण्यांत आलें.

युद्धपरिस्थितीमुळें सुटे भाग व सामुग्री मिळविणें, कोशीस करूनहि, आपणांस शक्य होत नाहीं, असें कंपनीनें कळविलें. २८ जानेवारी, १९४४ रोजीं सरकारनें कंपनीस नोटीस पाठवून ३ एप्रिल रोजीं कळविलेल्या अटी न पाळल्याबद्दल लायसेन्स १ मे १९४४ पासून रद्द होईल, असें कळविलें. लायसेन्स रद्द करणारी ही नोटीस कायदेशीर नाहीं, असें कंपनीचें म्हणणें आहे. त्याप्रमाणें मुंबई हायकोर्टानें निर्णय देऊन लायसेन्स चालू ठेवावा किंवा बेकायदा लायसेन्स रद्द केल्याबद्दल कंपनीस २० लक्ष रुपये नुकसानभरपाई देववावी, अशी कंपनीची मागणी आहे. कंपनीनें लायसेन्सच्या बाबतींत करावयाच्या गोष्टी करण्यांत निष्कारण विलंब लावला किंवा नाहीं व लायसेन्स रद्द करणें सार्वजनिक हितावें आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याचा अधिकार सर्वस्वी सरकारचा आहे; सरकारचें विशिष्ट प्रकारचें मत कां झालें, तें तसें होण्यास पुरेशीं कारणें आहेत किंवा नाहींत, वगैरे बाबत चौकशी करण्याचा हायकोर्टास बिलकूल अधिकार नाहीं, असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें. दावा अद्याप चालू आहे.

## प्रत्येक स्वतंत्र समारंभास ४९ पाहुणे

मुंबई हायकोर्टाचा निवाडा

अर्देशिर सी. पी. वाडिया ह्यांच्या दोन मुलींचे नवजोत समारंभ २० फेब्रुवारी रोजीं मुलींचे आजोबा सी. पी. वाडिया ह्यांचे मुंबईमधील बंगल्यावर मुंबई येथें झाले. त्याप्रीत्यर्थ एकाच वेळीं व एकाच ठिकाणीं प्रत्येकांत ४९ पेक्षा कमी पाहुणे असलेल्या दोन स्वतंत्र गटांना मेजवानी देण्यांत आली. मध्यभागीं एक कापडाचा पडदा टांगून दोन्ही गट अलग करण्यांत आले होते. सप्लाय कमिशनरची परवानगी न घेतां सी. पी. वाडिया व अर्देशीर सी. पी. वाडिया ह्या दोघांनीं ५० पेक्षा जास्त लोकांना जेवणास बोलाविलें ह्या आरोपावरून त्यांचेवर खटला भरण्यांत आला. दोन नवजोत हे स्वतंत्र समारंभ आहेत, त्यासाठी दोघा आरोपींनीं स्वतंत्र बोलावणीं केलीं होतीं, सरकारी कायदा मोडण्याचें दोघांनीं संगनमत केलें असें सिद्ध करण्यांत आलेलें नाहीं, ह्या मुद्यांवर मॅजिस्ट्रेटनें आरोपींस दोषमुक्त ठरविलें. त्यावर सरकारनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. दोन्ही समारंभ स्वतंत्र असल्याकारणानें, आरोपींनीं संगनमत केलें किंवा नाहीं, हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं, असा हायकोर्टानें अभिप्राय व्यक्त केला आणि खालच्या मॅजिस्ट्रेटचा हुकूम कायम करून सरकारचें अपील फेटाळलें.

## दि आयुर्वेदीय अर्कशाला, लि. सातारा

वरील कंपनीची चौथी वार्षिक सभा रविवार ता. १८-३-४५ रोजीं झाली. त्याच दिवशीं कंपनीच्या कामगारवर्गीचें स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहानें पार पडलें.

कंपनीचे ता. ३१-१२-४४ अखेरचे ताळेबंदाचे आकडे पहातां कंपनीची प्रगति निःसंशय व भरभक्कम पायावर होत आहे असें दिसून येत आहे. नुसता नफा मिळवून भागीदारांना वांटणें एवढेंच कंपनीचें ध्येय नसून मुख्य ध्येय म्हणजे सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयास आर्थिक सहाय करणें हें होय व त्याप्रमाणें कंपनीनें चालू सालीं विद्यालयास १,४११ रुपये इतकी रकम दिली आहे. गेल्या वर्षी १,११२ रुपये दिले होते.

अर्कशालेचें भांडवल ५३,००० रुपये असून तिचेकडे १३,५०० रुपयांच्या ठेवी आहेत. १९४४ सालीं तिनें ४८,४१० रुपयांची विक्री करून १८,३५५ रुपये ठोक नफा मिळविला. आ. वै. महाविद्यालयास द्यावयाची रकम, इनकमटॅक्ससाठी रिझर्व्ह (२,८०० रु.) वगैरे बाजूस काढून १,४११ रुपये नफा उरला. त्यांतून डिफर्ड व ऑर्डिनरी भागीदारांस २½% कर माफ डिव्हिडंड देण्यांत यावयाचें आहे. दक्षिण भागांत कंपनीच्या मालाचा खप चांगला आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें हुबळी येथें नवीन केंद्र उघडलें. वाढत्या व्यापासाठी जास्त जागा घेऊन इमारतहि वाढविण्यांत येत आहे.

कंपनी आपलें अधिकृत भांडवल १ लक्ष रुपयांचें ५ लक्ष रुपये करीत आहे, असें समजतें.

## यूनियन बँक ऑफ इंडिया लि. मुंबई

मॅनेजिंग एजंट बँकेस ८९ हजार रु. कमिशन

वरील बँकेचें वसूल भांडवल ३९,९०,००० रुपये असून खेळतें भांडवल सुमारें ५४ लाखांचें आहे. १९४४ सालीं बँकेनें ८,१३,०८७ रुपये नफा मिळविला. त्यापैकीं २,९७,४२८ रुपये रोख्यांच्या खरेदी-विक्रीतील तफावतीपैकीं आहेत. ४,५०,००० रुपये करासाठी व १,००,००० रिझर्व्ह फंडासाठी बाजूस काढून भागीदारांस करमाफ ६¼% डिव्हिडंड देण्यासाठी २,४९,३७५ रु. लागतील. बँकेच्या मांडवी शाखेचें गोदींतील स्फोटामुळें बरेच नुकसान झालें व कित्येक महिने ती बंद ठेवावी लागली. शाखेंतील फर्निचरचा नाश झाला त्याबद्दल विमा कंपनीकडून ६,८३२ रुपये मिळाले. सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही यूनियन बँकेची मॅनेजिंग एजंट आहे. तिला १९४४ सालीं एजन्सीचें ८८,६२१ रुपये कमिशन मिळालें.

प्रबुद्ध वैश्य

मुंबई कों. वैश्य ज्ञातिफंडाचें मुखपत्र म्हणून वरील मासिक आचार्य ज. ग. दवण, वाङ्मय विशारद, ह्यांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालें आहे. "ज्ञानपिपासूकरितां कों. वैश्य ज्ञातिफंडानें उघडलेली पाणपोई" हें तिचें उद्दिष्ट साध्य होवो असें आम्ही इच्छितों.

व्याज-वजा ( xd )
बॉंबे डाइंग ७-४-४५
शिवराजपुर १०-४-४५

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
नागपूर २३-४-४५
स्वदेशी २७-४-४५
गोकाक ३०-४-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † बोनस S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २७।३।४५ | बुधवार २८।३।४५ | गुरुवार २९।३।४५ | शुक्रवार ३०।३।४५ | सोमवार २।४।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २०३१-४ | २०२८-१२ | २०३०—० | गुडफ्रायडे सार्वजनिक सुट्टी | २०३२—८ |
| ४३५; ३६९ | २३-०-०† | ऑगस्ट | टाटा आ.डिनरी | ७५ | ३७९-० | ३७८—८ | ३७८—८ | | ३७७—८ |
| २२०१; १६९५ | २५-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | १८३०-० | १८३३-१२ | १८३३-१२ | | १८२३-१२ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०९-० | ६१२—० | ६०६—० | | ६०१—० |
| ६५३; ४७५ | २२-०-०S | मे | स्वदेशी | १०० | ५४६-० | ५४७—० | ५३६—० | | ५३७—० |
| ४९८; ३६१ | १०-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३७९-० | ३८२—८ | ३८१—८ | | ३७९—० |
| ३७७; २६५ | २५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०२-८ | ३०२—० | ३०२—८ | | ३००—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९८-८ | २९८—८ | २९८—८ | | २९५—८ |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २५६-८ | २५७—८ | २५३—८ | | २५२—८ |
| ५-१० ६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१४-६ | ३-१३-६ | ३-१३-० | | ३-१२-९ |
| २१-१४; १३-४-६ | १-४-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—०-६ | १४—०-६ | १३-१३-६ | | १४—०-० |
| ४-९; २-७ | ०-५-० | मे | „ डिफर्डस् | १ | २-१४-९ | २-१४-६ | २-१४-० | | २-१५-३ |
| १८७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७०३-१२ | ७००—० | ६८७—८ | | ६८८-१२ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | २२८-८ | २२७—८ | २२७—८ | | २२८—४ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१७-० | २१६—८ | २१६—८ | | २१६—८ |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५१५-० | ५१७—८ | ५१७—८ | | ५११—४ |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८०-० | ७९—० | ७९—४ | | ७८—४ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३३-७ | ३३—१ | ३२-१४ | | ३२-१२ |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५३-० | ५२—० | ५२—० | | ५२—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०-४ | २०—२ | २०—२ | | २०—२ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६६-१२ | ६५—० | ६५—० | | ६२—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | ९९—८-९ | ९९—९ | ९९-९-३ | | ९९-९-६ |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
शिवराजपुर २३-३-४५ ते ७-४-४५
नागपूर २३-३-४५ ते ७-४-४५
स्वदेशी ३१-३-४५ ते १९-४-४५

दि. २-४-४५
३% व्हिक्टरी लोन = रु. ९९-१४-६
४% १९६०-७० रु. ११२-१२-०
सोनें ७२-८ चांदी १२९-८ कपास ४४६-०


डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

१९४४ मधील प्रगति
—तुलनात्मक आंकडे—
१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर
विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.
दि ट्रस्ट ऑफ इंडिया
ॲशुअरन्स कं. लि. पुणें.
मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी.ए.
अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.



व्ही.पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

जोगींचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
जोगी आणि कं. मुंबई ४


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ११ एप्रिल १९४५ अंक १५

## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व शूगरकरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशी परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती
(३) लोणावळा (४) बेलापूर.

पे-ऑफिसः-खोपोली (जि. कुलाबा)

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर,
नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

तारीख १ एप्रिल १९४५ पासून

—या बँकेच्या शाखा—

बारामती व निरा

येथें सुरू झाल्या आहेत. त्या भागांतील सहकारी संस्थांनीं व व्यापारी मंडळींनी या शाखांचा उपयोग करून घ्यावा अशी विनंती आहे.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर
पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि.

## विविध माहिती

### सरकारी रोख्यांच्या नव्या किमान किंमती

| | |
|---|---|
| ३% रोखे | ८५ रु. |
| ३½% रोखे | ९६ रु. |
| ३% व्हिक्टरी लोन (१९५७) | ९७ रु. ८ आ. |

### कापराचें पेट्रोल

कापरापासून पेट्रोल तयार करण्याची कृति जपानी शास्त्रज्ञांनीं शोधून काढली आहे. हें पेट्रोल अत्यंत उच्च दर्जाचें असून, त्यामुळें पेट्रोलचे बाबतींत जपान स्वावलंबी होणार आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. जपानी बेटें व फोर्मोसा येथें कापराचीं जंगलें आहेत, त्यापासून कापूर काढून तो मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवण्याची दक्षता जपाननें घेतलेली आहे.

### फटफटी मिळूं शकणार

कमी अश्वशक्तीच्या कांहीं मोटार सायकली आतां नागरिकांस उपलब्ध होतील. प्रत्येक फटफटीची किंमत ८२५ रुपये असेल, त्यांत व्यापाऱ्यास येणारा वहातुक खर्च मिळवून पक्की किंमत ठरविली जाईल. ज्यांस फटफटीची विशेष जरूरी आहे, अशांनाच ती मिळूं शकेल.

### "इंडिया लिमिटेड" कंपन्या

ज्या कंपन्यांच्या शेवटीं "इंडिया लिमिटेड" असे शब्द आहेत, अशा ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर नोंदलेल्या ५ कंपन्यांनीं १९४२-४३ अखेर संपलेल्या ४ वर्षांत हिंदुस्थानांत आपल्या व्यवहाराच्या कचेऱ्या स्थापन केल्या. १९४३-४४ अखेरच्या पांच वर्षांचे काळांत "इंडिया लिमिटेड" असे शेवटीं शब्द असणाऱ्या १०८ कंपन्या हिंदुस्थानांत नोंदण्यांत आल्या, त्यापैकी विदेशीयांच्या मालकीच्या किती आहेत, हें सांगतां येत नाहीं.

### ब्रिटिश हिंदुस्थानांतील विदेशी कंपन्या

ब्रिटिश हिंदुस्थानांत सध्या १५ विदेशी बँकिंग कंपन्या व्यवहार करीत आहेत, त्यांपैकी ७ ब्रिटिश, २ अमेरिकन, २ चिनी, २ डच, १ फ्रेंच व १ पोर्तुगीज आहे. संस्थानी हद्दींत स्थापन झालेल्या १७ बँकांचा ब्रिटिश हद्दींत व्यवहार चालू आहे.

### स्टिरलॉय : ना लाकूड, ना धातू, ना रबर

स्टिरलॉय् ह्या प्लॅस्टिकचा उपयोग विजेच्या तारांवरील इन्सुलेशन, पाण्याचे नळ, खेळणीं, बुटांच्या टाचा, रेफ्रिजरेटरचे ट्रे, पायपोसणीं, मुठी, नळाचे सांधे, तोटचा इ. बनविण्यांत करतां येतो. यावर धातूंप्रमाणें मशीन चालवितां येते; लाकडाप्रमाणें तें कापतां व रंधतां येतें; साच्यांत घालून त्याच्या अनेकविध वस्तू बनवितां येतात. या पदार्थाचा शोध डो केमिकल कंपनी, मिडलंड, मिचिगन, अमेरिका, यांनीं लावला.

## उद्बोधक विचार

"हिंदुस्थाननें दोस्त राष्ट्रांना या महायुद्धांत बरीच मदत केली आहे. युरोप, आफ्रिका आणि आशिया यांतील लढायांत हिंदी लढवय्यांनीं कौशल्य व धैर्य दाखविलें आहे. याशिवाय युद्धकार्याकरितां कच्चा व पक्का माल हिंदुस्थाननें पुरविला असून पुढेंही तो देईल. साधारणपणें दर वर्षी १०० हिंदी मंडळी अमेरिकेंत नागरिक या नात्यानें आल्यास अमेरिकेंत बेकारी होईल किंवा नोकऱ्यांत चढाओढ होईल ही भीति खरी नाहीं. हिंदी मंडळींना अमेरिकेंत नागरिकत्वाचे हक्क दिल्यानें मला वाटतें कीं आपल्याला युद्ध जिंकण्यास व शांतता प्रस्थापित करण्यास मदतच होईल." :—प्रेसिडेंट रूझवेल्ट

* * *

"इंग्लिश व अमेरिकन कारखानदारांचे प्रतिनिधी हिंदुस्थानभर विखुरले असून युद्धोत्तर नियोजनाच्या प्रचंड योजनांना लागणारें साहित्य पुरविण्याच्या ऑर्डर्स मिळवीत आहेत.":— नेव्हिल वाडिया यांचें मिनिअन्स क्लब, सिडने, ऑस्ट्रेलिया, मधील भाषण.

* * *

"व्यापारी चढाओढींत आगबोटींची वाहतुक व आगबोटी बांधणें या धंद्यांतील आपलें पूर्वापार अग्रेसरत्व जर ब्रिटनला टिकवावयाचें असेल तर त्या धंद्यांची आवड असलेली तरुण मंडळी मिळविण्याची कोशीस केली पाहिजे. शाळेचा अभ्यासक्रम संपविणाऱ्या शेवटच्या वर्षांतील विद्यार्थ्यांचे, वर्ष अखेरच्या सुट्टींतील दोन महिने बोटीवर घालविण्याची सोय करणें इष्ट होईल.":—'बोटी बांधण्याचें विश्वविद्यालयीन शिक्षण' यावर मि. चॅंपनेस यांचें न्यू कॅसल येथील भाषण.

* * *

"युद्धजन्य परिस्थितीमुळें हिंदुस्थानांतील कारखान्यांत वाढ झालेली आहे त्याचा परिणाम प्रमुख ब्रिटिश कंपन्यांनीं युद्धोत्तर हिंदुस्थानांत कारखाने सुरू करण्याचें किंवा हिंदी कारखान्याबरोबर सहकार्य करावयाचें ठरविण्यांत झाला आहे.

एका हिंदी कंपनी बरोबरचीं न्यू फिल्ड मंडळींचीं बोलणीं पुरीं होत आलीं आहेत. इतर ब्रिटिश कंपन्यांना लक्षावधींच्या ऑर्डर्स मिळण्याची खात्री वाटते. या ऑर्डर्स मुख्यतः यंत्रसामुग्री, मशीन टूल्स आणि आगगाडीचीं इंजिनें यांच्या आहेत. प्रतिवर्षी सहा कोटि पौंडाच्या कित्येक वर्षें पुरणाऱ्या ऑर्डर्स हिंदुस्थानांतून ब्रिटिश मालाला मिळतील असें नुकत्याच पुऱ्या झालेल्या सरकारी बोलण्यांवरून वाटतें.":—ट्रेव्हर इव्हॅन्स, डेली एक्सप्रेसचा बातमीदार.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७१

# अर्थ

## बँकांचें भाग भांडवल आणि ठेवी

### प्रमाणबद्धतेचा प्रश्न

जनतेपैकी अनेकजणांस स्वतःच्या प्राप्तीमधून खर्च वजा जातां उरणारी शिल्लक फायदेशीर व सुरक्षित रीतीनें उपयोगांत आणतां येत नाहीं आणि ती दागिने किंवा स्थावर मिळकत ह्यांमध्यें ते गुंतवतात. समाजांत दुसरे लोक असतात, त्यांस उद्योगधंद्यांस भांडवल लागतें, तें त्यांच्या स्वतःच्या शिलकेमधून पुरेसें मिळूं शकत नाहीं. हे दोन्ही वर्ग गरजू असून त्यांस एकत्र आणणें आणि त्यांचा दुवा जोडून देणें हेंच बँकांचें मुख्य कार्य आहे. ठेवींच्या मार्गानें समाजांतला शिल्लक पैसा जमा करणें आणि धंदेवाल्यांस कर्जें देण्यासाठीं तो वापरणें हा त्या संस्थांचा सामाजिक उपयुक्ततेचा व्यवहार आहे. बँकांच्या धंद्यांत त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या भांडवलापेक्षां ठेवीदारांकडून घेतलेल्या ठेवींस विशेष महत्त्व असतें. किंबहुना, बाहेरचा घेतलेला पैसा फायदेशीर व सुरक्षित रीतीनें वापरण्याचें कौशल्य ही त्यांच्या यशस्वितेची किल्ली आहे. तथापि बँकांनीं आपल्या धंद्यांत स्वतःचा पैसा घातला नाहीं तर ठेवीदारांचा त्यांचेवर विश्वास बसावयाचा नाहीं आणि त्यांचा व्यवहार नीट चालणार नाहीं. ह्याकरितां बँका भागांचें भांडवल जमवतात आणि नफ्यांतून कांहीं भाग काढून तो गंगाजळी म्हणून बाजूस ठेवतात. हें भाग भांडवल आणि ठेवी ह्यांचें परस्पर प्रमाण काय असावें ह्याचा सामान्यतः नियम नाहीं. अनुभवानें पुरेसें ठरणारें भाग भांडवल बँकांनीं उभारलेलें असलें पाहिजे अशी सर्वसाधारण समजूत आहे. जनतेचा विश्वास आणि व्यवहार ह्यांवर आधारलेली ती कल्पना आहे आणि तीच बँकिंगच्या धंद्यांत रूढ झाली आहे. सहकारी कायद्यानें ह्या प्रांतांत बँकांनीं भरलेलें भाग भांडवल व गंगाजळी ह्यांच्या आठ पटीपेक्षा अधिक ठेवी घेऊं नयेत असा निर्बंध घातला आहे तो वर निर्दिष्ट केलेलें प्रमाण कोणत्यातरी मर्यादेंत निश्चित व्हावें ह्या हेतूनेंच होय.

युद्धपरिस्थितींत चलनाच्या प्रसारामुळें लोकांच्या हातांत अधिक पैसा खेळत आहे आणि त्याचा विनियोग खर्चाकडे मर्यादित प्रमाणांत होत असल्यानें बराचसा पैसा बँकांकडे ठेवी म्हणून जात आहे. इंग्लंडमध्यें व हिंदुस्थानांत जॉइंट स्टॉक व सहकारी बँकांत गेल्या पांच वर्षांत ठेवींची कशी विलक्षण वाढ झाली आहे हें दर्शवणारे आकडे आम्हीं "अर्था"त मागें दिले आहेत. ठेवींतील वाढीच्या प्रमाणांत बँकांचें भाग भांडवल वाढवलें जावें कीं नाहीं हा प्रश्न येथें उपस्थित होतो. ह्या बाबतींत युद्धोत्तर काळांत ठेवींचा पूर ओसरण्याचा संभव आणि वाढलेल्या भाग भांडवलावर अधिक डिव्हिडंड वाटण्याची बँकांवर येणारी जबाबदारी ह्या दोन गोष्टींचा प्रस्तुत संबंधांत विचार करणें आवश्यक आहे. अलीकडे कांहीं जॉइंट स्टॉक व सहकारी बँकांनीं वाढलेल्या ठेवींस अनुलक्षून आपलें भाग भांडवल वाढवलें आहे आणि भाग वाढीच्या दरानें काढले गेल्यानें त्यांच्या गंगाजळींत चांगली भर पडली आहे. इंग्लंडमधील प्रमुख मोठ्या बँकांचे संबंधांत भाग भांडवल आणि ठेवी ह्यांच्या प्रमाणाचा प्रश्न युद्धपरिस्थितीमुळें पुढें आला आहे. युद्धोत्तर काळांत ह्या बँकांस उद्योगधंद्यांच्या सहाय्यार्थ लांब मुदतीचें भांडवल लागेल आणि त्याकरितां भाग भांडवलांतली वाढ किती उपयोगी पडेल, हा येथें प्रश्न आहे. ह्या बँकांच्या ठेवी व व्यवहार हीं एवढीं प्रचंड आहेत कीं भाग भांडवलाच्या वाढीचा त्यांवर विशेष परिणाम होईल असें दिसत नाहीं. तथापि त्यांस निदान भाग भांडवल आणि वाढलेल्या ठेवी ह्यांच्यामधलें पूर्वीचें प्रमाण कायम ठेवतां येईल व जनतेचा विश्वास दृढ करतां येईल.

पाच प्रमुख ब्रिटिश बँकांचे आकडे पाहिले असतां असें दिसतें कीं त्यांचें भाग भांडवल व गंगाजळी ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण युद्धापूर्वी ५ टक्क्यांच्या वर होतें, तें आतां ३ टक्क्यांच्याहि खालीं गेलें आहे. ह्यांपैकीं कांहीं बँकांचें अधिकृत भांडवल सर्व विक्रीस काढलेलें किंवा जमा केलेलें नाहीं. तेथें भाग भांडवलाच्या रकमेंत बँकांस भर घालतां येईल आणि नवीन, जादा भांडवल उभारण्याची आवश्यकता भासणार नाहीं. वाढवलेल्या भाग भांडवलाचा बँकांच्या किफायतशीर व्यवहारांच्या प्रमाणावर म्हणण्यासारखा अनुकूल परिणाम होणार नाहीं, पण त्या योगानें डिव्हिडंड वाटण्याचें त्यांचें सामर्थ्य थोडेंसें मर्यादित झाल्यावांचून रहाणार नाहीं. जवळजवळ पूर्वीइतकाच नफा वाढलेल्या भाग भांडवलावर वाटावा लागल्यामुळें डिव्हिडंडचा दर उतरणें अपरिहार्य आहे. बँका जरी बारा ते सोळा टक्के डिव्हिडंड वाटीत असल्या तरी त्यांच्या प्रचलित बाजारभावांचा विचार करतां त्यांवर रोख्यांवरील व्याजापेक्षा अधिक व्याज पडत नाहीं असें दिसून येईल. बँकांनीं योग्य संधी मिळतांच आपल्या भागीदारांसाठींच नवीन भांडवल वाढीच्या दरानें काढून त्यांस सवलत ट्रन्स्फरच्या हक्काच्या स्वरूपांत बोनस म्हणून द्यावी असें सुचवण्यांत आलें आहे.

वरील योजनेचा परिणाम खालीलप्रमाणें होईल. बँकेनें वाढीच्या दरानें भांडवल विक्रीस काढलें, तरी तो दर भागांच्या बाजारभावापेक्षा कमी असेल. भागीदारानें त्याच्या वाटणीचा भाग स्वतःसाठीं घेतला, तर बाजारभावापेक्षा त्यास तो स्वस्त मिळेल. त्यानें बँकेकडून भाग मिळण्याचा आपला हक्क दुसऱ्यास विकला, तर भागाची बाजारभावाची किंमत व बँकेस प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत ह्यांतील तफावत त्यास 'बोनस' म्हणून उरेल. भांडवलवाढीचा डिव्हिडंडवर परिणाम झाला तरी अशा रीतीनें मूळ भागीदारास त्याची अंशतः आगाऊ भरपाई होईल. वाढाव्याची रकम बँक गंगाजळींत टाकील व बँकेची गंगाजळी त्या प्रमाणांत वाढेल आणि तिच्या भक्कमपणांत भर पडेल. मूळ भागीदारास देऊं केलेले भाग त्यांस बिगर-भागीदारांस वर्ग करतां येतील; बँक त्यांत अडचण आणणार नाहीं, असें बँकेचें अभिवचन वरील योजनेंत महत्त्वाचें आहे.

### बँकेच्या सुटीचे दिवशीं दवाखाने बंद

रविवारप्रमाणें बँकेच्या सुटीचे दिवशींहि आपले दवाखाने बंद ठेवण्याचें मुंबईमधील गिरगांव व ग्रँटरोड भागांतील डॉक्टरांनीं आपली एक सभा भरवून ठरविलें आहे.

## कापडाचा मानव-निर्मित युद्धकालीन दुष्काळ

लेखकः—संजय

शेतीप्रधान हिंदुस्थान वास्तविक पहातां धन-धान्यांनीं समृद्ध असावयाचा; महायुद्धाच्या पसरत्या ज्वाळांनीं दग्ध झालेल्या देशांकडे धान्य पाठवून तेथील आर्त जनतेचे धन्यवाद आपण मिळवावयाचे; मानव जात एक असल्याचा निर्वाळा द्यावयाचा. प्रत्यक्ष स्थिति मात्र अशी आहे कीं, परदेशांतून धान्य आणल्याखेरीज आम्हीं जिवंत राहणेंहि कठीण झालें आहे. बंगालमधील भूकबळी आपल्या ह्या परिस्थितीवर विदारक प्रकाश पाडीत आहेत. लज्जारक्षणाला कपडा नाहीं म्हणून जीव देणाऱ्या त्याच प्रांतांतील अभागी स्त्रियांच्या कहाण्या आज आपण ऐकतों. खुद्द दिल्लीमध्यें कापडाकरितां दंगे होतील अशी गंभीर सूचना मि. रहमान अन्सारी यांनीं नुकतीच दिली आहे. लोखंड सांपडत असलेल्या व सीमेंट तयार होत असलेल्या आपल्या देशांतील मुंबईसारख्या शहरांत जागेची टंचाई तीव्रतर झाली आणि त्याचे पडसाद दिल्लीच्या मध्यवर्ती विधिमंडळाच्या बैठकींत उमटले. युद्धपरिस्थितींत या गोष्टींचा विचार साकल्यानें पण निकडीनें करावयास हवा.

कापडाबाबतचे कांहीं आकडे प्रसिद्ध झाले आहेत. हिंदी गिरण्यांनीं १९३९ मध्यें १२,६५० लक्ष पौंड सूत काढलें; १९४४ मध्यें १६,२३० लक्ष पौंड सूत काढलें. या सुतापासून दर वर्षी अदमासे ६७,००० लक्ष वार कापड तयार होतें. या गिरण्या ४८,००० लक्ष वार व लहान गिरण्या-हातमाग १९,००० लक्ष वार कापड काढतात. ६७,००० लक्ष वार कापडांतील अंदाजी ७,५०० लक्ष वार लष्कराकरितां व जास्तींत जास्त ६,००० लक्ष वार निर्गतीकरितां उपयोगांत येतें. निर्गतीचे प्रमुख्य देश तुर्कस्थान, ईजिप्त, अरबी प्रांत, सीलोन, द. आफ्रिका व ऑस्ट्रेलिया हे आहेत. निम-लष्करी म्हणजे ए.आर. पी., रेडक्रॉस इत्यादि संघटनांकरितां जें कापड लागतें तें सरकारनें बिन-लष्करी म्हणजे सामान्य जनतेच्या उपयोगाकरितां राहिलेल्या हिश्शांतून वापरलें आहे, याचा अर्थ नागरिकांस तितकें कापड कमी मिळालें. १९४५ मध्यें १०० लक्ष वार तलम कापड परदेशांतून येणार आहे. त्याबाबत टेक्स्टाइल कन्ट्रोल बोर्डाचें मत घेण्यांत आलें नाहीं असा सर विठ्ठलराव चंदावरकर यांचा दावा आहे.

नागरिकांच्या गरजेच्या मानानें कापडाचें उत्पादन कमी आहे का ? 'मुंबई योजना' पत्रकांत प्रमुख देशांत दर माणशीं कापड किती लागतें याची १९२९ च्या आकड्यांत माहिती दिली आहे. त्यावरून हिंदुस्थानांतील दर माणशीं प्रमाण १६·१ वार पडतें. टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष श्री. कृष्णराज ठाकरसी यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत म्हटलें आहे, "हिंदुस्थानांत तयार होणारें सर्व कापड जर नागरिकांच्या उपयोगाकरितां मिळालें तर दर माणशीं १६·२५ वार कापड मिळणें शक्य होईल." दुर्दैवानें एकूण उत्पादनांतील लष्कराकरितां व निर्गतीकरितां पुरवलेला भाग मोठा असल्यानें सामान्य नागरिकांच्या वाट्याला तो येत नाहीं.

कापडाचें दुर्भिक्ष्य नाहींसे होण्याचे मार्ग कोणते ? देशांतील सूत व कापड यांची पैदास वाढवावयाची हा एक मार्ग. दुसरा मार्ग, ब्रिटन-अमेरिकेंतून कापड आणण्याची व्यवस्था करावयाची. तिसरा मार्ग, कापडाची निर्गत शक्यतों कमी करावयाची हा आहे. दुसऱ्या मार्गाचा अवलंब केल्यानें हिंदी कापड-उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होईल. परदेशी माल आणलाच तर तो लष्करी व निम-लष्करी कार्यांकरितां वापरण्यांत यावा अशी इच्छा प्रदर्शित करणें अपरिहार्य आहे. असा परदेशी माल प्रत्यक्ष सरकारी मदतीनें येईल अशी भीतीहि व्यक्त करण्यांत आली आहे.

युरपमधील युद्धसमाप्तीचा क्षण जवळ येत असून जागतिक कापड-व्यापारांत हिंदुस्थानचें स्थान टिकविण्याच्या दृष्टीनें आपल्या येथील कापड-उत्पादन वाढविलें पाहिजे; स्थानिक खप कमी केला पाहिजे असें मत अहमदाबादचे प्रसिद्ध गिरणी-मालक श्रीमंत कस्तुरभाई लालभाई यांनीं प्रगट केलें आहे. गिरण्यांना भरपूर व वक्तशीर कोळसा पुरवठा, कापड-गिरण्यांनीं अधिक सूत काढून त्याचा लहान गिरण्या व हातमाग यांना पुरेसा पुरवठा, आज ३,००० प्रकारचें कापड काढण्यांत येतें त्याऐवजीं कांहीं ठराविक प्रकारचें कापड काढणें, गिरण्या ९ तासांऐवजी १८ अगर २४ तास चालल्यानें यंत्रांची अधिक झीज इन्कमटॅक्समध्यें घसारा रूपानें प्रत्यक्ष मान्य करणें, अधिक कामगार कामास येतील अशी व्यवस्था असणें, गिरण्यांना लागणाऱ्या मालाची वहातुक योग्य वेळीं करणें, हे उत्पादन वाढविण्याचे मार्ग आहेत. त्याबरोबरच तयार कापड गिऱ्हाइकाच्या हातांत वेळच्यावेळीं योग्य किंमतींत पडेल अशी व्यवस्था झाल्याखेरीज कापडाचें दुर्भिक्ष्य नाहींसें होणार नाहीं व कापड नियंत्रणाचा हेतू साध्य होणार नाहीं. सरकार व जनता यांच्या सुबुद्ध सहकार्यानेंच हा प्रश्न सुटणारा आहे. काँग्रेसनें मंत्रिमंडळें स्वीकारल्यानें सरकार व जनता यांतील अंतर कमी होऊन 'तांबड्या फितीचे' व्यवहार संपतील व राष्ट्रीय हिताच्या विशाल भूमिकेवरून नानाविध प्रश्नांचा विचार केला जाईल अशी आशा वाटते.

### भांडवल उभारणी बाबत तपासणी

( १ ) भांडवल उभारणीसाठी हिंदुस्थान सरकारकडे अर्ज करावा लागतो, त्यांत नमूद केलेली माहिती बरोबर आहे किंवा नाहीं हें तपासून पाहण्यासाठी व ( २ ) भांडवल उभारणीस परवानगी देतांना सरकार कांहीं अटी घालतें, त्या पाळल्या जातात किंवा नाहीं हें तपासण्यासाठीं हिंदुस्थान सरकार कांहीं अधिकाऱ्यांना योग्य ते अधिकार देणार आहे. त्याकरितां भारत संरक्षण कायद्यांत योजना करण्यांत आली असल्याचें गॅझिटांत प्रसिद्ध झालें आहे. युद्धविषयक धोक्याच्या विम्याचे बाबत देखरेखीचें काम करीत असणारांकडेच हें नवें काम तूर्त सोपविण्याचा सरकारचा विचार आहे.

जीर्ण व हटवादी हिवतापासाठीं
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
पायरोनिल
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६, सदाशिव, पुणें २.

## स्फुट विचार

### घटना कायद्यांतले व्यापारी निर्बंध काढून टाका

हिंदुस्थानच्या १९३५ च्या घटना कायद्यांत ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या हितांच्या रक्षणासाठीं कांहीं कलमें येथील कायदेमंडळ व सरकार ह्यांस बंधनकारक होतील अशा रीतीनें ग्रथित करण्यांत आलेलीं आहेत. ह्या घटनाकायद्यानें हिंदुस्थानास देण्यांत आलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग ब्रिटिश धंदेवाल्यांस अपायकारक किंवा अन्यायमूलक प्रकारानें केला जाऊं नये ह्या हेतूनें सदरहू बंधनें घालण्यांत आलीं आहेत. हीं कलमें कायद्यांतून काढून टाकण्यांत यावीं अशी सूचना करणारा एक ठराव मध्यवर्ती असेंब्लीनें गेल्या आठवड्यांत मान्य केला. त्यासंबंधांत झालेल्या मतप्रदर्शनांत सरकारनें भाग घेतला नाहीं आणि हिंदी सभासद व ब्रिटिश हितसंबंधाचे प्रतिनिधी ह्यांचे मध्येंच वाद झाला. विवक्षित कलमांपुरतीच घटना कायद्याची दुरुस्ती केली जाईल अशी कोणाची अपेक्षा होती किंवा अशी भीति कोणास वाटत होती असें दिसत नाहीं. ठरावाच्या चर्चेत हिंदी लोकमतांचा स्पष्ट उच्चार झाला आणि त्याविषयींच्या ब्रिटिश धंदेवाल्यांचा अभिप्राय प्रकट झाला एवढाच ह्या वादविवादाचा परिणाम आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आज दहा वर्षे प्रस्तुत कलमें अस्तित्वांत असतां हिंदी धंद्यांचें कांहीं नुकसान झालेलें नाहीं आणि आतांच त्यांचे विरुद्ध ही मोहीम कां? विशेषतः हिंदी व ब्रिटिश धंदेवाल्यांमध्यें युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी सहकार्याची आवश्यकता असतां, असला प्रश्न निष्कारण उपस्थित करणें योग्य नव्हे असा युक्तिवाद ठरावाच्या विरुद्ध बाजूनें पुढें मांडण्यांत आला. हिंदुस्थानास राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळावें अशी मागणी केली जात आहे आणि युद्धोत्तर आर्थिक अभ्युदयाच्या योजना आखल्या जात आहेत. तसेंच आंतरराष्ट्रीय परिषदांत ह्या देशाचे प्रतिनिधी भाग घेत आहेत, अशा वेळीं इतर कोणत्याहि राष्ट्राच्या घटना कायद्यांत नसलेलीं बंधनें येथें कां असावीं? असा प्रश्न त्या विचारसरणीस उत्तर म्हणून विचारण्यांत आला. कायद्यांतील निर्बंध जर निरुपद्रवी आहेत, तर ते हिंदी लोकमतविरुद्ध घातले कशाला आणि ते काढून टाकण्यास व इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्यांचें स्वतंत्रपणानें सहकार्य होईल अशी व्यवस्था केली जाण्यास हरकत कां?

---

### हिंद ब्रिटन भागीदारीचा हिंदी धंदेवाल्यांस पेंच

युरोपांतील युद्धाच्या समाप्तीचा क्षण जवळ येत चालला तसतशी इंग्लंड, अमेरिका व हिंदुस्थान ह्या देशांतील धंदेवाल्यांची आपापल्या व्यवहारांचे बस्तान नीट बसवण्याची खटपट अधिकाधिक वाढत आली. हिंदी उद्योगधंद्यांची अगदी निकडीची गरज नवीन यंत्रसामुग्री व यांत्रिक तज्ज्ञ ह्यांच्या पुरवठ्यासंबंधाची आहे, आणि त्या बाबतींत इंग्लंड व अमेरिका ह्या देशांवर त्यांस अवलंबून रहावें लागणें अपरिहार्य आहे. कोणताहि नवीन धंदा घेतला किंवा जुन्या कारखान्यांच्या विस्ताराचा प्रश्न निघाला कीं यंत्रसामुग्रीची नड प्रथम भासते आणि ती भागवण्यास विशेषतः इंग्लंडच्या तोंडाकडे पहावें लागतें. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका इंग्लंडमध्यें साचल्या असल्यानें ब्रिटिश यंत्रसामुग्रीची आयात विशेष सोयीची होणार असून ब्रिटिश कारखानदारांसहि आपला माल ह्या देशांत खपवावयाची उत्कट इच्छा आहे ही गोष्ट ह्या व्यवहारास सोयीची आहे. परंतु हा विषय येथेंच संपत नाहीं. जरा व्यापक व खोल दृष्टीनें पहातां, ब्रिटिश धंदेवाल्यांनीं हिंदुस्थानास यंत्रें व कुशल कारागीर पुरवून स्वतःस प्रतिस्पर्धी कां उत्पन्न करावे आणि हिंदी कारखानदारांनीं ब्रिटिश यंत्रसामुग्रीबरोबर इंग्लंडमधील धंदेवाल्यांचें वर्चस्व कां पत्करावें असे प्रश्न येथें उपस्थित होतात. ह्या देशांत आवश्यक असलेल्या शास्त्रीय औद्योगिक संशोधनाचे पुरस्कर्ते, प्रो. हिल ह्यांनीं प्रस्तुत बाबतींत ब्रिटिश धंदेवाल्यांचें मनोगत स्पष्ट करून सांगितलें आहे. ते म्हणतात कीं हिंदुस्थानचे औद्योगीकरणांत ब्रिटिश धंदेवाल्यांस पुष्कळ सहाय देतां येण्यासारखें आहे, पण तें फुकट मिळण्याची अपेक्षा ह्या देशानें करूं नये. यंत्रसामुग्रीची किंमत दिली आणि यांत्रिक तज्ज्ञांचा पगार दिला कीं काम भागलें अशी हिंदी धंदेवाल्यांची कल्पना असल्यास ती निराधार असल्याचें त्यांनीं स्पष्ट केलें आहे. ब्रिटिश धंदेवाल्यांस हिंदी धंद्यांत निम्मी भागीदारी दिली पाहिजे अशी अट घालण्यांत येत आहे असें दिसतें. ती मान्य झाल्यास हिंदी धंद्यांचें स्वातंत्र्य कोठें राहिलें आणि त्यांस येथील जनतेनें स्वार्थत्यागपूर्वक सहाय कां द्यावें? असा हा पेंच निर्माण होत असून तो हिंदी धंदेवाल्यांनीं राष्ट्रीय दृष्टीनें सोडवला पाहिजे.

---

### धंद्यांच्या विस्ताराविषयीं माहिती

हिंदुस्थानांत औद्योगिक अभिवृद्धि मोठ्या प्रमाणावर व्हावयाची तर कोणते धंदे काढावे आणि कोणत्या जुन्या धंद्यांचा विस्तार करावा हें ठरवावें लागेल आणि त्यांचा एकमेकांशीं काय काय संबंध येईल याचा विचार करून अखेरची अखिल भारतीय योजना निश्चित व्हावी लागेल. धंद्यांच्या गरजांची एवढी गुंतागुंत होणार आहे कीं कच्चा माल, यंत्रें, कोळसा, वीज इत्यादि बाबतींत त्यांची परस्पर स्पर्धा होईल. तसेंच, अनेक धंदे परस्परावलंबी असल्यानें एकास दिलेलें संरक्षण व सहाय दुसऱ्यांस बाधक होण्याचा संभव आहे. एवढ्यासाठी प्रत्येक धंद्याच्या अपेक्षा आणि गरजा काय आहेत ह्याची माहिती काढून सर्वांच्या हिताचा मेळ घालणें आवश्यक आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें निरनिराळ्या धंद्यांशीं संबद्ध असलेल्या अशा एकूणतीस निरनिराळ्या समित्या नेमण्याचें ठरवून त्यांपैकीं पंचवीस निश्चित केल्या आहेत. प्रत्येक धंद्यानें आपल्या प्रगतीची मर्यादा ठरवून ती गाठण्यास कोणती तयारी लागेल हें सांगावयाचें आहे. ह्या सर्व बाबतींत आपणाजवळ असलेली सर्व माहिती सरकार पुरवील, पण स्वतःचीं ध्येयें व गरजा ह्यांचा अंदाज धंदेवाल्यांनीं करून तो सरकारास तपशीलवार कळवला पाहिजे. धंदे खासगी मालकीचे कीं सरकारी असावे, त्यांचा आकार केवढा असावा, त्यांस लागणारें भांडवल कसें उभारावें, जकातींचें व इतर संरक्षण त्यांस आवश्यक होईल कीं काय इत्यादि विविध बाबींचा खुलासा त्यांस करावा लागेल. ह्या विस्तृत माहितीमधून काय बाहेर निघतें तें लवकरच दिसेल.

---

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., पुणें ५)

जानेवारीच्या १५ तारखेपासून शेअर बाजार आज तागायत एकसारखा खाली येत आहे. जास्तींत जास्ती टाटा डिफर्ड २४१० वरून शुक्रवारीं कमीत कमी १९७७।८, ऑर्डिनरी ४५४ वरून ३७०।८, कोहिनूर ६६७ वरून ५८०, शिंदिया ३८।६ वरून ३०।११ असे प्रमुख भाव खाली येऊन राहिलेत. बाजारांत मंदीची लाट येण्याचीं प्रमुख कारणें युरोपांतील दोस्तांचा विजय निश्चित पुढील आठ-पंधरा दिवसांत होणार ही खात्री व नुकतीच रशिया-जपानचा अनाक्रमणाच्या कराराची समाप्ति हीं होत. वास्तविक युरोपांतील लढाईचा, तसाच जपानी युद्धाचा शेवट काय होणार हे बाजाराला केव्हांच कळून चुकलें आहे. तेव्हां तदोद्भव येणाऱ्या भावनेचा फायदा मंदीवाले घेऊन राहिलेत. यांत विशेष गोष्ट ही कीं जरी भाव एकसारखे खालीं येत आहेत तरी गाळे मात्र मंदीवाल्या 'ऋषभांच्या' विरुद्ध आहेत. प्रश्न असा आहे कीं, बाजार आणखी खाली कोठवर जातील ? अगदीं खालची अथवा वरची मर्यादा कोणालाच सांगतां येणार नाहीं. पण सारासार तर्कवाद काय सांगतो याकडे लक्ष दिलें पाहिजे.

### वस्तुस्थितीचा अवास्तव निष्कर्ष

इकडील प्रमुख व्यवसाय जो वस्त्रोत्पादन त्याकडे लक्ष देतां, देशांत मागील वर्षांपासून कापडाची तीव्र टंचाई व अलीकडे तर निश्चित दुष्काळी परिस्थिति व त्याबरोबर उत्पादन वाढविण्याची अशक्यता. परदेशाहून माल मोठ्या प्रमाणावर-एक कोट वार-आणण्याची भाषा चालू असतां, या देशाची वार्षिक गरज किती व त्या मानानें ही आयात दर्यामें खसखस कशी आहे हें सांगणें नको. तसेंच जोंपर्यंत हिंदी, ब्रिटिश व अमेरिकेचे युद्धोत्तर व्यापारी संबंध निश्चित ठरविले गेले नाहींत व जोंपर्यंत चालू एकूण नियंत्रण व्यवस्था कायम आहे तोंपर्यंत कापडाच्या धंद्याला मंदी येणार असा निष्कर्ष काढला तर तो बुद्धिभेदाचा प्रयत्न म्हणून समजावा. जी गोष्ट कापडाची तीच गोष्ट पर्यायानें इतर व्यवसायांची. ही गोष्ट आज धरून चालावयास पाहिजे कीं युद्धोत्तर हिंदुस्थानांतील प्रमुख वस्त्रोत्पादन, लोखंड व पोलाद, साखर इत्यादि धंद्यांशीं अनिर्बंध स्पर्धा होणें कठीण. नाहींतर येऊं घातलेल्या देशी सरकारला व अमेरीसारख्यांनीं 'ब्रिटिश कारखानदारांनीं हिंदुस्थानांत सवलती हक्कानें मागण्याचे दिवस आतां गेले आहेत' अशा केलेल्या वक्तव्याला अर्थ उरत नाहीं. व्याजें व भाव कमी होणार हे दोन वर्षांपासून बाजाराला ठाऊक आहे. एकूण व्याजाचे दर उतरले असता, कारखान्यांचीं वैयक्तिक परिस्थिति विशेष मजबुतींत असतांना, चलनविकास सारखा चालू असेतांना व तसाच राहणार हें उघड असतां चांगल्या शेअर्सच्या किंमती वेड्यावांकड्या यापुढें कायम पडतील हें आर्थिक परिस्थितीशी घासून पाहतां पटत नाहीं. बाजार ऋषभांच्या काबूंत आहे ही गोष्ट खरी; पण समजा उद्या लढाई मानली तशी नाहीं थांबली; रशियानें जपानशी युद्ध नाहीं पुकारलें व जपानी युद्ध लांबतच राहिलें तर हेच मंदीवाले एका पायावर 'वृषक' होऊं पाहतील. परिस्थिती तितकीशी स्पष्ट होत नाहीं तोपर्यंत मंडळींनीं पैसा गुंतवून ठेवलेले शेअर्स निदान चालूं घवराटांत विकण्याची मुळींच घाई करूं नये असा स्पष्ट व निश्चित इशारा यावासा वाटतो.

### प्रेसिडेन्सी इं. बँकेची गेल्या दोन वर्षांतील प्रगति

बँकेचे सातव्या व आठव्या वर्षांचे तुलनात्मक आंकडे पुढील-प्रमाणें दिसतात:—

| | १९४३<br>७ वें वर्ष | १९४४<br>८ वें वर्ष | वाढ<br>सुमारें |
|---|---|---|---|
| खपलेलें भांडवल (रु.) | ३,०८,३०० | १०,००,००० | ३ पट |
| वसूल भांडवल (रु.) | १,०१,२९५ | ३,५६,२९५ | ३ पट |
| खेळतें भांडवल (रु.) | १९,९१,७०० | ३४,००,००० | २ पट |
| नफा (रु.) | १८,२३० | ४७,८३९ | २॥ पट |
| खर्चाचें प्रमाण (%) | १·३८ | १·४५ | |
| स्टाफ | १७ | २४ | |

### हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

नांव: ३% पहिलें डेव्हलपमेंट लोन, १९७०-७५.

विक्रीस प्रारंभ: १६ एप्रिल, १९४५

विक्रीची मुदत: ४० कोटि रु. किंवा १८ एप्रिलपर्यंत.

विक्रीची किंमत: १०० रु. च्या रोख्यास ९७ रु.

१९४५-५५ चे ५% करमाफ रोखे १०० रुपयांच्या रोख्याच्या किंमतीस १०२ रु. ८ आ. ह्या दरानें स्वीकारले जातील व त्यांचे बदली नव्या कर्जाचे रोखे दिले जातील.

### हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न-खर्च

एप्रिल १९४४ ते जानेवारी, १९४५ ह्या मुदतींत हिंदुस्थान सरकारनें आपल्या उत्पन्नापेक्षा १५६३ कोटि रुपये खर्च ज्यास्त केला. सरकारच्या कर्जाचा बोजा १७९३ कोटि रुपयांनीं वाढला.

### बंगालमधील कापडाचें रेशन

"बंगालमध्यें कापडाच्या रेशनिंगची योजना दोन-चार महिन्यांत अंमलांत येणार आहे, तिचे अन्वयें १२ वर्षांवरील प्रत्येकास दर वर्षी २ धोतरें किंवा २ साड्या किंवा ७ वार कापड मिळेल. अर्थात्, लोकसंख्येपैकीं एक बारांश लोकांना पहिलें रेशन हातीं पडण्यासाठीं ११ महिने वाट पहावी लागेल!" बंगालच्या "डायरेक्टर जनरल ऑफ कंझूमर्स गुड्स"नें ही योजना नुकतीच जाहीर केली आहे. कापडाचा अति भयंकर दुष्काळ त्यांनीं मान्य केला आहे.

### रिझर्व्ह बँकेनें पांच बँकांस पैशाची मदत कां नाकारली ?

रिझर्व्ह बँक स्थापन झाल्यापासून, जॉइंट स्टॉक बँकांपैकीं ४०% बँकांनीं तिचेकडे पैशाच्या तरतुदीसाठीं अर्ज केले होते. पांच सोडून बाकी सर्वांची गरज भागविण्यांत आली. त्या पांचापैकीं दोघांजवळ योग्य तारण नव्हतें; दोघांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नव्हती व एकीनें रिझर्व्ह बँकेच्या तपासणीस मान्यता देण्याचें नाकारलें होतें.

### हिंदी कापडाची व सुताची निर्गत

१९४४ सालीं हिंदुस्थानानें खालीलप्रमाणें कापड व सूत परदेशी पाठविलें:—

| | टन |
|---|---|
| एडन | ६,१७० |
| सुदान | ५,५२९ |
| दक्षिण आफ्रिका | ५,७६९ |
| नेपाळ | ५,६८७ |
| सिलोन | ४,२५० |
| ब्रि. पूर्व आफ्रिका इ. | ६,४४० |
| ऑस्ट्रेलिया | ३,६१५ |

## घरभाड्याच्या कायद्याबाबत निवाडा

### सर्टिफिकेटाबाबत कलेक्टराचा हुकूम निर्णायक

तुळशीराम देवीद्याळ ह्यांची माजगांव ( मुंबई ) येथें एक फॅक्टरीची मालकीची जागा आहे. त्यांतील कांहीं भाग त्यानें दुसऱ्यास भाड्यानें दिला. त्याचा स्वतःचा धंदा वाढल्याकारणानें त्यास ज्यास्त जागा लागू लागली व त्यानें भाडेकरूस काढून लावण्याचा प्रयत्न चालविला. भाडेकऱ्यास दिलेली जागा मालकास स्वतःकरितां हवी असल्यास रेंट ॲक्टाप्रमाणें त्यास कंट्रोलरकडून सर्टिफिकेट मिळवावें लागतें. कंट्रोलरच्या हुकुमाविरुद्ध कलेक्टरकडे अपील करतां येतें. वरील प्रकरणांत कंट्रोलरनें सर्टिफिकेट देण्याचें नाकारलें व अपिलांत कलेक्टरनें कंट्रोलरचा हुकूमच कायम केला. " स्वतःस उपलब्ध असलेल्या जागेपेक्षा अधिक जागा लागेल, अशा रीतीनें आपला चालू धंदा वाढवून, बराच काळ राहिलेल्या भाडेकरूंना घालवून देऊं पहाणें घरमालकाच्या अधिकारांत नाहीं " असा कलेक्टरनें शेरा मारला. घरमालकानें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें, तेव्हां " घरमालकास जागेचा ताबा खरोखरीच व योग्य कारणासाठी स्वतःकरितां हवा आहे कीं नाहीं, हें ठरविण्याचा अधिकार रेंट कंट्रोलर व कलेक्टर ह्यांचा आहे; त्यांत ढवळाढवळ करण्याचा हायकोर्टास अधिकार नाहीं असें १४ वें कलम सांगतें " असें म्हणून हायकोर्टानें अपील फेटाळलें.

## भारत इं. बँक लि., पुणें

### अध्यक्ष, श्री. केळकर ह्यांचें भाषण

वरील बँकेच्या ७ व्या वार्षिक सभेचे प्रसंगीं, ताळेबंद व हिशेब सादर करतांना अध्यक्ष, श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी., ह्यांनीं खालीलप्रमाणें भाषण केलें :—

" बँकेचें शेअर भांडवल ९९ हजारांवरून २ लाखांवर व खेळतें भांडवल १७ लक्ष, ८९ हजारांवरून २५ लक्ष, ४० हजारांवर गेलें आहे. आतां तें ३० लाखांचेवर झालें आहे. लोणावळा म्युनिसिपालिटीनें लोणावळा शाखेंत खातें उघडलें असून तेथील नागरिकांचा पाठिंबा चांगला आहे. बारामती शाखेंत अनेक कंपन्यांचे हप्ते भरण्याची सोय आहे व जास्त कंपन्यांच्या हप्त्यांची सोय लौकरच होईल. दक्षिण हिंदुस्थानांतील शहरांवर ड्राफ्ट देण्याची व्यवस्था झाली आहे. उत्तर हिंदुस्थानांतील शहरांवरील ड्राफ्टहि लौकरच मिळूं लागतील.

### स्वतःच्या इमारतीची जागा

" बँकेनें लक्ष्मीरोडवर अत्यंत महत्त्वाचे जागीं म्हणजे पूना गेस्ट हाऊस समोर ४०" × ९५" एवढी जागा खरेदण्याचें ठरविलें आहे. तो व्यवहार लवकरच पुरा होईल व त्याठिकाणीं दोन-तीन वर्षांत बँकेची स्वतःची इमारत दृष्टीस पडूं लागेल.

### मॅनेजिंग डायरेक्टरांची कामगिरी

" बँकेच्या वाढीस स्टाफ, शाखांचीं अडव्हायसरी बोर्डे वगैरे कारणीभूत आहेत. उभयतां मॅनेजिंग डायरेक्टर्स, श्री. रा. बा. साळवेकर व श्री. नी. ना. क्षीरसागर ह्यांच्या परिश्रमाचेंच हें फळ आहे, तेव्हां त्यांच्या परिश्रमाचा विशेष उल्लेख करणें जरूर आहे. "


सांडू हार्टिना

गुणकारी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅनु. केमिस्टस व ड्रगिस्टस.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.



दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( शेड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस : पुणें शहर

— भांडवल —

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १०,००,००० |

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर, रत्नागिरी, फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर



'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# मुंबई शेअर बाजार

(मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून)

व्याज-वजा (xd)
+बॉंबे डाईंग ७-४-४५
शिवराजपुर १०-४-४५
नागपुर २३-४-४५

व्याज-वजा (xd)
फिनले २७-४-४५
स्वदेशी २७-४-४५
गोकाक ३०-४-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. ३।४।४५ | बुधवार ४।४।४५ | गुरुवार ५।४।४५ | शुक्रवार ६।४।४५ | सोमवार ९।४।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | • | २००३-१२ | २०११--४ | १९८०—० | १९९७—८ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा ऑर्डिनरी | ७५ | | ३७३—८ | ३७४--८ | ३७२—० | ३७५—० |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | १८१८-१२ | १८२८-१२ | १८११—४ | १७६३-१२+ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ५९८—० | ५९९—० | ५८९—० | ५८३—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ५३६—० | ५३७—० | ५३०—० | ५३१—० |
| ४९८; ३६१ | ६-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | ३७८—० | ३८०—८ | ३७३—० | ३७५—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | | २९८—० | ३००—० | ३००—० | २९२—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | शिमगा दिनानिमित्त बाजार बंद | २९२—८ | २९५—० | २९५—० | २९०—० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | २४८—८ | २४८—८ | २४४—० | २४३—० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ३-१२-० | ३-१२-३ | ३-११-६ | ३-११-९ |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | १३-१४-० | १४--५-६ | १३-१४-० | १३-१५-० |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | | २-१४-६ | २-१५-६ | २-१५-६ | २-१४-० |
| ११७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | | ६९०—० | ७०६—४ | ६९०—० | ७०१—४ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २२२—८ | २२४—८ | २२३—० | २२७—४ |
| २५९; २११ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २१५—० | २१५—० | २१५—० | २१३—८ |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ५१०—० | ५१०—० | ५१०—० | ५१०—० |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | | ७७-१२ | ७७-१२ | ७७-१२ | ७६-१२ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | ३१-१२ | ३१-११ | ३०-१२ | ३१-३-० |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | | ५१-१२ | ५१—० | ५१—० | ५०—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | | २०—२ | २०—० | २०—० | २०—० |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | | ६२—८ | ६२—८ | ६२—८ | ६२—८—० |
| | | | ३½% रोखे | १०० | | ९९-११-० | ९९-११ | ९९-१०-६ | ९९-११-६ |

वर्ग पुस्तकें (ट्रा. बुकें) बंद
स्वदेशी ३१-३-४५ ते १९-४-४५
फिनले ६-४-४५ ते १९-४-४५
इंडिया युना. २०-४-४५ ते १६-५-४५

सोनें ७४—०
चांदी १३०—८
कपास ४२६-१२

दि. ९-४-४५
३% व्हिक्टरी लोन = रु. ९९-१५-०
३% १९६३-६५ रु. ९८-१४-०
३% १९६६-६८ रु. ९८—३-०


"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

**BUG COILS (ABC)**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४४ मधील प्रगति
नव्या कामांत ७० टक्के वाढ
खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. सांठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट— द. ना. हेजीब

नोगीचे डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४


हें पत्र पुणें, पेठ मोघुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दर्गाविलास,' मोकर्दा

REGISTERED No. B. 3434.

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १८ एप्रिल १९४५ अंक १६



**सारस्वत**
**को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
( स्थापना १९१८ ) टे. नं. ३१६७५
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | ... | रु. २,३२,१६० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | ... | रु. १,४५,८०१ |
| ठेवी | ... | ... | रु. ४४,४३,४०७ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | ... | रु. ४९,००,००० |

—: विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा :—
व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन. एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.
सब ऑफिस—दादर
( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशी परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, अॅक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# विविध माहिती

### संगमनेर व्यापारी असोसिएशन

वरील असोसिएशनची नऊमाही सभा नुकतीच भरली होती. अध्यक्ष, श्री. पी. एस. लाहोटी, ह्यांनीं सभेस असोसिएशनच्या कामाचा वृत्तांत निवेदन केला. असोसिएशनमार्फत संगमनेर येथें उन्हाळ्याकरितां चार ठिकाणीं पाणपोईची व्यवस्था करण्याचें ठरलें. त्याचप्रमाणें एक गोरक्षण संस्था स्थापण्यासहि असोसिएशननें मंजुरी दिली.

### विमा बिलाचें भवितव्य

हिंदुस्थान सरकारनें व्यापक सुधारणा करणारें एक विमा बिल असेंब्लींत मांडलें होतें, परंतु तें तसेंच टाकून देण्याचा सरकारचा विचार दिसतो. इन्कम टॅक्स बिलाची वासलात अगोदरच लागली आहे.

### सॅन फ्रॅन्सिस्को परिषदेचा खर्च

सॅन फ्रॅन्सिस्को परिषदेसाठीं अमेरिकन सरकारास ५,००,००० ते ९,००,००० डॉलर्स खर्च येईल. युद्ध चालू ठेवण्यांत ती रक्कम खर्च केली, तर ती ३ ते ५ मिनिटांत खलास होईल! परिषद किती लांबेल, ह्यावर तिचा खर्च अवलंबून आहे, हें उघड आहे.

### ब्रिटिश पार्लमेंटची निवडणूक

ब्रिटिश पार्लमेंटाची निवडणूक जूनमध्यें होईल व नवें पार्लमेंट जुलैमध्यें भरेल, असा अंदाज आहे. हें शक्य करण्याकरितां सध्याचें पार्लमेंट लवकरच बरखास्त करावें लागेल व त्यापूर्वी आवश्यक तेवढ्या बजेटाच्या बाबींस मंजुरी मिळवावी लागेल.

### कोळसा व वीज ह्यांची बचत कशी करावयाची!

मुंबई शहरांतील व उपनगरांतील गिरण्यांमधील कोळशाचा व विजेचा खप, कार्यक्षमता वाढवून कसा कमी करतां येईल, यासंबंधीं गिरण्यांस सल्ला देण्याकरितां मुंबई सरकारनें एका खास अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे.

### पोस्टांत जास्त पैसे ठेवण्यास उत्तेजन

लोकांना बचत करण्यास उत्तेजन मिळावें, ह्या दृष्टीनें पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकेंत ठेवीदारानें एका वर्षांत ठेवावयाच्या रकमेची कमाल मर्यादा १,५०० रुपये होती ती आतां वाढवून ५,००० रुपये करण्यांत आली आहे.

### कर्जनिवारण व खंडकरी कायदे हवेली तालुक्यास लावा

हवेली तालुक्यांतील शेतकऱ्यांची एक सभा राव बहादुर जी. एम. काळभोर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें श्रीशिवाजी मराठा हायस्कूलच्या वंडेकर लायब्ररी हॉलमध्यें ता. २५ मार्च रोजीं भरली होती. बॉंबे अॅ. डेटर्स रिलीफ अॅक्ट (१९३९) व बॉंबे टेनन्सी अमेंडमेंट अॅक्ट (१९४२) हे कायदे पुणें जिल्ह्याच्या हवेली तालुक्यास तात्काळ लागू करण्यांत यावेत, अशी सरकारला विनंति करणारा ठराव सभेनें मान्य केला.

### काळा बाजार मोडण्यासाठीं बक्षिसांची योजना

कापडाच्या काळा बाजारास आळा घालण्यास मदत करणारांस सिंध सरकार बक्षिसें देणार आहे. आरोपीस शिक्षा होईल इतकी माहिती पुरविणारास १,००० रुपये किंवा जप्त केलेल्या कापडापैकीं २०% कापड अथवा त्याची किंमत, एवढें बक्षीस मिळेल.

### भांडवल उभारणीवरील निर्बंध व किमान भांडवलाची आवश्यकता ह्यांतील विसंगति

भांडवल उभारणीवरील, सध्या अस्तित्वांत असलेले सरकारी निर्बंध व नियोजित बँकिंग कायद्यानें बँकांस आवश्यक ठरविलेलें किमान शेअर भांडवल, ह्यांतील विसंगति सरकारच्या लक्षांत नाहीं काय? असा प्रश्न असेंब्लींत नुकताच विचारण्यांत आला. त्यास उत्तर देतांना फडनवीस म्हणाले:-"एकापेक्षा जास्त प्रांतांत शाखा असणाऱ्या कांहीं बँकांना नवें भांडवल उभारण्यास परवानगी नाकारण्यांत आली तर त्या नियोजित कायद्याच्या ११ व्या कलमांतील भांडवलविषयक अट पार पाडूं शकणार नाहींत, ह्याची सरकारास जाणीव आहे. तथापि, बिलाचें अद्याप कायद्यांत रूपांतर झालेलें नाहीं. सध्याच्या मसुद्याप्रमाणेंच कायदा झाला, तरी पुरेसें भांडवल उभारण्याच्या मार्गांतील अडचणींचा विचार करण्यास पुरेसा वेळ राहीलच. अडचणी दूर करणें बँकांस अशक्य झालें, तर इतर प्रांतांतील शाखा बंद करणें त्यांच्या हातांतील गोष्ट आहे.

### नवें बँकिंग बिल

नवें बँकिंग बिल तपशीलवार विचारासाठीं सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्यांत यावें, अशी सूचना फडणविसांनीं असेंब्लींत मांडून, बिलाचा उद्देश स्पष्ट करून सांगितला. सूचना मंजूर झाली.

### गव्हर्मेंट सोप फॅक्टरी

म्हैसूर संस्थानांतील गव्हर्मेंट सोप फॅक्टरीची स्थापना १९१८ सालीं झाली, तेव्हां कपडे धुण्याचा साबण फक्त तयार करण्यांत येऊं लागला. आतां ह्या कारखान्यास हिंदुस्थानांतील साबण कारखान्यांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. १९३८-३९ सालीं कारखान्यानें ४,८६,३८५ रुपयांचा साबण तयार करून ८३,७९० रुपये नफा मिळविला. १९४३-४४ मधील उत्पादनाची किंमत १०,९३,३५२ रुपये भरली व नफ्याचा आकडा २,८३,२२९ रुपये झाला. आतां ह्या कारखान्याचें यशवंतपूर येथें स्थलांतर करण्यांत येणार आहे.

### नागपूर येथें व्यापारी कॉलेज

नागपूर येथें एक कॉमर्स कॉलेज येत्या जुलैपासून सुरू होईल. विश्वविद्यालयाकडे त्यासाठीं रीतसर अर्ज पाठविण्यांत आला आहे.

### रिझर्व्ह बँकेची सोन्या-चांदीची विक्री

रिझर्व्ह बँकेनें मार्च, १९४५ मध्यें एकूण ५,२०,००० तोळे सोनें व ६,९०० चांदीचे पाट विकले. दोन्ही मिळून सुमारें ६½ कोटि रुपयांची विक्री झाली.

### सांगली संस्थान सहकारी परिषद

सांगली संस्थान सहकारी परिषदेचें तृतीय अधिवेशन शनिवार ता. २१ व रविवार ता. २२ एप्रिल सन १९४५ इ. रोजीं मुंबई इलाख्याचे सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री. पी. जे. चिन्मुळगुंद आय. सी. एस. ह्यांचे अध्यक्षतेखालीं दरबार हॉलमध्यें (असेंब्ली हॉलमध्यें) भरणार आहे. श्रीमंत राजेसाहेबांचे हस्तें परिषदेचें उद्घाटन होईल.

### दुधाच्या पुढीची सक्ती

मुंबई शहरांतील हॉटेलवाल्यांनीं चहांत व कॉफींत स्किम मिल्क पावडरच वापरली पाहिजे, अशी सरकारनें सक्ती केलेली आहे. ह्या हुकुमाखालीं मुंबई उपनगरांतील वांद्रें, पार्ले-अंधेरी जुहू, कुर्ला, घाटकोपर व चेंबूर हे भागहि २२ एप्रिलपासून येतील.

# अर्थ

## हैदरी शिष्टमंडळाचें कार्य

### जरूरीच्या ब्रिटिश मालाचा पुरवठा

नित्याच्या उपयोगाच्या अनेक वस्तूंचा हिंदुस्थानांत तुटवडा पडल्यानें लोकांची गैरसोय होत असून त्या काळया बाजारांत भरमसाट किंमतींनीं विकल्या जात आहेत. सामान्य स्थितींतल्या लोकांस ह्या जिनसा मिळत नाहींत आणि गरजू गिऱ्हाइकें व श्रीमान् खरेदीदार पडतील त्या किंमती देऊन आपल्या जरूरी भागवीत आहेत. ह्यांपैकीं कांहीं वस्तू नेहमींच बाहेरून आयात कराव्या लागतात आणि युद्धपरिस्थितीमुळें त्यांचा पुरवठा मर्यादित झाला आहे. दुसऱ्या कांहीं जिनसा ह्या देशांत तयार होत असल्या तरी त्यांस युद्धसामुग्री म्हणून अग्रतेची मागणी असते आणि त्या कारणानें त्या सामान्य जनतेस उपलब्ध होऊं शकत नाहींत. ह्या रीतीनें मागणी पुरवठ्याचा मेळ न बसल्यानें महागाईची, कुचंबणेची व गैरसोयीची स्थिति निर्माण झाली आहे. तिच्यावर दुहेरी उपाय योजितां येण्यासारखा आहे. युद्धासाठी निरनिराळ्या प्रकारांची सामुग्री लागते, तिचें उत्पादन ह्या देशांत विस्तृत प्रमाणांत होईल अशी व्यवस्था करणें हा पहिला मार्ग आहे. पूर्व एशियांतील आघाड्यांस हिंदुस्थानांतून युद्धसामुग्री पुरवण्याचें ठरलें त्याच वेळीं इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून यंत्रसामुग्री आणून येथील उत्पादन वाढवण्याची तजवीज केली जाणें अगत्याचें होतें. एका वेळीं या संबंधांतील औद्योगिक विस्ताराच्या योजनांची चर्चाहि झाली पण अखेर ह्या कल्पना सोडून देण्यांत आल्या. त्या फलद्रूप झाल्या असत्या तर हिंदुस्थानच्या औद्योगीकरणास सहाय मिळून लढाऊ मालाचा हवा तेवढा पुरवठा होऊन सामान्य हिंदी जनतेस आवश्यक वस्तूंची टंचाई भासली नसती.

हा मार्ग बंद झाल्यानें इंग्लंडहून शक्य तेवढा लढाऊ उपयोगाचा व इतर माल आणून हिंदी बाजारावरील ताण कमी करणें हाच उपाय शिल्लक राहिला; आणि त्या मार्गाचा अवलंब हिंदुस्थान सरकारनें हैदरी शिष्टमंडळ लंडनला पाठवून केला आहे. ब्रिटिश सरकाराशीं वाटाघाटी करून सर अकबर हैदरी व त्यांचे साथीदार परत आले आहेत आणि त्यांनीं बजावलेल्या कामगिरीची माहिती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. त्यांनीं ब्रिटिश सरकाराकडून मिळवलेल्या सवलती येणेंप्रमाणें आहेत. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या मालापैकीं शक्य तितके कमी जिन्नस लष्करी उपयोगासाठी घेऊन अधिक पुरवठा हिंदी जनतेस उपलब्ध करून देणें, ह्या देशांत तयार न होणारा किंवा अपुऱ्या प्रमाणांत तयार होणारा माल इंग्लंडमधून इकडे आणणें; हिंदी कारखान्यांस उत्पादनास लागणारा कच्चा माल व इतर साधनें पुरवणें आणि हिंदुस्थान सरकारनें जिनसांचा पुरवठा वाढवण्यासाठीं मागितलेला माल त्वरेनें पाठवून देणें. ह्या शेवटच्या बाबीची अंमलबजावणी होत असून कोळशाच्या खाणींत लागणारीं यंत्रें, रस्त्यांसाठी जरूर असलेले रूळ, टेलिफोनचें सामान, शेतीसाठी यंत्रें, खतें इत्यादि प्रकारच्या मालाचा तींमध्यें अंतर्भाव झाला आहे. देशी कारखान्यांस आवश्यक असलेला मालहि लवकर हातीं येण्यासारखा आहे. नित्याच्या वापरांतील पण दुर्मिळ झालेल्या वस्तू आयात होणार आहेत, त्यांच्या यादींत अर्भकांचीं अन्नें, भाजीपाल्याचें बीं, दुचाकी गाड्या, औषधें, कागद व स्टेशनरी, शिवण्याचीं यंत्रें, प्रसाधनाचीं साधनें, काचेचें व विजेचें सामान इत्यादि प्रकारचा माल प्रामुख्यानें नमूद आहे.

वरील जिनसा आयात होतील तेव्हां त्यांची आज जनतेस भासणारी दुर्मिळता बरीच कमी होईल. परंतु ह्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट आहे ती, लढाऊ उपयोगाच्या वस्तूंची आयात करून त्या परस्पर लष्करास पुरवणें आणि ह्या रीतीनें हिंदुस्थानांत बनवल्या जाणाऱ्या मालास असलेली लष्करी मागणी कमी करून तो हिंदी जनतेस मिळेल अशी तजवीज करण्यासंबंधांतली होय. पोलाद, कातडीं, लाकूड, सिमेंट, लोकरीचा व कापसाचा विणलेला माल हे जिन्नस ह्या सदरांत येतात. चालू सालीं मिळावयाच्या ह्या वस्तूंची किंमत ४ कोटी व १९४६ मध्यें आयात व्हावयाच्या मालाची किंमत ७० कोटि रुपये भरेल असा अंदाज आहे. देशांतील प्रचलित टंचाईच्या दृष्टीनें पहातां चालू सालची ४ कोटींच्या मालाची सवलत विशेष आहे असें म्हणतां येत नाहीं. ती केवळ दर्यामें खसखस आहे. हिंदी बाजारांतील पुरवठा व किंमती ह्यांचेवर ह्या आयातीचा परिणाम म्हणण्यासारखा होणार नाहीं. तथापि देशाच्या पुरवठ्यांत कांहीं जरूरीच्या मालाची भर पडणार आहे ती केव्हांहि स्वागतार्हच वाटेल ह्यांत शंका नाहीं. सध्या कापडाची दुर्मिळता विलक्षण झाली आहे. लष्करी उपयोगाकरितां ८० कोटि वार आणि निर्गतीसाठी ६० कोटि वार एवढें कापड ह्या देशास पुरवावें लागत आहे. त्यापैकीं थोड्या तरी मालाची निर्गत इंग्लंडमधून करण्याचें आश्वासन हैदरी शिष्टमंडळानें ब्रिटिश सरकाराकडून मिळवलें आहे आणि ह्या देशांतलें कापडाचें उत्पादन वाढवण्यास हिंदुस्थान सरकार सहाय देणार आहे. ह्या देशांतली मालाची टंचाई आणि महागाई दूर करण्याचें महत्त्व ब्रिटिश सरकारनें मान्य केलें आहे, पण मालाच्या पुरवठ्याविषयींची त्याची मोठी जबाबदारी आपणाहि ओळखली पाहिजे, ह्या भूमिकेवरून आपण वाटाघाटी केल्या आणि सवलती मिळवल्या असें शिष्टमंडळाचें म्हणणें आहे.

---

### हिंदी कापडाचें उत्पादन अपुरें कां ?

हिंदी कापडाच्या गिरण्या व हातमाग ह्यांचे उत्पादनांत आतां हिंदी सुतच वापरलें जातें. १९३९ सालीं हिंदी सुताच्या उत्पादनाचा आकडा वजनानें १२६ कोटि पौंड होता, तो १९४४ सालीं १६२ कोटि पौंड झाला. ह्या सुतापासून दरसाल सुमारें ६७० कोटि वार कापड तयार होतें. त्यापैकी १९० वार कापड हातमागावरील असतें. हें सर्व कापड हिंदवासीयांस समप्रमाणांत वाटलें, तर प्रत्येकाच्या वाट्यास दरसाल १६¾ वार कापड येईल. सध्या नागरिकांस तें मिळत नाहीं, ह्याचें कारण ७५ कोटि वार कापड लष्करासाठी जातें व निर्गत ६० कोटि वारांपर्यंत कापड उठवूं शकतें. टेक्स्टाइल कंट्रोलर बोर्डाचे अध्यक्ष, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी, ह्यांनीं वरील माहिती नुकतीच सांगितली.

## बँकिंग बिल सिलेक्ट कमिटीकडे सोपविलें

### असेंब्लीमधील विचार प्रदर्शन

**फडणवीस, सर जरेमी राइस्मन**

" अमेरिका व कानडा ह्या देशांतील बँकिंग कायद्याच्या मानानें, प्रस्तुत बिलाची व्याप्ति पुष्कळच लहान आहे. हिंदुस्थानांत अद्याप बँकिंगची वाढ होत आहे आणि बँकांच्या आकारांत, व्यवहारांत व कार्यपद्धतींत फार तफावत आहे, त्यामुळें तपशीलवार नियमनाचा प्रयत्न करणें इष्ट होणार नाहीं. ज्या देशांत नियम कडक आहे, तेथील अनुभवहि अद्याप मार्गदर्शक होण्याइतका जमा झालेला नाहीं. बँकिंग बिलांतील मुख्य तत्त्वांस सर्वसाधारण पाठिंबा मिळालेला आहे. रिझर्व्ह बँकेस ४२ व्या कलमानें देखरेखीचे अधिकार दिले होते ते अपुरे होते. रिझर्व्ह बँकेनें दिलेला सल्ला मानण्याची जबाबदारी शेड्यूल बँकांवर नव्हती व कलमांत नमूद केलेल्या माहितीव्यतिरिक्त इतर माहिती मागण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार नव्हता. प्रस्तुत बिलांत इष्ट ती सुधारणा सुचविण्यांत आली आहे. सावकारी व्यवहार आणि रिझर्व्ह बँक ह्यांचा संबंध जोडणें इष्ट असलें तरी त्यास आवश्यक असलेल्या अटी स्वीकारण्यास सावकार व श्रॉफ तयार नाहींत. त्यांनीं बँकिंग व बिगर बँकिंग व्यवहार अलग करून रिझर्व्ह बँकेकडे वकशीर माहिती पाठविणें इष्ट आहे. बिलांतील बँकिंगच्या व्याख्येंत सावकारी व्यवहार येत नसल्याकारणानें तूर्त त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं. "

**श्री. टी. एस. ए. चेट्टिअर ( काँग्रेस )**

१४ वर्षांपूर्वीं बँकिंग इन्कायरी कमिटीनें तीन प्रमुख बाबी सांगितल्या, त्यांचेशीं प्रस्तुत बिल ताडून पाहिलें पाहिजे. ( १ ) बँकिंगची वाढ आणि शेती, व्यापार व उद्योगधंदे ह्यांची अभिवृद्धि, ( २ ) परदेशी बँकांपासून स्वदेशी बँकांचें संरक्षण व ( ३ ) बँकिंगच्या धंद्याचें नियंत्रण. ह्या तीन बाबींपैकीं फक्त पहिली बाबच बिलाच्या क्षेत्रांत आहे. हिंदी बँकांना ब्रिटिश बँकांपासून संरक्षण हवें, कारण हिंदी उद्योगधंदे व बँकिंग ह्यांच्या नाशास ब्रिटिशच कारणीभूत आहेत. परराष्ट्रीय व्यापारास पैसा पुरविण्याचा धंदा सर्वस्वी विदेशी बँकांच्या हातांत आहेत; त्या बँका हिंदी व्यापाऱ्यांवर विदेशी कंपन्यांत विमा उतरविणें भाग पाडतात."

**श्री. कृष्णमाचारी ( राष्ट्रीय )**

" व्यवहार चालू करण्यासंबंधींचा व चालू ठेवण्यासंबंधींच्या अटी लहान बँकांपुरत्या ढिल्या कराव्यात. आज मोठाल्या बँकांनीं हिंदुस्थानांत सर्वत्र शाखा उघडल्या आणि कालांतरानें त्या त्यांना बंद कराव्या लागल्या तर ? लहान बँकांचा स्थानिक रहाणीशीं व व्यवहाराशीं निकट संबंध असतो, हें त्यांचें वैशिष्ट्य आहे."

**श्री. भुलाभाई देसाई ( काँग्रेस )**

" बँकांस मॅनेजिंग एजंट असूं नयेत, ही बिलांतील सुधारणा स्वागतार्ह आहे. चलनविस्ताराच्या सध्याच्या कालांत लोकांच्या मूर्खपणाचा फायदा घेणारे कंपनी स्थापक पुष्कळ असतात. ज्यांना पैसा वापरतां येणार नाहीं, अशांच्या हातीं तो पडूं न देणें योग्यच आहे. बँका बुडण्याचीं ताजीं उदाहरणें लक्षांत घेऊनच, बिलांतील तरतुदींकडे पाहिलें पाहिजे."

**श्री. मनु सुभेदार ( काँग्रेस )**

" ज्यांचे आजवर झालेले एकमेव हिंदी फडणवीस सर बी. एन. मित्र हे अध्यक्ष होते, अशा सेंट्रल बँकिंग इन्कायरी कमिटीच्या शिफारसी सरकारनें अंमलांत आणलेल्या नाहींत. युरोपियन बँका व मोठ्या बँका ह्यांचें वजन पडल्यामुळेंच बिलानें प्रस्तुत स्वरूप धारण केलेलें दिसतें. बिलाचा उद्देश देशाचें व्यापक हितसंवर्धन हा नसून ठेवीदारांचें हितरक्षण, एवढाच आहे. बँकांवर मध्यवर्ती नियंत्रण हवें, परंतु रिझर्व्ह बँकेची दृष्टी फार आकुंचित आहे. इंपीरिअल बँकेचे खास अधिकार व तिला मिळणाऱ्या खास सवलती नष्ट करणें आवश्यक आहे. अमेरिकेसारख्या जगांतील सर्वांत श्रीमान राष्ट्रानेंहि परदेशी बँकांस तेथें शाखा उघडण्यास बंदी केली आहे. हिंदी घटना कायद्यांतील निर्बंध रद्द होईपर्यंत हिंदुस्थानास असें संरक्षक नियंत्रण चालतां येणार नाहीं. परंतु मध्यवर्ती बँकिंग इन्कायरी कमिटीनें एकमतानें सर्व बँकांस लायसेन्सची अट लावण्याची शिफारस केली होती, तीसुद्धां कोणतेंहि कारण न सांगतां सरकारनें त्याज्य ठरविली आहे. संस्थानी हद्दींतील बँकांस विदेशी बँकांच्या बरोबरीनें वागविणें अन्यायाचें आहे."

**मि. युसुफ हरून ( मुस्लिम लीग )**

" बँकेचे भाग मुंबईतील धनिक लोक आपल्या हातीं एकत्रित करीत आहेत, त्यामुळें तिचें राष्ट्रीय स्वरूप नाहींसें होऊं लागलें आहे; ह्या प्रवृत्तीस आळा घातला पाहिजे."

**सर झियाउद्दिन अहमद ( मुस्लिम लीग )**

" संस्थानांतील बँका देशाच्या आर्थिक व्यवहारांत महत्त्वाचा भाग घेत आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील बँकांच्या बरोबरीचा दर्जा त्यांस वाटाघाटी करून मिळवितां यावा, अशी तरतूद केली पाहिजे."

**मि. ई. एल. सी. ग्विल्ट ( युरोपियन गट )**

ज्या कंपनींत किंवा फर्ममध्यें बँकेच्या डायरेक्टरांचा हितसंबंध आहे, तिला तारणाखेरीज कर्ज देण्यावर बिलानें नियंत्रण घातलें आहे. ही तरतूद अनावश्यक आहे आणि तीमुळें अगदीं वाजवी कर्ज देणेंहि बँकेस अशक्य होईल. बँका व इतर चांगल्या कंपन्या या दोघांचेहि डायरेक्टर असलेल्या निवडक चारित्र्यवान लोकांच्या ह्या संबंधाचा बँकेस कांहींहि उपयोग होणार नाहीं, आणि असा डायरेक्टर बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर रहाण्यास तयार होणार नाहीं. त्यामुळें बँक चांगल्या संचालकास मुकेल. भांडवलविषयक अटी पाहतां, किमान भांडवलाचे आंकडे फार लहान वाटतात. बँकिंग हा अत्यंत लहान प्रमाणावर चालविण्याचा धंदाच नव्हे."

**श्री. रामनाथ ( रिझर्व्ह बँकेचे सेक्रेटरी )**

" लहान बँकांच्या भवितव्याबद्दल भीति बाळगण्याचें कारण नाहीं. त्यांना अडचण निर्माण करण्याचा बिलाचा मुळींच हेतु नाहीं. हिंदुस्थानची सध्याची आर्थिक प्रगति पहातां, लहान बँकांस लहान गांवांत व खेड्यांत अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावियाची आहे. लहान बँकांचें योग्य मार्गदर्शन व्हावें, अशीच बिलाची योजना आहे. रिझर्व्ह बँकेवर बरीच टीका करण्यांत आली, परंतु तिनें प्रारंभींच ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें सुरू करून शेतकऱ्यांच्या भांडवलविषयक गरजांचा अभ्यास चालू केला आणि प्रांतिक सरकारें व सहकारी बँका ह्यांस वेळोवेळ सल्ला दिला. सहकारी बँकांना २% व्याजानें कर्जे देण्याची योजना रिझर्व्ह बँकेनें आंखली आहे. वेअर हाउसिंग कंपन्यांच्या स्थापनेबद्दल तिनें आपली योजना नुकतीच प्रांतिक सरकारांकडे पाठविली आहे. सावकार व श्रॉफ ह्यांचेमध्यें धंद्यांचें लिमिटेड कंपन्यांत रूपांतर करण्याची प्रवृत्ति आढळून येत आहे. ती ज्या प्रमाणांत वाढेल, त्या प्रमाणांत ते रिझर्व्ह बँकेच्या क्षेत्रांत ज्यास्त प्रमाणांत येतील."

# स्फुट विचार

### ग्रामसुधारणा योजनांत संस्थानांचें सहकार्य !

भौगोलिक व नैसर्गिक दृष्ट्या हिंदुस्थानांतले प्रांत व संस्थानें हे राज्यव्यवस्थेचे भाग परस्परांशी असे निगडित झाले आहेत कीं त्यांतील जनतेची आर्थिक प्रगति घडवून आणावयासाठी योजावयाच्या उपायांचे बाबतींत त्यांचेमध्यें सहकार झाल्यावांचून ते यशस्वी होणें कठिण आहे. प्रांत व संस्थानें ह्यांनीं योजनात्मक धोरणें आपापल्या शक्तीप्रमाणें व स्वतःच्या कल्पनांस अनुसरून अंमलांत आणल्यास तें व्यवहार्य व परिणामकारक होणार नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेऊन ग्रामसुधारणाविषयक योजनांत लगतचीं संस्थानें व प्रांत ह्यांचें सहकार्य घेण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. परवां म्हणजे सोमवारीं प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या मुंबईत भरलेल्या सभेचें उद्घाटन करतांना हंमामी गव्हर्नर, सर हेन्री नाइट, ह्यांनीं ह्या उपक्रमाचा उद्देश व क्षेत्र ह्यांचें मार्मिक विवेचन केलें. बोर्डाच्या सभेस लगतच्या संस्थानांच्या प्रतिनिधींस विचारविनिमयासाठी निमंत्रण देण्यांत आलें होतें. ब्रिटिश आणि संस्थानी मुलूख ह्यांची मुंबई प्रांतांत ठिकठिकाणीं अशी गल्लत झाली आहे कीं पाटबंधारे, रस्ते, वीज, जमीन सुधारणा ह्यांचेसंबंधांतील योजना त्यांत स्वतंत्र व निरनिराळ्या अंमलांत आणणें खर्चाचें व अडचणीचें आहे हें कित्येक उदाहरणें देऊन सर हेन्री ह्यांनीं सिद्ध केलें. रस्ते, कालवे, विजेचें उत्पादन इत्यादींस लागणारा पैसा उभा करण्याचें सामर्थ्य बहुतेक संस्थानांत नाहीं आणि त्या बाबतच्या मुंबई सरकारच्या योजनांचा संस्थानी मुलखाशीं निकट संबंध येत असल्यानें त्या स्वतंत्र रीतीनें पार पाडण्याचे मार्गांत अडथळे उत्पन्न होतात. उलट, एकमुखी कारभार आणि मर्यादित मुलूख व खर्च ह्यांचे योगानें कांहीं सुधारणा संस्थानांत सहज हातीं घेतां येतील. मुंबई सरकार आणि संस्थानें ह्यांच्या परस्पर सहकार्यानें दोघांच्या अडचणी दूर होऊन सर्वांच्या हितास परिपोषक अशा अभिवृद्धीच्या योजना फलद्रूप करतां येतील ही कल्पना सर हेन्री ह्यांनीं पुढें मांडली. आणि आर्थिक योजना प्रादेशिक पायावर उभ्या करण्याचें महत्त्व प्रतिपादलें. त्यांच्या भाषणाचा अपेक्षित योग्य परिणाम घडून अभिवृद्धीच्या योजना सहकारात्मक व सुकर होतील अशी आशा आहे.

---

### रेलवेज आणि मोटारीचा धंदा

सध्या हिंदी आगगाड्यांत प्रवाशांची गर्दी आणि हाल होत आहेत त्यांचेविषयींच्या तक्रारी वृत्तपत्रांत सारख्या प्रसिद्ध होत आहेत. मध्यवर्ती असेंब्लीच्या सभासदांनींहि त्यासंबंधांत सरकारवर टीका केली आहे. आगगाड्यांतील गर्दी कमी करण्याच्या हेतूनें रेलवेजनीं शक्य तेथें मोटार बसेस चालवाव्या आणि त्याप्रीत्यर्थ ८२ लक्ष रुपये खर्चण्यास मान्यता मिळावी अशी अंदाजपत्रकांत सरकारनें केलेली सूचना मात्र असेंब्लीनें फेटाळून लावली होती. खाजगी बसेसच्या मालकांचा धंदा बसून त्यांवर रेलवेजचें वर्चस्व प्रस्थापित होईल ही गोष्ट इष्ट नाहीं आणि आगगाड्या व बसेस ह्यांच्या वहातुकीविषयींचें धोरण राष्ट्रीय दृष्टीनें समाधानकारक रीतीनें निश्चित झाल्यावांचून हिंदुस्थान सरकारच्या योजनेस पाठिंबा देतां येत नाहीं अशी भूमिका असेंब्लीमधील प्रमुख पक्षांनीं स्वीकारली होती. युद्धवहातुकीचे मंत्री सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं त्यांच्या पुढाऱ्यांची समजूत काढली आणि नामंजूर झालेल्या ८२ लक्ष रुपयांच्या खर्चास असेंब्लीनें बहुमतानें आतां मान्यता दिली आहे. रेलवेज, प्रांतिक सरकारें व खासगी बसेसचे मालक ह्यांच्या एकत्र विचारानें सरकार आपली योजना अंमलांत आणील ह्या आश्वासनाच्या आधारावर प्रस्तुत प्रकरण निकालांत काढण्यांत आलें आहे. रस्त्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर करण्याचें ठरलें आहे. त्यांवर वहातुक करणाऱ्या बसेस व रेलवेज ह्यांची अनिष्ट स्पर्धा होऊं नये, युद्धाचे संबंधांत मोटारविषयक काम करणारांस युद्धोत्तर काळांत उद्योग मिळावा व ह्या बाबतींत सर्व देशभर एकसूत्री धोरण असावें ह्या गोष्टी सरकारी योजनेच्या मुळाशी आहेत. निरनिराळ्या हितसंबंधाचा मेळ घालण्याचा हा प्रयत्न आहे आणि तो असेंब्लीमधील प्रमुख पक्षांस मान्य झाला आहे, हें विशेष आहे.

---

### प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांचें आकस्मिक निधन

युरोपिअन रणांगणावरील मित्रराष्ट्रांच्या विजयाचा क्षण अगदी जवळ येऊन ठेपला आहे आणि जगाची राजकीय व आर्थिक घडी सुव्यवस्थित रीतीनें बसवण्यासाठी सॅन फॅन्सिस्को येथें आंतरराष्ट्रीय परिषद् थोड्याच दिवसांत भरावयाची आहे, अशा स्थितींत प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांस आकस्मिक मृत्यू यावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. जगाची शांतता व सुस्थिति ह्यांविषयींच्या उदात्त व उदार कल्पनांनीं प्रेरित होऊन प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं जर्मनी व जपान ह्यांच्या आक्रमणात्मक, अत्याचारी व स्वातंत्र्यविध्वंसक सत्तेचा नाश करण्यासाठी इंग्लंड व रशिया ह्यांच्याशीं मनःपूर्वक सहकार्य करून युद्धाचा विजयी शेवट जवळ आणला. अमेरिकेच्या प्रचंड आर्थिक शक्तीचा उपयोग मित्रराष्ट्रांच्या विजयाप्रीत्यर्थ व्हावा ह्याकरितां प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं अविश्रांत श्रम केले आणि अमेरिकन लोकमतास इष्ट वळण लावण्यांत अपूर्व यश संपादलें. युद्धसमाप्तीनंतरच्या जागतिक व्यवस्थेच्या घटनेंत त्यांच्या नेतृत्वाची उणीव भासल्यावांचून रहाणार नाहीं. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांच्या मृत्यूनें सबंध जगाची भयंकर हानि झाली आहे. तथापि ह्या उदारचरित मुत्सद्याचीं उदात्त ध्येयें जागतिक घडामोडींत प्रभावी होवोत अशी सार्वत्रिक इच्छा असणें स्वाभाविक आहे.

---

### वीज कंपनीचा लायसेन्स रद्द करण्याच्या सरकारी अधिकारावर अपील नाहीं.

वीज कंपनीचा लायसेन्स रद्द करण्याचा सरकारचा अधिकार कशा प्रकारचा आहे, हें हुबळी इ. कंपनीनें मुंबई सरकारवर नुकसानभरपाईचा दावा लावला, त्यांत स्पष्ट झालें आहे. "अर्थ"च्या ता. ४ एप्रिलच्या अंकांत दाव्याची माहिती दिली आहे. न्या. ब्लॅगडेन ह्यांनीं आपला निवाडा गेल्या आठवड्यांत जाहीर केला, त्यांत ते म्हणतातः— "लायसेन्सच्या अटी पाळण्यांत आल्या किंवा नाहीं, हें सरकारनें योग्य प्रकारें ठरविलें किंवा कसें हें तपासून पहाण्याचा अधिकार हायकोर्टास नाहीं."

---

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती

(३) लोणावळा (४) बेलापूर.

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकिरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर,
नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

— भांडवल —

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १०,००,००० |

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर, रत्नागिरी, फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर


## महाराष्ट्राची युद्धोत्तर आर्थिक प्रगति

### तरुणांचें धाडस व स्वावलंबन ह्यांस भांडवलाच्या जोडीची आवश्यकता

#### श्री. न. गं. आपटे यांचें नागपूर येथील व्याख्यान

नागपूर येथील राजाराम लायब्ररींत ऑल इंडिया लॉ रिपोर्टरचे रा. ब. दातार, बी. ए., एलएल. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या महिन्यांत रूरल प्रॉडक्ट्स कं. लि. चे मॅ. डायरेक्टर श्री. न. गं. आपटे यांचें 'युद्धोत्तर महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यान झालें.

#### श्री. आपटे यांचें भाषण

"युद्धोत्तर महाराष्ट्राची कल्पना आपल्या डोळ्यांपुढें आणीत असतां, युद्धपूर्व व युद्धकालीन महाराष्ट्रांत जें घडलें असेल अगर घडत असेल त्या घडून आलेल्या अगर घडणाऱ्या गोष्टींवरून जे रीतसर निष्कर्ष निघूं शकतील, तेच युद्धोत्तर महाराष्ट्रांत आपणांस करणें शक्य आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युद्धोत्तर काळांतील उन्नतीसाठीं महाराष्ट्रापुढें एकच मार्ग आहे व तो म्हणजे स्वावलंबनाचा होय. १९०७ सालीं औद्योगिक बाबतींत लोकमान्यांनीं सुचविलेला स्वावलंबन व स्वदेशीचा महामंत्र आजहि तितकाच, किंबहुना त्यापेक्षांहि अधिक आवश्यक आहे. आज महाराष्ट्रांत जे उद्योगधंदे चालू आहेत त्यांची छाननी केली असतां नोकरींत किंवा व्यवसायांत मिळत असलेले पैसे बाजूस सारून कर्तबगार तरुण मंडळी स्वतंत्र धंद्याचा मार्ग पत्करीत आहेत व त्यांत यशहि मिळवीत आहेत असें आपणांस दिसून येईल." श्री. पु. ग. मराठे, श्री. म. स. पारखे, श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, श्री. दिगंबरपंत ओगले, इत्यादि कारखानदारांनीं मिळविलेल्या यशाचा उल्लेख करून व अशा प्रकारचीं आणखी अनेक उदाहरणें असल्याचें सांगून श्री. आपटे यांनीं या धंद्यांना मदत कशी करतां येईल याचें विवेचन केलें. या विवेचनांत ज्या व्यक्तींनीं महाराष्ट्राच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा विचार केला आहे अशा तज्ञ मंडळींचें एक मंडळ निर्माण करण्याबद्दल व अशा उद्योगधंद्यांना मदत करणाऱ्या महाराष्ट्र इं. इन्व्हेस्टमेंटस व नागपूर इन्व्हेस्टर्ससारख्या संस्था काढण्याबद्दल त्यांनीं सुचविलें.

ते पुढें म्हणाले कीं, कोणतीहि नवीन योजना पुढें आल्यास वरील तज्ञ मंडळींच्या पुढें ती मांडून त्या योजनेची योग्यायोग्यता व उपयुक्तता ठरवून घ्यावी व मग भांडवल पुरविणाऱ्या कंपनीकडे ती द्यावी व त्या कंपनीनें वरील धंद्यास भांडवल पुरवावें. याप्रमाणेंच मालविक्रीचीहि एक संघटना असावी व तिनें या कारखान्यांत निर्माण झालेला माल विकण्याची व्यवस्था करावी. अशा प्रकारची खटपट महाराष्ट्र कारखानदारसंघ मराराष्ट्रांतील कारखान्यांकरितां करीत आहे.

वरील विवेचनांत ज्यांच्यापासून भांडवल घ्यावयाचें त्यांचा उल्लेख नसल्यानें श्री. आपटे यांनीं त्यांचा स्वतंत्रपणें उल्लेख केला व ते म्हणालेः—"महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति हें आपल्या घरचें काम आहे, त्यांत महाराष्ट्राच्या संपत्तीची वाढ होणार आहे, त्यांत स्वतःच्या मुलांबाळांना व्यवसाय मिळणार आहे, स्वावलंबनाची व त्यामुळें स्वातंत्र्याची सार्वत्रिक वृत्ति निर्माण होणार आहे, या गोष्टी लक्षांत घेऊन प्रत्येक महाराष्ट्रीय व्यक्तीनें आपल्या

जवळच्या पैशांपैकीं निदान १० टक्के तरी वर सांगितलेल्या प्रकारच्या भांडवल जमा करणाऱ्या कंपन्यांस द्यावें. यामुळें पैसे गुंतविणारांचा पैसा सुरक्षित राहून उद्योगधंद्यांना त्यांच्या पैशाचा उपयोग होईल. १९०७ सालीं धंद्याबाबतचे प्रयोग करून पाहण्यासाठीं देणग्या म्हणून जसे पैसे मागण्यांत आले, त्याप्रमाणें आज भांडवल म्हणून पैसे मागण्याची वेळ आली आहे. पूर्वी ज्याप्रमाणें महाराष्ट्रानें लक्षावधि रुपयांचा पैसाफंड दिला त्याप्रमाणेंच हेहि पैसे महाराष्ट्र देईल असा मला विश्वास वाटतो."

शेवटीं श्री. आपटे यांनीं रूरल प्रॉडक्ट्स कंपनीमार्फत ज्या प्रादेशिक योजना आखल्या जात आहेत त्यांचा उल्लेख करून महाराष्ट्राचे मुख्यत्वेंकरून चार भौगोलिक विभाग पडत असल्याचें सांगितलें. या चार विभागांपैकीं सोलापूर विभाग आणि पुणें-नाशिक विभाग या विभागांतून होणाऱ्या विशिष्ट पिकांपासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याच्या योजना व कार्यक्रम चालू आहेत. त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे कोरफडीपासून काळा बोळ तयार करणें, एरंडीपासून टर्कीरेड तयार करणें, टोमॅटोपासून टोमॅटो केचप तयार करणें, बटाटे व कांदे वाळवून ठेवणें वगैरे होत. हे पदार्थ आपले आपण केल्यास महाराष्ट्रांतील पैसा महाराष्ट्रांत राहून अनेक तरुणांना काम मिळेल व त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध सरकारी कचेऱ्यांतून कारकुनी कामें करावीं लागणार नाहींत असें ते म्हणाले.

श्री. आपटे यांनीं विनंति केल्याप्रमाणें प्रत्येकानें उद्योगधंद्यांना शक्य तितकी मदत करावी असा समारोप करून रा. ब. दातार यांनीं सभा बरखास्त झाल्याचें जाहीर केलें.

---

## "अपेक्षित" नफ्याच्या नुकसानीची भरपाई

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

लँड ॲक्विझिशन ॲक्टाच्या २३ व्या कलमानुसार अपेक्षित नफा मिळूं शकत नाहीं त्याची नुकसानभरपाई मिळण्याबद्दल मुंबई हायकोर्टाकडे करण्यांत आलेल्या अर्जाचा न्या. मॅकलिन व न्या. राजाध्यक्ष ह्यांनीं नुकताच निवाडा केला. अर्जदाराचा सांताक्रूस येथें एक सिगारेटचा कारखाना होता व धंद्रा वाढविण्यासाठीं त्यानें जुहू येथें एक जमीन विकत घेतली. मूळ कारखान्याच्या तिप्पट मोठा कारखाना तेथें उभारण्याचा त्याचा विचार होता. त्यानें त्यासाठीं परवानगी मिळविली, नकाशांस मंजुरी मिळविली व कारखाना बांधण्यास प्रारंभ केला. इतक्यांत सरकारनें ती जागा अक्वायर करण्याबद्दल नोटीस दिली. एका वर्षाच्या अपेक्षित नफ्याइतकी म्हणजे १,८४,५०० रुपये एवढी रक्कम आपणांस मिळावी, असें अर्जदाराचें म्हणणें होतें. लँड ॲक्विझिशन अधिकाऱ्यास ही मागणी भरमसाट वाटली, परंतु जमिनींत गुंतलेल्या रकमेवर ६% व्याज देऊन अपुरी इमारत व बांधकामाचें सामान ह्या बाबतच्या नुकसानीची भरपाई त्यानें करविली. त्यावर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अर्ज करण्यांत आला. "अपेक्षित" नफ्याच्या नुकसानीची भरपाई करण्यांत आली पाहिजे, असा असिस्टंट जज्जाचा अभिप्राय पडला. ह्यावर सरकारनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें, तेव्हां हायकोर्टानें लँड ॲक्विझिशन ऑफिसरनें ठरविलेली रकमच कायम केली.

---


# दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव

शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापुर

**खेळतें भांडवल १५ लाखांवर**

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, B. A., LL. B.
चेअरमन.

श्री. एल. एस. आजगांवकर, श्री. एस. के. सामंत, श्री. एन. व्ही. सामंत, श्री. पी. ए. तेंडोलकर, श्री. जी. एन. कलघटगी, श्री. डी. आय. गाडवी, श्री. आय. एम्. झुंझुरवाडी, श्री. टी. व्ही. पोरवाल, श्री. डी. आर. अनगोळकर, श्री. आर. डी. गुर्लहोसूर, श्री. जी. जी. वेलिंग.

**आकर्षक दरानें मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा.

एस. एन. सामंत,
मॅनेजिंग डायरेक्टर

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड,

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ३,६७,९५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ३५,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

## मोठ्यांचें सगळेंच मोठें! —अमेरिकेचें प्रचंड कर्ज

अमेरिकेचा अफाट युद्धखर्च, त्या राष्ट्राची अलोट संपत्ति आणि त्याचें लढाऊ सामुग्रीचें प्रचंड उत्पादन ह्याविषयीं माहिती वेळोवेळ प्रसिद्ध झाली आहे. तथापि, कोणत्याहि राष्ट्राच्या श्रीमंतीस मर्यादाहि आहेच; आणि प्रस्तुत युद्धसमाप्तीनंतर लढाऊ खर्च बंद होईल तेव्हां शांततेच्या काळीं सरकारच्या खर्चावर कांहीं तरी नियंत्रण घातलें पाहिजे असें अमेरिकेंतील मुत्सद्यांस वाटूं लागलें आहे. ह्या संबंधांतले कांहीं आकडे विस्मयजनक आहेत. ते आम्ही एका अमेरिकन साप्ताहिकांतून उधृत करीत आहों. अमेरिकेच्या दीडशें वर्षांच्या आयुष्यांत ९६ वर्षांत तेथील सरकारचा खर्च प्राप्तीच्या मर्यादेंत राहिला आणि ५९ वर्षांत तो उत्पन्नापेक्षा अधिक झाला. ह्या तुटीच्या वर्षांतलीं १७ वर्षें युद्धाचीं होतीं. अमेरिकन राष्ट्राच्या स्थापनेपासून गेल्या महायुद्धापर्यंत वार्षिक तूट (अंतर्गत युद्धाचीं चार वर्षें सोडून) ९ कोटि डॉलर्सच्या वर कधींहि गेली नाहीं. मागील महायुद्धांत १९१७–१९ ह्या तीन वर्षांत अनुक्रमें ८५,९०० व १३०० कोटि डॉलर्स इतकें कर्ज अमेरिकन सरकारास काढावें लागलें आणि त्यापैकीं कांहीं भाग दोस्त राष्ट्रांस दिलेल्या कर्जाचा होता. पुढें १९२० ते १९३० पर्यंत सरकारच्या काटकसरीमुळें राष्ट्रीय कर्ज बरेंचसें कमी झालें. परंतु त्यानंतरच्या दशवार्षिक मुदतींत तें २,७०० कोटि डॉलर्सनीं वाढलें. म्हणजे सरसरीनें कर्जात दरवर्षी २७० कोटि डॉलर्सची वाढ झाली. चालू युद्धानें कर्जांत मोठीच भर घातली आहे. ह्या युद्धाचे समाप्तीनंतर अमेरिकन सरकारचें कर्ज ३०,००० कोटि डॉलर्स (सुमारें १ लक्ष कोटि रुपये) भरेल असा अंदाज आहे. म्हणजे प्रत्येक अमेरिकन कुटुंबामागें ३० हजार डॉलर्सचें कर्ज होईल. अडीच टक्के दरानें ह्या एकूण कर्जावरचें वार्षिक व्याज ७५० कोटि डॉलर्स (सुमारें २,५०० कोटि रुपये) इतकें होईल. १९४० पूर्वी अमेरिकन सरकारचें उत्पन्न कोणत्याहि वर्षी ७०० कोटि डॉलर्सपेक्षा अधिक नव्हतें. ह्याचा अर्थ असा आहे कीं युद्धापूर्वीच्या एकूण उत्पन्नापेक्षा युद्धानंतरच्या काळांत नुसत्या कर्जावरील व्याजाचा खर्चच अधिक होईल! सर्व प्रकारच्या अमेरिकन बँकांच्या ठेवींपैकी दोन-तृतीयांश रकम सरकारी कर्जात गुंतली आहे आणि आयुर्विमा मंडळांचे १,५०० कोटि डॉलर्स असेच गुंतलेले आहेत. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतां अमेरिकन सरकारनें स्वतःच्या उत्पन्नाचे मर्यादेंत युद्धोत्तर काळांत खर्च करावा असा निर्बंध घालण्याचें अगत्य विचारी अमेरिकन नागरिकांस वाटत असल्यास त्यांत नवल नाहीं.

## इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्ट, लि., मुंबई

वरील कंपनीनें आपले पैसे वेगवेगळ्या ठिकाणीं गुंतवले आहेत, परंतु त्या सर्वांत सरकारी रोख्यांच्या वांट्यास अधिक म्हणजे ४२·९९% रकम आली आहे. कापडाच्या गिरण्या, तागाच्या गिरण्या, पब्लिक युटिलिटी कंपन्या (वीज वगैरे) ह्यांत अनुक्रमें ९·७७%, ७·१६% व ७·६५% रकम गुंतविलेली आहे. सरकारी रोख्यांपैकीं ९६·३७% रोखे हिंदी (रुपयांचे) आहेत व ३·६३% रोखे स्टर्लिंगमधील आहेत. आणखी एका वेगळ्या तऱ्हेनें गुंतवणुकीची छाननी केली, तर सरकारी रोखे व डिबेंचर्स ४४·८२%; प्रेफरन्स भाग १४·३६%; ऑर्डिनरी भाग व स्टॉक ४०·८२% असें प्रमाण पडतें. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें १ कोटि रुपये आहे. ती ठेव घेत नाहीं. व्यवहार सगळे कागदी असल्याकारणानें व्यवस्थेचा खर्च कमी येतो. भागीदारांना १९४४ सालाकरितां ३½% कर माफ डिव्हिडंड मिळणार आहे.

---

## ब्रिटन आणि व्यापार

युद्धपूर्व बाजारपेठा परत मिळविण्याच्या व नवीन बाजारपेठा काबीज करण्याच्या तयारींत ब्रिटन गुंतलें आहे. युद्धमान युरोप सोडून इतर २६ देशांची भावी बाजारपेठ या दृष्टीनें माहिती मिळवून तयार ठेवण्यांत आली आहे. परदेशीं जाण्यास लागणारे परवाने देण्यांत ब्रिटिश सरकार दक्ष आहे. ब्रिटिश माल मिळावयास लागल्याबरोबर तो विकून टाकण्याकरितां शेकडो व्यापारी प्रतिनिधी दूरदूरच्या देशांत आज संचार करीत आहेत. प्रमुख राष्ट्रांतील ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या विक्रीचे अधिकारी म्हणून नेमणुका करण्यांत आल्या आहेत. लहान कारखानदारांचें प्रतिनिधित्व गटवारी पद्धतीनें देण्यांत येत आहे.

---

## अमेरिका आणि जकातीचे दर

प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं कॉंग्रेसकडे कांहीं वस्तूंवरील जकातीचे दर ७५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा अधिकार मागितला होता. ते म्हणाले: "भरपूर रोजगार आणि रहाणीचें मान टिकविण्याकरितां आपला परराष्ट्रीय व्यापार वाढला पाहिजे. ह्याचा अर्थ अधिक निर्गत व अधिक आयात. आयातीच्या रूपानें आपण किंमत घेतल्याशिवाय आपली शेती व कारखाने यांतील वस्तूंची निर्गत अधिक प्रमाणांत होणार नाहीं. अधिक निर्गतीची आपल्याला आवश्यकता आहे."

---

**आम्ही नाहीं, आपणच!** सह्याद्रीनें १९४४ सालीं केलेली प्रगति ही आपल्याच विश्वासाचें प्रतीक असल्यानें या प्रगतीच्या श्रेयाचे भागीदार आपणच आहांत; आम्ही नाहीं.

आलेलें काम—३१,१८,९३८
मंजूर काम —२८,२२,७६९
पूर्ण काम —२५,१४,९२३

आयुष्यावरील विमा याच कंपनींत उतरून आपल्या आर्थिक सुखांत भर घाला. भरपूर कमिशनवर एजन्सी दिली जाते.

सह्याद्रि विमा कंपनी, लि.
नासिक.

गो. ग. सौंदणकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसी
सा. न. वि. वि.

"आपल्या महाराष्ट्रीय कारखान्यांची युद्धकाळांत प्रगति झाली का ?" माझ्या एका स्नेह्यानें विचारलेल्या ह्या प्रश्नाचें उत्तर मी 'होय' आणि 'नाहीं' ह्या शब्दांत दिलें. त्याचें समाधान मात्र माझ्या या त्रोटक उत्तरानें झालें नाहीं ! युरोपमधील युद्ध आतां कोणत्याहि क्षणाला संपेल आणि युद्धोत्तर व्यापारी चढाई निढाई तावडतोब सुरू होण्याचीं लक्षणें स्पष्ट दिसत आहेत. ओगल्यांच्या काच कंपनीची वार्षिक सभा नुकतीच झाली. शेठ चतुरभाई पीतांबरदास शहा ह्यांच्या तिचेमधील अध्यक्षीय भाषणांतील पुढील वाक्यें मला चिंतनीय वाटतातः "युद्धोत्तरच्या कार्याकडे आमचें लक्ष वेधलें असतांना हिंदुस्थान सरकार आम्हांला इथें युद्धकार्याकरितां नित्य लागणाऱ्या वस्तू बनविण्यास सांगत आहे; आणि ह्याच वेळीं त्याच प्रकारचा माल परदेशांतून येथें आणीत आहे. ह्याचा परिणाम असा होत आहे कीं परदेशी माल आमच्या बाजार पेठेंत विकला जात असून त्याचें नांवहि होत आहे. आम्हांला मात्र बाजारांत माल विकणें व नांव करणें या परिस्थितीमुळें शक्य होत नाहीं. आमच्या प्रभाकर कंदिलाबाबत ही गोष्ट घडत असून ती श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले यांनीं हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर आझिझुल हक ह्यांच्या नजरेस आणली आहे."

युद्धकाळांत आपल्या कारखान्यांनीं भांडवल व ठेवी यांची मागणी केली. महाराष्ट्रानें त्यांना दोन्ही हातांनीं पैसा दिला; भांडवल कमी अशी अडचण आतां रहाण्याचें कारण दिसत नाहीं. मालाची विक्री वाढली दोन कारणांमुळें—बाजारभाव वाढल्यानें आणि उत्पादन वाढल्यानें. अलिकडेच कोळसा, कच्चा माल, कामगार ह्यांच्या कमतरतेमुळें कांहींचें उत्पादन घटल्याचें ऐकण्यांत येतें. कारखानदारांनींहि युद्धकालीन नफ्यांतील योग्य वाटणी भागीदारांना डिव्हिडंड व व्याज रूपानें पोंचती केली. हें असेंच पुढें चालेल कां ? याचें उत्तर कारखानदारांनीं युद्धकाळांत मिळविलेल्या अनुभवावर अन् तयारीवर बरेचसें अवलंबून नाहीं कां ?

"आज आम्हीं युद्ध-कार्यांत गुंतलों आहोंत; माफ करा हं ! आपली सोय आम्हांस पाहतां येत नाहीं. परंतु युद्धकाळांत मिळालेला अमूल्य अनुभव आम्हांला उद्याच्या नवीन जगांत गिऱ्हाइकांची सेवा करण्यांत अधिक उपयोगी पडेल" अशा अर्थाचे आश्वासनपूर्ण उद्‌गार आमचे किती कारखानदार काढूं शकतात, त्यावरच आमच्या कारखान्यांचें भवितव्य अवलंबून आहे.

प्रचंड उत्पादन व तदनुषंगिक प्रश्न हाताळण्याची आम्हांला संवय झाली आहे कां ? गुणांनीं सरस आणि किंमतीनें किफायतशीर उत्पादन आम्हीं करावयाला शिकलों कां ? उपयोगापेक्षाहि चवितल्याबरोबर हातांत वस्तु घ्यावी—ती आपल्या जवळ, आपल्या मालकीची असावी असें गिऱ्हाइकाला वाटणें, ह्या मालविक्रीच्या मानसशास्त्राचा आपण विचार करतों का अन् ह्या दृष्टीनें आपल्या मालांत सुधारणा करतो कां ? कारखान्यांतील मंडळी आपल्याबद्दल कुठेंहि झालें तरी चांगलें बोलतील—वाईट तरी बोलणार नाहींत—अशी आपली खात्री आहे कां ? विक्रीकरितां नेमलेल्या मंडळींना आपल्या कारखान्यांबद्दल आपलेपणा वाटतो कां ? ते आनंदी—समाधानी वृत्तीनें माल विकायला जातात ना ? छापलेल्या जाहिरातीपेक्षाहि कधीं कधीं चालतीबोलती जाहिरात बरें-वाईट काम अधिक परिणामकारक रीतीनें करते हें आपल्याला माहीत आहे ना ?

या व असल्याच इतर प्रश्नांचीं उत्तरें मी मनांतल्या मनांत देण्याचा प्रयत्न केला अन् माझ्या मित्राला उत्तर दिलें 'होय' अन् 'नाहीं' !

युद्धोत्तर काळांतील प्रादेशिक औद्योगिक नियोजनांत बसणाऱ्या आमच्या सर्व लहान-मोठ्या कारखान्यांचे दिवस निश्चयेकरून चांगले राहतील असा विश्वास वाटतो.

—संजय

## जागतिक वैमानिक वहातुकीच्या योजनांसाठी कंपन्यांची स्थापना

नागरिकांच्या उपयोगासाठी हवाई वहातुकीच्या तीन नवीन कंपन्या स्थापन करण्यांत येणार असल्याचें ब्रिटिश सरकारनें नुकतेंच जाहीर केलें आहे. कंपन्यांच्या कार्याची विभागणी प्रादेशिक तत्त्वावर करण्यांत आलेली आहे.

पहिली कंपनी अमेरिका, साम्राज्य-अंतर्गत देश, चीन व अति-पूर्वेकडील देश यांतील उतारूंची ने-आण करील. यांत हिंदुस्थानचा समावेश अर्थातच होतो. ब्रिटिश ओव्हरसीज् एअरवेज कॉर्पोरेशन ह्या कंपनीकडे या वहातुकीचे अधिकार देण्यांत येणार आहेत. युद्धोत्तर हिंदुस्थानशीं होणाऱ्या हवाई वहातुकीबाबतच्या सर्व योजना पुऱ्या झाल्या असून याबद्दलचा विचार गेले दोन वर्षे चालूच होता. गेल्या १४ वर्षांच्या अनुभवानें हिंदुस्थानचा प्रवास अधिक जलद व सुखकारक करण्यांत येणार आहे. ॲव्हरो कंपनीनें बनविलेलीं 'ट्यूडर—२' विमानें उपयोगांत आणावयाचीं आहेत. या विमानांचा कमाल वेग ताशीं ३३० मैल राहील. प्रत्येक विमानांत अदमासें २७ उतारूंची सोय होईल.

दुसऱ्या कंपनीतर्फे ब्रिटनमधील अंतर्गत व युरपची वहातुक करण्यांत येईल. या कंपनींत ब्रिटिश ओव्हरसीज् एअरवेज् कॉर्पोरेशन रेल्वे, आगबोट कंपन्या, प्रवाशी संस्था व युद्धपूर्व काम करीत असलेल्या इतर कंपन्या भाग घेतील.

तिसऱ्या कंपनीकडे दक्षिण अमेरिकेची वहातुक सोपविण्यांत आली आहे.

या तीनहि कंपन्यांच्या विमानांची मोड-तोड-दुरुस्ती वगैरे एकाच ठिकाणीं करण्यांत येईल. तसेंच हवाई शिक्षण घेण्याची सोय एकत्रच करण्यांत येईल. हीं विमानें ब्रिटनमध्यें बनविलेलीं असतील. आज हें पूर्णतः शक्य नसलें तरी शक्यतों लवकर ब्रिटिश बनावटीचीं विमानें उपयोगांत आणण्याचे प्रयत्न करण्यांत येतील.

वहातुकींतील या मक्तेदारीवर ब्रिटनमध्यें वादळ उठण्याचा संभव आहे.

## मुंबई शहराचें उष्णतामान वाढलें

मुंबई शहरांत शुक्रवार ता. २३ मार्च रोजीं जेवढें उष्णतामान होतें, तेवढें गेल्या १०० वर्षांत झालें नव्हतें. त्या दिवशीं १०३·१ डिग्रीवर पारा गेला होता.

## जागतिक व्यापार काबीज करण्याचे प्रयत्न

### उद्बोधक विचार

"हिंदी औद्योगिक अभिवृद्धीला पोषक नसलेल्या मालाचा व्यापार करणाऱ्या अमेरिकन मंडळींनीं हिंदी बाजारपेठेबाबत भरमसाट कल्पना बाळगणें स्वप्नाळूपणाचें ठरेल. लंडनमध्यें पडून असलेल्या स्टर्लिंग शिलकांमुळें हिंदुस्थानाच्या व्यापाराचा ओघ ब्रिटनकडेच वळेल. ज्या वस्तू हिंदुस्थानांत बनवितां येतील त्या परदेशांतून न आणण्याबाबत किंवा परदेशांतून यंत्रसामुग्री व माल आणण्याकरितां लागणारी हुंडणावळ शक्यतों जपून वापरण्याबद्दल हिंदुस्थानांतील मध्यवर्ती सरकारावर हिंदी जनतेकडून शक्य तितकें वजन आणण्यांत येईल. ही परिस्थिति कितीं तरी वर्षे राहील.":—क्रेटन लेन, युद्धकालीन आर्थिक व्यवहाराबाबत दिल्ली येथील अमेरिकन सरकारचे प्रतिनिधि-प्रमुख.

"युद्धाच्या उपयुक्त कार्यांत गुंतलेल्या मंडळींच्या उपयोगाकरितां अदमासें २,००० ऑस्टीन १० अश्वशक्तीच्या हलक्या मोटारगाड्या ब्रिटनहून हिंदुस्थानांत या वर्षी येतील अशी हिंदुस्थान सरकारला आशा आहे. किंमत ठरलेली नाहीं; तथापि जी किंमत ठरेल तेवढ्यानें लंडनमधील स्टर्लिंग शिल्लक कमी होईल.":—सर रामस्वामी मुदलियार, हिंदुस्थान सरकारचे पुरवठामंत्री.

* * *

"जर्मनीचा पराभव झाल्यावर त्यानें ब्रिटनला द्यावयाच्या लंडणींत घरें बांधण्याकरितां व इतर उपयोगाकरितां लाकूड दिलें पाहिजे ही गोष्ट माझ्या ध्यानांत आहे.":—चर्चिल.

* * *

"निर्गत व्यापारांत आमच्या कंपनीचें स्थान नेहमींच महत्त्वाचें आहे आणि आमचा भाग उचलण्याचें कार्य आम्ही करीत आहोंत. तथापि आम्हांला आजच परदेशी कारखानदारांची स्पर्धा जबरदस्त वाटत आहे. या स्पर्धेचा स्पष्ट अर्थच असा आहे कीं, हे कारखानदार आपल्या घरच्या विक्रीच्या आणि उत्पादनाच्या किंमतीच्याहून कमी किंमतीनें आपला माल विकीत आहेत. त्यांच्या मालाला बाजारांत काय किंमत येते हें पहाण्याकरितांच ते अशा किंमती सांगत आहेत हें खरें; पण त्यांच्या सरकारांनीं त्यांस असें करूं द्यावें ही गोष्ट बरी नाहीं. चलनस्थैर्याच्या दृष्टीनें ब्रेटन वुड्स् येथें झालेल्या आंतरराष्ट्रीय करारमदाराविरुद्ध हें धोरण आहे. जागतिक व्यापार बिघडण्याला हुंडणावळींतील चढ-उतार जसा कारणीभूत होतो त्याप्रमाणेंच उत्पादन-किंमतीपेक्षां खालच्या दरानें माल विकण्याचाहि परिणाम होतो. ही गोष्ट सांगण्याचा उद्देश व्यापाराची घडी पुन्हां बसविण्यांत येणाऱ्या अडचणींची कल्पना यावी असा आहे.":—सर जॉर्ज नेल्सन, इंग्लिश इलेक्ट्रिक कंपनीचे अध्यक्ष.

* * *

"जागतिक व्यापारी चढाओढींत आपल्याला टिकावयाचें असल्यास आपली आजची मोठी गरज कार्यक्षमता, अधिक कार्यक्षमता ही आहे. कारखान्यांच्या राष्ट्रीयकरणानें कार्यक्षमता वाढते असें सांगण्यांत आलेलें नाहीं. म्हणूनच मी राष्ट्रीयकरणाच्या घोषानें अस्वस्थ होतो.":—सर जॉर्ज नेल्सन, इंग्लिश इलेक्ट्रिक कंपनीचे अध्यक्ष.


जीर्ण व हटवादी हिवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
पायरोनिल
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६, सदाशिव, पुणें २.

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून
अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
महाराष्ट्र भुवन
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव] [मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

सांडू
टोमॅटो कम्पाउन्ड
(ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९

## भोर स्टेट बँक लि.

### पाली शाखेचें श्रीमंत राजेसाहेबांचे हस्तें उद्घाटन

वरील बँकेच्या पाली ( जि. कुलाबा, सं. भोर ) येथील शाखेचा उद्घाटन समारंभ श्रीमंत राजेसाहेब सं. भोर यांचे हस्तें ता. १५-३-४५ इ. रोजीं पाडव्याचे मुहूर्तावर झाला. त्याप्रसंगीं श्री. म. व्यं. शिंगरे, मंत्री भोर स्टेट, यांचें स्वागतपर भाषण व श्री. ग. भै. साठे यांचें शाखेचें महत्त्व सांगणारें अशीं भाषणें झाल्यावर श्रीमंत राजेसाहेब यांनीं टाळयांच्या गजरांत बँकेच्या शाखेचे दारास लावलेलें रौप्य कुलूप उघडून शाखा सुरू केल्याचें जाहीर केलें. बँक व इतर निरनिराळया संस्था यांचेतर्फे श्रीमंत राजेसाहेब यांना पुष्पहार अर्पण करण्यांत येऊन पाली जनतेतर्फे रा. चिमणराव कुळकर्णी व रा. दादासाहेब साने ह्यांचीं भाषणें झाल्यावर श्रीमंत राजेसाहेब ह्यांचें मुख्य भाषण झालें.

### श्रीमंत राजेसाहेब यांचें भाषण

" सर एम. विश्वेश्वर अया यांनीं संस्थानांत बँकिंगची सुलभ साधनें नसल्यानें व्यापाराची अभिवृद्धी तेथें होत नाहीं, असें दृष्टोत्पत्तीस आणून दिलें. बडोदें, म्हैसूर व जयपूर येथें मोठाल्या बँका स्थापन झाल्या व त्याचप्रमाणें दक्षिणी संस्थानांतहि बँका निघूं लागल्या. आमचे संस्थानांतहि बँक असावी असें मुंबईचे डेक्कन मर्चंटस को. बँकेचे रजतमहोत्सवास आम्ही गेलों तेव्हांपासून आम्हांसहि फार वाटत होतें. सांगण्यास आनंद वाटतो कीं, गेल्या ऑगस्टमध्यें भोर स्टेट बँक लि. ची स्थापना झाली व जवळ जवळ सहा महिन्यांचे अवधींत बँकेच्या संचालकांनीं पहिली शाखा पाली येथें काढली. बँकेबद्दल आपुलकी व विश्वास वाढावा म्हणून आम्हीं बँकेचे निम्में भांडवल घेतलें व पहिलीं पांच वर्षें ३ टक्के डिव्हिडंड देण्याची हमीहि घेतली. सुधागड तालुका शैक्षणिक व व्यापारी दृष्ट्या पुढारलेला असल्यानें बँकेची पहिली शाखा येथें निघाली हें उचित आहे. तालुका हा भात व साग ह्यांनीं समृद्ध असून त्यास भावहि हल्लीं बराच आहे. तरी व्यापारी व धनिक लोकांनीं बँकेचा फायदा करून घ्यावा. बँकेच्या पाली शाखेचें पहिलें सल्लागार मंडळ: १ मामलेदार सुधागड, २ शेठ अमरचंद हिराचंद, ३ रा. द. रा. मोडक, ४ शेठ सांखळचंद रेवाचंद, ५ रा. गोविंद रामचंद्र ऊर्फ बापुसाहेब लिमये यांचें राहील, असें मी जाहीर करतों. "

ह्यानंतर श्रीमंत राजेसाहेब ह्यांनीं थोडें विषयांतर करून सुधागड तालुका व विशेषत: पाली गांवीं धान्य खरेदीबाबत जो थोडा गैरसमज झाला होता तो दूर केला.

### भिक्षेकऱ्यांच्या नियंत्रणासाठी कायदा

मुंबई प्रांतांत भिक्षा मागणें बंद करण्याची योजना करून भिक्षेकऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या स्थानबद्धतेची, शिक्षणाची व नोकरीची व्यवस्था करणाऱ्या एका बिलाचा खर्डा मुंबई सरकारनें तयार केला आहे आणि त्यावर मतें मागविलीं आहेत. सबंध मुंबई प्रांताकरितां ह्या कायद्याची योजना असली तरी ठराविक दिवसापासून ठराविक ठिकाणींच ती लागू केली जाईल. १२ मे पूर्वी लोकांनीं आपलीं मतें सरकारकडे पाठवावीं.

## बँक ऑफ बरोडा वि. पंजाब नॅशनल बँक

### २,४०,००० रुपयांच्या व्यवहारावर प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय

" अ " ह्या बँक ऑफ बरोडाच्या खातेदारानें बँकेवर २,७५,६०० रुपयांचा पुढील तारखेचा ( पोस्ट डेटेड ) चेक " ब " च्या नांवें १३ जून, १९३९ रोजीं काढला. बँकेतर्फे तिच्या " क " मॅनेजरनें " २०-६-३९ रोजीं वटविण्यास लायक ( मार्कड गुड फॉर पेमेंट ) " असा शिक्का मारून सही केली. " ब "नें त्याच दिवशीं तो चेक पंजाब नॅशनल बँकेच्या " ड " मॅनेजरला देऊन त्याचेवर २,४०,००० रुपये ओव्हरड्रॉफ्ट घेतला. १९ जून रोजीं " क " ह्या बडोदा बँकेच्या मॅनेजरची नोकरी सुटली. २० जून रोजीं पंजाब नॅशनल बँकेनें चेक वसुलीसाठी बडोदा बँकेकडे धाडला, तेव्हां " पैशाची तरतूद नाहीं " अशा शेऱ्यासकट तो चेक परत करून बडोदा बँकेनें त्याचे पैसे देण्याचें नाकारलें. " अ "च्या खात्यांत बडोदा बँकेंत फक्त ७ आणे ३ पै एवढीच रकम होती. पंजाब नॅशनल बँकेनें बडोदा बँकेवर पैशाच्या वसुलीसाठी दावा लावला, त्याच्या निकालावर प्रिव्हि कौन्सिलकडे अपील करण्यांत आलें.

चेकवर " मार्कड गुड फॉर पेमेंट " असा शेरा मारणें कायदेशीर आहे काय व असा शेरा मारणाऱ्या बँकेवर पैसे देण्याची जबाबदारी आहे काय, असा येथें महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. असा शेरा मारण्याची नेहमीची पद्धति नाहीं व बँकेवर जबाबदारी येत नाहीं, असा प्रिव्हि कौन्सिलचा निवाडा आहे. " चेक हा बिल ऑफ एक्सचेंजचाच एक विशिष्ट प्रकार असला, तरी इतर पतपत्रिकेप्रमाणें त्यावर असे शेरे मारण्याची वहिवाट नाहीं. चेकवर असा शेरा मारण्याचा बँकेच्या मॅनेजरास साधारणतः अधिकार पोचत नाहीं. पुढील तारखेच्या चेकचे तारणावर पैसे कर्जाऊ देण्याचा तर बँकेच्या मॅनेजरचा व्यवहार असूंच शकत नाहीं. " असा प्रिव्हि कौन्सिलचा अभिप्राय आहे.

## फ्रान्समधील काळा बाजार

### अमेरिकन सैनिकांचें अंग

युरोपियन युद्धक्षेत्रांतील सुमारें १८,००० ते १९,००० अमेरिकन सैनिक कामावरून गैरहजर आहेत, असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे. अर्थात्, लष्करांतील एकूण सैनिकांच्या मानानें ही संख्या लहानच आहे. ह्या गैरहजर सैनिकांपैकीं निम्याहून अधिक काळया बाजारांत व्यापार करण्यामध्यें गुंतलेले आहेत, ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. आणीबाणीचे वेळीं आपल्या सहकाऱ्यांस सोडून जाऊन हा धंदा करीत बसणें गर्ह्य आहे, असें एका ब्रिटिश वृत्तपत्राचा लष्करी बातमीदार म्हणतो. बंधमुक्त केलेल्या राष्ट्रांत काळा बाजार फोफावणें अगदी स्वाभाविक आहे. लंडन शहरांत अमेरिकन सैनिकांमध्यें शिस्त राखण्यास ५०० अमेरिकन मिलिटरी पोलिस पुरतात, सीन विभागांत ( त्यांत पॅरिसचा समावेश होतो ) ४,००० मिलिटरी पोलिस कामावर आहेत. पॅरिस हें काळया बाजाराचें केंद्र बनलें आहे. काळया बाजाराशीं संबंध असणाऱ्या लष्करी सैनिकांना कोर्ट मार्शल जबर शिक्षा ठोठावून परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत.

व्याज–वजा ( xd )
+ शिवराजपुर १०–४–४५
नागपुर २३–४–४५
स्वदेशी २७–४–४५

# मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )
दि. २०–४–४५ ला रामनवमीची सुट्टी

व्याज–वजा ( xd )
गोकाक ३०–४–४५
फिनले १–५–४५
इंडि. युना. ३०–५–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १०।४।४५ | बुधवार ११।४।४५ | गुरुवार १२।४।४५ | शुक्रवार १३।४।४५ | सोमवार १६।४।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९—८—९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २०१२—८ | २००२—८ | २०२८—१२ | २०६२—८ | २०३६—४ |
| ४३५; ३६९ | २३—०—० | ऑगस्ट | टाटा ऑर्डिनरी | ७५ | ३७८—० | ३७६—८ | ३८३—८ | ३८९—८ | ३८३—८ |
| २२०१; १६९५ | ५०—०—०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १७७१—४ | १७६५—० | १७७१—४ | १७९०—० | १७८८—१२ |
| ७६५; ५३३ | १६—०—०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९१—० | ५९३—० | ५९७—० | ६०६—० | ५९६—० |
| ६५३; ४७५ | २२—०—० | मे | स्वदेशी | १०० | ५३४—० | ५३२—० | ५३८—० | ५४६—० | ५४३—० |
| ४९८; ३६१ | ६—०—०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३७७—८ | ३७६—० | ३७९—० | ३८१—० | ३७७—८ |
| ३७७; २६५ | १५—०—० | एप्रिल | फिनले | १०० | २९४—० | २९३—० | २९७—० | ३०२—० | ३००—० |
| ३९४; २८२ | ९—०—०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | २९२—० | २९१—० | २९५—० | २९८—० | २९८—० |
| ३०५; २१८ | ४—०—०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २४७—० | २४६—८ | २५२—० | २५५—८ | २५३—० |
| ५-१०-६; ३-६ | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ३—११—६ | ३—११—६ | ३—१२—० | ३—१३—३ | ३—१२—६ |
| २१-१४; १३-४-६ | ०—१५—० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—० | १४—१—० | १४—२—६ | १४—४—६ | १४—३ |
| ४-९; २-७ | ०—३—० | मे | ,, डिफर्ड्स | १ | २—१४—९ | २—१४—६ | २—१४—९ | २—१५—९ | २—१५—६ |
| १२७०; ६३० | १११—०—० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९७—८ | ६९५—० | ७१३—१२ | ७२२—८ | ७३१—४ |
| २५४; २१६ | ७—०—० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३१—० | २२९—० | २३१—८ | २३१—१२ | २३०—० |
| २५९; २११ | ९—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१२—० | २१२—० | २१२—८ | २१८—० | २१५—० |
| ५७५; ३७६ | ७—८—० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५११—४ | ५१२—८ | ५११—४ | ५११—४ | ५११—४ |
| ९३-१२; ७१ | २—०—० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ७६—० | ७६—८ | ७९—४ | ७८—८ | ७८—० |
| ३८; २९-२ | १—४—० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३१—१४ | ३१—१५ | ३२—४ | ३२—६ | ३२—४ |
| ८५; ४८ | २—०—० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ४७—८+ | ४७—४ | ४७—८ | ४८—० | ४९—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | १९—१४ | १९—१४ | २०—० | २०—० | २०—० |
| ९०; ६८-१२ | ३—०—० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६४—८ | ६४—८ | ६५—४ | ६६—० | ६६—० |
| | | | ३½% रोखे | १०० | ९९—१४ | ९९—१४—३ | ९९—१४—९ | १००—० | १००—१ |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
स्वदेशी ३१–३–४५ ते १९–४–४५
फिनले ६–४–४५ ते ३०–४–४५
इंडिया युना. २०–४–४५ ते १६–५–४५

दि. १६–४–४५
3% व्हिक्टरी लोन = रु. ९९–१५–०
3% १९६३–६५ रु. ९८–१३–०
3% १९६६–६८ रु. ९८—३–०


## १९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

### दि ट्रस्ट ऑफ इंडिया
ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.
अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

## डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

### लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

डोंगरे यांच्या बालामृतानें


व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४


हें पत्र पुणें, पेठ मांपुडी घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांपुडी, घ. नं. ९२४।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे, ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २५ एप्रिल १९४५ अंक १७

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

## डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टके डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## विविध माहिती

### सावतखेड येथं बीजारोपण

महाराष्ट्र कारखानदार संघाचे उपाध्यक्ष व कॅनरा पेपर कं. लि.चे मॅनेजिंग एजंट श्री. सदाशिव कृष्ण भावे ह्यांचे हस्तें, रूरल प्रॉडक्ट्स कं. लि. नें नवीन खरेदी केलेल्या सावतखेड गांवीं पाडव्याचे सुमूहुर्तावर बीजारोपण करून कामास प्रारंभ केला. श्री. भावे ह्यांनीं सर्व जमीन पाहून एकंदर एस्टेट चांगली असल्याबद्दल समाधान व्यक्त केलें. रूरल प्रॉ. कं. लि. चे ते डायरेक्टर झाले असल्याचें समजतें.

### सहकारी परीक्षा

गव्हर्मेंट डिप्लोमा इन कोऑपरेशन अँड अकौंटन्सीची वार्षिक परीक्षा ता. ९ ते १२ एप्रिल रोजीं पुणें येथें वाडिया कॉलेजच्या इमारतींत घेण्यांत आली. परीक्षेस एकूण ६२ उमेदवार बसले होते.

### भारत इं. बँकेच्या भाग विक्रीस परवानगी

भारत इंडस्ट्रिअल बँक लि. ला ऑगस्ट, १९४४ मध्यें ५,९८,०५० रुपयांचे ११,९६१ ऑर्डिनरी भाग विकण्याची परवानगी मिळाली होती. हे शेअर्स त्यांच्या दर्शनी किंमतीस विकावयाचे होते. ह्या परवानगीची मुदत संपल्यानंतर ती मुदत १४ सप्टेंबर, १९४५ पर्यंत आतां वाढविण्यांत आली आहे.

### खेडा जिल्हा सहकारी परिषद

खेडा जिल्हा सहकारी परिषदेचें पहिलें अधिवेशन ता. २४ व २५ मार्च रोजीं दि. व. काजी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. स्वागत समितीचे अध्यक्ष, श्री. इंदुलाल याज्ञिक, ह्यांनीं आपल्या भाषणांत सरकार सहकारी संघटनेकडे आत्मीयतेनें पहात नाहीं ह्याबद्दल तक्रार केली. अध्यक्षांनींहि सहकारी संस्थेपेक्षा खासगी व्यापाऱ्यास कसें प्राधान्य मिळतें, हें सोदाहरण सांगितलें. व्यापाऱ्यांऐवजी चांगल्या चाललेल्या सहकारी संस्थांकडेच वाटपाचें काम देण्यांत यावें, अशा अर्थाचा ठराव परिषदेनें मान्य केला.

### सहकारी शिक्षण केंद्र


सहकारी खात्याचा व सुपरवायझिंग युनियन्सचा नोकरवर्ग ह्यांच्या शिक्षणासाठी पुणें येथें उघडण्यांत आलेलें केंद्र ३० सप्टेंबर, १९४५ अखेर चालू राहणार आहे.

### विमा चौकशी कमिटी

विमा कंपन्यांच्या व्यवस्थेमध्यें दिसून येणारीं कांहीं अनिष्ट वळणें व प्रवृत्ती ह्यांसंबंधीं चौकशी करून त्यांस आळा कसा घालावा ह्याविषयीं उपाययोजना सुचविण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें सर कावसजी जहांगिर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. सुपरिंटेंडंट ऑफ इन्शुअरन्स, श्री. वैद्यनाथन, हे कमिटीचे सेक्रेटरी आहेत.

### दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें वसूल भांडवल ३,०४,२१० रुपये असून तिचेकडे ८,८१,२५३ रुपयांच्या ठेवी आहेत. पहिल्या वर्षअखेरच तिला २१,४५२ रुपये नफा झाला. बँकेची सांगली येथें प्रथमपासून शाखा आहे; शाहुपुरी ( कोल्हापूर ) येथील शाखा चालू मोसमापासून सुरू झाली. बँकेनें तरती रकम भरपूर राखूनहि नफा चांगला मिळविला आहे. ऑर्डिनरी भागीदारांना २½% करमाफ डिव्हिडंड डायरेक्टरांनीं सुचविलें आहे. बँकेची वार्षिक सभा ता. २९ एप्रिल रोजीं आहे.



फौंटनपेनकरतां
कॅमल इंक
सर्व
पसंत करतात.
दांडेकर आणि
कंपनी, मुंबई २८

रूरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड

सुगीच्या दिवसांत फळांपासून रस, सरबतें, मुरंबे वगैरे आधुनिक पद्धतीनें तयार करणारा महाराष्ट्रांतील पहिलाच कारखाना

—धंद्याच्या वाढत्या व्यापासाठी—

मुदतीच्या ठेवी घेणें आहेत

◆ स्वतःच्या धंद्यास लागणारा कच्चा माल स्वतः किमान खर्चांत पिकवून पक्क्या मालाचें उत्पादन हुकुमी व निश्चित करण्यासाठीं कंपनीनें सुमारें पाऊण लक्ष रुपये किंमतीची ३३० एकर बागाइत जमीन खरेदी केली आहे.

◆ यामुळें कारखान्याच्या यंत्रसामुग्री, तयार माल इत्यादि जंगम मालमत्तेंत उत्तम बागाईत जमिनीसारख्या स्थावर मालमत्तेची भर पडली आहे.

◆ कंपनीनें केलेल्या या खरेदीमुळें कंपनीचें स्थैर्य व त्यामुळें ठेवीदारांच्या ठेवींची सुरक्षितता अनेक पटींनीं वाढली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ठेवीची मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ७॥ |
| द. द. शें. व्याजाचा दर | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

कंपनीच्या भागीदारांना वरील दरापेक्षां अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येणार आहे. ( हिंदुस्थान सरकारकडून कंपनीचें उरलेलें भांडवल १० सप्टेंबर १९४५ च्या आंत विकण्यास नुकतीच परवानगी आली आहे. )

◆ माहितीपत्रकें, ठेवीचे व शेअरचे फॉर्म खालील पत्त्यावर मागवावे.

९५२ सदाशिव, पुणें २.
न. गं. आपटे
मॅनेजिंग डायरेक्टर.

—त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्या हि खात्यांत केली जाईल.

पत्ताः—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

# अर्थ

## मद्रास प्रांतांतील कंझूमर्स सहकारी सोसायट्या

युद्धजन्य परिस्थितीनें कंझूमर्स सहकारी चळवळीस जोरानें चालना दिली आहे आणि सर्वच प्रांतांत त्याचें प्रत्यंतर येतें. विशेषतः मद्रास प्रांतानें किरकोळ आणि घाऊक विक्रीच्या सहकारी स्टोअर्सचे बाबतींत आघाडी मारली आहे. ३० जून, १९४४ अखेरच्या वर्षाचा आढावा घेतला तर स्टोअर्स सोसायट्या नोंदविण्यासाठी ८०० अर्ज आले, त्यांपैकी फक्त २५० सोसायट्यांचे अर्ज मंजूर झाले असें आढळतें. पूर्वीपेक्षा आतां जास्त कडक अटी पुऱ्या करण्याचें बंधन अर्जदारांवर घालण्यांत येत आहे, ह्याचा हा परिणाम आहे. १९४२-४३ चे मानानें १९४३-४४ सालीं सहकारी कंझूमर्स सोसायट्यांनीं २¾ पट व्यवहार केला. ह्या बाबतींत मद्रास प्रांताचे सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री. सत्यनाथन, आय. सी. एस. ह्यांनीं गेल्या वर्षीच्या प्रगतीचा घेतलेला आढावा उद्‌बोधक आहे.

१९४३-४४ अखेर मद्रास प्रांतांत एकूण ११९१ प्राथमिक रिटेल सहकारी स्टोअर्स होते व त्यांच्या शाखांची संख्या ६९२ इतकी होती. त्या स्टोअर्सच्या सभासदांची संख्या सुमारें ३¾ लक्ष भरली. त्यांचें वसूल भांडवल ४४ लक्ष रुपयांच्या घरांत गेलें. खेडेगावांतील स्टोअर्स सोसायटीचें भांडवल २,५०० रुपये असावें, मध्यम आकाराच्या गावांतील स्टोअर्सनीं ५,००० रुपयांचें भांडवल जमवावें व शहरी स्टोअर्सनीं १०,००० रुपयांचें भांडवल पुरें करावें, अशी अपेक्षा धरण्यांत आलेली आहे व ती बहुतेक स्टोअर्स पुरी करूं शकतील.

जिल्हा सहकारी बँका व कंझूमर्स सहकारी सोसायट्या ह्यांचा मद्रास प्रांतांत एकजीव झाला आहे, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. गेल्या वर्षी सोसायट्यांना खेळत्या भांडवलासाठी वेळोवेळ उभाराव्या लागलेल्या २ कोटि, २६ लक्ष रुपयांपैकी १ कोटि, ५९ लक्ष रुपये सहकारी बँकांनीं दिलेले आहेत. वर्ष अखेरचे आकडे पाहिले, तर सोसायट्यांनीं ह्या बँकांचें ३० लक्ष रुपये देणें लागतें; प्राथमिक स्टोअर्सच्या एकूण १ कोटि, ७ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी ४८% भांडवल त्यांचें स्वतःचें आहे. त्यांनीं गेल्या वर्षी एकूण ८ कोटि, ७ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची खरेदी केली, त्यांपैकी ३२% (२ कोटि, ५५ लक्ष रुपयांची) खरेदी जिल्ह्याच्या घाऊक सहकारी स्टोअर्समार्फत केली. प्राथमिक स्टोअर्स सभासदांप्रमाणें बिगर-सभासदांसहि माल विकतात; त्यांचा ६०% माल बिगर सभासदांनींच घेतला, असें आढळून येतें. सर्व प्राथमिक स्टोअर्समध्यें मिळून एकूण ६,६०० लोक पगारी काम करीत आहेत. त्यांच्या पगाराची वार्षिक रक्कम १३ लक्ष रुपयांवर आहे. प्राथमिक स्टोअर्स सोसायट्यांपैकी १,०९५ सोसायट्यांनीं ठोक नफा दाखविला. त्यांतील ८१५ सोसायट्यांना निवळ नफाहि झाला. ३६२ सोसायट्यांना निवळ तोटा झाला.

गिरणी कामगारांच्या सोईसाठी कंझूमर्स स्टोअर्स सोसायट्यांची मद्रास प्रांतांत वाढत्या प्रमाणावर स्थापना होत आहे. ३० जून, १९४४ अखेर असे ६१ स्टोअर्स होते; त्यांचे सभासद ५९,००० झाले आणि त्यांचें वसूल भांडवल ५¾ लक्ष रुपयांवर गेलें. त्यांनीं गेल्या वर्षी १ कोटि, ५ लक्ष रुपयांची विक्री केली. १९४२-४३ चा तत्सम आकडा ५७ लक्ष रुपये होता. ह्या सोसायट्यांस गिरण्यांचे मालक खेळतें भांडवल पुरवीत असल्याकारणानें, सहकारी बँकांकडून त्यांनीं फक्त ७,००० रुपये कर्जाऊ घेतलेले दिसतात. कामगारांस संतुष्ट ठेवण्याचे हेतूनें मालक लोक सोसायट्यांना अनेक सवलती देत आहेत.

सरकारी व लोकल बोर्डांचे नोकर, शिक्षक, मोठाल्या कंपन्यांचे नोकर इत्यादींसाठी ६५ स्टोअर्स काम करीत आहेत. त्यांच्या पटावरील सभासदांची संख्या २६,००० भरते. वसूल भांडवलाचा आकडा १ लक्ष, ८१ हजार आहे. गेल्या वर्षी त्यांनीं २४ लाखांची विक्री केली.

मद्रास प्रांतांतील २४ जिल्ह्यांसाठी २१ जिल्हा सहकारी होलसेल स्टोअर्स आपल्या घटकांना म्हणजे प्राथमिक स्टोअर्सना घाऊक माल कसोशीच्या किंमतीनें पुरविण्याचें कार्य यशस्वी रीतीनें करीत आहेत. धान्य वगैरे मिळवून त्याची रेशनिंगच्या योजनेप्रमाणें साठवणहि ते करीत आहेत. १९४३-४४ अखेर त्यांच्या सभासदांची संख्या ६,५३८ भरली. वसूल भांडवल १६¾ लक्ष रुपये होतें. २१ होलसेल स्टोअर्सपैकी ९ स्टोअर्सचें वसूल भांडवल प्रत्येकीं १ लक्ष रुपयांवर आहे. सहकारी बँका ह्या स्टोअर्सना खेळतें भांडवल पुरवीत आहेत. १९४३-४४ अखेर होलसेल स्टोअर्सचें एकूण खेळतें भांडवल १ कोटि, ५६ लक्ष रुपयांवर गेलें; त्यांपैकी १ कोटि, ३८ लक्ष रुपये सहकारी बँकांनीं दिलेले होते. होलसेल स्टोअर्सनीं गेल्या वर्षी ५ कोटि, १९ लक्ष रुपयांची विक्री केली, त्यांपैकी २ कोटि, ५५ लक्ष रुपयांचा व्यवहार प्राथमिक स्टोअर्सशीं झाला. कांहीं होलसेल स्टोअर्सनीं किरकोळ विक्रीसाठींहि डेपो उघडले आहेत. कलेक्टरांच्या परवानगीनें खाजगी दुकानदार व व्यापारी ह्यांस १ कोटि, ९० लक्ष रुपयांचा नियंत्रित माल पुरविण्यांत आला. २१ होलसेल स्टोअर्सपैकी १९ स्टोअर्सनीं १९४३-४४ मध्यें निवळ नफा दाखविला.

फक्त धान्य वगैरे खाद्य पदार्थांच्या खरेदी-विक्रीचें कार्य प्राथमिक व होलसेल सोसायट्या करीत नसून नित्योपयोगी इतर मालाचा व्यापारहि त्या करूं लागल्या आहेत. कापड, सर्पण, औषधें, स्टेशनरी, वगैरे माल त्यांचेकडे मिळूं शकतो. कांहीं प्राथमिक स्टोअर्सनीं ८४ हजारांचा भाजीपालाहि विकला. सभासदांच्या सर्व गरजा यशस्वी रीतीनें व कसोशीच्या दरानें पुरविण्यावर स्टोअर्सचा उत्कर्ष अवलंबून आहे. धान्य वगैरे आवश्यक माल आतां नियंत्रित असल्याकारणानें, त्याची खरेदी-विक्री हाच स्टोअर्सचा आज प्रमुख व्यवसाय असला, तरी सर्व जिनसा मुबलक व स्वस्त मिळूं लागल्यावर स्टोअर्सची उपयुक्तता टिकण्यास त्यांचा व्यवहार अधिक व्यापक व उपकारक व्हावयास हवा. युद्धोत्तर काळांत त्यांना ह्या महत्त्वाच्या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरवावें लागेल. मद्रास प्रांतानें कंझूमर्स स्टोअर्सच्या बाबतींत नमुनेदार प्रगति केलेली आहे. तेथील व्यवहाराची माहिती उद्‌बोधक होईल, ह्यांत संशय नाहीं.

## मुंबई प्रांताची ग्रामोद्धार योजना

### रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा

गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरलेल्या प्रांतिक ग्रामोद्धार समितीच्या ( प्रॉव्हिन्शिअल रूरल डेव्हलपमेंट बोर्ड ) सभेचा हा विशेष होता कीं तीमध्यें गुजराथ व महाराष्ट्र ह्यांमधील देशी संस्थानांच्या निमंत्रित प्रतिनिधींनीं चर्चेत भाग घेऊन ग्रामसुधारणेच्या मुंबई योजनेशीं सहकार करण्याची आपली तयारी दर्शवली. कालवे, पाटबंधारे, विजेचा पुरवठा, जमीन सुधारणा, रस्त्यांचा विस्तार इत्यादि अनेक महत्त्वाच्या बाबतींत मुंबईप्रांत व त्याशीं संलग्न असलेलीं संस्थानें ह्यांचें सहकार्य उभयपक्षीं उपयुक्त होण्यासारखें आहे ही गोष्ट सर्वांस पटली आहे. सरकारच्या ह्या कल्पनेस मूर्तस्वरूप कसें यावें हा प्रश्न असून त्याचा निर्णय विचारविनिमयानें करतां येण्यासारखा आहे. परवाच्या सभेंत ह्यासंबंधांत कांहीं सूचना करण्यांत आल्या आहेत.

मुंबई सरकारनें ह्या प्रांतासाठी ग्रामोद्धाराची योजना तयार केली आहे तिच्यासंबंधांत कांहीं प्रगति झाली आहे तिची स्थूल कल्पना ह्या विषयाशीं संबंध असलेल्या अधिकाऱ्यांनीं सभेस दिली. सरकारचे सल्लागार, मि. कॉलिन्स, ह्यांनीं नवीन रस्त्यांचीं कामें हातीं घेण्यांत येणार आहेत त्यांचेसंबंधांत माहिती दिली. खेडेगावांस जोडणारे आणि जिल्ह्यांचे रस्ते अगोदर हातीं घ्यावे असें ठरलें असल्याचें त्यांनीं सांगितलें आणि उपलब्ध व्हावयाच्या पैशास अनुसरून परवडतील अशा प्रकारचे रस्ते काटकसरीनें करण्याचा विचार आहे असें ते म्हणाले. मजुरांच्या तुटवड्याची अडचण लक्षांत घेतां, ज्या खेडेगावांचे लोक ह्या कामीं सहाय देतील, त्यांचे रस्ते अगोदर तयार करण्याची कल्पना त्यांनीं पुढें मांडली. इमारती बांधण्याचा प्रश्नहि असाच बिकट होण्याचा संभव असल्यानें बांधकामाच्या सामानाच्या स्थानिक पुरवठ्यावरच भिस्त ठेवावी लागेल आणि सोयीच्या खेडेगावी इमारतींचे नमुने तयार करणें आवश्यक होईल. ग्रिड पद्धतीनें वीज पुरवण्याविषयींच्या योजनांचे बाबत सरकार कोणत्या प्रकारची पूर्वतयारी करीत आहे ह्याचीहि कल्पना मि. कॉलिन्स ह्यांनीं दिली आणि जंगलांची सध्याची परिस्थिति व ती सुधारण्याची आवश्यकता ह्यांविषयीं आपले विचार प्रदर्शित केले.

रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभासदांनीं ग्रामोद्धाराच्या सरकारी योजनांस स्थूल मानाची संमती दिली, पण त्यांच्या निरनिराळ्या अंगांविषयीं टीका केली व सूचनाहि सादर केल्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याची आवश्यकता, आरोग्य, पाणीपुरवठा, औषधोपचार ह्यांविषयींच्या जनतेच्या अपेक्षा सभासदांकडून व्यक्त करण्यांत आल्या. विजेचें उत्पादन पाण्याच्या साठ्यांच्या जोरावर करून ती खेडेगावी विभागांत पुरवण्याचे संबंधांत चाललेल्या प्रयत्नांची माहिती मि. अडवाणी ह्यांनीं दिली. अधिक धान्य पिकवण्याच्या प्रयत्नांस मुंबई प्रांतांत किती यश आलें आहे, हलक्या धाग्याच्या कपाशीचें पीक पुष्कळ कमी होऊन धान्यांच्या पिकांचें क्षेत्र कसें वाढलें आहे ह्याविषयींचे आकडे रूरल डेव्हलपमेंट बोर्डापुढें मांडण्यांत आले. भुइमुगाच्या पेंडीचें खत पिकांस देण्यांत आलें असल्यानें त्यांचें उत्पादनप्रमाण वाढत असल्याचें सांगण्यांत आलें. कपाशीच्या क्षेत्रांत घट झाल्यामुळें जनावरांस आवश्यक असलेल्या सरकीचा तुटवडा पडला असल्याची तक्रार करण्यांत आली आणि झुडाच्या उत्पादनाकडे लक्ष पुरवण्याच्या महत्त्वावर जोर देण्यांत आला.

शेतकरी कर्ज निवारण कायद्याची अंमलबजावणी प्रांतांत जिल्हानिहाय चालू होणार आहे आणि कर्जदारांच्या फेडीच्या शक्तीस धरून त्यांच्या कर्जाच्या रकमा मर्यादित केल्या जाऊन सावकारांस त्या हप्तेबंदीनें मिळतील. येथें जमीन गहाणाच्या सहकारी बँकांच्या मार्फतीनें हप्त्यांची फेड केली जाण्याच्या व्यवस्थेची चर्चा रूरल डेव्हलपमेंट बोर्डांत मागें झाली होती, आणि त्या बँकांनीं विशिष्ट अटींवर सदरहू व्यवहार हातीं घ्यावा असें मत व्यक्त करण्यांत आलें होतें. गहाण जमिनीच्या किंमतीच्या निम्यापेक्षा अधिक रकम कायद्याप्रमाणें बँकांस देतां येत नसल्यानें सावकार आपलें येणें कर्ज त्या मर्यादेपर्यंत कमी करण्यास तयार असतील तर त्यांस सबंद रकम रोकडीनें किंवा रोख्यांच्या स्वरूपांत एकदम मिळावी अशा तऱ्हेची तजवीज कायद्याच्या दुरुस्तीनें करण्यांत यावी ह्या आशयाची सूचना रूरल डेव्हलपमेंट बोर्डापुढें मांडण्यांत आली होती आणि थोडी चर्चा होऊन ती मान्य करण्यांत आली. शेवटीं, शेतकऱ्यांकडून धान्य जमवण्याची सरकारची योजना चालू सालीं समाधानकारक झाली असल्याचें सांगण्यांत आलें.

---

### दि ओरिअंट कमर्शिअल डेव्हलपमेंट असोसिएशन

वरील नांवाची एक शिक्षण संस्था श्री. डी. आर. राणे, बी. कॉम., जी. डी. ए., आर. ए., ( जळगांव येथील डी. आर. राणे आणि कं. ह्या ऑडिटिंग फर्मचे मालक ) हे लवकरच नोंदविणार आहेत. पूर्व खानदेश आणि त्याच्या आसपासचा भाग ह्यांत व्यापारी शिक्षणाचा फैलाव करणें, हें त्या संस्थेचें उद्दिष्ट राहील. अशा तऱ्हेची संस्था तिकडे सध्या अस्तित्वांत नाहीं. ज्यांना विश्वविद्यालयीन शिक्षण घेणें परवडत नाहीं, अशांना ह्या असोसिएशनच्या उपक्रमाचा फायदा घेतां येईल व व्यापारी शिक्षण संपादन करतां येईल.

### सांगली सहकारी परिषद

सांगली संस्थानची तिसरी सहकारी परिषद गेल्या आठवड्याचे अखेरीस मुंबई प्रांताचे सहकारी रजिस्ट्रार, श्री. चिनमुळगुंद, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. श्री. मोकाशी ह्यांचें स्वागतपर भाषण झाल्यावर सांगलीचे राजासाहेब ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन करतांना हिंदुस्थानांत सहकारी संघटनेचें शेतीच्या सुधारणेंत विशेष महत्त्व असल्याचें सांगितलें. श्री. चिनमुळगुंद ह्यांनीं मुंबई प्रांतांत युद्धोत्तर ग्रामसुधारणेची योजना तयार झाली आहे तिच्याकडे लक्ष वेधलें.

---

### नव्या सरकारी कर्जाची विक्री

३% १९७०-७५ च्या पहिल्या डेव्हलपमेंट सरकारी रोख्यांची विक्री ठरल्या दिवशीं थांबविण्यांत आली, तेव्हां अपेक्षित ४० कोटि रुपयांऐवजी २७ कोटींचे कर्जरोखे खपलेले होते. उरलेल्या १३ कोटि रुपयांचे रोखे नेहमीप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे ठराविक किंमतीस विकत मिळतील.

# स्फुट विचार

## साखरेची टंचाई कां ?

शरीरपोषणास साखर आवश्यक असून हिंदी शाकाहारी मनुष्य सशक्त व निरोगी राहण्याकरितां त्याच्या दररोजच्या आहारांत निदान एक छटाक साखर असावी असें मुंबईचे प्रख्यात आहारशास्त्रज्ञ डॉ. म्हसकर व इतर तज्ज्ञ यांनीं मत प्रदर्शित केलें आहे. अर्थातच हा झाला आशावाद; वस्तुस्थिति याहून फार निराळी आहे. मुंबईला दर आठवड्याला, मिळणाऱ्या दर माणशी १४ औंस साखरेचा हेवा बहुतेक साऱ्या हिंदुस्थानाला वाटत असावा ! हें साखरेचें दुर्भिक्ष्य कां ? मागणीच्या मानानें पुरवठा व प्रत्यक्ष उत्पादनच कमी आहे असें प्रसिद्ध झालेल्या सरकारी आकड्यांवरून दिसतें. गेल्या वर्षीचें साखर-उत्पादन १२,२०,००० टन आहे; पैकीं १०,६०,००० टनांचा उपयोग गेल्या वर्षी करण्यांत आला. राहिलेली १,६०,००० टन व या वर्षीचें उत्पादन ९,५०,००० टन मिळून ११,१०,००० टन साखर या वर्षीच्या उपयोगाकरितां मिळेल. नागरिकांच्या उपयोगाकरितां साधारणतः १०,५०,००० टन साखर देण्यांत येते. राहिलेली साखर लष्करी व निर्गत-मागणीकरितां आहे. गेल्या तीन वर्षांच्या सरासरीवरून साखर-निर्गत प्रतिवर्षी फक्त १७,००० टन आहे. या वर्षी लष्करी मागणीला २० टक्क्यांनीं काट लावण्यांत आला आहे. या वर्षीच्या मागणीच्या मानानें प्रत्यक्ष उत्पादन कमी असून पुरवठा जवळजवळ गेल्या वर्षी इतकाच असल्यानें दर माणशीं साखरेचें रेशन गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी किंचित् कमी आहे.

## तात्कालिक तुटवड्याचीं कारणें

साखरेची पैदास संयुक्त प्रांत, पंजाब, बिहार, ओरिसा, मद्रास व मुंबई या प्रांतांत होते. मुख्य उत्पादक प्रांतांत कमी पीक आल्यानें उत्पादनांत या वर्षी घट आली आहे. शिवाय शेतावर काम करणाऱ्या कामगारांचा तुटवडा, भरपूर खतपाण्याचा वेळेवर पुरवठा होण्याची अडचण, 'अधिक धान्य पिकवा' या सरकारी मोहिमेनें उसाखाली असलेल्या एकूण जमिनींत केलेली घट हीं तात्कालिक कारणें आहेत. दर एकरीं उत्पन्न व उसांतील साखरेचें प्रमाण हिंदुस्थानांत अतिशय कमी आहे. या बाबत सुधारणा करण्याचे सरकारी व कारखानदारांचे प्रयत्न चालू आहेत. आज हिंदुस्थानांत कापड दुष्काळ पडला असतां युद्धोत्तर कापसाची फाजील वाढ होऊं नये व शेतकऱ्यांना मालाची योग्य किंमत मिळावी म्हणून अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय सभा भरवून कपाशीखाली असलेल्या जमिनीबाबत नियंत्रण करण्याच्या गोष्टींची वाटाघाट चालू आहे;तीच हकीकत हिंदी साखर-पैदाशीबद्दल होण्याचाहि संभव नाहीं असें नाहीं. १९३०-३१ मध्यें क्यूबा वगैरे वेस्ट इंडीजकडील साखर फाजील उत्पादन झाल्यामुळें हिंदुस्थानांत अशा स्वस्त दरानें विकण्यांत येऊं लागली कीं त्याकरितां आयात कराच्या प्रतिबंधक भिंती उभारणें सरकारला भाग पडलें ! हिंदुस्थान, क्यूबा, अमेरिका, जावा, ब्राझील, फोर्मोसा व ऑस्ट्रेलिया या देशांत उसापासून साखर बनवितात; रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया, अमेरिका, इटली, फ्रान्स व ब्रिटन येथें बीटापासून साखर बनविण्यांत येते. हिंदुस्थानांतील वाढती लोकसंख्या व विशेषतः औद्योगीकरणानें शहरांतील वाढती दाटी, रशियांतील उध्वस्त झालेले साखरेचे कारखाने व त्यामुळें इराण, टर्की, इराक वगैरे देशांकडून हिंदी साखरेस येणारी वाढती मागणी हीं लक्षांत घेतां हिंदी साखर कारखानदारांपुढें कांहीं वर्षेतरी मागणी पुरी कशी करावयाची हाच प्रश्न राहील असें वाटतें.

## प्रांतिक उसाचें पीक आणि गूळ

सबंद हिंदुस्थानांत होणाऱ्या एकूण उसाच्या क्षेत्राच्या साडे तीन टक्के इतक्याच क्षेत्रांत मुंबईप्रांत व त्याच्याशीं संबंध असलेलीं संस्थानें ह्यांमध्यें उसाचें पीक काढण्यांत येतें. १९४४-४५ च्या हंगामांत ह्या भागांतली उसाची लागवड खाली दिलेल्या क्षेत्रांत विभागली होती:—

| | एकर |
|---|---|
| ब्रिटिश जिल्हे | १,०७,००० |
| संस्थानें | ५९,००० |
| | १,६६,००० |

गेल्या वर्षाच्या मानानें हें उसाचें क्षेत्र एक पंचमांश टक्का कमी पण गेल्या दहा वर्षांच्या सरासरीच्या तुलनेनें २७ टक्क्यांनीं अधिक होतें. गुळास चांगला भाव आल्यानें संस्थानांत चालू हंगामामध्यें उसाचें क्षेत्र थोडें वाढलें पण "अधिक धान्य पिकवा" ह्या मोहिमेचा परिणाम होऊन ब्रिटिश मुलुखांत त्यांत थोडी घट झाली. उसाच्या पिकाची स्थिति सामान्यतः चांगली होती. गुळाचें एकूण उत्पादन खाली दिल्याप्रमाणें होईल असा अंदाज आहे.

| | टन |
|---|---|
| ब्रिटिश जिल्हे | ३,५२,००० |
| संस्थानें | १,६९,००० |
| | ५,२१,००० |

गेल्या वर्षाच्या मानानें हें उत्पादन थोडें कमी आहे पण त्या पूर्वीच्या दहा वर्षांचा सरासरीच्या मानानें तें ५५ टक्क्यांनीं अधिक आहे.

## इंग्लंडचें औदार्य व हिंदुस्थानाची चंगळ !

"युद्ध जिंकण्याचे कामी ब्रिटिश लोकांनीं किती आर्थिक भार सहन केला आहे, ह्याची कित्येक हिंदी लोकांना जाणीवहि नाहीं. हिंदुस्थानाचें इंग्लंडमध्यें किती येणें साठलें आहे, हें अद्याप निश्चितपणें ठरलेलें नाहीं. युद्धखर्चाचा बोजा हिंदुस्थान सरकारनें किती उचलावा, हेंहि अजून ठरलेलें नाहीं. ब्रिटिश लोकांचें नुकसान झालें तरी आपला फायदा व्हावा, असें कांहीं हिंदी लोक धरूनच चालतात. हिंदुस्थान आणि हिंदी सरकार ह्यांस सढळपणें दिलेल्या सवलतींचा ते विचारच करीत नाहींत. हिंदुस्थानास आपण दाखविलेलें औदार्य आपल्या स्वतःच्या ऐपतीबाहेर गेलें आहे, अशी वस्तुस्थिति आहे." दि फिनॅन्शिअल टाइम्स ह्या ब्रिटिश पत्रानें हिंदी स्टर्लिंग येण्यावर वरील प्रकारें भाष्य आपल्या अगदी ताज्या अंकांत केलें आहे. इंग्लंडमधील हिंदी येण्याची रकम कमी करण्यांत यावी, असा त्याचा मथितार्थ आहे. इंग्लंडचें औदार्य व स्वार्थत्याग ह्यांच्या पायावर हिंदुस्थानानें चैन करूं नये, असें त्या पत्राचें म्हणणें आहे, तर युद्धखर्चाची वाटणी हिंदुस्थानास अन्यायाची आहे असें हिंदी पुढारी म्हणत आहेत.

## मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि.

**मनमाड उपशाखेचें दि. ब. वंडेकर ह्यांचे हस्तें उद्घाटन**

मुंबई प्रां. सहकारी बँकेच्या मनमाड उपशाखेचा उद्घाटन समारंभ रविवार, ता. १५ एप्रिल रोजीं दुपारीं ४ वाजतां दि. ब. आर. व्ही. वंडेकर ह्यांच्या हस्तें साजरा झाला. बँकेकरितां शहराचे मध्यवर्तीत मुथा बिल्डिंगचे दगडी इमारतींत दुसऱ्या मजल्यावर जागा मिळाली आहे व त्याच ठिकाणीं समारंभाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षांनीं प्रास्ताविक भाषणांत सहकारी व जॉइंट स्टॉक बँक ह्यांतील भेद समजावून सांगून सहकारी बँकेचा उद्देश व कार्य ह्यांची माहिती सांगितली. सी. इन्स्पेक्टर, श्री. चावडा, डॉ. देसाई वगैरेंचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं शाखेचें उद्घाटन जाहीर केलें. त्यानंतर बऱ्याच व्यापाऱ्यांनीं शाखेंत खातीं उघडलीं व कांहींनीं ड्राफ्ट वगैरे घेतले. लासलगाव शाखेचे एजंट श्री. कुळकर्णी ह्यांनीं अध्यक्षांचे व पाहुण्यांचे आभार मानले व मनमाड शाखेचे एजंट श्री. झेंडे ह्यांनीं अध्यक्षांस हारतुरे वगैरे अर्पण केले.

**सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा शिक्षण वर्ग**

आतां शेतकी सोसायट्या भावनियंत्रित वस्तूंच्या पुरवठ्याचें काम करूं लागल्या आहेत. हें काम दक्षतेनें केलें जावें व त्या बाबतींत वेळोवेळ करण्यांत आलेल्या नियमांचें उल्लंघन त्यांचे हातून होऊं नये, ह्याकरितां सुपरवायझिंग यूनिअन्स सेक्रेटरींच्या शिक्षणाचे वर्ग भरवूं लागल्या आहेत. शहादें ता. यूनियननें असा वर्ग २८-३-४५ ते ३१-३-४५ अखेर चालविला, त्यास १२ सेक्रेटरी उपस्थित होते. धुळें ता. यूनिअनचा वर्ग २५ व २६ फेब्रुवारी १९४५ व ५, ६ व ७ मार्च १९४५ असे ७ दिवस चालला. दोन्ही वर्गांत उपयुक्त विषयावर भाषणें व चर्चा झाली.

**बंगालच्या कायदेमंडळांत सहकार**

जनतेमध्यें मालाची वाटणी सुलभ रीतीनें व्हावी ह्याकरितां त्याच्या विक्रीचें कार्य सहकारी मल्टिपर्पज सोसायट्यांवर सोपवण्याचा प्रयत्न प्रांतिक सरकारनें समाधानकारक रीतीनें केला नाहीं अशी तक्रार बंगालच्या कायदेमंडळांत सभासदांनीं केली. अंदाजपत्रकांत सहकारी खात्यासाठीं नमूद असलेल्या खर्चाच्या रकमेस मंजूरी देण्याच्या प्रश्नाची चर्चा चालू असतां ही टीका करण्यांत आली. सहकारी मंत्र्यानें खात्याच्या वांटणीचें काम कांहीं सहकारी संस्थांस देण्यांत आलें असल्याची माहिती सभागृहास दिली आणि प्रांतिक सरकारचें ह्या बाबींकडे लक्ष आहे असें सांगितलें ह्या त्यांच्या उत्तरानंतर बंगालच्या सहकारी खात्यासाठी कायदेमंडळानें तेरा लक्ष रुपयांच्या खर्चास अनुमति दिली.

**नासिक जिल्हा नॉन्-क्रेडिट सोसायट्यांची परिषद**

ता. २।३।१९४५ रोजीं रजिस्ट्रारसाहेबांचे अध्यक्षतेखालीं नासिक जिल्ह्यांतील सेल-परचेस यूनियन्स व सोसायट्या, विविध-कार्यकारी सोसायट्या व डिस्ट्रिब्यूशनचें काम करणाऱ्या इतर सोसायट्या यांची सध्याच्या परिस्थितीचा व अडीअडचणींचा विचार करण्यासाठीं, सर्व नॉन्-क्रेडिट सोसायट्यांकरितां एक जिल्हा फेडरेशन स्थापणेबद्दल विचार-विनिमय करण्यासाठी व युद्धोत्तर पुनर्घटना यासंबंधीं विचार करण्याकरितां परिषद भरली होती. परिषदेचा उद्घाटन समारंभ नासिक जिल्हाधिकाऱ्यांचे हस्तें झाला. परिषदेचे स्वागताध्यक्ष दि. ब. आर. व्ही. वंडेकर हे होते.


महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

जीर्ण व हटवादी हिवतापासाठीं
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
पायरोनिल
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६, सदाशिव, पुणें २.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १-८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

सांडू हार्टिना
छातीत धडधडणें, धाप लागणें, छातीत कळ लागणें, वगैरे हृदयाच्या दौर्बल्यांवर खास गुणकारी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स् व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

## सहकारी वाटपकेंद्रांतील हिशेबपद्धति

### अकलूज येथील सभा

माळशिरस तालुक्यांत सोसायट्यांकडे ८ धान्य वाटप केंद्रें आहेत; ३ अॅप्रूव्हड क्लॉथ दुकानें आहेत आणि १० सोसायट्यांकडे साखर वाटणीचें काम आहे. ह्या कामाच्या जमाखर्चाची आणि हिशेबाची पद्धत यांत एकसूत्रीपणा ठेवणेसाठी व त्यांच्या कामकाजांतील अडीअडचणीचा विचार करणेसाठी सर्व वाटणी कामगारांची सभा ता. ३१-३-४५ रोजीं अकलूज सोसायटीचे फेअर प्राईस शॉपमध्यें भरली. त्या सभेस सुपरवायझर मि. जी. वाय. अवचट व मि. चांगण, सेल युनियन म्यानेजर यांनीं लोकांना कामकाजाची व हिशेबाची पद्धत समजावून सांगितली. त्यावर सर्वांची चर्चा होऊन त्यांच्या खालील अडचणी नमूद करून घेणेंत आल्या. (१) सरकारकडून फेअर प्राईस शॉपना आठवडेवार धान्य वाटणीसाठी जो "अ" "ब" फार्म वापरणेस सांगितलेला आहे त्यामध्यें हिशेब नमूद करणें अत्यंत त्रासाचें आहे. कारण धान्य नेणारे लोक हे एकाच दिवशीं येत नाहींत. तो फॉर्म प्रचारांत आणणें अशक्य असल्यानें त्या फॉर्मांत दुरुस्ती होणेबद्दल युनियनमार्फत व खात्यामार्फत पुढील तजवीज करणेंबद्दल अधिकाऱ्यांना विनंति करावी असें ठरलें. (२) व्हिलेज रेशनकार्ड व नमुना नं. ९ च्या याद्या ह्या गाव-कामगारांकडून वेळचेवेळीं पुऱ्या होऊन न आल्यामुळें प्रत्येक माणसाला धान्य देतांना त्रास होतो व त्यामुळें डबल रेशन जाण्याचा संभव आहे. यासाठी या बाबी वेळचेवेळीं योग्य अधिकाऱ्यांकडून पुऱ्या करून देणेबद्दल अधिकाऱ्यांना विनंती करावी असें ठरलें. या सभेस मि. जोशी सेक्रेटरी अकलूज, श्री. माने मॅनेजर रूरल फेअर प्राईस शॉप अकलूज व मि. चांगण म्यानेजर सेल युनियन नातेपुतें यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. मि. अवचट सुपरवायझर यांनीं सर्व लोकांना वाटणीचें काम कोणाच्याही मिंधेला बळी न पडतां व सचोटीनें करणेस विनंति केली. यामुळें सहकारी संस्थांचा दर्जा वाढला जाऊन सरकारमध्यें सहकारी चळवळीला प्राधान्य मिळेल असें त्यांनीं सांगितलें.

---

### बॉंबे को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा मार्च, १९४५ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. "युरोपमधील दुर्दशावस्थेस गेलेल्या शेतीच्या ऊर्जितावस्थेस सहकारी संघटनेचें सहाय" ह्या विषयावरील इंटर नॅशनल लेबर रिव्ह्यूमधील उपयुक्त माहितीच्या पुनर्मुद्रणाच्या आधारें प्रो. काळे ह्यांनीं त्रैमासिकांत लिहिलेला लेख उद्बोधक आहे. "शेतीच्या उत्पादनांत सहकारी व सरकारी प्रयत्नांचें स्थान" हा श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं इंडियन सोसायटी ऑफ अॅग्रिकल्चरल एकॉनॉमिक्सच्या गेल्या अधिवेशनांत वाचलेला निबंध त्रैमासिकांत उद्धृत करण्यांत आला आहे. मि. नसिर अहमद ह्यांनीं आपल्या लेखांत सहकारी दूध पुरवठ्या बाबत सूचना केल्या आहेत. अंकांत नेहमीप्रमाणें इतर उपयुक्त सदरें आणि माहिती ह्यांचा अंतर्भाव केलेला आहे.

---


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. १५,००,०००

काढलेलें भांडवल :: रु. १३,२५,०००

भरलेलें भांडवल :: रु. १३,११,५००

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७३ लक्ष

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | २३ नाशिक ( जि. नाशिक) |
| २ नीरा ,, | २४ लासलगांव ,, |
| ३ सातारा ( जि. सातारा ) | २५ मालेगांव ,, |
| ४ कऱ्हाड ,, | २६ नांदगांव ,, |
| ५ किर्लोस्करवाडी ,, | २७ घोटी ,, |
| ६ कोरेगांव ,, | २८ सटाणा ,, |
| ७ इस्लामपूर ,, | २९ येवलें ,, |
| ८ शिराळें ,, | ३० धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ तासगांव ,, | ३१ दोंडाईचें ,, |
| १० वांई ,, | ३२ नंदुरबार ,, |
| ११ भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ साक्री ,, |
| १२ कल्याण ,, | ३४ शहादें ,, |
| १३ पालघर ,, | ३५ शिरपूर ,, |
| १४ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिंदखेडें ,, |
| १५ अहमदनगर( ,, अहमदनगर ) | ३७ तळोदें ,, |
| १६ बेलापूर रोड ,, | ३८ दोहद (जि.भडोच व पंचमहाल) |
| १७ कोपरगांव ,, | ३९ गोधा ,, |
| १८ पाथर्डी ,, | ४० झालोद ,, |
| १९ राहुरी ,, | ४१ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २० शेवगांव ,, | ४२ नाडियाद ( जि. खेडा ) |
| २१ श्रीगोंदें ,, | ४३ आनंद ,, |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

व्याज-वजा ( xd ) व्याज-वजा ( xd )

+ नागपुर २३-४-४५
स्वदेशी २७-४-४५
गोकाक ३०-४-४५

# मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )
दिनांक २५-४-४५ ला महावीर जयंतीनिमित्त सुट्टी

फिनले १—५—४५
इंडि. युना. ३०-५-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संचित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १७।४।४५ | बुधवार १८।४।४५ | गुरुवार १९।४।४५ | शुक्रवार २०।४।४५ | सोमवार २३।४।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २०३२—८ | २०५७—८ | २०५१—४ | रामनवमीनिमित्त सुट्टी | २०५०—० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा ऑर्डिनरी | ७५ | ३८३—८ | ३८९—० | ३८६—० | | ३८५—० |
| २२०१; १६५५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १७९०—० | १८१२—८ | १८०५—० | | १८०७—८ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९५—८ | ५९९—० | ५९७—० | | ५९७—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५४२—८ | ५४६—८ | ५४४—० | | ५४२—० |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३७७—० | ३७९—० | ३७७—० | | ३७१—० + |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २९८—८ | ३०१—८ | ३०१—० | | ३००—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९७—० | २९९—० | २९८—० | | २९८—० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २५९—८ | २६०—८ | २६०—० | | २५९—० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१२-९ | ३-१२-६ | ३-१२-९ | | ३-१२-६ |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-३-० | १४-७-० | १४-६-० | | १४-४-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | २-१५-६ | ३-०-६ | ३-०-६ | | २-१५-६ |
| ११७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७३७—८ | ७३३-१२ | ७३१—४ | | ७३१—४ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३०—० | २३१—४ | २२९—० | | २२९—० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१४—० | २१५—० | २१५—० | | २१२—८ |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५१२—६ | ५०८-१२ | ५०७—८ | | ५०५—० |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ७७—० | ७६—८ | ७६—४ | | ७६—४ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३२—५ | ३२—७ | ३२—८ | | ३२—३ |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ४८—० | ४९—० | ५०—० | | ४९—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०—० | २०—० | २०—२ | | २०—२ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६५-१२ | ६५-१२ | ६६—८ | | ६६—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | १००-१-६ | १००—२ | १००—२ | | १००-२-० |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
फिनले ६-४-४५ ते ३०-४-४५
इंडिया युना. २०-४-४५ ते १६-५-४५

दि. २३-४-४५
सोनें ७४-१२
चांदी १३१-१४
कपास ४०७—०

३% व्हिक्टरी लोन = रु. ९९-१५-६
३% १९६३-६५ रु ९८-१४-०
३% १९६६-६८ रु. ९८-१४-०


## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व थूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशी परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९







व्ही.पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब




नोगी आणि कं. मुंबई ४


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व

REGISTERED No. B. 3474

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २ मे १९४५ अंक १८

जीर्ण व हटवादी हिवतापासाठीं
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
पायरोनिल
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६, सदाशिव, पुणें २.

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून
अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
महाराष्ट्र भुवन
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व क्रूसकरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशी परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें.

डोंगरे याच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

नोगीचें
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

# विविध माहिती

### ब्रिटिश पार्लमेंटचा दीप पुनः लागला

जर्मनीच्या बाँबचे हल्ले बंद झाल्यामुळें लंडनमधील दिव्या-संबंधाचीं नियंत्रणें आतां शिथिल करण्यांत आलीं आहेत. ब्रिटिश पार्लमेंटवर काम चालू असतांना त्याचें निदर्शक म्हणून दर संध्याकाळीं एक दिवा लावण्यांत येत असे. जर्मन विमानांस खूण दिसूं नये म्हणून तो दिवा लावणें बंद करण्यांत आलें होतें. कॉमन्स सभेच्या अध्यक्षांनीं अलीकडे आपल्या खुर्चीच्या शेजारीं असलेला बटन दाबून औपचारिक रीत्या दिवा पुनः चालू केला आणि " लोकशाही स्वातंत्र्याचा दीप " असा त्याचा गौरवपूर्ण निर्देश केला.

### बॉंबे सिल्क फिलेचर्स लि.

वरील नांवाची एक कंपनी म्हैसूर सिल्क फिलेचर्सचे मॅनेजिंग एजंट, श्री. नारायणराव नाईक, ह्यांनीं नुकतीच नोंदली आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल २० लक्ष रुपयांचें असून १० लक्ष रुपयांचें भांडवल विक्रीस काढलें जाईल. कर्नाटकांत कच्च्या रेशमाचा कारखाना काढणें, हा कंपनीचा उद्देश आहे. मुंबई सरकारनें कारखान्याच्या योजनेस सक्रिय पाठिंबा, सहाय व सवलती देण्याचें ठरविलेलें आहे. शेतकऱ्यांनीं तुतीची लागवड करावी, अशा प्रचारासाठी मुंबई सरकार स्वतः खर्च करून प्रचार करणार आहे. कंपनीच्या प्रॉस्पेक्टसची लोक वाट पहात आहेत.

### न्यू सिटिझन बँक लि. ची अहमदाबाद शाखा

न्यू सिटिझन बँकेच्या अहमदाबाद शाखेचें उद्घाटन ता. २७ एप्रिल रोजीं झालें. श्री. चिमणलाल वाडिलाल कुसुमगार हे त्या शाखेचे डायरेक्टर-इन-चार्ज आहेत. शाखेचा पत्ता रतनपोळ नाका, गांधी रोड, असा आहे.

### सेंट्रल म्युच्युअल लाइफ इं. कं. लि., मुंबई

वरील कंपनीनें १९४४ सालीं, आपल्या पहिल्याच वर्षी, ६,३२,२५० रुपयांचें काम पुरें केलें व वर्षअखेर ७४,२२० रुपयांचा लाइफ फंड निर्माण केला. श्री. एस. एन. आगाशे, बी. ए., हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### औंध म्यूच्युअल लाइफ ॲ. सोसायटी लि.

वरील विमा सोसायटीची वार्षिक सभा ता. २२ एप्रिल रोजीं झाली. श्री. व्ही. पी. वर्दे ( अध्यक्ष ) व रा. ब. व्ही. बी. गोखले ह्यांची सभेनें डायरेक्टर म्हणून फेरनिवड केली आणि भागवत आणि कंपनीस २०० रुपयांवर पुनः ऑडिटर नेमलें.

### शास्त्रज्ञ, परंतु अंधश्रद्धा

थर्मिऑनिक व्हॉल्व्हचे संशोधक, ब्रिटिश शास्त्रज्ञ सर ॲम्ब्रोज फ्लेमिंग हे वयाच्या ९५ व्या वर्षी, ता. १९ एप्रिल रोजीं मरण पावले. ते पहिल्या दर्जाचे शास्त्रज्ञ होते, तरी त्यांचा अवतार व दैव ह्यांवर विश्वास होता आणि विश्वाच्या उत्पत्तीची डारविनची उपपत्ति त्यांस मान्य नव्हती.

### कोळसा, वाघिणी व कापड

" कोळशाच्या कांहीं खाणी मालाला मागणी नाहीं म्हणून बंद होत आहेत, तर कापड-गिरण्यांना कोळसा नाहीं म्हणून त्यांतील कापड-उत्पादन थांबविण्यांत येत आहे. कोळशाचें वाटप सरकारनें हातांत घेऊनहि कोळशाच्या लहान खाणींतील माल वाहून नेण्यास आगगाडीचे डबे मिळत नाहींत.":—डी. आर. राठोर यांचें हिंदी कोळशाच्या खाणींच्या मालकांच्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण.

### भुइमुगाच्या पेंडीपासून लोकर

इंपीरियल केमिकल इंडस्ट्रिज लि. च्या संशोधन खात्यानें शेंगदाण्याच्या पेंडीपासून लोकर काढल्याची नुकतीच घोषणा केली आहे. या लोकरीस त्यांनीं " आर्डिल " असें नांव दिलें आहे.

वनस्पतिजन्य व प्राणिजन्य पदार्थांपासून लोकर करण्याचे प्रयत्न बऱ्याच काळापासून चालू आहेत. १९३५ सालीं स्निया व्हिस्कोसा या इटालियन कंपनीनें चक्क्यापासून लॅनिटाल नांवाची लोकर काढली होती. तिचे गुणधर्म अगदींच कमी दर्जाचे होते. परंतु त्याकाळीं इटालीवर अबिसिनियांतील युद्धामुळें आर्थिक बहिष्कार बसलेला होता व इटालीचा दुधाच्या निर्यातीचा व्यापार बसल्याकारणानें दूध वाया जात होतें. या दुधाचा विनियोग स्निया व्हिस्कोसानें किफायतशीरपणें करून घेतला एवढेंच. यानंतर हेपवरती प्रयोग करण्यांत आला, पण शेंगदाण्यावरील प्रयोग त्याहूनही यशस्वी झाला आहे. शेंगदाणे तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या अधिक किफायतशीर आहेत. आज जगांत दरवर्षी ८० लक्ष टन शेंगदाणे पिकतात व अधिक पिकवितां येतील. एक टन दाण्यापासून ५०० पौंड आर्डिल होतें.

शेंगदाण्यांत ५० टक्के तेल व २८ टक्के प्रोटीन्स असतात. शेंगदाण्याच्या पेंडींतून हीं प्रोटीन्स काढतात. उरलेल्या चोथ्यांत थोडीं प्रोटीन्स व इतर पदार्थ असतात व हा चोथा गुरांस चारतां येतो. काढलेलीं प्रोटीन्स शुद्ध करतात व कॉस्टिक सोड्यांत विरघळवून त्याचे तंतू काढतात. हे तंतू म्हणजेच आर्डिल होय.

आर्डिल हें लोकरीसारखें मऊ व स्पर्शास गरम लागतें, त्यास लोकरीसारखें रंगवितां येतें व पण कसर लागत नाहीं. शुद्ध आर्डिलचें कापड होतें, परंतु रेयॉन व खरी लोकर यांत ५० टक्के आर्डिल मिसळल्यास उत्तम " लोकरी " कापड होतें. आर्डिल लोकरीपेक्षां स्वस्त होईल असा अंदाज आहे. —श्री. चिं. काळे

### इन्कँडीसंट लॅम्प्स मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

वरील कंपनीला १,००,००० रुपयांचे नवे शेअर्स विकण्याची परवानगी मिळाली आहे. जुलै, १९४५ अखेर ह्या शेअर्सची विक्री पुरी व्हावयाची आहे. न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. चे मॅ. एजंट श्री. पु. म. मराठे हे ह्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर असून श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, हे कंपनीचे अध्यक्ष आहेत. डायरेक्टर बोर्डांत श्री. धोंडूमामा साठे, डॉ. भडकमकर. श्री. सद्‌काका रानडे, श्री. गो. न. ऊर्फ केशवराव जोशी हे गृहस्थ आहेत. कंपनीला गेल्या वर्षी गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून सरकारी मान्यता मिळाली आहे व सप्लाय खात्याकडून गॅसच्या बत्त्या पुरविण्याची मोठी ऑर्डर मिळालेली असून ती पुरी करण्याचें काम चालू आहे.

### इंडिया युनायटेड मिल्स लि.

वरील कंपनीनें १९४४ सालीं १० कोटि रुपये किंमतीच्या कापडाची विक्री केली व २,४५,५४,८९७ रुपये नफा मिळविला. त्यांतून १,६६,००,००० रुपये कराची तरतूद म्हणून बाजूस ठेवण्यांत येतील. २६,००,००० रुपये घसाराखातीं जातील. २६,००,००० गंगाजळींत टाकले जातील व ऑर्डिनरी भागीदारांस १० रुपयांच्या प्रत्येक भागावर १५ आणे डिव्हिडंड देण्यासाठी १८,७५,००० रुपयांचा विनियोग केला जाईल. १ रुपयाच्या प्रत्येक डिफर्ड शेअरवर ३ आणे डिव्हिडंड देण्यास ९,३७,००० रुपये लागतील.

अर्थ

## सरकारचें औद्योगिक धोरण

देशांत उद्योगधंद्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणांत करण्याच्या हेतूनें हिंदुस्थान सरकारनें निरनिराळ्या अनेक समित्या नेमून चौकशी चालविली आहे. युद्धोत्तर काळांत हिंदी जनतेची प्राप्ती वाढून तिची रहाणी सुधारावी हा प्रमुख उद्देश नियोजित औद्योगिक प्रगतीच्या मुळाशीं आहे. ह्या रीतीनें मध्यवर्ती सरकार औद्योगीकरणाच्या योजना आखण्यांत गुंतलें असतां कित्येक हिंदी उद्योगनेते ब्रिटिश व अमेरिकन धंदेवाल्यांच्या सहायानें नवीन कारखाने काढण्याच्या खटपटींत असून त्या बाबतींत त्यांनीं करारहि केले असल्याचें दिसतें. औद्योगीकरणाचे संबंधांत प्रांतिक सरकारें हिंदुस्थान सरकाराकडून मूलभूत धोरण निश्चित केलें जाण्याची वाट पहात आहेत आणि स्वतःच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनांमधून हा विषय त्यांनीं बाजूस काढून ठेवला आहे. ह्या परिस्थितींत हिंदी संस्थानांचें धोरण अनिश्चित अवस्थेंत राहिलें असल्यास त्यांत नवल नाहीं. प्रांत, संस्थानें व मध्यवर्ती सरकार ह्यांचे संबंध देशाच्या औद्योगीकरणाचे दृष्टीनें इतके गुंतागुंतीचे आहेत कीं त्यांचीं धोरणें परस्पर पोषक व एकसूत्री झाल्यावांचून पुढें पाऊल पडणें अशक्य आहे. ह्याकरितां आवश्यक असलेला विचारविनिमय अजून व्हावयाचा असल्यानें हिंदुस्थानचें राष्ट्रीय औद्योगिक धोरण प्राथमिक स्वरूपांतहि बनवलें जाण्यासारखी आज परिस्थिति नाहीं. तथापि, औद्योगीकरणाच्या योजना बनवण्यांत गुंतलेल्या हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या त्या संबंधांतील धोरणाची कांहींतरी कल्पना जनतेस यावी ही अपेक्षा पूर्ण करण्याच्या हेतूनें त्या सरकारानें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे.

सरकारच्या औद्योगिक धोरणाचें हें निवेदन अशा स्थूल स्वरूपाचें आहे कीं त्यापासून लोकांस काय बोध होईल हें समजणें कठिण आहे. औद्योगिक नियोजनाचे मध्यवर्ती सरकाराचे मंत्री, सर आर्देशर दलाल, ह्यांनीं आपल्या धोरणाचा खुलासा वेळोवेळ प्रकट भाषणांत केला आहे, त्याचाच सारांश प्रस्तुत पत्रकांत व्यवस्थित रीतीनें मांडण्यांत आला आहे असें म्हटलें तरी चालेल. ज्यावर औद्योगीकरण अवलंबून रहाणार, त्या राजकीय घटनेचा प्रश्न अजून लोंबकळत आहे. ह्या घटनेंत लोकांच्या हातीं सत्ता किती व कशी येणार हें निश्चित नाहीं आणि त्याचप्रमाणें तींत संस्थानांस कोणतें स्थान मिळणार हेंहि ठरलेलें नाहीं. सध्याच्या घटनेप्रमाणें उद्योगधंदे हा विषय प्रांतिक सरकारांच्या अधिकारकक्षेंत येतो, पण मध्यवर्ती सरकारास विशिष्ट धंद्यांचा पुरस्कार खास कायद्यांनीं स्वतःकडे घेतां येतो. ह्या मार्गानेंच हिंदुस्थान सरकारास कांहीं धंदे स्वतःच्या सत्ताक्षेत्रांत आणावे लागतील. जकातीचें धोरण ठरवणें त्या सरकारच्या हातीं असल्यानें त्यानें त्याच्या सहायानें पोलाद, साखर, कापड इत्यादि धंद्यांस उत्तेजन दिलें आहे. परंतु मोठ्या प्रमाणावरील औद्योगीकरणासाठी मध्यवर्ती सरकारास ह्याच्या पुढें जाऊन अधिक व्यापक धोरण अंमीकारावें लागेल आणि मूलग्राही महत्त्वाचे धंदे स्वतःच्या हातीं घेणें अगत्याचें होईल. लढाऊ सामुग्रीचें उत्पादन, वहातुकीचीं साधनें वगैरे बाबतींतले धंदे सरकारी होतील, पण वीस इतर धंद्यांची यादी सरकारी पत्रकांत दिली आहे, त्यांवर मध्यवर्ती सरकाराची हुकमत चालेल

युद्धकालांतील अनेक सरकारी आर्थिक नियंत्रणें युद्धोत्तर काळांत चालू रहातीलच. तथापि, आर्थिक व्यवहारांवरील सरकारचें नियंत्रण जनतेच्या सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीनें युद्धपूर्वकालाच्या मानानें अधिक व्यापक व प्रभावी असेल असें सरकारच्या पत्रकांत म्हटलें आहे. पण त्यांत असेंहि दर्शवलें आहे कीं हें सर्व धोरण दीर्घकालास अनुलक्षून नाहीं आणि त्यांत भावी राजकीय घटना हिशेबांत घेतलेली नाहीं. ह्या एका विधानानें सरकारी धोरणाचा सबंद डोलारा डळमळित बनला आहे. त्यांत कित्येक धंद्यांची सरकारी मालकी आहे; कांहीं धंद्यांत सरकारी नियंत्रण आहे, धंद्यांच्या संरक्षणाची तरतूद आहे; भांडवलाचा पुरवठा आहे; कामकरीवर्गाच्या हिताची जोपासना आहे; खाजगी मालकीच्या धंद्यांस वाव आहे; धंदे विशिष्ट भागांत एकत्रित होऊं नयेत ह्याविषयीं खबरदारी आहे. ह्याप्रमाणें सरकारी संकल्पांत सर्व कांहीं आहे, पण निश्चित असें कांहींच नाहीं आणि आहे तें तात्पुरत्या स्वरूपाचें आहे. ह्यामुळें सरकारी पत्रक एक विलक्षण "मिक्श्चर" बनलें आहे आणि इंग्लंडमध्यें आणि ह्या देशांत त्यावर जें मतप्रदर्शन झालें आहे तें विविध व साशंक असें आहे. लोकांस जबाबदार नाहीं असें मध्यवर्ती सरकार हिंदुस्थानचें राष्ट्रीय औद्योगिक धोरण निश्चित करूं शकत नाहीं हें हिंदी धंदेवाल्यांचें मत प्रस्तुत सरकारी पत्रकानें दृढ केलें आहे. निरनिराळ्या विचारांच्या लोकांस रुचतील अशा धोरणाच्या विविध कल्पना त्यांत ग्रथित झाल्या आहेत आणि त्या योगानें कोणाचेंच समाधान होणार नाहीं असें वाटण्यास जागा आहे.

---

### शिष्टमंडळांच्या भेटीवर हिंदुस्थान सरकारचा खर्च

चालू महायुद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत १३ शिष्टमंडळांनीं हिंदुस्थानास भेट दिली. त्यांचीं नांवें व त्यांचेवर हिंदुस्थान सरकारनें केलेला खर्च, ह्यांचीं माहिती खालीं दिली आहेः—

| शिष्ट मंडळाचें नांव | हिंदुस्थानवर खर्चाचा बोजा रु. |
|---|---|
| १ डीहायड्रेशन | ...... |
| २ थाइ वुडविल | १५,००० |
| ३ चिनी शैक्षणिक | ३३,७४४ |
| ४ पर्शियन सांस्कृतिक | १५,००० |
| ५ रबर | ......... |
| ६ ॲंग्लो अमेरिकन बंदरें व शिपिंग | १०,५०० |
| ७ टार्किश पत्रकार | ६८,७०० |
| ८ इंग्लिश ॲपल्टन | २१,००० |
| ९ ॲंग्लो अमेरिकन स्टील | ........ |
| १० मशीन टूल | अद्याप माहीत नाहीं |
| ११ अमेरिकन टेक्निकल मेडी | ५४,९०७ |
| १२ फर्टिलायझर टेक्निकल | १९,२०० |
| १३ मिनिस्ट्री ऑफ सप्लाय | ३,३१,११३ |

### जनतेची सहानुभूति व पाठिंबा मिळविण्यासाठी उद्योगपतींचा प्रयत्न

उद्योगपतींना दिवसानुदिवस सामान्य जनतेची सहानुभूति मिळविण्याचें अगत्य अधिकाधिक भासूं लागलें आहे. आपला कारखाना, ट्रेडमार्क, इत्यादींबद्दल लोकांत आपुलकी निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आपल्या फर्मबद्दल लोकांत आपुलकी निर्माण केली, म्हणजे तिच्या मालाकडे गिऱ्हाइकहि आपोआप वळतें. सरकारी व्यापारी धोरण स्वतःस अनुकूल रहावें, ह्याकरितां जनमताचा पाठिंबा मिळविण्याचाहि त्यांत हेतु असतो. सरकारी अधिकाऱ्यांतहि फर्मबद्दल अनुकूल ग्रह निर्माण कसा होईल, इकडे लक्ष द्यावें लागतें. कित्येक हिंदी उद्योगपति स्वतःच्या फर्मच्या प्रचारासाठी वेगवेगळे उपाय कसे योजीत असतात, हें वृत्तपत्रें वाचतांना सहज लक्षांत येतें. आतां तर कांहींनीं आपल्या फर्ममध्यें "पब्लिक रिलेशन्स" अधिकारी नेमून त्यांचीं स्वतंत्र खातीं निर्माण केलीं आहेत. त्यांच्या कार्यक्षेत्रांत खालील बाबींचा प्रामुख्यानें समावेश होतो:—

(१) गिऱ्हाइकांच्या आवडी-निवडीचा अभ्यास करणें.

(२) लोकांच्या तक्रारींस पत्रें पाठवून उत्तरें देणें व त्यांचें समाधान करणें.

(३) जाहिरातींचें व प्रचाराचें धोरण आखणें.

(४) प्रदर्शनें, चित्रपट, पुस्तकें इत्यादींचे द्वारा व्यापक दृष्टीनें जाहिरात करणें.

(५) वर्तमानपत्रांत छापण्यासाठीं मजकूर लिहून तयार करून देणें.

(६) फर्ममधील लोकांसाठींच वृत्तपत्रें व मासिकें चालविणें.

(७) बाहेरील जनतेच्या उपयोगासाठीं नियतकालिकें चालविणें

(८) कनिष्ठ नोकर वर्गाशी मिसळून वागून, मालक व नोकर ह्यांचेमध्यें दुवा सांधणें.

(९) वेतन, काम, इत्यादींबाबत मजूरसंघाशीं बोलणीं करणें.

(१०) फर्मच्या इभ्रतीस बाधक होईल अशा प्रत्येक गोष्टी-बाबत सल्ला देणें.

---

### रेल्वे गेज सर्व ठिकाणीं एकसारखें करा

ऑस्ट्रेलिया आपल्या १८,६०० मैल लांबीच्या आगगाडीच्या रस्त्यांचें एकजात, ४' ८½" गेजमध्यें रूपांतर करणार आहे, त्यास ५७ कोटि रुपये खर्च येईल. हें रूपांतर हळूहळू करून चालू वहातुकीस अडथळा येऊं नये अशी दक्षता बाळगली जाईल. हिंदुस्थानांत मीटर गेज सुरू करण्यांत आलें, त्याचें प्रमुख कारण काटकसर हें होतें व पुढें त्याचें ब्रॉडगेजमध्यें रूपांतर करण्याचा बेत फलद्रूप झाला नाहीं. ३१ मार्च, १९४३ अखेरचे आकडे पाहिले तर एकूण रेल्वे रस्त्यांपैकीं २०,६८२ मैल रस्ते ब्रॉड गेजचे, १५,९२८ मैल रस्ते मीटर गेजचे व ३,८६० मैल रस्ते नॅरो गेजचे आहेत. एका गेजवरील वाघिणींतील माल दुसऱ्या गेजवरील वाघिणींत चढवून त्याची वाहतुक करणें निष्कारण खर्चाचें होतें व त्यांत कालहरण होतें. युद्धपरिस्थितीमुळें जुने खराब झालेले रूळ, इंजनें व डबे बदलण्याची वेळ येईल त्यावेळीं एकाच गेजमध्यें रेल्वे रस्त्यांचें रूपांतर करण्याचें अगत्य लक्षांत घेतलें जाणें आवश्यक आहे असें मद्रासच्या "हिंदू"नें सुचविलें आहे.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिस:—पुणें शहर

—शाखा:—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिस:-खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : १०,००,००० रु. वर

चेअरमन:—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातात:—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.
—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

— भांडवल —

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २०,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,००,००,००० वर |

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर, रत्नागिरी, फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

# स्फुट विचार

## औद्योगिक धोरण आणि ब्रिटिश वृत्तपत्रें

हिंदुस्थान सरकारच्या औद्योगिक धोरणासंबंधानें इंग्लंडमध्यें अभिप्राय व्यक्त करण्यांत आले आहेत त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. लंडन "टाइम्स"च्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या नियोजित औद्योगीकरणाचा सुपरिणाम ह्या देशांतील भिन्न भिन्न वर्गांमध्यें आर्थिक सुस्थितीची सारखी वाटणी करण्यांत येईल, हा आहे. आजपर्यंत हिंदुस्थानांत धंदे व व्यापार विशिष्ट जातीच्या लोकांनीं स्वतःच्या हातीं ठेवला आहे. इतर वर्गांच्या व सामान्य जनतेच्या हिताविषयींची त्यांची जबाबदारीची भावना नाहींशी होऊन व्यावहारिक स्वार्थ ह्या मूठभर धंदेवाल्यांमध्यें दृढमूल झालेला आहे. ही प्रवृत्ति नष्ट होऊन सबंध हिंदी जनतेस उद्योगधंद्याच्या विस्ताराचा योग्य फायदा मिळावयाचा असेल तर सरकारनें मध्यें पडून संपत्तीची वाटणी सर्वांस सारखी समाधानकारक वाटेल अशी व्यवस्था केली पाहिजे असें "टाइम्स"नें म्हटलें आहे. "मँचेस्टर गार्डियन" हें उदारमतवादी वृत्तपत्र आहे आणि त्याचें धोरण उद्योधंद्यांत सरकारनें हस्तक्षेप करण्याच्या विरुद्ध आहे. सरकारची औद्योगिक सत्ता आणि बिनसरकारी धंदेवाल्यांचें व्यवहारस्वातंत्र्य ह्यांच्या मर्यादा हिंदुस्थान सरकारच्या पत्रकांत स्पष्ट नाहींत असें त्या पत्राचें मत आहे. "फिनॅन्शिअल न्यूज" ह्या पत्रानें सरकारच्या धोरणाचें स्वागत केलें असून हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाचा फायदा ब्रिटिश कारखानदारांस मिळेल अशी त्याची अपेक्षा आहे. "फिनॅन्शिअल टाइम्स"ला असें वाटत आहे कीं, हिंदुस्थान सरकारच्या धोरणानें खाजगी भांडवलवाल्यांमध्यें चिंता उत्पन्न होईल. ह्या पत्राच्या मतें हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति टिकाऊ व्हावयाची असेल तर त्यानें आंतरराष्ट्रीय चढाओढीकडे लक्ष ठेवून त्यास अनुसरून स्वतःचें धोरण आखलें पाहिजे.

## ब्रिटिश राष्ट्राचा युद्धकालीन खर्च

ग्रेट ब्रिटनचे फडनवीस सर जॉर्ज अँडर्सन ह्यांनीं युद्धपरिस्थितींत आपल्या सरकारास कराव्या लागत असलेल्या खर्चाची आणि तो भागण्यासाठीं उभ्या कराव्या लागलेल्या पैशाची माहिती कॉमन्स सभेस गेल्या आठवड्यांत दिली ती अत्यंत उद्बोधक आहे. ब्रिटनचा एका वर्षांतला खर्च ६०० कोटि पौंडांवर (आठ हजार कोटि रुपये) गेला आहे आणि येत्या वर्षी युरोपांतलें युद्ध थांबलें असलें तरी तो ५६५ कोटि पौंडांपेक्षा कमी होणार नाहीं असा अंदाज आहे. युद्धाच्या पहिल्या साडे पाच वर्षांत ब्रिटिश सरकारचा एकूण खर्च कल्पनातीत झाला असून त्याचा आकडा सुमारें ३६,५३५ कोटि रुपये एवढा होतो. ह्यापैकीं ४९ टक्के रकम करांच्या रूपानें जमा केली गेली ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. बाकीची निम्मी रकम कर्जाच्या मार्गानें सरकारच्या तिजोरींत आली. ग्रेट ब्रिटनमध्यें एवढा अवाढव्य युद्धखर्च चालू असतां तेथील बाजारभाव स्थिर राहिले आहेत ह्याचें कारण जनतेच्या खर्चावरचें सरकारी नियंत्रण आणि लोकांच्या प्राप्तीचा मोठा भाग कर व कर्जे ह्यांच्या मार्गानें सरकारच्या तिजोरींत शोषून घेण्याची झालेली यशस्वी व्यवस्था हें होय. युद्धासाठीं इंग्लंडच्या बाहेरील देशांत खर्च झाला आहे व होईल त्याचे कामीं पांच हजार कोटि रुपयांच्या वर देणें होईल. तें फेडण्यास आणि जरूरीचा माल आयात व्हावा लागेल त्याचें देणें देण्यास इंग्लंडची निर्गत वाढवी लागेल. ह्या कारणानें युद्धसमाप्तीनंतर कांहीं वर्षे ब्रिटिश जनतेस काटकसरीनें वागणें प्राप्त होईल असें ब्रिटिश फडनवीसांनीं ध्वनित केलें. हिंदुस्थानसारख्या देशांच्या स्टर्लिंग शिल्लका इंग्लंडमध्यें जमा आहेत, त्या सदरहू देशांस परत मिळण्याचे मार्ग विचारविनिमयानें व परस्पर सोयीनें निश्चित केले गेले पाहिजेत असें त्यांनीं सुचविलें.

## हिंदी धंदेवाल्यांचा इंग्लंड–अमेरिकेचा दौरा

हिंदुस्थानांतील प्रमुख शास्त्रज्ञ इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत मागेंच दौरा करून आले. त्यांनीं त्या देशांतील शास्त्रीय व औद्योगिक संशोधन संस्थांची पहाणी करून कारखानदारांच्या भेटी घेतल्या आणि त्यांच्याशीं विचारविनिमय केला. ह्या देशांत औद्योगिक प्रगतीप्रित्यर्थ व्हावयाच्या प्रयत्नांस ब्रिटिश व अमेरिकन कारखानदारांस व व्यापाऱ्यांस सहाय देतां येईल ही कल्पना ह्या चर्चेमध्यें होती. हिंदुस्थानास यंत्रसामुग्री व औद्योगिक तज्ज्ञ ह्यांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें ब्रिटिश धंदेवाल्यांस आपला माल ह्या देशांत खपवावयाचा आहे. या दृष्टीनें हिंदी शास्त्रज्ञांपेक्षा हिंदी उद्योगपतींच्या इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील दौऱ्याचें अधिक महत्त्व आहे. कांहीं हिंदी धंदेवाले अमेरिकेस जाऊन आलेहि आहेत. ब्रिटिश कारखानदार व व्यापारी वस्तुतः त्यांची वाट पहात आहेत. त्यांचें एक शिष्टमंडळ इंग्लंड–अमेरिकेस जाणार असल्याचें बरेच दिवस घाटत होतें. आतां अखेरीस त्यांच्या घटकांचीं नांवें प्रसिद्ध झालीं असून ते लवकरच नियोजित दौऱ्यावर निघणार आहेत. ह्या शिष्टमंडळाचा विशेष असा आहे कीं त्यांतील घटक हिंदुस्थान सरकारनें निवडले आहेत आणि त्यांच्यापाशीं निश्चित अशी कोणतीच योजना नाहीं. ते आपला खर्च स्वतःच करणार आहेत आणि त्यांस प्रवासाची सोय करून देण्यापलीकडे व एक आपला अधिकारी चिटणीस म्हणून पुरवण्यापलीकडे सरकारचा त्यांच्या दौऱ्यांशीं कांहीं संबंध नाहीं. आपापल्या इच्छेप्रमाणें त्यांनीं कारखाने पहाणें व वाटाघाटी करणें इत्यादि कार्यक्रम पार पाडावयाचा आहे. शिष्टमंडळाचें वरील स्वरूप व कार्यपद्धति ह्यांचा विचार करतां त्यांतले घटक तरी सरकारनें कां निवडले हें समजत नाहीं. तसेंच, हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण प्रसिद्ध झालें आहे त्याच्या दृष्टीनें हिंदी शिष्टमंडळ कोणती विधायक व व्यवहारी कामगिरी करणार आहे हें समजणें कठिण आहे.

## बँकांतील नोकरवर्गाची टंचाई

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. च्या वार्षिक सभेंतील आपल्या भाषणांत सर एच. पी. मोदी ह्यांनीं बँकांतील नोकरवर्गाविषयीं बोलतांना, कित्येक बँका दुसऱ्या बँकांतील तज्ञ नोकरांना जास्त पगार देऊन पळवितात, ह्याबद्दल तक्रार केली व ही गोष्ट अनिष्ट असल्याचें सांगितलें. बँका व त्यांच्या शाखा ह्यांची संख्या गेलीं दोन-तीन वर्षे झपाट्यानें वाढत आहे. साहजिकच त्यांस लागणारा तयार नोकरवर्ग इतर बँकांतून मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. जुन्या व सुस्थापित बँकांतील नोकरहि युद्धजन्य आर्थिक अडचणी सोडविण्याकरितां ही संधि साधतो. इतर ठिकाणीं सहज नोकरी मिळण्याजोगी असतांना, बँकिंगच्या धंद्याचें शिक्षण घेण्यासाठीं उमेदवार पुढें येणेंहि कठीण आहे. बँकिंगच्या धंद्याचा एकदम मोठा विस्तार झाला, ही गोष्टहि लायक नोकरांच्या टंचाईस कारणीभूत आहे.

## बंद केलेल्या धंद्यांच्या उत्पन्नावर इनकमटॅक्स बसतो काय ?

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

बी. एम्. कामदार ह्यांनीं १५ फेब्रुवारी, १९३८ पूर्वी "कामदार कार्यालय" ह्या नांवानें फर्निचरच्या व्यापाराचा धंदा केला. सल्लागार इंजिनिअर्स म्हणूनहि त्यांचा व्यवसाय होता. त्या तारखेस त्यांनीं फर्निचरचा धंदा एका लिमिटेड कंपनीस विकला व कंपनीच्या कामांत पूर्णपणें लक्ष घालण्याचें त्यांनीं मान्य केलें. सल्लागार इंजिनिअरचा व्यवसायहि त्यांनीं बंद केला. १ जानेवारी, १९३८ पूर्वीच्या व्यवसायाबद्दल येणें असलेली ११,३०२ रुपयांची रकम १९३८ सालीं त्यांस मिळाली, आणि इनकमटॅक्स अधिकाऱ्यांनीं त्यावर इनकमटॅक्स बसविला. ज्या-वेळीं उत्पन्न मिळालें, त्यावेळीं धंदा किंवा व्यवसाय चालू असेल तरच उत्पन्नावर इनकमटॅक्स बसूं शकतो, असें कामदार ह्यांचें म्हणणें होतें. इनकमटॅक्स कायद्याप्रमाणें, वादाचा हा मुद्दा मुंबई हायकोर्टाकडे सोपविण्यांत आला. हायकोर्टाचे सर न्यायाधीश न्यायमूर्ति कनिया व न्यायमूर्ति छगला, ह्यांच्या बेंचानें त्यावर आपला बहुमताचा निवाडा दिला. सर न्यायाधीशांचें मत इतर दोघां न्यायाधीशांच्या बाजूनें पडलें नाहीं.

### बहुमताचा निवाडा

"इनकमटॅक्स कायद्यांत प्राप्तीची व्याख्या कोठेंच केलेली नाहीं. ज्यावेळीं उत्पन्न मिळेल, त्यावेळीं उत्पन्नाचें मूळ शिल्लक असलेंच पाहिजे, असें ४ थें कलम कोठेंच सांगत नाहीं व ४ थ्या कलमाच्या अटी ६ वें किंवा १२ वें कलम मर्यादित करीत नाहीं. ६ व्या कलमांत प्राप्तीची वर्गवारी केलेली आहे, परंतु तें कराची आकारणी करीत नाहीं. प्रस्तुत वादांतील विशिष्ट उत्पन्न हें कर आकारणीच्या वर्षी अस्तित्वांत होतें व कामदार ह्यानें आकार-णीच्या वर्षी अस्तित्वांत असलेल्या सर्व उत्पन्नावर कर भरला पाहिजे. त्यानें जरी आपला धंदा कर आकारणीच्या वर्षी बंद केला असला, तरी १२ व्या कलमाप्रमाणें बाकी उत्पन्नांत त्याचा समावेश होऊन त्यावर कर बसेल."

---

### रेल्वे इंजनांत चांगल्या पाण्याची आवश्यकता

रेल्वे इंजनांचें आजारपण कमी करून त्यांचा अधिकांत अधिक वापर कसा करतां येईल, ह्याची चौकशी करण्यासाठी रेल्वे बोर्डानें एक कमिटी नेमली आहे. तिचे डॉ. मल्होत्रा व मि. हॅनकॉक हे सभासद आहेत. ते एका मुलाखतींत म्हणाले, "कोळसा व पाणी ह्यांवर इंजनाची कार्यक्षमता अवलंबून आहे. पाणी चांगलें नसेल तर बॉयलरवर क्षारांचा थर चिकटतो. तो थर उष्णतेच्या प्रवाहास अडथळा करतो व त्यामुळें योग्य तेवढा वाफेचा दाब निर्माण करण्यास जास्त कोळसा लागतो. क्षाराचे हे थर नाहींसे करणें फार खर्चाचें आहे. बॉयलरचें आयुष्यहि हे थर कमी करतात. इंजनांचा पाणी पुरवठा सुधारला म्हणजे वर्क-शॉपमध्यें दुरुस्तीसाठी त्यांना आतां इतक्या वेळा पाठवावें लागणार नाहीं. योग्य दर्जाचें पाणी वापरून इंजनांची कार्यक्षमता वाढविणें सध्याच्या तुटवड्याच्या काळांत विशेष महत्त्वाचें आहे. इंग्लंडमधील रेल्वेज पाण्यांतील अनिष्ट क्षार नाहींसे करूनच तें इंजनांसाठी वापरतात.

---

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

—त्वरा करा—
ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.
भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.
पत्ता:—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

सांडू टोमॅटो कम्पाउन्ड
(ए. बी. डी. व्हिटॅमिनयुक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. मुडदूस, मुलांचें सुकणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

## स्टॉक एक्सचेंज व सरकारी कर्जें

ले.:—व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम., पुणें ५

लोकांनीं सरकारी कर्जें विकत घेतल्यानें सरकारची युद्धकालीन चलन वाढ मर्यादित करण्याचें काम स्टॉक इक्सचेंजेस मार्फत कांहीं अंशीं होऊं शकतें. जेव्हां सरकारी रोखे आकर्षक वाटत नाहींत आणि स्टॉक एक्सचेंज संस्था चलन वाढ सेचण्याचें प्रत्यक्ष काम करूं शकत नाहीं, अशा वेळींहि जास्त व्याज देणाऱ्या औद्योगिक भागांकडे लोकांचे पैसे ओढून चलनविस्तार आटोक्यांत ठेवण्याचें काम तिचे हातून घडून येत असतें. औद्योगिक भागांची किंमत पुढें उतरून मूळ भांडवलांत बूड येण्याची भीति असली, तरी सुद्धा नीट तऱ्हेनें चालविलेल्या, व्याजाचा दर स्थिर ठेवणाऱ्या व पुढें मागें बोनस शेअर देऊं शकणाऱ्या चांगल्या औद्योगिक कंपन्यांच्या भागांना नेहमींच मागणी राहते. युद्धजन्य भरभराटीमुळें बाजारांतील बहुतेक सर्व ऑर्डिनरी भाग तेजींत आले व त्यांनीं पैसे गुंतविणारांचें लक्ष वेधून घेतलें; सरकारी रोख्यांस त्यांच्याशी स्पर्धा करतां आली नाहीं, ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आल्याशिवाय राहिली नसेल.

युद्धकाळांत सरकारनें वेळोवेळ कर्जें उभारलीं, त्यांचें स्वागत चांगलें झालें असलें व ५०० कोटि रुपयांपेक्षा अधिक रकम कर्जांत गुंतविली गेली असली, तरी ह्यापेक्षा अधिक होऊं शकलें नसतें, असें म्हणतां येत नाहीं. चलनविस्ताराच्या प्रमाणांत बँकांतील ठेवी वाढलेल्या नाहींत, असें युनायटेड कमर्शिअल बँकेच्या वार्षिक सभेंत तिचे अध्यक्ष श्री. बिर्ला शेटजी ह्यांनीं सांगितलें; त्याचा अर्थ असा कीं अद्याप पुष्कळच पैसा लोकांच्या हातीं खेळत असून खर्चिला जाण्याची वाट पहात आहे. किंमतींतील वाढ दर्शविणारे तुलनात्मक आकडे पाहिले तर सरकारला आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अद्याप किती मजल मारणें आवश्यक आहे, हें स्पष्ट होतें.

बचत व सरकारी रोख्यांत गुंतवणूक ह्या बाबतींत स्टॉक एक्सचेंजनीं फारशी कामगिरी बजावलेली नाहीं, ह्याबद्दल त्यांस दोषी ठरवितां येणार नाहीं. ब्रिटिश सरकारनें २% व्याजाच्या दरावर युद्धकर्जें उभारण्याचें धोरण अंमलांत आणलें, आणि हिंदुस्थान सरकारनें सरकारी कर्जरोखे ३% ( वजा इन्कमटॅक्स ) दराचे आहेत, म्हणजे सरासरीनें २½% च व्याज सुटतें. परत फेडीची मुदत हैंच पैसे गुंतविणारांस आकर्षण राहिलें. ट्रस्टस्, बँका, वगैरेंनीं सरकारी रोख्यांत पुष्कळ रकमा गुंतविल्या तरी गुंतवणूक अगदीं १००% बिनधोक असूनहि सामान्य माणसांचें लक्ष सेचणें त्यांस जमलें नाहीं. भावांतील चढउतार व ज्यास्त व्याज मिळण्याची अपेक्षा ह्यांवर नजर ठेऊन लोकांनीं अधिक धोक्याचा मार्ग पत्करला ! युरोपियन युद्धाचा अंत दिसूं लागला असला व बाजारभावांत त्यामुळें उतार होण्याचीं चिन्हें दृग्गोचर होत असलीं तरी औद्योगिक भाग विकून टाकण्याची घाई लोक करीत नाहींत. औद्योगिक भरभराटीचे दिवस अद्याप संपलेले नाहींत, ती कांहीं काळ तशीच चालू राहील, अशीच त्यांची कल्पना आहे.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
—+ स्वदेशी २७-४-४५
+ गोकाक ३०-४-४५

व्याज-वजा ( xd )
फिनले १—५—४५
इंडि. युना. ३०-५-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २४।४।४५ | बुधवार २५।४।४५ | गुरुवार २६।४।४५ | शुक्रवार २७।४।४५ | सोमवार ३०।४।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| —२३१५; १९१६ | १२९—८—९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २०६५—० | महावीर जयंतीनिमित्त सुट्टी | २०९५—० | २०७७—८ | २०५०—० |
| ४३५; ३६९ | २३—०—० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८८—८ | | ३९३—० | ३८९—८ | ३८३—० |
| —२२०१; १६९५ | ५०—०—०S | मार्च—सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८१६—४ | | १८१२—१२ | १८२७—८ | १८२०—० |
| ७६५; ५३३ | १६—०—०S | मार्च—सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०२—० | | ६०७—० | ६०३—० | ६०५—० |
| ६५३; ४७५ | २२—०—० | मे | स्वदेशी | १०० | ५४३—८ | | ५५१—८ | ५२४—८+ | ५१८—८ |
| ४९८; ३६१ | ६—०—०† | नोव्हें.—एप्रिल | नागपूर | १०० | ३७२—० | | ३७६—० | ३७८—८ | ३७१—० |
| ३७७; २६५ | १५—०—० | एप्रिल | फिनले | १०० | ३०१—० | | ३०५—० | ३०४—० | ३०३—० |
| ३९४; २८२ | ९—०—०S | ऑक्टो.—एप्रिल | गोकाक | १०० | ३००—० | | ३०४—० | ३०३—० | २९०—०+ |
| ३०५; २१८ | ४—०—०† | जाने.—जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६०—० | | २६७—० | २६९—८ | २६४—८ |
| —५-१०-६; ३-६ | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ३—१३—३ | | ३—१४—३ | ३—१४—३ | ३—१३—६ |
| —२१-१४; १३-४-६ | ०—१५—० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—९—० | | १४—११—६ | १४—१०—० | १४—६—० |
| ४-९; २-७ | ०—३—० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—०—६ | | ३—१—० | ३—०—६ | ३—०—० |
| —१२७०; ६३० | १११—०—० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७३०—० | | ७३२—८ | ७२७—८ | ७१८—१२—० |
| २५४; २१६ | ७—०—० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | २३०—१२ | | २३२—१२ | २३१—८ | २३०—० |
| २५९; २१९ | ९—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१३—० | | २१४—८ | २१५—० | २१४—० |
| ५७५; ३७६ | ७—८—० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५१०—० | | ५१०—० | ५१२—८ | ५१२—८ |
| —९३-१२; ७३ | २—०—० | जुलै | न्यू इंडिया अॅ० | १५ | ७६—८ | | ७७—८ | ७७—४ | ७६—१२ |
| ३८; २९-२ | १—४—० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३२—६ | | ३३—० | ३३—१४ | ३३—९ |
| ८५; ४८ | २—०—० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५०—८ | | ५१—८ | ५१—० | ५१—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०—१ | | २०—२ | १९—४ | १८—८ |
| ९०; ६८-१२ | ३—०—० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६६—० | | ६७—८ | ६७—८ | ६६—४ |
| | | | ३½% रोखे | १०० | १००—०—६ | | १००—०—६ | १००—१—० | १००—१—६ |

दि. ३०-४-४५

वर्गं पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
इंडिया युना. २०-४-४५ ते १६-५-४५

सोनें ७४—१४
चांदी १३०—६
कपास ४१०—४

3% व्हिक्टरी लोन = रु. ९९—१५—३
3% १९६३—६५ रु. ९८—१४—०
3% १९६६—६८ रु. ९८—४—०

## कापडाचा मानव-निर्मित युद्धकालीन दुष्काळ

लेखक:—संजय

"अर्थ"च्या एप्रिल ११ च्या अंकांत हिंदुस्थानांतील कापड-दुष्काळाबाबत मीं लिहिलें, त्याच सुमारास हैदरी शिष्टमंडळाच्या ब्रिटनमधील कामगिरीची द्योतक सरकारी माहिती प्रसिद्ध झाली; टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष, शेठ कृष्णराज ठाकरसी, हिंदुस्थान सरकारच्या औद्योगिक खात्याचे सेक्रेटरी सर अकबर हैदरी व गिरणी मालक संघाचे अध्यक्ष सर विठ्ठलराव चंदावरकर यांचीं भाषणें प्रसिद्ध झालीं. देशांतील कापड टंचाईची कल्पना ह्या सर्वांनाच आहे. आपापल्या अडचणी सुस्पष्ट करून त्यांनीं उपाय-योजनांचेंहि दिग्दर्शन केलें आहे. उंची कापडाची अनावश्यक खरेदी करणारी श्रीमंत व वरच्या मध्यम वर्गांतील मंडळी व कापडाच्या गांठींचा बेकायदा सांठा करणारी व्यापारी मंडळी सामाजिक गुन्हेगार आहेत; सामाजिक जबाबदारीच्या नीति-तत्त्वांचा आपण परिपोष केला पाहिजे असा सल्ला सर अकबर हैदरी यांनीं दिला आहे.

ह्या वर्षी देशांत ६३,००० लक्ष वार कापड तयार होईल. त्यापैकी गिरण्या ४८,००० लक्ष वार आणि लहान कारखाने व हातमाग मिळून १५,००० लक्ष वार कापड उत्पन्न करतील. लष्कराकरितां ८,००० लक्ष वारांपर्यंत परदेशीं पाठविण्याकरितां ६,००० लक्ष व.रांपर्यंत व सरकारनें २३० लक्ष पौंड सूत घेतलें त्यापासून तयार झालें असतें असें अदमासें १,००० लक्ष वार कापड मिळून एकूण १५,००० लक्ष वार कापड वजा जातां, नागरिकांच्या उपयोगाकरितां ४८,००० लक्ष वार कापड शिल्लक राहतें. हैदरी शिष्टमंडळाच्या प्रयत्नानें लष्करी व निर्गत उपयोगाकरितां राखून ठेवलेल्या कापडापैकी ६,००० लक्ष ते ८,००० लक्ष वार नागरिकांना मिळण्याची आतां सोय झाली आहे. म्हणजे, नागरिकांना ५४,००० ते ५६,००० लक्ष वार कापड मिळेल.

या वर्षीप्रमाणें १९४६ मध्यें ६३,००० लक्ष वार (गिरण्या ४८,०००लक्ष वार + लहान कारखाने व हातमाग १५,००० लक्ष वार) कापड-निर्मिति तर होईलच; पण त्याशिवाय २,००० लक्ष वार अधिक कापड तयार होईल. हैदरी शिष्टमंडळानें केलेल्या व्यवस्थेप्रमाणें ब्रिटनहून गिरण्यांना लागणारा मिल स्टोअर्स येणार असल्यानें उत्पादन-वाढीस त्याची विशेष मदत होणार आहे. एकूण ६५,००० लक्ष वार कापडाच्या उत्पादनापैकी लष्कराकरितां ६,००० लक्ष वार, परदेशीं पाठविण्याकरितां ४,००० लक्ष वार व सरकारनें सूत घेतल्यास त्याचें बनलें असतें असें १,००० लक्ष वार कापड मिळून ११,००० लक्ष वार कापड लागेल. म्हणजे नागरिकांना ५४,००० लक्ष वार कापड मिळेल.

सर अकबर हैदरी ह्यांनीं खाणींतील कोळसा कापण्याची यंत्रसामुग्री ब्रिटनकडून मिळविली असून ती लवकरच हिंदुस्थानांत येईल. कोळशाचें उत्पादन वाढण्याकरितां ह्या योजनेचा उपयोग होणार असल्यानें त्याबद्दल समाधान व्यक्त करून शेठ कृष्णराज ठाकरसी ह्यांनीं हल्लीच्या कोळशाच्या व विजेच्या अपुऱ्या पुरवठ्याबाबत तक्रार केली आहे. कामगारांना राहण्यास चाळी बांधल्यासेरीज पुरेसे कामगार मिळणार नाहींत असेंहि त्यांनीं बजावलें आहे.

आज बनत असलेल्या कापड व सूत यांच्या प्रकारांत जबरदस्त कपात, ज्यांत सूत वाया जातें अशा कापड-उत्पादनांत जबरदस्त कपात व धोतरें, साड्या, लाँग क्लॉथ, कोटिंग व शर्टिंग ह्या उपयुक्त कापडाच्या उत्पादनांत जास्तींत जास्त वाढ करण्याचें गिरणी मालकांनीं ठरविल्याचें व सरकारनें तें मान्य केल्याचें शेठ कृष्णराज ठाकरसी ह्यांनीं जाहीर केलें आहे. ह्या सर्व मार्गांनीं कापड-उत्पादनांत ४,००० वारांची भर पडेल, पण कापड जरा जाडें-भरडें व विरळ विणीचें येईल; कापडाची प्रत उतरेल. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या कापडापेक्षा अधिक सुबक व तलम परदेशी कापड परदेशांतून आणणार नाहीं असें आश्वासन सरकारकडून मागण्यांत आलें तें सशर्त देण्यांत आलें असल्याची माहिती दिल्लीचे प्रसिद्ध गिरणी-मालक सर श्रीराम ह्यांनीं सांगितली.

कापड-दुर्भिक्ष्याची जबाबदारी मुख्यतः वाहतुक खात्यावर व वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आहे. कापडाची निर्गत हीं देशावर लादलेली नाइलाजाची बाब आहे असें सर विठ्ठलराव चंदावरकर यांनीं मत दिलें. ते पुढें म्हणतात, "उद्योगधंद्यांची युद्धोत्तर पुनर्घटना व वाढ ह्या प्रश्नांचा विचार करण्याची हीच वेळ आहे. अमेरिका व ब्रिटन युद्धोत्तर आपल्याला यंत्रसामुग्री-सारखा 'भांडवली माल' कसा, केवढा व कोणत्या अटींवर देणार, ह्याबाबत सरकारनें त्यांच्याशीं बोलणीं सुरू केलीं असतीं व त्यांचा निकाल आम्हांला कळविला असता तर त्याचा फार उपयोग झाला असता. त्यानुरूप आपल्या व्यवस्था करून ठेवणें कारखानदारांना सोईचें झालें असतें. अमेरिका किंवा ब्रिटन ह्यांचेबरोबर कोणतीहि व्यवस्था पुरी होण्यापूर्वी सरकारनें उद्योगपतींची एक समिति नेमून तिचा सल्ला घ्यावा अशी माझी सूचना आहे."

### मद्रास प्रांताची युद्धोत्तर पुनर्घटनेची योजना

मद्रास सरकारनें आपल्या प्रांतांत व्हावयाच्या पुनर्घटनेची योजना प्रसिद्ध केली आहे. नवीन इंजिनिअरिंग, शेती व वैद्यकीय शिक्षणाच्या कॉलेजांची स्थापना, पाटबंधाऱ्यांची मोठी कामें, ग्रामसुधारणा, सहकारी पद्धतीची शेती, प्राथमिक शिक्षणाचा विस्तार, औषधपाण्याची सोय, इत्यादि बाबींवरील खर्चाची तरतूद त्या योजनेंत करण्यांत आली आहे.


**इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड**

**३७६ शुक्रवार, पुणें २**

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात

दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ मोंडा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मोंडा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ९ मे १९४५ अंक १९

**जीर्ण व हटवादी ज्वतापासाठी**
**डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें**
## पायरोनिल
**प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.**
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

## —त्वरा करा—
ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.
भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.
पत्ताः—
**तुळजाराम मोदी**
मोतीचौक, सातारा.

## —: साठे बिस्किटें :—
**ऑरेंज व क्रीमक्रॅकरी**
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

**डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.**



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

**नोगीचें डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.**
नोगी आणि कं. मुंबई ४

## युरोपांतील युद्धाची समाप्ती

जर्मनी विनशर्त शरण येऊन त्यानें शरणागतीच्या करारावर सही केली आहे. युरोपांतील युद्धाच्या समाप्तीच्या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ बुधवार, ता. ९ मे व गुरुवार, ता. १० मे हे दिवस सार्वजनिक सुट्टीचे समजले जातील, असें जाहीर झालें आहे.

# विविध माहिती

### जळत्या सिगारेटच्या टोकाचें उष्णतामान

जळत्या सिगारेटच्या टोकाचें उष्णतामान १,२००° ते १,३२५° फॅरनहाइट इतकें असतें! अल्युमिनियम व मॅग्नेशियम हे धातुसुद्धा ह्या उष्णतामानास वितळतात

### ब्रह्मदेशांतील चलनी नोटा

ब्रह्मदेशांतील ब्रिटिश लष्करी सरकारनें आपल्या स्वतःच्या चलनी नोटा काढल्या आहेत, त्या म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानांतील चलनी नोटांवर "ब्रम्हदेशांतील लष्करी सरकार—फक्त ब्रम्हदेशांतच कायदेशीर चलन" असें छापलेल्या नोटा होत. एकाद्या ठिकाणीं वहातुकीच्या अडचणींमुळें दुय्यम नाणीं पुरवितां आलीं नाहींत, तर चार आणे व आठ आणे किंमतींच्या नोटाहि प्रसृत केल्या जातील.

### देवकरण नानजी इनव्हेस्टमेंट कं. लि.

वरील कंपनीचें वसूल भांडवल २५,००,००० रुपये आहे व तिचा ताळेबंद २९¾ लक्ष रुपयांचा आहे. ३१, मार्च १९४५ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीस व्याजाचें व डिव्हिडंडचें उत्पन्न २,१९,००० रुपये झालें परंतु तिनें स्वतः कर्जावर १,०१,००० रुपये व्याज भरलें. शेअर्स व सिक्युरिटीज ह्यांवरील कमिशनचें उत्पन्न २,८१,००० रुपये झालें आणि कंपनीच्या उत्पन्नाचा मुख्य भाग तोच आहे. प्रत्येक भागास करमाफ १ रु. डिव्हिडंड सुचविण्यांत आलें आहे, म्हणजे डिव्हिडंडचा दर ४% पडतो.

### सायकलींचें उत्पादन अशक्य झालें

कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें गेल्या वर्षी हिंद सायकल्स लि. सायकलींचे फक्त सुटे भागच तयार करूं शकली; पुऱ्या सायकलींचें उत्पादन शक्य झालें नाहीं. इंग्लंडहून कच्चा माल अपेक्षित आहे तो आल्यावर पुऱ्या सायकली निघूं लागतील. धंद्याचें भवितव्य सरकारी सहायाच्या धोरणावर अवलंबून आहे असें श्री. बिर्ला ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेंत सांगितलें. क्यु. प्रेफरन्स भागांस ५½% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

### इनकम टॅक्सची गळती थांबविण्याचा प्रयत्न

इनकमटॅक्स कसा चुकविला जातो, ह्याविषयीं चौकशी करून वसुलीची पद्धति सुधारण्याकरितां सूचना करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें दोन युरोपिअन अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे.

### कोळशाच्या तुटवड्याचा परिणाम


कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें अहमदाबादमधील कापडाच्या गिरण्या जानेवारी, १९४५ पासून आतापर्यंत २० दिवस बंद ठेवाव्या लागल्या.

### भारत बँक लि.

वरील बँकेचें खेळतें भांडवल २६ कोटि रुपयांवर गेलें आहे. ३१ मार्च, १९४५ असेरच्या वर्षी तिला १९,२७,२३२ रुपये निवळ नफा झाला.

### प्रॉव्हिडंट कंपन्यांच्या अडचणी

"इंग्लंडमध्यें प्रॉव्हिडंट कंपन्यांची भरभराट होत आहे, परंतु हिंदुस्थानांत त्यांची जगण्यासाठी धडपड चालू आहे. १९३८ च्या विमा कायद्याची अंमलबजावणी ह्या परिस्थितीस मुख्यतः कारणीभूत आहे. त्यांनीं ५०% रकम सरकारमान्य रोख्यांत गुंतविली पाहिजे, ही अट जाचक आहे. हें प्रमाण २०% वर उतरविण्यांत येऊन, प्रॉव्हिडंट कंपन्यांस उत्पन्न वाढविण्यास वाव मिळाला पाहिजे. ":— हिंदी प्रॉव्हिडंट कंपन्यांच्या परिषदेचे अध्यक्ष, श्री. भट्टाचार्यजी, ह्यांनीं वरील विचार व्यक्त केले आहेत.




फौंटनपेनकरतां
कॅमल इंक
सर्व
पसंत करतात.
दांडेकर आणि
कंपनी, मुंबई २८

EVERYTHING IN RUBBER GOODS

● Hospital Requirements ● Cab Tyres
● Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
● Rubber Rollers for Textile Mills
● Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd,
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

मुदतीच्या ठेवी घेणें आहेत.

दी अंबा टॅनिन प्रॉडक्टस

[ कोल्हापूर संस्थानांत विशाळगड जहागिरींत अंबाघाटांत हिरड्यापासून टॅनिन बनविणारा कारखाना ]

चालक व मालक:
श्रीमान् वामन वासुदेव चितळे, नागपूर

ठेवींची मुदत व दर
१ वर्ष ४॥ टक्के, २ वर्षे ५ टक्के, ३ वर्षे ५॥ टक्के
किमान ठेव रु. ५०० ची स्वीकारली जाईल व व्याज वार्षिक दिलें जाईल.

ठेवीचे अर्ज मागविण्याचे पत्ते
(१) श्री. वि. ह. देशमुख, बी. ए.
न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मीरोड, ६ बुधवार, पुणें २
(२) ऑल-इण्डिया रिपोर्टर लि.
मेडोज हाऊस, मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

ठेवींना मालकांची वैयक्तिक हमी राहील

# अर्थ

## औद्योगिक नियोजनांत सरकारी नियंत्रणाचें स्थान

लोक स्वतःच्या फायद्यासाठी उद्योगधंदे करीत असले तरी त्यांचेसंबंधांतील नुकसानीची जबाबदारी ते स्वीकारींत असल्यानें आणि त्यांच्या व्यवहारांचा उपयोग इतरांस व सर्व समाजास होत असल्याकारणानें त्यांमध्यें राजसत्तेनें ढवळाढवळ करूं नये असें मत इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत प्रामुख्यानें रूढ आहे. प्रस्तुत युद्धामुळें उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेवर सरकारी नियंत्रणें घालणें अपरिहार्य झालें हें खरें; पण ही परिस्थिति बदलतांच पूर्वीचें आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्य शक्य तितक्या लवकर पुन्हां प्रस्थापित केलें जावें अशी मागणी त्या देशांत जोरानें केली जात आहे. समाजसत्तावाद्यांचा ह्या विचारसणीस अर्थातच मूलग्राही विरोध असून व्यक्तिगत नफ्याच्या तत्त्वावर आधारलेली सामाजिक व आर्थिक घटना बदलण्याची सध्याची संधि वाया घालविली जाऊं नये असा त्यांचा आग्रह आहे. आर्थिक नियोजनाची भाषा आज चोहोंकडे बोलली जात आहे. हें नियोजन व्यक्तिशः धंदेवाले आणि त्यांचे गट करूं शकतात. आपापल्या धंद्यांच्या परिस्थितीचा व भावी उत्कर्षाचा सांगोपांग विचार करून त्यांची योजनात्मक घडी बसवण्याची कल्पकता व व्यवहारचातुर्य ह्यांची वाण स्वतःमध्यें नसल्यानें राजसत्तेनें आपलें आर्थिक स्वातंत्र्य हिरावून घेऊं नये अथवा मर्यादित करूं नये असें त्यांचें म्हणणें आहे. अमेरिका व इंग्लंड ह्यांसारख्या आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्य व वैयक्तिक स्पर्धा ह्यांच्या वातावरणांत श्रीमान् बनलेल्या राष्ट्रांत वरील विचारसरणी समर्थनीय असली तरी हिंदुस्थानसारख्या मागसलेल्या व दुबळ्या देशांत ती लागू पडणें शक्य नसून आर्थिक पुनर्रचना व संवर्धन हीं राजकीय सत्तेच्या पुरस्कारानें, नियमनानें व सहायानेंच होऊं शकतील हें उघड आहे. शेती, धंदे व व्यापार ह्यांची सुधारणा व विस्तार राष्ट्राच्या भांडवलावर व प्राप्तीवर अवलंबून राहतील आणि त्यांच्या विनियोगाचें नियमन राष्ट्रीय राजकीय सत्तेनें सर्वंद समाजाच्या हिताच्या दृष्टीनें केलें पाहिजे. ह्याकरितां हिंदुस्थानचें आर्थिक संवर्धन व त्याचें नियोजन, व्यक्ती व त्यांचे गट कितीहि कर्तबगार असले तरी, त्यांचेवर सर्वस्वी सोपवून चालणार नाहीं. ही राजसत्ता मात्र जनतेच्या विश्वासावर आधारलेली व तिला जबाबदार अशी असली पाहिजे; तरच तिला आर्थिक संवर्धनाचें प्रचंड कार्य यशस्वी रीतीनें पार पाडतां येईल.

हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या औद्योगिक धोरणाची कल्पना पुढें मांडली आहे ती एवढी व्यापक, दूरगामी व मूलग्राही आहे कीं मध्यवर्ती राजकीय सत्तेच्या अमर्याद अधिकाराचा सार्वत्रिक व विधायक उपयोग केला गेल्यावांचून ती फलद्रूप होण्याची शक्यता दिसत नाहीं. हिंदी राष्ट्रीय वृत्तीच्या व लोकांच्या विश्वासांतल्या सरकारासहि असली योजना पार पाडणें अत्यंत अवघड होईल. सध्याच्या हिंदुस्थान सरकारानें ह्या प्रकारचें धोरण आखलें आहे त्याचें सर्वत्र आश्चर्य वाटत आहे तें उगीच नाहीं. राजकीय सत्तेच्या लोकांच्या मागणीचें व राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेच्या प्रश्नाचें भिजत घोंगडें अजून पडलें आहे आणि औद्योगिक अभ्युदयाच्या बारेमाप योजना मात्र बनवल्या जात आहेत ही घटना खचित विस्मयकारक आहे. औद्योगिक विस्ताराच्या नियंत्रणाची सरकारी योजना उदाहरणार्थ पहा. युद्ध परिस्थितींतले आजचे निर्बंध सोडले तर कोणीहि उठावें व मन मानेल तेथें कारखाना उभारावा ह्यास मर्यादा नाहीं. स्थानिक निर्बंध अस्तित्त्वांत असले तरी त्यांचा औद्योगिक विस्ताराच्या आर्थिक तत्त्वाशीं संबंध नसतो. उत्पादन खर्च, प्राप्ती व नफा ह्यांचा हिशेब करूनच धंदेवाले कारखाने काढीत असले तरी राष्ट्रीय दृष्टीनें ही घटना योग्य असतेच असें नाहीं. सरकारचें म्हणणें असें आहे कीं मुंबई व अहमदाबाद येथें कापडाच्या गिरण्या, बिहार व संयुक्तप्रांत येथें साखरेचे कारखाने व बंगालमध्यें कागदाचें उत्पादन असें स्थानिकीकरण झालें आहे तें संरक्षणाच्या, सामाजिक व आर्थिक दृष्टींनीं हितावह नाहीं. थोड्या शहरांत दाट व कोंदट वस्ती होऊं नये, शत्रूच्या हल्ल्याची भीति कमी व्हावी, देशाच्या सर्व भागांत कारखान्यांची वाटणी व्हावी व जनतेस काम व माल सोयीवार मिळावा ह्यासाठी कारखाने पांगले गेले पाहिजेत असा प्रस्तुत बाबतींत सरकारचा युक्तिवाद आहे. त्यांनीं आणखी एक मुद्दा पुढें मांडला आहे, तो असा कीं सरकारचें नियमन नसल्यास धंदेवाले तात्पुरत्या फायद्याच्या हेतूनें वाटेल तेथें विशिष्ट कारखानें स्पर्धेनें काढतील आणि सार्वजनिक महत्त्वाच्या धंद्यांकडे दुर्लक्ष होईल; ह्याकरितां कोणत्या मालाचें किती उत्पादन व्हावें हें ठरवावें लागेल आणि त्याची वाटणी देशाच्या निरनिराळ्या भागांत करणें अगत्याचें होईल. ह्या रीतीनें नियमन करण्याचा अधिकार आज सरकारास नाहीं, तो त्यास कायदे करून द्यावा लागेल. चालू कारखान्यांचा विस्तार करणें किंवा नवे कारखाने स्थापणें ह्यासाठी सरकारच्या परवान्यांची आवश्यकता राहील. लहान-सहान कारखान्यांस, त्यांच्या योगानें मालाच्या पुरवठ्यांत म्हणण्यासारखी भर पडणार नसल्यानें, हा नियम लागू केला जावयाचा नाहीं.

औद्योगीकरणाच्या नियमनाची नियोजित सत्ता फार मोठी व विस्तृत आहे ह्याची सरकारास जाणीव आहे. म्हणून त्याचें पत्रक म्हणतें कीं सर्वसाधारण जनतेस मान्य होईल अशा रीतीनेंच सरकारनें आपल्या उद्योगधंद्यांचे बाबतींतील नवीन अधिकाराचा उपयोग करावा लागेल. पण सध्याच्या राजकीय घटनेखालीं हें कसें होणार ? आणि खरेंखुरें राष्ट्रीय सरकार सध्याच्या हिंदुस्थान सरकारचें धोरण व कार्यक्रम उचलून धरील ह्याची काय शाश्वती आहे ? मध्यवर्ती सरकार कारखान्यांस परवाने देणार त्या बाबतींत संस्थानांतील धंद्यांचें काय होणार हा नाजुक प्रश्न येथें उद्भवतो. ह्यासंबंधांत संस्थानांच्या हितास बाधक होणार नाहींत, अशा रीतीनें निर्णय करतां यावे म्हणून एक उच्च दर्जाचें सल्लागार मंडळ नेमण्याचा उपाय हिंदुस्थान सरकारनें सुचवला आहे. ह्या मंडळाची घटना व कार्य ह्यांविषयींचा तपशील अजून ठरावयाचा आहे. एवढ्यानें संपलें नाहीं. लहानमोठे उद्योगधंदे व शेती ह्यांवर उपलब्ध असलेलें भांडवल योग्य तऱ्हेनें वाटलें गेलें पाहिजे आणि ह्यासाठी सरकार पैशाची योग्य वाटणी करील; कामकरी

वर्गास योग्य वेतन व सोयी प्राप्त होतील अशी तजवीज सरकारास करावी लागेल; सामान्यतः औद्योगिक नफ्याचें नियंत्रण करणें इष्ट नसलें तरी कित्येक बाबतींत तेंहि आवश्यक होईल; मालाचा दर्जा चांगला राहील ह्याविषयीं खबरदारी घ्यावी लागेल; धंदे विशिष्ट जमातींच्याच हातीं न जातील अशी व्यवस्था आवश्यक होईल आणि मागासलेल्या वर्गास यांत्रिक शिक्षण देण्याची सोय करावी लागेल. सरकारी पत्रकाप्रमाणें हें सर्वव्यापी धोरण तात्पुरत्या स्वरूपाचें असून त्यांत दीर्घकालीन दृष्टीनें विचार केलेला नाहीं. नियोजनात्मक धोरण तर दूरवरची दृष्टी ठेवून विशिष्ट ध्येय गाठण्याच्या निश्चित हेतूनें व ठराविक मार्गानें प्रगति घडवून आणण्यासाठी आखावयाचें असतें. मग प्रस्तुत औद्योगिक धोरणविषयक पत्रक प्रसिद्ध करून सरकारनें काय साधलें ?

## प्रांतिक सरकारांच्या उत्पन्नांत युद्धजन्य वाढ

प्रांतिक सरकारांचें एकूण उत्पन्न १९३८-३९ मध्यें ८५ कोटि रुपये होतें, तें आतां १९४५-४६ सालीं १९० कोटी जाईल, अशी अपेक्षा आहे. विशेषतः मद्रास प्रांतानें आपलें उत्पन्न चांगलेंच म्हणजे २५०% वाढविलें आहे. इन्कमटॅक्सच्या वसुलीपैकी प्रांतिक सरकारच्या वाट्यास १९३८-३९ मध्यें १½ कोटिवर रुपये आले, आतां हा आकडा २४कोटींवर गेला ! जमीनमहसुलाचें उत्पन्नहि वाढलें आहे. जंगल खात्याची विक्री सुधारली आहे आणि दारूबंदी उठल्यामुळें आणि लोकांच्या हातांत पैसा खेळूं लागल्यामुळें एक्साइजच्या उत्पन्नांतहि भर पडूं लागली आहे. उत्पन्नाच्या मानानें खर्च हात राखून झाल्याकारणानें बहुतेक युद्धोत्तर सुधारणांसाठी फंड निर्माण आले आहेत, परंतु जरूरीच्या मानानें ते फंड अगदींच अपुरे पडतील हें उघड आहे. प्रांतांचा खर्च वाढेल परंतु खर्चाचें वाढत्या अर्थोत्पादनांत रूपांतर होईपर्यंत तरी सरकारी उत्पन्न कायम टिकणें कठीण जाईल. मध्यवर्ती सरकारकडून मदत, करवाढ व कर्जाची उभारणी ह्या मार्गानींच मुख्यतः प्रांतिक सरकारांस आपल्या योजनांच्या खर्चाची तरतूद करावी लागेल. खालील तक्त्यांत प्रांतिक सरकारांच्या उत्पन्नांचे तुलनात्मक आकडे दिले आहेतः—

( लक्ष रुपये )

| प्रांत | १९३८-३९ | १९४५-४६ |
|---|---|---|
| मद्रास | १६,१३ | ४१,२५ |
| मुंबई | १२,४५ | २९,०९ |
| बंगाल | १२,७७ | २९,०० |
| संयुक्त प्रांत | १२,८० | २७,५२ |
| पंजाब | ११,१७ | २१,१७ |
| मध्यप्रांत | ४,२७ | ९,४८ |
| बिहार | ५,२४ | ११,३१ |
| सिंध | ३.७० | ८,५७ |

## सर अर्देशिर दलालांची विलायतची यात्रा

युद्धोत्तर आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या प्रश्नांची ब्रिटिश सरकारबरोबर चर्चा करण्यासाठी, हिंदुस्थान सरकारचे योजना मंत्रि, सर अर्देशिर दलाल हे इंग्लंडला गेले आहेत. एका महिन्यांत ते परततील.

## खेडेगांवांचें औद्योगीकरण*

खेडेगांवांच्या औद्योगीकरणाची एक योजना “ए. आय. एम. ओ.” नें १९४३ मध्यें प्रसिद्ध केली होती. त्या योजनेचें विशदीकरण करणारें हें छोटें पुस्तक सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांनीं लिहिलें आहे. प्रत्येक जिल्ह्यांत खेडेगावांचे गट तयार करणें व त्यांत काम करण्याकरितां तेथील प्रातिनिधिक नागरिकांच्या कार्यकारी समित्या नेमणें, हें वरील योजना यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक आहे. लोकांनीं एकजुटीनें वागून आत्मोद्धार करावा, अशी सर विश्वेश्वर अय्या ह्यांची सूचना आहे. नव्या परिस्थितीची जनतेस जाणीव करून देऊन तिला कार्यप्रवण करणें, हा त्यांचा उद्देश आहे. जनतेची रहाणी सुधारण्याच्या कार्यक्रमांत औद्योगिक प्रगतीस महत्त्वाचें स्थान आहे हें उघड आहे. ग्रामोद्धाराचें कार्य आज अनेक मार्गांनीं व वेगवेगळ्या पुरस्कारानें चालू आहे, त्याच्या सहकार्यानेंच प्रगति करण्याची ही योजना आहे परंतु ती खेडेगांवांतील प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली दिसत नाहीं. कागदी योजना ह्या दृष्टीनें ती ठीक असली, तरी ती हातीं घेऊन यशस्वी करण्याची जबाबदारी कोणी घ्यावयाची हा प्रश्नच आहे. “ए. आय. एम. ओ.” ही औद्योगीकरणाचें कार्य करण्यासाठी निघालेली संस्था असल्याकारणानें, तिच्या कार्यकर्त्यांवर मोठी जबाबदारी येणार आहे.

*व्हिलेज इंडस्ट्रिअलायझेशन. पृ.सं. ३३. किं. १ रु. ४ आ. प्रकाशकः ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन, चर्च गेट, मुंबई.

## ॲक्चुअरी श्री. ग. स. मराठे ह्यांचा मृत्यु

सुप्रसिद्ध ॲक्चुअरी श्री. गणेश सदाशिव ऊर्फ बाबासाहेब मराठे हे ता. ४ मे रोजीं निवर्तले, हें नमूद करण्यास दुःख होतें. सल्लागार विमागणिती ह्या नात्यानें त्यांनीं सबंद हिंदुस्थानांत अग्रेसरत्व मिळविलें होतें व शंभरावर कंपन्यांचीं कामें त्यांचेकडे येत असत. आफ्रिका व सिलोन येथूनहि त्यांचेकडे काम येई. विमाविषयक ज्ञानाच्या प्रसारासाठी त्यांनीं पुष्कळच प्रयत्न केले व सुमारें चार वर्षें “भद्रायु” हें विमाविषयक मासिक चालविलें. कै. बाबासाहेब ह्यांच्या सहवासानें स्फूर्ति मिळून अनेक तरुण विमा क्षेत्रांत प्रविष्ट झाले व ते चांगली कामगिरी बजावीत आहेत. महाराष्ट्राच्या औद्योगिक व्यापारी प्रगतीस त्यांनीं केवळ आर्थिक सहाय करूनच नव्हे, तर कंपन्यांचे डायरेक्टर, चेअरमन, इत्यादि होऊन हातभार लावला आहे. नवीन कंपनी काढणारा जबाबदार तरुण त्यांचेकडे गेला तर त्यास विन्मुख परत येण्याची पाळी आली असें सहसा झालेलें नाहीं. मूल्यमापनांचे बाबतींत हिंदी नव्या कंपन्यांस सढळपणा दाखवून त्यांनीं उर्जितावस्थेस येण्यास केलेली मदत विमा व्यवसायास अमोल ठरली आहे. “अर्था”मध्यें श्री. बाबासाहेब विमा विषयावर आपुलकीनें लेख लिहित असत. त्यांचे चिरंजीव श्री. अप्पासाहेब हेहि विमाशास्त्रांत पारंगत असून दोन औद्योगिक कंपन्यांचे ते आज मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

# स्फुट विचार

## स्टर्लिंग शिलकांचा प्रश्न अजून हवेंतच

मित्रराष्ट्रांच्या, विशेषतः इंग्लंडच्या वतीनें हिंदुस्थान सरकारनें ह्या देशांत युद्धखर्चासाठी पैसा पुरवला, त्याचा मोबदला लंडनमध्यें स्टर्लिंग पौंडांच्या स्वरूपांत पडून राहिला आहे, तो इकडे परत कसा आणावयाचा ह्या प्रश्नाचा निकाल अजून झालेला नाहीं आणि तो लवकर लागेल अशीं चिन्हें दिसत नाहींत. सर जेरेमी राइसमन सध्या इंग्लंडमध्यें आहेत आणि सर आर्देशीर दलाल तिकडे जाणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पण त्यांच्या ब्रिटिश सरकाराशीं होणाऱ्या चर्चेत हा प्रश्न निर्णयाच्या हेतूनें हाताळला जाईल असें म्हणण्यास जागा नाहीं. ब्रिटिश फडनवीसांनीं आपल्या अंदाजपत्रकावरील भाषणांत बाहेरील देशांच्या इंग्लंडमधील स्टर्लिंग शिलकांचा उल्लेख केला, पण त्यानें प्रस्तुत विषयावर कांहींच प्रकाश पडला नाहीं; उलट, त्याची अनिश्चितता वृद्धिंगत केली. सदरहु एकूण पाच हजार कोटि रुपयांच्या शिलका (त्यांपैकी एक तृतीयांश हिंदुस्थानच्या आहेत) मामुली व्यापारी व्यवहारांतून निघालेल्या नसल्यानें त्यांच्या फेडीची व्यवस्था तात्काळिक कसोशीनें व मामुली पद्धतीनें होण्याची अपेक्षा कोणीहि करूं नये असें त्यांनीं बजावलें. शिलकांच्या स्वरूपांतलें कर्ज इंग्लंडला सर्वांच्या हितासाठी चाललेल्या युद्धामुळें झालेलें आहे आणि केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यानें तें काढलेलें नाहीं ह्याची त्यांनीं जाणीव करून दिली. ह्याचा अर्थ हितसंबंध्यांनीं काय लावावयाचा तो लावावा. आम्ही तुमचें देणें बुडवूं इच्छित नाहीं, पण जरा दमानें व सोयीनें घ्या असें सांगण्याचा त्यांचा उद्देश दिसतो.

---

## परराष्ट्रीय भांडवल आणि देशी धंदे

मध्यवर्ती असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत, ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्यासाठी हिंदी राजकीय घटनेंत नमूद असलेले निर्बंध काढून टाकण्यांत यावे अशी सूचना चर्चिली गेली. त्या प्रसंगीं घटनेची अशी दुरुस्ती करणें अव्यवहार्य असल्यानें प्रस्तुत प्रकरणीं कांहीं तरी तात्पुरती तडजोड करण्याची शक्यता सर आर्देशीर दलाल ह्यांनीं व्यक्त केली होती. ह्या अभिवचनास अनुसरून इंग्लंडला भेट देऊन ते आतां हिंदुस्थानचें औद्योगीकरण आणि त्यांत ब्रिटिश भांडवलाचें स्थान ह्यांचेसंबंधांत विचारविनिमय करून कांहीं तरी निश्चित योजना घडवून आणणार आहेत असें समजतें. स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगाबाबतच्या वाटाघाटी इतक्यांत होणार नाहींत आणि त्या झाल्या तरी त्यांत सर आर्देशीर भाग घेणार नाहींत असें दिसतें. कांहीं प्रमुख हिंदी धंदेवाले आणि ब्रिटिश कारखानदार ह्यांचेमध्यें ह्या देशांत स्थापल्या जावयाच्या कारखान्यांचेविषयीं करारमदार झाले आहेत किंवा होत आहेत, त्यांचे योगानें स्वदेशी धंद्यांत परकीय भांडवलवाल्यांचा हात शिरून हिंदुस्थानचें आर्थिक परावलंबन दृढ होईल अशी भीति मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरनें व्यक्त केली आहे. राजकीय घटनेंतील हिंदुस्थानच्या आर्थिक स्वातंत्र्यावरील निर्बंध काढून टाकण्याचे ऐवजी सर आर्देशीर तडजोडीच्या स्वरूपांत ब्रिटिश भांडवलाचें ह्या देशांतील धंद्यांतलें स्थान दृढ करण्याची कांहीं तरी तजवीज मान्य करून येतील अशी भीति चेंबरला वाटत आहे. हिंदुस्थानच्या राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न अजून सुटावयाचा असतां ह्या देशाच्या नांवानें कोणतेहि व्यापारी करार सरकारनें करणें इष्ट आणि योग्य नाहीं असें चेंबरचें म्हणणें आहे. हिंदुस्थानचें औद्योगीकरण झालें नाहीं तरी आम्हांस पत्करेल, पण त्यासाठी परकीय भांडवलाचें ह्या देशांत आम्हांस वर्चस्व नको असें ह्या प्रमुख हिंदी व्यापारी मंडळानें एका निवेदनांत लिहून सांगितलें आहे. कांहीं निवडक हिंदी धंदेवाले औद्योगिक विस्ताराचे बाबतींत चर्चा करण्यासाठी इंग्लंडला जात आहेत त्यांनीहि ह्या महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधण्यांत आलें आहे.

---

## नाझी जर्मनीचा शेवट

हिटलरच्या नेतृत्वाखाली जर्मनींतील नाझी पक्षीय राजकर्त्यांनीं सबंध युरोपखंडांतील राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिरावून तेथें स्वतःचें आधिराज्य स्थापण्याच्या केलेल्या प्रयत्नाचा शेवट पूर्ण अपयशांत आणि प्रत्यक्ष जर्मनीच्या नाशांत झाला आहे. त्या योगानें सर्व जगास एका भयंकर संकटांतून मुक्त झाल्याचें समाधान वाटत आहे. एका मागून एक युरोपांतील राष्ट्रें जर्मनीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेस बळी पडत गेलीं आणि तिचा मोर्चा पूर्वेस व्होल्गा नदीपर्यंत जाऊन पोहोंचला तेव्हां हिटलर व त्याचे सहकारी ह्यांस दिग्विजयाचीं सुखस्वप्नें अनुभवास येत असलीं पाहिजेत. परंतु इंग्लंड, रशिया व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं दुर्दम्य निश्चयानें व चिकाटीनें शत्रु सेनांस मागें रेटीत रेटीत अखेर नाझींचा स्वतःचा देशच आतां व्यापून टाकला आहे. जर्मन सेना लाखांनीं, रशिया, इंग्लंड व अमेरिका ह्यांस शरण आल्या आहेत आणि हिटलर आदि करून नाझी पुढाऱ्यांचा अंत झाला आहे. जर्मनीच्या अल्पकालीन विजयाच्या गंगेंत हात धुवूं पहाणाऱ्या मुसलोनीचें साम्राज्य लयास जाऊन त्यास प्रत्यक्ष इटालिअन लोकांच्या गोळ्यांनीं मृत्यू आला आहे. ह्या रीतीनें मित्र राष्ट्रें युरोपियन युद्धाच्या भयंकर दिव्यांतून बाहेर आलीं आहेत आणि नाझींच्या अस्तित्वाचा अंत झाला आहे. एशिया खंडांत जर्मनीचें अनुकरण करून जपाननें अतिक्रमणाचा धुडगूस घातला त्याचें निराकरणहि व्यवस्थित प्रकारानें चालू असून ह्या पौर्वात्य नाझींना त्यांच्या युरोपियन मित्रांचा अनुभव लवकरच येणार आहे. ब्रह्मदेशांतून जपान्यांची हकालपट्टी पद्धतशीर झाली आहे — आणि पॅसिफिक महासागरांत त्यांस मागें पाय घ्यावा लागत आहे. युरोपांतील अभिनंदनीय व आनंदोत्पादक विजयामुळें जपानच्या पराभवाचें मित्र राष्ट्रांचें कार्य सुकर झालें आहे.

---

## न्यू सिटिझन बँकेचा गुजरातमध्यें प्रवेश

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. नें आपली अहमदाबाद शाखा ता. २७ एप्रिल रोजीं सुरू केली व पहिल्याच दिवशीं २०० खातीं चालू होऊन ठेवींचा आकडा ५ लक्ष रुपये झाला, असें समजतें. न्यू सिटिझन बँकेची गुजरातमधील ही पहिलीच शाखा आहे आणि तेथें व काठेवाडमध्यें लवकरच आणखी कांहीं शाखा उघडण्याचा तिचा विचार आहे. महाराष्ट्र व मध्यप्रांत-वऱ्हाड येथेंच नव्हे, तर इतर ठिकाणींहि बँकेनें शाखा स्थापून आपलें कार्यक्षेत्र विस्तृत केलें आहे. तिचें खेळतें भांडवलहि आतां २ कोटि रुपये झालें असल्याचें कळतें, बँकेच्या ह्या प्रगतीबद्दल तिचे मॅ. डायरेक्टर, श्री. देशपांडे, ह्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

## धुळें शहरांतील बँका

### युद्धजन्य तेजीमुळें स्पर्धा आज सुसह्य वाटते

ले.:—श्री. डी. व्ही. जावडेकर, धुळें

धुळें शहराची लोकसंख्या हल्लीं जवळजवळ साठ हजारांची आहे. व्यापारीदृष्ट्या हें शहर कपास व भुइमूग यांची खरेदी-विक्रीची एक मोठी पेठ समजली जाते.

दहा वर्षांपूर्वी येथील बाजारांत सामान्यतः एक लाख गांसड्या ( कपाशीच्या ) तयार होत असत, परंतु जिल्ह्यांत ठिकठिकाणीं जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज निघाल्यामुळें हाच आकडा आतां ४५ हजारांपर्यंत खालीं आला आहे. कदाचित् हा धंदा याहिपेक्षां कमी कमी होत जाण्याचा संभव आहे. इतरत्र धंदा वाटला जात आहे हें एक कारण व त्याचप्रमाणें कपाशीची लागवडही कमी होत आहे हें दुसरें कारण. गतवर्षी पिकाचें प्रमाण अत्यंत कमी होतें व एकंदरींत १५ हजार गांसडीच तयार होऊं शकली.

कपाशीच्या व्यापाराची जागा भुइमुगाचे शेंगांनीं भरून निघत आहे. साल्हिना, या पेठेंत ५ लाख पल्ले शेंगांची उलाढाल होते व पैदाशींत वाढ होत असल्यानें कांहीं वर्षांत आणखीहि वाढ होईल असा अंदाज आहे.

वीस वर्षांपेक्षां अधिक काळ धंदा करीत असलेल्या अशा तीन बँका येथें आहेत—( १ ) इंपीरियल बँक; ( २ ) मुंबई प्रांतिक सहकारी बँक व ( ३ ) अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक. याशिवाय राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक व गव्हर्नमेंट सर्व्हंटस को-ऑपरेटिव्ह बँक या सहकारी बँका व न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया याहि धंदा करीत आहेत. भारत बँक व बँक ऑफ बरोडा यांनीं नवीनच व्यवहार सुरू केले असून व्यापाऱ्यांचे विशेष सोईच्या नसल्या तरी इतरहि २–३ बँका त्यांचे मानानें थोडाबहुत व्यवहार करीत आहेत.

इंपिरियल बँकेला सरकारी सहाय्य असल्यानें व प्रांतिक सहकारी बँकेला सहकारी सोसायट्यांचें काम मिळत असल्यानें कमी-अधिक प्रमाणांत पण निश्चित असा 'मोनॉपोली' धंदा मिळत असतो. प्रमाणाबाहेर अधिक बँका निघाल्यानें इतरांचें एकंदरींत नफ्याचें प्रमाण समाधानकारक असेल अशी भावना होत नाहीं. अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेला व राजवाडे मंडळाचे बँकेला शहरांतील घरांचे तारणावर पैसा गुंतवितां येत असल्यानें त्यांचे व्यवहार समाधानकारक आहेत; परंतु व्यापारी वर्ग हा त्यांचेशीं फारसें सहकार्य करूं शकत नाहीं.

न्यू सिटिझन बँकेच्या धुळें येथील शाखेचा नफा हा खानदेशमधील गोरगरिबांना 'भिल्ल सुधार समिती' या संस्थेचे वतीनें मोफत औषधोपचार करण्याकडे होत असल्यानें तिला लहान-मोठे धनिक व व्यापारी यांचें सहकार्य उत्तम रीतीनें मिळत आहे. केवळ लोकाश्रयाचा विचार केला तर, पारमार्थिक विचारानें कां होईना, इतर सर्व बँकांपेक्षां या बँकेला सर्वांनीं आपली मानून अग्रेसरत्व प्राप्त करून दिलें आहे.

भारत बँक व बँक ऑफ बरोडा यांचे व्यवहार नवीनच सुरू झाले असल्यानें त्यांचेबाबत निश्चित असें लिहितां येत नाहीं.

गत वर्षापासून बँकांतील स्पर्धेमुळें ब्रोकरेजचे दर ६०% नीं उतरले व कर्जाऊ दिलेल्या रकमांचे व्याजाचे दर ४०% नीं उतरले.

जॉईंट स्टॉक कंपन्या ठेवींवर अधिक व्याज देतात. त्यामुळें बँकेकडे ठेवी न ठेवतां अशा कंपन्यांकडे जनतेचें अधिक लक्ष आहे. धुळ्यांत कंपन्यांकडे असलेल्या मुदतीचे ठेवींची रकम रु. ३० लाखांचेवर आहे ! अर्थात्, त्यामुळें बँकांकडे मुदती ठेवी आकर्षल्या जात नाहींत.

वस्तुतः इतक्या बँकांना व्यवहार करण्यास या शहरांत वाव नाहीं. परंतु युद्धपरिस्थितीमुळें, मुंबईच्या अडत्यांकडून पुरेसें द्रव्यसहाय मिळत नसल्यानें तूर्त बँकांना थोडेंफार काम मिळत आहे. युद्धोत्तर काळांत हल्लीं असलेल्या व्यवहाराचे ३०% ही प्रमाण राहील कीं नाहीं अशी शंका आहे. त्यावेळींच बँकांची खरी कसोटी लागणार आहे.

---

## विमा कंपनीची पहिल्याच वर्षांतील नमुनेदार प्रगति

### सेंट्रल म्यूच्युअल लाइफ इं. कं. लि.

सेंट्रल म्यूच्युअल लाइफ इं. कंपनीचा ३१।१२।४४ अखेरचा वार्षिक अहवाल वाचला. प्रथम दर्शनींच अहवाल वाचून समाधान वाटतें. त्यांत पुढील गोष्टी पाहाण्याजोग्या आहेत. कंपनीचें पहिलेंच वर्ष असल्यानें, रिन्यूअल प्रिमियमचें उत्पन्न दिसत नाहीं. सर्व खर्च, प्रथम वर्षाच्या हप्त्यांचे ९०%, सिंगल प्रिमियमचें ७%, व ॲन्युइटीच्या रकमेच्या २३/४% एवढ्यांत भागला आहे. एकंदर ६,३२,००० रुपयांच्या बिझिनेसमध्यें सिंगल प्रिमियमचा सुमारें १,३०,००० रु. चा बिझिनेस सोडल्यास, साधारण प्रिमियम हजारीं रु. ४६ पडतो. म्हणजे, छोट्या मुदतीचीं विमापत्रें आणून प्रिमियमची रकम उगाचच फुगविलेली दिसत नाहीं. तसेंच, पहिल्याच वर्षी मूल्यमापन केल्यास प्रथम वर्षाच्या १० टक्क्यांच्या आंतच रिझर्व्ह यावी. पहिल्या वर्षाच्या हप्त्यांचे १०% रकम, ॲन्युइटीची सर्व रकम हीं आयुर्विमानिधींतून वजा टाकतां, बाकी रकम सिंगल प्रिमियमच्या रकमेच्या ९३% हून जास्त आहे. कंपनीच्या खर्चाकडे वळतां डॉक्टरीचा खर्च १,००० रु. विमाधनास रु. ४, दर विमापत्रास रु. ५-१२-० व प्रथम वर्षाच्या हप्त्यांशीं तुलना करता सुमारें १०% इतका पडतो. हा खर्च काटकसरीचा आहे, व विमापत्राची सरासरी रकम वाढल्यास तो आणखी उतरूं शकेल. जागाभाडें, टपालखर्च, प्रवासखर्च, जाहिरात हे खर्च अत्यंत माफक असून अनुकरणीय आहेत. कमिशन खातींच्या रकमाही कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादांच्या पुष्कळच आंत आहेत. ह्याच काटकसरीनें रिन्युअलचें काम चालविल्यास पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटतां येणें शक्य आहे. कंपनीच्या सर्व रकमा सरकारी रोख्यांतच गुंतलेल्या आहेत व सुमारें १२००० रु. बिनव्याजी आहेत. कंपनीनें बँकेचें कर्ज काढून व्याजांतील फरक मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि ही परिस्थिति फार टिकूं शकणार नाहीं. व प्रसंगोपात चांगल्या व्याज देणाऱ्या इन्व्हेस्टमेंट पहाणें जरूर पडेल. ह्यापुढें ३ फार तर ३१/४ दरानेंच मूल्यमापन करणें भाग आहे. परंतु जास्त व्याज मिळविणें केव्हांही इष्ट आहे.

कंपनीची प्रथम वर्षाची प्रगति अभिनंदनीय असून, कंपनीची अशीच काटकसरीची व्यवस्था राहून कंपनीची भरभराट होवो अशी आम्ही आशा करतों. —पु. ग. मराठे.

## दशक पद्धतीचीं नाणीं हिंदुस्थानांत सुरू होणार ?

### हिंदुस्थान सरकारची योजना

हिंदी नाणीं दशक पद्धतीचीं करण्यासंबंधीं एक योजना हिंदुस्थान सरकारच्या फडणविशी खात्यानें आखली आहे व तिचेवर लोकमत व्यक्त व्हावें ह्यासाठी तिच्या प्रती प्रांतिक सरकारें, व्यापारी चेंबर्स, व्यापारी संस्था, शेड्यूल्ड बँका, इत्यादींकडे पाठविण्यांत आल्या आहेत. सिलोनमधील नाण्यांच्या धर्तीवरच नव्या नाण्यांच्या किंमती ठरविल्या जातील. सध्याचा रुपया, अधेली व पावली ह्यांचा आकार, वजन, बनावट इत्यादींत कांहीं फरक होणार नाहीं, परंतु अधेलीस ५० सेंट व पावलीस २५ सेंट असें अनुक्रमें संबोधिलें जाईल. पावलीचे खालील सध्याचीं नाणीं रद्द होऊन त्यांचे जागीं १० सेंट, ५ सेंट, २ सेंट, १ सेंट, ½ सेंट अशा किंमतीचीं नाणीं येतील. सिलोन, मलाया, चीन, इराक, पॅलेस्टाइन इत्यादि देशांनीं नाण्यासाठी दशक पद्धतीचा अवलंब केलेला आहे, परंतु ग्रेट ब्रिटन, हिंदुस्थान इत्यादि ब्रिटिश साम्राज्यांतील देश मात्र जुन्याच कोष्टकांस धरून आहेत. नवीन पद्धतीचें नाण्यांचें कोष्टक व नाणीं सुरू करण्यांत अनेक अडचणी असल्या तरी त्यांपासून होणारे फायदे महत्त्वाचे आहेत. ह्या दृष्टीनेंच हिंदुस्थान सरकारनें सुधारणा सुचविलेली आहे. हिंदुस्थानाप्रमाणेंच मागासलेल्या इतर देशांनीं नाण्यांमध्यें यशस्वी रीतीनें फरक घडवून आणलेला आहे. तेव्हां हिंदुस्थानास तसें करतां येण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं, असें सरकारचें म्हणणें आहे. सध्याचीं व नियोजित नाणीं ह्यांचा तपशील खालीं दिला आहे:—

| सध्याचें नाणें | अनुरूप नियोजित नाणें | सध्याच्या नाण्याची नव्या नाण्यांत किंमत |
|---|---|---|
| १ रु. | १ रु. | १ रु. |
| ½ रु. | ५० सेंट | ५० सेंट |
| ¼ रु. | २५ सेंट | २५ सेंट |
| २ आ. | १० सेंट | १२½ सेंट |
| १ आ. | ५ सेंट | ६¼ सेंट |
| १ पैसा | २ सेंट | १·५६२५ सेंट |
| १ पै | १ सेंट<br>½ सेंट | ०·५२०८ सेंट |

### गोडबोले आणि सन्स, लि.

वरील कंपनीचें खेळतें भांडवल १९४४ अखेर सुमारें ४ लक्ष रुपये झालें. सुमारें ९,२१४ रुपये नफा उरला व भागीदारांस ७% डिव्हिडंड मिळालें. श्री. एन. एस. गोडबोले हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर व चेअरमन आहेत.

### म. गांधींच्या चरित्रग्रंथाचा निव्वळ नफा

महात्मा गांधींच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या चरित्रग्रंथाच्या विक्रींतील निव्वळ नफ्याची २४,००० रुपयांची रकम त्यांस नुकतीच अर्पण करण्यांत आली.

## मुंबई शेअर बाजार

(मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून)

ब्याज-वजा (xd)
फिनले १—५—४५+
इंडि. युना. ३०—५—४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १।५।४५ | बुधवार २।५।४५ | गुरुवार ३।५।४५ | शुक्रवार ४।५।४५ | सोमवार ७।५।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९—८—९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २०२६—४ | २०३८—१२ | २०३०—० | २०१२—८ | २०११—४ |
| ४३५; ३६९ | २३—०—० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३७९—० | ३८१—० | ३७९—० | ३७५—८ | ३७७—० |
| २२०१; १६९५ | ५०—०—०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८१०—० | १८३७—८ | १८३५—० | १८१६—४ | १८१३—१२ |
| ७६५; ५३३ | १६—०—०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९८—० | ६०४—० | ६०३—० | ५९४—८ | ५९५—० |
| ६५३; ४७५ | २२—०—० | मे | स्वदेशी | १०० | ५१५—० | ५१७—० | ५१५—८ | ५०७—० | ५०८—८ |
| ४९८; ३६१ | ६—०—०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ३७१—० | ३७२—० | ३६९—० | ३६४—८ | ३६५—८ |
| ३७७; २६५ | १५—०—० | एप्रिल | फिनले | १०० | २८६—०+ | २८७—० | २८५—० | २८४—८ | २८३—० |
| ३९४; २८२ | ९—०—०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | २८६—० | २८६—८ | २८८—८ | २७१—८ | २८६—० |
| ३०५; २१८ | ४—०—०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६०—८ | २६२—८ | २५८—० | २५३—० | २५७—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ३—१२—० | ३—१२—९ | ३—१२—३ | ३—१२—० | ३—११—० |
| २१-१४; १३-४-६ | ०—१५—० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—३—० | १४—५—० | १४—४—० | १४—३—० | |
| ४-९; २-७ | ०—३—० | मे | „ डिफर्ड्स | १ | २—१५—३ | २—१५—६ | २—१५—० | २—१५—६ | २—१५—३ |
| १२७०; ६३० | ११३—०—० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७१३—१२ | ७१२—८ | ७०५—० | ६९७—८ | |
| २५४; २१६ | ७—०—० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३०—० | २३१—८ | २३१—४ | २३०—० | २३०—८ |
| २५९; २१९ | ९—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१३—८ | २१३—८ | २१२—४ | २१२—८ | २११—० |
| ५७५; ३७६ | ७—८—० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३०—० | ५३८—१२ | ५४५—० | ५५३—१२ | ५५०—० |
| ९३-१२; ७३ | २—०—० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ७७—१ | ७६—१२ | ७६—० | ७६—० | ७६—८ |
| ३८; २९-२ | १—४—० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३३—१ | ३३—३ | ३२—१४ | ३२—१३ | ३२—१४ |
| ८५; ४८ | २—०—० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५०—८ | ५०—४ | ५०—० | ५०—० | ५०—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | १८—६ | १९—० | १८—१० | १८—४ | १८—४ |
| ९०; ६८-१२ | ३—०—० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६६—४ | ६६—४ | ६६—४ | ६६—४ | ६६—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | १००—० | १००—०—६ | १००—०—३ | ९९—१५ | १००—०—० |

दि. ७—५—४५

वर्ग पुस्तकें (ट्रा. बुकें) बंद
इंडिया युना. २०—४—४५ ते १६—५—४५

सोनें ७२—६
चांदी १२५—४
कपास ३९८—१२

3% व्हिक्टरी लोन = रु. ९९—१५—३
3% १९६३—६५ रु. ९८—१४—०
3% १९६६—६८ रु. ९८—४—०

प्रगतिपथावरील नवा

# मै ला चा — द ग ड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

## इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड

३७६ शुक्रवार, पुणें २

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात

दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १-८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

## सांडू हार्टिना

गुणकारी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (माणिक चौक शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते; सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १६ मे १९४५ अंक २०

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

## विविध माहिती

### लारचंद अँड विष्णू

शेअर दलालांची ही एक नवी फर्म पुणें येथें व्यवहार करणार आहे, तिच्या कचेरीचा उद्घाटनसमारंभ ता. १० मे रोजीं २४२३, ईस्ट स्ट्रीट येथें झाला.

### भारत इं. बँकेची जागा खरेदी

भारत इंडस्ट्रिअल बँक लि. नें आपल्या मुख्य कचेरीकरितां ९३१२ व बुधवार ही लक्ष्मी रोडवरील पूना गेस्ट हाउस समोरची जागा ता. १६ एप्रिल रोजीं खरेदी केली. ४०'×९५' एवढ्या आकाराची ती जागा असून तिला ७४,४५१ रुपये किंमत पडली. वरील ठिकाणीं बँकेच्या नांवाची पाटी दिसूं लागली आहे. प्रेसिडेन्सी इं. बँकेची खरेदी केलेली स्वतःचीच " प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग " आहे, महाराष्ट्र बँकेनें विश्राम बाग वाड्यासमोर इमारतीसाठीं जागा १९४३ सालीं सुमारें १ लक्ष, ५ हजार रुपयांस घेऊन ठेवली आहे आणि आतां भारत इं. बँकेनें प्रत्यक्ष लक्ष्मी रोडवर जागा मिळविली आहे.

### लष्करासाठीं जनावरांची कत्तल

१९४० ते ४५ ह्या मुदतींत लष्करी मागणी पुरविण्याकरितां ८,५९,२२० जनावरांची कत्तल करण्यांत आली; १९४२ व १९४३ मध्यें २०,४०,००० मेंढ्या व बकऱ्या ह्याच कारणासाठीं कामास आल्या, अशी माहिती मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सांगण्यांत आली.

### बँक ऑफ फ्रान्सचा डिस्कौंटचा दर

बँक ऑफ फ्रान्सनें आपला डिस्कौंटचा दर १½% इतका उतरवला आहे. नेपोलियननें ती बँक स्थापन केली, तेव्हांपासून दर इतका कमी कधींच झाला नव्हता. बँक ऑफ इंग्लंडचा चालू दर २% आहे. हिंदी रिझर्व्ह बँकेचा दर ३% आहे.

### चलनी सोन्याची किंमत वाढविली नाहीं

खालील पूर्वी प्रसिद्ध झालेल्या बातमीचा इन्कार करण्यांत आला आहे:—

अमेरिकेच्या सेनेटनें सोन्याची किंमत दर औंशी ३५ डॉलर होती ती ५६ डॉलर केली आहे. फेडरल रिझर्व्ह बँकांना आपल्या ठेवी व नोटा ह्यांच्या अनुक्रमें ३५% व ४०% रकम सोन्यांत ठेवावी लागत असे. हें प्रमाण आतां २५% करण्यांत आलें आहे. चलनाच्या वाढत्या विस्ताराच्या सोईसाठी सोन्याचें प्रमाण व किंमत ह्यांत हा फरक केलेला आहे.

### हिटलरच्या मृत्यूबद्दल डी. व्हॅलेराचें शोकप्रदर्शन

हिटलरच्या मृत्यूबद्दल शोकप्रदर्शनार्थ आयर्लंड ( आयरा )चे मुख्य प्रधान, मि. डी. व्हॅलेरा, ह्यांनीं डब्लिनमधील जर्मन वकिलाची मुद्दाम जाऊन भेट घेतली, त्यासंबंधीं ब्रिटिश कॉमन्स सभेंत प्रश्न विचारण्यांत आला. "डी. व्हॅलेराच्या ह्या कृत्याबद्दल सर्व संयुक्त राष्ट्रांत किती त्वेष पसरला आहे, ह्याची जाणीव त्यास स्वतःसच होईल, ब्रिटिश सरकार त्याबद्दल तक्रार नोंदणार नाहीं" असें त्या प्रश्नास उत्तर मिळालें.

## कापडाच्या गिरण्यांस उज्ज्वल भवितव्य

### तूर्त जपानी स्पर्धेची भीति नाहीं

" आजच्या अपेक्षेप्रमाणें, कपास कापडाच्या गिरण्यांस येतीं कांहीं वर्षें तरी चांगलीं जातील, असा विश्वास वाटतो. जपाननें कापड व सूत निर्गत करून हिंदी धंद्याची अगदीं गळचेपी केली होती. तो जपान कित्येक वर्षें ह्यापुढें डोकें वर काढूं शकणार नाहीं. जपान अमेरिकेकडून व इतर देशांकडून टाकाऊ लोखंड इतकीं वर्षें मिळवीत असे. पुरवठ्याचा तो मार्ग बंद झाल्यामुळें जपाननें युद्धोत्तर उत्पादनासाठी राखून ठेवलेली कापड-गिरण्यांची यंत्रसामुग्री मोडून युद्धोपयोगी उत्पादनासाठी धातू म्हणून त्याचा उपयोग केला आहे. हिंदी कापड गिरण्यांनीं आपली सुधारणा घडवून आणली पाहिजे. सरकारी मागणी पुरविण्यासाठी आमचीं झिजलेलीं यंत्रें बदलण्यासाठी शक्य त्या सवलती सरकारनें दिल्या पाहिजेत. एक्सेस प्रॉफिट टॅक्सचे रिफंड आमच्या सोईप्रमाणें आम्हांस परत मिळाले पाहिजेत. बिगर—व्यापारी, परराष्ट्र सरकारप्रणीत स्पर्धेस तोंड देण्याची पाळी आम्हांवर पुनः येणार नाहीं, अशी व्यवस्था झाली पाहिजे. ":—सर व्हिक्टर ससून ( एडवर्ड टेक्स्टाइल्स लि. च्या वार्षिक सभेंत अध्यक्षीय भाषण )

### युरोपांतील अमेरिकन सैनिकांचें स्थलांतर

युरोपांतील युद्धसमाप्तीनंतर तेथील अमेरिकन सैनिक स्वगृहीं नेण्यासाठी ८०० विमानांची योजना केली आहे, त्यांत दरमहा ५०,००० सैनिकांची सोय होईल. सर्व सैनिक हलविण्यास किमान दीड वर्ष लागेल.

### ग्रेट ब्रिटनमधील औद्योगिक वांधे

| | १९४३ | १९४४ |
|---|---|---|
| वांध्यांची संख्या | १,७८५ | २,१८५ |
| त्यांत गुंतलेले कामगार | ५,६०,००० | ८,३०,००० |
| वाया गेलेले कामाचे दिवस | १८,००,००० | ३७,००,००० |


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

( स्थापना १९१८ ) टे. नं. ३१६७५

हेड ऑफिस : सब ऑफिस

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुं. ४ दादर



| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,३७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | ... | रु. १,४६,००० |
| ठेवी ... | ... | रु. ४५,४८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५०,२५,००० |

नवीन शेअरची विक्री चालू आहे सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात.

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन.

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.

# अर्थ

## औद्योगिक विस्तार आणि भांडवलाचा पुरवठा

### स्वतंत्र संस्थांच्या स्थापनेची आवश्यकता

जुन्या हिंदी धंद्यांची सुधारणा आणि विस्तार आणि नव्या धंद्यांची स्थापना हीं यशस्वी होण्यास अनेक गोष्टींची अनुकूलता आवश्यक आहे, त्यांमध्यें स्थायी व चालू भांडवलाचा पुरवठा ही विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. येथें मोठ्या प्रमाणावरील, मध्यम आकाराचे व लहान अशी वर्गवारी धंद्यांमध्यें केली पाहिजे आणि अस्तित्वांत असलेले व नवीन स्थापावयाचे धंदे असाहि भेद करणें जरूर आहे. कित्येक कारखान्यांस मूळचें भांडवल मिळतें आणि तें जमीन, इमारती व यंत्रें ह्यांत गुंतवलें जाऊन धंदा चालवण्यास लागणाऱ्या तात्पुरत्या भांडवलाची वाण त्यांस भासूं लागते. मोठ्या दराच्या व्याजानें ठेवी स्वीकारून धंदेवाले ही चालू भांडवलाची गरज भागवतात आणि व्यापारी बँकांचेंहि सहाय त्यांस मिळूं शकतें. धंद्यांस चालू भांडवल पुरवणें हा सामान्य बँकांचा तर मुख्य व्यवहारच असतो आणि त्यांचें हेंच निश्चित कार्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. खरी अडचण उद्भवते ती यंत्रसामुग्री व इमारती ह्यांचिसारख्या स्थायी स्वरूपाच्या साधनांस लागणारा पैसा उभा करण्याबाबतची असते. कंपन्यांच्या भागांचे विक्रीनें पुरेसें भांडवल उभें राहूं शकत नाहीं. बँकांच्या ठेवी अल्प मुदतीच्या असतात आणि त्यांमधून दिलेलीं कर्जें फिरत्या स्वरूपाचींच असावीं लागतात. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेमध्यें जनतेच्या बचतीमधून उद्भवणारा पैसा उद्योगधंद्यांसाठी लांब मुदतीचें भांडवल म्हणून कोणत्या पद्धतींनीं उभा करावा हा प्रश्न जगांतील सर्व राष्ट्रांपुढें उभा राहिला आहे आणि तो सोडविण्याचा प्रयत्न त्यांमध्यें चालला आहे. हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या दृष्टीनें भांडवलाच्या पुरवठ्याची तरतूद करणें अगत्याचें आहे हें सांगावयास नको.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं प्रस्तुत विषयासंबंधानें मुंबईत कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्सच्या स्थानिक शाखेच्या सभासदांस एका भाषणांत उपयुक्त माहिती दिली आणि कांहीं सूचना केल्या. इतर देशांत भांडवल पुरवठ्याचे कोणते मार्ग अवलंबण्यांत येत आहेत, सामान्य बँकांनीं लांब मुदतीचें भांडवल उद्योगधंद्यांस पुरवण्यांत कसा धोका आहे आणि ह्यासाठी स्वतंत्र संस्था स्थापणें व सरकारनें त्यांस सहाय देणें कसें शक्य व उचित आहे ह्यासंबंधांत त्यांनीं आपले विचार प्रकट केले आहेत, त्यांकडे आम्हीं वाचकांचें लक्ष वेधतों. उद्योगधंद्यांस लांब मुदतीचें भांडवल पुरवण्याची व्यवस्था प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांच्या अधिकारक्षेत्रांत स्वतंत्र संस्थांच्या मार्फत करणें आवश्यक आहे अशी त्यांची मुख्य सूचना आहे आणि तिला व्यावहारिक स्वरूप देण्याचा विचार होणें अगत्याचें आहे. ह्यासंबंधांत इंग्लंडमध्यें कोणत्या योजना अंगिकारण्यांत येत आहेत ह्याची माहिती येथें दिली असतां ती विचारप्रवर्तक होईल.

विशेषतः लहान आकाराच्या धंद्यांस भांडवल उपलब्ध करून देणें आणि तें लांब मुदतीच्या करारानें पुरवणें ह्यासाठी एक, आणि असेंच भांडवल विशिष्ट मोठ्या प्रमाणावरील धंद्यांस देणें ह्याकरितां एक, अशा दोन निरनिराळ्या संस्था इंग्लंडमध्यें स्थापण्यांत येत आहेत. शेअर बाजार आणि व्यापारी बँका ह्यांचेमार्फत ज्यांस लांब मुदतीचें भांडवल मिळूं शकत नाहीं अशा धंद्यांची पैशाची गरज भागवणें हा ह्या दुहेरी योजनेचा उद्देश असून हिंदुस्थानांत तिचा काळजीपूर्वक परामर्श घेतला गेला पाहिजे. वरील दुसऱ्या प्रकारच्या संस्थेस " फिनॅन्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री " असें नांव देण्यांत आलें आहे. तिचें भांडवल सुमारें २२ कोटि रुपये असेल आणि त्यांत अनेक विमा मंडळ्या, ट्रस्ट कंपन्या व बँक ऑफ इंग्लंड ह्यांची ठराविक प्रमाणांत भागीदारी राहील. सुमारें १३५ कोटि रुपयांपर्यंत बाहेरून पैसा कर्जाऊ घेण्याचा अधिकार ह्या कॉर्पोरेशनला राहील आणि ही रकम तिला व्यापारी बँकांकडून ठेवींच्या स्वरूपांत मिळेल. कॉर्पोरेशन स्वतः कोणताहि धंदा काढणार नाहीं आणि तिचा कारभार भागीदारांनीं निवडलेल्या बोर्डाचे हातीं राहील. लहान व मध्यम आकाराच्या, वर निर्दिष्ट केलेल्या भांडवल पुरवठ्याच्या संस्थेचें नांव " इंडस्ट्रिअल अँड कमर्शल फिनॅन्स कॉर्पोरेशन " असें आहे. तिचें भांडवल २० कोटि रुपयांचें आहे आणि त्याचे भाग व्यापारी बँकांमध्यें वाटून दिले जातील. ही संस्था स्वतः मामुली बँकिंगचे व्यवहार करणार नाहीं. बाहेरचें ४० कोटि रुपयांपर्यंत रकमेचें भांडवल तिला उभारतां येईल.

आर्थिक पुनर्रचनेंत कोणत्याहि धंद्यांस भांडवलाची वाण भासूं नये अशा हेतूनें वरील व्यवस्था करण्यांत आली आहे. व्यापारी बँकांनीं ह्या दोन नवीन कॉर्पोरेशन्सचें स्वागत केलें आहे, ह्यावरून त्यांच्या स्थापनेची आवश्यकता सर्वमान्य झाली आहे हें स्पष्ट होतें. ब्रिटिश सरकार व बँक ऑफ इंग्लंड ह्यांचा त्यास पाठिंबा आहेच. स्वतःच्या व्यवहारांत नवीन कॉर्पोरेशन्सची स्पर्धा जाणवेल असें व्यापारी बँकांस वाटत नाहीं. त्याचप्रमाणें लांब मुदतीच्या कर्जांत आपणांस पैसा गुंतवावा लागेल, त्याचें प्रमाण इतकें अल्प असेल कीं त्या योगानें आपल्या मामुली परिस्थितीवर कांहीं अनिष्ट परिणाम होण्याचीहि भीति त्यास वाटत नाहीं, अशा आशयाचे उद्गार प्रमुख ब्रिटिश बँकांच्या अध्यक्षांनीं प्रकट रीतीनें काढलेहि आहेत. उदाहरणार्थ, लॉइड्स बँकेचे लॉर्ड वॉर्डिंग्टन ह्यांनीं औद्योगिक पुनर्घटनेच्या कार्यांत लांब मुदतीचें भांडवल स्वतंत्र रीतीनें पुरवलें जाण्याचें महत्त्व प्रतिपादलें आहे. मात्र ह्या भांडवल पुरवठा करणाऱ्या मंडळ्यांचें यश त्यांच्या व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर व चोखपणावर अवलंबून राहील असें त्यांनीं म्हटलें आहे तें ध्यानांत बाळगण्यासारखें आहे. आमच्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामणराव ह्यांनीं प्रस्तुत महत्त्वाच्या विषयाकडे सरकार, धंदेवाले व बँका ह्यांचें लक्ष वेळींच वेधलें आहे ह्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

### सैनिकांच्या रेशनमध्यें काट

युरोपांतील जे अमेरिकन सैनिक प्रत्यक्ष लढाईत गुंतले नसतील अशांच्या रेशनमध्यें १०% काट करण्यांत आला आहे. अन्नपुरवठ्याची जागतिक परिस्थिति अत्यंत बिकट झाली आहे, त्याचा हा परिणाम आहे. रेशन कमी केलें तरी तें पुरेसें आहे असें युरोपिअन रणक्षेत्राच्या मुख्य सर्जनचें मत आहे.

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक अर्थ यांसी—

सा. न. वि. वि.

सर्वव्यापी युद्ध चालू असतांना केव्हां कशाला महत्त्व येईल हें सांगतां येत नाहीं हेंच खरें. आज कापड-प्रश्न सर्वांपुढें आहे. हैदरी मिशनच्या ब्रिटनमधील कामगिरीबाबत सरकारनें प्रसिद्ध केलेल्या पत्रकांतहि कापडाबाबत माहिती जरा विस्तारानें दिली आहे; इतर गोष्टींचा फक्त उल्लेख करण्यांत आला आहे.

कापडाबाबत वर्तमानपत्रांत येणारी माहिती नि भाषणें मी वाचतों. त्यावरून असें दिसतें कीं आजच्या कठीण परिस्थितीची कबुली सर्वजण देतात; जबाबदारी मात्र आपल्यापेक्षां इतरांचीच अधिक, असा मानव-सुलभ कोटिवाद करतात. याचा एक असा फायदा होतो कीं, वादावादींतील सुवर्णमध्य काढल्यास सत्य परिस्थितीची कल्पना येण्यास मदत होते. माझा आजचा प्रयत्न असाच आहे.

कापड-प्रश्नाचें स्वरूप त्रिविध आहे. कापड-उत्पादन; कापड-किंमत नि कापड-वाटप. म्हणजेच हा प्रश्न गिरणी मालक, मजूर-गिऱ्हाईक नि व्यापारी यांचा आहे. गिरण्यांचे संसार सुरळीत चालण्याकरितां लागणारा बहुतेक सारा माल-मसाला सरकारनें नियंत्रित केला असल्यानें आज सरकारला गिरणी-मालकाचे हक्क प्राप्त झाले आहेत. गिरण्यांत तयार होणाऱ्या ४८,००० लक्ष वारांपैकीं १५,००० लक्ष वार कापड लष्कर व निर्गत यांकरितां सरकार घेत असल्यानें सरकार गिऱ्हाईकहि आहे. तयार सूत व कापड नियंत्रित करून त्याचें वाटप करण्याची जबाबदारी घेतल्यामुळें सरकार व्यापारीहि बनलें आहे. यामुळें गिरणी मालक, मजूर, सामान्य जनता नि व्यापारी यांना देण्यांत येणाऱ्या श्रेयाचें नि अपयशाचे धनी त्यांच्याबरोबरच सरकारहि आहे हें उघड आहे.

गिरणी मालकांनीं आपल्या अडचणी मांडल्या; युद्धाच्या पर्वणींत अ-कल्पित नफा मिळवल्याचें कबूल केलें. तथापि २० पासून ५०-७५ वर्षांची जुनी यंत्रसामुग्री काढून टाकून त्या जागीं अद्यावत् नवीन आणण्याची त्यांनीं काय व्यवस्था केली याबाबत अधिकृत खुलासा मिळत नाहीं. हैदरी मिशननें हें न केलेलें कार्य ब्रिटन-अमेरिकेला लवकरच जाणाऱ्या हिंदी उद्योगपतींनीं करावयाचें असेल कदाचित्. युद्धोत्तर जागतिक चढाओढींत आमच्या गिरण्या टिकावयाच्या कशा ?—आहे या परिस्थितींत जास्तीत-जास्त उत्पादन कसें होईल याचा विचार करण्याकरितां टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाची श्रीमंत गिरणी मालक सभासद असलेली एक उप-समिति आहे. वास्तविक पाहातां हें काम तज्ज्ञांचें आहे; म्हणूनच कीं काय त्यांचा एकहि प्रतिनिधि समितीवर नाहीं ! तीच गोष्ट कापडाची किंमत ठरविण्याबाबत आहे. कापड खरेदी करणाऱ्या गिऱ्हाईकांचा एकहि प्रतिनिधि त्या समितीवर नाहीं. विश्वास दिल्या-घेतल्यानें वाढतो हें आम्हाला कळतें पण वळत नाहीं असाच याचा अर्थ नाहीं कां ? या वृत्तीत हिंदी कापड-धंद्याची भवितव्यता सांठवलेली आहे असेंच मला वाटतें !! 'उपयुक्त कापड' बनविण्याची योजना जाहीर करतांना गिरणी मालकांचीं जीं भाषणें झालीं त्यांवरून वर्षा-दोन वर्षांपूर्वी काढण्यांत आलेल्या स्टँडर्ड कापडाची आठवण झाल्याखेरीज राहात नाहीं.

न्यायमूर्ति द्विवेदा यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या कमेटीनें हिंदी कापड-कामगारांबाबत आपलें पुढील मत नोंदविलें आहे, "मालक व कामगार यांच्यांत सहकार असेल, त्यांची योग्य काळजी घेण्यांत आली अन् त्याला योग्य शिक्षण दिलें तर त्यांची कार्यक्षमता औद्योगिक क्षेत्रांत पुढारलेल्या कोणत्याहि देशांतील कामगाराबरोबरीनें आहे."

सरकारी वाटप-पद्धतींतील गोंधळ मोठ्या गिरण्यांना जाणवतोच; पण त्याहीपेक्षां लहान कारखानदार व हातावर पोट असलेल्या हातमागावर काम करणाऱ्यांना विशेष तीव्रतेनें भोंवतो. केवळ कोळशामुळें गेल्या तीन महिन्यांत १,००० लक्ष वार गिरणी-कापड-उत्पादन कमी झाल्याचें शेठ कृष्णराज ठाकरसी यांनीं सांगितलें.

खिशांत पैसे आहेत म्हणून भरमसाट कापड खरेदी करणाऱ्या मंडळी विरुद्ध सर अकबर हैदरी यांनीं जोरदार तक्रार केली आहे. ४० कोटींपैकीं किती लोकांजवळ असे पैसे आहेत व ते असें कां करतात असाहि प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. साठेबाज व नफेबाज यांचेकडे न जातां व्यवहार चालण्याची परिस्थिति सरकारनें निर्माण केली आहे कां ? असें करण्यांत व्यक्तिगत फायद्यापेक्षा तोटाच जास्त होतो अशी खात्री पटण्यासारखी स्थिति आहे कां ? सरळ मार्गांनीं गरज भागविण्याचे मार्ग जेव्हां खुंटतात तेव्हांच मनुष्य काळ्या बाजाराकडे वळतो.

युद्धकार्यांत सारी उत्पादन शक्ति केंद्रीभूत करण्यांत आली असून कळी-विमानांनीं संत्रस्त झालेलें ब्रिटन आज युद्धाच्या सहाव्या वर्षांत लढाई देत आहे. खुद्द ब्रिटनमध्यें कामगार-शक्ति कमी पडत आहे; कापड रेशनमध्यें आणखी कपात करण्यांत आली आहे असें असूनहि कापड-दुष्काळ-निवारणार्थ प्रतिवर्षी किमान ६,००० लक्ष वार कापड हिंदुस्थानला पाठविण्याची तयारी त्यानें दाखविली आहे. हा त्याग स्पृहणीय तर खराच पण आपल्या अगतिक असहाय्यतेवर विदारक प्रकाश पाडणाराहि आहे !

—संजय


**आम्ही नाहीं, आपणच!** सह्याद्रीनें १९४४ सालीं केलेली प्रगति ही आपल्याच विश्वासाचें प्रतीक असल्यानें या प्रगतीच्या श्रेयाचे भागीदार आपणच आहांत; आम्ही नाहीं.

आलेलें काम—३१,१८,९३८

मंजूर काम —२८,२२,७६९

पूर्ण काम —२५,१४,९२३

आयुष्यावरील विमा याच कंपनींत उतरून आपल्या आर्थिक सुखांत भर घाला. भरपूर कमिशनवर एजन्सी दिली जाते.

सह्याद्रि विमा कंपनी, लि. नासिक.

गो. ग. सौंदणकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### युरोपियन युद्ध संपलें–आतां पुढली व्यवस्था

जर्मनी बिनशर्त शरण आल्यावांचून आम्हीं शस्त्र खाली ठेवणार नाहीं किंवा युद्धतहकुबीची भाषा ऐकणार नाहीं असा मित्र राष्ट्रांनीं केलेला संकल्प अक्षरशः पुरा झाला आहे. जर्मन सैन्य व आरमार सपशेल शरण आलें असून त्या राष्ट्रांनीं जर्मनीचा ताबा घेतला आहे. जर्मनीनें व्यापलेले देश मुक्त व स्वतंत्र झाले आहेत आणि आतां त्यांमध्यें स्थिरस्थावर करण्याच्या प्रयत्नांस प्रारंभ झाला आहे. पांच वर्षें चाललेल्या लढाया आणि जर्मनांनीं केलेला जुलूम ह्यांचे योगानें युरोपियन देशांत एवढी हानि झाली आहे आणि एवढा गोंधळ माजला आहे कीं त्यांतील लोकांच्या सार्वजनिक व कौटुंबिक जीवनाची घडी पुनः नीट बसवणें मोठ्या प्रयासाचें काम आहे. ती बसेपर्यंत सदरहु लोकांस अन्नवस्त्राचा पुरवठा करण्याची जबाबदारी मित्र राष्ट्रांस पुरी पाडली पाहिजे आणि त्यांच्या राष्ट्रीय व आर्थिक पुनर्घटनेस सहाय केलें पाहिजे. प्रत्यक्ष जर्मनींतला गोंधळ नाहींसा करून तेथील राज्यकारभार व आर्थिक जीवन ह्यांची व्यवस्था लावण्याचें काम विशेष अवघड आहे. जर्मन युद्ध गुन्हेगारांस शासन करून नात्सी हुकूमशाहीनें रूढ केलेल्या कल्पना आणि स्थापलेल्या संस्था समूळ उखडून टाकणें हें कार्यहि तात्काळ हातीं घेतलें गेलें पाहिजे. त्यास प्रारंभ झाला असून तूर्त लष्करी अमलाखालीं त्या संबंधांतील नियंत्रणें जाहीर झालीं आहेत व होत आहेत. ह्या सर्व कार्यक्रमाचे बाबतींत इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांचें धोरण एकसूत्री असणें अगत्याचें आहे. त्या विषयीं उपस्थित होणारे वाद मुळांतच मिटवले पाहिजेत. पोलंडच्या बाबतींत सारखे वांधे उत्पन्न होणें इष्ट नव्हे. त्याचे योगानें पुढील विधायक रचनात्मक जागतिक व्यवस्थेविषयीं जगांत साशंकता उत्पन्न होते, तिला जागा मिळतां कामा नये.

### जर्मनी संपला, आतां जपान

सर्व मित्रराष्ट्रांमध्यें युरोपिअन युद्धाच्या समाप्तीबाबत विजयोत्सव साजरे झाले आणि धन्यवादात्मक प्रार्थना झाल्या. निरनिराळ्या समरांगणांवर हिंदी सैनिकांनीं अभिमानास्पद मर्दुमकी गाजवली आहे आणि इटली व जर्मनी ह्यांच्या पराभवांत स्वतःचा भाग कार्यक्षमतेनें उचलला आहे, ह्याचे योगानें हिंदुस्थानांतील विजयोत्सवास विशेष औचित्य प्राप्त झालें आहे. तथापि, जर्मनीसारखाच जपानचा निकाल लागल्यावांचून मित्रराष्ट्रांचें कार्य पुरें होऊं शकत नाहीं ह्याची जाणीव ह्या विजयोत्सवाचे प्रसंगीं जागृत ठेवणें आवश्यक आहे आणि ह्या पूर्व एशियांतील युद्धाशीं हिंदुस्थानचा निकट संबंधहि आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. युरोपांतील विजयास अनुलक्षून लंडनमध्यें नभोवाणीवरून केलेल्या आपल्या भाषणांत मि. चर्चिल ह्यांनीं जपानी युद्धावर इंग्लंडनें आपलें शक्तिसर्वस्व एकवटण्याच्या अगत्यावर जोर दिला. युरोपमध्यें खरीखुरी लोकशाही स्थापण्याविषयीं जागरूकतेनें काळजी घेणें, सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेंत जागतिक शांतता भरभक्कम पायावर उभी राहील अशी आंतरराष्ट्रीय घटना बनवणें आणि जपानचा पुरा पाडाव करणें अशी त्रिविध कामगिरी त्यांनीं लोकांपुढें मांडली आणि तिला ब्रिटिश जनतेनें स्वार्थत्यागपूर्वक पाठिंबा द्यावा अशी मागणी केली. अमेरिकेस पॅसिफिक महासागरांत जपानविरुद्ध भरपूर सहाय देणें आपलें कर्तव्य आहे आणि ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ह्यांच्या सुरक्षिततेसाठीहि त्याची आवश्यकता आहे असें ते म्हणाले. युरोपिअन रणक्षेत्रांतून मोकळें झालेलें अमेरिकन व ब्रिटिश सैन्य आणि आरमार व लढाऊ सामुग्रीचा ओघ आतां पूर्व एशियाकडे जपानच्या समाचारासाठी वळत आहे.

### महाराष्ट्र उत्कर्ष मंडळ

मुंबई शहरांत महाराष्ट्रीय बहुसंख्य आहेत, पण तेथील सामजिक, नागरिक, आर्थिक, व्यावसायिक व व्यावहारिक क्षेत्रांत योग्य मानाचें स्थान त्यांस नाहीं ही विस्मयजनक गोष्ट आहे ह्यांत शंका नाहीं. बाहेरून आलेल्या महाराष्ट्रीयेतर जमातींनीं, त्या अल्पसंख्याक असतांनाहि व्यापार, उद्योगधंदे इत्यादि संपत्त्युत्पादनाचीं प्रमुख साधनें आत्मसात केलीं असून सामाजिक पुढारीपण पटकावलें आहे. महाराष्ट्रीयांच्या ह्या अवनतीचीं कारणें शोधून काढून तीं दूर करण्याच्या हेतूनें "महाराष्ट्र उत्कर्ष मंडळ" ह्या नांवाची संस्था स्थापन झाली आहे आणि तिनें संघटनाच्या विधायक कार्यास प्रारंभ केला आहे. स्वजातीयांच्या उन्नतीचा प्रयत्न करणाऱ्या निरनिराळ्या अनेक संस्था मुंबईमध्यें आहेत. त्यांचें परस्पर सहकार्य घडवून आणण्याच्या उद्देशानें गेल्या वर्षीं एक मोठें संमेलन भरविण्यांत आलें होतें. त्याचा वृत्तांत आणि महाराष्ट्र उत्कर्ष मंडळाची माहिती हीं प्रसिद्ध झालीं आहेत. ( मुंबईंतील महाराष्ट्रीय ज्ञाति संस्थांचा संमेलन वृत्तांत; महाराष्ट्रीय उत्कर्ष मंडळ, ४०, पिकेट रोड, मुंबई २ ). मंडळाचे उत्साही चालक व निरलस कार्यकर्ते श्री. काकासाहेब सप्रे आणि डॉ. बाबासाहेब जयकर ह्यांचीं संमेलनप्रसंगीं झालेलीं भाषणें स्फूर्तिदायक व मार्गदर्शक आहेत. सहकार्य, संघटन, शिक्षण व शिस्त इत्यादि मार्गांनीं महाराष्ट्रीयांची सर्वांगीण उन्नति घडवून आणून हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रगतीस सहाय करणें हा उत्कर्ष मंडळाचा हेतु आहे, त्यास उत्तरोत्तर यश येवो असें आम्ही इच्छितों.

### पंधरा नवे तालुके

अन्नपुरवठा आणि युद्धोत्तर पुनर्घटना ह्यांच्या सोईसाठी व कांहीं मोठ्या तालुक्यांचा आकार कमी करण्यासाठी मुंबई सरकार कांहीं जिल्ह्यांची विभागणी सुधारणार आहे. १ ऑगस्टपासून ही सुधारणा अंमलांत येईल. १५ महालांचे तालुके बनतील व त्यांपैकी दोघांस शेजारच्या तालुक्यांतील खेडेगांवांची जोड दिली जाईल. कुलाबा जिल्ह्यांत खालापूर तालुका हा नव्यानेंच निर्माण केला जाईल. कर्जत तालुक्यांतील १०४ खेडीं पेण तालुक्यांतील ३७ खेडीं व पनवेल तालुक्यांतील ११ खेडीं, त्या तालुक्याकडे वर्ग केलीं जातील. पुणें जिल्ह्यांतील नवे तालुके दौंड, शिरूर व आंबेगांव हे आहेत. चांदोर ( नाशिक ), कर्जत ( अहमदनगर ), माण ( सातारा ) व नवापूर ( प. खानदेश ) हे मध्य विभागांतील नवे तालुके होतील. नव्या आंबेगांव तालुक्यास खेड तालुक्यांतील १८ व जुन्नर तालुक्यांतील १७ खेडीं मिळतील. त्याचप्रमाणें नंदुरबार तालुका आपलीं २८ खेडीं नवापूर तालुक्यास देणार आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

सांडू
टोमॅटो
कम्पाऊन्ड
(ए. बी. सी. व्हिटॅमिनयुक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

अहमदनगर विक्रेते :
मे. देशमुख आणि कं.
नवी पेठ.

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व श्रूसबरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप
'शुद्ध निलगिरी तेल.'
नोगी आणि कं. मुंबई ४

## हिंदी शेड्यूल्ड बँकांची प्रगति

### ( १ )

शेड्यूल्ड बँकांची संख्या

| | ३१-३ ४४ | ३०-९-४४ | ३१-३-४५ |
|---|---|---|---|
| एक्सचेंज बँका | १६ | १६ | १६ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ६२ | ६८ | ७२ |

### ( २ )

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | ३१-१२ ४३ | ३१-१२-४४ |
|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३९८ | ४२० |
| पांच प्रमुख बँका | ३५७ | ५६३ |
| एक्सचेंज बँका | ८५ | ८० |
| इतर शेड्यूल्ड बँका | ९४५ | १,३८० |
| | १,८८५ | २,४४३ |

### ( ३ )

शेड्यूल्ड बँकांचें येणें-देणें

( आकडे कोटि रुपयांचे )

| | २९-१२-४४ | ३०-३-४५ |
|---|---|---|
| माहिती पुरविणाऱ्या शेड्यूल्ड बँका | ८४ | ८५ |
| हिंदुस्थानांतील एकूण देणें | ८३९ | ८१७ |
| रोख व रिझर्व्ह बँकेंत शिल्लक | १०६ | ११५ |
| कर्जे. बिल डिस्कौंटिंग | २४९ | २९७ |
| कायद्याच्या जरूरीपेक्षा जास्त ठेवलेली रिझर्व्ह बँकेंतील शिल्लक | ३९ | ५२ |

## कपाशीच्या लागवडीचा सरकारी अंदाज

तुलनात्मक आकडे

| प्रांत व संस्थानें | एकर ( हजार ) | |
|---|---|---|
| | १९४३-४४ | १९४४-४५ |
| मुंबई | २,६६६ | १,४२१ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ३,०५२ | २,८५९ |
| पंजाब | २,६४० | २,८०९ |
| हैद्राबाद | ३,२७९ | १,३२५ |
| एकूण ( सर्व हिंदुस्थान ) | १५,१४२ | ११,५६० |

मुंबई प्रांतानें कपाशीच्या लागवडीमध्यें एका वर्षांत ४७% घट केली आहे, असें वरील तक्त्यावरून स्पष्ट होतें. मध्यप्रांत-वऱ्हाड फक्त ६% च घट करूं शकला.

### महाराष्ट्र बँकेचें बॅडमिंटन कोर्ट

बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या नोकरवर्गाच्या खेळाच्या सोईसाठी, बँकेने खरेदी केलेल्या नव्या जागेंत एक बॅडमिंटन कोर्ट तयार करण्यांत आलें आहे. त्याचा उद्घाटन समारंभ सोमवार, ता. १४ रोजीं सकाळीं अध्यक्ष, श्री. धोंडूमामा साठे, ह्यांचे हस्तें झाला. बँकेचे एक डायरेक्टर, श्री. एम्. आर. जोशी, ह्यांनीं स्वतःच्या खर्चानें हें कोर्ट तयार करून दिलें आहे.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd ) इंडि. युना. ३०-५-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. ८।५।४५ | बुधवार ९।५।४५ | गुरुवार १०।५।४५ | शुक्रवार ११।५।४५ | सोमवार १४।५।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| -२३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स् | ३० | २०११-४ | विजयदिनाची सुटी | विजयदिनाची सुटी | २०५७-८ | विजयदिनाची सुटी |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३७७-० | | | ३८६-८ | |
| -२२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८३३-१२ | | | १८३२-८ | |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०२-५ | | | ६०१-८ | |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५१५-८ | | | ५१५-० | |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३६८-० | | | ३६९-८ | |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८३-८ | | | २८६-० | |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २८८-८ | | | २९०-८ | |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६२-८ | | | २६७-८ | |
| -५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-११-० | | | ३-१३-० | |
| -२१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-२-० | | | १४-४-० | |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स् | १ | २-१५-६ | | | ३-०-० | |
| -१२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९५-० | | | ७०१-४ | |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३४-४ | | | २३५-० | |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१४-० | | | २१४-० | |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५०-० | | | ५५०-० | |
| -९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ७६-८ | | | ७६-४ | |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३३-६ | | | ३४-२ | |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ४९-० | | | ४९-० | |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | १८-४ | | | १८-८ | |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६६-४ | | | ६६-४ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १००-०-६ | | | १००-१-० | |

वर्गं पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद

इंडिया युना. २०-४-४५ ते १६-५-४५

## साखर अधिक कशी खपेल ?

अमेरिकेंत नुकतेंच एक साखर संशोधन केंद्र स्थापण्यांत आलें आहे. खुद्द संयुक्त संस्थानांतील सात-आठ मोठे कारखानदार, हवाई व प्युर्टो रिको येथील सर्व साखर कारखानदार यांचा या योजनेस पाठिंबा आहे. शिवाय क्यूबामधील कारखानदारांचा सहकार या केंद्रास मिळणार आहे ( जगांत सर्वांत अधिक साखर क्यूबांत होते ). हें संशोधन मॅसेच्युसेटस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथें करण्यांत येणार आहे.

केंद्राचें काम फक्त संशोधनात्मक राहील. कोठल्याहि तऱ्हेचा प्रचार, जकाती, कारखानदारी, व्यापार वा खप यासंबंधींचे प्रश्न इ. पासून केंद्र अलिप्त राहील.

केंद्राच्या कामाचे स्थूलमानानें दोन मुख्य विभाग राहतील. ( १ ) साखर व तत्सम इतर पदार्थ यांचा खाद्य पदार्थांत उपयोग व ( २ ) या पदार्थांचे उद्योगधंद्यांतील उपयोग.

( १ ) साखर शरीरप्रकृतीस विशेष चांगली नाहीं अशा तऱ्हेचा प्रचार कांहीं शास्त्रज्ञांच्या कार्यावरून नकळत झाला आहे, तेव्हां साखरेचा शरीरावर खरोखरीच काय परिणाम होतो हें बघावयाचें आहे. शिवाय, साखरेंत जीवनसत्त्वें ( व्हिटॅमिन्स ) घालून ती अधिक उपयोगी होईल काय हें ठरवावयाचें आहे.

( २ ) अमेरिकेंत आतांच दर माणशीं १०० पौंड साखर दरवर्षी खपते. हा खप आणखी वाढवणें शक्य आहे काय याबद्दल बरीच शंका आहे. तेव्हां साखर आणखी खपावयाची असेल तर तिचा खाण्याशिवाय इतर कांहीं तरी मार्गानेंसुद्धा उपयोग झाला पाहिजे. तेव्हां साखरेचा "कच्चा माल" म्हणून उपयोग होईल असे कोणते धंदे तयार होणें शक्य आहे यासंबंधीं केंद्र संशोधन करील.

भूतलावरील वनस्पतींतील पाणी वगळल्यास त्यांच्या उरलेल्या भागांतील तीन चतुर्थांशाहून अधिक अंश कार्बोहायड्रेट या सदराखालीं येतो. यांत सेल्युलोज, स्टार्च व साखर यांचा समावेश होतो. स्टार्चचा खाण्याकडे व सेल्युलोजचा लेण्याकडे मुख्यत: उपयोग होत असला तरी त्या पदार्थांस हल्ली इतर धंद्यांतहि बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. साखरेचा असाच अधिक उपयोग होण्याजोगा आहे आणि त्यामुळें लवकरच जगांत "कार्बोहायड्रेट युग" येईल असा केंद्राच्या शास्त्रज्ञांस विश्वास वाटतो.

—श्री. चिं. काळे

### सिमेंटच्या उत्पादनांत वाढ

हिंदुस्थानांतील सिमेंटचें उत्पादन दुप्पट व्हावें, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकार योजना आखीत आहे. असोसिएटेड सिमेंट कंपनीज व डालमिया ह्यांनीं १७,५०,००० टन आणखी सिमेंट करण्याच्या योजना तयार केल्या आहेत व यंत्रसामुग्री हातीं येतांच उत्पादनास प्रारंभ करण्याची त्यांची तयारी आहे. जामनगर संस्थानांत १,००,००० टनांच्या उत्पादनाची योजना पुरी झाली आहे. इतकें झालें, तरी आणखी ११,३५,००० टनांच्या उत्पादनाची व्यवस्था होणें आवश्यक आहे. सिमेंटचे कारखाने एकाच विभागांत एकत्रित न होतां ते ठिकठिकाणीं स्थापन व्हावे व त्यांची मालकीहि मूठभर हातांतच राहूं नये अशी सरकारची इच्छा आहे.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी मळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून
अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
महाराष्ट्र भुवन
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालक:—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

—त्वरा करा—
ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.
भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.
पत्ता:—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

जीर्ण व हटवादी हिवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
पायरोनिल
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्युटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

EVERYTHING IN RUBBER GOODS
● Hospital Requirements ● Cab Tyres
● Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
● Rubber Rollers for Textile Mills
● Ebonite Sheets & Rods etc.
The Western India Manufacturers' Agency, Ltd.,
Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

हें पत्र पुणें, पेठ मांगुडा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांगुडा, घ. नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २३ मे १९४५ अंक २१

## —: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व शूगरक्रीम

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

जीर्ण व हटवादी हिंवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
**पायरोनिल**
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

**EVERYTHING IN RUBBER GOODS**

- Hospital Requirements ● Cab Tyres
- Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd.,
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"







व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब




नोगी आणि कं. मुंबई ४

## विविध माहिती

### ऑस्टिन मोटरगाड्या येणार

प्रत्येकीं सुमारें ६,१०० रुपये किंमतीच्या, १० अश्वशक्तीच्या कांहीं ऑस्टिन मोटारी जून अखेर हिंदुस्थानांत उतरतील. आवश्यक युद्ध किंवा नागरी कार्य करणारांस त्या मिळूं शकतील. त्यांनीं ३१ मे पूर्वी प्रांतिक मोटार ट्रॅन्सपोर्ट कंट्रोलर, मुंबई ह्या पत्त्यावर अर्ज करावा.

### १५ दिवस अगोदर रिझर्व्हेशन

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेवरील आगगाड्यांतील जागांचें रिझर्व्हेशन प्रवासाच्या १५ दिवस अगोदर आतां होऊं शकेल.

### औषधें आलीं; व्यापाऱ्यांस चिंता

हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेंतून सर्व प्रकारच्या औषधांची मोठ्या प्रमाणावर आयात केली आहे. कांहीं औषधांचा बाजारांत मोठा पुरवठा झाला आहे, त्यामुळें औषधाच्या कांहीं व्यापाऱ्यांचें बरेंच नुकसान झालें आहे.

### मोहन–जो–दारो येथील अवशेषांचें स्थलांतर

दिल्ली येथें स्थापन व्हावयाच्या अखिल भारतीय म्यूझियममध्यें मोहन-जो-दारो येथील अवशेष नेऊन मांडण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे, त्यास सिंध सरकारचा विरोध आहे.

### हिंदुस्थान सरकारचीं कर्जें

२८ एप्रिल, १९४५ अखेरच्या तिमाहींत हिंदुस्थान सरकारचीं ८३,००,००,००० रुपयांचीं कर्जें खपलीं. त्यांचा तपशील खाली दिला आहे:—

| | रुपये |
|---|---|
| ३% १९५७ व्हिक्टरी लोन | १८,९५,००,००० |
| ३% १९५९–६१ „ | ११,५०,००,००० |
| ३% पहिलें डेव्हलपमेंट लोन | २७,००,००,००० |
| इतर कर्जें | २६,५०,००,००० |

### इजिप्तच्या इंग्लंडमधील येण्याची वसुली

इजिप्तचें ग्रेट ब्रिटनमध्यें ३० कोटि पौंड येणें साठलें आहे. त्याच्या फेडीसंबंधीं त्या देशांमध्यें करार झालेला नाहीं, परंतु यंत्रसामुग्री व पक्का माल पाठवून कर्ज फेडण्याचा ग्रेट ब्रिटनचा विचार आहे, असें इजिप्तच्या फडणवीसांनीं सांगितलें.

### बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें.

वरील कॉलेजांतून इंटर कॉमर्स परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांपैकीं एकूण ८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांपैकीं पहिल्या वर्गांत २, दुसऱ्या वर्गांत ३० व तिसऱ्या वर्गांत ५४ आले. निकाल ५५% लागला. विश्वविद्यालयाचा निकाल ५१% आहे. कॉलेजचा विद्यार्थी, श्री. विमलचंद्र वालजीभाई देसाई, हा सबंध विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांत पहिला आला व त्यास कॉमर्स विषयाची सर जेम्स बेग्बी शिष्यवृत्तिहि मिळाली. नव्यानेंच स्थापन झालेल्या ह्या कॉलेजाचें यश अभिनंदनीय आहे.

### स्टँडर्ड क्लॉथ

अडीच वर्षांपूर्वी सरकारनें स्टँडर्ड क्लॉथची योजना सुरू केली तेव्हांपासून आतांपर्यंत १०० कोटि वार कापड वेगवेगळ्या प्रांतांत व संस्थानांत वाटून झालें आहे. ह्या कापडास वाढत्या प्रमाणावर मागणी येत आहे व स्टँडर्ड क्लॉथच्या तऱ्हांची संख्याहि वाढत आहे. आतांपर्यंत गिरण्यांना ११३ कोटि वार कापडाचें उत्पादन करण्यास सांगण्यांत आलें. ७५ कोटि वार कापडाची प्रत्यक्ष विक्री झाली आहे.

### म्हैसूरमध्यें रेडिओ सेट्स तयार होणार

म्हैसूर सरकार आणि इंग्लंडमधील रेडिओ व वीज कंपन्यांच्या फिल्को गटाचे चेअरमन मि. लॉरेन्स बेनेट ह्यांचेमध्यें चालू असलेलीं बोलणीं संपलीं असून, बंगलोर येथें रेडिओच्या उत्पादनाचा कारखाना येत्या नोव्हेंबरमध्यें निघण्यांत त्याचा शेवट होणार आहे.


## शिक्षक पाहिजेत.

आमच्या हायस्कूलकरता इंग्रजी १ ते ३ इयत्ता अखेर शिक्षण देणेंकरतां पुरुष अगर स्त्री शिक्षक पाहिजेत. पगारांच्या अटींसह तावडतोब अर्ज करावेत, लायख व अनुभवी शिक्षकांस कायम नोकरीच्या दृष्टीनें चांगली संधी.

एस. ए. बोगर,
चेअरमन
येलूर को. सु. युनियन
तालुका वाळवे, जिल्हा सातारा.

विमेदारांचे मालकीची आदर्श विमा कंपनी

# दि सुप्रीम म्युच्युअल ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

महाराष्ट्राचे आर्थिक आघाडीवरील आपली कंपनी आपले व आपल्या कुटुंबियांचे भविष्यकाळाचे अनिश्चिततेपासून

**संरक्षण करण्यास**

विविध आकर्षक योजना व जास्तींत जास्त सवलती देण्यास तत्पर असणारी ही विमा कंपनी

**आपल्या सेवेस तयार आहे.**

अत्यंत काटकसरीची व्यवस्था व वाढतें काम यामुळें सर्वत्र अभिनंदनास प्राप्त झालेल्या ह्या कंपनींत विमा उतरून व एजन्सी घेऊन — वाढत्या वैभवाचे भागीदार व्हा.

लिहा अगर भेटा :—

व्ही. एन. म्हैसूर, मॅनेजर
दि सुप्रीम ॲशुअरन्स कंपनी लि. पुणें., ८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

अर्थ

## हिंदी नाण्यांची दशमान पद्धतीची मांडणी

हिंदुस्थानांत तीन वर्षांपूर्वी सर्वत्र दुय्यम नाण्यांची भयंकर चणचण झाली होती, निकेल व टिन ह्यांचा पुरवठा अपुरा पडला होता व लोकांमध्यें नाणीं साठवून ठेवण्याची प्रवृत्ति पसरली होती. ह्या परिस्थितीवर उपाययोजना म्हणून हिंदुस्थान सरकारनें दोन आणे, एक आणा, अर्धा आणा व एक पैसा ह्या किंमतीचीं नवीं नाणीं पाडून प्रसृत केलीं. तथापि, त्यांची बनावट व त्यांत वापरलेलें धातूचें मिश्रण हीं अनेक दृष्टींनीं सोईचीं नाहींत असें आतां आढळून आलें आहे. मध्यें भोक असलेल्या पैशाचें नाणेंहि समाधानकारक ठरलेलें नाहीं. निकेलचा पुरेसा पुरवठा होऊं लागतांच, सध्याच्या निकेल–ब्रास ऐवजीं पूर्वीच्या क्युप्रो-निकेलची नाणीं पुनः सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे. अर्थातच त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नाणीं पाडावीं लागतील. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें नाण्यांत मूलग्राही महत्त्वाची सुधारणा करण्याची असल्यास, ती हातीं घेण्यास हा समय सोइस्कर होईल असें सरकारचें मत आहे. शेजारच्या सिलोनमध्यें चालू असलेल्या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानांतहि नाण्यांची दशमानपद्धति चालू करावी, अशी सरकारपुढें सूचना आलेली आहे. सध्या १९२ पयांचा एक रुपया होतो, त्याऐवजी १०० सेंटसचा एक रुपया करावा; सध्याचा रुपया, अधेली, पावली, हीं नाणीं रहातील परंतु त्यांच्या खालील नाण्यांची जागा १० सेंट, ५ सेंट, २ सेंट, १ सेंट व कदाचित ½ सेंट हीं नाणीं घेतील, अशी ही योजना आहे. सध्याचीं दुय्यम नाणीं बाजारांतून अजीबात नाहींशी होईपर्यंत जुनीं व नवीं दोन्हीं नाणीं खेळतीं रहातील, परंतु कालांतरानें सध्याचीं २ आणे, १ आणा, ½ आणा, १ पैसा हीं नाणीं आजिबात नाहींशी झाल्यावर तीं पुनः पाडण्यांत येणार नाहींत. सध्याच्या रुपयास पुढेंहि रुपयाच संबोधिलें जाईल, ½ रुपयाचे ५० सेंट होतील, ¼ रुपयाचे २५ सेंट होतील व त्याचे खालीं सेंटची आणखी इतर दुय्यम नाणीं येतील.

"बारा पया म्हणजे एक आणा व १६ आणे म्हणजे एक रुपया, हें सध्याचें कोष्टक हिशेबाचे दृष्टीनें फारसें सोइस्कर नाहीं. आधुनिक व्यापार व व्यवसाय ह्यांत हिशेब सुलभतेनें व जलद् गतीनें पुरे होणें अगत्याचें असतें व ह्या दृष्टीनें दशमानपद्धतीसारखी सोईची नाण्यांची दुसरी पद्धति नाहीं," असा युक्तिवाद पुढें मांडण्यांत येत आहे. सिलोन, चीन, इराक, पॅलेस्टाइन, मलाया, नेदरलंड ईस्ट इंडीज, थायलँड, इत्यादि मागसलेल्या देशांनीं सुद्धा ह्या दशमानपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. हिंदुस्थान, ग्रेट ब्रिटन व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देश हे मात्र आपल्या नाण्यांच्या जुन्याच मोडणीस धरून आहेत.

एका आधारभूत नाण्याचे अनुरोधानें मुख्यतः दहा पटींनीं वाढणारीं नाणीं ज्या पद्धतींत असतात, तिला नाण्यांची दशमान पद्धत म्हणतात. उदाहरणार्थ, "एक" हें आधारभूत मुख्य नाणें धरलें तर किंमतींत त्याचेवरील नाणीं "दहा," "शंभर," "हजार" अशीं होतील व त्याचे खालील नाणीं ·१, ·०१, ·००१ अशीं होतील. दशमान पद्धति पूर्णपणें अंमलांत असेल, तर अशा नाण्यांच्या व्यतिरिक्त इतर नाणीं आढळणारच नाहींत. फ्रान्समधील फ्रँक हें मुख्य नाणें आहे व १० फ्रँकचीं आणि १०० फ्रँकचीं, त्याचप्रमाणें १० सेंटिमचींहि नाणीं आहेत. परंतु त्याबरोबरच सोईसाठी ५० फ्रँक, ५ फ्रँक, २ फ्रँक, ५० सेंटिम, २० सेंटिम, अशींहि पण नाणीं आहेत. जर्मन आणि अमेरिकन नाण्यांच्या दशमान पद्धतींतहि अशाच प्रकारचीं नाणीं आढळतात. हिंदी नाण्यांच्या पद्धतींत सुधारणा सुचविण्यांत येत आहे, तीमध्येंहि ह्याच तऱ्हेचीं सोइस्कर दुय्यम नाणीं ठेवण्यांत यावयाचीं आहेत. परंतु, मुख्य हिशेबाच्या नाण्यांचें प्रमाण दशमान पद्धतीचें रहाणार, ही त्यांतील महत्त्वाची बाब आहे. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, रशिया, जपान ह्या सर्व देशांनीं, १९ व्या शतकांतच आपलीं नाणीं दशमान पद्धतीवर आणून ठेवलीं आहेत. इंग्लंडमध्यें नाण्यांच्या पद्धतींत सुधारणा करण्यासंबंधीं आतांपर्यंत अनेकवार चर्चा झालेली असली, तरी हिंदुस्थानांत मात्र सुधारणा सुचविण्याचा महत्त्वाचा असा हा पहिलाच प्रयत्न आहे.

हिंदुस्थानांतील नाणीं दशमान पद्धतीवर आणण्यांतील अडचणी सहज लक्षांत येण्याजोग्या आहेत. फार पूर्वीपासून चालत आलेली व लोकांच्या दृढ परिचयाची अशी सध्याची नाण्यांची पद्धति आहे, तीमध्यें एकदम बदल केला असतां तो लोकांस तात्काळ न पटणें स्वाभाविक आहे. तथापि, रुपया, अधेली व पावली हीं नाणीं आहेत तशींच कायम राहावयाचीं असल्याकारणानें, नियोजित बदल हा फार क्रांतिकारक वाटणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. पावलीखालील नवीं नाणीं प्रचारांत येऊन त्यांनीं सध्याच्या दुय्यम नाण्यांची जागा पूर्णतः घेण्यास बराच वेळ लागेल व तोंपर्यंत दोन्हीं नाणीं चालू राहतील, ही गोष्टहि नव्या नाण्यांच्या स्वीकारास पोषक अशीच आहे. दोन्ही प्रकारचीं नाणीं चालू राहातील तोंपर्यंत त्यांच्या किंमतींचा परस्पर संबंध लोकांच्या ध्यानांत रहावा, ह्यासाठी तुलनात्मक कोष्टकें छापून तीं वरचेवर सर्व ठिकाणीं वाटण्याची व्यवस्था करण्याचा सरकारचा विचार आहे. सध्या आणा, चवली वगैरेंत सांगण्यांत येणाऱ्या किंमती पुढें सेंटमध्यें सांगाव्या लागतील व त्यांत कांहीं काळ घोटाळा उडणार हें उघड आहे. पोस्टाचीं व रेल्वेचीं तिकिटें ह्यांच्या किंमती नव्या नाण्यांतच आकारल्या जातील. नवी वेळ व जुनी (स्टँडर्ड) वेळ ह्यांमधील घोटाळा कांहीं दिवस चालू राहिला, परंतु त्याचा आर्थिक जीवनावर कांहीं परिणाम होऊं शकला नाहीं. परंतु दोन प्रकारचीं नाणीं कांहीं काळ चालू रहातील व जुन्या नाण्यांत सांगण्यांत येणाऱ्या किंमतींचें रूपांतर नव्या नाण्यांच्या किंमतींत प्रत्येक वेळीं करावें लागेल, त्या कारणानें कांहीं काळ घोटाळा माजल्याविना रहाणार नाहीं. विशेषतः, शैक्षणिक दृष्ट्या मागसलेल्या हिंदुस्थानांत नाण्यांतील ही सुधारणा लोकांच्या सवयी पडण्यास कालावधि लागेल हें उघड आहे.

हिंदी नाण्यांत सुधारणा घडवून आणणें इष्ट व फायदेशीर आहे हें मान्य झाल्यास, युद्धसमाप्तीनंतर तात्काल ती सुधारणा घडवून आणणें सोईचें होईल, हें सहज पटण्याजोगें आहे, असें सरकारचें म्हणणें आहे. जनतेचें ह्यासंबंधांत काय मत आहे, हें अगोदर अजमावून घेऊन नंतरच पुढें पाऊल टाकण्याचा सरकारचा विचार दिसतो. कोट्यवधि नवीन नाणीं पाडण्यास

टाकसाळींस बराच वेळ लागेल, ह्या दृष्टीनें नवीन सुधारणेबाबत अखेरचा निर्णय सरकारास लवकर घ्यावा लागेल आणि त्याकरितां लोकमत लवकर व्यक्त होणें अगत्याचें आहे. दशमान पद्धतीच्या नाण्यांपासून होणारे फायदे जनतेस जोपर्यंत माहीत नाहींत तोपर्यंत केवळ इतर देशांचा दाखला देऊन न थांबतां नव्या पद्धतीच्या फायद्यांचा तपशील लोकांना समजावून सांगण्याची व्यवस्था झाली पाहिजे. हिंदुस्थानांत अद्याप अनेक वजनें व मापें प्रचलित असून त्यांचीं ठिकठिकाणचीं रूढ कोष्टकेंहि भिन्न-भिन्न आहेत. त्यांत एकवाक्यता आणणें, तीं सर्व दशमान पद्धतीवर बसविणें व त्याबरोबरच नाण्यांची मांडणीहि दशमान पद्धतीची करणें, हें सर्वांत श्रेयस्कर होईल व दशमान पद्धतीच्या मांडणीचा खरा फायदा त्यापासून मिळूं लागेल. फक्त नाण्यांची मांडणी बदलल्यानें वजन-माप व किंमत ह्यांतील आजचे रूढ आडाखे बदलले जातील आणि त्यांची जागा मात्र नवे आडाखे तात्काळ घेऊं शकणार नाहींत, ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागेल. नाण्यांची नवीन मांडणीची सूचना हें सरकारच्या प्रगतिप्रियतेचें लक्षण असलें तरी प्रत्यक्ष योजना अंमलांत आणण्यापूर्वी तिच्या उपयुक्ततेचा नीट विचार झाला पाहिजे.

## नित्योपयोगी वस्तूंच्या आयातीचे दीर्घगामी दुष्परिणाम

**कॅनरा मिल्सचे मॅ. एजंट श्री. स. के. भावे ह्यांचें फेडरेशन ऑफ इं. चेंबर्सच्या सभेमधील भाषण**

"रोजच्या व्यवहारांत लागणाऱ्या वस्तूंची परदेशाहून आयात होण्यांत हिंदुस्थानचें आर्थिक मरण निश्चित आहे. हिंदी व्यापार आणि उद्योगधंदे यांच्या जीवन मरणाचा हा प्रश्न आहे. परदेशी मालाची आयात चालू राहिली तर परदेशीय धंद्यांना जीवन मिळेल व हिंदी धंद्यांना मरण पत्करावें लागेल. चलनवाढीस आळा घालण्याकरतां परदेशी वस्तू आणण्यांत येत आहेत हें सरकारी समर्थन लंगडें आहे. परदेशी वस्तु स्वस्त मिळणें हें हिंदीस विलोभन असून हिंदी जनतेचें रक्त शोषणारें विष त्यांत आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. चलनवाढीस आळा कितपत बसला हें सांगणें कठीण परंतु निरनिराळ्या कंट्रोल्समुळें हिंदी उद्योगधंद्यांत जे अडथळे निर्मिले गेले त्यांमुळें साहाजिकच उत्पादनाची व विक्रीचीही किंमत वाढून गैरवाजवी चढाओढ मात्र निर्माण होत आहे! यंत्रसामुग्री आणण्यास जहाजांत जागा नसते पण तयार माल आणण्यास भरपूर जागा मिळते! ज्या वस्तु येत आहेत त्या हिंदुस्थानांत न होणाऱ्या आहेत म्हणावें तर तसेंही नाहीं!

### ब्रिटिश कारखानदारांस संधी

"ब्रिटिश साम्राज्यांतील उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरविण्याचा आणि तयार माल विकत घेण्याचा उद्योग आपण अनेकवर्षे करीत आलों आहों; आणि आतां तर लढाईमुळें ज्या वस्तूंच्या अभावीं आपण दिवस काढले त्या वस्तू विकत घेण्याबद्दलची आमची उत्सुकता आणि लढाईमुळें प्रत्येकाच्या हातीं खेळणाऱ्या अमोप पैशामुळें वस्तु विकत घेण्याची वाढलेली पात्रता यांचा उपयोग परदेशीय कारखानदार करून घेतल्याशिवाय रहाणार नाहींत. जुना, पडलेला, साठलेला माल प्रथम येईल व तो युद्धकालीन किंमतीपेक्षां थोडा कमी किंमतीनेंही विकण्यांत येईल. हिंदी उद्योगधंद्यांकडून त्यांच्याकडून ताकतीबाहेर काम करून घेतलें असल्यामुळें त्यांचीं यंत्रें खिळखिळीं बनून जाऊन त्यांचेकडून वाढती मागणी पुरी होणार नाहीं हें उघड आहे. याकरतां हिंदी लोक यंत्रसामुग्रीची मागणी करतील व जुनीं यंत्रें लढाईच्या भरांत पण लढाई संपण्याच्या शेवटच्या क्षणांत त्यांचे पदरांत पडतील असें दिसतें. म्हणजे जुना मालही खपला व जुनी यंत्रेंही खपलीं व हिंदुस्थानची विलायतेंतील (लढाईमुळें निर्माण झालेली) शिल्लकही घटली असा तिहेरी प्रकार होणार आहे.

### जुन्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीचा परिणाम

"सर्व परदेशी आयातीविरुद्ध आपण नसून फक्त हिंदुस्थानांत तयार होणारा किंवा होऊं शकणारा माल परदेशांतून येऊं नये एवढेंच आमचें म्हणणें आहे. यंत्रसामुग्री व कांहीं कच्चा माल परदेशांतून आल्याशिवाय भागणारच नाहीं. जुनीं यंत्रें घेण्याचा आग्रह सरकार करीत नाहीं असें ना. दलाल यांनीं परवां सांगितलें. पण परदेशी मालाच्या आयातीचा ससेमिरा हा आग्रह निर्माण करीत आहे हें सांगणें जरूर आहे. सध्या ऑर्डरी दिल्या तर जुनी यंत्रें मिळणार व तीं परदेशीय नवीन यंत्रांच्या वस्तु निर्मितीला तोंड देऊं शकणार नाहींत हें उघड आहे.

### संरक्षण मिळणार, तें केव्हां?

"उद्योगधंद्याच्या उंबरठ्यांत नुकतेंच पाऊल टाकलेल्या आमच्या महाराष्ट्रांत साठे बंधूंना सिलोनमधून मिळणारी कोकोबीन्स, अलीकडे निर्यातीवर कंट्रोल बसल्यामुळें, मिळण्याचें बंद होऊन तो भाग बंद करण्याची पाळी येण्याचा संभव आहे. लष्कराला कंदील पुरविण्याचे कामांत ओगल्यांना पूर्णतः गुंतून राहावें लागलें असून जनतेला उजेड दाखविण्याचें काम अमेरिकन कंदील करीत आहेत हें लक्षांत घेण्यासारखें आहे. म्हणजे अमेरिकन कंदील बाजारांत तुडुंब भरले म्हणजे ओगल्यांच्या कंदीलाचें काय होणार हें काय सांगावयास पाहिजे? चार वर्षांपूर्वी कायदेमंडळांत त्यावेळचे व्यापार मंत्री ना. मुदलियार यांनीं सांगितलें होतें कीं लढाईच्या वेळीं निघालेले व लढाईच्या कार्याकडे आपलें सर्वस्व वेंचणारे अशा प्रकारच्या कारखान्यांना सरकार जरूर प्रथम संरक्षण देईल. संरक्षण देण्याची भाषा ना. दलाल यांनींहि परवा काढली. पण या गोष्टी अंमलांत लवकर येणें कठीण. १९३३ सालीं ओगल्यांनीं संरक्षण मागितलें. पण प्राथमिक चौकशीच्या नमनांतच ६ वर्षें गेलीं व १९३९ सालीं लढाईच सुरू झाल्यानें संरक्षणाचा प्रश्नच उरला नाहीं. हें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे.

### मोहास बळी पडूं नका

"प्रत्येक येणाऱ्या जहाजांतून रोज व्यवहारांत लागणाऱ्या वस्तू येऊं लागल्या आहेत व आपली शिल्लक कमी करीत आहेत. ही आयात म्हणजे उंटाचें पिलूं आहे. करतां आपला निषेध परिणामकारक होईल असें पाहिलें पाहिजे. लढाईच्या काळांत डी. आय. आर. नुसार आपण अनेक आवश्यक वस्तूंच्या अभावीं अद्याप जिवंत राहिलों आहोंत. परदेशी माल स्वस्त येईल, मोहक असेल हेंही खरें पण त्याशिवाय आपण आजवर जसें राहिलों तसेंच आणखी कांहीं काळ निग्रहानें राहिलें पाहिजे. ही वेळ जर चालविली व मोहाला बळी पडलों तर हिंदी आर्थिक दास्य चिरंतर झालेंच. आपल्या निषेधाचा परिणाम होऊन आयात बंद पडली तर ठीकच पण तसें न झालें तर स्वदेशी धर्माचा आदेश जनतेला देण्यास, मी प्रथम म्हटल्याप्रमाणें फेडरेशननें पुढें आलें पाहिजे."

# स्फुट विचार

### बंगालमधील दुष्काळाची चौकशी

अन्नाच्या दुर्भिक्षतेमुळें लाखों लोक बंगालमध्यें मृत्युमुखीं पडले आणि रोग व साथी ह्यांनीं पछाडले, तेव्हां सरकारास ह्या भयंकर आपत्तीची चौकशी करून तिचीं कारणें शोधून काढण्यासाठी एक कमिशन सर जॉन वुडहेड ह्यांचे अध्यक्षतेखाली नेमावें लागलें. गोळा केलेल्या माहितीच्या आधारावर त्यानें बसवलेले सिद्धांत प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून बंगाल सरकारच्या अव्यवस्थेवर आणि कार्यक्षमतेच्या अभावावर तसेंच व्यापाऱ्यांच्या निर्घृण नफेबाजीवर विदारक प्रकाश पडला आहे. निसर्गाच्या प्रकोपामुळें माणसांवर प्राणसंकटें येतात तेव्हां देखील त्यांच्या निराकरणार्थ सरकारास व समाजास प्रयत्नांची शिकस्त करावी लागते. बंगालमधील दुष्काळास भाताच्या पिकाची असमाधानकारक परिस्थितिसारखी मानवी प्रयत्नाच्या मर्यादेबाहेरील कारणें थोडींबहुत जबाबदार असलीं तरी प्रांतिक सरकारास भावी दुष्काळाची कल्पना येणें आवश्यक होतें आणि त्यासंबंधांत योग्य व्यवस्था त्यानें अगाऊ करावयास हवी होती असें कमिशनचें म्हणणें आहे. धान्याची जमवाजमव, पुरवठा व वाटणी ह्यांची तरतूद करण्यांत प्रांतिक सरकारच्या हातून झालेली दिरंगाई व गैरव्यवस्था आणि त्यामुळें असहाय जनतेची झालेली प्राणहानि ह्यांचें उद्वेगजनक चित्र कमिशननें रेखाटलें आहे. त्याच्या ताशेऱ्यांतून मध्यवर्ती सरकारहि सुटलें नसलें तरी त्यानें बंगाल सरकारासच मुख्यत्वेंकरून दोषी ठरवलें आहे. त्यानें अविष्कृत केलेल्या अनिष्ट राजकीय, कारभारविषयक व सामाजिक घटनांचा परिणाम बंगालमधील सार्वजनिक जीवन सुधारण्यांत आणि तेथील जनतेनें योग्य तो बोध घेण्यांत होईल अशी अपेक्षा करणें स्वाभाविक आहे.

---

### बंगालमध्यें लाचलुचपतीस आळा

वुडहेड कमिशननें बंगालमधील सरकारच्या निष्काळजीपणा व बेफिकीरी ह्यांच्या योगानें त्या प्रांतांतील दुष्काळानें उग्र स्वरूप कसें धारण केलें ह्याविषयीं व्यक्त केलेल्या अभिप्रायाचा उल्लेख आम्हीं वर केला आहे. कांहीं थोडे लोक संपत्तींत लोळत असतां बहुजन गरीब जनतेची उपासमार चालली होती असे हृदयद्रावक उद्गार बंगालच्या दुष्काळाबाबत काढून कमिशननें तेथें बोकाळलेल्या निंद्य नफेबाजीचा व लाचलुचपतीचा निर्देश आपल्या रिपोर्टांत केलेला आढळतो. सर आर्चिबॉल्ड रोलँड्स (सध्याचे हिंदुस्थान सरकारचे फडणवीस) ह्यांच्या अध्यक्षतेखाली बंगालमधील लाचलुचपतीची चौकशी करून तिला आळा घालण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी एक समिति नेमावी लागली. त्यावरून त्या प्रांतांत ह्या अनिष्ट प्रकाराचा प्रसार किती झाला आहे ह्याची कल्पना येते. युद्ध परिस्थितींत कोट्यवधि रुपयांचा सरकारी खर्च निरनिराळ्या बाबींवर चालला आहे आणि विविध नियंत्रणें व्यापारी वगैरे व्यवहारांवर घालण्यांत आलीं आहेत. त्याचप्रमाणें, अनेक नवीन सरकारी खातीं स्थापन झालीं आहेत आणि त्यांत हजारों नोकर नेमले जात आहेत. ह्या सर्व घडामोडींत लाच देण्यास व घेण्यास वाटेल तेवढी जागा निर्माण झाली आहे. व्यापाराचे परवाने देणें, सरकारी नोकरांच्या नेमणुका करणें इत्यादि संबंधांत रोलँड्स समितीनें विशिष्ट निर्बंध सुचवले आहेत. बंगालमधील राजकीय, सामाजिक व राज्यकारभारविषयक वातावरणच इतकें दूषित होऊन गेलेलें दिसतें कीं तें शुद्ध होण्यास दीर्घगामी व कडक उपायांची योजना अगत्याची आहे.

---

### मोठ्या किंमतीच्या ब्रिटिश नोटा बंद होणार

दहा शिलिंग आणि एक पौंड किंमतीच्या चलनी नोटा खेळण्याच्या बंद करण्याचा अधिकार बँक ऑफ इंग्लंडला १९२८ सालच्या एका कायद्यानें देण्यांत आला होता; त्याचें क्षेत्र आतां विस्तृत करण्यांत आलें असून तो दहा पौंड व त्यापेक्षा वरच्या नोटांसहि लागू करण्यांत येणार आहे. ह्या नोटा परत घेण्याचा बँकेचा ठराव प्रसिद्ध झाल्यावर विशिष्ट मुदतीनंतर त्यांच्या कायदेशीर चलनाचें स्वरूप नाहींसें होतें. त्यांच्या मोबदला दुसरें चलन त्या धारण करणारांस देण्याची बँकेची जबाबदारी अर्थात् नष्ट होत नसल्यानें जनतेचें नुकसान होत नाहीं. दोन वर्षांमागें दहा पौंड किंमतीच्या नवीन नोटा काढण्याचें बंद करण्याचें बँकेनें ठरवलें होतें. भारी किंमतीच्या बँक ऑफ इंग्लंडच्या नोटांचे संबंधांत असें धोरण अंगिकारण्याचा उद्देश त्यांचा काळा बाजार बंद पाडणें हा आहे. ब्रिटिश सरकार एका बाजूनें हुंडणावळीचें नियंत्रण करीत असतां नोटांचा दुरुपयोग इंग्लंडच्या बाहेर चलन पाठवण्याकडे होत असल्यानें मोठ्या किंमतीच्या नोटांचा कायदेशीरपणाच दूर करणें आवश्यक झालें आहे. त्याचप्रमाणें, बँक ऑफ इंग्लंडच्या खोट्या नोटा बाहेरच्या देशांत तयार केल्या जात आहेत आणि जर्मनीनें ही कारवाई मोठ्या प्रमाणांत केली असल्याचें अलिकडे बाहेर आलें आहे. दहा पौंड आणि त्या वरच्या नोटांचा कायदेशीरपणा नष्ट केला गेल्यास असल्या लबाडीस वाव उरणार नाहीं. पाच पौंडांच्या नोटा इंग्लंडमध्यें सामान्य देण्या-घेण्यांत अत्यंत सोयीच्या असल्यानें त्यांस हात लावला जाणार नाहीं असें दिसतें. काळा बाजार आणि बनावट नोटांचा प्रसार बंद करण्यास मोठ्या किंमतीच्या नोटा चलनांतून काढून घेतल्या जाणें हा उपाय परिणामकारक झाल्यावांचून राहणार नाहीं. नोटांचा बेकायदेशीर व गैरवाजवी उपयोग करणारांस हलक्या किंमतीच्या नोटांचें महत्त्व नसल्यानें आणि असलें चलन ब्रिटिश जनतेस आवश्यक असल्यामुळें बँक ऑफ इंग्लंड तिला देण्यांत आलेला अधिकार त्याचें उद्दिष्ट साध्य होईल अशा बेतानेंच वापरील हें उघड आहे.

---

### युद्धांतून मोकळ्या होणाऱ्या लोकांच्या व्यवसायाची व्यवस्था

युरोपांतील युद्ध संपलें आहे आणि पूर्व एशियांतील युद्धास आतां अधिक जोर येऊन तेंहि लवकरच संपेल ह्याविषयीं शंका नाहीं. लष्करी कामाच्या निरनिराळ्या क्षेत्रांमध्यें हिंदुस्थानांत लक्षावधि माणसें आज गुंतलीं आहेत, तीं युद्ध संपतांच मोकळीं होतील आणि शांततेच्या काळांतील जीवनांत त्यांस पूर्व-स्थानावर परत यावें लागेल. पण युद्ध परिस्थितींत लढाऊ गरजांमुळें विविध प्रकारच्या व्यवसायांचा अफाट विस्तार झालेला असतो आणि कर व कर्जे ह्यांमधून येणाऱ्या पैशानें लक्षावधि लोक तात्पुरते पोसले जातात. युद्धसमाप्तीनंतर पैशाचा हा ओघ ओसरणार आणि ज्यांवर तो आज खर्च केला जात आहे तीं

कामेंहि संपुष्टांत येणार. मग ह्या लक्षावधि लोकांस कामें, व्यवसाय व धंदे मिळून त्यांच्या चरितार्थाची सोय कशी होणार हा अवघड प्रश्न उपस्थित होतो आणि त्याचा विचार युद्धसमाप्ति जवळ येऊं लागली असतांच करावा लागतो. ह्याप्रमाणें लढाऊ कामांतून मोकळ्या होणाऱ्या लोकांच्या नित्य व्यवसायाची व्यवस्था लावण्याची योजना हिंदुस्थान सरकारनें आखली आहे ती पुढील वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यापासून अमलांत यावयाची आहे. सबंध देशांत मिळून ७१ व्यवसाय व्यवस्था केंद्रें स्थापन केलीं जातील आणि त्यांचे मार्फत गरजू लोकांस त्यांच्या योग्यतेस अनुसरून कामें मिळवून देण्याची तजवीज करण्यांत येईल. ह्या योजनेची मुदत पांच वर्षांची असून तिच्यावर दर वर्षी ५८ लक्ष रुपये खर्च होतील. ह्या रकमेपैकी सुमारें १४ लक्ष रुपये प्रांतिक सरकारांस खर्चावे लागतील.

---

### कोल्हापुरची आर्थिक सुधारणेची योजना

लोकांच्या जीवनाच्या अनेक अंगांचा विचार करून त्यांत शक्य तेवढी सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशानें कोल्हापूर संस्थानच्या मंत्रिमंडळानें स्वतंत्र सुधारणा खातें निर्माण केलें असून त्यासंबंधांतील तपशीलवार योजना आखण्याचें कार्य हातीं घेतलें आहे. ह्या सुधारणा खात्याच्या पहिल्या अधिकृत प्रकाशनांत नियोजित सुधारणांची कल्पिलेली रूपरेषा देण्यांत आली आहे, तीवरून मंत्रिमंडळाचें प्रगतीविषयींचें उद्दिष्ट व्यापक पण व्यावहारिक स्वरूपाचें असल्याचें दिसून येतें. आपल्या योजनांस युद्धोत्तर पुनर्घटना हें आतां रूढ झालेलें अगडबंब नांव न देतां सर्वांगीण सुधारणा असें त्यांस संबोधण्यांत स्वतःच्या जबाबदारीची जाणीव आणि व्यवहारचातुर्य हीं स्पष्टपणानें त्यानें व्यक्त केलीं आहेत. शेती, धंदे, जंगलें, व्यापार, रस्ते, कालवे, शिक्षण, आरोग्य, इत्यादि आर्थिक सुधारणेच्या साधनांत विस्तार व कार्यक्षमता हीं कशीं घडवून आणण्याचा विचार आहे ह्याची स्थूलमानाची कल्पना प्रस्तुत प्रकाशनांत देण्यांत आली आहे आणि सुधारणा योजनांस लागणारा पैसा उभारण्याच्या मार्गांचेंहि दिग्दर्शन त्यांत आहे. कोल्हापूर मंत्रिमंडळ लोकांच्या आर्थिक व नैतिक प्रगतीसाठी कोणते विविध उपाय योजणार आहे ह्याच्या माहितीबरोबरच जनतेचें सहकार्य आणि तिनें स्वतः उचलणें आवश्यक असलेली जबाबदारी ह्याविषयींची जाणीव मंडळानें करून दिली आहे. सुधारणांचा बारीक तपशील तयार केला जात आहे, पण त्यांचें सर्वसाधारण स्वरूपाचें चित्र प्रस्तुत प्रकाशनांत रेखाटण्यांत आलें आहे, तें उद्बोधक आहे. त्यांत सुधारणाविषयक ध्येयवादास व्यावहारिकतेच्या मर्यादित चौकटींत बसवण्याचा योग्य प्रयत्न केलेला दिसत आहे, हा त्याचा ठळक गुण आहे.

---

### जर्मनीच्या बनावट "ब्रिटिश" नोटा

तीन कोटि पौंड किंमतीच्या ब्रिटिश चलनी नोटांच्या बनावट नोटा जर्मनीनें तयार करवून युरोपांत त्या चालविल्या व त्यांचे मोबदल्यांत माल मिळविला, असें आतां उघडकीस आलें आहे. आपल्या देशांत बाहेरून नोटा आणण्यास ग्रेट ब्रिटननें बंदी करून, त्यांची तटस्थ राष्ट्रांतील किंमत उतरविली. ५ पौंडांवरील नोटा काढण्याचें बँक ऑफ इंग्लंडनें दोन वर्षांपूर्वी बंद केलें व आतां ५ पौंडांवरील नोटा व्यवहारांत चालणार नाहींत, असें जाहीर झालें आहे. बँकेंतच फक्त त्यांची मोड मिळूं शकेल.


## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई



## इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड

**३७६ शुक्रवार, पुणें २**

**सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.**

**नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.**

**ठेवी स्वीकारल्या जातात**

**दराबद्दल चौकशी करा**

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

## " बँकांच्या डायरेक्टर बोर्डावर ठेवीदारांचे प्रतिनिधी पाहिजेत."

### विमा कंपन्यांतील विमेदार-डायरेक्टरांचा दाखला

### निवडणुकीसंबंधीं तपशीलवार सूचना

( न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. द. दि. देशपांडे, बी. ए. हे बँकांच्या बोर्डावरील ठेवीदारांच्या प्रतिनिधित्वाचे पहिल्यापासून पुरस्कर्ते आहेत. नवीन बँकिंग कायद्याची तपशीलवार छाननी करतांना त्यांनीं ह्या प्रश्नाची खुलासेवार चर्चा केली आहे. त्यांच्या प्रमुख मुद्यांचा सारांश येथें दिला आहे. )

बँकिंगचा धंदा भांडवलवाल्यांचेच हातीं ठेवण्याचा कायदा करणारांचा हेतु दिसतो, कारण कायद्यांतील कित्येक बाबी, विशेषतः भांडवल व शाखा, अशा प्रकारच्या आहेत कीं, त्या फक्त भांडवलवाल्यांच्याच आवाक्यांतील आहेत. मध्यम वर्गीयांनीं नोकर ह्या नात्यानेंच बँकिंगच्या धंद्याचे प्रगतीस हातभार लावावा, अशी परिस्थिति निर्माण होत आहे. मध्यमवर्गांत ध्येयवादी, उत्साही व कार्यतत्पर असे पुष्कळ लोक उपलब्ध आहेत व त्यांस योग्य संधी मिळाल्यास बँकिंगसारख्या संस्था ते यशस्वी रीतीनें उभारूं व वाढवूं शकतील. ठेवीदार हे मुख्यतः मध्यम वर्गीयच लोक असतात, हेंहि कायदा करणारांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. त्यांच्या सेव्हिंग्ज व मुदती ठेवी साधारणतः स्थिर राहातात व त्यांचा व्यापार आणि उद्योगधंदे पोसण्याकडे बँका उपयोग करतात. अशा ठेवीदारांच्या वर्गाचें हितसंरक्षण करणें हें रिझर्व्ह बँकेचें व विधिमंडळाचें कर्तव्य आहे. नियोजित कायद्याच्या १६, १८ व १९ व्या कलमांनीं दिलेलें संरक्षण अपुरें व अप्रत्यक्ष स्वरूपाचें आहे. विमा कंपन्यांच्या विमेदारांना डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व देण्यांत आलेलें आहे, त्याच स्वरूपाचें प्रतिनिधित्व बँकांच्या ठेवीदारांना त्यांच्या बोर्डावर मिळालें पाहिजे. बँकांच्या ठेवींचे मानानें त्यांचें भाग भांडवल अगदी कमी असतें व ठेवींचा आकडा वसूल भाग भांडवलाच्या २० ते ३० पट व कांहीं बाबतींत ५० पटहि असूं शकतो, हें लक्षांत घेतां ठेवीदारांना बँकांच्या डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधित्व देणें आवश्यक व रास्त आहे. विमेदारांचें विमा कंपनींत दीर्घ मुदतीपर्यंत हित निगडित झालेलें असतें, तशी गोष्ट बँकांच्या ठेवीदारांची नाहीं, अशी सबब पुढें केली जाणें संभवनीय आहे. परंतु सुस्थापित बँकांच्या ठेवीदारांची काळजीपूर्वक छाननी केली तर वर्षानुवर्षे मोठाल्या ठेवी ठेऊन बँकेशीं दीर्घकाळ हितसंबंध निगडित असलेले किती तरी ठेवीदार असतात हें आकडेवार सिद्ध करतां येईल. विमेदारांप्रमाणेंच त्यांचे दीर्घकालीन हितसंबंध असतात. ठेवीदारांना बँकांच्या बोर्डावर प्रतिनिधित्व देण्याची वेळ केव्हांच येऊन ठेपलेली आहे, हें प्रतिनिधित्व कसें देण्यांत यावें हें ठरवितांना विमेदारांच्या प्रतिनिधित्वाचा आदर्श पुढें घरण्यास प्रत्यवाय नाहीं. त्यासंबंधांत खालील सुचना करण्यांत येत आहेतः—

( अ ) कोणत्याहि बँकिंग कंपनींतील ठेवींचा आकडा वसूल भांडवलाच्या मानानें कितीतरी पटीनें मोठा असतो, ह्या दृष्टीनें ठेवीदारांचे व भागीदारांचे डायरेक्टर ह्यांचें प्रमाण सारखें, म्हणजे ५० : ५० असावें.

( ब ) दोन्ही प्रकारच्या डायरेक्टरांपैकी एक तृतीयांश डायरेक्टर दरसाल निवृत्त व्हावेत.

( क ) ज्यांची किमान ठराविक रकमेची व किमान मुदतीची ( ३ वर्षे ) ठेव बँकेंत आहे, अशांनाच ठेवीदारांचे डायरेक्टर निवडून देतां येईल. मतदार-ठेवीदारांचा एक वर्ग करण्यांत यावा. करंट, सेव्हिंग्ज व मुदती ठेवीदारांना खालील प्रकारें मतदानाचा अधिकार असावा.

( १ ) तीन वर्षे ज्यांच्या करंट खात्यांत दररोज किमान ३,००० रुपये शिलक असतील, अशांना मताधिकार

( २ ) तीन वर्षे ज्यांच्या सेव्हिंग्ज खात्यांत दरमहा किमान १,००० रुपये शिलक असतील, अशांना मताधिकार

( ३ ) किमान ५,००० रुपयांची किमान ३ वर्षांची ठेव निवडणुकीचे वेळीं असणारांस मताधिकार

ठेवीदारांची संख्या मोठी असल्याकारणानें मतदार-ठेवीदारांची यादी तयार करणें निष्कारण त्रासाचें होईल, असा आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे, परंतु अधिक काळजीपूर्वक छाननी करतां व विमेदारांच्या तत्सम प्रश्नाशीं तुलना करतां ही तक्रार निराधार असल्याचें दिसून येईल. ओरिएंटल, बॉंबे म्युच्युअल, हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह अशा विमा कंपन्यांचे लक्षावधि विमेदार असतांहि, विमेदारांच्या डायरेक्टरांच्या निवडणुकी किती व्यवस्थितपणें होतात! निवडणुकीचें तंत्र सोपें करण्याची एक युक्ति सुचवितां येण्याजोगी आहे. खातें उघडतांना ठेवीदारांकडून त्यास मतदार-ठेवीदार होण्याची इच्छा आहे किंवा नाहीं हें स्पष्ट करून घ्यावें. दोन प्रकारच्या ठेवीदारांचीं दोन वेगळीं पुस्तकें उघडलीं म्हणजे झालें. मतदार-ठेवीदारांचे वर्गांत रहावयाचें किंवा नाहीं हें ठेवीदारानें ठरविलें, म्हणजे सोपें होईल. एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत वरचेवर बदलून जाण्याच्या अस्थिर प्रवृत्तीवर उपाय म्हणून ठराविक कारणाखेरीज त्यास मूळ वर्गांत पुनः येतां येणार नाहीं, असा नियम करण्यांत यावा. अशा रीतीनें ठेवीदारांचा एक कायम वर्ग निर्माण होईल व वेळोवेळ बँका बदलणाऱ्या ठेवीदारांच्या प्रवृत्तीसहि कांहीं अंशीं आळा बसेल.

मतदार-ठेवीदारांचा वर्ग निर्माण केला त्याच प्रकारें निवडणुकीच्या पात्रतेची व्यवस्था करतां येईल. किमान ५ वर्षे ज्याची १५,००० रुपयांची मुदती ठेव आहे, अशालाच डायरेक्टरच्या जागेसाठीं उभें राहतां यावें. देण्याचे बाबतींत त्याची भागीदारांचे डायरेक्टराशीं बरोबरी व्हावी ह्याकरितां त्यास बँकेच्या कॉंट्रिब्यूटरीजच्या यादींत करारान्वयें घालण्यांत यावें. म्हणजे ठेवीदार-डायरेक्टराच्या स्थानाचे मुदतींत बँक गुंडाळण्यांत आली तर त्यास भागीदार-डायरेक्टराच्या बरोबरीनें तोषीस बसेल. ठेवीदार-डायरेक्टरानें किमान लायकीचे भागच विकत घेतले असतील तर कॉंट्रिब्यूटरीजच्या यादींत त्यास दाखल करविण्याचें कारण नाहीं. सुरुवातीस ठेवीदारांचे बोर्डावरील प्रतिनिधी कोऑप्शन पद्धतीनें घेऊन पुढें निवडणुकीचें तत्त्व अंमलांत आणलें तरी चालेल. मुंबईच्या न्यू सिटिझन बँक लि. ह्या शेड्यूल्ड बँकेनें ह्या दिशेनें प्रत्यक्ष प्रारंभ केलेला आहे.

## बंगालच्या तागास जगभर मागणी

### स्कॉटलंडमधील लोकांचें वर्चस्व

तागाच्या जागतिक लागवडीपैकीं ९९% लागवड हिंदुस्थानांत होते व हिंदुस्थानांतील लागवडीमध्यें बंगालचा वाटा ८०% आहे इतर देशांत ताग लावण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तो अयशस्वी ठरला, त्यामुळें तागाचे बाबतींत संयुक्त राष्ट्रांस काळजी उरली नाहीं. फेब्रुवारी ते मे ह्या मुदतींत ताग लावण्यांत येतो आणि जून ते सप्टेंबर पीक काढण्यांत येतें. तागाचें पीक करणारा शेतकरी व अखेरचा खरेदीदार गिरणीवाला ह्याचें दरम्यान अनेक मध्यस्थ व दलाल असतात, त्याकारणानें गिरण्यांनीं दिलेल्या किंमतीचे मानानें शेतकऱ्यांचे हातीं फारच थोडी किंमत पडते. पूर्वी हातमागावर तागाचें कापड करीत असत. आतां त्यांची जागा गिरण्यांनीं घेतली आहे. स्कॉटलंडमध्यें तागाच्या गिरण्या प्रथम स्थापन झाल्या व तेथील लोकांनीं नंतर बंगालमध्यें येऊन आपलें बस्तान बसविलें, त्याकारणानें स्कॉटसमेन लोकांचें ह्या धंद्यांत प्राबल्य फार आहे. आतां, हुगळीच्या दोन्ही तीरांवर मिळून शंभरावर तागाच्या गिरण्या आहेत. त्यांतील कांहीं हिंदी मुख्यतः मारवाडी लोकांच्या मालकीच्या आहेत. तागाच्या विविध कापडास जगभर मागणी असते. तागाची जागा घेणारा दुसरा समाधानकारक पदार्थ अद्याप सापडलेला नाहीं, आणि तागाचे नवे नवे उपयोग शोधून काढण्यांत येत आहेत. तागाच्या किंमती स्थिर राहण्याचें महत्त्व विशेष आहे, कारण लक्षावधि लोकांचा चरितार्थ त्यावर अवलंबून असतो.

---

### कपाशीचें दर एकरी उत्पादन : खताचा उपयोग

हिंदुस्थानांत कपाशीचें दर एकरीं उत्पन्न अत्यल्प आहे. पाण्याखालील जमिनींत तें सरासरीनें २०० पौंड व कोरड्या जमिनींत ७५ पौंड भरतें. खताचा उपयोग केल्यास उत्पादन वाढवितां येणें शक्य आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें ह्या संबंधांत बऱ्याच प्रयोगांस आर्थिक सहाय केलें. अमोनियम सल्फेट, नैट्रेट ऑफ सोडा किंवा सुपर फॉस्फेट्स, बोनमील किंवा पेंड, शेणखत ह्या सर्वांचा उपयोग करून पाहण्यांत आला. फॉस्फेट्स व पोटॅश ह्यापेक्षा नैट्रोजन उत्पादन अधिक वाढवितो, असें आढळून आलें. कोरड्या, काळ्या जमिनींत भुइमुगाची पेंड जास्त यशस्वी ठरली, परंतु कमी पावसाच्या क्षेत्रांत उत्पादनावर खताचा दुष्परिणाम झालेला आढळला. खत योग्य वेळीं देणें विशेष महत्त्वाचें आहे. एक एकर कोरड्या जमिनीस ४० पौंड नैट्रोजनची आवश्यकता असते आणि ५०० पौंड भुइमुगाची पेंड किंवा २०० पौंड अमोनियम सल्फेट ह्यांतून तो मिळूं शकतो. पेरणीपूर्वी दोन आठवडे हें खत दिलें पाहिजे. जेथें पाऊस फार पडतो, तेथें पेरणीनंतर सहा आठवड्यांनीं खत द्यावें.

---

### मुंबईत विजेच्या खर्चावर नियंत्रण

जाहिरात व रोषणाई ह्यांसाठी वापरावयाच्या विजेवरील मुंबई शहरांतील नियंत्रणें कांहीं काळ तशींच चालू रहावयाचीं आहेत. रस्त्यांवरील दिव्यांच्या उजेडांत सुधारणा होईपर्यंत, मोटारींच्या दिव्याच्या झोतावरील नियंत्रण दूर करणें शक्य होणार नाहीं. घरांच्या आंतील दिव्यांवरील सर्व बंधनें काढून टाकण्यांत आलेलीं आहेत.


१९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर


१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए. — अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित






फौंटनपेनकरतां कॅमल इंक सर्व पसंत करतात.

दांडेकर आणि कंपनी, मुंबई ८



"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि., हिराबाग, पुणें २



—त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:— तुळजाराम मोदी मोतीचौक, सातारा.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्*
**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर् पोस्टानें पाठवूं.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड,

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.
मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ३,६७,९५५ |
| एकूण खेळतें भांडवल | „ ३५,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टीफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टीफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों.. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल. बी., मॅनेजर
चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर
—शाखाः—
(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा
(४) बेलापूर. पे--ऑफिसः–खोपोली (जि. कुलाबा)
एकूण खेळतें भांडवल : २०,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षीं कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.
—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

‘अर्थ’ ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## ग्रामोद्धारास सामुदायिक शेतीची आवश्यकता

### मि. कीनस्लें ह्यांचें भाषण

हिंदुस्थानांतील तांदळाचें दर एकरीं उत्पादन ८०० पौंड आहे. अमेरिकेंत तें १,४५० व इटलींत ३,००० पौंड आहे. हिंदी गाई-म्हशींचें प्रत्येकीं रोजचें दूध २ पौंडांपेक्षा थोडें ज्यास्त भरतें. हॉलंडमधील गाई २०.५ पौंड व इंग्लंडमधील गाई १५ पौंड दूध देतात. हिंदुस्थानांतील दूध ज्यास्त सकस असलें, तरी उत्पादनांतील तूट त्यानें भरून निघूं शकत नाहीं. शहरांत व गांवांत प्रगति होत असली, तरी खेडेगांवें सुधारत चाललेलीं नाहींत. पाणीपुरवठा, रहाण्याची सोय, स्वच्छता, दळणवळण, ह्या खेडेगांवांच्या प्रमुख गरजा आहेत. येथें इंजिनिअर, शास्त्रज्ञ व कायदा करणारे ह्यांच्या कार्यक्षेत्रास वाव आहे. जगांतील कित्येक देशांत सामुदायिक शेती यशस्वी झाली आहे. हिंदुस्थानांतहि ती यशस्वी होणें अगदी शक्य आहे. लोकांच्या मनोवृत्तींत मोठा फरक घडून येण्यावरच हें अवलंबून आहे. सामुदायिक शेतीच्या कल्पनेनें मूळ धरलें, कीं जुन्यापुराण्या अवजारांची जागा नवी यंत्रसामग्री घेऊं शकेल. शेती तज्ज्ञ त्यांचा उपयोग शिकवितील; यंत्रें विकणारें तीं लवकरच पुरवूं शकतील, परंतु सुधारण्याची इच्छा ही मात्र शेतकऱ्यांतच निर्माण झाली पाहिजे. शेतकरी व त्याच्या कुटुंबांतील लोक ह्यांनीं रहाणीमध्यें सुधारणेची मागणी केली पाहिजे.

तेनसी व्हॅली योजनेची आठवण येथें सहाजिकच होते. ह्या योजनेच्या प्रारंभीं तिला स्थानिक गांवकऱ्यांचा पुष्कळच विरोध होता, परंतु एक दोन दूरदृष्टीच्या शेतकऱ्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें इतरांस मार्ग दाखविला. प्रत्यक्ष फायदा दिसूं लागतांच विरोधकांचा विरोध मावळला व ते योजनेचे पुरस्कर्ते बनले. अशा तऱ्हेच्या योजना हिंदुस्थानांत अमलांत आणतां येण्याजोग्या आहेत, परंतु त्यासाठी शेतकऱ्यांची पुराणप्रियता नष्ट करणें आधीं आवश्यक आहे.

---

### " शिक्षणासाठी परदेशीं उमेदवार पाठविणें हा पैशाचा अपव्यय"

" व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणासाठी परदेशीं उमेदवार पाठविण्याचें महत्त्व सरकारास एकाएकी पटलें आहे. वास्तविक, अशा शिक्षणाची व्यवस्था हिंदुस्थानांत पुरेशा संस्था स्थापून करतां येण्याजोगी आहे. शिकून येणारे उमेदवार "फोरमन" पद्धतीची देखरेख करणारेच केवळ होणार असतील, तर त्यांचेवर केलेला खर्च हा पैशाचा शुद्ध अपव्यय होय. हिंदुस्थानांत विलायतपेक्षा कमी किंमतींत तेंच शिक्षण देतां येणें अगदी शक्य आहे. जे पुढें तज्ज्ञ शिक्षक किंवा औद्योगिक पुढारी होऊं शकतील असे अत्युच्च दर्जाचे निवडक लोकच फक्त विलायतेस शिक्षणासाठी पाठविणें योग्य होईल. " :— सर एम. विश्वेश्वरअय्या (सरकारी औद्योगिक योजनेवरील मत)

### चलनी नोटांमध्यें भर

ह्या महिन्याच्या ११ तारखेस पुऱ्या झालेल्या आठवड्यांत हिंदुस्थानांतील खेळत्या चलनी नोटांच्या किंमतींत सवा नऊ कोटींची भर पडली आणि अशा एकूण नोटांची किंमत १,१२५ कोटि रुपये झाली.


# दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : गणपतगली बेळगांव

शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापुर

**खेळतें भांडवल १५ लाखांवर**

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, B. A., LL. B. चेअरमन.

श्री. एल. एस. आजगांवकर, श्री. एस. के. सामंत, श्री. एन. व्ही. सामंत, श्री. पी. ए. तेंडोलकर, श्री. जी. एन. कलघटगी, श्री. डी. आय. गाडवी, श्री. आय. एम्. मुंगुरवाडी, श्री. टी. व्ही. पोरवाल, श्री. डी. आर. अनगोळकर, श्री. आर. डी. गुर्लहोसूर, श्री. जी. जी. बेलिंग.

**आकर्षक दरानें मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा.

एस. एन. सामंत,
मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

**— भांडवल —**

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,००,००,००० वर |

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

**डेकन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर, रत्नागिरी, फैजपूर (पे-ऑफिस)**

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## शंभराच्या 'फाटक्या' नोटा कायदेशीर केव्हां समजाव्या ?

### रिझर्व्ह बँकेला ५०० रु. द्यावे लागले

जौनपूर शहरांतील राधा कृष्ण गोपाळलाल या नांवाच्या पेढीनें ५०० रु. च्या ५ शंभराच्या नोटा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पाठविल्या व त्यांबद्दल रुपये मागितले. सदर नोटांचे अर्धे तुकडे केले होते व ते पाठीमागून कागदाचा तुकडा लावून चिकटविले होते. सदर नोटा पाहिल्यावर रिझर्व्ह बँकेच्या करन्सी ऑफिसरनें सदर नोटांचे सर्व भाग शाबूत नाहींत, फक्त एका बाजूचे अर्धे भाग बरोबर आहेत, बाकीच्या उरलेल्या अर्ध्या भागांतील आकडा बरोबर जुळला नाहीं असें म्हणून निम्मे पैसे सदर पेढीला देण्याची तयारी दर्शविली. परंतु नोटा खऱ्या असल्यामुळें पेढीनें निम्मे पैसे घेण्याचें नाकारलें व रिझर्व्ह बँकेवर ५०० रु. मिळण्याबद्दल दावा लावला. सदर दावा खालच्या कोर्टानें रद्द केला. त्यांच्या मतें सदर नोटा या फाटक्या होत व फाटक्या नोटांचे पैसे दिलेच पाहिजेत असें कायद्यांत कुठेंहि लिहिलें नाहीं. हे पैसे देणें न देणें हें रिझर्व्ह बँकेच्या मर्जीची गोष्ट आहे. याकरतां रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टच्या २८ व्या कलमाचा आधार घेण्यांत आला व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) रूल्स १९३५ पैकी रूल नं. २ प्रमाणें नोटा फाटक्या असल्याचें ठरविण्यांत आलें.

परंतु हायकोर्टानें हा निर्णय बरोबर नसल्याचा शेरा मारून रिझर्व्ह बँकेनें वादीस ५०० रु. द्यावेत असा निकाल दिला. हा निकाल देतांना हायकोर्टानें असें म्हटलें आहे कीं,

"फाटक्या नोटांचे पैसे देणें न देणें हा रिझर्व्ह बँकेच्या मर्जीचा प्रश्न आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु अमूक एक नोट फाटकी आहे कीं नाहीं, हें प्रथम २ (ई) नियमाप्रमाणें पाहिलें पाहिजे व या नियमांत फाटक्या नोटांची व्याख्या अशी केली आहे कीं ज्या नोटांचा कांहीं भाग सांपडत नाहीं ती फाटकी नोट होय.

कोर्टापुढील नोटांचा कोणताच भाग हरवलेला नाहीं. फक्त दोन भाग जुळवितांना नीट रीतीनें न जुळविल्यामुळें नंबर मागेपुढें झाल्यासारखे दिसतात. नोटांच्या मागील चिठी काढून टाकून जवळ जवळ जर दोन्हीं तुकडे ठेवले तर दोन्हीं तुकडे एकाच नोटीचे आहेत असें स्पष्ट दिसून येतें. सबब या नोटीला फाटकी 'म्युटिलेटेड' नोट म्हणतां येत नाहीं. सबब रिझर्व्ह बँकेनें नोटांचे पैसे दिले पाहिजेत."

### पाटणा विश्वविद्यालयाच्या कागदाचें प्रकरण

पाटणा विश्वविद्यालयाचे माजी रजिस्ट्रार, मि. जमुनाप्रसाद, ह्यांनीं व त्यांचा बंधु ( विश्वविद्यालयाचा स्टोअर कीपर ) ह्यांनीं विश्वविद्यालयासाठी कागद पाहिजे असें सांगून टिटाघर पेपर मिल्सकडून बराच कागद मिळविला व त्यापैकी बहुतेक कागद स्थानिक कागद व्यापाऱ्यांस विकला, अशा आरोपावर इतर तिघांसमवेत वरील दोघांवर पाटणा येथील कोर्टांत खटला चालू आहे.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
इंडि. युना.३०-५-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १५।५।४५ | बुधवार १६।५।४५ | गुरुवार १७।५।४५ | शुक्रवार १८।५।४५ | सोमवार २१।५।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २०६६—४ | २१०३-१२ | २१२१—४ | २०९५—० | २१२०—० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३८८—८ | ३९५—८ | ३९८—० | ३९३—० | ३९७—० |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८५२—८ | १८५७—८ | १८६५—० | १८७१—४ | १८७८—८ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०९—० | ६१५—८ | ६१०—८ | ६१२—० | ६१४—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५२२—० | ५२४—० | ५२५—० | ५२४—० | ५२७—८ |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३७३—० | ३७३—८ | ३७५—० | ३७२—८ | ३७५—८ |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८८—८ | २९०—० | २९१—० | २८९—० | २९२—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९५—४ | २९७—० | ३००—८ | २९७—० | २९९—० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २६६—० | २६८—० | २६८—० | २६५—० | २७६—० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१३-६ | ३-१४-६ | ३-१४-६ | ३-१५-० | ३-१५-६ |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—५-६ | १४—७-० | १४—७-० | १४—६-० | १४-११-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—०-० | ३—०-० | ३—०-३ | २-१५-९ | ३-१-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७१०—० | ७१३-१२ | ७१३-१२ | ७०७—८ | ७१०—० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३५-१२ | २३६-१२ | २३७—० | २३७—० | २३९—० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१६—८ | २१७—८ | २१८—० | २१६—० | २१७—० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५१—४ | ५३०—० | ५३०—० | ५३१—४ | ५३५—० |
| ९३-१२; ७३ | २-०-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ७७—० | ७८—० | ७९—० | ७८—० | ७९—८ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४—३ | ३४—६ | ३४—७ | ३४—२ | ३४—५ |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५०—० | ५१—० | ५१—० | ५०—० | ५१—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | १८-१० | १८-१० | १८-१२ | १८-१० | १८-१४ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६७—० | ६७—८ | ६८—४ | ६८—४ | ६९—० |
| | | | ३½% रोखे | १०० | १००-१-० | १००—१ | १००—१ | १००—१ | १००—१ |

## टी. व्ही. ए.

### ओसाड जमिनीचें नंदनवन

अमेरिकेंतील तेनसी नदीच्या भोंवतालचा प्रदेश पावसाच्या पाण्याच्या पुरानें धुवून निघाला होता. १९३० च्या सुमारास, १ कोटि ३० लक्ष एकरांवर पसरलेलीं पूर्वीचीं घनदाट अरण्यें नाहींशीं झालीं होतीं; तीनशें वर्षांच्या सतत शेतीमुळें जमिनीला कस राहिला नव्हता; १० लक्ष एकर जमीन शेतकामास निरुपयोगी झाली होती; १५ लक्ष एकर जमीन रिती पडण्याच्या मार्गावर होती; ४५ लक्ष एकर जमीन खत-पाण्याशिवाय उपयोगांत येणें शक्य नव्हतें. या जमिनीवर २५ लक्ष जीव जगत होते. कपास व तमाखू पिकवणाऱ्या एकांड्या, सर्वस्व नष्ट झालेल्या, अशिक्षित व डोंगरी लोकांचा हा मुलूख असेंच बहुतेक सर्वजण त्या भागास म्हणत.

१९३३ च्या मे महिन्यांत अमेरिकन सरकारनें या प्रदेशांतील जीवन सुखकर आणि लोक अधिक उद्योगी व कार्यक्षम करण्याचा निर्धार केला. जीवित व संपत्ति यांना धोका देणाऱ्या पुरांवर विजय मिळविण्याचें त्यानें ठरविलें. ओसाड होणाऱ्या जमिनीवर उत्कृष्ट पीक काढण्याची योजना आखण्यांत आली. त्याकरितां लागणारीं खतें तयार करण्याची सिद्धता झाली. नवीन झाडें लावून अरण्यें वाढविण्याचें योजण्यांत आलें. घरांस, शेतकामास व कारखान्यांस स्वस्त विजेचा पुरवठा करण्याचें ठरविलें. नदीचें पात्र खोल करून स्वस्त जल-वाहतुकीची सोय करण्याचेंहि निश्चित झालें. ही प्रचंड योजना एकसूत्रीपणानें चालवून यशस्वी करण्याकरितां "टी. व्ही. ए." तेनसी व्हॅली ॲथॉरिटीची स्थापना करण्यांत आली.

गेल्या दहा वर्षांच्या अल्प काळांतील "टी. व्ही. ए." ची प्रगति विलक्षण आहे. लहान-मोठीं धरणें बांधून पूर येण्याचा संभव अल्पतर करण्यांत आला आहे. प्रस्तुतचें महायुद्ध सुरू झाल्यापासूनच्या काळांतहि आठ धरणें बांधण्यांत आलीं आहेत. तेनसी व्हॅलींतील वीज आजूबाजूच्या कारखान्यांतहि नेण्यांत आली आहे. आज युद्धकार्यांत गुंतलेल्या, बोटी बांधणाऱ्या, बॉंबर विमानें तयार करणाऱ्या व ॲल्युमिनिअमच्या प्रचंड कारखान्यांत ही वीज खेळत आहे. अमोनियम नायट्रेट, सिन्थेटिक अमोनिया, प्युअर एलेमेंटल फॉस्फरस, कॅल्सिअम कारबाइड, फॉस्फेटिक फर्टिलायझर्स व फॉस्फेट ओअर बनविणाऱ्या कारखान्यांतहि तिचाच उपयोग करण्यांत येतो.

पुरांचें पाणी धरणांनीं अडवून मोठमोठ्या तलावांत सोडण्यांत आलें आहे. पाण्यानें जमीन वाहून जाऊन रेताड होण्याची क्रिया थांबविण्यांत आली आहे. सुपर फॉस्फेटचा उपयोग करून शेतीचें, फळा-दुधाचें, मांस-अंड्यांचें उत्पादन वाढविण्यांत आलें आहे; शेती करण्याच्या पद्धतींत व शेतीच्या पिकांत सुधारणा करण्यांत आल्या आहेत. खेड्यांतील मुबलक व स्वस्त विजेच्या पुरवठ्यामुळें शेतकऱ्यांचे कष्ट, वेळ व पैसा यांची बचत करणाऱ्या यंत्रसामुग्रीचा व्यापक प्रमाणावर उपयोग करणें शक्य झालें आहे. फळें व इतर पदार्थ दीर्घकाल टिकविण्याची सोय झाल्यानें शेतकऱ्यांच्या सुखांत व उत्पन्नांत भरच पडली आहे. थोडक्यांत, शेतीचें व उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन झालें आहे. तेनसी व्हॅलींतील शेतकऱ्यांचें उत्पन्न गेल्या दहा वर्षांत दुप्पट झालें आहे. १९३५-४० च्या पांच वर्षांच्या कालावधींत येथील शेत जमिनीच्या किंमती १९ टक्क्यांनीं वाढल्या आहेत. साऱ्या अमेरिकन राष्ट्राचा विचार केला असतां या काळांत तेथील किंमती सरासरी फक्त २ टक्क्यांनीं वाढल्या. हें लक्षांत घेतां एकविळच्या ओसाड जमिनीच्या किंमती १९ टक्क्यांनीं वाढाव्यात यांत विशेष अर्थ वाटतो.

'टी. व्ही. ए.' च्या योजनेंत अमेरिकन सरकारनें ७,४५० लक्ष डॉलर्स गुंतविले आहेत.

ती योजना हा आतां प्रयोग राहिलेला नाहीं. ही एक सत्य-कथा आहे. युद्धकाळांतहि ही योजना स्थगित न करतां अमेरिकन सरकारनें ती पुरी करण्याचाच प्रयत्न केला. त्याच्या या प्रयत्नाला टी. व्ही. ए. च्या उपयुक्त युद्धकार्यामुळें अधिकच पुष्टि मिळाली आहे.

### खाणींतील भट्टी

कोळशाच्या उत्पादनपद्धतींत एक महत्त्वाची भर पडली आहे. कोळशास खाणींतच आग लावावी व त्यापासून गॅस काढावा अशी कल्पना शास्त्रज्ञांस बरेच दिवसांपूर्वी सुचली होती. पण तीस आतां मूर्त स्वरूप आलें आहे. याचें श्रेय मुख्यतः सोव्हिएट शास्त्रज्ञांकडे आहे.

या पद्धतींत खाणींत दोन नळ पुरतात व त्यांचीं खाणींतील तोंडें बोगद्यानें जोडतात. एका नळांतून हवा पुरविली व कोळसा पेटविला कीं, दुसऱ्या नळांतून गॅस बाहेर येतो. या गॅसचा उपयोग यंत्रें चालविणें व विजेचें उत्पादन करणें, त्याचप्रमाणें लोखंड, अमोनिया, रबर व तेल करण्याकडे होतो.

विशेषतः इतर पद्धतींनीं कोळसा खाणींतून काढणें जेथें किफायतशीर पडत नाहीं (उ० अधिक राख असणारा कोळसा, पातळ थरांत सापडणारा कोळसा इ०,) तेथें ही पद्धति चांगलें काम देते.

—श्री. चिं. काळे


# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखाः डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज-सेव्हिंग बँक सेक्शन.

—शाखा—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, बारामती व निरा

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ३० मे १९४५ अंक २२

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व क्रीमक्रॅकर
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तस-तशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

जीर्ण व हटवादी हिंवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
**पायरोनिल**
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

**EVERYTHING IN RUBBER GOODS**
● Hospital Requirements ● Cab Tyres
● Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
● Rubber Rollers for Textile Mills
● Ebonite Sheets & Rods etc.
The Western India Manufacturers' Agency, Ltd.,
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

नोगीचे डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

## विविध माहिती

### " स्टर्लिंग शिलकां " वर मि. कोल्हटकरांचें व्याख्यान

इंडिअन इंस्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें येथील उपशाखेच्या विद्यमानें बडोयाच्या कॉमर्स कॉलेजचे प्रिन्सिपॉल, प्रा. कोल्हटकर ह्यांचें " हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांचा प्रश्न " ह्या विषयावर प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली गेल्या रविवारीं गोखले हॉलमध्यें उद्बोधक व्याख्यान झालें.

### अमेरिकेंतील अपघात

प्रत्यक्ष युद्धांत जखमी झालेल्यांपेक्षा अपघातांत जखमी झालेल्या, इस्पितळांतील रुग्णांची संख्या अमेरिकेंत जास्त भरते.

### दशमान पद्धतीच्या नाण्यांस पाठिंबा

हिंदुस्थानांतील नाण्यांची मांडणी दशमान पद्धतीची करण्या-संबंधींच्या सरकारी सूचनेस मुंबईच्या महाराष्ट्र चेंबरनें मान्यता दर्शविली आहे. रुपयाचे १० आणे व आण्याच्या १० पै कराव्या अशी चेंबरची सूचना आहे.

### चांदीचा पुरवठा

" हिंदी रिझर्व्ह बँकेचा चांदीचा साठा कायम राखण्यासाठी मार्च महिन्यांत इराणकडून १ कोटि, ६० लक्ष औंस चांदी खरेदी करण्यांत आली. जूनमध्यें अमेरिकेनें १० कोटि औंस चांदी उसनी दिली, ती युद्धसमाप्तीनंतर परत करावी लागेल. " फिनॅन्शिअल टाइम्सचा गेल्या वर्षाचा आढावा.

### अमेरिकेंत विजेचा प्रसार

येत्या तीन वर्षांत अमेरिकेमध्यें खेडेगांवास वीज पुरवठा करण्याकरितां वीज कंपन्या सुमारें १०० कोटि रुपये खर्च करतील. नव्या गिऱ्हाइकांस विजेच्या तारा टाकण्यास व इतर फिटिंग करण्यास सुमारें १५० कोटि रुपये खर्च येईल. १० लक्ष नव्या गिऱ्हाइकांपैकी ६ लक्ष प्रत्यक्ष शेतावर रहाणारे शेतकरी आहेत.

### औद्योगिक उत्पादनाचा अंदाज

हिंदुस्थान सरकार वेगवेगळ्या पिकांचा अंदाज प्रसिद्ध करीत असतें. लागवडीचें क्षेत्र, हवामान, दर एकरीं उत्पादन, इत्यादींवर हा अंदाज आधारलेला असतो. अशाच पद्धतीचा औद्योगिक उत्पादनाचा अंदाज बांधून तो प्रसिद्ध करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. मामुली कामगार–पुरवठा, कोळशाचा पुरवठा व कपाशीचें उत्पादन ह्यांच्या आकड्यांचे आधारानें कापडाच्या उत्पादनाचा बिनचूक अंदाज करतां येईल, अशी अपेक्षा आहे.

### सिटिझन्स बँकेची हुबळी येथील शाखा

दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव या बँकेची हुबळी येथील शाखा शुक्रवार ता. १८ मे, १९४५ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां धारवाडचे कलेक्टर श्री. एस. जी. बर्वे, आय. सी. एस. यांच्या हस्तें मोठ्या थाटानें उघडण्यांत आली. हुबळी येथील प्रमुख व्यापारी, डॉक्टर्स, वकील, सरकारी अधिकारी वगैरे मंडळी समारंभास हजर होती. प्रारंभीं बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जी. डी. सराफ यांनीं निमंत्रित मंडळींचें स्वागत करून बँकेच्या खेळत्या भांडवलाची वाढ १ लाखापासून चाळीस लाखांपर्यंत कशी झाली याचें विवेचन केल्यानंतर कलेक्टर श्री. बर्वे ह्यांनीं बँकेच्या उत्कर्षाबद्दल समाधान व्यक्त करून बँक कर्नाटकांतील एक अग्रेसर बँक होईल अशी आशा व्यक्त केली व त्यानंतर शाखा उघडल्याचें जाहीर केलें. समारंभास बेळगावहून रा. काशीनाथराव देशपांडे, श्री. शंकरराव कलघटगी, श्री. रामकृष्णपंत जोशी, खानापुराहून रा. सा. वागळे, रा. मल्लाप्पा होसमनी, अळणावराहून रा. सा. के. आर. पाटील व धारवाडहून रा. डी. के. गुंजीकर वगैरे मंडळी आली होती. शेवटीं रा. स. रं. सुंठणकर यांनीं मंडळींचे आभार मानले व अल्पोपाहारानंतर समारंभ समाप्त झाला.

**D. E. SOCIETY'S**

**Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.**

The College reopens on the 20th June, 1945. Admissions to the F. Y., I. Com. and B. Com. classes will begin from 10th June. Applications for admission to the College and Hostel should be made to the Principal in the prescribed form. The College Prospectus containing the Application form will be sent on receipt of postage stamps worth two annas.

**D. G. Karve,**
*Principal.*

विमेदारांचे मालकीची आदर्श विमा कंपनी

**दि सुप्रीम म्युच्युअल ॲशुअरन्स कं. लि. पुणें.**

महाराष्ट्राचे आर्थिक आघाडीवरील आपली कंपनी आपले व आपल्या कुटुंबियांचे भविष्यकाळाचे अनिश्चिततेपासून

**संरक्षण करण्यास**

विविध आकर्षक योजना व जास्तींत जास्त सवलती देण्यास तत्पर असणारी ही विमा कंपनी

**आपल्या सेवेस तयार आहे.**

अत्यंत काटकसरीची व्यवस्था व वाढतें काम यामुळें सर्वत्र अभिनंदनास प्राप्त झालेल्या ह्या कंपनींत विमा उतरून व एजन्सी घेऊन — वाढत्या वैभवाचे भागीदार व्हा.

लिहा अगर भेटा :— व्ही. एन. म्हैसूर, मॅनेजर
दि सुप्रीम ॲशुअरन्स कंपनी लि. पुणें., ८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

अर्थ

## मुंबई प्रांतांतील युद्धोत्तर पुनर्घटना

### सहकारी संघटनेबाबत सरकारी योजना

कांहीं महिन्यांपूर्वी मुंबई सरकारनें एक चोपडें प्रसिद्ध करून त्यांत आपल्या युद्धोत्तर खेडेगावी पुनर्घटनेची योजना जाहीर केली. त्याच योजनेची जरा तपशीलवार माहिती देणारें एक ७० पृष्ठांचें पुस्तक मुंबई सरकारनें आतां प्रसिद्ध केलें आहे. योजनेची एकसारखी उजळणी चालू असल्याकारणानें, तीस अद्याप असेरचें स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. सामान्य जनतेची रहाणी सुधारणें, हें युद्धोत्तर पुनर्घटनेचें उद्दिष्ट आहे व ही योजना सोई-स्करपणें अंमलांत यावी, ह्याकरितां तिच्या १५ वर्षाच्या मुदतीचे प्रत्येकीं ५ वर्षांचे असे ३ भाग पाडण्यांत आले आहेत. सबंद प्रांतामध्यें सुधारणांस एकदम प्रारंभ करणें अव्यवहार्य असल्या-कारणानें, योजनांचे चार गट पाडण्यांत आले आहेत. ॲग्रिकल्चरल डेट्‌र्स रिलीफ ॲक्ट ज्या ठिकाणीं लागू करण्यांत येईल, अशा ठिकाणीं सहकारी संघटनेचा प्रसार होणें क्रमप्राप्तच ठरतें. उत्पादन आणि विक्री ह्यांची सासळी जोडण्याचें महत्वहि सरकारास पटलें आहे.

शेतकऱ्यांना भांडवल पुरवण्याकडेच आपले प्रांतांतील सहकारी चळवळीचें लक्ष आतांपर्यंत होतें; त्यामुळें इतर आवश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष होऊन त्यांस सहकारी संघटनेचा फायदा मिळूं शकला नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत खरेदी, विक्री, हौसिंग, बी-खतें-अवजारें पुरवठा इत्यादींसाठी अनेक सोसायटया निघाल्या आहेत. सावकारां-वरील शेतकऱ्यांचें अवलंबन कमी करून त्यांस त्यांच्या मालाचा योग्य मोबदला मिळावा, ह्या दृष्टीनें युद्धोत्तर काळीं सहकारी चळवळीचें क्षेत्र विस्तृत करण्याचा सरकारचा विचार आहे. खेडेगावी पुनर्घटनेच्या मार्गांतील प्रमुख अडचण म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा ही होय. तेव्हां शेतकऱ्यांस स्वस्त भांडवल पुरविण्याचा सहकारी चळवळ प्रथम प्रयत्न करील. ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ ॲक्ट त्यासाठी करण्यांत आला असून लवकरच ९२ तालुक्यांत कर्ज तडजोड बोर्डें काम करूं लागतील. युद्धसमाप्ती-नंतर सबंध प्रांत वरील कायद्याखाली येईल.

शेतकऱ्याच्या कर्जाचा बोजा एकदा हलका करून दिल्यानें केवळ त्याची अडचण दूर होत नाहीं, त्याच्या शेतकामास भांडवल हें लागणारच. सहकारी संस्थांनीं हें भांडवल पुरवठ्याचें काम करावें, असें सरकारनें ठरविलें आहे. सहकारी सोसायट्या व त्यांचे सभासद ह्यांची संख्या त्याकरितां पुष्कळच वाढवावी लागेल व देखरेखीचें कामहि अधिक अवघड व त्रासाचें होईल. भांडवल-पुरवठ्याची योजना पार पाडण्यास सहाय म्हणून सहकारी पतपेढ्या व त्यांस पैसे देणाऱ्या बँका ह्यांच्या नुकसानीचा कांहीं अंश सोसण्याचें सरकारनें मान्य केलें आहे. ज्यांचीं कर्जें बोर्डांनीं तपासून कमी करून दिलेलीं आहेत, अशांना दिलेल्या कर्जांतील ५% पर्यंत बूड सरकार सोसेल. देखरेखीचा सर्वच सर्च सरकार करणार आहे. ह्याकरितां पहिल्या पांच वर्षांत २० लक्ष रुपये भांडवली व २११ लक्ष रुपये सालीना सर्च सरकारावर पडेल.

पिकांसाठी कर्ज देऊन केवळ भागत नाहीं; शेतकऱ्याच्या पिकास योग्य किंमत प्राप्त होईल अशीहि व्यवस्था केली पाहिजे. मालविक्रीची सध्या चांगली व्यवस्था नाहीं; दलालांचें वर्चस्व फार आहे व बाजारांत माल उठविण्यापूर्वी नाना प्रकारच्या पट्ट्या त्यांवर लादल्या जातात. ह्या कारणामुळें उत्पादकाचें नुकसान होतें. मुंबई सरकारनें आपल्या युद्धोत्तर पुनर्घटनेंत मालविक्रीच्या संघटनेस महत्त्वाचें स्थान दिलें आहे हें योग्यच आहे. सहकारी सप्लाय व सेल सोसायट्या आणि यूनिअन्स ह्यांची संख्या वाढविण्याचा व नियंत्रित बाजारपेठांचें जाळेंच्या जाळें निर्माण करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यास लागणाऱ्या तज्ज्ञ मॅनेजरांच्या सर्चाचा अंशतः बोजा कांहीं काळ सरकार स्वतः उचलणार आहे. बाजारपेठांच्या देखरेखीचा व व्यवस्थेचा सर्च व कोठारांचें बांधकाम इत्यादींसहि सरकार हातभार लावणार आहे. पंचवार्षिक मुदतींत १ लक्ष, १५ हजारांचा भांडवली व सालीना ३ लक्ष, ६७ हजारांचा सर्च अपेक्षित आहे.

खेडेगांवी कारागिरांचे लहान प्रमाणावरील धंदे ऊर्जितावस्थेस आणण्याच्या प्रयत्नांसहि सरकारी योजनेंत स्थान आहे. चीनमधील इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्‌च्या धर्तीवर हिंदुस्थानांत सहकारी संघटना निर्माण व्हावी, अशी सरकारची कल्पना आहे. सध्या नऊ जिल्हा औद्योगिक संघ अस्तित्वांत आहेत, त्यांचें कार्यक्षेत्र वाढविण्यांत यावयाचें आहे. प्रांतांतील सर्व जिल्ह्यांत त्यांचे धर्तीवर संघ स्थापिले जातील. त्या सर्वांचे केंद्रस्थानीं प्रांतिक औद्योगिक फेडरेशन स्थापण्याचाहि सरकारचा विचार आहे. पहिल्या पांच वर्षांचे अवधींत ह्या सर्वांस १० हजार रुपये भांडवली व २ लक्ष, ८३ हजार रुपये वार्षिक सर्च येणार आहे.

शेतीस जोडधंदा म्हणून दूध व आनुषंगिक जिनसांच्या पुरवठ्याचेहि प्रयत्न सरकार हातीं घेणार आहे. पांच प्रमुख केंद्रांत प्रयोग म्हणून सहकारी क्रीमरीज् स्थापण्यांत येतील. चांगल्या जनावरांच्या पैदाशीचें कार्य ह्या क्रीमरीज्‌ना जोडण्यांत येईल. ह्या योजनेचा अनुक्रमें भांडवली व वार्षिक सर्च ३७ हजार व ७८ हजार रु. येईल. दूध पुरवठा यूनियन्सचा तत्सम सर्च अनुक्रमें १ हजार व ७४ हजार आहे. कांहीं निवडक ठिकाणीं सहकारी तत्त्वावर जमिनीच्या फुटकळ तुकड्यांचें एकत्रीकरण करण्याचा प्रयोग करण्यांत येईल. त्याच्या रचनेचा व ती पार पाडण्याचा भांडवली सर्च ४ हजार रुपये व वार्षिक ४ लक्ष, १५ हजारांचा सर्च सरकार करील. वरील सर्व योजना हातीं घेऊन पार पाडण्यासाठी तज्ञ अधिकारी व नोकर पाहिजेत. गेल्या १५ सप्टेंबर पासून पुणें येथें एक शिक्षण केंद्र उघडण्यांत आलें आहे. त्यांतून एक एक तुकडी शिक्षण घेऊन बाहेर पडत आहे.

### इंग्लंडमधील पेनिसिलिनचा कारखाना

पेनिसिलिनच्या उत्पादनाचा एक प्रचंड कारखाना लिव्हरपूल येथें उभारण्यांत येत आहे. पेनिसिलिनच्या तज्ञ अमेरिकन उत्पादकांची त्यावर देखरेख आहे. कारखान्यास १० लक्ष पौंड सर्च येईल.

## निवडक तालुक्यांच्या योजनांचा तपशील

### सातारा तालुक्यांतील युद्धोत्तर पुनर्घटना

मुंबई प्रांताच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनांत अनेक विषयांचा अंतर्भाव होतो. विषयवार त्यांची तपशीलवार चौकशी करण्याऐवजीं, त्या अंमलांत आणण्यास त्यास नोकरवर्ग किती लागेल, खर्च किती येईल, वगैरे गोष्टींचा अंदाज करण्यासाठी कांहीं विशिष्ट तालुक्यांपुरती चौकशी अगोदर करावी, असें सरकारनें ठरवून उत्तर, मध्य व दक्षिण भागांतील प्रत्येकीं एक तालुका त्यासाठी निवडला. सातारा तालुक्याची पहाणी सर्वांत आधीं सुरू झाली. त्यासाठी नेमण्यांत आलेल्या खास अधिकाऱ्यांकडे सर्व खात्यांच्या प्रमुखांनीं आपल्या सूचना पाठवाव्या, असें ठरलें. खास अधिकाऱ्यानें नंतर समक्ष हिंडून एक कच्चा आराखडा तयार केला व गव्हर्नरांचे सल्लागार, खात्यांचे प्रमुख, जिल्हा लोकल बोर्ड व म्युनिसिपॅलिटी ह्यांचे अध्यक्ष व स्थानिक अधिकारी ह्यांचे सभेस तो सादर केला. सभेचे कित्येक निर्णय सरकारनें मान्य केले व रिपोर्टांत दाखल केले. हा रिपोर्ट व इतर माहिती ह्यांचे आधारावर सरकार युद्धोत्तर योजनेंत कांहीं बदल करावयास हवा काय, हें ठरवील. परंतु तें ठरविण्यापूर्वी हा रिपोर्ट प्रसिद्ध करून लोकमत मागविण्यांत येत आहे. सातारा तालुक्यासाठी चौकशीचा खास अधिकारी म्हणून मि. कॉस्थवेट ह्यांची नेमणूक झाली होती.

सातारा तालुक्यांतील सुधारणेकरितां खालील केंद्रें निवडण्यांत आलीं आहेत:—

| केंद्र | लोकसंख्या | साताऱ्यापासून अंतर (मैल) |
|---|---|---|
| नागठाणा | २,४६७ | १० |
| परळी | १,०८८ | ७ |
| चिंचनेर वंदन | १,३१९ | ६ |
| लिंब | २,७८८ | ७½ |
| वडुथ | १,१४८ | ६½ |
| कान्हेर | ९१८ | ७ |

ह्यांपैकी नागठाणा, परळी, लिंब व चिंचनेर वंदन हीं प्रमुख केंद्रें होतील.

रस्ते, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, शेतीचीं अवजारें, जंगलें, सहकारी संघटना, शिक्षण, वैद्यकीय मदत, आरोग्य, ग्रामसुधारणा, खेडेगावी धंदे, इत्यादि प्रश्नांचा विचार मि. कॉस्थवेट ह्यांच्या रिपोर्टांत आलेला आहे आणि रिपोर्टाचे अखेर त्या सर्वांस येणाऱ्या खर्चाचा अंदाज दिलेला आहे. विजेच्या पुरवठ्याची योजना व जमीनसुधारणा आणि ताली-बंधारे ह्यांच्या खर्चाची कल्पना आज नीटशी करतां येणार नाहीं म्हणून त्याच अंदाजी खर्च दिलेला नाहीं.

| खातें | भांडवली खर्च | पहिल्या ३ वर्षांतील विशेष (बिगर भांडवली) खर्च | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| | (रु.) | (रु.) | (रु.) |
| रस्ते (पी. डब्ल्यू. डी.) | २१,७२,०००* | .... | हिशेब केला नाहीं. |
| शेती खातें | ५,१७,७५० | ३५,००० | २५,८५० |
| जंगल | १,७२,१९० | .... | .... |
| व्हेटरिनरी | २१,००० | .... | १२,८०० |
| सहकारी | २,८७५ | १७,५८० | २१६ |
| शिक्षण | ५,०२,००० | .... | ६२,००० |
| खेडेगावास पाणीपुरवठा | ३,००,००० | .... | .... |
| वैद्यक खातें | ७५,००० | .... | ६,३३० |
| चावड्या वगैरे | .... | .... | .... |
| | ४८,१८,२१५ | ५२,५८० | १,०७,१९६ |
| दर माणशीं खर्च रु. | ४४–०–० | ०–८–० | १–०–० |

(* राष्ट्रीय महत्त्वाचे रस्ते वगळून)

आरोग्य, बाळंतपण, इत्यादि विषयक विकल्पाचे योजनांचा विचार केला तर एकूण भांडवली खर्च ५० लक्ष रुपये व सालीना खर्च १½ लक्ष रुपये म्हणजे दरमाणशीं भांडवली खर्च ४६ रु. ९ आ. ९ पै व वार्षिक खर्च १ रु. ६ आ. ० पै असा हिशेब होतो.

सध्या सातारा तालुक्यांत जो सरकार खर्च करीत आहे, त्यांत वरील खर्चाची भर पडणार आहे. आज सातारा तालुक्याचा जमीनमहसूल २,५३,२३१ रुपये आहे, म्हणजे नव्या योजना अंमलांत आणण्यास तो अपुरा आहे. "हा पैसा कसा पुरविला जाईल किंवा सरकार प्रांतांतील इतर कांहीं तालुक्यांवरहि खर्च करणार आहे हें लक्षांत घेतां हा खर्च फाजील आहे किंवा काय ह्याचा विचार प्रस्तुत रिपोर्टांत करण्याचें मला प्रयोजन नाहीं" असें मि. कॉस्थवेट हे म्हणतात.

### मद्रास प्रांतांतील सहकारी स्टोअर्सची प्रगति

| | सहकारी रिटेल स्टोअर्स | | सहकारी होलसेल स्टोअर्स | |
|---|---|---|---|---|
| | ३०-६-४० | ३०-६-४४ | ३०-६-४० | ३०-६-४४ |
| स्टोअर्सची संख्या | १९८ | १,१९१ | २ | २१ |
| त्यांचे सभासद | ३४,४०० | ३,४३००० | १६६ | ६,५३८ |
| | (लक्ष रुपये) | | | |
| वसुल भांडवल | ३.२० | ४३.६७ | ०.१९ | १६.४९ |
| रिझर्व्ह फंड | २.३७ | ६.९३ | ... | ०.५४ |
| वर्ष अखेर कर्जे | ५.०३ | ५६.३७ | ०.७६ | १३९.४० |
| वर्षांतील विक्री | ३३.०७ | ८३२.३६ | १.७२ | ५१८.८३ |

### ८५ लक्ष रेशनकार्डे हरवलीं

गेल्या १२ महिन्यांत ग्रेट ब्रिटनमध्यें ८५,००,००० लोकांचीं रेशनबुकें हरवलीं व त्याप्रीत्यर्थ त्यांना ५,८३,३३३ रुपये दंड भरावे लागले. हिंदुस्थानांतील बहुतेक शहरांत रेशनकार्ड हरवलें, तर २ आणे भरल्यावरच नवें कार्ड मिळूं शकतें.

# स्फुट विचार

## अन्नोत्पादनाची सात-कलमी योजना

सध्याचा काळ आर्थिक योजनात्मक धोरणाच्या चर्चेचा आहे. नुसती शेती किंवा ग्रामसुधारणा घेतली तरी हिंदुस्थान सरकारच्या वियमानें नेमल्या गेलेल्या अनेक पोट खात्यांच्या व समित्यांच्या कक्षेत ह्या विषयाचीं निरनिराळीं अंगें येत असून व्यक्तिशः बनवल्या गेलेल्या विविध योजनाहि तत्संबंधांत बाहेर येत आहेत. धान्याची पैदास व पुरवठा वाढवण्याचे बाबतींत हिंदुस्थान सरकारनें देशाचे सहा विभाग करून त्या प्रत्येकावर एक कमिशनर नेमला आहे. ह्या अधिकाऱ्यांचें प्रत्यक्ष कार्य काय आहे आणि तें कसें चालतें ह्याची विशेष माहिती प्रसिद्ध नाहीं. तथापि वायव्य गटाचे कमिशनर, लेफ्टनंट जनरल, सर क्लॅरेन्स बर्ड ह्यांनीं आपल्या नभोवाणीवर केलेल्या भाषणांत एक सात कलमी योजना पुढें मांडली, तीवरून ध्येय आणि व्यवहार ह्यांचेमध्यें केवढें मोठें अंतर आहे ह्याची कल्पना येते. ही योजना अशी :— ( १ ) अन्न परिस्थितीची सर्व शहरी व खेडेगावी लोकांस चांगली जाणीव, ( २ ) शेतीच्या धंद्यांत साहस व धडाडी ह्यांची वाढ आणि चांगल्या शिकलेल्या व व्यवहारकुशल शेतकरी पुढाऱ्यांची आवश्यकता, ( ३ ) सुधारलेल्या पद्धतीच्या शेतीची उपयुक्तता, ( ४ ) खतांचा पुरवठा, ( ५ ) पाणी पुरवठ्याचा विस्तार, ( ६ ) धान्य व इतर शेतीच्या मालाची सुरक्षित साठवण आणि ( ७ ) साठवण व वहातुक ह्यांस अनुसरून उत्पादनाची योजना. वरील सात गोष्टी साध्य झाल्या असतां अन्नपुरवठ्याचे बाबतींत हिंदुस्थान स्वावलंबी होईल असें सर क्लॅरेन्स ह्यांचें म्हणणें आहे. शेत मालाच्या बाजार भावाचा किफायतशीरपणा व स्थैर्य, कर्ज निवारण, भांडवलाचा पुरवठा, सहकारी संघटन, मालविक्रीची व्यवस्था, जमीन धारणाची इष्ट पद्धति इत्यादि बाबींचा समावेश झालेला त्यांच्या योजनेंत दिसत नाहीं. शिकलेले, स्वावलंबी व व्यवहारचतुर शेतकरी त्यांनीं कल्पिले असल्यानें ह्या गोष्टी त्यांस सुसाध्यच आहेत अशी त्यांची समजूत असावी.

## इंग्लंडमधील राजकीय घडामोडी

इंग्लंडच्या अंतर्गत राजकीय क्षेत्रांत घडामोडी झपाट्यानें चालू झाल्या आहेत. जर्मनीसारख्या शत्रूस कार्यक्षमतेनें तोंड देतां यावें म्हणून त्या देशांतील लोकांनीं आपले मतभेद बाजूस सारून संयुक्त मंत्रिमंडळ मि. चर्चिल यांचे नेतृत्वाखालीं स्थापन केलें आणि एकमुखी धोरणानें आजवर राज्यकारभाराचा गाडा हांकला. आतां युरोपांतील युद्धाचा यशस्वी शेवट झाला आहे आणि वादग्रस्त असे अंतर्गत पुनर्रचनेचे प्रश्न ब्रिटिश राष्ट्रास तातडीनें हातीं घ्यावयाचे आहेत. या दृष्टीनें संयुक्त मंत्रिमंडळ अस्थानीं बनलें असून पार्लमेंटची नवीन निवडणूक व नवीन मंत्रिमंडळाची स्थापना ह्या गोष्टी अगत्यांच्या झाल्या आहेत असा आग्रह मजूर पक्षानें धरल्याकारणानें मि. चर्चिल ह्यांस तशी व्यवस्था करणें प्राप्त झालें. जपानचा पराभव होईपर्यंत राजकीय पक्षांची जूट कायम रहावी आणि उपस्थित झालेल्या व होणाऱ्या अवघड आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा ब्रिटिश राष्ट्रानें एकविचारानें निर्णय लावावा अशी त्यांची इच्छा होती, ती निष्फळ ठरली आहे. पार्लमेंट बरखास्त होऊन कॉमन्स सभेच्या नवीन निवडणुकीची तयारी चालली आहे. पुनर्घटनेच्या आपापल्या कल्पना व योजना राजकीय पक्ष मतदारांपुढें मांडीत असून मजूरपक्षानें त्याबाबतींत प्रथम उडी घेतली आहे. आपला समाजसत्तावादमूलक कार्यक्रम त्या पक्षानें ब्रिटिश जनतेस सादर केला आहे आणि कॉंझरव्हेटिव्ह पक्ष वादाच्या आखाड्यांत लवकरच उतरेल. ह्या घडामोडींचा हिंदुस्थानांतील परिस्थितीवर काय परिणाम होतो तें पहावें.

## अमेरिकन व्यापाऱ्यांचा सहकारास विरोध

नैसर्गिक साधनांची विपुलता आणि मनुष्यनिर्मित संपत्ति ह्यांचें अमेरिका हें माहेरघर आहे. प्रस्तुत युद्धांत स्वतःच्या सैन्यास निरनिराळ्या आघाड्यांवर लढाऊ सामुग्री भरपूर प्रमाणांत पुरवून मित्रराष्ट्रांसहि "कर्ज उसनवार" पद्धतीनें अमेरिकेनें केलेलें विस्तृत सहाय प्रसिद्धच आहे. त्या श्रीमान् देशांत संपत्तीच्या उत्पादनाचें प्रमाण आणि जनतेच्या राहणीचें मान तुलनात्मक दृष्ट्या उच्च प्रतीचें आहे. ह्या कारणानें तेथें कामकरी वर्गाचें संघटन बलवान असलें तरी समाजसत्तावादाचा प्रसार विशेष झालेला नाहीं आणि वैयक्तिक आर्थिक साहस व स्वातंत्र्य ह्यांच्या जोरावर चाललेल्या कारखान्यांचें व धंद्यांचें प्राबल्य आहे. ह्या प्रकारची भांडवलशाही युद्धोत्तर काळांतहि अमेरिकेंत रूढ रहावी अशी तेथील धंदेवाल्यांची प्रबळ इच्छा आहे. सरासरीनें दर पांच माणसांत एकाची स्वतःच्या मालकीची मोटार गाडी त्या देशांत असून कामकरी कारखान्यांत आपापल्या मोटारींत बसून जातात अशी तेथें परिस्थिति आहे. तेव्हां समाजसत्तावादास अमेरिकेंतील सामाजिक वातावरण प्रतिकूल असावें ह्यांत नवल नाहीं. सहकारी संघटन, वैयक्तिक नफेबाजी व भांडवलशाही ह्यांच्या विरुद्ध दिशेनें आर्थिक व्यवहारांची व्यवस्था करीत असल्यानें त्याचेवर समाजसत्तावादाप्रमाणेंच अमेरिकन धंदेवाल्यांची वक्रदृष्टि आहे. अमेरिकेंत सहकारी संघटनाचा प्रभाव मुख्यत्वेंकरून, ग्रेट ब्रिटनप्रमाणें, कामकरी वर्गांत दिसून येतो आणि आपल्या सभासदांस दुकानदारीमार्फत माल पुरवण्याचें कार्य सहकारी संस्था तेथें करतात. गेल्या वर्षी त्यांची सुमारें साडे तीनशें कोटि रुपयांची उलाढाल झाली तरी ती अमेरिकेसारख्या देशांतील एकूण व्यापाराच्या मानानें केवळ दर्यामे खसखस अशीच होती. तरी पूर्वीच्या वर्षाच्या मानानें हा आकडा वाढलेला असल्यानें त्याचे योगानें व्यापारी वर्गाचें पित्त खवळलें असून त्यानें सहकारी संस्थांवर विरोधाचें शस्त्र उगारलें आहे.

## अमेरिकन सहकारी संस्थांचा प्रतिकार

इंग्लंड, हिंदुस्थान इत्यादि देशांत अमेरिकेप्रमाणेंच वैयक्तिक मालकीच्या धंद्यांचा सहकारी संस्थांवर डोळा असतो, आणि त्याचें मुख्य कारण ह्या संस्थांस सरकारकडून मिळणाऱ्या कांहीं सवलती हें असतें. सहकारी सहायानें चाललेल्या आर्थिक व औद्योगिक व्यवहारांची अनिष्ट स्पर्धा स्वतःच्या हिमतीवर धंदे करणारांस निष्कारण सहन करावी लागते अशी तक्रार ते लोक करीत असतात. माल पुरवणाऱ्या सहकारी संस्था आपल्या सभासदांस खरेदीच्या किंमतीवर " रिबेट " देतात, त्यावर प्राप्तीचा कर घेतला जात नाहीं हें शल्य त्यांस बोचतें. अमेरिकन व ब्रिटिश सहकारी संस्थांचें असें म्हणणें आहे कीं त्या " नफा "

मिळवीतच नाहींत आणि त्यांस "प्राप्ति" होत नाहीं. त्यांची प्राप्ति ही वस्तुतः त्यांच्या सभासदांची प्राप्ति असून तीहि नफ्याच्या स्वरूपाची नसते. बाजारभावानें खरेदी केलेल्या मालाच्या किंमतींतून दुकानांच्या खर्चांत झालेल्या बचतीचा अंश त्यांस रिबेट म्हणून मिळतो, ही त्यांची कांहीं "प्राप्ति" नव्हे. तथापि, धंदेवाल्यांची तक्रार विशेषतः रिबेटला प्राप्तीवरील कर लागू नाहीं ही नसून रिबेटचा पैसा सहकारी सभासद आपल्या संस्थांमध्यें ठेव म्हणून ठेवतात आणि त्यायोगानें त्यांचें भांडवल वाढतें आणि स्पर्धाक्षमता वृद्धिंगत होते, हें त्यांच्या पोटदुखीचें खरें कारण आहे. प्राप्तीवरील कर सहकारी संस्थांवर बसवण्यांत आल्यास आत्मसंरक्षणाचा एक रामबाण उपाय अवलंबणें त्यांच्या हातीं आहे. स्वीडनमधील सहकारी संस्थांचें अनुकरण करून सभासदांस रिबेट देण्याचे ऐवजी बाजार भावापेक्षा कमी किंमतीनें त्यांस माल विकतां येईल. असें झालें असतां नफ्याचा किंवा रिबेटचा आणि अर्थात् प्राप्तीवरील कराचा प्रश्न सहकारी संस्थांचे बाबतींत उद्भवणारच नाहीं. अमेरिकेंतील सहकारी कार्यकर्ते आपली संघटना अधिक विस्तृत व बळकट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ह्या विस्तारास पुष्कळ वाव असून विविध प्रकाराचे व्यवहार सहकाराच्या क्षेत्रांत आणतां येण्यासारखे आहेत. सामान्य स्थितींतल्या लोकांच्या निरनिराळ्या गरजा भागवण्याकडे सहकारी संघटनाचा उपयोग करतां येईल ह्याची जाणीव अमेरिकन सहकारी कार्यकर्त्यांस आहे आणि त्या दिशेनें त्यांची खटपट चालू आहे.

---

### पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, लि. पुणें

ही संस्था ता. १८-४-१९४५ रोजीं नं. ९००० नें रजिस्टर झाली आहे. सदर संघाची पहिली साधारण सभा बुधवार ता. ३०-५-१९४५ रोजीं दोन प्रहरीं ४–३० वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे इमारतींत खालील कामांचा विचार करण्याकरितां बोलाविली आहेः—(१) अध्यक्षांची निवड करणें, (२) मे. रजिस्ट्रारसाहेब यांचेकडून सुचविलेल्या दुरुस्तीसह मंजूर होऊन आलेले पोट-नियम स्वीकारणें, (३) नवीन सभासद करून घेणें, (४) मॅनेजर नेमणें व त्यांचें वेतन ठरविणें, (५) ता. १५-५-१९४५ अखेरचा जमाखर्चाचा तक्ता व रिपोर्ट दाखल करून घेणें आणि (६) मे. अध्यक्ष यांचे परवानगीनें ऐनवेळीं येणारे कामांचा विचार करणें.

मॅनेजिंग कमिटीवर सरकारनें खालील गृहस्थांची नेमणूक केली असल्याचें समजतें.

१ प्रिं. डी. आर. गाडगीळ, ( पुणें )
२ रा. दा. वा. पोतदार, ( पुणें )
३ रा. ज. तु. सावंत, ( कोरेगांव मूळ )
४ रा. सा. य. द. खोले, ( पुणें )
५ रा. ब. ग. गो. शेंबेकर, ( बारामती )
७ रा. गं. जा. शितोळे, ( पाटस )

---

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेनें १९४४ सालीं एकूण ४७ नव्या शाखा स्थापन केल्या व ५०,००० रुपयांच्या देणग्या दिल्या.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.
टेलिफोन नं. १५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००
भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००
खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड " | २५ मालेगांव " |
| ३ किर्लोस्करवाडी " | २६ नांदगांव " |
| ४ कोरेगांव " | २७ घोटी " |
| ५ इस्लामपूर " | २८ सटाणा " |
| ६ शिराळें " | २९ येवलें " |
| ७ तासगांव " | ३० मनमाड |
| ८ वांई " | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद " | ३२ दोंडाईचें " |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार " |
| ११ कल्याण " | ३४ साक्री " |
| १२ पालघर " | ३५ शहादें " |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर " |
| १४ अहमदनगर ( " अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें " |
| १५ बेलापूर रोड " | ३८ तळोदें " |
| १६ कोपरगांव " | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी " | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी " | ४१ गोध्रा " |
| १९ शेवगांव " | ४२ झालोद " |
| २० वांबोरी " | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गाव) " | ४४ नडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद " |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड " |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक "अर्थ", यांसी—

सा. न. वि. वि.

ज्या गतीनें व पद्धतीनें आपण आपले महाराष्ट्रीय कारखाने काढले, वाढवले, लहानाचे मोठे केले तीच गति व त्याच पद्धति आपण यापुढें चालू ठेवल्या तर तें योग्य होईल का !—या प्रश्नाच्या नकारार्थी उत्तराला कांहीं अपवाद आहेत. परदेशी वा परप्रांतीय स्पर्धा नाहीं, बाजारपेठ स्थानिक स्वरूपाची आहे, उत्पादन लहान प्रमाणावर राहून त्यांत नफा भरपूर सुटतो अशा मालाचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची स्थिति अपवादात्मक राहण्याची शक्यता आहे.

माझ्या समजुतीनें असे कारखाने फार नसावेत. उद्यांच्या व्यापारी चढाओढींचें स्वरूप आज निश्चितपणें सांगतां येत नसलें तरी कल्पना करतां येते. वाहणाऱ्या वाऱ्यांची दिशा सुस्पष्ट आहे. इंग्लंड, अमेरिका व रशिया हिंदुस्थानांत माल खपविण्याच्या उद्योगास लागतील. जर्मनी—जपानच्या मालाची आयात तेथील कारखान्यांची स्थिति काय होते, तेथील तज्ज्ञ माणसें व मनुष्यबळ किती शिलक राहील यावर अवलंबून राहील. परप्रांतांतील कारखानदारांची वाढती श्रीमंती व उद्योगधंद्यांचे पसारे पुढील परिस्थितीची जाणीव होण्यास पुरेसे आहेत.

गेलीं ५—७ वर्षे मालाच्या किंमतवाढीचीं गेलीं. यापुढें ही स्थिति फार दिवस टिकणार आहे का ? युद्धकाळांत वाढलेलें उत्पादन बाजार-पेठेंत खपविण्याची व्यवस्था आम्ही करीत आहोंत का ? त्यांत आम्हांला आज मिळत असलेला नफा मिळेल का ?

युद्धपर्वात ६ पासून १६ टक्के पर्यंत व्याज व डिव्हिडंड घेतलेले ठेवीदार व शेअर होल्डर्स उद्यां कारखानदारांकडे रोखून बघतील तर परदेशी स्वस्त व सुबक माल खरेदी करणारा व्यापारी भेटण्यासही नाखुषीच दर्शवील. नवीन येत असलेल्या समाज-व्यवस्थेंत कामगार कारखानदारांकडे अधिक व्यापारी व व्यवहारी दृष्टीनें पहावयास लागतील. त्यांना त्यांच्या हक्कांची समज नीट देण्यांत येत आहे. सरकारी कर कमी न होतां आणखी वाढण्याची शक्यताच अधिक आहे. ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांतील करविषयक कायदे, कामगारांच्या हित-संरक्षणाचे कायदे दिवसेंदिवस सम पातळीवरच येत आहेत.

रु. ५,००,००० चे रु. ४,००,००० होण्यास २० टक्के कपात पुरते हें साधें गणित आहे. असें झाल्यास काय करावयाचें हें मात्र कारखान्यांच्या व्यवहारांतील अत्यंत अवघड उदाहरण आहे ! कंपनीचे मालक, शेअर-होल्डर्स, सावकार, ठेवीदार, माल बनविणारे कामगार व खपविणारे व्यापारी यांच्याशीं गेल्या सुगीच्या वर्षांत आमच्या कारखानदारांचे कोणत्या स्वरूपाचे संबंध होते, त्यांनीं त्यांची सहानुभूति व आत्मीयता किती संपादन केली आहे यावरच, मला वाटतें, आपल्या कारखान्यांचें बरेंचसें भवितव्य अवलंबून राहील ! जागतिक परिस्थिति व सरकारी धोरण यावर मीं लिहावयास पाहिजेच का ? प्रत्यहीं बदलणाऱ्या व गृहीत धरावयाच्या त्या गोष्टी ! किती लिहिणार मी त्यांवर ? अन् आज लिहिलेलें उद्याला टिकणार असें थोडेंच आहे ?

प्रचंड उत्पादनाच्या व जाहीरातबाजीच्या नवीन युगांत व्यक्तिगत किंवा व्यक्तिगत स्वरूपाचे प्रयत्न पुरे पडणार नाहींत. पैशाचें व माणसांचें भरपूर भांडवल मिळवूनच कार्यास सुरवात केलेली बरी. अपुऱ्या पैशाच्या, अपुऱ्या अ-तज्ज्ञ, एकरूप न होणाऱ्या माणसांच्या भांडवलावर उभारलेले प्रयत्न यशस्वी कां व कसे होणार ?

—संजय

## मुंबई शेअर बाजार

(मेसर्स व्ही. एम्. लिमये आणि कं. पुणें ४ यांजकडून)

व्याज-वजा (xd)
इंडि. युना. ३०—५—४५

व्याज-वजा (xd)
सिंप्लेक्स ५—७—४५
न्यू इंडिया ९—७—४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २२।५।४५ | बुधवार २३।५।४५ | गुरुवार २४।५।४५ | शुक्रवार २५।५।४५ | सोमवार २८।५।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१६०—० | २१६१—४ | २१४५—० | २१५२—८ | २१३६—४ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०४—० | ४०४—८ | ४००—० | ४०२—० | ३९८—८ |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९०१—४ | १९०६—४ | १९००—० | १९०६—४ | १८७८-१२ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१४—० | ६१५—० | ६१०—८ | ६१२—० | ६०७—८ |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५३२—० | ५३२—० | ५२९—० | ५३७—० | ५३४—० |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३७६—० | ३७७—० | ३७६—० | ३७७—८ | ३७९—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २९७—० | २९६—८ | २९३—८ | २९४—८ | २९२—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०४—० | ३०२—० | ३०१—० | ३०२—८ | ३००—० |
| ३०५; २१८ | १२-०-०§ | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८५—८ | २८५—८ | २८८—८ | २८९—० | २८३—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-०-३ | ४-०-६ | ३-१५-६ | ३-१५-० | ३-१४-९ |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-२-६ | १५-२-६ | १५-१-० | १५-२-० | १५-०-० |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३-१-६ | ३-२-० | ३-१-६ | ३-१-३ | ३-१-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७२३-१२ | ७१६—४ | ७१७—८ | ७२०—० | ७१३-१२ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३९—० | २३८—८ | २३७—८ | २३८—० | २३६—८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१८—० | २१८—८ | २१८—० | २१८—० | २१९—८ |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४५—० | ५४०—० | ५३५—० | ५३५—० | ५३६—४ |
| ९३-१२; ७३ | १-८-० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८०—० | ८०—४ | ८०—० | ८०—० | ८०—० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३४-११ | ३५—३ | ३५—५ | ३५-१० | ३५—८ |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५०—० | ५१—० | ५१—० | ५१—० | ५१—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | १९—२ | १९-११ | २०-१२ | २०-१२ | २०-१२ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६८—८ | ६८—० | ६८—० | ६७—८ | ६८—० |
| | | | ३½% रोखे | १०० | १००—२ | १००—३ | १००—३ | १००—४ | १००-५-० |

वर्ग पुस्तकें (ट्रा. बुकें) बंद
न्यू इंडिया ॲशु. १—६—४५ ते २९—६—४५

## माढें तालुक्यांत मुंबईच्या कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतच्या कायद्याचा प्रचार

सोलापूर जिल्ह्यांतील माढा, माळशिरस व करमाळा या तीन तालुक्यांना तारीख १।५।४५ पासून मुंबईच्या कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा कायदा लागू करण्यांत आला असून या कायद्याअन्वयें माढा व करमाळें तालुक्यांकरितां कुर्डुवाडी येथें व माळशिरस तालुक्याकरितां माळशिरस येथें बोर्ड स्थापन करणेंत आलें आहे.

या कायद्याअन्वयें बोर्डाकडे अर्ज करणेची मुदत १८ महिन्यांचे ऐवजीं ६ महिन्यांची करण्यांत आलेली आहे. मुदत फारच थोडी असलेमुळें या मुदतींत सर्व कर्जदार शेतकऱ्यांनीं अर्ज करणें जरूर आहे. वरील कायद्याची माहिती खेड्यांतील शेतकऱ्यांना व्हावी म्हणून सोलापूर जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर श्री. चौधरी यांनीं माढा तालुक्यांतील लोकांना कायद्यासंबंधी माहिती देण्याकरितां माढा, कुर्डुवाडी, आष्टें, आकुंभे, शेटफळ, उपळाई, सुर्डे मोहोळ व सौंदणें या गांवीं सेंटर्स ठरवून व त्याप्रमाणें प्रत्येक सेंटरला आसपासचे गावांतील लोकांना बोलावण्यांत येऊन थोडक्यांत उपयुक्त अशी माहिती दिली. या खेरीज वरील सेंटर्सच्या ठिकाणीं ज्या गांवांतील लोक येऊं शकले नाहींत अशा गांवीं प्रत्यक्ष जाऊन लोकांना माहिती देण्यांत आली. याप्रमाणें माढें तालुक्यांतील एकूण ४५ गावांतील लोकांना माहिती देण्यांत आली. या प्रचाराचे कामीं माढें तालुक्याचे मामलेदारसाहेब यांनीं प्रत्येक गांवीं प्रत्येक गांवचे गांवकामगार यांना वरील सेंटर्सला लोक हजर ठेवणेबद्दल कळवून बरीच मदत केली.

या प्रचाराचे वेळीं माढा ता. को. सुपरवायझिंग युनियनचे सुपरवाझर श्री. पानसरे यांनींहि भाग घेऊन वरील कायद्याचे महत्त्व लोकांना पटवून दिलें. तसेंच माढा ता. डेव्हलपमेंट असोसिएशनचे फील्डमन श्री. राऊत यांनीं प्रत्येक ठिकाणीं हजर राहून सुधारलेल्या पद्धतीनें शेती करून आपलें उत्पन्न कसें वाढवावें याबद्दल माहिती दिली. डि. को. ऑ. अधिकारी यांचा दौरा ता. २५ ते ३१।५।४५ अखेर माळशिरस तालुक्यांत होणार आहे. तरी त्या तालुक्यांतील लोकांनीं या संधीचा फायदा घ्यावा. या कामीं ज्यांना माहिती पाहिजे असेल ती देणेची सोय माढा ता. को. सुपरवायझिंग युनिअनमध्यें केली आहे.

---

## पू. खा. डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग यूनियन्स लि.

जळगावच्या एज्युकेशन कमिटीच्या विद्यमानें शेतकी पतपेढ्यांचे सेक्रेटरींना सहकाराचें व दप्तरी हिशेब ठेवण्याचें शिक्षण देणारा वर्ग चाळिसगांव येथें ता. ९-४-४५ ते ता. २८-४-४५ पावेतों भरविण्यांत आला होता. क्लासचा फायदा ६८ उमेदवारांनीं घेतला व ६४ उमेदवार अभ्यासक्रमाचे शेवटीं घेतलेल्या परीक्षेस बसले. क्लासचा उद्घाटन समारंभ चाळिसगांव येथील व जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते श्री. व्हीं. एच. पाटसकर वकील यांचे हस्तें ता. ९-४-४५ रोजीं सकाळीं करण्यांत आला. समारोप समारंभ ता. २८-४-४५ रोजीं सायंकाळीं रावसाहेब डॉक्टर जी. आर. चव्हाण, चेअरमन चाळिसगांव ता. को. सुपरवायझिंग यूनियन, यांचे हस्तें करण्यांत आला.


डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

**लायसॉफ**

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

दोन वेळां उपयोग

दि मागोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —

**—त्वरा करा—**

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ताः—

तुळजाराम मोदी

मोतीचौक, सातारा.

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०**

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिसः-खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : १०,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः— नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.

गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.

मॅनेजिंग डायरेक्टर्स.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ६ जून १९४५ अंक २३

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

### डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री—श्री—श्री—श्री—श्री

## विविध माहिती

### ४० लक्ष रुपयांची फसवेगिरी

अलिपूर टेलिग्राफ स्टोर्समध्यें फसवणुकीचा एक प्रकार आढळला असून त्यामुळें हिंदुस्थान सरकारचें ४० लक्ष रुपयांचें नुकसान झालें आहे. चौकशी चालू आहे.

### अमेरिकेची सैनिक हानी

चालू महायुद्धांत अमेरिकेचे १० लाखांवर सैनिक आतांपर्यंत कामास आले आहेत. त्यांत २,२७,०९७ मृत, ६,०७,४६८ जखमी, ६३,४५५ बेपत्ता व १,०४,८६७ युद्धकैदी झाले आहेत.

### किर्लोस्करवाडी येथें ऑइल इंजनांचें उत्पादन

ब्रश इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग कंपनी व ब्रिटिश ऑइल इंजिन एक्सपोर्ट कंपनी ह्यांचे किर्लोस्कर बंधूबरोबर करार झाले आहेत. त्या अन्वयें, वरील दोन ब्रिटिश कंपन्यांचा माल किर्लोस्करवाडी येथें तयार होऊन हिंदुस्थानांत विकला जाईल. दीड ते पंधराशें अश्वशक्तीचीं सर्व तऱ्हेचीं इंजनें किर्लोस्करांच्या कारखान्यांत तयार होऊं लागतील व त्यासाठी कारखाना वाढविण्यांत येईल.

### आर्थिक नियोजन आणि मध्यवर्ती सरकार

"नियोजनात्मक आर्थिक प्रगति घडून येण्यास हिंदुस्थानांत बलवान मध्यवर्ती राजकीय सत्ता अत्यावश्यक आहे, पण एकीकडे सध्या अधिकारारूढ असलेलें सरकार कामचलाऊ स्वरूपाचें असल्यानें त्यावर जनतेचा विश्वास नाहीं आणि दुसरीकडे स्वतंत्र मध्यवर्ती सरकाराच्या स्थापनेस एक मोठा हिंदी राजकीय पक्ष विरोध करीत आहे. ह्या दृष्टीनें पहातां हिंदुस्थानच्या भवितव्याची किल्ली राजकीय क्षेत्रांतच शोधावी लागेल आणि लॉर्ड वेव्हल इंग्लंडमधील आपल्या वाटाघाटीनंतर हिंदुस्थानांत ह्या संबंधांतली कोणती योजना बरोबर घेऊन जातात ह्यावर पुढील घडामोडी अवलंबून रहातील." —मँचेस्टर गार्डिअन.

### ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान

"परतंत्र देशांस घटनात्मक आणि भरीव स्वातंत्र्य देण्याची आपली इच्छा इंग्लंडनें व्यक्त केली आहे, तिच्या सत्यपणाची कसोटी ब्रह्मदेशांत बनवल्या जाणाऱ्या राज्यघटनेनें लावावयाची आहे अशी हिंदुस्थानची समजूत आहे." —लंडन टाइम्स.

### कपास गोळा करतांना होणारा पानांचा उपद्रव

कपाशीचीं बोंडें तोडतांना, पानांचा मोठा अडथळा येतो. पानांच्या सावलीमुळें बोंडें तयार होण्यास वेळ लागतो, बोंडें नीट फुटत नाहींत व त्याचा उत्पादनावर परिणाम होतो. ह्यावर उपाय म्हणून अमेरिकन सायनामिड कंपनीनें एरो डिफोलिअंट ह्या नांवाची एक औषधी पूड तयार केली आहे, ती विमानांतून कपाशीच्या शेतांवर टाकली म्हणजे थोड्याच दिवसांत पानें गळून पडतात. कपाशीवर मात्र त्याचा वाईट परिणाम न होतां, काड्यांवर पांढरा कापूस तेवढा शिल्लक रहातो. कॅलिफोर्नियांतील कपाशीच्या शेतांवर ह्या शोधाचा प्रयोग गेल्या मोसमांत करण्यांत आला, तो यशस्वी ठरला आहे. कपास गोळा करण्यासाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग करण्याची कल्पना त्यामुळें लवकर व्यवहारांत येईल, अशी अपेक्षा आहे.

### मद्रास प्रांताची युद्धोत्तर पुनर्घटना

मद्रास प्रांतानें आपल्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेची रूपरेषा देणारें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. ह्या योजनेस एकूण १३६३ कोटि रुपये खर्च येईल, त्यापैकीं ५० कोटि रुपयांचा खर्च मध्यवर्ती सरकार सोशील.

### अमेरिका डॉलर्स कसे मिळविणार ?

"अमेरिका आजवर माल निर्गत करीत होती तरी इतर देशांचा माल आयात होऊं देण्यास ती नाखुष होती. त्याकारणानें, अमेरिकेच्या निर्गतीची फेड होणें कठीण जाई. परदेशीं गुंतविलेल्या रकमांवरील व्याज वसूल करणेंहि अमेरिकेला कठीण जाई. ही परिस्थिति सुधारली पाहिजे. परदेशांतून प्रवासी उतारू आकर्षून त्यांस अमेरिकेंत पैसा खर्च करण्यास लावणें हा त्या पैशाच्या किंमतीचा माल निर्गत करण्यासारखेंच आहे." —अमेरिकेचे व्यापारखात्याचे सेक्रेटरी, मि. हेन्री ए. वॅलेस.

### देना बँकेची मद्रास येथील शाखा

देवकरण नानजी बँकिंग कं. लि. ची मद्रास येथील शाखा ता. ५ जून रोजीं उघडण्यांत आली. ती धरून बँकेच्या आतां ४२ शाखा झाल्या आहेत.

### अलाहाबाद बँक लि.

"चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना" शीं वरील बँक संलग्न आहे. तिच्या ताळेबंदांतील कांहीं आंकडे उद्बोधक आहेत. बँकेचें वसूल भांडवल ३५३ लक्ष रुपये आहे व रिझर्व्ह फंड ६० लक्ष रुपये आहे. शाखांच्या विस्तारासाठी बँकेनें ६३,७२५ रुपयांचा फंड वेगळा काढून ठेवला आहे ! २३ कोटींच्या ठेवींपैकी ९ कोटी रुपये मुदती ठेवींचे आहेत. बँकेच्या ५ डायरेक्टरांपैकीं ३ युरोपियन आहेत. अध्यक्ष व जनरल मॅनेजर युरोपियन आहेत.

### दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

या बँकेची पहिली शाखा, गेल्या गुढीपाडव्यापासून इचलकरंजी येथें मोठ्या प्रमाणांत सुरू झाली आहे. आतां या बँकेची दुसरी शाखा हुपरी (पेटा हातकणंगले) येथें सुरू झाली आहे. तिचा उद्घाटन समारंभ, रविवार ता. ३।६।४५ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां हुपरी येथील श्रीअंबाबाईचे देवळांत, कोल्हापूर संस्थानचे सरसुभेसाहेब रावब.पी. बी. पाटील यांच्या हस्तें झाला. बँकेचें खेळतें भांडवल १५ लक्ष रुपयांवर आहे. श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.


## Deccan Institute of Commerce, Poona

(Recognised by Government)

Opens for 1945-46 Session on Monday the 25th June. Students coached up for G. D. C. & C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st Part) G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Last date admission 15th July. Morning and evening classes. Highly qualified and experienced staff. Prospectus free on application to:

592/3 Budwar Peth,<br>Opp. New English School,<br>Poona. } SECRETARY.

# अर्थ

## हिंदी कारखानदारांचें इंग्लंडमधील कार्य

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक नियोजन मंत्री, सर आर्देशीर दलाल आणि श्री. बिर्ला, श्री. टाटा इत्यादि प्रमुख हिंदी कारखानदार सध्या इंग्लंडमध्यें आपापल्या कार्यांत व्यापृत असून त्याचा उद्देश स्पष्ट करीत आहेत. ब्रिटिश उद्योगधंद्यांत झालेल्या सुधारणांचें अवलोकन करून हिंदी व्यापार व कारखाने ह्यांची प्रगति घडवून आणण्यासाठी काय करणें इष्ट आहे ह्याची कल्पना बांधणें आणि ह्या कामीं ब्रिटिश धंदेवाल्यांचें शक्य तेवढें सहाय संपादन करणें हा आपला उद्देश आहे असें श्री. बिर्ला आदिकरून हिंदी कारखानदारांनीं म्हटलें आहे. आपण विशिष्ट ठरलेल्या धोरणानें शिष्टमंडळ म्हणून एकत्र इंग्लंडला आलों नाहीं, आपला हिंदुस्थान सरकारशीं संबंध नाहीं, आपणांपैकीं प्रत्येकजण स्वतंत्र रीतीनें पहाणी व बोलणीं-चालणीं करण्यास मोकळा आहे आणि राष्ट्रीय मध्यवर्ती सरकार हिंदुस्थानांत स्थापन झाल्यावांचून येथील औद्योगीकरण शक्य नाहीं हें आपलें मत ठाम आहे असा खुलासा त्यांनीं केला आहे. हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति स्वतःच्या हितास बाधक नसून परिपोषकच आहे ह्या जाणिवेनें ब्रिटिश कारखानदारांनीं त्यांचें स्वागत केलें आहे. हिंदी कारखानदारांस मुख्यत्वेंकरून ब्रिटिश यंत्रसामुग्री आणि यांत्रिक तज्ञांचें सहाय ह्यांची आवश्यकता तीव्रतेनें भासत आहे आणि त्यांचा पुरवठा मामुली व्यापारी व्यवहाराच्या स्वरूपांत करतांना भागीदारीसारख्या अटी इंग्लंडमधील कारखानदार लादतात कीं काय आणि त्या कमी-अधिक प्रमाणांत मान्य केल्या जातात कीं काय हा येथें खरोखर महत्त्वाचा प्रश्न आहे.

हिंदी कारखानदारांच्या ब्रिटिश धंदेवाल्यांशीं चाललेल्या वाटाघाटीविषयीं कुतूहल आणि शंका ह्या देशांत प्रदर्शित केल्या जात आहेत ह्याचें कारण त्यांतून कोणते व्यापारी करार निष्पन्न होतात ह्यासंबंधांतील लोकांस वाटणारी भीति हें आहे. स्वतःच्या दृष्टीनें योग्य दिसतील ते करार करण्यास ते समर्थ आहेत, परंतु स्वतःच्या धंद्यांस लागणारें जकातीचें व इतर संरक्षण ते पुढें मागूं लागतील तेव्हां तो राष्ट्रीय धोरणाचा व हिंदी जनतेच्या स्वार्थत्यागाचा प्रश्न होईल. हिंदी भांडवलानें व हिंदी लोकांच्या फायद्यासाठीं चालविल्या जाणाऱ्या कारखान्यांसच तेवढें संरक्षण द्यावें अशी त्यांची आजपर्यंतची मागणी असून ती यथार्थ आहे अशी समजूत देशांत दृढ झाली आहे. ह्या राष्ट्रीय धोरणाशीं विसंगत असे वैयक्तिक करार त्यांचेपैकीं कोणीं केल्यास तें लोकमतास पसंत पडणार नाहीं. अशा करारांची भाषा बोलण्यांत आल्याच्या बातम्या कानीं आल्यावरूनच इंग्लंडमध्यें सध्या वाटाघाटी करीत असलेल्या हिंदी कारखानदारांच्या कार्यक्रमावर टीका झालेली आहे. हिंदुस्थानचें औद्योगीकरण राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेवांचून इष्ट नाहीं हें मत जर सर्वमान्य आहे तर ही गोष्ट घडून येण्यापूर्वीच ब्रिटिश कारखानदारांशीं बंधनकारक करार करणें कितीसें श्रेयस्कर आहे असा प्रश्न विचारण्यांत येत असून श्री. बिर्ला आदिकरून पुढाऱ्यांनीं केलेल्या खुलाशांत त्यास उत्तर नाहीं. त्यांच्याशीं संबंध असलेल्या कांहीं व्यक्तींनीं आणि प्रत्यक्ष सर आर्देशीर दलाल यांनीं काढलेल्या विशिष्ट उद्गारांनीं टीकाकारांची शंका दृढ झाली आहे. स्वदेशी धंद्यांत ब्रिटिश कारखानदारांस थोडीशी भागीदारी देण्यास काय हरकत आहे, त्यांत हिंदी भांडवलाचें व व्यवस्थेचें वर्चस्व असलें म्हणजे झालें, असाहि युक्तिवाद केला जात आहे. आम्हांस हिंदुस्थानचें औद्योगीकरण नाहीं झालें तरी पुरवेल पण आम्हीं आपलें आर्थिक व पर्यायानें राजकीय स्वातंत्र्य यत्किंचितही गमावण्यास तयार नाहीं, अशी निर्वाणीची भाषा बोलण्यांत येत आहे, तिचें रहस्य ध्यानांत येणें आवश्यक आहे. हा राष्ट्रीय आर्थिक धोरणाचा विषय आहे आणि त्याचे संबंधांतील निर्णय सध्याचें हिंदुस्थान सरकार व व्यक्तिशः मोठे कारखानदार करूं शकत नाहींत. हिंदी घटना कायद्यांत ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हितसंरक्षणार्थ घातलेले निर्बंध काढून टाकण्याचा प्रश्न ह्याच वेळीं सर आर्देशीर हाताळीत आहेत हें विसरून चालणार नाहीं. त्यांचें इंग्लंडमधील कार्य आणि हिंदी कारखानदारांच्या तेथील वाटाघाटी ह्यांचा ह्या रीतीनें महत्त्वाचा परस्पर संबंध आहे हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

हिंदी कारखानदारांचा इंग्लंडमधील दौरा हा ह्या देशांत वादाचा विषय झाला असून त्याचे संबंधांत शंका आणि खुलासे प्रसिद्ध होत आहेत, ह्या कारणानें त्याची फोड करणें आवश्यक झालें आहे. स्वदेशी उद्योगधंद्यांची उन्नति साधण्यासाठीं हिंदी कारखानदारांनीं इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत जाऊन आवश्यक ती यंत्रसामुग्रीच्या खरेदीची वगैरे व्यवस्था करावी हें त्यांचें पुरोगामी कर्तव्यच आहे. त्याचप्रमाणें, त्यांनीं आपापल्या धंद्यांच्या दृष्टीनें जरूर ते करार परस्थ व्यापाऱ्यांशीं करावे हेंहि सरळ आहे. परदेशीय कारखानदार व व्यापारी त्यांस पटतील अशा अटींवरच हे सौदे करावयास तयार होतील हें उघड आहे. व्यापारी व्यवहार एकांगी असूं शकत नाहींत; ते व्यवहार करणाऱ्या दोन बाजूंस हितावह व सोईचे असावे लागतात. ह्या दृष्टीनें हिंदी कारखानदारांच्या परदेशांतील दौऱ्यांत आक्षेप घेण्यासारखें कांहीं नाहीं. तथापि, त्यांचे सौदे सरकारच्या विद्यमानें व्हावयाच्या हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या योजनेचा एक महत्त्वाचा भाग होणार आहेत ह्याची आठवण ठेवली पाहिजे. विशिष्ट कारखानदारांच्या वैयक्तिक इच्छा, नफ्याच्या अपेक्षा व सोयी ह्यांचाच केवळ हा प्रश्न नसून सबंद हिंदी राष्ट्राच्या योजनात्मक उन्नतीचा त्याच्याशीं निकट संबंध आहे. तसेंच, हिंदी राष्ट्रीय राजकारणापासून तो सर्वस्वीं अलिप्त ठेवतां येत नाहीं. औद्योगीकरणाचा राजकीय स्वातंत्र्याशीं मेळ घालावा लागणार आहे ही गोष्ट हिंदी कारखानदारांसहि मान्य आहे. तेव्हां, त्यांचे वैयक्तिक व्यवहार निश्चित राष्ट्रीय धोरणाशीं सुसंगत असले पाहिजेत हें स्पष्ट आहे.

### श्री स्टार्स फिल्म कं. लि.

हिंदुस्थानांत सर्वत्र सिनेमाचा प्रसार करण्याकरितां वरील नांवाची कंपनी इंग्लंडमध्यें नोंदण्यांत आली आहे. ब्रिटिश फिल्म कंपन्यांच्या व हिंदुस्थानांत, नव्यानें स्थापावयाच्या एका कंपनीच्या सहकार्यानें वरील कंपनी काम करणार आहे. सर फ्रॅन्सिस प्राइस हे तिचे चेअरमन आहेत.

## पुण्याची आर्थिक पहाणी

### प्रि. गाडगीळ ह्यांचा नवा ग्रंथ

(१)

प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं आपल्या गोखले इन्स्टि-ट्यूटमधील मदतनीसांच्या सहाय्यानें पुणें शहरांतील नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक पहाणीचें काम ऑगस्ट, १९३६ मध्यें सुरू केलें. पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें ह्या कार्यास एकूण ५,२४० रुपयांची मदत दिली. सबर्बन म्युनिसिपॅलिटीनें ५०० रुपये मंजूर केले. पूना कँटोन्मेंट बोर्ड कोणत्याच प्रकारें आर्थिक सहाय करूं शकलें नाहीं, त्या कारणानें पहाणीचें क्षेत्र शहर व सबर्बन हद्द एवढेंच मर्यादित झालें. " सोशल सर्व्हेज ऑफ मर्सीसाइड " ही सुप्रसिद्ध पहाणी आदर्श म्हणून ठेवण्यांत आली. माहिती गोळा करून तिची मांडणी करणें व तीवरें रिपोर्ट लिहिणें ह्या सर्व कामास अपेक्षेबाहेर वेळ लागला आणि छपाईसहि उशीर झाला. पहाणीचा पहिला खंड नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत आर्थिक माहितीचें संकलनच मुख्यत: आलें असून दुसऱ्या खंडांत सामाजिक माहिती प्रसिद्ध होईल. प्रस्तुत पहिल्या खंडाचीं ३०० पृष्ठें झालीं असून तीं माहितीनें, आराखड्यांनीं व तक्त्यांनीं भरगच्च भरलीं आहेत. पृष्ठसंख्या ३०० असून किंमत १५ रुपये ठेवण्यांत आली आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभीं पुणें शहराच्या वाढीचा इतिहास देण्यांत आला आहे. " अर्था "च्या गेल्या दिवाळी अंकांत त्याचे आधारावर प्रि. गाडगीळ ह्यांचे प्रमुख सहायक, श्री. एन. व्ही. सोवनी ह्यांनीं लिहिलेला लेख प्रसिद्ध झाला होता. ही ऐतिहासिक माहिती श्री. सोवनी ह्यांनींच परिश्रमपूर्वक मिळविलेली आहे. पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणांत पुण्यांतील लोकसंख्येविषयीं वेगवेगळया दृष्टींनीं माहिती दिली आहे, ती उपयुक्त व लोकांच्या रहाणीवर प्रकाश पाडणारी आहे. उदाहरणार्थ, रहाणीचें मान हें कुटुंबांनीं नेमलेल्या नोकरांच्या संख्येवरून अजमावतां येतें. नाना, गंज, मंगळवार व गणेश ह्या पेठांत घरगुती कामावर नोकर फारच कमी आढळतात. भवानी व कसबा पेठांत तें प्रमाण किंचित ज्यास्त आहे. घरगुती नोकरांच्या पगाराची छाननी केली तर दर नोकराचा दरमहा पगार सरासरीनें ४ रु. ३ आ. पडतो ह्याचा अर्थ, बहुसंख्य नोकर हे कांहीं तासांपुरते किंवा ठराविक कामापुरतेच नेमलेले होते. प्रत्येक पेठेंतील किती कुटुंबांत कामासाठी नोकर आहे, हें पाहिलें तर बुधवार आणि रास्ता ह्या पेठांतील निम्म्याहून अधिक कुटुंबांनीं नोकर-माणूस ठेवलेला आहे, असें आढळून येतें. शनवार, सदाशिव व नारायण पेठांत अशा कुटुंबांचें एकूण कुटुंबांशीं प्रमाण ४०% ते ५०% पडतें. नोकर ठेवणाऱ्या कुटुंबांपैकी एकापेक्षा अधिक नोकर ठेवणारीं कुटुंबें फारशीं नाहींत. एकट्या शिवाजीनगर पेठेंत नोकरांचा हा आकडा १–५ पेक्षा ज्यास्त आढळतो. सबर्बन हद्दींत नोकर ठेवणाऱ्या कुटुंबांत सरासरीनें ३ पेक्षा ज्यास्त नोकर असतात ! दर नोकराच्या मासिक सरासरी पगाराची सबंद शहराची सरासरी ४ रुपये ३ आणे आहे; शिवाजीनगर पेठेंत ती ८ रुपये आहे व सबर्बन हद्दींत ती १७ रुपये आहे. ह्याचा अर्थ, शिवाजीनगर व सबर्बन येथें नोकरांची संख्याहि ज्यास्त आहे व त्यांत पार्ट-टाइम काम करणारांची संख्या तुलनेनें पहातां कमी आहे. स्वैंपाकी, इत्यादि नोकर मालकाचे घरीं जेवतात व त्या दृष्टीनें त्यांचा पगार ठरविलेला असतो ही गोष्ट वरील हिशेबांत स्पष्ट नाहीं.

## सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेंत जागतिक आर्थिक स्वास्थ्य

सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेचें काम कल्पनेच्या बाहेर रेंगाळत चाललें आहे ह्याचें मुख्य कारण प्रमुख राष्ट्रांचेमध्यें महत्त्वाच्या व मूलग्राही प्रश्नांवर उपस्थित होणारे मतभेद हें आहे. इंग्लंड व अमेरिका एका बाजूस आणि रशिया दुसऱ्या बाजूस अशा रीतीनें हा वाद चालला आहे आणि ह्या राष्ट्रांचा दृष्टिकोन कित्येक तात्विक बाबतींत भिन्न असल्याचें दिसून आलें आहे. तसेंच, प्रमुख राष्ट्रें आणि लहान व कमकुवत राष्ट्रें ह्यांचीहि कांहीं प्रश्नांचे संबंधांत एकवाक्यता होत नाहीं. पोलंडच्या बाबतींतलें रशियाचें धोरण इंग्लंड व अमेरिका ह्यांस पसंत नाहीं, आणि सॅनफ्रॅन्सिस्को परिषद् जागतिक सुरक्षिततेची योजना एकीकडे तयार करीत असतांच फ्रान्ससारख्या प्रमुख राष्ट्रानें सीरियांत व लेबेनॉनमध्यें आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी शस्त्र उगारलें आहे, ह्यायोगानें त्या परिषदेच्या विधायक कार्याविषयीं साशंकता उत्पन्न झाली आहे. जागतिक शांततेची स्थिर व्यवस्था व्हावी म्हणून परिषदेंत योजना आखली जात आहे, तिच्या प्रमाणेंच आर्थिक व सामाजिक स्वास्थ्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची कायमची तजवीज व्हावी असें घाटत आहे. ह्या विषयाचा विचार हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी, सर रामस्वामी मुदलियार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं असलेल्या परिषदेच्या समितीनें केला असून तिच्या सूचना परिषदेंत मान्य होतील अशी अपेक्षा आहे. मागसलेल्या व लहान राष्ट्रांस औद्योगिक व सामाजिक प्रगतीबाबत सर्व प्रकारचें साहाय्य दिलें जावें आणि त्यांतील लोकांचें दारिद्र्य, अज्ञान व शारीरिक अस्वास्थ्य ह्यांचें निवारण करण्यासाठीं उपाय योजले जावे अशा आशयाची ही शिफारस आहे. नियोजित जागतिक संघटनेच्या उद्दिष्टांत तिचा अंतर्भाव झाला तरी ती व्यवहारांत कशी येणार हाच कठिण प्रश्न आहे. उच्च ध्येयें ठीक आहेत, पण त्यांची कसोटी प्रत्यक्ष व्यवहार ही आहे.

## " हिंदुस्थानानें ग्रेट ब्रिटनला कर्जांत सूट द्यावी "

हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनकडून येणें त्या देशांत साठून राहिलें आहे हा आंतरराष्ट्रीय व्यापारास मोठाच अडथळा आहे; हिंदुस्थानानें स्वखुषीनें कांहीं येणें सोडून द्यावें, असें मत एका अमेरिकन आर्थिक अधिकाऱ्यानें व्यक्त केलें आहे. शत्रुपक्षाच्या पराभवासाठी हिंदुस्थानाची ती आर्थिक देणगीच समजावी, अशी त्याची सूचना आहे. अमेरिकेनें गेल्या महायुद्धानंतर आपलें युरोपियन राष्ट्रांकडील येणें नाहीं का सोडून दिलें ? असा दाखला त्यानें दिला आहे. ग्रेट ब्रिटनचें आर्थिक सामर्थ्य हिंदुस्थानाची कर्जफेड पूर्णत: करण्याइतकें नसल्याकारणानें अनेक वर्षें हा प्रश्न लोंबकाळत ठेवण्यापेक्षा तावडतोब त्याचा निकाल लावून घेण्यांत हिंदुस्थानाचा फायदा आहे, असें सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थानानें स्वखुषीनें ग्रेट ब्रिटनला कांहीं सूट दिली तर ग्रेट ब्रिटन कांहीं कर्जफेड डॉलर्सच्या द्वारा करूं शकेल असेंहि सुचविण्यांत येत आहे. ह्याचा अर्थ त्यामुळें अमेरिकेचा हिंदुस्थानाशीं व्यापार सुरू होऊं शकेल असा आहे. ग्रेट ब्रिटनकडून हिंदुस्थानानें माल घेत रहाणें अमेरिकेच्या फायद्याचें नाहीं, हें उघड आहे.

# स्फुट विचार

## इंपीरिअल बँकेस रिझर्व्ह बँकेची एजन्सी

सन १९२० सालीं इंपीरिअल बँक ऑफ इंडिया ॲक्ट पास होऊन २७ जानेवारी १९२१ रोजीं इंपीरिअल बँकेच्या व्यवहारास प्रारंभ झाला आणि तीन प्रांतिक बँकांचें तींत एकीकरण झालें. मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेसंबंधीं इतकीं वर्षें चर्चा चालली होती व योजना आखल्या जात होत्या, तथापि अशा बँकेच्या स्थापनेस मूर्त स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. इंपीरिअल बँकेची स्थापनी म्हणजे मध्यवर्ती बँकेची स्थापना नव्हे, हेंहि स्पष्ट होतें. इंपीरिअल बँक स्थापन झाली तरी मध्यवर्ती बँकेचीं महत्त्वाचीं कामें तिच्याकडे कधींच सोपविण्यांत आलीं नाहींत. परराष्ट्रीय हुंडणावळ व चलन ह्या अत्यंत महत्त्वाच्या बाबी इंपीरिअल बँकेच्या अधिकारांत कधींच आल्या नाहींत. नोटा काढण्याचा अधिकार तिला मिळाला नाहीं. इतर बँकांप्रमाणेंच व्यवहार करणारी परंतु मोठी आणि हिंदुस्थान सरकारशीं प्रत्यक्ष संबंध असलेली व्यापारी जॉइंट स्टॉक बँक अशी ती बँक बनली. पुढें मध्यवर्ती बँकेची स्थापना १९३४ सालीं झाली. इंपीरिअल बँकेचा विशिष्ट दर्जा, तिचें देशभर पसरलेलें शाखांचें प्रचंड जाळें, तिचेवरील जनतेचा विश्वास, इत्यादि बाबी लक्षांत घेऊन, रिझर्व्ह बँकेचा कांहीं बाबतींत एजंट हा दर्जा तिलाच देण्याचें ठरलें व रिझर्व्ह बँकेनें तिचा व्यावहारिक दृष्ट्या उपयोग करून घ्यावा अशी योजना आखण्यांत आली. रिझर्व्ह बँकेचें एजन्सीचें काम करण्याबद्दल इंपीरिअल बँकेस वार्षिक मोबदला मिळावयाचा त्याची तरतूदहि कायद्यांत करण्यांत आली.

---

## दोन बँकांमधील करार

रिझर्व्ह बँक आणि इंपीरिअल बँक ह्यांचेमधील कराराची रूपरेखा खालीलप्रमाणें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत ज्या ठिकाणीं इंपीरिअल बँकेच्या शाखा असतील आणि रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग विभागाची शाखा नसेल अशा सर्व ठिकाणीं इंपीरिअल बँक रिझर्व्ह बँकेच्या एजन्सीचें काम करील. तें दुसऱ्या कोणत्याहि बँकेस करतां येणार नाहीं. हिंदुस्थान सरकारचें वरील ठिकाणीं काम इंपीरिअल बँक पहाणार तें रिझर्व्ह बँकेच्या वतीनें पहाणार, ह्यासाठी तिला कमिशन मिळेल. पहिल्या दहा वर्षांच्या मुदतींत सरकारच्या वतीनें जमानावेची दर वर्षी ज्या रकमेची उलाढाल होईल तिच्यापैकी पहिल्या २५० कोटींवर १/१६ टका व बाकीच्या रकमेवर १/३२ टका असें हें कमिशन ठरलें आहे. पहिल्या दशवार्षिक मुदतीच्या अखेर ह्या कमिशनच्या रकमेचा फेरविचार केला जाईल. त्यापुढें जोंपर्यंत करार अंमलांत राहील तोंपर्यंत दर पांच वर्षांनीं त्याचा फेरविचार होईल. रिझर्व्ह बँकेचा कायदा अंमलांत येण्यापूर्वी इंपीरिअल बँकेच्या ज्या शाखा अस्तित्वांत असतील त्या तशाच चालू ठेवण्यासाठी पहिलीं पंधरा वर्षें रिझर्व्ह बँक तिला खालीलप्रमाणें रकमा देईल:—

( अ ) पहिलीं पांच वर्षें, दरवर्षी ९ लक्ष रु.

( ब ) दुसरीं पांच वर्षें, दरवर्षी ६ लक्ष रु.

( क ) तिसरीं पांच वर्षें, दरवर्षी ४ लक्ष रु.

---

## कराराचा फेरविचार करण्याची आवश्यकता

रिझर्व्ह बँकेचा इंपीरिअल बँकेशीं झालेला करार इंपीरिअल बँकेस फारच अनुकूल आहे आणि इतर हिंदी लायक बँकांस त्यामुळें अन्याय होत आहे, अशी प्रस्तुत करारासंबंधीं तक्रार आहे. ह्या पंधरा वर्षें मुदतीच्या कराराची पहिली दहा वर्षांची मुदत ३१ मार्च, १९४५ रोजीं संपली आहे आणि करार संपुष्टांत आणण्याविषयीं इंपीरिअल बँकेस पांच वर्षांची नोटीस द्यावयाची असल्यास ती ३१ मार्च, १९४५ रोजींच दिली गेली पाहिजे. अशा तऱ्हेची नोटीस देण्यांत आली आहे किंवा नाहीं, ह्याचा खुलासा कोठेंच प्रसिद्ध झालेला नाहीं. इंपीरिअल बँकेची एजन्सीची मोनॉपली रद्द व्हावी ह्याबद्दल मागणी करण्यांत ऐकमत्य असणें स्वाभाविक आहे. परंतु, इंपीरिअल बँकेच्या ऐवजी दुसऱ्या कोणास एजन्सी द्यावयाची म्हटलें, तर त्या एजंटाची निवड कोणत्या तत्त्वावर करावी, त्याच्याशीं करार कोणते करावे, ह्याबद्दल चर्चाहि कोठें झालेली नाहीं. इंपीरिअल बँकेच्या वर्चस्वाविरुद्ध मात्र इतरांचें एकमत दिसतें. इंपीरिअल बँकेच्या कराराची मूळ मुदत १५ वर्षांची असली, तरी तिला एजन्सीच्या कामाचा मोबदला काय मिळावा, ह्याचा विचार पहिल्या दहा वर्षांनंतर पुनः अवश्यमेव करण्यांत यावा, असा सक्त आदेश कायद्यानें दिलेला आहे, ही गोष्ट येथें महत्त्वाची आहे. तज्ज्ञांनीं हिशेब तपासून, इंपीरिअल बँकेस प्रत्यक्ष खर्च किती येतो हें पाहूनच ह्यासंबंधांत मत व्यक्त केल्यावर कराराचा फेरविचार व्हावा, असें कायदा सांगतो. अशा तऱ्हेची तपासणी करण्यांत आली आहे काय ? ह्या तपासणीचे आधारावर इंपीरिअल बँकेस १ एप्रिल १९४५ पासून एजन्सीबाबत मिळावयाचा मोबदला ठरविण्यांत आला आहे काय ? कायद्याच्या परिशिष्टांत मोबदल्याचा तपशील नमूद केलेला आहे, तो तज्ज्ञांच्या अंदाजावरच आधारलेला आहे. प्रत्यक्ष अनुभवाअंतीं त्यांत फेरफार होणें इष्ट वाटलें किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा उलगडा झाला पाहिजे. रिझर्व्ह बँक आणि इंपीरिअल बँक ह्यांचे करारांत कांहीं फरक झाला असल्यास अर्थात् तो मध्यवर्ती विधिमंडळास कायद्याप्रमाणें सादर केला जाईलच.

---

## बॉयलर व इंजनें ह्यांच्या उत्पादनास हिंदुस्थानांत प्रारंभ

ईस्ट इंडिया रेल्वेचें सिंगभुम येथील वर्कशॉप ता. १ मे रोजीं टाटांचे स्वाधीन करण्यांत आलें. तेथें टाटा बॉयलर व इंजनें ह्यांचें उत्पादन करणार आहेत. प्रथम बॉयलर तयार होऊं लागतील व नंतर इंजनांचें उत्पादन हातीं घेण्यांत येईल. सरकार दरसाल कांहीं किमान बॉयलर व इंजनें टाटांचेकडून विकत घेईल आणि ज्यास्तीची आयात करण्यापूर्वी टाटांच्या मालासच प्राधान्य देईल. ह्या योजनेसाठी लागणारी ३० लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री इंग्लंडमधून सत्वर मिळवून देण्याची खटपट सरकार करीत आहे. ह्या नवीन उपक्रमासाठी एक नवी कंपनी स्थापन करण्यांत येईल, तिच्या ५ कोटींच्या अधिकृत भांडवलापैकी २ कोटींचें भांडवल विक्रीस काढण्यांत येईल व त्यापैकी ५०% म्हणजे १ कोटि रुपये भांडवल प्रत्यक्ष वसूल केलें जाईल, असें समजतें. हें भांडवल उघड विक्रीस न निघतां, टाटा आयर्न अँड स्टील कंपनी, बडोदें सरकार व निजाम सरकार ह्यांच्या सहकार्यानें कंपनी स्थापन होईल अशी अपेक्षा आहे. बॉयलर व इंजनें ह्यांच्या उत्पादनाची हिंदुस्थानांत व्यवस्था करावी, असा लोकमताचा फार पूर्वीपासूनचा आग्रह आहे. नव्या योजनेस टाटांचा पुरस्कार असल्याकारणानें तिचें सर्वत्र स्वागतच होईल.

## —त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण

## महाराष्ट्र भुवन

लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालक:—वाय. व्ही. सहस्त्रबुद्धे

## —: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
## पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी
## महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

जीर्ण व हटवादी हिंवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें

## पायरोनिल

प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

## EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd.,**
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट— द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

### महाराष्ट्र-दर्शन ( अॅटलस ) ग्रंथाची रूपरेषा

महाराष्ट्राची वस्तुस्थिति दाखविणारीं सुमारें साठ मानचित्रें लहान व मोठ्या आकाराच्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें महाराष्ट्र साहाय्यक संघानें योजलें आहे. मानचित्रावरील निर्बंधामुळें लहान आकाराचें पुस्तकच प्रसिद्धीसाठी प्रथमतः घेण्याचें योजलें आहे. त्यांत समाविष्ट करण्याच्या मानचित्रांपैकी कांहीं मानचित्रांचें 'प्रथमदर्शन' नांवाची आठ मानचित्रांची पुस्तिका तयार केली आहे. तिची किंमत आठ आणे आहे. या पत्रकाबरोबर दोन मानचित्रें आहेत. त्यांवरून सर्वसाधारण कल्पना येईल. त्यांचे खालीं त्रोटक माहिती दिली आहे. त्यापेक्षां जास्त माहिती देणें अगत्याचें आहे व ती मुख्य ग्रंथांत देण्यातहि येईल. अशा प्रकारचा साठ मानचित्रांचा व जास्त माहिती दिलेला २००० प्रतींचा ग्रंथ प्रकाशित करण्यास आजच्या अंदाजानें सुमारें ७,५०० रुपये खर्च येईल. मोठ्या आकाराच्या ग्रंथास अंदाजें १५,००० रुपये खर्च होतील. ग्रंथाची किंमत कमी ठेवून कार्यप्रेमी धनिकांकडून देणग्या घ्याव्या अशी कल्पना आहे. याचें कारण म्हणजे मध्यम स्थितींतील अभ्यासू व्यक्तींना ग्रंथ विकत घेतां यावा. ही विचारसरणी मान्य झाल्यास देणग्या घेण्याची इष्टता पटेल. देणगी देणारांनीं आपल्या इच्छेप्रमाणें रु. २५, ५० व १०० च्या देणग्या या कार्यास याव्या अशी विनंति आहे. देणगीरूपानें रक्कम न जमल्यास पुस्तकाची किंमत ७॥ रुपयपर्यंत ठेवावी लागेल. महाराष्ट्रदर्शन ग्रंथाबद्दल माहिती मागवावयाची अगर पाठवावयाची असेल, देणगी अगर अगाऊ किंमत पाठवावयाची असेल तर न. गं. आपटे, ९५२ सदाशिव, पुणें २, पोस्ट पेटी नं. २३, या पत्त्यावर पाठवावी.

### टाटांची नवी कंपनी

बॉयलर व इंजनें ह्यांच्या उत्पादनासाठी टाटा नवीन कंपनी काढणार आहेत तिचें नांव टाटा लोकोमोटिव्ह अॅंड इंजिनिअरिंग कं. लि. असें राहील व टाटा सन्स लि. ला तिची मॅनेजिंग एजन्सी मिळेल.

### सोन्याच्या खाणींतील मजुरांचा संप

कोलार सोन्याच्या खाणींतील मजुरांचा संप गेलें. १५ दिवस चालू आहे. संपांत ३०,००० मजूर सामील झाले आहेत.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
+ इंडि. युना. ३०-५-४५

व्याज-वजा ( xd )
सिंप्लेक्स ५-७-४५
न्यू इंडिया ९-७-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २९।५।४५ | बुधवार ३०।५।४५ | गुरुवार ३१।५।४५ | शुक्रवार १।६।४५ | सोमवार ४।६।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स् | ३० | २१२२—८ | २१४७—८ | २१४२—८ | २१३५—० | २१५२—८ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९६—० | ४०१—० | ३९९—८ | ३९८—० | ४०२—८ |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | १८७३-१२ | १८८३-१२ | १८८१—४ | १८७०—० | १८७७—८ |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०५—० | ६१०—० | ६०७—० | ६०६—८ | ६०९—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५३२—० | ५३७—० | ५३३—० | ५३०—० | ५३३—८ |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३७९—८ | ३८६—० | ३८३—० | ३८३—० | ३८४—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २९१—८ | २९३—० | २९२—० | २९०—० | २९१—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९९—० | २९९—० | २९९—० | २९९—८ | ३००—८ |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८१—८ | २८५—० | २८४—८ | २८१—० | २८३—० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१४-० | ३-१४-० | ३-१४-६ | ३-१४-६ | ३-१४-६ |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. आर्डि. | १० | १४-१५-६ | १४—३+ | १४-०-६ | १४-०-६ | १४-१-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स् | १ | ३-०-६ | २-१४+ | २-१४-० | २-१३-९ | २-१४-९ |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७११-४-० | ७२०—० | ७१७—८ | ७१६—४ | ७१७—८ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | २३६-०-० | २३६—० | २३५-१२ | २३७—० | २१५—०+ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१९-८-० | २१९—८ | २२१—८ | २२२—० | २२२—० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३५-०-० | ५३३-१२ | ५३०—० | ५३२—८ | ५३०—० |
| ९३-१२; ७३ | १-८-० | जुलै | न्यू इंडिया अॅ० | १५ | ८०-०-० | ८०—८ | ८१—० | ८१—४ | ८२—० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | सिंदिया स्टीम | १५ | ३५-०-० | ३५-१३ | ३५—८ | ३५—८ | ३५-१५ |
| ८५; ४८ | २-०-० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५०-०-० | ५०—० | ५०—४ | ५०—४ | ५१—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०-८-० | २०—६ | २०—६ | २०—२ | २०—२ |
| ९०; ६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६७-१२-० | ६७—८ | ६७—४ | ६७—८ | ६७—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | १००-५-६ | १००-६-० | १००—७ | १००-७-३ | १००-१२-० |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
न्यू इंडिया अॅशु. १-६-४५ ते २९-६-४५ सिंप्लेक्स २५-५-४५ ते १४-६-४५

सोमवार दि. ४-६-४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—८—० |
| १९५१-४ | १००-१५—० |
| १९५७ | १००—३—० |
| १९६३-६५ | ९८-१५—६ |
| १९६६-६८ | ९८—५—६ |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४१—४ |
| सेंट्रल | ७९—८ |
| इंडिया | १८५—० |
| इंपी० | २०००—० |
| | ५०२—८ |
| रिझर्व्ह | १३९—० |
| युनियन | ८-१४ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १७५६—४ |
| बॉम्बे ट्रॅम | १४१—० |
| टाटा हायड्रो | २०४—० |
| टाटा पॉवर | १८०५—० |

### फाजील चलनविस्तारास आळा

१९४४-४५ मध्यें, चलनविस्तारास आळा बसावा म्हणून खेळतें चलन ओढून घेण्याचे प्रयत्न करण्यांत आले. त्याचे नियोजित आकडे व प्रत्यक्ष वसुली ह्यांचा तपशील खालीं दिला आहे:—

( आकडे हजार रुपयांचे आहेत )

| प्रांत | नियोजित वसुली | १-४-४४ ते ३१-३-४५ वसुली | अद्याप वसूल व्हावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| मुंबई | ६५,००,०० | २५,५८,३१ | ३९,४१,६९ |
| बंगाल | २०,००,०० | ९,४२,८२ | १०,५७,१८ |
| पंजाब | २५,००,०० | २१,५६,७२ | ३,४३,२८ |
| संयुक्तप्रांत | १५,००,०० | १९,६०,१८ | −४,६०,१८× |
| मद्रास | २५,००,०० | २०,५५,४० | ४,४४,६० |
| सिंध | ८,५०,०० | ८,२५,३० | २४,७० |
| बिहार | ६,००,०० | ८,३६,८२ | −२,८६,८२× |
| दिल्ली | ३,००,०० | १,६०,५६ | १,३९,४४ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ८,००,०० | १७,३९,३७ | −९,३९,३७× |
| सरहद्द-प्रांत | १,००,०० | ४८,९२ | ५१,०८ |
| ओरिसा | १,००,०० | १,००,४४ | −४४× |
| बलुचिस्तान | ५०,०० | २५,५९ | २४,४१ |
| आसाम | १,२५,०० | १,२७,५३ | −२,५३× |
| अजमीर-मारवाड | २५,०० | २९,२० | −४,२०× |
| कूर्ग | ३,०० | ६,१३ | −३,१३× |
| हिंदी संस्थानें | ३३,५९,८९ | १०,६५,३० | २२,९४,५९ |
| एकूण | २,१३,१२,८९ | १,४६,९८,५९ | ६६,१४,३० |

× नियोजित आकड्यापेक्षा ज्यास्त झालेली वसुली.

वरील आकड्यांवरून, सात प्रांतांनीं नियोजित वसुलीपेक्षां जास्त वसुली केली असल्याचें दिसून येईल. या वसुलींत कर्जातील गुंतवण, जादा करवसुली व जादा जमीनमहसूलवसुली ह्यांचा समावेश होतो. त्यांपैकीं दुसऱ्या दोन बाबींचे आकडे उपलब्ध झाल्यावर इतर प्रांतांची वसुलीबाबत परिस्थिति अधिक समाधानकारक असल्याचें आढळून येईल. हिंदी संस्थानांनीं नियोजित वसुली केलेली नाहीं व त्यांच्या बाकी वसुलीचें नियोजित वसुलीशीं प्रमाणहि फार मोठें आहे, हें वरील आकड्यांवरून स्पष्ट होतें.

### वरिष्ठ जागांवर युरोपियनांची भरती

इंडियन सिव्हिल सर्व्हिस व इंडियन पोलीस सर्व्हिस ह्यांचेमधील भरती जानेवारी, १९४३ पासून बंद ठेवण्यांत आली. १९४४ अखेर इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील १६९ जागा रिकाम्या आहेत. त्यांपैकीं ९८ जागा युरोपियनांच्या वाटणीस जातील. ह्यापुढें युद्धसंपेपर्यंत दरसाल निर्माण होणाऱ्या ४८ जागांपैकीहि निम्या जागा त्यांचेसाठीं राखून ठेवल्या जातील. इंडियन पोलीस सर्व्हिसमध्यें ९६ जागा रिकाम्या आहेत. त्यांपैकीं ६३ जागांवर युरोपियनांची नेमणूक होईल. ह्यापुढें दरसाल निर्माण होणाऱ्या जागांपैकी ११ हिंदी उमेदवारांस व १२ किंवा १३ युरोपियन उमेदवारांस मिळतील.


"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

**ढेकणांच्या उदबत्त्या**

(ABC)

**BUG COILS ( ABC )**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८८, ट. ख. निराळा.

**दि मागोरा केमिकल कं. लि., हिराबाग, पुणें २**



**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



**दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०**

हेड ऑफिसः—पुणें शहर

—ःशाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिसः-खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : २०,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षीं कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंडाइ वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाविलास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १३ जून १९४५ अंक २४

## —: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व शूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

जीर्ण व हटवादी हिंवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
**पायरोनिल**
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

**EVERYTHING IN RUBBER GOODS**

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd.,**
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

# विविध माहिती

### इंडो-ब्रिटिश कमर्शिअल कॉर्पोरेशन

वरील नांवाची एक कंपनी लवकरच स्थापन होईल. तिचें निम्में भांडवल ब्रिटिश व निम्में भांडवल हिंदी मालकीचें राहील व डायरेक्टरांच्या संख्येची वाटणीहि त्याच प्रमाणांत होईल. ही कंपनी ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी माल विकील व हिंदुस्थानांत ब्रिटिश माल खपवेल. "हिंदुस्थानाच्या ग्रेट ब्रिटनमधील येणयाचा प्रश्न सोडविण्यास कंपनीचा व्यवहार मदत करील" असें तिचे पहिले चेअरमन, डॉ. रॉले, हे म्हणतात.

### उद्योगदिन

दर वर्षीप्रमाणें यंत्राचा उद्योगदिन ह्मारावकर टेलरिंग कॉलेजमध्यें श्री. वा. दे. सामंत ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला व त्यावेळीं श्री ग. बा. देसाई ह्यांचें मुख्य भाषण झालें.

### फ्लीट स्ट्रीट–ब्रिटिश वृत्त पत्रांचें केंद्रस्थान

लंडन शहरांतील फ्लीट स्ट्रीट हा रस्ता जगभर प्रसिद्ध आहे. ब्रिटिश वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांचें तें आगर आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें सुमारें १,७०० दैनिकें व साप्ताहिकें प्रसिद्ध होतात, त्यांपैकी बहुतेकांच्या पाट्या ह्या रस्त्यावर कोठेंतरी आढळतील. लंडन शहर व त्याचीं उपनगरें ह्यांत वृत्तपत्रांचा खपहि पण मोठा आहे. तेथील लोक दररोज १,००,००,००० वृत्तपत्रें विकत घेतात. मासिकें व साप्ताहिकें ह्यांची खरेदी वेगळीच! फ्लीट स्ट्रीटमध्यें ३,६०० मासिकेंहि प्रसिद्ध होतात. अशा तऱ्हेनें, त्या रस्त्यावरील छापखाने मैलच्या मैल कागद व टनावारी शाई आणि टाइप खात असतात.

### सात लक्ष शेर बटाटे

पुणें व नाशिक येथून मुंबईस नेऊन साठवलेले ७ लक्ष शेर बटाटे खराब झाले, असें प्रसिद्ध झालें आहे. बंद वाघिणींतून हे बटाटे नेण्यांत आले व त्यांतच मुंबईच्या वाईट हवेची भर पडली.

### औषधांच्या किंमती उतरल्या

सरकारनें कित्येक औषधांच्या नियंत्रित किंमती उतरविल्या आहेत. ह्या नव्या किंमती २ जुलैपासून अंमलांत येतील.

### कागद नियंत्रण—नवी सवलत

पेपर कंट्रोलर (इकॉनॉमी) ऑर्डर, १९४४ मध्यें सरकारनें थोडी दुरुस्ती केली आहे, त्यामुळें असोसिएशन्स, सोसायट्या वगैरे संस्थांस त्यांचे रिपोर्ट वगैरेसाठी वार्षिक ५० पौंड कागद वापरतां येईल. ४"×३½" आकाराच्या, एका तारखेसाठी एक पृष्ठ असणाऱ्या खिशांतील डायऱ्या छापण्यास आतां प्रत्यवाय नाहीं.

### "रूरल पब्लिसिटी ऑर्गनायझेशन"

मद्रास सरकारनें १ जुलै १९४५ पासून "राष्ट्रीय युद्ध आघाडी" बंद करण्याचें ठरविलें आहे. तिचे ऐवजीं "ग्रामप्रचार संघटना" चालविण्यांत येईल. हिंदुस्थान सरकार व मद्रास सरकार ह्या दोघांच्या सहमतानें तिचें काम चालेल.

### पाऱ्याची आयात

न्यूझीलंड हिंदुस्थानास दरमहा १,००० पौंड पारा पुरविणार आहे, त्याच्या आयातीची व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें केली आहे.

### कृत्रिम खताचा कारखाना

संयुक्त प्रांतांत धनबाद शेजारीं एक कृत्रिम खताचा कारखाना हिंदुस्थान सरकार उभारणार आहे, त्यास १०½ कोटि रुपये खर्च येईल. ह्या कारखान्याची उत्पादन शक्ति ३,५०,००० टन राहील. अमेरिकन व ब्रिटिश तज्ज्ञांचा सल्ला घेण्यांत आला आहे. अमेरिकन (सल्फर) पद्धतीचें उत्पादन ब्रिटिश (जिप्सम) पद्धतीपेक्षा अधिक स्वस्त पडेल व त्यास भांडवली खर्चहि पण कमी येईल, असें सांगण्यांत येतें.

### हिंदी सिगार्सची इंग्लंडकडे निर्गत

हवाना सिगार्सचा तुटवडा पडण्याची भीति निर्माण झाल्यामुळें इंग्लंड चांगल्या हिंदी सिगार्सची आयात करणार आहे. दरसाल १५ लक्ष सिगार्स येथून तिकडे पाठविण्यांत येतील, त्यांचा पहिला हप्ता रवानाहि झाला आहे.

### हबिब बँक लि.

वरील बँकेच्या कलकत्ता येथील शाखेचें उद्घाटन ता. २ रोजीं झालें. त्यावेळीं शाखेमध्यें ७५ लक्ष रुपयांच्या ठेवी जमा झाल्या.

### रॉकेल येणार

जुलै, १९४५ पासून हिंदुस्थानांत दरमहा आणखी १०,००० टन रॉकेलची आयात होऊं लागेल व त्यामुळें जनतेस ज्यास्त रॉकेल मिळूं शकेल.

### सोन्याच्या खाणींवरील निर्बंध

खाणींतून सोनें व इतर धातू काढण्यावरील निर्बंध कॅनडाच्या सरकारनें दूर केले आहेत.

### युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन

वरील नांवाजलेल्या कंपनीच्या हिंदुस्थानांतील कचेऱ्या सोईप्रमाणें शक्य तितक्या लवकर बंद करण्यांत येणार आहेत.

### बादशहांचा वाढदिवस

बादशहांचा १४ जून रोजीं जाहीर झालेला वाढदिवस समारंभानें साजरा करण्यांत येणार नाहीं. तो सार्वजनिक सुट्टीचा दिवसहि गणला जाणार नाहीं.


# SIR CUSROW WADIA INSTITUTE OF Electrical Technology, Poona.

POST WAR INDUSTRIALISATION OF INDIA will require trained Engineers in thousands. Secure a permanent position for yourself in Industrialised India by joining the SIR CUSROW WADIA INSTITUTE OF ELECTRICAL TECHNOLOGY, Nowrosjee Wadia College, Poona, which provides a three years' course leading to Diploma in Technology (Electrical and Radio) awarded by the Government of Bombay.

Open to Matriculates of all Indian Universities. Compulsory factory training is our speciality.

*Session begins on 20th June.*

For prospectus apply to the Principal with stamps worth annas 2/-.

अर्थ

## ब्रिटिश निवडणुकींत आर्थिक धोरणाचा वाद

निवडणुकीच्या प्रचाराच्या ओघांत निरनिराळे प्रतिस्पर्धी पक्ष आणि गट ह्यांच्या वक्तव्यांत व लिखाणांत अतिशयोक्ति, आत्म-प्रौढी व परनिंदा ह्यांची पुष्कळ जळ असते आणि ती काढून टाकून सत्य काय खाली राहतें हें पहावें लागतें. अशा प्रकारच्या धामधुमीचा अनुभव सर्वत्रच येतो. ग्रेट ब्रिटनमधील कॉमन्स सभेची निवडणूक पुढील महिन्याच्या प्रारंभीं होणार आहे आणि तिच्या संबंधांतील प्रचार चालू झाला आहे, त्यामध्यें वरील प्रकारची धामधूम माजलेली दिसून येत आहे. युरोपांतील युद्ध संपलें असलें तरी जपानचा पराभव व्हावयाचा आहे, तो होईपर्यंत जुनें पार्लमेंट व संयुक्त मंत्रिमंडळ हीं मोडणें इष्ट नसल्यानें कॉमन्स सभेची निवडणूक पुढें ढकलण्यांत यावी अशी सूचना मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांनीं केली होती, ती कामकरी पक्ष व लिबरल पक्ष ह्यांस मान्य झाली नाहीं. जपानशीं नेटानें युद्ध चालवण्याचे संबंधांत सर्व पक्षांचें ऐकमत्य असल्यानें टोरी पक्षाच्या ह्या मुद्यास महत्त्व देण्याचें कारण नाहीं असें त्यांचें मत पडलें. अत्यंत जिव्हाळ्याचे असे आर्थिक व सामाजिक प्रश्न ब्रिटिश राष्ट्रास तात्काळ हातीं घेणें आवश्यक असून त्यांचे बाबतींत राजकीय पक्षांत तीव्र मतभेद उत्कृष्ट रीतीनें प्रकट झाल्या-कारणानें संयुक्त मंत्रिमंडळ कार्यक्षम रीतीनें राष्ट्राचा कारभार चालवूं शकत नाहीं असें मजूर पक्षानें खडखडीतपणानें सांगितलें आणि पार्लमेंटची फेरनिवडणूक अपरिहार्य झाली.

इंग्लंडमधील निवडणूक प्रचाराची ही पार्श्वभूमि ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. जपानशीं चाललेल्या युद्धाप्रमाणेंच हिंदुस्थानविषयक धोरणाचे संबंधांत इंग्लंडमध्यें पक्षभेद नाहींत हेंहि येथें विसरतां कामा नये. ह्या बाबतींतलें आपलें धोरण विशेष सहानुभूतीचें आणि सहायकारक राहील असें आश्वासन निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांनीं दिलें तरी मुद्याच्या प्रश्नावर त्यांचें मुळांत ऐकमत्यच आहे. मुख्यत्वेंकरून :अंतर्गत आर्थिक व्यवस्था आणि कांहीं प्रमाणांत परराष्ट्रीय धोरण हेच वादाचे विषय निवडणुकीच्या प्रचारांत ठळकपणानें दिसून येत आहेत आणि येणार आहेत. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे नेते मि. चर्चिल, कामकरी वर्गाचे पुढारी, मि. ॲटली व लिबरल पक्षाचे पुढारी सर आर्चिबॉल्ड सिंक्लेअर ह्यांनीं आपापला कार्यक्रम ब्रिटिश जनतेपुढें मांडून स्वतःच्या प्रतिस्पर्ध्यांवर हल्ले चढवलेले आहेत. त्यांच्या वक्तव्यावरून ह्या निरनिराळ्या पक्षांचीं आर्थिक ध्येयें कोणतीं आहेत ह्याची त्यांच्या दृष्टीची कल्पना लक्षांत घेण्यास मदत होण्यासारखी आहे. त्यांनीं इंग्लंडकरितां पुढें मांडलेल्या कार्यक्रमापासून हिंदुस्थानास प्रत्यक्ष फायदा होण्याचा संभव नाहीं, पण त्याचा अप्रत्यक्ष परिणाम येथील आर्थिक व राजकीय परिस्थितीवर होण्याचा संभव आहे, इतकेंच. बेव्हिनसारख्या मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून हिंदुस्थानचे संबंधांत त्यांचें धोरण अधिक पुरोगामी होईल असें वाटण्यास जागा दिसत नाहीं.

मि. चर्चिल ह्यांनीं टोरी पक्षाच्या निवडणूक मोहिमेस नभोवाणीवरील भाषणानें प्रारंभ केला आणि त्यांत मजूर पक्षास मताधिक्य मिळाल्यास समाजसत्तावादाची आपत्ति व्यक्तिस्वातंत्र्यप्रेमी ब्रिटिश जनतेवर कशी कोसळेल ह्याचें भडक चित्र त्यांनीं रंगवलें. उद्योगधंदे व व्यापार ह्यांत सरकार ढवळाढवळ करील, संपत्तीची खाजगी मालकी संपुष्टांत आणील आणि जर्मनीप्रमाणें गुप्त पोलिसांचा ससेमिरा लोकांच्या मागें लागेल; इंग्लंडची आर्थिक प्रगति धंदेवाल्यांचा धडाडी, कौशल्य व साहस इत्यादि गुणांमुळें झालेली आहे, ती परंपरा मोडून मजूर पक्षाचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यास हुकूमशाहीचें जूं ब्रिटिश जनतेच्या मानेवर बसेल असें ते म्हणाले. सामाजिक व आर्थिक सुधारणेच्या आपल्या प्रसिद्ध झालेल्या योजनेनें लिबरल पक्षाचें समाधान व्हावयास हवें होतें आणि त्यानें संयुक्त मंत्रिमंडळाचा त्याग करावयास नको होता अशी टीका त्यांनीं त्या पक्षावर केली.

समाजसत्तावादावर आधारलेल्या मजूर पक्षाच्या कार्यक्रमावर मि. चर्चिल यांनीं केलेल्या भडिमारास मि. ॲटली ह्यांनीं अधिक सौम्य पण परिणामकारक रीतीनें उत्तर दिलें आहे. व्यक्तिस्वातंत्र्यावर कोणीं आघात केला असेल तर तो टोरी पक्षानें केला असून मजूर पक्षानें सतत चालवलेल्या लढ्यामुळेंच ब्रिटिश जनतेस खरें आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त झालें असें त्यांनीं सांगितलें. मि. चर्चिल ह्यांनीं पुरस्कार केलेलें स्वातंत्र्य म्हणजे भांडवलवाल्यांचें गरीब व बलहीन जनतेची पिळवणूक करण्याचें स्वातंत्र्य होय असें म्हणून मजूर पक्ष संपत्तीच्या उत्पादनाचीं सर्व साधनें एकदम व्यक्तींच्या हातून काढून घेऊं इच्छित नाहीं हें स्पष्ट केलें. युद्धकाळांतलीं आर्थिक नियंत्रणें नफेबाजीवरील उपाय म्हणून कांहीं काळपर्यंत चालू ठेवण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादिली. सुवर्ण परिमाण चलनाची पद्धति मागील युद्धाचे नंतर पुन्हां चालू करून ब्रिटिश व्यापाराचा खेळखंडोबा टोरी पक्षानेंच केला असा दाखला देऊन मि. चर्चिल ह्यांचा हल्ला त्यांनीं परतवला. मजूर पक्षाच्या अमदानींत इंग्लंडमध्यें सामाजिक व आर्थिक क्रांति होईल अशी भीति सामान्य जनतेच्या मनांत उत्पन्न करण्याचा व निवडणुकींत मतें मिळवण्याचा मुख्य प्रधानांचा प्रयत्न त्यांचेवरच मि. ॲटली ह्यांनीं उलटवला. लिबरल पक्षास टोरी पक्षाचें औद्योगिक संरक्षणाचें व साम्राज्यांतर्गत सवलतीच्या व्यापाराचें तत्त्व मान्य नसल्याचें त्याच्या पुढाऱ्यांनीं सांगितलें आहे. इंग्लंडचें आर्थिक स्वास्थ्य खुल्या व्यापारावर अवलंबून आहे हा त्यांचा सिद्धांत आहे आणि टोरी पक्षाचें धोरण त्यास विघातक आहे अशी त्यांची टीका आहे. मि. चर्चिल ह्यांच्या भाषणाचा रशिया व ऑस्ट्रेलिया ह्या देशांतील समाजसत्तावादी राज्यकर्त्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम होईल अशी भीति व्यक्त केली जात आहे. टोरी पक्षास निवडणुकींत यश येण्याच्या दृष्टीनें समाजसत्तावादाचें भीषण चित्र काढून जनतेस भेडसावणें अगत्याचें होतें असें समर्थनहि कांहींनीं केलें आहे.

# स्फुट विचार

### उत्पादनांत वाढ आणि कामकरी वर्गाची सुधारणा

गेल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ स्थापण्यांत आला, त्याचेच बरोबर त्यास पूरक म्हणून आंतरराष्ट्रीय कामकरी वर्ग संघ निर्माण करण्यांत आला. कामकरी लोकांच्या हिताचे प्रश्न जागतिक सुस्थितीशी निगडित झाले असल्यानें ह्या संस्थेस सर्व राष्ट्रांनीं पाठिंबा दिला आणि तिचें नियोजित कार्य चालू असून त्याचा उत्कृष्ट उपयोग होत असल्याचें दिसून आलें आहे. बेकारी, वार्धक्य, आजारीपणा इत्यादि संकटें कामकऱ्यांवर येतात, त्यांपासून त्यांचें संरक्षण करण्याचे प्रयत्न सर्व प्रगमनशील देशांत चालू आहेत. मजुरांस त्यांच्या आजारीपणांत सहाय देण्याविषयींची एक योजना सध्या हिंदुस्थान सरकारापुढें आहे. मोठ्या व्यापक स्वरूपाची "बीव्हरिज योजना" ब्रिटिश सरकारास सुचवण्यांत आली आहे. ह्या दिशेनें हिंदुस्थानांत प्रगति व्हावयाची असेल तर ह्या देशांतलें संपत्तीचें उत्पादन वाढलें पाहिजे आणि जनतेची रहाणी सुधारली जाणें आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघाचे एक अधिकारी श्री. राव, ह्यांनीं दिल्लीच्या नभोवाणीमधून नुकतेंच एक भाषण केलें, त्यांत एशियांतील कामकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार स्वतंत्र रीतीनें व्हावा ह्यासाठीं एक खास परिषद् भरवण्याचें ठरलें असल्याची माहिती त्यांनीं दिली. हिंदुस्थानासारख्या देशांत औद्योगिक व शेतीविषयक प्रगति मोठ्या प्रमाणावर झाल्यावांचून येथील कामकरी वर्गाची स्थिति सुधारणें कठिण आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

### जर्मन कारखाने ग्रेट ब्रिटन चालविणार

ब्रिटिशांनीं व्यापलेल्या जर्मनीच्या विभागांतील सोळा मोठे कारखाने ग्रेट ब्रिटन स्वतः चालविणार आहे. त्यासाठी हुशार व अनुभवी कामगार तेथें नेण्यांत येतील त्यांस दरमहा ६०० ते १,२०० रुपये पगार मिळेल. १,००० जागांसाठी ३०,००० अर्ज आले आहेत, त्यामुळें निवड करणें अवघड झालें आहे. जे युद्धविषयक उत्पादनांत गुंतले होते, अशांस ग्रेट ब्रिटनमध्यें पुढें काम उरणार नाहीं, परंतु जर्मनींत जाऊन तेथील कारखान्यांत काम करण्याची व पैसे कमविण्याची सुसंधि त्यांस मिळणार आहे. अशा रीतीनें युद्धकार्यांत गुंतलेल्यांस पुढें काम पुरविण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

### ब्रिटिश सायकलींच्या धंद्यास चलती येणार

चालू महायुद्धापूर्वी ब्रिटिश, जर्मन व जपानी सायकलींनीं जागतिक बाजारपेठ व्यापली होती. अमेरिकेखेरीज सर्व देशांत सायकलींस प्रचंड मागणी होती. अमेरिकेंत सायकलींस मोठी मागणी नसल्याचें कारण, त्या देशांत सायकली इतक्याच मोटारी लोक वापरीत असतात! हिंदुस्थान हा देश सायकली आयात करणारांत अग्रगण्य आहे, ह्या कारणानें ब्रिटिश सायकलींच्या कारखान्यांस ह्यापुढें चांगले दिवस येणार, अशीं लक्षणें आहेत. हिंदुस्थानांत सायकली बनविण्यास प्रारंभ झाला तरी त्याची भीति ब्रिटिश कारखानदारांस वाटत नाहीं, कारण सायकलींचे महत्त्वाचे भाग ब्रिटिश कारखानदारच पुरवीत रहातील. शिवाय, ब्रिटिश कारखानदारच स्वतः येथें आपले कारखाने चालवूं शकतील.

### बॉंबे सिल्क फिलेचर्स लि.

वरील कंपनीची माहिती आजच्या अंकांत दुसरीकडे प्रसिद्ध झाली आहे, तिचेवरून कंपनीच्या यशास अनुकूल असलेल्या बाबी, तिला सरकारचें मिळत असलेलें सहाय्य, इत्यादि गोष्टींचा खुलासा होईल. कंपनीचे सर्व भाग अंडरराइट झालेले असून थोडेच भाग विक्रीस शिल्लक आहेत. अर्जाची मुदतहि उद्या, गुरुवार ता. १५ रोजीं संपते. कंपनीनें अर्ज स्वीकारण्याची केलेली महाराष्ट्रभर व्यवस्था शेअर घेणारांस फार सोईची वाटेल. श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं कच्च्या-पक्क्या रेशमाच्या धंद्यांत मिळविलेला अनुभव व यश ह्यांचा उपयोग आतां मुंबई प्रांतास होणार आहे.

### बस वहातुकीची नवी व्यवस्था

हिंदुस्थानांतील बस वहातुकीच्या धंद्याची पुनर्घटना करून, निम सरकारी कंपन्यांच्या मार्फत वहातुकीची व्यवस्था नियंत्रित करण्याचा सरकारचा विचार मागेंच प्रसिद्ध झाला होता. बसवाल्यांनीं त्यास कसून विरोध केला, मध्यवर्ती असेंब्लींत त्यावर चर्चा झाली आणि सरकारनें आपली योजना स्थगित केली असल्याचीहि बातमी प्रसिद्ध झाली. आतां सरकारी योजना थोड्या-फार फेरफारासह अंमलांत येणार असल्याची अधिकृत घोषणा लवकरच होईल, असें समजतें. बस वहातुकीच्या क्षेत्रांचे गट पाडावे, प्रत्येक गटासाठी लिमिटेड कंपन्या काढाव्या, त्या कंपन्यांत मध्यवर्ती सरकारचें सुमारें ४०%, प्रांतिक सरकारचें २०%, बसवाल्यांचे ३०%, प्रत्यक्ष कंपन्या चालविणारांचें १०%, असें भांडवल असावें, वगैरे खुलासा त्यांत होईलच. नव्या योजनेस विरोध करण्याऐवजी तिचेशीं सहकार्य करणें व त्या दृष्टीनें शक्य तेवढ्या फायदेशीर सवलती मिळविणें, एवढेंच बसवाल्यांच्या हातीं राहील. वहातुकीच्या लिमिटेड कंपन्यांची व्यवस्था पगारी मॅनेजिंग डायरेक्टरांकडे सोपविण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

### ब्रिटिश तिजोरीनें सोन्याच्या खरेदीची किंमत वाढविली

लंडनमधील सोन्याची किंमत प्रत्येक औंसास ४ शिलिंग, ३ पेन्सनीं वाढविण्यांत आली आहे. म्हणजे आतां नवी किंमत प्रत्येक औंसास १७२ शिलिंग, ३ पेन्स अशी झाली आहे. ९ जूनपासून ही किंमत अंमलांत आली. हुंडणावळीच्या दरावर ह्या किंमतवाढीचा कांहींहि परिणाम घडून येणार नाहीं, असें जाहीर करण्यांत आलें आहे. स्टर्लिंग क्षेत्रांत कोठेंहि सरकारी तिजोरीनें सोनें विकत घेतलें, तरी त्यास हाच दर लागू पडेल. युरोपांतील युद्धसमाप्तीनंतर, सोन्याच्या वहातुकीचा व विम्याचा खर्च बराच उतरला असल्याकारणानें त्याच्या खरेदीचा दर वाढविणें शक्य झालें आहे, असा खुलासा सरकारनें केला आहे. बाजारभावाशीं मिळता दर करण्यापलीकडे ह्या दरवाढीचा कांहींहि उद्देश नाहीं, असा त्याचा अर्थ आहे.

### बालसन्मित्र विशेषांक

मालवण येथें प्रसिद्ध होणाऱ्या, श्री. पा. ना. मिसाळ ह्यांच्या "बालसन्मित्रा"चा १२ व्या वर्षाचा पहिला अंक "विशेषांक" म्हणून प्रसिद्ध झाला आहे. ह्या पाक्षिकांत मुलांच्या आवडीचे व त्यांच्या बुद्धीच्या आवाक्यांतील मनोरंजक व माहितीपूर्ण छोटेखानी लेख येत असतात. तें खरोखरच "मुलांमुलींचें आवडतें पाक्षिक" आहे.

[ हा प्रॉस्पेक्टस नव्हे – शेअरविक्रीची जाहिरात आहे ]

**सर्व शेअर्सच्या विक्रीची हमी मिळालेली आहे ( अंडरराइट झाले आहेत )**

शेअर–अर्ज शनिवार दि. ९ जूनपासून गुरुवार दि. १४ जूनपर्यंत स्वीकारण्यांत येतील

# दी बॉंबे सिल्क फिलेचर्स लि.

**[आधुनिक यांत्रिक पद्धतीनें कोशिट्यांपासून रेशीम तयार करणारा कारखाना]**

रजिस्टर्ड ऑफिस—२१ ठळकवाडी, बेळगांव

## अधिकृत भांडवल रु. २० लक्ष : विक्रीस काढलेलें रु. १० लक्ष

प्रत्येकीं रु. १० च्या ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें

**तूर्त रु. १० च्या प्रत्येक शेअरमागें अर्जाबरोबर रु. १ व अर्जमंजुरीनंतर रु. १ भरावयाचे आहेत.**

*विक्रीकरितां आतां फक्त पन्नास हजार शेअर्स शिल्लक असून, त्यांकरितां लोकांकडून शेअर–अर्ज मागवण्यांत येत आहेत.*

**संचालक–मंडळ**

श्रीमंत **चिंतामणराव भालचंद्रराव पटवर्धन**, कुरुंदवाड ( सीनिअर ) संस्थानचे राजे, कुरुंदवाड ( अध्यक्ष ).

मि. **एम. पी. कांगा**, डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज, गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, मुंबई. ( मुंबई सरकाराचे प्रतिनिधी ).

श्री. सरदार **जगन्नाथमहाराज पंडित**, फर्स्ट क्लास सरदार ऑफ दि डेक्कन, ... ... ... पुणें

श्री. सरदार **नागोजीराव दत्ताजीराव सरदेसाई, जांबोटीकर**, सेकंड क्लास सरदार ऑफ दि डेक्कन, ... बेळगांव

श्री. **रामचंद्र गोविंद सुळे**, सी. आय. ई., आय. एस. ई., बी. ए., एल. सी. ई., ए. एम. आय. ई.; ( इंडिया ) रिटायर्ड सुपरिंटेंडिंग एंजिनिअर. ... ... ... पुणें

शेठ **रमणलाल बी. चिनई**, रेशमाचे व्यापारी, ... ... ... ... ... मुंबई

श्री. **सीताराम कृष्ण रानडे**, रंग व रसायनाचे व्यापारी, ... ... ... ... मुंबई

श्री. **गजानन विश्वनाथ** ऊर्फ **बाबासाहेब साळवेकर**, बी. ए., व्यापारी व लँडलॉर्ड, सरदारगृह, ... मुंबई

श्री. **शंकर प्रभाकर ओगले**, म्हैसूर ग्लास ॲण्ड एनामेल वर्क्स लि., बंगलोर व त्रावणकोर ग्लास मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., अलवाई यांचे मॅनेजिंग डायरेक्टर ... ... ... ... बंगलोर

श्री. **नारायण गोविंद नाईक**, एम. आर. ए. (म्हैसूर), श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर व म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. चे मॅनेजिंग एजंट व एन. जी. नाईक आणि कं. लि. चे अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर (एक्स ऑफीशिओ) बंगलोर

हिशेबतपासनीस–श्री. गो. द. आपटे, बी. ए., जी. डी. ए., आर. ए., लक्ष्मी रोड, पुणें.

**मॅनेजिंग एजंटस**

**एन. जी. नाईक आणि कं. लि., बंगलोर**

कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीचे प्रमुख श्री. नारायण गोविंद नाईक यांच्या व्यवस्थेखालीं हिंदुस्थानांतील मोठा कच्च्या रेशमाचा कारखाना म्हैसूर संस्थानांत यशस्वी रीतीनें गेलीं सात वर्षे चालला असून शेअर–होल्डरांना भरपूर डिव्हिडंड देत आहे. श्री. नाईक यांचा रेशमी सुतकापडाचाहि कारखाना बंगलोरला आहे. म्हैसूरांत कच्च्या रेशमाचा कारखाना काढण्यापूर्वीच श्री. नाईक हे जपानला जाऊन तेथील त्या धंद्याचा सूक्ष्म अभ्यास करून आले होते.

या धंद्याचें महत्त्व जाणून युद्धपूर्वकाळांतहि सरकारानें त्याला संरक्षण दिलें होतें. हिंदुस्थानांतील मागणीइतकें रेशीम येथें तयार होत नाहीं. साहजिकच या धंद्याच्या वाढीला भरपूर वाव आहे. कंपनीच्या स्थापनेस मुंबई सरकारनें सर्वतोपरी सहाय्य केलें असून बेळगांव, धारवाड जिल्ह्यांत कच्च्या रेशमाच्या कारखान्याचा मक्ता सरकारनें तिला दिला आहे. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज, मुंबई हे सरकारतर्फे डायरेक्टर बोर्डावर आहेत.

**शेअर–अर्ज मिळण्याचीं ठिकाणें**

| | |
|---|---|
| मुंबई—कंपनीचे सर्व बँकर्स व ब्रोकर्स | बेळगांव—२१ ठळकवाडी येथील कंपनीचें ऑफिस व सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. |
| पुणें—दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., लक्ष्मीरोड व डेक्कन जिमखाना | हुबळी—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. |
| सोलापूर—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. | गदग—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. |
| जळगांव—दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. | ग्वाल्हेर—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. |
| नागपूर—दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. | उज्जैन—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. |
| अकोला—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. | अहमदाबाद—सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. |
| रत्नागिरी—दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. | |

खेरीज कंपनीचे बँकर्स व त्यांच्या शाखा, अंडरराइटर्स व ब्रोकर्स यांच्याकडेहि शेअर–अर्ज मिळतील.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

## पुण्यांतील व्यापार व उद्योगधंदे

### हातमाग आणि विणकर

### प्रि. गाडगीळ ह्यांच्या ग्रंथानें पाडलेला प्रकाश

(२)

पेशवाईच्या बहुतेक काळांत पुण्यांत जाडें कापडच मुख्यतः तयार होई. दरबारी लोकांना लागणारें तलम कापड बाहेरूनच मागवावें लागे. १८ व्या शतकाचे अखेरपर्यंत रेशमाचें कापड विणणें पुणेंकरांना माहीतच नव्हतें, असें दिसतें; पैठण व येवलें ह्यांसारख्या ठिकाणांहून तें आणवावें लागे. १९ व्या शतकाचे प्रारंभीं तेथील कांहीं विणकऱ्यांना पुण्यास येण्यास प्रोत्साहन देण्यांत आलें व तेव्हांपासून रेशमाच्या धंद्यास येथें प्रारंभ झाला. राजाश्रयामुळें ह्या धंद्यानें चांगलें मूळ धरलें, परंतु पेशवाई संपुष्टांत आल्यावर ह्या धंद्यासहि वाईट दिवस आले असले पाहिजेत. १९ व्या शतकाचे मध्याच्या सुमारास त्यास पुनः बरे दिवस दिसूं लागल्याचें आढळतें. गॅझिटिअरमधील ह्याविषयींची माहिती उद्बोधक होईल.

१८८३–८४ मध्यें पुण्यांत १,१०० ते १,३०० माग होते. रेशमाचें कापड करण्याचा धंदा ज्यास्त भरभराटींत होता. कामगारांत हिंदु व मुसलमान ह्या दोघांचाहि भरणा होता. हिंदूंच्या हातमागांपैकीं ३०० हातमाग कोष्टी चालवीत होते व १५० हातमाग साळी चालवीत होते. हिंदु कामगारांची वस्ती मुख्यतः सोमवार, वेताळ, भवानी, रास्ता व शुक्रवार या पेठांतून होती. मुसलमानांजवळ ५० हातमाग होते.

हातमागाचें कापड जाडेंभरडें निघे. २०$^{s}$ ते ३०$^{s}$ चें सूतच त्यास मुख्यतः वापरण्यांत येई. हें सूत खरेदी करण्यासाठी विणकरांना दरमहा दर शेकडा २ टक्के व्याजानें कर्ज काढावें लागे.

रेशमाच्या कापडाच्या धंद्यानें पुण्यांत सत्वर चांगलेंच बस्तान बसविलें. १८८३–८४ मध्यें ह्या धंद्यांत ७०० ते ८०० विणकर गुंतलेले होते. रेशमी कापड विणणाऱ्या मागांपैकी दोन तृतीयांश माग मोमीन व मुसलमान ह्यांच्या मालकीचे होते. पैठणी व पितांबर ह्यांचेंच उत्पादन मुख्यतः चाले, व त्यांच्या वार्षिक उत्पादनाची किंमत २,५०,००० रुपये तरी असली पाहिजे.

१९ व्या शतकाचे अखेरीस पुण्यांतील हातमागाच्या धंद्यास ओहोटी लागली, त्यास कारण जास्त संघटित अशा कोइमतूर अहमदाबाद, बनारस वगैरे केंद्रांची स्पर्धा हें होय. ही ओहोटी कायम राहून तिची गति वाढतच गेली. १९०४ चे मानानें १९१६ सालीं हातमागाचा धंदा निम्म्यावर आला. बदलत्या आवडी-निवडींस अनुरूप असा मर्सराइज धाग्याचा माल आतां निघूं लागला. १९२६-२७ मध्यें अगदी मोसमांत ५०० माग चालू होते. त्यानंतर हातमागाचा धंदा अधिकच निकृष्टावस्थेस पोंचला आहे.

हातमागाच्या धंद्याविषयीं पूर्वीच्या खानेसुमारींत मिळणारी माहिती अपुरी व भ्रामक ठरल्याकारणानें प्रिं. गाडगीळ ह्यांनीं विणकरांच्या कुटुंबांची तपशीलवार पहाणी केली आहे. कांहीं विशिष्ट जातींमध्येंच विणकरांचा धंदा चालू आहे, ह्या भूमिकेवरून त्यांनीं अशा जातींची माहिती मिळविली. अशा जातींचीं


डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध


लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट ख. निराळा

दोन वेळां उपयोग

दि मागोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —




फौंटनपेनकरतां

कॅमल इंक

सर्व पसंत करतात.

दांडेकर आणि कंपनी, मुंबई ८

१९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर

१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी.ए.

अध्यक्ष:—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

—त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—

तुळजाराम मोदी

मोतीचौक, सातारा.

कुटुंबें थोडीं असल्याकारणानें पुरी माहिती मिळवणें शक्य झालें. गंज, भवानी, नाना, वेताळ आणि घोरपडी पेठांत पहाणी केली, त्यांत मोमीन, पद्मसाळी आणि स्वकुळसाळी ह्या सर्वांचा समावेश झाला. एकूण ७९६ कुटुंबांची पहाणी केली, त्यांची जातवार व पेठवार वाटणी खालीं दिली आहे:—

| जात | गंज | भवानी | नाना | वेताळ | घोरपडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| पद्मसाळी | २३१ | २८२ | ८८ | ... | ... | ६०१ |
| स्वकुळसाळी | ६७ | ... | ... | २० | ... | ८७ |
| ,, (पैठण) | २३ | ... | ... | ... | ... | २३ |
| मोमीन | ४६ | ... | ... | २४ | १५ | ८५ |
| एकूण | ३६७ | २८२ | ८८ | ४४ | १५ | ७९६ |

गॅझेटिअरमध्यें ज्या पद्मसाळींचा उल्लेखहि नाहीं, अशांचा पुण्यांतील विणकरांत मुख्य भरणा आहे, हें श्री. गाडगीळ ह्यांच्या पहाणींत आढळून आलें आहे.

हातमागाच्या कारखान्यांपैकी ९८% कारखान्यांस फॅक्टरी ॲक्ट लागू नव्हता. एक किंवा दोन माग असलेले कारखाने मुख्यतः गंज पेठेंत आढळले. ८२% कारखान्यांत एक किंवा दोन मागच आहेत. पद्मसाळींच्या मालकीचे ७३% कारखाने आहेत.

१९३० च्या मंदीमुळें पुण्यांतील हातमागाच्या धंद्यास चांगलाच धक्का बसला. बाहेरील केंद्रांतील मालाची स्पर्धाहि तीव्रतर होऊं लागली. त्याकारणानें कित्येक विणकरांना आपला पिढीजात धंदा सोडणें भाग पडलें व ही प्रवृत्ति वाढत गेली. विणकरांची प्रकृति धडधाकट नसल्याकारणानें शारीरिक कष्टाचें काम करणें त्यांना शक्य होत नाहीं आणि कमी वेतनाचें त्यांस काम स्वीकारावें लागतें. साहजिकच विड्या करण्यासारखें बैठें काम पत्करणें त्यांस जास्त सोईचें जातें. विणकराचा धंदा सोडलेल्या कुटुंबांपैकी ५४% कुटुंबांनीं विड्या करण्याचा व घरगुती नोकरीचा धंदा पत्करला असें दिसून येतें. कांहीं वर्षांपूर्वी विणकरांसाठी एक सहकारी सोसायटी चालविण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तो अयशस्वी ठरला. विणकऱ्यांचा विश्वास तिला कधीच संपादन करतां आला नाहीं, सहकारी तज्ज्ञांना धंद्याच्या परिस्थितीची यथार्थ कल्पना नव्हती व व्यवस्था खर्चहि डोईजड झाला.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
सिंप्लेक्स ५–७–४५
न्यू इंडिया ९–७–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. ५।६।४५ | बुधवार ६।६।४५ | गुरुवार ७।६।४५ | शुक्रवार ८।६।४५ | सोमवार ११।६।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २१९६—४ | २१७७—८ | २२०५—० | २२००—० | 'सावट्टु' दिनानिमित्त सुट्टी |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०९—० | ४०५—८ | ४०८—८ | ४०८—० | |
| २२०१; १६९५ | ५०–०–० S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९०८–१२ | १८९५—० | १९०३–१२ | १८८८–१२ | |
| ७६५; ५३३ | १६–०–० S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१४—८ | ६१०—० | ६११—० | ६०७—८ | |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५३६—८ | ५३३—० | ५३३—० | ५३१—० | |
| ४९८; ३६१ | ६–०–० † | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ३८६—० | ३८३—८ | ३८३—० | ३७९—० | |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २९३—८ | २९१—० | २९१—० | २९१—० | |
| ३९४; २८२ | ९–०–० S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३०१—० | ३००—० | ३००—० | २९९—० | |
| ३०५; २१८ | १२–०–० S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८६—० | २७९—८ | २७९—८ | २८१—८ | |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ३–१५–३ | ३–१५–६ | ३–१५–६ | ३–१५–३ | |
| २१-१४; १३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—३–६ | १४—२–६ | १४—३–० | १४–२–० | |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | २–१५–० | २–१५–० | २–१५–० | २–१५–० | |
| १२७०; ६३० | १११–०–० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७२३–१२ | ७२०—० | ७२३–१२ | ७२०—० | |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २१६—४ | २१७—० | २१७—० | २१७—० | |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२३—० | २२१—८ | २२३—० | २२३—८ | |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३१—४ | ५३०—० | ५२७—८ | ५२५—० | |
| ९३-१२; ७३ | १–८–० | जुलै | न्यू इंडिया ॲ० | १५ | ८३–१२ | ८३—० | ८२—८ | ८२—० | |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३६—२ | ३७—६ | ३७—२ | ३६–१० | |
| ८५; ४८ | २–०–० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५०—८ | ५०—८ | ५०—० | ५०—० | |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | २०—४ | २०—२ | २०—४ | १९–१२ | |
| ९०; ६८-१२ | ३–०–० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६७—८ | ६७–१२ | ६८—८ | ६८–१२ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १००–१५ | १००–१४ | १०१—० | १००-१५-३ | |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
न्यू इंडिया ॲशु. १–६–४५ ते २९–६–४५ सिंप्लेक्स २५–५–४५ ते १४–६–४५

शुक्रवार दि. ८–६–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—७—६ |
| १९५१–५४ | १०१—०—० |
| १९५७ | १००—४—० |
| १९६३–६५ | ९८–१५—६ |
| १९६६–६८ | ९८—६—० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४१—८ |
| सेंट्रल | ८०—४ |
| इंडया | १८५—० |
| इंपी० | { १९९३–१२ |
| | { ५०२—८ |
| रिझर्व्ह | १४१—० |
| युनियन | ९—० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १७७०—० |
| बॉम्बे ट्रॅम | १४२—८ |
| टाटा हायड्रो | २०५—० |
| टाटा पॉवर | १८१५—० |

## चिरमुळे इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटच्या कार्यास प्रारंभ

### डॉ. मो. ना. आगाशे यांचे महाराष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षासंबंधीं विचार

#### नव्या पिढीनें पुढें आलें पाहिजे

विमा महर्षि अण्णासाहेब चिरमुले यांना ता. ४-६-४५ रोजीं ८२ वें वर्ष लागलें. या शुभ दिनाच्या निमित्तानें महाराष्ट्राची व्यापारी व औद्योगिक उन्नति व्हावी अशी तळमळ वाटणाऱ्या कांहीं मंडळींनीं चिरमुले सत्कार समितीचे अध्यक्ष डॉ. मो. ना. आगाशे यांची मुलाखत घेऊन श्री. अण्णासाहेब व महाराष्ट्राचा आर्थिक उत्कर्ष याबद्दल त्यांना प्रश्न विचारले. त्यांस डॉ. आगाशे यांनीं जीं उत्तरें दिलीं व विचार प्रदर्शित केले ते महाराष्ट्राच्या सध्याच्या काळांत मार्गदर्शक असल्यामुळें खालीं देत आहों. डॉ. आगाशे म्हणाले, "श्री. आण्णासाहेब चिरमुले आतां केवळ सातारकरांचे अगर वेस्टर्न इंडियादि संस्थांचेच राहिलेले नाहींत. ते आपल्या भरीव कार्यामुळें केव्हांच महाराष्ट्राचे आदर्श झाले आहेत. तथापि गेल्या वर्षी मोठा समारंभ करून त्यांनीं स्थापिलेल्या तिन्ही संस्थांनीं त्यांना सन्मानपूर्वक अखिल महाराष्ट्राचे स्वाधीन केले आहेत. त्यांचें पूर्व चरित्र सर्व महाराष्ट्राचें स्फूर्तिस्थान असून त्यांचें उर्वरित आयुष्य नव्या पिढीचें आशास्थान आहे."

#### महाराष्ट्र आघाडीवर पाहिजे

"हिंदुस्थानच्या औद्योगिक व आर्थिक पुनर्घटनेच्या मोठ्या योजनांची आखणी चालू आहे. या सर्व आर्थिक पुनर्रचनेंत महाराष्ट्रानें आघाडीस राहिलें पाहिजे. आपल्या विमा महर्षीनी आपणांस हें काम सहज साध्य आहे असें दाखवून दिलें आहे. महाराष्ट्रांत बुद्धि आहे हें कोणास सांगावयास नको. व्यापार-उद्योगधंदे यांस लागणारे, ध्येयनिष्ठा चिकाटी, सचोटी आणि सेवाबुद्धि हे गुणहि महाराष्ट्रांत भरपूर आहेत हे आण्णासाहेबांनीं स्वोदाहरणानें दाखवून दिलें आहे. महाराष्ट्राच्या तरुणांनीं आणि धनिकांनीं आतां पुढें आलें पाहिजे. श्री. आण्णासाहेबांनीं आणखी नव्या कंपन्या काढून द्याव्या असें कांहीं लोक म्हणतात. ते आतां वयातीत झाले आहेत. त्यांच्याकडून आतां ही कामाची अपेक्षा कां करावी ? इतरांनींच आतां पुढें व्हावें. महाराष्ट्रांत आगीच्या विमा कंपन्या हव्या आहेत. विमा महर्षीनीं इन्शुअरन्स कंपनीची कल्पना मूर्त स्वरूपांत आणली पाहिजे. निरनिराळ्या गिरण्यांना लागणारीं यंत्रें तयार करण्याचे कारखाने निघाले पाहिजेत. जरा विचारपूर्वक निरीक्षण केल्यास अशा आपल्या अनेक गरजा आपल्या दृष्टीस पडतील.

#### नव्या पिढीची शिक्षणाची दिशा

"आपल्या पिढीनें आतां याच तऱ्हेनें शिक्षण घेतलें पाहिजे. यांत्रिक ज्ञान, रासायनिक ज्ञान आणि व्यापारशास्त्र यांतच नवी नवी तरतरीत बुद्धि शिरली पाहिजे. इंजिनियर्स व्हा, बी. एससी. टेक. व्हा, बी. कॉम व्हा, हाच सल्ला सर्वांनीं त्यांस दिला पाहिजे. दुय्यम शिक्षणांत आपल्या कॉंग्रेस सरकारनें ही सुधारणा थोड्या प्रमाणांत घडवून आणली आहे. तिचा पूर्ण फायदा घ्या. सोलापुरास नॉर्थकोट हायस्कूलचें नॉर्थकोट टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्यें रूपांतर करण्यांत आलें आहे. तेथें सरकार दरसाल हजारों रुपये आपल्या मुलांसाठी खर्च करीत आहेत. तेथून पास झालेल्या मॅट्रिक मुलांस इतर मॅट्रिकचें सर्व ज्ञान असून शिवाय वरिष्ठ दर्जाचें यांत्रिक ज्ञान असतें व कॉलेजांत इंजिनिअरिंग कोर्स घेण्यास तो जास्त लायक असतो. बुद्धिमान विद्यार्थ्यांनीं या व अशा संस्थांचा जरूर फायदा घेतला पाहिजे.

#### चिरमुले इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटची स्थापना

"श्री. अण्णासाहेब चिरमुले यांनीं वेस्टर्न इंडिया विमा कंपनीसारख्या आदर्श संस्था स्थापून महाराष्ट्रापुढें कार्याचे प्रत्यक्ष धडे ठेवलेलेच आहेत. तथापि त्यांची स्फुर्ति शाश्वत रीतीनें मिळत रहावी म्हणून व विमा विषयाचें ज्ञान व ब्यांकिंगचें ज्ञान तरुण पिढीला सुलभ रीतीनें मिळावें म्हणून चिरमुले ब्यांकिंग आणि इन्शुअरन्स इन्स्टिट्यूट स्थापन करण्याचें गेल्या वर्षी चिरमुले सत्कार समितीनें ठरविलें होतें. त्याप्रमाणें ती स्थापन होऊन तिनें आपल्या कार्यास आरंभही केला आहे हें जाहीर करण्यास मला आनंद वाटतो. या संस्थेची सर्व जबाबदारी वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें स्वीकारली असून ता. ८ जानेवारी १९४५ पासून या संस्थेतर्फे विमा शिक्षणाचा वर्ग सुरू करण्यांत आला आहे. इंडियन लाइफ इन्शुअरन्स असोसिएशनतर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेसाठीं यंदा १७ विद्यार्थी या संस्थेनें तयार केले आहेत. साताऱ्यास या परीक्षेच्या केंद्रस्थानाचा मानही मिळाला असून आजच पहिल्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. यंदा या संस्थेंत श्री. न. आ. चरणकर, एम्. ए., एफ. सी. आय. आय., श्री. बा. हं. खाडिलकर, बी. ए., बी. कॉम. चिरमुले चरित्रकार व डॉ. भा. वि. पाठक, एम्. बी. बी. एस., बी. एच. वाय. यांनीं प्राध्यापक म्हणून काम केलें आहे. अशा तऱ्हेनें कार्यास सुरवात झाली आहे. याचा ज्यांना शक्य असेल त्या सर्वांनीं जरूर फायदा घ्यावा अशी विनंति आहे.

#### श्री. अण्णासाहेबांचें नवें अर्थयंत्र

"श्री. अण्णासाहेबांच्याकडून वास्तविक आतां नव्या कांहीं कार्याच्या उपक्रमाची अपेक्षा करावयाची नाहीं हें खरें. तथापि त्यांचा अविरत पण संथ असा उद्योग चालूच असून त्याचें परिणत स्वरूप म्हणून आर्थिक उत्कर्षाचें कांहींतरी नवें यंत्र लवकरच अस्तित्वांत येईल असें वाटतें इतकेंच मी आज या प्रसंगाच्या निमित्तानें बोलून ठेवतों."

---

#### पांच तासांत नवीन घर बांधून तयार

इंग्लंडमध्यें युद्धाचा परिणाम म्हणून लाखो नवीन घरें बांधावीं लागणार आहेत. तीं शक्य तितकीं सोयीचीं व स्वस्त व्हावीं ह्याविषयीं काळजी घेण्यांत येत आहे. घरांचे सुटे भाग विशिष्ट नमुन्याप्रमाणें तयार ठेवले असतां ते नुसते जोडण्याचें काम अत्यंत त्वरित होतें असा त्या देशांत अनुभव आला आहे. सात मजुरांनीं एक घर ह्याप्रमाणें पांच तासांत उभें करून दाखवलें आहे. आणखी सात मजुरांनीं घरांत सामान नेऊन थोडक्या वेळांत तें सजवूनहि टाकलें.

#### साधु व संन्यासी ह्यांस भिक्षा मागण्यास परवानगी ठेवा

धार्मिक ग्रंथांत सांगितल्याप्रमाणेंच भिक्षा मागणारे व लोकांच्या आदरास पात्र असलेले जैन साधू व इतर खरेखुरे संन्याशी ह्यांस नियोजित भिक्षा-बंदी कायदा लागू पडूं नये, अशी सूचना बॉंबे ऑफ्स (बँकर्स) असोसिएशन लि. नें मुंबई सरकारास केली आहे.

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3484

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २० जून १९४५ अंक २५

पश्चिम हिंदुस्थानांतील आदर्श विमा संस्था

## दि सुप्रीम म्युच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

मुख्य कचेरी : ८६६ सदाशिव पेठ, पुणें २

★ भविष्यकाळाचे अनिश्चिततेपासून संरक्षण करण्यास व उतारवयांतील आपलें आयुष्य सुखी करण्यास ' विमा पॉलिसी ' हेंच एक अमोघ साधन आहे. आकर्षक विमा योजना व जास्तींत जास्त सवलती देणारी ही महाराष्ट्रीय कंपनी आपल्या सेवेस सदैव तयार आहे.

—: सन १९४४ चें कार्य :—

मिळविलेलें काम रु. १६,५२,५००, स्वीकृत काम रु. १४,९९,५००

पूर्ण काम रु. १४,०९,७५०

मध्यप्रांत व वऱ्हाड या भागांत वजनदार, उत्साही व अनुभविक प्रतिनिधी भरपूर वेतनावर अगर कमिशनवर तावडतोब नेमणें आहेत. —जास्त माहितीसाठीं लिहा—

त्र्यं. दा. देशपांडे, बी. ए., एलएल. बी.
सेक्रेटरी

व्ही. एन. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## विविध माहिती

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.—आणखी भाग विक्रीस परवानगी**

महाराष्ट्र बँकेस हिंदुस्थान सरकारकडून आणखी १०,००० भाग प्रत्येकीं ५ रुपये वाढाव्यानें विकण्याची परवानगी आली आहे, असें समजतें.

**रामायणाची प्रत सांपडली**

१५२ सुंदर रंगीत चित्रें असलेली रामायणाची एक प्रत बंगालमध्यें नुकतीच सांपडली, ती कलकत्ता विश्वविद्यालयाच्या म्यूझियममध्यें ठेवण्यांत आली आहे. शके १६९४ मध्यें ती लिहिलेली आहे.

**बंगालमध्यें कापडाच्या गिरण्या**

श्री. एन्. आर. सरकार हे बंगालमध्यें दहा ते वीस कापडाच्या गिरण्या स्थापण्यासाठी ब्रिटिश यंत्रसामुग्री खरेदी करण्याच्या उद्योगांत आहेत.

**रेल्वे उतारूंना दंड व कारागृहवास**

स्पेशल रेल्वे मॅजिस्ट्रेटनें ता. ११ जून रोजीं आपलें कोर्ट दिल्ली रेल्वे स्टेशनांत भरवून आगगाड्यांच्या डब्यांच्या फळीवर उभें राहून किंवा तिकीट न काढतां प्रवास केल्याबद्दल २५० उतारूंना शिक्षा केली. २ रु. ते २० रु. दंड आणि २ दिवस ते २० दिवस कारागृहवास अशी शिक्षेची मर्यादा होती.

**प्रीमिअर ऑटोमोबाइल कंपनीचा कार्यक्रम**

प्रीमिअर ऑटोमोबाइल कंपनीच्या मोटारगाड्यांच्या उत्पादनास १९४६ च्या मध्याचे सुमारास प्रारंभ होईल, असें श्री. लालचंद हिराचंद ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतेंच सांगितलें. सुटे भाग स्वतः तयार करून तीन वर्षांचे अवधींत सबंध मोटार स्वतःचे कारखान्यांत बनविण्याचा कंपनीचा विचार आहे. क्रिस्लर कॉर्पोरेशनशीं ह्या संबंधांत बोलणीं करण्याकरितां श्री. लालचंद हे अमेरिकेस गेले होते.

**सहकारी शिक्षणाची व्यवस्था**

उच्च सहकारी डिप्लोमा परीक्षासाठी उमेदवार तयार करण्याकरितां मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट मुंबई येथें जुलैच्या मध्यापासून एक शाळा चालविणार आहे, ती सुटीचे दिवस सोडून दररोज सायंकाळीं एक तास भरेल.

**बॉंब व पाणसुरुंग**

ब्रिटिश विमानदलानें युरोपांतील युद्धांत युरोप खंडावर १०,००,००० टन बॉंब टाकले, त्यांपैकी दोन तृतीयांश बॉंब एकट्या जर्मनीवर टाकण्यांत आले. एकूण ४७,००० पाणसुरुंग पेरण्यांत आले, त्यांनीं १,००० जर्मन आगबोटी बुडविल्या.

**त्रावणकोर येथील कृत्रिम खतांचा कारखाना**

५४,००० टन उत्पादन शक्तीचा कृत्रिम खतांचा एक कारखाना त्रावणकोर संस्थानांत लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे, त्यास दोन कोटि रुपये खर्च येईल. कारखाना उभारण्यास ४,००० इंजिनिअर व कामगार लागतील व कारखाना सुरू झाला म्हणजे त्यांत ५,००० लोकांना काम मिळेल.

**चीनमधील महागाई**

चीनमध्यें बर्फाची किंमत दर पौंडास ७ रुपये झाली आहे. तीव्र उन्हाळा सहन होणें त्यामुळें कठीण झालें आहे.

**ट्रेझरी बिलांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. ४ आणे.**

हिंदुस्थान सरकारच्या तीन महिने मुदतीच्या दोन कोटि रुपयांच्या स्वीकारलेल्या ट्रेझरी बिलांच्या टेंडर्सवर सरासरीच्या व्याजाचा दर द. सा. द. शे. ४ आणे सुटला! इतका हलका दर अपूर्व गणला जात आहे.

**हिंदी रेल्वेजचें उत्पन्न**

गेल्या एप्रिलच्या प्रारंभापासून १० मेपर्यंतच्या मुदतींत हिंदी सरकारी रेल्वेजना २४ कोटि, ८५ लक्ष रुपये इतकें उत्पन्न झालें. हा आकडा गेल्या वर्षींतल्या तत्सम मुदतीच्या मानानें ३ कोटि, ६२ लक्ष रुपयांनीं अधिक आहे.

**कर्जदारांची सोय**

मुंबई सरकारनें नेमलेल्या कर्ज–तडजोड बोर्डांची कचेरी एका गांवांत असली तरी त्याचें कार्यक्षेत्र मात्र एका तालुक्यापेक्षा मोठें असतें. कर्जदारांस प्रवासाचा खर्च पडूं नये व त्यांचा वेळ वांचावा ह्यासाठी बोर्डांनीं आपल्या कचेरीचें प्रत्येक तालुक्यांतील व पेट्यांतील मुख्य गांवीं वेळोवेळ स्थलांतर करावें, असें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. ह्यासंबंधांत डिस्ट्रिक्ट जज्ज तारखा ठरवून देतील.

**बॉंब हल्ल्यांस पडणारी किंमत**

टोकिओ किंवा ओसाका ह्यांवर मोठ्या प्रमाणावर बॉंब हल्ला करावयाचा म्हटलें, तर प्रत्येक खेपेस १ अब्ज, १० कोटि रुपये खर्च येतो. अमेरिकेच्या २,००८ "सुपर फोर्ट्रेस" विमानांकडे ह्या बॉंबहल्ल्यांची जबाबदारी सोपविलेली आहे. त्यांत अमेरिकेचें ४ अब्ज रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

**मोटारींतील उंदरांचा पराक्रम**

ग्रेट ब्रिटनमधील पेट्रोल रेशनिंग जरा ढिलें करण्यांत आल्यानंतर इस्लिंग्टन (इंग्लंड) येथील मि. व मिसेस टर्नर हें जोडपें आपल्या मोटारींतून बाहेर निघालें. मोटारगाडी तबेल्यांत फार दिवस पडून राहिली होती त्यामुळें उंदरांस सवड मिळून त्यांनीं मोटारीच्या गाद्यांत घर केलें होतें, तें मालकांच्या नजरेस आलें नाहीं. मोटार चालू झाल्यावर, मिसेस टर्नरच्या पायास कांहींतरी गार लागलें. तिनें खालीं वाकून पाहिलें तेव्हां तिला उंदरांचीं दोन पिल्लें दिसलीं. तिनें दचकून किंकाळी फोडली व शेजारी बसून मोटार चालवीत असलेल्या आपल्या पतीच्या खांद्याचा आश्रय घेतला. मि. टर्नर ह्यांच्या हातून मोटारीचें चक्र निसटलें व मोटार फुटपाथवर चढून भिंतीवर आदळली. पति–पत्नीस इस्पितळांत पोंचवावें लागलें.

**रिझर्व्ह बँक आणि ब्रह्मदेशांतील ब्रिटिश लष्करी सरकार**

एका ऑर्डिनन्सनें रिझर्व्ह बँक कायद्यांत एक नवीन कलम दाखल केलें आहे, त्याचे अन्वयें, ब्रह्मदेशांतील ब्रिटिश लष्करी सरकारचे बँकर म्हणून काम करण्यास आणि हिंदुस्थान सरकारास बँक ज्या सवलती देते त्या सवलती त्या सरकारासहि देण्यास बँकेस अधिकार प्राप्त झाला आहे,


**GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS.**

**SERVANTS OF INDIA SOCIETY'S HOME, POONA 4**

**ADMISSIONS TO STUDENTS**:—reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics.

**D. R. GADGIL,**
*Director*

अर्थ

## विमा कंपन्या काबीज करण्याच्या कारवाया

### जहांगिर कमिटीपुढील महत्त्वाचे प्रश्न

हिंदी विमा कंपन्यांच्या कारभारांत कांहीं अयोग्य दिशेनें गोष्टी घडत आहेत, त्यांचेकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें असून त्यासंबंधांत चौकशी करून अनिष्ट प्रकारांस आळा घालण्याकरितां उपाययोजना सुचविण्यासाठी सरकार एक कमिटी नेमीत आहे, अशा अर्थाची घोषणा हिंदुस्थान सरकारनें दोन महिन्यांपूर्वी केली. ह्या कमिटीचे अध्यक्ष सर कावसजी जहांगिर हे असून सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स श्री. वैद्यनाथन हे तिचे सेक्रेटरी आहेत. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मि. वजाहत हुसेन, एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज सर ॲलन लॉइड, बॉंबे स्टॉक एक्स्चेंजचे अध्यक्ष श्री. के. आर. पी. श्रॉफ, इत्यादींची कमिटीचे सभासद म्हणून नेमणूक झालेली आहे. विमा कंपन्यांच्या अंतर्गत व्यवस्थेसंबंधाच्या महत्त्वाच्या भानगडींचा विचार कमिटीस करावा लागणार आहे आणि कमिटीच्या घटनेवरून तिचा रिपोर्ट वजनदार होईल आणि त्याप्रमाणें सरकार योग्य ती उपाययोजना सत्वर करील अशीं चिन्हें दिसत आहेत.

विमा कंपन्यांची व्यवस्था कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे असतां कामा नये, असें दुरुस्त विमा कायद्यानें मागेंच ठरविलें आणि त्यास अनुसरून विमा कंपन्यांच्या मॅनेजिंग एजंटांचे करार संपुष्टांतहि आले. तथापि वस्तुतः तशाच प्रकारचे परंतु कायद्यांत बसतील असे व्यवस्थापकांचे नवे करार अस्तित्वांत येऊन कायद्याचा उद्देश निष्फळ होत असल्याचें आढळतें. हप्त्यांच्या उत्पन्नाच्या कांहीं प्रमाणांत व्यवस्थापकांचें वेतन ठरविणें कायदेशीर असल्याकारणानें कंपन्यांत निर्णायक मताधिक्य असणारांचें चांगलेंच फावलें. हें वेतन केवढें मोठें असूं शकतें ह्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून ओरिएंटलचा दाखला देतां येईल. ओरिएंटल विमा कंपनींत अशा प्रकारचा करार नाहीं, परंतु तिच्या मॅनेजरास हप्त्यांच्या उत्पन्नाच्या १% इतकें वेतन देण्याचें समजा ठरलें तर त्यास दरमहा ४०,००० रुपये मिळतील असा हिशेब करण्यांत आला आहे.

ह्याचा सहाजिकच परिणाम असा होतो कीं, कांहीं पैसेवाल्या लोकांचा गट चालू स्थितींतल्या लहान-मोठ्या विमा कंपन्यांचे भाग खरेदून गोळा करूं लागतो व त्या कंपन्यांत मताधिक्य व त्यांवर हुकमी ताबा मिळवूं पहातो. कोणत्या कंपनीची केव्हां पाळी येईल, ह्याचा नेम कोणीं सांगावा ? बाजारांत हे भाग विक्रीस असतात. त्यांची सहाजिकच किंमत भरमसाट वाढते. कंपनीच्या भागावर प्रत्यक्ष किती व्याज सुटतें, तिचें भवितव्य किती उज्वल आहे, व्याजाचे चालू दर काय आहेत, वगैरे गोष्टींवर भागांचे बाजारभाव साधारणतः अवलंबून असतात. ज्यांना त्यांवरील डिव्हिडंडशींच मुख्यतः कर्तव्य आहे, असे लोक वरील दृष्टीनेंच भागांच्या किंमतीकडे पहातात. परंतु, कंपनीचा ताबा मिळवूं पहाणारांची दृष्टि जास्त भेदक असते; त्यांना कंपनीवर सत्ता मिळवून त्यापासून मोठें घबाड साधावयाचें असतें. असे लोक शक्य तेवढे भाग व त्यांचा मताधिकार आपल्या ताब्यांत आणण्यासाठी त्यांस वाटेल ती किंमत देण्यास तयार होतात. भाग विकत घेण्यासाठी बाजारभावाच्या चौपट-पांचपट रकम जे देतात, ते तिची चांगली सव्याज वसुली केल्यावेरीज रहातील काय ? कंपनीमध्यें आवाच्या सवा वेतनावर आपलीं माणसें नेमून व अन्य मार्गांनीं कंपनीकडून ते पैसे उकळणार हें उघड आहे. कंपनीबद्दल त्यांस आत्मीयता वाटण्याचें कारणच नसतें. कंपन्यांचे व्यवस्थापक अशा रीतीनें बदलले जाणें किंवा नेमले जाणें विमेदारांच्या हिताच्या दृष्टीनें अनिष्ट आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. एक लक्ष रुपये भांडवलाच्या कंपनीची जिंदगी दोन-चार कोटि रुपयेहि सहज असूं शकते व ही जिंदगी वस्तुतः विमेदारांच्या मालकीची असते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. विमेदारांचे हितसंबंध हें मूठभर मतलबी पैसेवाल्या लोकांचें खेळणें बनतां कामा नये. गेल्या एक दोन वर्षांत बऱ्याच हिंदी कंपन्यांचे व्यवस्थापक अशा रीतीनें बदलले गेले आहेत. वृत्तपत्रें काळजीपूर्वक वाचणारांच्या नजरेपुढें कित्येक सुप्रसिद्ध कंपन्यांचीं उदाहरणें येतील, त्यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण नाहीं. नव्या विमा कमिटीस ह्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करावा लागेल. कितीहि भाग धारण केले तरी मतांची संख्या त्या प्रमाणांत न वाढतां ती अगदी मर्यादित रहावी, अशा तऱ्हेची योजना उपाय म्हणून सुचविण्यांत येत आहे.

विमा कंपन्यांपुरतेंच हें अनिष्ट वळण मर्यादित राहिलेलें नसून विमा कंपन्यांच्या पैशानें बँकांचे भाग खरेदी करून किंवा बँकांच्या पैशानें विमा कंपन्यांचे भाग खरेदी करून उभय संस्थांच्या हितसंबंधाची गुंतागुंत करण्याची प्रवृत्तिहि दिसून येत आहे. अशा रीतीनें एका संस्थेच्या भागांपैकीं बहुसंख्य भाग आपल्या ताब्यांत ठेवून त्याचे जोरावर मूठ स्वतःचीच केवळ नव्हे तर दुसरी संस्थाहि आपल्या अधिकाराखालीं आणतां येते. ह्या घटनेस आळा बसविण्याचें कार्यहि जहांगिर कमिटीस करावयाचें आहे. विमा कंपन्यांप्रमाणें बँकांचें भांडवलहि त्यांचेजवळील एकूण जिंदगीच्या मानानें अल्प असतें. त्याकारणानें गटवाल्या लोकांना कांहीं भाग मुठींत धरून फार मोठाल्या उलाढाली करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ह्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याचा मोह झाल्यास त्याचे दुष्परिणाम किती खोल व दूरवर पोचतील ह्याची कल्पनाच केलेली बरी. बँक व विमा कंपनी ह्या दोघांचाहि मॅनेजर किंवा मॅनेजिंग डायरेक्टर एकाच व्यक्तीस होतां येऊं नये, असें सुचविण्यांत येत आहे, त्याचें कारण वरील विवेचनावरून ध्यानांत येईल.

विमा कंपन्यांनीं आपले पैसे सुरक्षित ठिकाणींच गुंतवावे, त्यांचा सट्टेबाजीकडे उपयोग करूं नये, ही गोष्ट सहज पटण्यासारखी आहे. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति कित्येक कंपन्यांचे बाबतींत वेगळी आढळते. इतर कंपन्यांप्रमाणें विमा कंपन्यांचा व्यवहार फायद्यांत चालला आहे किंवा नाहीं, हें दरसाल उघड कळण्यास मार्ग नसतो. ठराविक वर्षांनीं त्यांचे मूल्यमापन झालें म्हणजेच वाढावा उरला का तोटा आला, हें स्पष्टपणें कळूं शकतें. विमा कंपन्यांचे चालक कर्तव्यतत्पर नसतील, तर त्यांना ही मोठीच सोय वाटते; कारण

त्यांच्या व्यवहारांची खरी परीक्षा मूल्यमापनाच्या वेळेपर्यंत होऊंच शकत नाहीं. विमा कंपन्यांचे पैसे म्हणजे विमेदारांचें धन गोत्यांत येणें सर्वस्वी अनिष्ट असलें तरी विमेदार संघटित होऊन त्यावर उपाययोजना करण्यास असमर्थ ठरतात आणि भागीदारांत चालकांचेंच मताधिक्य असतें. विमा कंपन्यांचे फंड्स गोत्यांत येऊं शकतील अशा तऱ्हेनें ते गुंतविले जाणें अशक्य कसें करतां येईल ह्याचाहि विचार जहांगिर कमिटीस करावा लागेल. व्यवस्थापकांचे अधिकाराखाली कंपन्यांची सर्व जिंदगी असते, तिचे आधारावर त्यांस सट्टे खेळतां येतात. नफा झाला तर व्यवस्थापकांचा व नुकसान आलें तर तें मात्र कंपनीचें, असला व्यवहार थांबविणें अगत्याचें झालें आहे, असें अनुभव सांगतो.

बँका आणि विमा कंपन्या ह्यांवर कायद्यानें कितीहि बंधनें घातलीं तरी त्यांतून निसटून जाण्याचा मार्ग कांहीं लोक नेहमीच काढू पहातील हें उघड आहे. चांगल्या तऱ्हेनें चालविलेल्या जबाबदार चालकांच्या हाताखालील कंपन्यांवर बंधनें घालण्याची आवश्यकताच उरत नाहीं. चांगल्या बँका आपण होऊन भरपूर रोख रक्कम शिल्लक बाळगतात, पैसे काळजीपूर्वक गुंतवितात व नफ्यांतून योग्य तेवढी रकम गंगाजळींत टाकतात. कायद्यानें सांगितलें म्हणूनच केलें असें त्यांचेबद्दल म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें, चांगल्या विमा कंपन्या आपला खर्च मर्यादित राखतात, विमेदारांचें हित पहातात व क्लेमची रकम बिनबोभाट देतात. स्वार्थसाधू लोकांच्या हातीं ठेवीदार व विमेदार ह्यांच्या पैशावर चालणाऱ्या अशा संस्था आल्या तर ते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं शकतात व कायदा कांहीं ठराविक मर्यादेपलीकडे जाऊन त्यांचा हात धरूं शकत नाहीं. हिंदी विमा व्यवसायाचे बाबतींत कायद्याची व्याप्ति वाढविण्याची पाळी आली आहे, ही दुःखाची गोष्ट आहे. जहांगिर कमिटी ज्या सूचना करील त्यांची अंमलबजवणी होऊन परिस्थिति सुधारण्यास मदत झाली तरी कंपन्यांच्या चालकांत सामाजिक जबाबदारीची खरी जाणीव निर्माण झाल्याविना कायमची सुधारणा घडून येणार नाहीं. व्यवसायाची प्रतिष्ठा व त्याची सामाजिक उपयुक्तता ह्यांकडे लक्ष देऊन आपला स्वार्थ योग्य मर्यादेंत ठेवणारे चालक ज्या प्रमाणांत पुढें येतील, त्या प्रमाणांत विमा व इतर व्यवसाय ह्यांची प्रगति होईल. विमा कंपन्यांच्या व्यवस्थेबाबत जाहीर चौकशी होऊन तिचेवर अधिकृत रीत्या कोरडे ओढले जाणें, ही हिंदी कंपन्यांची दुष्कीर्ति करणारी वाईट जाहिरातच नव्हे काय? त्यामुळें हिंदी कंपन्यांऐवजीं विदेशी कंपन्यांकडे लोकांनीं धांव घेतली तर राष्ट्राचें व जनतेचें नुकसान होणार नाहीं काय? ह्या व्यापक प्रश्नाकडे सुज्ञांनीं विचारपूर्वक लक्ष दिलें पाहिजे.

### झेकोस्लोव्हाकियांतून जर्मनांची हकालपट्टी

झेकोस्लोव्हाकियाच्या सरकारनें आपल्या सरहद्दीवरील प्रदेशांतील सुमारें २० ते ३० लक्ष जर्मन नागरिकांची हकालपट्टी करण्यास प्रारंभ केला आहे. ब्रिटिश व अमेरिकन सरकारांची त्यास संमति घेतलेली नाहीं.

### पार्लमेंटच्या सभागृहावरील बाँब हल्ले

ब्रिटिश पार्लमेंटच्या सभागृहावर चालू युद्धांत १२ वेळा बाँब पडले त्यामुळें तिघांस मृत्यु आला व पंधरा लोक जखमी झाले. एकूण १,२२४ वेळा हवाई हल्ल्यांची इशारत देण्यांत आली.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : १०,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड,

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ३,६७,९५५ |
| एकूण खेळतें भांडवल | „ ३५,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्ट्स दिले जातात.

शेअर सर्टिफिकेट्स तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेट्स पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

## स्फुट विचार

### राजकीय कोंडी फोडण्यासाठी योजना

जपानशीं अधिक नेटानें युद्ध चालवण्याचें अगत्य इंग्लंडमध्यें व ह्या देशांत सर्वमान्य आहे आणि हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीचा अवघड प्रश्न सोडवला जावयाचा आहे. ह्या देशांत लोकमतानुवर्ति सरकारांचा कारभार सर्वत्र चालू झाल्यास हीं दोन्हीं उद्दिष्टें साध्य होण्यास उत्कृष्ट सहाय होईल असें विचारी लोकांस आज दोन वर्षें वाटत आहे. क्रिप्स योजना निष्फळ ठरल्यानंतर त्या तऱ्हेचा प्रयत्न केला गेला नाहीं, तो करण्यांत यावा असें वारंवार सुचवण्यांत येत होतें आणि ही राजकीय कोंडीची परिस्थिति ब्रिटिश सरकार आणि हिंदी जनता ह्या दोहोंसहि भूषणावह नाहीं. हिंदुस्थानची कायमची राजकीय घटना कोणत्या स्वरूपाची असावी ह्याविषयीं मुख्य राजकीय पक्षांत तीव्र मतभेद उपस्थित झाले आहेत, त्यांकडे बोट दाखवून ब्रिटिश सरकारास ह्या बाबतींतील स्वतःची जबाबदारी टाळणें सोपें झालें असल्याविषयींची समजूत ह्या देशांत दृढ झाली होती. मध्यवर्ती सरकारांत सर्व हिंदी पक्षांचे मिळून मुस्लिम लीगला पसंत पडेल अशा प्रकारचें एक संयुक्त मंत्रिमंडळ तात्पुरतें स्थापन करावें, त्यानें देशाचा कारभार हाकूं लागावें आणि त्याचें अनुकरण सर्व प्रांतांत केलें जावें हा प्रस्तुत स्थितीवर एक उपाय सुचवण्यांत आला. सप्रू समितीनें ह्या कल्पनेस जोराची चालना दिली आणि मध्यवर्ती असेंब्लीमधील प्रमुख पक्षांच्या पुढाऱ्यांनीं तशा प्रकारची योजना व्हाइसरॉयांचे पुढें मांडली. लॉर्ड वेव्हल यांनीं इंग्लंडमध्यें ब्रिटिश मंत्रिमंडळाशीं तिची चर्चा करून तिला त्याची मान्यता मिळवली. तिच्या संबंधांतली घोषणा ब्रिटिश पार्लमेंटांत व ह्या देशांत गेल्या गुरुवारीं एकाच वेळीं करण्यांत आली.

### लॉर्ड वेव्हल ह्यांच्या योजनेचें स्वरूप

मध्यवर्ती संयुक्त मंत्रिमंडळाची योजना तात्पुरत्या स्वरूपाची आहे. तिच्या योगानें कायमच्या घटनेचा वादग्रस्त प्रश्न सोडवावयास सहाय होईल अशी अपेक्षा आहे. व्हाइसरॉय आणि सर सेनापति हे वगळून मंत्रिमंडळांत सर्व सभासद हिंदी असतील आणि त्यांत सर्व पक्षांचे प्रतिनिधी येतील. व्हाइसरॉयांचा व्हेटोचा अधिकार अबाधित राहील, पण त्याचा उपयोग अगदीं अपरिहार्य असेल तेथेंच आपण करूं असें आश्वासन लॉर्ड वेव्हल ह्यांनीं आपल्या घोषणेंत दिलें आहे. मंत्रि मंडळानें जपानशीं उत्साहानें युद्ध चालवण्यास सहाय करणें आणि आर्थिक अभिवृद्धीच्या योजनांस मूर्त स्वरूप देणें ह्या कार्यावर विशेष लक्ष द्यावयाचें आहे. नियडक सर्वपक्षीय प्रातिनिधिक पुढाऱ्यांची सभा सिमला येथें येत्या २५ तारखेस भरेल आणि तींमध्यें भावी मंत्र्यांचीं नांवें सुचवण्यांत यावयाचीं आहेत. ह्या नांवांतून अखेरची निवड व्हाइसरॉय व ब्रिटिश सरकार ह्यांच्या मताप्रमाणें होईल. परराष्ट्रीय खातें धरून सर्व खातीं मंत्रिमंडळाकडे सोपवण्यांत येतील. निमंत्रित पुढाऱ्यांमध्यें महात्मा गांधी, मौलाना अबुल कलम अझद, मि. जिना, जुन्या काँग्रेस मंत्रिमंडळांचे मुख्य प्रधान आणि शीख व हरिजन पक्षांचे प्रतिनिधि ह्यांस बोलावणीं करण्यांत आलीं आहेत. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांस मोकळें करण्यांत आलें असून त्यांस विचारविनिमयाची संधि देण्यांत आली आहे. आपल्या योजनेचा सर्व पक्षांनीं सद्भावनेनें विचार करावा आणि हिंदुस्थानांतला सध्याचा राजकीय पेचप्रसंग सोडवण्यांत सर्वांनीं आपणांस सहाय करावें अशी इच्छा लॉर्ड वेव्हल ह्यांनीं व्यक्त केली आहे.

### जगांतील पहिल्या प्रतीची वहातुक व्यवस्था

मुंबईसारख्या शहरांत दररोज लक्षावधि लोकांची ये–जा आगगाड्या, ट्रामगाड्या, बसेस, टॅक्सीज ह्यांमधून होत असते, आणि युद्धपरिस्थितीमुळें त्यांमध्यें विलक्षण खेचाखेच व गैरसोय होत असलेली अनुभवास येते. लंडन शहराची लोकसंख्या मुंबईच्या कितीतरी पटींनीं मोठी आहे आणि दररोज सरासरीनें एक कोटि लोक वरील साधनांचा उपयोग करतात. ह्या वहानांच्या जोडीस जमीनीखालील विजेच्या आगगाड्यांची भर पडलेली आहे. तथापि, वहातुकीच्या ह्या सर्व मार्गांची एकसूत्री व्यवस्था नमुनेदार रीतीनें करण्यांत आली आहे ती मार्गदर्शक होण्यासारखी आहे. ह्या व्यवस्थेचा विस्तार दोन हजार चौरस मैलांवर झाला आहे आणि लंडनभोवती तिचा पन्नास मैलांचा परिघ आहे. ह्या क्षेत्रांत वहातुकीच्या रस्त्यांची व रूळांची एकूण लांबी तीन हजार मैल भरते. एवढ्या विस्तृत वहातुकीचा कारभार "लंडन पॅसेंजर ट्रॅन्सपोर्ट बोर्ड" ह्या नांवाच्या समितीच्या हातीं कायद्यानें देण्यांत आला आहे आणि तो समाधानकारक रीतीनें चालला आहे. अठरा वर्षांमागें लंडनमधील वहानांच्या व्यवस्थेंत गोंधळ होता आणि ती निरनिराळ्या एकशेतीन संस्था व मंडळ्या ह्यांच्या हातीं असल्यानें तींमध्यें एकसूत्रीपणा व कार्यक्षमता ह्यांचा स्वाभाविक रीतीनें अभाव होता. १९३३ सालीं ब्रिटिश पार्लमेंटमेंटनें एक कायदा पास करून ह्या निरनिराळ्या मंडळ्यांचें एका संस्थेंत संघटन करण्यांत आलें. तिचे व्यवस्थेचे सर्व अधिकार एका निमस्वतंत्र बोर्डाच्या स्वाधीन करण्यांत आले आहेत. बोर्डाचे सभासद माहितगार तज्ञ असतात आणि त्यांची नेमणूक कायद्यानें निश्चित केलेल्या ट्रस्टीजकडून केली जाते. विशिष्ट स्थानिक आणि इतर संस्थांचे प्रतिनिधी ट्रस्टीज आहेत. ब्रिटिश सरकारचा ह्या व्यवस्थेशीं कांहीं संबंध नाहीं आणि ती राजकीय धडामोडींपासून अलिप्त राखण्यांत आली आहे. भागीदारांस डिव्हिडंड मिळण्याचा निश्चित हक्क देण्यांत आला आहे, पण त्यांस "लंडन ट्रॅन्स्पोर्ट'च्या कारभारांत हात घालतां येत नाहीं किंवा त्यावर त्यांची देखरेखहि नाहीं. ही घटना यशस्वी ठरली आहे आणि निःसंशय बोधप्रद आहे. वहातुकीचा हा प्रचंड धंदा विशिष्ट रीतीनें सार्वजनिक मालकीचा आहे आणि त्यांत सरकारचें प्रत्यक्ष नियंत्रण नाहीं व खाजगी भांडवलवाल्यांची नफेबाजीहि नाहीं, पण व्यावहारिक कार्यक्षमता आहे.

### "ऐक्या"चा शैक्षणिक (५ वा) विशेषांक

सातारा येथील श्री. चं. ह. पळणिटकर ह्यांच्या संपादकत्वाखालील "ऐक्या"चा वरील विशेषांक त्याच्या पूर्वीच्या विशेषांकाप्रमाणेंच उपयुक्त लेखांनीं व माहितीनें भरलेला आहे. सातारा जिल्ह्यांतील शिक्षण संस्थांची सुबोध व आपुलकीनें लिहिलेली माहिती त्यांत एकत्रित आहे. विशेषांकानें आपला पूर्वीचा उच्च दर्जा कायम राखला आहे.

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

--पुणें शहर--

[ टेलिफोन नं. ४८३ ]

बँकेच्या सुरक्षित सेफ डिपॉझिट व्हाल्टचा जरूर फायदा घ्या.

फक्त १ रुपयांत

आपल्या मौल्यवान जिनसा वगैरे भक्कम कप्प्यांत सुरक्षित ठेवा.

सुट्टीखेरीज केव्हांही उघडण्यांत येतें.

द. दि. चितळे

मॅनेजिंग डायरेक्टर

# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई

खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर

—शाखा—

स्थानिक:—१ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँट रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्ले, ७ माटुंगा.

इतर:—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.


## बँकांच्या किमान भांडवलासंबंधीं अटी

### भरमसाट शाखा काढण्यावर नियंत्रण

( बँकिंगच्या नियोजित कायद्यांत बँकांचें किमान भांडवल किती असावें ह्यासंबंधीं अटी नमूद केलेल्या आहेत. त्यावर न्यू सिटिझन बँकेचे मॅ. डायरेक्टर, श्री. द. दि. देशपांडे, बी. ए. ह्यांचे विचार खाली दिले आहेत ).

बँकांच्या भांडवलासंबंधींचें ११ वें कलम कांहीं दृष्टींनीं स्वागतार्ह, तर कांहीं दृष्टींनीं टीकास्पद आहे. बँकांच्या भांडवलाचीं रचना भक्कम पायावर करण्याचा त्या कलमाचा प्रयत्न स्तुत्य आहे. परंतु त्यांतील भांडवलाचे आकडे मध्यमवर्गीयांच्या बँकांना झेपण्याजोगे नाहींत. बँकेच्या कामास प्रारंभ होण्यापूर्वीच तिचें किमान पुरेसें भांडवल असणें आवश्यक आहे, हें उघड आहे. सध्याच्या कायद्यानें हा किमान भांडवलाचा आकडा ५०,००० रुपये सांगितला आहे, तो नियोजित कायदा १,००,००० रुपये करूं पहात आहे. त्यामुळें तालुक्याचीं ठिकाणें किंवा लहान जिल्हा ठिकाणें येथें बँका काढणें अत्यंत अवघड होणार आहे. ज्या गावाची लोकसंख्या ४०,००० पेक्षा कमी आहे, अशा ठिकाणच्या बँकांना सध्याची ५०,००० रुपये भांडवलाची मर्यादाच ठेवावी व त्यापेक्षा मोठ्या गावांतील बँकांना १,००,००० रुपयांच्या भांडवलाची अट लागू करावी. जिल्ह्यांतील बँकेस तिचें वसूल भांडवल १,००,००० रुपये असल्यास स्वतःच्या जिल्ह्यांत कोठेंहि शाखा उघडण्यास मुभा असावी. प्रांतांतील इतर जिल्ह्यांत तिला शाखा उघडावयाच्या असल्यास, प्रत्येक शाखेसाठीं १०,००० रुपये जास्त भांडवल तिनें जमा केलें पाहिजे. तिच्या शाखांची कमाल मर्यादा १० ठरवून टाकावी.

सबंद हिंदुस्थानभर व्यवहार करणाऱ्या बँकांना २० लक्ष रुपये भांडवलाची अट घातलेली आहे, त्याबद्दल तक्रार करण्याचें कारण नाहीं. ही अट पुरी करण्यासाठीं ठेवलेली २ वर्षांची मुदत कांहीं बँकांना अपुरी वाटेल, ह्यासाठीं ती वाढवून ५ वर्षें करण्यांत येणें आवश्यक आहे. शाखांच्या वाढीसाठीं ज्यास्त भांडवल आवश्यक करण्याचें तत्त्व योग्य नाहीं. कित्येक प्रसंगीं, शाखांची संख्या व भांडवल ह्यांचा कांहींच संबंधहि नसतो. अगोदरच ज्या ठिकाणीं इतर बँका आहेत, अशा ठिकाणीं शाखा उघडण्याची बँकांची प्रवृत्ति असल्याचा गेल्या पांच-दहा वर्षांचा अनुभव सांगतो. त्यामुळें निष्कारण स्पर्धा वाढते. शाखांशींच केवळ भांडवलाचा संबंध जोडण्याऐवजी, ज्या केंद्रांत बँका नाहींत, अशा ठिकाणींच त्या जाव्यात, अशी कायद्यानें व्यवस्था केली पाहिजे. एखाद्या बँकेचें वसूल भांडवल २० लक्ष रुपये आहे म्हणून केवळ तिनें हिंदुस्थानांत कोठेंहि शाखा उघडावी, हें योग्य नाहीं. जेथें विशिष्ट बँकेसंबंधी लोकांना माहिती आहे, अशाच ठिकाणीं तिला शाखा उघडूं यावी. नाहीं तर, हिंदुस्थानाच्या एका टोकांतील बँका दुसऱ्या टोकांतील गांवांत शाखा उघडूं शकतील. तें टाळण्यासाठीं, ५ लक्ष वस्तीपेक्षा मोठ्या शहरांत आवश्यक तें भांडवल असणाऱ्या कोणत्याहि बँकेस आपली शाखा उघडतां यावी, परंतु ५ लक्ष वस्तीपेक्षा लहान शहरांतील बँकिंग कचेऱ्यांची संख्या मर्यादित करण्यांत यावी. १ लक्ष ते ५ लक्ष लोकसंख्येच्या शहरांत १० ते १२ पेक्षा ज्यास्त बँका असूं नयेत व ४० हजार ते १ लक्ष

वस्तीच्या ठिकाणीं ४ ते ५ च बँका असाव्या. अशा तऱ्हेचीं बंधनें घातलीं तर वाटेल तेथें शाखा उघडण्याची बँकांची प्रवृत्ति कमी होईल व बँकांच्या स्पर्धेची पातळी उच्च राहील. विशिष्ट लोकसंख्येच्या ठिकाणच्या बँकांची संख्या नियंत्रित करणें हें २० लक्ष रुपये भांडवलवाल्या बँकांस कोठेंहि शाखा उघडूं देण्यापेक्षा अधिक हितावह होईल. नियोजित कायदा हा जॉइंट स्टॉक बँकांसच लागू होणारा असल्याकारणानें, बँकांच्या कचेऱ्यांची संख्या मोजतांना सहकारी बँका वगळण्यांत याव्यात. गेल्या २-३ वर्षांत बऱ्याच बँकांनीं कांहीं ठिकाणीं शाखा उघडल्या आहेत,तेथील त्यांच्या खर्चाचें स्थानिक व्यवहाराशीं प्रमाण अत्यंत असमाधानकारक आढळतें. परंतु, आपल्या घाईच्या धोरणाच्या परिणामांचा विचार न करतां, बँका आपल्या शाखांची संख्या वाढवीतच आहेत ! जनतेची बँकिंगविषयक गरज किती आहे, हें लक्षांत घेऊन त्याप्रमाणें बँकांच्या कचेऱ्यांचे संख्येवर नियंत्रण घालण्याची वेळ आली आहे.

---

## दि सह्याद्रि विमा कंपनी लि.

### आठव्या वर्षाची समाधानकारक अभिनंदनीय प्रगति

**विमा कामांत पन्नास टक्क्यांचेवर वाढ**

ता. २६ मे १९४५ रोजीं कंपनीचे व्हाइस-चेअरमन श्री. एम. जे. दीक्षित, रिटा. कलेक्टर यांचे अध्यक्षतेखालीं कंपनीचे भागीदारांची सभा होऊन १९४४ सालचा संचालकांचा वार्षिक अहवाल व जमाखर्च आणि ताळेबंद सर्वानुमतें मान्य करण्यांत आले. अहवालाचे सालीं कंपनीकडे रु. ३१ लाखांचेवर विमा काम आलें असून त्यापैकीं रु. २५ लाखांचेवर काम पूर्ण झालें. मागील वर्षापेक्षा या कामांत शे. ५० पेक्षां अधिक वाढ झालेली आढळते. प्रिमियमचें एकूण उत्पन्न २,७७,१९५ रु. आहे, तसेंच सरासरी विमानिधीवर व्याजाचा दर शे. ५·२ पडतो. मृत्यूचें प्रमाणही पूर्वीप्रमाणेंच अत्यंत अनुकूल असेंच दिसून येतें. युद्धजन्य परिस्थिति पूर्वीप्रमाणेंच प्रतिकूल असतांनाहि खर्चाचें प्रमाण गेल्या सालपेक्षां शेंकडा २ टक्क्यांनीं कमी झालें आहे. कंपनीच्या आठव्या वर्षांतहि तिचेकडे मृत्यूमुळें आलेल्या क्लेम्सची रकम १२,००० रुपयांचे आंतच आहे. सरकारी कर्जरोख्यांचे भाव वाढले असल्यानें, कर्जरोख्यांत गुंतविलेल्या रकमेची आजच्या बाजारभावानें किंमत १३,००० रु. नें वाढलेली आढळते. कंपनीच्या विमा खातीं फंडांत अहवालाचे वर्षी ५० हजारांची भर पडून तो २,९५,००० रु. वर गेला आहे. प्रगतीचे वरील आंकड्यांवरून कंपनीची उत्तरोत्तर भरभराट होत आहे असेंच निदर्शनास येईल. या वाढत्या प्रगतीबरोबर खर्चाचें प्रमाण सालोसाल कमी होत आहे ही गोष्ट कंपनीचे व्यवस्थापक मंडळास व तिचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जी. जी. सौंदणकर ह्यांस अत्यंत भूषणावह आहे. कंपनीच्या प्रचारकार्याचा व्याप आज मुंबई इलाखा व वऱ्हाड मध्यप्रांत यांत पसरलेला आहे. वाढत्या व्यापाबरोबर कंपनीचें कामही सारखें वाढत आहे. आजपावेतों कंपनीकडे एक कोटी २५ लाखांचेवर काम आलेलें आहे. विमा क्षेत्रांत या प्रगतीमुळें कंपनीनें जें मानाचें स्थान मिळविलें आहे त्याबद्दल आम्ही अभिनंदन करतों व कंपनीची अशीच उत्तरोत्तर भरभराट होवो अशी सदिच्छा प्रगट करतों.


## दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव

शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापुर

खेळतें भांडवल १५ लाखांवर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, B. A., LL. B. चेअरमन.

श्री. एल. एस. आजगांवकर, श्री. एस. के. सामंत, श्री. एन. व्ही. सामंत, श्री. पी. ए. तेंडोलकर, श्री. जी. एन. कलघटगी, श्री. डी. आय. गाडवी, श्री. आय. एम्. मुंगुरवाडी, श्री. टी. व्ही. पोरवाल, श्री. डी. आर. अनगोळकर, श्री. आर. डी. गुर्लहोसूर, श्री. जी. जी. बेलिंग.

आकर्षक दरानें मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा.

एस. एन. सामंत,
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

– भांडवल –

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,००,००,००० वर |

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पद्मजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर, रत्नागिरी, फैजपूर (पे-ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## —त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—

तुळजाराम मोदी

मोतीचौक, सातारा.

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर

बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण

## महाराष्ट्र भुवन

लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय

बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

## —: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व क्रीमक्रीम

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

जीर्ण व हटवादी हिंवतापासाठी

डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें

## पायरोनिल

प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.

: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :

फार्मास्युटिकल अँड जनरल एजन्सीज,

८६६ सदाशिव, पुणें २.

## EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd.,

*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*

Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

डोंगरे याच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः— द. ना. हेजीब

नागीचे डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.

नागी आणि कं. मुंबई ४

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

### कामगारांचा कारखान्यांच्या प्राप्तींतील वांटा

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसी

सा. न. वि. वि.

या युद्धांतून नवीन जग जन्मास येत आहे. नकळत पण निश्चित. नवीन जाणीवा नि नवीन कर्तव्यें. औद्योगिक व्यवहार यशस्वी होण्यास तज्ज्ञ कारखानदार पाहिजेत; भांडवल रूपानें भरपूर पैसा पाहिजे; व्यापारी बाजू संभाळणारी बुद्धिवादी नि विचारी चालक मंडळी पाहिजेत. या साऱ्यांची कमी अधिक प्रमाणांत आपल्याला सतत आठवण राहते. पण कारखान्यांत रात्रंदिवस राबणारा कामगार—त्याची आठवण मात्र तितक्याच तीव्रतेनें होते कां?

मंदीच्या दिवसांत पोट बांधून जीवन जगणारा कामगार, जबरदस्त स्पर्धेच्या धमालींत मिळेल त्यावर गुजराण करणारा कामगार, प्रसंगीं कारखान्याच्या कठीण दिवसांत पगारांत कपात मान्य करून काम पुढें चालू ठेवणारा कामगार, महर्गतेच्या पण कारखान्याच्या सुस्थितीच्या दिवसांत त्याला देण्यांत येणारा महागाई भत्ता व दोन–तीन महिन्यांचा बोनस यांवर समाधान मानेल का? अन् तशी अपेक्षा करणें योग्य होईल का?

कंपनीस शेअर भांडवल, तसेंच कुशल मॅनेजिंग एजंटस यांची जितकी जरुरी आहे तितकीच कामगारांचे श्रमाची पण आहे हें नाकारतां येणार नाहीं. मग कारखान्याचे प्राप्तीचा योग्य वांटा कामगारास मिळतो ना, हें पहाणें ओघानेंच आलें. योग्य वांटा कशाला म्हणावें ह्याबद्दल कांहीं निश्चित प्रमाण ठरविणें कठीण आहे. प्रत्येक प्रश्नाचे गुणदोष व महत्त्व पाहूनच तें ठरविणें जरूर आहे.

आधुनिक तंत्रानें व प्रागतिकपणें काम करणारे म्हणून सुप्रसिद्ध असलेले किर्लोस्कर बंधु लि. व किर्लोस्कर कामगार युनियन ह्यांच्यांत गेले कांहीं महिने वांधा निर्माण झाला होता. पुढें श्री. ग. वा. मावळंकर यांना लवाद नेमून त्यांचेपुढें वादाचे मुद्दे उभय पक्षांनीं मांडले. श्री. मावळंकर ह्यांनीं दिलेला निकाल मे महिना-अखेर प्रसिद्ध झाला. किर्लोस्करांसारख्या पुरोगामी मंडळींना हे कारखानाविषयक प्रश्न आपसांत समझोता करून मिटवितां न येऊन लवादापुढें ठेवावे लागले यावरून प्रश्नांची विविधता व गुंतागुंती ह्यांची कल्पना करतां येते.

कामगारांची पहिली मागणी वार्षिक ४ महिन्यांच्या बोनसची होती. तथापि कंपनीनें देऊं केलेला ३ महिन्यांचा बोनस लवादांनीं कायम केला. दुसरी मागणी किरकोळ व पगारी रजेबाबतची होती. औंध सरकारनें ह्याबाबत नुकतेच नवीन कायदे पास केल्यानें लवादांना ह्या मुद्यावर निर्णय देण्यास विशेष असें कांहीं उरलेंच नाहीं. तिसरी व महत्त्वाची मागणी किमान वेतनाची, त्याच्या श्रेणी ठरविण्याची आणि पर्यायानें धंद्याच्या भरभराटींत कामगारांना वाटा मिळण्याचा हक्क प्रस्थापित करण्याची. लवादांनीं या मुद्याचा खोलवर विचार करून कामगारांच्या मागणीला बहुंशीं मान्यता दिली आहे. वेतनांत सर्वसाधारण वाढ आणि कार्यक्षमता, हजेरी व भरभराटीचे बोनस या चतुर्विध रूपानें कामगारांना किमान तीन वर्षेपर्यंत ठराविक अधिक रक्कम मिळण्याची व्यवस्था त्यांनीं सुचविली आहे.

"कामगारांची संघटना हा हल्लींचा युगधर्म आहे," हें मान्य असून श्री. मावळंकर पुढें म्हणतात, "स्वतःची कार्यक्षमता वाढविणें, कर्तव्यदक्ष असणें, लक्ष देऊन काम करणें व कारखान्याकडून वेळोवेळ जे नियम व जी शिस्त ठरविली जाईल त्यांचें पालन करणें व याप्रमाणें चालकांशीं एकजीव होणें हें प्रत्येक कामगारांच्या हिताचें आहे. कामगार व चालक ह्यांचेमध्यें कोणतेहि प्रकारचा विरोधीभाव किंवा शत्रुभाव असण्याचें कारणच नाहीं."

श्री. दादासाहेब मावळंकर हे अहमदाबादचे कुशल कायदेपंडित, तेथील गिरणी मालक व मजूर यांच्या प्रश्नाबाबत सल्लागार व मुंबई प्रांताच्या पहिल्या (काँग्रेस) असेंब्लीचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनीं या प्रकरणीं लवाद या नात्यानें निरनिराळ्या प्रश्नांचें केलेलें विवेचन खोल, मूलग्राही नि व्यावहारिक आहे. त्यांनीं प्रकट केलेले विचार वैयक्तिक नि प्रसंगसापेक्ष असले तरी उद्याच्या सत्ताधारी काँग्रेसचें सर्वसाधारण धोरण ह्या दृष्टीनें ते प्रातिनिधिक मौलाचें नाहींत, असें म्हणवत नाहीं.

—संजय

---

### कोऑपरेशन आणि अकौंटन्सी डिप्लोमा परीक्षेचा निकाल

एप्रिल १९४५ मध्यें घेण्यांत आलेल्या परीक्षेचा निकाल खाली दिला आहे :—

सबंद परीक्षा उत्तीर्ण (१३)

श्री. के. जी. आंबेकर, आर. एन. धारवाडकर, एम. बी. घोरपडे, के. वाय. अय्यर, एल. डी. जागिया, सी. ए. जमाखिंडीमठ, सी. एस. कजगर, एस. व्ही. करंदीकर, जी. डी. कुलकर्णी, बी. व्ही. कुंभोजकर, जी. एन. रोडे, एम. बी. शिरूर, आर. आर. वाणी.

अकौंटन्सी व ऑडिटिंग गटांत उत्तीर्ण (६)

श्री. पी. जी. गुते, पी. आर. कुलकर्णी, एम. एम. पाटील, आर. एम. पाटील, एच. पी. रायचूर, एस. बी. यांधेली.

कोऑपरेशन गटांत उत्तीर्ण (६)

श्री. एम. एच. चोबी, जी. एम. हेडगे, व्ही. डी. जोशी, बी. एस. कल्याणपूरकर, एन. एस. तर्टे, एन. एच. विंगकर.

---

### ब्रिटिशांनीं भिण्याचें कारण नाहीं

"हिंदुस्थानच्या औद्योगिकरणानें ब्रिटिश हितसंबंधांस बाध येणार नाहीं; उलट तें हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्यांच्या दोघांच्याहि फायद्याचेंच अखेर ठरेल. आपणांस हवा असलेला माल त्यांस परिस्थिति अनुकूल होतांच तात्काळ पुरविण्यास ब्रिटिश कारखानदार उत्सुक आहेत. त्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या नोकऱ्या कित्येक वर्षे कायम टिकण्यास मदत होईल, कारण वरिष्ठ सरकारी नोकऱ्यांतील ब्रिटिशांची संख्या कमी झाली, तरी कारखान्यांतून नेमण्यांत यावयाच्या ब्रिटिश तज्ज्ञांनीं ती भरून येईल." :—श्री. एन. आर. सरकार ह्यांनीं ग्रेट ब्रिटनमध्यें व्यक्त केलेले विचार.

## बाजारपेठेची पहाणी व विक्रीची व्यवस्था

चांगले दिवस व संधी ह्यांची भरती संपून ओहोटी लागल्याचें आतां स्पष्ट दिसूं लागलें आहे. गेल्या कांहीं दिवसांत प्रसिद्ध झालेल्या बहुतेक औद्योगिक कंपन्यांच्या ताळेबंदांवरून त्यांच्या नफ्याचें प्रमाण खालीं घसरत चालल्याचेंच दिसतें.

युरपची पुनर्घटना व जपानचा पाडाव होईपर्यंतचा काळ बरा जाईल व उत्पादन वरच्या पातळीवर टिकेल असें वाटतें. पण त्यानंतर ह्या वाढलेल्या व पुढें वाढवावयाच्या उत्पादनाचा उठाव करण्याच्या कांहीं निश्चित कल्पना–योजना आहेत का ?

ब्रिटनमध्यें ' ब्रिटिश एक्सपोर्ट ट्रेड रिसर्च ऑर्गनायझेशन '–याचा सुटसुटीत अनुवाद ' बेट्रो '–या नांवाची एक नवीन संस्था नुकतीच स्थापन झाली आहे.

प्रमुख ब्रिटिश व्यापारी कंपन्यांनीं ह्या संस्थेचा पुरस्कार केला आहे. बऱ्याच जाहीरात कंपन्याहि या संस्थेच्या सभासद असून त्यांच्या वतीनें ब्रिटिश एक्स्पोर्ट ट्रेड ॲडव्हरटायझिंग कॉर्पोरेशन काढण्यांत येणार असून परदेशांत जाहीरात करण्याकरितां या कॉर्पोरेशनचा बराच उपयोग होईल. ' बेट्रो ' चें कार्य सरकार व इतर व्यापारी संस्था यांच्याशीं सहकार्य करून चालणार आहे. ब्रिटनमध्यें तयार झालेला माल परदेशांत खपविणें–निर्गत वाढविणें हा या नवीन संस्थेचा मुख्य उद्देश आहे. केवळ गुणांनीं सरस माल काढून भागत नाहीं तर त्याच्या विक्रीची व्यवस्थाहि करावयास पाहिजे ही गोष्ट ब्रिटिश व्यापाऱ्यांना आतां पटली आहे.

निरनिराळ्या देशांत आपले प्रतिनिधी पाठवून, कचेऱ्या उघडून आपल्या सभासदांना उपयुक्त होणारी माहिती जमा करणें, त्यांना प्रत्यक्ष मदत करणें हें या नवीन संस्थेचें मुख्य काम होणार आहे. बाजारपेठेचें सर्वसाधारण स्वरूप ( आर्थिक, सामाजिक इत्यादि ); गिऱ्हाइकांचे निरनिराळे प्रकार ( त्यांचा वर्ण, शिक्षण, चालीरीति इत्यादि ); विचारांच्या पद्धति, धर्म, कपड्यांची ठेवण, प्रवासाच्या सोई इत्यादि; बाजारांत मागणी आहे पण मिळत नाहीं असा माल; रंग; डिझाइन इत्यादीबाबतच्या आवडीनिवडी; आपल्या मालाबरोबर विकल्या जाणाऱ्या दुसऱ्यांच्या मालाचें स्वरूप, किंमत इत्यादि; विशिष्ट माल विकत घेण्याबाबत बाजारांत चोखंदळपणा निर्माण करण्याची शक्यता, जकाती व कर; सर्वसाधारण किंमती व व्यापाराच्या अटी व पद्धति, माल चढवण्या उतरविण्याच्या सोई-व्यवस्था, स्थानिक वहातुकीच्या सोई व खर्च, विम्याचे दर, जाहीरातींबाबतच्या व्यवस्था व भाषेचें माध्यम या प्रश्नांवर अद्यावत माहिती मिळवून ती सभासदांना वेळोवेळीं पुरविण्यांत येईल.

ब्रिटनमधील लहान व मोठ्या कारखान्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरितां दोन मोठ्या कंपन्या स्थापन झाल्याचें ब्रिटनचे फडणवीस सर जॉन ॲंडरसन यांनीं कांहीं दिवसांपूर्वी जाहीर केलें. आतां तयार मालाची जाहीरात व विक्रीची व्यवस्था करणाऱ्या या दोन नवीन संस्था स्थापन होत आहेत. या पार्श्वभूमीवर उद्या घ्या आपल्या व्यापाराचीं चित्रें काढावयाचीं आहेत.


**Deccan Institute of Commerce, Poona**

**( Recognised by Government )**

Opens for 1945-46 Session on Monday the 25th June. Students coached up for G. D. C. & C., L. C. C., D. Com. ( I. M. C. ), R. A. ( 1st Part ), G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Last date of admission 15th July. Morning and evening classes. Highly qualified and experienced staff. Prospectus free on application to :

592/3 Budhwar Peth,<br>Opp. New English School,<br>Poona. } SECRETARY.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार<br>
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक<br>
३ व्यापारी उलाढाली<br>
४ सहकार

**दि बँक ऑफ इंडिया लि.**

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिल्केवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

### चीनमधील सोन्याचा दर

चीननें सोन्याचा दर, औंसास ३५,००० चिनी डॉलर होता तो ४०,००० चिनी डॉलर केला आहे. मार्च, १९४५ पूर्वीचा दर २०,००० चिनी डॉलर होता, तो त्या महिन्यांत ३५,००० चिनी डॉलर करण्यांत आला होता. अमेरिकन चलनास चीनमध्यें मोठी मागणी असून त्या चलनाचा तेथें काळा बाजार निर्माण झालेला आहे. सोन्याच्या किंमतीमधील वाढीचा ह्या काळ्या बाजारांतील अमेरिकन डॉलरच्या किंमतीवर परिणाम होऊन ती उतरली, परंतु लवकरच ती पुनः वाढली. एका अमेरिकन डॉलरची बरोबरी करण्यास १,१५० चिनी डॉलर लागतात.

### युद्धकाळांत ब्रिटिश सोन्याची सुरक्षित स्थळीं रवानगी

ग्रेट ब्रिटन देश १९४० च्या मध्याच्या सुमारास भयंकर संकटांत सांपडला, त्यावेळीं तेथील सोन्याचा सर्व सांठा तात्काळ हालविण्यांत आला. त्यासाठीं मिळतील त्या आगबोटींचा उपयोग करण्यांत आला. एका वेळीं तर १५ ते २० कोटि पौंड किंमतीचें सोनें समुद्रावर संरक्षणासाठीं मार्ग आक्रमीत होतें! ओटावा व न्यूयॉर्क येथेंच मुख्यतः तें नेऊंन सांठविण्यांत आलें. ह्या प्रचंड वहातुकींत २,००० हजार तोळ्यांत एक तोळा, एवढ्या अल्प प्रमाणांत सोनें समुद्राच्या तळास गेलें!

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
सिंप्लेक्स ५–७–४५
न्यू इंडिया ९–७–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १२।६।४५ | बुधवार १३।६।४५ | गुरुवार १४।६।४५ | शुक्रवार १५।६।४५ | सोमवार १८।६।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २२१७—८ | २२१५—० | २२२६—४ | | २१९०—० |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४११—० | ४१०—८ | ४१०—८ | | ४०४—० |
| २२०१; १६९५ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८८५—० | १८७८–१२ | १८८६—४ | | १८६५—० |
| ७६५; ५३३ | १६–०–०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०९—८ | ६१०—८ | ६१२—० | | ६०२—० |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५३१—८ | ५३२—० | ५३१—० | | ५२५—८ |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३८१—० | ३८१—० | ३८०—८ | | ३७८—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २९१—८ | २९०—८ | २९०—० | | २८७—० |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३०१—० | २९९—० | ३०१—० | | २९८—० |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८६—८ | २८५—० | २८४—८ | | २८२—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ३–१५—६ | ३–१५—६ | ३–१५—३ | बाजार बंद | ३–१४—९ |
| २१-१४; १३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४–३—० | १४—२–६ | १४—२–० | | १४—०–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | २–१५—६ | २–१५—६ | २–१५—० | | २–१४—९ |
| १२७०; ६३० | १११–०–० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७२२—८ | ७२०—० | ७२१—४ | | ७१२—८ |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २१७—० | २१७—० | २१६—८ | | २१४–१२ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२३—० | २२२—८ | २२३—८ | | २२२—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३०—० | ५२७—८ | ५२५—० | | ५२५—० |
| ९३-१२; ७३ | १–८–० | जुलै | न्यू इंडिया अॅ० | १५ | ८२—४ | ८२—० | ८२—० | | ८१—८ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३६—६ | ३६—५ | ३६—९ | | ३५–१५ |
| ८५; ४८ | २–०–० | एप्रिल | शिवराजपुर | १० | ५१—० | ५१—० | ५१—० | | ५१—० |
| ३३; १९ | ... | ... | टाटा केमिकल | १० | १९–१४ | १९–१२ | १९–१० | | १९—६ |
| ९०; ६८-१२ | ३–०–० | सप्टेंबर | टाटा ऑईल | २५ | ६९—० | ६८–१२ | ६८–१२ | | ६९—४ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१–१० | १०१—८ | १०१—८ | | १०१—८ |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
न्यू इंडिया अॅशु. १–६–४५ ते २९–६–४५ सिंप्लेक्स २५–५–४५ ते १४–६–४५

सोमवार दि. १८–६–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—८—० |
| १९५१–५४ | १०१—०—० |
| १९५७ | १००—६—० |
| १९६३–६५ | ९९—२—० |
| १९६६–६८ | ९८—१—० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४४—८ |
| सेंट्रल | ८१—४ |
| इंडिया | १८६—० |
| इंपी० | २००१—४ |
| | ५१३–१२ |
| रिझर्व्ह | १४१—० |
| युनियन | ९—० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १७९०—० |
| बॉम्बे ट्रॅम | १४२—८ |
| टाटा हायड्रो | २०४—० |
| टाटा पॉवर | १८२५—० |

**आम्ही नाहीं, आपणच!** सह्याद्रीनें १९४४ सालीं केलेली प्रगति ही आपल्याच विश्वासाचें प्रतीक असल्यानें या प्रगतीच्या श्रेयाचे भागीदार आपणच आहांत; आम्ही नाहीं.

आलेलें काम—३१,१८,९३८
मंजूर काम —२८,२२,७६९
पूर्ण काम —२५,१४,९२३

आयुष्यावरील विमा याच कंपनींत उतरून आपल्या आर्थिक सुखांत भर घाला. भरपूर कमिशनवर एजन्सी दिली जाते.

सह्याद्रि विमा कंपनी, लि. नासिक.

गो. ग. सौंदणकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मोटार वहातुकीची मुंबई सरकारची चिरस्थायी योजना

मोटार वहातुकीच्या दोन योजनांचा मुंबई सरकार विचार करीत आहे, त्यांपैकीं एक सध्याचा रेल्वे वहातुकीवरील ताण कमी करण्यासाठी असून ती तात्कालिक स्वरूपाची आहे, दुसरी योजना कायम स्वरूपाची आहे. तिचा उद्देश रेल्वे व मोटर वहातुक ह्यांचा समन्वय घडवून आणणें, असा आहे. ही दुसरी योजना अमलांत येईपर्यंतच पहिली योजना अमलांत राहील.

तात्कालिक योजनेचें स्वरूप खालीलप्रमाणें आहे:—ती उतारू व माल ह्या दोघांच्याहि वहातुकीसाठी आहे. रेल्वे स्टेशन ते रेल्वे स्टेशन वहातुक केली जाईल; मध्यें कोठेंहि माल किंवा उतारू घेण्यांत अथवा सोडण्यांत येणार नाहींत. रेल्वेच्या देखरेखीसाठी वहातुकीचें कंत्राट दिलें जाईल.

युद्धापूर्वी, मोटार वहातुकींत भयंकर स्पर्धा निर्माण झाली होती आणि तिचा रेल्वेवरहि परिणाम झाला होता. ती परिस्थिति पुन: निर्माण होऊं नये, ह्यासाठी रेल्वे-मोटार समन्वय योजना आखण्यांत येत आहे. वहातुक करणारे मोटारवाले, रेल्वेज व प्रांतिक सरकार ह्यांच्यांत भाग वांटून देऊन लिमिटेड कंपन्या स्थापून सर्वांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याचा सरकारचा विचार आहे.

भक्कम पायाच्या परंतु मर्यादित आकाराच्या कंपन्याचा अस्तित्वांत याव्या, ह्यासाठी मुंबई प्रांताचे ११ भाग करण्यांत येतील, गुजरातचे ३, महाराष्ट्राचे ५, कर्नाटकचे २ व कोकणचा १. ह्या भागांच्या तपशीलवार प्रत्यक्ष मर्यादा मागाहून ठरविण्यांत येतील. प्रत्येक भागांत एक कंपनी वहातुक करील. सध्या वहातुक करणाऱ्या मोटारवाल्यांस, त्यांच्या आजच्या मोटार बसेसच्या किंमतींचे प्रमाणांत, नव्या कंपनींत भाग मिळतील. त्यांनीं आपल्यापैकी एकास निवडून द्यावें; त्यास ठराविक मुदतीकरितां मॅनेजिंग डायरेक्टर नेमण्यांत येईल. मोटारवाल्यांत ऐकमत्य न झाल्यास मॅनेजिंग डायरेक्टराची निवड सरकार करील.

नव्या कंपनींत सध्याच्या मोटारवाल्यांस एकूण २५%, प्रमोटर (मॅ. डायरेक्टर) १०%, रेल्वेज ३०% व प्रांतिक सरकार ३५% ह्याप्रमाणें भाग मिळतील. प्रांतिक सरकार व रेल्वेज ह्यांस वरील प्रमाणाबाहेर भाग मिळवितां येणार नाहींत. मॅनेजिंग एजंट नेमण्यांत येणार नाहींत. कंपनीच्या ९ डायरेक्टरांपैकी एक मॅनेजिंग डायरेक्टरानें नेमलेला, एक रेल्वेनें नेमलेला व एक प्रांतिक सरकारनें नेमलेला असेल. बाकीच्यांची निवड भागीदार करतील. १९४२ नंतर ज्यांना माल वहातुकीसाठी परवाने मिळालेले आहेत अशांना कंपनींत भाग मिळणार नाहींत. शहरांतील उतारूंची व मुंबईतील मालाची वहातुक ह्या नव्या कंपन्यांचे क्षेत्रांत समाविष्ट नाहीं.

मुंबई प्रांताचे ११ भाग दर्शविणारा नकाशा मुंबई येथें प्रांतिक मोटार ट्रॅन्सपोर्ट कंट्रोलरच्या कचेरींत पाहण्यास मिळेल. नियोजित कंपन्या चालवूं इच्छिणारांनीं कंट्रोलरकडे अर्ज करावेत. अर्जाचा नमुना त्यांचेकडूनच मागवून घ्यावा.


"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

**ढेकणांच्या उदबत्त्या**

(ABC)

**BUG COILS (ABC)**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १-८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

**१९४४ मधील प्रगति**

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

**दि ट्रस्ट ऑफ इंडिया**
ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.
अध्यक्ष:—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

**इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड**

३७६ शुक्रवार, पुणें २

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात
दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२८।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २७ जून १९४५ अंक २६

पश्चिम हिंदुस्थानांतील आदर्श विमा संस्था

दि सुप्रीम म्युच्युअल अॅशुअरन्स कंपनी लि.

मुख्य कचेरी : ८६६ सदाशिव पेठ, पुणें २

★ भविष्यकाळाचे अनिश्चिततेपासून संरक्षण करण्यास व उतारवयांतील आपलें आयुष्य सुखी करण्यास 'विमा पॉलिसी' हेंच एक अमोघ साधन आहे. आकर्षक विमा योजना व जास्तींत जास्त सवलती देणारी ही महाराष्ट्रीय कंपनी आपल्या सेवेस सदैव तयार आहे.

—: सन १९४४ चें कार्य :—

मिळविलेलें काम रु. १६,५२,५००, स्वीकृत काम रु. १४,९९,५००

पूर्ण काम रु. १४,०९,७५०

मध्यप्रांत व वऱ्हाड ह्या भागांत वजनदार, उत्साही व अनुभविक प्रतिनिधी भरपूर वेतनावर अगर कमिशनवर तावडतोब नेमणें आहेत. —जास्त माहितीसाठीं लिहा—

त्र्यं. द्वा. देशपांडे, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरी

व्ही. एन. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., मॅनेजर

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व क्रूसकरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

## विविध माहिती

### घटना कायद्यांतील परिशिष्टांत दुरुस्ती

व्हाइसरॉयांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमधील स्वतः व्हाइसरॉय व युद्धमंत्रि कमांडर-इन-चीफ ह्यांच्या जागा सोडून बाकीच्या सर्व जागांवर प्रातिनिधिक हिंदी पक्षांचे प्रतिनिधी नेमण्याचें ठरलें तर १९३५ च्या घटना कायद्याच्या नवव्या परिशिष्टांत दुरुस्ती करावी लागेल. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या एकूण सभासदांपैकी किमान तीन सभासदांनीं तरी पूर्वी हिंदुस्थानांत कमींत कमी १० वर्षें सरकारी नोकरी केलेली असली पाहिजे, अशी अट त्या परिशिष्टांत नमूद आहे. ही अट नाहींशी केली, म्हणजे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद म्हणून कोणाचीहि नेमणूक करणें शक्य होईल.

### मुंबई सरकारची ट्रॅक्टर योजना

मुंबई सरकारनें नुकतेच कांहीं ट्रॅक्टर्स आणविले असून १९४६ अखेर सुमारें १०० ट्रॅक्टर्स शेतांवर फिरूं लागलेले दिसतील. शेतांतील हरळी नाहींशी करून जमीन नांगरणें व यांत्रिक सहाय्यानें बांध घालण्याची व्यवस्था करणें हा सरकारचा हेतु आहे. चालू वर्षाचा पावसाळा संपला, म्हणजे बेळगांव व धारवाड या जिल्ह्यांतील हरळीयुक्त जमिनींत १५ ते २० ट्रॅक्टर्सचा संचार सुरू होईल. येत्या १० वर्षांत ६ ते ७ लक्ष एकरांची हरळीपासून मुक्तता होऊन तींत लागवड होऊं शकेल, अशी अपेक्षा आहे. ह्या सरकारी योजनेस ३० ते ३५ लक्ष रुपये खर्च येईल.

### हिंदी लोकांचा नवा समग्र इतिहास


हिंदी लोकांचा अगदी ताज्या संशोधनावर आधारलेला समग्र इतिहास हिंदी विद्वानींकडूनच लिहवून घेऊन तो स्वस्त किंमतींत उपलब्ध करून देण्यासाठी बाबू राजेंद्रप्रसाद व सर जदुनाथ सरकार ह्यांनीं १९३८ सालीं बनारस येथें भारतीय इतिहास परिषद् नांवाची संस्था नोंदली. लिखाणाचें काम विद्वानांना वाटून देण्यांत आलें. परंतु युद्धपरिस्थितीमुळें कामाची अपेक्षित प्रगति झाली नाहीं. डॉ. मुजुमदार व डॉ. आळतेकर ह्यांनीं संपादित केलेल्या "गुप्त" खंडाची आणि प्रो. नीलकंठ शास्त्री व डॉ. रॉय चौधरी ह्यांनीं संपादित केलेल्या "मौर्य" खंडाची हस्तलिखित प्रत तयार आहे. "अकबर" खंडाचें संपादन सर जदुनाथ सरकार करीत आहेत.

### मुंबई प्रांतांत युद्धोत्तर औद्योगिक वृद्धीसाठी कमिटीची स्थापना

मुंबई प्रांताच्या उद्योगधंद्यांच्या वाढीचा विचार करण्याकरितां मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. (१) युद्धोत्तर काळांत मुंबई प्रांतामध्यें सध्या चालू असलेले कोणते कारखाने वाढवितां येतील व नवे कोणते सुरू करतां येतील, (२) मोठ्या प्रमाणावर, मध्यम प्रमाणावर व ग्रामोद्योग म्हणून कोणते धंदे काढतां येतील, (३) नव्या कारखान्यांस सोईचीं केंद्रें कोणतीं होतील, (४) नवे उपक्रम सरकारनें सुरू करावे का खासगी व्यक्तींवर ते सोपवावे आणि (५) विशिष्ट उद्योगधंद्यांसाठी कमिट्या कोणत्या नेमाव्या, ह्या विषयांचा अभ्यास करून सरकारास रिपोर्ट सादर करणें हें ह्या कमिटीचें काम आहे. गव्हर्नरांचे सल्लागार हे तिचे अध्यक्ष असून कमिटींत त्यांचे आणखी दोघे सल्लागार, इतर सरकारी अधिकारी व बिनसरकारी गृहस्थ हे आहेत.


डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.

फौंटनपेनकरतां कॅमल इंक सर्व पसंत करतात.
दांडेकर आणि कंपनी, मुंबई ८




EVERYTHING IN RUBBER GOODS
- Hospital Requirements ● Cab Tyres
- Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd,
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

जोगींचें डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.
जोगी आणि कं. मुंबई ४

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
महाराष्ट्र भुवन
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

# अर्थ

## सहकारी व इतर संस्थांचीं माल तारणावरील कर्जें

### व्यवस्थापकांनीं घ्यावयाची दक्षता

आपल्या इकडे शेतीच्या उत्पादनास भांडवल पुरवण्याचें कार्य सहकारी संस्था मोठ्या प्रमाणावर करीत असल्या तरी सहकारी चळवळीची इतर बाबतींत प्रगति अपेक्षेप्रमाणें झालेली नाहीं. केवळ मालाच्या उत्पादनास भांडवल पुरविल्यानें शेतकऱ्यांची सबंद अडचण निवारली जात नाहीं; त्याच्या मालाची साठवण व विक्री ह्यांची व्यवस्थाहि सामुदायिक तत्त्वावर सहकारी पद्धतीनें होणें आवश्यक आहे, ही गोष्ट आतां सर्वांस पटली असून त्या दिशेनें प्रांतिक सरकारांचे प्रयत्न चालू आहेत. मुंबई सरकारनें आपल्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंत मालविक्रीच्या व्यवस्थेचा समावेश केला आहे. सहकारी खरेदी-विक्री संघांची स्थापना, नियंत्रित बाजारांची स्थापना, तज्ज्ञ व्यवस्थापकांच्या शिक्षणाची सरकारी खर्चानें तरतूद, देखरेखीची व्यवस्था, कोठारें बांधण्यासाठीं पैशाची सरकारी मदत, इत्यादि बाबींचा खुलासा पुनर्घटना योजनेंत करण्यांत आला आहे. सहकारी संस्थांप्रमाणेंच जॉइंट स्टॉक बँकाहि माल तारणावर मोठ्या प्रमाणावर कर्जें देत आहेत आणि त्यासाठीं नव्या शाखा स्थापन करीत आहेत.

माल तारणावरील कर्जें देण्याची पद्धति प्रत्येक देशाच्या परिस्थितीप्रमाणें वेगवेगळी असणें अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, ग्रेट ब्रिटन हा देश मुख्यतः कारखानदारीचा आहे आणि तेथील कारखान्यांनीं मागवलेल्या कच्च्या मालावरील मालकी हक्कांच्या कागदांचे तारणावर तेथील बँका कर्जें देतात. अमेरिकेंत शेतीसहि महत्त्वाचें स्थान आहे; तेथील एलेव्हेटर्स आणि कोठारें ह्यांत साठविलेल्या मालाचे आधारावर काढलेल्या हुंड्या अमेरिकन बँका पत्करतात. हिंदुस्थानांतील परिस्थिति भिन्न असून, येथील बँकांना मालाचा प्रत्यक्ष ताबा घेणेंच आवश्यक वाटतें. धान्याचा पद्धतशीर साठा करणारीं गोडाउन्स नसल्याकारणानें मोजणी करणें व किंमत ठरविणें हे प्रश्न नेहमी अवघड ठरतात. कर्जदाराचें धान्य आपल्या ताब्यांत घेऊन तें सुरक्षित राखण्याची जबाबदारी बँकांवर येऊन पडते. धान्याच्या किंवा इतर मालाच्या प्रती लावणें अवघड असतें. सुनियंत्रित बाजारपेठा नाहींत आणि वजनें व मापें हीं ठिकठिकाणीं वेगवेगळीं असतात. माल खराब होण्याची भीति ही तर नेहमीचीच आहे. कर्जदाराचा माल विकून आपले पैसे उभे करण्याचा प्रसंग आला, तर त्याच्या वहातुकीची चांगली सोय नाहीं. त्याकारणानें विवक्षित क्षेत्रापुरताच कोठाराचा धंदा होऊं शकतो आणि प्रत्येक ठिकाणचा व्यवहार स्वतंत्र व अलग बनतो. त्या सर्वांत एकवाक्यता निर्माण होत नाहीं.

जॉइंट स्टॉक बँका व सहकारी संस्था माल तारणावर मोठ्या प्रमाणावर कर्जें देऊं लागलीं आहेत आणि हा व्यवहार ह्यापुढें वाढत जाणार अशीं चिन्हें दिसत आहेत. बँकांच्या शाखांतील अधिकाऱ्यांना व नोकर वर्गाला ह्यासंबंधांत फार दक्षतापूर्वक वागावें लागतें व त्यांचेवरील जबाबदारीहि मोठी असते. बँकांतील एकमेकांतील स्पर्धेमुळें, कित्येक प्रसंगीं कर्जदारांस सवलती देणें भाग पडतें; परंतु कर्ज वसूल झालें नाहीं, तर त्या सवलतीबद्दलची सर्व जबाबदारी बँकेंतील नोकरांवर येऊन पडतें. अशा प्रकारच्या बिकट परिस्थितींत मालतारणाच्या कर्जाच्या व्यवहारासंबंधीं कोणती दक्षता घेणें जरूर आहे ह्याविषयींच्या अज्ञानाची भर पडली, तर एखादे वेळीं बँकेस फारच मोठी ठोकर बसण्याचा संभव आहे. बँक आणि कर्जदार ह्यांचेमधील खरें नातें कोणत्या स्वरूपाचें आहे, ह्याची जाणीव बँकेच्या अधिकाऱ्यास असली पाहिजे आणि त्यानें ती कर्जदारासहि करून दिली पाहिजे.

वरील विषयावर श्री. डी. एस. शास्त्री, एम्. ए., सी. ए. आय. बी., ह्यांनीं आपल्या विस्तृत अनुभवाच्या आधारावर एक ग्रंथ* लिहिला आहे, त्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. ते सध्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया मद्रास शाखेचे एजंट आहेत. त्यांनीं आपल्या ग्रंथांत वरील विषयाचें तपशीलवार विवेचन केलें आहे. मालतारणासंबंधांतला कायदा त्यांनीं प्रथम सुबोध रीतीनें विवेचला असून त्या विषयाच्या विशिष्ट शब्दप्रयोगांचा अर्थ स्पष्ट केला आहे. मालतारणाचे कागद व निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस ह्यांतील फरकहि त्यांनीं दाखविला आहे. मालावर द्यावयाच्या कर्जाच्या व्यवहाराचें तंत्र नंतर वर्णिलेलें आहे. कारखान्यांत तयार झालेल्या मालाचे व्यवहारासंबंधीं स्वतंत्र प्रकरण लिहिलेलें आहे. तारणासंबंधीचे कागद व त्यांचे प्रकार ह्यांची माहिती नंतर देण्यांत आली आहे. तारण मालाची पहाणी, किंमतींची आकारणी, योग्य मर्यादेंत कर्ज आहे किंवा नाहीं ह्याची तपासणी, वगैरे तारण कायम राखण्याचे अवघड प्रश्न श्री. शास्त्री ह्यांनीं नंतर हाताळले आहेत आणि अखेर बँका ज्या मालाचें तारण साधारणतः स्वीकारतात, अशांची ( उ.—खाद्य-धान्य, कपास, ताग, गळिताचीं धान्यें, चहा, कॉफी, रबर, लाकूड, मिरची, लवंग वेहडा, तंबाखू, ठोकर, सोनें, चांदी, तयार माल इ. ) माहिती दिली आहे. श्री. शास्त्री ह्यांनीं अशा रीतीनें आपला ग्रंथ उपयुक्त व मार्गदर्शक केला आहे. कोठाराचा व्यवहार करणाऱ्या संस्थांनीं त्याचा अवश्य उपयोग करावा, अशी आमची शिफारस आहे. परिशिष्टांत त्यांनीं बँकेनें माल तारणाचे व्यवहारांत करून घ्यावयाच्या कागदपत्रांचे नमुने दिले आहेत, ते बँकांना निश्चित उपयोगी वाटतील.

हिंदी विमा कंपन्यांनीं आपली संस्था स्थापन केली आहे, तिचे धर्तीवर " इंडियन जॉइंट स्टॉक बँक्स असोसिएशन " स्थापण्यांत यावी अशी श्री. शास्त्री ह्यांची सूचना आहे. हिंदी बँकिंगची ज्या पद्धतीनें प्रगति झालेली आहे ती लक्षांत घेतां व युद्धोत्तर अडचणींचा विचार करतां, बँकांनीं आपल्या व्यवहाराची पातळी उच्च राखण्याची आवश्यकता सहज पटण्याजोगी आहे. कर्जावरील व्याजाचा दर, तारण, इत्यादि बाबतींत कांहीं तरी एकवाक्यता आणली व कोठारावर बँकेच्या नांवाची पाटी लावल्याखेरीज कर्ज देण्याचें सर्वांनीं नाकारलें तर पुष्कळच सुधारणा होईल. बँकांच्या एकमेकांतील स्पर्धेमुळें तारणमालावरील बँकेच्या

*Bankers' Advances Against Goods. पृ. सं. ११०. किं. १२ रु. ८ आ.

मालकी हक्कास बिलकूल बाध येऊं नये व कर्जदारास अवास्तव सवलती मागण्यास फावूं नये अशी व्यवस्था होणें अगत्याचें आहे. "अर्था"च्या २८ मार्च, १९४५ चे अंकांत, गोडाउन-वरील सदूनें लिहिलेलें बँकेचें नांव व नंबर खोडून टाकून एका व्यापाऱ्यानें त्याच मालाचे तारणावर दुसऱ्या बँकेकडून कसें कर्ज काढलें, ह्याचें एक उदाहरण दिलें आहे. बँकांनीं ह्यासंबंधांत घ्यावी तेवढी दक्षता थोडीच आहे. मालांच्या तारणावर कर्ज दिलें, तरी कर्जदाराची पत ही बाबहि कमी महत्त्वाची नसते. मालाचें तारण मिळाल्यावर, तें देणाराची पत पहाण्याचें काय प्रयोजन ? असें कित्येक लोक समजतात. मालाचें तारण व रोखे किंवा इतर तारण ह्यांत फरक आहे, मालाचे बाबत फसवणूक करण्यास पुष्कळ वाव मिळूं शकतो, वगैरे गोष्टींकडे बँकर्सनीं लक्ष देणें जरूर आहे.

---

### दोंडाइचे येथें को. के. सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें ता. २१।४।४५ रोजीं दोंडाइचें येथें सेक्रेटरी क्लासचा उद्‌घाटन समारंभ सुप्रसिद्ध पुढारी श्री. आमदार गुलाबसिंह भिलेसिंह गिरासे यांचे हस्तें दुपारीं ३ वाजतां झाला. दाऊळचे सेक्रेटरी श्री.नरहर मार्तंड जोशी यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली. नंतर डि. को. ऑफिसर मि. देशपांडे यांनीं सदर क्लास भरविण्याची जरूरी व हेतू विशद करून सांगितले. अध्यक्ष श्री. गुलाबसिंह यांनीं आपण सद्य:परिस्थितीस अनुसरून कसें वागलें पाहिजे व वागणें इष्ट आहे याचा समन्वय करून क्लास उघडल्याचें जाहीर केलें. क्लास ४ दिवस चालून तो ता. २४।४।४५ रोजीं विमगुळ येथें श्री. गुलाबसिंह यांचे मळ्यांत श्री. भिमसिंह एस. गिरासे यांचे हस्तें समारोप झाला. सदर प्रसंगीं श्री. भिमसिंहजी यांनीं क्लासाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व अधिकारी यांना थाटाची मेजवानी दिली. मध्यंतरीचे काळांत रात्रीं सो. चेअरमन श्री. कोंडू उदेसिंह पाटील, मे. राउतसो जगसिंहराव व मे. रामभाऊ, शॉप मॅनेजर यांनीं क्लासला अल्पोपाहार निरनिराळे प्रसंगीं व निरनिराळे ठिकाणीं देऊन क्लासास उपकृत केलें आहे. सेक्रेटरी संघातर्फे ता. २५ ला फोटो समारंभ होऊन क्लास संपला.

---

### ब्रिटिश सहकारी संस्थांची विक्री वाढली

गेल्या चार वर्षांच्या युद्धकालीन अवधींत ब्रिटिश सहकारी संस्थांच्या दुकानांतील मालाची किरकोळ विक्री इतर दुकानदारांच्या विक्रेत्यांच्या व्यवहारापेक्षा अधिक वाढली हें दर्शवणारे आकडे प्रसिद्ध झाले आहेत. जनतेच्या रोजच्या गरजेच्या जिनसांची किरकोळ विक्री संबंद्ध ग्रेट ब्रिटनमध्यें १९४१ ते १९४४ ह्या चार वर्षांत कशी कमी ज्यास्त झाली ह्याविषयींच्या आकड्यांची सहकारी पद्धतीनें झालेल्या विक्रीच्या आकड्यांशीं तुलना केली असतां ती सहकारी संस्थांस अनुकूल ठरते. युद्धपरिस्थितींत संस्थांच्या सभासदांची प्राप्ति म्हणजे माल विकत घेण्याची शक्ति वाढली हें ह्या व्यवहारविस्ताराचें एक कारण असावें असें दिसतें.

---




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

—त्वरा करा—
ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.
भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.
पत्ता:—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

जीर्ण व हटवादी हिंवतापासाठी
डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या कृतीप्रमाणें तयार केलेलें
पायरोनिल
प्रथितयश डॉक्टर्स वापरतात.
: सोल डिस्ट्रिब्यूटर्स :
फार्मास्युटिकल ॲंड जनरल एजन्सीज,
८६६ सदाशिव, पुणें २.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(स्थापना १९१८) टे. नं. ३१६७५
हेड ऑफिस : सब ऑफिस
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुं. ४ दादर


| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,४१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. १,४८,००० |
| ठेवी | ... | रु. ४५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५०,००,००० |

सभासदांना जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट अगर कॅशक्रेडिट देण्यांत येतें.
व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन.
एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.

## स्फुट विचार

### सहकारी गृहसंस्थांची मुंबई परिषद

मध्यम स्थितींतील लोकांच्या रहाण्याच्या घरांचा प्रश्न युद्ध-परिस्थितीमुळें लहान–मोठ्या शहरांत अत्यंत बिकट झाला आहे, आणि युद्धसमाप्तीनंतरहि त्यासंबंधांत समाधानकारक व्यवस्था करणें अगत्याचें होणार आहे. युद्धापूर्वींहि सोइस्कर व स्वतंत्र घरांचा पुरवठा मर्यादित होता आणि तो वाढवण्यासाठी सहकारी तत्त्वावरच्या संघटनेच्या मार्गानें प्रयत्न चालू होते. मुंबई शहरांत ह्या संघटनेस १९१५ सालीं प्रारंभ झाला आणि सारस्वत को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीनें त्याकामीं पुढाकार घेतला. मागील युद्धानंतर ह्या चळवळीस विशेष जोर आला आणि सुमारें वीस सहकारी हाउसिंग सोसायट्या मुंबई व उपनगर ह्यांमध्यें स्थापन झाल्या. प्रांतिक सरकारनें ह्या संस्थांस लांब - मुदतीनें भांडवल कर्जाऊ दिलें; परंतु निरनिराळ्या आर्थिक व इतर अडचणींमुळें सारस्वत सोसायटीशिवाय बाकीच्या संस्था यशस्वी होऊं शकल्या नाहींत. गेल्या चार-पांच वर्षांत कांहीं हाउसिंग सोसायट्या स्थापन झाल्या आहेत, पण युद्धपरिस्थितीमुळें त्यांची प्रगति झालेली नाहीं. ह्या सर्व प्रश्नांचा विचार करून व सहकारी घर पुरवठ्याचे बाबतींत पुन्हां संघटित यत्न व्हावे ह्या उद्देशानें मुंबईत गेल्या शनिवारीं व रविवारीं सर जनार्दन मदन ह्यांचे अध्यक्षतेखालीं एक खास परिषद भरवण्यांत आली. मुंबई शिक्षण समितीच्या विद्यमानें श्री. मुर्डेश्वर ह्यांनीं घरपुरवठ्याच्या प्रश्नाचा इतिहास परिषदेस सांगितला. ह्या कामीं येणाऱ्या अडचणींचा निर्देश करून कित्येक विधायक सूचना त्यांनीं पुढें मांडल्या. परिषदेनें मान्य केलेल्या ठरावांस अनुसरून मुंबईमध्यें सहकारी घरपुरवठ्यास चालना मिळेल अशी आम्हांस आशा आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रांतिक सरकार ह्यांनीं प्रस्तुत विषयाचें महत्त्व जाणून ह्या कामीं सर्वतोपरी सहाय देणें अगत्याचें आहे.

---

### विणकरांच्या संघटनेचे प्रयत्न

मध्यप्रांत–वऱ्हाड विणकर परिषदेचें ४ थें अधिवेशन नागपूर येथें, स्वतःच्या बांधवांच्यासाठी कळकळीनें काम करणारे पुढारी श्री. कृष्णराव कोष्टी, बी. ए. (ऑनर्स) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं थोड्या दिवसांपूर्वीं पार पडलें. त्याच प्रमाणें मुंबई इलाखा हातमाग विणकर परिषदेचें ४ थें अधिवेशन सुप्रसिद्ध मजूर पुढारी श्री. ना. म. जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. श्री. कोष्टी ह्यांच्या भाषणाचा सारांश आजच्या अंकांत दुसरीकडे देण्यांत आला आहे. त्यांनीं विणकरांना केलेला उपदेश मननीय असून संघटनेचे प्रयत्न करण्याची त्यांनीं वर्णिलेली आवश्यकता समाजांच्या मागसलेपणामुळें जास्तच तीव्र असल्याचें दिसून येईल. श्री. कोष्टी ह्यांच्या भाषणांत आपुलकी, प्रश्नांचें संपूर्ण आकलन व प्रगतीच्या मार्गांतील प्रचंड अडचणी निवारण करण्यासाठी तळमळ ह्या गोष्टी स्पष्ट आढळून येतात. श्री. जोशी ह्यांनींहि विणकरांच्या धंद्याचें महत्त्व वर्णन करून त्यास संरक्षण मिळावें व सूत वाटणी समाधानकारक व्हावी अशी मागणी केली. नागपूर परिषदेचे कांहीं सुपरिणाम तात्काळ प्रत्ययास आले, ही समाधानाची गोष्ट आहे. विणकरांनीं, हिंदु-मुसलमान हे भेद विसरून आपल्यापुढील प्रश्नांबाबत विचारविनिमय केला आणि ज्या ठिकाणीं एकेकाळीं जातीय दंगा झाला, त्याच ठिकाणीं हे दोन प्रमुख गट एकत्र येऊन त्यांनीं एकमुखानें मागण्या केल्या. आर्थिक पायावर अशा रीतीनें कायमची एकी घडून आल्यास, विणकरांची प्रगति होण्यास पुष्कळ सहाय होईल हें उघड आहे. तेथील विणकरांना सुताचा पुरवठा अधिक होऊं लागला असून सुताचा काळ्या बाजारांतील भावहि एक तृतीयांशानें घटला आहे, असें समजतें. संघटनेचे सुपरिणाम विणकरांच्या नजरेस येत असल्याकारणानें ती दृढ होण्यास अनुकूल परिस्थिति आहे आणि युद्धसमाप्तीनंतर येणाऱ्या संकटांस तोंड देण्याची तयारीहि आतांपासूनच केली पाहिजे. गिरणी-मालकांस ज्याप्रमाणें स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळतें, त्याचप्रमाणें विणकरांसहि मिळावें, अशी श्री. कोष्टी ह्यांची मागणी आहे. विणकरांच्या निकडीच्या प्रश्नांचें महत्त्व सरकारच्या व जनतेच्या नजरेस येण्यास सहाय होण्याचे दृष्टीनें त्या मागणीस विरोध होण्यास कारण नाहीं.

---

### संततीविस्ताराविषयीं चिंता

हिंदुस्थान सरकारचे योजनामंत्री सर आर्देशीर दलाल इंग्लंड-मधील आपला दौरा संपवून अमेरिकेंतील उद्योगधंद्यांचें निरीक्षण करण्यासाठी तिकडे गेले आहेत. "टेनेसी व्हॅली ऑथॉरटी" च्या विद्यमानें नदीचें पाणी आडवण्यांत येऊन शेती, वीज व धंदे ह्यांची मोठ्या प्रमाणावर तेथें प्रगति घडवून आणण्यांत आली आहे, ती हिंदुस्थानच्या दृष्टीनें मार्गदर्शक होण्यासारखी असल्यानें त्या योजनेची विशेष माहिती आपण मिळवणार आहों असें ते म्हणाले. ह्या देशांत लोकसंख्या प्रतिवर्षी पन्नाससाठ लक्षांनीं वाढत आहे, तिच्या अन्नपाण्याचा प्रश्न सोडवण्याचें महत्त्व किती आहे ह्याचा निर्देश करून, संततीच्या वाढीस आर्थिक सुधारणेबरोबर हळुहळु आळा बसेल अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. लोकसंख्या वाढीचा प्रश्न ह्या देशांत विचारी लोकांस अशा रीतीनें भेडसावीत आहे, त्याचवेळीं संततिविस्तारास उत्तेजन देण्याची आवश्यकता ब्रिटिश पार्लमेंटास भासत आहे ही गोष्ट बोधप्रद आहे. एक मुलापेक्षा अधिक संतति असणाऱ्या कुटुंबांतील प्रत्येक मुलामागें वेतन बहाल करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरवलें आहे. परिस्थितीप्रमाणें एका देशास लोकसंख्येच्या वाढीविषयीं चिंता वाटत आहे तर दुसऱ्या देशास संततिविस्तारास उत्तेजन देण्याची आवश्यकता भासत आहे. दरिद्र्याच्या मागें अनिच्छित मुलांचें लटांबर लागतें आणि श्रीमंत संततीच्या अभावीं झुरत असतात हा नित्याच्या जीवनांतील अनुभव राष्ट्रांच्याहि संबंधांत येत आहे!


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

## विणकरांच्या उन्नतीचे प्रयत्न

मध्यप्रांत-वऱ्हाड विणकर परिषदेंत अध्यक्ष, श्री. कृष्णराव रामचंद्र कोष्टी, बी. ए. ( ऑनर्स ) ह्यांचें मार्गदर्शन.

चरखा आणि हातमाग हे धंदे परस्पर पूरक आहेत. परंतु गिरणीचें सूत आणि हातमाग ह्यांमध्यें परस्पर स्पर्धा आहे. सुताच्या पुरवठ्यासाठी गिरणीवर अवलंबून राहून फक्त विणकामाच्या बाबतींत गिरणीवर मात करणें ही गोष्ट स्वभावतःच अशक्य आहे, गिरणीचें सूत घेऊन त्याचें हातमागावर कापड विणणें व तें त्याच नंबरच्या सुताच्या गिरणीच्या कापडापेक्षा स्वस्त दरानें विकण्याचा प्रयत्न करणें म्हणजे दुसऱ्याच्या खांद्यावर बसून त्याच्यापुढें धांवत जाण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे ! तेव्हा विद्यमान विणकरांना जिवंत राहावयाचें असेल तर त्यांनीं हातसुताचीच कास धरली पाहिजे, हें गिरणीचें सूत व हातमागाची वीण ह्याचा पुरस्कार करणाऱ्यांनीं विशेष लक्षांत ठेविलें पाहिजे.

### केवळ आणे, पैचा हिशेब नको

गेल्या महायुद्धापूर्वी हातमागाचें कापड गिरणीच्या कापडापेक्षा ४ आणे वार महाग पडत होतें. युद्धकाळांत हातमागावर पांढरें कापड विणलें जाऊं लागलें व विणकरांना थोडा फायदा होऊं लागला; परंतु महायुद्धानंतर गिरणीच्या व परदेशाच्या मालाशीं टक्कर देण्यास हातमाग असमर्थ झाले. हातमागाचें कापड ८ ते ९ आणे वार असे. तसलेंच चीन, जपान वगैरे देशांतून आलेलें कापड ६॥ आणे वार मिळत होतें, त्यामुळें हातमागाचा धंदा अजिबात बसूं लागला. आतांपासूनच नीट काळजी न घेतल्यास या युद्धानंतर हल्ली जे कांहीं थोडेफार भाग शिल्लक आहेत तेही दिसणार नाहींत अशी भीति वाटते. म्हणून थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्यानें नेहमीं रुपये, आणे, पैच्या हिशेबी वृत्तीनें वागून जगांत चालावयाचें नाहीं. रुपये आणे पै पेक्षा त्याला आपला धर्म, देश, विशेष प्रिय असला पाहिजे. राजाश्रयाच्या अभावीं जनतेनें महाग हातमागाचें कापड घेणें म्हणजे एक प्रकारचें त्याचें संरक्षण करणें होय व असें संरक्षण इंग्लंडसारख्या देशांत कसें दिलें होतें हें आपण पाहिलेंच आहे. " हातमागाशिवाय आपला तरणोपाय नाहीं. हातमागावरील कापड महाग पडतें असें म्हटलें जातें, परंतु आपल्या मुलाबाळांचें पोषण करणें हें खर्चाचें पडतें म्हणून आपण त्यांना मारून टाकीत नाहीं. ही गोष्ट खरी आहे कीं, आपण आपल्या मुलांना मारलें तर आपण कमी खर्चांत राहूं, पण तें आपण अधर्म्य मानतों व तसें करीत नाहीं. त्याचप्रमाणें कोट्यो लोकांना अन्नपाणी देणारी खादी सोडून आपण कदाचित् कमी खर्चांत राहूं शकूं पण तें बरोबर नाहीं. " असें खुद्द महात्माजीहि म्हणतात तेव्हा देशांतील प्रत्येक व्यक्तीनें हातमागाचा कपडा वापरण्याचा निश्चय केला पाहिजे. हातमाग व गिरण्या ह्यांमध्यें स्पर्धा असूं नये. गिरण्या जर अस्तित्वांत राहिल्या तर त्यांचें क्षेत्र हातमागाच्या क्षेत्राबाहेरचें राहिलें पाहिजे. म्हणजे कोट्यों लोक ज्या प्रकारचें सूत कातूं आणि विणूं शकतात तसें सूत आणि कापड काढण्याची गिरण्यांना मनाई असली पाहिजे.

आपला वर्ग कायम ठेवण्याकरितां आपण संघटित झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आपण नेहमी आपल्या कल्याणाकरितां व त्याचबरोबर समाजांतील बंधुभगिनींकरितां झटलें पाहिजे ही गोष्ट प्रथम ध्यानांत व वर्तनांत आणली पाहिजे. आपला समाज अडाणी, अशिक्षित व मागासलेला आहे म्हणून हल्लींच्या सुधारलेल्या काळांत शिक्षणाचा सर्व बाजूंनीं आपला फायदा करून घेतला पाहिजे.

### उपाययोजना

समाजाची सर्वांगीण सुधारणा म्हटली म्हणजे त्यांत मुख्यतः तीन प्रकार असतात ( १ ) आर्थिक ( २ ) सामाजिक ( ३ ) राजकीय.

आपले विणकर समाजाची सामाजिक व राजकीय प्रगति घडवून आणण्यासाठी आपला समाज आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आणि संपन्न बनविणें अवश्य आहे. आपल्या समाजाचें दारिद्र्य जसजसें दूर होत जाईल तसतशी आपली सामाजिक आणि राजकीय प्रगति सुलभ साध्य होईल यांत संशय नाहीं. ( श्री. कोष्टी ह्यांनीं नंतर ह्यासंबंधांत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, ह्यांचें विस्तृत विवेचन केलें. )

कापडाचें दुर्भिक्ष्य दूर करण्याच्या दृष्टीनें गिरण्यांनीं कापडाच्या निरनिराळ्या तऱ्हा कमी करून साड्या, धोतरें व इतर जरुरीच्या कापडाचें निदान २० टक्क्यांनीं तरी उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्याचें आश्वासन दिलें आहे. इतकें करूनहि कापड अपुरेंच पडणार आहे आणि ती उणीव भरून काढण्याचें कार्य हातमाग करूं शकतील. परंतु हिंदुस्थानांतील हातमागाची स्थिति फार विचित्र आहे. हल्ली स्वस्त असें जपानी सूत अजिबात बंद झाल्यामुळें सुताकरितां त्यांना केवळ गिरण्यांवरच अवलंबून रहावें लागतें, आणि हें सूत वापरून हातमाग गिरणीच्या मालाबरोबर टक्कर देऊं शकणार नाहींत हें खरें; परंतु व्यवस्थशीर सूत वांटप पद्धति, संघटना, तयार मालाची वेळेवर विक्री करणें वगैरे गोष्टींकडे लक्ष पुरविल्यास हा धंदा फायदेशीर होऊन विस्कळीत झालेली घडी पुनः बसेल व थोड्याच दिवसांत या धंद्याचें पुनरुज्जीवन झाल्याचें दिसून येईल. हिंदुस्थानांतील कापडाच्या दुष्काळाची आपत्ति टाळावयाची असेल तर गिरण्यांनीं सुताच्या उत्पादनाकडे विशेष लक्ष देऊन सरकारनें या सुताचा पुरवठा हातमागांना पद्धतशीर रीतीनें केल्यास जनतेचें काम भागेल व गरीब विणकरांचेंहि कल्याण होईल.

### गिरणी मालकांचा युक्तिवाद

गिरणी मालकांकडून असें सांगण्यांत येतें कीं ते हातमागाशीं मुळीच स्पर्धा करीत नसून त्यांनीं फक्त परदेशी गिरण्यांचाच बाजार बळकावला आहे, आणि हे त्यांनीं आंकडेवारीनें सिद्ध करून दाखविलें आहे. परंतु ह्या आंकड्यांमध्यें त्यांनीं एक मोठी चूक केलेली आहे आणि ती म्हणजे हातमागाच्या संख्येंत त्यांनीं पावरलूम्सचीहि गणती केली आहे. त्यांच्या दृष्टीनें पावरलूमस् कःपदार्थ असतील परंतु हातमागाच्या दृष्टीनें तीं यंत्रेंच आहेत व गिरण्या इतकींच मारक आहेत, म्हणून त्यांची गणती हातमागांत न करतां स्वतंत्र करावी व मग निव्वळ हातमाग किती चालू आहेत व त्यांची काय स्थिती आहे हें पहावें.

त्यांचा दुसरा असा एक मुद्दा आहे कीं गिरणींत फक्त जाडेभरडेच कापड तयार करण्यांत येतें, परंतु हें फार मोठ्या प्रमाणा-

-वर असल्यामुळें बाजारांत स्वस्त विकतां येते व याचे गिऱ्हाईक बहुतेक सर्व गरीब व अशिक्षित लोक असतात. श्रीमंत व सुशिक्षित फक्त सुबक व दिखाऊ अशा परदेशी मालाकडेच धांव घेतात त्यामुळें हातमागांची स्थिति हवेंत लटकल्याप्रमाणें झाली आहे. त्यांना कापड महाग असते म्हणून गरीब लोक टाळतात तर जाडजाभरड्या कापडामुळें श्रीमंत लोक ढुंकूनही बघत नाहींत. नाहीं म्हणायला स्वदेशीच्या चळवळीपासून हातमागाचें महत्त्व पुन्हा वाढूं लागलें आहे परंतु हातमाग परदेशी व गिरणीचें सूत वापरीत असल्यामुळें काँग्रेसही त्यांना पाठिंबा देत नाहीं अशा रीतीनें आपल्या वर्गाची चोहोंकडून कुचंबणा झालेली आहे.

कांहीं वर्षांपूर्वी जें सरकार देशी उद्योगधंदे ठार मारण्याच्या बेतात होते तेंच सरकार आजच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें व अडचणीमुळें देशी धंद्यांच्या उन्नतीकडे लक्ष देऊं लागलें आहे हें वरील गोष्टीवरून स्पष्ट दिसून येते. इतकेंच नव्हे तर लष्करासाठी लागणारा ब्लँकेटसारखा माल देखील सरकार हातमागावर ऑर्डर देऊन तयार करवून घेवूं लागले आहे. गिरणीचें सूत हातमागाला योग्य प्रकारचें व योग्य प्रमाणांत मिळण्यासाठी सरकारनें ठिकठिकाणीं सूत वाटपपद्धति सुरूं केली आहे व इतरत्र अन्य तऱ्हेनें मदत करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

### संघटनेचें महत्त्व

परंतु येवढ्यावरच आपण खूष राहून भागणार नाहीं. आजची परिस्थिती ही कांहीं कायम टिकणारी नाहीं व त्यावेळीं आपल्याला सरकार मदत करीलच याची खात्री नाहीं. युद्धोत्तर योजनेचा गाजावाजा आतापासूनच सुरूं झालेला आहे. बरेचसे धंदे सरकार आपल्या ताब्यांत घेणार असल्याचें कळतें व इतर कांहीं धंद्यांच्या संरक्षणार्थ जकाती बसवून अगर आर्थिक मदत करून ते टिकविण्याचे प्रयत्न सरकार करणार आहे. या सर्व योजनेंत आपल्या हातमाग धंद्याबद्दल कोठेंच उल्लेख केलेला आढळून येत नाहीं. युद्धोत्तर काळांत आपला धंदा व त्यावर अवलंबून असलेल्या लाखों लोकांचे प्राण वाचवावयाचे असतील तर आतापासूनच आपण चळवळ केली पाहिजे व संरक्षण होण्यासाठी सरकारला भाग पाडले पाहिजे.

हिंदुस्थानच्या भावी घटनेमध्यें विणकरांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यासाठी त्यांना विनंती करण्यांत यावी असें मला वाटते. आपला विणकर समाज मागसलेला आहे व हरिजनांप्रमाणें आपणालाही राखीव जागा मागण्याचा हक्क आहे. आपण केवळ जातीय तत्त्वावर भांडत नसून लोकशाही तत्त्वावर भांडत आहोंत, एक महत्त्वाचा देशी धंदा जिवंत ठेवण्याकरितां भांडत आहोंत. गिरण्यांचे प्रतिनिधी ज्याप्रमाणें घेण्यांत येतात त्याचप्रमाणें हातमाग धंद्याचे प्रतिनिधी त्या धंद्यांतील लोकसंख्येप्रमाणें घेण्याची आम्ही मागणी करीत आहोंत, व या मागणीला कोणीही सूज्ञ विरोध करील असें वाटत नाहीं.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
सिंप्लेक्स ५–७–४५
न्यू इंडिया ९–७–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १२।६।४५ | बुध. गुरु. २०-२१।६।४५ | शुक्रवार २२।६।४५ | शनिवार २३।६।४५ | सोमवार २५।६।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१९२—८ | | २१७३–१२ | २१८५—० | २१९६—४ |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०४—८ | | ४००—८ | ३९९—८ | ४०१—० |
| २२०१; १६९५ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८७३–१२ | | १८५२—८ | १८५६—४ | १८६५—० |
| ७६५; ५३३ | १६–०–०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०३—८ | | ५९५—० | ५९५—० | ५९७—० |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५२६—० | | ५२१—० | ५२०—० | ५२५—० |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३७६—८ | | ३७२—८ | ३७१—८ | ३७२—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २८७—० | | २८५—० | २८५—८ | २८४—८ |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | २९८—० | बाजार बंद | २९५—० | २९५—० | २९६—० |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८३—० | | २७९—८ | २८२—८ | २८३—० |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ३–१४—६ | | ३–१३—६ | ३–१३—६ | ३–१४—० |
| २१-१४; १३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३–१३ | | १३–११–६ | १३–१२ | १३–१२–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | २–१४—६ | | २–१३—६ | २—१४ | २–१४—० |
| १२७०; ६३० | १११–०–० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७१०—० | | ७०३–१२ | ७००—० | ६९५—० |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २१३—० | | २०८—४ | २०७—८ | २०५—८ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२१—८ | | २२०—० | २२०—० | २२०—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५२२—८ | | ५२२—८ | ५२३–१२ | ५२२—८ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३५–१४ | | ३६—६ | ३६–११ | ३७–१० |
| | | | ३½% रोसे | १०० | | | | | |

वर्ग पुस्तकें ( ट्रा. बुकें ) बंद
न्यू इंडिया अॅशु. १–६–४५ ते २९–६–४५

सोमवार दि. २५–६–४५ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | सामान्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बरोडा | १४६—० | | | अलकॉक | ४१०—० |
| १९४६ | १०२—८—० | सेंट्रल | ८२—० | आंध्रा व्हॅली | १७७७—८ | बीबे स्टीम | ५८०—० |
| १९५१–५४ | १०१—३—० | इंडिया | १९०—० | बॉम्बे ट्रॅम | १४२—८ | न्यू इंडिया | ८१–१२ |
| १९५७ | १००—५—० | इंपी० | २००५—० | टाटा ह्यड्रो | २०४—० | शिवराजपुर | ५०—० |
| १९६३–६५ | ९९—२—० | इंपी० | ५१०—० | टाटा पॉवर | १८२५—० | टाटा केमिकल | २०—० |
| १९६६–६८ | ९८—८—० | रिझर्व्ह | १४१—४ | | | टाटा ऑईल | ६९—० |
| | | युनियन | ८–१५ | | | 'विमको' | ३२०—० |

## माळशिरस तालुक्यांत कर्ज निवारण कायद्याचा प्रचार

माळशिरस तालुक्यामध्यें कर्ज निवारण कायदा ता. १।५।४५ पासून अंमलांत आलेला आहे आणि ह्या कायद्याच्या प्रचाराचें काम मुंबई सरकारनें सहकारी खात्याकडे सोंपविलें आहे. त्यानुसार मे व जून महिन्यांमध्यें तालुक्यांतील खालील गावीं मे. चौधरी डी. सी. ओ. साहेब सोलापूर, मि. पाटील, ब्यांक इन्स्पेक्टर व सुपरवायझर मि. अवचट यांनी गावोगांवीं शेतकी कर्ज निवारण कायद्याची साधकबाधक माहिती शेतकऱ्यांना समजाऊन दिली. मेढद, तिरवंडी, नातेपुतें, कारूंडें, पिंपरी, फडतरी, धर्मपुरी, फोंडशिरस, गुरसाळें, कुरबावी, शिंदेवाडी, मोरोची तांबडें, चाकोरे, कोंढबावी, वेळापूर, तोंडले बोंडले, खुडूस, पाणीव,; या गावीं लोक जमवून वरील तीन अधिकाऱ्यांनीं कर्जनिवारण कायद्याची माहिती समजावून सांगितली. प्रत्येक गावीं सभेस लोक ५० ते २०० पर्यंत होते. साधारणपणें माळशिरस हा तालुका कॅनॉल भाग असल्यामुळें व सध्या शेती उत्पादक धान्यास भावही चांगले असल्यानें पुष्कळ शेतकऱ्यांनीं आपल्या कर्जाची फेड केलेली दिसते. साधारपणें या तालुक्यांत आतांपर्यंत प्रचार कार्यावरून १,००० पर्यंत तडजोडीचे अर्ज येतील असा अंदाज आहे..

ता. २७-५-४५ ला माळशिरस येथें डेव्हलपमेंट असोसिएशनची वार्षिक सभा होती. त्या सभेस सुमारें २००० लोक ठिकठिकाणचे शेतकरी लोक हजर होते. त्या वेळीं सदर कायद्याची जरूरी व फायदे मे. गाटेसाहेब चेअरमन बी. डी. आर. ॲक्ट कोर्ट, मे. डी. सी. ओ. साहेब सोलापूर व मे. के. एल. गिरमे, बागाईतदार यांनीं सदर कायद्याची महती समजावून सांगितली.

माळशिरस तालुक्यामध्यें राहिलेल्या गावीं प्रचार कार्य करण्यास मि. अवचट सुपरवायझर, मि. पाटील बँक इन्स्पेक्टर आणि मि. मंकड एजंट यांच्यामध्यें राहिलेल्या गावांची वाटणी करून देण्यांत आली. हें प्रचार कार्य या महिना अखेर संपवावयाचें आहे.

---

## सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा वर्ग

साक्री येथें मे. डिस्ट्रिक्ट को. ऑफिसर प. खा. धुळें यांचे नेतृत्त्वाखाली सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा वर्ग तारीख ११ ते १४ एप्रिलपर्यंत भरविण्यांत आला. या वर्गांत भावानियंत्रित वस्तूंची वाटणी करण्यासंबंधीचे नियम, हिशेब व यासंबंधीं कायदाकानू यांची माहिती देण्यांत आली. तसेंच प्रत्यक्ष व्यवहारांत येत असलेल्या अडचणी यांचाही विचार करणेंत आला. सदरहु क्लासचें उद्घाटन मे. मामलेदारसाहेब साक्री यांचें हस्तें झालें व समारोप तेथील सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते श्री. मा. गो. भोसले एम. एल. ए. यांचे हस्तें करण्यांत आला. निरनिराळया विषयांसंबंधींची माहिती देण्याकरितां तालुक्याचे डि. सुपरवायझर, सब-ऑडिटर, असि. डि. को. ऑफिसर, युनिअन सुपरवायझर व बँक इन्स्पेक्टर वगैरे अधिकारी हजर होते.

---

## चीनची हिंदी कपाशीची खरेदी

हजारो टन हिंदी कपास चीनकडे पाठविण्यांत येणार आहे. त्याचा पहिला हप्ता वाट चालत आहे. चीनमध्यें कपाशीचें दुर्भिक्ष्य आहे. तें निवारण्यासाठी लांब धाग्याची ब्राझीलमधील कपास खरेदी करण्याचा चीनचा प्रथम विचार होता. परंतु वहातुकीच्या अडचणींमुळें हिंदी कपास आतां घेण्यांत येत आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. १५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | रु. २५,००,००० |
| काढलेलें भांडवल | :: | रु. २२,००,००० |
| भरलेलें भांडवल | :: | रु. १९,८९,५०० |

खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

.........शाखा व उपशाखा.........

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड " | २५ मालेगांव " |
| ३ किर्लोस्करवाडी " | २६ नांदगांव " |
| ४ कोरेगांव " | २७ घोटी " |
| ५ इस्लामपूर " | २८ सटाणा " |
| ६ शिराळें " | २९ येवलें " |
| ७ तासगांव " | ३० मनमाड |
| ८ वांई " | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद " | ३२ दोंडाईचें " |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार " |
| ११ कल्याण " | ३४ साक्री " |
| १२ पालघर " | ३५ शहादें " |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर " |
| १४ अहमदनगर ( " अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें " |
| १५ बेलापूर रोड " | ३८ तळोदें " |
| १६ कोपरगांव " | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी " | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी " | ४१ गोध्रा " |
| १९ शेवगांव " | ४२ झालोद " |
| २० पींबोरी " | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गाव) " | ४४ नाडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद " |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड " |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास.' भांबुर्डा. घ. नं. ९२४।११. पुणें शहर. येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, 'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ४ जुलै १९४५ अंक २७

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## विविध माहिती

### सिंधमध्यें विजेचा पुरवठा

सिंध प्रांतांतील मोठ्या शहरांस बीजपुरवठा करण्याची, २ कोटि रुपयांची एक योजना सिंध सरकार आखीत आहे. सिंधू नदीच्या एका मोठ्या कालव्याचा तंडोमस्तिखान हा उतार पंधरा मैल वरती हालविण्यांत येणार आहे, त्यासाठीं तितका लांब कालवा खोल खणवा लागेल.

### सिंधमधून होणारी गव्हाची निर्गत थांबणार

सिंधमधून गव्हाची निर्गत तात्काळ थांबविण्यांत आली नाहीं, तर त्या प्रांतांत गव्हाचा तुटवडा पडण्याचा संभव आहे आणि ह्या दृष्टीनें ह्यापुढें आणखी निर्गत होऊं नये, अशी मध्यवर्ती सरकारास सिंध सरकारनें विनंति केली आहे.

### प्रांतिक औद्योगिक कमिटींत सभासदत्वाची मागणी

मुंबई सरकारनें औद्योगिक कमिटी नेमली आहे, तिचेवर मुंबई बाहेरील व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी कोणीच नाहींत, तेव्हां मराठा चेंबर पुणें, कर्नाटक चेंबर बागलकोट व सुरत चेंबर सुरत, ह्यांच्या प्रतिनिधींस कमिटींचें सभासदत्व मिळावें अशी सूचना मराठा चेंबरनें मुंबई सरकारास केली आहे.

### डेन्मार्क-ग्रेट ब्रिटन व्यापारास प्रारंभ

डेन्मार्कनें पाठविलेलें ६६० टन लोणी व २३० टन अंडीं हीं हल बंदरांत नुकतींच उतरलीं. त्यांचे बदली ग्रेट ब्रिटन कोळसा देणार आहे.

### ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन

वरील संस्थेच्या मध्यवर्ती कमिटीची पहिली त्रैमासिक सभा ता. १७ जून रोजीं भरली होती, तीमध्यें पदाधिकाऱ्यांची व सेंट्रल कमिटीच्या सभासदांची निवड झाली. श्री. एन. के. रानडे, श्री. जी. आर. साठे व श्री. एन. जी. आपटे हे पुण्यांतील तिघे गृहस्थ निवडून आले. सर एम. विश्वेश्वर अय्या हे अध्यक्ष कायम आहेत.

### भारत बँकेच्या शाखा

गेल्या अडीच वर्षांत भारत बँक लि. नें २१६ कचेऱ्या उघडल्या, त्या सर्वांचा खर्च उत्पन्नांतूनच भागविण्यांत आला आहे. ८० शाखा अद्याप फायद्यांत आलेल्या नाहींत. त्यांचा तोटा हिशेबांत धरूनच १९ लक्ष रुपये नफा बँकेस ३१ मार्च, १९४५ अखेरच्या वर्षी झाला.

### हिंदी उमेदवाराचें डिपॉझिट जप्त होणार ?

ब्रिटिश कॉमन्स सभेच्या निवडणुकीस उभे राहणाऱ्या प्रत्येक उमेदवारास २,००० रुपये ( १५० पौंड ) सरकारांत अनामत ठेवावे लागतात. एकूण पडलेल्या मतांपैकीं त्यास एक अष्टमांशहि मतें मिळालीं नाहींत, तर डिपॉझिट जप्त होतें. मि. दत्त हे हिंदी कम्युनिस्ट गृहस्थ भारतमंत्रि मि. एमरी ह्यांस प्रतिस्पर्धी म्हणून उभे आहेत, परंतु त्यांचें डिपॉझिट बहुतेक जप्त होईल, असें मजूर पक्षाच्या प्रतिनिधीच्या निवडणूक-एजंटाचें म्हणणें आहे.

### सिडनेमध्यें विजेचें रेशनिंग

ऑस्ट्रेलियांत संपामुळें कोळशाचा तुटवडा पडल्याकारणानें सिडने शहरांत विजेचें रेशनिंग करण्यांत आलें आहे. रेशनपेक्षा ज्यास्त वीज वापरणारास ६,६०० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा सांगितली आहे.


डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.


EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd.,
Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

नोगींचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

# अर्थ

## भांडवलशाहीची आंतरराष्ट्रीय संघटना

प्रबळ भांडवलवाले विशिष्ट मालाच्या उत्पादनाचे बाबतींत आपापले कारखाने स्वतंत्र ठेवून उत्पादनाच्या विक्रीसाठी मात्र एक संयुक्त संघटना निर्माण करतात. अशा संघटनेस 'कार्टेल' असें म्हणतात. सर्वच भांडवलवाल्यांचा उद्देश अधिकांत अधिक नफा मिळविणें हा असल्याकारणानें ह्या संघटनेंत अनेक राष्ट्रांतील भांडवलवाले सामील होतात; आंतरराष्ट्रीय राजकारणापासून त्यांचे व्यवहार अलिप्त असतात. जागतिक व्यापार पेठेची वाटणी आपसांत करून घेणें व कृत्रिम मार्गानें विक्रीची किंमत वाढविण्याची शिकस्त करणें, ह्या दृष्टीनें त्यांचें धोरण आखलें जातें. माल शिल्लक पडून राहिला व नाश पावला तरी चालेल परंतु कार्टेलला भरपूर फायदा झाला पाहिजे, अशी अत्यंत स्वार्थी वृत्ति त्यांची असते. त्यांच्या धोरणामुळें बेकारी माजली किंवा दुष्काळ पडला तरी त्याबद्दल त्यांस वाईट वाटण्याचें कारणच नसतें. चांगला माल काढण्यापेक्षा वाईट माल मुद्दाम उत्पादन केल्यानें कार्टेलचा नफा वाढून त्यांचें सामर्थ्य वाढत असेल, तर समाजाच्या हिताविरुद्ध तसें करणें त्यास योग्यच वाटतें. आपलें वर्चस्व टिकविण्यासाठी नवे कारखाने स्थापन होऊं नयेत, ह्यासाठी ते कोशीस करतील. सामान्य नागरिकास नकळत ह्या कारवाया चालू असतात, परंतु त्यांचे परिणाम मात्र दूरगामी ठरतात.

ह्या विषयावर "दि वॉर अँड दि वर्किंग क्लास" ह्या पाक्षिकांत व्ही. लिन्यत्सि ह्यांचा एक लेख आला आहे, त्यांत जर्मन व अमेरिकन भांडवलवाल्यांच्या संगनमतावर चांगला प्रकाश पाडलेला आहे. गेल्या महायुद्धानंतर जर्मनी आपलें आर्थिक सामर्थ्य पुनः इतक्या लौकर प्राप्त करूं शकला, ह्याचें कारण आंतरराष्ट्रीय कार्टेल्स हेंच होय, असें त्या लेखकाचें म्हणणें आहे. कार्टेल्समधील अटींत जर्मनीस अनुकूल असलेल्या कांहीं विशिष्ट अधिकारांमुळें, अमेरिकेंतील उत्पादनावर जर्मनीचें प्रभावी नियंत्रण होतें आणि त्या नियंत्रणाचा उपयोग जर्मनीच्या आर्थिक व लष्करी सामर्थ्यवाढीकडे केला गेला; हें सिद्ध करण्यासाठी लेखकानें कांहीं उदाहरणेंहि दिलीं आहेत.

अशा प्रकारच्या रासायनिक कार्टेलमध्यें अमेरिकन ड्यु पॉंट डी नेमार्स व स्टँडर्ड ऑइल कंपनी ऑफ न्यू जर्सी; ब्रिटिश इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज व जर्मन आय. जी. फार्बेन इंडुस्ट्री हे चार प्रमुख सभासद होते. परंतु त्यांपैकीं जर्मन सभासद हा प्रबळ होता व त्यामुळें जर्मन लष्करास सर्व प्रकारच्या अमेरिकन उत्पादनाची अंतस्थ पुरी माहिती उपलब्ध होई. अमेरिका युद्धांत पडली, तरीसुद्धां ह्या कार्टेलच्या अटींप्रमाणेंच व्यवहार चालू होते व त्यांत मिळालेला पैसा बँकांत गुप्तपणें जमा होत होता. ब्रिटिश नाकेबंदीच्या जाळ्यांतून जर्मनीची सुटका व्हावी ह्यासाठी कांहीं अमेरिकन कंपन्यांनीं जर्मन कंपन्यांना मदत केली; कोर्टांत हजर रहाण्यासाठी समन्स काढल्यानंतरच स्टँडर्ड ऑइल कंपनीनें जर्मन कंपनीबरोबरचा आपला संबंध तोडण्याचें ठरविलें; वगैरे गोष्टी अमेरिकेंत प्रसिद्ध झालेल्या एडवर्ड सेनेट कमिटीच्या रिपोर्टांत नमूद आहेत.

जागतिक बाजारपेठेवरील कार्टेल्सच्या हुकमतीमध्यें प्रस्तुत महायुद्धामुळें तात्पुरता खंड पडला एवढेंच; शांतता प्रस्थापित होतांच त्यांचें जाळें पुनः पसरल्याविना रहाणार नाहीं, असें वर उल्लेखिलेल्या लेखकाचें म्हणणें आहे. जर्मनीस सर्व देशांनीं शत्रू मानून त्याचा पुरा बीमोड केला, तरी त्या देशाच्या आर्थिक उद्धारास अमेरिकन कार्टेल्स हातभार लावण्यास तात्काळ पुढें येतील. गेल्या महायुद्धानंतर झालेल्या घडामोडींचीच पुनरावृत्ति होण्याचा रंग दिसतो आणि अमेरिकन कारखानदारांचा त्या दृष्टीनें चाललेला प्रचार उद्बोधक आहे असें सांगून, स्टँडर्ड ऑइल कंपनी आणि आय. जी. फार्बेन इंडुस्ट्री ह्यांचेमधील करारांतील एक कलम (वेंडेल बर्जनें आपल्या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें) त्यानें उद्धृत केलें आहे. "युद्धामुळें कराराप्रमाणें व्यवहार चालू राहूं शकले नाहींत तरी युद्धसमाप्तीनंतर ते पूर्वीच्याच आपुलकीनें पुनः चालू करावयाचें ठरलें आहे" हें तें कलम वाचून, कार्टेल्सचें स्वरूप कसें सीमा अथवा शत्रू जुमानीत नाहीं, ह्याची कल्पना येईल. जर्मनीनें सबंध जगाचें कमालीचें निष्कारण नुकसान केलें, तरी जर्मनीबद्दलचा बंधुभाव मतलबी अमेरिकन भांडवलवाल्यांत कायम राहूं शकतो, हें जितकें आश्चर्यकारक तितकेंच हानिकारक आहे. जर्मनीवर कडक अटी लादूं नका, जर्मन उद्योगधंदे सर्वस्वी मारूं नका, अशी ओरड करणारांची पार्श्वभूमि नेहमीच निःस्वार्थी, उच्च तत्त्वाची व सहानुभूतीची असते, असें नाहीं. कित्येकांचा स्वार्थच तशी मनोवृत्ति निर्माण करीत असतो !

आंतरराष्ट्रीय कार्टेल्स ही पैसे कमावणाऱ्या मतलबी गब्बर भांडवलवाल्या लोकांची संघटना आहे. युद्ध किंवा शांतता ह्यांकडे पाहण्याची त्यांची दृष्टिहि त्याच प्रकारची आहे. कार्टेल्सचे फायदे वर्णन करून त्यांचें अस्तित्व उपकारक आहे, असें भासविण्याचा प्रयत्न पुष्कळ वेळां केला जातो. परंतु ह्या संघटनेचें सामर्थ्य मर्यादित स्वार्थ साधण्याकडेच मुख्यतः खर्च केलें जात असल्याकारणानें राष्ट्रीय हिताचेंहि संवर्धन साधणें अशक्य होतें. युद्धोत्तर काळांत, जनहितविरोधी आंतरराष्ट्रीय कार्टेल्सचे व्यवहार अशक्यप्राय करावयाचे असतील तर केवळ भांडवलवाल्या लोकांच्या हातीं राजकीय सत्ता एकत्रित असूं नये, हें ओघानेंच सिद्ध होतें. कार्टेल्सचे द्वारा आर्थिक स्वर्ग गाठूं पहाणारांस त्यांच्या कृत्यांचे इतर लोकांवरील व राष्ट्रांवरील दुष्परिणाम काय होतील हें पाहण्याची सुबुद्धि रहात नाहीं आणि त्यांचेवर कडक नजर ठेवण्यासाठी जागरूक आणि कर्तव्यदक्ष अशा लोकमतानुवर्ती लोकशाहीचें अस्तित्व आवश्यक ठरतें. कोट्यवधि लोकांनीं युद्ध जिंकण्यासाठी स्वार्थत्याग करावा व लक्षावधि सैनिकांनीं मरणें पत्करावें, परंतु संधि मिळतांच शत्रुपक्षाशीं सहकार्य करून कार्टेल्सनीं पुनः नव्या युद्धाची तयारी करून ठावी, ही घटना अशक्यप्राय झाली पाहिजे. भांडवलदार लोक आपल्या प्रचारानें व पैशानें लोकशाहीच्या धोरणास वळण लावूं शकतात, ही गोष्टहि नजरेआड करून भागणार नाहीं. आंतरराष्ट्रीय कार्टेल्समध्यें हिंदुस्थानास भागीदारी मिळण्याची आज परिस्थिति नाहीं, परंतु कार्टेल्सचे प्रयोग मात्र हिंदुस्थानावर होऊं शकतील आणि हिंदी उद्योगधंद्यांवर त्याचा परिणाम होऊं लागेल.

अमेरिकन असोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्सच्या डायरेक्टर

बोर्डानें कार्टेल्स व आंतरराष्ट्रीय आर्थिक नियंत्रणें, ह्यांवर एक ठराव नुकताच केला आहे. अमेरिकेंतील औद्योगिक स्पर्धा नष्ट करण्याच्या सर्व कारवायांचा त्या ठरावानें निषेध केला आहे. अस्तित्वांत असलेलीं कार्टेल्स नष्ट करण्याचे बाबतींत व नवीं कार्टेल्स अस्तित्वांत येणें अशक्य करण्याचे संबंधांत अमेरिकेनें इतर राष्ट्रांशीं सहकार्य करावें, इतकेंच नव्हे तर त्या बाबतींत स्वतः पुढाकार घ्यावा, असें वरील ठरावानें सुचविलें आहे. तथापि, अमेरिकन सरकारनें अमेरिकन व्यापाऱ्यांस इतर देशांत चालू असलेल्या त्यांच्या व्यापारी पद्धतीप्रमाणेंच व्यवहार करण्यास सहाय्य करावें अशीहि विनंति त्या ठरावानें आपल्या सरकारास केली आहे. "इतर देशांतील कार्टेल्सचे व मोनॉपोलींचे व्यवहार बंद पडण्याचा संभव नाहीं, अशीच अमेरिकन असोसिएशनची समजूत झालेली दिसते" ही 'एकॉनॉमिस्ट' ची त्यावरील टीका सूचक नाहीं काय ?

### यंत्रोत्पादनाचा स्वदेशी धंदा

हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाचे मार्गांत ज्या अडचणी आहेत त्यांमध्यें यंत्रसामुग्री तयार करण्याच्या कारखान्यांचा येथील पूर्ण अभाव हा मोठा अडथळा आहे. यंत्रें हा आधुनिक धंद्यांचा प्राण आहे आणि त्यांच्या पुरवठ्यासाठी हिंदुस्थानास परदेशांवर अवलंबून रहावें लागत आहे हें त्याच्या परिस्थितींतलें महत्त्वाचें वैगुण्य आहे. त्याचे परिणाम दूरगामी आहेत. ज्या देशांतून यंत्रसामुग्री आणावयाची त्याच देशांची सदरहु यंत्रांच्या सहायानें बनणाऱ्या मालाचे बाबतींत हिंदी कारखान्यांशीं स्पर्धा होणें अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणें, यंत्रांचे कारखाने आणि त्यांपासून तयार व्हावयाच्या मालाच्या गिरण्या एकाच देशांत असल्यानें ह्या दोन्ही प्रकारांच्या मालांत सारखी सुधारणा होणें व त्यांची कार्यक्षमता वाढणें शक्य असतें. हिंदुस्थानांतील कारखान्यांत बाहेरून आणून उभारलेलीं यंत्रें थोड्याच काळांत जुनीं होतात आणि त्यांस परदेशांतील कारखान्यांशीं टक्कर देतां येत नाहीं. हें वैगुण्य दूर होण्यास यंत्रें बनवण्याचे कारखाने ह्या देशांत स्थापले जाणें आवश्यक आहे आणि हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या योजना सध्या हातीं घेण्यांत येत आहेत, ती संधि अशा उपक्रमास अत्यंत अनुकूल आहे. सूत व कापड ह्यांच्या गिरण्यांचा हिंदी धंदा आतां चांगला दृढमूल झाला आहे आणि त्यास लागणारीं यंत्रें व इतर साधनें ह्या देशांत तयार करण्याचा प्रयत्न केला जाणें अगत्याचें आहे. सध्या इंग्लंड-अमेरिकेच्या दौऱ्यावर असलेल्या कांहीं कारखानदारांनीं हा प्रश्न हातीं घेतला असल्याचें समजतें. पण त्याचबरोबर गिरण्यांच्या यंत्रांच्या खरेदीबाबत चौकशी व करार दुसरे कारखानदार करीत असल्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे. ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं घडून येऊं शकत नाहींत आणि त्यांचा परस्पर मेळ कसा घालतां येईल ह्याचा विचार राष्ट्रीय दृष्टीनें झाला पाहिजे. तो न झाल्यास आणि यंत्रांचे कारखाने उभारण्याची कल्पना मागें पडल्यास हिंदुस्थानच्या औद्योगीकरणांत योजनात्मकता कोठें राहिली ? हिंदी कारखानदार आपापल्या स्वतंत्र कल्पना व योजना वैयक्तिक रीतीनें दामटीत असल्याचा हा परिणाम असावा असें वाटतें. परंतु सरकारनें असल्या प्रयत्नांची योग्य जुळणी करण्याची खबरदारी वेळींच घेणें आवश्यक आहे.

### म्हैसूर सिल्क फिलेचर्स, लि.

वरील कंपनीस १९४४ सालीं १,७५,३१८ रुपये निवळ नफा झाला. करासाठी १,७०,००० रुपयांची तरतूद करून हा नफा निघाला आहे. भागीदारांना १२½% कर माफ डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीचें सर्व रेशीम म्हैसूर सरकारास पुरविलें जातें. युद्धोत्तर योजना म्हणून रेशमी कापड तयार करण्याचा स्वतःचा कारखाना काढण्याची व हिंदुस्थानांत आणि बाहेर व्यापारी संबंध वाढविण्याची डायरेक्टरांची कल्पना आहे. त्यासाठी, कंपनीचें अधिकृत भांडवल १० लाखांचें २५ लाख करून जरूरीप्रमाणें तें विक्रीस काढण्याचा त्यांचा विचार आहे. मेसर्स नाइक अँड कंपनीकडे म्हैसूर सिल्क फिलेचर्सची मॅनेजिंग एजन्सी आहे. तिचे प्रमुख भागीदार श्री. नारायणराव नाईक ह्यांनींच बॉंबे सिल्क फिलेचर्स लि. ही नवी कंपनी बेळगाव येथें स्थापन केली आहे.

### वेस्टर्न इंडिया विमा कं. व श्री. कै. ग. स. मराठे

"या अहवालाचे प्रसंगीं नमूद करण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, कंपनीचे कन्सल्टिंग ॲक्चुअरी श्री. जी.एस. मराठे, एम. ए., ए.आय. ए. हे गेल्या महिन्यांत दिवंगत झाले. त्यांचा व कंपनीचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा होता व कंपनीचे स्थापनेपासून त्यांचे मृत्यूपावेतों त्यांचे व कंपनीचे संबंध अत्यंत घनिष्ठ होते. कंपनीच्या कामकाजाच्या प्रसंगीं त्यांच्या सल्लामसलतीचा फारच उपयोग झालेला आहे. अर्थातच त्यांचे मृत्यूमुळें कंपनीचें फार नुकसान झालें आहे." —वार्षिक सभेंत-अध्यक्षांनीं काढलेले उद्गार.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India-Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent, the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस—पुणें शहर.

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल

रु. ५,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या १०,००० भागांत विभागलेलें).

वरील शेअर्स ता. ६-७-४५ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या ४ शेअर्संना १ नवा शेअर याप्रमाणें रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांना तेवढ्याच वाढीनें (रु. ५/-) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५।९।१९४५ ही आहे.

सी. व्ही. जोग,
मॅनेजर.

## स्फुट विचार

### संयुक्त राष्ट्रांची जागतिक घटना

सॅन फ्रॅन्सिस्को परिषदेची चर्चा नऊ आठवडे चालून अखेर तीमध्यें तयार झालेल्या घटनेवर पन्नास राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या सह्या झाल्या. जगांत शांतता व सुरक्षितता अप्रतिहत नांदावी आणि कोणत्याहि देशास त्यांचा भंग करतां येऊं नये ह्या उद्देशानें ह्या सर्व राष्ट्रांनीं एकमतानें विशिष्ट योजना मान्य केली आहे. मागील महायुद्धाचे समाप्तीनंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाच्या घटनेंत व कार्यपद्धतींत ठळक वैगुण्यें राहिल्यानें तीं अयशस्वी ठरली ही गोष्ट लक्षांत ठेवून प्रस्तुतची व्यवस्था तयार करण्यांत आलेली आहे. राष्ट्रांराष्ट्रांमधील तंट्यांचा निकाल सामोपचारानें व तडजोडीनें व्हावा आणि एखादें राष्ट्र बळजबरीनें जागतिक शांततेचा भंग करण्यास व युद्धापर्यंत मजल नेण्यास उद्युक्त झाल्यास त्याच्या विरुद्ध उपाययोजना करून त्याचें पारिपत्य करण्यास कायमची लष्करी तजवीज करण्यांत येणार आहे. इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन व फ्रान्स ह्या राष्ट्रांवर ह्याबाबतची जबाबदारी मुख्यत्वेंकरून पडणार असल्यानें त्यांस संयुक्त राष्ट्रांच्या घटनेंतील मुख्य समितीवर म्हणजे सिक्युरिटी कौन्सिलवर कायमच्या जागा आहेत आणि बाकीचे सहा सभासद सर्व राष्ट्रांच्या सभेनें म्हणजे जनरल असेंब्लीनें निवडावयाचे आहेत. कायद्याच्या व घटनात्मक प्रश्नांचा निर्णय देण्यासाठी स्वतंत्र न्यायाधिशांची एक समिति नेमली जाईल. राजकीय सुरक्षिततेबरोबर जगास आर्थिक व सामाजिक स्वास्थ्य लाभावें म्हणून त्यासंबंधांतल्या प्रश्नांचा विचार आर्थिक समितीकडे सोपवला जाईल. त्याचप्रमाणें राजकीय दृष्ट्या परावलंबी देशांच्या हितसंबंधांचीहि काळजी घेण्यांत यावयाची आहे. सॅन फ्रॅन्सिको परिषदेंत कांहीं महत्त्वाच्या मुद्यांवर तीव्र मतभेद उत्पन्न होऊन तिचें कामहि कित्येक दिवस अडून बसलें होतें. परंतु अखेरीस त्यांचा तडजोडीच्या वृत्तीनें निकाल करण्यांत आला. पन्नास राष्ट्रांनीं एकमतानें जागतिक घटना तयार केली ही मोठी कामगिरी झाली आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि, नवीन राष्ट्रसंघाची खरी परीक्षा त्याच्या उद्देशानुरूप कृति करण्याचा प्रसंग प्रमुख राष्ट्रांवर येईल तेव्हां व्हावयाची आहे. विशेषतः आर्थिक आणि सामाजिक स्वास्थ्याविषयींचें उद्दिष्ट साध्य होण्यास कोणत्या उपायांचा अवलंब केला जातो आणि लहान व मागसलेल्या देशांस प्रबल राष्ट्रें कोणत्या रीतीनें वागवतात ह्यावर संयुक्त राष्ट्रघटनेचें भवितव्य मुख्यत्वेंकरून अवलंबून राहणार आहे.

### मोठ्या नोटा, क्रॉस न केलेले चेक्स व काळा बाजार

ता. ४ जूनपासून १० पौंडांपेक्षा जास्त रकमेच्या चेक्सचे रोख पैसे देण्याचें ब्रिटिश बँकांनीं बंद केलें आहे. काळ्या बाजारास आळा घालणें, हा त्याचा उद्देश आहे. काळ्या बाजारांत सर्व व्यवहार रोखीनेंच चालतात, हें सुप्रसिद्ध आहे. कारण त्या व्यवहारांची नोंद राहूं देणें कोणासच नको असतें. सरकारासहि लोकांची खरी प्राप्ती कळणें अशक्य होऊन त्याचा इन्कम टॅक्स बुडतो. ता. ३० एप्रिल रोजीं ब्रिटिश सरकारनें ५ पौंडांवरील सर्व नोटांचा कायदेशीरपणा नाहींसा केला. त्यामुळें मूळ उद्देशाप्रमाणें काळ्या बाजारांतील लोकांच्या व्यवहारांची सुलभता नाहींशी झाली, परंतु त्यांनीं त्यावर तोड काढलीच. पैशाची देवघेव अन्‌क्रॉस्ड चेक्सच्या द्वारा करावयाची परंतु प्रत्यक्ष बँकेंतून वसुली स्नेह्यांच्या मार्फत करावयाची, अशा प्रकारचे व्यवहार एकदम वाढले. ब्रिटिश बँकांनीं त्यावरहि आतां उपाययोजना करून फिरून काळ्या बाजारांतील व्यापाऱ्यांस अडचणींत आणलें आहे. चेक काढणारानें स्वतः किंवा ओळखीच्या माणसानें दाखल केलेल्या, क्रॉस न केलेल्या चेक्सची रकमच फक्त ह्यापुढें बँका रोखीनें देतील. काळ्या बाजारांतील व्यापाऱ्यांना आतां पांच पौंड किंवा त्याखालील नोटांचीं गेंडोळीं द्यावीं घ्यावीं लागतील. मोठाल्या नोटा बंद झाल्या व साध्या चेक्सची सोयहि आतां नाहींशी झाली.

### मोठ्या प्रमाणावरील शेतीसाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग

युद्धकाळांत ग्रेट ब्रिटनमध्यें शेतीचें उत्पादन वाढूं शकलें, त्याचें एक कारण यंत्रसामुग्रीचा मोठ्या प्रमाणावरील उपयोग, हें होय. १९४२ सालीं त्या देशांत १,१६,८२५ ट्रॅक्टर चालू होते. १९४४ सालीं त्यांची संख्या १,७२,७७० झाली. १९३९ सालीं फक्त ५५,००० ट्रॅक्टर चालू होते. दूध काढण्याचीं यंत्रें २९,५०५ चीं ३७,७७० झालीं. ब्रिटिश सरकारचें शेतकी खातें अमेरिका व कॅनडा ह्या देशांकडे तेथील शेतकीच्या यंत्रसामुग्रीची अद्यावत माहिती करून घेण्यासाठीं एक तज्ज्ञांचें मंडळ पाठवीत आहे. ग्रेट ब्रिटनमधील शेतें व तेथील शेतें ह्यांच्या सरासरी क्षेत्रांत फारच फरक असल्याकारणानें अमेरिकन यंत्रसामुग्री जशीच्या तशी ग्रेट ब्रिटनमध्यें उपयोगांत आणतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील शेतें त्या मानानें तर फारच लहान आकाराचीं आहेत. शेतांचे मालकी हक्क, समाईक शेती, इत्यादि प्रश्न मोठ्या प्रमाणावर यंत्रसामुग्री उपयोगांत आणण्याशी निगडित आहेत आणि यांत्रिक शक्तीमुळें निरुपयोगी ठरणाऱ्या शेतकऱ्यांस दुसरें निर्वाहाचें साधन उपलब्ध करून देणें आवश्यक आहे, ह्या दोन गोष्टी हिंदुस्थानांत अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

### वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षी १,६७,२३,४४५ रुपयांचें काम पुरें केलें व लाइफ अॅशुअरन्स फंडांत सुमारें २५ लक्ष रुपयांची भर टाकली. त्या फंडाची रकम आतां २ कोटि, १० लक्ष रुपये झाली आहे. कंपनीच्या इन्व्हेस्टमेंटची बाजारभावानें होणारी किंमत खरेदीच्या किंमतीपेक्षा २४½ लक्ष रुपयांनीं जास्त आहे. ही वाढ हिशेबांत आणण्याची कंपनीची पहिल्यापासूनच पद्धत नाहीं. कंपनीचे हिशेब तिच्या भक्कमपणाची साक्ष एरवीं हि देतातच. त्यांत ह्या सुप्रसिद्ध गुप्त रिझर्व्हनें भर पडत आहे. कंपनीच्या लाइफ फंडावर निवळ व्याजाचा दर ३·३० टक्के पडला आहे. भागीदारांना १९४४ सालाकरितां इन्कम टॅक्स वगैरे धरून १०% दरानें डिव्हिडंड त्याकरितांच राखून ठेवण्यांत आलेल्या डि. ई. फंडांतून यावयाचें ठरलें आहे. नवीन कामांत वाढ असूनहि कंपनीचे खर्चाचें प्रमाण फार नाहीं व रिन्युअल खर्चाचें प्रमाण तर बरेंच कमी झालें आहे. कंपनीच्या लॅप्सचें प्रमाण हें नेहमीच कमी असतें. वेस्टर्न इंडियाचीं वैशिष्ट्यें आम्हीं सालोसाल वर्णन करीत आलों आहोंत, तीं सर्व कायम असून कंपनीचा कारभार पूर्वीप्रमाणेंच काटकसरीनें व दक्षतेनें चालू आहे आणि तिचा उच्च दर्जा कायम आहे, ही गोष्ट चालकांस भूषणावह आहे.

## दि सुप्रीम म्युच्युअल ॲशुअरन्स कं. लि., पुणें

वरील म्युच्युअल विमा कंपनीचा १९४४ अखेरचा ताळेबंद आमचे हातीं नुकताच आला आहे. कंपनीनें १९४४ सालीं १४,०९,७५० रुपयांचें काम पुरें केलें. हप्त्यांचें एकूण उत्पन्न १,२६,५६४ रुपये झालें. त्यापैकी ४९,७६२ रुपये पहिल्या वर्षाच्या हप्त्यांचे; ३१,८७२ रुपये रिन्युअल हप्त्यांचे व ४४,९२८ रुपये सिंगल प्रीमियमचे आहेत. ह्या सिंगल प्रीमियमचे रकमेपैकी ३५,२३३ रुपयांचे सिंगल हप्ते एकट्या श्रीमंत आबासाहेब पटवर्धन ह्यांचे आहेत, ह्याचा गौरवपर उल्लेख कंपनीचे अध्यक्ष, श्री. एस. पी. आठवले ह्यांनीं वार्षिक सभेंतील आपल्या भाषणांत केला. खर्चाचें रिन्युअल हप्त्यांशीं प्रमाण २०% पडतें. १९४५ सालीं ह्या बाबतींत आणखी सुधारणा घडून येईल, असें श्री. आठवले ह्यांनीं सांगितलें. सुप्रीम म्युच्युअल कॉलनीच्या योजनेनें १६,०२६ रुपयांचा नफा दिला आहे. कंपनीनें प्राथमिक खर्च पूर्णपणें लिहून टाकला आहे व ऑर्गनायझेशन खर्चाचा जिंदगीकडील आकडा २,८४६ रुपयांनीं कमी केला आहे. विमा खातीं फंड वर्षारंभीं ११,०६६ रुपये होता तो सालअखेर ८९,२२९ रुपये झाला. कंपनीच्या संचालक मंडळांत श्री. दत्तोपंत फाटक, श्री. नारायणराव नाईक, श्री. अच्युतराव साठे वगैरे गृहस्थ आहेत. श्री. व्ही. एन. म्हैसूर हे डायरेक्टर-मॅनेजर आहेत. कंपनीनें मिळविलेल्या वाढत्या कामाबद्दल आणि तिच्या उत्पन्नांत चांगल्या तऱ्हेनें भर घातल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

### हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्स

वरील नांवाचें एक नवें कॉमर्स चेंबर मुंबईंत स्थापन होत आहे. त्यासाठीं बोलाविलेल्या सभेंत जागच्याजागीं नव्या चेंबरला ५०,००० रुपयांच्या देणग्या मिळाल्या.

## युद्धकालीन वहातुक कंत्राटदारांची तक्रार

### " सरकारी वहातुक योजनेंत स्थान नाहीं "

" १९४२-४३ मध्यें लष्करी अधिकाऱ्यांना वहातुकीची अडचण तीव्रतेनें भासूं लागली व लष्करी वहातुक सुलभतेनें होईना, अशा वेळीं कंत्राटदार पुढें आले, खंड-उसन वहानें विकत घेण्यांत त्यांनीं कोट्यवधि रुपये गुंतविले व वहातुकीची व्यवस्था केली. १९४३ च्या जानेवारीनंतर त्यांनीं हजारों वहानें विकत घेतलेलीं आहेत. इतकें केलें असतांहि सरकारनें त्यांना आपल्या वहातुक-योजनेंतून वगळलें आहे. त्यामुळें त्यांचा धंदा आजिबात मोडणार आहे. आम्हीं किमान १,००० वाहनांचे मालक आतां २५ लाखांची लिमिटेड कंपनी काढणार आहोंत. युद्धापूर्वी प्रांतांतील वाहनांपैकी ७५% वहानें मुंबई शहरांतील होतीं, तरी त्यांना मुंबई-पुणें वहातुक योजनेंत स्थान मिळणार नाहीं. आम्हीं कंत्राटदार, सरकारकडे ह्या सर्व प्रश्नांवर आपलें म्हणणें पाठविणार आहों. " :—श्री. राजपाल ह्यांचें भाषण.

### ब्रिटिश कॉमन्स सभेची निवडणूक

ब्रिटिश कॉमन्स सभेंतील ६३७ जागांसाठीं १,६७२ उमेदवार उभे आहेत. त्यापैकी ८८ स्त्रिया आहेत. मजूर पक्षानें सर्वांत जास्त म्हणजे ६०१ उमेदवार उभे केले आहेत.

### ग्रेट सोशल लाइफ अँड जनरल इं. कं. लि.

वरील कंपनीनें १९४४ सालीं १६ लक्ष रुपयांचे आयुर्विमे उतरविले. १९४३ सालीं तिनें ७ लक्ष रुपयांचें काम मिळविलें होतें.


# ★ वेस्टर्न इंडियाची प्रगति ★

## १९४४ चे अहवालांतील ठळक गोष्टी

| | | |
|---|---|---|
| कंपनीचा चालू विमा | ... | रु. ८,०९,६९,४८९ |
| कंपनीची मालमत्ता | ... | रु. २,३५,३३,७२७ |
| कंपनीचा आयुर्निधि | ... | रु. २,०९,८१,६३४ |
| आतांपर्यंत कंपनीनें विमेदारांकडे क्लेमचे पोंचविलेले | ... | रु. ८७,०५,१८१ |

या कंपनीचे विमेदार होण्यांत लोकांना भूषण वाटतें.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि. सातारा

पुणें शाखा : १७९, बुधवार, लक्ष्मीरस्ता पुणें २

### कृष्णराजसागर

म्हैसूर शहराजळील, कावेरी नदीवरील कृष्णराजसागर धरण हें म्हैसूर संस्थानांतील सर्व वीज निर्मितीचें मूळ आहे. धरणाच्या पाण्याचा शेतीसहि उपयोग होतो. धरणाची भिंत ८,६०० फूट लांब असून १४० फूट उंच आहे. भिंतीची बुडाशीं रुंदी १११ फूट आहे. वरील रस्ता १४½ फूट आहे. धरणांत ४८⅞ अब्ज घनफूट पाणी मावतें. जुलै १९२४ मध्यें कमालीचा पूर आला तेव्हां २९,००० क्यूसेक्स पाणी वाहिलें; धरणांतून ३५,००० क्यूसेक्स पाणी वाहूं शकेल अशी तरतूद करण्यांत आली आहे. सुमारें ४,१०० चौरस मैल क्षेत्रांत पडणारा पाऊस वहात येऊन धरणांत पाणी साठतें. धरणाशेजारी नदीचा ओघ पावसाळ्यांत १,००,००० क्यूसेक्स असतो, तो उन्हाळ्यांत १०० क्यूसेक्सवर येतो.

### मध्यवर्ती सरकारचा उत्पन्न-खर्च

१९४३-४४ मध्यें मध्यवर्ती सरकारास २५० कोटि रुपये उत्पन्न झालें व खर्चाचा आकडा ४४० कोटि रुपये भरला. कर्जांत २४२ कोटींची भर पडली.

### रिझर्व्ह बँकेचा इंपीरिअल बँकेशीं करार

इंपीरिअल बँक आणि रिझर्व्ह बँक ह्यांचेमधील एजन्सीच्या कराराची मुदत ३१ मार्च १९५५ अखेर वाढविण्यांत आली आहे. इंपीरिअल बँकेस मिळावयाचा कमिशनचा दर मात्र उतरविण्यांत आला आहे. पहिल्या १५० कोटींच्या उलाढालीस यापुढें 1/16 टक्का, त्यापुढील १५० कोटींस 1/32 टक्का, त्यापुढील ३०० कोटींस 1/64 टक्का व त्यापुढील उलाढालीस 1/128 टक्का असा नवीन दर आहे. जुना दर पहिल्या २५० कोटींस 1/16 टक्का व बाकीच्या रकमेवर 1/32 टक्का, असा होता.

### युद्धविषयक धोक्याचा विमा

चालू तीन महिन्यांसाठीं हप्ता न घेतां वॉररिस्क विमा पॉलिसी चालू ठेवण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. मालाच्या विम्याच्या ३० जून रोजीं संपणाऱ्या पॉलिसी सप्टेंबर अखेर चालू राहतील. कारखान्यांच्या विम्यांचा सप्टेंबरमध्यें पडणारा हप्ता भरण्याचें प्रयोजन नाहीं. माल व कारखाने ह्यांच्या विमा-खातीं सरकारजवळ सुमारें ४० कोटि रुपये पडून आहेत. ह्या विम्यांच्या सक्तीचें कारण उरलेलें नाहीं व हप्त्यांचा दरहि उतरविण्यास हरकत नाहीं असें हितसंबंधी लोकांचें म्हणणें आहे.

## मुंबई शेअर बाजार

**( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )**

व्याज-वजा (xd)
सिंप्लेक्स ५-७-४५
न्यू इंडिया ९-७-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. २६।६।४५ | बुधवार २७।६।४५ | गुरुवार २८।६।४५ | शुक्रवार २९।६।४५ | सोमवार २।७।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २१७७-८ | २१७६-४ | २१७१-४ | २१८१-४ | |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९६-० | ३९८-० | ३९६-८ | ३९८-० | |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८६२-८ | १८७५-० | १८७३-१२ | १८७८-१२ | |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९२-८ | ५९२-८ | ५९५-० | ५९९-८ | |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५२०-० | ५२१-० | ५२२-० | ५२३-० | |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३७०-८ | ३६९-० | ३६८-८ | ३७०-० | |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८५-० | २८४-० | २८५-० | २८५-० | |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९५-० | २९५-० | २९५-० | २९५-० | बँक सुटी |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८१-० | २८१-० | २८१-० | २८३-८ | |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१४-३ | ३-१३-६ | ३-१३-९ | ३-१३-९ | |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३-११-० | १३-११-० | १३-११-६ | १३-१३-० | |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | २-१४-० | २-१३-६ | २-१३-९ | २-१३-६ | |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९५-० | ६८८-१२ | ६८३-१२ | ६८३-१२ | |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २०५-८ | २०४-१२ | २०५-० | २०५-४ | |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१९-८ | २१९-८ | २१९-० | २१९-८ | |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५२१-४ | ५२०-० | ५१५-० | ५१५-० | |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७-९ | ३७-५ | ३७-४ | ३७-६ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१-८ | १०१-७ | १०१-७ | १०१-१०-६ | |

**शुक्रवार दि. २९-६-४५ चे भाव**

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | सामान्य | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बरोडा | १४५-० | | | अलकॉक | ३९६-४ |
| १९४६ | १०२-७-६ | सेंट्रल | ८१-८ | आंध्रा व्हॅली | १७७२-८ | बीचे स्टीम | ५८५-० |
| १९५१-५४ | १०१-३-० | इंडिया | ११९-० | बॉम्बे ट्रॅम | १४२-० | न्यू इंडिया | ८२-८ |
| १९५७ | १००-६-० | इंपी० | २००२-८ | टाटा हायड्रो | २०४-० | शिवराजपुर | ४९-८ |
| १९६३-६५ | ९९-०-० | इंपी० | ५०६-४ | टाटा पॉवर | १८२०-० | टाटा केमिकल | २०-६ |
| १९६६-६८ | ९८-७-३ | रिझर्व्ह | १३८-० | | | टाटा ऑईल | ६८-१२ |
| | | यूनियन | ८-१५ | | | 'विमको' | ३१७-८ |

## —: साठे बिस्किटें :—

**ऑरेंज व क्रीमक्रॅकर**

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

---

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

## पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९

---

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

---

## डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

# लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

**दोन वेळां उपयोग**

**दि मागोरा केमिकल कं. लि.**

— हिराबाग, पुणें २ —

---

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे

**पहिले व फक्त १ च**

*गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्*

## पेन्टर बेडेकर, ए. जी.,

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

---

## —त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ताः—

**तुळजाराम मोदी**

मोतीचौक, सातारा.

---

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**न्यूयॉर्क एजन्ट्स :**—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

हें पत्र पुणें, पेठ भांबुडा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुडा, घ. नं. १२४।११ पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ११ जुलै १९४५ अंक २८

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व क्रीमक्रीम

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.







व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

EVERYTHING IN RUBBER GOODS

● Hospital Requirements ● Cab Tyres
● Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
● Rubber Rollers for Textile Mills
● Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd.,
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay.*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून
अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
**महाराष्ट्र भुवन**
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालक:—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

## विविध माहिती

### अमेरिकेंत कापडाच्या उत्पादनांत घट

अमेरिकेंतील कापडाच्या उत्पादनांत घट अपेक्षित असून १९४५ च्या दुसऱ्या तिमाहीपेक्षा तिसऱ्या तिमाहींत पुरवठ्यांत ७½% कपात करावी लागणार आहे. लष्करी खात्यानें १५% कपात मान्य केली आहे. त्यामुळें उपलब्ध होणारें १० कोटि वार कापड नागरिकांच्या उपयोगी येईल.

### मिसेस चर्चिल ह्यांस हिऱ्याच्या आंगठीची भेट

मिसेस चर्चिल ह्यांनीं रशियाला नुकतीच भेट दिली, त्याप्रसंगीं मादाम मॉलोटाव्ह ह्यांनीं त्यांना उरल पर्वतामधून काढलेल्या हिऱ्याची एक आंगठी नजर केली. " ह्या हिऱ्याइतके तेजस्वी, स्वच्छ व दीर्घकालीन असे आपल्या दोन देशांचे संबंध असावेत " अशी इच्छा त्यांनीं आंगठी देतांना व्यक्त केली.

### मोटार कारखान्यासाठी विमानमार्गानें बॉल बेअरिंग

डॅगेनहॅम (इंग्लंड) येथील फोर्ड मोटार कारखान्यासाठी अमेरिकेंतून विमानमार्गें १,३७९ पौंड बॉल बेअरिंज पाठविण्यांत आलीं.

### अमेरिकन सरकारचा प्रचंड खर्च

अमेरिकेच्या मध्यवर्ती (फेडरल) सरकारनें ३० जून, १९४५ अखेर संपलेल्या हिशेबाचे वर्षी ३३,०००| कोटि रुपये खर्च केले. त्यापैकी ३०,००० कोटि रुपयांचा युद्धखर्च झाला. आतांपर्यंत कोणत्याहि वर्षी अमेरिकन सरकारचा इतका खर्च किंवा उत्पन्न झालें नव्हतें.

### चलनविस्तारास आळा घालण्यासाठी अमेरिकन सोनें

चिनी सरकारचें १९४५ चें अंदाज-पत्रक १९३६ चे मानानें १९० पट मोठें आहे. चीन अमेरिकेंतून विमानमार्गें सोन्याची आयात करीत आहे, त्याची किंमत अमेरिकेनें मंजूर केलेल्या कर्जाच्या रकमेंतून देण्यांत यावयाची आहे. हें सोनें विकून चलनविस्तारास आळा घालण्याचा चिनी सरकारचा विचार आहे.

### बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस ३० जून, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी ३५,३२,३५२ रुपये नफा झाला. त्यापैकी २०,००,०० रुपये करासाठीं राखून ठेवण्यांत आले आहेत. म्हणजे १५,३२,३५२ रुपये उरतात. मागील हिशेबांतील उरलेले ११,७७,३९६ रुपये त्यांत मिळविल्यावर एकूण २७,०९,७४८ रुपये नफा रहातो. बँकेनें आपल्या १,४८,५८,९५० रुपयांच्या वसूल भांडवलावर करमाफ ११% ( प्रत्येक भागास २ रुपये १२ आणे ) इंटेरिम डिव्हिडंड जाहीर केलें आहे. त्यास लागणारी रकम(८,१६,६१३ रुपये) वगळली तर पुढील सहामाहीसाठीं १८,९३,१३४ रुपये नफा ओढला जातो.

### रोटीमध्यें कॅलशियम मिसळणार

हाडें मजबूत करणारें कॅलशियम हें द्रव्य मुंबई शहरांतील नागरिकांच्या आहारांत पुरेसें नसतें असें आढळल्यावरून मुंबई शहरांत विकल्या जाणाऱ्या रोट्यांत तें मिसळलें जाण्याची व्यवस्था मुंबई सरकार करणार आहे. रोटीसाठी देण्यांत येणाऱ्या आट्यांत शेरामागें १६ ते २० ग्रेन ह्या प्रमाणांत कॅलशियम मिसळलें जाईल. त्याबद्दल किंमत आकारली जाणार नाहीं. चपातीसाठीं गव्हाचें रेशन घेणारांसहि रेशनच्या दुकानांत कॅलशियम मोफत मिळणार आहे.

### हक्काची भरपगारी रजा

ग्रेट ब्रिटनमधील सुमारें ५ लक्ष रेल्वे कामगारांना ह्यापुढें दरसाल १४ दिवस हक्काची भर पगारी रजा मिळणार असल्याचें जाहीर झालें.

### काठेवाड एक्सप्रेस पुनः सुरू होणार

सुमारें ३ वर्षांपूर्वी बंद केलेली काठेवाड एक्सप्रेस १६ जुलैपासून पुनः सुरू होईल.

### बक्षिसाच्या रोख्यांची चिठ्या टाकून निवड

हिंदुस्थान सरकारच्या बक्षिसाच्या रोख्यांतील तिसऱ्या सहामाहीच्या बक्षिसांचे नंबर निवडण्याचें काम ता. १३ जुलै रोजीं सकाळीं ११ वाजतां सर कावसजी जहांगिर हॉल, मुंबई, येथें होईल.


पुण्यांत एकच चर्चेचा विषय—' हुमायूं ! '

' हुमायूं ' म्हणजे प्रत्येक शो ' हाऊसफुल्ल ' !

' मेहबूब ' प्रॉडक्शन्साची अतिप्रचंड ऐतिहासिक कलाकृति

हुमायूं

निर्माता-दिग्दर्शक—मेहबूब

संगीत—गुलाम हैदर

छाया—फरेदुन इराणी

कला—पळनीटकर

सिलेक्ट प्रकाशन

कलावंत सेना:— ★अशोक कुमार ★नर्गीस ★वीणा ★चंद्रमोहन ★शहानवाझ.

रोज तीन खेळ— ३।, ६॥ व १० वाजतां

पॅरेमाऊंट [पुणें]

रिझर्वेशन रोज सकाळीं: १० ते १२ प.

# अर्थ

## युद्धाचे आर्थिक आणि सामाजिक परिणाम

शांतता काळांत अनवश्यक आणि अनिष्टहि वाटणाऱ्या कित्येक सामाजिक महत्त्वाच्या गोष्टी युद्धपरिस्थितींत अपरिहार्य होतात आणि त्यांपैकीं कांहीं शांततेच्या काळींहि समाजास चिकटून पहातात आणि त्या योगानें अनेक अवघड प्रश्न उपस्थित होतात. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें कारखान्यांत स्त्रियांनीं श्रमाचीं कामें करून युद्धप्रयत्नास बहुमोल सहाय्य दिलें आहे, पण लढाऊ सामुग्री बनवण्याचें बंद झाल्यावरहि ह्या स्त्रीकामगारांस पगारी धंदे कोठें व कसे यावयाचे? पूर्वीच्या घरगुती कामांकडे ह्या स्त्रिया परततील ही अपेक्षा पुरी होईल असें दिसत नाहीं. ह्या संबंधांत काढलेल्या माहितीवरून असें अनुमान निघतें कीं बहुतेक स्त्रिया कारखान्यांत राहूं इच्छीत आहेत आणि त्यांमध्यें विवाहित स्त्रियांचाहि भरणा आहे. कारखान्यांतील कामांत मिळणारें वेतन आणि त्यापेक्षाहि महत्त्वाचें स्वातंत्र्य ह्यांचें आकर्षण ह्यासंबंधांत प्रभावी ठरत आहे. युद्धाच्या आघाडीवरून परत येणाऱ्या पुरुषांस स्त्रीकामकऱ्यांची स्पर्धा भोवणार आहे. युद्धकार्याशीं संबंध असलेल्या अनेक कचेऱ्यांमध्यें आणि इतर क्षेत्रांत हजारों हिंदी स्त्रिया आज पगारी कामें करीत आहेत. त्यांसहि स्वतंत्र प्राप्तीची सवय चिकटणार, पण ती मिळण्याचे मार्ग मात्र बंद होणार आहेत. अर्धवट शिकलेल्या तरुणांस युद्धाच्या निकडीमुळें सध्या बऱ्या पगारावर काम मिळत आहे आणि चरितार्थ व चैन यांवर पैसा खर्चतां येत आहे. युद्धसमाप्तीनंतर त्यांपैकी थोडक्यांसच काम मिळेल आणि बाकीच्यांस काम मिळवण्याची धडपड करावी लागेल. युद्धोत्तर काळांतील औद्योगीकरणाच्या योजनांत कित्येकांची सोय होईल, पण शिक्षण घेणाऱ्या तरुणांची संख्या वर्षानुवर्ष वाढत जाणार आहे आणि त्यांची परस्पर स्पर्धा तीव्र होणार आहे. हा एकूण प्रश्न अवघड पण जिव्हाळ्याच्या महत्त्वाचा आहे आणि त्याचा निकाल राष्ट्रीय वृत्तीच्या सरकारांनीं सहानुभूतीनें व आपुलकीच्या वृत्तीनें करणें आवश्यक आहे. युद्धकाळांत जनतेस लागलेली काटकसरीची आणि शिस्तीची सवय आज नाइलाजानें पत्करावी लागली तरी ती कायमची लावून घेणें हिताचें आहे. सध्याच्या अनेक आर्थिक व सामाजिक नियंत्रणांपैकीं बरींचशीं काढून घेतलीं जातील; पण कांहीं चालू ठेवणें आवश्यक आणि इष्ट वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

हिंदुस्थानांत युद्धामुळें यांत्रिक शिक्षणास उत्तेजन मिळालें आहे. ह्या देशांतील शिक्षणपद्धतींत यांत्रिक शिक्षणास दुय्यम प्रतीचेंहि स्थान नाहीं आणि केवळ कारकुनी पेशाचे तरुण तिच्यामधून तयार होऊन बाहेर पडतात अशी टीका होत असे. ही तक्रार पुष्कळशी युद्धाच्या निकडीच्या गरजेनें दूर करण्यास सहाय दिलें आहे. दारूगोळा वगैरे अनेक प्रकारांची लढाऊ सामुग्री हिंदुस्थाननें स्वतःच्या सैन्यास आणि मित्र-राष्ट्रांस पुरवली आहे. ती बनवण्यास यंत्रविद्येंत कुशल असलेल्या लोकांची आवश्यकता भासली. त्यासाठी सरकारनें खास शिक्षणाची सोय केली. त्याचप्रमाणें इंग्लंडला शेकडो तरुण पाठवून तेथें शिकवून इकडे आणिले आणि त्यांस कारखान्यांत काम दिलें आहे. युद्धाची गरज संपल्यावर ह्या हजारो यंत्रकलाविशारदांस खाजगी व सरकारी कारखान्यांत काम पुरवावें लागेल. देशाच्या औद्योगीकरणाच्या योजनेस अनुसरून कारखान्यांचा विस्तार होईल, त्यांत कुशल कामगारांची जरूर भासेल आणि ती भागवली जाण्यास ह्या अनुभवी लोकांचा चांगला उपयोग होईल. ह्या योगानें "दांत आहेत तर चणे नाहींत आणि चणे आहेत पण दांत नाहींत" असा प्रकार कारखाने व शिक्षित कामगार ह्यांचे बाबतींत होण्याची भीति नाहीं.

प्रत्यक्ष रणांगणावरून व युद्धकार्यावरून लाखो लोक परत येतील, त्यांस योग्य काम मिळवून देण्याची तजवीज सरकारनें केली आहे. त्यांपैकी कित्येकांकरितां सरकारी जागा कायमच्या भरावयाच्या शिल्लक ठेविल्या आहेत. सैनिक खेडेगावांतून रणांगणावर गेले, त्यांस निरनिराळ्या देशांत व युद्धक्षेत्रांत नवीन अनुभव मिळाले असून त्यांचे दृष्टिकोन बदलेले आहेत. हे लाखो लोक आपापल्या गांवीं परत येतील तेव्हां त्यांस त्यांची गरज व पात्रता ह्यांस अनुसरून काम दिलें गेलें पाहिजे. त्यांस व्यावहारिक शिक्षण देऊन स्वावलंबी बनवण्याची व्यवस्था सरकार करीत आहे. युद्धांतून परत आलेल्या ह्या शिपायांच्या उदाहरणाचा व नेतृत्वाचा शेतीचा धंदा व एकंदर ग्रामीण जीवन ह्यांवर दृश्य असा परिणाम होणार आहे. इंग्लंडमध्यें कारखानदार, धंदेवाले व जमिनदार सैनिकांस पुन्हां काम देण्यास उत्सुक आहेत आणि त्यांच्या परत येण्याची ते वाट पहात आहेत. युद्धकार्य करणाऱ्या आणि कारखान्यांतील सध्याचें पगारी काम सोडून देण्यास नाखुष असलेल्या स्त्रियांची सोय कशी लावावयाची हा तेथें अवघड प्रश्न आहे, त्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. हिंदी शिपायांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था येथील विशिष्ट खेडेगावी परिस्थितींत करण्याची अडचण त्याहिपेक्षा मोठी आहे. तथापि सरकार एव्हांपासून त्या संबंधांत योजना तयार करून ठेवीत आहे. मुंबई प्रांतांत ह्या संबंधांत सरकारनें काय तरतूद योजिली आहे, त्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे तीवरून युद्धाच्या सामाजिक आणि आर्थिक परिणामांच्या एका महत्वाच्या अंगावर बोधप्रद प्रकाश पडण्यासारखा आहे. प्रस्तुत युद्धामुळें सबंध राष्ट्रीय जीवनास नवीन वळण लागणार आहे आणि तें योग्य व प्रागतिक रीतीनें लागावें ह्या विषयींची खबरदारी सरकार व जनतेचे नेते ह्यांनीं वेळींच घेतली पाहिजे. ह्यासाठी सिमल्यास चाललेल्या अत्यंत महत्वाच्या राजकीय वाटाघाटींकडे लोकांचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे.

### कालेज सेल्स असोसिएशन

मुंबई येथील वरील फर्मला ३,००,००० रुपयांचें भांडवल विकून लिमिटेड कंपनी काढण्याची सरकारी परवानगी नुकतीच मिळाली आहे, असें समजतें.

### २½% १९५० कर्ज

२० कोटि रुपयांचें १९५० चें २½%चें कर्ज विक्रीस काढण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. ता. १६ रोजींच फक्त त्याची विक्री केली जाईल.

### बंगालच्या दुःस्थितीचें गव्हर्नरकृत वर्णन

बंगाल प्रांताचे गव्हर्नर, मि. केसी, ह्यांनीं कलकत्ता येथील आपल्या नभोवाणीवरील भाषणांत आपल्या अधिकाराखालील प्रांताच्या आजच्या परिस्थितीचें वर्णन केलें, त्यावरून बंगालच्या दुःस्थितीचा विषय लोकांच्या नजरेंत पूर्वी इतका आतां प्रामुख्यानें नसला, तरी त्याची गंभीरतां कायम आहे, असें आढळून येतें. युद्धामुळें ब्रह्मी तांदुळाचा पुरवठा बंद पडल्या कारणानें, तांदुळाचा दुष्काळ पडला व मोठ्या प्रमाणावर प्राणहानी झाली, त्याची पुनरावृत्ति होणार नाहीं असा विश्वास त्यांनी प्रगट केला. काळजीपूर्वक व्यवस्था करून बंगालनें ७,५०,००० टन तांदुळाचा साठा निर्माण केला आहे, त्यापैकीं १,००,००० टन तांदूळ हिंदुस्थान सरकारास मुख्यतः सिलोनकडे पाठविण्याकरिता उपलब्ध करून देण्यांत येणार असल्याचें त्यांनीं सांगितलें. बंगालमधील दुःस्थितीची तीव्रता गेले नऊ महिने कमी होत चालली आहे व गेल्या १८ महिन्यांतील कोणत्याहि वेळेपेक्षां आजची दुःस्थिति अधिक सह्य आहे, असा त्यांनीं खुलासा केला. दुधाच्या पुरवठ्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले: "दूध अपुरें व महाग असून, तें अत्यंत कनिष्ठ दर्जाचें आहे. कित्येक अर्भकें व बाळंत स्त्रिया यांस जरूरीपेक्षा किती तरी कमी दूध वाट्यास येतें व त्यांस मिळतें तेंहि भेसळच असतें. युद्धपरिस्थितीमुळें, दुभतीं जनावरें आणणेंहि शक्य नाहीं." दुधाचा पुरवठा वाढविण्यासाठी सरकारनें दीर्घकालीन योजना आखल्या असल्या तरी त्यांचा आजची परिस्थिति सुधारण्यास उपयोग होण्याजोगा नाहीं. उन्हाळ्याच्या प्रारंभीं कलकत्ता शहरांत कॉलऱ्याची जोराची साथ पसरली होती, ती आटोक्यांत आणण्यांत आली गेली व प्रांतांत इतर ठिकाणीं कॉलऱ्याचा उपद्रव नेहमींपेक्षाहि कमी होता. तथापि, मलेरियाचा उपद्रव अद्यापहि मोठ्या प्रमाणावर टिकाव धरून असल्याकारणानें मामुली मृत्युसंख्येपेक्षा सध्याची मृत्युसंख्या पुष्कळच अधिक आहे. मलेरियाप्रतिबंधक औषधें पुरविण्याचें व वाटण्याचें काम पद्धतशीर मार्गावर आणण्यांत आलें असल्याचें मि. केसी ह्यांनीं सांगितलें. बंगालमधील दुष्काळाचे परिणाम अद्याप किती तीव्रतेनें तेथील जनतेस जाचक होत आहेत आणि त्यामुळें आगामी पिढ्यांचे आरोग्यावर व कर्तृत्व-शक्तीवर कसा ताण पडणार आहे, ह्याची कल्पना वरील शब्द-चित्रावरून येईल.


---


## APPLICATIONS

are invited for the post of a Manager of the Central Co-operative Bank Limited, Ichalkaranji. B. Com. or those having previous experience in Banking should apply. One having experience in Co-operative Banking will be given preference. Working capital of the Bank is about seven lacks. Quarters will be provided free. Application should reach the undersigned on or before 23rd July, 1945, stating qualifications, caste and minimum salary expected.

Ichalkaranji, 5th July, 1945.

G. R. CHAVAN,
CHAIRMAN.




फौंटनपेनकरतां
कॅमल इंक
सर्व
पसंत करतात.
दांडेकर आणि
कंपनी, मुंबई

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—:शाखा:—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा
(४) बेलापूर. पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

पकूण खेळतें भांडवल : ३५,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातात:—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षीं कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.
—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

नोगीचे
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

## स्फुट विचार

### ब्रिटिश मालाची निर्गत वाढवण्याचा प्रयत्न

स्वतःची आर्थिक घटना स्थिर व भक्कम पायावर उभी करण्याच्या हेतूनें इंग्लंड आपला निर्गत व्यापार वाढवण्याच्या प्रयत्नांत आहे. ब्रिटिश माल बाहेरच्या देशांत खपेल त्या मानानें इंग्लंडला खाद्य पदार्थ व जरूरीचा कच्चा माल आयात करून स्वतःचा चरितार्थ चालवतां येणें शक्य आहे. परदेशांचें झालेलें युद्धकालीन देणें भागवण्याचाहि निर्गत व्यापाराचा विस्तार करणें हाच मार्ग इंग्लंडला मोकळा आहे. ह्या परिस्थितींत कांहीं ब्रिटिश कारखानदार स्वतःचा माल बाहेर पाठवण्याबरोबर दुसऱ्या देशांत आपले कारखाने उभारीत आहेत व कमी प्रमाणांत व अप्रत्यक्ष रीतीनें निर्गत व्यापारास सहाय्य करीत आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. नफील्ड कंपनीनें हिंदुस्थानांत मॉरिस मोटार गाड्या उभ्या करण्याची व पुढें त्या बनवण्याची व्यवस्था कांहीं हिंदी धंदेवाल्यांच्या सहकार्यानें करण्याचें ठरवलें आहे, या विषयाचें वृत्त मागेंच प्रसिद्ध झालें आहे. आतां अशी बातमी आली आहे कीं नफील्ड ऑस्ट्रेलिया प्रोप्रायटरी ह्या नांवाची सुमारें सव्वा कोटी रुपये भांडवलाची एक कंपनी ऑस्ट्रेलियांत स्थापन झाली आहे. प्रथम ती मोटारींचे सांगाडे बनवील आणि इंग्लंडमधून इंजनें व इतर सामुग्री आणवून मोटारी उभ्या करील, पण हळुहळु सबंद मोटारी ऑस्ट्रेलियांतच बनवण्याचा लॉर्ड नफील्ड ह्यांचा बेत आहे असें समजतें. ह्या कंपनीच्या स्थापनेमुळें ऑस्ट्रेलियामध्यें एरव्ही तयार ब्रिटिश मोटारी खपल्या असत्या त्या खपणार नाहींत आणि त्या मानानें ब्रिटिश निर्गत व्यापाराच्या विस्ताराविषयींचें धोरण मर्यादित होईल. पण व्यवहाराची ही प्रवृत्ति अपरिहार्य असून पुढारलेल्या देशांत आपलें भांडवल खपलें व कांहीं तज्ज्ञ माणसांस काम मिळालें असल्या विचारावर इंग्लंडला संतुष्ट रहाणें प्राप्त आहे. युरोपांतील उध्वस्त झालेले देश आणि एशिया व आफ्रिका खंडांतील मागसलेले देश ह्यांमध्यें आपला माल खपवण्याची खटपट ब्रिटिश धंदेवाले करीत आहेत तें ह्या कारणानेंच होय. आपले धंदे सुधारण्याचा व नवे धंदे स्थापण्याचा यत्न प्रत्येक देश करणारच. ह्या त्यांच्या महत्त्वकांक्षेशीं जमतें घेऊन स्वतःचा उच्च दर्जाचा आणि अत्यंत आवश्यक असाच माल इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांस परदेशांत खपवतां येईल.

### महागाई केव्हां कमी होणार ?

देशांतील महागाईस आळा केव्हां बसतो आणि धान्यवस्त्रादि जीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तू बेताच्या किंमतीनें केव्हां मिळूं लागतात असें हिंदी जनतेस झालें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. यंदा पावसाळयाचा प्रारंभ बरा झालेला आहे आणि मामुली पिकें हातीं येतील तर धान्याच्या दुर्मिळतेचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. ब्रह्मदेशांतून जपान्यांची आतां हकालपट्टी झाली असल्यानें त्या देशाचा तांदूळ पूर्वीप्रमाणें ह्या देशांत चालू वर्षी येऊं शकल्यास ह्या धान्याचें दुर्भिक्ष लोकांस विशेष जाणवत आहे त्याची तीव्रता पुष्कळ कमी होईल. दर महिन्यास एक लक्ष टन ह्या प्रमाणें सहा महिनेपर्यंत इंग्लंडमधून गहू इकडे येईल असें प्रसिद्ध झालें आहे. ही आयात अपेक्षेस धरून झाल्यास गव्हाचा पुरवठा वाढेल आणि त्या धान्याची टंचाई व महागाई भासणार नाहीं. कापडाविषयींची ओरड दूर होण्यास मात्र सामान्य जनतेच्या उपयोगाचा असा त्याचा पुरवठा गिरण्यांनी वाढवला पाहिजे आणि त्याची वांटणी नियंत्रित व पद्धतशीर रीतीनें केली जाणें अगत्याचें आहे. ह्यापेक्षा कमी महत्वाच्या पण जीवनास लागणाऱ्या अनेक वस्तू, त्यांची आयात मर्यादित झाल्याकारणानें, महागल्या आहेत, त्या स्वस्त होण्याचा एक परिणामकारक उपाय म्हटला म्हणजे, युरोपांतील युद्धाची आतां समाप्ति झाल्यानें त्या इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून आणण्याची व्यवस्था करणें हा होय. हैदरी शिष्टमंडळानें ह्यासंबंधांत मागें खटपट केली होती, (पृ.२४४ पहा) तिचा परिणाम थोड्या प्रमाणांत दिसूं लागला आहे. पण ही आयात अपेक्षित व्हावी तशी झालेली नाहीं आणि चारपाच वर्षांची लोकांची मागणी तर तुंबून राहिली आहे. ह्याकारणानें होणारा पुरवठा अपुरा ठरून किंमती युद्धाच्या पूर्वीच्या काळाचे मानानें विशेष उतरलेल्या नाहींत. मालाचा पुरवठा थोडाबहुत वाढला तरी काळया बाजाराविरूद्ध चाललेली सरकारची मोहिम अधिक परिणामकारक झाल्यावाचून किंमती खाली येण्यास त्याचें म्हणण्यासारखें सहाय होणार नाहीं.

### श्री. देसाई ह्यांचा महागाईविषयींचा खुलासा

ह्या महिन्याच्या प्रारंभापासून फौन्टनपेन्स, टेनिसचे चेंडू, सायकली, प्रसाधनाच्या वस्तू वगैरेंच्या किंमती थोड्या उतरल्या आहेत, पण हा उतार अपेक्षेपेक्षा कमी आहे ह्याचें कारण हे जिन्नस पुरवणाऱ्या देशांत त्यांच्या उत्पादनाचा खर्च अजून खाली आलेला नाहीं आणि म्हणून त्यांची येथें येऊन पडण्याची किंमत उतरलेली नाहीं हें आहे असें सिव्हिल सप्लाइजचे कंट्रोलर जनरल, श्री. देसाई ह्यांनीं नुकतेंच एका मुलाखतींत सांगितलें. ह्या संबंधांत सुधारणा लवकर घडून येण्याची आशा अर्थातच नाहीं. हैदरी शिष्ट मंडळाच्या योजनेविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, जहाजाच्या वहातुकीची टंचाई ही तिच्या परिपूर्तेच्या मार्गांतील एक मोठी अडचण आहे. तथापि, एक महिन्याच्या अवधींत ती दूर होईल असें आश्वासन त्यांनी दिलें. तसेंच, कृत्रिम रेशमाचें सूत व रेशमी पक्का माल वगैरे जिन्नस इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून यावयाचे होते, पण तेथेंच त्यांस निकडीची मागणी झाल्यानें त्यांची आयात होऊं शकली नाहीं. ह्या मालाच्या किंमती उतरण्याची आशा नाहीं हें सांगावयास नको. श्री. देसाई ह्यांच्या सांगण्यांत असेंहि आलें कीं विशिष्ट जातीची दारू थोडी स्वस्त झाली आहे आणि ऑगस्टच्या प्रारंभापासून अंगावर वापरण्याच्या घड्याळांच्या किंमतीहि उतरणार आहेत. कच्चें रेशमी सूतहि बरेच स्वस्तावलें आहे आणि ह्यापुढें त्या कारणानें पक्क्या रेशमी मालाचे भावहि खाली येतील. युद्धामुळें उध्वस्त झालेल्या देशांतील लोकांस धान्यवस्त्राचा पुरवठा करून मदत देण्याच्या हेतूनें एक जागतिक व्यवस्था करण्यांत आली आहे. तिचे प्रतिनिधी हिंदुस्थानांत लवकरच येणार असल्याचें समजतें. तिच्या खर्चासाठीं ह्या देशानें आठ कोटि रुपये देण्याचे ठरवलेंच आहे. धान्यवस्त्र वगैरे जरुरीच्या जिनसांचा तुटवडा येथेंच असल्यानें त्यांच्या स्वरूपांत हिंदुस्थान मदत करूं शकणार नाहीं हें उघड आहे. तथापि, तागाचें कापड, चहा इत्यादि येथें फाजील असलेल्या जिनसांचे रूपांत ह्या देशाची वर्गणीची रकम पुरी करतां आली तर पहाण्यासारखें आहे. ह्या मार्गानें हिंदी मालाची निर्गत होऊन युद्ध-पीडित देशांस हवें आहे तें सहाय हिंदुस्थानास सोयीस्कर रीतीनें देतां येईल.

# नव्या बँकांचे ताळेबंद

## भ्रामक नफ्यांतून डिव्हिडंडची वाटणी

वरील विषयावर मुंबईच्या सारस्वत को. बँकेचे सेक्रेटरी, श्री. एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम, ह्यांनीं आपल्या एका इंग्रजी लेखांत व्यक्त केलेले विचार खाली दिले आहेत. नव्या बँकांच्या हिशेबांतून दिसून येणारे कांहीं आकडे भ्रामक असतात व ते वगळले तर त्यांना इतका नफा दाखवितां येणार नाहीं व भ्रामक नफ्यांतून डिव्हिडंड म्हणून वाटणें योग्य नाहीं, असा त्यांचा युक्तिवाद आहे. ताळेबंदांतील जिंदगीकडील कांहीं बाबींना जिंदगी म्हणणेंच चुकीचें आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. त्यापैकीं स्टेशनरीचा साठा ही बाब जिंदगी म्हणून दाखविण्यास हरकत असूं नये, असें बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर, श्री. सी. व्ही. जोग, बी. कॉम; सी. ए. आय. बी., सी., ए. आय. आय. बी., ह्यांचें मत आहे. प्रस्तुत विषयाची चर्चा वाढविण्याचा येथें उद्देश नसून, कोणाच्याहि विचारसरणीस विरोध दर्शविण्याचाहि हेतु नाहीं, हें स्पष्ट करूनच श्री. जोग ह्यांनीं आमचे विनंतीवरून आपले विचार "अर्थ"चे वाचकांसाठी प्रसिद्धीसाठी दिले आहेत.

सं. "अर्थ"

### ताळेबंदांतील कांहीं अयोग्य बाबी : श्री. संझगिरी यांचे विचार

युद्धकाळांत स्थापन झालेल्या कांहीं बँकांचे ताळेबंद पाहून समाधान वाटत नाहीं. त्यांतील कांहीं अयोग्य बाबी, म्हणजे (१) प्राथमिक खर्च, (२) शेअर-विक्रीवरील ब्रोकरेज अथवा कमिशन आणि (३) हातीं असलेल्या स्टेशनरीचा सांठा, ह्या होत. ह्या सर्वांना जिंदगी म्हणणें चुकीचें आहे. खर्च झालेल्या त्या रकमा असून, त्यांस जिंदगी म्हणतांचें येणार नाहीं. बँकेच्या स्थापनेचे वेळीं केलेला खर्च म्हणजे "प्राथमिक खर्च" होय. हा खर्च वारंवार होणारा नसतो आणि बँकेच्या मामुली नफ्यांतून तो काढून टाकणें शक्य होईलच असें नाहीं. नफ्याच्या वार्षिक रकमेंतून सोईप्रमाणें हळुहळु तो "लिहून टाकला" जातो. बँकांच्या ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस प्राथमिक खर्च म्हणून जी रकम दिसते, ती लिहून न टाकलेली रकम होय, आणि ह्या दृष्टीनें बँकेचें भांडवल त्या प्रमाणांत मोकळें नसतें. शेअर विक्रीवरील ब्रोकरेजची रकमहि ह्याच स्वरूपाची असते. स्टेशनरी ही बाब मात्र नेहमीच्या खर्चाची असून ती जिंदगी म्हणून दाखवणें भ्रामक आहे. स्टेशनरी खर्चाची रकम तिच्या विक्रींतून उभी राहूं शकेलच असें नाहीं आणि चांगली बँक स्टेशनरीची किंमत खर्चीं घालील; नफा म्हणून समजणार नाहीं, हें उघड आहे.

प्राथमिक खर्च व शेअर कमिशन, ह्यांचा खर्च लिहून टाकण्याइतका बँकेस नफा जोपर्यंत होत नाहीं, तोपर्यंत तो जिंदगीच्या बाजूस दाखविण्यांत कांहीं चूक नाहीं. परंतु; ह्या बाबी शक्य तो लवकर लिहून टाकल्या जाणें आवश्यक आहे, कारण त्यांच्या रकमेचे प्रमाणांत भांडवलाची खरी किंमत नाहींशी झालेली असते. ताळेबंदांत जोपर्यंत ह्या बाबी दिसून येतात, तोपर्यंत बँकेनें डिव्हिडंड वाटणें (तेंहि भरमसाट दरानें) श्रेयस्कर होणार नाहीं.

हातीं असलेल्या स्टेशनरीस नफा समजणें हें तर फारच दिशाभूलक आहे. कित्येक बँकांच्या निवळ नफ्याच्या २५% ते ५०% पर्यंत ह्या स्टेशनरीची किंमत असलेली आढळते ! ह्या दिखाऊ नफ्यांचा उपभोग भागीदारांस डिव्हिडंड वाटण्याकडे करणें म्हणजे संस्थेच्या भरभक्कमपणास बाध आणण्यासारखें होत नाहीं का ?

शेअर विक्रीवरील वाढावा (प्रीमिअम) ह्या बाबीचाहि विचार करणें येथें अप्रस्तुत होणार नाहीं. भागीदारांनीं दिलेली ही जादा किंमत होय; तें भांडवल नव्हे. भांडवली रिझर्व्ह त्यास म्हणतां येईल व त्याची खरी जागा रिझर्व्ह फंडांत आहे. शेअर्सवरील वाढाव्याचा उपयोग प्राथमिक खर्च लिहून टाकण्याकडे केल्यानें बँकेचा भांडवली रिझर्व्ह उपलब्ध होऊं शकत नाहीं.

### रोख्यांच्या खरेदी-विक्रींतील तफावत

नफा तोटा खातीं (१) रोख्यांच्या खरेदी-विक्रींतील तफावत आणि (२) मालमत्तेचें भाडें अशा दोन बाबी पुष्कळ वेळां आढळतात. त्यांपैकी पहिली बाब ही खरी नफ्याची बाब म्हणतां येणार नाहीं, कारण बाजारभाव उतरले म्हणजे आतां दिसणारा नफा भ्रामक ठरून तो नाहींसा होऊन जावयाचा. खरेदी-विक्रींत होणारा नफा हा स्वतंत्रपणें बाजूस काढून गुंतवणुकींतील चढउताराची तरतूद म्हणून रिझर्व्ह राखणें हेंच योग्य. नव्या बँकांच्या निवळ नफ्यापैकी ५०% ते ६०% नफा रोख्यांच्या खरेदी-विक्रींतील नफ्याचा असून त्याचा डिव्हिडंड वांटणीकडे विनियोग केलेला आढळतो. गुंतवणुकीच्या किंमतींत होणाऱ्या घटीमुळें होणाऱ्या नुकसानींची तरतूद त्यामुळें होत नाहीं. बँकेनें रोख्यांची खरेदी-विक्री, स्वतःसाठी नफा मिळविण्याकरितां स्वतःचा धंदा म्हणून करणें हें बँकेच्या खऱ्या व्यवहारांत बसत नाहीं. त्याला सट्टेबाजीचा वास येतो, ही गोष्ट जातां जातां नमूद करावीशी वाटते. मालमत्तेचें भाडें उत्पन्न म्हणून घेण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं, परंतु बिल्डिंग खातें त्या प्रमाणांत कमी करण्यासाठीं स्वतंत्र बिल्डिंग फंड निर्माण करण्याकडे त्याचा विनियोग करणें हें अधिक श्रेयस्कर ठरेल.

### कायद्याची उपाय-योजना

नव्या बँकांच्या हिशेबांत दिसून येणारे कांहीं आकडे कसे भ्रामक असतात व ते वगळले तर बँकांचे हिशेब इतका नफा कसा दाखवूं शकणार नाहींत, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. भ्रामक नफ्यांतून खरें नाणें डिव्हिडंड म्हणून वाटलें जात आहे, हें येथें नमूद केलें पाहिजे. अशा प्रकारच्या गोष्टींस योग्य कायदे करून आळा बसविण्यांत आला पाहिजे. बँकेनें ताळेबंदांतील सर्व खोटी जिंदगी लिहून टाकल्याविना व ठराविक रिझर्व्ह फंड निर्माण केल्याविना तिला डिव्हिडंड जाहीर करतांच येऊं नये, अशी कायद्यानें तरतूद केली पाहिजे. रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधांत पुढाकार घेतला पाहिजे. युद्धसमाप्ति जवळ येत आहे अशा वेळींच योग्य ती खबरदारी घेतली जाणें जरूर आहे, नाहींतर इतिहासाची पुनरावृत्ति व्हावयाची !

—एस. व्ही. संझगिरी

### स्टेशनरीचा साठा : जिंदगीची बाब

नव्या बँकांच्या ताळेबंदांतील अयोग्य बाबी म्हणून (१) प्राथमिक खर्च (२) शेअर विक्रीवरील ब्रोकरेज अथवा कमिशन आणि (३) हातीं असलेल्या स्टेशनरीचा साठा यांचा उल्लेख श्री. एस. व्ही. संझगिरी ह्यांनीं केला आहे. यांतील पहिल्या दोन गोष्टींविषयीं सर्वांचें एकमत होईल. परंतु, हातीं असलेल्या स्टेशनरीचा साठा जिंदगी म्हणून दाखविण्यास श्री. संझगिरी यांची कां हरकत असावी हें तितकेसें समजत नाहीं. सध्याच्या कागद व स्टेशनरीच्या परिस्थितींत बँकांना आपल्याजवळ नेहमी लागणाऱ्या साठ्यापेक्षा जास्त साठा ठेवण्याची जरूरी आहे. विशेषतः लेजर-बुकें व चेक बुकें वगैरे आगाऊ छापून ठेवावीं लागतात. या खर्चाचें स्वरूप आगाऊ केलेल्या खर्चासारखें ( Advance Payments ) असतें. या दृष्टीनें पुढील वर्षी होणारा खर्च या वर्षाच्या नफ्यांतून घेऊन टाकणें योग्य होणार नाहीं. "चांगली बँक स्टेशनरीची किंमत खर्ची घालील, नफा म्हणून समजणार नाहीं" असें श्री. संझगिरी म्हणतात. परंतु त्यांचें लक्ष इंपीरिअल बँक, सेंट्रल बँक, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बरोडा यासारख्या पहिल्या प्रतीच्या बँकांच्या ताळेबंदांकडे वेधावेसें वाटतें. या बँकांच्या ताळेबंदांत जिंदगीच्या बाजूला दिसून येणारी स्टेशनरीची रक्कम लहान आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें नवीन बँकांमध्यें दि युनायटेड कमर्शिअल बँक, बँक ऑफ जयपूर, यांच्याहि ताळेबंदांत ही बाब जिंदगी म्हणून दिसून येईल. या दोन बँका अलीकडील नवीन निघालेल्या बँकांमध्यें उच्च दर्जाच्या गणल्या आहेत. ज्याप्रमाणें प्राथमिक खर्च हा अनेक वर्षांच्या नफ्यांतून खर्ची टाकावयाचा असतो त्याचप्रमाणें स्टेशनरीची किंमत दोनतीन वर्षांमध्यें खर्ची पडावयाची असते. बँका बंद करून जिंदगीची वसुली करावयाची झाल्यास स्टेशनरीच्या नांवावर दिसणारी रक्कम पूर्णपणें वसूल करतां येणार नाहीं ही गोष्ट खरी, परंतु इतका आत्यंतिक विचार आपण कां करावा हें समजत नाहीं.

शेअर विक्रीवरील वाढावा हा रिझर्व्ह म्हणून गणला काय किंवा प्राथमिक खर्च वगैरे काढून टाकण्यांत खर्च केला काय दोन्हीही सारखेंच. परंतु एका दृष्टीनें रिझर्व्ह फंडांत ही रक्कम जमा केली असतां त्यावर भागीदारांची थोडी फार तरी सत्ता असते. म्हणून रिझर्व्ह फंडांत ही रक्कम जमा करणें योग्य होईल.

—सी. व्ही. जोग.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
+ सिंप्लेक्स ५-७-४५
+ न्यू इंडिया ९-७-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. ३।७।४५ | बुधवार ४।७।४५ | गुरुवार ५।७।४५ | शुक्रवार ६।७।४५ | सोमवार ९।७।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१९५—० | २२१८-१२ | २२०८-१२ | २२०५—० | २२२७—८ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०२—८ | ४०६—८ | ४०३—८ | ४०४—८ | ४१०—८ |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १८८३-१२ | १८९५—० | १९०३-१२ | १९०८-१२ | १९१५—० |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०२—८ | ६०६—८ | ६०५—० | ६०६—० | ६०८—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५२६—० | ५३५—० | ५३४—० | ५३४—८ | ५३५—० |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३७२—० | ३७७—० | ३७५—८ | ३७६—८ | ३७८—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८५—० | २८६—० | २८५—८ | २८५—० | २९०—० |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९६—८ | २९६—८ | २९७—० | २९८—० | ३००—८ |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८६—८ | २९०—० | २७७+ | २८१—० | २८३—० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१४-० | ३-१४-६ | ३-१४-६ | ३-१४-६ | ३-१५-० |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३-१५-० | १४-१-६ | १४-०-६ | १४-०-६ | १४-३-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | २-१३-९ | २-१४-९ | २-१४-० | २-१४-० | २-१५-० |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ६९६—४ | ७००—० | ६९८-१२ | ७०२—८ | ७०२—८ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २०८—८ | २११—० | २०८—८ | २०८-१२ | २०९—० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२०—० | २२०—८ | २२०—८ | २२०—८ | २२१—० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५०७—८ | ५१५—० | ५११—४ | ५१५—० | ५१५—० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७—९ | ३७-१० | ३७—७ | ३७-१४ | ३८—३ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१-१० | १०१-११-६ | १०१-१५ | १०२—५ | १०२-१० |

सोमवार दि. ९-७-४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—८—० |
| १९५१-५४ | १०१-१०—० |
| १९५७ | १००-१०—० |
| १९६३-६५ | ९९- ३—० |
| १९६६-६८ | ९८—८—० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४७—० |
| सेंट्रल | ८४-१२ |
| इंडिया | ११३—८ |
| इंपी० | २०८०—० |
| | ५३३-१२ |
| रिझर्व्ह | १४१—० |
| युनियन | ८-१३ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १७८५—० |
| बॉम्बे ट्रॅम | १४०—८ |
| टाटा हायड्रो | २०४—८ |
| टाटा पॉवर | १८६०—० |

**सामान्य**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४०१—४ |
| बॉम्बे स्टीम | ६३६—४ |
| न्यू इंडिया | ८१—०+ |
| शिवराजपुर | ५०—० |
| टाटा केमिकल | २०—० |
| टाटा ऑईल | ७६—० |
| 'विमको' | ३२०—० |

## हैदरी मिशन : उद्देश व कार्य

( १ ) हिंदुस्थानामधील उत्पादनांतील लष्करी मागणी कमी करून तेवढा अधिक माल हिंदी जनतेला मिळावा हा पहिला उद्देश.

१९४५ चा उत्पादन कार्यक्रम सुरू झाला असल्यानें ह्या वर्षापेक्षा १९४६ मध्येंच ब्रिटिश मालाची आयात करून हिंदी नागरिकांना आराम मिळेल. शिवाय युरोपमधील व जपानशीं १९४५ मध्यें एकाच वेळीं युद्धें सुरू असल्यानें १९४५ पेक्षां १९४६ मध्येंच ब्रिटनला हिंदुस्थानांत माल पाठविणें अधिक शक्य होईल. १९४५ मध्यें आयात करावयाच्या मालाची किंमत ४ कोटि रुपये व १९४६ मध्यें आयात करावयाच्या मालाची किंमत ७० कोटि रुपये होईल.

पोलाद, चामडें, लाकूड, लोकरी माल, सीमेंट व सुती कापड, ह्यांपैकीं सर्वांत कापडाच्या आयातीचें महत्त्व जास्त आहे. ६,००० ते ८,००० लक्ष वार १९४५ मध्यें व ६,००० लक्ष वार १९४६ मध्यें लष्करी उपयोगाकरितां ब्रिटनहून कापड आणण्याची व्यवस्था झाली आहे.

( २ ) ज्या नित्योपयोगी वस्तू देशांत बनविल्या जात नाहींत किंवा बनत असून त्यांचें उत्पादन पुरेसें होत नाहीं अशा वस्तूंची आयात करावयाची हा दुसरा उद्देश.

ह्या तयार मालाकरितां १९४४ मध्यें लागलेल्या रकमेपेक्षां १९४५ मध्यें रु. १३,००,००,००० व १९४६ मध्यें रु. २४,००,००,००० जास्त रक्कम लागेल. याचा अर्थ एवढ्या रकमांनीं आयात वाढेल. मुलांचें अन्न, भाजीचें बीं, सायकली, औषधें, कागद व स्टेशनरीचा माल, शिवावयाचा कापड दोरा, शिवण्याचीं यंत्रें, सौंदर्य-वर्धनाचीं साधनें, हार्डवेअर, कांचसामान, विजेचा घरगुती माल इत्यादींचा समावेश वरील आयातींत होईल.

( ३ ) देशांत नित्योपयोगी वस्तूंच्या उत्पादनाकरितां लागणारा कच्चा व इतर माल मिळविण्याची व्यवस्था करावयाची हा तिसरा उद्देश.

या मालाकरितां १९४४ मध्यें लागलेल्या रकमेपेक्षां १९४५ मध्यें रु. १३,००,००,००० व १९४६ मध्यें रु. २४,००,००,००० जास्त रक्कम लागेल. याचा अर्थ एवढ्या रकमांनीं आयात वाढेल.—मिलस्टोअर्स, रंग, विणावयाची लोंकर, लोकरी सूत, टिनाचे पत्रे, छत्र्या व सायकलीचे भाग, औद्योगिक रसायनें इत्यादींचा समावेश त्यांत होतो.

( ४ ) युद्धकार्य किंवा नागरी अर्थव्यवस्था यांकरितां लागणारी सामुग्री व इतर माल ( ज्यांच्याकरितां सरकारच्या निरनिराळ्या खात्यांनीं मागणी केलेली आहे ) मिळवून तो तावडतोब हिंदुस्थानांत पाठविण्याची व्यवस्था करणें हा चवथा उद्देश.

माल मिळवून तो तावडतोब पाठविण्याबाबत बरेचसें यश मिळालें आहे. कोळशांच्या खाणीकरितां लागणारी यंत्रसामुग्री, वाहतुकीकरितां लागणारा स्टोअर्स, रस्ते बनविण्याचे रोलर्स, क्रेन्स, टेलिफोनचें साहित्य, शेतकीकरितां लागणारी यंत्रसामुग्री, खतें इत्यादि, येणार आहेत.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

—त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India-Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent, the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस—पुणें शहर.

एकूण खेळतें भांडवल रु. १,२५,००,०००

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल रु. ५,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या १०,००० भागांत विभागलेलें).

वरील शेअर्स ता. ६-७-४५ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या ४ शेअर्सना १ नवा शेअर याप्रमाणें रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांना तेवढ्याच वाढीनें (रु. ५/-) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५।९।१९४५ ही आहे.

सी. व्ही. जोग,
मॅनेजर.

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर. येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १८ जुलै १९४५ अंक २९

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors)


२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.




फौंटनपेनकरतां
**कॅमल इंक**
सर्व
पसंत करतात.
दांडेकर आणि
कंपनी, मुंबई २८

**नोगीचे डोंगर छाप**
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

## —त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.
भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—
तुळजाराम मोदी
मोतीचौक, सातारा.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

## विविध माहिती

### बॉंबे टॉकीज लि.

वरील कंपनीस ऑक्टोबर, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १,४६,७६१ रुपये नफा झाला. भागीदारांस प्रेफरन्स भागांवर ७% व ऑर्डिनरी भागांवर १०% कर माफ डिव्हिडंड मिळालें.

### एम. बी. बी. एस. परीक्षेच्या निकालाची अवस्था

मुंबई विश्वविद्यालयाच्या तिसऱ्या एम. बी. बी. एस. परीक्षेचे पेपर तपासण्यासाठी कलकत्ता येथें परीक्षकांकडे रेल्वेनें पाठविण्यांत आले, परंतु वहातुकीमधील अनियंत्रितपणामुळें पार्सलें बेपत्ता झालीं. विश्वविद्यालयानें आपला प्रतिनिधी कलकत्त्यास पाठवून त्यांचा शोध लावला व तीं मुंबईस परत आणलीं. अखेर मुंबई प्रांतांतील परीक्षकांकडूनच पेपर तपासून घेण्यांत आले. १ जून रोजीं प्रसिद्ध व्हावयाचा निकाल प्रथम पुढें ढकलण्यांत आला. नंतर २ जुलै ही तारीख निश्चित करण्यांत आली व त्यानंतर पुनः ७ जुलै ही तारीख कायम केली गेली.

### व्हिस्कीचा तुटवडा

ग्रेट ब्रिटनमधील व्हिस्कीचा साठा आतां फारच कमी झाला असून येतीं चार-पांच वर्षे तिचा तुटवडा कायम राहील. १९४५ सालीं व्हावयाचें व्हिस्कीचें उत्पादन युद्धपूर्वकालीन वार्षिक उत्पादनाच्या एक तृतीयांशाइतकेंहि भरणार नाहीं.

### मुख्य प्रधानांच्या विधवा पत्नीस सरकारी पेन्शन

ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रधान, मि. कर्टिन, हे नुकतेच मरण पावले. त्यांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नव्हती, ह्यासाठी त्यांच्या पत्नीला खास सरकारी पेन्शन देणारें एक बिल ऑस्ट्रेलियाच्या पार्लमेंटांत मांडण्यांत येणार आहे.

### ब्रिटिश गव्हाची हिंदुस्थानांत आयात

ब्रिटिश सरकार हिंदुस्थानाकडे येते सहा महिने दरमहा १,००,००० टन गहूं निर्गत करणार आहे. सध्याच्या जागतिक टंचाईचे वेळीं व वहातुकीची अडचण असतांहि ही मदत करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकारचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### सूर्यग्रहणाचें निरीक्षण

सोमवार, ता ९ जुलै रोजीं सूर्यग्रहण झालें, त्याच्या शास्त्रीय अभ्यासासाठी निरीक्षण करण्याकरितां रशियानें २० ठिकाणीं शास्त्रज्ञ पाठविले होते. त्यासाठी आठ महिन्यापूर्वीपासून तयारी चाललेली होती.

### स्त्रियांची दारूबाजींत प्रगति

अमेरिकेंत दारूबंदी उठविल्यापासून स्त्रियांमध्यें मदिरापान बरेंच वाढलें आहे. १९३१ मध्यें पुरुष व स्त्री दारूबाज ह्यांचें प्रमाण पांचांस एक होतें तें १९४४ सालीं दोघांस एक असें झालें. पोलिसांना ज्यांचेमध्यें मध्यस्ती करावी लागते अशांचाच समावेश वरील दारूबाजांत केलेला आहे. बाकीचे दारूबाज वेगळेच.

### हिंदुस्थानची युरोपला मदत

अमेरिकेच्या वॉर मोबिलायझेशनचे डायरेक्टर, मि. फ्रेड्रिक एम. विन्सन ह्यांनीं आपल्या अहवालांत हिंदुस्थाननें युरोपांतील आर्थिक दुःस्थिति निवारण्यासाठी केलेल्या सहायाचा उल्लेख केला आहे.

### १२२९ पोस्टमनांना पिसाळलेलीं कुत्रीं चावलीं

अमेरिकेंत पत्रें वाटणाऱ्या पोस्टमनांपैकी १२२९ पोस्टमनांना १९४४ सालीं पिसाळलेलीं कुत्रीं चावलीं.

### ग्रेट ब्रिटन इजिप्तचें कर्ज कसें फेडणार ?

ग्रेट ब्रिटन इजिप्तचें ४½ अब्ज ते ५½ अब्ज रुपये देणें लागतो. हें कर्ज फेडण्याची व्यवस्था निश्चित झालेली नाहीं, परंतु यंत्रसामुग्री व पक्का माल पाठवून ग्रेट ब्रिटन कर्ज फेडील, अशी अपेक्षा आहे. ग्रेट ब्रिटन इजिप्तकडे एक औद्योगिक व व्यापारी शिष्टमंडळ पाठवीत आहे, त्यानें इजिप्तमध्यें ब्रिटिश मालाची आयात वाढविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

### जनरल डिगॉल आणि ब्रिटिश निशाण

पॅरिस येथें मोठी परेड झाली, तीमध्यें स्पिअर्स मोबाइल हॉस्पिटल युनिटनें भाग घेतला. लेडी स्पिअर्स ह्या ब्रिटिश बाईच्या नेतृत्वाखाली वरील युनिटनें सिरिया, लिबिया, उत्तर आफ्रिका, इटली व फ्रान्स इतक्या ठिकाणीं जाऊन २१,००० फ्रेंच अधिकारी व सैनिक ह्यांची शुश्रुषा केली होती. परेडच्या वेळीं युनिटच्या मोटारींवर फ्रेंच व ब्रिटिश निशाणें फडकावण्यांत आलीं. ब्रिटिश निशाण दृष्टीस पडतांच जनरल डिगॉल संतापला. तीन दिवसांत हें हॉस्पिटल युनिट बंद केलें पाहिजे व त्यांतील ब्रिटिश लोक ग्रेटब्रिटनकडे रवाना केले पाहिजेत असा त्यानें हुकूम दिला. वरील माहिती लेडी स्पिअर्सनें स्वतः निवेदन केलें आहे.

### १९४६ फोर्ड मॉडेल मोटारींचें उत्पादन

फोर्ड कंपनीच्या १९४६ मॉडेलच्या मोटारींच्या उत्पादनास ३ जुलै, १९४५ रोजीं प्रारंभ झाला. ज्यांना मोटार मिळण्यासाठी प्राधान्य मिळालेलें नाहीं, अशांना मोटार हातीं पडण्यास दोन वर्षे तरी लागतील. १९४५ मध्यें अमेरिकेंत उत्पादन करावयाच्या २,००,००० मोटारींपैकीं ४०,००० मोटारींचें उत्पादन फोर्ड कंपनीच्या वाटणीस आलें आहे.

### ब्रह्मी तांदूळ केव्हां येणार ?

ब्रह्मदेशांतील तांदळाची हिंदुस्थानांत आयात १९४६-४७ मध्यें सुरू होईल आणि तिचे पहिले कांहीं हप्ते आसाम, बंगाल व बिहार ह्यांचे वाट्यास येतील, अशी अपेक्षा आहे. नंतर ब्रह्मी तांदूळ सर्व प्रांतांत वाटून तेथील तांदळाची किंमत उतरविण्यास मदत करण्यांत येईल.



## APPLICATIONS

are invited for the post of a Manager of the Central Co-operative Bank Limited, Ichalkaranji. B. Com. or those having previous experience in Banking should apply. One having experience in Co-operative Banking will be given preference. Working capital of the Bank is about seven lacks. Quarters will be provided free. Application should reach the undersigned on or before 23rd July, 1945, stating qualifications, caste and minimum salary expected.

Ichalkaranji, 5th July, 1945. G. R. CHAVAN, CHAIRMAN.

# अर्थ

## युद्ध जिंकलें; आतां बाजारपेठा काबीज करणार

ब्रिटिश लोकांचें जीवन निर्गत व्यापारावर मुख्यतः अवलंबून आहे, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. कच्चा माल बाहेरून आणवून पक्का माल निर्गत करावयाचा आणि त्याचे मोबदल्यांत पैसा कमवून आपला संसार सुखानें चालवावयाचा, असा ब्रिटिशांचा नित्य क्रम आहे. प्रस्तुत महायुद्ध चालू असतांनाच, ब्रिटिश निर्गत व्यापार पुढें कसा पुनः सुरू करून वाढवितां येईल ह्याचा ब्रिटिश सरकार आणि कारखानदार विचार करीत आहेत. युरोपांतील युद्ध आतां संपलें असल्याकारणानें, ह्या निकडीच्या प्रश्नास फारच महत्त्व प्राप्त झालें आहे. युद्धापूर्वीइतकीच निर्गत करून ब्रिटिशांचें केवळ भागणार नाहीं; कारण त्यांनीं परदेशांतील आपली गुंतवणूक मोडून व त्याचे पैसे करून युद्धप्रयत्नासाठी त्यांचा उपयोग केलेला आहे. ह्या गुंतवणुकीवरील डिव्हिडंड आणि व्याज ह्यांचें उत्पन्न ग्रेट ब्रिटनला ह्यापुढें मिळणार नाहीं. ब्रिटिश निर्गत व्यापाराच्या वाढीकडे तेथील सरकार अत्यंत आपुलकीनें पहात असतें आणि त्यासाठी शक्य त्या सवलती आणि सहाय देण्यास तें तत्पर असतें.

युद्धापूर्वी, १९३८ सालीं ग्रेट ब्रिटननें जेवढ्या मालाची निर्गत केली, त्याच्या दीडपट तरी निर्गत ह्यापुढें दरसाल झाली पाहिजे, असें ध्येय पुढें ठेवण्यांत आलें आहे. १९३८ सालीं ब्रिटिश निर्गतीची किंमत ४७ कोटि पौंड भरली. १९३८ च्या बाजारभावाप्रमाणें आतां ७० कोटि पौंड किंमतीच्या मालाची निर्गत करावी लागेल. १९४४ सालांतील बाजारभावाप्रमाणें, त्या निर्गतीची किंमत १२५ कोटि पौंड भरेल. निर्गतीमध्यें करावयाची वाढ १९३८ चे मानानें दीडपट असली तरी, ब्रिटिश निर्गत व्यापाराची आजची परिस्थिति लक्षांत घेतली, तर १९४४ चे मानानें पांच पट निर्गत ह्यापुढें करावयास पाहिजे, असा अर्थ होतो. कारण १९४४ सालीं १९३८ च्या मानानें फक्त ३२% च ब्रिटिश निर्गत झाली होती. गेल्या महायुद्धानंतरचा अनुभव लक्षांत घेतला असतां, निर्गतीची वाढ करणें कसें अवघड आहे, हें लक्षांत येतें. तेव्हांचे मानानें आतां अडचणी कितीतरी ज्यास्त आहेत; जगांतील सर्वच देश कारखानदारीकडे वळले आहेत आणि ग्रेट ब्रिटनचें पुढारीपण नष्ट झालेलें आहे.

खालील तक्त्यांत ग्रेट ब्रिटननें १९३८ सालीं वेगवेगळ्या प्रकारचा किती माल निर्गत केला, त्याची लक्ष पौंडांत किंमत दिलेली आहे. १९४४ सालांतील निर्गतीचेहि त्याचप्रमाणें आकडे दिले आहेत. १९३८ सालीं "१००" वजनाचा माल निर्गत झाला असें मानलें तर १९४० सालीं त्यामानानें किती वजनाचा माल निर्गत झाला, हें तक्त्यांतील तिसऱ्या स्तंभांत दाखविलें आहे. शेवटच्या स्तंभांत १९३८ मध्यें बाजारभाव "१००" असला तर त्यामानानें १९४४ सालीं बाजारभाव किती होता ह्याचे तुलनात्मक आकडे दिले आहेत.

१९३८ सालीं जेवढी निर्गत झाली, त्यामानानें १९४४ सालीं सरासरीनें फक्त ३१% च निर्गत झाली. कोळसा, लोखंड, पोलाद, कापड, वहानें ह्यांच्या निर्गतीस प्रस्तुत महायुद्धानें चांगलाच आळा घातलेला दिसतो.

### १९३८ आणि १९४४ मधील ब्रिटिश निर्गत

| | १९३८ किंमत लक्ष पौंड | १९४४ किंमत लक्ष पौंड | १९४४ वजन (१९३८ =१००) | १९४४ सरासरी किंमत (१९३८ =१००) |
|---|---|---|---|---|
| कोळसा | ३७४ | ४५ | :७ | १७८ |
| पॉटरी, कांच | ९६ | ९५ | ५५ | १८० |
| लोखंड-पोलाद | ४१६ | ८५ | १४ | १४६ |
| वीज सामान | १३६ | १२६ | ५३ | १७७ |
| यंत्रसामुग्री | ५७९ | ४१० | ४२ | १६९ |
| कपास कापड | ४९७ | ३७० | ३३ | २२९ |
| लोकरी कापड | २६८ | १५३ | ३१ | २३० |
| रसायनें | २२१ | २८१ | ८० | १६० |
| वहानें | ४४६ | ११७ | १३ | १९४ |
| | ४,७०८ | २,५८१ | ३१ | १७८ |

वरील तक्त्यांतील आकडे स्पष्ट करण्यासाठी आपण वहानांच्या निर्गतीचे आकडे तपासून पाहूं. १९३८ सालीं ग्रेट बिटननें ४४६ लक्ष पौंड किंमतीचीं वहानें निर्गत केलीं असें त्यावरून दिसून येतें. १९४४ मधील वहानांची निर्गत फक्त ११७ लक्ष पौंडांची आहे. तक्त्यांतील शेवटच्या स्तंभांतील आकड्यांकडे पाहिलें तर १९३८ चे मानानें १९४४ सालीं बाजारभाव १९४% होते असें आढळून येतें. म्हणजे, १९४४ सालीं झालेल्या निर्गतीची किंमत १९३८ चे मानानें २६% भरली, तरी सुद्धा बाजारभावांतील दुप्पट वाढ लक्षांत घेतां प्रत्यक्ष निर्गत १३% च झालेली आहे, ही गोष्ट तक्त्यांत स्पष्टपणें नजरेस येते. मोटारींच्या निर्गतीस युद्धसमाप्तीनंतर पुष्कळच वाव आहे आणि त्यास ब्रिटिश सरकार शक्य ती मदत करील हें उघड आहे. कोळशाची परिस्थिति मात्र लवकर समाधानकारक होण्याची आशा नाहीं. ग्रेट ब्रिटनमधील उत्पादन घटत चाललें असून, त्या देशासच कोळशाची आयात करावी लागणार अशीं चिन्हें दिसत आहेत. लोखंड-पोलाद, यंत्रसामुग्री, इत्यादींच्या निर्गतीबद्दल ब्रिटिशांना भीति वाटत नाहीं परंतु सुताची व कापडाची निर्गत पुनः पूर्ववत् करण्याइतकें त्यांचें उत्पादन लवकर सुरू होईल अशी त्यांना आशा बाळगतां येत नाहीं.

ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापाराशीं आपणांस काय करावयाचें आहे; त्याची निर्गत घटली म्हणून काय झालें ? असा प्रश्न उपस्थित होण्याजोगा आहे. ग्रेट ब्रिटनसारख्या मुरब्बी व्यापारी राष्ट्राकडून जागतिक बाजारपेठा काबीज करण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले जातील आणि हिंदुस्थानाची बाजारपेठ त्यांत महत्त्वाची आहे, ही गोष्ट विसरून भागणार नाहीं. त्याहि पेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे, हिंदुस्थान देश हा ब्रिटिशांचे राजकीय सत्तेखालीं असल्याकारणानें, येथील बाजारपेठेवर त्यांचा जणूं मालकी हक्क पोचतो, ही कल्पना होय. त्यांचे निर्गत व्यापार वाढविण्याचे कार्यक्रमांत हिंदुस्थानांत माल खपवण्यास प्राधान्य मिळणार हें उघड आहे. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची योग्य वाढ आणि ब्रिटिश मालाची हिंदुस्थानांत आयात ह्यांचा मेळ कसा बसेल, हा महत्त्वाचा मुद्दा येथें निर्माण होतो. ह्या दृष्टीनें ब्रिटिशांच्या निर्गत व्यापाराच्या धोरणाकडे आपण पाहिलें पाहिजे आणि हिंदुस्थान सरकार हिंदी हितसंबंधांची जोपासना करील अशी खटपट केली पाहिजे. आर्थिक व राजकीय प्रश्नांची गुंतागुंत झालेली असते, हें नेहमीं लक्षांत बाळगणें जरूर आहे.

### आयुर्विमा कंपन्यांवरील इनकम टॅक्स

( वेस्टर्न इंडिया ला. इं. कंपनीचे अध्यक्ष, डॉ. मो. ना. आगाशे, ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेंत केलेल्या भाषणांतील उतारा ).

सध्या इनकम टॅक्सच्या दरांत भरमसाट वाढ झालेली आहे. सदर वाढलेल्या दरांचा परिणाम इन्शुअरन्स कंपन्यांवर फारच झाला असतां ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारनें विमा कंपन्यांना इनकम टॅक्स व सुपर टॅक्सची एकूण कमाल मर्यादा एक रुपयाला ६३ पै प्रमाणें ठरवून दिलेली आहे. या दरानें इनकम टॅक्स भरणें इन्शुअरन्स कंपन्यांना जड जात असून सदर कमाल मर्यादा ४५ पै पर्यंत ठरविण्यांत यावी याकरतां शक्य ती खटपट असोसिएशनमार्फत झाली आहे. सध्याच्या परिस्थितींत येणाऱ्या मोठ्या विम्याच्या केसेसमध्यें सर्वच्या सर्व हप्त्याच्या रकमेवर विमेदारांना इनकम टॅक्सची माफी न मिळतां ती ठराविक मर्यादेपर्यंतच म्हणजे विम्याच्या रकमेच्या दहा टक्के होणाऱ्या हप्त्याच्या रकमेपर्यंत मिळणार आहे. तथापि या नवीन बदलामुळें खरोखरीचें विम्याचें संरक्षण मिळविण्याच्या प्रयत्नास कांहीं बाध येण्यासारखा नाहीं.

आयुर्विमा कंपनीचें उत्पन्न कर आकारणीकरितां दोन पद्धतीनें प्रथम काढण्यांत येतें. पहिली पद्धत म्हणजे मूल्यमापनाप्रमाणें येणारें सरासरी वार्षिक उत्पन्न व दुसरी पद्धत म्हणजे हप्त्याव्यतिरिक्त एकूण उत्पन्न, वजा खर्च या पद्धतीनें येणारें उत्पन्न. दुसऱ्या पद्धतींत खर्चाची कमाल मर्यादा ठरविण्यांत आलेली आहे. सदर मर्यादा वाढविण्यांत आली असून पहिल्या वर्षाच्या हप्त्यांपैकी शेकडा ८५ टक्के खर्चाऐवजीं ९० टक्के खर्चास व रिन्युअल हप्त्यांपैकी साडे आठ ऐवजी १२ टक्के खर्चास कर आकारणीकरितां परवानगी देण्यांत आली आहे. या सवलतीमुळें कर आकारणी पूर्वीपेक्षा कमी होईल असें वाटतें. तथापि इनकम टॅक्सचा वर उल्लेख केलेला दर जो सध्या जबर आहे तो कमी होणें अगदीं जरूर आहे. तसा तो व्हावा एतदर्थ लाइफ ऑफिसेस असोसिएशनमार्फत झालेले प्रयत्न फलद्रूप झाल्यास सध्या मिळत असलेल्या इन्व्हेस्टमेंटवरील व्याजांत थोडीफार सुधारणा होण्याची शक्यता आहे. परंतु सदर सुधारणा भरलेला इनकम टॅक्स परत मिळतेवेळींच दिसेल. त्यापूर्वी दिसणार नाहीं.

---

### कोशिट्यांवरील व कच्च्या रेशमावरील नियंत्रण उठणार

पॅरॅशूटच्या कापडासाठी ज्यास्तींत ज्यास्त रेशीम मिळावें ह्यासाठी रेशमाचें उत्पादन वाढविण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें आखलेली योजना जुलै १९४५ अखेर आटोपती घेण्यांत यावयाची आहे. ह्या योजनानुसार, म्हैसूर संस्थानांत व रेशीम उत्पादन करणाऱ्या इतर ठिकाणीं बरींच फिलेचर्स नव्यानें स्थापन करण्यांत आलीं होतीं. एकट्या म्हैसूर संस्थानांतच १,००० नवीं बेसिन्स वसविण्यांत आलीं होतीं. कोशिट्यांचा बाजार नियंत्रित करण्यांत आला होता व प्रत्येक पौंड रेशमाच्या उत्पादन खर्चाचा हिशेब करण्याची पद्धतिहि घालून देण्यांत आली होती. फिलेचर्सच्या मालकांना आपलें सर्व उत्पादन सरकारास विकावें लागे. ऑगस्ट, १९४५ नंतर आपलें उत्पादन बाजारांत कोठेंहि विकण्यास त्यांना आतां मोकळीक देण्यांत आली आहे. उत्पादनाच्या खर्चावर १०% नफा त्यांना घेतां येईल. बिनलष्करी बाजारपेठेंतील सर्व रेशमी मालाचें नियंत्रण सरकार करणार आहे. इतके दिवस कोशिट्यांची व फिलेचर्समध्यें तयार होणाऱ्या कच्च्या सुताची किंमत नियंत्रित केलेली होती.


# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरी:–लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती व निरा

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड,

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| अधिकृत व विक्रीस | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ३,६७,९५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ३५,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

### धी बँक ऑफ कोकण लि. मालवण, चा उद्घाटन समारंभ

वरील बँकेचा उद्घाटन समारंभ रा. ब. उमाकांत देसाई, बँकेचे चेअरमन, यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच टोपीवाला हायस्कूलच्या दिवाणखान्यांत मोठ्या थाटानें साजरा झाला. या समारंभासाठी श्रीमंत मोतीरामशेट देसाई टोपीवाले व श्री. आ. भा. पंडित हे दोघे डायरेक्टर्स मुंबईहून आले होते. समारंभाच्या वेळीं बँकेचे एक डायरेक्टर श्री. आ. भा. पंडित यांनीं सदर बँकेचें ध्येय सबंध कोकणपट्टींत ठिकठिकाणच्या व्यापारी केंद्रावर शाखा काढून कोकणांतील व्यापाराला व उद्योगधंद्याला चेतना देणें, बाहेरील बँकांच्या शाखा व ही बँक यांच्यातील फरक सांगतांना बँकेचा व्यवहार करून केवळ नफा मिळविणें हें या बँकेचें ध्येय केव्हांही रहाणार नाहीं, सामुदाईक भांडवल एकत्र करून त्याच्या जोरावर कोकणपट्टींत लहान धंद्यांना योग्य अटीवर भांडवल पुरविणें, वहातुकीच्या धंद्यांना मदत करणें वगैरेबद्दलची या बँकेविषयीं माहिती सांगितली. श्री. मोतीरामशेट देसाई यांनीं आपल्या भाषणांत या ठिकाणीं निरनिराळ्या बँका असतांना ही बँक येथें सुरू करण्याचें कारण असें कीं मालवण विषयीं आम्हांला आपलेपणा वाटतो, या बँकेमुळें चढाओढ न होतां व्यापारास मदतच होईल व सर्वांच्या सहकार्यानें कोकणचा व्यापार आपणास ऊर्जितावस्थेला नेतां येईल असें सांगितलें.

शेवटीं अध्यक्षीय भाषणांत श्री. उमाकांत देसाई यांनीं कोंकण बँकेची जरूरी, तिचें महत्त्व, व वैशिष्ट्य विशद करून सांगितलें व तेथील प्रसिद्ध व्यापारी शेख कासम अझी यांनीं सर्वत्रांचे यथोचित शब्दांत आभार मानून राष्ट्रगीत होऊन हा उद्घाटन समारंभ आटोपला.

### घडाडीनें बँकिंगच्या धंद्यांत पडलेल्या जनरल मोटर्सची अद्वितीय कामागिरी

१९३३ च्या प्रारंभीं अमेरिकेंतील डेट्रॉइट येथील प्रत्येक बँक सहा आठवडे तरी बंद होती. सर्व व्यवहार स्थगित होण्याची पाळी आली होती. तेथील जनरल मोटर्स कॉर्पोरेशनजवळ सुमारें १,९०,००,००० डॉलर्स रोख होते, तरी सुद्धां त्या कंपनीची काम चालू ठेवण्याची पंचाईत झाली. अखेर एक नवी बँक (नॅशनल बँक ऑफ डेट्रॉइट) काढण्याचें ठरलें, तिचें रीकन्स्ट्रक्शन फिनॅन्स कॉर्पोरेशननें निम्में भाग भांडवल घेतलें. व जी. एम्. कॉर्पोरेशननेंहि निम्में भाग भांडवल-घेतलें प्रत्येकानें १,२५,००,००० डॉलर्स गुंतवले. प्रत्येक भाग २५ डॉलर्सचा होता. ह्या नव्या बँकेनें डेट्रॉइट येथील आर्थिक संकट दूर करून विश्वासाचें वातावरण निर्माण केलें. नॅशनल बँकेस पहिल्याच दिवशीं १,१५,३८,३३९ डॉलर्सच्या ठेवी मिळाल्या. इतर बँकांतून पैसे काढून घेऊन घरीं साठवले होते,अशांनीं आपली पुंजी नॅशनल बँकेंत नेऊन ठेवली. १९३३ अखेर, त्या बँकेकडील ठेवींचा आकडा १८,९६,९३,०७४ डॉलर्सवर गेला. मंदीच्या काळांत जन्मास आलेल्या ह्या बँकेचें संगोपन करण्याचें काम एका निष्णात व अनुभवी बँकरकडे देण्यांत आलें होतें, तो पुढें बँकेचा चेअरमन झाला. बँकेचा व्यवहार नंतर इतका वाढला, कीं लवकरच डेट्रॉइटमधील आर्थिक व्यवहारांचें अग्रेसरत्व तिचेकडे आलें. अर्थात्, बँकिंगचा व्यवहार करणें हा जनरल मोटर्स कॉर्पोरेशनचा मुख्य उद्देश नसल्या कारणानें, एप्रिल, १९४५ मध्यें तिनें आपल्या मालकीचे ५,०९,५५० शेअर्स विक्रीस काढले. एकाच वेळीं इतके शेअर्स विक्रीस निघाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. शेअर्सला चांगली मागणी येऊन प्रत्येकी २५ डॉलर्सच्या शेअरला ४२ डॉलर्स भाव आला!

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. पुणें ४ यांजकडून )

व्याज-वजा (xd)
इंपीरियल बँक १६-७-४५
बँक ऑफ इंडिया २८-७-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १०।७।४५ | बुधवार ११।७।४५ | गुरुवार १२।७।४५ | शुक्रवार १३।७।४५ | सोमवार १६।७।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स् | ३० | २२३५—० | २२३३-१२ | २२३७—८ | २२२५—० | |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१२—८ | ४१४—० | ४१७—८ | ४१५—० | |
| २२०१; १६९५ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९१३-१२ | १९१६—४ | १९२२—८ | १९१५—० | |
| ७६५; ५३३ | १६-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०७—८ | ६१०—० | ६१५—० | ६०९—८ | |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५३७—० | ५३५—० | ५३८—० | ५३३—८ | |
| ४९८; ३६१ | ६-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३८१—८ | ३८०—० | ३८२—८ | ३८१—० | |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २९२—८ | २८८—० | २९५—० | २९५—० | |
| ३९४; २८२ | ९-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०३—८ | ३०२—८ | ३१०—८ | ३०७—० | |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८४—० | २८२—८ | २८७—८ | २८४—८ | |
| ५-१० ६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-०-० | ४-०-० | ३-१५-६ | ४-०-० | |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-४-६ | १४-४-० | १४-५-० | १४-२-६ | |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स् | १ | २-१५-० | २-१५-३ | २-१४-९ | २-१५-० | |
| १२७०; ६३० | १११-०-० | जुलै | इंदूर माळवा | १०० | ७०३-१२ | ७०३-१२ | ७०८-१२ | ६९२—८ | |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २१०-१२ | २१३—० | २१२—० | २११—८ | |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२१—० | २२१—० | २२१—० | २२०—८ | |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५२०—० | ५१७—८ | ५२०—० | ५२०—० | |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३८—२ | ३८—४ | ३७-१० | ३७—९ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२-११ | १०२-८-६ | १०२—९ | १०२-१३ | |

### सिमला परिषदेचा अयशस्वी शेवट

जपानचा पूर्ण पराभव होईतोपर्यंत त्याच्याशी जोरानें युद्ध चालू ठेवणें आणि युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेची योजनात्मक तयारी करणें ह्या दोन्ही गोष्टी निकडीच्या महत्त्वाच्या आहेत ह्या विषयीं हिंदुस्थानांतील सरकार आणि भिन्न भिन्न विचाराचे सर्व लोक ह्यांमध्यें ऐकमत्य आहे. तसेंच, हा कार्यक्रम यशस्वी होण्यास राष्ट्रीय वृत्तीचें व प्रमुख पक्षांस मान्य असलेलें मध्यवर्ती कार्यकारी मंत्रिमंडळ अधिकारारूढ असणें अगत्याचें आहे ह्यासंबंधानेंहि मतैक्य आहे. अशा स्थितींत भावी राज्यघटनेचा वादग्रस्त प्रश्न तूर्त बाजूस ठेवून युद्धकाळापुरती संयुक्त प्रतिनिधिक मंत्रिमंडळाची तरतूद केली गेल्यास चालू राज्यकारभार कार्यक्षम राहून पुढील राजकीय व आर्थिक प्रगतीस चालना मिळूं शकेल आणि ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानास स्वातंत्र्याचें अभिवचन दिलें आहे त्यास अनुसरून एक पाऊल पुढें टाकल्याचें प्रत्यक्ष कार्यहि घडून येईल ह्या भावनेनें लॉर्ड वेव्हल ह्यांनीं एक योजना तयार केली व तिला साम्राज्य सरकारची संमती घेऊन ती सिमला येथें निमंत्रित ठळक राजकीय पुढाऱ्यांचे विचारासाठी त्यांच्या परिषदेस सादर केली. मध्यवर्ती मंत्रिमंडळांत मुसलमानांस सवर्ण हिंदूंच्या इतकें प्रतिनिधित्व दिलें आणि इतर अल्पसंख्याकांचे पुढारी त्यांत सामील केले असतां ही योजना सर्वांस समाधानकारक वाटेल अशी त्यांची कल्पना होती आणि ती साधार आहे असें मानण्यास त्यांस जागा होती.

### "पुढें काय ?"

स्वतःच्या राजकीय ध्येयाच्या मार्गांतील हा एक निश्चित टप्पा आहे आणि त्याचे योगानें जनतेच्या प्रतिनिधींचे हातीं राजकीय सत्ता पूर्णपणें देण्याचें काम सुकर होण्यासारखें आहे असें पाहून काँग्रेसनें लॉर्ड वेव्हलच्या योजनेस सर्वसामान्य रीतीचा पाठिंबा दिला. परंतु आपल्या पाकिस्तानच्या ध्येयास ती प्रतिकूल आहे आणि आपल्या पक्षाचें बल खच्ची करणारी आहे असें मुस्लिम लीगनें ठरवलें आणि आपण सुचवूं तेच मुसलमान सभासद मंत्रिमंडळांत व्हाइसरॉयांनीं स्वीकारले पाहिजेत असा तिनें आग्रह धरला. लॉर्ड वेव्हल ह्यांस लीगच्या मागण्या मान्य करणें शक्य नव्हतें आणि त्यामुळें सिमला परिषद अयशस्वी झाली असें जाहीर करून तिच्या वाटाघाटींवर त्यांस पडदा पाडावा लागला. हा निकाल सर्व विचारी हिंदी लोकांस निराशाजनक वाटेल ह्यांत शंका नाहीं. राजकीय परिस्थितीचा गाडा निष्क्रियतेमध्यें रुतून पडला आहे, तो चालू करण्याच्या तात्पुरत्या स्वरूपाच्या प्रयत्नाचें देशांत चोहोंकडे स्वागत होत असतां परिषदेंतील एका गटानें तडजोडीची वृत्ति यत्किंचितहि न दाखवतां फाटेपर्यंत ताणून धरलें म्हणून एकवाक्यतेच्या अभावीं स्वतःची योजना सोडून देण्याऐवजीं व्हाइसरॉयांनीं बहुमताच्या पाठिंब्याच्या आधारानें पुढें जाण्याचा निश्चय केला असता तर तें चांगलें झालें असतें. सिमला परिषदेंत हिंदी लोकांच्या तीव्र मतभेदांचें अनिष्ट प्रदर्शन मात्र झालें आणि तिनें हिंदी राजकीय आकांक्षांच्या विरोधकांच्या हातीं एक नवीन कोलित दिलें. तडजोडीस आणि प्रगतीस अत्यंत अनुकूल अशी परिस्थिति असतांनाहि त्या दिशेनें झालेला प्रयत्न फसला आहे आणि "पुढें काय ?" हा प्रश्न पुन्हां शिल्लकच राहिला आहे.

'सासू'—
जिला पहातांच तिच्या कुटुंबांतील सर्वत्र मंडळी
थरथर कापूं लागतात
आणि जिला पूर्ण पाह्यलावर तिला पाह्यला येणारे
खूप खूष होतात अशी
लाखो लोकांची लाडकी
'सासू'
येत्या शुक्रवारीं पुण्यांत २ ठिकाणीं
पुणें २ व पुणें ४
मध्यें मुक्काम ठोकणार—पुणेंकरांच्या भेटीसाठीं

बुधवार चौकांत
रोज हजारों पुणेंकर जमतात
आणि 'पॅरामाउण्ट' मध्यें शिरतात
सहकुटुंब सहपरिवार
'मेहबूब' चित्र
'हुमायूं'
पहाण्यासाठीं !
रोज ३।, ६॥ व १० वाजतां
सकाळीं १० ते ११॥ जागा रिझर्व्ह करूनच !

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## स्फुट विचार

### बडया तीन राष्ट्रांच्या नेत्यांची बैठक

जर्मनींत मि. चर्चिल, मार्शल स्टालिन आणि प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांची एकत्र बैठकींत चर्चा होण्याचें अगत्य आज कित्येक आठवडे भासत आहे. युरोपांत युद्ध चालू असतांना लष्करी हालचाली एकमतानें निश्चित करून त्यासंबंधांत कार्यक्रम आखणें व तो पार पाडण्याची व्यवस्था करणें ह्यासाठीं अशा प्रकारच्या बैठकी ह्यापूर्वी झालेल्या आहेत. लष्करी मोहिमांपेक्षाहि युद्धसमाप्तीनंतर निरवानिरवीचे प्रश्न अधिक अवघड ठरणार ह्याची कल्पना मित्र-राष्ट्रांच्या मुत्सद्यांना प्रथमपासून होती. युद्ध जिंकण्यापेक्षा त्याच्या नंतरची शांतता जिंकणें अधिक कठिण आहे असे उद्गार मागेंच काढण्यांत आलेले असून युद्धोत्तर व्यवस्था लावावयाचें कार्य परराष्ट्रीय मंत्री आणि वकील ह्यांच्या परस्पर वाटाघाटींवर विसंबून न ठेवतां तें इंग्लंड, रशिया व अमेरिका ह्यांच्या राष्ट्रपतींनीं स्वतः आपल्या हातीं घेण्याची आवश्यकता ह्या प्रकरणांतील पूर्वपरंपरेस धरून होती. शिवाय, एका बाजूस रशिया व दुसऱ्या बाजूस इंग्लंड व अमेरिका ह्यांचे मध्यें मतभेद व गैरसमज अलीकडे उत्पन्न झाले आहेत आणि त्यांचें निराकरण तीन राष्ट्रपतींनीं मनमोकळेपणानें चर्चा करून घडवून आणणें आवश्यक झालें आहे. जर्मनीची राजकीय व आर्थिक घडी कशी बसवावयाची आणि त्या व्यवस्थेंत एकसूत्रीपणा कसा आणावयाचा हा निकडीचा चर्चेचा विषय आहे. स्वतःच्या वर्चस्वाखालीं असलेल्या जर्मन प्रदेशांत रशिया आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं भिन्न भिन्न धोरणें अंमलांत आणल्यास गोंधळ माजल्यावांचून राहणार नाहीं. रशियाच्या लगत असलेल्या लहान राष्ट्रांत स्टालिननें स्वतःचें वजन प्रस्थापित केलें असून युरोप खंडाची पूर्व व पश्चिम विभागांची एक प्रकारची राजकीय वर्चस्वाची वाटणी होऊं पहात आहे. तुर्कस्थान, भूमध्य समुद्र व इराण ह्यांचे बाजूस रशिया हातपाय पसरणार अशी भीति इंग्लंडला वाटूं लागली आहे, आणि स्वतःच्या साम्राज्याच्या हितांचें रक्षण करण्याची आवश्यकता ब्रिटिश मुत्सद्यांस तीव्रतेनें भासत आहे. जागतिक शांततेच्या प्रस्थापनेचें कुंपण बांधणाऱ्या प्रमुख राष्ट्रनेत्यांस सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेंत मान्य झालेल्या सनदेस मूर्त स्वरूप देतां येण्यास त्यांचेमध्यें अगोदर एकवाक्यता झाली पाहिजे आणि ती घडवून आणणें हें जर्मनींत पोस्टडॅम येथें होणाऱ्या वाटाघाटींचें उद्दिष्ट आहे. ह्या चर्चेच्या फलनिष्पत्तीवर जागतिक शांततेचें भवितव्य अवलंबून रहाणार आहे.

### उपयुक्तताप्रधान कापडाची योजना

गोरगरीबांची व मध्यम स्थितींतल्या जनतेची गरज भागणें अत्यंत कठिण झालें आहे आणि धोतरें, साड्या वगैरे प्रकारांच्या मालाची दुर्मिळता व महागाई लोकांस विशेष जाणवत आहे. सामान्य स्थितींतल्या जनतेस कापड स्वस्त व खात्रीनें मिळावें म्हणून सरकारनें "प्रमाणित" या नांवानें ओळखलें जाणारें कापड गिरण्यांत खास काढवून त्याच्या व्यवस्थित वाटणीचीहि तजवीज केली. परंतु ह्या योजनेस यश आलें नाहीं आणि मुंबई सरकारनें आतां "उपयुक्त" कापडाची नवी व्यवस्था नुकतीच चालू केली आहे. टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष, श्री. कृष्णराज ठाकरसी, ह्यांनीं ह्या योजनेचें स्वरूप स्पष्ट करून सांगितलें आहे. प्रमाणित कापडाची व्यवस्था अयशस्वी ठरली ह्याचें कारण तीमध्यें पुरवल्या जाणाऱ्या कापडाच्या जाती अत्यंत मर्यादित होत्या हें होय. ही चूक दुरुस्त करण्यांत येऊन आतां सामान्य लोकांच्या उपयोगाच्या कापडाच्या अनेक जाती प्रांतांतल्या गिरण्यांत बनवल्या जातील आणि रेशनिंगच्या नवीन व्यवस्थेंत हेंच कापड लोकांस विकत घ्यावें लागेल. सरकारास पुरवावयाचें कापड सोडून देतां प्रांतांतील गिरण्यांनीं आपल्या उत्पादन शक्तीच्या नव्वद टक्के इतकी शक्ति ठराविक जातींचाच माल काढण्यासाठी खर्चली पाहिजे असें त्यांवर बंधन आहे. आयशी काउंट्सची कमाल मर्यादा सुताच्या तलमपणाचे संबंधांत आतां घालण्यांत आली आहे. नवीन योजना चालू झाल्यापासूनच्या थोड्या काळांतच कापडाचें उत्पादन बरेंच वाढलें असल्याची माहिती श्री. कृष्णराज ह्यांनीं दिली. "उपयुक्त" कापड हलक्या दर्जाचें आहे ह्या टीकेस उत्तर देतांना ते म्हणाले कीं, नवीन योजना चालू होण्यापूर्वी मामुली वापरांत असलेलें कापड त्यापेक्षां अधिक चांगलें नव्हतें. कापडाच्या उंची आणि अनेक जाती गिरण्यांनीं काढल्यानें सामान्य जनतेस हव्या असलेल्या कापडाचा पुरवठा मर्यादित होतो ह्या तक्रारीचें निवारण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत नवीन योजनेंत अंतर्भूत आहे.

### युद्धानें उध्वस्त झालेल्या देशांस हिंदुस्थानची मदत

जर्मनीच्या जुलुमांतून मित्र राष्ट्रांनीं जे युरोपिअन देश मुक्त केले आहेत, त्यांस अन्नाची वाण तीव्रतेनें भासणें स्वाभाविक आहे. ह्या बाबतींत त्यांस सहाय देण्याचे हेतूनें एक जागतिक संघ स्थापण्यांत आला असून त्याच्या फंडास आठ कोटि रुपये देण्याचें हिंदुस्थाननें कबूल केलें आहे. ह्या देशांत धान्यवस्त्राची टंचाई असल्यानें त्यांचे स्वरूपांत मदत त्यास करतां येणें शक्य नाहीं. तागाच्या गोणी वगैरे येथें पुरून उरणारा माल हिंदुस्थाननें पुरवावा आणि त्या रीतीनें कबूल केलेली आपली वर्गणी पुरी करावी असें आम्हीं "अर्था"च्या गेल्या अंकांत सुचवलें होतें. "यू. एन. आर. आर. ए." (युनायटेड नेशन्स रिलीफ अँड रिहॅबिलिटेशन ॲडमिनिस्ट्रेशन) ह्या वर निर्देशलेल्या जागतिक संघाचें धोरण ह्या सूचनेस सर्वस्वी अनुसरूनच आहे ही गोष्ट ह्या व्यवस्थेच्या अधिकाऱ्यानें दिल्लींत दिलेल्या आपल्या मुलाखतींत स्पष्ट केली आहे. "आम्हीं हिंदुस्थानांत तागाचे गोण विकत घेऊन ग्रीस, आल्बेनिया, झेकोस्लोव्हेकिया, पोलंड इत्यादि देशांस त्यांत दुसरीकडचें धान्य भरून पाठवण्याचें योजिलें आहे" असें ते म्हणाले. निरनिराळ्या देशांस त्यांच्या स्वतःच्या गरजा भागवून कोणता माल पुरवतां येण्यासारखा आहे हें शोधून काढून तोच घेण्याचा आपला उद्देश असून ह्या धोरणामुळें मदत देणाऱ्या देशाची कोणतीहि आर्थिक गैरसोय होणार नाहीं अशी त्या बाबतची व्यवस्था असल्याचें त्यांनीं सांगितलें. अन्नान्न दशेंत असलेल्या युद्धाच्या बळींस सहकार्याच्या जागतिक पद्धतीनें मदत देणें हा सार्वत्रिक शांतता स्थापण्याचा व्यावहारिक व परिणामकारक मार्ग आहे आणि संयुक्त राष्ट्रांच्या संयुक्त प्रयत्नांपैकीं आपल्या संघाची कामगिरी हेंच एक कार्य प्रत्यक्ष घडत आहे असे साभिमान उद्गार त्यांनीं काढले.

## " कोणत्याहि महिन्यांत विवाह करा "

### पाटगांव पीठाच्या जगद्‌गुरूंचा जाहीरनामा

" हिंदुस्थानाबाहेरून स्वदेशीं परत आलेल्या मराठा सैनिकांनीं आषाढ, श्रावण, भाद्रपद व आश्विन ह्या महिन्यांत विवाह करावेत काय ? " ह्या विषयावर पाटगांव पीठाचे श्रीमत् क्षात्र जगद्‌गुरू ( कोल्हापूर ) ह्यांचा सल्ला विचारण्यांत आला, तेव्हां त्यांनीं " वर्षाच्या कोणत्याहि महिन्यांत विवाह करण्यास हरकत नाहीं " असें आपलें मत जाहीरनामा काढून व्यक्त केलें आहे. सैनिकांनींच केवळ नव्हे, तर कोणत्याहि हिंदूनें कोणत्याहि महिन्यांत विवाह केला तरी चालेल, असें सांगतांना त्यांनीं शास्त्राधार दाखविला आहे. आपला जीव धोक्यांत घालून ज्यांनीं काटकसरीनें बचत केली, अशा मराठा सैनिकांनीं विवाह समारंभांतील अनवश्यक बाबींवर खर्च करूं नये, असेंहि त्यांनीं सुचविलें आहे.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

## नोटीस

या बँकेच्या १९४५-४६ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून, ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा-कचेरींत नोटीस बोर्डावर निवडणुकीच्या नियम नंबर ३ प्रमाणें लावली आहे. तरी निवडणुकीसाठी लायख उमेदवारांचीं नांवें, सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवारांच्या लेखी संमतीनें तारीख १० ऑगस्ट सन १९४५ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावींत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीच्या वेळांत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर, तारीख १५ जुलै १९४५ | द. दि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर पुणें सें. को. बँ. लि.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

## नोटीस

या बँकेच्या सन १९४५-४६ सालच्या हिशेबाची तपासणी करण्याकरितां ग्रेत्या वार्षिक साधारण सभेनें दोन हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागांसाठी ज्यांस उमेदवार म्हणून उभे राहावयाचे असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत तारीख ३१ जुलै सन १९४५ रोजीं दुपारीं ४ वाजण्यापूर्वी दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. उमेदवारानें अर्जात आपले संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावींत. हिशेब तपासनिसांच्या नेमणुकीसंबंधीं बँकेनें केलेले नियम तिच्या कचेरींत कामाच्या वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर ता. १५ जुलै १९४५ | द. दि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सें. को. बँ. लि.

## दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव
शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापूर
खेळतें भांडवल १५ लाखांवर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, B. A., LL. B. चेअरमन.

श्री. एल. एस. आजगांवकर, श्री. एस. के. सामंत, श्री. एन. व्ही. सामंत, श्री. पी. ए. तेंडोलकर, श्री. जी. एन. कलघटगी, श्री. डी. आय. गाडवी, श्री. आय. एम्. हुंगुरवाडी, श्री. टी. व्ही. पोरवाल, श्री. डी. आर. अनगोळकर, श्री. आर. डी. गुर्लहोसूर, श्री. जी. जी. बेलिंग.

आकर्षक दरानें मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा.

एस. एन. सामंत,
मॅनेजिंग डायरेक्टर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : ३५,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः— नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, ऑर्डेन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.
—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## महाराष्ट्रांतील औद्योगिक क्रांति

### स्टॉक एक्स्चेंजची आवश्यकता

( ले. श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., )

जॉइंट स्टॉक संस्थांचा प्रसार झाला, म्हणजे स्टॉक एक्सचेंजची आवश्यकता निर्माण होते. महाराष्ट्रांत, विशेषतः महाराष्ट्रीयांनीं काढलेल्या कंपन्या लहान आकाराच्याच आहेत. त्यांपैकीं बहुतेकांना गेलीं ४० वर्षें तेजी-मंदीच्या चक्राप्रमाणें बरे-वाईट दिवस गेले आहेत. चालू महायुद्धामुळें, महाराष्ट्रीय कंपन्यांस पुनः एकदा भरभराटीचे दिवस दिसले आहेत व महाराष्ट्रांत नव्या कंपन्यांच्या स्थापनेसहि चालना मिळाली आहे.

महाराष्ट्रानें अल्प प्रमाणावर का होईना, व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या बहुतेक शाखांत यशस्वी रीतीनें प्रवेश केला आहे. बँकिंग ( सहकारी व जॉइंट स्टॉक ), विमा ( आयुष्याचा फक्त ), हुंडी, बांधकामाचीं व रेल्वेचीं कंत्राटें, कापडाच्या गिरण्या, कातडी सामान, साखर व रासायनिक कारखाने, कांचसामान, धातूंचीं भांडीं, शेतीचीं अवजारें, हातमागावरील लुगडीं, इत्यादि लहान प्रमाणावरील विविध उपक्रम पहातां, इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या परिस्थितीची आठवण होते. कारखाना मोठा असून त्यांत शेकडो कामगार काम करीत असले व त्याच्या नफ्याची रक्कम लाखांनीं मोजली जात असेल तर त्याचे मागें बहुधा गुजराती, मारवाडी, पारशी अथवा युरोपियन ह्यांचा हात असावयाचा व त्यांत महाराष्ट्रीय लोक कारकुनी करणारे किंवा यंत्रें चालविणारे दुय्यम दर्जाचेच असावयाचे हें ठरल्यासारखेंच आहे.

महाराष्ट्रांत व त्याच्या भोंवती कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असूनहि बाहेरच्या लोकांस त्याचा फायदा मिळू दिला जात आहे. सहाजिकच महाराष्ट्रांत सुरुवातीस जे मोठे कारखाने निघाले ( कापडाच्या गिरण्या) त्यांचें भांडवल बाहेरच्या लोकांचेंच आहे. अवजारें व कांचसामान ह्यांचे बाबतींत अनुक्रमें किर्लोस्कर व ओगले आणि पैसाफंड ह्यांनीं मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचे प्रयत्न केले, परंतु चालू युद्धाच्या प्रारंभापर्यंत त्यांस विशेष यश आलें असें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्रीय कारखान्यांत ज्यांनीं आपले पैसे गुंतविले अशांना आपले शेअर्स विकून पैसे सोडवून घेण्याची पद्धतशीर सोय उपलब्ध नव्हती. कित्येक कारखान्यांचीं ह्या संबंधांत उदाहरणें देतां येतील.

जॉइंट स्टॉक कंपनींत एखाद्या उपक्रमाचें रूपांतर केलें तर त्यास स्पर्धेस तोंड देणें अवघड जातें. परंतु खासगी मालकीचा उपक्रम टिकाव धरून राहूं शकतो. हातमागाच्या धंद्याचें उदाहरण येथें देण्याजोगें आहे. समाइक भांडवलाच्या तत्त्वावर हातमागांचा कारखाना कोणी चालविला असता, तर ह्या प्रश्नावर चांगला प्रकाश पडला असता.

महाराष्ट्रीय व्यापारी व औद्योगिक उपक्रमांत किती भांडवल गुंतलेलें आहे, हें सांगणें कठीण आहे. तें तीन-चार कोटि रुपयांच्या घरांत असेल, असा अंदाज आहे. इतका पैसा कित्येक वर्षें स्थिर अडकून राहिला आहे.

ज्या कंपन्या मोठ्या व बाहेरील लोकांच्या हातांत आहेत, अशांचीं नांवें बॉंबे स्टॉक एक्सचेंजच्या यादींत आणविण्यांत आलीं आहेत. सोलापूरची लक्ष्मी, विष्णु, जुनी गिरणी, नांदेडची उस्मानशाही, बेलापूर शुगर, दौंड-बारामती व पाचोरा जामनेर रेल्वेज, शिंदा स्टीम इत्यादींचीं नांवें उदाहरणादाखल देतां येतील.

स्टॉक एक्सचेंजच्या यादींत दाखल होण्यासाठीं कंपनी कोठें काम करीत आहे, ह्या गोष्टीचें महत्त्व नाहीं. परंतु स्टॉक एक्सचेंजच्या यादींत ती दाखल झाली म्हणजे तिचें नांव पैसे गुंतविणारांचे पुढें आपोआपच राहतें.

महाराष्ट्रांतील कंपन्यांना हें भाग्य लाभलेलें नाहीं. गेल्या दहा-बारा वर्षांत कोठें आपल्याकडे नव्या कंपन्या उदयास येत असलेल्या दिसत आहेत. त्यांतहि साखर व गूळ कंपन्याच विशेष यशस्वी झाल्या आहेत. त्यांचे खालोखाल बँकिंग कंपन्या येतात. विमा कंपन्यांचा नंबर त्यांचेहि खाली लागतो. महाराष्ट्रांत वहातुकीची मोठ्या प्रमाणावर संघटना अद्याप झालेली नाहीं. ती बहुधा खासगी मालकीची आहे. मोटार युनियन्स निघाल्या आहेत त्या बहुंशीं स्पर्धा टाळण्यासाठीं आहेत.

महाराष्ट्रीय कंपन्यांत गुंतविलेलें भांडवल जरूर तेव्हां काढून दुसरीकडे कसें घालतां येईल, हा प्रश्न प्रामुख्यानें उभा राहतो. महाराष्ट्रीयांनीं उभारलेल्या आणि चालविलेल्या कंपन्यांत बाहेरच्या लोकांना पैसे गुंतविण्यास साधन कसें निर्माण होईल, ही आर्थिक प्रगतीची दृष्टीनें महत्त्वाची बाब आहे. महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं असलेल्या पुणें शहरांत खराखुरा स्टॉक एक्सचेंज स्थापन होणें हेंच त्याचें उत्तर आहे.


# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

## हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई

## खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर

—शाखा—

स्थानिकः—१ दादर, २ गिरगांव, ३ मैंड रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्ले, ७ माटुंगा.

इतरः—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध

**लायसॉफ**

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
**दि मागोरा केमिकल कं. लि.**
— हिराबाग, पुणें २ —

**१९४४ मधील प्रगति**

—तुलनात्मक आंकडे—
१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर
विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

**दि ट्रस्ट ऑफ इंडिया**
ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.
अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

**—: साठे बिस्किटें :—**
ऑरेंज व क्रूसकरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक: कै. नानासाहेब सरपोतदार
**पूना गेस्ट हाउस**
टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी
**महिंद्रकर ब्रदर्स**
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.







व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

**EVERYTHING IN RUBBER GOODS**

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd ,**
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून
अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
**महाराष्ट्र भुवन**
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व स. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

तुमच्या पैशाच्या




योग्य मोबदला

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २५ जुलै १९४५ अंक ३०

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व क्रीमक्रीम

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं· युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील·

—साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements ● Cab Tyres
- Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
- Rubber-Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd.,
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब







नोगी आणि कं. मुंबई ४

## विविध माहिती

### उच्च सहकारी शिक्षणाची शाळा

सहकाराच्या उच्च शिक्षणासाठीं मुंबई येथें प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट तिच्या जागेंत एक शाळा चालविणार आहे. ६ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर व १२ नोव्हेंबर ते ३१ मार्च अशा दोन अधिवेशनांत अभ्यासक्रम संपविण्यांत येईल. एप्रिलमध्यें सहकारी डिप्लोमा परीक्षा घेण्यांत येईल. विश्वविद्यालयाची किमान मॅट्रिक परीक्षा तरी उमेदवाराची उत्तीर्ण झालेली असली पाहिजे. प्रमुख सहकारी कार्यकर्ते व कॉलेजांतील प्राध्यापक ह्यांचीं शाळेंत व्याख्यानें होतील. फी, वेळापत्रक, इत्यादींबाबत तपशीलवार माहितीकरितां इन्स्टिट्यूटचे ऑनररी सेक्रेटरी श्री. वैकुंठराय मेहता ह्यांस ( ९, बेकहाऊस लेन, मुंबई ) लिहावें.

### नागपूर येथें स्टॉक एक्सचेंज

मुंबई, कलकत्ता, वगैरे ठिकाणच्या स्टॉक एक्सचेंजचे धर्तीवर नागपूर येथें स्टॉक एक्सचेंज स्थापन होत असून त्याच्या कामास लवकरच प्रारंभ होईल असें समजतें. अशा रीतीनें नागपूर शहरानें पुण्यावर आघाडी मारली आहे.

### खोल पाण्यांत वेल्डिंगचें काम

रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड तालुक्यामधील रामचंद्र अनंत काळे हा २१ वर्षांचा तरुण सध्या इंग्लंडमध्यें खोल पाण्यांत जाऊन वेल्डिंग करण्याचें काम शिकत आहे. त्याचें शिक्षण पुरें झालें, म्हणजे नादुरुस्त आगबोटींच्या दुरुस्तीचें काम पाण्यांत खोल जाऊन तो करूं शकेल.

### हिंदी सैनिकांची हानी

२८ फेब्रुवारी, १९४५ अखेर एकूण १,४९,२२५ हिंदी सैनिक कामास आले. १५,२९१ मरण पावले; ५०७०५ जखमी झाले; १०२७१ बेपत्ता आहेत, ५१,८०२ युद्धकैदी बनले व २१,०५६ युद्धकैदी असावेत असा अंदाज आहे. मलायामध्यें सर्वांत जास्त सैनिक गमावले. त्याचे खाली ब्रह्मदेश, इटली, उत्तर आफ्रिका हीं युद्धक्षेत्रें येतात.

### सहकारी पतपेढ्यांचें कार्य दाखविणारा बोलपट

इन्फर्मेशन फिल्म्स ऑफ इंडियानें १९४४ सालीं शेतीविषयक सात लघुपट तयार केले, ते पुष्कळच लोकप्रिय झाले. चालू वर्षीहि असेच आणखी लघुपट तयार करण्यांत येतील. सहकारी पतपेढ्यांचें कार्य व त्यांपासून होण्याजोगे फायदे ह्यांचें वर्णन करणारा एक लघुपट लवकरच बाहेर पडेल. शेतकऱ्यांचा दिनक्रम व त्याच्या अडचणी आणि त्याच्या मनरंजनाचे प्रकार वगैरे दुसऱ्या एका लघुपटांत पहावयास मिळतील.


**WANTED**

Agents to represent Sun Life Assurance Co., of Canada at Ahmednagar, Bijapur, East and West Khandesh, Nasik and Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Remuneration purely commission. Apply to :—Mr. P. V. LAD, Unit Organiser. Sun Life of Canada, Poona 2.


### कानडाच्या गव्हाची खरेदी

हिंदुस्थान सरकारनें कानडाकडून १९४५ अखेरपर्यंत दरमहा १,००,००० टन गहू आयात करण्याचें मान्य केलें आहे.


६ वा 'HOUSE-FULL' आठवडा !

एका क्रांतिकारक तरुणीची अद्भुतरम्य आणि अपूर्व प्रीति-कथा

पन्ना

दिग्दर्शक : नजम नकवी

प्रमुख भूमिका :

गीता निझामी

कुसुम देशपांडे, जयराज, डेविड वगैरे

श्रीकृष्ण-पुणें

रोज ३।, ६॥ व १० वाजतां

येत्या गणपति उत्सवांत

रोख रुपये १०० ची बक्षिसें मिळवा

— फक्त शाळेंतील मुला-मुलींसाठीं —

फडके प्रॉडक्टस् मुंबई या गृहउद्योगमंदिराचे विद्यमानें येत्या गणेशोत्सवांत मुंबई, पुणें, महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं प्रचारार्थ झंबो, जिंटो, सँडो, खाजाव या आधुनिक. पौष्टिक सात्विक आरोग्यवर्धक खाद्यपदार्थांचे प्रचारासाठीं कंपनीचे सोल अेजंट हरीभाऊ भंडारे खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, गाडीखाना पुणें यांनीं २० वर्षांचे आंतील शाळेंतील मुला-मुलींना "खाजावचें गाणें" रचून व गाऊन दाखविण्याबद्दल १०० रुपयांची रोख बक्षिसें ठेवली आहेत. तरी या गाण्याच्या चढाओढींत भाग घेणारांनीं हरीभाऊ भंडारे यांचेकडे नांवे नोंदवावीत. मेळेवाल्यांनाहि या संधीचा फायदा घेतां येईल. आतांपासून रचावयास लागा. तयारी करा. ही संधी पुन्हा येणार नाहीं.

फडके प्रॉडक्टस् मुंबई

झंबो-जिंटो-सँडो-खाजाव

सोल अेजंट– हरीभाऊ भंडारे पुणें.

एजन्सीसाठीं समक्ष भेटावें.

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## सहकारी नियोजनांत इन्स्टिट्यूटचें स्थान

हिंदुस्थानच्या आर्थिक घटनेंत उन्नतीच्या दृष्टीनें आवश्यक असलेले पुनर्रचनात्मक फेरबदल कसे घडवून आणावे ह्या विषयींच्या योजना आखल्या गेल्या आहेत आणि आखल्या जात आहेत हें आतां सर्वश्रुतच आहे. देशाच्या आर्थिक घटनेच्या अंगोपांगांचाहि विचार स्वतंत्रपणानें आणि तपशीलवार रीतीनें चालला आहे. मोठमोठाले धंदे व कारखाने ह्यांची स्थापना व विस्तार, शेतीची सुधारणा, व्यापाराची अधिक कार्यक्षम व्यवस्था इत्यादि प्रश्नांची चौकशी व चर्चा झाली आहे. मोठे भांडवलवाले व कारखानदार इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत जाऊन स्वतःच्या औद्योगीकरणाच्या योजनांस लागणारी यंत्रसामुग्री व तज्ज्ञ सल्लागार मिळवण्याच्या प्रयत्नांत आहेत. प्रांतिक सरकारांनीं त्यांच्या कक्षेंत येणाऱ्या शेती, पाणीपुरवठा, शिक्षणप्रसार, आरोग्य-सुधारणा, रस्त्यांचा विस्तार इत्यादि बाबतींतल्या युद्धोत्तर कार्यांच्या योजना आखल्या आहेत. सहकारी संघटनेचें ध्येय व पद्धति ह्यांचें वैशिष्ट्य व उपयुक्तता लक्षांत घेऊन चाळीस वर्षांमागें हिंदुस्थान सरकारनें तिचें बीजारोपण केलें आणि तिला खास उत्तेजन देण्याचें धोरण अंगिकारलें. सांपत्तिक व शैक्षणिक दृष्ट्या मागसलेला शेतकरी वर्ग स्वावलंबन व संघशक्ती ह्यांच्या सहायानें कार्यक्षम होईल आणि आधुनिक जीवन-कलहांत तग धरूं शकेल ह्या विश्वासानें सरकारनें आजवर सहकारी संस्थांस उत्तेजन व मदत हीं दिलेलीं आहेत. ह्या सरकारी प्रयत्नांस अपेक्षेप्रमाणें यश प्राप्त न होण्याचीं कारणें शोधून काढण्यांत आलीं असून सुधारणेच्या उपायांचा अवलंब केला जात आहे. युद्धोत्तर पुनर्रचनेंत सहकारी संघटनेस महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें पाहिजे ही गोष्ट सर्वमान्य झाली आहे आणि ह्या कारणानें ह्या विषयाचा विचार एका अखिल भारतीय सहकारी समितीवर सोपवण्यांत आला आहे. ही समिति आपला रिपोर्ट तयार करण्यांत गुंतली असल्यानें सहकारी संघटनेच्या लोकशाही स्वरूपाच्या विशिष्ट अंगाकडे तिचें लक्ष वेधणें अगत्याचें आहे.

युद्धोत्तर आर्थिक पुनर्रचनेच्या संबंधांत हिंदुस्थान सरकारचें म्हणून जें धोरण स्थूल मानानें प्रसिद्ध झालें आहे त्यांत सरकारी मालकीचे व त्याच्या व्यवस्थेखालील धंदे आणि फायद्याच्या इच्छेनें पैसेवाल्या व्यक्ती व त्यांचे गट ह्यांनीं चालवावयाचे धंदे असें द्विविध वर्गीकरण करण्यांत आलें आहे. परस्पर हित साधण्याच्या बुद्धीनें द्रव्यहीन लोकांनीं संघशक्तीनें चालविलेले सहकारी उद्योगधंदे ह्यांस ह्या दोन वर्गांच्या जोडीस बसवलें पाहिजे. सरकारनें स्वतःच्या हातीं घेतलेल्या धंद्यांत व्यक्तिगत नफेबाजीचा प्रश्नच उद्भवत नाहीं. व्यक्तिगत नफ्याच्या बुद्धीनें चालवल्या जाणाऱ्या अनेक स्वदेशी धंद्यांस हिंदी सरकारनें जकातीचें सहाय दिलें आहे आणि जनतेनें त्यांचेसाठी स्वार्थत्याग केलेला आहे. युद्धोत्तर औद्योगीकरणांत भांडवलवाल्या कारखानदारांस सरकारी साहाय हवें आहे, आणि तें सरकार देईल. सहकारी पद्धतीच्या संस्थांस हें सरकारी सहाय मागण्याचा व मिळण्याचा किती तरी पटींनीं अधिक हक्क आहे हें ओघानें प्राप्त होतें आणि तें आजपर्यंतच्या सरकारच्याच धोरणास धरून आहे. परंतु ह्या सहायाबरोबर सरकारी नियंत्रण आलेंच पाहिजे असें बहुतेक सरकारी अधिकाऱ्यांचें मत असतें. ह्या कारणानें हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांस इतर देशांतील तसल्या संस्थांसारखें स्वातंत्र्य नाहीं आणि त्यांस लोकशाहीची बैठक नाहीं. वास्तविक पहातां स्थानिक स्वराज्य संस्था, स्वतंत्र शिक्षण संस्था, स्वतंत्र विश्वविद्यालयें वगैरेंस सरकार ग्रँट्स देतें व धंद्यांस संरक्षण देतें. त्याप्रमाणेंच सहकारी संस्थांस सरकारचें द्रव्यसहाय मिळालें पाहिजे आणि त्यांच्या अंतर्गत व्यवस्थेची जबाबदारी त्यांचेवरच टाकली पाहिजे.

हिंदी सहकारी संघटन स्वतंत्र होऊन सर्वस्वी स्वतःच्या पायावर उभें रहाण्याची त्याची तयारी व्हावी, हा सरकारचा मूळ हेतु होता आणि सहकारी इन्स्टिट्यूटस किंवा युनिअन्स ह्यांनीं आपल्या चळवळीचें धोरण ठरवावें, तिचा प्रसार करावा आणि तिचा सगळा कारभार जबाबदार रीतीनें हाकावा अशी अपेक्षा होती. परंतु आज ह्या प्रांतिक मध्यवर्ती संस्थांस सत्ता नाहीं, त्यांचा कार्यक्रम व्यापक नाहीं आणि त्यांचें अस्तित्व अनिश्चित आहे. ह्या कारणानें हिंदी सहकारी चळवळींत लोकशाही नाहीं, स्वराज्य नाहीं, स्वावलंबन नाहीं, एकसूत्रीपणा नाहीं व जबाबदारीची भावना नाहीं. सहकारी संस्थांस सरकारी अधिकाऱ्यांच्या तंत्रानें चालावें लागतें आणि सर्व अंतिम सत्ता सहकारी खात्याच्या हातीं आहे. ह्या बाबतींत स्वतंत्र, संघटित, बलवान व पुरोगामी पाश्चात्य सहकारी चळवळीशीं मागसलेल्या हिंदी सहकारी संघटनेची तुलनाच होऊं शकत नाहीं आणि त्यांचें ध्येय पुढें ठेवून आम्हीं निघालों, पण त्याचेपासून कितीतरी अंतरावर अजून थबकून राहिलों आहों. सहकारी चळवळीचीं सगळीं सूत्रें हिंदुस्थानांत सरकारी सहकारी खात्याच्या हातांत आहेत. युद्धोत्तर पुनर्घटनेमध्यें तरी निदान ही वस्तुस्थिति इष्ट दिशेनें बदलली जाण्याची तरतूद केली जाणें अगत्याचें आहे. सहकारी नियोजन समितीनें ह्या-संबंधांत विधायक सूचना करून प्रांतिक इन्स्टिट्यूटला सहकारी चळवळीची खरीखुरी प्रातिनिधिक, लोकसत्तात्मक व कार्यक्षम संस्था बनविण्याची व्यवस्था केली पाहिजे. असें करण्यास युद्धोत्तर पुनर्घटनेच्या कार्यक्रमानें उत्कृष्ट संधी दिली आहे आणि तिचा योग्य उपयोग करून घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

### लंडनमध्यें सहकारी ग्रंथालय

लंडन को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या शिक्षण समितीनें स्वतःच्या जागेंत एक ग्रंथसंग्रह आणि वाचनालय चालू केलें आहे. सभासद आणि वाचनेच्छू लोकांस ह्या संस्थेचा फायदा घेतां येतो. सहकारी संघटनेच्या ज्ञानाचा प्रसार करणें व त्यासंबंधांत संशोधनास उत्तेजन देणें, सामाजिक महत्त्वाच्या प्रश्नांवरील पुस्तकांचा पुरवठा करणें आणि लंडनमधील सहकारी चळवळीच्या इतिहासाचीं साधनें जमवणें हे ग्रंथालयाचे उद्देश निश्चित झाले आहेत. संस्था नवीनच असल्यानें संग्रहित पुस्तकांची संख्या मर्यादित आहे. अध्यक्ष आणि चिटणीस ह्यांनीं त्याबाबतींत जनतेचें सहाय मागितलें आहे.

### अमेरिकन चित्रपट निर्मात्यांनीं दिलेला कर

अमेरिकेंतील आठ प्रमुख चित्रपट निर्मात्यांनीं १९४१ ते १९४४ ह्या चार वर्षांत सरकारास इन्कम व एक्सेस प्रॉफिट कर किती भरला ह्याचे आकडे खालीं दिले आहेत.

( लक्ष डॉलर्सचे आकडे )

| | १९४१ | १९४२ | १९४३ | १९४४ |
|---|---|---|---|---|
| कोलंबिया | .१ | १० | ३९ | ४० |
| लुईज | ३३ | ६० | १९४ | २२९ |
| मोनोग्रॅम | .२ | .५ | .६ | १.२ |
| पॅरॅमाउंट | १० | २० | १२९ | २८९ |
| आर. के. ओ. | ५ | ७ | ६० | ६० |
| ट्वेन्टिएथ सेंचरी-फॉक्स | २३ | ७८ | २६० | २५१ |
| युनिव्हर्सल | १७ | ४५ | ९९ | ८४ |
| वॉर्नर | १६ | ८३ | १३९ | १३१ |
| एकूण ( लक्ष डॉलर्स ) | १०५ | ३०३ | ९२१ | १,०८५ |

१९४१ सालीं कंपन्यांनीं आपल्या एकूण जमा रकमेच्या ४% कर दिला; १९४४ सालीं हें प्रमाण १२% पडलें. थिएटरवाल्यांनीं सिनेमा तिकिटांवर करमणुकीचा कर भरला, त्याची रकम वरील हिशेबांत घेतलेली नाहीं. जपानशीं चालू असलेलें युद्ध संपेपर्यंत कर कमी होणार नाहीं, असें प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें.

---

### ग्रेट ब्रिटन कोळसा आयात करणार काय ?

ग्रेट ब्रिटनमधील कोळशाच्या उत्पादनाचा प्रश्न दिवसानुदिवस बिकट होत चालला आहे. खाणींत उपयोगांत आणली जाणारी यंत्रसामुग्री जुनीपुराणी आहे, खाणी कामगारांचा तुटवडा आहे आणि दरमाणशीं उत्खननाचें प्रमाण कमी पडत आहे. जुन्या खाणींतूनच कोळसा काढणें सध्यां अपरिहार्य झालें आहे, आणि वयस्क कामगारांकडून काम करून घ्यावें लागत आहे. नवीन लोक कामास येत आहेत ते अत्यंत नाखुषीनेंच. ग्रेट ब्रिटनला दरसाल किमान १९½ कोटी टन कोळसा लागतो, असा गेल्या पांच वर्षांचा अनुभव आहे, परंतु १९४५ सालीं उत्पादन १७½ कोटी टनांवर जाण्याची अपेक्षा नाहीं. युद्धापूर्वीचीं दहा वर्षे पाहिलीं, तर ग्रेट ब्रिटन दरसाल ३½ कोटी टन कोळसा निर्गत करीत असे. एका वर्षी तर ५ कोटी टनांची निर्गत झाली. कोळशाच्या उत्पादनांतील वाढत्या घटीच्या प्रश्नानें आतां गंभीर स्वरूप धारण केलें असून, एक वेळ निर्गत करणाऱ्या ग्रेट ब्रिटनला कोळशाची आयात करावी लागणार कीं काय, अशी भीति पडली आहे. कोळशाच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण केल्यानें हा प्रश्न सुटेल, असें मजूर पक्षाचें म्हणणें आहे.

---

### यंत्रें जुनीं झालीं आहेत

इंग्लंडमधील पुष्कळ कारखान्यांत अजून जुन्या पद्धतीचीं यंत्रें वापरण्यांत येत आहेत. जगाच्या बाजारपेठेंत पुनः एकदां स्पर्धा करावयाची असल्यास, त्या देशास आपली यंत्र-सामुग्री बदलणें आवश्यक होईल; तसेंच हिंदुस्थानाला त्या देशाकडून उत्पादन-साधनें हवीं असलीं तरी तीं दीड-दोन वर्षे तरी मिळणें शक्य होणार नाहीं असें श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांनीं आपलें मत व्यक्त केलें आहे.


—त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—

तुळजाराम मोदी

मोतीचौक, सातारा.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS ( ABC )

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,

हिराबाग, पुणें २

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(स्थापना १९१८) टे. नं. ३१६७५

हेड ऑफिस: सब ऑफिस

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुं. ४ दादर



| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,४३,९८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. १,५३,९६० |
| ठेवी ... | ... | रु. ४८,३५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५१,९२,००० |

सभासदांना जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट अगर कॅशक्रेडिट देण्यांत येतें.

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन.

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.

## स्फुट विचार

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट


सहकारी संघटनेच्या केंद्रस्थानीं असलेल्या इन्स्टिटयूटसारख्या प्रातिनिधिक प्रांतिक संस्थांस स्वायत्ततेचें स्थान मिळून त्यांचे हातीं सबंद सहकारी चळवळीचें नेतृत्व येईल अशी व्यवस्था युद्धोत्तर योजनेंत समाविष्ट केली जाण्याची आवश्यकता आजच्या अंकांतील अग्रलेखांत आम्हीं प्रतिपादली आहे आणि सहकार नियोजन समितीनें त्यासंबंधांत योग्य सूचना कराव्या असें त्यांत म्हटलें आहे. मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटच्या त्रैमासिकाच्या ताज्या अंकांत त्याच विषयावर प्रो. काळे ह्यांनीं एक लेख लिहिला आहे आणि त्यांत युद्धोत्तर पुनर्रचनेच्या संधीचा पूर्ण फायदा घेऊन सरकारनें इन्स्टिटयूटला स्वयंपूर्ण व स्वयंशासित बनवण्याची योजना हातीं घ्यावी असें सुचवलें आहे. कांहीं वर्षीमागें ह्या दिशेनें इन्स्टिटयूटची प्रगति चालली होती आणि तिला प्रांतिक सरकारचें हार्दिक सहाय होतें. पण ह्या सरकारी धोरणांत बदल होऊन इन्स्टिटयूटचें कर्तव्यक्षेत्र मर्यादित करण्यांत आलें, त्यास देण्यांत येणारी ग्रँट कमी केली गेली आणि सहकारी संघटनांत सरकारच्या नियंत्रणाचें प्राबल्य झालें. ह्या रीतीनें आपल्या पूर्ण जबाबदारीच्या व स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे जाण्याऐवजी सहकारी चळवळ मागें हटली आहे. सरकार तिला द्रव्यसहाय देतें म्हणून सहकारी संघटनेवर त्याचें नियंत्रण असलें पाहिजे ही विचारसरणी तत्वतः व व्यवहारदृष्ट्या कशी भ्रममूलक आहे हें प्रो. काळे ह्यांनीं विशद करून सांगितलें आहे. प्रांतिक इन्स्टिटयूटच्या कार्यकारी मंडळाच्या वतीनेंहि सहकार नियोजन समितीकडे वरील भूमिकेवर आधारलेलें एक निवेदन गेलें आहे आणि त्यांत इन्स्टिटयूटची घटना व कार्यक्षेत्र ह्यांमध्यें कसा फेरबदल करणें आवश्यक आणि शक्य आहे हें दर्शवलें आहे. ह्या सूचनांचा योग्य परामर्श नियोजन समितीकडून घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

### उच्च सहकारी शिक्षणाची पुण्यांत सोय

सहकारी तत्त्व, संघटन आणि व्यवहार ह्यांचें उच्च प्रतीचें शिक्षण देणारी आणि तें शिक्षण यशस्वी रीतीनें घेणारांस अधिकृत प्रशस्तीपत्रें देणारी संस्था पुण्यासारख्या केंद्रांत पद्धतशीरपणानें चालवली जाणें अगत्याचें आहे. महाराष्ट्रांत, ह्या प्रांताच्या इतर विभागांप्रमाणें, सहकारी संस्थांची वाढ होत आहे आणि युद्धोत्तर काळांत हा विस्तार मोठ्या प्रमाणावर व्हावयाचा आहे. ह्या दृष्टीनें सहकाराचें सर्वांगीण आणि उच्च दर्जाचें शिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. असें झालें असतां होतकरू सहकारी कार्यकर्ते आणि सहकारी संस्थांत निरनिराळीं कामें करणारे व करूं इच्छिणारे ह्यांची शिक्षणाची सोय होईल. सहकारी संघटनेचीं व कार्याचीं कित्येक वैशिष्ट्यें आहेत तीं पूर्णपणें अवगत असणारे लोकच सहकारी संस्थांत कार्यक्षमपणानें व्यवस्थापक, हिशेबनीस, तपासनी इत्यादि जबाबदार अधिकाऱ्यांचीं कामें करूं शकतील. अशा प्रकारचीं लायकी स्वतःमध्यें उत्पन्न करूं इच्छिणारांसाठी प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटनें खास शाळा चालवण्याचें ठरवलें आहे आणि मुंबई शहरापुरती ह्या बाबतींतली व्यवस्था त्यानें हातीं घेतली आहे. पुणें हें शिक्षणाचें व सहकाराचें मोठें व वाढतें केंद्र आहे आणि येथेंहि अशी स्वतंत्र शाळा निघाली पाहिजे. सुदैवानें येथें बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स स्थापन झालें आहे. त्याचें सहाय शाळेस मिळेल. शिकणारांच्या सोयीसाठी दररोज संध्याकाळीं एक तास शिक्षण दिलें जाईल. ठराविक फी देऊन सुमारें तीस शिक्षणेच्छु शाळेंत दाखल होतील तर हा उपक्रम पुण्यास करतां येईल. यशस्वी शिक्षितांस इन्स्टिट्यूटचा डिप्लोमा देण्यांत यावयाचा आहे आणि त्याचा व्यावहारिक उपयोग होण्यासारखा आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. नियोजित शाळेमध्यें प्राध्यापक आणि व्यवहारज्ञ ह्यांची अध्यापनाचे कामीं योजना केली जाईल आणि तीमध्यें सहकारी संस्थांत आज कामें करणारे आणि पुढें करूं पहाणारे ह्यांस दाखल होतां येईल. अपेक्षेप्रमाणें शाळेंत येऊं इच्छिणारांची मोठी संख्या होईल तर ती पुढील महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत चालू करण्याचा इन्स्टिट्यूटचा विचार आहे. ह्या संबंधांतली अधिक माहिती संपादक, "अर्थ" ह्यांचेकडून मिळूं शकेल.

### नागरिकांस जिनसांचा पुरवठा वाढणार

ज्या हिंदी कारखान्यांचें बहुतेक सर्व उत्पादन गेलीं कांहीं वर्षे लष्करी खातेंच खरेदी करीत असे, अशांचें कांहीं उत्पादन नागरिकांच्या गरजा भागविण्यास उपलब्ध होण्यास प्रारंभ झाला आहे. येत्या सहा महिन्यांत ह्या संबंधांत प्रगति झालेली आढळेल, अशी अपेक्षा आहे. हिंदी रेशमाच्या धंद्याचें सर्व उत्पादन पॅरेशूटसाठी वापरण्यांत येत असे; आतां नागरी मागणी पुरी पाडण्यासाठी त्यास मोकळीक देण्यांत आलेली आहे. लोकरी मालाचें उत्पादन १९३९ चे मानानें आतां चौपट होत आहे. त्याच्या २५% म्हणजे १९३९ मधील उत्पादनाइतकें उत्पादन नागरिकांस मिळूं शकेल. लष्करी खात्यानें कापडाच्या आपल्या कांहीं ऑर्डरी कमी केल्या असल्याकारणानें चालू सहामाहींत २,७०० जास्त गाठी उपलब्ध होतील. त्या संयुक्त प्रांत, बंगाल आणि सिंध ह्या प्रांतांस देण्यांत येतील. सिमेंट आणि पोलाद यांचाहि पुरवठा वाढावा ह्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहे. हिंदी कारखान्यांच्या पुरवठ्यांत आयात मालाची भर पडणार आहे. ह्या सर्वांचा परिणाम बाजारांत अधिक माल येऊं लागण्यांत होणार आहे. प्रत्यक्ष नवीन पुरवठा येण्याची वाट न पाहतां, व्यापारी लोक आपले दडवून ठेवलेले साठे संपुष्टांत आणण्याच्या खटपटींत आहेत. काळ्या बाजारांतील नफ्याचें प्रमाण उतरत चाललें आहे, असें दिसतें. जीवनोपयोगी वस्तूंवरील नियंत्रण आणखी कांहीं काळ चालू रहाणें योग्यच आहे, तथापि हाताशी पैसे असूनहि कांहीं माल मिळत नाहीं अशी परिस्थिति ह्यापुढें फार दिवस टिकणार नाहीं अशीं चिन्हें आहेत.



फौंटनपेनकरतां
कॅमल इंक
सर्व
पसंत करतात.
दांडेकर आणि
कंपनी, मुंबई १८

## जागतिक सहकार समालोचन

आंतर राष्ट्रीय मजूर संघाच्या (इंटरनॅशनल लेबर ऑफिस) विद्यमानें प्रसिद्ध होणाऱ्या सहकारी माहितीपत्रकांत जगांतील निरनिराळ्या देशांत चाललेल्या सहकारी क्षेत्रांतील घडामोडींची ताजी माहिती दिलेली असते. तीपैकीं कांहीं बातमीविषयांचा त्रोटक वृत्तांत खालीं दिला आहे, तो बोधप्रद होईल:-

पश्चिम ऑस्ट्रेलिया:-खाणींच्या विभागांत कांहीं सहकारी स्टोअर्स आहेत ते वगळल्यास पश्चिम ऑस्ट्रेलियामधील सहकारी संघटन शेतीविषयक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेथें १९०६ मध्यें उत्पादक संघ स्थापन झाला आणि स्वतःच्या सभासदांचा माल विकणें आणि त्यांस खतें, यंत्रें वगैरे सामुग्री पुरवणें हे उद्देश त्यानें निश्चित केले. त्याचें रूपांतर १९१४ मध्यें वेस्ट्रेलियन फार्मर्स ह्या सहकारी संस्थेमध्यें झालें, आणि ती पश्चिम ऑस्ट्रेलियाची मध्यवर्ती संस्था बनली आहे. तिच्याच पुरस्कारानें १९२४ सालीं सहकारी संस्थांचें फेडरेशन स्थापन झालें आणि शिक्षणप्रचार, हितसंरक्षण इत्यादि सर्वांच्या उपयोगाचीं कामें त्याचेकडे सोपवण्यांत आलीं.

* * *

बेल्जमः-हा देश जर्मनांनीं व्यापल्या कारणानें तेथील सहकारी संस्थांची पीछेहाट होणें स्वाभाविक होतें. १९४३ सालीं बेल्जममध्यें ४० मालविक्रीच्या सोसायट्या जनरल को-ऑपरेटिव्ह सोसायटी ह्या त्यांच्या मध्यवर्ती संस्थेशीं संलग्न झाल्या होत्या. त्यांच्या सभासदांची एकूण संख्या तीन लक्षांचेवर होती. तिला जोडलेल्या कामकऱ्यांच्या एकवीस उत्पादन संस्थाहि अस्तित्वांत होत्या. विक्रीचें व इतर संस्थांचें जाळें सर्व बेल्जमभर पसरलेलें आहे आणि त्यांचा लक्षावधि कुटुंबांशीं आर्थिक संबंध येत आहे.

कॅनडा—कर्जाची देवघेव करणाऱ्या (क्रेडिट युनिअन्स) सोसायटयांनीं सभासदांस आजारांत औषधपाणी व शुश्रूषा ह्यांची मदत देण्याचे उद्देशानें एक नवीन संस्था स्थापन केली आहे. ऑंटारियो प्रांतांतील क्रेडिट युनिअन्सनीं प्रत्येकीं २५ सभासद ह्या नूतन संस्थेस मिळवून दिल्यास त्यांस तिच्या कार्याचा फायदा घेतां घेतो. सभासदांनीं अपेक्षित वैद्यकीय मदतीसाठी जादा वर्गणी दिली पाहिजे हें उघड आहे, पण त्यांची ही सोय सहकारी पद्धतीनें क्रेडिट युनिअन्सचे मार्फत होते हें येथें विशेष आहे.

* * *

सिलोन—युद्ध परिस्थितीमुळें महागाई माजली आणि तिला आळा घालण्यासाठी सरकारनें किंमतींचें नियंत्रण आरंभिलें. पण ह्या योगानें काळ्या बाजारास ऊत आला आणि जरूरीच्या वस्तू दुर्मिळ झाल्या. ह्यावर उपाय म्हणून सहकारी विक्रीचीं दुकानें काढण्याचें १९४२ सालच्या अखेर ठरलें आणि १९४३ च्या मध्यास कोलंबो शहरांत ह्यासंबंधांतला उपक्रम चालू करण्यांत आला. शहराचे १०५ विभाग करण्यांत आले आणि त्या प्रत्येकांत एक सहकारी मालविक्रीची सोसायटी स्थापन केली गेली. कोलंबो शहरांतले तीन-साडेतीन लाख लोक आपलीं रॅशन्स ह्या निरनिराळ्या सहकारी दुकानांतून घेत आहेत आणि स्टोअर सोसायटयांचे एकूण ६० हजार सभासद आहेत. सबंद सिलोनमध्यें एकंदर ४ ते ५ हजार भिन्न भिन्न प्रकारच्या सहकारी सोसायटया असून त्यांच्या सभासदांची संख्या ६ लक्ष आहे.

* * *

ग्रेट ब्रिटन—प्रचारात्मक आणि शैक्षणिक स्वरूपाचे चित्रपट तयार करण्याच्या हेतूनें ग्रेट ब्रिटनमध्यें एक सहकारी संघ अनुभवी निर्मात्यांनीं व छायाचित्रकारांनीं स्थापला आहे. बेकारी, विजेचें उत्पादन, स्थानिक स्वराज्य, कारखान्यांतील रात्रींचें काम, इत्यादि विषयांवर ह्या लोकांनीं पूर्वीच चित्रपट तयार केले होते. सामान्य जनतेस बोधकारक होतील असेच चित्रपट बनवणें हें संघाचें ध्येय आहे. त्याचे चिटणीस उद्गारले आहेत : "आपण सर्व लोकशाहीची भाषा बोलत आहों; सहकारी संघ काढून आम्हीं स्वतः पुरती लोकशाही चालू करीत आहों."

### मुंबई शेतकऱ्यांचा कर्जनिवारण कायदा

इंदापूर तालुक्यास सदरहु कायदा लागू होऊन ता. १।५।४५ पासून डेट्अडजस्टमेंट बोर्ड आलें आहे; सदरहु कायद्याची माहिती देणेकरितां तालुक्यांतील सर्व को. सोसायट्यांचे सेक्रेटरींचा क्लास इंदापूर तालुका पूर्वभाग को. सुपरवायझिंग युनियन लि. तर्फे ता. ५।६।४५ ते १२।६।४५ पर्यंत घेणेंत आला. एकंदर ३० सोसायट्यांचे सेक्रेटरींनीं क्लासचा फायदा घेतला. क्लासचें उद्घाटन युनियन डायरेक्टर मे. के. डी. व्यवहारे साहेब यांचे हस्तें होऊन मे. सीनियर इन्स्पेक्टर साहेब पुणें सेंट्रल को. बँक शाखा बारामती (मे. व्ही. सी. भानूसाहेब) व मे. डेट्अडजेस्टमेंट बोर्ड इंदापूर (मे. पाटणेसो) यांचीं व्याख्यानें झालीं. सहरहु वक्त्यांनीं अनुक्रमें सहकारी चळवळींतील सेक्रेटरींचा दर्जा व सदर कायद्याचा सहकारी कायद्यावर होणारा परिणाम आणि शेतकऱ्यांस कायदा समजावून सांगण्याची आवश्यकता यांची उपयुक्तता पटवून दिली. क्लासला कायदा सांगणेकरितां खात्याकडून असि. डि. को. ऑफिसर व सब. ऑडिटर यांची नेमणूक झालेली होती. सदर क्लासची देखरेख व सर्व व्यवस्था युनियन सुपरवायझर श्री. ए. डी. पाटील व पुणें सेंट्रल को. बँकेचे एजंट श्री. डी. ए. कुलकर्णी शाखा इंदापूर यांनीं पाहिली.

### कर्ज निवारण कायद्याचा प्रचार

मे. डि. को. ऑफिसर अहमदनगर मि. चौधरी यांनीं नेवासा तालुक्यांत व कुकाणे, मिरी व वडाळा मिशन येथें सभा भरवून शेतकऱ्यांना कर्ज निवारण कायद्यासंबंधीं उपयुक्त माहिती दिली, त्यांच्या शंकांचें निरसन केलें व त्यांना नेवासा येथील बोर्डाकडे मुदतींत अर्ज करण्याची विनंति केली. त्याचप्रमाणें शेवगांव तालुक्यांत एरंडगांव, बोधेगांव व वडुले येथेंहि अशाच प्रकारच्या शेतकऱ्यांच्या सभा भरविण्यांत आल्या.

### संयुक्त प्रांतांतील सहकारी बँकांचे व्याजाचे दर

संयुक्त प्रांताच्या प्रांतिक सहकारी बँकेनें रिझर्व्ह बँकेशीं बोलणीं करून, आपल्या प्रांतांतील जिल्हा बँकांना शेतकऱ्यांस कर्जे देण्यासाठी १½% दरानें तिचेकडून रकमा मिळविण्यांत यश संपादन केलें आहे. शेतकऱ्यांना व्याजाचा दर ७½% पेक्षा अधिक पडूं नये, ह्या दृष्टीनें बँकांनीं पतपेढ्यांस बेतानें व्याज आकारावें, असाहि प्रांतिक बँकेचा प्रयत्न आहे. सध्याचा दर १२½% आहे. रिझर्व्ह बँकेकडून १½% दरानें पैसे मिळाल्यावर, व्याजाचा दर आणखी उतरविणें शक्य होईल. जिल्हा सहकारी बँकांनीं चालू व सेव्हिंग्ज ठेवीहि स्वीकाराव्यात व ठेवीदारांस द्यावयाचा दर कमी करावा, असाहि प्रयत्न चालू आहे.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. मुंबई यांजकडून )

व्याज–वजा (xd)
बँक ऑफ इंडिया २८–७–४५
इंदूर माळवा २७–८–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. १७।७।४५ | बुधवार १८।७।४५ | गुरुवार १९।७।४५ | शुक्रवार २०।७।४५ | सोमवार २३।७।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स् | ३० | २२५७—८ | २२५८–१२ | २२५२—८ | २२७५—० | २२७०—० |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४२२—८ | ४२२—० | ४२१—० | ४२४—८ | ४२३—० |
| २२०१; १६९५ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९३६—४ | १९३७—८ | १९४२—८ | १९५३–१२ | १९५८–१२ |
| ७६५; ५३३ | १६–०–०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१४—० | ६१६—० | ६१४—० | ६१९—८ | ६१५—८ |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५३७—८ | ५४१—० | ५४१—८ | ५४५—० | ५४४—८ |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ३८४—० | ३८६—० | ३८४—० | ३८९—० | ३८८—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २९६—८ | २९६—० | २९६—० | २९८—० | २९८—० |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३०९—० | ३०९—० | ३०९—० | ३११—८ | ३०९—० |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८५—८ | २८९—० | २९५—८ | २९७—८ | २९६—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४–०–६ | ४–०–९ | ४–०–६ | ४–१–६ | ४–४–६ |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४–४–६ | १४–५–० | १४–४–० | १४–१२–६ | १४–११–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स् | १ | २–१५–० | २–१५–३ | २–१५–० | ३—०–६ | ३–१–३ |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७०३–१२ | ६९७—८ | ७१५—० | ७३७—८ | ७३३–१२ |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २१२—० | २१२—८ | २१०–१२ | २१२—० | २१२—० |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२२—८ | २२२—८ | २२१—० | २२४—८ | २२४—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५२५—० | ५२२—८ | ५२३–१२ | ५२५—० | ५२७—८ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७–११ | ३७—४ | ३७–१३ | ३८—१ | ३७–१५ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२–१३ | १०२–११ | १०२–११ | १०२–१० | १०२—९ |

सोमवार दि. २३–७–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२–९–० |
| १९५१–५४ | १०१–९–० |
| १९५७ | १००–९–० |
| १९६३–६५ | ९९–४–० |
| १९६६–६८ | ९९–८–० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा * | १४८–०–० |
| सेंट्रल | ८७–४–० |
| इंडिया | १९६–८–० |
| इंपी० | २१८५–०–० |
| इंपी० | ५४८-१२-० |
| रिझर्व्ह | १४२–४–० |
| यनियन | ९–६–० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८००–०–० |
| बॉम्बे ट्रॅम | १४७–०–० |
| टाटा हायड्रो | २०३–०–० |
| टाटा पॉवर | १६९०–०–० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४२८–१२ |
| बीबे स्टीम | ६३३–१२ |
| न्यू इंडिया | ८४—४ |
| शिवराजपुर | ५६—० |
| टाटा केमिकल | २०—० |
| टाटा ऑईल | ७७—४ |
| 'विमको' | ३१५—० |

* व्याज रु. २–८–० † १८–८–४५




## पन्ना

'पन्ना' चें कथानक औत्सुक्यपूर्ण तर दिग्दर्शन रंगत निर्माण करणारें, नायिकेची भूमिका प्रेक्षकांना प्रथम दर्शनींच चटका लावून अखेरपर्यंत झुलवीत ठेवणारी यामुळें गर्दीचें प्रमाण आठवड्यांच्या पटीनें वाढत राहिलें आहे. व्यवस्थित करमणूक करण्याचा गुण या चित्रपटांत पुरेपूर असल्यानें पुनः पुनः पहाण्याएवढी अवीट गोडी प्रेक्षकांत आपोआप निर्माण झाली आहे.

हण्डाभर दुधांत लहानसाच
एकच मिठाचा खडा पडला

तरी तें दूध जसें नासतें-कुचकामी ठरतें त्याचप्रमाणें सबंध कुटुम्बाच्या सुखांत त्या कुटुम्बांतील एखादी व्यक्ति कशी विष कालवू शकते तें ' आयना ' पाहून शिका !

डी. आर. डी. चित्र

# " आयना "

( म्हणजे आरसा )

अर्थात

# ' सासू '

दिग्दर्शकः—युसफ | ' हॅपि डायमंड ' प्रकाशन

रोज दोन्ही बोलपट प्रासादांत तीन खेळ:—४, ७, १० वाजतां

भूमिकाः–कौसल्या, याकूब, राजकुमारी, हुस्नबानू, गोप, मिर्झा मुशरफ, लीला, सुलोचना, त्रिलोक

—पुण्यांतील—

**डेक्कन व न्यू अपोलोमध्यें**



लाखो तरुणींचा प्यारा–तरुणींचा प्यारा–

अशोककुमारची

—पहिली ऐतिहासिक भूमिका—

पहाण्यासाठीं पुणेंकर प्रेक्षक रोज हजारोंनीं

मेहबूबचें चित्र-रत्न

संगीत : गुलाम हैदर

# ' हुमायूं '

अभिनय संगीत :

कला : पळनीटकर

'डायमंड-सिलेक्ट' प्रकाशन

वर तुटून पडतात !

( रिझर्व्हेशन : रोज सकाळीं १० ते ११ )

अशोककुमार, नर्गीस, चंद्रमोहन, वीणा, शाहनवाझ,

# तिसरा ३ रा सातवडा !

**पुणें, पॅरेमाऊंट** रोज : ३, ६॥ व १०



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता ' फार्मर बँक '

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००
भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००
खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड ” | २५ मालेगांव ” |
| ३ किर्लोस्करवाडी ” | २६ नांदगांव ” |
| ४ कोरेगांव ” | २७ घोटी ” |
| ५ इस्लामपूर ” | २८ सटाणा ” |
| ६ शिराळें ” | २९ येवलें ” |
| ७ तासगांव ” | ३० मनमाड |
| ८ वाई ” | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद ” | ३२ दोंडाईचें ” |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार ” |
| ११ कल्याण ” | ३४ साक्री ” |
| १२ पालघर ” | ३५ शहादें ” |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर ” |
| १४ अहमदनगर ( ” अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें ” |
| १५ बेलापूर रोड ” | ३८ तळोदें ” |
| १६ कोपरगांव ” | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी ” | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी ” | ४१ गोध्रा ” |
| १९ शेवगांव ” | ४२ झालोद ” |
| २० वांबोरी ” | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गाव) ” | ४४ नडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद ” |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड ” |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ मोडुडा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास, ' मोडुडा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १ ऑगस्ट १९४५ | अंक ३१

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

## डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## विविध माहिती

### तुटीच्या प्रांतांस जास्त गहूं वाटल्यास येणार

ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानाकडे कांहीं गहूं पाठविण्याचें मान्य केलें आहे व पंजाब आणि मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें ह्यांनीं जास्त गहूं देऊं केला आहे, ह्यामुळें हिंदुस्थान सरकारनें बंगाल, मुंबई, दिल्ली व मद्रास ह्या तुटीच्या प्रांतांस अनुक्रमें २,७५,०००; २,००,०००; ९५,००० व ७१,००० टन अधिक गहूं देण्याचें ठरविलें आहे.

### नव्या ऑस्टिन गाडीची किंमत ५,७५० रुपये

दहा अश्वशक्तीच्या २०० ऑस्टिन मोटारगाड्या मुंबईंत दाखल झाल्या आहेत, त्या प्रत्येकीं ५,७५० रुपयांस नागरिकांना मिळूं शकतील. मोटारीची ग्रेट ब्रिटनमधील घाऊक किंमत ३,७५७ रुपये आहे. त्यांत ३६% जकात मिळविली म्हणजे ४,९९२ रुपयांस गाडी मुंबईंत येऊन पडते. वहातूक, विमा, पॅकिंग, खोलणें, गाडी चालू करून देणें, वगैरेस ७५० रुपये खर्च येतो.

### सिरियन सरकारचा करार

सिरियाच्या सरकारनें सोकोनी ऑईल कंपनी ऑफ न्यूयॉर्क आणि स्टँडर्ड ऑईल कंपनी ह्यांचेशीं ७० वर्षें मुदतीचा एक करार करून त्यांस ट्रिपोली येथें दोन तेल काढण्याचीं केंद्रें स्थापण्यास परवानगी दिली आहे.

### रेल्वे-पार्सलावर नांवें इंग्रजींत लिहा

रेल्वे-पार्सलें भलतीकडेच पाठविलीं जातात अशा बऱ्याच तक्रारी ऐकूं येतात. तीं पाठविणारे योग्य ती दक्षता बाळगत नाहींत हेंच त्याचें बहुंशीं कारण असतें. १ ऑगस्ट, १९४५ नंतर, पार्सलावर इंग्रजी भाषेंत, ज्याचें नांवानें पार्सल पाठविलें असेल त्याचें नांव, खुणा, स्टेशनचें नांव, वगैरे नसल्यास तें स्वीकारलें जाणार नाहीं असें जी. आय. पी. रेल्वेनें जाहीर केलें आहे. कातडीं, फळें, भाज्या, तेल, तूप, लोखंडी गज, इत्यादींवरील नांवें टिकत नाहींत, म्हणून त्यांस कातड्याचें किंवा लाकडाचें लेबल लावून त्यावर नांव, पत्ता वगैरे लिहिलें पाहिजे. हे नियम नव्यानें करण्यांत येत आहेत, असें नाहीं. परंतु त्यांची अंमलबजावणी ह्यापुढें कडक रीतीनें केली जाणार आहे.

### तडजोड बोर्डाकडे करावयाच्या अर्जाची मुदत

कर्ज तडजोड बोर्डाकडे कर्जदार व सावकार ह्यांनीं बोर्ड स्थापन झाल्यापासून सहा महिन्यांचे अवधींत अर्ज केला पाहिजे, असें कायदा सांगतो. बॉम्बे ॲ. डे. रिलीफ ॲक्टाच्या ४ (१) कलमाप्रमाणें नोटफिकेशन निघाल्यापासून सहा महिने मोजावयाचे कीं ४ (२) कलमाप्रमाणें स्थानिक भाषेंत ती प्रसिद्ध झाल्यापासून तें मोजावयाचे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. ४ (१) ह्या कलमाप्रमाणें निघणाऱ्या नोटिफिकेशनेंच बोर्ड अस्तित्वांत येतें व त्या तारखेपासूनच सहा महिने मोजले पाहिजेत असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. १ मे रोजीं स्थापन झालेलीं बोर्डें ३१ ऑक्टोबरपर्यंत आलेल्या अर्जांचा विचार करतील हें त्यावरून आतां स्पष्ट होईल.

### मेलेल्यास जिवंत करण्याचे प्रयोग

विजेच्या प्रवाहामुळें मृत्यू आलेल्यास पुनः जिवंत करण्याचे प्रयोग रशियांत करण्यांत आले आहेत. मृत्यू आल्यानंतर तात्काळ २,००० ते ५,००० व्होल्ट विजेचा डोस त्यास दिल्यास, मनुष्याचा पुनः श्वासोच्छ्वास सुरू होऊं शकतो, असें आढळून आलें आहे. मुख्यतः कुत्र्यांवर प्रयोग करून हा शोध लावण्यांत आला आहे.

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मानोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

येत्या गणपति उत्सवांत
रोख रुपये १०० चीं बक्षिसें मिळवा
— फक्त शाळेंतील मुला-मुलींसाठीं —
फडके प्रॉडक्टस् मुंबई या गृहउद्योगमंदिराचे विद्यमानें येत्या गणेशोत्सवांत मुंबई, पुणें, महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं प्रचारार्थ झंबो, जिंटो, सँडो, खाजाव या आधुनिक पौष्टिक सात्त्विक आरोग्यवर्धक खाद्यपदार्थांचे प्रचारासाठीं कंपनीचे सोल अेजंट हरीभाऊ भंडारे खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, गाडीखाना पुणें यांनीं २० वर्षांचे आंतील शाळेंतील मुला-मुलींना "खाजावचें गाणें" रचून व गाऊन दाखविण्याबद्दल १०० रुपयांचीं रोख बक्षिसें ठेवलीं आहेत. तरी या गाण्याच्या चढाओढींत भाग घेणारांनीं हरीभाऊ भंडारे यांचेकडे नांवें नोंदवावींत. मेळेवाल्यांनाहि या संधीचा फायदा घेतां येईल. आतांपासून रचावयास लागा. तयारी करा. ही संधी पुन्हा येणार नाहीं.
फडके प्रॉडक्टस् मुंबई
झंबो-जिंटो-सँडो-खाजाव
सोल अेजंट—हरीभाऊ भंडारे पुणें.
एजन्सीसाठीं समक्ष भेटावें.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४४ मधील प्रगति
नव्या कामांत ७० टक्के वाढ
खर्चाचें प्रमाण फक्त १२%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## युद्धकाळांतील लिमिटेड कंपन्या

### संख्या वाढली परंतु भांडवल घटलें

#### संस्थानांकडे जाण्याची भांडवलाची प्रवृत्ति

जॉइंट स्टॉक कंपन्यांसंबंधीं तपशीलवार आकडे दरमहा हिंदुस्थान सरकार प्रसिद्ध करीत असे. डिसेंबर, १९४१ ह्यानंतर ते आकडे प्रसिद्ध झाले नव्हते. परंतु आतां मार्च, १९४४ पर्यंतचे आकडे उपलब्ध झाले आहेत व ह्यापुढें ते पूर्वीप्रमाणें दरमहा प्रसिद्ध होत जातील. तथापि, कागदाची काटकसर करण्याचे हेतूनें, पूर्वीइतका तपशील आतां देण्यांत येणार नाहीं, असें जाहीर झालें आहे. खालील तक्त्यांत ब्रिटिश हिंदुस्थान व हैद्राबाद, बडोदें, म्हैसूर, त्रावणकोर आणि कोचीन हीं संस्थानें ह्यांतील लिमिटेड कंपन्यांसंबंधीं माहिती दिली आहे.

| वर्ष | कंपन्यांची संख्या | खपलेलें भांडवल | वसूल भांडवल |
|---|---|---|---|
| | | ( लक्ष रुपयांचे आकडे ) | |
| १९३९ | ११,११४ | ३२९,१७ | २९०,३९ |
| १९४० | ११,३७२ | ३३९,८२ | ३०३,६७ |
| १९४१ | ११,६१७ | ३४१,२४ | ३०२,७७ |
| १९४२ | १२,१७६ | ३५४,११ | ३१५,४५ |
| १९४३ | १२,९९३ | ३५४,०१ | ३१३,०१ |
| १९४४ | १३,९२१ | ३५२,१४ | ३०९,०१ |

हैद्राबाद, बडोदें, म्हैसूर, त्रावणकोर आणि कोचीन ह्यांखेरीज इतर संस्थानांतहि लिमिटेड कंपन्या स्थापन झाल्या आहेत, परंतु त्यांची गणना वरील तक्त्यांत नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षां संस्थानी हद्दींत कारखाने व कंपन्या अधिक प्रमाणांत निघत आहेत आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील भांडवलाची संस्थानांकडे धाव घेण्याची प्रवृत्ति आहे, ह्या अनुभवास खालील आकड्यांवरून दुजोरा मिळेल. १९४१ ते १९४४ ह्या मुदतींत प्रत्येक वर्षी मार्च अखेर ब्रिटिश हिंदुस्थानांत व संस्थानांत किती कंपन्या चालू होत्या, हें ह्या तक्त्यांत दाखविलें आहे.

| | १९४१ | १९४२ | १९४३ | १९४४ |
|---|---|---|---|---|
| ब्रिटिश हिंदुस्थान | १०,६३७ | ११,२०८ | ११,९२३ | १२,६६० |
| संस्थानें | ९८० | ९६८ | १,०७० | १,२६१ |

ब्रिटिश हिंदुस्थानांतील कंपन्यांत १९४४ मध्यें १९४१ चे मानानें सुमारें १९% वाढ झाली; संस्थानी हद्दींतील वाढीचें प्रमाण सुमारें २९% पडलें. वरील पांचाखेरीज इतर अनेक संस्थानांत कित्येक कंपन्या निघाल्या आहेत, त्या हिशेबांत घेतल्या तर भांडवलाच्या संस्थानांकडीलें धावेची अधिक स्पष्ट कल्पना येऊं शकेल.

खालील तक्त्यांत १९४१ ते १९४४ ह्या मुदतींत नोंदण्यांत आलेल्या व लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपन्यांचे तुलनात्मक आकडे दिले आहेत. बंद पडलेल्या कंपन्यांपेक्षा नवीन निघालेल्या कंपन्यांची संख्या जास्त दिसते, परंतु कंपन्यांच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें महत्त्वाची बाब म्हणजे वसूल भांडवल. त्यासंबंधांत वाढ होण्याऐवजी घट झालेली आढळते.

| | स्थापन झालेल्या नव्या कंपन्या | बंद पडलेल्या कंपन्या |
|---|---|---|
| १९४१–४२ | ११६२ | ६०३ |
| १९४२–४३ | १३०८ | ४९१ |
| १९४३–४४ | १४१२ | ४८४ |

एकूण वसूल भांडवलांत वाढ–घट

| | वाढ | घट | निवळ वाढ |
|---|---|---|---|
| | ( आकडे लक्ष रुपयांचे ) | | |
| १९४१–४२ | १३,८४ | ११५ | +१२६९ |
| १९४२–४३ | २२ | २६६ | – २४४ |
| १९४३–४४ | २६ | ४२६ | – ४०० |

प्रत्यक्ष वसूल भांडवल किती होतें, हें खालील आकड्यांवरून दिसून येईलः—

| | कोटि रु. |
|---|---|
| १९३६–३७ | ३१२ |
| १९३७–३८ | २७९ |
| १९४१–४२ | ३१५ |
| १९४३–४४ | ३०९ |

हिंदुस्थानांतील एकूण कंपन्यांची संख्या वाढली तरी ब्रिटिश हद्दीपेक्षां संस्थानी हद्दींतच कंपन्या ज्यास्त निघाल्या असून वसूल भांडवलाचे दृष्टीनें मुळींच प्रगति झालेली नाहीं, हें वरील तपशीलवार आकड्यांवरून स्पष्ट होईल. कोणताहि मोठा आर्थिक उपक्रम आतां लिमिटेड कंपनीचें स्वरूप धारण करीत असतो, ह्या दृष्टीनें कंपन्यांच्या आंकड्यांवरून आपणांस औद्योगिक प्रगतीची कल्पना करतां येते. युद्धकाळांत औद्योगिक प्रगति झाल्यासारखी वाटते, त्यास आधार मिळत नाहीं असें लिमिटेड कंपन्यांचे आकडे सांगतात. युद्धप्रयत्नास आवश्यक अशा मालाचे प्रचंड कारखाने हिंदुस्थानांत उभारण्याची संधि गमाविली गेली आहे आणि त्याकारणानें प्राथमिक महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची स्थापना हिंदुस्थानांत होऊं शकलेली नाहीं. इतर देशांनीं ह्याच काळांत स्वतःचें मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण करून घेतलेलें आहे, त्याचा त्यांना पुढेंहि फायदा मिळत राहील हें उघड आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्यासंबंधांत अधिक प्रगतिप्रिय धोरण स्वीकारणें आवश्यक होतें, असेंच सर्वसामान्य मत आहे. संस्थानी हद्दींकडे भांडवल वाढत्या प्रमाणावर आकर्षिलें जात आहे, ही गोष्ट ह्या लेखांतील आकड्यांवरून सिद्ध होत असली, तरी संस्थानांत निघणाऱ्या कंपन्यांची संख्या हे आकडे दर्शवितात त्यापेक्षां अधिक आहे, ह्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. भोर, कुरुंदवाड, बुधगांव, वगैरे महाराष्ट्रांतील संस्थानांत निघालेल्या कंपन्या आपल्या नजरेसमोर आहेत परंतु त्यांचा समावेश सरकारी आकड्यांत झालेला नाहीं. अशाच अनेक संस्थानांत कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. ब्रिटिश हद्दीपेक्षा संस्थानी हद्द भांडवलवाले कां पसंत करतात, ह्याचीं कारणें उघडच आहेत. इन्कमटॅक्स, कामगारविषयक कायदे, इत्यादि संबंधांत संस्थानें ज्यास्त सवलती देऊं शकतात आणि त्याचा फायदा कंपन्या काढणारे घेऊं पहातात. संस्थानी सरकारांबरोबर ते दीर्घ मुदतीचे करार करून स्वतःचें स्थान सुरक्षित करून ठेवतात. संस्थानांचा आश्रय घेणाऱ्या कंपन्यांस त्यामुळें स्पर्धेमध्यें टिकाव धरण्यास सोईचें जातें. सबंद हिंदुस्थानचें एकजात औद्योगिक धोरण असण्याचें महत्त्व ह्यावरून स्पष्ट होईल.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी आघाडीचे मार्गावर

वार्षिक सभेंत अध्यक्ष, श्री. अण्णासाहेब भोपटकर, ह्यांचा आढावा

**नवें कामः**—१९४४ सालीं कंपनीनें रु. ४४,००४०६ इतकें म्हणजे कंपनीच्या आतांपर्यंतच्या इतिहासांत सर्वांत अधिक काम पूर्ण केलें आहे.

**काटकसरीचा कारभारः**—१९४२ सालीं कंपनीच्या रिन्युअंल खर्चाचें प्रमाण २२·८ टक्के होतें. १९४३ सालीं हेंच प्रमाण १९·१ टक्के असें होतें आणि १९४४ सालीं ते आतां १५·९ टक्के इतकें खालीं उतरलें आहे. खर्चात १ टक्का कमी झाला तर रु. १०,००० ची बचत होते हें लक्षांत घेतलें म्हणजे या मुद्याचें महत्त्व आपल्या लक्षांत येईल. कंपनीचे सल्लागार विमा-गणिती श्री. जी. एस. दिवाण म्हणतात, "गेल्या मूल्यमापनांत आधारभूत धरण्यांत आलेल्या तत्त्वांच्या मर्यादेत आपण काम केलेलें आहे, हें १९४४ सालीं आपणांस आलेल्या अनुभवावरून सिद्धच होत आहे."

**आयुर्विमा निधिः**—१९४३ सालअखेर कंपनीचा आयुर्विमानिधि रु. ३८,६७,६७८-६-१ होता. तो १९४४ सालअखेर रु. ४७,०५,०३५-५-११ झाला आहे. म्हणजे या निधींत रु. ८,३७,३५६-१५-१० ची नवीन भर पडली पडली आहे. हा निधि सुरक्षितपणें गुंतविण्यांत आला असून, त्या शिवाय रु. १,६१,८६५-१४-६ इतका राखीव निधि या कामासाठी निर्माण करण्याची दक्षता घेतली आहे.

**तूट भरून निघालीः**—कांटेकोर काटकसर आणि उत्पन्नाच्या नव्या बाबी शोधून काढून १९४४ सालअखेरचा रिपोर्ट मी सादर करीत आहें तेव्हां कंपनीनें तूट पूर्णपणें भरून काढली आहे. अत्यंत थोड्या अवधींत काटकसर आणि कार्यक्षमता यांना कोणत्याहि रीतीनें बाध न आणतां ही करामत करून दाखविण्याचें श्रेय, बोर्डाच्या कुशल मार्गदर्शनाप्रमाणें अविश्रांत श्रम करणारे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एस. एम. जोशी यांनाच दिलें पाहिजे. कंपनी आतां धोक्याच्या क्षेत्राच्या बाहेर पडली असून आयुर्विमा व्यवसायांत ती आघाडीवर चमकूं लागेल.

### निनाद (ॲडव्हर्टायझिंग) लि.

सर्व प्रकारच्या जाहिरात कामाचा मोठ्या प्रमाणावर धंदा करण्यासाठी वरील कंपनी स्थापन झाली आहे, तिची मुख्य कचेरी देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई, ह्या ठिकाणीं आहे.

पहिल्याच वर्षी करमाफ ६ टक्के डिव्हिडंड वाटलें!

ब्रिप्ला कमर्शिअल कंपनी लि.

मुख्य कचेरी : सरस्वती-विलास, लक्ष्मीरोड, पुणें २

मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

व्याजाचे दरः—एक वर्ष ४%; तीन वर्षे ५%; पांच वर्षे ६%.

रु. पांचशेच्या खालीं रकम स्वीकारली जाणार नाहीं.

व्याज दर सहामाहीस दिलें जातें.

मॅनेजिंग एजंटस } मा. पं. सोमण, एम. ए.; श्री. वा. रानडे

## पुणें येथें शेअर बाजाराची आवश्यकता

आमचे मित्र श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., शेअर व स्टॉक ब्रोकर, ह्यांनीं "अर्थ"च्या ता. १८ जुलैच्या अंकांत पुणें येथें शेअर बाजार स्थापन होण्याची आवश्यकता प्रतिपादन करतांना त्याची पार्श्वभूमि तपशीलवार वर्णन करून सांगितली आहे. ही विचारसरणी विचारवंत वाचक वर्गास पटलेली आढळून येते. ह्या विषयावर श्री. लोणकर ह्यांचेकडे त्यांच्या सूचनेस पोषक अशीं कांहीं पत्रें आलीं आहेत, त्यांपैकी एका सुप्रसिद्ध व्यापारी पेढीच्या इंग्रजी पत्राचा अनुवाद खालीं दिला आहे.

### भांडवलाची व इतर मदत

आपला व आमचा प्रत्यक्ष परिचय नाहीं, परंतु "अर्थ"मध्यें आपले शेअर बाजारावर लेख प्रसिद्ध होत असतात, त्यांचे द्वारा आम्ही आपणांस ओळखितों. ते लेख आम्हांस फारच पसंत पडतात.

"अर्थ"च्या ता. १८ जुलैच्या अंकांतील पुण्यांत स्टॉक एक्सचेंजची आवश्यकता ह्या विषयावरील आपला लेख आम्हांस फारच आवडला. आपण स्वतः पुढाकार घेऊन एक लाखाची स्टॉक एक्सचेंज कंपनी अथवा सोसायटी काढून कांहीं तरी प्रत्यक्ष प्रारंभ करावा अशी आमची विनंति आहे. गेलीं २० वर्षे आम्हीं शेअर बाजारांत व्यवहार करीत आहोंत आणि भांडवलाच्या व इतर दृष्टीनेंहि आपणांशीं सहकार्य करण्यास आम्ही तयार आहों. तेव्हा, आमच्या ह्या सूचनेचा कृपा करून काळजीपूर्वक विचार करावा व सवडीनुसार सत्वर पत्रोत्तर यावें, अशी विनंति आहे.


### घटस्फोट—संततिनियमनाचीं साधनें वापरल्याचा परिणाम

मिसेस ब्रेंडा ली कॉवेन हिनें आपला पति संततिनियमनाचीं साधनें वापरण्याचा हट्ट धरीत असल्याकारणानें आपणास मूल होऊं शकत नाहीं ह्या मुद्यावर इंग्लंडमध्यें घटस्फोट मागितला. कोर्ट ऑफ अपीलनें डायव्होर्स कोर्टाचा निवाडा रद्द करून घटस्फोट देवविला. संततिनियमनाचीं साधनें तयार करणें ह्या निवाड्यामुळें बेकायदा ठरेल कीं काय असा प्रश्न आतां उपस्थित होण्याचा संभव आहे.

### १ कोटि चात्या व २ लक्ष माग पाहिजेत

हिंदी कपास कापडाच्या गिरण्या पूर्व स्थितींत आणण्यास १ कोटि चात्या व २ लक्ष माग लागतील, असें मि. आर. एम्. नानावटी ह्यांनीं एका भाषणांत सांगितलें.

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



आशा

Asha

सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

दि आयडिअल इन्स्टिट्यूट

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

——कारखान्याच्या वाढीसाठीं ठेवी घेणें आहेत——

# स्फुट विचार

## ब्रिटिश कामगारवर्गाचा विजय

ब्रिटिश कॉमन्स सभेच्या गाजलेल्या निवडणुकीचा निकाल लागून तींत कामगार पक्षाचा दणदणीत विजय झाला असून त्याचें मंत्रिमंडळ आतां अधिकारारूढ झालें आहे. मि. चर्चिल ह्यांच्या दणकेबाज नेतृत्वाखाली युरोपांतील युद्धांत इंग्लंडला स्पृहणीय यश प्राप्त झालें असल्यानें त्यांच्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे सभासद बहुमतानें कॉमन्स सभेंत निवडून येतील आणि कांहीं काळपर्यंत ते मुख्य प्रधान राहून जागतिक शांततेच्या स्थापनेंत पुढाकार घेतील अशी अपेक्षा होती, ती खोटी ठरली आहे. जगाची व इंग्लंडची आर्थिक घडी पुन्हां नीट बसवण्याचें कार्य कामगार पक्षाचे पुढारीच चांगलें करूं शकतील असा कौल ब्रिटिश नागरिकांनीं दिला असल्यानें मि. चर्चिल ह्यांची निराशा झाली आहे. कामगार पक्षाचे नेते, मि. ॲट्ली, मुख्य प्रधानाचे जागीं विराजमान होऊन त्यांनीं आत्मविश्वासानें स्वतःच्या नव्या मंत्रिमंडळाचें धोरण जाहीर केलें आहे. जागतिक शांतता आणि आर्थिक अभिवृद्धि हें आपलें दुहेरी ध्येय राहील आणि जपानचा पूर्ण पराभव होण्यास सहाय देणें हें पहिलें कर्तव्य आपण करूं असें त्यांनीं म्हटलें आहे. पुराणमतवादी पक्षाचा पराभव होऊन पुरोगामी कामकरी पक्षाचा विजय इंग्लंडमध्यें झाला आहे. त्याचा अनुकूल परिणाम हिंदी राजकीय परिस्थितीवर होईल अशी आशा उत्पन्न झाली आहे, ती कितपत आणि कशी सफल होते हें आतां लवकरच दिसेल.

---

## " महाराष्ट्र–दर्शन "

महाराष्ट्रीयांची आर्थिक व सामाजिक उन्नति घडून येण्यास त्यांच्या प्रदेशाची नैसर्गिक परिस्थिति आणि तिचा कार्यक्षम उपयोग करण्याची शक्यता ह्यांची माहिती लोकांस होणें आवश्यक आहे. हें ज्ञान "मानचित्रां"च्या म्हणजे नकाशांच्या सहायानें दिलें असतां विशेष परिणामकारक होतें असा सामान्य अनुभव आहे. ह्या दृष्टीनें महाराष्ट्राची नैसर्गिक, आर्थिक व सामाजिक स्थिति प्रतिबिंबित करणारे नकाशे बनवून ते लोकशिक्षणाच्या हेतूनें प्रसिद्ध करण्याची कल्पना श्री. न. गं. आपटे ह्या उत्साही व माहितगार कार्यकर्त्यानें प्रथम काढली आणि तिला मूर्तस्वरूप देण्याचा उपक्रम त्यांनीं आतां केला आहे. ( " महाराष्ट्र-दर्शन "– प्रथम दर्शन–मूल्य १ रु., ९५२ सदाशिव पेठ, पुणें २ ). ह्या नमुन्यावरून श्री. आपटे ह्यांनीं योजलेल्या ६० नकाशांचें स्वरूप लक्षांत येण्यासारखें आहे. क्षेत्र, लोकसंख्या, हवामान, पाउसपाणी, नद्या, डोंगर, पिकें, उद्योगधंदे, रस्ते, जनावरें, जंगलें, फळें, ऐतिहासिक व धार्मिक स्थळें इत्यादि विषयींची माहिती ह्या नकाशांत स्पष्टीकरणासह देण्यांत यावयाची आहे. श्री. आपटे ह्यांनीं हें सबंध कार्य पुरें करून देण्याचें अंगावर घेतलें असून विश्वास कंपनीचे भागीदार, श्री. स. के. भावे ह्यांनीं प्रकाशनाची व्यावहारिक योजना आखली आहे. ह्या लोकशिक्षणात्मक कार्यास आवश्यक असलेलें सहाय मिळून ती यशस्वी होईल अशी आम्हांस आशा आहे.

---

## कॉमनवेल्थ कंपनीच्या चालकांचा यशस्वी कारभार

कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या मूल्यमापनांत आढळलेली तूट भरून काढण्याची मोठी व बिकट जबाबदारी कंपनीच्या बोर्डानें स्वीकारली होती, ती त्यानें पूर्णपणें पार पाडली आहे, हें वृत्त कंपनीच्या विमेदारांस व भागीदारांस संतोषजनक वाटेल. वाजवी अपेक्षा बरोबर ठरल्यास लवकरच इंटेरिम बोनस जाहीर करतां येईल, अशी चालकांस आशा आहे. श्री. ल. व. भोपटकर ह्यांच्या नेतृत्वाखालील बोर्डाच्या मार्गदर्शनाप्रमाणें मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एस. एम. जोशी ह्यांनीं कसून प्रयत्न करून कार्यक्षमतेस कोणत्याहि प्रकारें बाध येऊं न देता खर्चाचें प्रमाण थोड्या अवधींत पुष्कळच उतरविलें, कंपनीच्या इतिहासांत तिला कोणत्याच वर्षी काम मिळालें नाहीं इतकें मिळविलें, आणि उत्पन्नाच्या बाबी वाढवून आतां तूट पूर्णपणें भरून काढली, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. कंपनी लवकरच आयुर्विमा व्यवसायाच्या आघाडीवर चमकूं लागेल, असा चालकांस वाटणारा विश्वास खरा ठरेल, हें कंपनीनें अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि केलेल्या कामगिरीवरून सहज पटण्यासारखें आहे.

---

## हिंदी बँकिंगविषयक ताजे आंकडे

एक्सचेंज बँका व त्यांच्या कचेऱ्या ह्यांची संख्या स्थिर आहे परंतु शेड्यूल्ड बँका व त्यांची संख्या मात्र वाढत आहे. ३१-३-४४ ते ३१-३-४५ ह्या बारा महिन्यांचे अवधींत शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या २,०४१ ची २,५७० झाली म्हणजे ती ५२९ नें वाढली.

शेड्यूल्ड बँकांची संख्या

| | ३०-६-४४ | ३१-१२-४४ | ३०-६-४५ |
|---|---|---|---|
| एक्सचेंज बँका | १६ | १६ | १६ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ६३ | ७१ | ७३ |

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | ३१-३-४४ | ३०-९-४४ | ३१-३-४५ |
|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ४०२ | ४१२ | ४२३ |
| पांच प्रमुख बँका | ४९१ | ५२१ | ५९३ |
| एक्सचेंज बँका | ८० | ८० | ८० |
| इतर शेड्यूल्ड बँका | १,०६८ | १,२२६ | १,४७४ |
| एकूण ... | २,०४१ | २,२३९ | २,५७० |

---

## रिझर्व्ह बँकेचें इश्यू खातें

खालील तक्त्यांत १–९–३९, ३०–६–४४ व २९–६–४५ चे रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याचे तुलनात्मक आकडे दिले आहेत त्यावरून चलनी नोटांची वाढ, स्टर्लिंग रोख्यांची वाढ, वगैरेंवर चांगला प्रकाश पडेलः—

( आंकडे कोटि रुपयांचे )

| | १-९-३९ | ३०-६-४४ | २९-६-४५ |
|---|---|---|---|
| देणें | | | |
| एकूण चलनी नोटा | २१७ | ९४३ | ११४७ |
| जिंदगी | | | |
| (अ) सोनें | ४४ | ४४ | ४४ |
| स्टर्लिंग रोखे | ६० | ८२८ | १०२९ |
| एकूण ( अ ) | १०४ | ८७३ | १,०७४ |
| (ब) रुपये | ७६ | १२ | १५ |
| हिंदी सरकारी रोखे | ३७ | ५८ | ५८ |
| एकूण | २१७ | ९४३ | १,१४७ |

## —त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ता:—

**तुळजाराम मोदी**

मोतीचौक, सातारा.

तुमच्या पैशाचा योग्य मोबदला




## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व स्ट्रॉबेरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार **पूना गेस्ट हाउस** टेलिफोन नं. ७७९

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

### EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements ● Cab Tyres
- Mechanical Rubber Goods ● Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd.,**

*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*

Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंट:— द. ना. हेजीब







नोगी आणि कं. मुंबई ४

### हिंदुस्थान–अमेरिका वहातुक

युरोप आणि तुर्कस्थान ह्या मार्गे हिंदुस्थानाशी वक्तशीर वैमानिक वहातुक सुरू करण्याचा अमेरिकेचा विचार आहे.

### शेड्यूल्ड बँकांच्या नवीन शाखा

एप्रिल ते जून १९४५ ह्या तिमाहींत शेड्यूल्ड बँकांनी उघडलेल्या १११ शाखांची प्रांतवार वाटणी खालीलप्रमाणें आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| पंजाब | ३७; | मद्रास | ११; |
| मुंबई | १३; | सं. प्रांत | १०; |
| बंगाल | ६; | दिल्ली; | ६; |
| बिहार | ५; | आसाम | ३; |
| सिंध | ३; | मध्यप्रांत | १; |
| हिंदी संस्थानें | १३. | | |

### हिंदुस्थानांत कॅनडाहून गहूं येणार

गेल्या वर्षी हिंदुस्थानचें पीक ९७ लक्ष टन एवढें भरलें होतें. या वर्षी तें १०३ लक्ष टन होईल असा अंदाज आहे. ऑस्ट्रेलियाचें पीक चांगलें आलें नसल्यामुळें तेथून गव्हाची आयात व्हावयाची नाहीं. परंतु कॅनडानें एक लक्ष टनांचा वायदा पुरा करण्याचें ठरविलें आहे. जेथें दुर्भिक्षतेमुळें गव्हाचे भाव वाढले आहेत अशा प्रांतांना हा गहूं पुरविण्यांत येईल.

### न्यू यॉर्क येथें टाटा–बिर्ला

हिंदी औद्योगिक शिष्टमंडळास अमेरिकेच्या नॅशनल असोशिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स या संस्थेनें नुकताच खाना दिला. हिंदुस्थान निसर्गाच्या देणगीनें श्रीमंत असतां तेथील जनता गरीब राहिली आहे; देशाचें औद्योगीकरण करण्यांत अमेरिकेची सर्व मदत मिळेल असें वरील संस्थेनें त्यावेळीं आश्वासन दिलें. हिंदुस्थानचें स्टर्लिंग कर्ज ब्रिटननें देऊन टाकावें असें बिर्लांनीं सांगितलें.

### रिझर्व्ह बँकेचा वाढता वार्षिक नफा

| | ३० जून १९४५ लक्ष रु. | ३० जून १९४४ लक्ष रु. | ३० जून १९४३ लक्ष रु. |
|---|---|---|---|
| उत्पन्न | १६६७ | १२०० | ९१९ |
| खर्च | १७८ | १७३ | १४९ |
| वाटणीसाठीं शिलक | १४८९ | १०२७ | ७७० |
| ३½% डिव्हिडंड | १७½ | १७½ | १७½ |
| रिझर्व्ह फंड | ... | ... | ... |
| ½% जादा डि. | २½ | २½ | २½ |
| मध्यवर्ती सरकारास देणार | १४६९ | १००६ | ७५० |
| | १४८९ | १०२७ | ७७० |

### कस्तुरबा सहकारी उद्योग मंदिर लि.

पालघर येथील स्त्रियांची वरील पहिली सहकारी प्रोड्यूसर्स सोसायटी स्थापन झाली आहे, तिची पहिली साधारण सभा ता. २२ जुलै रोजीं मुंबईच्या श्री. सौ. विमलाबेन मेहता. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाली.

### युद्धसमाप्तीनंतर रेशनिंग चालू रहाणार

युद्धसमाप्तीनंतर तीन ते पांच वर्षे रेशनिंग व अन्ननियंत्रण चालू ठेवावें लागेल असें हिंदुस्थान सरकारचे रेशनिंग सल्लागार मि. कर्वी ह्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें. रेशनमध्यें वाढ होणार नाहीं असा मात्र त्याचा अर्थ नाहीं हें त्यांनीं स्पष्ट केलें.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. मुंबई यांजकडून )

व्याज–वजा (xd)
बँक ऑफ इंडिया २८–७–४५
इंदूर माळवा २७–८–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार ३०।७।४५ |
|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९—८—९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २२५०—० |
| ४३५; ३६९ | २३—०—० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१७—८ |
| २२०१; १६९५ | ५०—०—०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ११८१—४ |
| ७६५; ५३३ | १६—०—०S | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६२३—८ |
| ६५३; ४७५ | २२—०—० | मे | स्वदेशी | १०० | ५६१—० |
| ४९८; ३६१ | ६—०—०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३९४—८ |
| ३७७; २६५ | १५—०—० | एप्रिल | फिनले | १०० | २९९—८ |
| ३९४; २८२ | ९—०—०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३०९—० |
| ३०५; २१८ | १२—०—०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३०९—० |
| ५-१०-६; ३-६ | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ४—४ |
| २१-१४;१३-४-६ | ०—१५—० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—१० |
| ४-९; २-७ | ०—३—० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३—०—६ |
| १२७०; ६३० | ३५—०—० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७६७—८ |
| २५४; २१६ | ७—०—० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २११—८ |
| २५९; २१९ | ९—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२३—० |
| ५७५; ३७६ | ७—८—० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४३२—८ |
| ३८; २९-२ | १—४—० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७—६ |
| | | | ३½% रोसे | १०० | १०२—० |

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—८ |
| १९५१-५४ | १०१—६ |
| १९५७ | १००—७ |
| १९६३-६५ | ९९—३ |
| १९६६-६८ | ९८—६—६ |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा * | १४९—० |
| सेंट्रल | ८६—१२ |
| इंडिया | १९३—८ |
| इंपी० | २२३०—० |
| इंपी० | ५६३—१२ |
| रिझर्व्ह | १४२—० |
| युनियन | ९—६—० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १६०७—८ |
| बॉम्बे ट्रॅम | ६८—० |
| टाटा हायड्रो | १६५-१० |
| टाटा पॉवर | १७२५—० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४२५—० |
| बीबे स्टीम | ३४७—८ |
| न्यू इंडिया | ८३—१२ |
| शिवराजपुर | ५४—० |
| टाटा केमिकल | २०—८ |
| टाटा ऑईल ; | ७५—० |
| 'विमको' | ३२०—० |

* व्याज रु. २—८—० † १८—८—४५

## विमा कंपनीच्या भांडवलांत वाढ

### हायकोर्टाचा मनाई हुकूम

माणेकलाल बेचरदास आणि ओझा ह्या बाँबे लाइफ अॅश्युअरन्स कं. लि. च्या दोघा भागीदारांनीं कंपनीनें तिचें भांडवल १० लाखांचें ५० लाख करणारा ठरांव तिच्या कोणत्याहि सभेंत करूं नये अशा अर्थाचें इंजंक्शन मुंबई हायकोर्टांत मागितलें. शेअर वाढविण्याचा ठराव १९ जुलैच्या साधारण सभेंत यावयाचा होता. "कंपनीचा ताबा मिळविण्यासाठीं कांहीं लोकांत स्पर्धा चालू होती. स्वतःच्या हातांत सूत्रें राखण्यासाठी प्रतिवादी नं. २ चा प्रयत्न होता. प्रस्तुत ठराव कंपनीच्या हिताचा नाहीं. कंपनीचा लाईफ फंड २,२९,००,००० रुपये असून ती भरभराटींत आहे." असें वादींचें म्हणणें होतें. "भागीदारांच्या हितसंवर्धनासाठीं वादींनीं दावा लावलेला नाहीं. त्यांस दुसऱ्यांनीं उभें केलेलें आहे. आग, मरीन, वगैरेच्या विम्याचा धंदा करण्यासाठी कंपन्या उभारण्याकरितां व शेअर घेण्याकरितां भांडवलांत वाढ आवश्यक आहे." असा प्रतिवादींचा युक्तिवाद होता. "दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनीं नवें भांडवल विकूं नये. भांडवल उभारून तें गुंतविण्याची एकादी चांगली संधी आली आहे असें त्यांस वाटल्यास त्यांनीं कोर्टाकडे अर्ज करावा. भांडवल वाढविण्यास हिंदुस्थान सरकारची परवानगी मिळविण्याचा प्रयत्न वादींनीं चालू ठेवण्यास हरकत नाहीं." असा मुंबई हायकोर्टानें हुकूम केला.

---

### ह्या युद्धाचा खर्च गेल्यों युद्धाच्या पाचपट

| | डॉलर्स |
|---|---|
| अमेरिका | २,७०,००,००,००,००० |
| ग्रेट ब्रिटन | १,८०,००,००,००,००० |
| जर्मनी, आणि जर्मनीचे दोस्त | १,८०,००,००,००,००० |
| रशिया | ५०,००,००,००,००० |
| जपान | ५०,००,००,००,००० |

लोकांच्या संपत्तीचा नाश किती झाला आहे तें खालील आकड्यांवरून दिसेल.

| | डॉलर्स |
|---|---|
| जर्मनी | ५०,००,००,००,००० |
| ब्रिटन | १५,००,००,००,००० |
| रशिया व पोलंड | ३५,००,००,००,००० |
| जहाजें | १०,००,००,००,००० |

आणि मृत्युसंख्येची किंमत वेगळीच !

---

### हिंदुस्थानांत अमेरिकन चित्रपटांची चलती

पॅरेमाउंट अमेरिकन कंपनीचे हिंदुस्थान, ब्रह्मदेश व सिलोन येथील सेल्स मॅनेजर हे मे महिन्यांत न्यूयॉर्कला गेले, तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानांतील चित्रपटांचा धंदा अत्यंत भरभराटींत असल्याचें सांगितलें. संयुक्त राष्ट्रांचे सैनिक हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर आहेत व सैन्यांत दाखल झालेले लाखो हिंदी सैनिक ह्यांसहि सिनेमाची गोडी लागली आहे, असें ते म्हणाले. १९४३ सालीं दोनशेवर अमेरिकन चित्रपट हिंदुस्थानांत दाखविण्यांत आले; १९४४ मध्यें त्यांची संख्या थोडी कमी भरली. १९४४ सालीं २३ ब्रिटिश चित्रपट हिंदुस्थानांत दाखविण्यांत आले; चालू वर्षी २४ चित्रपटांची घोषणा झाली आहे.


जागतिक बंधुत्व दर्शविणारें अतिभव्य चित्र
महेबूब प्रॉडक्शन
दिग्दर्शक : महेबूब
भूमिका—चंद्रमोहन, अशोककुमार, वीणा, नर्गीस.
'हुमायूं'
४ था सातवडा !
पुणें, पॅरेमाऊंट रोज : ३ खेळ ३।, ६।। व १०

निराशा टाळण्यासाठीं तिकिटे अगाऊ रिझर्व करा—
नवयुगाचा नवा सामाजिक बोलपट !
पन्ना
दिग्दर्शक—नजम नकवी.
—भूमिका—
गीता, निजामी, जयराज, डेविड, कुसुम देशपांडे.
६ वा गर्दीचा आठवडा
श्रीकृष्ण—पुणें
फोन नं. ९।१००१
रोज ६।। व १० वाजतां.
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३।। वा.
आगाऊ ति. विक्री थिएटरवर नेहेमीप्रमाणें.
—पिअरलेस प्रकाशन—

'इषारा'—प्रसिद्ध डी. आर. डी. ची दुसरी सामाजिक कलाकृति
म्हणजेच
आयना 'आरसा' अर्थात् सासू
'हॅपी डायमंड' प्रकाशन
तिसरा ३ सातवडा !
कथा—प्रभुलाल त्रिवेदी. दिग्दर्शक—युसफ.
राजकुमारी, सुलोचना, याकूब, लीला, कौसल्या, गोप, त्रिलोक, मिर्झा.
आतां फक्त डेक्कन या पुण्यांतील बोलपट प्रासादांत
रोज फक्त २ खेळ ७ व १० वा.
शनि. रवि. सोम. व सुट्टीचे दिवशीं मॅटि. ४ वा. रिझर्वेशन १० ते १२.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. गोपाळ वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा घ. नं. १२४।११, पुणें येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ८ ऑगस्ट, १९४५ अंक ३२

## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व क्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

—पुणें शहर—

[ टेलिफोन नं. ४८३ ]

बँकेच्या सुरक्षित सेफ डिपॉझिट व्हाल्टचा जरूर फ़ायदा घ्या.

फक्त १ रुपयांत

आपल्या मौल्यवान जिनसा वगैरे भक्कम कप्प्यांत सुरक्षित ठेवा.

सुट्टीखेरीज केव्हांही उघडण्यांत येतें.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लिमिटेड

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव
शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापुर

खेळतें भांडवल १५ लाखांवर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, B. A., LL. B., चेअरमन.

श्री. एल. एस. आजगांवकर, श्री. एस. के. सामंत, श्री. एन. व्ही. सामंत, श्री. पी. ए. तेंडोलकर, श्री. जी. एन. कलघटगी, श्री. डी. आय. गाडवी, श्री. आय. एम्. हुंदुरवाडी, श्री. टी. व्ही. पोरवाल, श्री. डी. आर. अनगोळकर, श्री. आर. डी. गुर्लहोसूर, श्री. जी. जी. वेलिंग.

आकर्षक दरानें मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा.

एस. एन. सामंत,
मॅनेजिंग डायरेक्टर

# विविध माहिती

### आगकाडी पाण्यांत भिजली तरी पेटते

ओली झाली तरी पेटणाऱ्या आगकाडीचें उत्पादन आतां मोठ्या प्रमाणावर अमेरिकेंत होऊं लागलें आहे. डायमंड मॅच कंपनी दररोज १ कोटि अशा काड्या तयार करते. पॅसिफिक युद्धक्षेत्रांतील पाऊसपाण्यांत टिकणाऱ्या आगकाड्यांची लष्करानें मागणी केली, ती शास्त्रीय संशोधनानें पुरी करणें शक्य केलें आहे. आठ तास पाण्यांत भिजत ठेवलेली आगकाडी पेटूं शकते. ती दिसावयास नेहमींच्या आगकाडीसारखीच दिसते. फक्त तिचे-वर एका रसायनाचें आवरण असतें.

### अमेरिकेंत वधू जास्त; नवरे कमी

अमेरिकेंत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या वाढत जात असल्या-कारणानें लक्षावधि स्त्रियांचे विवाह होणें अशक्य होणार आहे. १५ वर्षांपूर्वी स्त्रियांपेक्षा पुरुष १ लक्ष अधिक होते, आतां स्त्रिया सुमारें ७½ लक्ष अधिक भरतील. पुरुषांपेक्षा स्त्रियांत मृत्यूचें प्रमाण कमी आढळतें, त्याचा हा परिणाम आहे. चालू महायुद्धांत सुमारें २½ लक्ष पुरुष मृत्यू पावले आहेत व परत यावयाच्या हजारो सैनिकांनीं परदेशी मुलींबरोबर विवाह केलेले आहेत. हजारो सैनिक स्वदेशीं परत न येतां इतर देशांतच स्थाइक होण्याचा संभव आहे.

### आर्थिक वर्चस्वाचा दुरुपयोग

ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांपेक्षा स्वित्सरलंड अर्जेंटिनाच्या गव्हास २९% जास्त किंमत देतो. डब्यांत भरलेले मासे, वाळवि-विलेलीं फळें, इत्यादि अनेक जिन्नस स्वित्झरलंडला फारच महाग पडतात. अमेरिका व ग्रेट ब्रिटन हे देश आपल्या आर्थिक वर्च-स्वाचा दुरुपयोग करून लहान-सहान देशांवर वाटेल त्या किंमती लादीत आहेत. असा आरोप डेप्युटी डटवीलर ह्या एका स्विस राजकीय पुढाऱ्यानें आपल्या सहीखालील एका लेखांत केला आहे. स्वित्झरलंडला फक्त ग्रीक आगबोटींतूनच मालाची ने-आण करतां येते व त्याचें भाडें भरमसाट पडतें, अशीहि तक्रार त्यानें केली आहे. स्वित्झरलंडला स्वतःसाठी आगबोटी खरेदी करतां येत नाहींत.

### डंडी येथील तागाच्या गिरण्या

डंडी ( स्कॉटलंड ) येथील तागाच्या गिरण्या ऑगस्ट अखेर पुनः सुरू होणार आहेत. कलकत्ता, बेलजम, झेकोस्लोव्हाकिया व फ्रान्स ह्यांची स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच आपलें बस्तान बसवि-ण्याचा तेथील कारखानदारांचा विचार आहे.

### ब्रिटिश सायकल कंपन्या

रॅले, हर्क्यूलस, बी. एस. ए., न्यू हडसन आणि सनबीम ह्या गाड्या ग्रेट ब्रिटनमध्यें फार खपतात. फिलिप्स, हर्क्यूलस आणि रॅले ह्या गाड्या मुख्यतः निर्गत होतात. रॅले कंपनीच्या कार-खान्यांस उत्पादनासाठी दुसऱ्या कोणावरहि अवलंबून रहावें लागत नाहीं. बी. एस. ए. कंपनीचा नफा सायकलीपेक्षा इतर प्रकारच्या मालाचें उत्पादनावरच अवलंबून असतो. हालफर्ड कंपनी सायकली तर बनवितेच, परंतु त्याबरोबर तिचीं स्वतःचीं सायकलीचीं, मोटारींच्या सुट्या भागाचीं व इतर जिनसांचीं दुकानें आहेत.

### कामगारांस भागीदार करणार

बंगलोर येथें २५ लक्ष रुपये भांडवलाचा साबणाचा कारखाना लवकरच स्थापन होणार आहे. त्यांतील कामगारांस कंपनीमध्यें २५% भाग धारण करण्याची सवलत देण्यांत यावयाची आहे.

### कपाशीचें जागतिक उत्पादन

कपाशीचें जागतिक उत्पादन १९४४-४५ मध्यें १९४३-४४च्या मानानें १० लक्ष गांठींनीं घटेल असा अंदाज आहे. १९४३-४४ मध्यें २ कोटि, ६६ लक्ष टन गांठींचें उत्पादन झालेलें होतें. हिंदुस्थानांतील कपाशीची लागवड फारच घटली आहे त्याचा मुख्यतः हा परिणाम आहे. चीनमध्यें कपाशीचें उत्पादन वाढत आहे. रशियांतील कपाशीचें दर एकरीं उत्पादन सुधारत चाललें आहे.

हिंदुस्थानांतील भुइमुगाची लागवड—१९४४-४५ चा अंदाज

| | |
|---|---|
| एकूण लागवड | ९८,४१,००० एकर |
| उत्पादन | ३५,६०,००० टन |

लागवडीपैकी मद्रास प्रांताचा वाटा ४१% व मुंबई प्रांताचा वाटा २८% आहे.

### रद्दी कागद जमा करण्यासाठी सिनेमाचा खेळ

अमेरिकेंतील चॅथॅम शहरांतील एका बोलपटगृहांत एके दिवशीं दुपारीं सिनेमा दाखविण्यांत आला. त्याच्या वर्तमानपत्रांतील जाहिरातींस स्थानिक व्यापाऱ्यांनीं मदत केली. किमान ५ शेर रद्दी कागद आणून देणारास प्रवेश मोफत होता. सर्वांत जास्त रद्दी आणणारांस बक्षिसें देण्यांत आलीं.

### फ्रिस्को परिषदेपासून स्थानिक दुकानदारांस प्राप्ती

सॅन फ्रॅन्सिस्कोची परिषद् त्रेसष्ठ दिवस चालली होती आणि जगांतील निरनिराळ्या देशांतून हजारो लोक तिच्या निमित्तानें गोळा झाले होते. त्यांच्या खरेदीपासून स्थानिक दुकानदारांस सुमारें तीन कोटि रुपयांची प्राप्ती झाली.


## दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लि.
पुणें शहर
...एका भागीदारानें पुरस्कारलेली महाराष्ट्रांतील एजंटांसाठीं...
—बक्षिसाची चढाओढ—
चढाओढींत भाग घेऊं इच्छिणारांनीं तावडतोब एजन्सीसाठीं अर्ज करावेत.
महाराष्ट्रांत सर्वत्र एजंटस नेमणें आहेत : : : माहितीपत्रकासाठीं भेटा अगर लिहा—
श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

अर्थ
वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## रिझर्व्ह बँकेचा वार्षिक अहवाल

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा ३० जून, १९४५ अखेरचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून अहवालाचे वर्षीच्या बँकेच्या कारभाराची कल्पना येते. चलनविस्तारामुळें बँकेकडे व्याज देणारे रोखे आणखी साचले ह्याचा परिणाम उत्पन्न व नफा अधिकच वाढण्यांत झाला. बँकेस १९३९ सालीं २२ लक्ष रुपये नफा होऊन त्यापैकीं भागीदारांस १८ लक्ष रुपये व हिंदुस्थान सरकारास ५ लक्ष रुपये मिळाले होते. त्या वर्षापासून निवळ नफा वाढत गेला व अहवालाचे वर्षी त्याची रकम १४ कोटि, ९० लक्ष रुपये झाली. रिझर्व्ह बँकेस ३० जून, १९४५ अखेर सुमारें १५ कोटि रुपये निवळ नफा झाला तरी भागीदारांचे वाटणीस त्यापैकीं फक्त २० लक्ष रुपयेच आले असून बाकीची रकम ( १४ कोटि, ६९½ लक्ष रुपये ) कायद्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारास मिळावयाची आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४७ व्या कलमाची दुरुस्ती १९४३ च्या एका ऑर्डिनन्सनें करून नफा–वाटणीचा कमाल दर ४% ठरवून टाकला आहे. हा ऑर्डिनन्स अद्याप अंमलांत असल्याकारणानें भागीदारांस ४% डिव्हिडंड देण्यांत आलें आहे.

### शेड्यूल्ड बँकांचे संख्येंत वाढ

वृत्तांताचे वर्षी रिझर्व्ह बँकेशी जोडलेल्या 'शेड्यूल्ड' बँकांची संख्या १० नें वाढून ती ८६ झाली. कायद्यांत सांगितलेल्या अटी दोन बँका पार पाडीत असल्याचें उघडच दिसून आल्याकारणानें, शेड्यूलमध्यें त्यांस दाखल करण्यापूर्वी त्यांची तपासणी करणें आवश्यक वाटलें नाहीं. जरूरीपेक्षा पुष्कळ मोठ्या वसूल भांडवलानिशीं स्थापन झालेल्या त्या बँका असल्या पाहिजेत हें उघड आहे. जून, १९४५ अखेर ११ बँकांच्या अर्जांचा विचार चालू आहे. एकादी बँक शेड्यूलमध्यें रहाण्यास अयोग्य असल्याची शंका वाटल्यास रिझर्व्ह बँक तिची तपशीलवार चौकशी करते. अशाप्रकारें कलकत्त्याकडील तीन आणि मद्रासकडील एक बँक ह्यांस रिझर्व्ह बँकेच्या तपासणींतून जावें लागलें.

### बँकांकडील पैशास वाढती मागणी

शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींचा आकडा ३० जून, १९४४ रोजीं ७४७½ कोटि रुपये होता, तो ३० जून, १९४५ अखेर ८६८½ कोटि रुपयांवर गेला. त्यांनीं दिलेल्या कर्जांचा आकडा ह्या मुदतींत २११½ कोटींचा २७९½ कोटि रुपये झाला. ठेवींशीं कर्जांचे व बिल डिस्कौंटचें प्रमाण २९·४३% पडत होतें, तें आतां ३३·७७% पडलें आहे. फक्त तीनच बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे कर्ज मागितलें; त्यापूर्वीच्या वर्षी सात बँकांनीं कर्ज घेतलें होतें. बँकांजवळील ठेवी वाढत जात असल्या तरी त्याबरोबरच कर्जांची मागणीहि अधिकाधिक येत आहे ह्याचें प्रत्यंतर वरील आकड्यांत मिळतें. शेड्यूल्ड बँकांनीं ३० जून, १९४४ अखेर १६·९५% रकम रोख व रिझर्व्ह बँकेंत ठेवली होती; जून १९४५ अखेर हें प्रमाण १३·३३% वर आलें, हाहि पैशास वाढती मागणी असल्याचाच परिणाम आहे. कायद्यानें आवश्यक ठरविलेल्या रकमेपेक्षा ६४ कोटि रुपये ज्यास्त रकम शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे जून, १९४४ अखेर राहूं दिली होती; जून १९४५ अखेर तत्सम रकमेचा आकडा ४३ कोटींवर उतरला आहे.

### भांडवल उभारणी अर्जांची तपासणी

भांडवल उभारणीसाठीं बँकिंग व विमा कंपन्यांनीं सरकारकडे अर्ज केले, म्हणजे सरकार ते अर्ज रिझर्व्ह बँकेच्या मतासाठीं तिचेकडे पाठविते. १७ मे, १९४३ पासून, म्हणजे त्यासंबंधांतील नियम जाहीर झाल्यापासून ३० जून, १९४५ अखेर रिझर्व्ह बँकेनें अशा ८४३ अर्जांवर मत व्यक्त केलें. त्यापैकीं ६०४ अर्ज बँकिंग व २३९ अर्ज विमा कंपन्यांबाबत होते.

### बँकेचे भाग मुंबईंत एकवटण्याची प्रवृत्ति

रिझर्व्ह बँकेचे भाग भांडवल हिंदुस्थानाच्या सर्व प्रांतांत योग्य प्रमाणांत विभागलें जावें ह्या दृष्टीनें मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व रंगून ह्या पाच पटांत त्याची प्रारंभीं वाटणी करण्यांत आली. परंतु, पुढें हळु हळु इतर पटांतील शेअर्स मुंबई पटांत वर्ग होऊन येऊं लागले आणि एकूण भागीदारांची संख्याहि कमी होऊं लागली. त्यामुळें, रिझर्व्ह बँकेचे शेअर्स शक्य तितक्या ज्यास्त भागीदारांत व सर्व प्रांतांत योग्य प्रमाणांत विभागले जावेत, ही मूळ योजना जशीच्या तशी कायम राहूं शकली नाहीं. बँकेच्या एकूण भागीदारांची संख्या प्रारंभीं ९२,०४७ होती ती आतां ४६,६४० झाली आहे आणि प्रत्येक भागीदाराच्या नांवावर प्रारंभीं सरासरीनें ५·४ शेअर्स होते, त्यांची सरासरी संख्या आतां १०·७ झाली आहे. ३० जून, १९४५ अखेर संपलेल्या वर्षापुरतेंच पाहिलें, तर मुंबई पटावरील शेअर्समध्यें २१३९ ची भर पडली, परंतु त्याच पटावरील भागीदारांच्या संख्येंत मात्र ६२४ ची घट झाली !

### दहा वर्षांतील फरक

प्रत्येक पटांतील भागीदारांची व भागांची संख्या ह्यांचे तुलनात्मक आकडे खालील तक्त्यांत दिले आहेत, त्यांवरून मुंबईमध्यें बँकेचे भाग कसे एकत्रित होत चालले आहेत हें स्पष्ट कळून येईल.

| पटाचें नांव | भागीदारांची संख्या | | भागांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | १९३५ | १९४५ | १९३५ | १९४५ |
| मुंबई | २८,०१० | १७,४४९ | १,४०,००० | २,३३,२७२ |
| कलकत्ता | २३,८९० | १०,७६४ | १,४५,००० | १,२१,७५५ |
| दिल्ली | २३,००० | ११,०२६ | १,१५,००० | ८२,९३० |
| मद्रास | १४,००० | ६,८४७ | ७०,००० | ५३,१५९ |
| रंगून | ३,१५७ | ५५४ | ३०,००० | ८,८८४ |
| | ९२,०४७ | ४६,६४० | ५,००,००० | ५,००,००० |

### सैनिक परतल्यावर कोणत्या घरांत प्रवेश करणार ?

युद्धामुळें ग्रेट ब्रिटनमध्यें राहण्याच्या घरांचा भयंकर तुटवडा पडला आहे, त्यावर एक उपाय म्हणून तेथील सरकारनें तावडतोब उभीं करतां येतील अशी कारखान्यांत बनविण्याचीं घरें तयार करण्याची योजना केली आहे. युद्धक्षेत्रांतील सैनिकांना परत स्वगृहीं गेल्यावर कोणत्या प्रकारचीं घरें रहावयास मिळतील ह्याची कल्पना यावी म्हणून त्या घरांचे नमुने हिंदुस्थानांत कांहीं क्षेत्रांत ठेवण्यांत येणार आहेत आणि त्यांतील सोयी समजावून सांगण्यासाठीं खास लोक ग्रेट ब्रिटनमधून येथें येणार आहेत.

शेअर बाजार

## उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयकरणाचा परिणाम

( श्री. व. वि. लोणकर, १२८६ शिवाजीनगर, पुणें ५ )

इंग्लंडमधील मजूर पक्षाच्या विजयानंतर प्रो. लास्की या मजूर अध्वर्यूंनीं युनायटेड स्टेट्सला उद्देशून भाषण करतांना इंग्लंड-मधील उद्योगधंद्यांच्या–विशेषतः बँकांच्या–राष्ट्रीयकरणावर विशेष जोर दिला. त्याचा परिणाम लंडन बाजारावर होऊन बँक ऑफ इंग्लंडचा अभेद्य समजला जाणारा शेअर वीस पौंडांनीं घटला. त्याच्या मागोमाग तिकडील मोठ्या गणल्या जाणाऱ्या बँकांचे मिडलँड, लॉईड, बार्क्ले इत्यादींचे शेअर्सही दहा दहा पौंडांनीं घटले. या घटनेचा परिणाम हिंदी शेअरबाजारावर काय होणार याकडे मंडळींचें लक्ष लागलेलें दिसत आहे.

जेव्हां एकादें खरेंखुरें राष्ट्रीय सरकार–म्हणजे इंग्लंडचें आहे तसें–उद्योगधंदे एकंदर राष्ट्राच्या हितार्थ स्वतःच्या मालकीचे करतें तेव्हां भागीदारांचें भांडवल परत होऊन त्या त्या विशिष्ट धंद्यांतून उत्पन्न होणारा नफा सर्व जनतेला मिळतो. अर्थातच जनतेची क्रयशक्ति वाढते व जनतेची राहणी सुधारून देश समृद्ध होण्याच्या मार्गास लागतो. तेव्हां आपल्या डिव्हिडंडसूना कात्री लागणार या भीतीनें इंग्लंडमधील भांडवलवाला व पुंजी चाळून त्यावर जगणारा वर्ग भयभीत झाल्यास नवल नाहीं.

हिंदुस्थान सरकारनें कांहीं दिवसांपूर्वीच इकडील उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयकरणाबद्दलचें धोरण जाहीर केलेलें आहे. त्या वेळेस बाजारावर कांहींच विशेष परिणाम झालेला दिसला नाहीं. तसें पाहिलें तर सध्या जादा करामुळें सर्व धंद्यांचे नफे कमालीचे मर्यादित झालेले आहेत व राष्ट्रीयकरणामुळें आणखी कमी होणार म्हणून भिण्याचें कारण नाहीं. किंमती नियंत्रित असल्यानें नफे आणखीहि नियंत्रित आहेतच. इकडील रेल्वेज बहुतेक राष्ट्रीय झाल्या आहेत अगर पुढील दहावीस वर्षांत राष्ट्रीय होणार आहेत. रिझर्व्ह बँक ही जरी भागीदारांच्या मालकीची असली तरी भागीदारांचा नफा ४ टक्क्यावर मर्यादित करण्यांत आलेला आहे. यंदा बँकेनें १४ कोट रुपये मध्यवर्ती सरकारला दिले. म्हणजे ज्या जनतेच्या गरजेंतून हा नफा निर्माण झाला तो तिच्याचकडे परत झाला असा अर्थ होतो. आतां हें सरकार जनतेचें नाहीं ही गोष्ट अलाहिदा. हिंदुस्थानांत जे धंदे मक्ते म्हणून गणण्यांत येतील, उदा. लोखंड, पोलाद, वीज वगैरे, त्यांचे राष्ट्रीयकरणास फक्त लेखणीचा फटकारा पुरे. मात्र भागीदारांना त्यांचें भांडवल चालू बाजारभाव लक्षांत घेऊन परत करावें लागेल. कापडाच्या गिरण्यांचें राष्ट्रीयकरण हा इतका सोपा प्रश्न नाहीं. कारण हा धंदा फारच विखुरलेला आहे. तो पुढील अनेक वर्षें, फार काय पिढ्या, राष्ट्रीय करणें दुरापास्त आहे. सरकार वर सांगितल्याप्रमाणें फारतर आहे ती नफ्यांची मर्यादा कायम राखील. सध्याचे बाजारभाव या भूमिकेवरच अधिष्ठित झालेले आहेत म्हणून राष्ट्रीयकरणाच्या भीतीनें भाव खाली जातील हें असंभवनीय. चलनसंकोच वगैरे कारणांनीं खाली गेले तर ती गोष्ट निराळी.

### बहुपत्नीकत्वास आळा बसणार नाहीं

बहुपत्नीकत्वाचा कायदेशीरपणा नाहींसें करणारें व घटस्फोट नियंत्रित करणारें एक बिल इजिप्तच्या पार्लमेंटांत आणण्याचा तेथील सरकारचा विचार होता, परंतु धार्मिक पुढाऱ्यांचा त्यास मोठा विरोध असल्यामुळें बिल मांडण्याचा विचार सोडून देण्यांत आला आहे.


पुणें नगरपालिकेचें चार टक्के दरांचें कर्ज

## टेंडर जाहिरात

पुणें नगरपालिकेनें उभारलेल्या रकम रुपये ८,४०,००० चें कर्जाचीं टेंडरें देण्याची मुदत पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें दिनांक १४ ऑगस्ट १९४५ रोजीं संपत आहे.

टेंडरासाठीं जे इसम दरशेंकडा रुपये १०० पेक्षां जास्त दर देतील त्यांचींच टेंडरें विचारांत घेतलीं जातील. दिनांक २-८-१९४५.

पुणें नगरपालिका,
विश्रामबाग वाडा,
जाहीरात क्रमांक १२६
दिनांक २-८-४५.

सही–जी. एम्. खोपकर,
चीफ ऑफिसर,
पुणें नगरपालिका.

## WANTED

Bank Manager; Assistant Managers; Accountants; Cashiers and Clerks. Apply with testimonials and full particulars; stating minimum Salary expected. No interview unless called for.

**BANK OF POONA, LIMITED,**
*595, Budhwar, POONA.*

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

## नोटीस

दि. २० ऑगस्ट, १९४५ रोजीं कंपनीच्या शेअर रजिस्टरवर नांव असलेल्या शेअरहोल्डर्सना दि. ३० जून १९४५ अखेर पुऱ्या झालेल्या सहामाहीचें दर शेअरला रु. २ ( दोन ) प्रमाणें इंटेरिम डिव्हिडंड दि. १५ ऑक्टोबर १९४५ पासून देण्यांत येईल. तरी पत्ता बदलला असल्यास तावडतोब कळवावें.

कंपनीचीं शेअर ट्रान्स्फर बुकें मंगळवार दि. २१ ऑगस्टपासून शुक्रवार दि. ३१ ऑगस्ट १९४५ पर्यंत बंद राहतील.

ओगलेवाडी, (सं. औंध),
सातारा जिल्हा.
दि. ३० जुलै, १९४५.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून,
एस. पी. ओगले आणि कंपनी,
एजंट्स.

## पूना गेस्ट हाऊस

: संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९




फौंटनपेनकरतां
कॅमल इंक
सर्व
पसंत करतात.
दांडेकर आणि
कंपनी, मुंबई २८

# स्फुट विचार

## चीनमध्यें चलनाची व महागाईची विलक्षण वाढ

युद्धामध्यें चीनला लढाऊ सामुग्री बाहेरून मिळूं नये असा आटोकाट प्रयत्न जपाननें केलेला आहे. तो हाणून पाडून मित्र-राष्ट्रें ह्या मालाचा पुरवठा करीत आहेत. तथापि चीन देशाचा आयात-निर्गत व्यापार जपाननें केलेल्या कोंडमाऱ्यांत संपुष्टांत आला आहे आणि मालाचें अंतर्गत उत्पादन लढाऊ व बिनलढाऊ गरजा भागवण्यास सर्वस्वी अपुरें पडत आहे. तसेंच, चिनी सरकारास खर्चासाठी लागणारा पैसा कागदी चलन काढूनच उभारावा लागत आहे. ह्या अमर्याद चलनवाढीमुळें चीनमध्यें विलक्षण महागाई झाली आहे. त्या देशांतील घाऊक बाजारभाव १९३७ सालाच्या मानानें १,२०० पट चढले आहेत. गेल्या वर्षाच्या मार्च महिन्यांत हें प्रमाण २३० होतें आणि जूनमध्यें तें ४३८ झालें. अशा रीतीनें चिनी जनतेच्या रहाणीची महागाई सतत वाढणाऱ्या प्रमाणांत चढत आहे. चिनी हुंडणावळीचा दर नियंत्रित असला तरी त्यासंबंधांत काळा बाजार माजून राहणें अपरिहार्य आहे. चीनमध्यें मालाचें उत्पादन अत्यंत अपुरें आहे आणि त्याचा बाहेरून व्हावयाचा पुरवठा युद्धपरिस्थितीमुळें अत्यंत मर्यादित झाला आहे. काळया बाजाराविरुद्ध योजण्यांत येणारे कडक उपाय निष्फळ ठरत असल्यास ह्या कारणानें त्यांत नवल नाहीं. चलनविस्तारावर चिनी सरकार किती वेळ अवलंबून रहाणार आणि त्यावर आपल्या जनतेस कसें जगवणार हा अत्यंत विकट प्रश्न झाला आहे. अंतस्थ राजकीय व सामाजिक परिस्थितीवरहि त्याचे परिणाम झाल्यावांचून रहावयाचे नाहींत.

---

## हिंदी कारखानदारांचा इंग्लंड-अमेरिकेंतील दौरा

हिंदुस्थानच्या औद्योगीकरणासाठी अपरिहार्य असलेल्या यंत्र-सामुग्रीच्या पुरवठ्याचे संबंधांत इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील कारखान्यांची पहाणी करून जमल्यास तेथील धंदेवाल्यांशीं खरेदी-विक्रीचे करार करण्याचे हेतूनें तिकडे गेलेल्या हिंदी धंदेवाल्यांचा दौरा संपत आला असून हे लोक परत येण्याच्या तयारींत आहेत. त्यांनीं इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत उपयुक्त माहिती मिळवली आहे आणि व्यावहारिक स्वरूपाचा विचारविनिमयहि केला आहे. अशाच कार्यासाठी तिकडे दौऱ्यावर गेलेले हिंदुस्थान सरकारचे मंत्री सर आर्देशीर दलाल, हेहि स्वदेशाच्या मार्गावर आहेत. स्वतःचें उद्दिष्ट व कार्यक्रम ह्यांचे विषयीं ह्या लोकांनीं वेळोवेळ काढलेले उद्गार प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून त्यांच्या प्रयत्नांची फलनिष्पत्ति विशेष उत्तेजनकारक नाहीं असें दिसतें. मि. टाटा तर असें म्हणतात कीं अमेरिकन कारखानदार अजून युद्धसामुग्री बनवण्यांत गुंतले असल्यानें युद्धोत्तर काळांतील मालाच्या निर्गती-संबंधानें ते आज कांहींच निश्चित बोलूं शकत नाहींत. ब्रिटिश आणि अमेरिकन कारखानदारांस हिंदुस्थानच्या औद्योगीकरणा-विषयीं पूर्ण सहानुभूति वाटत आहे, परंतु त्यांत किती व कसा भाग स्वतःस घेतां येईल ह्या संबंधानें स्पष्ट कल्पना त्यांस बांधतां येत नाहीं. आणखी वर्ष दीड वर्षाच्या अवधीनंतर आपण पुनः अमेरिकेस भेट दिल्यास तिचा अधिक व्यावहारिक उपयोग होईल असें मि. टाटा ह्यांनीं बोलून दाखविलें आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका आणि डॉलर्समधील हुंड्यांचा पुरवठा ह्यांचे बाबाबत प्रश्न अजून सुटावयाचा आहे. सर आर्देशीर स्वदेशीं परत आल्यावर त्यांच्या कामगिरीची फलश्रुति काय आहे हें समजेल आणि हिंदी कारखानदारांच्या दौऱ्याच्या परिणामांची कल्पना त्यांच्या अधिकृत वृत्तांतावरून येईल. तूर्त प्रस्तुत बाबतींत अनिश्चितपणाचें वातावरण पसरलेलें दिसत आहे.

---

### " यंत्रें घ्या, पण भागीदारी द्या "

हिंदी कारखानदारांचा इंग्लंड-अमेरिकेंतला दौरा प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें यशस्वी झालेला नाहीं ह्या अनुमानास सर आर्देशीर दलाल ह्यांनीं लंडनमध्यें काढलेल्या उद्गारांमुळें पुष्टी मिळत आहे. ब्रिटिश व अमेरिकन कारखानदार, हिंदुस्थानास हव्या असलेल्या यंत्रसामुग्रीच्या विक्रीबाबत नक्की सौदे करण्यास तयार नाहींत ह्या कारणानें सदरहु व्यवहार पुढें ढकलण्यांत येणें क्रमप्राप्त आहे आणि ह्या देशाच्या औद्योगीकरणाचा कार्यक्रम लांबणीवर पडणार आहे. सर आर्देशीर ह्यांनीं ह्याहिपेक्षा अधिक महत्वाच्या अडचणीचा निर्देश आपल्या मुलाखतींत केला आणि ती म्हणजे ब्रिटिश व अमेरिकन कारखानदार यंत्रांच्या विक्रीच्या करारांत घालीत असलेल्या भागीदारीच्या अटीसंबंधांतील होय. ज्या हिंदी धंद्यांस आम्हीं यंत्रें पुरवूं त्यांमध्यें आम्हांस सत्तेचा अंश मिळाला पाहिजे असें ते म्हणत आहेत. असल्या मागणीची बातमी मागेंच प्रसिद्ध झाली होती आणि प्रो. हिल ह्यांनीं तिचा उल्लेख केला होता. ती खरी असल्याचें आतां सर आर्देशीर स्पष्टच सांगत आहेत. त्यांत समाधानाची गोष्ट ही आहे कीं हिंदुस्थान सरकारच्या ह्या जबाबदार मंत्र्यांनीं अधिकारयुक्त वाणीनें ब्रिटिश कारखानदारांस असें स्वच्छ बजावलें आहे कीं हिंदुस्थानचा स्वतःचे वाढते धंदे आपल्याच हातांत सर्वस्वी ठेवण्याचा निश्चय आहे आणि ज्यांस हें मान्य असेल त्यांचेकडूनच हा देश यंत्रें विकत घेईल.

---

## आक्रमक नात्सी मनोवृत्तीचें निर्मूलन

पॉट्सडॅम येथें जर्मनीचें भवितव्य आणि तदनुषंगिक प्रश्न ह्यांची चर्चा होऊन त्यांच्या संबंधांतील निर्णय त्रोटक रीतीनें प्रसिद्ध झाले आहेत, त्यांमध्यें हिटलरशाहीच्या ध्येयांचीं व साधनांचीं पाळेंमुळें खणून टाकण्याचा दृढनिश्चय मूलभूत महत्त्वाचा आहे. अलीकडच्या काळांतील आक्रमक युद्धें दिवसानुदिवस आधुनिक भौतिक शास्त्रांच्या व मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक संघटनेच्या जोरावर अधिकाधिक आधारलीं जात आहेत. आरमारें, लढाऊ विमानें, पाणबुड्या, नावा, स्फोटकारक व दाहक गोळे, स्वयंचालक रणगाडे, चिलखती गाड्या इत्यादि विनाशक सामुग्रीच्या सहायानें जर्मनीनें युरोपांत धुमाकूळ घातला. असलीं घातुक साधनें निर्माण करण्याचें कारखाने जर्मनीस यापुढें काढतां येऊं नयेत अशी व्यवस्था करण्याचें पॉट्सडॅमच्या परिषदेनें ठरवलें आहे आणि जर्मनी शांततामय कृषिप्रधान देश बनावा असें धोरण निश्चित करण्यांत आलें आहे. आक्रमक युद्धामार्गे असलेली आणि नात्सी नेत्यांनीं जर्मन जनतेच्या मनांत दृढमूल केलेली विपरीत संस्कृति आणि स्वातंत्र्य व माणुसकी नष्ट करणारीं तत्त्वें समूळ काढून टाकून तिच्या जागीं लोकशाही, शांतताप्रियता, न्याय व समता ह्यांस अनुकूल असलेल्या विचारांच्या ध्येयांचीं बीजें रोवणें हें कठिण कार्य मित्रराष्ट्रांनीं आपल्या अंगावर घेतलें आहे. मागील महायुद्धानंतर जर्मनींत सोटेशाहीचा उदय झाला, त्याची पुनरावृत्ति होण्याचा संभवहि असूं नये अशा रीतीचें धोरण तेथें अमलांत यावयाचें आहे. जर्मनीची आर्थिक व सांस्कृतिक घटना वरील मुलभूत तत्त्वांस अनुसरून घडवण्याचें पुढारी मित्रराष्ट्रांनीं ठरवलें आहे.

## —त्वरा करा—

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ताः—

**तुळजाराम मोदी**

मोतीचौक, सातारा.

## येत्या गणपति उत्सवांत

**रोख रुपये १०० चीं बक्षिसें मिळवा**

**— फक्त शाळेंतील मुला-मुलींसाठीं —**

फडके प्रॉडक्टस् मुंबई या गृहउद्योगमंदिराचे विद्यमानें येत्या गणेशोत्सवांत मुंबई, पुणें, महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं प्रचारार्थ झंबो, जिंटो, सँडो, खाजाव या आधुनिक, पौष्टिक, सात्विक, आरोग्यवर्धक खाद्यपदार्थांचे प्रचारासाठीं कंपनीचे सोल अेजंट हरीभाऊ भंडारे, खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, गाडीखाना, पुणें यांनीं २० वर्षांचे आंतील शाळेंतील मुला-मुलींना "खाजावचें गाणें" रचून व गाऊन दाखविण्याबद्दल १०० रुपयांची रोख बक्षिसें ठेवलीं आहेत. तरी या गाण्याच्या चढाओढींत भाग घेणारांनीं हरीभाऊ भंडारे यांचेकडे नांवें नोंदवावींत. मेळेवाल्यांनाहि या संधीचा फायदा घेतां येईल. आतांपासून रचावयास लागा. तयारी करा. ही संधी पुन्हा येणार नाहीं.

फडके प्रॉडक्टस् मुंबई

## झंबो-जिंटो-सँडो-खाजाव

सोल अेजंट—हरीभाऊ भंडारे पुणें.

**एजन्सीसाठी समक्ष भेटावें.**

## EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd.,**

*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*

Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

## डोंगरे यांच्या बालामृतानें

अशक्त मुलें सशक्त होतात

तुमच्या पैशाचा योग्य मोबदला






सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

## आशा

*Asha*

**सौंदर्य साधनें**

विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

**( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )**

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

**दि आयडिअल इन्स्टिट्यूट**

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

——कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.——

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




**व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.**

मुंबई.

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः—

**द. ना. हेजीब**

## नोगींचें डोंगर छाप

'शुद्ध निलगिरी तेल.'

नोगी आणि कं. मुंबई ४

### ड्राफ्ट हिंदु कोडाचा विचार *

हिंदु धर्मशास्त्राचें कोडांत रूपांतर करण्याच्या हेतूनें हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या हिंदु लॉ कमिटीनें तयार केलेलें ड्राफ्ट हिंदु कोड प्रसिद्ध होऊन बरेच दिवस होऊन गेले. पण कांहीं लोक याबाबत उदासीन म्हणून व कांहींना कार्यबाहुल्यामुळें फुरसत नाहीं म्हणून अशा बऱ्याच लोकांस या ड्राफ्ट कोडाबद्दल असावी तितकी माहिती नाहीं. अशा लोकांच्या दृष्टीनें सातारचे सुप्रसिद्ध वकील श्री. गजेन्द्रगडकर यांनीं लिहिलेला हा छोटासा निबंध अतिशय उद्बोधक वाटेल. निबंधाच्या पहिल्या भागांत या कोडाचा सारांश दिलेला आहे. यावरून वारसाहक्क, विवाह व लग्नविच्छेद, दत्तक इत्यादींबाबत सदर कोडांत काय तरतूद केलेली आहे याची पूर्ण कल्पना येण्यासारखी आहे. निबंधाच्या दुसऱ्या भागांत सदर कोडास विरोध करणाऱ्यांकडून जे आक्षेप घेतले जातात त्यांस लेखकानें समर्पक उत्तरें दिलीं आहेत. इंग्लिश भाषा जाणणाऱ्या प्रत्येक इसमानें हा निबंध अवश्य वाचावा असें आम्हीं सुचवितों. हा निबंध मराठींत प्रसिद्ध झाला असता तर त्याचा अधिक उपयोग झाला असता. —के. व्ही. दिक्षित, बी. ए. एलएल. बी.

* ले.—श्री. के. बा. गजेन्द्रगडकर, बी. ए. ( ऑ. ), एलएल. बी. वकील, सातारा.

### दुधाचा प्रश्न *

दुधाचें आहारांतील महत्त्व सुप्रसिद्ध आहे. तथापि, हिंदुस्थानांत आणि त्यांतहि मुंबई प्रांतांत दुभत्या जनावरांची संख्या घटत चालली आहे. लोकसंख्या मात्र वाढत आहे. हिंदुस्थानांत दरमाणशी दुधाचा उठाव ६ औंस आहे; इंग्लंड, कॅनडा, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, ह्यांपैकी कोणत्याहि देशांत तो २० औंसांपेक्षा कमी नाहीं. हिंदुस्थानांतील मृत्युसंख्या जबर असल्यास त्यांत नवल नाहीं. दुभत्या जनावरांची संख्या कमी होत चालली आहे, त्याकडे कोणाचें लक्ष नाहीं. सध्या त्यासंबंधांतील परिस्थिति तर विशेष गंभीर झाली आहे. सरकारनें ती सुधारण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत, परंतु त्यांचा फारसा उपयोग झालेला दिसत नाहीं. श्री. मनकड ह्यांनीं पीपल्स प्रॉव्हिन्शियल फूड कौन्सिलकरितां लिहिलेल्या "मिल्क प्रॉब्लेम" ह्या छोट्या पुस्तकांत वरील प्रश्नांचें स्वरूप थोडक्यांत वर्णन करून सांगितलें असून उपाययोजना सुचविली आहे.

* Milk Problem ले.:—जे. एन. मनकड, पद्म पब्लिकेशन्स लि. चें प्रकाशन, पृ. सं. १९, किं. ८ आ.

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. मुंबई यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५–८–४५
२२–९–४५

व्याज–वजा ( xd )
इंदूर माळवा रु. ३५– २७–८–४५
कोहिनूर रु. ९ सं. दि. १९–९–४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संचित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार दि. ३१।७।४५ | बुधवार १।८।४५ | गुरुवार २।८।४५ | शुक्रवार ३।८।४५ | सोमवार ६।८।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २२०२—८ | | २२२६—४ | २२२८–१२ | २२१७—८ |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०९—० | | ४१३—० | ४०९—८ | ४०८—८ |
| २२०१; १६९५ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९५७—८ | —टिळक पुण्यतिथिनिमित्त सुट्टी— | १९७२—८ | १९७२—८ | १९६७—८ |
| ७६५; ५३३ | ९—–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०९—८ | | ६११—८ | ६०७—८ | ६०२—८ |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५४८—० | | ५५२—० | ५४७—८ | ५४६—० |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३८४—० | | ३८७—० | ३८३—० | ३८०—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २९३—८ | | २९४—८ | २९३—० | २९०—० |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३०२—० | | ३०४—० | ३०२—० | ३०१—० |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३०२—८ | | ३०५—० | ३०९—० | ३०४—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४—३–० | | ४—१–९ | ४—१–० | ४—१–० |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४—४–० | | १४–५–० | १४–२–६ | १४–१–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | २–१५–३ | | २–१४–९ | २–१४–९ | २–१४–० |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७५७—८ | | ७५७—८ | ७५५—० | ७५०—० |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २०९—८ | | २०९—० | २०८—८ | २०८—० |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२०—० | | २१९—८ | २१९—० | २१९—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३२—८ | | ५३२—८ | ५३२—८ | ५३०—० |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३६–१३ | | ३६–१४ | ३६—८ | ३६–१५ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१–१५ | | १०१–१५ | १०२—३ | १०२–६–० |

सोमवार दि. ६–८–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—७ |
| १९५१–५४ | १०१—६ |
| १९५७ | १००—९ |
| १९६३–६५ | ९९—२ |
| १९६६–६८ | ९८—६ |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा * | १४९—० |
| सेंट्रल | ८५–१२ |
| इंडिया | १८९—८ |
| इंपी० | २२२५—० |
| | ५६३–१२ |
| रिझर्व्ह | १४०—८ |
| युनियन | ९—४ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८३०—० |
| बॉम्बे ट्रॅम | १४६—० |
| टाटा हायड्रो | २०३—८ |
| टाटा पॉवर | १८८७–८ |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४२१—४ |
| बॉंबे स्टीम | ६१०—० |
| न्यू इंडिया | ८२—० |
| शिवराजपुर | ५२—० |
| टाटा केमिकल | १९—६ |
| टाटा ऑईल | ७१–१२ |
| 'विमको' | ११६—४ |

* व्याज रु. २–८–० † १८–८–४५

## उच्च सहकारी शिक्षणाची पुण्यांत सोय

### ता. २० ऑगस्टला वर्ग सुरू होणार

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें उच्च सहकारी शिक्षणाची सोय पुणें येथें बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या जागेंत करण्याचें ठरवलें आहे. ह्या शिक्षणाचा वर्ग २० ऑगस्टपासून चालू होईल आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तो रोज संध्याकाळीं ६ ते ७ वाजेपर्यंत चालवला जाईल. सहकारी डिप्लोमा परिक्षेसाठी विद्यार्थी तयार करण्यांत येतील आणि सहकाराशी संबंध असलेल्या नऊ विषयांचें शिक्षण दिलें जाईल.

प्रमुख सहकारी तज्ज्ञ आणि कॉलेज प्राध्यापक ह्यांचेकडे शिक्षणाचें काम सोपवण्यांत आलें आहे, आणि अभ्यासक्रम २० ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर आणि १२ नोव्हेंबर ते ३१ मार्च अशा दोन कालखंडांत विभागला जाईल. सहकारी डिप्लोमाची परीक्षा एप्रिलमध्यें घेण्यांत येईल. मॅट्रिक पास झालेल्या कोणासहि वर्गांत नांव घालतां येईल. वर्गाची फी दर सहामाहीस २५ रुपये आहे. वर्गांत दाखल होण्यासाठी अर्ज १० रुपये अगाऊ भरून इन्स्टिट्यूटचे चिटनवीस, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें यांचेकडे १५ ऑगस्टचे आंत करावे. अर्जाचे नमुने त्यांचेकडे स दर पत्त्यावर मिळतील. अधिक माहितीहि तेथेंच मिळेल.

---

### विमा कंपन्यांचें सट्टेबाजांपासून संरक्षण

हिंदी विमा कंपन्यांच्या कारभारांतील कांहीं अनिष्ट प्रकारांस आळा घालून उपाययोजना सुचविण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें सर कावसजी जहांगिर ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती. तिनें चौकशी करून एकमतानें सूचना केल्या आहेत. बँका आणि विमा कंपन्या ह्यांच्या हितसंबंधांची गुंतागुंत टाळण्यासाठी, एका व्यक्तीस मध्यवर्ती सरकारच्या परवानगीशिवाय कोणत्याहि कंपनीच्या विक्रीस काढलेल्या भांडवलाच्या १०% पेक्षा अधिक भाग घेतां येऊं नयेत, अशी कायद्याची तरतूद तिनें सुचविली आहे. विमा कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डाचें रकम गुंतविण्याचे अधिकार मर्यादित करावे, अशीहि कमिटीची शिफारस आहे. कोणत्याहि विमा कंपनीस स्वतःच्या पैशाच्या ठराविक प्रमाणाबाहेर रकम दुसऱ्या कंपनीच्या भागांत गुंतवितां येऊं नये व त्या कंपनीच्या भागांच्या कांहीं ठराविक प्रमाणांतील भागांपेक्षा अधिक भाग विमा कंपनीस धारण करतां येऊं नयेत, अशी कायद्यानें तरतूद करावी असाहि कमिटीचा अभिप्राय आहे. विमा कंपन्यांच्या मॅनेजिंग डायरेक्टरांचें वेतन त्याच्या कामाच्या मानानें किंवा कंपनीच्या परिस्थितीच्या मानानें भरमसाठ असूं नये ह्या दृष्टीनें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला चौकशी करून स्वतःची खात्री करून घेण्याचा अधिकार देण्यांत यावा, अशीहि जहांगिर कमिटीची शिफारस आहे. विमा कंपन्या काबीज करण्यासाठी चालविलेल्या कारवाया बंद पाडून, कंपन्या सट्टेबाजांच्या हातीं न जाऊं देण्यास जहांगिर कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी सरकारास सहायकारक होईल अशी अपेक्षा आहे. कंपनीवाल्यांचा त्यास विरोध होणें स्वाभाविक असलें तरी विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें विमा व्यवसायाचा दर्जा राखला जाणें आवश्यकच आहे.

---

...इतिहासाला तेजस्वी करणारा...
महान बादशहा
'हुमायूं'
निर्माते व दिग्दर्शक : महेबूब — — 'मेहबूब' चित्र
छाया—फरेदुन इराणी, संगीत—गुलाम हैदर, कला—पळणीटकर
भूमिका—अशोककुमार, नर्गीस, वीणा, चंद्रमोहन, शहानवाझ.
लोकप्रियतेचा २ रा महिना !
पुणें, पॅरेमाऊंट रोज : ३ खेळ ३।, ६॥ व १०
रिझर्वेशन : सकाळीं १० ते ११॥

'पन्ना' खुनी होती...
'पन्ना' फरारी झाली होती...
पण आपल्या हजारों देशबांधवांचे प्राण रक्षण करून
तिनें थोर पुण्य साधलें ! पहा—
नवयुगाचा नवा सामाजिक बोलपट !
पन्ना
दिग्दर्शक— नजम नकवी.
—भूमिका—
मीता निजामी, जयराज, डेविड, कुसुम देशपांडे.
७ वा आठवडा !
श्रीकृष्ण—पुणें
फोन नं. ९१००१
रोज ६॥ व १० वाजतां.
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३॥ वा.
आगाऊ ति. विक्री थिएटरवर नेहेमीप्रमाणें.
—पिअरलेस प्रकाशन—

कौटुंबिक जीवनाधारावर प्रकाश पाडणारा 'बा—पट'
'इषारा'—प्रसिद्ध डी. आर. डी. चे दुसरें समाजरत्न
म्हणजेच
आयना 'आरसा' सासू
अर्थात
लोकावडीचा ४ चौथा सातवडा !
राजकुमारी, सुलोचना, याकूब, लीला, कौसल्या, गोप, त्रिलोक, मिर्झा.
—डेक्कन, पुणें—
रोज फक्त २ खेळ ७ व १० वा.
शनि, रवि. सोम. व सुट्टीचे दिवशीं मॅटि. ४ वा. रिझर्वेशन १० ते १२

हें पत्र पुणें, पेठ मोबुद्री घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास' मोबुद्री घ. नं. १२४।११ पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.





REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १५ ऑगस्ट, १९४५ अंक ३३



## —: साठे बिस्किटें :—

**ऑरेंज व क्रूसबरी**

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्तीचा काळ जवळ येत जाईल, तसतशीं परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

**हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई**

**खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर**

—शाखा—

स्थानिकः—१ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँट रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्ले, ७ माटुंगा.

इतरः—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| अधिकृत व विक्रीस | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ३,६७,९५५ |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ३५,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्ट्स दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे मॅ. डायरेक्टर

## विविध माहिती

**हेन्री फोर्डचा ८२ वा वाढदिवस**

सुप्रसिद्ध मोटर कारखानदार, मि. हेन्री फोर्ड, ह्यांनीं आपला ८२ वा वाढदिवस नुकताच साजरा केला.

**इंग्लंडमध्यें हिंदी मालकीची ग्रंथप्रकाशक कंपनी**

हिंदी मालकीची एक ग्रंथप्रकाशक कंपनी इंग्लंडमध्यें स्थापन व्हावयाची आहे. हिंदुस्थानासंबंधाचे ग्रंथ ती मुख्यत्वेंकरून प्रकाशित करील.

**स्वस्त मोटारींची हिंदुस्थानांत बनावट**

ह्या देशांतील लोकांच्या अल्प प्राप्तीच्या दृष्टीनें येथें स्वस्त मोटारी बांधण्याचा विचार एका हिंदी तज्ज्ञानें केला आहे.

**महाराष्ट्रांतील गुळाची निर्गत**

महाराष्ट्रांतील गूळ कर्नाटकांत जाण्यावर रेल्वेनें निर्बंध घातल्याकारणानें महाराष्ट्रांतील गूळ विजापूर व धारवाड जिल्ह्यांकडे पाठविणें शक्य होत नाहीं. कोल्हापूरमधील गूळ तिकडे पाठविण्यांत येत आहे. महाराष्ट्रांतील जिल्ह्यांत त्यामुळें गूळ जादा शिल्लक राहील, त्याचा उठाव करण्यासाठी पुणें जिल्ह्यांतील ७,००० टन, अहमदनगर जिल्ह्यांतील २,००० टन व सोलापूर जिल्ह्यांतील ५०० टन गूळ मध्यप्रांत आणि वऱ्हाड, हैद्राबाद, बडोदें व गुजरातमधील संस्थानें इकडे पाठविण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**टाटा मिल्स लि. ची मॅनेजिंग एजन्सी**

टाटा मिल्स लि. ची मॅनेजिंग एजन्सी टाटा सन्स लि. कडे होती. तिचेऐवजी टाटा इंडस्ट्रीज लि. ला आतां मॅनेजिंग एजंट्स नेमण्यांत आलें आहे. टाटा इंडस्ट्रीज लि. चे सर्व भाग भांडवल टाटा सन्स लि. च्याच मालकीचें आहे.

**हुंडा घेतल्याबद्दल दंड**

लग्नांत हुंडा घेणें बेकायदा करणारा कायदा सिंधमध्यें अमलांत आला आहे. त्याचा पहिला बळी सक्कर येथील गोपाळदास तीर्थदास ह्यास ४,५०० रुपये हुंडा घेतल्याबद्दल २०० रुपये दंडाची शिक्षा आली.

**ॲक्चुअरींची परीक्षा**

इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजची प्राथमिक परीक्षा ता. २८ जानेवारी व २९ जानेवारी १९४६ रोजीं होणार आहे. त्यासाठी उमेदवारांचे अर्ज व पैसे लंडन येथें १९ नोव्हेंबर १९४५ चे आंत पोचले पाहिजेत.

**छत्र्या बनविण्याची सरकारी योजना**

हिंदुस्थानांत १,५२,००० छत्र्या तयार करण्याची योजना सरकारनें आखली आहे. मुंबई, अहमदाबाद, सुरत, जोधपूर, नडियाद, हुबळी, कलकत्ता, मद्रास, कालिकत, मंगलोर व दिल्ली येथें त्यांचें उत्पादन केलें जाईल.

**सुधारलेल्या जातींच्या बियांचा प्रसार**

तांदूळ, बाजरी, गहूं, ज्वारी, तूर वगैरे [illegible] खाद्य धान्याच्या सुधारलेल्या जातींच्या बियांचा प्रसार व्हावा, ह्यासाठी त्यांचें उत्पादन सध्याचीं मुंबई प्रांतातील सरकारी फार्म्स व त्यांचे शेजारील खंडानें घेतलेली २६५ एकर जमीन ह्यांत करण्यांत यावयाचें आहे. सरकारच्या "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचा एक भाग म्हणून अशा बियांचें उत्पादन व प्रसार करण्याचा सरकारचा विचार आहे. त्याप्रीत्यर्थ पांच वर्षांत मिळून ३,८४,५५७ रुपये खर्चण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. हिंदुस्थान सरकार १९४५–४६ मध्यें २१,००० रुपये व १९४६–४७ मध्यें २५,००० रुपये देणार आहे. १९४६–४७ नंतर ह्या योजनेचा युद्धोत्तर योजनेंत अंतर्भाव केला जाईल.

**—त्वरा करा—**

ज्या तरुणांना सैन्यांत भरती होणेचें असेल त्यांनीं त्वरित येऊन भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

भरती कोणत्याहि खात्यांत केली जाईल.

पत्ताः—

**तुळजाराम मोदी**

मोतीचौक, सातारा.

**येत्या गणपति उत्सवांत**

**रोख रुपये १०० चीं बक्षिसें मिळवा**

— फक्त शाळेंतील मुला–मुलींसाठीं —

फडके प्रॉडक्टस् मुंबआी या गृहउद्योगमंदिराचे विद्यमानें येत्या गणेशोत्सवांत मुंबआी, पुणें, महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं प्रचारार्थ झंबो, जिटो, सँडो, खाजाव या आधुनिक, पौष्टिक, सात्विक, आरोग्यवर्धक खाद्यपदार्थांचे प्रचारासाठीं कंपनीचे सोल अेजंट हरीभाऊ भंडारे, खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, गाडीखाना, पुणें यांनीं २० वर्षांचे आंतील शाळेंतील मुला-मुलींना "खाजावचें गाणें" रचून व गाऊन दाखविण्याबद्दल १०० रुपयांची रोख बक्षिसें ठेवलीं आहेत. तरी या गाण्याच्या चढाओढींत भाग घेणारांनीं हरीभाऊ भंडारे यांचेकडे नांवें नोंदवावींत. मेळेवाल्यांनाहि या संधीचा फायदा घेता येअील. आतांपासून रचावयास लागा. तयारी करा. ही संधी पुन्हा येणार नाहीं.

फडके प्रॉडक्टस्, मुंबआी

**झंबो-जिंटो-सँडो-खाजाव**

सोल अेजंट–हरीभाऊ भंडारे, पुणें.

एजन्सीसाठीं समक्ष भेटावें.

**EVERYTHING IN RUBBER GOODS**

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd.,**

*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*

Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"



अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## सर चिंतामणराव देशमुख ह्यांचें मार्गदर्शक भाषण

### संक्रमण काळांत दक्षता बाळगण्याचें महत्त्व

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची ११ वी वार्षिक सभा दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत झाली, त्यावेळीं बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं अध्यक्षपदावरून केलेलें भाषण अत्यंत उद्बोधक झालें. युद्धपरिस्थितींतून शांततेच्या काळांत जाण्याच्या हिंदी संक्रमणावस्थेच्या अडचणी त्यांनीं स्पष्ट करून सांगितल्या. मालाची व नोकरींची युद्धजन्य लष्करी मागणी कमी होतांच उद्भवणाऱ्या प्रसंगावर उपाययोजना तयार ठेवली नाहीं, तर कांहीं काळ तरी आर्थिक घडी बिघडल्यासेरीज रहाणार नाहीं, असा इषारा त्यांनीं दिला व त्याबाबत सरकारास कांहीं सूचनाहि केल्या. सरकारनें योजना आखतांना केवळ किफायतशीरपणावर दृष्टि न ठेवतां, देशाचें व जनतेचें व्यापक हित आपल्यापुढें ठेवावें, असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमध्यें बरेंच मोठें येणें साठलें आहे, त्यावर पुष्कळशी भिस्त ठेवण्याची प्रवृत्ति आढळून येते; परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत त्या येण्याचा अपेक्षेइतका उपयोग करून घेणें अवघड जाईल, हें सर चिंतामणराव ह्यांनीं स्पष्ट केलें.

हिंदी बँकिंगचे क्षेत्रांतील कांहीं अयोग्य प्रवृत्तींचा त्यांनीं उल्लेख केला. ह्या प्रवृत्तींचा प्रसार किती व्यापक आहे, हें जरी आज निश्चितपणें सांगता आलें नाहीं, तरी त्यांस वेळींच आळा घालण्यांत आला नाहीं तर हिंदी बँकिंग व्यवसायावर त्याचा अनिष्ट परिणाम झाल्याविना रहाणार नाहीं. कित्येक बँका इतर बिगर-बँकिंग कंपन्यांचे शेअर खरेदी करून त्यांवर हुकमत चालवूं पहातात. हे भाग खरीदतांना त्यांस किंमत किती द्यावी लागत आहे व त्यांवर व्याज किती सुटत आहे, हें बघण्यांत येतेंच असें नाहीं. ह्या व्यवहारामुळें बँकेच्या स्वतःच्या आर्थिक परिस्थितीवर होणाऱ्या परिणामाकडेहि दुर्लक्ष्य केलें जातें. कित्येक बँका भरमसाटपणें आपल्या शाखांचें जाळें पसरवीत आहेत. ताळेबंद तयार करतांना आकड्यांची विलक्षण ओढाताण केलेली कांहीं बँकांचे बाबतींत दिसून येते. सोडतीच्या स्वरूपाच्या व्यवहारांत कांहीं बँकांना चुकून नफा मिळाला तरी त्यांनीं त्याचा विनियोग गंगाजळी मजबत करण्याकडे न करितां डिव्हिडंड जाहीर करून रकम वाटून टाकण्याकडे केला, असेंहि आढळतें. ह्या प्रकारच्या सर्व प्रवृत्तींस आळा घातला पाहिजे, असें मत सर चिंतामणराव ह्यांनीं व्यक्त केलें. बँकांनीं सरकारकडे भांडवलवाढीस परवानगी मागणारे अर्ज केले, त्यांवर रिझर्व्ह बँकेनें सल्ला देतांना बँकिंगची वाढ इष्ट मार्गानें होईल, ह्याबाबत शक्य ती दक्षता बाळगली. परंतु, तेवढ्यानेंच केवळ भागणें शक्य नसल्याकारणानें, बँकिंगच्या धंद्याचें नियंत्रण करणारें एक बिल तयार करण्यांत आलें. ह्या बिलाचा मसुदा मागेंच प्रसिद्ध झालेला आहे.

वेगवेगळया देशांत चलनविस्ताराचें मान भिन्न भिन्न आहे. युद्धखर्चाचा बोजा जनतेवर टाकावयाचा, तो कर्जाचे स्वरूपांत किती असावा व करवसुलीचे स्वरूपांत किती असावा, ह्याविषयीं ठिकठिकाणीं केलेल्या योजनांत व त्यांच्या अंमलबजावणींत एकवाक्यता नसल्याचा हा परिणाम आहे. सहाजिकच, निरनिराळया देशांत किंमतींची वाढ कमी-अधिक प्रमाणांत झालेली आहे. ज्या मालाची खरेदी-विक्री आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहे, अशा मालाच्या किंमतींत वेगवेगळया देशांत फरक पडतो, त्यामुळें अधिकच अडचणी उपस्थित होतात. ग्रेट ब्रिटनमध्यें मालाच्या उत्पादनास पडणारी किंमत, तो माल हिंदुस्थानांत आणावयास येणारा खर्च व योग्य नफा ह्या सर्वांचे दुप्पट ते तीन पट किंमत त्या मालास हिंदी बाजारपेठेंत मिळूं शकते तेव्हां, ग्रेट ब्रिटनमधील व हिंदुस्थानांतील बाजारभावांत पडणाऱ्या तफावतीचा फायदा कोणास व किती मिळावा, हा महत्त्वाचा प्रश्न येथें उपस्थित होतो. आयात होणाऱ्या मालाची विक्री येथील बाजारांतील प्रचलित महागाईच्या भावानें होऊं दिली, तर विदेशी कारखानदार आणि निर्गतीचे व्यापारी ह्यांची चंगळ उडेल परंतु हिंदी चलनविस्तारास आळा बसविण्याचा व जनतेस स्वस्त माल पुरवण्याचा उद्देश सफळ कसा होणार ? असा प्रश्न सर चिंतामणराव ह्यांनीं उपस्थित केला आहे.

हिंदुस्थानांतील बाजारभाव वाजवीपेक्षा फाजील कडाडलेले असल्याकारणानें हिंदुस्थानानें ब्रिटिश व इतर सरकारांस पुरविलेला माल त्यांस फार महाग पडलेला आहे आणि ग्रेट ब्रिटनमध्यें साठलेलें हिंदी येणें हें खऱ्या येण्यापेक्षां त्यामुळें निष्कारण मोठें दिसत आहे, असा कित्येक वेळा हितसंबंधी बाजूनें युक्तिवाद करण्यांत येतो. सर चिंतामणराव देशमुख ह्यांनीं त्यास चोख उत्तर देऊन, हिंदुस्थानास भांडवली व इतर माल योग्य किंमतीस व अटींवर पुरविला जाण्याचें अगत्य प्रतिपादन केलें. त्यांच्या भाषणांतील हा भाग महत्त्वाचा आहे. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं आपल्या उच्च स्थानावरून हिंदी बाजूचें समर्थन करून राष्ट्रीय हिताचा पुरस्कार करण्याची संधी योग्य रीतीनें साधली, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. भांडवली स्वरूपाचा विदेशी माल महाग पडला, तर त्याचा दुष्परिणाम हिंदी उद्योगधंद्यांवर दीर्घकालीन स्वरूपाचा होईल, ह्याचाहि त्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख करून, वेळींच सावधगिरीची सूचना दिली आहे. एकंदरींत पहातां, सर चिंतामणराव देशमुख ह्यांचें भाषण अत्यंत मार्गदर्शक आणि जबाबदारीनें पूर्ण असें झालें असून सरकारासहि त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. रिझर्व्ह बँकेस हिंदी आर्थिक धोरण आखण्यांत महत्त्वाचें स्थान असावें, अशी जनतेची जुनी मागणी आहे. सर चिंतामणरावांनीं आपल्या भाषणानें त्या मागणीचें रहस्य सिद्ध करून दाखविलें आहे.

---

### बँक ऑफ इंग्लंड सरकारी होणार ?

कामगार पक्षाचें मंत्रिमंडळ ग्रेट ब्रिटनमध्यें आतां अधिकारूढ झालें आहे. त्याच्या समाजसत्तावादी ध्येयवादास अनुसरून बँक ऑफ इंग्लंड सरकारच्या सत्तेखालीं आणली जाईल असें कामगार पक्षाचे एक पुढारी, प्रो. लास्की ह्यांनीं बोलून दाखविलें आहे. ह्या बँकेचें धोरण नेहमीं ब्रिटिश सरकारच्या धोरणाशीं मिळतें आणि राष्ट्रीय स्वरूपाचें असतें, तरी ती संस्था आज सरकारी नाहीं. ह्या स्थितींत क्रांती घडवून आणण्याचा नव्या मंत्रिमंडळाचा बेत आहे. जनतेच्या हिताच्या दृष्टीनें राष्ट्रीय मध्यवर्ती बँकेसारखी चलन व पैसा ह्यांवर प्रभावी सत्ता गाजवणारी संस्था लोकशाही सरकारच्या कह्यांत असणें अगत्याचें आहे ह्या कल्पनेवर ही क्रांतिकारक योजना आधारलेली आहे.

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

मार्च, १९४५ अखेरच्या रिपोर्टांतील महत्त्वाच्या बाबी

(१) बँकेचें खेळतें भांडवल ६५ लाखांनी वाढून तें १,८५,००,००० रुपये झालें. ३१ जून, १९४५ अखेर तें २ कोटि रुपयांवर गेलें आहे.

(२) विक्रीस काढलेलें ९,०३,१७५ रुपयांचें भाग भांडवल खपून गेलें. आणखी २४ लक्ष रुपये दर्शनी किंमतीचे भाग विकण्याची सरकारकडे परवानगी मागितली आहे. ते सर्व खपले, म्हणजे वसूल भांडवल २२,४०,४६० रुपये होईल.

(३) अहवालाचे वर्षी बँकेनें नऊ नव्या ठिकाणीं आपलीं व्यवहार केंद्रें उघडलीं.

(४) शेअर्सच्या विक्रीवर १,०८,३८१ रुपये प्रीमिअम मिळाला. एकूण ६०,२५४ रुपयांचा भांडवली स्वरूपाचा खर्च ह्यापूर्वी जिंदगीचे बाजूस होता, तो पूर्णपणें लिहून टाकण्यांत येऊनहि व भारी वकिली व कोर्टखर्च आणि छपाई खर्च भागवूनहि बँकेस ६३,७६६ रुपयांचा निवळ नफा उरला.

(५) भागीदारांस मिळणारा डिव्हिडंडचा दर कायम राखण्यांत आला आहे.

(६) बाँबे स्टॉक एक्सचेंजवरील शेअर्सचे यादींत बँकेचा शेअर आणण्याचा प्रयत्न चालू आहे.

### दि ट्रॅन्स्पो लि., पुणें

वहातुक आणि मिळकत ह्यांचा धंदा करणारी वरील कंपनी श्री. मा. पं. सोमण, एम. ए. व श्री. श्री. वा. रानडे ह्यांनीं नुकतीच नोंदली आहे.

### कर्जनिवारण कायदा प्रचार

कर्जनिवारण कायद्याचा ज्यास्तींत ज्यास्त फायदा शेतकऱ्यांस मिळावा, म्हणून प्रचारकार्य करण्यासाठी शुक्रवार ता. १० रोजीं मुरबाड येथें सभा झाली. ता. २० रोजीं वसई येथें व ता. ७ सप्टेंबर रोजीं मुरबाड येथें जाहीर सभा होणार आहेत. अर्ज लिहून कोर्टांत दाखल करण्याचें काम करण्यास तयार असतील, अशांच्या खास शिक्षणाची व्यवस्था करण्यांत येणार आहे असें डि. ऑ. ऑ. को. सो. ठाणें श्री. दौ. ज. झुंजारराव हे कळवितात.

### ८,००,००० अमेरिकन सैनिक स्वदेशीं परत

युरोपांतून ८,००,००० अमेरिकन सैनिक अमेरिकेकडे व पॅसिफिक युद्धक्षेत्राकडे आतांपर्यंत रवाना केले आहेत.

### भारत इं. बँकेचें ओझर (तांबट) येथील पे ऑफिस

भारत इं. बँक लि. नें ओझर येथें एक पे ऑफिस १५ जुलै रोजीं उघडलें आहे. ओझर हें गांव नाशीकपासून ११ मैलांवर आहे. उद्घाटन समारंभ श्री. शांतिकुमार [illegible] दास मास्तर, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, ह्यांचे हस्तें झाला.

### युद्धकाळांतहि इंग्रजांचें आरोग्य कसें राहिलें ?

(१) आहाराची शास्त्रीय पद्धतीनें आखणी करण्यांत आली होती, (२) प्रत्येकास भरपूर उद्योग होता, (३) उपलब्ध अन्न खरेदी करण्यास प्रत्येकाजवळ पुरेसा पैसा होता व (४) युद्ध जिंकण्याच्या नादांत सर्व जण स्वतःच्यापेक्षा दुसऱ्याच्या दुःखाचा विचार करण्यांत अधिक मग्न होते. ब्रिटिश मिनिस्ट्री ऑफ हेल्थचे चीफ मेडिकल ऑफिसर, सर विल्यम जेमसन ह्यांनीं युद्धकाळांतहि इंग्रजांचें आरोग्य कसें चांगलें राहिलें ह्याची वरीलप्रमाणें कारणमीमांसा केली.


पहिल्याच वर्षी करमाफ ६ टक्के डिव्हिडंड वाटलें!

## त्रिफला कमर्शिअल कंपनी लि.

मुख्य कचेरी : सरस्वती-विलास, लक्ष्मीरोड, पुणें २

**मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.**

व्याजाचे दर:-एक वर्ष ४½%; तीन वर्षे ५%; पांच वर्षे ६%.

रु. पांचशेच्या खालीं रक्कम स्वीकारली जाणार नाहीं.

व्याज दर सहामाहीस दिलें जातें.

मॅनेजिंग एजंटस् } मा. पं. सोमण, एम. ए. / श्री. वा. रानडे

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

## ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

**BUG COILS (ABC)**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २


Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India-Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent, the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस—पुणें शहर.

एकूण खेळतें भांडवल रु. १,२५,००,०००

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल रु. ५,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या १०,००० भागांत विभागलेलें).

वरील शेअर्स ता. ६-७-४५ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या ४ शेअर्सना १ नवा शेअर याप्रमाणें रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांना तेवढ्याच वाढीनें (रु. ५/-) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५।९।१९४५ ही आहे.

सी. व्ही. जोग,
मॅनेजर.

## स्फुट विचार

### मजूर मंत्रिमंडळ कोणतें धोरण स्वीकारणार?

जपानचा पूर्ण पराभव आणि हिंदुस्थानची नियोजनमूलक आर्थिक प्रगति हें दुहेरी ध्येय कार्यक्षम रीतीनें साधतां यावें ह्याकरितां येथील मध्यवर्ती राज्यव्यवस्थेंत लोकप्रतिनिधींच्या मंत्रिमंडळाची स्थापना अत्यावश्यक आहे ह्या भावनेनें लॉर्ड वेव्हल ह्यांनीं सिमला परिषद् भरवण्याचा लटाटोप केला. हा प्रयत्न तात्पुरता फसला तरी त्याचीं सूत्रें पुन्हां लवकरच हातीं घेण्यांत येतील असें आश्वासन एक महिन्यामागें देण्यांत आलें होतें. मध्यंतरीं इंग्लंडमध्यें कॉन्झरव्हेटिव्ह पक्ष अधिकारच्युत होऊन त्याची जागा कामकरी पक्षाच्या मंत्रिमंडळानें घेतली. हिंदी जनतेच्या राष्ट्रीय आकांक्षांसंबंधानें ह्या विजयीपक्षास विशेष सहानुभूति वाटत असल्यानें त्यास विचारविनिमयास योग्य वेळ मिळतांच ब्रिटिश मंत्रिमंडळ सिमला परिषदेंत स्थगित झालेली चर्चा पुन्हां चालू करून स्वतःची नवीन योजना पुढें मांडील अशी आशा उत्पन्न झाली. परंतु युद्धसमाप्तीच्या पूर्वीच्या काळांत सध्याच्या मध्यवर्ती मंडळाची तात्पुरती पुनर्घटना करण्याऐवजी कायमच्या राज्यघटनेच्या बनावटीचाच प्रश्न एकदम हातीं घ्यावा अशी एक सूचना मध्येंच पुढें आली आहे. ती स्वीकारली गेल्यास प्रगतीचें सबंद गाठोडेंच खुंटीवर टांगल्यासारखें होणार आहे. असें झाल्यास देशाच्या औद्योगिकरणाच्या व आर्थिक पुनर्रचनेच्या शिजलेल्या व शिजत असलेल्या सर्व योजना अनिश्चितकाळपर्यंत पुढें ढकलल्या जातील ही गोष्ट अत्यंत असमाधानकारक अशी आहे. रशिया मित्रराष्ट्रांच्या बाजूनें जपानच्या विरुद्ध युद्धाच्या आखाड्यांत आतां उतरला आहे आणि बाँब हल्ल्यामुळें त्या देशाची राखरांगोळी होत आहे अशा अनुकूल स्थितींत राष्ट्रीय स्वरूपाच्या मंत्रिमंडळाबाबत जनतेच्या मनांत अपेक्षा उत्पन्न झाल्या आहेत, त्यांस दिरंगाईच्या धोरणानें धक्का बसल्यावांचून राहणार नाहीं. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांपुढें अनेक जिव्हाळ्याचे पण कठीण प्रश्न पडले आहेत, आणि ते लोकसत्तानुवर्ती मंत्रिमंडळेंच सोडवूं शकतील ह्याविषयीं मतभेद नाहीं. नवीन ब्रिटिश प्रधानमंडळ ही गोष्ट लक्षांत घेऊन धैर्यानें अडचणींस तोंड देऊन प्रगतीचा मार्ग चोखाळेल अशी आशा आहे. जुन्या चाकोरींतून तें जाऊं लागल्यास त्यांचें धोरण निराशाजनक ठरल्यावांचून राहणार नाहीं.

---

### नवीन अजस्र अस्त्राचे दूरगामी परिणाम

जर्मनीनें बाणाच्या स्वरूपाचीं अस्त्रें इंग्लंडवर फेकून मित्रराष्ट्रांच्या युरोपांतील मोहिमेस कुंठित करण्याचा प्रयत्न केला. असल्याच प्रकारचीं आणखी अनेक शस्त्रें बनवून त्यांचा उपयोग युद्धांत करण्याचा हिटलरचा बेत होता. पण त्याची ह्या बाबतींतली तयारी पुरी होण्यापूर्वींच जर्मनीस शरण यावें लागलें आणि नात्सींची शास्त्रीय कल्पकता फलद्रूप होऊं शकली नाहीं. मित्रराष्ट्रांचे शास्त्रज्ञहि जर्मनी नवीन-नवीन घातुक अस्त्रें बनवण्यांत गुंतला असतांना स्वस्थ बसले नव्हते आणि शत्रूच्या तोडीस तोड देण्याचा त्यांचा प्रयत्न सारखा चालू होता. त्याचें फळ जपानवर अमेरिकनांनीं नुकत्याच सोडलेल्या अजस्र व भयंकर विघातक बाँबमध्यें प्रत्यक्ष दिसून आलें आहे. जपान तात्काळ शरण न आल्यास ह्या नरकाचा पाऊस आपण शत्रूच्या देशावर पाडणार आहों असी घोषणा प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं केली आहे. नवीन बाँबच्या ह्या वर्णनाची यथार्थता त्याच्या नाशकारक प्रचंड व विस्तृत शक्तीचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे त्यावरून सहज येते. लढाऊ विमानांतून टाकण्यांत येणाऱ्या बाँबमुळें आणि दूर अंतरावरून सोडण्यांत येणाऱ्या बाँबफेक्या बाणांच्या योगानें संरक्षक तटबंद्या व राष्ट्रीय सरहद्दी कुचकामाच्या ठरल्या असल्याचा अनुभव अगोदर आलाच आहे. आतांपर्यंत वापरण्यांत आलेल्या बाँबसच्या अनेक पटींनीं अधिक घातुक शक्ती असलेल्या नवीन बाँबनें आधुनिक युद्धपद्धतींत क्रांति घडवून आणली आहे. ह्यापुढें, प्रचंड शस्त्रास्त्रें बनवण्याचें सामर्थ्य असलेल्या बलवान व श्रीमान राष्ट्रांसच युद्धांत जय मिळवण्याची शक्यता रहाणार असल्यानें जागतिक शांततेचें व आंतरराष्ट्रीय सलोख्याचें रक्षण करण्याची जबाबदारी त्यांचेवर सर्वस्वी येऊन पडली आहे. शास्त्रीय शोधांचा दुरुपयोग मानवी संस्कृति व स्वातंत्र्य ह्यांचा नाश करण्याकडे होऊं शकतो हें जर्मनी व इटली ह्यांनीं स्वतःच्या कृतीनें सिद्ध केलें आहे. त्यांचीं अस्त्रें त्यांचेवरच उलटवणें मित्रराष्ट्रांस आवश्यक झालें आहे. तथापि, आतां ह्या प्रकारची शस्त्रास्त्रांची स्पर्धा व शर्यत कायमची बंद झाली पाहिजे आणि युद्धांची शक्यताच नाहींशी केली जाऊन आंतरराष्ट्रीय मतभेद व तंटे तडजोडीनें व सामोपचारानें मिटवले जाण्याची कायमची व्यवस्था होणें अगत्याचें आहे. फ्रिस्को परिषदेंत उभारण्यांत आलेल्या जागतिक घटनेचा हाच उद्देश आहे. त्याच्या महत्त्वाची योग्य कल्पना नवीन बाँबच्या शोधानें करून दिली आहे. त्याच्या दूरगामी परिणामांची जाणीव वृत्तपत्रांत ह्यासंबंधांत व्यक्त करण्यांत आलेल्या विचारांवरून लोकमतास असल्याचें दिसून येत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

---

### आयात-निर्गत व्यापारांतील "अदृश्य" बाबी

परदेशांतून जरूरीचा माल सोयीनें विकत घेतां यावा ह्या हेतूनें राष्ट्रें स्वतःच्या मालाची निर्गत वाढवण्याचा प्रयत्न करीत असतात. ह्या निर्गत-आयात व्यापाराच्या राष्ट्रीय आढाव्यांत प्रत्यक्ष ऐनजिनसी मालाच्या बरोबर कित्येक "अदृश्य" देवघेवीच्या बाबी आढळतात. हिंदुस्थानांत नोकरी करून सेवानिवृत्त झालेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांचीं पेन्शनें, इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जाचें व्याज, ब्रिटिश कंपन्यांनीं येथें मिळवलेला नफा व कामाचा मोबदला इत्यादि "अदृश्य" आयातीची फेड ऐनजिनसी मालाच्या निर्गतीनें ह्या देशास करावी लागली आहे आणि असल्या "होम चार्जेस" चा आकडा कोट्यवधि रुपयांत प्रतिवर्षी मोजावा लागला आहे. ह्याच्या उलट, अमेरिकन लक्ष्मीपुत्र प्रवासी युद्धापूर्वी ह्या देशांत येऊन लाखो रुपये चैनीनें खर्चीत. त्यांचा मोबदला येथील मालाच्या खपाचे स्वरूपांत मिळत असे आणि हा एक प्रकारचा निर्गत व्यापार राष्ट्रीय आढाव्यांत "अदृश्य" गणला जाई. स्वित्सर्लंडमधील सृष्टिसौंदर्य ही अशीच महत्त्वाची अदृश्य निर्गतीची बाब त्या देशाचे बाबतींत आहे. युद्धोत्तर काळांत आपली अदृश्य निर्गत वाढवण्याची ब्रिटिश लोकांची मनीषा असून परदेशांतून खर्चिक प्रवासी आकर्षून घेण्याची पद्धतशीर व्यवस्था त्यांनीं चालू केली आहे. युद्धापूर्वी परकीय प्रवासी प्रतिवर्षी सरासरीनें तीस कोटि रुपये खर्चीत. हा आकडा दुप्पट, तिप्पट करण्याची तेथील हितसंबंधी लोकांची संघटित खटपट चालू आहे आणि तिला ब्रिटिश सरकारची सहानुभूति आहे. ह्या देशांतल्या देशांत पवित्र स्थळीं लक्षावधि यात्रेकरूंची, स्थानिक धंदेवाले पुण्यसाधनाचे कामीं सोय करतात आणि तिच्या मोबदल्यांत त्यांचेकडून पैसा कमावतात. त्याचप्रमाणें परकीय लोकांस स्वदेशांतील सृष्टिसौंदर्य, ऐतिहासिक व कलाप्रचुर स्थळें व सामाजिक वैशिष्ट्यें ह्यांच्या परिचयाचें सौख्य पुरवून त्याची किंमत हिंदी धंदेवाल्यांस वसूल करतां येते. ब्रिटिश व्यवसायी लोकांप्रमाणें हिंदी धंदेवाल्यांनीं (रेल्वे, हॉटेलांचे मालक, टॅक्सीचा व्यवसाय करणारे, कलाकुसरीचा माल बनवणारे व विकणारे) हा व्यापार पद्धतशीर रीतीनें करणें आवश्यक आहे.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, १२८६ शिवाजीनगर, पुणें ५ )

जपानच्या शरणागतीची बातमी मागच्या शुक्रवारीं बाजार स्थिर बंद झाल्यानंतर आली व खाजगीत भाव अपेक्षेविरुद्ध झपाट्यानें खालीं ठोकण्यांत आले. शनिवारीं शेअरबाजाराचे अध्यक्षांनीं नेहमी सुट्टी असते तरी एर्वीतेर्वी खासगी सौदे करणारच तर मग बाजार खुला ठेऊन बाजाराला काय पाहिजे तो गोंधळ उघड घालूं दिला. सोनें-चांदी तर पडलेच पण रुईनें जो सूर मारला तो ४३३ वरून ३८८ पर्यंत ! म्हणजे रुईत लोकांनीं किती मार खाल्ला असला पाहिजे याची कल्पनाच करवणार नाहीं. इकडे डिफर्ड २२०० वरून कमींत कमी २१०५, ऑर्डिनरी ४०१ वरून ३९०, नागपूर ३७२ वरून ३६४ असे विविध भाव पडले. मात्र सोमवारीं पुन्हा बंद होता त्यांना प्रतिक्रियात्मक स्थिरपणा आलेला दिसला.

नेहमीप्रमाणेंच भावांत मोठे फेरफार झाल्यानंतर मंडळींची धावपळ सुरू झाली असून जो तो दुसऱ्यास अथवा ज्योतिषास पुढें काय होणार, मंदी किती होणार व किती काल टिकणार असें विचारूं लागला आहे.

याला थोडक्यांत उत्तरें अशीं देतां येतील.

( १ ) युद्ध थांबतांच भाव पडणार हे ठरल्यासारखें असल्यानें व जपानी युद्ध लवकरच थांबणार हें गृहीत असल्यामुळें बाजार फार वर नव्हते. त्यामुळें वेडेवांकडे पडण्यास वाव कमी.

( २ ) पदार्थांच्या किंमती कमी झाल्यामुळें नफ्याचें प्रमाण उतरलें तरी जादा कराचें ओझें त्याच प्रमाणांत खात्रीनें कमी होईल. म्हणजे डिव्हिडंड देण्याचा वाव फारसा कमी होऊं नये.

( ३ ) वाढलेलें चलन, उतरलेले व्याजाचे दर व मोकळा पैसा दुसऱ्या धंद्यांत येवढ्यांत न गुंतला जाण्याची शक्यता-यामुळें बाजाराला खालच्या भावांत वारंवार टेका देतां येईल.

मात्र आलेली पहिली मोठी लाट जाईतोंपर्यंत बाजार वेडावांकडा हालणें अपरिहार्य आहे. घबराटांत नांवावर चढविलेले शेअर्स विकून टाकणें शहाणपणाचें ठरणार नाहीं. सटोडिये नेहमींच अंगाबाहेर धंदा करत असतात. त्यांना विकण्याची घाई होणारच व त्यांच्या बेचाणीमुळें व इतर बाजारांचा परिणाम म्हणून— बाजार तात्पुरता वर आला तरी—पुन्हा खालीं दाबला जाऊं शकेल. ज्या ज्या वेळेला असा खाली गेलेला दिसेल त्या वेळेस शक्तीप्रमाणें माल उचलावा व थोड्या फरकांत काढून टाकावा व जवळ जर वरच्या भावांतले शेअर्स असतील तर त्यांची सरासरी उतरविण्याचा प्रयत्न करावा. शक्य तर आठ पंधरा दिवस बाजारच्या हालचालीकडे मुळींच लक्ष देऊं नये व गुंतविणारांनीं मन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करावा.

### इंदूर परस्पर सहकारी पेढी मर्यादित

वरील पेढीचें एकूण खेळतें भांडवल ११ लक्ष ६२ हजार रु. आहे. ३१-३-१९४५ अखेरच्या वर्षी तिला ६,९१० रुपये नफा झाला. भागीदारांस २% डिव्हिडंड मिळालें. पेढीनें कांहीं दिवस ठेवी घेण्याचें बंद केलें होतें. ता. २२ मे १९४५ पासून पुनः अ-सभासदांच्या ठेवी घेण्यास प्रारंभ झाला आहे व ही रकम सरकारी रोख्यांत गुंतविण्यांत येत आहे. पेढीच्या धान्य दुकानाचा फायदा २३० कुटुंबांना मिळतो. पेढीच्या लौकिकास साजेसें रौप्यमहोत्सव स्मारक करावें असें १९४३ सालीं उत्सवाचे वेळीं ठरलें. संकल्पाप्रमाणें दरसाल ५०० रुपयेप्रमाणें नफ्यांतून ५,००० रुपये आतां जमलें आहेत. स्मारकासंबंधीं योजना सभासदांकडून मागविण्यांत आल्या आहेत.


तुमच्या पैशाचा




योग्य मोबदला

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
——कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.——

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

नोगीचे
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

### साखरेचा जागतिक तुटवडा

चालू युद्धापूर्वी जगांतील साखरेच्या मागणीचे मानानें तिचा पुरवठा भरपूर होता; एवढेंच नव्हे तर उसापासून केल्या जाणाऱ्या स्वस्त साखरेच्या स्पर्धेपासून कित्येक पाश्चात्य राष्ट्रें स्वतःच्या बीटांच्या बनवल्या जाणाऱ्या साखरेचें रक्षण करीत होतीं. युद्ध-परिस्थितीमुळें हें संबंध पारडें फिरलें आहे. ह्याचें मुख्य कारण साखरेच्या उत्पादनाचें मुख्य केंद्र जावा देश अजून जपान्यांच्या ताब्यांत आहे आणि फिलिपाइन्समधील उत्पादन चालू होण्यास अजून कांहीं काळ लोटला पाहिजे हें आहे. ह्या दोन देशांत मिळून युद्धापूर्वी साडेपंचवीस लक्ष टन साखर तयार होत असे. जगांतील उसाच्या साखरेच्या एकूण उत्पादनाचा सुमारें सातवा हिस्सा हे दोन देश पुरवीत. ऑस्ट्रेलियाचें उत्पादन आठ लक्ष टनांचें सहा लक्ष टनांवर आलें आहे. क्यूबामधील साखरेचें उत्पादन मात्र कायम राहिलें असल्यानें इंग्लंड, अमेरिका व कॅनडा ह्यांची मागणी पुरवली जाईल. अमेरिकेस चालू सालीं सुमारें पासष्ट लक्ष टन साखर लागेल. ह्यापैकी अकरा लक्ष टन प्रत्यक्ष त्या देशांत तयार होईल आणि बाकीचा पुरवठा क्यूबा, प्यूरेटो रीको, दक्षिण अमेरिका व हवाई ह्या देशांतून व्हावा लागेल. ग्रेट-ब्रिटनला युद्धापूर्वी प्रतिवर्षी सुमारें चोवीस लक्ष टन लागत असत आणि त्या देशांत बीट साखर साडे चार लक्ष टनांपर्यंत तयार होई. गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमध्यें नेहमीच्या मानानें सुमारें सत्तर टक्के साखर खपली. चालू सालीं एकूण सुमारें अठरा लक्ष टन साखर उपलब्ध होईल आणि हा पुरवठा वेस्ट इंडीज, मॉरिशस, फिजि, इत्यादि देशांतून येणारा माल आणि स्थानिक उत्पादन व साठ्यांतील कांहीं भाग ह्यांचा मिळून होईल. युद्धामुळें उध्वस्त झालेल्या युरोपिअन देशांतलें साखरेचें उत्पादन अर्थातच घटलें आहे आणि त्यांस अल्प पुरवठाहि करण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. रशियाचें तेवीस लक्ष टनांचें मामुली उत्पादन पुष्कळच घटलें आहे. पोलंड, झेकोस्लॉव्हिया ह्यासारखे देश साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्ण असत आणि आपल्या उत्पादनाचा कांहीं भाग निर्यात करीत. हिंदुस्थानचें सुमारें बारा लक्ष टनांचें उत्पादन ह्या देशास जेमतेम पुरण्यासारखें आहे आणि युद्धपरिस्थितीमुळें त्याची वाटणी अडचणीची झाली आहे. इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानांतील साखरेचा मामुली दर माणशीं खप अल्प आहे. इंग्लंडमध्यें रॅशनिंग असूनहि तेथील जनतेस साखरेचा पुरवठा हिंदुस्थानशीं तुलना करतां किती तरी मोठ्या प्रमाणांत होत आहे. तथापि युद्धपरिस्थितीमुळें जागतिक उत्पादन व पुरवठा मर्यादित झाल्यानें तेथेंहि साखरेची टंचाई भासत आहे. युरोपमध्यें आतां स्थिरस्थावर होत आहे आणि जपानी युद्धाचा शेवट जवळ येत आहे. ह्या बाबतींत जसजशी प्रगति होत जाईल तसतसा साखरेच्या जागतिक पुरवठ्याचा प्रश्न सुटत जाईल.

### इंडियन प्रोग्रेसिव्ह इं. कं. लि. पुणें

१९४४ मध्यें वरील कंपनीकडे २,४५,२०० रुपयांच्या विम्याचे अर्ज आले. कंपनीनें २,२४,२२५ रुपयांचे विमे स्वीकारले, त्यांचे वार्षिक हप्ते १२,५३० रुपयांचे आहेत. कंपनीचें एकूण उत्पन्न १,००,५४८ रुपये झालें. सर्च भागवून ७०,२९० रुपये लाइफ फंडांत टाकण्यांत आले ह्या फंडाची रकम वर्ष-असेर २,७८,४१२ रुपये झाली. कंपनीच्या खर्चाचें प्रमाण सालोसाल उतरत चाललें असून तें आणखी खाली उतरविण्याचा चालकांचा प्रयत्न चालूच आहे. कंपनीच्या सरकारी रोख्यांचे बाजार भाव खरेदी किंमतीपेक्षा १३,४५३ रुपयांनीं अधिक आहेत. प्रिन्सिपॉल व्ही. के. जोग हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. ए. एन. गाडगीळ हे सेक्रेटरी आहेत.

### दिल्ली डेअरीज लि.

वरील नांवाची एक कंपनी न्यू दिल्ली येथें नोंदण्यांत आली आहे. दिल्लीपासून १० मैलांवर एक डेअरी स्थापण्याचा तिचा उद्देश आहे. नागपूरचे रा. ब. सर माधवराव देशपांडे, के. बी. ई. हे तिचे एक डायरेक्टर आहेत. कंपनीनें खर्चाचा व नफ्याचा अंदाज खालीलप्रमाणें केला आहे:—

| | | रुपये |
|---|---|---|
| १ | १०० एकर जमीन, कुंपणाच्या खर्चासह प्रत्येकीं १,००० रु. | १,००,००० |
| २ | ४०० म्हशी, प्रत्येकीं ५०० रु. | २,००,००० |
| ३ | १०० गाई, प्रत्येकीं ३०० रु. | ३०,००० |
| ४ | मशिनरी वगैरे | ६०,००० |
| ५ | भांडीं, वहानें इ. | ५०,००० |
| ६ | खेळतें भांडवल | ४०,००० |
| ७ | प्राथमिक खर्च व ब्रोकरेज | २०,००० |
| | एकूण | ५,००,००० |

प्रत्येक शेरास सरासरी २ आणे नफा ह्या हिशेबानें कंपनीस दररोज सरासरीनें १,००० रु. नफा व्हावा, अशी अपेक्षा आहे. श्री. विद्याभूषण चोप्रा हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### दोन नवऱ्यांतून एकाची निवड!

हॅरोल्ड जोड ह्या अमेरिकन वैमानिक लेफ्टनंटला जपान्यांनीं युद्धकैदी केलें. परंतु अमेरिकेस त्याप्रमाणें कळविलें नाहीं. ब्रह्म-देशांत त्याचें विमान कोसळल्यापासून एक वर्षपर्यंत "बेपत्ता" च्या यादींत त्याचें नांव होतें. पुढें अमेरिकन युद्धखात्यानें अधि-कृतरीत्या तो मरण पावला असल्याचें जाहीर केलें. त्यानंतर दोन महिन्यांनीं त्याची पत्नी मिसेस जोड हिनें एनसाइन रॉबर्ट मॅक्डो-वेल ह्याचेशीं विवाह केला. मे १९४५ मध्यें तिला आपला पहिला पती रंगूनच्या इस्पितळांत सुखरूप असल्याची वार्ता कळली. तिनें त्याला लागलीच तार पाठविली, "तुम्ही जिवंत आहांत, हें ऐकून फार आनंद झाला, भेटीची वाट पहात आहे." अर्थात् तिचें दुसऱ्याहि नवऱ्यावर प्रेम होतेंच. दुसरा विवाह करण्यांत तिचा कोणताहि अपराध नसल्याकारणानें, दोहोंपैकीं कोणताहि नवरा निवडण्याचा तिला अधिकार प्राप्त झाला. "मॅक्डोवेल हा कांहीं बाबतींत जोडपेक्षां चांगला होता. परंतु जोडवरच माझें प्रेम जास्त आहे" असें म्हणून ती आपल्या मूळ घरीं रहावयास गेली. इकडे कलकत्त्यास जोडला ही बातमी कळतांच तो उद्गारला, "मी नशीबवान आहे खरा!"

### मध्यहिंदुस्थान–रजपुताना सहकारी परिषद

मध्यहिंदुस्थान व रजपुताना सहकारी परिषदेचें चौथें अधि-वेशन कोटा येथें सप्टेंबर, १९४५ मध्यें कोटा संस्थानचें नियमानें भरणार आहे. गेल्या वर्षीचें अधिवेशन भरतपूर येथें झालें.


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

### उद्यम सावण विशेषांक

उद्यम मासिकाचा ऑगस्ट १९४५ चा अंक सावण विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत डॉ. सदगोपाळ, डॉ. सॅलेटोर, श्री. भागवत, श्री. चोबे ह्यांचे साबणाच्या धंद्यावर माहितीपूर्ण व मार्गदर्शक लेख प्रसिद्ध झाले आहेत. श्री. बापूराव वाकणकर ह्यांचा "साबण तयार करणें" हा लेख प्रस्तुत विशेषांकांतील मध्यवर्ती लेख असून त्यांत श्री. वाकणकर ह्यांनीं आपलें शास्त्रीय ज्ञान व अनुभव हीं वाचकांस मुक्त हस्तानें उपलब्ध करून दिलीं आहेत.

### दि सांगली बँक लि., सांगली

वरील बँकेस १९४४ सालीं २ लक्ष रुपये वसूल भांडवलावर व ६० लक्ष खेळत्या भांडवलावर ३८,१३४ रुपये निवळ नफा झाला. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड सुमारें २ लक्ष रुपयांचे होते, त्यांत आतां १७ हजारांची भर पडली आहे. भागीदारांना ९% करमाफ डिव्हिडंड देण्यांत आलें. बँकेचें काम योग्य दक्षतेनें चालू आहे. तिच्या नऊ ठिकाणीं शाखा आहेत. बँकेची वार्षिक सभा १० जुलै रोजीं झाली.

### सरस्वती म. संस्थेचा नवीन स्तुत्य उपक्रम

खेडेगावांत उपयुक्त पद्धतीनें शाळा चालवण्याचें कार्य ह्या संस्थेनें श्रमपूर्वक चालवलें आहे. खेडेगावी लोकांसाठी औषधोपचाराची सोय करण्याचा कार्यक्रमहि तिनें आतां हातीं घेतला असून पुण्याजवळच्या किवळे गावांत अलीकडे आरोग्यकेंद्र चालू केलें आहे. हा उपक्रम अभिनंदनीय आहे, पण त्याचा विस्तार आणि यश हीं लोकाश्रयावरच अर्थात् अवलंबून आहेत.

### आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

३१ मे, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें ३,३७,१२७ रुपयांची विक्री केली, म्हणजे विक्रींत ६५,००० रु. वाढ झाली आहे. कंपनीला निवळ नफा ३५,३५७ रुपये झाला. गेल्या वर्षी तो २४,०४५ रुपये होता. वृत्तांत वर्षांत बॉटेट लॅबोरेटरीचा नवा उपक्रम करण्यांत आला आहे. त्या कामासाठी एक स्वतंत्र अनुभविक केमिस्ट नेमण्यांत आला असून मद्यार्क पद्धतीनें औषधें तयार करण्याचें काम सुरू झालें आहे. साधारण भागीदारांना ५% ( वजा रुपयांस ४ आणे ९ पै कर ) डिव्हिडंड मिळणार आहे.

### निनाद ( ॲडव्हर्टायझिंग ) लि., मुंबई

वरील जाहिरात कंपनीच्या कार्याचें उद्घाटन शुक्रवार ता. ३ रोजीं इं. अँड प्र. ॲशुअरन्स कंपनीच्या इमारतींत श्री. डहाणूकर ह्यांचे हस्तें झालें. कंपनीची कचेरी देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, येथें आहे.


स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून
अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर
बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण
महाराष्ट्र भुवन
लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय
बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रश्न !
चारशें वर्षांपूर्वी मोंगल सम्राट बाबर व 'हुमायूं' ह्यांनीं कसा सोडविला तें
'मेहबूब चित्र'
'हुमायूं' मध्यें पहा
रोज ३ खेळ :
३॥, ६॥ व १० वाजतां.
पॅरेमाऊंट–पुणें ] सिलेक्ट प्रकाशन [ ६ वा सातवडा





कर्णमधुर संगीत— नयनमनोहर नृत्यें—
अफाट साहसें—यांची रेलचेल
म्हणजेच
नवयुगचा नवा सामाजिक बोलपट ! पन्ना दिग्दर्शक— नजम नकवी.
—भूमिका—
गीता निजामी, जयराज, डेविड, कुसुम देशपांडे.
८ वा आठवडा !
श्रीकृष्ण–पुणें
फोन नं. ३१००१
रोज ६॥ व १० वाजतां.
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३॥ वा.
आगाऊ ति. विक्री थिएटरवर नेहेमीप्रमाणें.
—पिअरलेस प्रकाशन—

"सासू" पहाण्यासाठीं सुनांचें माहेरघर झालेल्या "डेक्कन" मध्यें
आयना अर्थात सासू
रोज शेंकडो सुना प्रत्यही येतात.
लोकावडीचा ५ पांचवा सातवडा !
राजकुमारी, सुलोचना, याकूब, लीला, कौसल्या, गोप, त्रिलोक, मिर्झा.
रोज फक्त २ खेळ ७ व १० वा.
शनि. रवि. सोम. व सुट्टींचे दिवशीं मॅटि. ४ वा. रिझर्वेशन १० ते १२
—हॅपि डायमंड प्रकाशन—


हें पत्र पुणें, पेठ मोंबुडों घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मोंबुडों, घ. नं. १२४।११. पुणें ... येथें प्रसिद्ध केलें




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २२ ऑगस्ट, १९४५ अंक ३४

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

**EVERYTHING IN RUBBER GOODS**

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

**The Western India Manufacturers' Agency, Ltd.,**
*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*
Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपिन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## विविध माहिती

### बँक ऑफ इंग्लंड

बँक ऑफ इंग्लंडवर सरकारी मालकी प्रस्थापित करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. त्याप्रमाणें कायद्याची व्यवस्था झाली, म्हणजे भागीदारांचे सर्व भाग सरकारच विकत घेईल व प्रमुख अधिकाऱ्यांची नेमणूक तेंच करील. आज त्या बँकेचें भांडवल १,४५,५३,००० पौंड आहे. बँकेची व्यवस्था कोर्ट ऑफ डायरेक्टर्स पहातें. ह्या कोर्टाची सभा प्रत्येक आठवड्यांत एकदां तरी व्हावी लागते. बँक ऑफ इंग्लंड ही जगांतील पहिली जॉइंट स्टॉक बँक होय. बँकेनें गेलीं २३ वर्षें दरसाल १२% डिव्हिडंड दिलेलें आहे. बँकेच्या १०० पौंडांच्या स्टॉकची बाजारभावानें किंमत ३७१ पौंड आहे.

### अमेरिकेंतील कामगारांवरील नियंत्रणें रद्द

अमेरिकेंतील कामगारांवरील युद्धजन्य सर्व नियंत्रणें आतां दूर करण्यांत आलीं आहेत. त्यांनीं कोणतेंहि काम सोडावें व कोणतेंहि काम धरावें. कारखानदारांनीं लोक नेमतांना अगर काढतांना सरकारकडे परवानगी मागण्याचें प्रयोजन नाहीं.

### अमेरिकेची खंड-उसनवार मदत थांबणार

अमेरिकेनें आजवर १२५ अब्ज रुपये किमतीचा माल संयुक्त राष्ट्रांस खंड-उसनवार पद्धतीनें पुरविला. ही योजना आतां बंद करण्यांत येणार असल्याबद्दलची सूचना संयुक्त राष्ट्रांस आजउद्यां इतक्यांत मिळेल. नेदरलंड, बेल्जम, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, रशिया व चीन ह्या देशांवरच मुख्यतः ह्या गोष्टीचा परिणाम होईल.

### ॲटॉमिक बाँबसाठीं ७५ कोटि रुपयांची चांदी

ॲटॉमिक बाँबच्या उत्पादनासाठीं अमेरिकेची सुमारें ७५ कोटि रुपये किंमतीची चांदी उपयोगांत आली.

### लाहोरमधील रहाणी सर्वांत अधिक खर्चाची

पंजाब बोर्ड ऑफ एकनॉमिक इन्क्वायरीनें हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या शहरांतील रहाणीच्या खर्चाचे आंकडे गोळा केले तेव्हां सर्व शहरांत लाहोर हें शहर युद्धापूर्वीप्रमाणें आतांहि रहाणीस सर्वांत खर्चाचें असल्याचें आढळून आलें.

### परराष्ट्रीय आयात वाढली.

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय बिनसरकारी व्यापाराचे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, १९४४-४५ सालीं पूर्वीच्या वर्षाच्या मानानें आयात वाढली, परंतु त्या प्रमाणांत निर्गत मात्र वाढली नाहीं. ह्यामुळें ह्या देशाचें निव्वळ परराष्ट्रीय येणें पुष्कळच घटलें.

### नाण्यांसाठीं १२½ कोटि तोळे चांदी

१९४३-४४ सालीं १२½ कोटि तोळे चांदी नाणीं पाडण्यासाठीं हिंदी टांकसाळींत वापरण्यांत आली.

### "एकॉनॉमिस्ट" पत्राची विचारसरणी

पॅलेस्टाइनमध्यें ज्यू-अरब आणि हिंदुस्थानमध्यें मुस्लिम-हिंदु अशा परस्पर-विरुद्ध मागण्या पुढें येत असल्यानें त्यांचेपैकीं एका बाजूस पाठिंबा देऊन राजकीय प्रगतीची गाडी पुढें ढकलण्यास सहाय करणें ब्रिटिश राष्ट्रास अवघड झालें आहे अशा जुन्या युक्तिवादास "एकॉनॉमिस्ट" हें इंग्लंडमधील वजनदार वृत्तपत्र चिकटून राहूं पहात आहे. हिंदुस्थानांतील अलीकडच्या घडामोडींचा कोणताच विशेष परिणाम त्या पत्राच्या धोरणावर झालेला दिसत नाहीं. कांहीं परिणाम झाला असेल तर तो तें धोरण दृढ करण्यांतच झालेला आहे.

तुमच्या पैशाचा योग्य मोबदला





व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो: मुंबई--गोवा--बंगलोर--दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
——कारखान्याच्या वाढीसाठीं ठेवी घेणें आहेत.——

नोगीचें
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

अर्थ
वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## हिंदी चलनविस्ताराचें पृथक्करण

### पैशाच्या पुरवठ्यांत वाढ

हिंदी रिझर्व्ह बँकेचा "करन्सी आणि फिनॅन्स" वरील १९४४–४५ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्यांत नेहमीप्रमाणें गेल्या वर्षातील आर्थिक घडामोडींचा परामर्ष घेण्यांत आला आहे. बाजारभाव आणि व्यापार, सोनें–चांदी, हुंडणावळ व तिचें नियंत्रण, मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचीं अंदाजपत्रकें, मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचीं कर्जें, सरकारी रोखे व औद्योगिक शेअर्स ह्यांचे बाजार व किंमती, बँकांची परिस्थिति, चलनाचा प्रसार, इत्यादि अनेक बाबींची माहिती रिपोर्टीत तपशीलवार तक्त्यांच्या सहाय्यानें देण्यांत आलेली आहे. हिंदुस्थानांतील एकूण चलन पुरवठ्यांत ( रुपयांचीं नाणीं वगळून ) गेल्या वर्षी घडून आलेल्या वाढीचें पृथकरण रिपोर्टीत आढळतें, तें उद्बोधक आहे. चलनविस्तार प्रत्यक्ष कसा घडून येतो, ह्याची कल्पना त्यामुळें चांगली येऊं शकेल.

देशांतील पैशाच्या एकूण पुरवठ्याचा विचार करीत असतांना मुख्यतः दोन बाबी महत्त्वाच्या आहेतः—

( १ ) व्यवहारांत खेळत असलेल्या चलनी नोटा ( बँकांच्या तिजोऱ्यांतील नोटा वगळून )+ बँकांकडील तात्काळ काढून घेतां येण्याजोग्या ठेवी, आणि

( २ ) बँकांच्या आणि सरकारच्या रिझर्व्ह बँकेकडील रोख ठेवी.

व्यवहारांत खेळणाऱ्या चलनी नोटांची संख्या वाढली, म्हणजे सरकारच्या रिझर्व्ह बँकेंतील ठेवीमध्यें घट होते, असें बहुधा घडून येतें, कारण सरकार आपलें देणें देण्यासाठी रिझर्व्ह बँकेस सूचना देतें तेव्हां बँकेंतील त्याची ठेव त्या प्रमाणांत उतरते व रिझर्व्ह बँकेंतून बाहेर पडणाऱ्या नोटा व्यवहारांत खेळूं लागतात. त्याचप्रमाणें, सरकारनें कर्ज उभारून किंवा कर गोळा करून समाजांत प्रसृत झालेलें चलन जमा केलें म्हणजे ह्या नोटा रिझर्व्ह बँकेकडे जाऊन सरकारी ठेवींत भर घालतात. म्हणजे, खेळत्या नोटांत वाढ झाली कीं सरकारी ठेवींत घट होते व सरकारी ठेवींत घट झाली कीं खेळत्या नोटांत वाढ होते, असा ह्या दोन बाबींचा परस्पर संबंध आहे. अर्थात् चलनविस्तार घडवून आणणारा एकाचा परिणाम दुसऱ्यामुळें नष्ट होण्याची ही प्रवृत्ति मर्यादित स्वरूपांत खरी असली तरी, त्यानें एकूण चलनपुरवठ्यास आळा न बसतां तो एकसारखा वाढत जाऊं शकतो, हें विसरतां कामा नये.

हिंदुस्थानांतील पैशाच्या पुरवठ्याच्या वाढीचें मान उतरत चाललेलें आहे, असें उपरिनिर्दिष्ट रिपोर्ट म्हणतो. म्हणजे, चलनविस्तार जरी चालू आहे, तरी विस्ताराचा वेग थोडा कमी झाला आहे. विस्तार पूर्वीपेक्षा हळूहळू होत आहे, असा त्याचा अर्थ आहे. प्रसृत चलनी नोटांत दरमहा वाढ होत गेली आणि बँकांकडील तात्काळ काढून घेतां येण्याजोग्या ठेवी दरमहा वाढल्या, हें दर्शविणारे शतमानाचे आकडे खाली दिले आहेत, त्याचप्रमाणें, एकूण पैशाचा पुरवठा कसा वाढत गेला, त्यांत कोणत्या प्रमाणांत भर पडली आणि चलनविस्ताराची गति वाढत जाऊन पुनः कशी थोडी उतरली आहे हें लक्षांत येण्यास त्यामुळें सहाय होईल.

#### चलनी नोटा आणि बँकांकडील ठेवी

| सप्टेंबर अखेर | चलनी नोटांत दरमहा वाढ % | बँकांकडील ठेवींत दरमहा वाढ |
|---|---|---|
| १९४१ | २·० | २·६ |
| १९४२ | ७·० | ४·३ |
| १९४३ | ४·५ | ३·८ |
| १९४४ | २·० | २·४ |
| १९४५ ( मार्च ) | २·६ | —०·४ |

#### एकूण पैशाच्या पुरवठ्यांत वाढ

चलनी नोटा व बँकाकडील ठेवी ह्यांबरोबर रिझर्व्ह बँकेकडील ठेवी व शेड्यूल्ड बँकाजवळील चलनी नोटा ह्यांचाहि विचार केल्याखेरीज एकूण पैशाच्या पुरवठ्याचा आकडा खरा कळणार नाहीं. एकूण पैशाचा पुरवठा ( रुपयाचें नाणें वगळून ) कसा वाढत गेला व त्याचा वेग कसा कमी झाला आहे, हें खालील आकडे सांगतीलः—

#### एकूण पैशाचा पुरवठा

| सप्टेंबर अखेर | (कोटि रु.) | शतमानानें एकूण वाढ(१९३९=१००) | दरमहा वाढीचें मान |
|---|---|---|---|
| १९३९ | ३४६ | | |
| १९४० | ४३६ | १२६ | २·८ |
| १९४१ | ५४२ | १५७ | २·१ |
| १९४२ | ८९७ | २५९ | ५·४ |
| १९४३ | १,३३२ | ३८५ | ४·१ |
| १९४४ | १,८३९ | ५३२ | ३·२ |
| १९४५ ( मार्च ) | २,०५० | ५९२ | १·९ |

युद्धकाळांतील चलनविस्ताराचे मुख्य घटक कोणते व चलनविस्ताराची वाढ कशी होत गेली, हें वर सांगितलें. तथापि, ह्या चलनविस्तारास प्रमुख कारणें कोणतीं घडलीं, हें येथें नमूद करणें विषयास धरूनच होईल.

( १ ) ब्रिटिश सरकार व दोस्त राष्ट्रें ह्यांस हिंदुस्थानानें येथें माल पुरविला व त्यांचे करितां वहातुक वगैरे अनेक कामें केलीं, त्याची भरपाई तूर्त अंशतःच झालेली आहे. कांहीं रकम त्या खातीं जमा झाली असली तरी हिशेबांत येणें रकम पुष्कळच मोठी निघत असून ब्रिटिश पौंडाचे स्वरूपांत तें ग्रेट ब्रिटनमध्यें अडकून पडलेलें आहे. हिंदुस्थानांतील चलनविस्ताराचें हें सर्वांत मोठें कारण आहे.

( २ ) चालू खर्च भागविण्याइतकें सरकारास उत्पन्न झालें नाहीं, म्हणजेहि चलनविस्तारास प्रोत्साहन मिळतें.

( ३ ) भांडवली स्वरूपाचा मोठ्या प्रमाणावरील लष्करी खर्च ही बाबहि चलनविस्तारास कारणीभूत आहे.

हिंदुस्थान सरकारनें देशांतच कर्जें उभारलीं, म्हणजे त्यामुळें जनतेजवळील चलन सरकारकडे खेचलें जाऊन त्या प्रमाणांत चलनविस्तारास आळा बसतो. सरकारनें जमा केलेले पैसे रिझर्व्ह बँकेंत जमा होतात आणि त्यामुळें बँकेकडील सरकारी ठेव तात्पुरती वाढते. व्यवहारांतील एकूण चलनी नोटा किती वाढल्या आहेत ( त्यांत रुपये व दुय्यम नाणीं हींहि मोजलीं पाहिजेत )

आणि बँकांतील ठेवींत किती भर पडली आहे, ह्यांचे आकड्यां-वरून पैशाच्या पुरवठ्यांत झालेली वाढ मोजतां येते. आतां युद्ध संपलें असल्याकारणानें, चलनविस्तारास केवळ आळा घालूनच नव्हे, तर चलन संकोचन करून आर्थिक व्यवहारांच्या बेतापुरतेंच चलन खेळतें ठेवण्याचा अवघड प्रश्न सरकारास सोडवावा लागेल. व्यवहारांत नोटा रिझर्व्ह बँक प्रत्यक्ष प्रसृत करीत असली, तरी आर्थिक धोरण आखण्याचें व तें पार पाडण्याचें काम हिंदुस्थान सरकारचें आहे. रिझर्व्ह बँक फार तर सल्ला देईल, परंतु धोरणाची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर नाहीं.

## सोन्याची किंमत

सोन्याचें जागतिक उत्पादन घटल्याकारणानें व वहातुकीच्या अडचणीमुळें त्याचा पुरवठा अपुरा पडून कित्येक देशांतील सोन्याच्या बाजारांत सट्टेबाजांचें चांगलेंच फावलें. हिंदुस्थानांतहि तशीच परिस्थिति निर्माण झाली. लोकांजवळ पैसा पडून राहिला, तो सोन्यांत गुंतविला जाऊं लागला. काळ्या बाजारांतील व्यवहारांस लागणारा पैसा सोन्याचे स्वरूपांत साठवून ठेवण्यास लोकांनीं प्रारंभ केला. कर चुकविण्यास किंवा प्राप्ती दडवण्यासहि सोन्याचा चांगला उपयोग होऊं लागला. इकडे पुरवठा तर कमी पडला, त्याचा फायदा सट्टेवाल्यांनीं घेण्यास प्रारंभ केला. रिझर्व्ह बँकेनें सोन्याची विक्री सतत चालू ठेविली आणि युद्धाची परिस्थितीहि अधिकाधिक आशादायक होऊं लागली ह्यामुळें सोन्याच्या किंमतीचे वाढीस आळा बसला. सोन्याच्या किंमतीमधील चढउताराचे १९३८-३९ सालापासून १९४४-४५ पर्यंतचे आकडे खाली दिले आहेतः—

**किंमतींचे तुलनात्मक आकडे**

| वर्ष | कमाल | किमान | सरासरी |
|---|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| १९३८-३९ | ३७-१०-६ | ३४-१२-३ | ३५-१०-३ |
| १९३९-४० | ४३-८-० | ३६-९-० | ३९-१३-११ |
| १९४०-४१ | ४८-८-० | ४०-२-६ | ४२-६-० |
| १९४१-४२ | ५७-१२-० | ४१-९-६ | ४४-७-११ |
| १९४२-४३ | ७२-०-० | ४४-१२-० | ५७-१०-१० |
| १९४३-४४ | ९६-४-० | ६५-४-० | ७६-११-६ |
| १९४४-४५ | ७६-१२-० | ६१-२-० | ७१-७-४ |

१९४४-४५ पुरता विचार केला तर २४ एप्रिल १९४४ रोजीं सोन्याची किंमत सर्वांत ज्यास्त म्हणजे ७६ रु. १२ आ. झाली, असें आढळतें. सर्वांत किमान किंमत ( ६१ रु. २ आ. ) २६ ऑक्टोबर रोजीं झाली.

१९२६-२७ सालीं सोन्याची कमाल किंमत २१ रु. ११ आ. ६ पै होती, ती हळु हळु वाढत १९३१-३२ सालीं ३१ रु. ९ आ. झाली. १९३८-३९ सालीं कमाल किंमत ३७ रु. १० आ. ६ पै. त्यानंतरचे बाजारभाव वर दिले आहेत.

### बनावट चलनी नोटा

१९४४-४५ मध्यें एकूण १२,६७५ बनावट नोटा रिझर्व्ह बँकेकडे आल्या, त्यांपैकी ४,८२० नोटा एक रुपयावाल्या, २,५९९ नोटा दोन रुपयेवाल्या, ३५२ नोटा पांच रुपयेवाल्या, ४,८९४ नोटा दहा रुपयेवाल्या, १ नोट पन्नास रुपयेवाली व ९ नोटा १०० रुपयेवाल्या होत्या. १० रुपयेवाल्या नोटा बनावट करण्याची प्रवृत्ति वाढत्या प्रमाणावर आहे व १ रुपयेवाल्या नोटा बनावट करण्याची प्रवृत्ति उतरत आहे.

### सुरत येथें कॉमर्स कॉलेज

सुरत येथील सार्वजनिक एज्युकेशन सोसायटी जून, १९४६ पासून एक व्यापारी कॉलेज काढणार आहे.

### हिंदुस्थानाची आयात वाढली

| वर्ष | आयात (किंमत रु.) | (निर्गत किंमत रु.) |
|---|---|---|
| १९४३-४४ | ११७,९७,००,००० | १९९,०३,००,००० |
| १९४४-४५ | २००,९७,००,००० | २११,०५,००,००० |
| वाढ ... | ८३,००,००,००० | १२,०२,००,००० |

अमेरिका, इराण व ग्रेट ब्रिटन ह्या देशांकडून होणारी निर्गत वरीच वाढली. कच्च्या मालाचाच आयातींत मुख्यतः भरणा होता.

### मुंबई प्रांतांतील अन्न-परिस्थिति

मुंबई प्रांतांतील अन्नपरिस्थिति समाधानकारक आहे, असें आपलें मत हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं व्यक्त केलें.

अत्यंत गुणकारी—
कामगार ब्राह्मी तेल
व
माधव गो.कुल हेअर ऑईल वापरा.
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,
—: पुणें शहर :—
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )
एकूण खेळतें भांडवल रु. ३२ लाखांचेवर
बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वतंक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. SC. | श्री. के. पी. जोशी |

शेअर विक्री चालू आहे.
( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )
* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्ट्स दिले जातात.
—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—
रा. वा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

## स्फुट विचार

### महायुद्ध संपलें, शांतता युगाचा प्रारंभ

पॅसिफिक महासागरांत अमेरिकेचें वैमानिक आणि आरमारी सामर्थ्य अलीकडे इतकें वाढलें होतें कीं त्याच्यापुढें जपानला क्रमाक्रमानें मागें पाय घ्यावा लागून त्याची लढाऊ शक्ती क्षीण होऊन गेली होती. प्रत्यक्ष जपानी बेटांवर अमेरिकन विमानांचे झोरदार हल्ले चालू होऊन त्यांच्यापुढें शत्रूचा टिकाव लागेनासा झाला. त्याचें बहुतेक आरमार नष्ट करण्यांत आलें आणि त्यांचा विमानाचा पुरवठा संपुष्टांत आला. अशा स्थितींत जपानच्या पराभवाचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागल्यानें त्यानें बिनशर्त शरण येण्याचा शहाणपणा दाखवावा नाहींतर सर्वनाशास तयार व्हावें असा संदेश पॉट्सडॅमहून मित्रराष्ट्रांनीं पाठवला. नवीन संहारक बॉंबच्या सामर्थ्याचा प्रसाद जपानला लवकरच मिळाला आणि ह्याच सुमारास रशियानें त्याचेविरुद्ध युद्ध पुकारून मँचुरियावर स्वारी केली. आतां आपली धडगत नाहीं असें पाहून जपाननें अखेर मित्रराष्ट्रांस शरण जाण्याचें ठरवलें. ह्या रीतीनें महायुद्धाचा शेवट होऊन जगामध्यें सर्वत्र आनंद पसरला. आतां शांततेच्या युगास प्रारंभ झाला आहे आणि त्याच्या अनुषंगानें उद्भवणारे पुनर्घटनेचे अवघड प्रश्न सोडवण्याची जबाबदारी जगांतील राष्ट्रांवर येऊन पडली आहे. युद्धाचे हानिकारक परिणाम धुवून काढून आर्थिक, सामाजिक व राजकीय पुनर्घटनेचा विधायक कार्यक्रम त्यांस हातीं घ्यावयाचा आहे. इंग्लंड, अमेरिका व रशिया हीं प्रमुख राष्ट्रें ह्या बाबतींतल्या स्वतःच्या जबाबदारीच्या जाणीवेनें कोणतें धोरण स्वीकारतात ह्याकडे हिंदुस्थानसारख्या देशांचे डोळे लागले असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. जपानच्या पराभवानें हिंदुस्थानच्या आर्थिक व राज्यघटनात्मक पुनर्घटनेचा मार्ग मोकळा झाला आहे आणि इंग्लंडमध्यें पुरोगामी मजूरपक्ष अधिकारारूढ झाला आहे. हिंदी जनतेच्या अपेक्षा पुऱ्या करण्याचा स्वतःचा निश्चय ब्रिटिश मंत्रिमंडळानें व्यक्त केला आहे आणि लॉर्ड वेव्हल ह्यांनीं त्यासंबंधांत अगोदरच अभिवचन दिलें आहे. नवीन शांतता युगाचा अवतार ह्या देशांत कोणत्या स्वरूपांत होतो ह्या दृश्याची वाट आतुरतेनें हिंदी जनता पहात आहे.

---

### युद्धसमाप्तीचे पहिले परिणाम

लढाऊ हालचाली युद्धसमाप्तीमुळें बंद झाल्या तरी युद्धकाळांत अनुभवास आलेल्या अडचणी तात्काळ नाहींशा होतात असें नाहीं. एकतर निरनिराळ्या आघाड्यांवरील सैनिक स्वदेशीं परत आणून त्यांस स्वगृहीं पोंचवण्याचें सरकारचें काम कित्येक महिनेपर्यंत चालतें. दुसरें, युद्धानें उध्वस्त झालेल्या देशांतील लोकांस तेथील आर्थिक घडी नीट बसेपर्यंत अन्नवस्त्राचा पुरवठा होण्याची व्यवस्था करावी लागते. तिसरें, शत्रूपासून परत जिंकून घेतलेल्या प्रदेशांच्या संरक्षणासाठीं कांहीं फौज तिकडे ठेवणें आवश्यक होतें. तसेंच, वाहतुकीचीं साधनें भरपूर नसल्यानें व्यापारी व्यवहार त्वरेनें होऊं शकत नाहींत. त्याचप्रमाणें, लढाऊ सामुग्री तयार करण्यांत गुंतलेल्या कारखान्यांत मामुली जरूरीचा माल बनवला जाण्याची तरतूद होण्यास कांहीं काळ जावा लागतो. ही संक्रमणावस्था अर्थातच घोटाळ्याची व गैरसोयीची अशी सामान्य जनतेस वाटल्यावांचून राहात नाहीं. पण ह्याच बदलणाऱ्या स्थितींत दुसऱ्याहि कित्येक गोष्टी घडत असतात. रणांगणावर आवश्यक असलेल्या युद्धसामुग्रीचें उत्पादन तात्काळ बंद होतें आणि त्यांत गुंतलेल्या माणसांवर तात्पुरत्या बेकारीचा प्रसंग येतो. लष्करी उपयोगाचीं इमारतींसारखीं कामें थांबतात आणि त्यांवर अवलंबून असलेले अनेक लोक निरुद्योगी बनतात. कारखानदार व इतर धंदेवाले लोक ह्यांचें लक्ष शांततेच्या काळांतील उत्पादनाकडे व व्यवहारांकडे वळतें. नफेबाजी आणि साठेबाजी ह्यांस वाव उरत नाहीं आणि बाजारांत मालाचा अधिक पुरवठा होऊं लागून महागाईस आळा बसतो. युद्धखर्च बंद किंवा मर्यादित झाल्यानें नवीन चलनाची आवश्यकता भासत नाहीं आणि त्याचीहि स्वस्ताईस मदत होते. पुरवठ्यांत वाढ आणि प्राप्तींत व मागणींत घट ह्यांचाहि अशाच प्रकारचा परिणाम होतो. युद्धसमाप्तीच्या घोषणेबरोबर बाजारभावांत झालेल्या चलबिचलेचें रहस्य समजण्यास ह्या सर्व गुंता-गुंतीच्या बाबी लक्षांत घेणें आवश्यक आहे.

---

### डॉलर्सच्या टंचाईवर डॉलर्समधील कर्जाचा उपाय

हिंदुस्थानांत स्थापन व्हावयाच्या नवीन कारखान्यांस आवश्यक असलेलीं यंत्रें, इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतच विकत घ्यावीं लागणार आहेत. जे सौदे इंग्लंडमध्यें सोइस्कर रीतीनें पटूं शकणार नाहींत ते अमेरिकेंत केले पाहिजेत. पण ह्या अमेरिकेंतील यंत्रांच्या खरेदीचे मार्गांत तिच्यासाठीं लागणाऱ्या डॉलर्सच्या दुर्मिळतेची मोठी अडचण आहे. हिंदुस्थानचे कोट्यवधि रुपये लंडनमध्यें स्टर्लिंगच्या स्वरूपांत पडून आहेत, पण त्यांच्या मोबदल्यांत अमेरिकेवर हुंड्या देण्याची ब्रिटिश सरकारची तयारी नाहीं. मग अमेरिकन यंत्रें त्यांची किंमत विकेत्यांच्या पदरांत टाकून हिंदी कारखानदारांनीं कशी खरेदी करावयाची हा प्रश्न उद्भवतो. इंग्लंडनें जरूर ते डॉलर्स मोकळे करावे अशी टोचणी आमच्या कारखानदारांनीं लावली आहे, तिचा परिणाम न झाल्यास यंत्रांच्या किंमतीइतकें तात्पुरतें कर्ज अमेरिकेंत काढण्यांत यावें असा उपाय सुचवण्यांत आला आहे आणि तो योजण्यासारखा आहे अशी शिफारस सर चिंतामणराव देशमुख ह्यांनीं नुकतीच केली आहे. हिंद-अमेरिकन व्यापाराच्या व्यवहारांत अमेरिकेनें ह्या देशाचें यावयाचें देणें निघतें, ती तफावत ह्या तात्पुरत्या कर्जास तारण राहून तीमधून कर्जाची फेड होऊं शकेल. हे डॉलर्स वापरण्याची मुभा हिंदुस्थानास मिळाली पाहिजे. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं वरील कर्जास पाठिंबा दिला आहे त्यावरून ही व्यवस्था व्यवहार्य आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

---

### पुण्यांत उच्च सहकारी शिक्षण संस्था चालू झाली

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें उच्च दर्जाचें सहकारी शिक्षण देण्याचा वर्ग पुण्यामध्यें चालू करण्याच्या कल्पनेनें आतां मूर्तस्वरूप धारण केलें आहे. ऑगस्ट २० तारखेपासून हा वर्ग बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या इमारतींत सुरू झाला असून, त्यांत चाळिसेंचें वर विद्यार्थी दाखल झाले आहेत. गेल्या सोमवारीं ह्या वर्गाचें उद्घाटन औपचारिक रीतीनें प्रो. काळे ह्यांनीं केलें. शिक्षणाचा कार्यक्रम रीतसर येत्या शुक्रवारपासून चालू होईल. वर्गास अनुभवी अध्यापकांचें व सहकारी तज्ज्ञांचें सहकार्य लाभलें आहे. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत वर्गांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचें महत्त्व व उपयुक्तता ह्यांचें विवेचन केलें आणि त्याचा फायदा होतकरू तरुणांनीं अवश्य घ्यावा असें सुचविलें. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या दृष्टीनें असलें व्यावहारिक शिक्षण किती आवश्यक आहे हेंहि त्यांनीं समजावून सांगितलें आणि बृहन्महाराष्ट्र कॉलेजनें दिलेल्या सहाय्याबद्दल प्राध्यापक कर्वे ह्यांचे आभार मानले.

## युद्ध–कालांत सुरू झालेले उद्योगधंदे

### संरक्षणाची तात्पुरती व कायमची व्यवस्था

" आतांपर्यंत युद्धकालांत सुरू झालेल्या थोड्या उद्योगधंद्यांना युद्धोत्तरकालांत जरूर तें संरक्षण देण्याचें आश्वासन हिंदुस्थान सरकारनें दिलें आहे. हे धंदे महत्त्वाचे आहेत. पण साहाजिकच ते थोडे आहेत. यांखेरीज दुसरेही अनेक धंदे युद्धकालांत ठिकठिकाणीं अस्तित्वांत आलेले असून त्यांनीं अडचणीच्या वेळीं देशाची गरज भागविण्यास मदत केली आहे. त्यांपैकीं कांहीं व्यवस्थित व चांगल्या पायावर उभारलेले असूनही त्यांना मदतीचें आश्वासन मिळालेलें नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. कायम टॅरिफ बोर्डामार्फत चौकशी होऊन संरक्षण देण्याची व्यवस्था अमलांत येण्यापूर्वी वर निर्दिष्ट केलेल्या उद्योगधंद्यांना सत्वर मदत मिळून ते नष्टप्राय न व्हावे एतदर्थ आपण कांहींतरी तात्पुरती व्यवस्था करीत असल्याचें सरकारनें जाहीर केलें होतें; पण त्या बाबतींत निश्चितपणें अद्याप कांहीं करणेंत आलेलें दिसत नाहीं. अशा धंद्यांबाबत पांच वर्षेपर्यंत आयात मालावरील जकात वाढवून सरकारला तजवीज करणें शक्य आहे. त्यानंतर पुढें टॅरिफ बोर्डाचे शिफारशीनुसार काय तें करतां येईल. कायमचें टॅरिफ बोर्ड लवकर नेमल्यास व त्याला केलेल्या सूचनेप्रमाणें निरनिराळ्या धंद्यांची चवकशी करून संरक्षणाची शिफारस करणेचे अधिकाराबरोबर, वाटल्यास स्वतः होऊन एकाद्या धंद्याबद्दल चवकशी करणेची सवड ठेवल्यास त्यायोगें देशाचें व्यवस्थित व सत्वर औद्योगीकरण करणेचे सरकारी धोरणास सहाय्य होऊन, त्यामुळें प्रस्तुतचे औद्योगिक युगांत देशाचे उद्योगिकरणासाठीं महत्वाचे व मूलभूत गणले गेलेले लोखंड, पोलाद, रासायनिक धंदे, यंत्रोत्पादनासाठीं लागणारीं हत्यारें वगैरेसारखे नवे धंदे उभारणें वा जुने असलेल्यांची वाढ करणें हें शक्य होणार आहे. "— श्री. महादेव लक्ष्मण डहाणूकर ( महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष) ह्यांचें चेंबरच्या तिसऱ्या त्रैमासिक सभेंत ता. १५ ऑगस्ट रोजीं भाषण.

### चित्रपटाच्या धंद्यावर नियंत्रणमुक्तीचा परिणाम

युद्ध परिस्थितींत कच्च्या फिल्मचा पुरवठा मर्यादित असल्यानें चित्रपट निर्मितीवर सरकारनें परवान्याचें नियंत्रण घातलें होतें. त्याचेसंबंधांत बऱ्याच तक्रारी ऐकूं येत असत. आतां युद्ध संपल्यामुळें सरकारी नियंत्रण काढून घेण्यांत आलें आहे. पण ह्या नियंत्रणमुक्ततेनें चित्रपटाच्या धंद्याचे मार्गांत नवीन अडचणी उत्पन्न केल्या असल्याचें रायबहादूर चुनीलाल ह्यांनीं नुकत्याच काढलेल्या उद्गारावरून दिसतें. फिल्मचा बाजार मोकळा झाला असल्यानें त्या धंद्यांत पडण्याचा नवीन लोकांस मोह होईल आणि त्यांची स्पर्धा चांगल्या चित्रपटांच्या निर्मितीस बाधक होईल असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांत स्टूडिओंची संख्या मर्यादित आहे आणि तिच्यावर ताण पडून सबंद धंद्यांत गोंधळ माजेल. एका वर्षांत १६५ पेक्षा अधिक चित्रपट ह्या देशांत होऊं शकत नाहींत आणि सिनेमागृहेंहि अपुरीं आहेत. परिस्थिति लक्षांत घेऊन भांवडलवालेहि आपला हात आखडून धरतील. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत धरून धंदेवाल्यांनीं आपलें धोरण आखावें अशी सावधगिरीची सूचना रायबहादुर चुनीलाल ह्यांनीं दिली आहे. सरकारी नियंत्रण गेलें पण स्वयंस्फूर्त संघटन आवश्यक झालें.


डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, कोइमतूर, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० एकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. मुंबई यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५-८-४५ ते २२-९-४५
बॉंबे डाइंग ३१-८-४५ ते १४.९.४५
कोहिनूर १-९-४५ ते १७-९-४५

व्याज-वजा (xd)
इंदूर माळवा रु. ३५- २७-८-४५
कोहिनूर रु. ९ सं. दि. १९-९-४५
डाइंग २७.९.४५
सेंट्रल बँक २७-८-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार दि. १३।८।४५ | मंगळवार १४।८।४५ | बुधवार १५।८।४५ | गुरुवार-शुक्रवार १६।८।४५ १७-८-४५ | सोमवार २०।८।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१८७-८ | २१९१-४ | २१७७-८ | | २१६७-८ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०५-० | ४०३-८ | ४०३-८ | | ४०३-८ |
| २२०१; १६९५ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | १९६७-८ | १९५८-१२ | १९३२-८ | | १९३१-४ |
| ७६५; ५३३ | ९-०-० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९०-० | ५८१-८ | ५८१-० | | ५७३-० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५३५-० | ५३३-८ | ५३१-० | | ५२२-८ |
| ४९८; ३६१ | ६-०-० † | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३६६-० | ३६६-८ | ३६४-० | विजयदिनानिमित्त छुट्टी | ३६४-० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८२-८ | २८१-० | २८१-० | | २७८-८ |
| ३९४; २८२ | ९-०-० S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९२-० | २९१-८ | २९१-० | | २८३-८ |
| ३०५; २१८ | १२-०-० S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८६-८ | २९०-० | २९०-० | | २८०-० |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१४-० | ३-१४-० | ३-१३-६ | | ३-१५-० |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १२-९-६ | १३-८-६ | १३-१०-६ | | १३-१०-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | २-९-० | २-१०-६ | २-११-० | | २-११-६ |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७१८-१२ | ७०५-० | ६९२-८ | | ६९०-० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २०८-० | २०८-८ | २१०-० | | २०९-० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१४-० | २१३-८ | २१५-० | | २१४-० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३७-८ | ५४५-० | ५७२-८ | | ५६२-८ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३६-७ | ३६-११ | ३६-७ | | ३६-२ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१-११ | १०१-१२ | १०१-१२ | | १०१-७ |

सोमवार दि. २०-८-४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२-६ |
| १९५१-५४ | १०१-६ |
| १९५७ | १००-९ |
| १९६३-६५ | ९९-१ |
| १९६६-६८ | ९८-५ |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४६-० |
| सेंट्रल | ८५-१२-० |
| इंडिया | १८९-८ |
| इंपी० | २१९५-० |
| | ५६२-८ |
| रिझर्व्ह | १३८-८ |
| युनियन | ८-१२ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८३०-० |
| बॉम्बे ट्रॅम | १४५-० |
| टाटा हायड्रो | २०२-८ |
| टाटा पॉवर | १८७२-८ |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलॅकॉक | ४०५-० |
| बॉंबे स्टीम | ६०७-८ |
| न्यू इंडिया | ७९-० |
| शिवराजपुर | ५१-० |
| टाटा केमिकल | १८-१० |
| टाटा ऑईल | ६८-१२ |

गुरुवार, दि. २३-८-४५ 'नारळी पौर्णिमे 'निमित्त छुट्टी.




### 'खाजाव' संगीत चढाओढ

कै. लो. टिळकांच्या प्रेरणेनें पुण्यांत सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाले. अशा तऱ्हेचे उत्सव सुरू करण्यांत इतर कांहीं हेतूं-बरोबर स्वदेशीचा प्रसार हाही एक हेतु होता. फडके प्रॉडक्टस् ( मुंबई ) यांच्या खाजावादी खाद्य-पदार्थांच्या प्रचारार्थ श्री. हरिभाऊ भंडारे यांनीं वरील चढाओढ योजिली आहे. या योजनेंत प्राथमिक अगर दुय्यम शाळांतील मुलांमुलींना भाग घेतां येईल व यशस्वी उमेदवारांस रोख रु. १०० चीं बक्षिसें वांटण्यांत येतील. हीं बक्षिसें वांटण्यासाठी पुण्यांतील प्रतिष्ठित नागरिकांची एक कमिटीहि नेमण्यांत आली आहे. परीक्षा ता. १४ सप्टेंबर रोजीं सकाळीं ९ वाजतां नूतन मराठी विद्यालयांत घेतली जाईल. प्रवेशपत्रिका घेऊन जाव्यात. परीक्षकांच्या निर्णयानुसार पहिलें १०० रुपयांचें, दुसरें ५० रुपयांचें, तिसरें २५ रुपयांचें व आणखी किरकोळ कांहीं रोख बक्षिसें वांटण्यांत येतील.


## विलक्षण योगायोग—

एक विलक्षण साहसी स्त्री प्रेयसी बनली हा योगायोग विलक्षण नाहीं कां! पहा—

नवयुगाचा नवा सामाजिक बोलपट!

# पन्ना

दिग्दर्शक— नजम नकवी.
भूमिका— गीता निजामी,

८ वा जोरदार आठवडा! **श्रीकृष्ण-पुणें** फोन नं. ९१००१

रोज ६॥ व १० वाजतां.
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३॥ वा.
नारळी पौर्णिमेनिमित्त ता. २३ रोजीं जादा खेळ दु. ३॥ वा.

आगाऊ ति. विक्री थिएटरवर नेहेमीप्रमाणें.

—पिअरलेस प्रकाशन—

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें

### रौप्य महोत्सवाची तयारी

उद्योगधंदे व व्यापार करूं इच्छिणाऱ्या अगर त्यांत सहभागी होऊं पाहणाऱ्या महाराष्ट्रीय तरुणांस व्यापारी शिक्षण मिळावें या उद्देशानें प्रो. ग. कृ. भोपटकर यांनीं सन १९१८ सालीं विजयादशमीच्या सुमुहूर्तावर हें विद्यालय स्थापन केलें. तेंव्हांपासून सतत पंधरा वर्षें म्हणजे सप्टेंबर १९३३ पावेतों त्यांनीं सदर विद्यालयाचे प्रगतिप्रीत्यर्थ कार्य केलें. त्या सालीं त्यांनीं स्थलान्तर करून औद्योगिक क्षेत्रांत प्रत्यक्ष पदार्पण केलें व एका मोठ्या व नमुनेदार साखर कारखान्याच्या उभारणीचें कामीं वाहून घेतल्यानें तेव्हांपासुन त्यांचेच शिष्य श्रीयुत शं. ह. धुपकर, डी. कॉम., हे या विद्यालयाचें कार्य आजतागायत चालवीत आहेत. श्री. धुपकर यांच्या विद्यालयाविषयींच्या आपलेपणामुळें व अभिमानामुळें विद्यालयाच्या अभिवृद्धीसाठीं त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले असून सदर विद्यालयास बरेंच मान्यत्व प्राप्त करून दिलें आहे. संस्थेचे आणखी एक माजी विद्यार्थी प्रो. व्ही. बी. कीर्तने, बी. एससी., एलएल. बी., जी. डी. ए. आर. ए., इनकॉर्पोरेटेड अकाउंटंट ( इंग्लंड ), हेहि सन १९४० पासून सहकारी म्हणून येऊन मिळाले. सध्या तेच विद्यालयाचे प्रिन्सिपलचे जागीं काम पहात आहेत.

प्रो. भोपटकर ह्यांचा प्रयत्न पुण्यासारख्या ठिकाणीं अगदींच पहिला असल्यानें महाराष्ट्रांतील व्यापारी शिक्षणाचे आद्य पुरस्कर्ते म्हणून जसें त्यांना व त्यांच्या विद्यालयाला ओळखण्यांत येईल, तसेंच त्यांना आघाडीचें अत्यंत कठिण असें बेलदारीचें ( पायोनिअरिंगचें ) कार्य करण्याची कष्टाळू जबाबदारी पार पाडण्यांत अत्यंत श्रम घ्यावे लागले आहेत. विद्यालयाच्या उपयुक्त कार्याची साक्ष त्यांतून गेल्या पंचवीस वर्षांत शिकून तयार झालेले व व्यापाराच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत नांव कमावलेले माजी विद्यार्थी देत आहेतच. येथील शिक्षणक्रम पुरा केलेले विद्यार्थी हल्लीं काय करीत आहेत याचें पृथःकरण केल्यास हें निश्चित समजून येईल कीं, कोणताही स्वतंत्र धंदा यशस्वी करण्याचें सामर्थ्य विद्यार्थ्यांचे अंगीं येऊन त्या कामीं आवश्यक तो आत्मविश्वास निर्माण होतो व त्यामुळें जबाबदारीच्या व महत्त्वाच्या जागा पत्करण्याची पात्रताही त्यांचे अंगीं येते. सबब सर्वस्वी नोकरीवर अवलंबून रहाण्याची पाळी हें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांवर येत नाहीं. आजपर्यंत १८०० वर विद्यार्थी शिकून गेले आहेत. दर वर्षांच्या परीक्षांचे निकाल अत्यंत स्फूर्तिदायक, अभिमानास्पद व गौरवास्पद असेच आहेत आणि त्यामुळेंच सतत पंचवीस वर्षें हें कार्य होऊं शकलें. अनेक मित्रमंडळी व कांहीं माजी विद्यार्थी ह्यांच्या सहकार्यानें विद्यालयाच्या प्रगतीस विशेष स्थैर्य प्राप्त झालेलें आहे.

विद्यालयाला पंचवीस वर्षें पूर्ण झालीं आहेत व म्हणून त्याचा रौप्यमहोत्सव येत्या विजयादशमीस ( ता. १६ आक्टोबर, १९४५ रोजीं ) साजरा करण्याचा चालकांचा मानस आहे. आजपर्यंतच्या कार्याला जास्त स्थैर्य आणण्याचे दृष्टीनें स्वतःची इमारत करणें; महाराष्ट्रांतील व्यापारी शिक्षण प्रयत्नाचा रौप्यमहोत्सव—स्मारक म्हणून सरकारी शाळाखात्याकडून नवीन आखण्यांत आलेला अभ्यासक्रम शिकविणारें व्यापारी हायस्कूल चालू करणें; निरनिराळ्या परीक्षांत विशिष्ट गुणांनीं उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिकें देतां यावीं म्हणून निधि अस्तित्वांत आणणें; अशा तीन प्रमुख आकांक्षा रौप्यमहोत्सवप्रसंगीं साध्य करतां याव्या अशी चालकांची तीव्र मनीषा आहे. ह्या प्रसंगीं एक स्मृतिग्रंथहि प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मानस आहे.

## औद्योगिक कंपन्यांचे ऑर्डिनरी भाग

### बाजारभावांतील वाढ दाखविणारे इंडेक्स नंबर

बँका, कोळशाच्या खाणी, तागाच्या गिरण्या, सिमेंट, चहा, कागद, साखर, इत्यादींच्या कंपन्यांचे बाजारभाव १९४४–४५ मध्यें चढीचे राहिले. तथापि, १९४३–४४ च्या मानानें १९४४–४५ मध्यें बाजारभावांतील वाढीचें प्रमाण टिकून नव्हतें. कोळशाच्या तुटवड्यामुळें कोळशाचे शेअर्स चांगलेच तेजींत होते; त्यांच्या किंमतींत ४७% वाढ झाली. ताग आणि इंजिनिअरिंग ह्यांच्या शेअर्सच्या किंमतींत अनुक्रमें २२% व १७% वाढ झाली. कापडाच्या गिरण्यांचे शेअर्स मात्र ९% पडले.

एप्रिल, १९४४ मध्यें आसामांत जपानी शिरल्यामुळें शेअर मार्केट एकदम खालीं आलें. १४ एप्रिल १९४४ रोजीं मुंबईच्या गोदींत आग लागली. त्याकारणानें बँका व विमा कंपन्या ह्यांचे शेअर्स घसरले. पुढें जुलैपर्यंत शेअरबाजार तेजींत होता. संयुक्त राष्ट्रांच्या एकजात विजयाच्या बातम्यामुळें ऑगस्ट व सप्टेंबर ह्या महिन्यांत शेअर्सचे भाव पुनः उतरले. विशेषतः मद्रास स्टॉक एक्सचेंजमध्यें ही घट फारच झाली. ऑक्टोबरपासून भाव पुनः सुधारले, परंतु जानेवारी, १९४५ नंतर ते उतरंडीस लागले. कापडाच्या गिरण्यांच्या शेअर्सनीं मात्र इतर शेअर्सचें अनुकरण गेल्या वर्षी कधींच केलें नाहीं. कायम डिव्हिडंड देणाऱ्या प्रेफरन्स भागास मात्र एकजात मागणी होती. त्यांपैकीं बहुतेक करमाफ असल्याकारणानें, युद्धकाळांत कर वाचविण्यासाठीं व युद्धोत्तर काळांत भांडवली नुकसान टाळण्यासाठीं, त्यांत पैसे गुंतविण्याची लोकांची प्रवृत्ति प्रामुख्यानें दिसून येत होती. खालील तक्त्यांत प्रमुख ऑर्डिनरी शेअर्सचे गेल्या चार वर्षांतील तुलनात्मक बाजारभाव दिले आहेत:—

ऑगस्ट १९३९=१००

| | १९३९ सप्टेंबर | १९४१-४२ | ४२-४३ | ४३-४४ | ४४-४५ |
|---|---|---|---|---|---|
| बँका | ८६.६ | ११०.८ | ११७.५ | १५५.५ | १६२.६ |
| कापड गिरण्या | १२१.४ | १७७.२ | २१३.५ | २६९.५ | २४५.७ |
| कोळसा | १२०.९ | १२५.३ | १३३.८ | १९०.४ | २८०.८ |
| तागाच्या गिरण्या | १३०.७ | १२९.८ | १३१.९ | १७०.० | २०६.६ |
| माइनिंग व तेल | १३१.२ | १०४.६ | १०६.८ | १५५.२ | १६३.४ |
| सिमेंट, चुना | १०३.७ | १२५.७ | १५८.१ | २००.० | २१०.५ |
| इंजिनिअरिंग, मेटल | १२६.९ | १४४.५ | १४९.७ | १९६.६ | २३०.५ |
| चहा | १०१.१ | १३६.३ | १५९.१ | २२६.४ | २४१.७ |
| कागद | १३८.९ | २५१.४ | २९१.१ | ३९८.३ | ४१०.९ |
| साखर | १२९.२ | १५३.३ | १८०.३ | २६५.४ | २९९.७ |
| इतर | १२२.४ | १५६.१ | १६७.८ | १९९.६ | २४२.६ |
| एकत्र इंडेक्स आकडा | १२२.४ | १४५.२ | १५९.३ | २१०.१ | २३९.१ |

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर. येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २१ ऑगस्ट, १९४५ अंक ३५


## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(स्थापना १९१८) टे. नं. ३१६७५

हेड ऑफिस : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुं: ४ — सब ऑफिस दादर



| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,४७,२८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. १,५४,००० |
| ठेवी | ... ... | रु. ४८,८१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५३,६१,००० |

सभासदांना जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट अगर कॅशक्रेडिट देण्यांत येतें.

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन.

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.




स्टेशन, मोटारस्टँड व पोस्ट ऑफिसपासून अवघ्या पांचच मिनिटांचे रस्त्यावर

बेळगांव येथील एकच प्रसिद्ध ठिकाण

## महाराष्ट्र भुवन

लॉजिंग बोर्डिंगची उत्कृष्ट सोय

बेळगांव ] [ मालकः—वाय. व्ही. सहस्रबुद्धे

## EVERYTHING IN RUBBER GOODS

- Hospital Requirements
- Cab Tyres
- Mechanical Rubber Goods
- Rubber Gloves
- Rubber Rollers for Textile Mills
- Ebonite Sheets & Rods etc.

The Western India Manufacturers' Agency, Ltd.,

*Sir Vithaldas Chambers, 16 Apollo Street, Fort, Bombay*

Tel. 32408 ] [ Telegrams : "Artleather"




## —: साठे बिस्किटें :—

### ऑरेंज व शूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## विविध माहिती

### इंपीरिअल बँकेंतील हिंदी व युरोपियन अधिकारी

"आपल्या बँकेंतील अधिकारी वर्गाचे तीन भाग पाडतां येतील: ऑफिसर्स, असिस्टंटस व सब अकौंटंटस. फक्त आफिसर्स वर्गातच हिंदुस्थानाबाहेरील लोकांना जागा देण्यांत आल्या आहेत. १९३५ साली बँकेंतील २२५ ऑफिसर्सपैकी १९२ युरोपियन व ३३ हिंदी होते. आतां १२३ युरोपियन व ६४ हिंदी आहेत. इंपीरिअल बँक जेव्हां स्थापन झाली, तेव्हा तिनें पांच वर्षांत १०० शाखा उघडल्या पाहिजेत असें तिचेवर बंधन घालण्यांत आलेलें होतें. त्यासाठी अनुभवी अधिकारी एकदम मिळविणें आवश्यक होऊन त्यांची नेमणूक केली गेली. ह्या कारणानें खालच्या नोकरांना बढतीस जागाच उरली नाहीं. १९२९ नंतर ६३ नवे अधिकारी नेमण्यांत आले, त्यांपैकी ५४ हिंदी होते. १९४५ ते १९५० च्या दरम्यान बँकेचे बरेच अधिकारी सेवानिवृत्त होतील, त्यावेळीं बढतीस बराच वाव मिळेल." :—बँकेच्या वार्षिक सभेंत अध्यक्षांचें भाषण.

### जगांतील सर्वांत मोठीं धरणें पंजाबांत होणार

पंजाबमध्यें पांच प्रचंड धरणें बांधण्याची पूर्वतयारी चालू आहे. डॉ. निकेल हे योग्य जागेची निवड करीत आहेत आणि खडक व दगड ह्यांच्या थरांचा अभ्यास करीत आहेत. ह्या धरणांच्या पाण्यावर चालणारीं वीजगृहें उत्तर हिंदुस्थानांत औद्योगिक क्रांति घडवून आणतील, अशी अपेक्षा आहे.

### मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची निवडणूक

मुंबई प्रां. सहकारी बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर कर्नाटकांतील, महाराष्ट्रांतील व गुजरातमधील मध्यवर्ती बँकांतर्फे अनुक्रमें श्री. उगरगोल, देशमुख व देसाई हे निवडून आले. कर्नाटक–महाराष्ट्रांतील अर्बन बँकांनीं श्री. पोतदार ह्यांस व मुंबई–गुजरातमधील अर्बन बँकांनीं श्री. वर्दे ह्यांस निवडून दिलें. श्री. मोरे, झुंजारराव व विचारे हे पतपेढ्यांतर्फे बोर्डावर आले.

### पूना मर्चंट्स को. बँक लि.

वरील बँकेच्या निवडणुकी ता. ५ ऑगस्ट रोजीं झाल्या. श्री. ल. ब. भोपटकर हे अध्यक्ष व श्री. द. दि. चितळे हे उपाध्यक्ष निवडण्यांत आले. ता. ७ ऑगस्टच्या बोर्डाच्या सभेनें श्री. रा. सी. जोशी ह्यांची चेअरमन, श्री. ना. सं. जमदाडे ह्यांची व्हाइस चेअरमन व श्री. मो. वा. पेणकर ह्यांची ऑनररी एजंट म्हणून निवड केली. गेल्या वर्षी बँकेस ५,०२२ रुपये नफा झाला. भागीदारांस ३% डिव्हिडंड मिळालें.

---


### बार्शी सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि.

## नोटीस

ह्या बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येते कीं, बँकेची वार्षिक साधारण सभा साने मेमोरियल हॉलमध्यें रविवार ता. २३ माहे सप्टेंबर १९४५ रोजीं दुपारीं ३ वाजतां (स्टँ. टा.) बँकेच्या नोटीसबोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरतां भरणार आहे. त्यावेळीं सर्व सभासदांनीं हजर रहावें, अशी विनंती आहे, कळावें.

बार्शी
ता. २४।८।४५

बोर्डाच्या हुकुमावरून,
र. प. पटवर्धन,
मॅनेजर.

म च्या पै शा चा


यो ग्य मो ब द ला



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे
(स्वतःचे डेपो: मुंबई--गोवा--बंगलोर--दिल्ली)
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—

नोगीचें
डोंगर
छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## सहकाराचें सर्वमान्य साधन

आतां युद्ध संपल्यानें त्याचा फाफटपसारा आवरण्याचें काम सर्व राष्ट्रांस हातीं घ्यावें लागत आहे आणि ह्या संक्रमणावस्थेतून स्थिर आर्थिक संघटना त्यांस निर्माण करावयाची आहे. हें काम किचकट तर आहेच, पण पुढील नियोजित कार्यक्रमास तें बाधक न होतां शक्य तर परिपोषकच होईल अशा रीतीनें तें पार पाडलें गेलें पाहिजे. हिंदुस्थानच्या त्वरित औद्योगीकरणाच्या मार्गांत अडचणी येत आहेत, त्या कशा दूर कराव्या ह्याची विवेचना कारखानदार आणि धंदेवाले ह्यांस पडली असल्याचें दिसत असून मध्यवर्ती सरकारहि ह्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करीत आहे. इंग्लंडमध्यें मजूर मंत्रिमंडळानें आपल्या आर्थिक धोरणाची रूपरेषा पुढें मांडली आहे. हिंदुस्थानांत कायदेमंडळांच्या नवीन निवडणुकी लवकरच व्हावयाच्या असून लोकनियुक्त मंत्रिमंडळांस येथील आर्थिक अभिवृद्धीविषयींचें धोरण निश्चित करून त्यास मूर्तस्वरूप द्यावें लागेल. कोणते मोठे धंदे काढणें व चालवणें सरकारच्या कक्षेंत यावें, कोणते खाजगी मालकीचे असावे, खेडेगावी व लहान धंद्यांचें संघटन कसें करावें इत्यादि बाबींची पुष्कळ चर्चा झाली आहे आणि तीमध्यें कांहीं मतभेदहि प्रकट करण्यांत आले आहेत. तथापि, शेतीच्या धंद्याची सुधारणा व खेडेगावी उद्योगांची संघटना ह्यांचेसंबंधांत करण्यांत आलेल्या सूचनांमध्यें पुष्कळ ऐकमत्य आहे ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

युद्धकाळांत अन्नपुरवठ्याविषयीं ह्या देशांत कटु अनुभव येऊन तो कायमचा वाढवण्याचें आणि सुधारण्याचें महत्त्व सर्वांस पटलें. पुरेसें आणि पौष्टिक अन्न जनतेच्या पुरवठ्यास येण्यास शेतीच्या धंद्याची उत्पादकता वाढणें आवश्यक आहे आणि त्या दिशेनें संघटित व नेटाचे प्रयत्न केले जाणें अगत्याचें आहे ह्या विषयीं आज कोठेंच शंका किंवा मतभेद नाहीं. पण शेतीचें उत्पन्न कसें वाढवावयाचें आणि शेतकरी वर्गाच्या प्राप्तींत भर घालून त्याची रहाणी कशी सुधारावयाची ? देशाच्या कांहीं भागांत जमीनदारीची जमीनधारणाची पद्धति अस्तित्वांत आहे आणि तेथें दरिद्री कुळांस भारी खंड द्यावा लागतो. तेथें आणि इतरत्र रयतवारी भागांत शेतांचें क्षेत्र अत्यंत मर्यादित असून त्यांत सुधारणा व उत्पादकतेची वाढ अशक्य आहे. देशभर सर्वत्र शेतकऱ्यांस भांडवलाची अडचण भासते, सुधारलेलीं आउतें वापरतां येत नाहींत आणि खत–पाण्याचा योग्य पुरवठा होत नाहीं. अशा स्थितींत शेतीच्या धंद्याची प्रगति होणें दुरापास्त दिसतें आणि तिच्यावर उपाय योजण्याची आवश्यकता प्रतीत होते. अनेक विचारी नियोजकांनीं ह्या परिस्थितीवर सहकारी संघटनाचा तोडगा सुचवला आहे आणि त्याच्या सहायानेंच दरिद्री, मागसलेल्या व अत्यंत लहान प्रमाणावर धंदा करणाऱ्या हिंदी शेतकऱ्याची उत्पादक शक्ती वाढूं शकणार आहे असें प्रतिपादलें आहे. शेतकऱ्यांस व्यक्तिशः जें सांपत्तिक व व्यवहारिक बळ स्वतःचा धंदा सुधारून किफायतीचा करण्यास उपलब्ध होऊं शकत नाहीं, तें परस्पर-सहायानें व संघशक्तीनें प्राप्त करून घेतां येतें हें सहकारी संघटनेचें मूलतत्त्व असल्यानें आणि तें जगांतील अनेक देशांत यशस्वी ठरलें असल्यानें हिंदुस्थानांतील शेतीच्या पुनर्घटनेंत त्याचाच अवलंब करणें श्रेयस्कर व अगत्याचें आहे असा सिद्धांत त्यांनीं मांडला आहे. त्यांच्या योजनांत पूर्ण एकवाक्यता नसली तरी सहकारी संघटनेचें तत्त्व त्यांत निश्चितपणानें ग्रथित केलें आहे.

अलीकडे प्रसिद्ध झालेल्या दोन पुस्तकांचा ह्यासंबंधांत निर्देश केला असतां तो येथें दिग्दर्शनाच्या दृष्टीनें पुरेसा होईल. श्री. डी. एस. दुबे ह्यांनीं आपल्या पुस्तकांत (Our Agricultural Plan—Kitab Mahal, Allahabad ) प्रत्येक खेडेगावांत सहकारी पंचायत स्थापन करावी आणि तिनें आपल्या क्षेत्रांतील आर्थिक व्यवहार सहकारी संघटनेस धरून एकत्र चालवावे असें सुचवलें आहे. ह्या नियोजित घटनेचा स्थूल मानाचा तपशीलहि लेखकानें दिला आहे. श्री. बाळसुब्रमनियम् ह्यांनीं शेतीसाठी धोरण ( A Policy for Agriculture: Oxford University Press ) ह्या नांवाची पुस्तिका लिहिली आहे. तीमध्यें स्वतंत्र रीतीनें शेती करणारांचे सहकारी संघ स्थापण्यांत यावे आणि त्यांच्या सभासदांनीं डेन्मार्क, हॉलंड, इत्यादि देशांच्या धर्तीवर सुधारलेल्या पद्धतीनें शेती करावी अशी सूचना केली आहे. हिंदुस्थानांत सहकारी संघटन आतांपर्यंत यशस्वी झालेलें नाहीं असा अनुभव असतांना पुन्हां त्याच मार्गाचा अवलंब करण्यांत काय अर्थ आहे ? अशा आशयाच्या येऊं शकणाऱ्या आक्षेपास लेखकानें उत्तर दिलें आहे. परिस्थिति अनुकूल करून घेऊन योग्य रीतीनें सरकारनें सहकाराची वाढ केली नसल्यानें त्यास अपेक्षेप्रमाणें यश आलें नाहीं. ही चूक आतां सुधारून घेतली पाहिजे असें त्याचें सांगणें आहे. सरकारनें स्वतः पुढाकार घेऊन खेडेगावी जीवनाची सहकारी पुनर्रचना घडवून आणली पाहिजे असा वरील दोन लेखकांचा आग्रह आहे. ह्याच प्रकारचे विचार प्रकट करणाऱ्या इतर पुस्तकांचा निर्देश करतां येईल. मासल्यासाठी येथें उल्लेखिलेल्या लेखकांच्या विचारसरणीवरून खेडेगावी आर्थिक जीवनाची घडी सहकारी पद्धतीनें बसवली जाऊन शेती, लहान-सहान उद्योगधंदे व व्यापारी व्यवहार ह्यांस सहकारी वळण लावलें गेल्यावांचून हिंदुस्थानच्या अभिवृद्धीचा प्रश्न सुटावयाचा नाहीं हा सिद्धांत कसा सर्वमान्य झाला आहे हें दिसून येतें. ह्यासंबंधांत सरकारचें विधायक धोरण आणि कार्य नियोजित पुनर्घटनेस चालना देणारें, पोषक व सहायक असणें अगत्याचें आहे हेंहि स्पष्ट आहे.

### आयुर्विमा कंपन्यांचे डायरेक्टर व भागीदार

आयुर्विमा कंपनीच्या डायरेक्टर बोर्डांतील सभासदांत कोणत्याहि प्रकारचा बदल झाला, तर ती गोष्ट एक इंग्रजी व एक स्थानिक अशा दोन भाषांतील वृत्तपत्रांत कंपनीनें जाहीर केली पाहिजे, अशी शिफारस जहांगीर कमिटीनें केली आहे. कंपनीच्या प्रत्येक भागीदारानें, तो धारण करीत असलेल्या भागांत किंवा इतर भागांत त्याचा हितसंबंध किती आहे, हें कंपनीस कळविलें पाहिजे. भाग वर्ग होण्याचें वेळीं, ते ज्याचे नांवें वर्ग व्हावयाचे, त्यानें भाग वास्तविक कोणासाठी धारण करण्यांत येत आहेत, हें स्पष्ट करून सांगितलें पाहिजे. कोणासहि विमा कंपनीच्या एकूण वसूल भांडवलाच्या १०% भागांपेक्षा अधिक भागांवर अधिकार प्राप्त होऊं दिला जाणार नाहीं. बँक अथवा इनव्हेस्टमेंट कंपनी ह्यांचे बाबतींत हें प्रमाण ५% राहील.

### बडोद्याच्या महाराजांची इस्टेट–खरेदी

बडोद्याच्या महाराजांनीं इंग्लंडमध्यें ८७ एकरांची एक इस्टेट नुकतीच खरेदी केली आहे.

## पालघर येथील स्त्रियांची पहिली सहकारी संस्था

### कस्तुरबा सहकारी उद्योग मंदिर, लि.

पालघर तालुक्यांत नसली तरी खुद्द पालघर येथें सहकारी चळवळ आस्ते कदम आगेकूच करीत आहे. मुंबई प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेची शाखा पालघर येथें येऊन जवळ जवळ १५ वर्षे झाली. शिवाय पालघर पेंढी सेल सोसायटी आणि पालघर पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक या दोन जुन्या सहकारी संस्था येथें आहेत. या संस्थांत गेल्या वर्षांत दोन नवीन संस्थांची भर पडली. एक पालघर तालुका हॉटेल अँड बेकरी ओनर्स को. कंझ्यूमर्स सोसायटी आणि दुसरी पालघर तालुका को. कंझ्यूमर्स सोसायटी. या सर्व सहकारी सोसायटया पुरुष वर्गानें चालविलेल्या आहेत. ह्या संस्थांना एक प्रकारें पूरक अशी स्त्रियांनीं स्थापलेली 'कस्तुरबा सहकारी उद्योग मंदिर, लि.' ह्या नांवाची एक प्रोड्यूसर्स सोसायटी येथें निघाली आहे. तिची पहिली साधारण सभा रविवार ता. २२-७-४५ रोजीं पालघर येथें मुंबईच्या श्री. सौ. विमल बेन मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. सभेला गांवांतील बराच महिलासमाज उपस्थित होता. शिवाय पुरुषवर्गहि हजर होता. बोर्डी, चिंचणी, विरार आणि वसई येथील कांहीं प्रमुख सद्‌गृहस्थहि ह्या सभेस उपस्थित राहिले.

सुरवातीला सोसायटीच्या एक प्रमोटर कु. जयंतीबेन श्रॉफ यांनीं ही सोसायटी स्थापण्याचा हेतु निवेदन करून अशा प्रकारच्या सोसायटयांची आपल्या देशाला किती आवश्यकता आहे हें प्रतिपादिलें. नंतर सभेच्या कार्यक्रमानुसार सभेचीं कामें—पोटनियम स्वीकारणें, व्यवस्थापक कमिटी निवडणें, पुढील वर्षाचा कार्यक्रम आखणें इ.—झाल्यावर उपस्थितांपैकीं श्री. मुकुंदराव सावे आणि श्री. गोविंदराव वर्तक यांचीं समयोचित भाषणें झालीं. नंतर श्री. खंडागळे, बँक इन्स्पेक्टर, पालघर यांचें 'सहकार' या विषयाचें विवेचन करणारें आणि प्रोड्यूसर्स सोसायटीचें महत्त्व प्रतिपादणारें छोटेसें भाषण झालें. शेवटीं अध्यक्ष श्री. सौ. विमलाबन मेहता यांनीं आपलें अध्यक्षीय भाषण सुमारें पाऊणतास केलें. या भाषणांत त्यांनीं अशा सोसायटयांबाबत स्वतःचा अनुभव सांगून त्या यशस्वी रीतीनें कशा चालवाव्यात हें योग्य शब्दांत व माहिती देऊन सांगितलें. त्यांचें एकंदर भाषण विचारपूर्ण आणि 'आधी केलें मग सांगितलें' या प्रकारचें असल्यामुळें तें परिणामकारक झालें. शेवटीं आभारप्रदर्शन होऊन सभा बरखास्त झाली.

ठाणें जिल्ह्यांत अशा प्रकारची ही पहिलीच सहकारी सोसायटी आहे.

### पूना डि. को. रुपी बँक लि.

(वार्षिक सभा : २ सप्टेंबर, १९४५)

वरील बँकेच्या पटावर १६२२ सभासद आहेत. वसूल भांडवल ३७,६२५ रुपये असून रिझर्व्ह फंडांत १२,६३८ रुपये व बॅड डेट रिझर्व्हमध्यें ७,१०७ रुपये आहेत. ठेवी १,६३,५०२ रुपयांच्या आहेत. बँकेनें ८२,९३२ रुपये सरकारी व तत्सम रोखे ह्यांत गुंतविले आहेत व १,४१,७०१ रुपये कर्जाऊ दिले आहेत. थकबाकीचें एकूण कर्जाशीं प्रमाण १२% पडतें. थकबाकी बरीच वसूल झाली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २,४६८ रुपये नफा झाला. भागीदारांस ३½% डिव्हिडंड देण्यास १४१० रुपये लागतील. १९४४–४५ मध्यें श्री. शं. न. घडफळे हे सल्लागार मंडळाचे अध्यक्ष व श्री. चिं. ल. तिखे, बी. ए., हे कार्यकारी मंडळाचे चेअरमन होते. श्री. वा. ग. भावे (मॅनेजर) ह्यांनीं थकबाकी वसूल करण्याचे कामीं बरीच मेहनत घेतली, असें कार्यकारी मंडळानें रिपोर्टांत नमूद केलें आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. १५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'.

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००

काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००

भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००

खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

शाखा व उपशाखा

| | |
|---|---|
| १ सातारा (जि. सातारा) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड " | २५ मालेगांव " |
| ३ किर्लोस्करवाडी " | २६ नांदगांव " |
| ४ कोरेगांव " | २७ घोटी " |
| ५ इस्लामपूर " | २८ सटाणा " |
| ६ शिराळें " | २९ येवलें " |
| ७ तासगांव " | ३० मनमाड |
| ८ वाई " | ३१ धुळें (जि. पश्चिम खानदेश) |
| ९ लोणंद " | ३२ दोंडाईचें " |
| १० भिवंडी (जि. ठाणें) | ३३ नंदुरबार " |
| ११ कल्याण " | ३४ साक्री " |
| १२ पालघर " | ३५ शहादें " |
| १३ अकलूज (जि. सोलापूर) | ३६ शिरपूर " |
| १४ अहमदनगर (" अहमदनगर) | ३७ शिंदखेडें " |
| १५ बेलापूर रोड " | ३८ तळोदें " |
| १६ कोपरगांव " | ३९ नरडाणा |
| १७ पाथर्डी " | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी " | ४१ गोध्रा " |
| १९ शेवगांव " | ४२ झालोद " |
| २० श्रीगोंदे " | ४३ पनवेल (जि. कुलाबा) |
| २१ बेलापूर (गाव) " | ४४ नडियाद (जि. खेडा) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद " |
| २३ नाशिक (जि. नाशिक) | ४६ बोरसाद " |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### सकस अन्नपुरवठ्याविषयीं चौकशी

हिंदी आर्थिक जीवनांतील वैगुण्यें दूर करून तें अधिक सुखमय व्हावें ह्याकरितां युद्ध संपतांच अमलांत आणतां येतील अशा योजना तें चालू असतांनाच तयार करण्याचें सरकारनें ठरविलें होतें. आतां युद्ध संपून गेलें तरी अजून कांहीं चौकशा व्हावयाच्या राहिल्या आहेत आणि त्यांचा आराखडा तयार होत आहे. सामान्य जनतेचें अन्न पुरेसें सकस नसतें आणि त्यामुळें लोकांचें आरोग्य नीट रहात नाहीं ह्याची जाणीव सर्वांस झाली आहे. शक्तिवर्धक अन्नाचें उत्पादन व त्याची वाटणी सध्यां कोणत्या स्थितींत आहे आणि ही स्थिति सुधारण्यास कोणते उपाय योजिले पाहिजेत ह्यासंबंधानें माहिती गोळा करण्याच्या कामास हिंदुस्थान सरकारनें प्रारंभ केला आहे. सर जोसेफ भोर ह्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या जनतेच्या आरोग्याचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्याहि कक्षेंत सकस अन्नाच्या पुरवठ्याचा प्रश्न येतो आणि त्या समितीचा रिपोर्ट अजून प्रसिद्ध व्हावयाचा आहे. हिंदी जनतेची सध्याची प्राप्ति लक्षांत घेतां तिला इच्छित सकस अन्न मिळणें दुर्घट आहे, तेव्हां लोकांची आर्थिक उत्पादकता आणि प्राप्ति वाढवण्याचे उपाय योजणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. तथापि, नियोजित चौकशींतून विश्वसनीय माहिती बाहेर येईल हा तिचा उपयोग आहे.

### औद्योगीकरण दोन वर्षें पुढें ढकललें

ह्या देशाच्या औद्योगीकरणाच्या योजना तयार होऊन त्यांचेसाठी आवश्यक असलेलीं यंत्रें मागवण्याच्या हेतूनें प्रमुख हिंदी कारखानदार ब्रिटिश व अमेरिकन धंदेवाल्यांशीं बोलणीं करण्याकरितां गेले होते आणि त्यांचा दौरा पुरा होऊन ते परत येत आहेत. हिंदुस्थान सरकारचे नियोजन मंत्री, सर आर्देशीर दलाल अशाच उद्देशानें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत बाटाघाटी करून परत आले आहेत. त्यांनीं आपल्या कामगिरीचा वृत्तांत नुकताच सांगितला त्यावरून वरील दोन्हीं राष्ट्रें स्वतःची आर्थिक घडी पुन्हां बसवण्यांत गुंतलीं असल्यानें त्यांस हिंदुस्थानास हवी असलेली यंत्रसामुग्री आणखी दोन वर्षेंपर्यंत तरी पुरवतां येणार नाहीं असें दिसतें. हिंदी घटना कायद्यांत ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हिताचे रक्षणासाठी निर्बंध घातलेले आहेत, ते दूर व्हावे अशा विषयीं बोलणीं सर आर्देशीर ह्यांनीं केलीं, पण घटनेचा सबंध प्रश्नच आतां चर्चिला जावयाचा असल्यानें तीं निष्फळ झालीं. स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगासंबंधानेंहि अजून कांहींच निश्चित सांगतां येत नाहीं. अशा रीतीनें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाचा प्रारंभ लांबणीवर पडला आहे असा निष्कर्ष ह्या निवेदनावरून आणि टाटा–बिर्लादि कारखानदारांच्या प्रसिद्ध झालेल्या उद्गारांवरून निघतो.

### ग्रामोद्धार कार्याविषयींचा सरकारी वृत्तांत

मुंबई प्रांतांत सरकारनें चालवलेल्या ग्रामोद्धार कार्याचा १९४३–४४ सालाबाबतचा वृत्तांत अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. ह्या कार्याशीं संबंध असलेल्या निरनिराळ्या खात्यांतील अधिकाऱ्यांस युद्धपरिस्थितीनें निर्माण केलेल्या अडचणींत आपला कारभार करावा लागला तरी ग्रामोद्धाराचा कार्यक्रम चालू राहिला असें ह्या अहवालांत म्हटलें आहे आणि जमीन सुधारणा, सुधारलेलीं शेतीचीं साधनें, बीं व खतें ह्यांचा पुरवठा, पिकांच्या रोगांचें निवारण, जनावरांची जोपासना, शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था, आरोग्य, शिक्षणप्रसार इत्यादि बाबतींत झालेल्या प्रगतीची माहिती दिली आहे. सहकारी चळवळीसंबंधानें वृत्तांतांत असें म्हटलें आहे कीं, प्रांतांतील एकूण ९,१३५ सोसायट्यांपैकी ४,०९४ प्राथमिक कर्जे देणाऱ्या शेतकरी सोसायट्या आहेत. तथापि, अलीकडे ह्या संस्थांत बीं, खतें, आऊतें व घरगुती उपयोगाचे जिन्नस ह्यांचा पुरवठा करण्याचें कामहि हातीं घेण्याची वाढती प्रवृत्ति दिसून येत आहे. धान्य आणि इतर नियंत्रित मालाच्या वाटण्याचें काम सुव्यवस्थित रीतीनें चाललेल्या सोसायट्यांकडे सोपवून त्यांस उत्तेजन देण्याचें धोरण सरकारनें अंगिकारल्याकारणानें ही प्रवृत्ति बळावली आहे. कर्जनिवारणाचा कायदा फलद्रूप व्हावा एवढ्याकरितां पिकांच्या तारणावर शेतकऱ्यांस अल्प व्याजानें पैसे पुरवणाऱ्या सोसायट्या स्थापन केल्या जात आहेत आणि शेतकऱ्यांच्या विक्रीची सहकारी व्यवस्था करण्यांत येत आहे. वृत्तांताच्या वर्षी तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची संख्या दोहोंनीं वाढून ११५ झाली. "अधिक धान्य पिकवा" ह्या मोहिमेस त्यांचें उत्कृष्ट सहाय झालें आहे. कांहीं सोसायट्या (उदाहरणार्थ, पू. खानदेशांतील) जनावरें व कोंबड्या ह्यांच्या पैदाशीचेंहि काम करीत आहेत. बेटर फार्मिंग सोसायट्यांची संख्या सहानीं वाढली व ५२ झाली. त्यांचें कार्य तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सच्या कामास पूरक असें आहे. मल्टिपर्पज सोसायट्यांच्याहि संख्येंत वाढ होऊन ती १०५ झाली. खेडेगावांत धान्य वाटण्याचें काम ह्या संस्थांकडे सरकारनें दिल्यामुळें एका वर्षांत ही वाढ २६ नें झाली. ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या बाबी खेडेगावीं सहकारी सोसायट्यांनीं हातीं घेऊन उपयुक्त कामगिरी बजावल्याचीं कित्येक उदाहरणें वृत्तांतांत नमूद करण्यांत आलीं आहेत.

### पोंच

**'विकास' (धरमपेठ, नागपूर.)**

वरील नांवाचें "विद्यार्थ्यांसाठी अभिनव मराठी साप्ताहिक नागपूर येथें सौ. सुशिला मोहनी, बी. ए., बी. टी., सुपरिंटेंडेंट, भिडे गर्ल्स हायस्कूल, ह्यांच्या संपादकत्वाखालीं गणेश चतुर्थी (१०-९-४५) पासून सुरू होणार आहे. "विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञान देण्याची फारच आवश्यकता आहे; ही गरज भागविणें हें प्रस्तुत साप्ताहिकाचें मुख्य उद्दिष्ट राहील." 'विकास'चा आकार डबल क्राऊन ⅛, पृष्ठें २० व वा. व. ६ रु. राहील.


## RECENT PUBLICATIONS

Report of the Eighteenth Bombay Provincial Co-operative Conference. ... Rs. 1–8/–

Co-operative Distribution in Bombay, by M. P. Nagarsheth, B. Com., ... Rs. 2–8/–

Report of the Post-War Development Committee. ... Rs. 0–4/–

**Can be had from :** The Provincial Co-operative Institute,

*9, Bakehouse Lane, Fort,*
**BOMBAY.**

## सहकारी चळवळीच्या प्रसाराची आवश्यकता

### सांगली संस्थान तृतीय सहकारी परिषदेंत स्वागताध्यक्ष श्री. पु. श्री. मोकाशी, ह्यांचें भाषण.

सांगली संस्थान पहिली सहकारी परिषद सन १९२७ सालीं झाली व सन १९४१ सालीं द्वितीय सहकारी परिषद् भरली. तृतीय सहकारी परिषद् एप्रिल १९४५ मध्यें भरली.

सामान्य अथवा गरीब मनुष्याची उन्नति, व त्यासाठी मोठाल्या रकमांच्या युद्धोत्तर योजना, हे दोन मुद्दे हल्लीं सर्वत्र चर्चिले जात आहेत. आपली सहकारी चळवळ मुख्यतः सामान्य माणसें ( शेतकरी, विणकर, छोटे उत्पन्नदार ) यांचेसाठींच जन्माला आलेली आहे. म्हणून या युद्धोत्तर योजनांमध्यें या चळवळीचें स्थान केव्हांही महत्त्वाचेंच राहील. याच उद्देशानें हिंदुस्थान सरकारनें या विषयाकरतां एक कमिटी नेमली असून आपल्या सांगली दरबारनेंही नेमलेल्या एका कमिटीकडे हा विषय सोपविला आहे.

सन १९४४ अखेर एकूण सांगली संस्थानांतील सहकारी संस्थांची संख्या ११८ असून सभासदांची संख्या १२४८७ आहे. खेळतें भांडवल २१४४२७१ रु. असून रिझर्वफंड रु. २९८८८१ आहे. या ११८ संस्थांत ९२ शेतकी, २२ नॉनअग्रिकल्चरल व ४ बँका आहेत. या कालखंडांत या चळवळीची जी प्रगति दिसून येते, त्याचें श्रेय सहकारी खातें, हल्लींचे रजिस्ट्रार श्री. एच. बी. कुलकर्णी, व सांगली स्टेट को. सुपरवायझिंग युनियन यांना प्रामुख्यानें दिलें पाहिजे. वरील माहितीवरून आपल्या संस्थानांतील या चळवळीची प्रगति दिसून येईल;परंतु आसपासच्या ब्रिटिश मुलुखांतील चळवळीकडे पहिल्यास आपण अद्यापि बरेच मागें आहोत असें दिसून येईल. यापेक्षा आपणांस फारच पुढें गेलें पाहिजे. आपल्या संस्थानांत शेतकऱ्याप्रमाणें विणकरांचाही मोठा वर्ग आहे, त्यांचीही सहकारी तत्त्वावर आपण संघटना केली पाहिजे.

कोणत्याही सोसायटीची आपण पाहणी केल्यास दिसून येईल कीं, खेड्यांतील फारच थोडे लोक सोसायटीचे सभासद होतात. प्रत्येक खेड्यांत सहकारी संस्था निघणें जरूर आहे. असा प्रयोग एका तालुक्यांत तरी करून पाहणें अवश्य आहे. हल्लीं लढाईमुळें मिळणाऱ्या बाजारभावानें बऱ्याच शेतकऱ्यांजवळ थोडा फार पैसा असणें संभवनीय आहे; म्हणून या संधीचा फायदा घेऊन सुधारलेल्या शेतीच्या साधनांचा सरकारच्या साहाय्यानें प्रयोग करणें शक्य आहे म्हणून एका तालुक्यापुरता तरी प्रयोग करून पाहण्याबद्दल सूचना करणें गैर होणार आहे.

ह्याच परिस्थितीचा फायदा घेऊन हल्लीं आपल्याकडे केवळ क्रेडिट सोसायट्याच निघत आहेत, त्या ऐवजी इतर विविध प्रकारच्या सोसायट्या आपल्यास काढतां येतील. व अशाप्रकारें खेड्यांचें आर्थिक जीवन संपूर्णतः सहकारी तत्त्वावर नेण्याचा प्रयत्न करतां येईल. उदा. एखाद्या खेड्यांत इलेक्ट्रिसिटी प्लँट बसवून व बोअर्स टाकून अगर लगतच्या नदी ओढ्याचें पाणी घेऊन जिरायत असलेली जमीन बागायत करतां येईल.

आपली संस्थानची इन्स्टिट्यूट अधिक संघटित करून तिचे मार्फत प्रचार, शिक्षण वगैरे गोष्टी हातीं येणें अत्यंत जरूरीचें आहे. कारण प्रचार व शिक्षण हीं दोन्हीं कामें सहकारी चळवळींत किती महत्त्वाचीं आहेत, हें सांगणेंची जरूरी नाहीं. चांगले पंच व चांगले सेक्रेटरी यांचेवरच या चळवळीची उभारणी आहे. कारण ते आपल्या या इमारतीचे आधारस्तंभच आहेत.

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

### युद्ध संपलें; काळजी सुरू झाली

श्री. संपादक "अर्थ", यांसी—

सा. न. वि. वि.

महायुद्ध संपलें. जगाच्या कानाकोपऱ्यांत विद्युद्वेगानें ही बातमी पसरली, विजयी राष्ट्रांत विजयानंदाची एकच लाट उसळली. युद्धकार्याच्या निमित्तानें देशी-विदेशी असलेली सर्व मंडळी आपापल्या घरीं लवकर यावयास मिळणार म्हणून आनंदानें बेहोष झाली. प्रियजनांची पुनर्भेट—कल्पनाच मनोहारी आहे, गोडी अवीट आहे.

विमानांची घर घर नि बाँबची आग- थांबली. पराभूत राष्ट्रें स्तब्ध झालीं. शेळ्या-मेंढ्यांचें, गव्हा-कणसांचें राष्ट्र होणार म्हणून हळहळत असतील. उद्योगधंदे हाच ज्याचा प्राण त्याला शेतकरी बनविल्यास त्याची मानहानी किती तीव्र असेल याची कल्पना केलेली बरी. जागतिक शांतता प्रस्तापित करण्याचा हा एक मार्ग खरा; पण तो मानवी समतेच्या व सुरक्षिततेच्या तत्त्वांवर अधिष्ठित आहे का ? नव्वद वर्षांच्या वयोवृद्ध मार्शल पेतॉं यांनीं त्यांचेवर भरण्यांत आलेल्या राजद्रोहाच्या खटल्याचे वेळीं काढलेले उद्गार मानवी जीवनाचे ध्येयमार्ग दर्शवितात. " माझें जीवित नि स्वातंत्र्य तुमच्या हातीं असेल, पण माझा स्वाभिमान मात्र तुम्हांला हिरावून घेतां येणार नाहीं." मार्शल पेतॉंचे शब्द प्रासंगिक आहेत, पण ते मार्मिक वाटतात.

हिंदुस्थानांतील ४० लक्ष मंडळी युद्धकार्यांत गुंतली होती पैकीं २० लक्ष मंडळी आघाडीवर होती. ती लवकरच स्वगृहीं परततील अन् त्यांचें यथोचित स्वागतहि होईल. जग पाहून आले त्या मंडळींचीं मनें सुखाला आसावलेलीं असतील. आकांक्षांनीं भारावलेलीं असतील. कांहीं शरीरानें पंगू झालेलेहि असतील. त्यांना सुख—समाधान देणें, दैनंदिन व्यवसाय देणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

सरकारी निरनिराळ्या खात्यांत युद्धोपयोगी व युद्धजन्य कारखान्यांत काम करणारी कितीतरी मंडळी आतां बाहेर पडतील. त्यांत स्त्रियाहि आहेत. या सर्वांच्या जीवनोद्योगाच्या काय व्यवस्था आम्ही केल्या आहेत ?

जपानी युद्ध अपेक्षेपेक्षां लवकर संपलें अन् सरकारी कांहीं योजना अजून पुऱ्या व्हावयाच्या आहेत, कांहीं अमलांत यावयाच्या आहेत ! सर्वसाधारण रूपरेषा देण्यांत येते त्यावरून ५० टक्के मंडळींची सरकार व्यवस्था करील असें दिसतें. बाकीच्या मंडळींची कारखान्यांतून व शेतकी जीवनांत सोय करण्याचा विचार दिसतो. तथापि त्याबाबत सरकारी निश्चित धोरण जाहीर झाल्याखेरीज मोठ्या प्रमाणावर जागा निर्माण होतील असें वाटत नाहीं. आजच्या किंमती घसरल्या अन् परदेशी मालाची चढाओढ सुरू झाली म्हणजे आजच्या इतका तरी रोजगार टिकतो का नाहीं हाच आज काळजीचा प्रश्न आहे.

शांतता सर्वांनाच हवी आहे. पण ती टिकण्याकरितां बेकारी, अज्ञान, दौर्बल्य, आळस नि दारिद्र्य ह्या पंचरिपूंवर विजय मिळविला पाहिजे.

युद्धकार्याकरितां अमाप पैसा व मनुष्यबळ निर्माण होऊं शकतात. शांततारक्षणाकरितां मग तो कमी कां पडावा ?

—संजय

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५-८-४५ ते २२-९-४५
बॉंबे डाइंग ३१-८-४५ ते १४-९-४५
कोहिनूर १-९-४५ ते १७-९-४५

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
+इंदूर माळवा रु. ३५– २७–८–४५
कोहिनूर रु. ९ सं. दि. १९–९–४५
डाइंग रु. २५ दि. २७-९-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार दि. २०।८।४५ | मंगळवार २१।८।४५ | बुधवार २२।८।४५ | गुरुवार-शुक्रवार २३।८।४५ २४-८-४५ | सोमवार २७।८।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; ११९६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१६७—८ | २१७७—८ | २१५६—४ | | २१८३ १२-० |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०३—८ | ४०७–८ | ४०३—८ | | ४०७—८ |
| २२०१; १६९५ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९३१—४ | १९४६—४ | १९३३–१२ | गुरुवार—नारळी पौर्णिमे निमित्त सुट्टी. —शुक्रवारी बाजार बंद— | १९५८–१२ |
| ७६५; ५३३ | ९——०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ५७३—० | ५७६—८ | ५६६—० | | ५७६—० |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५२२—८ | ५२७—० | ५१८—० | | ५२९—० |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ३६४—० | ३६३—८ | ३६०—० | | ३६५—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २७८—८ | २७८—८ | २७५—० | | २७८—० |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | २८३—८ | २८५—० | २८६—० | | २८९—० |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८०—० | २८६—० | २८०—८ | | २८७—० |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ३–१५–० | ३–१४–३ | ३–१३–० | | ३–१४–० |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३–१०–६ | १३–११–६ | १३—८–६ | | १३—९–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | २–११–६ | २–११–६ | २–१०–० | | २–११–६ |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६९०—० | ६८७—८ | ६७७—८ | | ६४५–०+ |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २०९—० | २०८—४ | २०७–१२ | | २०८–१२ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१४—० | २१४—० | २१३—० | | २१५—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५६२—८ | ५६१—४ | ५५२—८ | | ५५२—८ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३६—२ | ३६—४ | ३५–१४ | | ३६—२ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१—६ | १००-१५ ६ | १००–१२ | | १०१–६–० |

सोमवार दि. २७–८–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—७–० |
| १९५१–५४ | १०१—७–० |
| १९५७ | १००–१०–० |
| १९६३–६५ | ९९—२–० |
| १९६६–६८ | ९८—५–० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४४—० |
| सेंट्रल | ८०–१२ |
| इंडिया | १८७—८ |
| इंपी० | २१९२—८ |
| | ५६१—४ |
| रिझर्व्ह | १३६—८ |
| युनियन | ८–१० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८२२–८ |
| बॅाम्बे ट्रॅम | १४३–८ |
| टाटा हायड्रो | २०१–८ |
| टाटा पॉवर | १८६२–८ |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४०६—४ |
| बॉंबे स्टीम | ५८७—८ |
| न्यू इंडिया | ८२—८ |
| शिवराजपुर | ५०—० |
| टाटा केमिकल | १८–१२ |
| टाटा ऑईल | ६७—८ |

गोकुळअष्टमीनिमित्त गुरुवार, शुक्रवार दि. ३० नि दि. ३१ ला बाजार बंद असून शनिवारीं १–९–४५ ला बाजार उघडा राहील.

दि कराड अर्बन को. ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड कराड

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची अहाविसावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख ९।९।४५ रोजीं सकाळीं नऊ वाजतां ( हल्लीच्या वेळेप्रमाणें ) बँकेचे इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९४४–४५ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती वगैरे कामें केलीं जातील.

डायरेक्टर्सच्या निवडणुकीबाबत मतनोंदणीची वेळ सकाळीं ९–३० ते १–३० अशी आहे. तसे सदर वेळीं सर्व समासदांनीं अगत्य येण्याचें करावें अशी विनंती आहे.

कराड २४-८-४५ } म. वि. खंडकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

इतकी धाडसी स्त्री रुपेरी पडद्यावर आलीच नाहीं !
नवयुगचा नवा सामाजिक बोलपट !
पन्ना
दिग्दर्शक– नजम नकवी.
भूमिका– गीता निजामी,
जयराज, डेविड, कुसुम देशपांडे
१० वा गर्दीचा आठवडा ! श्रीकृष्ण-पुणें फोन नं. ९।१००१
रोज ६॥ व १० वाजतां.
शनि. रवि. सोम. जादा खेळ ३॥ वा.
आगाऊ ति. विक्री थिएटरवर नेहमीप्रमाणें.
—पिक्चरलेस प्रकाशन—
गोकुळअष्टमींनिमित्त ता. ३१ रोजीं जादा खेळ दु. ३॥ वा.

## शेतकरी कर्ज निवारण कायद्याचा प्रचार

### ठिकठिकाणच्या सभा

मे. सब-ऑडिटर फॉर डेट रिलिफ वर्क, जळगाव, श्री. क्षीरसागर, यांनीं यावल तालुक्यांत ( जि. पूर्व खानदेश ) माहे जुलै १९४५ महिन्यांत ठिकठिकाणीं सभा भरवून शेतकऱ्यांना कर्जनिवारण कायद्यासंबंधीं माहिति दिली व प्रत्यक्ष अर्जाचे फॉर्म्स भरण्यासंबंधीं मदत केली. त्याचप्रमाणें यावल येथें तालुक्यांतील सर्व सोसायट्यांचे सेक्रेटरी व पंचमंडळी यांची सभा भरवून त्यांनाहि ह्या बाबत माहिति दिली. सेक्रेटरीस अर्ज कसे भरावे याबद्दल ट्रेनिंग दिलें. सदर प्रसंगीं तालुक्यांतील प्रमुख चालक मे. व्यंकट भगा पाटील ( विरावली ) व मे. के. एम. चौधरी ( यावल तालुका को. सु. युनिअन चेअरमन ) यांनीं हजर राहून उत्तम प्रकारें मदत केली. ह्याबद्दल मुलकी खात्याकडून देखील पूर्ण सहकार्य दिलें जात आहे. सर्व शेतकरी वर्गांत या कायद्याबाबत जागृती होऊं लागली आहे. पुढील महिन्यांत लवकरच तालुक्यांतील सर्व तलाठी वर्गासहि मे. मामलेदारसाहेब यांचे कचेरींत या बाबत व अर्ज भरण्याबाबत माहीती देण्यांत येऊन शेतकरी वर्गास अर्ज करण्यास शक्य ती मदत करण्याबद्दल प्रचार करण्यांत येणार आहे.

* * *

चोपडा तालुक्यांत मे. मॅनेजिंग डायरेक्टर साहेब पू. खा. सेंट्रल को. बँक लि. जळगांव यांचे नेतृत्वाखालीं जुलै महिन्यांत हातेड बु॥, वेळोदे, चोपडा, आडावद या सेंटर्सना सहा ग्रुप मिटींग्ज भरविण्यांत आल्या असून एकूण ३४ खेड्यांतील शेतकऱ्यांना कर्ज निवारण कायद्याची व अर्ज भरणेंबद्दलची माहिती दिली. चोपडे तालुक्यांतील को. क्रे. सोसायटींच्या सेक्रेटरींची मिटींग भरवून त्यांना अर्ज भरणेंबद्दल माहिती दिली. सोसायटींच्या मेंबरांच्या कर्जाच्या याद्याही बोर्डाकडे योग्य त्या अधिकाऱ्यांमार्फत मुदतींत पाठविणेंबद्दलचें महत्त्व त्यांना पटवून दिलें.

रावेर तालुक्यांत मे. डिस्ट्रिक्ट को. ऑपरेटिव्ह ऑफिसरसाहेब जळगांव यांचे देखरेखीखालीं रावेर, वाघोदा बु॥ व खिर्डी बु॥ सेंटर्सना तीन ग्रुप मिटींग्ज भरविण्यांत आल्या. या सेंटर्सना २९ गांवांतील लोक हजर असून त्यांना कर्जनिवारण कायद्याची व अर्ज भरणेंची माहिती दिली. को. क्रे. सोसायटींचे सेक्रेटरींची मिटींग भरवून त्यांनाही वरीलप्रमाणें माहिती दिली. तसेंच तालुक्यांतील दहा खेड्यांत १० मिटींग्ज भरवून शेतकऱ्यांना सदर कायद्याची व फॉर्म भरणेंची माहिती दिली. रावेर तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेंतही कर्ज निवारण कायद्याची माहिती मे. रावसाहेब व्ही. एच. पाटील यांचे अध्यक्षतेखाली देण्यांत आली.

यावल तालुक्यांत आठ गावांना ५ मिटींग्ज भरवून सदर कायद्याची व अर्ज भरणेंबद्दलची माहिती दिली.

येणेंप्रमाणें सदर कायद्याची माहिती जुलै १९४५ महिन्यांत देण्यांत आली.

* * *

भातोडी ता. नगर येथील सरकारी बंगल्यांत मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब को. सो. पुणें यांचे अध्यक्षतेखालीं शेतकरी कर्ज विमोचन कायद्याची माहिती देण्यासाठी ता. २६-६-४५ रोजी जाहीर सभा झाली. सभेस तालुक्याचे मामलेदारसाहेब व इतर अधिकारी हजर होते. तसेंच आसपासचे गावांतील बरेच शेतकरी हजर होते. सभेंत अधिकारीवर्ग व इतर बिनसरकारी सद्‌गृहस्थांची भाषणें झालीं. लोकांना कायद्याची सविस्तर माहिती देण्यांत आली व कर्जदार शेतकऱ्यांना पारनेर बोर्डाकडे ऑक्टोबर १९४५ चे आंत रीतसर अर्ज करण्यास सांगितलें.

वरीलप्रमाणें जेऊर ( ता. नगर ) येथें ता. २७-६-४५ रोजीं मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. त्यावेळींही मे. मामलेदारसाहेब हजर होते. जेऊर व जेऊरच्या आसपासच्या वाड्यांतील आणि इमामपूर येथील शेतकरीसमाज बराच हजर होता. या वेळींही शेतकरी कर्ज विमोचन कायद्याची माहिति लोकांना देण्यांत आली.

* * *

मे. डि. को. ऑफिसरसाहेब, नगर, यांनीं कर्जनिवारण कायदा शेतकरी लोकांना समजावून देण्याकरितां जुलै १० ते १५ तारखेपर्यंत नगर जिल्ह्यांतील नेवासा तालुक्यांत प्रवरा संगम, वडाळा-महोदय, घोडेगांव, चांदे व सोनई या मुख्य गांवीं सभा भरविल्या. सभेस आजूबाजूचे गावचे लोकहि हजर होते. कायद्याची माहिति देऊन ३१-७-४५ पर्यंत बोर्डाकडे अर्ज करून कायद्याचा फायदा शेतकऱ्यांनीं घ्यावा अशी त्यांनीं कळकळीची विनंति केली. लोकांचे शंकांचें निरसन करण्यांत आलें. सदर सभांना चेअरमन, डेट अॅडजस्टमेंट बोर्ड नेवासा हे हजर होते व कांहीं सभांना मामलेदारसाहेब हजर होते. त्यांची या सभा भरविण्याचें कामीं चांगली मदत झाली.

* * *

नगर व पारनेर तालुक्यांत मि. इनामदार ( असिस्टंट डि. को. ऑफिसर नगर ) यांनीं जुलै महिन्यांत दहा गावीं शेतकरी कर्जनिवारण कायद्याची सविस्तर माहिती सांगण्यासाठी सभा घेतल्या. त्यांपैकीं कांहीं सभांना मे. महाजन ( चेअरमन, डेट्ट अॅडजेस्टमेंट बोर्ड, पारनेर ) मे. सरोदे ( मामलेदार, पारनेर ) मि. दौलतराव पाटील ( ऑ. ऑर्गनायझर सई छत्रपती ) तसेच मि. के. डी. काळे ( डि. ऑर्गनायझर, सारोळा ) हे हजर होते व त्यांची वरील विषयावर कळकळीचीं भाषणें झालीं. तसेंच शिंगवे-नाईक (ता. नगर ) येथें ता. २०-७-४५ रोजीं मे. मे. एस. व्ही. भीर, एम. ए. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब ( डेट रिलीफ ) सेंट्रल डिव्हिजन, पुणें यांचे अध्यक्षतेखालीं जाहीर सभा झाली. त्यावेळीं त्यांनीं अतिशय कळकळीचें भाषण करून शेतकऱ्यांना समजेल अशी सविस्तर कायद्याची माहिती दिली.

* * *

संगमनेर व अकोला तालुक्यांत मि. कऱ्हाडकर ( आसिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, नगर ) यांनीं जुलै महिन्यांत पावबाकी, वडगाव पान, अकोल, राजूर, कळस व संगमनेर ह्या ठिकाणीं 'शेतकरी कर्जनिवारण कायद्याची' माहिती सांगण्यासाठी जाहीर सभा घेतल्या. त्यांपैकीं कांहीं सभांना मे. जोशी, मामलेदारसाहेब, संगमनेर व अकोला, मे. पुराणिक ( चेअरमन डेट अॅडजेस्टमेंट बोर्ड, संगमनेर) व रावबहादूर जी. एम. परशरामी, ( डिस्ट्रिक्ट ऑनररी ऑर्गनायझर ) हे हजर होते. त्यांचीं वरील विषयावर कळकळीचीं भाषणें झालीं. तसेंच संगमनेर येथें मि. नामदेवराव जाधव यांना व्हिक्टोरिया क्रॉस मिळाल्याबद्दल त्यांचे नातेवाइकांचा सन्मान ता. १६-७-४५ रोजीं झाला. या समारंभास तालुक्यांतून सर्व गावचे पाटील, तलाठी व इतर शेतकरी बरेच हजर होते. त्या वेळींहि मि. कऱ्हाडकर यांनीं कायद्याची सविस्तर माहिती सांगितली. तसेंच अकोले येथें ता. १३-७-४५ रोजीं मे. मामलेदारसाहेब अकोले यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. त्या वेळीं सभेस २५०-३०० शेतकरी १०।१२ गावचे मिळून हजर होते. त्या वेळीं इतर सद्‌गृहस्थांचींहि भाषणें झालीं.

* * *

संगमनेर, नेवासा, शेवगाव, पाथर्डी, नगर व कर्जत तालुक्यांत मि. एस. व्ही. भीर एम. ए. ( असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब डेट रिलीफ सेंट्रल डिव्हिजन, पुणें ) यांचे अध्यक्षतेखालीं शेतकरी कर्जनिवारण कायद्याची माहिती सांगण्यासाठी १३ जाहीर सभा जुलै व ऑगस्ट १९४५ या महिन्यांत झाल्या. ठिकठिकाणीं ज्या त्या भागांतील पुढारी व अधिकारीवर्ग हजर होता. त्यांपैकीं प्रत्येक तालुक्याचे मामलेदारसाहेब, रावबहादूर परशरामी, सरदार थोरात तसेंच डेट अॅडजेस्टमेंट बोर्डाचे चेअरमन, तालुका ऑनररी ऑर्गनायझर व सहकारी क्षेत्रांतील अधिकारी वर्ग हेहि आपापले भागांत सभेला हजर होते. प्रचार सभेच्या सर्व गावांना व सभांना होणार असलेल्या गावांचे आसपासचे ४।५ मैलांतील गावांतील लोकांना सुद्धां बरेच दिवस अगाऊ सुचना गावचे पाटील, तलाठी यांचेमार्फत तालुक्याचे मामलेदारसाहेब यांनीं दिल्या होत्या. त्यामुळें सभांना शेतकरी समाज ठिकठिकाणीं बराच हजर होता.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ५ सप्टेंबर, १९४५ अंक ३५

## काळेज सेल्स असोसिएशन ( मुंबई )

यांच्या हितचिंतकांस

### आनंदाची बातमी

सदरहू असोसिएशन लिमिटेड कंपनीमध्यें रूपांतर होत असून तिचें अधिकृत भांडवल रु. १०,००,००० आहे व त्यांपैकीं तूर्त रु. ३,००,००० भांडवल विकण्यास हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे. त्या तीन लाख रुपये भांडवलापैकीं असोसिएशनचे संस्थापक व त्यांची स्नेही मंडळी यांमध्यें जवळ जवळ रु. १,८०,००० भांडवल आगाऊ खपलें गेलें आहे.

भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें आदर्श ठिकाण

## —: ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स् लिमिटेड :—

मॅनेजिंग एजंटसः—डब्ल्यु. डी. चितळे आणि कं.

रजिस्टर्ड ऑफिस—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठीं कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते

| ठेवी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | २ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

# विविध माहिती

### पोस्टांतील ठेवींत वाढ

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत १९४४-४५ मध्यें खातेदारांनीं एकूण ४३ कोटि, ७६ लक्ष रुपये ठेवले. ठेवींवरील व्याजाची रकम १ कोटि, २१ लक्ष रुपये झाली. २८ कोटि, ९४ लक्ष रुपये काढून घेण्यांत आले. अशा रीतीनें ठेवींची रकम १६ कोटि ३ लाखांनीं वाढून वर्षअखेर ती ८० कोटि, २७ लक्ष रुपये झाली. १९४२-४३ अखेर पोस्टांत ५२½ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या. १९४३-४४ अखेर तत्सम आकडा ६४½ कोटि रुपये होता.

### पोस्ट-तार खात्याचा नफा

हिंदी पोस्ट व तार खात्यास १९४३-४४ सालीं ९ कोटि, २ लक्ष रुपये नफा झाला, त्यापैकी ८ कोटि, ३६ लक्ष रुपये मध्यवर्ती हिशेबांत जमा झाले.

### अमेरिकेंतून युरोपकडे कापड रवाना

अडीच कोटि गरजवंत लोकांना पुरेल इतकें कापड अमेरिका युरोपकडे व पूर्व आशियाकडे पाठविणार आहे. हिंवाळ्यापूर्वी तें कापड लोकांच्या हातीं पडेल. ४ कोटि पौंड कापड अगोदरच जाऊन पोचलें आहे. युगोस्लाव्हियाला सर्वांत जास्त कापड मिळालें आहे. त्याचे खालोखाल फिलिपाइन्स, नेदरलंड्स, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, बेल्जम, फ्रान्स, ग्रीस, इटली, चीन व रशिया हे देश येतात.

### प्रांतिक सरकारांचीं नवीं कर्जें

तीन प्रांतांचीं सरकारें खालीलप्रमाणें ८½ कोटि रुपयांचीं कर्जें उभारणार आहेतः—

| प्रांत | कर्जाची रकम (रु.) | व्याज | परतफेड |
|---|---|---|---|
| मद्रास | ३ कोटि | ३% | १९६० |
| पंजाब | ३ कोटि | ३% | १९६० |
| संयुक्तप्रांत | २½ कोटि | ३% | १९६० |

कर्जउभारणीच्या अटी अद्याप पक्क्या झालेल्या नाहींत.

### टाटा आयर्न अँड स्टील कंपनी-डिव्हिडंड कायम

टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.चा ३१ मार्च १९४५ अखेरच्या वर्षाच्या डिव्हिडंडचा दर ऑर्डिनरी शेअरवर २३ रु. व डिफर्ड शेअरवर १२९ रु. ८ आ. ९ पै (दोन्ही करमाफ) कायम ठेवण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे.

### सिंधमध्यें सहकारी चळवळ अयशस्वी कां ?

"सिंधमध्यें स्थाइक खेडेगावें नसल्याकारणानें तेथें सहकारी चळवळ अयशस्वी झाली आहे. कित्येक गावांत सोसायट्या स्थापन होतात व त्या सहकारी बँकेकडून कर्ज घेतात आणि पांच सहा वर्षांत तीं गांवेंच उठून जाऊन नाहींशीं होतात. त्यामुळें कर्जाची वसुली अशक्यप्राय होते.":—सिंधमधील सहकारी चळवळीसंबंधीं वरील उद्गार त्या प्रांताच्या रजिस्ट्रारनें नुकतेच काढले. जिल्हा बँकेऐवजीं तालुकानिहाय बँका स्थापन करून त्यांत सहकारी सोसायट्यांचा अंतर्भाव करण्याचा प्रयोग आतां तेथें केला जावयाचा आहे.

### हिंदुस्थानांत ट्रॅक्टर तयार होणार ?

हिंदुस्थानांत खपविण्यासाठी एका स्वस्त प्रकारच्या ट्रॅक्टरसंबंधीं चर्चा मि. हेन्री फोर्ड (ज्यूनियर) ह्यांचेबरोबर अमेरिकेंत श्री. अमृतलाल शेठ ह्यांनीं केली. हिंदुस्थानांत पुरेसें पोलाद तयार करतां येईल असें श्री. शेठ ह्यांनीं सांगितलें, तेव्हां असे ट्रॅक्टर हिंदुस्थानांत बनविणें शक्य व इष्ट आहे असें मि. फोर्ड म्हणाले. दहा वेगवेगळीं कामें करण्याची सोय असणारा ट्रॅक्टर हिंदी शेतकऱ्यास २,५०० रुपयांस मिळूं शकेल, असा अंदाज आहे. हिंदी शेतकऱ्यांस ट्रॅक्टरचें प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी एक हिंदी इंजिनिअर शिकवून तयार केला जात आहे, अशी अमेरिकेकडील बातमी आहे.

### प्रांतिक सरकारें युद्धोत्तर योजनांवर किती खर्च करणार ?

कांहीं प्रमुख प्रांतांच्या युद्धोत्तर पंचवार्षिक योजनांच्या संकल्पित खर्चाचे आकडे खालीं दिले आहेतः—

(आकडे कोटि रुपयांचे आहेत)

| | भांडवली खर्च | चालू खर्च | एकूण |
|---|---|---|---|
| मुंबई | ३९ | ७ | ४६ |
| मद्रास | ८७ | ४९ | १३६ |
| बिहार | १०० | १९ | ११९ |
| सं. प्रांत | ८७ | २७ | ११४ |
| मध्य प्रांत-वऱ्हाड | २१ | ९ | ३० |
| सिंध | ३५ | १० | ४५ |

### सोलापूर येथें व्यापारी कॉलेज ?

महाराष्ट्र लिंगायत एज्युकेशन सोसायटीतर्फे सोलापूर येथें कॉमर्स कॉलेज उघडण्याच्या परवानगीसाठी मुंबई विश्वविद्यालयाकडे ता. २०-८-४५ रोजीं अर्ज करण्यांत आला आहे.


## दि सातारा जि. को. लँड मॉर्गेज बँक, लि. कराड

फक्त सभासदांकरितां वार्षिक साधारण सभेची

## नोटीस

या बँकेची दहावी वार्षिक साधारण सभा शनिवार ता. २२ सप्टेंबर १९४५ रोजीं दुपारीं ३ वाजतां मे. रावसाहेब कल्याणी यांचे कराड येथील नव्या इमारतीमध्यें भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९४४-४५ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, डायरेक्टर्सची निवडणूक जाहीर करणें, पोटनियम दुरुस्ती, सन ४५-४६ सालचें अंदाजपत्रक मंजूर करणें वगैरे कामें केलीं जातील.

तरी सदरवेळीं सर्व सभासदांनीं अगत्य येण्याचें करावें अशी विनंति आहे.

कराड, २२ ऑगस्ट १९४५ — आण्णापा नारायण कल्याणी, चेअरमन

## पुणें सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक लि. पुणें

## नोटीस

पुणें सेंट्रल को-आपरेटिव्ह बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २३ सप्टेंबर १९४५ रोजीं दुपारीं ५-३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरणार असून त्यात अहवाल, ताळेबंद, नफा वांटणी, पोट नियम दुरुस्ती, तपासनीसांच्या याद्या, वगैरे विषयांचा विचार होईल. तसेंच पुढील सालासाठी बोर्ड ऑफ डायरेक्टर्स व हिशेब-तपासनीस यांची निवडणूक वरील इमारतींत त्याच दिवशीं सकाळीं ९ ते १२-३० वाजेपर्यंत होईल. तरी बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

लक्ष्मीरोड, पुणें शहर, तारीख ३१ आगस्ट १९४५. — द. वि. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## अमेरिकन उसनवारीच्या बंदीनें उडवलेली खळबळ

नुकत्याच संपलेल्या महायुद्धांत निरनिराळ्या रणांगणांवर अमेरिकन राष्ट्रानें लष्करी पराक्रम करून अंतिम विजयास महत्त्वाचा व निर्णायक हातभार लावला, एवढेंच नव्हे तर इंग्लंड, रशिया व चीन ह्या स्वतःच्या बरोबरीनें लढणाऱ्या राष्ट्रांस बहुमोल लढाऊ सामुग्री पुरवून युद्धक्षम केलें. आपली अपार संपत्ती व उत्पादक शक्ती मित्रराष्ट्रांस ऐनवेळीं दूरदूरच्या आघाड्यांवर उपयोगी पडावी म्हणून अमेरिकेनें त्यांस पुरवल्या जाणाऱ्या युद्धसामुग्रीची किंमत रोखीनें दिली जाण्याचा आग्रह धरला नाहीं. अमेरिकेस पैसे मोजणें किंवा त्याचें कर्ज काढणें हा मामुली पद्धतीचा व्यवहार इंग्लंड व रशिया ह्यांस युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं अशक्य होता. यास्तव अमेरिकेनें उसनवारीनें माल पुरवून पुढें त्याचा ऐनजिनसी मोबदला सोयीनें स्वीकारण्याच्या पद्धतीचा अंगिकार केला. युद्धाच्या काळापुरतीच ही खास व्यवस्था होती आणि तें संपतांच ती बंद करण्यांत आल्याचें अमेरिकेनें जाहीर केलें. तथापि, लढाया संपल्या तरी युद्धानें निर्माण केलेली आर्थिक परिस्थिति एकदम बदलत नाहीं आणि अमेरिकन मालाचा पुरवठा उसनवारीच्या पद्धतीनें आणखी कांहीं काळपर्यंत होत रहाणें इंग्लंडच्या सोयीच्या दृष्टीनें अगत्याचें होतें. ह्याकारणानें उसनवारीबंदीच्या घोषणेमुळें ब्रिटिश मुत्सद्यांस जोराचा धक्का बसला आणि कांहींच अगाऊ सूचना न देतां अमेरिकेनें केलेल्या एकतर्फी निर्णयाविरुद्ध इंग्लंडमध्यें मोठें काहूर उठलें. उसनवारी बंद झाली तरी अमेरिकन मालाचा पुरवठा सर्वस्वी बंद होणार नसून त्याच्या व्यवहाराची निराळी व्यवस्था करावी लागेल ही गोष्ट अमेरिका व इंग्लंड ह्या दोन्ही देशांस स्पष्ट असली पाहिजे. ह्या बाबतींत वाटाघाटी करून प्रस्तुत प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्यासाठी लॉर्ड हॅलिफॅक्स व लॉर्ड कीन्स अमेरिकेस तातडीनें गेले आहेत. त्या राष्ट्रास तरी स्वतःची आर्थिक घडी पुन्हां नीट बसवणें प्राप्त आहे. अमेरिकेंत कर्ज काढून इंग्लंडनें ह्यापुढें तेथून माल न्यावा अशी व्यवस्था त्यास सुचवण्यांत येत आहे आणि ब्रिटिश सरकारास ह्याच प्रकारची तडजोड मान्य करावी लागणार आहे. युद्धसमाप्तीनंतरहि मित्रराष्ट्रांचें हार्दिक सहकार्य चालू रहावें ह्या तत्त्वास तिनें बाध येण्याचें कारण नाहीं.

तथापि, अमेरिकन कायद्यास अनुसरून प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं उसनवारी बंद झाल्याची घोषणा करतांच इंग्लंडमध्यें विलक्षण खळबळ उडाली आणि तिची प्रतिक्रिया अमेरिकेंतहि प्रतीत झाली. जगाला उधार माल देण्याचें धर्मादायाचें उदक अमेरिकेनें सोडलेलें नाहीं आणि युद्धाची निकड भागल्यावरहि स्वतःच्या फायद्यासाठी इंग्लंडनें किंमत दिल्यावांचून अमेरिकन माल मिळवण्याची अपेक्षा करणें योग्य नव्हे अशी भाषा एका बाजूनें उच्चारली गेली, तर अमेरिकेच्या बदललेल्या धोरणाचा वचपा काढण्याचें सामर्थ्य इंग्लंडमध्यें आहे हें त्या राष्ट्रानें लक्षांत ठेवावें असें उत्तर दुसऱ्या बाजूनें देण्यांत आलें. इंग्लंड व अमेरिका ह्यांचे आर्थिक संबंध परस्परांत इतके गुंतलेले आहेत कीं हें शाब्दिक वादळ शांत होऊन दोन्ही राष्ट्रांच्या परिस्थितींतल्या अडचणी लक्षांत घेतल्या जाऊन त्यांचेमधून तडजोडीचा मार्ग काढण्याचें अगत्य जबाबदार ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांस पटलें असल्याचें त्यांच्या उद्गारांवरून दिसून येतें. इंग्लंडची निर्गतीपेक्षा आयात अधिक असल्यानें आणि अन्न व कच्चा माल बाहेरून आणणें त्यास अपरिहार्य असल्यामुळें अमेरिकेच्या मालाचें देणें तात्काळ चुकतें करणें त्या राष्ट्रास अशक्य आहे. उसनवारीची व्यवस्था कांहीं काळपर्यंत चालू रहाण्याची निकड इंग्लंडला ह्या कारणास्तवच भासत आहे. पण अमेरिकेनें हजारो कोटि रुपये किंमतीचा माल आजवर उसना दिला असल्याकारणानें ह्यापुढें तसला व्यवहार चालू ठेवण्याचा ताण अमेरिकन आर्थिक घटनेस सहन होण्यासारखा नाहीं. इंग्लंडला हिंदुस्थान, इजिप्त वगैरे देशांचें पुष्कळ देणें झालें आहे आणि त्याची फेड अंशतः डॉलर्समध्यें व्हावी अशी त्यांची मागणी आहे. ती पुरी करण्याची अडचण अगोदरच इंग्लंडला भासत होती आणि आतां अमेरिकेच्या तसल्याच मागणीची भर पडत आहे हें त्या देशांत उडालेल्या खळबळीचें प्रमुख कारण आहे. ह्या सर्व घडामोडींचा अनिष्ट परिणाम हिंदुस्थानच्या औद्योगिक परिस्थितिवर होण्याची भीति आहे. हिंदी स्टर्लिंग शिलकेंतून कांहीं भागाच्या बदल्यांत डॉलर्स देण्यांत यावे म्हणजे त्यांचा विनियोग औद्योगीकरणाच्या योजनेसाठी अमेरिकन यंत्रसामुग्री खरीदण्यांत करतां येईल अशी सूचना ब्रिटिश सरकारास करण्यांत आली असून तिचेसंबंधांत हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी आणि हिंदी कारखानदार ह्यांनीं बोलणीं केलीं आहेत. हिंद-अमेरिका व्यापारांत निघणारे डॉलर तरी ह्या देशास मिळण्यास वास्तविकपणानें अडचण असूं नये आणि इंग्लंडनें डॉलर्समध्यें कर्ज काढल्यास त्यांतूनहि कांहीं कोटींचे डॉलर्स ह्या देशास उपलब्ध केले जाणें अगत्याचें व न्याय्य आहे.

---

### अमेरिकेची सैनिक हानि

युद्धास प्रारंभ झाल्यापासून मे, १९४५ अखेर मृत्यूमुळें व इतर कारणांनीं अमेरिका १९,९८,००० सैनिकांस मुकली.

### एक कोटि जपानी लोकांचा नाश

संयुक्त राष्ट्रांच्या बॉंबफेकीमुळें १,००,००,००० ( एक कोटि ) जपानी लोक मरण पावले, जखमी झाले अथवा परागंदा झाले.

### सिंधमध्यें दोन नवीन धरणें

सिंधमध्यें आणखी दोन धरणें बांधण्याचा तेथील सरकारचा विचार आहे. त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी एका खास इंजिनिअरची अमेरिकेकडे रवानगी होणार आहे. नव्या दोन धरणांस एकूण सुमारें ३० कोटि रुपये खर्च येईल.

### बँकेच्या उमेदवारांसाठी शिक्षणाची व्यवस्था

कित्येक नव्या बँका निघाल्या आहेत व बँकांच्या शाखांचें जाळें वाढत आहे. त्यांस लायक व तज्ज्ञ अधिकारी व नोकरवर्ग मिळणें कठीण जातें. ही अडचण दूर करण्यासाठी कानपूरच्या हिंदुस्थान कमर्शिअल बँकेनें उमेद्वार शिकवून तयार करण्याची एक योजना आखली आहे. सुमारें ४,००० पदवीधरांनीं उमेद्वारीसाठी अर्ज केले आहेत त्यांतून बँक निवड करील.

### पं. जवाहरलाल ह्यांची इस्पितळांची मागणी

हिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं लष्करी उपयोगासाठी मोठालीं इस्पितळें बांधण्यांत आलेलीं आहेत, तीं नष्ट न करतां किंवा विकून न टाकतां नागरिकांच्या उपयोगासाठी तीं स्वाधीन करण्यांत यावीं, अशी विनंति लष्करी अधिकाऱ्यांना, विशेषतः अमेरिकन अधिकाऱ्यांना पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केली आहे.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

### १९४४–४५ च्या वार्षिक अहवालांतील महत्वाच्या बाबी

**खेळतें भांडवल १ कोटि रुपयांवर: डिव्हिडंड ५½%**

( १ ) पुणें जिल्ह्यांतील भिमथडी व इंदापूर तालुक्यांत काल-व्याखालीं असलेल्या सोसायट्यांचा कारभार मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेकडे होता. तो पुणें बँकेकडे वर्ग होऊन मिळण्याबाबत गेलीं कांहीं वर्षें या बँकेचा प्रयत्न चालू होता. यंदाचे सालीं सदर प्रयत्नांस यश मिळवितां आलें व सदर व्यवहार तारीख १-४-४५ पासून पुणें बँकेकडे वर्ग करण्यांत आला, ही बाब चालू सालचे अहवालांत प्रामुख्यानें नमूद करण्यासारखी आहे. बारामती भागांतील सोसायट्या पुणें बँकेकडे आल्यानें आतां जिल्ह्यांतील सर्व सहकारी सोसायट्या पुणें बँकेच्या कार्यक्षेत्रांत आल्या आहेत.

( २ ) अहवालाचे सालीं तारीख १-४-४५ रोजीं बँकेनें वरील घेतलेल्या क्षेत्राचे सोयीसाठीं बारामती व निरा या दोन ठिकाणीं नवीन शाखा उघडल्या. आतां बँकेच्या १० शाखा व १ उपशाखा मिळून ११ शाखा झाल्या आहेत.

( ३ ) बँकेस जोडलेल्या सोसायट्यांची संख्या तारीख ३०-६-१९४५ अखेर ३५२ असून त्यांपैकीं शेतकी चालू २५३ व रद्द १६ आणि बिगरशेतकी चालू ७४ व रद्द ९ अशा आहेत. गतवर्षींचे हे आंकडे अनुक्रमें ३०७, २०८, २१, ७२ व ६ असे होते.

( ४ ) चालू वर्षांत बँकेच्या विशेष प्रयत्नामुळें १७ नवीन सोसायट्या स्थापन होऊं शकल्या.

( ५ ) युद्धजन्यपरिस्थितीमुळें खेडेगांवांतील गरजू जनतेला लागणाऱ्या धान्याचें वांटप वैयक्तिक व्यापाऱ्यांऐवजीं सहकारी संस्थांमार्फत करण्याचें धोरण गतवर्षीपासून अंमलांत येऊन त्या अन्वयें आपल्या जिल्ह्यांतील ६३ सहकारी सोसायट्या व आपल्या बँकेच्या ४ शाखा हें काम करीत आहेत. गतवर्षी हें काम ४० सहकारी संस्थांकडे दिलें होतें. हें काम करणाऱ्या सहकारी सोसायट्यांस धान्य खरेदीसाठीं जरूर तें भांडवल पुरविण्याचें धोरण गतवर्षीपासून बँकेनें अंमलांत आणलें आहे. अहवालाचे सालीं अशा सोसायट्यांना रु. ५०,४७५ क्रेडिट मंजूर केलें आहे. स्टँडर्ड क्लॉथ, पेंड, नांगर, फाळ इत्यादींच्या विक्रीच्या प्रयत्नांमुळें कांहीं सोसायट्यांच्या कांहीं सभासदांच्या गरजा अल्पांशानेंच पुरवितां आल्या.

( ६ ) बँकेच्या दैनंदिन खर्चाचें तिच्या खेळत्या भांडवलाशीं प्रमाण चालू सालीं शेकडा ·९ पडतें. गेले सालीं ते १·२ होतें.

( ७ ) अहवालाचे सालीं बँकेस निव्वळ नफा रुपये ४३,२९६-१३-१ झाला आहे. भागीदारांस ५½% डिव्हिडंड सुचविण्यांत आलें आहे. खेळतें भांडवल १ कोटि रुपयांवर गेलें आहे.

---

### सायकलींची आयात

आणखी दोन-तीन वर्षें तरी ब्रिटिश सायकलींची आयात युद्धापूर्वी इतकी होणार नाहीं. सध्या दरसाल १० ते १५ हजार सायकलींची आयात होते; युद्धापूर्वीची सरासरी १½ लक्ष सायकलींची आहे. चालू वर्षी सरकार २५ हजार सायकलींच्या आयातीस परवानगी देईल अशी अपेक्षा आहे.


पहिल्याच वर्षी करमाफ ६ टक्के डिव्हिडंड वाटलें!

**त्रिप्ला कमर्शिअल कंपनी लि.**

मुख्य कचेरी: सरस्वती-विलास, लक्ष्मीरोड, पुणें २

**मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.**

व्याजाचे दर:—एक वर्ष ४½%; तीन वर्षें ५%; पांच वर्षें ६%.

रु. पांचशेच्या खालीं रकम स्वीकारली जाणार नाहीं.

व्याज दर सहामाहीस दिलें जातें.

मॅनेजिंग एजंटस् } मा. पं. सोमण, एम्. ए. श्री. वा. रानडे

---

**डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.**

---

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध


**लायसॉफ**

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

दोन वेळां उपयोग

दि मागोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —



# स्फुट विचार

## अमेरिकेचें मित्रराष्ट्रांस युद्धसामुग्रीचें सहाय

अमेरिकेनें मित्रराष्ट्रांस उसनवारीनें युद्धसामुग्री पुरवली. त्या बद्दलचें ऋण त्यांस सोयीसोयीनें फेडतां यावें ह्या बेतानें सवलती देण्याची आवश्यकता प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं प्रतिपादिली असून ह्या संबंधांत घाई किंवा चुका झाल्यास त्याचे घोर परिणाम धनको राष्ट्रास व सर्व जगासहि भोगावे लागतील असें म्हटलें आहे. त्यांनीं दिलेल्या माहितीवरून युद्धखर्चाचा व मित्रराष्ट्रांस केलेल्या सहायाचा केवढा प्रचंड बोजा अमेरिकेस उचलावा लागला आहे ह्याची कल्पना येते. त्या राष्ट्रानें आतापर्यंत अठ्याण्णव हजार कोटि रुपये युद्धाप्रीत्यर्थ खर्चले आहेत आणि ह्यापैकी सुमारें पंधरा टक्के रकम मित्रराष्ट्रांस लढाऊ सामुग्रीचा पुरवठा करण्यांत आला त्या खातीं पडली आहे. तिचा आकडा अजमासें चवदा हजार कोटि रुपये होतो. अमेरिकेंतून उसनवार माल बाहेर पाठवण्यांत आला, त्यांतला बेचाळीस टक्के इंग्लंडला गेला, रशियाचा हिस्सा अठावीस टक्के भरला; आफ्रिका व भूमध्य समुद्र ह्यांच्या क्षेत्रांत तेरा टक्के गेला आणि बारा टक्के पॅसिफिक व इतर आघाड्यांवर वांटण्यांत आला. सुमारें दोन हजार कोटि रुपयांचा माल मित्रराष्ट्रांनीं उलट अमेरिकेस पुरवला आणि ह्या कामीं इंग्लंडचेंच सहाय मुख्यत्वेंकरून झालें. जून, १९४५ अखेर अमेरिकेनें हिंदुस्थानकडे उसनवारीनें २०३ कोटि डॉलर्स किंमतीचा माल पाठविला, त्यांत दारूगोळ्याचाच भरणा मुख्यत: होता. यंत्रसामुग्रीच्या स्वरूपांतहि अमेरिकेनें मदत केली त्या कारणानें हिंदुस्थानांतील दारूगोळ्याचें व इतर युद्धोपयोगी मालाचें उत्पादन वाढूं शकलें. लष्करी वसाहतीसाठी हिंदी दळणवळणाची व्यवस्था अपुरी पडूं नये ह्याकरितां अमेरिकेनें इंजनें पुरविलीं. हिंदुस्थानानें ५२ कोटि डॉलर्सचा माल अमेरिकेस उलट पुरविला, त्यांत लष्करी पुरवठा, माल व इमारती ह्यांचा समावेश होतो. अमेरिकन लष्करानें हिंदुस्थानांत २३ कोटि रुपयांचें ६२ कोटि पौंड अन्न खाल्लें, तीहि बाब त्यांत येते.

## शिलकी लढाऊ सामुग्रीची विल्हेवाट

युद्ध चालू असतांना त्यास आवश्यक असलेली अनेक जातींची सामुग्री अगाऊ एकत्र करून लागेल तेव्हां इच्छित स्थळीं पाठवण्यांत येण्याकरितां तयार ठेवावी लागते. हे साठे सोयीच्या व सुरक्षित ठिकाणीं केलेले असतात. जपान अपेक्षेपेक्षा लवकर शरण आल्याकारणानें त्याच्यावरील अखेरच्या स्वारीचे दृष्टीनें लढाऊ सामानाचे मोठे साठे बनवण्यांत आले होते, ते आतां निरुपयोगी झाले आहेत आणि त्यांची योग्य विल्हेवाट लावण्याचा अवघड प्रश्न उपस्थित झाला आहे. पॅसिफिक महासागरांतील युद्धाचें हिंदुस्थान देश हें पुरवठ्याचें महत्त्वाचें मध्यवर्ती केंद्र झालें होतें आणि हा शिलकी माल येथें विस्तृत प्रमाणांत सांचला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. अमेरिकेच्या मालकीचा असा माल ह्या देशांत शिल्लक आहे आणि त्याचा निकाल लावण्याच्या योजना अमेरिकन अधिकारी आखीत आहेत. ह्या सांठ्यांतली कांहीं सामुग्री पूर्व एशियांत दुसरीकडे हालवणें व कांहीं अमेरिकेस परत पाठवणें सोयीचें होईल. मालाचा एकूण पुरवठा, त्याचे बाजारभाव, त्याच्या कारखानदारांचें हितानहित, त्यास असलेली मागणी इत्यादि अनेक गोष्टी विविध सामुग्रीच्या विल्हेवाटींत लक्षांत घ्याव्या लागतील. बाजारांची घडी विघडणार नाहीं आणि त्यांत गोंधळ उडणार नाहीं ह्याविषयीं अर्थातच दक्षता बाळगणें आवश्यक होईल. लढाऊ उपयोगाचे नाना जातींचे जिन्नस लोकांच्या मामुली गरजा भागविण्यासाठी विक्रीस काढण्यांत येतील आणि त्यांची किंमत ठरवणें व ते बाजारांत जिरवणें हें काम बरेंच अवघड आहे. हिंदुस्थान सरकारासहि शिलकी लढाऊ मालाची व्यवस्था बेताबातानें करावी लागणार असून त्याविषयींच्या योजनांचा विचार मागेंच चालू झालेला आहे. अमेरिकेचा दारूगोळ्याचा प्रचंड सांठा हिंदुस्थानांत आहे त्याचा निकाल कसा करावयाचा ह्याचें कोडें त्या देशाच्या अधिकाऱ्यांस पडलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्या स्फोटक मालाचा शांततेच्या काळांत कांहीं उपयोग नाहीं आणि त्याची किंमत अल्प प्रमाणांतहि हातीं येण्याचा संभव नाहीं. एवढेंच नव्हे तर त्याचा नाश करून टाकणें हेंहि सोपें नाहीं. "समुद्रास्तृप्यंतु" हाच एक उपाय ह्या बाबतींत योजणें शक्य आहे असें जबाबदार तज्ज्ञांचें मत आहे, पण इतर उपयुक्त मालाची गोष्ट वेगळी असून त्याची विल्हेवाट राष्ट्रीय हिताच्या व लोकांच्या सोयीच्या दृष्टीनें करण्यांत आली पाहिजे. म्हणजेच राष्ट्रीय खर्चांत बचत होऊन आर्थिक पुनर्घटनेस थोडेंबहुत सहाय दिल्याचें श्रेय मिळेल.

## श्री. मुरारजी वैद्य ह्यांच्या सूचना

शिलकी लढाऊ सामुग्रीच्या विल्हेवाटीच्या प्रश्नावर असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मुरारजी एम. वैद्य ह्यांनीं असोसिएशनच्या तिमाही सभेंत व्यक्त केलेल्या विचारांकडे लक्ष वेधणें युक्त होईल. हिंदुस्थानांत हिंदुस्थान सरकार, ब्रिटिश सरकार व अमेरिकन सरकार अशीं तीन देशांचीं सरकारें ह्या प्रश्नाशीं निगडित आहेत. हिंदी व्यापारी व कारखानदार वर्गास विश्वासांत घेऊन त्यांचा सल्ला विचारण्यांत आला नाहीं, अशी श्री. वैद्य ह्यांनीं तक्रार केली. सामुग्रीची विल्हेवाट लावतांना योग्य ती दक्षता बाळगली नाहीं व योजना आखली नाहीं तर गेल्या महायुद्धाचे अखेरीस आलेल्या अनुभवाची पुनरावृत्ति व्हावयाची, असा इशारा त्यांनीं दिला. जपानशीं युद्ध संपुष्टांत आल्याकारणानें हिंदी कारखानदारांचीं लष्करी कामाचीं कंत्राटें बंद झालीं असून त्यांस चालू काम बंद करून एकाएकीं नागरिकांच्या उपयोगी मालाचें उत्पादन सुरू करावें लागणार आहे. हा बदल थोडा त्रासदायक झाल्याविना राहणार नाहीं. कित्येक कारखानदारांना वेगळ्या प्रकारचा कच्चा माल वापरावा लागेल, परंतु तो मिळविणें आज सोपें नाहीं. ह्या प्रश्नाचा सरकारनें व कारखानदारांनीं तातडीनें विचार करावा असें श्री. वैद्य ह्यांनीं सुचविलें. आगबोटीनें पुरेसा माल आयात होऊं लागण्यास वेळ लागेल, तेव्हां कारखानदारांना देशांतच मिळेल तो कच्चा माल शक्य तेवढा सुधारून वापरावा लागेल, असेंही ते म्हणाले. मशीन टूल्ससारखी कितीतरी यंत्रसामुग्री रिकामी पडेल ती हिंदी कारखानदारांस उपलब्ध व्हावी म्हणजे आज त्यांची पडत असलेली तूट नाहींशी होईल, अशीहि त्यांनीं सूचना केली.

## युद्धकाळांतील औद्योगिक प्रगतीस खोडा

हिंदी उद्योगपतींचें शिष्टमंडळ ग्रेट ब्रिटनमधून आतां परत आलें आहे. त्यांतील प्रमुख सभासद, श्री. टाटा व श्री. श्रॉफ, ह्यांनीं कराचीस उतरल्यावर मुलाखतीमध्यें हिंदी युद्धकालीन उद्योगधंद्यांविषयीं काढलेले उद्गार उद्बोधक आहेत. ते म्हणाले:— "युद्धकाळांत हिंदुस्थानांतील कारखान्यांत पुष्कळ वाढ झाली त्याचा हिंदुस्थानास पुढेंहि फायदा मिळेल, ही कल्पना भ्रामक ठरली आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांच्या औद्योगिक प्रगतीशीं तुलना केली, तर हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीस खोडा बसलेला आढळून येईल. साम्राज्याच्या युद्धप्रयत्नास मदत देण्याच्या नावाखालीं ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांस अनेक तऱ्हेची यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यांत आली, तिचा फायदा त्यांस पुढेंहि मिळत राहील." हिंदुस्थानांतील औद्योगिक प्रगतीस युद्धकाळांतहि सरकारचें धोरण पोषक नव्हतें, ह्या लोकांच्या तक्रारीस वरील विधानानें पुष्टी मिळाली आहे.

## भोर संस्थानांतील औद्योगिक प्रगति

### भोरच्या अधिपतींचें भाषण

“ भोर संस्थानची औद्योगिक प्रगति व्हावी म्हणून आम्ही कांहीं कारखानदारांना सवलती देऊन संस्थानांत कारखाने काढण्यास प्रोत्साहन दिलें. त्याप्रमाणें सध्या भोर नजीक भोर ट्रेडिंग कंपनी, दी पारेख पेपर मिल्स, राजा रघुनाथराव मिल्स, लक्ष्मी टेक्सटाईल मिल्स वगैरे कारखाने सुरू झाले आहेत. या कारन्यांत भोर संस्थानांतील कांहीं प्रजाजनास कामधंदा मिळून त्यांचे पोटापाण्याचा प्रश्न या महगाईतच्या काळांत सुटला आहे. शिवाय संस्थानची औद्योगिक प्रगती होत आहे हें पाहूनें समाधान वाटत आहे.

“मुंबई सरकारनें खडकवासला व वीर येथील धरणें वाढविण्याच्या योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे.या योजना हातीं घेतल्यानें संस्थानची बरीचशी सुपीक जमीन पाण्यांत जाऊन संस्थानचें बरेंच नुकसान होण्याचा संभव आहे. औद्योगिक दृष्ट्या फायदाहि होणेचा बराच संभव आहे. याबाबत दरबार व मुंबई सरकार यांचे दरम्यान पत्रव्यवहार व वाटाघाटी चालू आहेत. संस्थानचें व प्रजाजनांचें नुकसान होऊं नये म्हणून दरबार शक्य ती खबरदारी घेत आहे. ”

### पोंच

( १ ) श्रीकरुणेश्वर प्रासादिक परस्पर सहाय्यकारी पतपेढी लि., मुंबई:—३० जून १९४५ अखेरचा रिपोर्ट.

( २ ) मार्ढे ता. को. सु. यूनियन लि.—३० जून १९४५ अखेरचा रिपोर्ट.

( ३ ) मध्यवर्ती ग्रामसेवा मंडळ, मुंबई:—१९४४ चा सहावा वार्षिक रिपोर्ट.

( ४ ) नगर डि. अर्बन से. को. बँक लि:–३० जून, १९४५ अखेरचा रिपोर्ट.

( ५ ) सांगली स्टेट सें. को. बँक लि:–३० जून, १९४५ अखेरचा रिपोर्ट.

( ६ ) अर्बन को. बँक लि. सांगली:—३० जून, १९४५ अखेरचा रिपोर्ट.

( ७ ) लक्ष्मी को. बँक लि. सोलापूर:—३० जून, १९४५ अखेरचा रिपोर्ट.

### आवाजाचा ३३½ लक्ष रुपयांचा विमा

हॉलिवुडची गायिका मिस रोज स्टीव्हन्स हिनें लंडनच्या लॉइड्सकडे आपल्या आवाजाचा ३३½ लक्ष रुपयांचा विमा उतरला आहे. कांहीं काळापुरतें तिला गातां आलें नाहीं, तर लॉइडसकडून तिला दर आठवड्यास १०,००० रुपये मिळतील आणि वर्षभर गळा बसला तर पॉलिसीची सबंद रकम मिळेल.

### अकरा नातवंडांच्या आजीचा विक्रम

मृणालिनी घोष ह्या ११ नातवंडें असलेल्या बंगाली विदुषीनें पाटणा विश्वविद्यालयाच्या एम्. ए. च्या परीक्षेंतील बंगाली भाषा विषयांत पहिला नंबर मिळविला आहे. नात मॅट्रिकला बसली, त्याच वर्षी आजी बी. ए. झाली.

### महारोगी

ब्रिटिश साम्राज्यांत २०,००,००० महारोगी आहेत. हिंदुस्थानांतील अस्सल महारोग्यांपैकीं २% सुद्धां रोग्यांची स्वतंत्र बाजूस ठेवण्याची आज व्यवस्था नाहीं.

तुमच्या पैशाचा




योग्य मोबदला




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

‘अर्थ’ ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिटयूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—

नोगीचे
डोंगर
छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५-८-४५ ते २२-९-४५
बॉंबे डाइंग ३१-८-४५ ते १४-९-४५
कोहिनूर १-९-४५ ते १७-९-४५

व्याज–वजा ( xd )
कोहिनूर रु. ९ सं. दि. १९–९–४५
डाइंग रु. २५ दि. २७-९-४५
टाटा स्टील रु. १२९–८–९ } १–१०–४५
रु. २३–०–० }

| १९४४ मधील चढउतार | दिलेल व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार दि. २७।८।४५ | मंगळवार २८।८।४५ | बुधवार २९।८।४५ | गुरुवार-शुक्रवार ३०।८।४५ . ३१-८-४५ | शनिवार १।९।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २१८३–१२ | २२३६—४ | २२५६—४ | | २२५६—४ |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४०७—८ | ४१७—० | ४२०—८ | | ४२२—० |
| २२०१; १६९५ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९५८–१२ | १९६२—८ | १९७०—० | | १९६७—८ |
| ७६५; ५३३ | ९—–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ५७६—० | ५८४—० | ५९६—० | | ५९६—० |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५२९—० | ५३३—० | ५४०—८ | | ५४३—० |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ३६५—० | ३६८—८ | ३७२—८ | | ३७१—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २७८—० | २८२—० | २८१—८ | गोकुळअष्टमीनिमित्त सुट्टी | २८०—८ |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | २८९—० | २९३—० | २९३—० | | २९४—० |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८७—० | २८८—० | २९०—८ | | २९०—० |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ३–१४–० | ४–०–० | ४—०–३ | | ३–१५–६ |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३–९–० | १३–१२–० | १३–१३–० | | १३–१२–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | २–११–६ | २–१२–३ | २–१२–६ | | २–१३–६ |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६४५–०+ | ६५७—८ | ६६१—४ | | ६५७—८ |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २०८–१२ | २१०—० | २११—० | | २१०—८ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २१५—० | २१५—० | २१४—८ | | २१५—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५२—८ | ५५७—८ | ५६०—० | | ५५०—० |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३६—२ | ३६—९ | ३६–११ | | ३६—९ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१—६ | १०१—८ | १०१–१० | | ११०-११-० |

शनिवार दि. १–९–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स्**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—७–० |
| १९५१–५४ | १०१—८–० |
| १९५७ | १००–१०–० |
| १९६३–६५ | ९९—२–० |
| १९६६–६८ | ९८—८–० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४३—८ |
| सेंट्रल | ८३—४ |
| इंडिया | १८७—८ |
| इंपी० | {२१९७—८ |
| | { ५६५—० |
| रिझर्व्ह | १३७—० |
| युनियन | ८–१०–० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८२१–४ |
| बॉम्बे ट्रॅम | १४६–० |
| टाटा हायड्रो | २०३–० |
| टाटा पॉवर | १८४०–० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४०७—८ |
| बॉंबे स्टीम | ५९०—८ |
| न्यू इंडिया | ८५—८ |
| शिवराजपुर | ५१—० |
| टाटा केमिकल | १८–१४ |
| टाटा ऑईल | ६९–१२ |

सोमवार, मंगळवार दि. ३ नि ४ सप्टेंबरला पारशी नूतन वर्षानिमित्त बाजार बंद होता.
शुक्रवार दि. ७–९–४५ पासून ११ सप्टेंबर ४५ पर्यंत सुट्यानिमित्त बाजार बंद आहे.

### उच्च सहकारी शिक्षणाची व्यवस्था

उच्च सहकारी शिक्षणाची मुंबई व पुणें येथें सोय मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटनें केली असून दोन्ही ठिकाणच्या वर्गांत सायंकाळीं कॉलेजांतील प्राध्यापक व सहकारी पुढारी ह्यांचीं व्याख्यानें होतात. प्रत्येक ठिकाणच्या वर्गांत प्रत्येकीं ५० विद्यार्थी ( सहकारी संस्थांतील नोकर व कॉलेजांतील विद्यार्थी ) दाखल झालेले आहेत. पुणें येथील वर्ग बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समध्यें भरतो. एप्रिल, १९४६ मध्यें डिप्लोमाची परीक्षा घेण्यांत येईल. इन्स्टिटयूटच्या ह्या उपक्रमास उत्साहजनक पाठिंबा मिळाला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

### कोयनेलच्या २५ पट स्वस्त ' टोटॅकिन '

कोयनेलचाच गुण असणारें परंतु त्यापेक्षा पुष्कळच स्वस्त असें एक औषध अमेरिकन लष्करी तज्ज्ञांनीं शोधून काढलें आहे. त्याचें नाव " टोटॅकिन " असें आहे. कोयनेलप्रमाणें टोटॅकिन हेंहि सिंकोनाच्या झाडापासून निघतें. एक वेळ घेण्याच्या शुद्ध कोयनेलच्या डोसाला ४½ आणे पडतात व ॲटेब्रिनला २½ आणे खर्च येतो; टोटॅकिनची २ पै किंमत पडेल !

### एक लक्ष रुपयेपर्यंत भांडवल उभारणीस परवानगी अनावश्यक

नवीन लिमिटेड कंपनी काढावयाची असल्यास, एक हजार रुपयांवरील भांडवलाच्या कंपनीचे स्थापनेस सरकारी परवानगी पाहिजे असें दोन वर्षांपूर्वी हिंदुस्थान सरकारनें ठरविलें. एक हजार रुपयांची मर्यादा वाढवून आतां ती एक लक्ष रुपयांची करण्यांत आली आहे. शेअर अर्जाबरोबर द्यावयाची प्रवेश फी किंवा वाढावा ह्यांचा समावेश ह्या एक लक्ष रुपयांतच होतो.

### कपाशीच्या लागवडींत ३० % घट

हिंदुस्थानांतील १९४४–४५ मधील कपाशीची लागवड त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें ३०% कमी असून उत्पादन ३३% कमी होईल असा सरकारी अंदाज आहे. लागवडीचा अंदाज १,४८,०३,००० एकर असून उत्पादनाचा अंदाज ३५,४३,००० गाठी आहे.

### औषधांच्या किंमती उतरणार

कित्येक औषधांच्या नियंत्रित किंमती उतरविण्यांत आल्या आहेत, त्या १ ऑक्टोबरपासून अंमलांत येतील.

**इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड**

३७६ शुक्रवार, पुणें २

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात

दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे

पहिले व फक्त १ च

*गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्*

**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India-Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent, the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them,

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस–पुणें शहर.

एकूण खेळतें भांडवल रु. १,२५,००,०००

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल रु. ५,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या १०,००० भागांत विभागलेलें).

वरील शेअर्स ता. ६–७–४५ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या ४ शेअर्सना १ नवा शेअर याप्रमाणें रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांना तेवढ्याच वाढीनें (रु. ५/–) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५।९।१९४५ ही आहे.

सी. व्ही. जोग,
मॅनेजर.

**—: साठे बिस्किटें :—**

ऑरेंज व स्ट्रॉबेरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १२ सप्टेंबर, १९४५ अंक ३६

## काळेज सेल्स असोसिएशन (मुंबई)

यांच्या हितचिंतकांस

### आनंदाची बातमी

सदरहू असोसिएशन लिमिटेड कंपनीमध्यें रूपांतर होत असून तिचें अधिकृत भांडवल रु. १०,००,००० आहे व त्यांपैकीं तूर्त रु. ३,००,००० भांडवल विकण्यास हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे. त्या तीन लाख रुपये भांडवलापैकीं असोसिएशनचे संस्थापक व त्यांची स्नेही मंडळी यांमध्यें जवळ जवळ रु. १,८०,००० भांडवल आगाऊ खपलें गेलें आहे. प्रत्येकी १०० रुपयांचे ५% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स आतां शिलक आहेत.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

फोन नं. ४९३ | तारेचा पत्ता "Cencobank" | पोस्टबॉक्स नं. ११

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती व निरा

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई

खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर

—शाखा—

स्थानिकः—१ दादर, २ गिरगांव, ३ थेंट रोड, ४ जव्हेरी बाज़ार, ५ शींव, ६ विलेपार्लें, ७ माटुंगा.

इतरः—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

# विविध माहिती

### अमेरिकन सैनिकांच्या संख्येंत अर्ध्या कोटीची घट

अमेरिकेच्या लष्करांत सध्या ८०,५०,००० सैनिक आहेत, ते कमी करीत करीत जुलै १९४६ अखेर २५,००,००० वर आणण्यांत यावयाचे आहेत. त्यांपैकी ३,७०,००० सैनिक युरोपांत, ८,३०,००० सैनिक पॅसिफिकमध्यें, १,१५,००० अलास्कामध्यें व कॅरीबिअन बेटांत व ११,८५,००० प्रत्यक्ष अमेरिकेंत ठेवण्यांत येतील. २,००,००० सैनिक केव्हांहि उपस्थित होणाऱ्या प्रसंगासाठी सज्ज राखून ठेवले जातील.

### दारूगोळ्याच्या साठ्याचें काय करणार ?

युद्ध संपल्याकारणानें हिंदुस्थानांत शिल्लक राहिलेला दारूगोळ्याचा साठा निकालांत कसा काढावयाचा, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. बिनधोकपणें तो नाहींसा करावयाचा म्हटलें तर तो उडवून देण्यास सहा वर्षें लागतील. कांहीं दारूगोळा समुद्रांत फेकावा लागेल.

### बूट व कातडी माल ह्यांच्या कारखान्यांसाठी ब्रिटिश सहाय

हिंदुस्थानांत बूट व कातडी माल ह्यांच्या उत्पादनाचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालू करण्याच्या दृष्टीनें मि. कैसर अहमद, इंडियन फेडरेशन ऑफ फुटवेअर असोसिएशन्स, हे इंग्लंडमध्यें खटपट करीत आहेत. ब्रिटिश कारखानदारांना भागी देऊन हिंदुस्थानामध्यें कारखाने उभारण्यास त्यांची मदत घेणें, हिंदी भांडवलानें निघालेल्या कारखान्यांसाठी ब्रिटिश यंत्रसामुग्री मिळविणें, तयार ब्रिटिश माल घाऊक मागवून किरकोळीनें विकणें व हिंदी कातडी मालास इंग्लंडमध्यें गिऱ्हाईक शोधणें, असा मि. अहमद ह्यांचा चतुर्विध प्रयत्न आहे. अर्धा कोटि रुपये खर्चण्याची आज त्यांची तयारी आहे.

### नोकर मिळत नाहींत, म्हणून मुलें नकोत

इंग्लंडमध्यें घरकामास नोकर मिळत नाहींत, हें सुप्रसिद्धच आहे. ज्या कुटुंबांत लहान मुलें असतील, अशा ठिकाणीं काम करण्यास मोलकरणी तयार होत नाहींत. नोकरांच्या अडचणीचा परिणाम कुटुंबांतील मुलांची संख्या मर्यादित होण्यांत होणार कीं काय आणि त्यामुळें लोकसंख्येच्या वाढीस आळा बसणार कीं काय अशी भीति तेथें व्यक्त करण्यांत येत आहे. कुटुंबांत मुलें नसलीं तरच मोलकरणी काम करण्यास तयार होणार.

### नव्या प्रांतिक कर्जांचा तपशील

मद्रास, पंजाब व संयुक्तप्रांत ह्या तीन प्रांतांच्या सरकारांनीं एकूण ८३ कोटि रुपयांचीं कर्जें उभारण्याचें ठरविलें आहे. व्याजाचा दर ३%, परतफेड १९६० सालीं, विक्रीची किंमत १०० रु. च्या रोख्यास ९९ रु. ८ आ. व अर्जांची मुदत १२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर, असा त्यांचा तपशील आहे. मद्रास व पंजाब ह्यांस उत्पादक भांडवली खर्चासाठी प्रत्येकीं २ कोटि रुपये हवे आहेत; संयुक्त प्रांत सरकारास हिंदुस्थान सरकारचें कर्ज फेडण्यासाठी ४३ कोटि हवे आहेत.

### छपाईच्या दिरंगाईमुळें रेशनिंगची तारीख लांबली

कलकत्ता शहरांत ३ सप्टेंबरपासून कापडाचें रेशनिंग सुरू करण्याचें ठरलें होतें, परंतु सप्टेंबर अखेर आवश्यक ते तक्ते, कुपन्स वगैरे छापून तयार होत नाहींत असें आढळून आल्यावरून रेशनिंग १ ऑक्टोबरनंतर अंमलांत यावयाचें आहे. कापडाचा साठा रेशनिंगला प्रारंभ करण्यास पुरेसा असूनहि, छपाईच्या दिरंगाईमुळें कापड-वाटप पुढें ढकलावें लागलें आहे.

### इंग्लंड-अमेरिका रेडिओ टेलिफोन

इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमधील रेडिओ-टेलिफोन युद्धकाळांत बंद ठेवण्यांत आला होता तो नुकताच सुरू करण्यांत आला. त्याचा तात्काळ अनेक अमेरिकन सैनिकांनीं फायदा घेतला. तीन मिनिटें बोलण्याचा चार्ज ४५ रुपये आहे.

### कपाशीचा नाश

अमेरिकेंतील एका प्रचंड वादळामुळें, कपाशीच्या झाडांवरील हजारों गांठी भरेल इतक्या कपाशीचा नाश झाला त्यामुळें कोट्यवधि रुपयांचें नुकसान झालें.

### हिंदुस्थान सरकारचा खर्च

१९४५-४६ च्या पहिल्या तिमाहींत हिंदुस्थान सरकारनें आपल्या उत्पन्नाच्यापेक्षा ४६३ कोटि रुपये जास्त खर्च केला. तीन महिन्यांत सरकारचें कर्ज ६१३ कोटि रुपयांनीं वाढलें.

### इजिप्तच्या कपाशीची हिंदुस्थानांत आयात

इजिप्तनें जुलै १९४५ मध्यें ८४,३६६ गांठी कपास निर्गत केली. त्यांपैकी हिंदुस्थाननें १३,३६१ गांठी घेतल्या. फ्रान्सकडे ५६,१४० व ग्रेट ब्रिटनकडे ९,३९७ गांठी गेल्या.

### अमेरिकेच्या लोकसंख्येंत वाढ

अमेरिकेची लोकसंख्या गेल्या पांच वर्षांत सुमारें ८० लाखांनीं वाढून ती १३,९६,८२,००० झाली.

### मुख्य प्रधानास मताधिकार नाहीं.

मि. चर्चिल ह्यांचें स्वतःचें नांव मतदारांच्या यादींत नसल्याकारणानें, त्यांना गेल्या निवडणुकींत मत देतां आलें नाहीं.

### दोघे एकाच क्षणास मेले तर वारसा कोणास जाणार ?

बॉंबवर्षावामुळें अनेक मृत्यु एकदम होतात व कोण आधीं मेला आणि कोण मागाहून मेला हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. मालमत्तेचें विश्वस्तपत्र केलें असल्यास, वारस ठरविण्याचे वेळीं मृत्यूंचा अनुक्रम महत्त्वाचा असतो. इंग्लंडमध्यें एका तळघरांतील आश्रयस्थानांत दोघांचा बॉंबहल्ल्यांत मृत्यू आला, तेव्हां त्यांपैकी अगोदर कोण मेला, असा प्रश्न उपस्थित झाला आणि निवाड्यासाठी प्रकरण हाऊस ऑफ लॉर्डसकडे गेलें. न्यायाधीशांचें एकमत होऊं शकलें नाहीं. "बॉंबवर्षावामुळें दोन मृत्यूंमधील वेळेची तफावत अगदीं कमी होण्याची शक्यता असली, तरी ती नाहींशी झालेली आहे असें म्हणतां येणार नाहीं" असा एका लॉर्डानें अभिप्राय व्यक्त केला. कोण आधी मेला हें ठरवितां आलें नाहीं, तर कमी वयाचा मनुष्य मागून मेला असें गृहीत धरण्याचा कायद्याचा आदेश आहे. हा प्रघातच चालू रहावा, असें बहुसंख्य लॉर्डांचें मत पडलें. विश्वस्तपत्र करणारांनीं दोघांचा मृत्यू एकदमच आला तर मालमत्तेची वाटणी कशी करावयाची, हेंहि लिहून ठेवणें ह्यापुढें आवश्यक ठरणार आहे असें दिसतें.

खरूज, गजकर्ण, भाजणें या सर्वांवर
सर्वमान्य उपाय योजना

★ मलम ★ लोशन ★ साबण ★ पावडर ★

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## आर्थिक घडी पुन्हां कशी बसवणार ?

जपानी युद्ध आणखी वर्ष-सहा महिने तरी चालेल अशा अपेक्षेनें अमेरिका व इंग्लंड ह्या राष्ट्रांनीं स्वतःची लढण्याची तयारी ठेवली होती आणि सावधगिरीच्या दृष्टीनें हेंच योग्य होतें. युद्ध लवकर थांबलें ही गोष्ट अत्यंत इष्ट अशीच झाली ह्यांत शंका नाहीं. कारण, त्या योगानें द्रव्यहानी व मनुष्यहानी वांचेली आणि शांततेची स्थापना जवळ येऊन जगांत स्थिरस्थावर करण्याचें मनःस्वास्थ्य लोकांस त्वरित मिळालें आहे. तथापि, ही घटना आनंदमय आणि स्वागतार्ह असली तरी तिनें मित्रराष्ट्रांच्या युद्धाबाबतच्या व युद्धोत्तर काळांतील संकल्पित योजनांची घडी विस्कटून टाकली आहे. ज्या गोष्टी वर्ष-सहा महिन्यांनीं कराव्या लागतील त्या आजच हातीं घ्याव्या लागत असल्यानें त्यांचेसंबंधांत थोडाबहुत घोटाळा होणें अपरिहार्य आहे. युद्धाची समाप्ति आणि शांततामय आर्थिक व्यवहारांची स्थापना ह्यांच्यामधील संधिकाळ नेहमीच अवघड असतो, आणि तो प्रस्तुत प्रसंगीं विशेष अडचणीचा वाटल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. युद्धकाळांतील मालाची टंचाई, महागाई, विविध सरकारी नियंत्रणें व तज्जन्य गैरसोयी ह्यांस सर्वच लोक कंटाळलेले असतात आणि आपलें जीवन पूर्वपदावर पुन्हां केव्हां येईल असें त्यांस झालेलें असतें. हा उतावीळपणा अगदीं स्वाभाविक असतो आणि त्यासंबंधांत जनतेची गैरसोय जेवढी कमी होईल तेवढी ती करणें सरकारचें कर्तव्य ठरतें.

रणांगणांवर विखुरलेल्या सैनिकांस स्वदेशीं परत आणून त्यांस जीवनाचीं साधनें उपलब्ध करून देणें हें पहिलें महत्त्वाचें काम केलें पाहिजे. ह्याविषयीं इंग्लंडमध्यें व्यवस्था केली जात आहे, तिची माहिती अधिकारी रीतीनें नुकतीच देण्यांत आली, तीवरून वहातुकीच्या साधनांची अडचण तेथील सरकारी योजनेच्या मार्गांत येत आहे असें दिसून येतें. कित्येक उद्योगधंदेवाले आपले नोकर लढाईवरून परत येण्याची आणि त्यांस पूर्ववत कामावर लावण्याची वाट पहात आहेत. कामधंदा आणि परत आलेले सैनिक ह्यांचा मेळ घालण्याचा कार्यक्रम पुरा पाडण्यासाठीं खास तरतूद करण्यांत आली आहे, तिची अंमलबजावणी बेकारी न पसरतां केली जाणें अगत्याचें आहे. हिंदुस्थानांत हाच प्रश्न प्रथम सोडवला गेला पाहिजे आणि तिकडे सरकारचें लक्ष वेधलेलें दिसत आहे. सर्व पूर्व एशियाभर जपान्यांनीं ठिकठिकाणीं हिंदी व ब्रिटिश सैनिक डांबून ठेवले आहेत आणि त्यांपैकीं अनेक हलाखीच्या स्थितींत आहेत. त्यांस हुडकून काढणें, ते एकत्र जमवून, त्यांस औषधपाणी देऊन व कपडालत्ता पुरवून त्यांस आपल्या घरीं पोंचवणें इत्यादि कामांत वहातुकीचीं साधनें व सांठ्यांतला हरतऱ्हेचा माल हीं उपयोगांत आणावीं लागतील. हिंदुस्थानांत असलेल्या निर्वासितांस स्वगृहीं पोंचवणें हेंहि त्याबरोबरच करणें अवश्य होईल. जपानच्या मगरमिठींतून सोडवलेल्या देशांत कांहीं काळपर्यंत शिबंदी ठेवावी लागेल. तीमध्यें हिंदी सैनिकांचा समावेश केला जाईल. निरनिराळ्या आघाड्यांवरून परतणाऱ्या शिपायांच्या मामुली जीवनाची व्यवस्था लावण्याच्या सरकारच्या योजना आहेत त्यांची अंमलबजावणी तात्काळ हातीं घेतली पाहिजे. ह्या सर्व कार्यक्रमाचा ताण कित्येक महिनेपर्यंत राज्यकारभार व्यवस्थेवर आणि देशाच्या आर्थिक घटनेवर पडेल.

ही घडामोड चालू असतांच देशांतील उद्योगधंदे व व्यापार ह्यांची घडी पुनः बसवण्याचा प्रश्न काळजीनें पण तातडीनें सोडवला गेला पाहिजे. प्रामुख्यानें युद्धावर अवलंबून राहिलेले धंदे आणि व्यवसाय युद्धसमाप्तीमुळें बंद किंवा अस्थिर होतील, त्यांचा योग्य परामर्श घेतला जाऊन निर्माण होणाऱ्या बेकारीवर उपाययोजना करावी लागेल, आणि तिचा सरकारशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं ह्या कारणास्तव ती खाजगी व वैयक्तिक जबाबदारीवर व प्रयत्नावर सोपवून चालणार नाहीं. हा राष्ट्रीय हिताचा प्रश्न असल्यानें आणि तो युद्धपरिस्थितीमधून उत्पन्न होत असल्याकारणानें तो सोडवण्यांत सरकारनें पुढाकार घेणें अगत्याचें आहे. होऊं घातलेल्या बेकारीचें स्वरूप किती मेसूर आहे ह्याची कल्पना हिंदुस्थान सरकारच्या स्वतःच्या एका खात्यांत युद्धपरिस्थितींत तात्पुरत्या वाढलेल्या गरजेसाठीं नेमलेल्या सुमारें अडीच लक्ष लोकांवर बिगर रोजगार होण्याचा प्रसंग आला आहे ह्यावरून सहज येण्यासारखी आहे. दुसऱ्या खात्यांत असे किती तरी लक्ष कामगार बेकार होण्याची भीति आहे. ह्यांत खाजगी व्यवसायांत आज गुंतलेल्या पण आतां बेकार होऊं घातलेल्यांची भर घातली असतां एकूण बेरीज मोठी आणि सामाजिक स्वास्थ्याचे दृष्टीनें चिंताजनक होते. ह्याकरितां प्रस्तुत विषयाचा संकलित अखिल भारतीय दृष्टीनें चौकशी, विचार आणि निकाल केला जाणें अगत्याचें आहे. गेल्या तीन वर्षांत अनेक सरकारी व बिनसरकारी योजना युद्धोत्तर आर्थिक परिस्थितीस तोंड देण्याचे हेतूनें तयार करण्यांत आल्या आहेत, त्यांस मूर्त स्वरूप देण्याची वेळ आतां आली आहे. मध्यवर्ती असेंब्लींत ह्या सबंध प्रश्नाचा खल होऊन योग्य उपाययोजना सुचवण्यांत येऊं शकली असती. पण तिचें हिवाळ्याचें अधिवेशन भरणार नसल्याचें प्रसिद्ध झालें आहे आणि लोकनियुक्त मंत्रिमंडळाच्या स्थापनेचा प्रश्न हवेंत तरंगत आहे. अनेक प्रांतांतहि हीच स्थिति आहे. ह्याकारणानें विद्यमान सरकारावर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे आणि ती योग्य रीतीनें पार पाडण्यास त्यानें सरसावलें पाहिजे. निरनिराळे धंदे आणि व्यवसाय ह्यांचा, कांहीं झालें तरी, संकलित रीतीनें विचार केला जाणें आणि राष्ट्रीय उत्पादनाची गाडी सुरळीत मार्गानें चालू केली जाणें अगत्याचें आहे.

---

### कापूस आणि कापड

सध्या हिंदुस्थानांत कापडाची टंचाई तीव्रतेनें भासत आहे आणि ती आणखी कांहीं काळपर्यंत चालू रहाणें अपरिहार्य आहे ह्या कल्पनेनें त्याच्या नियंत्रित वाटणीची व्यवस्था केली जात आहे. इकडे हिंदी कपाशीची किंमत विशिष्ट मर्यादेच्या खालीं जाऊन शेतकऱ्यांचें नुकसान होऊं नये ह्याकरितां तिच्या बाजारभावाचें सरकारकडून नियंत्रण केलें जात आहे. युद्धकाळांत हिंदी गिरण्यांचें कापडाचें उत्पादन वाढलें आहे, पण त्यांस नवीं यंत्रें मिळण्यांत व त्यांचा विस्तार होण्यांत अडचणी उपस्थित झाल्या आहेत. हातमागाच्या धंद्याची स्थिति आणि भवितव्य हीं असमाधानकारक असल्याची हाकाटी चालूच आहे. तेव्हां येत्या एकदोन वर्षांच्या अल्पावधींत आणि पुढील दीर्घकालांत हिंदी कपास आणि कापड ह्यांच्या धंद्यांचें काय होणार आणि त्या बाबतींत सरकारनें व धंदेवाल्यांनीं कोणत्या धोरणाचा अवलंब करावा ह्याबद्दलचे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. कांहीं काळपर्यंत जगांत कापडाची टंचाई भासणार आणि कापसाचा पुरवठा फाजील

होणार असा रंग दिसत आहे. युद्धापूर्वी हिंदी कपाशीस जपानमध्यें मोठें गिऱ्हाईक होतें आणि जपानी कापड ह्या देशांत येऊन स्वदेशी मालाशीं स्पर्धा करीत असे. हें गिऱ्हाइक आणि ही चढाओढ येथें कित्येक वर्षें नाहींशी होणार आहे. बाहेरून फारसें कापड इकडे येण्याचा संभव नाहीं. लँकेशायरच्या कापडास इतर बाजारांत पुष्कळ मागणी येणार आहे आणि हिंदी कापडाच्या खपास एशियाटिक देशांत बरी मागणी येण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत कापड स्वस्त होण्याचे संबंधांत परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे ह्याचें दिग्दर्शन वर नमूद केलेल्या तिच्या निरनिराळ्या अंगांवरून होईल.

---

### कापडाचें उत्पादन आणि निर्गत

स्थूल मानानें पाहातां जगांतील कापड कारखान्यांची उत्पादक शक्ति मर्यादित झाली आहे. यंत्रें व सामुग्री ह्यांचा तुटवडा त्यास कारणीभूत आहे, त्याचप्रमाणें कामकऱ्यांचा अपुरा पुरवठाहि त्यास जबाबदार आहे. युद्धामुळें कांहीं देशांत गिरण्यांचें नुकसान झालें आहे तर अन्यत्र कोळशाच्या टंचाईचीहि अडचण भासत आहे. युद्धापूर्वी कापसाच्या कापडाचें एकूण जागतिक उत्पादन ३,४५३ कोटि चौरस वार इतकें होतें आणि एक दोन वर्षांत तरी गिरण्यांस ही मर्यादा गाठतां येणार नाहीं असें दिसतें. स्वतःची गरज भागवून कांहीं देश कापड बाहेर पाठवीत असत, त्यांचीहि निर्गत लवकर पूर्वपदावर येणें शक्य होणार नाहीं. एकूण जागतिक निर्यात व्यापारांपैकी सुमारें दोन-पंचमांश एवढा हिस्सा जपानचा असे. हा व्यापार कांहीं वर्षेंपर्यंत पुनः चालू होण्याचा संभव नाहीं. अमेरिका व ब्राझिल ह्या देशांची उत्पादनशक्ति वाढली आहे तरी सगळा जागतिक तुटवडा त्यांच्यानें भरून निघणार नाहीं. कापडाच्या निर्गतीचे बाबतींत युद्धापूर्वी इंग्लंडचा नंबर जगांत पहिला होता, पण त्या देशांतील गिरण्यांमधील कामकऱ्यांची संख्या घटली असून स्वतःचें पूर्वीचें स्थान पुनः मिळवणें त्या देशास कठिण जाणार आहे. लंडनच्या "एकॉनॉमिस्ट" पत्रानें कापडाच्या धंद्यासंबंधांतले युद्धापूर्वीचे आकडे दिले आहेत ते उद्बोधक आहेत:—

कापडाचें उत्पादन व निर्गत ( वर्ष : १९३७–३८ )
( आकडे कोटि चौरस वारांचे आहेत )

| | उत्पादन | निर्गत | निर्गतीचें उत्पादनाशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ३२५ | १६५ | ५०.९ |
| युरोप ( इंग्लंड वगळून ) | ७५२ | १५० | २०.० |
| अमेरिका | ८३६ | २७ | ३.३ |
| कानडा | २३ | .५ | २.२ |
| ब्राझिल | ९० | .५ | ०.५ |
| चीन | ८७ | ६.४ | ७.३ |
| हिंदुस्थान | ४१३ | १२.७ | ३.१ |
| जपान | ४०० | २४१ | ६०.३ |
| रशिया | ३६७ | २० | ५.४ |
| इतर देश | १६० | ... | ... |
| एकूण | ३,४५३ | ६२४ | १८.१ |

---

### महाराष्ट्र बँकेची कोपरगांव शाखा

बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या कोपरगांव शाखेचा उद्घाटन समारंभ सोमवार, ता. १० सप्टेंबर रोजीं झाला. शाखेचा पत्ता श्री. मारुती रामजी बिल्डिंग, घ. नं. ५६४, असा आहे. कोपरगांवची शाखा ही बँकेची ९ वी शाखा होय. श्री. म. अ. केळकर हे तेथें एजन्ट म्हणून गेले आहेत.








—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व क्रीमक्रीम

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी — महिंद्रकर ब्रदर्स — गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

## स्फुट विचार

### जपानच्या पराभवाची मीमांसा

अमेरिकेच्या वाढत्या सामर्थ्यापुढें जपानचा अखेरीस टिकाव लागणें असंभाव्य होतें ह्याविषयीं कधींच वाद नव्हता. तथापि, हें सामर्थ्य प्रभावी होण्यास कालावधि लागणें अपरिहार्य होतें. पॅसिफिक महासागरांत विखुरलेल्या लहान-मोठ्या बेटांतून जपान्यांचें क्रमाक्रमानें उच्चाटन करून आणि त्यांचे दळणवळणाचे माग तोडीत तोडीत स्वदेशाकडे रेटींत मार्गे नेण्याचें धोरण अमेरिकन सेनानायकांनीं अंगिकारल्यानें त्यांची कुचंबणा झाली. ह्या मोहिमांमध्यें जपानी आरमाराचा फडशा उडाला आणि जपानी विमानदळ खच्ची झालें. त्यांतच जपानच्या शहरांवर अमेरिकन बॉबसचा अविरत वर्षाव होत राहिला आणि त्यामुळें त्यांत होणारें लढाऊ सामुग्रीचें उत्पादन संपुष्टांत आलें. अशा परिस्थितींत जपाननें बंगालच्या उपसागरापर्यंत विजयाचा फाफटपसारा मांडला होता, तो आवरणें त्यास अशक्य होतें. स्वतःच्या घराचें संरक्षण करण्याची जेथें मारामार तेथें ब्रह्मदेश व चीन ह्या देशांत लढाया चालू ठेवण्याची शक्ती जपानमध्यें कोठून उरणार? तथापि, ही हलाखीची स्थिति जपानी पुढाऱ्यांनीं आपल्या जनतेपासून बराच काळपर्यंत छपवून ठेवली होती. ॲटॉमिक बॉंब आणि रशियानें समरांगणांत टाकलेली उडी ह्यांनीं युद्धाचा शेवट त्वरित जवळ आणला असला तरी जपानच्या लढाऊ शक्तीचा भयंकर ऱ्हास आणि अमेरिकेचें वाढलेलें मारक बळ हींच कारणें शेवटीं जपानच्या पराभवास प्रभावी ठरलीं ही गोष्ट त्या देशाच्या मुख्य प्रधानास आतां उघडपणें कबूल करावीं लागलीं आहेत. मित्र-राष्ट्रांच्या आज्ञा मुकाट्यानें पाळणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें जपानी जनतेस त्यानें सांगितलें आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचा वाढता नफा : चलनविस्ताराचा परिणाम

युद्धपरिस्थितींतील चलनविस्तारामुळें रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा नफा पुष्कळच वाढला आहे. डिव्हिडंडचा दर ऑर्डिनन्सनें १९४३ सालापासून ४% निश्चित करून टाकला असल्याकारणानें, डिव्हिडंड देऊन उरलेली सर्व रकम हिंदुस्थान सरकारास मिळते. खालील तक्त्यांत बँकेच्या स्थापनेपासून तिला मिळालेलें उत्पन्न, तिचा खर्च, नफा, डिव्हिडंड यावयास लागलेली रकम व हिंदुस्थान सरकारास मिळालेली रकम ह्यांचा तपशील दिला आहे.

| | उत्पन्न लक्ष रु. | खर्च लक्ष रु. | निवळ नफा लक्ष. रु. | डिव्हिडंडची रकम लक्ष रु. | मध्यवर्ती सरकारास रकम लक्ष रु. |
|---|---|---|---|---|---|
| १-४-४५ ते ३१-१२-४५ | १२६ | ७० | ५६ | १३ | ४३ |
| १९३६ | १५५ | १०२ | ५३ | १७½ | ३५ |
| १९३७ | १२७ | ९९ | २८ | १७½ | १० |
| १९३८ | १३७ | ९९ | ३८ | १७½ | २० |
| १९३९ | १२२ | १०९ | २३ | १७½ | ५ |
| १-१ ४० ते ३०-६-४० | ८४ | ५५ | २९ | ८½ | २० |
| ३०-६-४१ अखेर | ३८२ | १०३ | २७९ | १७½ | ३६१ |
| ३०-६-४२ „ | ४५६ | ११५ | ८४१ | १७½ | ३२४ |
| ३०-६-४३ „ | ९१९ | १४९ | ७७० | २० | ७५० |
| ३०-६-४४ „ | १२०० | १७४ | १०२६ | २० | १००६ |
| ३०-६-४५ „ | १६५७ | १८१ | १४८९ | २० | १४६९ |

---

### १९४४–४५ मधील उसाचें पीक

१९४४-४५ मधील उसाच्या लागवडीचा अंदाज ४१,३४,००० एकरांचा आहे. १९४३-४४ मधील लागवड ४२,३४,००० एकर होती. उसाच्या एकूण लागवडींत संयुक्त प्रांताचा वाटा ५१%, पंजाबचा १२%, बिहारचा ११%, बंगालचा ८%, मुंबईचा ४% व मद्रासचा ३% आहे. गेल्या तीन वर्षांतील साखरेच्या आयातीचे आकडे खाली दिले आहेत:—

| | टन |
|---|---|
| १९४१–४२ | ४८,६३७ |
| १९४२–४३ | ५६३ |
| १९४३–४४ | २१ |
| १९४४–४४ ( सप्टेंबर अखेर ६ महिने ) | ७ |
| १९४४–४५ ( सप्टेंबर अखेर ६ महिने ) | —— |

१९४४–४५ मधील साखरेचें जागतिक उत्पादन १ कोटि, ९१½ लक्ष टन भरेल अशी अपेक्षा आहे.

---

### बार्शी सें. को. बँक लि.
( वार्षिक सभा : २३-९-४५ )

अहवालाचे सालामध्यें बँकेकडील सर्व ठेवींमध्यें सुमारें २ लक्ष रुपयांची वाढ होऊन ठेवींची रकम सुमारें १० लक्ष रुपये झाली आहे. व्यक्तिमात्र व मालतारण कर्ज व्यवहार ५६ हजारांनीं कमी होऊन सोसायट्यांकडील व्यवहार २८ हजारांनीं वाढला. बँकांकडील ठेवी व रोख्यांत गुंतविलेली रकम ह्यामध्यें सुमारें २ लक्ष रुपयांची वाढ झाली. सालअखेरीस ती रकम ७½ लक्ष रुपये आहे. थकबाकी ८ हजारांनीं कमी होऊन ३६ हजारांवर आली. बँकेच्या वैराग शाखेचें काम समाधानकारक चाललें असून, सरकारनें शाखेकडे दिलेल्या स्वस्त धान्याचे दुकानामार्फत ७ गांवांच्या लोकांना सुमारें ६७ हजार रुपयांचें धान्य देण्यांत आलें. अहवालाचे सालीं येडशी येथें बँकेचें पे ऑफिस सुरू करण्यांत आलें. बँकेस निवळ नफा ४,९७६ रुपये झाला, त्यांतून भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळेल. श्री. गणेश रामचंद्र साने, वकील, ह्यांचे चेअरमनशिपखाली बँकेनें आपला दर्जा कायम राखला आहे. श्री. र. प. पटवर्धन, सी. ए. आय. आय. बी., हे बँकेचे मॅनेजर आहेत.

---

### घाऊक किंमती व रहाणीचें मान ह्यांत वाढ

राष्ट्रसंघानें घाऊक किंमती व रहाणीचें मान ह्यांचे निदर्शक आकडे प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरून महागाईमध्यें होणाऱ्या वाढीचें प्रमाण आतां पूर्वीइतकें राहिलेलें नाहीं असें दिसून येतें. २८ देशांसंबंधीं आकडे उपलब्ध आहेत, त्यांपैकी १६ देशांत किंमती उतरल्या नसल्या तरी ओढून धरण्यांत आलेल्या आढळतील. चीनमध्यें किंमती व रहाणीचें मान ह्यांत सप्टेंबर १९४३ अखेर संपणाऱ्या वर्षी अनुक्रमें १७१% व १२३% वाढ झाली, १९४४ मधील वाढीचें तत्सम प्रमाण अनुक्रमें १७३% व १७६% भरलें. अमेरिका व कॅनडा ह्या देशांतील किंमतींत सर्व देशांपेक्षा कमी वाढ झालेली आहे.

---

### युद्धविषयक धोक्याचे विमे बंद

कारखान्यांच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याची योजना १ सप्टेंबर रोजीं बंद झाली. मालाच्या युद्धविषयक धोक्याच्या विम्याच्या योजनेची १ ऑक्टोबर रोजीं समाप्ती होईल.

## सोलापूर डि. सें. को. बँक लि.

### शेअर भांडवलांत वाढ करण्यासाठी पोटनियमांत दुरुस्ती

( वार्षिक सभा : ३०–९–४५ )

( १ ) बँकेचें एकूण भांडवल १,२४,५०० आहे, त्यापैकी ८०,२०० रु. वैयक्तिक सभासदांचे व बाकीचें सोसायट्यांचें आहे. बँकेचे रिझर्व्ह व इतर फंड १,४४,५०० रुपयांचे आहेत.

( २ ) एकूण ठेवींची रकम सुमारें ३० लक्ष रुपये झाली. बँकेच्या स्वतःच्या भांडवलाचे विवक्षित प्रमाणांतच तिला ठेवी स्वीकारतां येत असल्याकारणानें, भांडवलांत वाढ व्हावी ह्यासाठी पोटनियमांत दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे.

( ३ ) सोसायट्यांकडील कर्जांत वाढ झालेली आहे. धान्यावरील व इतर मालावरील निर्बंध कमी झाल्यावर व्यक्तिगत कर्जांतहि वाढ होईल अशी अपेक्षा आहे.

( ४ ) पंढरपूर येथील सेल शॉपनें ४२,२८७ रु. चा माल विकला. त्या दुकानाला आतां लोखंड व सरकी विक्रीचें काम मिळालें आहे. बँकेनें तालुक्याची एजन्सी घेतली आहे. बँकेच्या सर्व दुकानांनीं १,५३,००० रु. चा माल विकला.

( ५ ) अहवालाचे सालीं १८½ हजार रु. नफा झाला. त्यापैकी सुमारें ४ हजार रु. नफा बँकेच्या दुकानांचा आहे. भागीदारांस ४% डिव्हिडंड देण्यास ५,१५४ रु. लागतील.

### शेतकी मालावरील नियंत्रण, अडतपद्धति व मालतारणावरील कर्जें

" बहुतेक शेतकी मालावर हल्लीं नियंत्रण असलेमुळें अडत धंद्यावर त्याचा विशेष परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणें अशा नियंत्रण पद्धतीमुळें माल तारणावर कर्जें देण्याच्या व्यवहारावरहि त्याचा परिणाम झाला आहे. नियंत्रण पद्धति जसजशी कमी होत जाईल तसतशी बँकेचीं अडत दुकानें परिणामकारक ठरून मालतारण कर्जाच्या व्यवहारावरहि किफायतशीर परिणाम होत जाईल. शिवाय कर्ज निवारण कायदा जिल्ह्यांत बहुतेक ठिकाणीं लागूं करण्यांत आल्यामुळें सोसायट्यांची संख्या वाढत जाईल व बँकेचें भांडवल जास्त प्रमाणांत गुंतविणें सोयीस्कर व शक्य होईल; तसेंच ज्या शेतकऱ्यांनीं ऋणविमोचन बोर्डाकडे अर्ज केले आहेत, अशा शेतकऱ्यांना बँकेस पिकासाठी कर्जें देतां येतील. " :—एम्. व्ही. लेले, बी. ए. एलएल. बी.,
चेअरमन, सोलापूर डि. सें. को. बँक लि.

### " मोगल बादशहा; ईस्ट इंडिया कंपनी नव्हे "

सर सुलतान चिनॉय ह्यांनीं इंग्लंडमध्यें कांहीं विधानें केलीं, तीं हिंदुस्थानांत विकृत स्वरूपांत प्रसिद्ध झालीं, असें म्हणून त्यांनीं खालीलप्रमाणें खुलासा केला:—" हिंदुस्थानांत येऊन ब्रिटिश भांडवलदार कायम घर करतील, हें म्हणण्यांत माझा असा अर्थ होता, कीं ते ईस्ट इंडिया कंपनीसारखे नफेबाजीसाठी न येतां हिंदुस्थानाशीं एकजीव होऊन त्याच्या हितासाठी प्रयत्न करणाऱ्या मोगलबादशहाप्रमाणें अवतीर्ण होतील."

### अंबळे गांवास १०० रु बक्षीस

पुणें जिल्ह्यांतील सर्व गांवांत शिरूर तालुक्यांतील अंबळे गांवानें ग्रामसुधारणा उत्कृष्ट केल्याबद्दल त्या गावास १०० रुपयांचें बक्षीस देण्यांत आलें आहे.


तुमच्या पैशाचा योग्य मोबदला
हरण छाप सुगंधी उदबत्ती
रामकृष्ण गोपाळ सुगंधी



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
Asha
आशा सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—

नोगीचे डोंगर छाप शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५-८-४५ ते २२-९-४५
बॉंबे डाइंग ३१-८-४५ ते १४-९-४५
कोहिनूर १-९-४५ ते १७-९-४५

व्याज–वजा ( xd )
कोहिनूर रु. ९ सं. दि. १९–९–४५
डाइंग रु. २५ दि. २७-९-४५
टाटा स्टील रु. १२९–८–९ } १–१०–४५
रु. २३–०–० }

| १९४४ मधील चढउतार | दिलेल व्याज † संचित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार दि. ३।९।४५ | मंगळवार ४।९।४५ | बुधवार ५।९।४५ | गुरुवार ६।९।४५ | शुक्रवार ७।९।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | पारशी नूतन वर्षानिमित्त सुट्टी | पारशी नूतन वर्षानिमित्त सुट्टी | २२५८–१२ | २२६२—८ | श्वेतांबर जैन सणानिमित्त सुट्टी |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | | ४२१—० | ४२४—० | |
| २२०१; १६९५ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | | | १९५६—४ | १९५७—८ | |
| ७६५; ५३३ | ९—–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | | | ५९४—८ | ५१५—० | |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | | | ५४२—० | ५४७—८ | |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | | | ३७२—० | ३७३—० | |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | | | २८०—० | २७९—० | |
| ३९४; २८२ | ९–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | | | २९२—८ | २९३—० | |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | | | २८७—८ | २८७—० | |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | | | ३–१५–६ | ३–१५–९ | |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | | १३–११–० | १३—७–० | |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | „ डिफर्ड्स | १ | | | २–१३–० | २–१२–० | |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | | ६५५—० | ६५७—८ | |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | | २१०—० | २१४—४ | |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | | २१५—० | २१४—८ | |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | | ५७३–१२ | ५७०—० | |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | | ३६—८ | ३६—६ | |
| | | | ३½% रोखे | १०० | | | १०१–१३ | १०१–१२ | |

गुरुवार दि. ६–९–४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—६ |
| १९५१–५४ | १०१–१० |
| १९५७ | १००—६ |
| १९६३–६५ | ९९—२ |
| १९६६–६८ | ९८—९ |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १४३–१२ |
| सेंट्रल | ८३—० |
| इंडिया | १८८—० |
| इंपी० | २१९७—८ |
| | ५६६—४ |
| रिझर्व्ह | १३७—८ |
| युनियन | ८-१४ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८०२–८ |
| बॉम्बे ट्रॅम | १४०–० |
| टाटा हायड्रो | २०२–८ |
| टाटा पॉवर | १८४०–० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४१०—० |
| बॉंबे स्टीम | ५९०—० |
| न्यू इंडिया | ८४—८ |
| शिवराजपुर | ५१—४ |
| टाटा केमिकल | १९—४ |
| टाटा ऑईल | ७३—४ |

शुक्रवार दि. ७–९–४५ पासून ११ सप्टेंबर ४५ पर्यंत सुट्यांनिमित्त बाजार बंद होता.

### म्हैसूरमधील सोन्यावर कर

प्रत्येक औंसास १०० रुपये, ह्या ठराविक किंमतीपेक्षा सोन्यास जेवढी ज्यास्त किंमत येईल, तिच्या ७५% म्हैसूर सरकारास व २५% खाणींच्या मालकांस रकम मिळावी, अशी १९४० साली म्हैसूर सरकारनें योजना केली.परंतु, म्हैसूरमधील सोन्याच्या खाणीवाल्यांनीं तक्रार करून, एवढी मोठी रकम सरकारला दिल्यानंतर सोन्याचे आणखी थर शोधून काढण्यासाठी व प्रचलित किंमतीचा फायदा घेऊन सोन्याचें उत्पादन वाढविण्यासाठी भांडवली खर्चास सवड उरत नाहीं असें गाऱ्हाणें केलें. त्याचा सरकारनें विचार करून, कांहीं अटींवर खाणीमालकांस सवलती दिल्या आहेत. गेल्या वर्षी सोन्यावरील पद्धतीनें म्हैसूर सरकारास १ कोटि, १० लक्ष रुपये दिले.

### ब्रिटानिया बिस्किट कं. लि.

वरील कंपनीस ३१-३-४५ अखेर संपलेल्या वर्षी ३,४६,९९७ रुपये नफा झाला. मुंबई व कलकत्ता येथील कंपनीच्या दोनहि कारखान्यांत उत्पादन चांगलें झालें.

### अमेरिकेस सल्ला—" आयात वाढवा "

" अमेरिकेचें सबंद जगांत येणें निर्माण झालें आहे. तेव्हां निर्गत मालाचे मोबदल्यांत सोनें स्वीकारल्याविना किंवा परदेशांस मोठालीं कर्जें दिल्याविना अमेरिकेच्या परराष्ट्रीय व्यापाराचा ताळेबंद जमणार नाहीं. अमेरिका आपला सोन्याचा सांठा वाढविण्यास तयार झाली, तरी इतर देशांजवळ सोनें देण्यास फारसें आहे कोठें ? परदेशांस कर्जें दिलीं, तरी त्यांच्या मुद्दलाची व कर्जाची परत फेड मालाचे स्वरूपांत होऊं शकली नाहीं, तर कर्जें घेणारीं राष्ट्रें संकटांतच यावयाचीं. माळाचे स्वरूपांत परत फेड, अमेरिकेनें आपली बाजारपेठ आयात मालास मोकळी ठेवली तरच होऊं शकेल. व्यापारी आंतर-राष्ट्रीय व्यवहारांत अमेरिका देणेंकरी बनली नाहीं, तर जगाची आर्थिक घडी बसणें अशक्यप्राय आहे. युद्धोत्तर काळांत निर्गत वाढविण्याचा अमेरिकेचा विचार आहे; वास्तविक तिनें आयात वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याखेरिज आंतरराष्ट्रीय व्यापार पूर्ववत् चालू होणार नाहीं:—" डॉ. श्वार्झ.

# पूना गेस्ट हाऊस

: संस्थापक :

कै. नानासाहेब सरपोतदार

टेलिफोन नं. ७७१

## १९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर

१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.

अध्यक्षः—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. २,९९,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरीः ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, कोइमतूर, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईद; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

### करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ४,५५,८७० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ४१,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्ट्स् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेट्स् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेट्स् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. घों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

पुणें शहर

शाखा—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर-रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

चेअरमनः—श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B.

## एकूण खेळतें भांडवल रु. ३२ लाखांचेवर

—: व्याजाचे दर :—

करंट ½ टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २½ टक्के. कायम ठेवी २¾ ते ४½ टक्केपर्यंत ( मुदत ६ महिने ते ५ वर्षे )

शेअर विक्री चालू आहे.

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअरवर ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें.
- सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
- शॉर्ट टर्म डिपॉझिट्स् स्वीकारलीं जातात.
- मुंबई, नगर, नाशिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्ट्स् दिले जातात.

रा. बा. साळवेकर, B. A. LL. B.

नी. ना क्षीरसागर,

मॅनेजिंग डायरेक्टर्स.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १९ सप्टेंबर, १९४५ अंक ३७

## ✢ श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर ✢

( भोर संस्थान )

अधिकृत भांडवल : १५ लाख रु.

विक्रीस काढलेले व खपलेले भाग : साडेआठ लाख रु.

—: बोर्ड ऑफ डिरेक्टर्स :—

श्रीमंत सरदार खंडेराव रामराव विंचूरकर, पुणें

| | |
|---|---|
| श्री. गणेश रामचंद्र साठे<br>बिस्किट कारखानदार, पुणें. | श्री. दत्तात्रय बाळकृष्ण फाटक<br>पायोनियर डाईंग हाऊस, पुणें. |
| श्री. हरीहर रामकृष्ण करंदीकर<br>लक्ष्मीरोड, पुणें. | श्री. माधव गणेश देसाई<br>एस. एन. राजर्षी कं. मुंबई, वगैरे. |

ही गिरणी १९४४ सालीं सुरू झाली. गिरणींत तूर्त फक्त सूत निघतें. भोर संस्थाननें या गिरणीला टेक्स्टाइल इंडस्ट्रीबद्दल भोर संस्थान हद्दीपुरती मोनापलीसारख्या खास सवलती दिल्या आहेत. भाटघर धरणानें उत्पन्न झालेल्या विजेच्या शक्तीवर ही गिरणी चालते. या मिलचे मॅनेजिंग एजन्टस दि भोर मरकंटाईल एजन्सी लि. ( भोर ) हे आहेत. या कंपनीचे सध्याचे डायरेक्टर, श्री. देसाई, फाटक व करंदीकर हे आहेत.

या गिरणीचे चालू भांडवलाकरितां व वाढीकरितां ठेवी घेणें आहेत. ह्याबद्दल चौकशी मॅनेजिंग एजंटस, दि भोर मरकंटाईल एजन्सी लि. भोर यांजकडे करावी.

# विविध माहिती

### अमेरिकन इस्पितळांची विल्हेवाट

हिंदुस्थानांत एकूण १३ अमेरिकन इस्पितळें असून त्यांत ८,९७५ खाटांची व्यवस्था आहे. त्यांची पुढें विल्हेवाट कशी लावावयाची, हें ठरविण्याकरितां एक मंडळ. अमेरिकेंतून येथें यावयाचें आहे.

### न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. मुंबई

रबराच्या वरील कारखान्यास ३१ मार्च, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी १५½ हजार रुपये घसारा काढून व २ हजार रुपये बोनस देऊन ९,१४५ रुपये नफा उरला. क्यु. प्रे. भागांस ५%, ऑर्डिनरी भागांस ६%, रिझर्व्ह फंडांत २ हजार रुपये अशी नफ्याची वाटणी डायरेक्टर बोर्डानें सुचविली आहे. श्री. पु. ग. मराठे हे वरील कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### श्री. ग. स. मराठे ह्यांचें तैलचित्र

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. चे संस्थापक व पहिल्यापासूनचे अध्यक्ष, आणि मराठे आणि कं. ह्या फर्मचे मुख्य भागीदार कै. ग. स. मराठे ह्यांचें तैलचित्र कंपनीच्या दिवाणखान्यांत लावण्यांत यावयाचें आहे. त्याचा उद्घाटन समारंभ ह्या महिनाअखेर होईल.

### १९४४-४५ कर्जाची परतफेड

५% कर माफ १९४४-४५ चें कर्ज १५ ऑक्टोबर, १९४५ रोजीं फेडून टाकण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. १५ ऑक्टोबरनंतर त्यावर व्याज मिळणार नाहीं.

### हिंदी लोक साखर जास्त खाऊं लागले

लोकांमध्यें साखर खाण्याची संवय पसरत चालली आहे, हेंच सध्याच्या साखरेच्या तुटवड्याचें प्रमुख कारण आहे, असें शुगर कंट्रोलरचें मत आहे. लष्करी मागणी फक्त ८१,००० टनांची असून निर्गत १८,००० टनांपेक्षा अधिक नाहीं; उलट साखरेच्या रेशनमुळें साठा मात्र मोठा ठेवावा लागतो, असें त्यांनीं सांगितलें. सध्याच्या उत्पादनांत ५०% वाढ झाल्याविना पुरवठा पुरेसा पडणार नाहीं; चालू वर्षी ११,००,००० टन उत्पादन होईल म्हणजे मागील साळापेक्षा तें १,२०,००० टन अधिक भरेल असा त्यांचा अंदाज आहे.

### दक्षिण आफ्रिकेंत ७ कापडाच्या गिरण्या

दक्षिण आफ्रिकेंत कपास कापडाच्या गिरण्या स्थापन करण्यांत यावयाच्या आहेत. ७ गिरण्यांची यंत्रसामुग्री इंग्लंडमधून मागविण्यांत येत आहे.

### "हिंदी साखर बाहेर खपूं शकणार नाहीं"

हिंदुस्थानला साखरेच्या जागतिक बाजारपेठेंत स्पर्धा करून टिकाव धरतां येणार नाहीं, कारण हिंदी साखर कारखान्यांचा उत्पादनाचा खर्च फार भारी आहे, असा अभिप्राय एका अमेरिकन तज्ज्ञानें व्यक्त केला आहे.

### दरसाल ३ कोटि गॅलन पेट्रोलची बचत

३० एप्रिल,१९४५ रोजीं सबंध हिंदुस्थानांत मिळून १८,३५३ मोटार गाड्या प्रोड्यूसर गॅसवर चालू होत्या. त्यांपैकी १०,३३७ बसेस व ८९६ मालाच्या लॉर्‍या व उरलेल्या खाजगी मोटारी होत्या. त्यामुळें दरसाल ३ कोटि गॅलन पेट्रोलची बचत झाली. नाहींतर एवढें पेट्रोल समुद्रमार्गें हिंदुस्थानांत आणावें लागलें असतें.

### हिंदुस्थान सरकार अडचणी निर्माण करीत आहे

"ब्रिटिश कारखानदारांस हिंदी आकांक्षाबद्दल फारशी सहानुभूति कधींच वाटत नव्हती. हिंदुस्थान सरकारचा ज्यास आयातीची परवानगी मिळालेली नाहीं, अशास ब्रिटिश कारखानदारांनीं यंत्रसामुग्रीच्या किंमतीचा अंदाजी आकडासुद्धां सांगूं नये अशी सूचना हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश कारखानदारांस केलेली आहे. त्याकारणें ब्रिटिश कारखानदारांची वृत्ति अधिकच सहानुभूतिशून्य झाली आहे. युद्धापूर्वीच्या मानानें इतर भांडवली मालाची किंमत ग्रेट ब्रिटनमध्यें ६०% वाढली असली तर कापडाचीं यंत्रें १५०% महागलीं आहेत. त्याकारणानें हिंदुस्थानांतील गिरण्यांच्या वाढीस अडथळा निर्माण झाला आहे. खरेखुरें मध्यवर्ती कार्यतत्पर राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्याविना कोणतेंच नियोजन यशस्वी होणें अशक्य आहे, असा माझा हिंदुस्थानांतील व परदेशांतील अनुभव सांगतो.":—हिंदी उद्योगपतींच्या शिष्टमंडळाचे एक सदस्य, श्री. जी. डी. बिर्ला, ह्यांनीं कलकत्ता येथें प्रसिद्ध केलेलें पत्रक.

### श्री. श्री. प्र. ओगले ह्यांस निरोप

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. श्रीपाद प्रभाकर ऊर्फ आत्मारामपंत ओगले हे पॅरिस. येथें पुढील महिन्यांत भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेला हिंदुस्थानांतील कारखानदारांच्या प्रतिनिधींचे सल्लागार म्हणून जावयाचे आहेत. त्यांना त्यांच्या कार्यांत सुयश चिंतून निरोप देण्याचा समारंभ दि. १५ रोजीं शनिवारीं सायंकाळीं ५॥ वाजतां केसरी-मराठा संस्थेच्या सभागृहांत झाला. त्यावेळीं श्री. आ. रा. भट, श्री. दा. वि. गोखले, श्री. श्री. बा. काळे, श्री. ह. श्री. घारे, श्री. नी. ना. क्षीरसागर, इत्यादींचीं श्री. ओगले ह्यांच्या अभिनंदनपर भाषणें झालीं. चेंबरचे कार्याध्यक्ष, श्री. दामूआण्णा पोतदार ह्यांच्या समारोपानंतर श्री. ओगले ह्यांचें आभारप्रदर्शनात्मक भाषण झालें.

### तुटीच्या प्रांतांस सिंधी तांदळाचा पुरवठा

चालू मोसमांत सिंध प्रांतानें मुंबई प्रांतास २६,००० टन तांदूळ पुरवला व कोचीन आणि त्रावणकोरकडे १,००,००० टन व २१,००० टन मद्रासकडे गेला.

### औद्योगिक वांधे व कामाचें नुकसान

जून, १९४५ मध्यें मुंबई प्रांतांत एकूण ४० औद्योगिक वांध्यांत ४२,३५९ कामगारांचे ६७,१६७ कामाचे दिवस बुडाले.


## दि मुधोळ स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## नोटीस

या बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येतें कीं, बँकेची वार्षिक साधारण सभा दिवाण ऑफिसचे हॉलमध्यें रविवार तारीख ३० माहे सप्टेंबर १९४५ रोजीं दुपारीं ४ वाजतां (नवीन स्टँ. टा.) बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरितां भरणार आहे.

डायरेक्टर्सच्या निवडणुकीबाबत मतनोंदणीची वेळ दुपारीं ४ ते ६ अशी आहे; सदर वेळीं सर्व सभासदांनीं अगत्य येण्याचें करावें अशी विनंति आहे.

र. ना. तांबे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

मुधोळ, ता. १६-९-४५.

अर्थ
वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## हिंदी विद्यार्थ्यांचें इंग्लंडमधील शास्त्रीय शिक्षण

### इंग्रजांना एकाएकी कळकळ कां वाटूं लागली ?

हिंदुस्थानांतून ७०० विद्यार्थी ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्या देशांत उच्च शास्त्रीय शिक्षण घेण्यासाठी लवकरच येथून निघतील असें प्रसिद्ध झालें आहे. सुमारें १०,००० अर्जदारांतून त्यांची निवड करण्यांत आली आहे. ह्या दोनहि देशांतील विश्वविद्यालयें हिंदी विद्यार्थ्यांची सोय करण्यास अतिशय उत्सुक असून शक्य तेवढे हिंदी विद्यार्थी दाखल करून घेण्याची त्यांची तयारी आहे. कॅनडाच्या सरकारासहि हिंदी विद्यार्थ्यांबद्दल प्रेम वाटूं लागलें आहे आणि हिंदुस्थान सरकार हिंदी विद्यार्थी परदेशीं पाठविण्याचे बाबतींत सर्वतोपरी सहाय देत आहे. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज ( इं. ) नें हिंदी विश्वविद्यालयांतील शास्त्रीय विषयाच्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देण्यासाठी येत्या पांच-सात वर्षांकरितां ३,३६,००० रुपये देऊं केले आहेत. प्रत्येक शिष्यवृत्ति मासिक ४०० रुपयांची असून प्रयोगांस लागणाऱ्या विशेष सामुग्रीसाठी आणखी रकमहि देण्यांत येणार आहे.

हिंदी उद्योगधंद्यांच्या अपेक्षित वाढीसाठी तज्ज्ञ शास्त्रज्ञ तयार होतील तेवढे हवेच आहेत, ह्याबद्दल दुमत नाहीं. प्रत्यक्ष अमेरिकेंतहि अशा शास्त्रज्ञांचा तुटवडा पडण्याची भीति तेथें व्यक्त करण्यांत येत आहे. ब्रिटिश आणि अमेरिकन सरकार व विश्वविद्यालयें ह्यांस हिंदी विद्यार्थ्यांबद्दल एकदम एवढी कळकळ कां वाटूं लागली आहे, एवढाच येथें एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. हिंदी शास्त्रज्ञांस सहाय करण्यासाठी त्यांस उत्सुकता कां वाटत आहे, त्याच्या मुळाशी कांहीं मोठा स्वार्थ आहे का हें केवळ शुद्ध शिक्षणप्रेम आहे, इत्यादि गोष्टींचा खुलासा होणें जरूर आहे. शिक्षण घेण्यासाठी परदेशी जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांचे दृष्टीनें ही संधि उत्कृष्ट आहे, हें निर्विवाद आहे. त्याचप्रमाणें हिंदी औद्योगीकरणास त्याचा उपयोग होईल, हेंहि स्पष्ट आहे. परंतु अमेरिकन व ब्रिटिश लोकांचा त्यापासून फायदा कोणता हा प्रश्न शिल्लक राहतोच. व्यापारी राष्ट्रें मोबदल्यांत चांगला नफा उरल्याविना कोणताहि व्यवहार करणार नाहींत, हें उघड आहे.

ब्रिटिश विश्वविद्यालयांत शिकून स्वदेशीं परत येणाऱ्या विद्यार्थ्यांवर ब्रिटिश शिक्षणाची एक प्रकारची छाप बसते आणि तो विद्यार्थी स्वदेशांतील परिस्थितीचा विचार न करतां ब्रिटिश विचारसरणी आणि ब्रिटिश माल ह्यांचा डोळे मिटून स्वीकार करूं लागतो, असा अनुभव आहे. ग्रेट ब्रिटनच्या हिताच्या दृष्टीनें खुला व्यापार फायद्याचा असल्याकारणानें तेथील विश्वविद्यालयांनीं खुल्या व्यापाराची आवश्यकता मागें प्रतिपादन केली तर त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, परंतु परकीयांनीं शिकविलेलें सर्व कांहीं हिंदुस्थानच्याहि हिताचें आहे अशी विद्यार्थ्यांची खुळी कल्पना होऊन हिंदुस्थानांसहि खुला व्यापार हितावह आहे असें ते येथें शिकवूं लागले आणि ही कल्पना हिंदुस्थानास किती तरी काळ भोवली. शास्त्रीय क्षेत्रांत ब्रिटिश वर्चस्व असल्याचें हिंदी विद्यार्थ्यांस दाखवून, ब्रिटिश शास्त्रीय उपकरणें आणि यंत्रसामुग्री ह्यांच्या खपास हिंदुस्थानांत गिऱ्हाइक निर्माण करण्यासाठी हिंदी विद्यार्थ्यांची मनोभूमिका निर्माण करणें, हाच प्रस्तुत उपक्रमाचा उद्देश आहे, हें उघड आहे. ब्रिटिश मालाचा हिंदुस्थानांत उठाव करण्यासाठी विक्रेते निर्माण करणें आणि अशा रीतीनें ब्रिटिश मालाचा खप वाढविणें, हा ब्रिटिश उदारतेमागील हेतु लक्षांत घेऊनच आपण त्यांच्या सवलतींचा योग्य तो फायदा घेतला पाहिजे.

इकडे ब्रिटिशांची निर्गत वाढविण्याची खटपट चालू आहे, तर हिंदुस्थानांत आयात करणारांमध्यें परवानगीस प्राधान्य मिळण्यासाठी झुंबड उडून राहिली आहे. हिंदी कारखानदार व त्यांचे सल्लागार ह्यांनीं डोळ्यांत तेल घालून आयात व्हावयाच्या मालाचा दर्जा नीट पारखून पाहिला पाहिजे. एकदा माल आयात झाल्यानंतर त्याच प्रकारचा माल पुनः आणवावा लागणार नाहीं ह्याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. "इंजिनिअर लोकांनीं केवळ आयात करणारे दलाल न बनतां आपण आपल्या देशाच्या खऱ्या हिताचा विचार केला पाहिजे" अशी कळकळीची विनंति श्री. एस. बी. जोशी ह्यांनीं मॅकॅनिकल एंजिनिअर्स असोसिएशनचे गेल्या अधिवेशनांतील आपल्या भाषणांत केली, त्याचा पुनरुच्चार येथें करणें योग्य होईल. परदेशांत शिकून आलेले आपले विद्यार्थी श्री. जोशी ह्यांच्या सूचनांची अंमलबजावणी करूं शकतील का ते ब्रिटिश कारखानदाराचे केवळ हस्तक होऊन बसतील ?

ब्रिटिश विश्वविद्यालयांतील शिक्षणाचा असा परिणाम होण्याची भीति वाटते, ती साधार कशी आहे हें दाखविण्यासाठी थोडासा दाखला देणें आवश्यक आहे. जर्मनीच्या पाडावाचा फायदा घेऊन युरोपमधील बाजारपेठ ब्रिटिशांनीं काबीज करावी असें सांगतांना मि. ई. एफ. आर्मस्ट्रॉंग, एफ. आर. एस. ह्यांनीं आपल्या एका ताज्या लेखांत कांहीं सूचना केल्या आहेत. युरोपमधील प्रत्येक तरुण व वृद्ध शास्त्रज्ञास ग्रेट ब्रिटनमध्यें आणून त्यास ब्रिटिश विश्वविद्यालयांत कांहीं महिने तरी शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे, ब्रिटिश व अमेरिकन वृत्तपत्रांचा युरोपांत शक्य तेवढा प्रसार करून तेथील विश्वविद्यालयांस त्यांचा मोफत पुरवठा केला पाहिजे, जर्मन क्रमिक पुस्तकें काढून टाकून त्यांचे जागीं इंग्रजी पुस्तकें नेमलीं पाहिजेत व सगळे संदर्भ ग्रंथ इंग्रजीच फक्त ठेवले पाहिजेत, व्यापारी कॅटलॉगांचा सर्वत्र प्रसार केला पाहिजे, वगैरे आपल्या सूचनांचा उद्देश ब्रिटिश उपकरणें व यंत्रसामुग्री वगैरे मालाच्या उठावासाठी इष्ट अशी पार्श्वभूमि निर्माण करणें हा आहे, हें मि. आर्मस्ट्रॉंग ह्यांनीं स्पष्टच सांगून टाकलें आहे. हिंदी विद्यार्थ्यांस ब्रिटिश विश्वविद्यालयांत नेऊन त्यांस शास्त्रीय शिक्षण देण्यांत ब्रिटिशांचा दुसरा कोणता हेतु असणार ? ब्रिटिशांचा उद्देश पूर्णपणें ओळखून आपलें स्वदेशहित साधण्याचा स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न करण्याची पात्रता हिंदी तरुण विद्यार्थ्यांत एकाएकी कशी येणार ? व्यापारी व औद्योगिक धोरण ठरविण्याचा अधिकार असणारें सरकार हें लोकहितानुवर्ती निर्माण होणें हाच त्यावर खरा उपाय असून, केवळ शास्त्रीय शिक्षणाची परदेशीं सोय झाल्यानें हिंदुस्थानचें औद्योगिक क्षेत्रांत पुढें पाऊल पडणार नाहीं.

---

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94 A. "It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

कंपनीच्या प्रॉस्पेक्टसची इंग्रजी प्रत मुंबईच्या रजिस्ट्रार ऑफ कंपनीकडे नोंदविण्यांत आली आहे.

हें प्रॉस्पेक्टस नव्हे, केवळ प्रसिद्धि पत्रक आहे.

# बँक ऑफ पूना लि.

| अधिकृत भांडवल | तूर्त विक्रीकरता काढलेले |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |
| प्रत्येकी रु. १०० चे ५०,००० शेअर्स | प्रत्येकी रु. १०० चे २५,००० शेअर्स |

*या शेअर्सपैकीं डायरेक्टर्स व त्यांची मित्रमंडळी ह्यांनीं पांच लाख रुपयांचे ५००० शेअर्स घेणेचे ठरविले असून बाकी वीस लाख रुपयांचे २०,००० शेअर्स विक्रीकरतां काढले आहेत. प्रत्येक शेअरमागें अर्जासोबत रु. २५ व अर्ज मंजुरीनंतर रु. २५ भरणेचे आहेत. बाकीची रक्कम रु. ५० ची मागणी, डायरेक्टर्स जरूर वाटेल त्यावेळीं करतील.*

## —बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

…चेअरमन…

**१ शेट मुरलीधर चतुर्भुज लोया,**
फर्म मे. हिंदुमल बालमुकुंद, लँडलॉर्ड, बँकर, बालमुकुंद रोड, पुणें २

…व्हाईस चेअरमन…

**२ शेट दत्तात्रय रामचंद्र नाईक**, जे. पी., कॉंट्रॅक्टर आणि लँडलॉर्ड, २ ए कारमायकेल रोड, मुंबई

**३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर**, एम. ए., पीएच. डी., प्रोमायटर आणि संचालक 'सकाळ', १६ वेलेस्ली रोड, पुणें १

**४ मि. फ्रामजी पेस्तनजी पोचा**
फर्म मे. पेस्तनजी पी. पोचा अँड सन्स, बी–बियाण्याचे व्यापारी, नेपीयर रोड, पुणें १.

**५ शेट लक्ष्मीनारायण राठी,**
फर्म मे. रामनारायण राजमल, बँकर आणि मर्चंट, टिळक चौक, सोलापूर.

**६ शेट नारायणदास श्रीराम सोमाणी,**
फर्म मे. रामभगत पछानदास, बँकर आणि मर्चंट, ६१० रविवार पेठ, पुणें.

**बँकर्स :**
१ इंपीरियल बँक ऑफ इंडिया.
२ बँक ऑफ इंडिया लि.

**सॉलिसिटर्स :**
मे. तयबजी डायाभाई आणि कंपनी, लेंटीन चेंबर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

**ऑडिटर्स :**
मे. एस. बी. बिलिमोरिया अँड को., ११३ एस्प्लनेड रोड, मुंबई.

**रजिस्टर्ड ऑफिस :**
**५९५ बुधवार पेठ, पुणें.**

**ब्रोकर्स :**
१ चंपकलाल देविदास, आगाखान बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
२ मि. आर. जे. सावंत, ६२ स्टॉक एक्स्चेन्ज न्यू बिल्डिंग, अपोलो स्ट्रीट, मुंबई.

### उद्देश

मेमोरँडममध्यें नमूद केल्याप्रमाणें सर्व प्रकारचा बँकिंगचा धंदा करण्याच्या हेतूनें ही बँक स्थापन झाली असून, मुंबई येथें ता. १९ जुलै १९४५ रोजीं रजिस्टर झालेली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार ही बँक रिझर्व्ह बँकेला शेडयूल्ड बँक म्हणून संलग्न करण्यांत येणार असून शेडयूल्ड बँकांना मिळणाऱ्या सर्व सवलतीचा फायदा या बँकेला मिळेल.

### माहितीपत्रक

पुणें हें मध्यवर्ति ठिकाण आहे. पुण्याच्या समोंवार १३ जिल्हे असून, महाराष्ट्रांतील ह्या जिल्ह्यांत गेल्या कांहीं वर्षांत तंबाखू, गळिताचीं धान्यें, कपाशी, सूत व कापड गिरण्या वगैरे व्यापार उद्योगधंद्यांची बरीच वाढ झाली आहे. तसेंच साखर, कांच, मशिनटूल्स, कागद, लांकूड, प्लायवुड वगैरे कारखाने स्थापन होत आहेत व होतील. या व इतर वाढत्या धंद्यांना तसेंच प्रांतांतील जनतेला व संस्थांना बँकेची जरूरी आहे. अशा प्रकारच्या वाढता व्यापार व उद्योगधंद्यासाठीं संघटित बँकिंगला पुष्कळसा वाव आहे असें डायरेक्टरांचें मत आहे.

### डायरेक्टरांचे हितसंबंध व पात्रता

बँकेच्या स्थापनेंत कोणाहि डायरेक्टराचे त्यानें घेतलेल्या शेअर्सखेरीज निराळा हितसंबंध नाहीं. डायरेक्टर होणेसाठीं रु ५०,००० चे ५०० शेअर्स घेतले पाहिजेत. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे सभेस हजर राहणाऱ्या डायरेक्टरास जास्तींत जास्त फी रु. १०० आहे. पहिले वर्षीं बोर्डाचे सभेस हजर रहाणेबद्दल डायरेक्टर्सनीं फी न घेणेचें ठरविलें आहे.

**अर्जमंजुरीची मर्यादा :** ३२०० शेअर्सची मागणी आल्यानंतर डायरेक्टर्स अर्जमंजुरीस सुरवात करतील.

**प्राथमिक खर्च :** बँकेच्या स्थापनेसाठीं कोणासहि कांहीं रक्कम दिली नाहीं अगर देऊं केली नाहीं. बँकेच्या स्थापनेसाठीं प्राथमिक खर्च अंदाजी रु. १५००० हून जास्त होणार नाहीं.

**ब्रोकरेज :** शेअर्स विक्रीची दलाली दर शेअरमागें जास्तींत जास्त एक टक्क्यापर्यंत दिली जाईल.

**मताधिकार :** सभेस हजर असलेल्या प्रत्येक भागिदारास एक मत, परन्तु पोल मागितल्यास प्रत्येक शेअरमागे एक मत.

संपूर्ण प्रॉस्पेक्टस, बँकेचें मेमोरँडम, आर्टिकल्स ऑफ असोसिएशन आणि सरकारी मान्यता पत्र रजिस्टर्ड ऑफिसमध्यें ऑफिस वेळांत पाहणेस मिळेल.

**शेअर मागणी अर्ज : शेअर्सकरतां अर्ज संपूर्ण प्रॉस्पेक्टसच्या आधारावर करावेत.**

**छापील अर्ज नमुने मिळण्याचीं ठिकाणें—(१) वर नमूद केलेले अधिकृत ब्रोकर्स व बँकर्स, (२) मे. रामनारायण राजमल राठी, बँकर्स आणि मर्चंट, टिळक चौक, सोलापूर (३) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, ५९५ बुधवार पेठ, पुणें.**

## भांडवल उभारणीच्या यशस्वी अर्जांचा तपशील

कंपन्यांच्या भांडवल उभारणीवर १९४३ च्या मध्याचे सुमारास नियंत्रण घालण्यांत आलें तेव्हांपासून १९४५ च्या मार्च अखेर भांडवल उभारणीसाठी हिंदुस्थान सरकारकडे एकूण ४,४१४ अर्ज दाखल झाले. त्यांपैकी १२०,८०,००,००० रुपयांच्या भांडवल उभारणीचे ३,३८१ अर्ज मंजूर करण्यांत आले. ह्या ३,३८१ यशस्वी अर्जांपैकी २,९१९ अर्ज औद्योगिक कंपन्यांच्या भांडवल उभारणीचें होते आणि बाकीचे शेती, बँका, व्यापार, वहातुक वगैरे बाबत होते. औद्योगिक व इतर अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांची निकडीचे व बिगर निकडीचे असें पुनः वर्गीकरण करण्यांत आलें. युद्धकाळांतहि ज्या भांडवल उभारणीचा उपयोग होऊं शकेल, ती निकडीची व ज्यांसाठी लागणारी यंत्रसामुग्री उपलब्ध होण्यास मामुली वहातुक सुरू होण्याची वाट पहावी लागेल ती बिगर निकडीची असें स्थूल मानानें म्हणतां येईल. नव्या कंपन्यांची पहिलीचं भांडवल उभारणी असूं शकते किंवा जुन्या कंपन्यांची भांडवल वाढहि असणें शक्य होतें. निकडीच्या औद्योगिक योजनांच्या भांडवल अर्जांपैकी ३६२ अर्ज नव्या कंपन्यांचे होते व ५०२ जुन्या कंपन्यांच्या भांडवल वाढीसाठी होते, आणि त्यांस अनुक्रमें १६,१०,००,००० रुपयांच्या व २०,५०,००,००० रुपयांच्या भांडवलाच्या उभारणीस परवानगी देण्यांत आली. कालांतरानें म्हणजे युद्धपरिस्थिति निवळल्यानंतर ज्या भांडवलाचा औद्योगिक उपयोग केला जाईल, अशांच्या उभारणीस परवानगी मागणारे ९६ अर्ज सरकारकडे आले, त्यांपैकी ४५,३०,००,००० रुपयांचे ९४ अर्ज मंजूर करण्यांत आले. बिगर-औद्योगिक कंपन्यांच्या अर्जांपैकी १८,७०,००,००० रुपयांचे तांतडीच्या उपयोगाच्या भांडवलाचे अर्ज मंजूर झाले व ४,२०,००,००० रुपयांचे अर्ज मंजूर झाले, त्यांच्या भांडवलाचा विनियोग युद्धपरिस्थिति निवळल्यावर करण्यांत यावयाचा होता.

## जर्मनीमधील शेतीचें अपुरें उत्पादन

जर्मनीमध्यें रोटीसाठी लागणाऱ्या धान्यांचा पुरवठा फारच कमी पडणार आहे. युद्धापूर्वी जर्मनी दरसाल १ कोटि, २६ लक्ष टन गहूं व राय उत्पादन करीत असे; युद्धकाळांत तें १ कोटि, १० टनांवर आलें. जर्मनीचा जो भाग ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच नियंत्रणाखाली आहे, त्यांतील धान्याचें नेहमींचें उत्पादन जर्मनींतील एकूण उत्पादनाच्या निम्याइतकेंहि कधींच नव्हतें. परंतु त्या भागांतील लोकसंख्या मात्र एकूण जर्मन लोकसंख्येच्या ६०% आहे. चालू वर्षाचें पीक युद्धकाळांतील पिकाइतकेंहि भरणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. लष्करी हालचालींमुळें लागवडीस व्यत्यय आला व शेतकाम करण्यास पुरेसे लोक उपलब्ध नाहींत, अशी दुहेरी अडचण आहे. जर्मनीनें बिगर-जर्मन ३० लक्ष लोकांना शेतांवर कामास लावलें होतें, त्यांची जागा घेण्याइतके जर्मन युद्धकैदी शेतीसाठी अद्याप मोकळे झालेले नाहींत. अशा रीतीनें जर्मन लोकांपुढें उपासमारीचा व ब्रिटिश आणि अमेरिकन लोकांपुढें अन्नपुरवठ्याच्या जबाबदारीचा बिकट प्रश्न येऊन ठेपला आहे.

## मालमत्तेचा नाश झाला तर कंपनीचें भांडवल कमी होतें काय?

टेरेन्स बायरन लि. ह्या कंपनीच्या मालकीचीं पांच थिएटरें होतीं, त्यांपैकी हल येथील ॲलेक्झँड्रिया हें थिएटर ७ मे, १९४१ रोजीं जर्मन बाँबवर्षावामुळें जमीनदोस्त होऊन पुढें निरुपयोगी झालें. त्या थिएटरास १२,२८० पौंड किंमत पडली होती व कंपनीच्या हिशेबाचे पुस्तकांत ती त्याप्रमाणें दाखविण्यांत आली होती. थिएटरच्या नाशामुळें तेवढ्या रकमेनें कंपनीच्या व्यवहारांत गुंतलेलें भांडवल कमी झालें किंवा नाहीं, हा प्रश्न जादा नफ्यावरील कराची आकारणी करतांना मूळ रकम कोणती धरावयाची, ती ठरविण्यासाठी उपस्थित झाला. ७ मे १९४१ नंतर कंपनीच्या व्यवहारांत गुंतलेल्या सरासरी भांडवलाची रकम कमी झाली, असें सरकारी कर खात्याचें म्हणणें पडलें कंपनीचा त्यास विरोध होता आणि " स्टँडर्ड " नफ्याची रकम कमी करूं देण्यास ती तयार नव्हती. हाउस ऑफ लॉर्ड्सपर्यंत ह्या दाव्याचें प्रकरण गेलें. त्यांत कंपनी यशस्वी झाली. युद्धकाळांत ग्रेट ब्रिटनमध्यें कितीतरी मालमत्तेचा नाश झालेला आहे, त्यांना कोर्टाचा वरील निवाडा लागू पडणार आहे. कंपनीचें थिएटर नाश पावल्यामुळें त्याच्या किंमतीइतक्या भांडवलास कंपनी मुकली असें मानलें, तरी दुसऱ्या एका भांडवलाच्या बाबीनें ( थिएटरच्या युद्धविषयक नुकसानीच्या विम्याचा क्लेम ) त्याची जागा घेतलेली असल्याकारणानें भांडवल कमी झालें असें म्हणतां येणार नाहीं, असा युक्तिवाद कंपनीस करतां आला असता, परंतु त्याची आवश्यकताच निर्माण झाली नाहीं. मूळ दाव्याचें कोर्ट, अपील कोर्ट व हाउस ऑफ लॉर्ड्स ह्या सर्वांनीं कंपनीच्या बाजूनेंच निवाडा केला. सरकारी कर खात्यानें मात्र चिकाटी चांगलीच दाखविली.

### कालेज-सेल्स असोसिएशनचें लिमिटेड कं. नींत रूपांतर

कालेज सेल्स असोसिएशनची स्थापना १९३५ सालीं तीन-चार स्वतंत्र विक्रेत्यांनीं संघटनात्मक व्यवहार करण्याच्या उद्देशानें केली. मूळ कल्पनेपेक्षा हा उद्देश कितीतरी पटीनें सफळ झाला आणि असोसिएशनचें कार्यक्षेत्र दरसाल वाढत गेलें. हिंदी मालाचा प्रसार करणें हें असोसिएशनचें प्रमुख ध्येय आहे आणि त्याच्या सिद्धीसाठी जनतेचें उत्कृष्ट सहकार्य तिला लाभलें. प्रांतांच्या प्रमुख शहरीं कचेऱ्या स्थापून, सध्याच्या कार्याचा विस्तार करण्यासाठी असोसिएशनचें लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें आहे. कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीमध्यें कर्तबगार व अनुभवी अशी राष्ट्रीय वृत्तीची मंडळी आहेत. कंपनीनें विक्रीस काढलेल्या ३,००,००० रुपयांच्या भांडवलापैकी आतां फक्त १,२०,००० रुपयांचें भांडवल विक्रीसाठी शिल्लक आहे आणि तें सर्व ५% क्यु. प्रेफरन्स भागांचे स्वरूपांत आहे. ठराविक चांगलें डिव्हिडंड बिनधोक मिळवूं इच्छिणारांस हे भाग अत्यंत सोईस्कर आहेत. सरकारी खातीं, हिंदी संस्थानें, लोकलबोर्डें, बँका, मोठ्या व्यापारी फर्म्स, घाऊक व्यापारी, इत्यादींशीच असोसिएशनचा व्यवहार आहे. कंपनीच्या भांडवलविक्रीस मागणी चांगली आहे, असें समजतें.

### बँक ऑफ महाराष्ट्र लि.चे नवे शेअर्स

महाराष्ट्र बँकेनें आपलें वसूल भांडवल १२,५०,००० रुपये करण्यासाठी प्रत्येकीं ५ रुपये वाढीनें ५ लक्ष रुपयांचे १० हजार नवे भाग विक्रीस काढले होते. १५ सप्टेंबरअखेर १० हजारांपेक्षां जास्त भागांस मागणी आली आहे, असें समजतें.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५-८-४५ ते २२-९-४५

व्याज-वजा (xd)
कोहिनूर रु. ९ सं. दि. १९-९-४५
डाइंग रु. २५ दि. २७-९-४५

टाटा स्टील रु. १२९-८-९ } १-१०-४५
रु. २३-०-० }

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार मंगळवार दि. १०, ११।९।४५ | बुधवार १२।९।४५ | गुरुवार १३।९।४५ | शुक्रवार १४।९।४५ | सोमवार १७।९।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | २३००-८ | २२८६-४ | २२६८-१२ | २२८५—० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ४२८-८ | ४२८-८ | ४२७—८ | ४३०—० |
| २२०१; १६९५ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | १९६८-१२ | १९६२-८ | १९३७—८ | १९२५—० |
| ७६५; ५३३ | ९—-० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ५१९-० | ५९६-८ | ५९५—० | ५९६—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ५४९-८ | ५४७-८ | ५४५—० | ५४४—८ |
| ४९८; ३६१ | ६-०-० † | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | ३७८-८ | ३७५-० | ३७१—० | ३७४—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | | २८२-० | २८०-८ | २८०—० | २८०—० |
| ३९४; २८२ | ९-०-० S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | २९५-० | २९२-० | २९१—० | ३९०—८ |
| ३०५; २१८ | १२-०-० S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | बाजार बंद | २८८-० | २८५-० | २८३—० | २८५—० |
| २-१० ६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ३-१५-९ | ३-१५-० | ३-१४-९ | ३-१५-० |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | १३-१०-६ | १३-९—६ | १३—९-० | १३-११-० |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | | २-११-० | २-११-६ | २-११-६ | २-११-३ |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ६८१-४ | ६७१—४ | ६६१—४ | ६६६—४ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २१६-४ | २१७—४ | २१६—४ | २१६—४ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २१५-० | २१६—० | २१७—८ | २२०—० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ५७१-४ | ५६६—४ | ५६३-१२ | ५६३-१२ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | ३६-१४ | ३७—० | ३६-१३ | ३७—० |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०१-१२ | १०१-१३ | १०१-१४ | १०१-११-६ |

सोमवार दि. १७-९-४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—६ |
| १९५१-५४ | १०१—६ |
| १९५७ | १००—७ |
| १९६३-६५ | ९९—५ |
| १९६६-६८ | ९८-१० |

**बँका**

| | |
|---|---|
| बडोदा | १४३—८ |
| सेंट्रल | ८२-१२ |
| इंडिया | १८९—० |
| इंपी० | २२०५—० |
| | ५७१—४ |
| रिझर्व्ह | १३९—० |
| युनियन | ९—० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८२२-८ |
| बॉम्बे ट्रॅम | १४८-४ |
| टाटा हायड्रो | २०२-८ |
| टाटा पॉवर | १८६०-० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४१०—० |
| बॉंबे स्टीम | ६००—० |
| न्यू इंडिया | ८३—० |
| शिवराजपुर | ५०—८ |
| टाटा केमिकल | १९-१० |
| टाटा ऑईल | ६९—९ |

## शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितीचे तुलनात्मक आकडे

( आकडे हजार रुपयांचे )

| | ७-९-१९४६ | ३१-८-१९४५ | ८-९-१९४४ | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| १. हिंदुस्थानांतील मागणीबरहुकूम घावयाचें देणें | ६३९,६६,४८ | ६४३,५५,७० | ५८६,७०,३६ | १३४,३६,४९ |
| २. हिंदुस्थानांतील मुदती देणें | २५२,५१,६१ | २५१,७९,७० | १९१,२८,१३ | १०२,२४,३४ |
| ३. हिंदुस्थानांतील रोख शिल्लक | ३२,९९,६४ | ३४,४६,०९ | २५,११,५४ | ६,६९,९२ |
| ४. रिझर्व्ह बँकेजवळ ठेव | ११४,४२,२८ | २०३,८९,९४ | १०४,२४,१६ | २५,१७,१९ |
| ५. हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | २५६,१२,६३ | २६३,६८,०९ | २०३,४०,२१ | १०१,५२,१६ |
| ६. हिंदुस्थानांत डिस्कौंट केलेल्या हुंड्या | १३,४८,८५ | १३,५६,५० | ९,७४,२० | ३,५७,२९ |

# स्फुट विचार

## टारिफ बोर्ड

स्वदेशी धंद्यांस संरक्षण देण्याचें धोरण वीस वर्षांमागें हिंदुस्थान सरकारनें मान्य केलें आणि जकाती वगैरेचें सहाय मागणाऱ्या धंदेवाल्यांच्या अपेक्षांची छाननी करून जरूर त्या शिफारसी करण्यासाठी एक टारिफ बोर्ड नेमलें. ह्या बोर्डाच्या सूचना लक्षांत घेऊन मध्यवर्ती सरकार आणि कायदेमंडळ ह्यांनीं पोलाद, कागद, काडीच्या पेट्या, साखर इत्यादि धंद्यांस आयात जकाती वाढवून परदेशी मालाच्या स्पर्धेपासून संरक्षण दिलें. पुढें कायमचें टारिफ बोर्ड बंद करण्यांत येऊन विशिष्ट धंद्याच्या चौकशीसाठी तात्पुरत्या बोर्डाची नेमणूक करण्यांत येऊं लागली. त्यानंतर अलीकडे कित्येक वर्षें अशी चौकशीच झालेली नाहीं. परंतु युद्धकाळांत विशिष्ट परिस्थितींत निघालेले धंदे पुढें टिकून रहावे आणि युद्धोत्तर काळांत नवीन निघावयाच्या धंद्यांस उत्तेजन मिळावें म्हणून त्यांस सरकारी सहायाची आवश्यकता भासणें अपरिहार्य असल्यानें कायमच्या टारिफ बोर्डाची स्थापना करावी अशी मागणी धंदेवाल्यांनीं केली. तिला अनुसरून पाच सभासदांचें एक बोर्ड नेमण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. युद्धकाळांत काढण्यांत आलेल्या कोणत्या धंद्यांस सरकारचें सहाय्य आवश्यक आहे ह्याची चौकशी त्यानें प्रथम करावयाची आहे.

## धान्याचें रॅशनिंग आणखी एक वर्षावर चालू रहाणार

अन्न-वस्त्राची टंचाई व महर्गता ह्यांस कंटाळलेल्या हिंदी जनतेस आतां युद्ध संपून गेल्यामुळें त्या बाबतींतली नियंत्रणें बंद किंवा शिथिल होऊन पूर्वीप्रमाणें खुले बाजार व स्वस्ताई ह्यांचा सोईस्कर अनुभव घेण्यास सांपडेल अशी आशा वाटूं लागली असल्यास ती निराधार आहे ह्याची सार्वत्रिक जाणीव करून दिली जाणें आवश्यक आहे. धान्याचे संबंधांत हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्री सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं दिल्ली येथें अन्न-सल्लागार समितीच्या सभेंत स्पष्ट सांगून टाकलें आहे कीं आणखी एक वर्षपर्यंत सध्याची नियंत्रणात्मक व्यवस्था चालू राहील आणि त्याच्यापुढें काय होईल ह्याचा निर्णय त्या मुदतीनंतर करावा लागेल. यंदा बंगाल व बहार ह्या प्रांतांतील कांहीं भागांत पाऊस अपुरा झाल्यानें तांदुळाचें पीक चांगलें आलेलें नाहीं आणि ब्रह्मदेशचा तांदूळ ह्या देशांत येईल किंवा नाहीं हें अनिश्चित आहे. ब्रह्मदेशांतील तांदुळाची आयात होऊन हिंदुस्थानांतील धान्यपुरवठ्यांत भर पडावी असा आटोकाट प्रयत्न आपण करूं असें आश्वासन सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं दिलें आहे. पण ही हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांतली गोष्ट नसल्यानें तिच्यावर विसंबून चालणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें आहे. धान्य जमवणें, त्याच्या किंमतीचें नियंत्रण करणें आणि त्याच्या योग्य वांटणीविषयीं काळजी घेणें हा कार्यक्रम सरकारास चालू ठेवणें प्राप्त आहे. युद्ध संपलें तरी मामुली आर्थिक घडी देशांत बसण्यास अजून कांहीं काळ लोटावा लागेल आणि या दरम्यानचे अवधींत धान्याचे अनियंत्रित व्यवहार होऊं देणें श्रेयस्कर होणार नाहीं. नियंत्रणहि बेताबातानें शिथिल करावें लागेल. तसें न झाल्यास सामान्य जनतेवर उपासमारीची आपत्ति येण्याची भीति आहे. नियंत्रण पत्करलें, पण काळा बाजार आणि दुष्काळ नको असें लोकांस वांटल्यावांचून रहाणार नाहीं. तथापि, वर्षाभरांत अनियंत्रित व्यवहार पुनः चालू होऊं देणें अपरिहार्य होणार असल्यानें हें धोरण केव्हां व कसें अंमलांत आणलें जावें त्याचाहि विचार होणें आवश्यक असल्यानें त्यासंबंधांत सरकारला सल्ला देण्यासाठी एक समिती नेमण्यांत यावयाची आहे असें सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं सांगितलें आहे तें इष्टच आहे.

## माहितीचा प्रसार आणि प्रचार

युद्ध चालू असतांना त्याचेविषयींची योग्य माहिती जनतेस पुरवून तत्संबंधीं प्रचार चालू ठेवणें हें हिंदुस्थान सरकारच्या प्रसिद्धीखात्याचें महत्त्वाचें कार्य होतें. रेडिओ आणि इतर साधनें यांच्याद्वारें हें काम करण्यांत आलें आहे. आतां ह्या परिस्थितींत बदल झाला असल्यानें ह्यापुढें सरकारचें धोरण काय राहील ह्याचा खुलासा मध्यवर्ती प्रसिद्धीखात्याचे मंत्री, सर सुलतान अहमद, ह्यांनीं नुकताच केला आहे. युद्धोत्तर काळांत हातीं घेण्यांत यावयाच्या अनेक योजनांचा बोलबाला झाला आहे. नवीन धंद्यांची स्थापना, शेतीची सुधारणा, ग्रामोद्धार, शिक्षण-प्रसार इत्यादि बाबतींत प्रगति करण्याचें उदक मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांनीं सोडलें आहे. त्या विषयींची अधिकृत माहिती देण्याचें काम आपलें खातें करील असें सर सुलतान अहमद म्हणतात. वरील सुधारणांशीं हिंदुस्थान सरकारचा संबंध प्रत्यक्ष रीतीनें येणार आहे; म्हणून त्यांची माहिती जनतेस पुरवण्याची जबाबदारी त्याचेवर आहे. तथापि, प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत युद्धोत्तर पुनर्घटनेचा कार्यक्रम मुख्यत्वेंकरून येणार असल्यानें त्याचे बाबतींतली प्रसिद्धि त्यांनींच केली पाहिजे आणि मध्यवर्ती सरकारच्या कार्याशीं मिळतें घेतलें पाहिजे ह्या गोष्टीकडे सर सुलतान ह्यांनीं लक्ष वेधलें आहे. हिंदुस्थानांतील बहुसंख्य जनता निरक्षर आणि ग्रामीण असल्याकारणानें वृत्तपत्रें आणि रेडिओ हीं त्यांस उपयोगी पडण्यासारखीं नाहींत. ह्या स्थितींत प्रसिद्धि आणि प्रचार ह्याविषयींच्या खास योजना सरकारास योजाव्या लागतील. राजकीय पुनर्घटनेवर ह्या प्रश्नाचा निर्णय पुष्कळ अंशीं अवलंबून रहाणार आहे आणि त्याचा निकाल लवकर आणि समाधानकारक लावला जाणें अगत्याचें आहे.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड

वरील बँक ता. १९ जुलै १९४५ रोजीं नोंदण्यांत आली. तिचें अधिकृत भांडवल ५० लक्ष रुपये व विक्रीस काढलेलें २५ लक्ष रुपये आहे. प्रत्येक भाग १०० रुपयांचा असून, त्यापैकीं ५० रु. भरावयाचे आहेत. बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर सधन व अनुभवी अशी व्यापारी मंडळी आहेत आणि त्यांतील प्रत्येकानें किमान ५० हजारांचे भाग घेतलेले आहेत. मोठ्या वसूल भांडवलाची ही बँक तात्काळ शेड्यूल्ड बँक होईल आणि व्यापारी वर्गांत डायरेक्टर मंडळींचें वजन असल्याकारणानें तिला धंदाहि चांगला मिळेल अशी अपेक्षा आहे. मजबूत भांडवलाच्या व व्यवस्थित रीतीनें चालविलेल्या बँकांची प्रगति सत्वर होते, असा अनुभव आहे. ह्या दृष्टीनें आम्ही बँक ऑफ पूना लि. चें महाराष्ट्रांतील बँकिंग क्षेत्रांत यश चिंतितों.

## श्रीगणेश मो. वाचनालयाचा रौप्यमहोत्सव

श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय, पुणें ह्या संस्थेचा रौप्यमहोत्सव समारंभ भोरचे राजेसाहेब ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सोमवार, ता. २४ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां श्री. सरदार पुरंदरे ह्यांचे वाड्यांत होणार आहे. त्याचप्रसंगीं श्री. सरदार मुजुमदार ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण होणार आहे.

### मिरज स्टेट बँक लि., मिरज

( वार्षिक सभा : २३-९-४५ )

वरील बँकेचें वसूल भांडवल ९० हजार रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड २ लक्ष, १० हजार रुपयांचे आहेत. मुदतीच्या व इतर ठेवींचा आकडा ६० लक्षांवर गेला आहे. १९४२-४३ मध्यें ३३½ लक्ष रुपयांच्या व १९४३-४४ मध्यें ४६½ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या. रोख शिल्लक २०½ लक्ष रुपये, इन्व्हेस्टमेंटस १९½ लक्ष रुपये, कर्जें २३ लक्ष रुपये असे येण्याचे बाजूस आकडे आहेत. ३० जून १९४५ अखेर बँकेस निवळ नफा १,०७,२०० रुपये म्हणजे वसूल भांडवलाच्या ५¼ पट झाला. भागीदारांना १४% डिव्हिडंड व ६% बोनस वाटण्यास ४,००० रुपये लागतील. इनकम टॅक्सची व सुपरटॅक्सची तरतूद करून बाकी नफा रिझर्व्ह व इतर फंडांत टाकून बँकेचें स्थैर्य आणखी वाढविण्याचें चालकांचें धोरण योग्यच आहे. श्री. वि. पां. बेडेकर, बी. एससी., बी. ई. हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून श्री. कृ. घों. शिराळकर, बी. ए. हे मॅनेजर आहेत.

---

### टाटा कंपनीच्या व्यवहाराविषयीं आकडे

टाटा आ. अँड स्टील कं. लि. च्या कारभारासंबंधीं कांहीं उद्बोधक आकडे खाली दिले आहेत:—

३१ मार्च अखेर ( आकडे लक्ष रुपयांचे )

| | १९४५ | १९४४ | १९४३ | १९४२ | १९४१ |
|---|---|---|---|---|---|
| मालविक्री | २०,९५ | २,०४० | १६,०२ | १८,१६ | १७,४३ |
| पगार व मजुरी | ३,६० | ३,६२ | ३,०८ | २,४९ | २,३१ |
| एकूण खर्च | १२,८० | १३,२० | १०,७१ | ९,२७ | ९,५८ |
| नफा | ८,४५ | ८,०५ | ६,८९ | ८,९५ | ७,४९ |
| नफ्याची तरतूद | ३,९९ | ३,९९ | २,९२ | ३,८२ | .२४५ |
| निवळ नफा | ३,२२ | २,८६ | २,७२ | २,६८ | ३,५४ |
| डिव्हिडंड वाटलें | २,०० | २,०० | २,०० | २,२६ | २,४२ |

---

### "केवळ कल्पनेचें किंवा पद्धतीचें पेटंट घेतां येत नाहीं"

श्री. नरहर विश्वनाथ मुळे ह्यांनीं लहान मुलांना अक्षरें शिकविण्याची एक कल्पना शोधून काढली व तिचें पेटंट घेतलें, परंतु उत्पादनाच्या पद्धतीचें तें पेटंट नसून फक्त कल्पनेचें पेटंट होतें. श्री.भागवत ह्यांनीं त्या पेटंटच्या विरुद्ध कल्पनेचा उपयोग करूं नये, असें इंजंक्शन श्री. मुळे ह्यांनीं मुंबई हायकोर्टात मागितलें, परंतु तें नाकारण्यांत आलें. "एखादी कल्पना, पद्धति अथवा योजना ह्यांचें पेटंट होऊं शकत नाहीं. त्यांचें शब्दांत रूपांतर केलें पाहिजे. कल्पना, पद्धति किंवा योजना ह्यासंबंधीं लेख अथवा पुस्तक लिहून त्याचा कॉपिराइट मिळवितां येईल, परंतु त्याचे अभावीं केवळ कल्पना, पद्धति अथवा योजना ह्यांस इंडियन पेटंट्स अँड डिझाइन्स ॲक्ट संरक्षण देऊं शकत नाहीं" असें हायकोर्टानें आपलें मत व्यक्त केलें.

---

### गव्हाच्या १९४४-४५ मधील पिकाचा अंदाज

हिंदुस्थानांतील गव्हाची एकूण लागवड १९४४-४५ मध्यें ३ कोटि, ४१ लक्ष एकर, म्हणजे त्यापूर्वीच्या वर्षींपेक्षा ५% अधिक भरेल, अशी अपेक्षा आहे. प्रांतवार वाटणी पहातां, पंजाबांत ३३%, संयुक्तप्रांतांत २३%, मध्य-प्रांत-वऱ्हाडांत ९%, मुंबईंत ६%, सिंधमध्यें ४%- अशी लागवड आहे.

### मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३४ वी सर्वसाधारण सभा शनिवार ता. २९ सप्टेंबर १९४५ रोजीं दुपारीं ३ वाजतां ( न. स्टँ. टा. ) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेकहाऊस लेन, कोट मुंबई ); खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

( १ ) ३० जून १९४५ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.

( २ ) नफ्याची वांटणी व डिव्हिडंड ठरविणें.

( ३ ) डिरेक्टरांची निवडणूक करणें.

( ४ ) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,

मुंबई, ता. २५-८-४५ — वैकुंठ ल. मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर.

भागांच्या तबदिलीचें काम ( ट्रान्स्फर बुकें ) १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.

---

GUEST HOUSE POONA

संस्थेच्या दिवसेंदिवस वाढत जाण्याच्या प्रगतीवरील कांहीं महत्त्वाचे टप्पे

★ १९३६ संस्थापना

★ १९३७ उतारूंची आवकसंख्या दहा हजारांवर

★ १९३८ लॉर्ड रे औद्योगिक प्रदर्शनांत गौरवचिन्ह अर्पण करून संस्थापक कै. नानासाहेबांचा व्यक्तिशः सन्मान करण्यांत आला.

★ १९३९ शारदोपासक संमेलनप्रसंगीं अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांचेकडून प्रशंसेनें उल्लेख केला.
काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीस आलेल्या श्रेष्ठींकडून कै. नानासाहेबांचा गौरव.

★ १९४० कॉमनवेल्थ विमा कं. लि. च्या पुणें येथील नव्या प्रासादतुल्य इमारतीच्या उद्घाटनप्रसंगीं १२,००० वर लोकांना संस्थेनें भव्य उपाहार दिला.

★ १९४२ अपुऱ्या जागेनिमित्त संस्थेनें जवळच्या इमारतींत व्याप वाढविला.

★ १९४३ आजवर पन्नास हजारांवर लोकांनीं आश्रय दिला.

अन्ननियंत्रण व जिकिरीचा प्रवास या अडीअडचणींत सुद्धां संस्थेशीं सहमत केल्याबद्दल संस्था जनतेची ऋणी आहे.

पूना गेस्ट हाउसचें

दहावे वर्षांत पदार्पण

## समुद्राच्या भरतीचा विद्युत्पादनाकडे उपयोग

### व्यावहारिक योजना

नद्यांच्या उताराच्या किंवा धबधब्याच्या सहाय्यानें वीज निर्माण करण्याची कल्पना आतां नवीन नाहीं. जेथें नदी वर्षभर वाहत नाहीं, अशा ठिकाणीं धरणानें ती आडवून त्यांतील पाण्याच्या सहाय्यानेंहि वीज तयार केली जाते. हिंदुस्थानांतहि ठिकठिकाणीं वीजगृहें स्थापन झालेलीं आहेत. खंडाळा घाटांतील खोपोली वीजगृह सुप्रसिद्ध आहे. इंग्लंडमध्यें मोठ्या पाण्याच्या नद्या नाहींत, त्या कारणानें "हैड्रो-इलेक्ट्रिक" गृहें तेथें नाहींत. स्कॉटलंड-मध्यें तीं आहेत. ग्रेटब्रिटनमधील एकमेव मोठी नदी शॅनॉन हिचेवर वीजगृह बांधण्यांत आलेलें आहे. इंग्लंडमध्यें ह्या दृष्टीनें कांहीं करतां येण्याजोगें नाहीं, म्हणून समुद्राच्या भरती-ओहोटीपासून वीज निर्माण कशी करतां येईल, ह्याचा अभ्यास करण्यासाठी लॉर्ड ब्रॅबॅझॉन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती.

समुद्राच्या भरतीचा उपयोग करावयाचा म्हणजे लाटांची उंची जेवढी ज्यास्त तेवढी हवी. इंग्लिश स्टोन्स येथील अरुंद सामुद्रधुनींतून २४ अब्ज गॅलन पाणी दिवसांतून दोनदां आंत-बाहेर वहातें. ह्या एकाच गोष्टीवरून किती शक्ति वाया जात आहे ह्याची कल्पना येईल. ह्या शक्तीचा उपयोग करण्याच्या शक्यतेचा विचार एका कमिटीनें १० वर्षांपूर्वी केला व व्यावहारिक दृष्ट्या तें शक्य असल्याचें आपलें मत नमूद केलें. प्रत्येकीं १७,००० अश्वशक्तीचीं ७२ टर्बाइन्स बसवावींत असें कमिटीनें सुचविलें. हीं टर्बाइन्स सालिना २२ कोटि युनिट्स वीज पुरविण्यास समर्थ झालीं असतीं. व्याज भागवून सर्व खर्च लक्षांत घेऊन आणि भांडवली खर्चावर घसारा काढून अडीच पयांत एक युनिट इतक्या स्वस्त दरांत वीज पडली असती.

समुद्राची भरती-ओहोटी मनुष्याच्या नियंत्रणाखालीं नसल्याकारणानें, आपल्या जरूरीप्रमाणें वीज मिळेलच असें नाहीं, हीं ह्या संबंधांतील महत्त्वाची अडचण आहे. लाटांपासून वीज उपलब्ध असेल, तेव्हां तिचा उपयोग पाणी खेंचून वर घेऊन तें साठवण्याकडे करावा व त्या पाण्याच्या जोरावर जरूरी-प्रमाणें वीज तयार करावी, अशी त्यावर तोड काढण्यांत आली. परंतु त्यामुळें विजेची उत्पादन किंमत तीन पयांपर्यंत गेली असती. कोळशावर तयार होणाऱ्या विजेस एका युनिटास चार पया खर्च येत होता, तेव्हां तिचेपेक्षां ही वीज स्वस्त पडली असती. तथापि, त्याच वेळेस कोळशाच्या खाणींच्या धंद्यास मंदी होती, आणि वीज निर्मितीचा हा उपक्रम हातीं घेतला असता, तर कोळशाचा उठाव आणखी कमी झाला असता, ह्या कारणानें ह्या योजनेचें योग्य तें स्वागत झालें नाहीं.

आतां ह्या प्रश्नाकडे सरकार पुनः लक्ष देत आहे. कोळशाची किंमत भरमसाट वाढली असल्याकारणानें, कोळशाची बचत झाली, तर ती हवीच आहे. आतां व्याजाचा दर पुष्कळच उतरला असल्याकारणानें, भांडवल स्वस्त दरानें मिळूं शकेल, व खर्चांत बचत होईल हाहि एक मोठा फायदा आहे. त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ग्रेट ब्रिटनमधील सर्व वीजगृहें एकमेकांशीं जोडलेलीं असल्याकारणानें, समुद्राच्या पाण्यापासून मिळणारी वीज त्यांत मिळवून ती सर्व ठिकाणीं खेळविण्याची सोय झाली आहे. पाणी पंपानें खेचून त्याचा मागून पुनः उपयोग करण्याची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. वेगवेगळ्या समुद्र किनाऱ्या-जवळील भरती-ओहोटीची वेळ वेगवेगळी असते, ह्या गोष्टीचा फायदा घेऊन चोवीस तास अखंड वीज उत्पादन करून पुरविणेंहि शक्य होणार आहे.

खरूज, गजकर्ण, भाजणें या सर्वांवर
सर्वमान्य उपाय योजना
खुजलीन
★ मलम ★ लोशन ★ साबण ★ पावडर ★



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे
( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत—

नोगीचे
डोंगर
छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

दि व्हलकन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपिन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

एकूण खेळतें भांडवल रु. ३२ लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| शेट वाडीलाल साकळचंद | |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. SC. | श्री. के. पी. जोशी |

शेअर विक्री चालू आहे.

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नाशिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. वा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

प्रगतिपथावरील नवा

मैलाचा — दगड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे — सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

अत्यंत गुणकारी—

कामगार ब्राह्मी तेल
व
माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.

म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

हे पत्र पुणें, पेठ मांगुडा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांगुडा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २६ सप्टेंबर, १९४५ अंक ३८

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

## डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री—श्री—श्री—श्री—श्री

## विविध माहिती

**निवडणूकीच्या मोहिमेसाठी जादा कागद**

मध्यवर्ती व प्रांतिक विधिमंडळांच्या निवडणुकी लढविण्या-साठी उमेदवारांस लागणारीं पत्रकें, जाहिराती, वगैरेसाठी जादा कागद देण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

**हिंदी रेल्वेजचें उत्पन्न**

१ एप्रिल ते १० ऑगस्ट १९४५ अखेर हिंदी रेल्वेजना ८२,५२,००,००० रुपये एकूण मिळाले. ही रकम १९४४ च्या तत्सम मुदतींतील उत्पन्नापेक्षा ८½ कोटि रुपयांनीं व त्यापूर्वीच्या वर्षींतील तत्सम उत्पन्नापेक्षा १८½ कोटींनीं जास्त आहे.

**पूना गेस्ट हाऊसचा दहावा वाढदिवस**

कै. नानासाहेब सरपोतदार यांनीं स्थापन केलेल्या गेस्ट हाऊसचा वाढदिवस ता. २० सप्टेंबर रोजीं थाटानें साजरा कर-ण्यांत आला. सदर प्रसंगीं श्रीसत्यनारायणाची पूजा झाली. तीर्थप्रसादास गांवांतील प्रतिष्ठित व कै. नानासाहेब यांची चहाती मंडळी हजर होती. श्री. बंडोपंत सरपोतदार यांनीं पाहुण्यांची उत्तम व्यवस्था ठेविली होती.

**प्राइझ बॉंड्सची विक्री**

दहा रुपयेवाल्या प्राइझ बॉंड्सचा सांठा पुरेसा नसल्याकारणानें त्यांची विक्री २३ सप्टेंबरनंतर फक्त रिझर्व्ह बॅंकेच्या कचेऱ्यांतून होत आहे. शंभर रुपयेवाल्या बॉंड्सची विक्री रिझर्व्ह बॅंकेच्या व इंपीरिअल बॅंकेच्या सर्व कचेऱ्यांत व शाखांत पूर्ववत् चालू आहे.

**स्टुडबेकर गाड्या हिंदुस्थानांत जुळवल्या जाणार**

स्टुडबेकर मोटर्स लि.नें श्री. बिर्ला ह्यांनीं उभारलेल्या हिंदु-स्थान मोटर्स लि.शीं करार करून तिला स्टुडबेकर गाड्यांची जुळणी करण्याचा अधिकार दिला आहे. स्टुडबेकर कंपनी सुटे भाग पाठवील तिची जुळणी हिंदुस्थानांत होईल.

**गणेश मोफत वाचनालय**

ह्या संस्थेचा रौप्यमहोत्सव गेल्या सोमवारीं श्री. राजेसाहेब भोर, ह्यांचे अध्यक्षतेखाली साजरा होऊन सरदार मुजुमदार ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण झालें. प्रो. काळे, प्रो. पोतदार, श्री. वाळवेकर, श्री. देव, श्री. काकासाहेब शिंगरे इत्यादि वक्त्यांचीं भाषणें झालीं. राजेसाहेबांनीं वाचनालय संस्थेस ५०० रुपये आणि सरदार मुजुमदार संगीत कोश तयार करीत आहेत, त्यास ५०० रुपये अशा देणग्या जाहीर केल्या. संस्थेचे चिटणीस श्री. हरी-भाऊ देशपांडे ह्यांचा त्यांच्या कामगिरीबद्दल गौरव करण्यांत आला. तसेंच श्री. नानासाहेब पोतदार (वाचनालयाचे एक उत्पादक) आणि प्रो. पिंपळखरे ह्यांचाहि सन्मान करण्यांत आला.

**चांगले रस्ते नव्हते, म्हणून युद्ध लांबलें**

"मलाया, ब्रह्मदेश आणि लिबिया येथील युद्धांत आपणांस फार नुकसान सोसावें लागलें, त्यास अनेक कारणें असतील. परंतु योग्य क्षणीं व योग्य स्थळीं आपलें मनुष्यबळ व शस्त्रास्त्रें एकवटण्याची सोइस्कर व्यवस्था नव्हती हें त्यांतील एक महत्त्वाचें कारण आहे. समुद्रमार्ग बंद होण्याची पूर्वतयारी म्हणून हिंदु-स्थान आणि ब्रह्मदेश हे रस्ते व लोहमार्ग ह्यांनीं अगोदरच जोडण्यांत आले असते तर चीन असहायपणें तुटक राहूं शकला नसता. दळणवळणाच्या उत्कृष्ट मार्गाचा अभाव हें युद्ध कित्येक महिने नव्हे, वर्षें लांबण्यास कारणभूत झालें आहे." :—मि. टी. आर. एस. कीनस्लें, ह्यांचें मुंबईंत भाषण.


# पूना गेस्ट हाऊस

: संस्थापक :

कै. नानासाहेब सरपोतदार

टेलिफोन नं. ७७९

GUEST HOUSE POONA

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

# ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

**BUG COILS (ABC)**

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.

**दि मागोरा केमिकल कं. लि., हिराबाग, पुणें २**

# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बॅंक लि.

(स्थापना १९१८) टे. नं. ३१६७५

हेड ऑफिस : सारस्वत बॅंक बिल्डिंग, गिरगांव, मुं. ४ — सब ऑफिस दादर



| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,५१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. १,५५,००० |
| ठेवी ... | ... | रु. ४९,९१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५,२०,००० |

सभासदांना जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवल-तीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट अगर कॅशक्रेडिट देण्यांत येतें.

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन.

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## शेतकरी कर्ज-निवारणाचा कायदा

### सहकारी संस्थांस सरकारचें सहाय

मुंबई प्रांतांत शेतकऱ्यांचीं कर्जें हलकीं करण्याच्या हेतूनें सरकारनें कायदा अंमलांत आणला आहे, त्याअन्वयें अनेक ठिकाणीं चौकशी बोर्डें स्थापन होऊन कामास प्रारंभ झाला आहे. कर्जनिवारणाच्या ह्या व्यवस्थेचा पूर्ण फायदा कर्जदार शेतकऱ्यांनीं घ्यावा म्हणून त्यांचेमध्यें सहकारी संस्था आणि सरकारी अधिकारी ह्यांनीं प्रचार चालवला आहे, त्यासंबंधांतले निरनिराळ्या जिल्ह्यांतून आमचेकडे आलेले वृत्तांत आम्हीं प्रसिद्ध केले आहेत. आपल्या कर्जाच्या रकमा मुदतबंदीनें व्हावयाच्या परत फेडीच्या शक्तीच्या मर्यादेंत आणून बसण्याची अत्यंत महत्त्वाची सवलत शेतकऱ्यांस मिळाली आहे ती स्वतःच्या पदरांत कशी पाडून घ्यावी याची माहिति कर्जदारांस होणें आणि त्यांचेकडून बोर्डांकडे वेळेवर रीतसर अर्ज जाणें आणि त्यांचे अनुषंगानें जरूर ती माहिती त्यांस पुरवली जाणें ह्या गोष्टी अगत्याच्या आहेत. शेतकरी कर्जनिवारण कायद्याचा सरकारचा हेतु सफल होण्यास ज्या बाबींची सिद्धता झाली पाहिजे त्यांपैकीं वरील विधीस अग्रस्थान दिलें जात आहे तें योग्यच आहे. कर्जदारांच्या सहज फेडीच्या आवाक्यांत त्यांच्या कर्जाच्या रकमा आणून त्याप्रमाणें कायदेशीर निवाडा देणें हें बोर्डांचें काम राहील आणि त्यांचा निःशय फायदा शेतकऱ्यांस मिळेल. पण एवढ्यानें काम भागत नाहीं. कर्ज हलकें झालें आणि त्याच्या हप्तेबंदीनें व्हावयाच्या फेडीची तजवीज केली गेली तरी चालू शेतीच्या खर्चासाठी शेतकऱ्यांस पैशाची आवश्यकता उरते ह्याणि ही त्यांची गरज भागवली जाण्याची व्यवस्था झाली तरच कर्जनिवारण कायद्याचा खरा उपयोग होणार आहे.

सहकारी पतपेढ्या आणि बँका ह्यांनीं निवाडा मिळवलेल्या कर्जदारांस शेतीस लागणारें चालू भांडवल पुरवण्याची जबाबदारी उचलणें उचित असून त्यांनीं हें कार्य हातीं घेण्याचें ठरवलें आहे हें योग्यच आहे. पिकें काढण्यासाठीं आवश्यक असलेला पैसा विशिष्ट प्रमाणांत हलक्या व्याजाच्या दरानें कर्जाऊ दिला जावा आणि त्याच्या सहाय्यानें केल्या जाणाऱ्या पिकाच्या विक्रीच्या पैश्यांतून दर हंगामांत कर्जफेड केली जावी अशी सरकारची योजना आहे. निवाडा मिळवलेल्या शेतकऱ्यांस सहकारी पतपेढ्यांचे नामधारी सभासद करून घेण्याची तजवीज करण्यांत आली आहे. ह्या लोकांस सभासदाचे मामुली हक्क असणार नाहींत आणि त्यांस दिल्या जाणाऱ्या कर्जाचे निराळे हिशेब ठेवण्यांत येतील. त्यांची पतपेढींतील जबाबदारी मर्यादित राहील हें उघड आहे. आपला तयार माल पेढीच्या मार्फत विकून विक्रीच्या पैश्यांतून कर्जफेड करण्याची जबाबदारी नवीन सभासदांवर टाकण्यांत आलेली आहे. त्यांनीं पुन्हां सावकारांच्या तावडींत सांपडूं नये हा ह्या सर्व व्यवस्थेचा उद्देश आहे. तथापि नापीक किंवा पिकाची खराबी झाली असतां कर्जफेड होणें अशक्य किंवा अवघड होईल आणि कर्जें देणाऱ्या पतपेढ्या आणि यांस पैसा पुरवणाऱ्या बँका व इतर सहकारी संस्था ह्यांस नुकसान येईल, त्यावर उपाय योजण्याची तजवीज प्रथमपासूनच केली पाहिजे. व्याजाचे दर हलके असल्यानें पेढ्या व बँका ह्यांची प्राप्ती मर्यादित होऊन नुकसान भरून काढण्यास त्यांस वाव उरणार नाहीं. ह्या अडचणी निवारण्याच्या मार्गाची चर्चा सहकारी संस्था आणि प्रांतिक सरकार ह्यांचेमध्यें होऊन विशिष्ट प्रमाणांत सोसायट्या व बँका ह्यांच्या नुकसानीची भरपाई करण्याचें सरकारनें मान्य केलें आहे.

ह्यासंबंधांतील सरकारी योजनेची माहिती प्रांतिक प्रसिद्धी खात्यानें नुकतीच प्रसिद्ध केली आहे. कर्जनिवाडा मिळवलेल्या शेतकऱ्यांस पिकांसाठीं दिलेल्या कर्जाचे बाबतींत येणाऱ्या नुकसानीची भरपाई त्या कर्जाच्या येणें असलेल्या एकूण रकमेच्या पांच टक्क्यांइतकी करण्याचें सरकारनें पत्करलें आहे. बँकेनें दिलेल्या असलेल्या पिकांच्या तारणावरील कर्जाच्या सबंध एकूण रकमेवर हे पाच टक्के आकारले जातील. सोसायट्यांचे बाबतींत मात्र प्रत्येक पतपेढीच्या नुकसानीचा स्वतंत्र हिशेब करण्यांत येऊन तिचे पाच टक्के सरकार सोशील असें ठरलें होतें. पण पतपेढ्यांस ही योजना विशेष सहायकारक होणार नाहीं आणि त्यांपैकीं कित्येक संस्था तोट्यांत येऊन बुडतील ह्या गोष्टीकडे सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें. तिचा विचार करून सरकारनें आतां असें ठरवलें आहे कीं, कर्जनिवारण कायद्याखालीं येणाऱ्या व लवाद मिळवलेल्या शेतकऱ्यांस कर्जें देणाऱ्या सर्व सोसायट्यांस असल्या व्यवहारांत येणाऱ्या तोट्याच्या एकूण रकमेवर नुकसानभरपाईची आखणी केली जाईल. बँका आणि सोसायट्या ह्यांचेमध्यें नुकसान भरपाईच्या रकमेची वाटणी योग्य हिशेब करून हिस्सेरशीनें निश्चित करण्याचें कार्य सहकारी रजिस्ट्रारनीं करावयाचें आहे. कर्ज घेतल्यापासून बारा महिन्यांचे आंत त्याची फेड सभासदानें न केल्यास तें थकलेलें कर्ज समजण्यांत येऊन त्यावरील व्याजाचें नुकसान भरून निघण्यास सरकारी भरपाईचें सहाय होईल. कर्जाचें मुद्दल आणि त्यावरील व्याज ह्या दोहोंस सरकारी पांच टक्क्यांची हमी लागू होईल. कर्जनिवारण कायद्यांत अशी तरतूद आहे कीं, सरकारनें खास परवानगी दिलेल्या कोणाहि सावकारास कायद्याखालीं येणाऱ्या किंवा लवाद मिळवलेल्या शेतकऱ्यांस कर्जें देतां येतील. जिल्ह्यांच्या कलेक्टरांस कायद्यास अनुसरून परवाने देण्याचा अधिकार सरकारनें दिला आहे. सहकारी पतपेढ्यांस मात्र असल्या परवान्यांची आवश्यकता नाहीं. कर्जनिवारण कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कांहीं काळपर्यंत झाल्यानंतरच नवीन कर्जें, त्यांची फेड, सहकारी संस्थांस ह्या व्यवहारांत होणारें नुकसान, त्याच्या भरपाईची सरकारची तरतूद, इत्यादि संबंधांत अनुभव येईल त्याच्या अनुरोधानें प्रस्तुत सरकारी योजना आहे तशीच चालू ठेवणें किंवा तिच्यामध्यें फेरफार करणें ह्याविषयीं विचार व्हावा लागेल. शेतीचा खर्च, तिचें निव्वळ उत्पन्न, त्यामधून व्हावयाची कर्जफेड, शेतकऱ्याची राहणी, इत्यादि योजनेमधील बाबी इतक्या काटेकोरपणाच्या आहेत कीं प्रत्यक्ष व्यवहारांत अपेक्षेप्रमाणें त्या वठतील तरच कर्जनिवारणाचा कायदा यशस्वी होण्याचा संभव आहे. ह्या कामीं अडचणी येतील त्या योग्य वेळीं दूर करण्याची आणि सहकारी संस्थांस जरूर तें सहाय देण्याची तयारी सरकारनें ठेवली पाहिजे. ह्या महत्त्वाच्या गोष्टींकडे सहकारी संस्थांनीं त्याचें लक्ष प्रथमपासूनच वेधलें आहे आणि तिच्याविषयींच्या त्याच्या विशेष जबाबदारीवर जोर दिलेला आहे.

## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, १२८६ शिवाजीनगर, पुणें ५ )

मागील आठवड्यापासून शेअर बाजारांत जोरदार घसघट सुरू झाली आहे. अमेरिकेनें चांदीचा भाव वाढविला त्यायोगें चांदी-सोनें मजबुतींत आलीं आहेत. याच सुमारास टाटा स्टीलचे अध्यक्ष श्री. टाटा यांचें जें भाषण झालें त्यांत कंपनीला पुढील कांहीं वर्षे तरी मागें पाऊल पडण्याचें कारण नाहीं असें जें ध्वनित केलें गेलें त्याचा कारवाया करणाऱ्या मंडळींनीं पराचा कावळा करून मागच्या शनवारीं डिफर्ड खाजगींत २३७० वर व आर्डि-नरी ४४५ पर्यंत खेचले. इकडील किरकोळ मंडळी सव्याज टाटा शेअरच्या मागें, तो व्याजबाद झाल्यावर पुन्हा सव्याज होता त्याच भावावर तो येतो, या आशेनें फार असतात. त्यांच्या धांदलीचीहि भावांत भर पडली आहे. त्या मानानें गिरण्या विशेष नॉहींत तरी पंधरा दिवसांमागचे निराशामय वातावरणांतून मंदी-वाल्यांच्या मुख्यतः कापणीमुळें वर आल्या आहेत. सुज्ञ मंडळींनीं टाटांच्या वाढलेल्या भावांत-सव्याज असले तरी-विकून काढणें श्रेयस्कर ठरेल. सोनें-चांदीवाल्यांच्या नादीं लागून तिकडे व शेअर-बाजारांत जर तेजीच्या आशेचा खेळ केला तर त्याचा लवकरच खंडोबा झालेला पहावा लागेल.

## सहकारी मालविक्रीचा संघटित प्रयत्न

### मुंबई प्रां. स. मार्केटिंग सोसायटी लि. चे अध्यक्ष वि. ब. काजी ह्यांचें भाषण

" मुंबई प्रांतिक सहकारी मार्केटिंग सोसायटी लि. च्या डाय-रेक्टरांनीं सोसायटीच्या व्यवहाराची पुनर्घटना करून सोसायटीचे तीन भाग केले आहेत. फळें व भाज्या ह्यांच्या विक्रीचा एक भाग, कपास विक्रीचा दुसरा भाग व गळिताचीं धान्यें, खाद्य धान्यें वगैरेंच्या विक्रीचा तिसरा भाग. प्रत्येक भागावर तज्ज्ञ व हितसंबंधी सोसायट्यांचे प्रतिनिधी ह्यांच्या सल्लागार कमिटीची देखरेख असते. मुंबईमध्यें शेतीच्या व घरगुती उपयोगाच्या माल-विक्रीचें सहकारी केंद्र निर्माण करण्याची सर्व पूर्वतयारी झाली आहे. माल साठविण्यासाठी कोठार मिळण्याचीच वाट पहात आहोंत. सहकारी सोसायट्यांच्या उपयोगासाठी नागरी नित्य-उपयोगाच्या वस्तूंचे घाऊक मालाचें दुकान लवकरच उघडण्याचा मार्केटिंग सोसायटीचा बेत आहे."

### मुंबई रेडिओवर सहकाराविषयीं भाषणें

चालू वर्षाच्या प्रारंभीं मुंबई रेडिओवर सहकारी चळवळी-संबंधानें तज्ज्ञांचीं पांच प्रचारात्मक इंग्रजींत भाषणें झालीं, तीं प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें एकत्र छापून प्रसिद्ध केलीं आहेत. सहकाराच्या सर्वच अंगांचा परामर्ष ह्या भाषणांत घेतला जाणें अर्थातच शक्य नव्हतें. तथापि, मुंबई प्रांतांत सहकारी चळवळीची झालेली प्रगति, सहकारी बँकिंग, सहकारी माल विक्री, सहकारी माल वाटणी व सहकारी औद्योगिक घटना हे विषय प्रस्तुत भाषणांत हाताळण्यांत आले आहेत. ज्यांस हीं भाषणें रेडिओवर ऐकणें शक्य झालें नसेल, त्यांस तीं वाचण्याची संधि प्रांतिक इन्स्टिट्यूटनें करून दिली आहे. जिज्ञासूंनीं तिचा उपयोग आव-श्यक करावा. पुस्तिका इन्स्टिट्यूटकडे आठ आण्यांस मिळेल. ती ह्या संस्थेचे चिटणीस, वैकुंठराय मेथा ह्यांनीं प्रसिद्ध केली आहे.

## सातारा-जावळी तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ

### पहिली साधारण सभा

" सातारा तालुक्याच्या युद्धोत्तर पुनर्घटनेमधील तुमचा सातारा-जावळी तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ ही कोन-शिला आहे; आणि ज्यांनीं ही संस्था प्रस्थापित केली त्या सर्वांचें मी हार्दिक अभिनंदन करतों." अशा तऱ्हेचें ता. २१-७-४५ रोजीं संघाच्या भरलेल्या साधारण सभेच्या अध्यक्षपदावरून सहकारी खरेदी-विक्री सोसायट्यांच्या महत्त्वाबद्दल साताऱ्याचे कलेक्टरसाहेब, ए. एल. डायस. आय. सी. एस. यांनीं विवेचन केले. सातारा व जावळी तालुक्यांतील सुमारें ५०० लोक सभेस जमले होते. खरेदी-विक्री संघ स्थापण्याचे कामीं पुढाकार घेत-लेले श्री. एस. के. साबळे, चेअरमन सातारा-जावळी तालुका को. ऑ. सुपरवायझिंग युनिअन, यांनीं आतांपर्यंत खरेदी-विक्री संघानें केलेल्या कामाचें थोडक्यांत निवेदन केलें. मे. रजिस्ट्रार-साहेब यांचेकडून दुरुस्त्यासह मंजूर होऊन आलेले संघाचे पोट-नियम मि. एन. डी. सूर्यवंशी यांनीं सभेंत वाचून समजावून सांगितले. शेतीचा माल विकण्याकरितां व शेतीसाठी लागणाऱ्या व इतर उपयुक्त वस्तु पुरविण्यासाठी सबंध सातारा जिल्हाभर खरेदी विक्री व बहुविध कार्यकारी सोसायट्यांच्या कार्यक्षेत्रांचें जाळें कसें पसरलें आहे यासंबंधीं माहिती देऊन त्यांनीं नवीन रजिस्टर झालेल्या संघाचें कार्य चांगलें चालण्याकरितां कांहीं सूचनाही केल्या.

त्यानंतर डिस्ट्रिक्ट जज्जसाहेब व्ही. एन. सरदेसाई, आय. सी. एस., यांनीं मुंबई शेतकी कर्जनिवारण कायद्यांतील महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट करून सांगितले आणि कर्जदार शेतकरी व सावकार या दोघांनींहि या कायद्याचा फायदा करून घेण्याविषयीं उपदेश केला. श्री. एस. एस. एरम, डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर व मे. आर. एस. पाटील, असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब को-ऑ. सोसा-यटीज यांनीं कायद्याचे संपूर्ण विवेचन केलें आणि कर्जाची तड-जोड करण्याकरितां कर्जदारांनीं अर्ज पाठविणें किती जरूरीचें आहे हे लोकांना पटवून दिले. कलेक्टरसाहेब यांनीं आपले समा-रोपाचे भाषणांत ( त्यांचें इंग्रजी भाषण मि. सूर्यवंशी यांनीं मराठींत सांगितलें ) सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटनेमधील मह-त्त्वाच्या योजना लोकांपुढें समजतील अशा तऱ्हेनें मांडल्या व त्या यशस्वी रीतीनें पार पाडण्याकरितां जमलेल्या लोकांस त्या कामीं सहकार्य करण्यास सांगितलें. नवीन संघाचा उत्कर्ष व्हावा अशी इच्छा व्यक्त करून संघाला उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें संघाला नियंत्रित माल वाटपाचें काम देण्यांत येईल असें सांगितलें. त्या-नंतर आभारप्रदर्शन, हारतुरे व पानसुपारी झाल्यावर सभेचें काम संपलें.

### पुणें सें. को. बँक लि. ची वार्षिक सभा

वरील बँकेच्या वार्षिक सभेंत डायरेक्टरांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यांत आला, त्यांत रावसाहेब खोले ह्यांस सर्वांत अधिक मतें मिळालीं. चेअरमनच्या जागीं त्यांची पुनः निवड झाली, ती सर्वानुमतें झाली, व्हाइस चेअरमनच्या जागीं श्री. मो. ना. पाटसकर हे बहुमतानें निवडून आले. श्री. रा. व. बोरकर हे नव्या वर्षाच्या डायरेक्टर बोर्डांत प्रथमच प्रवेश करीत आहेत. श्री. भगवंतराव साहेबराव काकडे ह्यांची कलेक्टरांतर्फे बोर्डावर नेमणूक झाली आहे.

## स्फुट विचार

### " आम्ही भिक्षांदेहीसाठीं आलों नाहीं "

उसनवार पद्धतीनें इंग्लंडला माल पुरवण्याची व्यवस्था अमेरिकेनें युद्धाच्या यशस्वी कारभारासाठीं केली होती, ती लढाया संपतांच एकदम बंद करण्यांत आली. त्यायोगानें इंग्लंडला अमेरिकेंतून होणाऱ्या अन्नसामुग्रीच्या व कच्च्या मालाच्या पुरवठ्यांत एकाएकी खंड पडला आणि ब्रिटिशांच्या आर्थिक जीवनांत चिंताजनक गोंधळ उत्पन्न झाला. युद्धसमाप्तीनंतर जगांत स्थिरस्थावर नीट व्हावें ह्यासाठीं इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांचें पूर्ण सहकार्य चालू रहावें ह्या अनेकवार घोषित झालेल्या धोरणास त्यामुळें हरताळ फासला गेला आहे. ह्या कल्पनेनें ब्रिटिश मुत्सद्यांनीं ओरड केली. इंग्लंडच्या मार्गांत अडचणी उत्पन्न कराव्या आणि त्यास आवश्यक असलेली मदत देऊं नये असा अमेरिकेचा मुळींच हेतू नाहीं आणि गेलीं कांहीं वर्षे चालू असलेल्या उसनवार पद्धतीच्या जागीं दुसरी कांहीं तरी तजवीज करून आपण त्या राष्ट्रास सहाय करूं शकूं असें आश्वासन प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं दिलें आहे. लॉर्ड हॅलिफॅक्स व लॉर्ड केन्स ह्यांचें शिष्टमंडळ ह्या सबंद प्रश्नाविषयीं वाटाघाटी सध्यां अमेरिकन मुत्सद्यांशीं व तज्ज्ञांशीं करीत आहेत. आपली भूमिका भिक्षांदेहीची नाहीं आणि आपण अमेरिकेची पायधरणी करण्याकरतां आलेलों नाहीं; परंतु अमेरिकेनें इंग्लंडला माल पुरवण्याची नवी समाधानकारक व्यवस्था तात्काळ केली नाहीं तर जागतिक पुनर्घटनेचें सर्वांस इष्ट वा हितकारक वाटत असलेलें कार्य कठिण किंवा अशक्य होईल हें सिद्ध करण्याचा आपला हेतु असल्याचें त्यांनीं निक्षून सांगितलें आहे. अमेरिकेच्या सहायाची याचना करणें कमीपणाचें आहे. पण तसें आपण केवळ जागतिक स्वास्थ्याकरितां करीत आहों; नाहींतर ब्रिटिश साम्राज्य स्वतःच्या पायावर उभें राहून आपल्यापुरती आर्थिक व्यवस्था लावण्यास केव्हांहि समर्थ आहे अशी निर्वाणीची भाषाहि त्यांनीं वापरली आहे.

---

### शेतीची सुधारणा—वुडहेड कमिशनचा रिपोर्ट

बंगालमध्यें अन्न दुर्मिळ होऊन लाखो माणसें मृत्युमुखीं पडलीं, त्या आपत्तीच्या कारणाची चौकशी करून तिची पुनरावृत्ति न होण्यास कोणते उपाय योजण्यांत यावे ह्याविषयीं सूचना करण्यासाठीं वुडहेड कमिशन नेमण्यांत आलें होतें. त्याच्या रिपोर्टाच्या पहिल्या भागाचा उल्लेख आम्हीं "अर्था"मध्यें मागें केला आहे. रिपोर्टाचा दुसरा भाग आतां प्रसिद्ध झाला असून त्यांत कमिशननें हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याच्या असमाधानकारक स्थितीचें विवेचन करून ती सुधारण्याकरितां आवश्यक असलेल्या उपाययोजनेची जबाबदारी सरकारावर टाकली आहे. युद्धसमाप्तीनंतरच्या चार पांच वर्षांत अन्ननिर्मितीची वाढ, धान्याची साठवण आणि त्याची वाटणी ह्यांचें नियंत्रण सध्याप्रमाणें चालू ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादून धान्याच्या किमान व कमाल किंमती निश्चित करून शेतकऱ्यांस पिकांचें उत्पादन वृद्धिंगत करण्यास उत्तेजन दिलें जावें अशी सूचना केली आहे ती महत्त्वाची आहे. रेशनिंग प्रथम खेडेगांवीं विभागांत आणि नंतर क्रमाक्रमानें लहान मोठ्या शहरांत बंद केलें जावें असें कमिशनचें म्हणणें आहे. मध्यवर्ती सरकारच्या एका खात्याच्या कक्षेंत शेती व अन्नपुरवठा ह्याविषयींची व्यवस्था रहावी आणि ह्यासंबंधांत एक कायमची घटना बनवण्यांत यावी ह्या त्याच्या शिफारसीवरून हिंदी जनतेस अन्नपुरवठा भरपूर होण्याविषयींच्या सरकारच्या जबाबदारीवर कमिशननें विशेष जोर दिला आहे ही गोष्ट लक्षांत येईल "संरक्षक" अन्नाच्या वाढत्या पुरवठ्याच्या संबंधांत आणि एकूण धान्य, भाजीपाला, दूधदुभतें फळें इत्यादींच्या उत्पादनाच्या विस्ताराचे बाबतींत कमिशननें विधायक सूचना केल्या आहेत. शेतीची सर्वांगीण सुधारणा ही त्या सर्वांस मूलभूत आहे आणि ती देशाच्या आर्थिक अभिवृद्धीचें एक महत्त्वाचें अंग आहे हें विसरतां कामा नये.

---

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

मागील सालाप्रमाणें शेतीच्या मालाचे भाव टिकून होते. विशेषतः चांगलें बागायत असलेले शेतकरी ह्या संधीचा फायदा घेऊन आपली सांपत्तिक स्थिति सुधारीत आहेत. जमिनीच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या आहेत, त्यामुळें कर्जाच्या अर्जांची आवक कमी होणें अपरिहार्य आहे. एकूण ३९ अर्जदारांना ३९,८५० चें कर्ज देण्यांत आलें. १७ सभासदांनीं आपलें २२,२२०० रुपयांचें कर्ज पूर्णपणें फेडलें आहे. १९४२-४३ सालीं थकबाकीचें प्रमाण मुद्दल २१·३६% व व्याज १३·८४% असें होतें, तें १९४४-४५ मध्यें अनुक्रमें १५·६४% व ७·१६% झालें. बँकेचा ताळेबंद सुमारें ४ लक्ष रुपयांचा असून सभासदांस दिलेल्या कर्जाची रक्कम ३,३७,८२६ रुपये आहे. शेतकरी बंधूंची सांपत्तिक स्थिति सुधारत असलेमुळें बँकेकडे कमी अर्ज दाखल झाले. वर्षअखेरीस जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांस ऋणविमोचन कायदा लागू करण्यांत आला आहे त्यामुळेंहि अर्जांची आवक कमी झाली आहे. तथापि तडजोड मंडळाकडून कर्जाच्या रकमा ठरल्यानंतर कायद्यांत तरतूद केल्याप्रमाणें शेतकरी बंधू ह्या बँकेचा अवश्य फायदा घेतील अशी उमेद डायरेक्टर बोर्डानें व्यक्त केली आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस निवळ नफा १,८६० रुपये झाला. भागीदारांस ३½% डिव्हिडंड देण्याचें ठरलें. रावसाहेब आण्णाप्पा नारायण कल्याणी, एम. एऌ. ए., हे बँकेचे चेअरमन आहेत.

---

### मुंबई प्रां. सहकारी बँक लि.

वरील बँकेच्या खेळत्या भांडवलांत गेल्या वर्षी १ कोटि रुपयांची भर पडून तें ५ कोटि, ६८ लक्ष रुपयांवर गेलें. शेतीच्या उत्पन्नाचे तारणावर दिलेल्या कर्जांत बरीच वाढ झाली आणि सरकारी रोख्यांतहि ४० लक्ष रुपयांची भरती झाली. बारामती ही बँकेची सर्वांत जुनी शाखा बंद करण्यांत आली तिचा व्यवहार पुणें सें. को. बँकेनें घेतला. पिकें आणि बाजारभाव ह्यासंबंधांतील परिस्थिति १९४३–४४ च्या इतकी समाधानकारक नव्हती, तरी सोसायट्यांची कर्जाची परतफेड समाधानकारक झाली. बँकेच्या निरा व किर्लोस्करवाडी शाखांत दरोडे पडले त्यांतील नुकसानीची पूर्ण तरतूद करण्यांत आली आहे. बँकेस ३० जून, १९४५ अखेरच्या वर्षी २,८९,८३१ रुपये नफा झाला. भागीदारांस ४% डिव्हिडंड व १% बोनस देण्यास ८२,६०१ रुपये लागतील. नव्या सहकारी पतपेढ्यांच्या स्थापनेच्या प्रचारासाठीं एक नवा फंड निर्माण करून त्यांत १०,००० रुपये टाकण्यांत आले आहेत. बँकेच्या नोकरींत असतां मृत्यु पावणाऱ्या नोकरांचे कुटुंबीयांना मदतीचा अलावन्स देण्याची बँकेची पद्धति आहे, ह्या अलावन्सची पक्की तरतूद करण्यासाठीं एक स्टाफ फॅमिली बेनिफिट फंड निर्माण करून त्यांत १०,००० रुपये घातले आहेत. बँकेची मजबुती वाढविण्याचे दृष्टीनें पूर्वींप्रमाणेंहि इतर सर्व फंडांत मोठ्या रकमा टाकणें बँकेच्या यशस्वी व फलदायी कारभारामुळें शक्य झालें आहे.

## कर्ज निवारण कायद्याचा प्रचार

मे. डी. जी. लाड, सुपरवायझर नगर नेवासा को. सुपरवायझिंग युनि-अन यांनी कर्ज निवारण कायदा शेतकऱ्यांना समजावून देण्याकरितां ऑगस्ट १८ ते २९ सन १९४५ पर्यंत नगर जिल्ह्यांत श्रीगोंदे तालुक्यांत १० मुख्य सेंटर्सच्या गांवीं सभा भरविल्या. या सभांना मे. डी. जी. पाटील, ऑर्गनायझर ऋ ई छत्रपति हे हजर राहून त्यांनीही या कायद्याची विस्तृत माहिती सांगितली. कांहीं ठिकाणीं बोर्डाचे चेअरमन मे. रानडेसाहेब हेही हजर होते. तसेंच काष्टी येथें नगर नेवासा युनिअनचे प्रेसिडेंट मे. भिमराव पाटील यांनीं सभेस लोक जमविण्याची बरीच खट-पट केल्यामुळें फारच मोठा समुदाय जमला होता.

मे. एस. व्ही. भीर, एम्. ए., असिस्टंट रजिस्ट्रार कर्जनिवारण प्रचार यांनी मे. डॉ. देसाई, ऑडिटर आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफिसर, नाशिक व मे. म्हैस्कर, सब-ऑडिटर, डेट रिलिफ नाशिक यांचेसह नाशिक जिल्ह्यांत ता. १४ ते २५ आगस्टपर्यंत दौरा काढून कर्जनिवारण कायदा लागू केलेल्या चार तालुक्यांतून महत्त्वाच्या ठिकाणीं सभा घेऊन कायद्याचा प्रचार केला. एकंदर सभा १० ठिकाणीं घेतल्या गेल्या.

मे. सब-ऑडिटर डेट रिलिफ वर्क, प. खा. शहादा (मि. के. एम. पाटील) ह्यांनीं आगस्ट महिन्यांत शहादा तालुक्यांतील बऱ्याचशा खेडो-पाडीं भेटी दिल्या व तेथील लोकांना कर्जनिवारण कायद्याची समग्र माहिती दिली. शहादें व तळोदें तालुक्यांतील आसि. डि. को. ऑफिसर्स देखील जारीनें प्रचार करीत आहेत. मे. सबऑडिटरसाहेब, को. सो. बॅकवर्ड एरिया तळोदें ह्यांनीं तळोदें तालुक्यांतील भिल शेतकरी कर्जदारांना कर्जनिवारण कायद्याचें महत्त्व पटवून देण्याचें व त्यांना अर्ज लिहिण्यांत मदत करण्याचें कार्य चालू ठेविलेलें आहे.

जुन्नर तालुक्यास कर्ज निवारण कायदा लागू झाल्यामुळें तालुक्यांतील कर्जदार शेतकऱ्यांना या कायद्याची रूपरेषा, त्यापासून होणारे फायदे व मुदतींत अर्ज दाखल करण्याची जरूरी, याबाबत माहिती देण्यासाठी श्री. के. डी. कुळकर्णी, असिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, जुन्नर, यांनीं गांवोगांव सभा घेण्याचें काम जोरानें चालू केलें आहे. यापूर्वी अशा सभा सेंटर्स घेऊन गटानें भरविण्यांत आल्या होत्या. आतां गांवोगांव सभा घेण्यांत येऊन महिना-सव्वा महिन्याचे मुदतींत आजपर्यंत अशा सभा एकूण ४५ घेण्यांत आल्या. या तालुक्यांतील मावळी भागांत हल्लीं पाऊस फारच असल्यामुळें, या भागांतील शेतकऱ्यांना सदर कायद्याची कल्पना येऊन जास्तींत जास्त अर्ज मुदतींतच दाखल व्हावे व त्यांना आवश्यक कायदा घेतां यावा, म्हणून पुणे भागाचे असि. रजिस्ट्रारसाहेब, को. सो. मे. डब्ल्यू. डी. साळुंकेसाहेब यांनीं मुद्दाम भेट देऊन योजना ठरविली आणि त्यांच्याकडून छापील हस्तपत्रकें मिळवून या मावळी भागांत गांवोगांव सभा घ्याव्या व त्यांना माहिती देण्यांत यावी, अशी व्यवस्था केली आहे.

नगर व पारनेर तालुक्यांत मि. एन. एस. इनामदार, असिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, पारनेर यांनीं शेतकरी कर्जनिवारण कायदा समजावून सांगण्यासाठी आगस्ट १६ ते ३० पर्यंत अकोळनेर कौडगांव वाळकी केडगांव, चिचोंडी-शिराळ, कोल्हार मजली-चिंचोली, गुंजाळ पिंपळगांव उज्जनी घोसपुरी अळकुटी लोणी आणि भाळगांव या गांवीं जाहीर मोठ्या सभा भरवून ५१ खेड्यांतील शेतकऱ्यांना कायदा समजावून सांगितला. आगस्ट १९४५ असेर नगर तालुक्यांत एकंदर प्रमुख ठिकाणीं ४२ सभा घेऊन १०५ खेड्यांत प्रचार झाला व पारनेर तालुक्यांत २७ ठिकाणीं सभा घेऊन ८९ खेड्यांत प्रचार झाला आहे.

माळशिरस तालुक्यांतील सहकारी शेतकी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास मे. व्ही. एन. देशपांडेसाहेब, असिस्टंट रजिस्ट्रार, को. सो. सोलापूर यांचे अध्यक्षतेखालीं झाला. त्यावेळीं सेक्रेटरींशिवाय मे. गाटे-साहेब, चेअरमन डेट ॲडजस्टमेंट बोर्ड, माळशिरस, मे. शेख डी. सी. ओ. सोलापूर, मे. पळसली, स्पेशल सब ऑडिटर, बी. एडी. आर. ॲक्ट पंढर-पूर, मि. अवचट सुपरवायझर माळशिरस हेही हजर होते. सदर क्लास ता. २९ व ३० ऑगस्ट रोजीं माळशिरस मुक्कामीं भरविण्यांत आला. त्यांत सोसायट्यांचे २० सेक्रेटरी हजर होते. क्लासमध्यें वरील अधिकारी वर्गांनीं विशेषतः सोसायट्यांना अनुषंगिक अशा शेतकी कायद्याच्या कलमांची माहिती देऊन कायद्यांतील कलम १७ (१) प्रमाणें शेतकऱ्यांनीं बोर्डाकडे द्यावयाच्या अर्जांची माहिती आणि प्रत्यक्ष उदाहरणें लिहून घेऊन सेक्रेटरींना सर्वतोपरी माहिती करून दिली.

ता. २९-८-४५ रोजीं मे. डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर साहेब नगर, यांनीं कोतूळ येथें कर्जनिवारण कायद्याची माहिती देण्यासाठीं शेतकऱ्यांची सभा घेतली. सभेस ४२ गावांतील ७००-८०० वर जन-समुदाय हजर होता. श्री. मा. ल. पाटील तालुका ऑनररी ऑर्गनायझर अध्यक्ष यांनीं ठिकठिकाणीं सहकारी सोसायट्या स्थापन करण्याबाबत मदत करण्याबद्दल त्यांना विनंति केली व शेतकऱ्यांना लागणाऱ्या कर्जाची व्यवस्था सोसायटीमार्फत होणार आहे असें सांगितलें.

कसबें जेऊर ता. करमाळें (जि. सोलापूर) येथें तारीख १८।८।४५ व १९।८।४५ रोजीं सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास भरविण्यांत आला होता. त्या क्लासमध्यें शेतकरी कर्जनिवारण कायद्याची माहिती व कर्जदारासाठी अर्ज कसे लिहावे याबद्दल माहिती देण्यांत आली. उद्घाटन समारंभाचे वेळीं मे. असि. रजिस्ट्रार साहेब, को. सो. सोलापूर, मे. चेअरमन साहेब, डी. ए. बोर्ड, कुर्डुवाडी व मि. जी. ई. पाटील, प्रेसिडेंट डी. एल. बी., मे. डि. को. आफीसर सो. सोलापूर व इतर कांहीं सोसायट्यांचे चेअरमनही हजर होते.

ता. १६ व १७ ऑगस्ट १९४५ रोजीं माढें जि. सोलापूर येथें ट्रेनिंग क्लास मे. असि. रजिस्ट्रारसाहेब को. सो. सोलापूर यांचे अध्यक्षतेखालीं दोन दिवस भरविण्यांत आला. क्लाससाठीं तालुक्यांतील सर्व सेक्रेटरी मे. डि. ओ. आर्गनायझर माढें, मे. प्रेसिडेंट ता. सु. युनियन माढें, आसपासच्या सोसायटींचे कांहीं चेअरमन, मे. सब ऑडिटरसाहेब डे. रिलीफ वर्क व सुपरवायझर आणि ब्यांक इन्स्पेक्टरसाहेब हे हजर होते. प्रास्ताविक भाषण मे. साठे डी.ओ. आर्गनायझर यांनीं करून सदर कायद्याच्या उपयुक्ततेसंबंधानें माहिती दिली. सेक्रेटरी यांना ऋणविमोचन कायद्याबाबत शेतकरी कर्जदारांनीं करावयाचे अर्जासंबंधानें कायद्याची माहिती मे. गायकवाड व वकील व चेअरमन श्रीजगदंबा को. क्रे. सोसायटी माढें यांनीं दिली व कांहीं उपयुक्त सूचना केल्या. त्यास अनुसरून मे. सब ऑडिटर व सुपरवायझर यांनीं शेतकरी कर्जदारांचें अर्ज कसे लिहावे यासंबंधीं सर्व सेक्रेटरींना शिक्षण दिलें.

नगर जिल्हा को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनिअन्स बोर्डाच्या वतीनें सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास ता. २४।७।४५ पासून नगर येथें सुरू करण्यांत आला. सदर ट्रेनिंग क्लासचें उद्घाटन मे. एन. पी. भागवतसाो., डेप्युटी रजिस्ट्रार सा. को. सो., इलाखा मुंबई, पुणें यांचें हस्तें करण्यांत आलें. या समारंभास मे. साळुंकेसा., असि. रजिस्ट्रार साहेब को. सो. पुणें, डी. यु. बीचे चेअरमन मे. कमालखान गुलाबखान व इतर अधिकारी आणि सद्गृहस्थ व विद्यार्थी मिळून सुमारें १२५ लोक हजर होते. क्लास ता. २४ जुलै पासून १५ दिवसपर्यंत घेण्यांत आला. सदर क्लासमध्यें विद्यार्थ्यांना सहकारी सोसायट्यांचा कायदा, सोसायट्यांचे हिशेब, कर्ज-निवारण कायदा, व निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्था यांचेबद्दल योग्य ती माहिती देण्यांत आली. सदर क्लासांत एकंदर ७१ विद्यार्थी हजर होते. क्लासचे शिक्षणाचा कार्यक्रम संपल्यानंतर ता. ८ व ९।८।४५ रोजीं परीक्षा घेण्यांत आली.


### शेवगांव नेवासा शेतकी माल पुरविणारी व खरेदी-विक्री करणारी सहकारी सोसायटी लिमिटेड, शेवगांव, जि. अहमदनगर.

या सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार तारीख १ आक्टोबर १९४५ रोजीं दुपारीं २ वाजतां सोसायटीचे ऑफिसमध्यें भरविण्यांत येणार आहे; तरी या सभेस सर्व सभा-सदांना हजर राहण्याची विनंति आहे.

त्र्यं. शि. भारदे,
चेअरमन.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
टाटा स्टील २५-८-४५ ते २२-९-४५
गोकाक १२-१०-४५ ते २५-१०-४५

व्याज–वजा ( xd )
+कोहिनूर रु. ९ सं. दि. १९–९–४५
डाइंग रु. २५ दि. २७-९-४५
टाटा स्टील रु. १२९–८–९ } १–१०–४५
रु. २३–०–० }
गोकाक मिल्स रु. ५ दि. २९-१०-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार दि. १७।९।४५ | मंगळवार १८।९।४५ | बुधवार १९।९।४५ | गुरुवार २०।९।४५ | शुक्रवार २१।९।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २२८५—० | २३१५—० | २३२०–० | २३४२–८ | |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४३०—० | ४३४—० | ४३४–० | ४३९–८ | |
| २२०१; १६९५ | २५–०–०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९१५—० | १९३२—८ | १९४१–४ | १९६२–८ | |
| ७६५; ५३३ | ९—–०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९६—० | ६०५—० | ६०५+ | ६१४–० | |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५४४—८ | ५४७—० | ५५३–० | ५७०–८ | |
| ४९८; ३६१ | ६–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ३७४—० | ३७५—० | ३७६–० | ३८५–८ | बाजार बंद |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | २८०—० | २८२—० | २८२–० | २८६–८ | |
| ३९४; २८२ | ५–०–०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | २९०—८ | ३९३—० | २९४–० | २९८–० | |
| ३०५; २१८ | १२–०–०S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | २८५—० | २८६—० | २९०–० | २९७–८ | |
| २-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ३–१५–० | ३–१५–० | ३–१५–० | ३–१५–६ | |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३–११–० | १३–११–० | १३-१०-६ | १४–०—६ | |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | २–११–३ | २–१२–० | २–१२–० | २–१२–६ | |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६६६—४ | ६७१—४ | ६७७–८ | ६८७—८ | |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | २१६—८ | २१७—० | २१७–८ | २१८—० | |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२०—० | २२४—८ | २२४–८ | २२५—० | |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५६३–१२ | ५६३—८ | ५६२–८ | ५६२—८ | |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७—० | ३७—६ | ३७–१४ | ३७–१५ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१–१३ | १०१-१२-० | १०१–१४ | १०२—० | |

आंध्रा व्हॅली रु. ३७–८S दि. १०–१०–४५ टाटा हायड्रो रु. ४–८–०S दि.६–९–४५ टाटा ऑइल रु. २–१२ दि. २०-१०-४५
बॉम्बे ट्रॅम रु. २–८–०† दि. २३–१०–४५ टाटा पॉवर रु. ४०–०–०S दि. १७–१०–४५

## सारस्वत को. बँकेची आदर्श प्रगति

मुंबईमधील वरील प्रगतिप्रिय बँकेचें खेळतें भांडवल गेल्या वर्षात १५ लाखांनीं वाढून तें ५२,८८,२९३ रु. झालें. १९४३ सालीं खेळतें भांडवल २६,१६,२६२ रु. होतें. बँकेचे स्वतःचे फंड ४ लाखांचेवर असून त्यांतील २ लक्ष, ४४ हजार रुपयांचें शेअर भांडवल आहे. रिझर्व्ह फंडांतील १ लक्ष रुपयांचीं नॅशनल से. सर्टिफिकिटें घेण्यांत आलीं, त्यांचे १२ वर्षांनीं १½ लक्ष रु. होतील. बँकेच्या एकूण १९९७ सभासदांपैकीं प्रत्येकीं ५ किंवा त्या पेक्षां कमी भाग धारण करणारे ७३% सभासद आहेत, ह्या वरून बँकेचें खरें सहकारी स्वरूप दिसून येतें. बँकेनें सुमारें ४२ लक्ष रुपये रकम सरकारी व तत्सम रोख्यांत गुंतविलेली आहे, त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदांतील किंमतीपेक्षां ५१ हजारांनीं ज्यास्त आहे. एकूण सुमारें ४½ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. इमारतींत गुंतलेल्या रकमेवर ( १,२१,००० रु. ) व्याज न आकारतां, तीवरील खर्च वजा रहाणारी सर्व रकम बिल्डिंग फंडांत टाकण्यांत येते. वरील माहितीवरून नफ्याची रकम न वाढवितां बँकेची अंतिम मजबुती वाढविण्याकडे चालकांचा कसा कटाक्ष आहे, हें समजून येईल. जॉइंट स्टॉक बँकांच्या धरतीवरील सर्व कामें ही बँक तर करतेच, परंतु आपल्या सभासदांच्या उद्धारासाठी सहकारी तत्त्वावर तिचे चालक दक्षतेनें योजना आखून पार पाडीत असतात, त्याचें प्रत्यंतर रिपोर्टावरून येते. अर्बन बँकांना आदर्श असा हा रिपोर्ट व त्यांतील कार्याचा तपशील आहे. श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम हे बँकेचे चेअरमन असून श्री. एस. व्ही. संझगिरि, बी. कॉम हे सेक्रेटरी आहेत. गेल्या वर्षी बँकेस २२,५५९ रु. नफा झाला त्यांतून ५% डिव्हिडंड व १½% बोनस देण्याउ १२,७०० रु. लागले.

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व क्रूसकरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

खरूज, गजकर्ण, भाजणें या सर्वांवर
सर्वमान्य उपाय योजना

**खुजलीन**

★ मलम ★ लोशन ★ साबण ★ पावडर ★




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



# आशा

Asha

सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

**दि आयडिअल इन्स्टिट्यूट**

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
——कारखान्याच्या वाढीसाठीं ठेवी घेणें आहेत.——

**नोगीचे डोंगर छाप**

शुद्ध निलगिरी तेल.

नोगी आणि कं. मुंबई ४

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग,
९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | रु. २५,००,००० |
| काढलेलें भांडवल | :: | रु. २२,००,००० |
| भरलेलें भांडवल | :: | रु. १९,८९,५०० |

खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

………शाखा व उपशाखा………

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड „ | २५ मालेगांव „ |
| ३ किर्लोस्करवाडी „ | २६ नांदगांव „ |
| ४ कोरेगांव „ | २७ घोटी „ |
| ५ इस्लामपूर „ | २८ सटाणा „ |
| ६ शिराळें „ | २९ येवलें „ |
| ७ तासगांव „ | ३० मनमाड |
| ८ वाई „ | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद „ | ३२ दोंडाईचें „ |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार „ |
| ११ कल्याण „ | ३४ साक्री „ |
| १२ पालघर „ | ३५ शहादें „ |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर „ |
| १४ अहमदनगर ( „ अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें „ |
| १५ बेलापूर रोड „ | ३८ तळोदें „ |
| १६ कोपरगांव „ | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी „ | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी „ | ४१ गोध्रा „ |
| १९ शेवगांव „ | ४२ झालोद „ |
| २० वांबोरी „ | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गाव) „ | ४४ नडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद „ |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड „ |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व
ए. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा घ. नं. १३४।११ पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ३ आक्टोबर, १९४५ अंक ४०

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94 A. " It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them. "

# बँक ऑफ पूना लिमिटेड

५९५ बुधवार, पुणें २

## रजिस्टर झाल्याची तारीख १९–७–४५

| अधिकृत भांडवल | तूर्त विक्रीकरतां काढलेले |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |
| प्रत्येकीं रु. १०० चे ५०,००० शेअर्स | प्रत्येकीं रु. १०० चे २५,००० शेअर्स |

*या शेअर्सपैकीं डायरेक्टर्स व त्यांची मित्रमंडळी ह्यांनीं पांच लाख रुपयांचे ५००० शेअर्स घेणेचें ठरविलें असून बाकी वीस लाख रुपयांचे २०,००० शेअर्स विक्रीकरतां काढले आहेत. प्रत्येक शेअरमागें अर्जासोबत रु. २५ व अर्जमंजुरीनंतर रु. २५ भरणेचे आहेत. बाकीची रक्कम रु. ५० ची मागणी, डायरेक्टर्स जरूर वाटेल त्यावेळीं करतील.*

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया,
फर्म मे. हिंदुमल बालमुकुंद, लँडलॉर्ड, बँकर, बालमुकुंद रोड, पुणें २. चेअरमन.

२ शेठ दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.,
कॉंट्रॅक्टर आणि लँडलॉर्ड, २ ए कारमायकेल रोड, मुंबई. व्हाईस चेअरमन

३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर, एम. ए., पीएच. डी.,
प्रोप्रायटर आणि संचालक ' सकाळ ', १६ वेलेस्ली रोड, पुणें १.

४ मि. फ्रामजी पेस्तनजी पोचा, फर्म मे. पेस्तनजी पी. पोचा अँड सन्स,
बी–बियाणाचे व्यापारी, नेपीयर रोड, पुणें १.

५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, फर्म मे. रामनारायण राजमल,
बँकर आणि मर्चंट, टिळक चौक, सोलापूर.

६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, फर्म मे. रामभगत पन्नालाल,
बँकर आणि मर्चंट, ६१० रविवार पेठ, पुणें.

## शेअर विक्री सुरू आहे

छापील अर्ज नमुने मिळण्याचीं ठिकाणें:—( १ ) मे. चंपकलाल देवीदास, आगाखान बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, मुंबई. ( २ ) मि. आर. जे. सावंत, ६२ न्यू स्टॉक एक्स्चेंज बिल्डिंग, अपोलो स्ट्रीट, मुंबई. ( ३ ) मे. रामनारायण राजमल राठी, टिळक चौक, सोलापूर. ( ४ ) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस ५९५ बुधवार पेठ, शनवारवाड्याचे पिछाडीस, बिनीवाल्यांचा वाडा, पुणें २.

# विविध माहिती

### टारिफ बोर्डाची नेमणूक

हिंदुस्थान सरकारनें टारीफ बोर्डाची नेमणूक करून त्यावर खालील सभासदांची नेमणूक केली आहे, असें समजतें.

१ सर षण्मुखम चेट्टी ( अध्यक्ष )

२ उस्मानिया विश्वविद्यालयाचे प्रो. अनवर इकबाल कुरेशी,

३ श्री. के. सी. नियोगी, श्री. सी. सी. देसाई कंट्रोलर जनरल ऑफ सिव्हिल सप्लाइज ह्यांस सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे.

### लष्करांतून परतणारांची सोय

आक्टोबर १९४५ ते जून १९४६ अखेर लष्करांतून मोकळया होणाऱ्या ८,५०,००० सैनिकांपैकी २२००० लोकांची तरतूद हिंदी रेल्वेजमध्यें करण्यांत येईल, असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

### वीज कंपन्यांच्या हिशेबांची प्रसिद्धि

टाटा हैड्रो इलेक्ट्रिक कंपन्यांचे तपशीलवार हिशेब प्रसिद्ध करण्यास हिंदुस्थान सरकारनें बंदी केली होती, ती आतां उठविण्यांत आली आहे.

### कराचीमधील ट्राम व बस गाड्या

कराची कॉर्पोरेशननें कराचीमधील ट्राम व बस कंपनीची सर्व मालमत्ता विकत घेऊन वहातुकीचें काम स्वतः करण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें, ईस्ट इंडिया ट्रामवेज कंपनीला नोटीस देण्यांत आली आहे.

### बारींत उभें रहावें लागेल

ग्रेट ब्रिटनकडून यंत्रसामुग्रीसारखा भांडवली स्वरूपाचा माल मिळविण्यासाठी हिंदुस्थानास इतर देशांचे बरोबर बारीमध्यें उभें रहावें लागेल, असें श्री. ए. डी. श्रॉफ हे एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

### मि. हेन्री फोर्ड

मि. हेन्री फोर्ड ह्यांनीं फोर्ड मोटार कंपनीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. ही कंपनी त्यांनीं १९०३ सालीं स्थापन केली. त्यांचें वय आतां ८२ वर्षांचें आहे. त्यांच्या नातवानें आतां अध्यक्षपद स्वीकारलें आहे.

### अमेरिकेपेक्षा ग्रेट ब्रिटनचा युद्धप्रयत्न मोठा

"अमेरिकेनें स्वार्थत्याग करून ग्रेट ब्रिटनला विजय संपादन करून दिला" ह्या विचारसरणीस फोल ठरविणारे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. अमेरिकन सैनिकहानीपेक्षा ब्रिटिश सैनिकहानी २½ पट अधिक झाली, ब्रिटिश मालवाहू आगबोटींस ब्रिटन मुकलें, ब्रिटिश घरादारांचा नाश झाला, राष्ट्रीय संपत्तींत २०% घट झाली, वगैरे मुद्दे पुढें मांडण्यांत येत आहेत.

### हिंदी कारखान्यांतील अपघात व त्यांची नुकसानभरपाई

| | | १९४२ | १९४३ |
|---|---|---|---|
| कारखान्यांतील अपघात | | ३१,०८९ | ४४,८२६ |
| दिलेली नुकसानभरपाई | (रु.) | १४,०८,०३५ | २२,८३,९९१ |
| प्रत्येक अपघातास सरासरी दिलेली नुकसानभरपाई | (रु.) | ४५ | ५१ |
| कमिशनर्सपुढील दावे | | २,८८१ | ३,९७२ |

### आंकडे प्रसिद्ध करण्यावरील बंदी उठली

व्यापार, आयात-निर्गत, इत्यादींविषयक कांहीं आंकडे प्रसिद्ध करण्यास युद्धपरिस्थितींत हिंदुस्थान सरकारनें बंदी केली होती, ती आतां उठविण्यांत आली आहे. दारूगोळा, आगबोटींच्या हालचाली वगैरेंची माहिती मात्र प्रसिद्ध करतां कामा नये.


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

अत्यंत गुणकारी—

## कामगार ब्राह्मी तेल
व
## माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.

म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), वांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, जुनागड, कराची, कोइमतूर, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

# अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.


## खातेदारांना अनिष्ट सवलतींची संवय लावूं नका

### रिझर्व्ह बँकेचा सल्ला

कांहीं दिवसांपूर्वी एका शेड्यूल्ड बँकेसंबंधीं कांहीं अफवा उठून ठेवीदारांत चलबिचल निर्माण झाली आणि ते आपले पैसे भराभर काढून घेऊं लागले. बँकेच्या कामाच्या ठरलेल्या वेळेबाहेरहि तिनें ठेवीदारांस पैसे देऊन त्यांचें समाधान केलें, इतकेच नव्हे तर कांहीं मुदती ठेवीहि मुदत भरण्यापूर्वी परत देऊन टाकल्या आणि त्यामुळें बँकेविषयीं शंका नाहींशी झाली. प्रस्तुत शेड्यूल्ड बँक आपल्या ठेवीदारांचे पैसे अशा रीतीनें तात्काळ देऊं शकली तरी सर्व बँकांस तसें करतां येईलच असें नाहीं आणि त्यांचे पैसे तरते असले तरी मुदतीच्या ठेवी मागणी येतांच मुदतीपूर्वी देण्याजोगी त्यांची परिस्थिति असेलच असें सांगतां येत नाहीं. बँकेच्या कामाच्या तासांचे बाहेर पैसे देणें व मुदतीच्या ठेवींची मुदत भरण्यापूर्वी त्या परत देणें ह्या दोन्हीं बाबींसंबंधीं रिझर्व्ह बँकेनें आपलें मत सर्व शेड्यूल्ड बँकांस, त्यांच्या मार्गदर्शनार्थ, कळविलें आहे.

#### कामाची वेळ संपल्यावरहि चेकचे पैसे देण्याचा प्रघात

नेहमीच्या कामाची वेळ संपून गेल्यानंतर चेकचे पैसे रोखीनें देणें अनिष्ट आहे, असें रिझर्व्ह बँकेचें खालील कारणांसाठी स्पष्ट मत आहे. ( १ ) कांहीं बँका कामाची वेळ काटेकोरपणानें पाळीत असतील, तर कांहीं बँका पाळीत नसतील आणि अशा बँकांत त्यामुळें अनिष्ट स्पर्धा निर्माण होण्याचा संभव आहे. ( २ ) बँकेची हिशेबाचीं पुस्तकें पुरीं करण्यास त्यामुळें विलंब होतो आणि नोकरवर्गावर भयंकर ताण पडतो. ( ३ ) कामाची ठराविक वेळ संपल्यानंतरहि बँकेकडून पैसे मिळण्याची मामुली काळांत खातेदारांना सवय झाली, म्हणजे बँकेच्या अडचणीच्या प्रसंगीं ते ही सवलत हक्कानें मागूं लागतील आणि बँकेचे तरते पैसे ठेवी काढून घेतल्यामुळें संपुष्टांत येण्याच्या वेळींच बँकेची आणखी दुर्दशा उडेल. ( ४ ) जेथें पैशाची व्यवस्था तात्काळ करतां येईल, अशा ठिकाणच्या बँकांस कामाची वेळ संपून गेल्यावरहि ठेवींचे पैसे परत देणें शक्य झालें, तरी इतर ठिकाणच्या बँकांस व शाखांस आपत्तीचे प्रसंगीं अनपेक्षितपणें मोठ्या प्रमाणावर ठेवी परत देणें अशक्यप्राय होईल आणि ठराविक कामाच्या तासांस चिकटून रहाणेंच त्यांस सोईचें होईल. ( ५ ) केवळ फक्त कायद्याचे दृष्टीनेंच विचार केला, तर कामाच्या वेळेचे बाहेर बँकेनें चेकचे पैसे देणें निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस ॲक्टाच्या ८५ व्या कलमास कितपत धरून होईल, ह्याबद्दल शंकाच आहे.

#### मुदतबंद ठेवींची मुदतीपूर्वी भरपाई

नेहमीच्या कामाचे वेळेबाहेर चेक वगैरेचे पैसे बँकांनीं देऊं नयेत अशी रिझर्व्ह बँकेची स्पष्ट शिफारस आहे, ती कामाची वेळ संपण्यापूर्वी दाखल करण्यांत आलेल्या चेक्सना लागू नाहीं. अशा चेक्सचे पैसे बँकेच्या नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें देण्यांत यावे, असें तिचें म्हणणें आहे. मुदतीच्या ठेवींची रकम मुदतीपूर्वी देण्यांत येऊं नये अशी रिझर्व्ह बँकेनें जुलै, १९४० मध्यें सर्व शेड्यूल्ड बँकांना सूचना केली होती, तिची आतां पुनः आठवण करून देण्यांत येत आहे. एकाद्या ठेवीदारास तातडीनें पैशाची गरज लागली, तर मुदतीच्या ठेवीचे तारणावर त्यास कर्ज देणें बँकेस केव्हांहि शक्य असतेंच. मुदतीच्या ठेवीचा करार हा इतर करारांप्रमाणेंच बंधनकारक असतांना, कायद्यानें आवश्यक असलेल्या गोष्टीपलीकडे जाऊन सवलती देण्याचें बँकांस कारण नाहीं आणि मामुली काळांत सवलतींची सवय लागली म्हणजे आपत्तीचे प्रसंगीं ही सवलत काढून घेतल्यास साशंकता ज्यास्तच वाढेल, असा रिझर्व्ह बँकेचा त्या वेळेस युक्तिवाद होता तो आजहि कायम आहे. मुदतीच्या ठेवीचे तारणावर जरूर तर बँकेनें कर्ज द्यावें परंतु मुदतीपूर्वी ठेव परत करूं नये, ह्या तेव्हांच्या शिफारसीस रिझर्व्ह बँकेनें एक पुस्ती जोडली आहे. फक्त मामुली प्रसंगीं मुदतीच्या ठेवींचे तारणावर कर्जें दिलीं, तरी आपत्तीचे प्रसंगीं बँकेनें नवीं कर्जें देण्याचें तात्काळ बंद करावें व उलट जुनीं दिलेलीं कर्जें वसूल करण्याच्या मागें लागावें, असा रिझर्व्ह बँकेचा सल्ला आहे.

#### मुदती व करंट ठेवी आणि कायद्याची तरतूद

" मागणी येतांच तत्काळ द्यावयाचें देणें " व " मुदतीनंतर द्यावयाचें देणें " ह्या दोन प्रकारच्या बँकांच्या " देण्यांत " महत्त्वाचा फरक आहे आणि अशा दोन्ही प्रकारच्या ठेवींसाठी रिझर्व्ह बँक कायद्यानें स्वतंत्र तरतूद केलेली आहे. पहिल्या प्रकारच्या एकूण देण्याच्या ५% व दुसऱ्या प्रकारच्या एकूण देण्याच्या २% एवढी रकम प्रत्येक शेड्यूल्ड बँकेनें रिझर्व्ह बँकेत रोख बाळगली पाहिजे, असा त्या कायद्याचा दंडक आहे. म्हणजे मुदतीनंतर द्यावयाच्या देण्यासाठी कमी तरतूद केली तरी चालते, असा त्याचा अर्थ आहे. मुदतबंद ठेवी ठेवीदारांची मागणी येतांच मुदतीपूर्वी परत देणें म्हणजे त्या ठेवींचें करंट अकाउंटवरील ठेवीत रूपांतर करण्यासारखें आहे आणि त्यामुळें वरील कायद्याच्या तरतुदीचा उद्देश कांहीं प्रमाणांत निष्फळ होणार आहे. बँकांच्या गिऱ्हाइकांच्या तातडीच्या व बिनतातडीच्या गरजांमध्यें बँकांनीं नेहमी फरक केला पाहिजे, अडचणीचे वेळीं रोख रकमेसाठी ठेवीदारांची झुंबड उडेल, त्या प्रसंगीं मुदतीच्या ठेवींचे तारणावर कर्ज मागणारांपैकी खरोखरच जास्त नड कोणाची आहे, हें समजणें कठीण जाईल व अशा प्रसंगीं मुदतीच्या ठेवींचे तारणावर कर्ज देण्याचें बँकांनीं माफ नाकारणें हेंच श्रेयस्कर होईल असें रिझर्व्ह बँकेनें आपल्या सूचनेचें समर्थन वरील प्रकारें केलें आहे.

#### पद्धतशीर प्रगतीवर रिझर्व्ह बँकेचा कटाक्ष

सर्वसामान्य बँकिंगच्या योग्य प्रगतीच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेचा सल्ला बँकांनीं अंमलांत आणावा, हें योग्यच आहे. सामान्यतः सर्व बँकांस जें पचेल, त्याच्या पलीकडे कांहीं बँकांनीं त्यांस सहज शक्य असलें तरी, जाऊं नये असा ह्या सल्ल्याचा अर्थ आहे. बँकांच्या कामाच्या वेळेबाहेर चेकचे पैसे दिल्यानें बँकेस मिळणारें निगोशिएबल ॲक्टाचें संरक्षण उपलब्ध न होण्याचा संभव आहे, हा रिझर्व्ह बँकेचा इषारा सर्व बँकांनीं ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे. मुदतीच्या ठेवी मुदत भरण्यापूर्वी व्याज कापून परत देण्यांत बँकेचा फायदाच असतो आणि खोट्या हुलीमुळें बँकेकडे ठेवीदारांनीं पैशाची एकदम मागणी केल्यास चांगल्या बँका त्या अडचणींतून नफाच कमावतात, अशीं उदाहरणें घडलेलीं आहेत. परंतु बँकिंगच्या धंद्यामध्यें एकवाक्यता असावी, अनिष्ट स्पर्धा व तुलना होऊं नये, रिझर्व्ह बँक कायद्याचें उद्दिष्ट साध्य व्हावें इत्यादि दृष्टींनीं सर्वच बँकांनीं काटेतोलपणें करार पार पाडावे, अनिष्ट सवलतींची खातेदारांत संवय लावूं नये, असा रिझर्व्ह बँकेचा आग्रह आहे. शहरांमधील बँकांनींच फाजील सवलती देण्यास प्रारंभ केला, तर तालुक्याच्या ठिकाणच्या बँकांस कोणताच नियम पाळणें अवघड होऊन बसेल. खातेदारांची सोय पहाणें व त्यांस अनिष्ट सवलतींची चटक लावणें ह्यांतील फरक लक्षांत घ्या, एवढेंच रिझर्व्ह बँकेचें सांगणें आहे.

## अन्न धान्य प्रश्न *

बंगालमधील भीषण दुष्काळानें हिंदुस्थानांतील अन्नधान्य प्रश्न किती बिकट व मोठा आहे, ह्याची सर्वांना चांगलीच जाणीव करून दिली. लोकसंख्येच्या प्रमाणांत अन्न-पुरवठा वाढत गेलेला नाहीं, ही गोष्ट स्पष्ट होण्यास १५ लक्षांचेवर लोकांना अन्नावांचून तडफडून मरण पावावें लागलें आणि त्याचे कितीतरी पट लोकांस प्रत्यक्ष मरण आलें नाहीं तरी त्याच्या सन्निध जाऊन यावें लागलें. हिंदी प्रजाजनांपैकीं ८ कोटि लोकांना जन्मापासून मृत्यूपर्यंत एकदाहि पोटभर जेवण मिळत नाहीं, अशी वस्तुस्थिती आहे. ह्या कारणानें, हिंदी जनतेंत नेटानें काम करण्याचें त्राणच राहिलेलें नाहीं. पूर्वी दुष्काळांत धान्याच्या टंचाईपेक्षां तें विकत घेण्यासाठीं लागणाऱ्या पैशाची व तो पैसा मिळविण्यास लागणाऱ्या कामधंद्याची वाण पडे. १९४३ चा दुष्काळ हा मुख्यतः धान्याच्या कमतरतेचाच होता. "सरकारच्या हलगर्जीपणामुळें हिंदुस्थानांतील अन्नधान्य परिस्थिति ही नेहमीचीच असमाधानकारक असून लढाईपूर्वींहि ती हळुहळु बिघडत चालली होती. त्यामुळें तिच्यांत कोणत्याहि अकल्पित कारणांचा धक्का सहन करण्याची ताकदच राहिलेली नव्हती" असा श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांनीं आपल्या नवीन पुस्तकांत* निष्कर्ष काढला आहे. लोकसंख्येचा अन्नधान्य पुरवठ्यावर ताण कसा वाढत आहे, हें दाखवून श्री. गुप्ते ह्यांनीं महाराष्ट्राची परिस्थिति श्री. न. गं. आपटे ह्यांच्या आकड्यांचे आधारानें जरा विस्तारानें वर्णन केली आहे आणि डॉ. अक्रॉइड ह्यांच्या अंदाजाप्रमाणें, "एकदल धान्य २०%, डाळ १००%, दूध ३००–४००%, पालेभाज्या १००%, ह्याप्रमाणें वाढ झाल्याशिवाय हिंदुस्थानाच्या आहाराचें मान समाधानकारक मानतां येणार नाहीं" असें सार काढलें आहे. ह्या परिस्थितीबद्दल बऱ्याच अंशीं सरकारच जबाबदार आहे, असें त्यांचें स्पष्ट मत आहे.

प्रचलित दुष्काळाची पार्श्वभूमि वर्णन केल्यावर, श्री. गुप्ते ह्यांनीं सध्याची महागाई व टंचाई यांची कारणमीमांसा केली आहे. पूर्वतयारी व कार्यक्षमता ह्यांचा पूर्ण अभाव, वहातुकीच्या साधनांची दाणादाण, मागणींत वाढ व पुरवठ्यांत तूट, नफेबाजी व लाचलुचपत, चलनवृद्धी, इत्यादींचें वर्णन करून सरकारी योजनेंतील एकंदर दोषांचा सारांश त्यांनीं दिला आहे. आपल्या जिव्हाळ्याची मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें अधिकारावर येण्याबद्दल लोकांत आतुरता कां आहे, ह्याचें त्यांनीं योग्य कारण दिलें आहे. शास्त्राची प्रगति, कळकळीच्या सरकारची कर्तबगारी आणि जागृत झालेल्या जनतेची समंजस सहकारिता ह्यांच्या संगमामुळें हिंदुस्थान लवकरच समृद्धीच्या व सुखसमाधानाच्या मार्गाला लागेल असा विश्वास त्यांनीं अखेर प्रकट केला आहे.

---

* महाराष्ट्र कॉंग्रेस प्रकाशन, ले:—भालचंद्र महेश्वर गुप्ते, एम. ए., एलएल. बी., एम. एल. ए. पृ. सं. ४०. किं. ८ आ.

---

### मुंबई प्रांतामधील तुरुंगांतील कैदी

मुंबई प्रांतामधील तुरुंगांत १९४४ सालीं एकूण ३९,९५५ कैदी दाखल झाले. तुरुंगांतील कैद्यांची रोजची सरासरी संख्या १३,५५७ होती, १९४३ सालीं ती १८,०३६ होती. तुरुंगांत दाखल झालेल्या कैद्यांपैकीं ४०% कैद्यांस एक महिन्यापेक्षां कमी दिवस तेथें काढावे लागले. बाकीचे कैदी ज्यास्त दिवसांच्या कारागृहवासाच्या शिक्षेचे होते. १२ कैदी तुरुंगांतून पळाले. फटक्याची शिक्षा कोणासही देण्यांत आली नाहीं.




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

नोगीचे
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

डोंगरे यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

### थोडा जमाखर्च

श्री. संपादक "अर्थ", यांसी—

सा. न. वि. वि.

सतत सहा वर्षें चाललेलें महायुद्ध नुकतेंच संपलें. युद्धोत्तर, युद्धपूर्व जग रहात नाहीं हा सर्वमान्य सिद्धांत आहे. त्याला हें युद्ध अपवाद कसें असणार ?— नवीन जग, नवीन प्रश्न. त्यांचीं उत्तरें काळ देईलच. तथापि मध्यंतरच्या दिवसांत युद्धकालांत हिरावलेलीं नि गमावलेलीं मोहरीं यांची मोजदाद मोठी करमणुकीची वाटते. तसाच कांहींसा प्रयत्न आज करीत आहे.

**जमा :**

आघाडीवरील हिंदी लढवय्यांनीं हिंदुस्थानची कीर्ति त्रिखंड गाजविली. जगश्रेष्ठींनीं त्यांची मुक्तकंठानें प्रशंसा केली. युद्धोत्तरच्या जागतिक प्रश्नांच्या चर्चेत हिंदी आशा–आकांक्षांचा आस्थेनें नि सहानुभूतीनें विचार होण्यास हिंदी सैनिकांची अतुल कामगिरी विशेष कारणीभूत होईल असा प्रामाणिक आशावाद प्रकट करण्यांत येतो. किमया केल्याप्रमाणें युद्धपूर्व ऋणको हिंदुस्थान युद्धोत्तर धनको देश बनला आहे. बहुसंख्य नागरिकांनीं राहण्या-जेवण्याच्या, वस्त्रप्रावरणाच्या, प्रवासाच्या अकल्पित हालअपेष्टा सहन करून दोन्ही हातांनीं युद्धकार्याला पैका नि मनुष्यबळ यांचा अमाप पुरवठा केला. हे 'कष्ट, अश्रू नि रक्त' स्टर्लिंग शिलकांच्या स्वरूपांत लंडनमध्यें जमा आहेत.

हिंदी गिरण्या-कारखान्यांनीं रात्रंदिवस काम करून युद्ध कार्यातील आपला वाटा उचलला. असह्य परिस्थितींत नागरिक जीवन सुसह्य करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. सतत चलनवाढीच्या नि चढत्या किंमतीच्या दिवसांत त्यांना अपरंपार फायदा झाला अन् त्यांनीं तो कराच्या रूपानें सरकारतिजोरींत भरला ! परदेशी मालाची एक स्पर्धा नसली तर इतर अडचणी असूनहि उत्पादन किफायतशीर कसें होतें–प्रचंड उत्पादन कसें काढावयाचें याचा अनुभव त्यांना अल्पावधींत मिळून गेला. मोठमोठ्या उलाढाली करण्याची ईर्षा नि मानसिक तयारी झाली. सरकारच्या मनांत असलें म्हणजे निमिषार्धांत बंगले, कारखाने नि शहरेंचीं शहरें कशीं उठतात याचा प्रत्यक्ष अनुभव सर्वांना आला. जणूं कांहीं अल्लाउद्दीनाचा दिवाच ! याच काळांत कोडो रुपयांच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजना मांडण्यांत आल्या अन् त्या हिंदभूमीवर प्रत्यक्षावस्थेंत आणण्याची शक्यता वाटूं लागली. या जनमनाच्या तयारींतच हिंदुस्थानच्या उज्वलत्या दिशा मला दिसतात.

राजकीय हितसंबंधांचे देशांतील आर्थिक व्यवहारावर दूरगामी परिणाम होत असतात या तत्त्वाचा परिचय अर्थशास्त्राच्या अभ्यासकाला असतो. कारखानदार-व्यापारी मंडळींना अनुभव असतो, पण त्याची आंच रोजच्या व्यवहारांत सर्वसामान्य जनतेला तितक्या तीव्रतेनें लागत नाहीं. राजकीय नि आर्थिक निर्बंधांनीं जखडलेल्या बहुजनांना या परस्परसंबंधांची कल्पना युद्धकालांत विनासायानें झाली. याचा इष्ट परिणाम उद्यांचे प्रश्न सोडवितांना झाल्याखेरीज राहणार नाहींत.

युद्धकार्याच्या निमित्तानें निरनिराळ्या ठिकाणीं नि प्रसंगीं निरनिराळी मंडळी भेटली. याचा कळत नकळत पण निश्चित परिणाम युद्धावरून परत येणाऱ्या मंडळींच्या जीवित-ध्येयावर होईल. सारी मानव जात एक असल्याचा त्यांना विश्वास आला असेल. संधि नि शिक्षण मिळाल्यास आपण इतर पुढारलेल्या राष्ट्रांतील मंडळींबरोबर काम करूं शकतों असा आत्मविश्वास निर्माण झाला असेल. हा अनुभव, ही मानसिक तयारी बहुमोल आहे.

थोडक्यांत, सारें समाज-जीवन गतिमान झालें आहे. त्याचा आवेग थांबविणें आतां शक्य नाहीं.

**नावे :**

अर्थे असूनही जमा बाजू खर्च बाजूपेक्षा जड आहेच असें मला निश्चयानें म्हणतां येत नाहीं !

राजकीय कोंडी आडून नव हिंदुस्थान जन्माला येत असेल, पण गेल्या पांच वर्षांचा पुन्हां अनुभव घ्यावा असें राज्यकर्त्यांना नि जनतेलाही वाटत नाहीं हें खरेंच आहे.

इतर राष्ट्रांच्या मानानें युद्धकालांत हिंदी उद्योगधंद्यांची वाढ झाली नाहीं; उलट पीछेहाटच झाली असा श्री. ए. डी. श्रॉफ यांचा दावा आहे. इंग्लंड–अमेरिकेचा प्रवास करून परत आल्यावर त्यांनीं दिलेल्या एका मुलाखतींत इंग्लंडच्या अडेल धोरणानें हिंदी स्टर्लिंग शिलकांचा प्रश्न लवकर सुटणार नाहीं असें सांगितलें. डॉलर हुंडणावळ न मिळाल्यास हिंदी औद्योगिकरणाचा प्रश्न लांबणीवर पडेल अशी भीतिहि त्यांनीं व्यक्त केली. म्हणूनच, मला वाटतें, अमेरिकेनें उधार-उसनवार पद्धत रद्द केल्याचें जाहीर केल्याबरोबर 'दैवी घटना' असे त्यांनीं उद्गार काढिले.

चिवट जपान्यांवर विजय मिळविणाऱ्या हिंदी सैनिकांची जपानी तहनाम्याचे समारंभाचे प्रसंगीं आठवणही झाली नाहीं ! याबद्दलची रास्त तक्रार सर्व वर्तमानपत्रांतून करण्यांत आली आहे.

युद्धकालांत खूप पैसा झाला. पण तो शिल्लक आहे का ? उद्यांचे प्रश्न सोडविण्याचे वेळीं त्याचा अभावच आढळेल अशी साधार भीति वाटते ! हिंदी व्यापारी मंडळींनीं ग्रावाबतचें आपलें गाऱ्हाणें मांडलें आहे. युद्धपरिस्थितींत बेसुमार वाढलेले कर कमी करण्याची जनतेची मागणी; पण तसें करतां येत नाहीं असें सरकारचें उत्तर. उलट अधिक नवीन कर बसविण्याच्या योजना. या सर्व घटनांचा विचार व्हावयास पाहिजे. युद्धकार्याच्या सोईकरितां झणून एक तास पुढें करण्यांत आलेलें घड्याळ. तें आतां पूर्ववत् आणण्याची साधी गोष्ट. पण नाहीं. 'नाहीं' हेंच उत्तर.

मला या ठिकाणीं नमूद करून ठेवावेसें वाटतें कीं देशी उद्योगधंदे व कारखाने यांनीं युद्धकाळांत मिळविलेला अनुभव नि पैसा प्रासंगिक होता. प्रसंगच कठीण होता. येथील कारखाने राबविण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. परंतु सरकारी धोरण उत्साह उत्पन्न करणारें होतें नि सरकारी नियंत्रणें नि त्यांची अंमलबजावणी विश्वासपूर्ण–सहानुभूतीची होतीच होती असें निश्चयानें कोणाला म्हणतां येईल असें वाटत नाहीं. श्री. श्रॉफ यांच्या उद्गारांचें मर्म यांतच आहे.

शेतीप्रधान देशांत अन्न-दुष्काळ पडतात. एका प्रांतांतील १५ लक्ष जीव अन्नाविना तडफडून प्राण सोडतात. हिंदी औद्योगिक क्षेत्रांत मानाचे स्थानावर असणाऱ्या कापड-गिरण्या; त्यांत तयार होणारें कापड नागरिक जीवनास अपुरें पडून कापड-दुष्काळ. त्यापायीं आत्महत्या. मृताभोंवतालचें कापड मिळविण्याकरितां जिवंत माणसांची धडपड. युद्धपूर्व फाजील साखरउत्पादन होऊं न देण्याचे प्रयत्न तर आज तोळा–माशांनीं साखर–वाटप करण्याचा प्रसंग. माणुसकी नि सुव्यवस्था यांवर ही निःशब्द विदा

रक टीका आहे! युद्धपरिस्थिती इतकेच साठेदार, नफेबाले नि सरकार या परिस्थितीला जबाबदार आहे.

अपुरें नि निस्सत्व अन्न, शारीरिक नि मानसिक विलक्षण ताण, औषधोपचारांची कमाल टंचाई, या व एततसम कारणसमुच्चयांनीं आरोग्य-आघाडीवर जोरदार हल्ले चढविले असून प्लेग-कॉलऱ्यासारख्या प्राणविघातक साथी फैलावत असल्याचे अहवाल प्रत्यहीं कानांवर येत आहेत.

युद्ध आलें नि गेलें. पण वर्णद्वेष नि सवतासुभा यांचें वीष आफ्रिका, ब्रम्हदेश नि पाकिस्तानमार्गे आपल्या अंगांत अधिकच भिनत असून वेदना वाढत आहेत. एका अमेरिकन मासिकांत वर्णद्वेषावर एक गमतीदार चुटका माझ्या नुकताच वाचण्यांत आला. अमेरिकेंतील नीग्रोद्वेष प्रसिद्ध आहे. हिटलरला युद्धगुन्हेगार म्हणून कोणती शिक्षा द्यावी असें एका तरुण मुलीला विचारलें असतां तिनें झटकन् उत्तर दिलें, "करा त्याला काळा नि राहूं दे त्याला अमेरिकेंत!"

युद्धसमाप्ती झाली नाहीं तोंच बेकारीचा बकासूर सर्वत्र डोकावूं लागला आहे. हिंदुस्थानबाबत डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव म्हणतात, "ज्यांचे श्रम राष्ट्रीय उत्पादन वाढविण्याच्या कामीं उपयोगी पडणार नाहींत त्यांना त्यांच्या युद्धकालीन नोकरीवरून कमी केलें पाहिजे. हा एक कठीण प्रश्न आहे खरा; पण राष्ट्राच्या नि युद्धकालीन नोकरवर्गाच्या दृष्टीनें त्याला जितकें लौकर तोंड लागेल तेवढें बरें." रोजगार टिकविणें नि रहाणीचें मान वाढविणें हे जागतिक प्रश्न आहेत. ते आंतरराष्ट्रीय सहकारानें सोडवावयाचे आहेत. तथापि ह्या विशाल भूमिकेवरून ते सोडविण्याचें प्रमुख राष्ट्रांचे प्रयत्न चाललेले आहेतच असें म्हणवत नाहीं. अमेरिकन उद्योगपतींना व्यापारी साम्राज्याचीं स्वप्नें पडत आहेत, तर ब्रिटन आपला हिंदुस्थानांतील व्यापार टिकवून तो वाढविण्याची पराकाष्ठा करीत आहे. देशांतील धडधाकट काम करणाऱ्या प्रत्येक इसमास काम मिळेल तेव्हांच खरा बेकारीचा प्रश्न सुटणार आहे.

चालू नि उगवत्या पिढीचे आज-उद्याचे प्रश्न हे असे आहेत.

—संजय

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद.
गोकाक १२-१०-४५ ते २५-१०-४५
नागपूर दि. ५-१०-४५

व्याज-वजा (xd)
+डाइंग रु. २५ दि. २७-९-४५
†टाटा स्टील रु. १२९-८-९ } १-१०-४५
रु. २३-०-० }
गोंकाक मिल्स रु. ५ दि. २९-१०-४५
नागपूर मिल्स रु. ९S दि. ६-११-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संचित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २५।९।४५ | बुधवार २६।९।४५ | गुरुवार २७।९।४५ | शुक्रवार २८।९।४५ | सोमवार दि. १।१०।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २३९२—८ | २३८८-१२ | २३७८-१२ | २३८२—८ | २२२८-१२† |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४४२—० | ४४३—० | ४४१—० | ४४१—८ | ४१६—८† |
| २२०१; १६९५ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २०१३-१२ | २०१५—० | १९८५-०+ | १९८८-१२ | १९५०—० |
| ७६५; ५३३ | ९---०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६१८—० | ६१९—० | ६१७—८ | ६२०—० | ६१३—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५७६—० | ५७३—० | ५७२—० | ५७३—० | ५६१—० |
| ४९८; ३६१ | ९-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४०५—० | ४०५—० | ४०४—० | ४०८—० | ४००—८ |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २९४—० | २९३—० | २९०—० | २८९—० | २८७—० |
| ३९४; २८२ | ५-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०४—० | ३०३—० | ३०३—० | ३०४—८ | ३००—० |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३०७—८ | ३०६—० | ३०४—० | ३०४—८ | २९४—० |
| २-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-१-० | ४-१-० | ३-१५-० | ३-१५-० | ३-१५-९ |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-५-० | १४-३-६ | १४-१-० | १४-०-० | १३-१३-० |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | २-१५-० | २-१४-६ | २-१३-६ | २-१३-६ | २-१३-० |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७११—४ | ७२६—४ | ७१६—४ | ७१६—४ | ७०८-१२ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२३—४ | २२२—० | २२०—८ | २२०—८ | २१८-१२ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२७—० | २२६—८ | २२६—८ | २२५—० | २२५—० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५६७—८ | ५६५—० | ५६२—८ | ५६२—८ | ५५५—० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३८—४ | ३८—२ | ३७-१४ | ३७-१३ | ३८-० |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२—३ | १०२—३ | १०२—३ | १०२—३ | १०२—३ |

आंध्रा व्हॅली रु. ३७-८S दि. १०-१०-४५ टाटा हायड्रो रु. ४-८-०S दि. २६-९-४५ टाटा ऑइल रु. २-१.२ दि. २०-१०-४५
बॉम्बे ट्रॅम रु. २-८-०† दि. २३-१०-४५ टाटा पॉवर रु. ४०-०-०S दि. १७-१०-४५

सोमवार दि. १-१०-४५ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०२—५-० | बरोडा | १४३—० | आंध्रा व्हॅली | १८२७—८ | अलकॉक | ४०७—८ |
| १९५१-५४ | १०१—९-० | सेंट्रल | ८५—० | बॉम्बे ट्रॅम | १४८—४ | बॉंबे स्टीम | ६०५—० |
| १९५७ | १००—६-० | इंडिया | १९४—० | टाटा हायड्रो | २०३—०† | न्यू इंडिया | ८५—० |
| १९६३-६५ | ९९—६-० | इंपी० | २२२०—० | टाटा पॉवर | १८८५—० | शिवराजपुर | ५१—० |
| १९६६-६८ | ९८-१०-६ | | ५६७—८ | | | टाटा केमिकल | १८—४ |
| | | रिझर्व्ह | १४०—० | | | टाटा ऑईल | ७२—० |
| | | युनियन | ९—२ | | | | |

मंगळवार, दि. २-१०-४५ ला म. गांधी जयंतीनिमित्त बाजार बंद.

# स्फुट विचार

## डॉलर-स्टर्लिंग रस्सीखेंच

पहिल्या महायुद्धाचे अखेरीस अमेरिकेनें जगांतील सर्वांत मोठें धनको राष्ट्र ही पदवी मिळवली. आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याची वजावाट करण्याचें लंडन हें जगद्विख्यात केंद्र होतें, त्याची जागा न्यूयॉर्कनें घेतली आणि ब्रिटिश पौंड स्टर्लिंगला अमेरिकन डॉलरनें खो देऊन त्याची जागा पटकाविली. जागतिक व्यापारांतला आपला पूर्वीचा अग्रतेचा मान पुन्हां मिळवण्याचा प्रयत्न इंग्लंडनें केला, पण तो म्हणण्यासारखा यशस्वी झाला नाहीं. दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस स्टर्लिंग आणि डॉलर ह्यांचा झगडा पुन्हां चालू झाला आहे. जगांतील निरनिराळ्या चलनांच्या परस्पर-संबंधांत स्थैर्य रहावें आणि त्या योगानें जागतिक व्यापार पुन्हां सुरळीत चालून सर्व राष्ट्रांच्या आर्थिक पुनरुज्जीवनास सहाय व्हावें ह्या हेतूनें ब्रेटनवुड्स परिषदेंत एक आंतरराष्ट्रीय चलन-निधी व जागतिक बँक स्थापण्याचें ठरलें. पण इंग्लंड आणि अमेरिका ह्यांचे दरम्यान स्टर्लिंग व डॉलर ह्यांच्या परस्पर संबंधाविषयींची योजना निश्चित झाल्यावांचून ह्या बाबतींत पुढें पाऊल पडूं शकत नाहीं. इंग्लंडला उसनवारीनें माल पुरवण्याचें अमेरिकेनें बंद केलें आणि रोख डॉलर देऊन माल घ्या असा आग्रह धरला. इंग्लंडला वर्ष-दोन वर्षेपर्यंत अमेरिकन मालाच्या आयातीचें विशेष अगत्य आहे; पण हिंदुस्थान, इजिप्त इत्यादि देशांचें जबर देणें झाल्यामुळें त्याचेजवळ डॉलर हुंड्या नाहींत, आणि उलट धनको राष्ट्रांनीं कर्जफेडी विषयीं निकड लावली आहे. अशा परिस्थितीमधून मार्ग कसा काढावा ह्यासंबंधानें अमेरिकेंत वाटाघाटी चालू आहेत आणि ब्रिटिश व अमेरिकन तज्ञ आपापली बाजू जोरानें पुढें मांडीत आहेत. इंग्लंडनें अमेरिकेंत अल्प व्याजाच्या दरानें कर्ज काढावें आणि डॉलर्सची गरज भागवावी अशी सूचना करण्यांत आली आहे, तिचा विचार चालू आहे. हिंदुस्थान वगैरे देशांचें देणें इंग्लंडला झालें आहे तें त्यानें कमी करावें व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत व्यापारावरील आपलें नियंत्रण शिथिल करावें इत्यादि सूचनांचे विरुद्ध अमेरिकेच्या सहायावांचून आपण आपल्या व्यापाराची नीट व्यवस्था लावूं आणि स्टर्लिंगचें स्थान दृढ करूं अशी निर्वाणीची भाषा ब्रिटिश मुत्सद्दी बोलत आहेत; पण तडजोडीनें कांहीं तरी निर्णय सध्याच्या वाटाघाटींतून निघेल अशी आशा वाटण्यास जागा आहे. आपल्या स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगाविषयींची काळजी हिंदुस्थानास लागली असल्यानें वरील निकालाकडे त्याचे डोळे लागून रहाणें स्वाभाविक आहे.

## रेलवे आणि कालवे

पंचेचाळीस वर्षांमागें हिंदुस्थानांत दोन भयंकर दुष्काळ पडले आणि लॉर्ड कर्झन व्हाइसरॉय असतांना असल्या आपत्तींवर उपाय म्हणून, कालव्यांच्या पाण्याच्या व्यवस्थांचा विस्तार करण्याचें इरिगेशन कमिशनच्या शिफारसींवरून ठरलें. रेल्वेजच्या सहायानें दुष्काळाचे प्रसंगीं धान्य देशाच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत नेतां येऊन जनतेची उपासमार थांबवण्यांत येते हा या वहातुकीच्या साधनाचा फायदा आहे ह्या कल्पनेचा पगडा सरकारच्या मनावर कित्येक वर्षें होता. देशाच्या कांहीं भागांत चांगलीं पिकें यावीं, पण दुसरीकडे दुष्काळ पडावा अशा स्थितींत रेल्वेजचा धान्याच्या वाटणीचे कामीं उत्कृष्ट उपयोग होतो, यांत शंका नाहीं. पण कोरडवाहू जमिनीवर अवर्षण वा अपुरा पाऊस ह्यांचीं संकटें वारंवार येणें अपरिहार्य असल्यानें त्यांवर रेल्वेजचा उपाय प्रभावी होऊं शकत नाहीं. पाटबंधाऱ्यांच्या सहायानें शेतीस निश्चित पाणीपुरवठा होईल अशी व्यवस्था करणें हाच परिणामकारक तोडगा उपयोगांत आणला गेला पाहिजे असें लोकमत अनेकवार व्यक्त करण्यांत आलें होतें. लॉर्ड कर्झन ह्यांच्या इरिगेशन कमिशनचा ह्या लोकमतास दुजोरा मिळाला आणि कालव्यांच्या योजना हातीं घेण्याचें सरकारनें ठरवलें आणि निरनिराळ्या प्रांतांत पाटबंधाऱ्यांचीं कामें हातीं घेण्यांत आलीं. ह्यानंतर देशाच्या निरनिराळ्या भागांत अवर्षणें पडलीं तरी दुष्काळांची तीव्रता एकंदरीनें बरीच मर्यादित झाली. तरीहि केवळ पावसावर अवलंबून रहाणाऱ्या शेतीचें प्रमाण देशांत मोठें राहिलें आणि लोकसंख्येच्या वाढीबरोबर अन्नपुरवठ्याचा प्रश्न अवघड होत गेला.

## धान्याचा वाढता पुरवठा व कालवे

देशांतील अन्नधान्याचें उत्पादन लोकसंख्येच्या मानानें पुरेसें नाहीं असा सिद्धांत चोवीस वर्षांमागें हिंदुस्थान सरकारच्या आज्ञेवरून त्याचे एक तज्ञ अधिकारी, श्री. दत्त, ह्यांनीं केलेल्या चौकशीमधून निघाला. त्यांनीं तुलनात्मक आकडे देऊन असें दाखवलें होतें कीं पिकांखालचें क्षेत्र आणि धान्यांचें उत्पादन ह्यांचा विस्तार लोकसंख्येच्या प्रमाणांत वाढलेला नाहीं आणि त्यामुळें देशांत महागाईचा प्रसार झाला होता. सरकारनें विशिष्ट कारणें देऊन हा सिद्धांत अमान्य ठरवला. ह्यानंतर कित्येक प्रांतांत कालव्यांचीं नवीं कामें पुरीं करण्यांत आलीं आहेत. परंतु युद्धकालांतील अन्नाची टंचाई व बंगालमधील भयंकर दुष्काळ ह्यांनीं प्रस्तुत प्रश्नाकडे पुन्हां लक्ष आकर्षलें आहे आणि आर्थिक पुनर्रचनेच्या योजनांत कालव्यांच्या विस्ताराचें महत्त्व मान्य करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकांस पुरेसें अन्न खावयास मिळत नाहीं, आणि सकस अन्न तर नाहींच नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे आणि सरकारासहि पटली आहे. हिंदुस्थान सरकारचे पाणीपुरवठ्याचे तज्ञ सल्लागार, सर वुइल्यम स्टँप, ह्यांनीं सोसायटी ऑफ आर्ट्स ह्या लंडनमधील संस्थेच्या एका सभेंत बोलतांना, ह्या देशांत कालव्यांचा विस्तार आणि अन्नपुरवठ्यांत वाढ होण्याचें महत्व नुकतेंच प्रतिपादिलें. नद्यांस धरणें बांधून, कालव्यांतून शेतांस पाणी पुरवणें आणि त्याचबरोबर विजेचें उत्पादन करून खेडेगावांसहि ती पुरवणें ह्यांच्या आवश्यकतेवर त्यांनीं जोर दिला.

## बेळगाव बँक लि., बेळगाव

(वार्षिक सभा : ७।१०।४५)

वरील बँकेनें ३० जून १९४५ अखेर संपलेल्या वर्षी सर्वांगीण प्रगति केली आहे. तिचें खेळतें भांडवल २५१ लाखांवरून ३४ लाखांवर गेलें आहे. बँकेचें वसूल भांडवल २३ लक्ष रुपये आहे. बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलापैकीं सुमारें निम्मी रकम रोख, इतर बँकांत खात्यावर व सरकारी आणि तत्सम रोख्यांत, म्हणजे पूर्णपणें तरती आहे. बँकेनें अहवालाचे वर्षी धारवाड, शिरोडें, नरगुंद, चिपळूण व कणकवली येथें शाखा उघडल्या. आतां बँकेच्या एकुण १५ ठिकाणीं शाखा आहेत, त्यांपैकीं ९ बेळगांव जिल्ह्याचे बाहेर आहेत. ह्यावरून बँकेच्या कार्याच्या व्यापाची कल्पना येईल. बँकेनें अहवालाचे वर्षी कमिशनचे स्वरूपांत निवळ १७,००० रुपये मिळविले. वर्षअखेर बँकेस तिच्या व्यवहारांत १९,४१७ रुपये नफा उरला. त्यांतून करमाफ ६३% डिव्हिडंड देण्यास १०,४१९ रुपयांचा विनियोग करावा; ४,००० रुपये रिझर्व्ह फंडांत टाकावे व ४,००० रुपयांची इन्कमटॅक्ससाठीं तरतूद करावी, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. श्री. एन. रामराव हे बँकेचे चेअरमन व श्री. एच. एस. कुलकर्णी हे मॅनेजर आहेत.

## युद्धोत्तर मंदीचे अनिष्ट परिणाम टाळण्याची पूर्वतयारी

### मुं. प्रां. सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांचें वार्षिक सभेंत अध्यक्षीय भाषण

"युद्धजन्य गरज भागविण्यासाठी सरकारास मोठ्या प्रमाणावर खर्च करणें भाग पडलें. त्यासाठी चलनविस्तार आवश्यक झाला आणि त्याचा परिणाम शेड्यूल्ड व इतर बँकांकडील ठेवी वाढण्यांत झाला. युद्धकाळांत बँकिंगचें क्षेत्र अर्थातच विस्तार पावलें. युद्धविषयक उत्पादन कमी पडल्यावर चलनविस्तार आखडला जाईल व बँकांकडील ठेवी कमी होतील. बँकांच्या खऱ्या कसोटीची हीच वेळ आहे. बँकांचा कारभार भक्कम पायावर चालविण्याची आवश्यकता आतां विशेष आहे. बँकांनीं आपली मजबुती वाढवून गंगाजळींत भर टाकली पाहिजे आणि कांहीं नफ्यास मुकावें लागलें तरी त्यांनीं आपले पैसे तरते ठेवले पाहिजेत. खर्चाचें प्रमाण मर्यादेंत राखलें पाहिजे. बँकिंगच्या व्यवसायाचा सुदृढपणा चलनाच्या योग्य धोरणावरच अवलंबून रहाणार आणि चलनाचें धोरण सरकारी आर्थिक धोरणावर अवलंबून रहाणार, हें उघड आहे. संक्रमण काळांतून व्यवस्थितपणें पार पडतां यावें आणि किंमती, विशेषतः शेतीच्या मालाच्या किंमती ढासळून जाऊं नयेत ह्या दृष्टीनें सरकारी खर्चानें राष्ट्रसंवर्धक योजना हातीं घेऊन पार पाडण्यांत आल्या पाहिजेत. हिंदी जनतेची रहाणी अगदींच कनिष्ठ दर्जाची असून लोकांना पोटभर खावयास मिळण्याचीहि पंचाईत आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेचा प्रश्न हा हिंदी लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न असून, युद्धांत स्वसंरक्षणासाठी जितकें आपण कसून झटतों, तितक्याच कसोशीनें तो सोडविण्याची आपण कोशीस केली पाहिजे.'

"गेल्या वर्षी भुइमूग, कपास, गूळ, तांदूळ वगैरेचे भाव थोडेसे खाली घसरले. त्यांचा तुलनात्मक तक्ता येथें दिला आहे.

#### तुलनात्मक बाजारभाव

| | जून १९४० | जून १९४१ | जून १९४२ | जून १९४३ | जून १९४४ | जून १९४५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | |
| भुइमूग | १२/ | १०/ | १३/८ | .३५/ | २८/ | २७/ | प्रत्येक पल्ल्यास |
| कपास | ७२/ | ७५/ | ५७/ | १६०/ | ८०/ | ८०/ | प्रत्येक गाठीस |
| गूळ | १४/ | १०/ | २२/ | ४८/ | ४५/ | ३७/ | प्रत्येक पल्ल्यास |
| तांदूळ | ३/ | ४/ | ५/ | ७/ | ७/ | ७/ | प्रत्येक मणास |

"कांहीं ठिकाणीं बैल, खत, लोखंडी अवजारें, मजूर, इत्यादींच्या तुटवड्यामुळें शेतकामास व्यत्यय आला. विशेषतः महाराष्ट्रांतील उसाच्या लागवडीस त्यामुळें बराच अडथळा झाला. रहाणीचें मान व मजुरीचे दर हे सर्वत्र वाढले आणि त्याप्रमाणांत शेतीचें उत्पन्न घटलें. उतरते बाजारभाव व वाढता खर्च ह्यांच्या कात्रींत शेतकरी थोडेफार सापडले तरी त्यांनीं कर्जफेड व्यवस्थित केली, इतकेंच नव्हें तर कित्येक ठिकाणीं त्यांनीं प्रगतीबद्दल व नव्या प्रकारच्या सहकारी संस्था काढण्याबद्दल आस्था दाखविली. शेतकऱ्यास त्याच्या शेतींतील पिकाचा योग्य मोबदला मिळाल्याविना त्याची ही आस्था टिकणार नाहीं, हें उघड आहे. शेतीच्या मालाच्या किंमती योग्य पातळीवर राखण्याची आवश्यकता लवकरच तीव्रतेनें भासूं लागेल. कपाशीच्या बाबतींत ती आतांच निर्माण झालेली आहे आणि सरकारनें तिला थोडा फार आधारहि दिलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर आलेल्या मंदीचे काळांत शेतकऱ्यास स्वतःच्या जीविताची लढाई एकट्यासच लढावी लागली, त्याची पुनरावृत्ति टाळली पाहिजे."

## बोनसचें खरें स्वरूप कोणतें ?

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

इंडियन ह्यूम पाइप कं. लि. नें आपल्या कामगारांस १९४१, १९४२ व १९४३ सालांकरितां बोनस दिला परंतु १९४४ साला करितां बोनस देण्याचें नाकारलें. कंपनी व कामगार ह्यांचेमधील वांध्याचा निवाडा करण्यासाठी मुंबई सरकारनें श्री. नानावटी आय. सी. एस्. (रि.) ह्यांची नेमणूक केली. "बोनस ही केवळ स्वेच्छेनें आपण होऊन दिलेली देणगी आहे, सबब त्याला वांध्याचें स्वरूप देऊन निवाड्यासाठी तो पाठविण्याचा सरकारास अधिकार नाहीं, तेव्हां श्री. नानावटी ह्यांस ॲडज्युडिकेटर म्हणून काम करण्यास मनाई करावी", असा अर्ज कंपनीनें मुंबई हायकोर्टाकडे केला. "बोनस हा देणगीच्या स्वरूपाचाहि असूं शकेल व तो कायद्याप्रमाणें मागतां येण्याजोगाहि असूं शकेल; प्रस्तुत प्रकरणांत, पूर्वी केलेल्या कामाबद्दल तो देण्यांत यावयाचा होता, केवळ स्वेच्छेनें नव्हे. कामाच्या अटींशी त्याचा संबंध असल्यामुळें, तो ट्रेड डिस्प्यूट ॲक्टाच्या कलमांत बसतो, म्हणून मुंबई सरकारनें त्याचा प्रश्न ॲडज्युडिकेटरकडे सोपविण्यांत कांहींहि चूक केलेली नाहीं." असा न्यायमूर्तींनीं निवाडा करून कंपनीचा अर्ज नामंजूर केला.

## शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितीचे तुलनात्मक आकडे

(आकडे हजार रुपयांचे)

| | २१–९–१९४५ | १४–९–१९४५ | २२–९–१९४४ | १–९–१९३९ |
|---|---|---|---|---|
| १. हिंदुस्थानांतील मागणीबरहुकूम द्यावयाचें देणें | ६४५,५५,७८ | ६४४,७१,०६ | ५८६,८३,९३ | १३४,३६,४९ |
| २. हिंदुस्थानांतील मुदती देणें | २५४,२२,३३ | २५३,२६,२८ | १९०,५२,८४ | १०२,२४,३४ |
| ३. हिंदुस्थानांतील रोख शिल्लक | ३४,१६,४५ | ३४,३४,५९ | २६,६७,६७ | ६,६९,९२ |
| ४. रिझर्व्ह बँकेजवळ ठेव | १०९,११,४६ | ११३,९७,१८ | १००,०८,८२ | २५,१७,१९ |
| ५. हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | २४९,९१,९५ | २५२,८०,०१ | *२०२,३४,९६ | १०१,५२,१६ |
| ६. हिंदुस्थानांत डिस्कौंट केलेल्या हुंड्या | १३,३२,५५ | १३,६७,४७ | ९,०४,४३ | ३,५७,२९ |

# श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर

( भोर संस्थान )

अधिकृत भांडवल : १५ लाख रु.

विक्रीस काढलेले व खपलेले भाग : साडेआठ लाख रु.

—: बोर्ड ऑफ डिरेक्टर्स :—

श्रीमंत सरदार खंडेराव रामराव विंचूरकर, पुणें

श्री. गणेश रामचंद्र साठे
बिस्किट कारखानदार, पुणें.

श्री. हरीहर रामकृष्ण करंदीकर
लक्ष्मीरोड, पुणें.

श्री. दत्तात्रय बाळकृष्ण फाटक
पायोनियर डाईंग हाऊस, पुणें.

श्री. माधव गणेश देसाई
एस. एन. राजर्षी कं. मुंबई, वगैरे.

ही गिरणी १९४४ सालीं सुरू झाली. गिरणींत तूर्त फक्त सूत निघतें. भोर संस्थाननें या गिरणीला टेक्स्टाइल इंडस्ट्रीबद्दल भोर संस्थान हद्दीपुरती मोनापलीसारख्या खास सवलती दिल्या आहेत. भाटघर धरणानें उत्पन्न झालेल्या विजेच्या शक्तीवर ही गिरणी चालते. या मिलचे मॅनेजिंग एजन्टस दि भोर मरकंटाईल एजन्सी लि. ( भोर ) हे आहेत. या कंपनीचे सध्याचे डायरेक्टर, श्री. देसाई, फाटक व करंदीकर हे आहेत.

या गिरणीचे चालू भांडवलाकरितां व वाढीकरितां ठेवी घेणें आहेत. ह्याबद्दल चौकशी मॅनेजिंग एजंटस, दि भोर मरकंटाईल एजन्सी लि. भोर यांजकडे करावी.



प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

### दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर



## इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड

३७६ शुक्रवार, पुणें २

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात
दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे
( स्वतःचे डेपो : मुंबई--गोवा--बंगलोर--दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
---कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत---

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.
हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई
खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर
---शाखा---
स्थानिकः---१ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँट रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्ले, ७ माटुंगा.
इतरः---८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.
---बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात---
डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.
डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
---पुणें शहर---
[ टेलिफोन नं. ४८३ ]
बँकेच्या सुरक्षित सेफ डिपॉझिट व्हाल्टचा जरूर फायदा घ्या.
फक्त १ रुपयांत
आपल्या मौल्यवान जिनसा वगैरे भक्कम कप्प्यांत सुरक्षित ठेवा.
सुट्टीखेरीज केव्हांही उघडण्यांत येतें.
द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

१९४४ मधील प्रगति
---तुलनात्मक आंकडे---
१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर
विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.
दि ट्रस्ट ऑफ इंडिया
ॲश्युअरन्स कं. लि. पुणें.
मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.
अध्यक्षः---श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

---: साठे बिस्किटें :---
ऑरेंज व क्रूसकरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
---साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा घ. नं. १२४।११ पुणें शहर येथें [illegible]






REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १० आक्टोबर, १९४५ अंक ४१



सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

## आशा

Asha

### सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

**दि आयडिअल इन्स्टिट्यूट**

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

——कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.——

प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

पुणें शहर

शाखा—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर-रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

*चेअरमनः—श्री. के. व्ही. केळकर,* M. A., LL. B.

**एकूण खेळतें भांडवल रु. ३२ लाखांचेवर**

—: व्याजाचे दर :—

करंट ½ टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २½ टक्के.
कायम ठेवी २¾ ते ४½ टक्केपर्यंत ( मुदत ६ महिने ते ५ वर्षे )

शेअर विक्री चालू आहे.

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअरवर ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें.
- सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
- शॉर्ट टर्म डिपॉझिट्स् स्वीकारलीं जातात.
- मुंबई, नगर, नाशिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नी. ना क्षीरसागर,
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ४,५५,८७० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ४२,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे
मॅ. डायरेक्टर

## विविध माहिती

### पंजाबमधील होजिअरीचे कारखाने

पंजाब सरकारनें होजिअरीच्या निर्गतीस बंदी केल्यामुळें तेथील त्या मालाच्या कारखान्यांवर आपत्ती आली आहे. पंजाबमध्यें होजिअरीचा धंदा महत्त्वाचा असून, लुधिआना ह्या एकट्या केंद्रांत २२ कारखाने आहेत. त्यांत ७ हजार यंत्रें चालतात आणि ७५,००० लोकांचें त्या धंद्यावर जीवन अवलंबून आहे. सप्टेंबर ते डिसेंबर ह्या मोसमांत खपविण्यासाठी १ कोटि रुपयांचा माल पंजाबमध्यें अडकून पडला आहे.

### पोलादाचें उत्पादन दुप्पट झालें

हिंदुस्थानांतील पोलादाच्या कारखान्यांची उत्पादनशक्ति युद्ध-काळांत दुप्पट झाली आहे. १९४६ मध्यें पोलादाची कोणासच टंचाई भासणार नाहीं, अशी अपेक्षा आहे.

### कॅनडाचा कागद ग्रेट ब्रिटन घेणार नाहीं

ब्रिटिश सरकार वृत्तपत्रांच्या छपाईचा कागद कॅनडाकडून मागवीत असे. ही आयात थांबविण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार आहे. त्यामुळें कॅनडांतील हितसंबंधी लोकांस काळजी वाटूं लागली आहे.

### ब्रह्मदेशाकडे तांदळासाठी आशाळभूत नजर

बंगालमध्यें चालू मोसमांतील तांदळाचें पीक दरवर्षी इतकें किंवा गेल्या वर्षी इतकें भरणार नाहीं, असें अधिकृत रीत्या प्रसिद्ध झालें आहे. लौकरच ब्रह्मदेशांतून तांदूळ येऊं लागेल, अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे.

### स्फोटक द्रव्यांतील नैट्रोजनचें खत

युद्धसमाप्तीमुळें आतां निकामी झालेल्या स्फोटक द्रव्यांचा नाश करून टाकण्याऐवजी त्यांचा खताकडे उपयोग करण्यांत यावा, असें कलकत्ता विश्वविद्यालयांतील प्रो. मित्र ह्यांनीं सुचविलें आहे. स्फोटक द्रव्यांत पुष्कळसा नैट्रोजन असतो व तो खत म्हणून उपयुक्त असतो. स्फोटक द्रव्यांचा खत म्हणून उपयोग करण्यापूर्वी, त्यांची स्फोटक शक्ति नाहींशी केली पाहिजे हें उघड आहे.

### ५० कोटींच्या धरणांची योजना

बंगाल, बिहार, ओरिसा आणि संयुक्त प्रांत ह्यांस वीज पुरविण्यासाठी, शेतीस पाणी देण्यासाठी व पुरामुळें होणारें नुकसान टाळण्यासाठी दामोदर, शोण व महानदी ह्या नद्यांवर ५० कोटी रुपये खर्चून धरणें बांधण्यांत यावयाचीं आहेत. राणीगंजच्या कोळशाच्या खाणी कलकत्त्याशीं जोडण्याकरितां १०० मैलांचा एक कालवा खोदण्यांत यावयाचा आहे.

### गव्हाची आयात

मे ते सप्टेंबर १९४५ ह्या मुदतींत ३,००,००० टन गहूं परदेशांतून हिंदुस्थानांत आला.

### ५० पाहुण्यांस ११ दिवस परवानगी

पन्नासपेक्षा ज्यास्त पाहुण्यांना जेवण घालतां कामा नये, हा नियम दसरा, दिवाळी, ईद व गुरुनानक जयंती ह्या सणांस लागू न करण्याचें सिंध सरकारनें ठरविलें आहे. ह्या एकूण ११ दिवसांत दररोज ५० पेक्षा ज्यास्त पाहुण्यांस जेवण देतां येईल.

### हवामानाच्या प्रसिद्धीस परवानगी

हवामानाच्या प्रसिद्धीवरील युद्धकालीन सर्व नियंत्रणें आतां दूर करण्यांत आलीं आहेत.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ह्. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## औद्योगीकरणविषयक सरकारी धोरणावर प्रकाश

हिंदुस्थानच्या युद्धोत्तर औद्योगीकरणाचे बाबतींत अनेक बिन-सरकारी व सरकारी योजना प्रसिद्ध झालेल्या आहेत आणि त्या फलद्रूप होण्याचे संबंधांत इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत यंत्र-सामुग्री मिळण्याचा संभव किती आहे ह्याची चौकशी करण्या-साठी हिंदी कारखानदार तिकडे जाऊन आले. त्यांस आलेला अनुभव व परिस्थितीचें त्यांनीं केलेलें निरीक्षण ह्याची कल्पना ह्या कारखानदारांनीं जनतेस दिलीच आहे. हिंदुस्थान सरकारचे योजनाखात्याचे मंत्री, सर आर्देशीर दलाल, हेहि इंग्लंड व अमे-रिका ह्या देशांचा दौरा करून आले आहेत आणि त्यांनीं आपल्या तिकडील कामगिरीचा वृत्तांत औद्योगिक धोरणाचा विचार करण्या-साठी नेमलेल्या समितीस दिल्लीमध्यें नुकतांच सादर केला आणि तसें करतांना मध्यवर्ती सरकारच्या कार्यक्रमाची रूपरेखाहि पुढें मांडली. हिंदी राज्यघटना कायद्यांत ब्रिटिश भांडवलवाल्यांस ह्या देशांत विशिष्ट प्रकारचें संरक्षण देणारीं कलमें आहेत. तीं दूर झाल्यावांचून हिंदुस्थानचें औद्योगीकरण झपाट्यानें व समाधान-कारक रीतीनें होऊं शकणार नाहीं असें मत मध्यवर्ती असेंब्लीनें व्यक्त केलें होतें. त्यास अनुलक्षून सरकारच्या वतीनें सर आर्देशीर ह्यांनीं असें सांगितलें होतें कीं हे निर्बंध काढून टाकावयाचे असें म्हटल्यास घटना कायद्यांत दुरुस्ती करावी लागेल आणि हा गोष्ट व्यवहार्य नाहीं; तथापि आपण इंग्लंडला जाऊं तेव्हां तेथें साम्राज्य सरकाराशीं चर्चा करून ह्या अडचणींतून मार्ग काढ-ण्याचा प्रयत्न करूं. त्यांच्या ह्या संबंधांतील खटपटीस कांहींच यश आलेलें नाहीं ही गोष्ट त्यांनीं आतां स्पष्ट केली आहे. हिंदी राज्यघटनेंत महत्त्वाचे बदल करण्याचा सबंद वादग्रस्त प्रश्न सध्या चर्चिला जात असल्यानें घटना कायद्याच्या विशिष्ट कल-मांचा स्वतंत्र रीतीनें विचार होणें शक्य नाहीं असें उत्तर सर आर्देशीर ह्यांस मिळालें आहे. पण सध्याची घटना लवकर बद-लली गेली नाहीं आणि ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या दृष्टीनें तीमध्यें अंतर्भूत झालेले हिंदुस्थानच्या आर्थिक स्वातंत्र्यावरील निर्बंध तसेच राहिले तर त्यांचा देशाच्या औद्योगीकरणास अडथळा आल्यावांचून रहावयाचा नाहीं असें विधान त्यांनीं प्रांजलपणानें केलें आहे. देशाची आर्थिक उन्नति राजकीय प्रगतीवर कशी अवलंबून आहे हें त्यावरून उघड होत आहे.

सरकारच्या स्वतःच्या औद्योगिक कार्यक्रमासंबंधानें बोलतांना योजनामंत्री म्हणाले कीं व्यापारी आणि आरमारी उपयोगाचीं जहाजें बांधण्याचा धंदा प्रस्थापित करण्याचा त्याचा विचार [illegible]ला आहे. तसेंच, व्यापारी व लष्करी विमानें तयार कर-ण्याचा धंदाहि सरकार हातीं घेईल. मोठ्या आणि मध्यम आका-राच्या धंद्यांस भांडवल पुरवण्याच्या हेतूनें एक संस्था निर्माण केली जावयाची आहे. ह्या संबंधांतली कल्पना अशी आहे कीं मोठ्या भांडवलाची व विस्तृत प्रमाणावर पैसा उभारण्याचा अधिकार असलेली एक औद्योगिक बँक स्थापावयाची: आणि तिचें भांडवल सरकार, रिझर्व्ह बँक व विमा मंडळयांसारख्या संस्था ह्यांनीं मिळून उभारावयाचें. ह्या बँकेच्या योजनेचा तप-शील रिझर्व्ह बँकेनें सरकारच्या विचारानें निश्चित करावयाचा असें ठरलें आहे. लहान व खेडेगावी धंद्यांस भांडवल पुरवण्यासाठी नियोजित मोठ्या मध्यवर्ती बँकेच्या धर्तीवर प्रत्येक प्रांतांत संस्था स्थापण्यांत यावयाच्या आहेत. युद्धकाळांत निघालेल्या नवीन धंद्यांच्या सरकारी सहायासाठी मागण्या येतील त्यांची छाननी करण्यासाठी एक टारिफ बोर्ड नेमण्यांत येत असल्याचेंहि सर आर्देशीर ह्यांनीं सांगितलें. स्वतःस पाहिजे असलेल्या यंत्रसामु-ग्रीच्या मागण्या धंदेवाल्यांनीं सरकारकडे नोंदवाव्या असें त्यांस मागें कळवण्यांत आलें होतें. त्यास अनुसरून सुमारें पस्तीस कोटि रुपये किंमतीच्या यंत्रांचे बाबतींत ६५१ अर्ज सरकाराकडे आल्याविषयींची माहिती त्यांनीं दिली.

ह्या सर्व निवेदनाचा मथितार्थ असा दिसतो कीं सरकारचें औद्योगिक धोरण अजून चर्चेच्या व विचाराच्या मर्यादेपलीकडे गेलेलें नाहीं. युद्ध संपतांच औद्योगिक अभिवृद्धीच्या योजना हातीं घेतां याव्या ह्या हेतूनें त्यांची जय्यत तयारी ठेवण्याचा सरका-रचा संकल्प होता. परंतु हें उद्दिष्ट सफल होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी असल्याचें आणि तें लांबणीवर पडत असल्याचें सर आर्देशीर ह्यांच्या निवेदनावरून स्पष्ट दिसतें. राज्यघटनेंत इष्ट असलेला बदल झालेला नाहीं; लोकांस जबाबदार असलेलें मध्यवर्ती मंत्रिमंडळ लवकर अस्तित्वांत येत नाहीं; औद्योगीकरणास आवश्यकता असलेली ब्रिटिश व अमेरिकन यंत्रसामुग्री मिळण्यास बराच काळ लोटला पाहिजे; डॉलर हुंड्या कारखानदारांस मिळणें सोपें नाहीं आणि त्यासाठी त्यांस अमेरि-केंत तात्पुरतीं कर्जें काढावीं लागतील; स्वित्झर्लंड व स्वीडन ह्या देशांत कांहीं यंत्रसामुग्री उपलब्ध होण्यासारखी आहे, पण तेथेंहि परराष्ट्रीय हुंड्यांची अडचण आहेच; ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा ह्या देशांत कांहीं यंत्रें मिळण्यासारखीं आहेत आणि तेथें सर-कारची चौकशी चालू आहे; युद्धकाळांत विस्तार पावलेली पण आतां नवी असलेली अशी वाटेल तेवढीं यंत्रें अमेरिकेंत विकाऊ आहेत आणि त्यांपैकीं कित्येक हिंदुस्थानासाठी खरीदतां येतील; सरकार ह्यासंबंधांत तज्ञांकडून चौकशी करणार असून गरजू हिंदी कारखानदारांनीं त्यांच्याशीं सहकार्य करावें अशी सर आर्देशीर ह्यांची सूचना आहे. वरीलप्रमाणें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाच्या योजनांचा आणि त्यासंबंधांतील सरकारनें केलेल्या कामगिरीचा त्यांनीं वाचलेला पाढा फारसा उत्साहजनक नाहीं ह्याची जाणीव स्वतः त्यांसच असावी असें वाटतें.

---

### युरोपांतील दुष्काळ

येत्या हिवाळ्यांत युरोपमधील सुमारें ३०. लक्ष लोक अन्नाचे अभावीं मरण पावतील व त्यांपेक्षां अधिक लोकांची उपासमार होईल, असा ब्रिटिश तज्ञांचा अभिप्राय आहे. जरी ह्या हिवाळ्यां-तील अन्नाचा तुटवडा कसाबसा भरून काढला, तरी पूर्ववत् परि-स्थिति येण्यास किमान १० वर्षें लागतील, असें त्यांचें म्हणणे आहे. खुद्द ग्रेट ब्रिटनलाहि अन्नांत थोडी काटकसर करावी लागेल.

### नुकसानभरपाईच्या वसुलींत हिंदुस्थानाचा वाटा

शत्रुराष्ट्रांकडून नुकसानभरपाई वसूल करण्यांत येत आहे त्यांत हिंदुस्थानासहि योग्य वाटा मिळाला पाहिजे, असा मद्रासचे पूर्वीचे मुख्य प्रधान, बोबिलीचे राजे, ह्यांचा आग्रह आहे. जपान मधून कापडाच्या ४० गिरण्या हिंदुस्थानांत आणाव्या, अशी त्यांची सूचना आहे.

## युद्धकालीन निर्बंध लवकर दूर करा

### महाराष्ट्र चेंबरच्या तपशीलवार सूचना

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई या संस्थेनें हिंदुस्थान सरकारला युद्धकालांत अमलांत आणलेले व्यापार, उद्योगधंदे व इतर बाबतींतील निर्बंध दूर करण्याबाबत एक सविस्तर पत्र लिहिलें असून त्यांत सर्व संलग्न हितसंबंधाचे दृष्टीनें विचार करून हे निर्बंध शक्य तो लवकर क्रमाक्रमानें दूर करणें इष्ट आहे असें म्हटलें आहे. सरकारनें आजपर्यंत या बाबतींत केलेला उपक्रम आपणांस मान्य असून शेती व उद्योगधंदे यांचें उत्पादन वाढविण्याकरितां सप्लाय डिपार्टमेंटकडे असलेलीं निरनिराळया तऱ्हेचीं यंत्रें व ट्रॅक्टर्स सरकारनें अनुक्रमें उद्योगधंदेवाल्यांना व महाराष्ट्रांतील साखरेच्या कंपन्यांसारख्या कंपन्यांना व इतर मोठ्या प्रमाणांवर शेती करणाऱ्यांना द्यावीं अशी सूचना चेंबरनें केली आहे. तसेंच राष्ट्रीय व्यवहारांत शक्य तितका कमी बिघाड होईल अशा रीतीनें सप्लाय डिपार्टमेंटकडे असलेल्या वस्तूंचा साठा बाजारांत येईल असें करणें व त्यांचें वाटप शक्य तितकें व्यवस्थितपणें होऊन त्या सत्वर व सुलभ रीतीनें जनतेला मिळतील यासंबंधींच्या सरकारी धोरणाला चेंबरनें आपला पाठिंबा दिला आहे. या बाबतींत चेंबरनें हिंदुस्थान सरकारच्या विचारासाठी पुढील निश्चित सूचना केल्या आहेत:—

१. हिंदी उद्योगधंद्यांना बाधक होणारे आयातीवरील निर्बंध शक्य तितक्या लवकर दूर करावेत. उदाहरणार्थ, इलेक्ट्रिक बल्बज्‌ना लागणाऱ्या फिलॅमेंट्स सारख्यांची आयात सध्यापेक्षां जास्त करण्यांत यावी.

२. रंग व रासायनिक द्रव्यें यांची आयात वाढविण्यांत यावी.

३. (अ) देशांत पुरून उरणाऱ्या कच्च्या मालाचे निर्यातीस उत्तेजन द्यावें.

(ब) अन्नधान्याची हल्लीची असमाधानकारक परिस्थिति चालू असेपर्यंत या देशांतून अन्नधान्यांची निर्यात मुळींच करण्यांत येऊं नये.

४. गुळाचे वहातुकीवरील निर्बंध दूर करण्यांत यावेत. तसेंच देशांत उत्पन्न होणाऱ्या आयुर्वेदिक, युनानी व इंग्रजी पद्धतीचे औषधांचे बाबतींत वहातुकीचे असलेले निर्बंध—रेल्वे बुकिंगबाबतचे—दूर करण्यांत यावेत.

५. जोपर्यंत पदार्थांच्या किमान किंमती निश्चित केल्या जात आहेत तोपर्यंत जीवनाचा खर्च हळूहळू कमी व्हावा म्हणून त्या उतरविण्यांत याव्यात.

६. बांधकामाला लागणाऱ्या वस्तूंवरील नियंत्रण ताबडतोब काढून टाकण्यांत यावें.

७. येथें न होणाऱ्या सामान्यतः आवश्यक असणाऱ्या आयात पदार्थांच्या किंमती अशा रीतीनें ठरवण्यांत याव्या कीं त्यांना तशा प्रकारच्या येथें उत्पन्न होणाऱ्या मालाशीं घातुक स्पर्धा करतां येऊं नये.

८. युद्धकालांत सुरू झालेल्या पण ज्यांस अद्यापि संरक्षणाबद्दल सरकारनें आश्वासन दिलेलें नाहीं अशा उद्योगधंद्यांना साहाय्य करण्यांत यावें. कारण त्यामुळें उद्योगधंदे वाढून त्याबरोबर लष्करांतून वगैरे मोकळे होणारांना काम मिळणें सुलभ होऊन बेकारी तीव्र होणार नाहीं.

९. विद्युत् कंपन्यांवरील निर्बंध लवकर नाहींसे करावेत.

१०. युद्धामुळें निरनिराळ्या देशांतून येथें आश्रयार्थ आलेल्या निर्वासितांची पुन्हा त्यांचे स्वतःच्या देशांत सत्वरतेनें रवानगी करण्यानें व युरोपियन सैनिकांच्या प्रयाणानें येथील व्यवहार सुधारण्यास मदत होणार आहे.

११. निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील नोकरांना देण्यांत येणारा महागाई-भत्ता एकदम न थांबवतां हळूहळू कमी करण्यांत यावा अशाबद्दल खबरदारी घ्यावी.

## मध्यमवर्गीय लोकांच्या संक्रमण कालांतील अडचणी

### बचत, उत्पन्नांत वाढ व सहकारी व्यवसाय ह्यांचा अवलंब करा

" जागतिक युद्धाची समाप्ति झाली असली तरी युद्धपरिस्थिति तात्काळ निवळणार नाहीं आणि मासिक प्राप्तीवर मुख्यतः अवलंबून असणाऱ्या लोकांना संक्रमणकाल फार बिकट जाईल. म्हणून, किंमतींचें मान बरेचसें खाली जाईपर्यंत शक्य तेवढा खर्च प्रत्येकानें टाळणें आवश्यक आहे. वाचेल तो प्रत्येक रुपया चांगल्या तऱ्हेनें गुंतवून भविष्यकालीन गरजेची तरतूद केली पाहिजे.

" मध्यमवर्गीय कुटुंबांच्या अडचणी केवळ बचतीनें व काटकसरीनें नाहींशा होणें शक्य नाहीं. तेव्हां, प्रत्येक कुटुंबाची प्राप्ती वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत आला पाहिजे. कुटुंबांतील मंडळींनीं रिकाम्या वेळांत रोजच्या गरजेच्या वस्तू तयार करून विकण्यास प्रोत्साहन देण्याकरितां कच्च्या मालाचे खरेदीसाठी बिनव्याजीं लहान कर्जें देण्यास बँकेनें प्रारंभ केला आहे. प्रत्येक रविवारीं संध्याकाळीं ५ ते ७ त्या वस्तूंची बँकेच्या इमारतींत विक्री करण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्या योजनेंतून स्त्रियांनीं स्वतंत्रपणें चालविलेले सहकारी मोठे उद्योगधंदे निर्माण होतील, अशी आशा आहे. ":—श्री. व्ही. पी. वर्दे, चेअरमन, सारस्वत को. बँक, ह्यांचें अध्यक्षीय भाषण.

### रबरी धंद्यांत रेयॉनचा उपयोग

गुडयिअर टायर अँड रबर कंपनीनें मोटार टायरमध्यें रेयॉन वापरण्याचे प्रयोग करून त्यांत यश मिळविलें आहे. रेयॉनमुळें टायर अधिक मैल टिकेल अशी अपेक्षा आहे.

**RESERVE BANK OF INDIA**
**CENTRAL OFFICE**
**BOMBAY**

## NOTIFICATION

No. 27 1st October 1945

Under Regulation 6 A of the Reserve Bank of India General Regulations, it is hereby notified that for the purpose of the election of the Local Board, Western (Bombay) Area, the Share Register of the Bank for the said Area shall be closed and the registration of transfers shall be suspended from the 15th October, 1945 to the 23rd November, 1945 (both days inclusive).

WAJAHAT HUSSAIN,
Deputy Governor.

# स्फुट विचार

## परराष्ट्रमंत्र्यांची परिषद वांझोटी ठरली

युद्धसमाप्तीनंतर शांतता स्थापनेंत जय मिळवणें, युद्धांत जय मिळवण्याइतकेंच कष्टमय पण अगत्याचें आहे, असें मित्रराष्ट्रांतील प्रमुख मुत्सद्दी म्हणत आले आहेत, त्या विधानाची सत्यता सध्या जगांत चालू असलेल्या राजकीय व आर्थिक धडामोडीवरून सहज पटण्यासारखी आहे. युरोपांत व पूर्व एशियांत जर्मनी व जपान ह्यांनीं पादाक्रांत केलेल्या आणि त्यांच्या ममरमिठींतून सोडवलेल्या देशांचे परराष्ट्रीय संबंध व अंतर्गत घटना निश्चित करणें हें प्रमुख विजयी राष्ट्रांचें प्रथम कर्तव्य आहे आणि अशा रीतीनें सहविचारानें ठरलेल्या व्यवस्थेच्या पायावर पुढील शांततेची व प्रगतीची उभारणी व्हावयाची आहे. युरोप खंडांतील घडी बसवण्यासाठीं करावयाच्या योजनेचें बीज पॉटसडॅम येथें करण्यांत आलेल्या निर्णयानें पेरलें गेलें आणि इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स व चीन ह्या राष्ट्रांच्या परराष्ट्रीय मंत्र्यांनीं हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया व इटली इत्यादि राष्ट्रांशीं व्हावयाच्या तहांचें स्वरूप एक परिषद भरवून तीमध्यें निश्चित करावें असें ठरलें. त्याप्रमाणें लंडनमध्यें तीन आठवडेपर्यंत परराष्ट्रमंत्र्यांची परिषद चालून तीमध्यें अनेक विषयांचा खल झाला. परंतु कार्यक्रमाच्या व निर्णयाच्या पद्धतीसंबंधांतच तीव्र मतभेद उत्पन्न होऊन कोणतीहि योजना अधिकृत रीतीनें निश्चित न करतां परिषद बंद झाली. हा प्रथम ग्रासे मक्षिकापात झाला आहे. त्याची जबाबदारी रशियन प्रतिनिधींनीं परिषदेंतील आपल्या सहकाऱ्यांवर टाकली आहे आणि वादग्रस्त प्रश्नांचा समाधानकारक निकाल लावण्यासाठीं मित्रराष्ट्रांच्या मुख्य प्रधानांची बैठक होण्याची आवश्यकता प्रतिपादण्यांत येत आहे. कित्येक प्रश्नांशीं चीन व फ्रान्स ह्यांचा प्रत्यक्ष संबंध नसल्यानें त्यांचें विषयींच्या निर्णयांत सदरहु राष्ट्रांस सहभागी होण्याचें प्रयोजन नाहीं असा रशियाचा आग्रह असून तो पॉटसडॅमच्या निर्णयास धरून आहे असें त्यांचें म्हणणें आहे. ह्याच्या उलट, सर्व प्रमुख राष्ट्रांच्या अनुमतानें सर्व प्रश्नांचा निकाल लावण्यांत यावा असा अमेरिका वगैरे राष्ट्रांचा युक्तिवाद असून लंडन परिषदेच्या ठरलेल्या कार्यक्रमास तो अनुसरून असल्याचें तीं सांगत आहेत. ह्या अनिष्ट पेचांतून लवकर मार्ग काढला जाणें अगत्याचें आहे, कारण त्यावर जागतिक शांततेचें भवितव्य अवलंबून आहे.

## जागतिक पुनर्घटनेच्या प्रसूति वेदना

पूर्व एशियांत जपानच्या तडाख्यांतून सुटलेल्या देशांत शांततेची पुनःस्थापना करण्याचा प्रश्न असाच महत्त्वाचा आहे. जपानचें भवितव्य निश्चित करण्याचे बाबतींत आपणांस सहभागी करण्यांत आलें पाहिजे असा रशियाचा आग्रह असून अमेरिकेस त्यास मान द्यावा लागेल. तसेंच, जाव्हा, फ्रेंच इंडोचायना इत्यादि डच व फ्रेंच वसाहतींची व्यवस्था लावली जाईल तीमध्यें तेथील रहिवाशांच्या राजकीय हक्कांविषयींच्या मागण्यांचा योग्य परामर्श घेतला जाणें आवश्यक झालें आहे. टिन, रबर, साखर, राकेल इत्यादि अत्यंत महत्त्वाचा माल ह्या देशांत उत्पन्न होतो आणि जागतिक पुरवठ्यांत त्यास जिव्हाळ्याचें स्थान आहे. हे प्रदेश युरोपिअन राष्ट्रांच्या वसाहती असून त्यांतील धंद्यांत त्यांचें पुष्कळ भांडवल गुंतलेलें आहे. स्थानिक जनता बहुतेक मजूर पेशाची असून जपानच्या पराभवानंतर तिला पुन्हां ह्याच दर्जावर काम करावें लागणार आहे. ह्या सर्वस्वी परावलंबी स्थितींत राहण्यास, युद्धाच्या अनुभवानंतर, वसाहतवाले तयार नाहींत आणि फ्रेंच व डच राज्यकर्त्यांशीं, ते स्वतःची सत्ता पुन्हां प्रस्थापित असतां, त्यांचे खटके उडत आहेत. हें युद्धोत्तर खळबळीचें व जागृतीचें लक्षण आहे आणि तें जागतिक सुस्थितीच्या दृष्टीनें हिशेबांत घेतलें गेलें पाहिजे. आफ्रिकेंत अशाच प्रकारचे प्रश्न उद्भवले आहेत. इजिप्तची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी आहे आणि अरब राष्ट्रें संघटित झालीं आहेत. पॅलेस्टाइनमधील परिस्थिति अधिक चिघळल्यासारखी दिसत आहे. ज्यू व अरब ह्यांच्या हितसंबंधाचा मेळ घालण्याचा नाजुक प्रश्न तेथें भिजत पडला आहे आणि अमेरिका व इंग्लंड ह्यांचेंहि त्याविषयीं एकमत असल्याचें दिसत नाहीं. हिंदुस्थानांतील राजकीय लढा अजून सुटावयाचाच आहे. उधार–उसनवारीची व्यवहार पद्धति अमेरिकेनें बंद केल्यामुळें इंग्लंडचा आर्थिक कोंडमारा झाला आहे. त्या बाबतींत ह्या दोन देशांत वाटाघाटी चालू आहेत, त्यांमध्यें तीव्र मतभेद प्रकट केले जात आहेत. ह्याचवेळीं, युद्धानें उध्वस्त झालेल्या युरोपिअन व एशियाटिक देशांत अन्नवस्त्राचा पुरवठा केला जाऊन तेथील जनतेस जगवण्याची कठिण जबाबदारी पार पाडली जावयाची आहे. मूलग्राही प्रश्नांचे बाबतींत पुढारी व प्रबळ राष्ट्रांचें परस्परांशीं प्रारंभींच जमेनासें झाल्यास जागतिक पुनर्घटनेचें कार्य त्यांचे हातून कसें पार पडणार ?

## साखर स्वस्त केव्हां होणार ?

एका बाजूस क्यूबा आणि दुसऱ्या बाजूस जाव्हा असे हे दोन देश जगास साखर पुरवण्यांत अग्रगण्य आहेत. जाव्हा जपानच्या ताब्यांत गेल्यानें तेथील कारखान्यांची साखर जागतिक पुरवठ्यांतून गळली. अर्थात् त्या कारणानें तिचा सर्वत्र तुटवडा भासूं लागला. हातीं आलेल्या ताज्या बातमीवरून असें दिसतें कीं, जाव्हाची आतां मुक्तता झाल्यानें तेथील शिलकी साठ्यामधून दहा लक्ष टन साखर जगाच्या बाजारांत येऊं शकेल. हिंदुस्थानांत स्वदेशी साखर प्रतिवर्षी बारा लक्ष टनांपर्यंत तयार होत असतांना तिची वाटणी अपुरी व असमाधानकारक होत असल्याविषयीं लोकांची हाकाटी सारखी चालू आहे. साखरेचें एकूण जागतिक उत्पादन वाढेल तरच ह्या परिस्थितींत इष्ट सुधारणा घडून येईल. तथापि प्रसिद्ध झालेल्या अंदाजी माहितीवरून निदान आणखी एक वर्षपावेतों जागतिक पुरवठा अपेक्षित प्रमाणांत वाढेल असा रंग दिसत नाहीं. अमेरिकेंतील सरकारी शेती खात्याच्या अदमासाप्रमाणें १९४५–४६ सालीं १९४४–४५ सालाच्या मानानें साखरेच्या जागतिक उत्पादनांत थोडी वाढ होईल पण युद्धापूर्वीची स्वस्ताईची स्थिति पुन्हां येण्यास कित्येक वर्षे लोटावीं लागतील. १९४४–४५ मध्यें मित्र राष्ट्रांच्या टापूंतील प्रदेशांमधलें साखरेचें उत्पादन दोन कोटि टन भरेल. हा आकडा १९४३-४४ च्या मानानें ५ टक्यांनीं अधिक आहे. क्यूबामधील उत्पादन अपेक्षेपेक्षां थोडें कमी भरलें आहे आणि फ्रान्स, बेलजम वगैरे देशांत युद्धाच्या पूर्वीच्या काळाचें मानानें ४० टक्के एवढेंच उत्पादन झालें. ऑस्ट्रेलियांत उत्पादन कमी झालें आणि ग्रेट ब्रिटनमधील उत्पादनांत १५ टक्के घट झाली. पूर्वीच्या वर्षाचे मानानें १९४४-४५ मध्यें अमेरिकेनें थोडी अधिक साखर बनवली. जगांतील सर्व देशांमधले साखरेचे साठे संपले आहेत आणि युरोपांतील देशांतलें उत्पादन पूर्वस्थितीवर येण्यास थोडासा वेळ लागणें अपरिहार्य आहे. तेथें आणि जाव्हा बेटांत उत्पादनाची घडी नीट बसण्यावर साखरेच्या जागतिक पुरवठ्याची परिस्थिति बरीचशी अवलंबून आहे असा अमेरिकेंतील अधिकृत अंदाज आहे.

## महाराष्ट्रीय कंपन्यांचा औद्योगिक प्रगतीस संघटित हातभार

**न्यू सिटीझनचे श्री. देशपांडे ह्यांची वृत्तपत्रकारांबरोबर चर्चा**

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. भाऊसाहेब देशपांडे, ह्यांनीं शनिवार ता. ६ रोजीं आपल्या बँकेच्या पुणें शहर शाखेंत पुण्यांतील वृत्तपत्रांच्या संपादकांना व आणखी कांहीं प्रतिष्ठित गृहस्थांना निमंत्रण करून त्यांस स्वतःची महाराष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीच्या योजनेची पार्श्वभूमि समजावून सांगितली व त्यांचेबरोबर विचारविनिमय केला. परप्रांतीयांचें होणारें भांडवली आक्रमण थांबविण्यासाठी महाराष्ट्रीय बँका, विमा कंपन्या इत्यादींनीं सहकार्यानें व संघटितपणें भांडवल पुरविण्याचे प्रयत्न करणें कसें निकडीचें व आवश्यक आहे हें स्पष्ट करून त्यासंबंधांत जागृति निर्माण करण्याची त्यांनीं संपादकवर्गास विनंति केली. श्री. ल. ब. भोपटकर, श्री. दा. वि. गोखले, श्री. ह. मो. जोशी, श्री. न. गं. आपटे व शेवटीं अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर ह्यांनीं आपल्या भाषणांत "वृत्तपत्रकारांचे राजकीय पक्ष कोठलेहि असले तरी महाराष्ट्राच्या आर्थिक उद्धाराचे बाबतींत सर्वांची ओतप्रोत कळकळ, सहानुभूति व सहकार्य आहे" असें श्री. देशपांडे ह्यांस सांगितलें. श्री. देशपांडे हे आपली तपशीलवार योजना लवकरच प्रसिद्ध करणार आहेत, असें समजतें. बँकेच्या पुणें शहर शाखेचे एजंट श्री. मांढेकर ह्यांनीं सभेची व्यवस्था उत्कृष्ट ठेवली होती.

### हिंदी रेलवेजच्या विस्तार–योजना

युद्धोत्तर सुधारणांविषयींच्या हिंदी रेलवेजच्या योजनांची कांहीं माहिती हिंदुस्थान सरकारचे रेलवे मंत्री, सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं लंडनमध्यें अलीकडे केलेल्या एका भाषणांत दिली. त्याचप्रमाणें ह्या रेलवेजचा विस्तार कोणत्या रीतीनें करण्याचें घाटत आहे ह्याचेंहि जाहीर दिग्दर्शन नुकतेंच झालें आहे. दिल्ली हा मध्यबिंदू कल्पिला जाऊन उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत मीटर गेज रूळ आहेत ते एकमेकांस जोडले जाऊन त्यांचें सुसूत्र जाळें विणण्यांत यावयाचें आहे. राजपुताना, काठेवाड, गुजरात आणि संयुक्तप्रांत व बिहार ह्यांमध्यें मीटरगेजचे रूळ आहेत. त्याचप्रमाणें दक्षिणेकडे त्रावणकोरला व पुण्यास जोडणारेहि तसेच रूळ आहेत. हे सर्व एकसूत्री केले जाणार आहेत. तसेंच, सिंध आणि मुंबई ह्यांस सरळ जोडणारा रेल्वे रस्ता केला जाणार आहे. अर्थात, आज ह्या सर्व विस्ताराची अगोदर पहाणी व्हावयाची आहे. तूर्त हिंदी रेलवेजच्या पुढें तातडीचा प्रश्न आहे तो, युद्धांतून परत आलेल्या सैनिकांची त्यांमध्यें भरती करण्याविषयींचा आहे. ह्या लोकांसाठी सत्तर टक्के जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत आणि येत्या दोन वर्षांत पन्नास हजार सैनिकांची त्यांत तरतूद करतां येईल असा अंदाज आहे. पुढच्या तीन–चार वर्षांत आणखी हजारो सैनिकांच्या नेमणुका करतां येतील असा अंदाज आहे.

### सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि., बेळगांव

वरील बँकेच्या भागभांडवलांत गेल्या वर्षी ८,००० रुपयांची भर पडून तें ८२,८२० रुपये झालें आणि खेळतें भांडवल १०३ लक्ष रुपयांवर गेलें. बँकेनें सुमारें ७३ लक्ष रुपये कर्जांत गुंतविलेले आहेत. इन्कम टॅक्स, रिझर्व्ह फंड, बुडीत फंड ह्यांची भरपूर तरतूद करून गेल्या वर्षीप्रमाणें यंदाहि क्यु. प्रे. भागीदारांस ६३% (करमाफ) व ऑ. भागीदारांस ४३% (करमाफ) डिव्हिडंड देण्यांत आलें. श्री. एस. जी. पंत बाळेकुंद्री, बी. ए. एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन व कायदा सल्लागार असून श्री. एस. एन. सामंत हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. ३०।९।४५ रोजीं झाली.

### दी पूना अर्बन को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., पुणें.

ह्या संस्थेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. ३०।९।४५ रोजीं झाली. सदर सभेंत खालीलप्रमाणें उमेदवार निवडून आले आहेत, असें श्री. पांडुरंग विष्णु इनामदार (सेक्रेटरी) हे कळवितात.

**कार्यकारी मंडळ**

१ मे. मोतीराम नारायण पाटसकर (चेअरमन), २ मे. दिगंबर विष्णु इनामदार (व्हॉ. चेअरमन), ३ मे. सदाशिव बाळकृष्ण अंध्ये, ४ मे. दिनकर शंकर जोशी, ५ मे. नरहर भाऊराव कुलकर्णी, ६ मे. व्यंकटेश नागेश पोळ, ७ मे. काशिनाथ म्हाळसाकांत बारभाई, ८ मे. महादेव भाऊराव शेळके, ९. पुरुषोत्तम शिवराम थत्ते

**ऑडिटर्स**

१ मे. रामकृष्ण आत्माराम कुलकर्णी, २ मे. शरच्चंद्र सिताराम मरकळे

### पुणें जिल्हा को. सु. युनियन बोर्ड लि., पुणें

पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग यूनियन्स बोर्ड लि. पुणें या संस्थेच्या ता. ३०-९-४५ रोजीं भरलेल्या वार्षिक साधारण सभेंत पुढील तीन वर्षांसाठी खालीलप्रमाणें बोर्ड सभासद सामील तालुका सुपरवायझिंग यूनियन्समधून निवडून आले आहेत:–

| | | |
|---|---|---|
| १ मे. जयवंतराव तुकाराम सावंत, | इनामदार–चेअरमन | शिरूर, हवेली |
| २ मे. मुगुटराव साहेबराव काकडे | डायरेक्टर | भिमथडी |
| ३ मे. रामचंद्रराव गुलाबराव चांदगुडे | " | दौंड |
| ४ मे. शंकरराव लक्ष्मणराव सांडभोर | " | खेड, जुन्नर |
| ५ मे. केरबा धोंडिबा व्यवहारे | " | इंदापूर. |

### बेकारांसाठी खास अधिकारी

हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यांतील कारकून कमी करण्यांत येत आहेत. त्यांस नवीन नोकरी पाहून देण्याच्या कामगिरीवर एक खास अधिकारी नेमण्यांत येणार आहे.

### बंगालमधील दुष्काळाचा शिक्षणावर परिणाम

कलकत्ता विश्वविद्यालयांतील प्रो. के. पी. चट्टोपाध्याय ह्यांनीं वरील विषयासंबंधीं आंकडे गोळा केले. एकूण ३१० खेड्यांतील शिक्षणाच्या परिस्थितीचें त्यांनीं अवलोकन केलें. त्या खेड्यांत १९३९ सालीं २८,००० मुलें शाळेंत जात होतीं. त्यांची संख्या १९४३ सालीं १८,५२६ व १९४४ मध्यें १७,८४९ झाली. ३७% मुलांनीं पैशाचे अभावी व १९% मुलांनीं आजारीपणामुळें शाळा सोडली. कापड, केरोसीन व पुस्तकें ह्यांच्या दुर्भिक्षामुळें आणखी १७% मुलें शिक्षणास मुकलीं. मध्यमवर्गीय लोक दुष्काळामुळें कनिष्ठ वर्गांत लोटले गेले आहेत. त्यांच्या उद्धाराचा प्रयत्न करण्यासाठी शिक्षण खालपासून वर सुधारत नेलें पाहिजे, असें प्रो. चट्टोपाध्याय म्हणतात.

### जपानमधील गिरण्या

जपानमध्यें १९३७ सालीं कापडाच्या २९१ गिरण्या होत्या; आतां फक्त ३९ च उरल्या आहेत. बाकीच्यांचा नाश झाला. चात्यांची संख्या १,३७,८०,००० वरून ३०,००,००० वर आली आहे.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्गं पुस्तकें बंद
गोकाक १२-१०-४५ ते २५-१०-४५
नागपूर दि. ५-१०-४५

व्याज-वजा ( xd )
गोकाक मिल्स रु. ५ दि. २९-१०-४५
नागपूर मिल्स रु. ९ S दि. ६-११-४५

| १९४४ मर्यादित चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २।१०।४५ | बुधवार ३।१०।४५ | गुरुवार ४।१०।४५ | शुक्रवार ५।१०।४५ | सोमवार दि. ८।१०।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | २२३५—० | २२३१—४ | २२१७—८ | |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ४१५—० | ४१४—० | ४१२—० | |
| २२०१; १६९५ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | म. गांधी जयंतीनिमित्त बाजार बंद. | १९५७—८ | १९७२—८ | १९६२—८ | |
| ७६५; ५३३ | ९—०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ६०९—० | ६०६—८ | ६०२—८ | |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ५६०—८ | ५५८—८ | ५५७—० | |
| ४९८; ३६१ | ९-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | ३९८—० | ३९६—० | ३९२—८ | |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | | २८५—० | २८५—० | २८४—० | |
| ३९४; २८२ | ५-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ३००—० | ३१०—० | २९७—८ | |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | २९६—० | २९७—० | २९५—० | |
| २-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ३-१५-६ | ३-१५-० | ३-१५-० | |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | १३-१४-६ | १३-१४-० | १३-१३-० | |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | | २-१३-६ | २-१३-६ | २-१३-६ | |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ७०३-१२ | ६९५—० | ६९३-१२ | |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | | २१९—४ | २१८-१२ | २१९—० | |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २२३—८ | २२३—० | २२२—० | |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ५५३-१२ | ५५२—८ | ५४७—८ | |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | ३७-१२ | ३७-१४ | ३७—८ | |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०२—४ | १०२-४-६ | १०२—६ | |

आंध्रा व्हॅली रु. ३७-८S दि. १०-१०-४५
बॉम्बे ट्रॅम रु. २-८-०† दि. २३-१०-४५
टाटा पॉवर रु. ४०-०-०S दि. १७-१०-४५
टाटा ऑइल रु. २-१२ दि. २०-१०-४५

## कर्ज तडजोडीचे अर्ज व रेकॉर्ड ऑफ राइट्सचे उतारे

( लेः-एल. एम्. क्षीरसागर, सब्-ऑडिटर फॉर डेट रिलीफ वर्क, जळगांव )

सन १९३९ चा मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायद्याचे कलम १७ (१) प्रमाणें मे. कर्ज तडजोड बोर्डाकडे अर्ज करतांना त्याबरोबर रेकॉर्ड ऑफ राईटसचे उतारे पाठविले नाहींत, तर अर्ज स्वीकारले जाणार नाहींत, अशी शेतकरी बांधवांची समज असल्यास ती चुकीची आहे. रे. रा. उतारे सोबत न जोडतां पाठविलेले अर्ज देखील स्वीकारले जाऊन, जरूरी असल्यास, ते उतारे सदर कायद्याचें कलम २२(४) प्रमाणें मागाहून ( अर्ज दाखल झाल्यानंतर ) मागवितां येतील अशा अर्थाचा सरकारी ठराव नं. ९८।४५-२३४९७ ता. ३०।८।४५ रेव्हेन्यू डिपार्टमेंटचा झाला आहे. तसेंच रे. रा. उतारे ताबडतोब, मागणी केल्यापासून १० दिवसाचे आंत, तलाठ्यांनीं द्यावेत अशाबाबत देखील सदर ठरावांत उल्लेख आहे. तरी संबंधी शेतकरी ऋणकोंनीं रे. रा. उतार्यांच्या अभावीं कर्ज तडजोडीचे अर्ज पाठविण्यास विलंब न लावतां ते मुदतींत ( ता. ३१।१०।४५ चे आंत ) कर्ज तडजोड बोर्डाकडे पाठवावेत, तसेंच जरूरी पडेल त्याप्रमाणें रे. रा. चे उतारे मागणीचे अर्ज तलाठ्यांकडे करतांना, ते अर्ज सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग घेऊन करणें हें जास्त बरें.

## धी बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (वाई शाखा.)

या शाखेस सामिल असलेल्या सोसायट्यांची नववी वार्षिक साधारण सभा शुक्रवार ता. १९ ऑक्टोबर १९४५ रोजीं दुपारीं अडीचं वाजतां वाई ता. को. सुप. युनियनचे ऑफिसांत वाई शाखा कमेटीचे चेअरमनसाहेब मे. बाळकृष्ण मारुती पाटील यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे. वार्षिक सभेंत होणाऱ्या कामासंबंधीं विशेष माहिती लागल्यास ती सोसायटीचे सभासदास आदले दिवशीं १ ते ४ वाजेपर्यंत शाखेच्या ऑफिसांत देण्याची तजवीज केली आहे.


बेकारीचा प्रश्न सोडवा

विमा कंपनीपेक्षां अभिनव योजना

सुशिक्षित स्त्री-पुरुषांसाठीं : फक्त ५०० रुपये भांडवल गुंतविणारे स्त्री, पुरुष पाहिजेत

द. म. १००/१५० रु. मिळवून देणारा एक नवीन उद्योग

म्हणजेच

फडके प्रॉडक्टस् आणि रेडसन् प्रॉडक्टस्‌ची एजन्सी घेणें

नवीन सुधारणा, नवीन सवलती, अखंड उद्योग वंशपरंपरेनें करा. नोकरीची जरूरी नाहीं. अर्ज पाठवा. आपल्या घरीं आपल्या गांवीं राहून उद्योग करा—

हरिभाऊ भंडारे

खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, पुणें



पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94 A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

# बँक ऑफ पूना लिमिटेड.

५९५ बुधवार, पुणें २

## रजिस्टर झाल्याची तारीख १९-७-४५

| अधिकृत भांडवल | तूर्त विक्रीकरतां काढलेलें |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |
| प्रत्येकीं रु. १०० चे ५०,००० शेअर्स | प्रत्येकीं रु. १०० चे २५,००० शेअर्स |

*या शेअर्सपैकीं डायरेक्टर्स व त्यांची मित्रमंडळी ह्यांनीं पांच लाख रुपयांचे ५००० शेअर्स घेणेचें ठरविलें असून बाकी वीस लाख रुपयांचे २०,००० शेअर्स विक्रीकरतां काढले आहेत. प्रत्येक शेअरमागें अर्जासोबत रु. २५ व अर्जमंजुरीनंतर रु. २५ भरणेचे आहेत. बाकीची रक्कम रु. ५० ची मागणी, डायरेक्टर्स जरूर वाटेल त्यावेळीं करतील.*

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया, फर्म मे. हिंदुमल बालमुकुंद, लँडलॉर्ड, बँकर, बालमुकुंद रोड, पुणें २. चेअरमन.

२ शेठ दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., काँट्रॅक्टर आणि लँडलॉर्ड, २ ए कारमायकेल रोड, मुंबई. व्हाईस चेअरमन

३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर, एम. ए., पीएच. डी., प्रोप्रायटर आणि संचालक 'सकाळ', १६ वेलेस्ली रोड, पुणें १.

४ मि. फ्रामजी पेस्तनजी पोचा, फर्म मे. पेस्तनजी पी. पोचा अँड सन्स, बीं-बियाणाचे व्यापारी, नेपीयर रोड, पुणें १.

५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, फर्म मे. रामनारायण राजमल, बँकर आणि मर्चंट, टिळक चौक, सोलापूर.

६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, फर्म मे. राममगत पन्नालाल, बँकर आणि मर्चंट, ६१० रविवार पेठ, पुणें.

## शेअर विक्री सुरू आहे

छापील अर्ज नमुने मिळण्याचीं ठिकाणें:—(१) मे. चंपकलाल देवीदास, आगाखान बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, मुंबई. (२) मि. आर. जे. सावंत, ६२ न्यू स्टॉक एक्स्चेन्ज बिल्डिंग, अपोलो स्ट्रीट, मुंबई. (३) मे. रामनारायण राजमल राठी, टिळक चौक, सोलापूर. (४) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस ५९५ बुधवार पेठ, शनवारवाड्याचे पिछाडीस, विनीवाल्यांचा वाडा, पुणें २.

---

# —: साठे बिस्किटें :—

## ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

---

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १७ आक्टोबर, १९४५ अंक ४२

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



## आशा

Asha

### सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

### दि आयडिअल इन्स्टिट्यूट

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

——कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.——

## बेकारीचा प्रश्न सोडवा

### विमा कंपनीपेक्षां अभिनव योजना

सुशिक्षित स्त्री-पुरुषांसाठीं : फक्त ५०० रुपये भांडवल गुंतविणारे स्त्री, पुरुष पाहिजेत

द. म. १००/१५० रु. मिळवून देणारा एक नवीन उद्योग
म्हणजेच
फडके प्रॉडक्टस् आणि रेडसन् प्रॉडक्टस्‌ची एजन्सी घेणें

नवीन सुधारणा, नवीन सवलती, अखंड उद्योग वंशपरंपरेनें करा. नोकरीची जरूरी नाहीं. अर्ज पाठवा. आपल्या घरीं आपल्या गांवीं राहून उद्योग करा—

### हरिभाऊ भंडारे

खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, पुणें

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( शेड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस : पुणें शहर

**— भांडवल —**

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १२,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,३०,००,००० वर |

नवीन विक्रीस काढलेलें रु. ५ लाखांचे भांडवल सर्व खपलें.
आतां विक्रीकरतां शेअर्स नाहींत.

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई ( फोर्ट ), गिरगाव, जळगाव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगाव, फैजपूर ( पे ऑफिस )

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

पुणें शहर

शाखा—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर-रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

चेअरमन:—श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B.

### एकूण खेळतें भांडवल रु. ३२ लाखांचेवर

—: व्याजाचे दर :—

करंट $\frac{1}{2}$ टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २$\frac{1}{2}$ टक्के.
कायम ठेवी २$\frac{3}{4}$ ते ४$\frac{1}{2}$ टक्केपर्यंत ( मुदत ६ महिने ते ५ वर्षे )

शेअर विक्री चालू आहे.

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअरवर ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें.
- सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
- शॉर्ट टर्म डिपॉझिट्स् स्वीकारलीं जातात.
- मुंबई, नगर, नाशिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नी. ना क्षीरसागर,
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

# विविध माहिती

**बंगाल सरकारनें घड्याळें मागें केलीं नाहींत.**

१५ आक्टोबरपासून हिंदुस्थान सरकारनें घड्याळें एक तास मागें करून पूर्व स्थितीस आणण्याचें ठरविलें, तरी बंगाल सरकारनें घड्याळें मागें न करण्याचें ठरविलें आहे.

**ग्रेट ब्रिटनमधील पेट्रोल रेशनिंग**

पेट्रोल रेशनिंग रद्द करणें किंवा पेट्रोलचें रेशन वाढविणें ग्रेट ब्रिटनमध्यें तूर्त शक्य होणार नाहीं, असें सरकारतर्फे पार्लमेंटमध्यें सांगण्यांत आलें. १९३८ च्या अखेरचे मानानें आज नागरिकांसाठी उपलब्ध असलेला पेट्रोलचा साठा फक्त ४०% आहे.

**अमेरिकेचें ग्रेट ब्रिटनला आर्थिक सहाय**

अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला १५ अब्ज रुपये कर्जाऊ देण्याचें मान्य केलें आहे. जरूरीप्रमाणें ग्रेट ब्रिटननें ह्या रकमेचा उपयोग करावा व परत फेडीसाठीं त्या देशास अमेरिकेनें भरपूर सवड द्यावी, अशी योजना आहे.

**हिंदी तांदळाचें पीक-सरकारी अंदाज**

| | क्षेत्र (हजार एकर) | उत्पादन (हजार टन) | दर एकरीं उत्पादन (पौंड) |
|---|---|---|---|
| १९४३-४४ | ८१,११७ | ३०,६६४ | ८४७ |
| १९४४-४५ | ८०,७५४ | २७,१२२ | ७५२ |

तांदळाखालील एकूण क्षेत्रापैकी २९·२% बंगालमध्यें, १३·३% मद्रासमध्यें, १२·१ बिहारमध्यें, १०·२% मध्यप्रांत-वऱ्हाड व ९·६% संयुक्त प्रांतांत आहे. मुंबई प्रांताचा हिस्सा ३·२% आहे.

**हिंदी तांदळाची परदेशी निर्गत**

| | बंगाल व ओरिसामधून (टन) | मद्रास, मुंबई व सिंधमधून (टन) | एकूण निर्गत (टन) |
|---|---|---|---|
| १९४० | ८३,२०० | १,६१,२०० | २,४४,४०० |
| १९४१ | ८२,६०० | २,१९,७०० | ३,०२,३०० |
| १९४२ | ६५,४०० | २,६६,२०० | ३,३१,६०० |
| १९४३ | २,५०० | ७०,३०० | ७२,८०० |
| १९४४ | ३१ | १८ | ४९ |

**निग्रो स्त्रियांस जुळीं मुलें अधिक**

श्वेत स्त्रियांपेक्षा निग्रो स्त्रियांना जुळीं मुलें जास्त होतात, असें अमेरिकेंतील जनन आकडे सांगतात. श्वेत स्त्रियांच्या ५,७०,०९६ बाळंतपणांपैकी फक्त एकाच बाळंतपणाचे वेळीं ४ मुलें एकदम जन्मास येतात, ह्या उलट ९,३७,८९७ निग्रो बाळंतपणांपैकी एका बाळंतपणांत ४ मुलांचा जन्म होतो.

**महायुद्धांचीं नांवें**

१९१४-१८ चे युद्धास महायुद्ध असें म्हणतात. तेव्हां, १९३९-४५ च्या युद्धास महोत्तर युद्ध म्हणावयाचें काय? पहिलें जागतिक युद्ध व दुसरें जागतिक युद्ध अशा नांवांनीं त्या युद्धांस ओळखतां येणें शक्य आहे, त्याचप्रमाणें चतुर्वार्षिक व षट्वार्षिक युद्ध असेंहि म्हणतां येईल. पहिलें जर्मन युद्ध व दुसरें जर्मन युद्ध असेंहि म्हटलें तरी चालेल किंवा कैसरचें युद्ध आणि हिटलरचें युद्ध अशा नांवांनींहि त्यांची ओळख पटण्याजोगी आहे.

**दिवसांत ११३ मिनिटें रडणें**

नुकतेंच जन्मलेलें मूल दिवसांतून सरासरीनें ११३ मिनिटें रडतें. जुळ्या मुलांपैकीं एक रडलें कीं दुसरें रडूं लागतें, ह्या समजास आधार सांपडत नाहीं.

**सुभद्रा**

श्री. विनायकराव हे राजकमल कलामंदिरांत आपल्या नव्या "सुभद्रा" बोलपटाचें चित्रीकरण करीत आहेत.

**बँक ऑफ इंग्लंडवरील शस्त्रक्रिया**

"बँक ऑफ इंग्लंडवर शस्त्रक्रिया करण्यांत येणार आहे, तिचें तपशीलवार स्वरूप अद्याप प्रसिद्ध झालेलें नाहीं. फडणवीस, डॉ. डाल्टन, ह्यांच्या कुशलतेवर व आकलनशक्तीवर माझा विश्वास आहे; त्यांस बँकेच्या जागतिक स्थानाची माहिती आहेच. तेव्हां, बँकेच्या भवितव्यास बाधक होण्याजोगें ते कांहींहि करणार नाहींत अशी अपेक्षा आहे." बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, लॉर्ड केट्टो, ह्यांचे उद्गार. बँकेच्या घटनेंत बदल करणारें सरकारी बिल गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालें.

**अविवाहितांपेक्षा विधवांचा व काडीमोडवाल्यांचा विवाह सुलभ**

अविवाहितांपेक्षा घटस्फोट घेतलेल्यांची किंवा विधवांची व विधुरांची लग्नें अधिक सुलभतेनें होतात असा अमेरिकेंतील अनुभव आहे. काडीमोड केलेल्या ३० वर्षें वयाच्या स्त्रीचा विवाह होण्याचा संभव १०० त ९४ असला, तर त्याच वयाच्या विधवेचा विवाह होण्याचा संभव १०० त ६० असतो परंतु ३० वर्षें वयाच्या अविवाहित स्त्रीचा विवाह होण्याचा संभव मात्र १०० त फक्त ४८ असतो. विवाहाचा अनुभव असणारास पति किंवा पत्नी लवकर मिळवितां येतात.

**नवयुग चित्रपट लि., पुणें**

वरील कंपनीस ३० एप्रिल, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी ४१,८५२ रुपये निवळ नफा झाला, परंतु तो वाटून टाकण्याऐवजी कांहीं जुना तोटा भरून काढण्याकडे त्याचा विनियोग करण्यांत येणार आहे. मेसर्स पिअरलेस पिक्चर्सचे श्री. सामंत हे मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार झाले आहेत. येत्या दोन वर्षांत तयार होणारे चित्रपट ठराविक निवळ नफा कंपनीस उरेल ह्या अटीवर पीअरलेस पिक्चर्सला विकण्याचा करार कंपनीनें केला आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. २८ ऑक्टोबर रोजीं आहे.

**रिझर्व्ह बँकेचें (कलकत्ता) पब्लिक डेट ऑफिस**

रिझर्व्ह बँकेचें (कलकत्ता) पब्लिक डेट खातें सध्या कानपुरास आहे, तें तेथें १० नोव्हेंबर रोजीं बंद होऊन कलकत्ता येथें २६ नोव्हेंबर रोजीं सुरू होईल. कांहीं रेकॉर्डीचें ऑक्टोबर अखेर कलकत्त्यास स्थलांतर करण्यांत येणार असल्याकारणानें, कानपूर कचेरीच्या कौंटरवर २१ ऑक्टोबर पासून सरकारी रोखे स्वीकारण्यांत येणार नाहींत; रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ८ कौन्सिल हाउस स्ट्रीट, कलकत्ता येथें ते पूर्वीप्रमाणें स्वीकारले जातील. १० नोव्हेंबरपर्यंत जें टपाल कानपूर कचेरीस पोचण्याचा संभव नाहीं, तें मॅनेजर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पब्लिक डेट ऑफिस, ८, कौन्सिल हॉल स्ट्रीट, पोस्ट बॉक्स नं. ५५२, कलकत्ता ह्या पत्त्यावर पाठवावें.

**श्री. दांडेकर ह्यांचा हीरक महोत्सव**

जी. जी. आर. दांडेकर मशीन वर्क्स लि. चे संस्थापक श्री. गोपाळ गणेश उर्फ "दादा" दांडेकर ह्यांचा हीरक महोत्सव दांडेकर सत्कार समितीतर्फे भिवंडी येथें रविवार, ता. २१ ऑक्टोबर रोजीं मोवींच्या परशुराम पॉटरी वर्क्स लि. चे श्रीमंत परशराम बळवंत गणपुले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा होणार आहे.

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## अपेक्षित आर्थिक मंदीवर उपाययोजना

### बेकारीचें निवारण कसें करणार ?

पॅसिफिक महासागरांतील युद्ध अपेक्षेपेक्षा लवकर थांबल्या कारणानें त्यासंबंधांतील मोहिमांच्या योजना व त्यांचे प्रीत्यर्थ केलेली तयारी ह्यांमध्यें स्वाभाविक रीतीनें गोंधळ उडाला. लष्करी हालचाली, युद्धसामुग्रीचें उत्पादन, पुरवठा व वहातुक ह्यांच्याशीं निगडित झालेल्या असतात आणि त्यांचा ह्या रीतीनें आर्थिक व्यवस्था व व्यवहार ह्यांच्यावर परिणाम होत असतो. लढाया थांबल्या कीं लढाऊ साधनांच्या पुरवठ्याबाबतची व उत्पादना-विषयींची मागणी बंद होते आणि ह्या कामांत गुंतलेलीं माणसें रिकामीं होतात. निरनिराळ्या रणक्षेत्रांतील सैनिक व त्यांच्या शुश्रूषेस असलेलें लोक स्वदेशीं परत आणावे लागतात आणि त्यांच्या दैनिक उद्योगाची व चरितार्थाची तरतूद करावी लागते. युद्ध चालू असतां सरकारी खर्चांचा ओघ जोरानें वहात असतो, त्यास ओहोटी लागते, त्यावर पोसलीं जाणारीं माणसें बेकार बनतात, जनतेची प्राप्ति घटते व एकंदरीनें आर्थिक मंदीचें वातावरण चोहोंकडे फैलावतें. ही एक प्रकारची सामाजिक आपत्तीच असल्यानें तिला तोंड देण्याची तयारी अगोदर वेळींच सरकार करीत असतें. रणांगणावरून परत येणाऱ्या सैनिकांस काम पाहून देणें, बेकारीनिवारणार्थ रस्त्यांची, कालव्यांची, रेलवेजची, घरबांधणीचीं वगैरे सरकारी कामें काढणें इत्यादि उपायांच्या आखलेल्या योजना अंमलांत आणल्या जातात आणि पैशाचा मंद होणारा ओघ चालू ठेवण्यांत येतो. लोकास शांततेच्या काळांतली कामें मिळतात, त्यांची प्राप्ती बंद होत नाहीं व उद्योगधंद्यांस चालना प्राप्त होऊन समाजाच्या आर्थिक यंत्राचीं चक्रें फिरतीं रहातात. हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना, जपानी युद्धकल्पनेपेक्षा लवकर समाप्त झालें असल्यामुळें, मागें ओढून त्यांच्या अंमलबजावणीस शक्य तितक्या त्वरेनें हात घातला जाणें आवश्यक आहे. अशा कार्यक्रमाचें मार्गांत अडचणी येणार, त्या दूर करण्याचे प्रयत्न कसोशीनें केले जाणें इष्ट आहे.

दिल्ली येथें सर आर्देशीर दलाल ह्यांनीं प्रस्तुत विषयाचा एका भाषणांत परामर्श घेतला हें समाधानकारक आहे. पसरूं पहात असलेल्या आर्थिक मंदीविषयीं भयसूचना देऊन तीवर कोणते उपाय योजले पाहिजेत ह्याचेंहि दिग्दर्शन त्यांनीं केलें. युद्धसमाप्तीच्या आर्थिक परिणामांचा निर्देश आम्हीं वर केला आहे. त्या धर्तीवर सर आर्देशीर म्हणतात कीं येत्या आठ महिन्यांत आठ लक्ष सैनिक परत येतील, त्यांस काम मिळण्याची व्यवस्था व्हावी लागेल. सरकारी युद्धखर्च बंद पडल्यानें त्यावर पोसलें जाणारे दहा लक्ष लोक बेकार होतील आणि युद्धकार्याशी अप्रत्यक्ष संबंध असलेल्या लक्षावधि स्त्री-पुरुषांची हीच अवस्था होईल. अपेक्षित भीषण बेकारीवर एकच परिणामकारक उपाय म्हटला म्हणजे जनतेस हवीं असलेलीं कामें उभीं करणें हाच आहे. त्यासाठी लागणाऱ्या पैशाची वाण भासणार नाहीं असें सर आर्देशीर ह्यांचें म्हणणें आहे. बँकांतील ठेवी युद्धकाळांत ६०० कोटि रुपयांनीं वाढल्या असून चलनाचा विस्तार हजाराचेवर कोटींनीं झालेला आहे. सैनिकांमध्यें सुमारें १०० कोटि रुपये निरनिराळ्या स्वरूपांत वाटले जातील आणि जादा नफ्याची ठेव ५० कोटींची सरकारापाशी आहे, ती धंदेवाल्यांस परत मिळेल. विविध प्रकारांच्या मालाच्या दुर्मिळतेमुळें युद्धकाळांत लोकांस खर्च करतां आला नाहीं, त्यासहि आतां वाव मिळेल. उदाहरणार्थ, घर बांधणीचीं कामें अडून बसलीं आहेत, तीं चालू झाल्यास कितीतरी लोकांस काम उपलब्ध होऊन प्राप्तीचा मार्ग सापडेल. स्वतःच्या नोकरांची तजवीज सरकारला करतां येईल. तयार सामुग्रीची घरें कशीं बांधतां येतील ह्यासंबंधानें चौकशी केली जात असल्याची माहिती सर आर्देशीर ह्यांनीं दिली आहे.

पैसा आहे, त्यास भरपूर मागणी आहे, कामासाठी माणसें तयार आहेत. पण सिमेंट, पोलाद, लोखंड, यंत्रें, हत्यारें इत्यादि सामुग्रीची व्यवस्था काय ? हीच मुख्य अडचण मार्गांत येत असल्याचें योजनामंत्र्यांनीं सांगितलें आणि रस्ते करावयाचे म्हटले तरी त्यांचे साठी जरूर असलेले रोलर्स नाहींत आणि नकाशे वगैरे तयार करणारीं तज्ञ माणसें नाहींत. प्रांतिक सरकारांच्या युद्धोत्तर पंचवार्षिक कालव्यांच्या, रस्त्यांच्या व विजेच्या योजना तरी ह्या परिस्थितींत कशा अंमलांत येणार ? आपल्या योजनांचा एक भाग म्हणून परंतु दुष्काळी स्वरूपाचीं व तोट्याचीं कामें त्यांस केवळ बेकारी निवारणार्थ चालू करावीं लागतील. त्यांमध्यें त्यांस नुकसान निःसंशय येणार आहे आणि तें अपरिहार्य असल्यानें त्याचा चौथा हिस्सा स्वतः सोसण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें आहे. त्यासाठी ५० कोटि रुपयांचें सहाय तें प्रांतिक सरकारांस देण्यास तयार आहे. प्रांतिक सरकारें २०० कोटि रुपयांचा खर्च संधिकाळांत जनतेस जरूर तें काम पुरवण्याकरितां करतील तर ही रकम नुकसान भरपाई म्हणून मध्यवर्ती सरकार त्यांच्या पदरांत टाकील. जनतेनेंहि आपलें कर्तव्य ह्या बाबतींत बजावलें पाहिजे अशी त्याची अपेक्षा आहे. युद्ध संपलें असतां त्यामुळें होणारी विशिष्ट वर्गाची प्राप्तीहि संपुष्टांत येणार आणि त्यांचेकडून सरकारास मिळणाऱ्या करांच्या उत्पन्नांतहि घट होणार. ही तूट कोणत्या दुसऱ्या करांनीं भरून काढावी ह्याविषयीं सरकार विचार करीत आहे असें सर आर्देशीर म्हणाले. यांत्रिक आणि शास्त्रीय तज्ञांचा पुरवठा आर्थिक प्रगतीस अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी हिंदी तरुणांस इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत पाठवण्याची तजवीज झाली आहे, तिचा त्यांनीं उल्लेख केला. जर्मनी व जपान ह्यांच्या पराजयामुळें रिकाम्या झालेल्या बाजारपेठांत हिंदुस्थानानें प्रवेश मिळवला असतां ह्या देशाच्या आर्थिक अभिवृद्धीस मदत होईल असें त्यांनीं सांगितलें. सध्याची हिंदुस्थानांतली राजकीय कोंडी फुटून जबाबदार मंत्रिमंडळाची स्थापना होण्याचें अगत्य सर आर्देशीर ह्यांच्या भाषणांत व्यक्त केलें गेल्यावांचून राहत नाहीं. आपल्या प्रगतीच्या योजनांचे मार्गांतली ही घोंड दूर झाल्यावांचून त्या अपेक्षेप्रमाणें यशस्वी होणार नाहींत ह्याची जाणीव त्यांचेमध्यें सदैव जागृत आहे. भावी स्वतंत्र हिंदुस्थानाच्या आर्थिक सुस्थितीचा पाया आपण घालीत आहों असें त्यांनीं अखेरीस बोलून दाखवलें आणि लोकप्रतिनिधींचीं मंत्रिमंडळें लवकर स्थापित व्हावीं आणि त्यांनीं देशापुढें असलेले कठिण आर्थिक प्रश्न जनतेच्या पाठिंब्यानें समाधानकारक रीतीनें सोडवावे अशी इच्छा ध्वनित केली.

## द. हैद्राबादची गोदावरी व केरळांतील त्रावणकोरची पेरियार

( लेखकः–श्री. के. जे. तवनाप्पा, बेळगांव )

अमेरिकेंतील T. V. A. ' टेनसी नदी खोरे योजना ' पूर्ण झाली आहे, ती योजना अंमलांत आणण्यासाठी "टेनसी व्हॅले अॅथारिटी" नांवाचें मंडळ १९३३ सालीं अमेरिकन फेडरल सरकारनें स्वतंत्र कायदा करून स्थापन केलें होतें. ही योजना पुरी होणेस तब्बल १२ वर्षें लागलीं. ह्या योजनेचें वैशिष्ट्य म्हणजे या योजनेचें उद्दिष्ट नद्यांस धरणें बांधून केवळ शेतीसाठी पाण्याचा उपयोग करणें एवढ्यापुरतें मर्यादित नव्हतें. शेतीसाठी पाटबंधारे, वहातुकीचे जलमार्ग व हैड्रो-इलेक्ट्रिकसिटी अशी विविध साधनें निर्माण करण्याची योजना आखली होती, इतकेंच नव्हे तर जंगलसंवर्धन, नवीन उद्योगधंद्यांची स्थापना, अद्यावत् नवीन शहरें निर्माण करणें, रस्ते बांधणें वगैरे विविध योजना पार पाडण्याचीहि ह्या मंडळावर जबाबदारी टाकण्यांत आली होती, ती जबाबदारी मंडळानें योग्य रीतीनें पार पाडली असून ही संस्था व योजना अखिल जगाच्या आदरास पात्र झाली आहे. नियोजनाच्या बाबतींत आद्य व यशस्वी समजला जाणारा देश सोव्हियट रशिया सुद्धां ' टेनसी व्हॅले अॅथॉरिटी ' शिक्षण केंद्रास अभ्यासासाठी आपले तज्ञ पाठवीत आहे तेवढ्यावरूनच या मंडळाच्या थोरवीची कल्पना वाचकांस होईल.

### (द.) हैद्राबाद गोदावरी व्हॅली स्कीम

निजाम सरकारनें कांहीं अंशीं T. V. A., धर्तीवर ' गोदावरी खोरे योजना ' तयार केली असून तीस येणाऱ्या २४ कोट रुपये खर्चास नुकतीच मंजुरी पण दिली आहे. या योजनेप्रमाणें वरंगल, करीमबाद, अदिलाबाद, जिल्ह्यांतील आठ लक्ष एकर जमीन पाटाच्या पाण्याखालीं भिजणार आहे व संस्थानास शेती व उद्योगधंद्याचे वाढीसाठी स्वस्त दरानें पंच्याहत्तर हजार किलोवॅट ( एक लक्ष हॉर्स पॉवर ) जल–विद्युत् मिळणार असून अदिलाबाद जिल्ह्यांत कोळसा, लोखंड, चुनखडी, सोप स्टोन, फायरक्ले, वगैरे खनीज आणि मुबलक लांकूड, कापूस व गोडें पाणी यांच्या सान्निध्यांत असलेले खेडे ' अंतरगांव ' येथें ' निझामबाद ' नांवचे विविध प्रकारचे उद्योगधंदे केंद्रीभूत झालेले नमूनेदार अद्यावत औद्योगीक शहर निर्माण करण्यांत येणार असून त्या शहरास दोन खास रेल्वे लाइननें पश्चिमेस मुंबई कनेक्शनसाठी कुर्डुवाडी G. I. P. येथें व पूर्वेस विझगापट्टम बंदर व इतर उत्तरेकडील व पूर्वेकडील भागांशीं दळणवळण जोडणेसाठी व्हाया बस्तार एजन्सी B. N. R. रेलवे लाइनस जोडण्यांत येणार आहे हें शहर खरोखर अखिल हिंदुस्थानांत आदर्शभूत होऊन राहील यांत संदेह नाहीं.

### त्रावणकोरची पेरियार योजना

पेरियार नदी त्रावणकोर संस्थानांत सह्याद्रींत उगम पावून १४२ मैलांच्या प्रवासानंतर कोचीनच्या उत्तरेस कांग्रानोर येथें खाऱ्या पाण्याच्या तलावास मिळते. हिच्या मुखाकडील भागांत ६० मैल वरपर्यंत जलवहातूक चालते. हैद्राबाद व काश्मीर यांच्या प्रत्येकीं ⅟₈ व म्हैसोरच्या ½ क्षेत्रफळाचें त्रावणकोर संस्थान आहे. ह्या छोट्याशा संस्थाननें चालू युद्धकालांत केलेला उद्योगधंद्यांतील विक्रम व त्यांत पेरियारनें उचललेला भाग प्रशंसनीय आहे.

धरण, कालवे, जल–विद्युतगृहें, उद्योगधंद्यांचे आश्रयस्थान या सर्व समुच्चय गुणांनीं पेरियार अलंकृत झाली आहे. उत्तर त्रावणकोरांत कोचीनजवळील आलवे येथें सिमेंट, टेक्स्टाईल, ओगले त्रावणकोर ग्लासवर्क्स, रासायनिक खतें व केमिकल्स, वगैरे कारखाने पेरियारचे कांठीं आहेतच. शिवाय एक टन अॅल्युमिनिअम तयार होण्यास अनेक टन बॉक्साईट, कोलकोक, चुनखडी, कॉस्टिक सोडा, अगणीत गोडें पाणी व विजेची प्रचंड अश्वशक्ती ह्यांचा फडशा पाडणारी हिंदुस्थानांतील कॅनेडिअन कंपनी ( कलकत्ता ) यांचा अॅल्युमिनियम स्मेल्टिंग कारखाना पण आलवे येथेंच आहे. अर्थात् या कंपनीचें संस्थाननें बरेच शेअर धारण केले आहेत. फार काय ? विशिष्ठ धंदा विशिष्ठ ठिकाणीं निघण्यास विशिष्ठ अनुकुलता लागते. याबरहुकूम बांबू, गोडें पाणी, बेसिक केमिकल्स, अगणीत वीज, शेजारपास मिळणारें कापूस वगैरे कच्चा माल लागणाऱ्या ' रेयॉन ' चा कृत्रिम रेशीम कारखाना आलवेसच निघणार आहे.

त्रावणकोरमधील इतर पेपर, पल्प, प्लायवूड, चिनी मातीचे पोर्सलेन वेअर, टायर ट्यूब, रबर, प्लॅस्टिक्स, सिल्क टेक्स्टाईल वगैरे धंद्यांच्या वसतीस्थानांबद्दल लेखकांस माहिती नाहीं.

गोदावरी कांठचें होऊं घातलेलें निझामाबाद, पेरियार कांठचें आलवे, भद्रा कांठचें भद्रावती, गंगाकांठचें कानपूर, कावेरी कांठचें मेट्टूर व तुंगभद्रा कांठचें हरीहर या औद्योगिक शहरांची नंबरवारी मात्र भविष्यकाळच ठरवील.

नुकतेंच जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत त्रावणकोर असेंब्लींत बजेट सादर करतांना तेथील दिवाण–प्रेसिडेंट सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं संस्थानांत बाळूचे उद्योगधंदे काढून त्यापासून पन्नास ते सत्तर लक्ष रुपयांचें वार्षिक उत्पन्न घेण्याची शक्यता बोलून दाखविली व जल-विद्युतसंबंधांत त्यांनीं असें सांगितलें कीं मद्रास प्रांत, त्रावणकोर, कोचीन, म्हैसोर या चारींच्या जल-विद्युतगृहांच्या कोरिलेटेड ग्रिड सिस्टीमनें सारें दक्षिण हिंदुस्थानभर वीज पुरवठा करूं व त्यायोगें दक्षिण हिंदुस्थानचें एक औद्योगिक युनिट ( घटक ) बनेल. अर्थात् या योजनेची महत्त्वाकांक्षा कृतींत उतरल्यास रानावनांतील लांबवरच्या ग्रामीण भागांतसुद्धां विजेचा संचार होऊन, शेती, घरगुती उद्योगधंदे यांना वीज मिळेलच. शिवाय शेतकऱ्याच्या स्वैंपाकघरांतसुद्धां त्याचा प्रवेश होणार नाहीं म्हणून कोणीं सांगावें ? खेडेगांवांत रेडियो, रेफ्रिजरेटर यांचा प्रसार व मिल्कसेपरेटर्स, व्हेजिटेबल अँड फ्रूट कॅनिंग इंडस्ट्रीज, अॅनीमल फॉडर इंडस्ट्रीज, फूड प्रोसेसींग इंडस्ट्रीज काढणें व लिफ्ट इरिगेशन चालूं करणें अगदीं सोपें होईल, हें काल्पनिक चित्र नसून आज रशिया, अमेरिका, जपान, युरोपमध्यें प्रत्यक्षांत पहावयास सांपडतें.

### ओरिसा प्रांताचे हिंदी गव्हर्नर

हिंदुस्थान सरकारच्या युद्ध खात्याचे सेक्रेटरी, सर चंदुलाल त्रिवेदी, ह्यांची ओरिसाचे गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. १९२० सालीं लॉर्ड सिंह ह्यांस बिहारच्या गव्हर्नराची गादी मिळाली होती. सर्व प्रांतांपेक्षा ओरिसाच्या गव्हर्नराचा पगार सर्वांत कमी आहे. मद्रास, मुंबई, बंगाल, संयुक्त प्रांत ह्यांच्या गव्हर्नरास दरसाल किमान १ लक्ष, २० हजार रुपये पगार मिळतो. ओरिसाच्या गव्हर्नरास ६६ हजार रुपये मिळतात. पगार व भत्ते मिळून प्रत्येकीं ५ लाखांपेक्षा अधिक रक्कम मद्रास, मुंबई व बंगाल ह्या प्रांतांच्या गव्हर्नरांस मंजूर आहे, ओरिसाच्या गव्हर्नरास मिळणारी तत्सम रक्कम १,०३,००० रुपये आहे.

# स्फुट विचार

## बँक ऑफ इंग्लंडच्या खरेदीची तयारी

बँक ऑफ इंग्लंड ही ग्रेट ब्रिटनची मध्यवर्ती बँक राष्ट्राच्या मालकीची करण्याचा आपला उद्देश मजूर मंत्रिमंडळानें मागेंच जाहीर केला होता, त्यास अनुसरून आतां एक बिल पार्लमेंटांत मांडण्यांत येणार आहे. त्याचा मसुदा जाहीर झाला आहे. बँकेच्या सध्याच्या भागीदारांचे भाग प्रत्येक १०० पौंडांच्या भागाचे बदली ३% व्याजाचे ४०० पौंडांचे दीर्घ मुदतीचे सरकारी रोखे देऊन विकत घेईल. म्हणजे भागीदारांस सध्या १२% डिव्हिडंड मिळतें, तेवढें व्याज मिळत राहील. बँकेचें भाग भांडवल १,४५,५३,००० पौंडांचें आहे, तें ब्रिटिश सरकारच्या फडणविशी खात्याच्या नांवें वर्ग करण्यांत येऊन त्याचे बदली ५,८२,१२,००० पौंडांचे ३% व्याजाचे सरकारी रोखे देण्यांत येतील. बँकेचे डायरेक्टर, डेप्युटी गव्हर्नर व गव्हर्नर ह्यांची नेमणूक मंत्रिमंडळाच्या सल्ल्यास अनुसरून राजा करील. बँकेचा कारभार साधारणतः पूर्ववत चालला तरी सरकारच्या फडणविशी खात्याकडे त्याचीं मुख्य सूत्रें राहतील. बँक ऑफ इंग्लंड सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली तरी प्रत्यक्ष वस्तुस्थितीस कायदेशीर स्वरूप देण्यापलीकडे त्यास महत्त्व नाहीं; कारण बँक व सरकार ह्यांच्या धोरणांत पूर्णपणें एकवाक्यता नाहीं, असें घडत नाहीं, असा अभिप्राय बँकेच्या राष्ट्रीयकरणावर मि. चर्चिल ह्यांनीं व्यक्त केला होता. तथापि, मजूर मंत्रिमंडळ आपलें व्यापक धोरण प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याचा खरोखर प्रयत्न करील, त्यावेळीं बँक ऑफ इंग्लंडनें सहकार्य केलें नाहीं तर तेढ उत्पन्न होऊन भांडवलदार वर्ग, पार्लमेंटांत अशक्य झालें तर बँकेच्या मार्फत, मजूर मंत्रिमंडळाच्या योजना हाणून पाडूं शकेल, अशा संभाव्य घटनेची वेळींच तरतूद करणें मजूर मंत्रिमंडळास आवश्यक वाटत आहे.

## रेल्वे-मंत्र्यांचा आशावाद

सर एडवर्ड बेंथॉल, हिंदुस्थान सरकारचे युद्धवाहतुक मंत्री, ह्यांनीं लंडनमध्यें ईस्ट इंडियन असोसिएशनच्या एका सभेंत बोलतांना हिंदी रेल्वेजनीं युद्धामध्यें बजावलेल्या स्तुत्य कामगिरीचा गौरवपूर्वक उल्लेख केला आणि युद्धोत्तर काळांतील त्यांच्या सुस्थितीविषयीं आशावाद प्रकट केला. उत्तर आफ्रिकेंतील रणांगणांस इंजिनें व डबे पुरवून हिंदी रेल्वेजनीं जें सहाय दिलें त्याचा परिणामकारक उपयोग तेथें विजय मिळवण्यांत झाला ही गोष्ट अनेक सेनानींनीं कबूल केली आहे तिचा निर्देश करून १९४२ च्या हिंदुस्थानांतील अंतर्गत धामधुमींत रेल्वे नोकरांनीं भयंकर अडचणींस न जुमानतां रेल्वेजचा व्यवहार चालू ठेवला ह्याबद्दल त्यांस धन्यवाद दिले. युद्धामध्यें हिंदी रेल्वेजचा विस्तार झालेला आहे आणि त्यांवर डागडुजी बरीच करावयाची असली तरी त्यांची सांपत्तिक स्थिति अत्यंत समाधानकारक असल्याचें त्यांनीं सांगितलें. युद्धापूर्वी ७,५०० इंजनें व २ लक्ष वाघिणींवर रेल्वेचें काम चाले. आतां १,४०० इंजनें व ५०,०००० वाघिणींची त्यांत भर पडावयाची आहे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सोयीसाठी सुखकारक डबे पुरवण्याचें रेल्वे अधिकाऱ्यांनीं ठरविलें आहे असें सर एडवर्ड म्हणाले. युद्धपरिस्थितींत सामान्य जनतेनें रेल्वे प्रवासांत ज्या अडचणी सोसल्या आणि व्यापारी व इतर लोकांचे जे हाल झाले, त्यांचा उल्लेख वाहतुक मंत्र्यांच्या भाषणांत होता कीं नाहीं हें समजत नाहीं. रेल्वेजच्या युद्धकालीन कारभाराच्या ह्या अंगाचा निर्देश केला जाणें आवश्यक होतें. तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांसाठीं व्हावयाच्या सोयींविषयींचीं अभिवचनें आजवर पुष्कळ देण्यांत आलीं आहेत. तीं कशीं कृतींत उतरतात हें आतां पहावयाचें आहे. हिंदी रेल्वेजची सुस्थिति जनतेच्या स्वार्थत्यागामुळेंच शक्य झाली आहे हें विसरून चालणार नाहीं.

## औद्योगिक माहितीची विश्वसनीय आकडेवारी

शेती, कारखानदारी व व्यापार ह्यांच्या व्यवहारांतील उत्पादन व उत्पन्न, समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें होणारी राष्ट्रीय प्राप्तीची वाटणी इत्यादि संबंधांत हिंदुस्थानांत विश्वसनीय आकडेवार माहिती उपलब्ध नसल्याची अनेक वर्षांची जुनी तक्रार आहे. अशा माहितीच्या अभावीं कोणतेंहि योजनात्मक धोरण आखण्याच्या मार्गांत अडचण येते आणि प्रगतीसाठीं विधायक कार्य हातीं घेणें कठिण होतें ही सामान्य अनुभवाची गोष्ट आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना तयार करतांना सरकारास ही नड तीव्रतेनें भासली आहे आणि जरूर पडेल त्याप्रमाणें विशिष्ट माहिती गोळा करणें त्यास भाग पडलें आहे. पुढारलेल्या देशांत आर्थिक व सामाजिक महत्त्वाच्या बाबींविषयींचे तपशीलवार व पद्धतशीर आकडे तयार करण्याची कायमची तज्ञांची व्यवस्था असते. हिंदुस्थान सरकारनें प्रमुख धंद्यांविषयींची आकडेवार माहिती गोळा करण्याची तजवीज अंमलांत आणण्याचें आतां ठरवलें आहे. डायरेक्टर ऑफ स्टॅटिस्टिक्स ह्या अधिकाऱ्याची त्यासाठीं खास नेमणूक होईल आणि प्रमुख धंदेवाल्यांस स्वतःच्या कारखान्यांचे संबंधांत दर महिना ठराविक माहिती त्याजकडे पाठवावी लागेल. निरनिराळ्या ३४ धंद्यांचा अंतर्भाव प्रारंभीं ह्या योजनेंत होईल. १९४५ सालांत खुषीच्या पद्धतीनें माहिती पुरवली जाईल. त्याच्या पुढील वर्षापासून माहिती देणें कायद्याच्या सक्तीचे क्षेत्रांत पडेल. सरकारनें नियोजलेला उपक्रम तूर्त अत्यंत मर्यादित स्वरूपाचा आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांचें आकलन होण्यास आकडेवार माहितीची व्यवस्था अधिक व्यापक करण्यांत येणें आवश्यक आहे.

## ॲटॉमिक बाँब

ॲटॉमिक बाँबच्या अपूर्व संहारशक्तीचा परिणाम जपानला तात्काळ शरण येण्यास भाग पाडण्यांत झाला. पण लाखों वस्तीचीं शहरें निमिषार्धांत भस्मसात करूं शकणारीं असलीं विध्वंसक अस्त्रें प्रतिस्पर्धी राष्ट्रें एकमेकांविरुद्ध वापरूं लागल्यास जगाचें पुढें काय होणार ह्याची चिंता विचारी लोकांस लागली आहे. शास्त्रीय व यांत्रिक शोध पुढें चालू राहणार आणि ते थांबवणें शक्य व इष्ट नाहीं. ह्या शोधांचा उपयोग मानवी जीवनाच्या सुधारणेकडेच करतां येऊन त्यांच्या दुरुपयोगास बंदी कशी करतां येईल हाच खरा प्रश्न आज जगापुढें आहे. प्रेसिडेंट ट्रूमन म्हणतात कीं ॲटॉमिक बाँबच्या मुळाशीं असलेलें शास्त्रीय तत्त्व हें कांहीं गुपित नाहीं. त्याचा बाँब बनण्यास लागणारीं साधनें व सांपत्तिक सामर्थ्य मात्र अमेरिकेपाशीं आहे तसें तें दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रास उपलब्ध होणें शक्य नाहीं. जगांत ह्यापुढें शांतता नांदावयाची असेल तर विध्वंसक साधनांवर नियंत्रण घालण्यांत येऊन तें राष्ट्रसंघाच्या हातीं देण्यांत आलें पाहिजे अशी एक सूचना करण्यांत आली ती विचारार्ह आहे. आंतराष्ट्रीय युद्धाची कल्पनाच नष्ट करण्याचा विडा संयुक्त राष्ट्रांनीं उचलला असल्यानें

जगाच्या नि:शस्त्रीकरणावर आतां भर देण्यांत आला पाहिजे. ॲटॉमिक बॉंबमधील शक्तीचा उपयोग औद्योगिक प्रगतीकडे करतां येणें प्रमुख शास्त्रज्ञांस शक्य वाटत आहे आणि त्यांचे प्रयत्न सफळ होतील तर मानवतेवर मोठे उपकार होतील. शस्त्राचा उपयोग मानवी दुःखाच्या निवारणार्थ करतां येतो, तसा तो मनुष्याच्या प्राणहरणाकडेहि केला जातो. तेव्हां, ॲटॉमिक बॉंबसारख्या रानटी सुधारणांचा चांगला-वाईट विनियोग शास्त्रीय शोधांवर अवलंबून नसून त्यांचा अनिष्ट फायदा घेणाऱ्या राष्ट्रीय राजसत्तेवर ह्याची जबाबदारी सर्वस्वी पडते. मानवी हिताच्या दृष्टीनें ह्या सत्तेचें नियमन करण्याचा प्रश्न प्रमुख बलवान् राष्ट्रांनींच सोडवावयाचा आहे. प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें ह्यापुढें जगांत युद्ध होऊं देणें म्हणजे मानवतेच्या नाशास तयार होणें आहे.

---

### महालिंगपूर सहकारी विणकर संघ अमलि.

वरील संघाचा उद्घाटन समारंभ महालिंगपूर येथें ता. ११-९-४५ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां मे. दिवाणबहादूर ए. एन. प्रधान, दिवाण सं. मुधोळ यांचे हस्तें मोठ्या थाटानें झाला. सदर प्रसंगीं संस्थानांतील प्रमुख अधिकारी, असेंब्ली प्रेसिडेंट राव. सालीमठ, रा. हट्टी वकील व बराचसा विणकर समुदाय हजर होता. प्रारंभीं संघाचे सेक्रेटरी रा. मुरगोड यांनीं स्वागतपर भाषण करून विणकरवर्गाच्या अडचणी सभेपुढें मांडल्या व उद्घाटन करण्यास विनंती केली. यानंतर श्री. तांबे असि. रजिस्ट्रार यांनीं कोणत्या परिस्थितींत संघ स्थापन होत आहे व सभासदांवर कोणती जबाबदारी आहे व प्रामाणिकपणें काम करीत राहिल्यास विणकर वर्गाचें व आपलें हित कसें होणार आहे याचें विवेचन केलें. यानंतर श्री. हट्टी वकील यांचें कानडींत विचारपरिप्लुत भाषण झाल्यावर अध्यक्षांनीं कोणत्या परिस्थितींत संघाचें काम सुरू झालें व त्याजवर पडणारी जबाबदारी याचें विवेचन करून प्रामाणिकपणाचें महत्त्व किती आहे याची विणकरवर्गास जाणीव करून दिली व सरकारांतून अल्प व्याजानें रु. २००० भांडवल सूत-खरेदीसाठीं मंजूर केलें आहे व त्यांतून सूत-खरेदी करून दिल्यास विणकरवर्गाचें हित होऊन त्यांचा धंदा वाढेल अशी आशा व्यक्त केली. नंतर संघ उघडल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

---

### दि विजय टेक्स्टाइल्स लि., पुणें

( वार्षिक सभा : २८-१०-१९४५ )

वरील कापडाच्या गिरणीस ३१ मार्च १९४५ अखेर संपलेल्या वर्षीं ३,९११ रुपये निवळ नफा झाला. मॅनेजिंग एजंटांनीं आपल्या अलावन्सपैकी स्वतः होऊन सोडलेल्या १,३२० रुपयांचा त्यांत समावेश होतो. पूर्वीचा शिलक तोटा कमी करण्याकडे ह्या नफ्याचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. कामगारांचा संप, मजुरींत भरमसाट वाढ, नियंत्रित दरानें सूत मिळण्याची अडचण वगैरे कारणांमुळें गिरणी ह्यापेक्षा अधिक चांगला नफा दाखवूं शकली नाहीं. परंतु, "आतां ह्यापुढें आम्हांस चांगले दिवस दिसत आहेत आणि आणि चालू वर्षअखेर जास्त समाधानकारक आकडे दाखवूं शकूं" असा बोर्डास विश्वास वाटत आहे. कंपनीचें वसूल भांडवल ३४,३०० रुपये असून तिचेकडे १ लक्ष, ६१ हजारांच्या ठेवी वगैरे आहेत. गेल्या वर्षीं कंपनीनें १,५२,०३२ रुपयांचा माल विकला. श्री. जी. डी. कवडीकर हे कंपनीचे मॅनेजिंग एजंट असून श्री.ग. वि. सावळेकर, बी. ए. हे चेअरमन आहेत.




व्ही.पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:— द. ना. हेजीब

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४४ मधील प्रगति
नव्या कामांत ७० टक्के वाढ
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

डोंगरे याच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
गोकाक १२-१०-४५ ते २५-१०-४५
नागपूर दि. ५-१०-४५

व्याज-वजा (xd)
गोकाक मिल्स रु. ५ दि. २९-१०-४५
नागपूर मिल्स रु. ९ऽ दि. ६-११-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित ऽ अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | शुक्रवार १२।१०।४५ |
|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २२४१-४-० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१३-०-० |
| २२०१; १६९५ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९५२-८-० |
| ७६५; ५३३ | ९---०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०२-०-० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५५७-०-० |
| ४९८; ३६१ | ९-०-०ऽ | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २५५-०-० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८४-०-० |
| ३९४; २८२ | ५-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९८-०-० |
| ३०५; २१८ | १२-०-०ऽ | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २९३-८-० |
| २-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१५-६ |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३-१३-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | २-१३-६ |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६९६-४-० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२१-०-० |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२२-०-० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५४८-१२-० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७-३-० |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२-५ |

आंध्रा व्हॅली रु. ३७-८ऽ दि. १०-१०-४५
बॉम्बे ट्रॅम रु. २-८-०† दि. २३-१०-४५
टाटा पॉवर रु. ४०-०-०ऽ दि. १७-१०-४५
टाटा ऑइल रु. २-१२ दि. २०-१०-४५

## जर्मनीच्या पराभवाचीं प्रमुख कारणें

( न्यूयॉर्क टाइम्समधील एका लेखाचा सारांश )

(१) १९४१-४२ मध्यें जर्मनीनें आपल्या आफ्रिकेंतील फौजांस पुरेशी कुमक पाठविली नाहीं. १९४१-४२ मध्यें ब्रिटिशांचा आफ्रिकेंतील पराभव एक सुतावर लोंबकळत होता.

(२) पर्ल हार्बरवर जपाननें हल्ला केल्यानंतर जर्मनीनें अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारावयास नको होतें. आपलें अमेरिकेशीं कांहींहि भांडण नाहीं, असा पुकारा त्यानें केला असता, तर अमेरिकेंतील लोकमतावर त्याचा परिणाम झाला असता.

(३) १९४०-४१ मध्यें इंग्लंडवर स्वारी न करण्यांत जर्मनीची चूक झाली. त्यावेळीं इंग्लंडची बचावाची मुळीच तयारी नव्हती.

(४) रशियाशीं युद्ध पुकारल्याकारणानें, जर्मनीला दोन आघाड्यांवर लढावें लागलें. जेवढी म्हटली जाते एवढी मात्र जर्मनीची अपेक्षा चुकीची नव्हती. १९४१ मध्यें मॉस्को जवळ जवळ पडलें आणि १९४१ व १९४२ मध्यें रशियाचें कमालीचें नुकसान झालें. युद्ध चालू असतांना रशियानें नव्या फौजा उभारल्या आणि औद्योगिक उत्पादन वाढविलें त्यास जगाच्या इतिहासांत तोड नाहीं.

(५) १९३९ सालीं युद्ध सुरू करण्यांतच जर्मनीची चूक झाली. आणखी एक वर्ष प्रचारांत आणि दमबाजींत घालवून त्या अवधींत जर्मनीनें आपलीं गुप्त अस्त्रें पूर्णावस्थेस नेलीं असतीं तर जर्मनीस त्वरित यश मिळालें असतें. गुप्त अस्त्रांचा उपयोग फार उशीरा सुरू करण्यांत आला व त्यांचा माराहि फार थोडा काळ टिकला.

## माढा ता. ख्रु. यूनियनचें सुपरवायझर श्री. पानसरे

माढा ता. सुपरवायझिंग युनियनचे सुपरवायझर मि. पानसरे यांना सोलापूर डि. सेंट्रल बँकेनें इन्स्पेक्टर म्हणून निवडून घेतलें असल्यानें ते माढा युनिअनमधून दुसरीकडे जात असल्यामुळें उपळाई खुर्द को. ऑ. सोसायटीतर्फे ता. १५-८-४५ रोजीं त्यांचा सत्कार युनिअनचे चेअरमन मे. शाहूराव रंगराव पाटील यांचे अध्यक्षतेखालीं झाला. उपळाई खुर्द सोसायटीनें चालविलेल्या किराणा दुकानला त्यांनीं वेळोवेळीं भेट देऊन शेतकरी वर्गांत व्यापारी आवड उत्पन्न करून दिली व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलें आहे, व तालुक्यांतील लोकप्रिय पुढारी मे जी. डी साठे साहेब यांचे देखरेखीखालीं काम करून शेतकऱ्यांत मिळून मिसळून मनमोकळेपणानें काम केलें. असा कार्यकर्ता मनुष्य आमचे युनिअनमधून जात असल्यानें त्याबद्दल जनतेस हळहळ वाटते, परंतु त्यांची बढती होऊन ते जात असल्यानें त्याबद्दलही आनंद वाटत आहे.


**पैसा आणि ज्ञान वाढवा !**

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्‌भुत कथानक ! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

# श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर

( भोर संस्थान )

अधिकृत भांडवल : १५ लाख रु.

विक्रीस काढलेले व खपलेले भाग : साडेआठ लाख रु.

—: बोर्ड ऑफ डिरेक्टर्स :—

श्रीमंत सरदार खंडेराव रामराव विंचूरकर, पुणें

श्री. गणेश रामचंद्र साठे
बिस्किट कारखानदार, पुणें.

श्री. हरीहर रामकृष्ण करंदीकर
लक्ष्मीरोड, पुणें.

श्री. दत्तात्रय बाळकृष्ण फाटक
पायोनियर डाईंग हाऊस, पुणें.

श्री. माधव गणेश देसाई
एस. एन. राजर्षी कं. मुंबई.

वगैरे.

ही गिरणी १९४४ सालीं सुरू झाली. गिरणींत तूर्त फक्त सूत निघतें. भोर संस्थाननें या गिरणीला टेक्स्टाइल इंडस्ट्रीबद्दल भोर संस्थान हद्दीपुरत्या मोनापलीसारख्या खास सवलती दिल्या आहेत. भाटघर धरणानें उत्पन्न झालेल्या विजेच्या शक्तीवर ही गिरणी चालते. या मिलचे मॅनेजिंग एजन्टस दि भोर मरकंटाईल एजन्सी लि. ( भोर ) हे आहेत. या कंपनीचे सध्याचे डायरेक्टर, श्री. देसाई, फाटक व करंदीकर हे आहेत.

या गिरणीचे चालू भांडवलाकरितां व वाढीकरितां ठेवी घेणें आहेत. ह्याबद्दल चौकशी मॅनेजिंग एजंटस, दि भोर मरकंटाईल एजन्सी लि. भोर यांजकडे करावी.

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ती झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व ए. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २४ आक्टोबर, १९४५ अंक ४३

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

डिस्टिलरीच्या उभारणीचें काम सुरू आहे.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री श्री

श्री—श्री—श्री—श्री—श्री

# विविध माहिती

## "अर्थ"चा दिवाळी अंक

"अर्था"चा ता. ३१ ऑक्टोबरचा अंक बंद राहील आणि त्यापुढील ता. ७ नोव्हेंबरचा अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल.

### मद्रास प्रांतांतील नियंत्रणें

मद्रास प्रांतांतील अन्न व वस्त्र ह्यांवरील नियंत्रण आणखी दोन वर्षे चालू राहील असें अधिकृत रीत्या प्रसिद्ध झालें आहे.

### टंकलेखनाचा विक्रम

न्यू यॉर्क येथील मिस मार्गारेट हमा हिनें मिनिटास १४९ शब्द टाइप करण्याचा विक्रम केला आहे. त्यापैकी ९९·१% बिनचूक होते.

### स्वतःवर प्रयोग करून घेण्याची तयारी

मलेरियास प्रतिबंध करणारें नवें औषध शोधून काढलें आहे त्याचा स्वतःवर प्रयोग करून घेण्याची अमेरिकेंतील ८०० कैद्यांनीं तयारी दर्शविली आहे.

### कर्जनिवारण बोर्डे व तालुक्यांच्या नव्या सरहद्दी

राज्यकारभाराच्या सोईसाठीः मुंबई सरकारनें कांहीं तालुके, पेटे व महाल ह्यांच्या सरहद्दी बदलल्या आहेत व त्यामुळें एकांतील खेडीं दुसऱ्यांत दाखल झालीं अशीं कित्येक उदाहरणें घडलीं आहेत. कर्जनिवारण बोर्डांची नेमणूक जाहीर झाली, त्या वेळीं खेडीं ज्या तालुक्यांत, पेट्यांत अथवा महालांत असतील, त्यांतच तीं बोर्डांच्या कामापुरती ह्यापुढेंहि राहतील असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. त्याप्रमाणें, ज्या तालुक्यास, पेट्यास किंवा महालास शेतकरी कर्ज निवारण कायदा लागू झाला असेल, त्यांत नव्यानें दाखल होणारें खेडेगांव कायद्याचे अंमलाखालीं येणार नाहीं.

### बंगाल आसाम रेल्वे

बंगाल आणि आसाम रेलवे ह्या रेलवेनें १ नोव्हेंबरपासून बंगाल आसाम रेल्वे हें नांव धारण केलें आहे.

### रेडिओची वाढती लोकप्रियता

रेडिओ वापरण्यासाठी परवाना फी लोकांस द्यावी लागते तिचें १९३०–३१ मध्यें हिंदुस्थान सरकारास ८३,००० रुपये उत्पन्न झालें होतें, तें १९४३–४४ मध्यें १९½ लक्ष रुपयांवर गेलें. रेडिओ–यंत्रांच्या आयातीवरील जकातीचें उत्पन्न १९३०–३१ सालीं ५६,००० रुपये होतें, तें १९४२–४३ मध्यें ३७ लक्ष रुपये झालें, पण आयात घटल्यामुळें त्याचा आकडा १९४३-४४ सालीं ११½ लक्ष पर्यंत घटला. मार्च, १९४४ अखेर १,८०,६६० लोकांनीं रेडिओचे परवाने काढलेले होते आणि ऑल इंडिया रेडिओचीं नियतकालिकें प्रसिद्ध होतात, त्याचा खप त्या वेळीं ६६,१५० एवढा होता.

### प्राप्तीवरील कर आणि जकाती ह्यांचें उत्पन्न

हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नाच्या कांहीं बाबींची उत्पादकता युद्धकाळांत पुष्कळ वाढली आणि कांहींची घटली. उदाहरणार्थ, १९३९–४० मध्यें प्राप्तीवरील करांचें १६½ कोटी रुपये सरकारला मिळाले होते आणि १९४३–४४ बाबतचें हें उत्पन्न (प्रांतिक सरकारांचा वांटा वगळून) १०९½ कोटी झालें. ह्याच्या उलट, जकातीपासून सरकारला १९३९–४० मध्यें ४६ कोटी रुपये मिळाले होते, पण हा आकडा १९४३–४४ मध्यें केवळ २६½ कोटींवर खालीं आला. एक्साइज पट्ट्यांचें उत्पन्न मात्र ६½ कोटींचें २५ कोटी झालें.

## केरळांतील त्रावणकोरची पेरियार

लेखकः—श्री. जे. जे. तवनप्पा, बेळगांव.

पेरियार नदीचा कांहीं भाग सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांत अडवून दाट अरण्यांत आठ मैलपर्यंत अनेक खोऱ्यांत पाणी पसरलेलें नयनमनोहर टेंकडीवरील सरोवर बनविण्यांत आलें असून, हिचें बांधकामसुद्धां निसर्गास अनुसरून अत्यंत गुंतागुंतीचीं लहानमोठीं वळणें घेणारीं बांधें बनवून करण्यांत आलें असून, पर्वतावरीलच्या तळांतून अत्यंत कठीण अशा दगडांतून एक मैलापेक्षां जास्त लांबीचा बोगदा कोरून हिंदूंच्या अत्यंत पवित्र अशा मदुरा क्षेत्रावरून वाहून रामेश्वर क्षेत्राजवळ समुद्रार्पण होणाऱ्या वैगे नदीस सरोवराचें पाणी सोडण्यांत आलें आहे. वैगे या तामीळ शब्दाचा अर्थच मुळीं असा होतो कीं, पाण्यावर हात ठरत नाहींत. यावरून तिच्या वेगाच्या तीव्रतेची कल्पना वाचकांस होईल.

याबाबत त्रावणकोरास मद्रास सरकारकडून वार्षिक खंडणी मिळते. अर्थात पेरियार पाणी निर्यात करते, फार काय लवकरच पेरियार वीज निर्यात करणारी कामधेनू होणार आहे. कदाचित् याबाबतींत म्हैसोरची गेरसप्पाच काय ती स्पर्धेत बरोबरी करूं शकेल.

सर्वांत अद्भुत म्हणजे आधुनिक इरिगेशन इंजिनियरिंग शास्त्राच्या देणगीचे 'पेरियारचें सरोवर' म्हणजे 'मार्व्हलस नॉव्हेल्टी' म्हणतात.

येवढ्यावरूनच तिचें चरित्र संपलें नाहीं. सरोवराचे काठीं 'इडापळ्ळयाम' नांवानें ओळखला जाणारा राजघराण्यासाठीं ३५० एकराचा खास शिकारखाना राखून ठेवण्यांत आला आहे. येथें सरोवरांत पेट्रोल–लॉंच (मोटारींच्या) आकाराच्या लहान यांत्रिक बोटींत बसून सकाळ–दुपार–संध्याकाळ कोणत्याही वेळीं निसर्गांत वाढलेल्या अनेक जातींच्या आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या हत्ती, वाघ, गवीरेडे, हरणें इत्यादि हिंस्र व अन्य जातींच्या रानटी जनावरांची मजा मनमुराद पाहून घ्यावी. सदरी शिकारखाना देशांतील इतर भागांतीलच नव्हे तर जगाच्या पाठीवरून प्रवाशी आकर्षेल व आपल्या सौंदर्याची निर्यात करून संस्थानास ज्याला अर्थशास्त्रांत 'अदृश्य निर्यातीची' बाब म्हणतात, त्यापासूनही संस्थान व जनता यांना उत्पन्न तयार करून देईल. अदृश्य निर्यातीचा दाखला म्हणजे नुकतेंच सॅनफ्रॉन्सिस्को येथें ५० राष्ट्रांची जी जागतिक परिषद भरली होती, त्यावेळीं परिषदेस आलेल्या परराष्ट्रांच्या सभासदांनीं तीन कोट रुपये उधळले. म्हणजेच तेथील हॉटेलवाले, वहातुकवाले यांना पैसा मिळाला व तितक्या किंमतीच्या डॉलरचा मोबदला अमेरिकेस परराष्ट्रीय चलन आपणांस हवा तो कच्चा माल खरेदी करण्यास त्या त्या देशांत तयार झाला.

ज्यांना सृष्टिसौंदर्याची व प्रवासाची आवड असून, आमच्या देशाचें खरें दर्शन घेण्याचें असेल, त्यांनीं अखंड देशाच्या दर्शनाचा एक भाग म्हणून त्रावणकोरच्या संपूर्ण चित्रदर्शनासाठीं प्रिन्सिपॉल गो. चि. भाटे यांनीं लिहिलेली 'केरळाचें वर्णन व वृत्तांत' प्रवास वृत्त माला वाचावी. लेखकांस नदीवर्णनापुरतें पहावयाचें असलेनें स्थलाभावीं इतर माहिती कितीहि मनोरंजक व उपयोगी असली तरी आवरणें भाग आहे.

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## सुरत जिल्ह्याचा सहकारी संसार

कोणत्याहि संस्थेच्या किंवा चळवळीच्या इतिहासाचें सिंहावलोकन मधून मधून करणें नेहमींच हितावह असतें. झालेली प्रगति किंवा तिच्या मार्गांत आलेल्या अडचणी, कार्यकर्त्यांच्या धोरणाची व व्यवहाराची युक्त वा अयुक्त दिशा, परिस्थितीचें आनुकूल्य वा प्रातिकूलता ह्यांचेवर अशा अवलोकनानें बोधप्रद प्रकाश पडून तें मार्गदर्शक होतें. कार्यपद्धति कोठें सुधारली पाहिजे, चुका कशा टाळल्या पाहिजेत व परिस्थितीस कसें नवीन वळण लावलें पाहिजे ह्याची कल्पना संस्थांमध्यें होणाऱ्या घडामोडींच्या परिशीलनानें येते. सहकारी चळवळीच्या वार्षिक सरकारी वृत्तांतांत तिच्या संबंधांतली अशी माहिती उपलब्ध होत असे, परंतु युद्धपरिस्थितीमुळें अलीकडे तो वृत्तांत छापून प्रसिद्ध न करण्याचें ठरवण्यांत आल्यानें सहकारी जनता एका महत्त्वाच्या शैक्षणिक साधनास मुकली आहे. आतां युद्ध समाप्त झालें असल्यानें तपशीलवार सहकारी वृत्तांत पुन्हां पूर्वीप्रमाणें छापून प्रसिद्ध केला जाईल अशी आशा आहे. तसेंच सहकारी चळवळीच्या निरनिराळ्या प्रमुख अंगांचा आणि संस्थांचा इतिहास लिहिला जाईल तर तो विशेष बोधप्रद झाल्यावांचून रहाणार नाहीं.

ह्या दृष्टीनें सुरत जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँक आणि इतर सहकारी संस्था ह्यांचा १९३४-३५ ते १९४४-४५ ह्या दशवार्षिक अवधींतला इतिहास दिवाणबहादुर चुनीलाल माणेकलाल गांधी ह्यांनीं प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे; ( **Ten years of Co-operative Effort in Surat District : By Diwan Bahadur C. M. Gandhi : Surat District Co-operative Bank : Price Rupees Three** )

दि. ब. गांधी हे मुंबई प्रांतांतील नाणावलेले, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व आस्थेवाइक सहकारी कार्यकर्ते आहेत. ते सुरत सेंट्रल बँकेचे उत्पादक व डायरेक्टर असून त्यांनीं सदरहु संस्थेच्या अध्यक्षाची जागा पंचवीस वर्षें ओळीनें विभूषित केली आहे. ह्या त्यांच्या प्रदीर्घ कामगिरीचें स्मारक म्हणून प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला आहे. बँकेचा रौप्यमहोत्सव दहा वर्षांमागेंच साजरा झाला आणि त्या निमित्तानें तिचा अितिहासहि प्रसिद्ध करण्यांत आला. त्यानंतरच्या काळांत सेंट्रल बँक आणि सुरत जिल्ह्यांतल्या इतर सहकारी संस्था ह्यांच्या कारभारास कोणतें वळण लागलें ह्याचा वृत्तांत तपशीलवार आकडे व त्यांचें स्पष्टीकरण यांचेसह प्रस्तुत पुस्तकांत देण्यांत आला आहे. दिवाण बहादुरांचा स्वतःचा सहकारी कार्यकर्ते ह्या नात्याचा अनुभव आणि त्यावरून त्यांनीं बनवलेल्या मतांपासून घेण्यासारखा असलेला बोध हीं पुस्तकांत जागोजाग आलीं आहेत, तीं विचारप्रवर्तक आहेत. भिन्न भिन्न जिल्ह्यांतली नैसर्गिक, आर्थिक व सामाजिक परिस्थिति निरनिराळी असते आणि त्यांमधील सहकारी संस्थांचा इतिहास थोड्याबहुत वेगळ्या रीतीनें घडलेला असतो. तथापि, त्यांच्या अडचणी व त्यांच्यापुढचे अवघड प्रश्न कमी-अधिक प्रमाणांत सारखेच असतात. ह्या दृष्टीनें पहातां सुरत जिल्ह्यांतील सहकारी संस्थांचा इतिहास इतरत्र उपयुक्त वाटल्यावांचून रहाणार नाहां.

पुस्तकांत प्राथमिक पतपेढ्या, मध्यवर्ती बँक, अर्बन बँका व इतर सहकारी मंडळ्या ह्यांची सांगोपांग माहिती आणि तिच्यावर आधारलेली चर्चा आहे. सेंट्रल बँकेकडील वाढत्या ठेवी, तिचा कार्यक्षम पण काटकसरीचा कारभार, तिचे भक्कम रिझर्व्ह आणि तिचें उदार धोरण ह्या गोष्टी आकड्यानिशीं पुढें मांडण्यांत आल्या आहेत. बँकेजवळ मुबलक पैसा पडून असतांना त्याचा जनतेच्या हितार्थ विनियोग करण्यास पुरेसा वाव नाहीं, अशी दिवाणबहादुरांची तक्रार आहे. खेडेगावी जनतेचें आर्थिक जीवन सुधारण्याचे योग्य रीतीचे प्रयत्न सरकारकडून होत नाहींत, नवीन सहकारी सोसायट्या काढल्या जात नाहींत व सहकारी अधिकाऱ्यांचें बिनसरकारी कार्यकर्त्यांशीं व्हावें तसें सहकार्य होत नाहीं ह्यामुळें बँकेच्या व चळवळीच्या प्रगतीस आळा बसला आहे असा त्यांचा दावा आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचा उपोद्‌घात पुस्तकास जोडला आहे, त्यांत त्यांनीं सहकारी कार्यकर्ते आणि अधिकारी ह्यांचेमध्यें असलेल्या सहकार्याच्या अभावाचा उल्लेख केला आहे. सहकारी चळवळीच्या नेतृत्वाची व प्रगतीची जबाबदारी दुभंगली गेल्यामुळें आज जो घोटाळा माजला आहे तो दूर केला जाण्याची आणि तिचीं सूत्रें एकहाती असण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आहे. सहकारी चळवळीस निष्ठावंत आणि कर्तृत्ववान् कार्यकर्ते लाभून त्यांच्या हातून जिल्हानिहाय सहकारी संस्थांची पद्धतशीर व शीघ्रगामी प्रगति घडून यावी अशी दिवाणबहादुर गांधींची सदिच्छा आहे ती आर्थिक पुनर्घटनेच्या काळांत सफल होवो असें आम्ही इच्छितों. त्यांच्या पुस्तकाचा कित्ता इतर बँकांकडून गिरवला जाईल अशीहि आम्हांस आशा आहे.

## " वनस्पती " तुपाचा धंदा

खाण्यास योग्य अशा गळिताच्या धान्यांपासून वनस्पती ह्या नांवानें ओळखलें जाणारें तूप अलीकडे हिंदुस्थानांत तयार केलें जात असून मध्यम व कनिष्ठ वर्गांच्या जनतेंत त्याचा खपहि बराच होत आहे. दुधाच्या सत्वाचें बनवलेलें तूप दुर्मिळ व महाग झाल्यामुळें त्याची जागा ह्या कृत्रिम तुपानें, विशेषत: तळणांत, घेतली आहे. ह्या नवीन धंद्याचा जनतेच्या आरोग्याशीं निकट संबंध येत असल्यानें आणि त्याचा विस्तार योग्य तऱ्हेनें होणें इष्ट आहे असें वाटत असल्याकारणानें त्याचे संबंधांत चौकशी केली जाऊन त्याचें नियमन कसें व्हावें ह्याविषयीं सूचना करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक समिति नेमली आहे. दुग्धजन्य तूप व खाण्यास योग्य असलेलीं तेलें ह्यांचा तुटवडा भरून निघण्यास वनस्पती तुपाच्या उत्पादनास किती वाव आहे, त्याचें उत्पादन योग्य किंमतींत होऊन तें वापरणारांच्या हितास बाध येणार नाहीं अशा बेतानें त्याच्या धंद्याचा विस्तार देशाच्या कोणत्या भागांत होऊं देणें इष्ट होईल, वनस्पती तुपास संभाव्य मागणी किती आहे आणि त्याच्या उत्पादनास लागणारी यंत्रसामुग्री मिळण्याची शक्यता काय आहे, माल चांगल्या प्रतीचा निघण्यास काय खबरदारी घेतली जावी, नवीन धंद्यास सरकारचें सहाय किती लागेल इत्यादि प्रश्नांवर समितीनें आपला अभिप्राय व्यक्त करावयाचा आहे. प्रतिवर्षी एकूण एक लक्ष टन तूप तयार करतील असे सत्तावीस कारखाने देशांत चालण्याची तरतूद अगोदर झालेलीच आहे.

## औद्योगिक सहकारी मंडळ्या

शेतकऱ्यांस धंद्यासाठी लागणारें भांडवल देणें, यंत्रें, खतें, बीं-बियाणें ह्यांचा त्यांस पुरवठा करणें व त्यांचा माल विकणें, तसेंच, मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या लोकांस विशेषतः कामकरी वर्गास नित्याच्या जीवनास आवश्यक असलेल्या जिनसा पुरवणें व प्रसंगीं त्यांचें उत्पादन करणें हींच कार्यें मुख्यत्वेंकरून सहकारी संस्था जगांतील सर्व देशांत करीत आहेत. लहान प्रमाणावर हस्त-व्यवसाय करणाऱ्या कारागिरांचे संघ बनवून त्यांचें उत्पादन कार्य संघटित व फायदेशीर करणें हें सहकारी संघटनेंत कोठेंच महत्त्वाचें स्थान मिळवूं शकलें नाहीं. जपानशीं स्वसंरक्षणात्मक युद्ध चालवीत असतांना, चिनी राष्ट्रास लहान प्रमाणावरील देशी धंदे विस्तृत रीतीनें संघटित करण्याची निकड भासली आणि तेथें औद्योगिक सहकारी संस्था उदयास येऊन विस्तार पावल्या. हिंदुस्थानांत खेडेगांवी धंद्यांचें संघटन सहकारी पद्धतीनें करून शेतकरी व इतर वर्गांस फायदेशीर व्यवसाय पुरवण्याची आवश्यकता अलीकडे भासत आहे. मोठ्या प्रमाणावर यांत्रिक शक्तीनें चालणाऱ्या स्वदेशी व परदेशी कारखान्यांच्या स्पर्धेमुळें ह्या देशांतील विविध प्रकारची कारागिरी मागें पडून नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. तिला सावरून धरण्यासाठी लक्षावधि बेकार कारागिरांस सहकारी पद्धतीनें संघटित करून स्वतःच्या पायांवर उभे रहाण्यास समर्थ बनवण्याचें अगत्य मुंबईमधील कित्येक समाजहितचिंतकांस पटून त्यांनीं औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करणारें एक मंडळ स्थापलें आहे. त्याच्या कार्यक्रमांत औद्योगिक सहकाराचा प्रचार करणें आणि तत्संबंधानें माहिती पुरवणें ह्याचा अंतर्भाव आहे.

ह्या उद्देशास अनुसरून जें लिखाण प्रसिद्ध होत आहे, त्यांत, मुंबई प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटच्या कचेरीचे मुख्य अधिकारी, श्री. आर. एम. तळपदे, ह्यांनीं नुकतीच महत्त्वाची भर घातली आहे. ( " Industrial Co-operation " By R. M. Talpade; Industrial Co-operative Library; Padma Publications Ltd., : Price As. 12/-). इंग्लंडमध्यें " औद्योगिक क्रांति " घडून आल्यानें कारागीर व मजूर ह्या वर्गांची दुर्दशा झाली, तेव्हां नवीन यंत्रयुगाच्या दुष्परिणामांपासून त्यांस वांचवून त्यांचें औद्योगिक संघटन करण्याचे प्रयत्न झाले, त्यांचा त्रोटक इतिहास श्री. तळपदे ह्यांनीं प्रस्तुत पुस्तिकेंत दिला आहे. इंग्लंड, फ्रान्स, स्वीडन, जर्मनी, रशिया, इटली इत्यादि देशांत ह्या प्रयत्नानें कोणतें स्वरूप धारण केलें आहे ह्याची बोधप्रद माहिती त्यांत आली असून हिंदुस्थानांत औद्योगिक सहकारी संघटनेचें काय महत्त्व आहे व त्यास किती वाव आहे ह्याचेंहि दिग्दर्शन त्यांनीं केलें आहे. ह्या देशांत औद्योगिक सहकारी संस्था स्थापणें शक्य व इष्ट आहे असें आपलें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. पुस्तिकेस जोडलेल्या आपल्या प्रस्तावनेंत श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं सदरहु कार्याच्या मार्गांतील अडचणींचा उल्लेख करून आर्थिक लोकशाहीच्या इष्टतेवर विश्वास असणारांनीं सहकारी औद्योगिक संघटनेचा पुरस्कार करणें आवश्यक आहे, असें म्हटलें आहे. श्री. तळपदे ह्यांचा त्यांच्या पुस्तिकेच्या वाचनानें कार्यकर्त्यांमध्यें जिज्ञासा व स्फूर्ति उत्पन्न व्हावी हा उद्देश आहे तो सफल होवो असें आम्ही इच्छितों.

---

### " दैनिक महाराष्ट्रा'चें स्वागत

कै. दादासाहेब ओगले ह्यांनीं ३१ वर्षांपूर्वी १९१४ सालीं ४ पृष्ठांचें ' महाराष्ट्र ' साप्ताहिक सुरू केलें. त्याचीं २० पृष्ठांपर्यंत वाढ झाल्यानंतर १९३० मध्यें त्याचें द्विसाप्ताहिक करण्यांत आलें आणि आतां त्याचें विजयादशमीच्या मुहूर्तावर दैनिकांत रूपांतर झालें आहे. गेल्या डिसेंबरांतच त्यासाठीं आवश्यक ती सरकारी परवानगी मिळाली परंतु दादासाहेबांच्या हयातींत त्यास ही उत्क्रांति बघण्यास मिळाली नाहीं. राष्ट्रीय वृत्तीचें, उत्कृष्ट रीतीनें संपादित व वाचकांस योग्य मार्गदर्शन करणारें अशी, "महाराष्ट्र"ची प्रसिद्धि आहे. आपलें ध्येय साध्य करण्यास दैनिक अवतार त्यास अधिक साहाय्यकारक होईल.

---

### रशियांतून कागद येण्यास वेळ आहे

रशियांतून वृत्तपत्रांच्या छपाईचा कागद इतक्यांत निर्गत होऊं लागणार नाहीं, असें दिसतें. प्रत्यक्ष रशियांतील वृत्तपत्रांनींहि युद्धकाळांत कमी केलेलीं आपलीं पृष्ठें अद्यापि वाढविलेलीं नाहींत.

### आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

वरील अर्कशालेचा १९ वा वाढदिवस मंगळवार, तारीख १६-१०-४५ रोजीं सायंकाळीं स्वतःचे इमारतींत थाटानें साजरा झाला.

### रिझर्व्ह बँकेच्या लोकल बोर्डांची निवडणूक

रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागाच्या लोकल बोर्डाच्या पांच सभासदांची निवडणूक २३ नोव्हेंबर रोजीं मुंबई येथें ९ ते १ व २ ते ५ वाजेपर्यंत होणार आहे. पांच भाग धारण करणारास एक मत, अशा प्रकारें ज्यास्तींत ज्यास्त १० मतें भागदारांस असूं शकतील.


विमा-काम-बक्षिसें

' सह्याद्रि ' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना !
' सह्याद्रि ' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती ! !
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

-शाखा- काळभोर आणि कं., पुणें. | अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा. | गो. ग. सौंदणकर मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच | खादी मन्दिर | २६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## शेअर ट्रान्स्फरच्या कागदावरील स्टँप

### न्यू सिटिझन बँक वि. एशियन अॅ. कं. लि.

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. चे ३०० भाग एशियन अॅश्युअरन्स कं. लि. चे नांवें वर्ग करण्यांत आले होते. आपलें नांव मागीदार म्हणून नोंदून त्यावर हे भाग चढवावेत, ह्यासाठी एशियननें न्यू सिटिझनकडे ट्रान्स्फर फॉर्म व शेअर सर्टिफिकिटें हीं पाठविलीं. न्यू सिटिझन बँकेनें भागांची वर्गावर्गी करण्याचें नाकारलें. (१) वर्गावर्गी नाकारण्याचा बँकेच्या डायरेक्टरांस संपूर्ण अधिकार आहे, (२) ज्या नांवानें उपरिनिर्दिष्ट शेअर्स होते, त्याच्या शेअर्सवर बँकेचा "लीन"चा हक्क होता, तेव्हां एशियनच्या नांवानें ते वर्ग करण्यास बँक बांधलेली नाहीं आणि (३) बँकेकडे दाखल केलेल्या ट्रान्स्फर फॉर्मवर योग्य प्रकारें स्टँप लावलेला नव्हता असा बँकेनें युक्तिवाद केला. एशियन कंपनीनें, कंपनी कायद्याच्या ३८ व्या कलमास अनुसरून कोर्टांत अर्ज करून कंपनीचें नांव शेअर-होल्डरांच्या यादींत चढविण्याबाबत हुकूम मागितला. कोर्टानें बँकेचें म्हणणें अमान्य ठरवून, एशियन कंपनीच्या नांवावर शेअर चढवले पाहिजेत असा निवाडा केला त्यावर न्यू सिटिझन बँकेनें अपील केलें.

"वादांतील शेअरबाबतचा ट्रॅन्स्फर कागद बँकेकडे देण्यापूर्वी योग्य स्टँप लावलेला नव्हता; तेव्हां बँकेनें एशियन कंपनीस भागीदारांचे यादींत दाखल करून आपलें शेअर रजिस्टर दुरुस्त करावें असा हुकूम देतां येत नाहीं" असा अपिलांत न्यायमूर्तींनीं निवाडा केला. "कंपनीचे पुरेसे पैसे बँकेकडे डिपॉझिट केलेले होते; पूर्वीच्या ट्रॅन्स्फरचे वेळीं बँकेनें स्टँप लावला होता आणि प्रस्तुत प्रकरणांतहि बँकेस तशी सूचना असल्याचें गृहीत धरलें पाहिजे" असें एशियन कंपनीनें सांगून पाहिलें, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. अशा तऱ्हेचा बँक व कंपनी ह्यांचेमध्यें करार असल्यास व त्याचा बँकेनें भंग केला असल्यास बँकेकडून नुकसानभरपाई मागतां येईल परंतु शेअर रजिस्टरची दुरुस्ती व्हावी अशी मागणी समर्थनीय ठरणार नाहीं." असें न्यायमूर्तींनीं स्पष्ट सांगितलें. ट्रॅन्स्फरच्या कागदास योग्य स्टँप, तो कागद लिमिटेड कंपनीकडे नोंदण्यासाठी पाठविण्यापूर्वी कोणत्याहि कारणामुळें लावला गेलेला नसेल, तर शेअर रजिस्टरमध्यें दुरुस्ती करून भागीदार म्हणून नोंद मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं, असा ह्याचा स्पष्ट अर्थ आहे.

---

### गोखले इन्स्टिट्यूटला देणगी

सर दोराबजी टाटा ट्रस्टनें गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्सला पांच वर्षें दरसाल १५,००० रुपये ग्रँट देण्याचें ठरविलें आहे आहे. इन्स्टिट्यूटमध्यें शेतकीविषयक अर्थशास्त्राची शाखा स्थापन करण्याकडे त्या रकमेचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. महाराष्ट्रांतील दुष्काळी भागांपैकी ज्यांची स्थिति सुधारणें अत्यंत अवघड आहे, असा भाग निवडून त्याची आर्थिक व सामाजिक पहाणी करण्यांत १९४७ पासूनचीं पांच वर्षें खर्च करण्यांत येतील. आर्थिक संशोधनाच्या क्षेत्रांत प्रा. गाडगीळ ह्यांच्या इन्स्टिट्यूटनें पूर्वीच मान्यता मिळविलेली आहे. टाटा ट्रस्टच्या देणगीमुळें इन्स्टिट्यूटच्या कार्याचा उरक जास्त होऊं शकेल आणि तिची उपयुक्तता वाढेल ह्यांत संशय नाहीं.




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

नोगीचें
डोंगर
छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

पैसा आणि ज्ञान वाढवा !
श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

डोंगरे
यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद
गोकाक १२-१०-४५ ते २५-१०-४५
नागपूर दि. ५-१०-४५

व्याज-वजा (xd)
गोकाक मिल्स रु. ५ दि. २९-१०-४५
नागपूर मिल्स रु. ९ S दि. ६-११-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १५।१०।४५ | बुधवार १७।१०।४५ | गुरुवार १८।१०।४५ | शुक्रवार १९।१०।४५ | सोमवार २२।१०।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २२६२—८ | २२७७—८ | | २२९०—० | २३२१—४ |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१७—० | ४१७—८ | | ४२०—८ | ४२५—८ |
| २२०१; १६९५ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १९६५—० | १९६५—० | | १९३७-१२ | १९८५—० |
| ७६५; ५३३ | ९---० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६०६—८ | ६०६—० | | ६०६—० | ६०७—८ |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५५९—८ | ५५७—० | | ५५७—८ | ५६७—० |
| ४९८; ३६१ | ९-०-० S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ३९५—८ | ३९५—० | | ३९६—० | ३९६—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | २८५—० | २८५—० | | २८८—० | २९०—० |
| ३९४; २८२ | ५-०-० † | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३००—८ | ३०४—० | | ३०५—० | ३०७—० |
| ३०५; २१८ | १२-०-० S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २९६—८ | २९४—८ | | २९४—० | २९४—८ |
| २-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१५-३ | ३-१५-३ | | ३-१५-० | ४—०-० |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १३-१४-० | १३-१४-० | | १३-१५-० | १४—१-६ |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | २-१३-३ | २-१३-६ | | २-१३-३ | २-१४-६ |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७०२—८ | ७०६—४ | | ७०५—० | ७०६—४ |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | २२२—४ | २२२—८ | | २२०-१२ | २२१—८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २२३—० | २२५—० | | २२५—० | २२५—८ |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५०—० | ५५०—० | | ५४५—० | ५५०—० |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३७-१० | ३७-११ | | ३७-१५ | ३८—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२-८-६ | १०२—९ | | १०२-९-६ | १०३-०-० |

सोमवार दि. २२-१०-४५ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०२—५-० |
| १९५१-५४ | १०१-१०-० |
| १९५७ | १००-१०-० |
| १९६३-६५ | ९९—६-० |
| १९६६-६८ | ९८—७-० |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १५२-० |
| सेंट्रल | ९०-० |
| इंडिया | २००-० |
| इंपी० | २३२५-० |
| | ५७७-८ |
| रिझर्व्ह | १५३-० |
| युनियन | ९-४ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८१५-० |
| बॉम्बे ट्रॅम | १५४-८ |
| टाटा हायड्रो | २०४-० |
| टाटा पॉवर | १८८१-४xd |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४४७—८ |
| बॉंबे स्टीम | ६१०—० |
| न्यू इंडिया | ८९—४ |
| शिवराजपुर | ५१—० |
| टाटा केमिकल | १७—४ |
| टाटा ऑईल* | ७४—८xd |

रविवार दि. ४-११-४५ ला नवीन 'मुहूर्त-दिन' म्हणून संध्याकाळीं ६-४५ ते रात्रीं ८ पर्यंत बाजार उघडा राहील.

## जयशंकर मिलमधील कामगारांच्या सुखसोयी

### गव्हर्नरांचे प्रशंसोद्गार

सर जॉन कॉलव्हिल, मुंबई प्रांताचे गव्हर्नर, ह्यांनीं तारीख ११ ऑक्टोबर सन १९४५ रोजीं, बार्शी शहरास भेट दिली. त्यावेळीं ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणें, ते जयशंकर मिलमध्यें, त्या मिलच्या कामगारांकरितां केलेल्या विविध सुखसोयी पाहण्याकरितां गेले होते. मिलच्या बाल संगोपनगृहांतील लहान मुलांकरितां असलेली हरएक प्रकारची व्यवस्था त्यांनीं पाहिली. तसेंच, सूतिकागृह, हॉस्पिटल, कामगारांच्या मुलांकरितां मॉन्टेसरी पद्धतीवर सुरू केलेला शिशुविहार, साक्षरता प्रचारवर्ग, वाचनालय, धान्याच्या विक्रीचें दुकान व कॅन्टीन हीं सर्व त्यांनीं पाहिलीं. कॅन्टीनमध्यें कोणकोणते खाद्य पदार्थ व पेयें देण्यांत येतात याची माहिती त्यांना देण्यांत आली व मजुरांकरितां बांधलेलीं, लहान लहान, पण स्वतंत्र घरें व कामगारांसाठी खेळण्याकरितां तयार केलेलें क्रीडांगण व तेथें त्यांच्याकरितां तालीम, क्रिकेट, फूटबॉल, टेनीस वगैरे खेळांच्या केलेल्या सोई त्यांना दाखविण्यांत आल्या. वर लिहिलेल्या या सर्व बाबींवर मिल दरसाल सुमारें ४१,००० रुपयांपर्यंत खर्च करीत आहे.

वरील सर्व प्रकारची व्यवस्था पाहून गव्हर्नरांनीं समाधान व्यक्त केलें व गिरणींतील कामगारांच्या घेत असलेल्या काळजीबद्दल मिलचे मॅनेजिंग एजंट रावबहादूर काकासाहेब झाडबुके यांच्याविषयीं त्यांनीं गौरवपर उद्गार काढिले.

आपकर
टेलरिंग कॉलेज
सन्डर्स्ट रोड मुंबई १९
माहिती मोफत मागवा

# स्फुट विचार

### हवेंतील वावड्या कीं सिद्धसाधकपणा ?

उसनवारीच्या व्यवहाराची बंदी झाल्याकारणानें व्यापाराचे बाबतींत इंग्लंडची गैरसोय होत आहे तिचें निवारण कसें करतां येईल या प्रश्नाची चर्चा त्या राष्ट्राचे तज्ज्ञ प्रतिनिधी अमेरिकन अधिकाऱ्यांशीं वॉशिंग्टन येथें आज कित्येक आठवडे करीत आहेत. सदरहु वाटाघाटीच्या स्वरूपाविषयीं त्रोटक व अंदाजी बातम्या मधून मधून प्रसिद्ध होत असून इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या मतभेदांतून कांहींतरी व्यावहारिक व तडजोडीच्या स्वरूपाची योजना बाहेर पडेल असा रंग दिसतो. इंग्लंडला अमेरिकेनें लांब मुदतीचें कर्ज अल्प व्याजानें द्यावयाचें तर स्टर्लिंग शिलकांचें जबर देणें ब्रिटिश राष्ट्रास झालें आहे तें हलकें करण्यांत यावें अशी एक अट घालण्यांत आली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, हिंदुस्थानच्या शिलका लंडनमध्यें साचल्या आहेत, त्यांसहि कात्री लावण्यांत आली पाहिजे. ह्या शिलका हिंदुस्थानास पूर्णपणानें परत मिळतील, त्या देण्याचें इंग्लंड टाळणार नाहीं, पण ही फेड सोयीसोयीनें केली जाईल असें आश्वासन अनेक वेळां देण्यांत आलें असतांना कांहीं ब्रिटिश लेखक आणि वक्ते स्टर्लिंग शिलकांस कात्री लावण्याच्या आवश्यकतेची भाषा मधून मधून बोलत असतात. रॉयटरच्या प्रतिनिधीनें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या एका ब्रिटिश तज्ज्ञाचें मत म्हणून असें प्रसिद्ध केलें आहे कीं, इंग्लंडचीं स्टर्लिंग देणीं कमी करणें अपरिहार्य झाल्यास हिंदुस्थानास सहानुभूतीनें वागवण्यांत आलें पाहिजे. ह्या देशाच्या स्टर्लिंग शिलका सर्वांत मोठ्या म्हणून त्यांस मोठा काट मारावा असलें धोरण अन्यायाचें होईल. कारण, हिंदी लोक दरिद्री असल्याकारणानें त्यांच्या स्वार्थत्यागाची शक्ति मर्यादित आहे असें सदरहु तज्ज्ञ म्हणतो. ह्या साळसूदपणाच्या सल्ल्याच्या मुळाशीं हिंदी स्टर्लिंग शिलकांस काट मारण्याची आवश्यकता उत्पन्न झाली असल्याची कल्पना गृहीत आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळानें ह्या प्रयत्नाचे संबंधांत हिंदुस्थानास त्याच्या असंदिग्ध रीतीनें स्टर्लिंग शिलका परत दिल्या जाण्याविषयींचें आश्वासन दिलें पाहिजे, एवढेंच नव्हे तर त्या कशा व केव्हां दिल्या जातील ह्याविषयींची योजना पुढें मांडण्यांत त्यानें दिरंगाई करतां कामा नये.

### "परस्परं समर्पयामि"चें धोरण

स्टर्लिंग शिलकांची विल्हेवाट लावली जाण्याच्या मार्गाचा विचार वॉशिंग्टन येथील ब्रिटन–अमेरिका वाटाघाटींत झालेला आहे आणि अमेरिकेनें इंग्लंडला द्यावयाच्या कर्जाच्या योजनेंत त्याविषयींची एक शर्त आहे असें ताज्या बातम्यांवरून स्पष्ट दिसतें. हिंदुस्थान, इजिप्त इत्यादि देशांच्या लंडनमधील शिलकांस कात्री लावण्यांत यावी ही अमेरिकेची अटकळ हवेंतली पोकळी नसून त्यासंबंधांतला सिद्धसाधकपणा सहेतुक आहे असें समजण्यास सबळ कारण आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांवर शस्त्रक्रिया करावी लागणार आहे ती हलक्या हातांनीं केली जावी अशा आशयाची ही सूचना आहे व शिलकांस काट मारला जाणें अपरिहार्य आहे ही कल्पना तिच्यामध्यें गृहीत आहे. अमेरिकेनें इंग्लंडला त्या देशाच्या अत्यंत आवश्यक मालाच्या आयातीच्या अडचणी दूर होण्यासाठीं कर्ज देण्याचें योजिलें आहे. त्याच्या योजनेवर मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपति सर चुनिलाल भाईचंद मेथा ह्यांनीं हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें टीका केली आहे तींत प्रस्तुत घटनेवर विदारक प्रकाश पडला आहे. अमेरिकन कर्जामुळें इंग्लंडच्या व्यापाराची सोय होईल, पण लंडनमधील आपल्या स्टर्लिंग शिलकांवर अवलंबून राहणाऱ्या हिंदुस्थानसारख्या देशाचें त्या कराराशीं संलग्न असलेल्या अटीमुळें जबर नुकसान होणार त्याची वाट काय ? 'परस्परं समर्पयामि'च्या अमेरिकन कर्ज योजनेचें हें अंग सर चुनिलाल ह्यांनीं उघडें केलें आहे. प्रस्तुत योजना अशी आहे. अमेरिकेनें ५०० कोटि डॉलर्स इंग्लंडच्या खात्यांत भरावयाचे आणि त्यांपैकीं ३०० कोटि व २०० कोटि अनुक्रमें करून ग्रेट ब्रिटनमध्यें व इतर साम्राज्यांतर्गत देशांत आयात व्हावयाच्या अमेरिकन मालाच्या किंमतीचे फेडीसाठीं पांच वर्षांत उपयोगांत यावयाचे आहेत. मुद्दलाचे ५०० कोटि डॉलर्स व त्यावरील व्याजाचे ५० कोटि डॉलर्स ह्यांची फेड दर वर्षी १० कोटि डॉलर्सच्या हप्त्यानें १९५१ सालानंतरच्या ५५ वर्षांत केली जाईल. इंग्लंडला इतर देशांचें १,४०० कोटि डॉलर्स इतकें देणें झालें आहे. स्टर्लिंग चलनाच्या क्षेत्रांतील देशांनीं ७५० कोटि डॉलर्स इतकें आपलें येणें कमी करावयाचें आणि पांच वर्षेंपर्यंत आपल्या निर्गत मालाची किंमत इंग्लंडनें द्यावी म्हणून ३०० कोटि डॉलर्स इतकें स्वतःचें चलन पुरवावयाचें आहे.

### हिंदी आर्थिक हिताचें संरक्षण

ह्या योजनेचा हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांवर काय परिणाम होईल ह्याचें दिग्दर्शन सर चुनिलाल मेथांनीं केलें आहे. रिझर्व्ह बँकेच्या चलन-निधीचे १०४२ कोटि रुपये आणि बँकिंग खात्यांतली ४०८ कोटि रुपयांची शिल्लक मिळून एकूण १५५० कोटि रुपये स्टर्लिंगमध्यें गुंतलेले आहेत. ही रकम ४६० कोटि डॉलर्स होते आणि ती इंग्लंडच्या एकूण देण्याच्या एकतृतीयांशा इतकी आहे. अमेरिकेनें सुचवलेल्या योजनेस अनुसरून ४६० कोटींत कपात केली जाईल आणि ती रकम २५० कोटि डॉलर्सवर आणून ठेवण्यांत येईल. ह्याशिवायं, इंग्लंडला आपला माल सोयीनें घेतां यावा म्हणून हिंदुस्थाननें त्या देशास पाच वर्षेंपर्यंत १०० कोटि डॉलर्सनें कर्ज द्यावयाचें आहे. ह्याचा अर्थ असा कीं १९५१ मध्यें इंग्लंडनें हिंदुस्थानाचें फेडावयाचें कर्ज २५०+१०० कोटि डॉलर्स एवढेंच भरेल. ह्याच्या मोबदल्यांत ६८ कोटि डॉलर्स किंमतीच्या अमेरिकन मालाच्या किंमतीची भरपाई करण्याची सोय हिंदुस्थानास उपलब्ध करून देण्यांत येईल आणि इंग्लंड १७ कोटि डॉलर्स किंमतीचें सोनें ह्या देशास पुरवील. ह्या दोन बाबींचे मिळणारे ८५ कोटि डॉलर ३५० कोटींमधून वजा केल्यास पांच वर्षांच्या ठराविक मुदतीनंतर इंग्लंडनें हिंदुस्थानाचें फेडावयाचें कर्ज २६५ कोटि डॉलर्स इतकेंच उरेल. अमेरिकन योजनेप्रमाणें ही रकम दर वर्षास २ कोटि डॉलर्सच्या हप्त्यानें इंग्लंड ५० वर्षांत फेडील आणि नंतरहि १६५ कोटि डॉलर्सचें कर्ज शिल्लकच राहील. ह्या कर्जावर व्याज वगैरे अर्थात्‌च कांहीं नाहीं. मँचेस्टर गार्डिअन सारख्या ब्रिटिश वृत्तपत्रांस वरील प्रकारची योजना इंग्लंड व अमेरिका ह्यांचे दृष्टीनें सोयीची व इष्ट वाटली तरी ती हिंदुस्थानासारख्या धनको देशास कितीशी रुचेल ह्याची शंका आहे. स्टर्लिंग शिलकांस मोठा काट मारण्याच्या कल्पनेचें हिंदी जनतेकडून कशा प्रकारचें स्वागत होईल हें सांगावयास नकोच. हिंदुस्थान सरकारनें ह्या प्रकरणांत तात्काळ लक्ष घालून त्याचा खुलासा सत्वर करणें आणि ह्या देशाच्या आर्थिक हिताचें योग्य संरक्षण होण्याची वेळींच खबरदारी घेणें अत्यंत अगत्याचें आहे. वॉशिंग्टन येथें चालू असलेल्या इंग्लंड–अमेरिका वाटाघाटींस अत्यंत नाजुक स्वरूप प्राप्त झालें असून त्या फिसकटण्याची परिस्थिति उत्पन्न झाली आहे असें ताज्या बातम्यांवरून समजतें. अमेरिकेनें इंग्लंडला द्यावयाच्या कर्जाविषयीं एक नवीन योजना सुचवली आहे. ती इंग्लंडला पसंत पडते कीं नाहीं ह्याची शंका आहे. वाटाघाटींचें तारू ह्या खडकावर आपटून बुडेल अशी भीति व्यक्त केली जात आहे.

## शेतकरी कर्जनिवारण कायद्याचा प्रचार

श्रीगोंदें व कर्जत तालुक्यांत मे. जी. एस. मठद् बी. ए. ( असिस्टंट डि. को. ऑफिसर, श्रीगोंदा ) यांनीं सप्टेंबर महिन्यांत पंधरा गांवीं शेतकरी कर्जनिवारण कायद्याची सविस्तर माहिती सांगण्यासाठीं सभा घेतल्या. त्यांपैकीं श्रीगोंदा व पेढगांव या सभांना मे. रानडे ( चेअरमन डेट् ॲडजस्टमेंट बोर्ड, श्रीगोंदा ) अळसुंद या सभाला मे. भोरे मामलेदार कर्जत हे हजर होते. तसेच श्रीगोंदा येथें ता. २५-९-४५ रोजीं मे. एस. व्ही. भोर. एम्. ए. जी. डी. ए. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब डेटरिलीफ सेंट्रल डिव्हिजन पुणें यांचे अध्यक्षतेखालीं जाहीर सभा झाली. त्यावेळीं त्यांनीं अतिशय कळकळीचें भाषण करून शेतकऱ्यांना समजेल अशी सविस्तर कायद्याची माहिती दिली.

मे. असिस्टंट डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, पारनेर मि- एम. एस. इनामदार यांनीं सप्टेंबर महिन्यांत नगर व पारनेर तालुक्यांत निंबोढी, सरोळाबदी, म्हसणा-सुलतानपूर, बाधुंड, बु. बाधुंड खु., वडगांव गुप्ते निंवळक-इसळक, कर्जुने-खोरे, वडनेर, शहापूर, मेहेकरी, रतडगांव, आगडगांव, देवगांव, कापूरवाडी, ढवळपुरी, घोत्री, बु. ढोकी, कर्जुले-हर्या, गांजीभोयरे, पिंप्री-जळसेना या २२ गांवीं सभा भरवून शेतकऱ्यांना कर्जनिवारण कायद्यासंबंधीं सविस्तर माहिती दिली. याशिवाय पारनेर तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनच्या वार्षिक सभेस व पारनेर तालुक्यांतील तलाठी लोकांच्या सभेस हजर राहून कायद्याची माहिती दिली. आतांपर्यंत सेंटर्सच्या गांवी मोठमोठ्या सभा भरवून सबंध नगर व पारनेर तालुक्यांतील खेड्यांत प्रचार झालेला असून आतां प्रत्येक गांवांत जाऊन सभा घेतल्या जातात,

अशा रीतीनें चांगला प्रचार झाल्यामुळें पारनेर बोर्डाकडे आलेल्या अर्जांची संख्या ३०-९-४५ ला २२९६ झाली आहे.

मे. डी. जी. लाड सुपरवायझर नगर-नेवासें को. सुपरवायझिंग युनिअन यांनीं कर्ज निवारण कायद्याची माहिती देणेकरितां ता. १४।९।४५ ते २०।१०।४५ पर्यंत नगर जिल्ह्यांत नेवासा तालुक्यांत १५ गांवीं सभा घेतल्या. प्रत्येक ठिकाणीं पेरणी सारखा महत्त्वाचा वेळ असतांहि लोकसमुदाय पुष्कळ जमला होता. श्री. लाड यांनीं ह्या कायद्याची रूपरेषा: त्यापासून होणारे फायदे व मुदतींत म्हणजे ३०।१०।४५ चे आंत अर्ज दाखल करण्याची जरूरी याबद्दल उत्तम प्रकारें माहिती दिली. आजपर्यंत त्यांनीं अशा सभा २५ घेतल्या आहेत. त्यामुळें एकंदर ७५ खेड्यांत प्रचार झाला आहे. ह्यापैकीं कांहीं सभेस मे. डी. जी. पाटील तालुका ऑनररी आर्गनायझर रुई छत्रपती हे हजर राहून त्यांनीं या कायद्याबद्दल उत्तम प्रकारें माहिती देऊन मुदतींत अर्ज करण्याबद्दल कळकळीची विनंति केली.

## सरकारी संस्थांच्या अहवालांची पोंच

सातारा जिल्हा लोकल बोर्ड प्राथमिक शिक्षकांची सहकारी बँक लि., कराड ( २ ) तासगांव अर्बन को. बँक लि., तासगांव ( ३ ) इचलकरंजी सें. को. बँक लि., इचलकरंजी ( ४ ) इंडिया युनायटेड मिल्स लि. नं. २ व ३ मिल्स एम्प्लॉईज को. के. सोसायटी लि., मुंबई ( ५ ) को. पीपल्स बँक लि., लिंब ( ६ ) महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर ( ७ ) महावीर को. बँक लि., कोल्हापूर ( ८ ) रावेर पीपल्स को. बँक लि., रावेर ( ९ ) बेळगांव पायोनियर अर्बन को. के. बँक लि., बेळगांव ( १० ) कारवार अर्बन को. बँक लि., कारवार ( ११ ) अमळनेर को. अर्बन बँक लि., अमळनेर ( १२ ) धुळें अर्बन को. बँक लि., धुळें ( १३ ) लासलगांव विभाग सहकारी खरेदी-विक्री संघ लि., लासलगांव ( १४ ) वाडा पेटा सहकारी खरेदी-विक्री युनिअन लि., वाडा.

वरील संस्थांच्या चालकांनीं पाठविलेल्या अहवालाबद्दल आभारी आहोंत.

## मुंबई प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें ३० जून, १९४५ अखेर संपलेल्या वर्षी प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांना ३,६१,८२५ रुपयांचीं ३८० कर्जें दिलीं. त्यापूर्वीच्या वर्षी २,२७,४५० रुपयांचीं १६९ कर्जें दिलेलीं होतीं. बँकांकडून येणें असलेलें २,००,५६१ रुपये मुद्दल व १, ३५,१३६ रुपये व्याज सर्व वसूल झालें आणि प्राथमिक बँकांनीं पुढील हप्त्यांचे २,८१,०२४ रुपये आगाऊ भरले. वर्षअखेर प्राथमिक बँकांकडून येणें २९,००,५१४ रुपये आहे. वर्षअखेर बँकेस ८,१७३ रुपये नफा उरला. भागीदारांस १½% डिव्हिडंड मिळणार आहे. बँकेकडील कर्जांत वाढ होत नाहीं, मुदतीपूर्वी बरीच मोठी रकम आगाऊ वसूल झाल्यामुळें व्याजाचें नुकसान होत आहे आणि सिंकिंग फंडांतील रकम वाढत चालली आहे तिचेवरील व्याज नफा-तोटाखातीं घेण्यास डिबेंचर ट्रस्ट डीडमधील अटी प्रतिबंध करीत आहेत. डिबेंचर ट्रस्ट डीडमध्यें योग्य ती दुरुस्ती करण्याविषयीं बँकेनें राजिस्ट्रारला विनंति केली आहे.

## पानसुपारी

धी बाँ. प्रॉ. को. बँक शाखा अकलूज या शाखेचे एजंट इन्स्पेक्टर साहेब मे. एम्. एम्. मंकडसाहेब यांची बदली मुंबई येथें झालेमुळें त्यांना तारीख ३१।८।४५ रोजीं अकलुज येथील समस्त व्यापारी मंडळीतर्फे गांधी थिएटरमध्यें सत्कार समारंभ करणेंत आला. त्यांत रतनचंद पी. व्होरा; जी. एन. पाटील ( बँक ), मामासाहेब पर्वते, व्होरा वकील वगैरे ६।७ वक्त्यांचीं त्यांचें गुणवर्णनपर व गौरवपर भाषणें झालीं आणि निरनिराळे संस्थांतर्फे सुमारें १०।१२ फुलांचे हार त्यांना घालण्यांत आले व त्यांना ७१ एकाहत्तर रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली. ती थैली मे. मंकडसाहेब यांनीं अकलूज येथें लवकरच सुरू होणाऱ्या मोफत वाचनालयास देणगी म्हणून दिली. शेतकरी, व्यापारी व निरनिराळ्या संस्थांचे प्रमुख सदर समारंभास सुमारें ३००।४०० मंडळी उपस्थित होती.

## कळवण येथील सेल्समन व इतर नोकरवर्गाचा ट्रेनिंग क्लास

ता. २६ व २७ ऑगस्ट १९४५ रोजीं कळवण येथें मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट मुंबई हिचे विद्यमानें कळवण तालुका खरेदी विक्री संघाच्या सेल्समेन व इतर नोकर नोकरवर्गाचा शिक्षणवर्ग मे. मामलेदार सो यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आला. मे. मामलेदार सो. यांनीं गिऱ्हाईक लोकांची कोणत्याहि प्रकारची गैरसोय होणार नाहीं याकडे जातीं लक्ष पुरविण्याबद्दल समज देऊन त्यांना वेळेवर धान्य न मिळाल्यास त्यांचे हाल कसे होतात वगैरे गोष्टी पटवून दिल्या. धान्याची विक्री करतांना कर्ज-निवारण कायद्याचाहि प्रचार करण्याबद्दल कळकळीचा उपदेश केला. शिक्षणवर्गांत सेल्समन लोकांना आपआपल्या भागांत कर्जनिवारण कायद्याचा प्रचार कसा करावयाचा हें उत्तम रीतीनें समजावून सांगण्यांत आलें. त्याबरोबरच नवीन सोसायट्या काढण्याबद्दल प्रयत्न करण्यास सांगितलें. तसेंच प्रत्येक सेल्समनवरील जबाबदारी व त्यांनीं ठेवावयाचीं हिशेबाचीं बुकें कशीं ठेवावींत याबद्दलचीहि तपशीलवार माहिती समजावून देण्यांत आली.

## मुंबई सहकारी बँक्स असोसिएशन

### गेल्या वर्षांतील कामगिरी

वरील असोसिएशनच्या पटावर आतां ५६ सहकारी बँका आहेत, त्यांपैकी ४२ अर्बन बँका आहेत. सहकारी सोसायट्यांचा आयुर्विम्याचा व्यवसाय, चेक्सच्या वसुलीवरील कमिशनचे दर, बँकांत वापरण्यांत येणाऱ्या फॉर्म्समध्यें एकवाक्यता, शेतकरी कर्जनिवारण कायदा अंमळांत आल्यावर पिकास द्यावयाच्या भांडवलाचा पुरवठा, सभासद-बँन्कांवरील देखरेख, मर्यादित जबाबदारीच्या अनेक सोसायट्यांचे एकाच वेळीं सभासद असणें, मध्यवर्ती बँन्क आणि अर्बन बँन्क ह्यांचे परस्पर संबंध, भरलेल्या इन्कमटॅक्सची वसुली, संशोधनासाठी ग्रँन्ट, शेतकी पतपेढ्यांत कांहीं विशिष्ट परिस्थितींत मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वाचा अवलंब, शेतीस भांडवलपुरवठा आणि मालाचा उठाव ह्यांची सांगड, अर्बन बँकांच्या डायरेक्टरांनीं सभासदांस जामीन रहाण्याची इष्टानिष्टता, शेअरभांडवलांत घट होऊं न देण्याची आवश्यकता, रजिस्ट्रेशन व स्टॅंप ड्यूटी ह्यांच्या माफीस पात्र असलेली रकम वाढविण्याची जरूरी, तकावी कर्जें देतांना घ्यावयाची सावधगिरी, शेतकी पतपेढ्यांत कॅश क्रेडिटच्या पद्धतीस आरंभ, मर्यादित जबाबदारीच्या सोसायट्यांचा कर्ज उभारण्याचा अधिकार कांहीं अटींवर त्याच्या स्वतःच्या भांडवलाच्या १२ पटींइतका करण्याची इष्टता, सहकारी बँकांनीं अवलंबिण्यासाठी नोकरांच्या नोकरीबाबतचे नमुन्याचे नियम, बँकांचीं शेतीच्या मालाचे तारणावरील कर्जें, बुडित कर्जें लिहून टाकण्याची पद्धति, व्यापारी हुंड्यांची रीडिस्कौंटिंगची सोय, लायसेन्स दिलेलीं कोठारें, भागीदारीस अर्बन बँन्केचे सभासद होतां येण्यासाठी कायद्यांत दुरुस्ती, लिक्विडेशन व आर्बिट्रेशनच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी, शेतकी पतपेढ्यांची देखरेख, सहकारी बँकांच्या ठेवी व त्यांच्या जिंदगीची गुंतवणूक, वगैरे अनेक प्रश्नांवर असोसिएशननें विचारविनिमय करून सभासद बँन्कांच्या हिताच्या दृष्टीनें शक्य ते प्रयत्न केले. असोसिएशन व सरकारचें सहकार खातें ह्यांचे संबंध सलोख्याचे असल्याकारणानें असोसिएशनचा सल्ला खात्यानें वेळोवेळ विचारला व मानला. असोसिएशननें सहकारी बँन्किंगच्याच केवळ नव्हे तर सर्वसाधारण सहकारी क्षेत्रांतहि महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे.

### निफाड येथील रिफ्रेशर ट्रेनिंग क्लास

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें निफाड येथें ता. ८।१०।४५ ते ता. १५।१०।४५ अखेर सेक्रेटरीज रिफ्रेशर ट्रेनिंग क्लास सात दिवसांचा भरविण्यांत आला. सदर क्लासचा उद्घाटन समारंभ मे. दि. ब. आर. व्ही. वंडेकर डिस्ट्रिक्ट ऑनररी आर्गनायझर को. सो. यांचे हस्तें झाला. ट्रेनिंग क्लासचा १६ लोकांनीं फायदा घेतला. विणकर सोसायटीचे दोन सभासदांनीं मधून मधून क्लासला हजर राहून क्लासचा फायदा घेतला. सदर क्लासला मे. डी. आर. वाणी एज्युकेशनल सुपरवायझर डिस्ट्रिक्ट युनियन बोर्ड, नाशिक व मे. ए. एन. देशपांडे सुपरवायझर, को. सो. निफाड यांनीं निरनिराळ्या विषयांसंबंधीं शिक्षण दिलें. तसेंच मे. कल्याणपूरकर सा॰. व मे. निरगुडकर सा॰. बँक इन्स्पेक्टर मुं. प्रॉ. को. बँक नाशिक यांनींहि ता. १२ व १३ रोजीं शिक्षण क्लासला भेटी देऊन जिंदगीपत्रक, परमावधीपत्रक व बँकेशीं व्यवहार करतांना करून द्याव्या लागणाऱ्या कागदपत्रांसंबंधीं संपूर्ण माहिती दिली.


सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



आशा

Asha

सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व केट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

दि आयडिअल इन्स्टिट्यूट

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

——कारखान्याच्या वाढीसाठीं ठेवी घेणें आहेत.——

बेकारीचा प्रश्न सोडवा

विमा कंपनीपेक्षां अभिनव योजना

सुशिक्षित स्त्री-पुरुषांसाठीं : फक्त ५०० रुपये भांडवल गुंतविणारे स्त्री, पुरुष पाहिजेत

दृ. म. १००/१५० रु. मिळवून देणारा एक नवीन उद्योग
म्हणजेच
फडके प्रॉडक्टस् आणि रेडसन् प्रॉडक्टस्‌ची एजन्सी घेणें

नवीन सुधारणा, नवीन सवलती, अखंड उद्योग वंशपरंपरेनें करा. नोकरीची जरूरी नाहीं. अर्ज पाठवा. आपल्या घरीं आपल्या गांवीं राहून उद्योग करा—

हरिभाऊ भंडारे

खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, पुणें

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व शूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

——साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

## सहकारी चळवळ हाच स्वराज्याचा पाया होय

( लेखक:-श्री. पांडुरंग गणेश जोशी, सेक्रेटरी, अकलूज सोसायटी)

ठोकळ मानानें पाहातां सहकार्याचा उगम दारिद्र्याबरोबर झगडून त्याच्यापासून उद्भवणारीं निरनिराळीं दुःखें व हाल ह्यांचा प्रतिकार करण्याच्या आकांक्षेपासून झाला आहे. भांडवलाचा पुरवठा करण्याकरितां प्रथम पतपेढ्यांची योजना सुरू करून सहकारितेचें बीं पेरण्यांत आलें. पेढ्यांच्या सभासदांत काटकसर, स्वावलंबन, परस्परसहाय्य यांच्या प्रसाराबरोबरच प्रामाणिकपणा व वक्तशीरपणा वगैरे गुणांचा विकास करून त्यांची नैतिक उन्नति करण्याचें जें उदात्त ध्येय आहे त्याच्याच जोरावर या चळवळीचा आज सर्व जगभर बोलबाला होत असलेला दिसत आहे. प्राणिमात्र कोणत्याना कोणत्या तरी ऐहिक गरजेच्या सिद्धीसाठीं झगडत असतात व अशा सर्व गरजा पुऱ्या पाडण्याचे सामर्थ्य सहकार्यांत आहे.

सहकार्य एखाद्या विविक्षित गोष्टीसंबंधानें होतें असें कांहीं नाहीं. उदाहरणार्थ, भांडवल लागल्यास सावकार न गांठतांना समान गरजूंशीं सहकार्य करून पतपेढ्या काढून आपली गरज स्वतःच भागवितां येईल. संसारोपयोगी जिन्नस अगर धंद्याकरितां अगर शेतकीकरितां लागणारी सामुग्री गांवचे व्यापाऱ्याकडून घेण्याऐवजीं स्वतःच्या संघटनेनें त्या जिनसांचीं भांडारें काढून आपल्या पायांवर उभें राहातां येईल, औषधोपचाराकरितां सहकारी दवाखाने काढतां येतील व रोगप्रतिबंधनार्थ आरोग्यविषयक योजना अमलांत आणतां येतील. सहकारी वाचनालयें काढून बौद्धिक उन्नतीस मदत करतां येईल. अशा रीतीनें सर्व गरजा सहकारी तत्त्वावर भागवून मधल्या दलालास फाटा दिल्यास त्यांत सांपत्तिक दृष्ट्या फायदा होईलच. परंतु अशा रीतीनें प्रत्येक खेडें स्वावलंबी बनून स्वतंत्र झाल्यास त्यांतील रहिवाशांची आर्थिक, सामाजिक, बौद्धिक व नैतिक इत्यादि बाजूंनीं सर्वांगसुंदर सुधारणा होऊन एकंदर राष्ट्रघटनेस सहकार्य अत्यंत पोषक होणारें आहे. व अशा रीतीने खेडीं संपन्न व स्वावलंबी बनल्यास इतर देशांप्रमाणें इकडील शहरांतून सहकारी छापखाने, इतर मोठमोठाले कारखाने उभारणें शक्य होऊन सहकारी तत्त्वावर उद्योगधंदे वाढविण्यांत येतील. व मग खेडीं व शहरें संपन्न होऊन एकंदर राष्ट्राची भरभराट होईल.

सहकार्य म्हणजे निव्वळ पतपेढी नसून सहकार्याचीं जीं त्रिविध अंगें आहेत त्यांपैकीं पेढी हें फक्त एक अंग आहे. खेड्यांतील व शहरांतील सहकार्याचीं हीं विविध अंगीं चक्रें जर आपल्या नैतिक आंसाभोंवतीं जोरानें फिरूं लागलीं तर राष्ट्रोन्नतीचा गाडा जोरानें पुढें ढकलण्यास किती तरी मदत होईल. म्हणजे सहकारी चळवळ हाच राष्ट्रोन्नतीचा उत्कृष्ट मार्ग होय. ह्याकरितां प्रत्येक सुशिक्षित राष्ट्रभक्तानें विशेषतः तरुण पिढीनें याच चळवळींत सामील होऊन सहकारी चळवळ हाच स्वराज्याचा पाया समजून राष्ट्रोन्नतीचें कार्य सहकार्याच्या जोरावर घडवून आणण्याचा नेटानें प्रयत्न केला पाहीजे.

---

## दीपावलीनिमित्त वाङ्मयीन चढाओढ

वाय. के. रेंडकर मेमोरियल फंड सावंतवाडीतर्फे आगामी दीपावलीनिमित्त दुसरी वाङ्मयीन चढाओढ कुमार-लेखकांसाठीं लावण्यांत येत आहे. या दुसऱ्या चढाओढींत लघुकथा, लघुतमकथा, व रूपककथा अशा स्वरूपाचें सुमारें २०० शब्दांचें कथात्मक लिखाणच स्पर्धेकरितां लेखकांनीं पाठवावयाचे आहे. लेख पाठविण्याची अखेरची मुदत १ नोव्हेंबर १९४५ पावेतों ठेवण्यांत आलेली आहे. पहिलें रु. ५, दुसरें रु. ३ व तिसरें रु. २ अशीं बक्षिसें असून शिवाय याखालील क्रमांकांस पुस्तकें बक्षिस दिलीं जातील.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००
भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००
खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

शाखा व उपशाखा

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड " | २५ मालेगांव " |
| ३ किर्लोस्करवाडी " | २६ नांदगांव " |
| ४ कोरेगांव " | २७ घोटी " |
| ५ इस्लामपूर " | २८ सटाणा " |
| ६ शिराळें " | २९ येवलें " |
| ७ तासगांव " | ३० मनमाड " |
| ८ वांई " | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद " | ३२ दोंडाईचें " |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार " |
| ११ कल्याण " | ३४ साक्री " |
| १२ पालघर " | ३५ शहादें " |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर " |
| १४ अहमदनगर ( " अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें " |
| १५ बेलापुर रोड " | ३८ तळोदें " |
| १६ कोपरगांव " | ३९ नरढाणा " |
| १७ पाथर्डी " | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी " | ४१ गोधा " |
| १९ शेवगांव " | ४२ झालोद " |
| २० वांबोरी " | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गाव) " | ४४ नाडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद " |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड " |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

दिवाळीचा मोठा अंक.

REGISTERED No. B. 3344

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ७ नोव्हेंबर, १९४५ अंक ४४

Telephone : 31084 two lines

Telegram : " Sardargriha."

SARDAR GRIHA

THE PREMIER & OLDEST HOTEL

For High Class Hindus, Chiefs and Sardars. Rooms fitted with latest equipments, Bath, Lift etc.

CENTRALLY SITUATED

*Near CRAWFORD MARKET, BOMBAY 2.*

न्यू इंडिया इंडस्ट्रिज, लि.

२६, लॅमिंग्टन रोड ( नॉर्थ ), मुंबई ११

: अध्यक्ष :

श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए., कागदाचे व्यापारी.

बँक ऑफ महाराष्ट्र लि., श्रीराम सिल्क मिल्स लि., लोकमान्य मिल्स लि., विजय टेक्स्टाइल्स लि., औंध म्यूच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी लि., वगैरे कंपन्यांचे डायरेक्टर.

: मॅनेजिंग एजंटस :

—मराठे आणि कंपनी—

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स् ★ छापखान्याचे रोलर्स ★ सर्व प्रकारचे रबरी वॉशर्स्

★ रबरी हातमोजे ★ रीमोल्ड टायर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार करतात.

शेअर्सवर भरपूर डिव्हिडंड : : ठेवी स्वीकारल्या जातात

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर

## सांडू ब्रदर्स यांची अनुभवसिद्ध औषधें

- सांडू-प्रेग-युटेरो — गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
- सांडू-बाळंत काढा — नं. १ पहिले दहा दिवसांत घेणेंचा, नं. २ दहा दिवसानंतर घेणेंचा
- सांडू-बाळ कडू — मूल उपजल्यापासून देण्यास योग्य
- सांडू कुमारी आसव नं. ३ — मुलांचे यकृत (लिव्हर) विकारांवर व उत्कृष्ट टॉनिक
- सांडू-टोमॅटो कम्पाउण्ड — भूक लागून अन्नपचनाकरितां व्हिटॅमिनयुक्त टॉनिक

V. BHUJBAL & Co.

ओरिजिनल ब्राह्मीतेलाचे एकटेच कारखानदार

**द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.**

मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट अँन्ड ड्रगिस्ट, चेंबूर — मुंबई.

---

## दि सदर्न निटिंग वर्क्स लि.

ह्यांनीं तयार केलेली

# होजिअरी

★ सर्व प्रकारचा सुती, लोकरी आणि जाळीचा, निरनिराळ्या डिझाइन्समधील माल.

★

इंटरलॉक अंडरवेअर्स व शर्टस

★

एस. व्ही. सुपनेकर
कुलकर्णी अँड सन्स
मॅनेजिंग एजंटस

---

## आतां आपली युद्धसमाप्तीमुळें नोकरी सुटणार

या काळजीनें

पुढें काय करावें हा प्रत्येक हंगामी नोकरापुढें

प्रश्न उभा रहाणार

यासाठीं स्वतंत्र धंदाच करणें किफायतशीर.

याकरतां

पुणें येथील सुप्रसिद्ध

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड

ची एजन्सी घेऊन तो प्रश्न सोडवा.

*आजच लिहा अगर भेटा.*


ल. ब. भोपटकर — अध्यक्ष
एस. एम. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

---

स्प्रिंग टाईप

## " डुप्लीकेटर "

दर ताशीं ४०० प्रती प्रमाणें हजारों प्रती काढा !!




★ हॅन्डलूम व पॉवरलूम करितां
★ टिकाऊ व सफाईदार
★ दर माफक —

माहिती करितां लिहा.

कारखानदार शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. बेळगांव (S.M.C. INDIA)

सर्व ऑफिसें, शाळा, कॉलेजें, बँका, विमाकंपन्या, कारखाने, म्युनिसिपालिट्या वगैरे

—सर्वच संस्थांना अत्यंत उपयुक्त—

किंमत रु. ८५-१२ फक्त. पॅकिंग, रेल्वे वगैरे खर्च निराळा.

आजच माहितीपत्रक मागवून ऑर्डर पाठवा.

कारखानदारः—

**शेवडेज् कॅमेरा वर्क्स लि. बेळगांव** S. M. C.

# विजय टेक्स्टाइल्स लि.

—पुणें ४—

- सदर कापड गिरणी चालू होऊन ४ वर्षें पूर्ण झालीं.
- दुसरे वर्षी कंपनीनें प्रेफरन्स व ऑर्डिनरी शेअर्सवर सहा टक्के डिव्हिडंड दिलें.
- मध्यंतरीचे काळांत कच्च्या मालाची (सुताची) अडचण, महागाई, व खर्चाचें वाढलेलें प्रमाण ह्यामुळें डिव्हिडंड वाटलें नाहीं.
- आतां परिस्थिति बऱ्याच अंशीं सुधारली असून काम जोरांत चालू आहे व तयार होणाऱ्या कापडास चांगली मागणी आहे.
- शेअरविक्री चालू आहे. तसेंच मुदतबंद ठेवीही घेतल्या जातात. शेअर्स व ठेवीबद्दल पत्रव्यवहार करावा.

—विजय टेक्स्टाइल्स लि., पुणें ४



हिज हायनेस श्रीमंत सरकार सांगलीचे राजेसाहेब यांच्या आश्रयाखालीं स्थापन झालेली

# दि सांगली बँक लि०

( स्थापना १९१६ )

बोर्ड ऑफ डिरेक्टर्स

( १ ) राव. ह. ब. कुलकर्णी
( २ ) शेठ ज. वि. करमरकर
( ३ ) शेठ ता. श्री. आरवाडे
( ४ ) ना. नि. प. कोरे

| | | |
|---|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,००,००० |
| रिझर्व्हस् | ... | रु. २,००,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ६०,००,००० |

हेड ऑफिसः—सांगली ( S. M. C. )

—शाखा—

१ शहापूर, २ शिरहट्टी, ३ तेरदळ, ४ रबकवी, ५ कवठे, ६ मंगळवेढें, ७ तुपारी ( ताकारी M. S. M, Rly. ) ८ उगार ( M. S. M. Rly. ), ९ विलिंग्डन कॉलेज ( जि. सातारा )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**P.S.MOKASHI**
मॅनेजर.

आपली दीपावलि आनंदाची जावो

पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि.,

निरनिराळ्या तऱ्हेचे पुठ्ठे, कागदी पेट्या, पाकिटें, फाइलस, लेबलें,
कॅलेन्डर्स इत्यादि अनेक प्रकारच्या कागदी मालाचे
एकमेव महाराष्ट्रीय कारखानदार

८१४ सदाशिव, पुणें २.

रूरल प्रॉडक्टस कं.
लिमिटेड
ची मागील वर्षांतील प्रशंसनीय प्रगति

(१) स्वतःचे मालकीच्या पिकांच्या लागवडीसाठी जमिनीची खरेदी.
(२) टिकेकर रेल्वे स्टेशनास लागून ४ एकर जमिनीची खरेदी.
(३) मालविक्रीची स्वतंत्र योजना.
(४) यामुळें वाढलेल्या व्यापासाठीं सुमारें ५०,००० रुपये जमा करण्याचा नवीन उपक्रम.

माहिती मागविण्याचा पत्ता:—
म्यानेजिंग डायरेक्टर, रूरल प्रॉडक्टस कं. लि.,
९५१ सदाशिव, पुणें २.

वर्ष ११ वें
# अर्थ
बुधवार, ता. ७ नोव्हेंबर १९४५
अंक ४४ वा

## ★ नैसर्गिक साधनें आणि लोकसंख्या ह्यांची विषम वाटणी ★

### मागसलेल्या देशांचें दारिद्र्य कसें दूर करणार ?

आज जगांत सर्वत्र राजकीय व आर्थिक स्वरूपाचे दुहेरी झगडे चालू असल्याचा विलक्षण देखावा दिसून येत आहे. युद्धसमाप्तीनंतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुनर्घटनेच्या प्रश्नांची चर्चा होऊन त्यांच्या समाधानकारक निकालाचें स्वरूप युद्ध चालू असतांनाच निश्चित झालें होतें. आंतरराष्ट्रीय मतभेदाचा निर्णय तडजोडीनें करावयाचा आणि प्रत्येक राष्ट्रास आर्थिक सुस्थितीचा योग्य वाटा मिळेल अशी व्यवस्था घडवून आणावयाची असें प्रमुख व प्रबल राष्ट्रांनीं ठरवलें होतें. दारिद्र्याची जगांतून हकालपट्टी होऊन जागतिक संपत्तीचा वाटा प्रत्येक लहान-मोठ्या राष्ट्रास मिळण्याच्या मार्गातील अडथळे दूर केले जाण्याचें अभिवचन प्रसिद्ध "अटलांटिक सनदे" मध्यें नमूद केलेलें आहे. पण हीं उच्च ध्येयें आणि अभिवचनें ह्यांस मूर्त स्वरूप देण्याचा प्रसंग येतांच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय एकवाक्यतेच्या ऐवजीं सर्वत्र बजबजपुरी माजून राहिली असल्याचें दिसत आहे. युरोपांत राजकीय व आर्थिक सत्तेच्या विभागणीचे बाबतींत रशिया आणि पाश्चात्य राष्ट्रें ह्यांमध्यें तीव्र मतभेद उत्पन्न झाले आहेत, आफ्रिका व एशिया ह्या खंडांत स्वातंत्र्याबाबत झगडे होत आहेत आणि पाश्चात्य साम्राज्यशाहीचा निषेध केला जात आहे. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत कारखान्यांतील मजुरांचे मोठे संप ह्याच वेळीं चालले आहेत.

अत्यंत विध्वंसक असें युद्ध संपून नवीन मनु नीट चालू होईपर्यंतच्या काळांत अस्वस्थता, असंतोष, विविध हित-कलह कमीअधिक प्रमाणांत बोकाळणें अपरिहार्य आहे. पण ह्या गोंधळांतून जगास बाहेर काढून त्यांत स्थिर शांतता व स्वास्थ्य स्थापण्यासाठीं इंग्लंड, अमेरिका व रशिया हीं प्रमुख राष्ट्रें स्वतः गंभीरपणानें उच्चारलेलीं ध्येयें कृतींत कशीं उतरवणार हा येथें खरा प्रश्न आहे. जगांतील मागसलेल्या व दरिद्री देशांतील लोकांची रहाणी सुधारण्याकरितां नैसर्गिक व मनुष्यकृत संपत्तीची योग्य वाटणी सर्वत्र केली जाणें अत्यंत आवश्यक आहे आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय आर्थिक व राजकीय धोरणें ह्या वाटणीस पोषक झालीं पाहिजेत. निसर्गदत्त संपत्तीचीं साधनें, क्षेत्रफळ व लोकसंख्या ह्यांची राष्ट्रांमध्यें वाटणी आज अत्यंत विषमपणानें झालेली आहे, तिच्यावर उपाय कोणते व कसे योजणार ? कांहीं देशांत जमीन मुबलक व लोकसंख्या मर्यादित आहे तर दुसऱ्यांत लोकसंख्येच्या मानानें जमीन व इतर नैसर्गिक साधनें अपुरीं आहेत. ह्या रीतीनें संपन्न व दरिद्री राष्ट्रें असा विरोधात्मक भेद उत्पन्न झाला आहे आणि तो जागतिक शांततेस बाधक ठरला आहे. जगांतील एकूण अन्नोत्पादक क्षेत्रफळापैकी १२ टक्के जमीन विशिष्ट प्रदेशांस मर्यादित झालेली आहे. तसेंच शेतीस उपयोगी जमिनींपैकी फक्त चौथा हिस्सा उच्च प्रतीच्या आहेत आणि त्यांची राष्ट्रवार वाटणी अत्यंत विषम आहे. जागतिक लोकसंख्येपैकी निम्मी एशिया खंडांत वसती करून आहे, तथापि तिच्या ताब्यांतील जमीन जागतिक क्षेत्रफळाच्या पाचव्या हिश्या एवढी आहे आणि तिचें धान्याचें उत्पादन जगांतील एकूण उत्पादनाच्या एक-तृतीयांशाइतकेंच आहे. उत्तर अमेरिकेचे आकडे पहातां, तेथें एकूण जगाच्या मानानें ९ टक्के लोकसंख्या पण १७ टक्के क्षेत्रफळ व २२ टक्के धान्याचें उत्पादन आहे. राकेल तेल, कोळसा, लोखंड इत्यादि खनिज द्रव्यांची विभागणी तर ह्यापेक्षां किती तरी अधिक विषम आहे. क्षेत्र, लोकसंख्या व धान्यांचें उत्पादन जगाच्या प्रमुख विभागांत कसें वाटलें गेलें आहे हें खालीं दिलेल्या तुलनात्मक आकड्यांवरून दिसेलः—

| विभाग | क्षेत्र (%) | लोकसंख्या (%) | धान्यें (%) |
|---|---|---|---|
| युरोप ( रशिया वगळून ) | ४ | १९ | २२ |
| रशिया | १६ | ८ | १३ |
| उत्तर अमेरिका | १७ | ९ | २२ |
| दक्षिण अमेरिका | १४ | ४ | ५ |
| एशिया ( रशिया वगळून ) | २० | ५२ | ३४ |
| आफ्रिका | २३ | ७ | ३ |
| इतर | ६ | १ | १ |
| एकूण जागतिक | १०० | १०० | १०० |

हिंदुस्थानांत सध्यां ४०,००,००,००० लोक रहात आहेत, परंतु त्यांपैकीं निम्मे लोकसुद्धां कसेबसे नीट जगूं शकतील, अशी परिस्थिति नाहीं. दुसऱ्या जागतिक महायुद्धास प्रारंभ झाल्यापासून इंग्लंडच्या एकूण लोकसंख्येइतकी हिंदी लोकसंख्येंत भर पडली आहे. ही प्रवृत्ति १९६० पर्यंत कायम टिकल्यास, हिंदी लोकसंख्येंत दरसाल १ कोटि २० लाखांची वाढ होऊं लागेल. अशा परिस्थितींत दुष्काळ पडणें ही नाइलाजाची गोष्ट आहे. १९४३ मधील दुष्काळांत ३० ते ४० लक्ष लोक मेले, परंतु त्याच अवधींत त्यापेक्षां जास्त जन्मास आले !

हिंदुस्थानसारख्या देशांत लोकसंख्या वाढत आहे आणि त्यांतलें जमिनीचें क्षेत्र मर्यादित आहे. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका वगैरे देशांतील स्थिति ह्याच्या उलट आहे, पण हिंदी लोकांस तेथें जाऊन वस्ती करण्यास मज्जाव आहे. नैसर्गिक साधनांची वाटणी राष्ट्रांमध्यें योग्य प्रमाणांत झाली नाहीं, तर मागसलेल्या देशांतलें दारिद्र्य कसें नाहींसें होणार ? लोकसंख्येची वाटणी जगभर समतेनें करण्याची समृद्ध व प्रबळ राष्ट्रांची तयारी आहे काय ? नाहींतर ॲटलँटिक सनदेची अंमलबजावणी कशी होणार ?

## आमच्या सर्व हितचिंतकांस नवें वर्ष सुखाचें जावो.

# स्फुट विचार

## शिलकी लढाऊ सामानाची वासलात

लढाऊ सामुग्री युद्ध संपतांच निकामी होते. वापरांत आणि साठ्यांत असलेल्या ह्या सामानाचा सरकारास उपयोग नसतो आणि त्यांत अडकून राहिलेला पैसा मोकळा करणें आवश्यक होतें. कोट्यवधि रुपये किंमतीची अशी लढाऊ सामुग्री हिंदुस्थान सरकाराजवळ शिलकी आहे आणि ती आतां विकून टाकण्यांत येत आहे. युद्धकाळांत लोकांच्या उपयोगाच्या सर्वच मालाची टंचाई झाली आणि त्यासंबंधांतील आपल्या गरजा त्यांस भागवतां आल्या नाहींत. हरतऱ्हेच्या मालाविषयींची तुंबलेली जनतेची मागणी सरकारपाशीं शिलकी असलेल्या सामुग्रीनें अंशतः पुरी होण्यासारखी आहे. आपल्यापाशीं असलेल्या शिलकी मालाच्या याद्या प्रसिद्ध करून त्या खरेदीदारांस पहातां याव्या ह्यासाठीं सरकारनें मुंबई, कलकत्ता, मद्रास, कराची, कानपूर व लाहोर ह्या पांच ठिकाणीं नमुने ठेवण्याची व्यवस्था केली आहे. विकाऊ मालाचा कोणता उपयोग करतां येईल हें तज्ज्ञ अधिकारी तेथें गिऱ्हाइकांस समजावून सांगतील. लिलांवाच्या पद्धतीनें किंवा टेंडरें मागविण्यांत येऊन मालाची विक्री केली जाईल. कारखानदार, व्यापारी, कॉंट्रॅक्टर्स यांस माल खरेदीची ही चांगली संधि आहे. गेल्या वर्षी सुमारें सत्तर लक्ष रुपयांचा माल केवळ मुंबई क्षेत्रांत खपला; आतां त्यापेक्षां मोठ्या प्रमाणांत माल विक्रीस निघेल.

---

## ब्रिटिश जनतेवर युद्धाचा ताण

इंग्लंड, अमेरिका व कॅनडा ह्या देशांतील लोकांच्या जीवनावर युद्धाचा किती ताण पडला ह्याचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करतांना त्यांजमधील नैसर्गिक संपत्ति, लोकसंख्या व औद्योगिक सामर्थ्य हीं हिशेबांत घेतलीं पाहिजेत. इंग्लंडला आयात केलेल्या अन्नसामुग्रीवर नेहमींच अवलंबून रहावें लागतें, तसें अमेरिका व कॅनडा ह्यांचें नाहीं आणि युद्धपरिस्थितींत ही आयात मर्यादित होणें स्वाभाविक होतें. तसेंच, युद्धाची जबाबदारी इंग्लंडला प्रारंभापासून उचलावी लागली आणि जर्मनांच्या बॉंबगोळ्यांस तोंड द्यावें लागलें. त्या अंतरांमुळें ही आपत्ति दुसऱ्या दोन देशांस सहन करावी लागली नाहीं. युद्धकाळांत शांतता स्थितीच्या मानानें ब्रिटिश जनतेनें अकरा टक्के कमी अन्न खरेदलें, ह्याच्या उलट अमेरिकन नागरिकांच्या अन्नखरेदींत आठ टक्के वाढ झाली. वस्त्रें व इतर रोजच्या गरजेच्या वस्तू इंग्लंडमध्यें विलक्षण दुर्मिळ होऊन लोकांस हालांत दिवस काढावे लागले.

---

## ब्रिटिश सरकारचें पुरवणी अंदाजपत्रक

ब्रिटिश फडनवीस, डॉ. डॉल्टन, ह्यांनीं कॉमन्स सभेस सादर केलेल्या पुरवणी अंदाजपत्रकाचें सामान्यतः सर्व बाजूंनीं स्वागत करण्यांत आलें आहे. युद्ध समाप्त झालें तरी सरकारी खर्च तात्काळ विशेष प्रमाणांत कमी होऊं शकत नाहीं. चालू वर्षाचे प्रारंभीं माजी फडनवीसांनीं उत्पन्न व तूट ह्यांचा अंदाज केला होता तोच वर्ष अखेर खरा ठरेल असें डॉ. डॉल्टन ह्यांचें मत आहे. ह्या कारणानें ब्रिटिश जनतेस सोसावा लागणारा करांचा बोजा तूर्त हलका होणें शक्य नाहीं. तथापि, येत्या जानेवारीपासून प्राप्तीवरील कर आणि जादा नफ्यावरील कर कमी करण्यांत येणार असून त्या योगानें उत्पादनास उत्तेजन मिळेल अशी फडनवीसांस आशा वाटत आहे. मालखरेदीवरील सध्याचा कर सामान्य जनतेस जाचक वाटतो, तो विशेष जरूरीच्या जिनसांचे बाबतींत समूळ काढून घेण्याचा त्यांचा विचार आहे. सरकारी उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी होण्याला आणखी कित्येक वर्षें लोटावीं लागतील; लष्करी खर्च कमी होईल, पण सामाजिक सुधारणेवर अधिक पैसा खर्चावा लागेल. ह्यासाठीं अंदाज पत्रकाची व्याप्ति प्रत्येक वर्षापुरती मर्यादित न करतां, ती तीन चार वर्षांवर पसरावी लागेल ही महत्त्वाची सूचना डॉ. डॉल्टन ह्यांनीं पुढें मांडली आहे. तसेंच महागाई पसरूं न देण्याचें महत्त्व आणि त्यासाठीं सरकारी सहाय्याबद्दल वर्षाचे तीन-चारशें कोटि रुपये खर्चण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली आहे. त्याचप्रमाणें, निर्गत व्यापाराचा विस्तार आणि उद्योगधंद्यांची चलती झाल्यावांचून इंग्लंडची आर्थिक स्थिति मार्गावर येणें शक्य नाहीं असेंहि त्यांनीं सांगितलें.

---

## साखर आणि अन्नधान्यें

"अधिक धान्य पिकवा" संबंधांतील मोहिमेस अनुसरून मुंबई सरकारनें महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांनीं आपल्या क्षेत्रापैकीं विशिष्ट आकाराच्या जमिनींत उसाचे ऐवजीं धान्याचीं पिकें लावलींच पाहिजेत अशी कायद्याची सक्ती केली होती. परंतु देशांतील साखरेचा पुरवठा वाढवण्याच्या आवश्यकतेच्या दृष्टीनें ही सक्ती इष्ट नाहीं असें हिंदुस्थान सरकारचें मत पडल्यामुळें प्रांतिक सरकारनें आतां ती दूर केली आहे. गेल्या हंगामांत वरील सक्तीमुळें सात हजार टन कमी साखर दक्षिणेमधील कारखान्यांत तयार झाली आणि चालू मोसमांत हा तुटवडा वाढण्याचा संभव आहे. साखरेचें उत्पादन वाढून सबंध देशाचा फायदा होईल, पण धान्याचा पुरवठा मुंबई प्रांतांत घटेल. धान्याच्या उत्पादनांतील ही तूट भरून काढण्याचें आश्वासन हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारास दिलें आहे असें समजतें. साखरेचा भाव आणखी एक वर्षभर कायम ठेवण्याचेंहि मध्यवर्ती सरकारनें ठरवलें आहे. महाराष्ट्रांत पुष्कळ गूळ उठावाच्या अभावीं पडून राहिला असल्याचा बोभाटा आहे. मुंबई प्रांताच्या बाहेर गूळ पाठवला जाण्यावर मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वेनें नियंत्रण घातलें आहे हें ह्या परिस्थितीस कारण असल्याचें सांगण्यांत येतें. साठलेल्या गुळाची खराबी आणि व्यापाऱ्यांचें होणारें नुकसान लक्षांत घेतां हें नियंत्रण शिथिल केलें जाणें अगत्याचें आहे.

---

## आर्थिक विषमता केव्हां अनिष्ट नाहीं ?

आर्थिक समतावादी आणि त्यांचें ध्येय मान्य असलेला कामकरी पक्ष आज इंग्लंडमध्यें अधिकारारूढ आहे. डॉ. डॉल्टन, ब्रिटिश कामकरी मंत्रिमंडळांतले फडनवीस, ह्यांच्या पुरवणी अंदाजपत्रकावरील कॉमन्स सभेंतील चर्चेंत भाषण करतांना माजी कॉंझर्व्हेटिव्ह फडनवीस, सर जॉन अँडर्सन, ह्यांनीं आर्थिक समतेसंबंधानें खालील उद्गार काढले:— "राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें पहातां आर्थिक विषमता ही वाईट नाहीं, इतकेंच नव्हे तर ती एक चांगली गोष्ट आहे. पण ह्या विधानास एक महत्त्वाची पुस्ती जोडली पाहिजे आणि ती ही आहे कीं विषमतेची पातळी फार खोल जाऊं देतां कामा नये आणि कमाल पातळी गाठण्याची संधि प्रत्येक शीलवान्, हुशार व साहसी माणसास मिळालीच पाहिजे."

# हिंदी कपाशीची आजची परिस्थिति

## भवितव्यतेचा विचार

(लेखकः—श्री. आर. जी. सरय्या, बी. ए., बी. एससी., ओ. बी. ई., जे. पी.)

### युद्धापूर्वीचें उत्पादन व खप

कपाशीचें उत्पादन करणाऱ्या देशांत सबंध जगामध्यें हिंदुस्थानचा दुसरा अनुक्रम लागतो; त्याचें वार्षिक उत्पादन ५५ ते ६० लक्ष गाठी आहे. १८७८–७९ मध्यें हिंदुस्थानचें कपाशीचें वार्षिक उत्पादन ११ लक्ष ६५ हजार गाठी इतकेंच होतें, तें वाढत जात जात १८८९–९० मध्यें ३० लक्ष गाठी व १९०५ मध्यें ३५ लक्ष गाठी झालें. पुढेंहि कपाशीखालील क्षेत्र वाढतच राहून दुसऱ्या महायुद्धाचे पूर्वी वार्षिक उत्पन्नाचा सरासरी आकडा ५५ ते ६० लक्ष गाठींपर्यंत पोंचला. हिंदी कपाशीच्या उठावाच्या दृष्टीनें तिचा ह्या देशांतील खप व तिची निर्गत ह्यांचा विचार केला पाहिजे. १९०० सालीं हिंदी गिरण्यांनीं २२ लक्ष गाठी कपाशीचा उठाव केला व तो सुमारें २८ वर्षे याच पातळीवर राहिला. १९३० चे सुमारास हिंदी वार्षिक उठाव ३० लक्ष गाठींचे घरांत आला. १९२०–२१ सालापासूनचे कपाशीच्या निर्गतीचे आकडे पाहिले तर वार्षिक निर्गत २२ लक्ष गाठींची होती असें आढळतें. १९३६–३७ चे सुमारास निर्गतीचा आकडा ४२ लक्ष गाठींवर पोंचला.

१९३५ ते ४० ह्या मुदतींत जपाननें हिंदुस्थानाकडून दरसाल सरासरीनें १५ लक्ष, २० हजार गाठी कपास घेतली. युरोपांतील देश, ग्रेट ब्रिटन आणि चीन हीं हिंदी कपाशीचीं बाकीचीं प्रमुख गिऱ्हाइकें होतीं. चीनकडील निर्गतीची १९३५–४० मधील वार्षिक सरासरी २½ लक्ष गाठी होती. युद्धापूर्वीच्या पांच वर्षांची सरासरी पाहिली, तर हिंदी गिरण्यांतील वार्षिक उठाव २८ लक्ष गाठी होता, ३२ लक्ष गाठींची निर्गत होत होती आणि एकूण उत्पादन ६० लक्ष गाठींचें होतें, असें आढळून येतें. सप्टेंबर १९३९ मध्यें युद्धास प्रारंभ झाला, तेव्हांची परिस्थिति अशी होती.

### युद्धकालीन आयात–निर्गत बंदीचे परिणाम

युद्धामुळें युरोपांतील व अतिपूर्वेकडील बाजारपेठ बंद झाली; हिंदी कपाशीस पूर्णपणें मज्जाव नसलेली ग्रेट ब्रिटनची एकमेव बाजारपेठ तेवढी उरली. अशा रीतीनें, हिंदुस्थानांतील मागणी पुरी पाडून वार्षिक उरणाऱ्या २० लक्ष गाठींच्या उठावाचा प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहिला. ही कपास मुख्यतः आखूड धाग्याचीच होती आणि कमी नंबरच्या सुताचें कापड उत्पादन करणाऱ्या देशांत ती पूर्वी खपत असे. सूत व कापड ह्यांची हिंदुस्थानांत होणारी आयात आतां बंद झाली ही गोष्ट हिंदी गिरण्यांच्या पथ्यावरच पडली. अंतर्गत मागणी पुरवून मध्यपूर्वेकडील देशांकडे कापड पुरविण्याची कामगिरी हिंदी गिरण्यांकडे आली. सैनिकांच्या कपड्यासाठी व पॅरेशूटसाठी लष्करी खात्याची मोठी मागणी होतीच. ह्या वाढत्या मागणीमुळें युद्धकाळांत गिरण्यांचें उत्पादन वाढलें, तरी परदेशच्या बाजारपेठा बंद झाल्यामुळें शिल्लक पडणारी हिंदी कपास उठविण्याइतकें तें मोठें नव्हतें.

### शिलकी कपाशीचा साठा कायम

१९३९–४० मध्यें हिंदी गिरण्यांत ३० लक्ष, ५० हजार गाठी हिंदी कपाशीचा उठाव झाला होता; १९४२-४३ मध्यें तो वाढून ४३ लक्ष, ७ हजार गाठी भरला. युद्धकाळांत कोणत्याच वर्षी इतकी हिंदी कपास हिंदी गिरण्यांनीं घेतली नव्हती, इतकेंच नव्हे तर आतांपर्यंत कोणत्याच वर्षी एवढा उठाव झाला नव्हता. १९४३–४४ मध्यें ४१ लक्ष, १९ हजार गाठींचा व १९४४–४५ मध्यें ४१ लक्ष, ६२ हजार गाठींचा उठाव झाला. हिंदी गिरण्यांनीं १९४०–४५ ह्या काळांत परदेशी कपासहि वाढत्या प्रमाणावर उपयोगांत आणली. १९३४–३९ मधील परदेशी कपाशीच्या खपाची हिंदी गिरण्यांतील वार्षिक सरासरी ५ लक्ष, २ हजार गाठी होती; १९४०-४५ मधील वार्षिक सरासरी ५ लक्ष, ७१ हजार गाठींवर गेली. हिंदी गिऱ्हाइकांची बदललेली आवड आणि लष्करी खात्याची पॅरेशूट कापडाची व इतर प्रकारच्या कापडाची मागणी, हें परदेशी कपाशीचा खप वाढण्याचें कारण आहे. युद्धपूर्व पांच वर्षांतील हिंदी कपाशीचा वार्षिक सरासरी उठावाचा आकडा २८ लक्ष, १५ हजार गाठी होता, तो युद्धकाळांत ३८ लक्ष, ८० हजार गाठी झाला; म्हणजे दरसाल १० लाखांवर गाठी ज्यास्त खपल्या, तरी उरणाऱ्या कपाशीचा प्रश्न सुटूं शकला नाहीं. त्यामुळें, शिलकी कपाशीचा साठा फुगत चालला. १९३८-३९ मध्यें १७,८९,००० गाठी पडून होत्या; १९४३-४४ मध्यें त्यांचा आकडा ४७,१०,००० गाठींवर गेला. १९४४-४५ मोसमाचे अखेर ४० लक्ष, ७ हजार गाठी पुढील वर्षाकरितां शिलक रहातील, अशी अपेक्षा आहे. नुकत्याच संपलेल्या मोसमांतील कपाशीचें उत्पादन फक्त ३८ लक्ष, ८ हजार गाठी इतकेंच भरलें. त्यामुळें कपाशीच्या शिलकी साठ्याचा आकडा थोडाफार कमी होऊं शकला.

### कपाशीच्या क्षेत्राचें संकोचन

युद्धकाळांत कपाशीचें परदेशांतील गिऱ्हाईक बंद झालें आणि त्याचवेळीं हिंदुस्थानांतील अन्न परिस्थिति अत्यंत कठीण झाली. ह्यावर उपाययोजना म्हणून कपाशीच्या लागवडीची जागा धान्यांनीं घ्यावी अशा धोरणाचा इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें पुरस्कार केला आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं कमीअधिक प्रमाणांत ह्या धोरणाचा अंगीकारहि केला. कपास व तंबाखू ह्यासारख्या व्यापारी पिकांऐवजीं धान्याची लागवड व्हावी ह्यासाठीं मुंबई सरकारनें तर प्रत्यक्ष कायद्याचा उपाय अवलंबिला. कपाशीखालील क्षेत्रांत अशा रीतीनें घट झाली नसती, तर तिची अवस्था फार वाईट झाली असती, हें उघड आहे. कपाशीच्या क्षेत्राचें आकुंचन कसें होत गेलें, हें खालील आकडे स्पष्ट दर्शवितात:—

| वर्ष | कपाशीखालील क्षेत्र (एकर जमीन) |
|---|---|
| १९३८–३९ | २,३४,९०,००० |
| १९३९–४० | २,१५,८०,००० |
| १९४०–४१ | २,३३,११,००० |
| १९४१–४२ | २,४१,५१,००० |
| १९४२–४३ | १,९२,०३,००० |
| १९४३–४४ | २,०३,९८,००० |
| १९४४–४५ | १,४८,०२,००० |

### कपाशीच्या किंमतींत वाढ नाहीं !

युद्धजन्य चलनविस्तारामुळें इतर मालाच्या किंमतींत पुष्कळच वाढ झाली, परंतु त्याचा फायदा कपाशीस मिळूं शकला नाहीं. शिलकी कपाशीचा —विशेषत: आखुड धाग्याच्या कपाशीचा—मोठा साठा साचलेला राहिला होता, हें त्याचें प्रमुख कारण आहे. कपाशीची किंमत वाढली तर नाहींच, उलट १९४४–४५ मध्यें तिला टेकू देऊन उचलून धरावें लागलें.

### भवितव्य—मर्यादित आशेस जागा

हिंदी कपाशीच्या भवितव्याचा विचार करतां, अवास्तव अपेक्षांस जागा नसली तरी मर्यादित आशावादास आधार आहे, असें म्हणतां येईल. सबंद जगांत कापडाचा तीव्र तुटवडा पडला आहे आणि हिंदी गिरण्यांची कमाल उत्पादन शक्ति उपयोगांत आणणें शक्य आहे. कांहीं काळ तरी हिंदी गिरण्यांतील स्थानिक कपाशीचा उठाव वार्षिक ४० लक्ष गाठींचे खाली जाण्याचा संभव नाहीं. परंतु, वार्षिक उत्पादन ४० ते ५० लक्ष गाठींचें आहे आणि त्यावर ४० लक्ष शिलकी गाठींचा साठ्याचें दडपण आहे, तेंहि विचारांत घेतलें पाहिजे.

### जपानकडे किती निर्गत शक्य आहे ?

निर्गतीच्या शक्याशक्यतेचा विचार करता, युद्धापूर्वींच्या प्रमाणांत जपानशीं व्यापार पुन: सुरू होण्याचा बिलकुल संभव दिसत नाहीं. युद्धानें जपानच्या सुमारें दोन तृतीयांश गिरण्यांचा नाश केलेला आहे. युद्धकाळांत बहुतेक सर्व जपानी गिरण्या नाश पावल्या, असें प्रत्यक्ष कॉटन स्पिनिंग असोसिएशन ऑफ जपाननेंच प्रसिद्ध केलें आहे. १९३७ मध्यें जपानमध्यें १,२७,८०,००० चात्यांच्या २९१ गिरण्या होत्या; आतां सुमारें ३० लक्ष चात्यांच्या फक्त ३९ च गिरण्या चालू आहेत. हिंदुस्थान दरसाल ३२,०९,००० गाठी कपास निर्गत करीत असे त्यापैकी एकटा जपान १५,६२,००० गाठी घेई, अशी युद्धापूर्वींच्या पांच वर्षांतील वार्षिक सरासरी आहे. त्याच आधारावर हिशेब केला, तरी येतीं कांहीं वर्षें, त्याच्या गिरण्या पूर्वस्थितीस येईपर्यंत, जपान दरसाल २ लक्ष गाठींपेक्षां अधिक हिंदी कपास घेऊं शकणार नाहीं. इतक्याहि कपाशीचा उठाव होणें हें व्यापारविषयक सवलती पूर्ववत् उपलब्ध होणें, वहातुकीची सोय व निर्गत व्यापाराला लागणाऱ्या पैशाची व्यवस्था ह्यांवर सर्वस्वीं अवलंबून आहे. तेव्हां ह्या गोष्टींवर कांहीं काळ तरी विसंबून न बसणें श्रेयस्कर होईल. एकदोन वर्षें जपानकडे निर्गत अजीबात होणार नाहीं, असें गृहीत धरून आपण चाललें पाहिजे.

### इतर देशांत खप—अमेरिकेची स्पर्धा

ह्या उलट ग्रेट ब्रिटन, युरोपांतील देश आणि चीन ह्यांकडे हिंदी कपाशीची निर्गत होण्यास अनुकूलता आहे. तथापि, अमेरिकेचा स्वस्त कापूस ह्या देशांस मोठ्या प्रमाणावर मिळूं लागेल ही गोष्ट प्रस्तुत संबंधांत विशेष चिंतनीय आहे. (१) एक पाउंड कपाशीस चार सेंट, म्हणजे प्रत्येक खंडीस १०४ रुपये एवढी सरकारी मदत देऊन, (२) निर्गतीस वहातुकीच्या आगबोटी उपलब्ध करून व (३) सरकारी व निमसरकारी द्वारा निर्गतीच्या व्यापारास लागणारा पैसा पुरवून शक्य तेवढी कपास निर्गत करण्याचें अमेरिकेचें धोरण आहे. अशा रीतीनें कितीतरी कपास स्पेन, हॉलंड, बेल्जम व स्वित्सरलंड ह्या देशांकडे पाठविण्यांत आली आहे. ह्या स्पर्धेमुळें, परराष्ट्रीय बाजारपेठांतील हिंदी कपाशीचा वाटा कमी होणार हें उघड आहे. कपास खरीदणाऱ्या देशांना, हिंदी कपास घेऊन तिची किंमत पौंडांत देणें हें अमेरिकन कपास घेऊन डॉलर देण्यापेक्षां अधिक सोईचें वाटलें तरी वहातुकीसाठी आगबोटींत कपाशीस जागा मिळण्याची मारामार व निर्गत व्यापारांत अडकणाऱ्या पैशाच्या वसुलीच्या योग्य व्यवस्थेचा अभाव ह्यांची गैरसोय हिंदी कपाशीस सोसावी लागेल. ह्या सवलती उपलब्ध करून देऊन हिंदी कपाशीच्या निर्गतीस प्रत्यक्ष मदत करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आपल्या अंगावर घेणें अर्थांतच जरूर आहे. ह्या बाबतींत योग्य तें सहाय मिळालें, तर: येत्या वर्षी १० ते १२ लक्ष गाठींची निर्गत होण्यास अडचण: पडणार नाहीं. १९४५-४६ च्या मोसमाचा अगदी ढोकळ अंदाज खालील प्रमाणें करतां येईल:—

| | | |
|---|---|---|
| अंदाजी शिलकी कपास | ४० लक्ष गाठी | |
| „ उत्पादन | ४५ „ „ | |
| एकूण पुरवठा | | ८५ लक्ष गाठी |
| गिरण्यांतील अंदाजी उठाव | ४० ते ४२ लक्ष गाठी | |
| अंदाजी निर्गत | १० ते १२ „ „ | |
| एकूण | | ५० ते ५४ लक्ष गाठी |
| अंदाजी शिलकी कपास ( १९४५-४६ अखेर ) | | ३५ ते ३६ लक्ष गाठी |

### कपाशीचे वाढते उपयोग

मोसमाचे अखेर शिलक पडणाऱ्या कपाशींत घट होणें म्हणज तिला चढती किंमत येणें असा साधारणत: अर्थ केला जातो. तेव्हां वरील आकड्यांवरून मर्यादित आशावादास जागा असल्याचें दिसतें. कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र आतां संकुचित झालें आहे तें तसेंच टिकलें आणि "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचा पुरस्कार तडफेनें केला ( त्याची अद्याप फार आवश्यकता आहेच ) तरच हा आशावाद खरा ठरेल. हिंदी कपाशीची लागवड व उत्पादन हीं मागणीच्या मर्यादेंत राखण्यावरच फाजील पुरवठ्याच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल अवलंबून आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें ह्या दृष्टीनें पाऊल टाकलें असून, हिंदुस्थानांतील कपाशीच्या योजनात्मक उत्पादनाबाबत तिनें शिफारसी केल्या आहेत. दरमाणशी कापडाचा खप विचारांत घेतला, तर जगांतील सर्व देशांत हिंदुस्थानाचा अनुक्रम तळाशीं लागतो आणि हिंदी गिरण्यांनीं केलेल्या योजनांत त्यांच्या उत्पादनांत बरीच मोठी वाढ अपेक्षित आहे, हें लक्षांत घेतां हिंदी कपाशीच्या हिंदुस्थानांतील उठावांत पुष्कळच वाढ होण्याची अपेक्षा आपण करण्यास कांहींच हरकत नाहीं. गिरण्यांत बसाविण्यासाठी यंत्रसामुग्री लागेल, ती कोरी करकरीत मिळण्याच्या प्रमाणावर कापडाचें उत्पादन व कपाशीचा उठाव अवलंबून रहाणार हें उघड आहे. तेव्हां नव्या यंत्रसामुग्रीच्या आयातीस हिंदुस्थान सरकारनें सर्वतोपरी सहाय करणें अगत्याचें आहे. मोटार गाड्या, मोटारींच्या धांवा, प्लॅस्टिक्स, कृत्रिम रेशीम, वगैरे धंद्यांत हिंदी कपाशीचा नवा उपयोग होऊं लागण्यासहि बराच वाव आहे. त्यासाठी लागणारें संशोधन मोठ्या प्रमाणावर सत्वर सुरू करण्यांत येण्यावर आणि सर्वसाधारणपणें सर्वच हिंदी धंद्यांच्या अभिवृद्धीवर ही घटना अवलंबून आहे.

## खेडेगांवी उद्योगधंद्यांची संघटना


( लेखक:—श्री. वैकुंठराय ल. मेहता. )

मुंबई सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंत औद्योगिक सुधारणेचा उल्लेख फारच तुरळक आढळतो अशी त्या योजनेवर एक टीका करण्यांत आलेली आहे. १९१४-१८ च्या पहिल्या जागतिक युद्धापर्यंत हिंदुस्थानामध्यें आर्थिक बाबतींत सरकारच्या बेफिकीरपणाच्या वृत्तीचा अंमल होता, त्यामुळें शेती आणि उद्योगधंदे ह्यांचेमधील प्रमाणबद्धता नाहींशी झालेली होती. उद्योगधंदे वाढवून ही प्रमाणबद्धता राखण्यावरच हिंदुस्थानाचा आर्थिक उद्धार अवलंबून आहे असें हिंदी अर्थशास्त्रज्ञ गेलीं ५० वर्षें सांगत आले आहेत. हातमाग प्रभृति स्थानिक उद्योगधंद्यांच्या पुनर्घटनेस सहायकारक होण्यासाठीं वेगवेगळ्या जिल्ह्यांत औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्याच्या उपक्रमाच्या निर्देशापलीकडे औद्योगीकरणाचा उल्लेख मुंबई सरकारच्या योजनेंत आढळत नाहीं. कोणते उद्योगधंदे हातीं घ्यावयाचे व त्यांची पुनर्घटना कोणत्या पद्धतीनें करावयाची, ह्याबद्दल योजना कांहींच सांगत नाहीं.

ह्या टीकेचा सरकारवर थोडाफार परिणाम झालेला दिसतो. कारण, मुंबई सरकारनें कांहीं महिन्यांपूर्वी एक औद्योगिक समिति नेमून, प्रांताच्या औद्योगिक सुधारणेची योजना आखण्याचें काम तिचेकडे सोपविलें. समितीनें कित्येक उपसमित्या नेमल्या आहेत, त्यांत खेडेगांवी व लहान उद्योगधंद्यांच्या विचारासाठींहि एक उपसमिति आहे. मुंबई सरकारनें आपल्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनांत औद्योगिक प्रगतीच्या प्रश्नास स्थान दिलें हें ठीकच झालें. परंतु, सरकारनें १९३८ सालीं नेमलेल्या "आर्थिक व औद्योगिक पहाणी समिती"चा रिपोर्ट १९४० सालीं प्रसिद्ध झाला, त्यांतील शिफारशींचा विचार करण्याचें काम आतां हातीं घेण्यांत आलें असतें तर निदान तातडीच्या प्रश्नांपुरतें तरी तें फार बरें झालें असतें, असें म्हटल्याविना रहावत नाहीं. हिंदुस्थानाच्या आर्थिक नियोजनाचा रिपोर्ट लिहिणाऱ्या मुंबईच्या प्रमुख उद्योगपतींतील एक पुढारी, सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षपदाचा लाभ उपरिनिर्दिष्ट पहाणी समितीस लाभलेला होता. नुकतेंच, १९४० सालीं, एका तज्ज्ञ समितीनें जमा केलेली माहिती सरकारपुढें असतांना, आतां चालू परिस्थितीची व आवश्यक सुधारणांची पुनः चौकशी करविण्यांत होणारा काळाचा व पैशाचा अपव्यय सहज टाळतां येण्याजोगा होता.

स्थानिक उपलब्ध असलेला कच्चा वापरणाऱ्या, स्थानिक कामगारांस काम देणाऱ्या (ते कामगार कायम बेकार रहाणारे असोत किंवा वर्षांतील कांहीं महिने फक्त बेकार रहात असोत) व खेडेगांवांतच बनविलेल्या हत्यारांचा व यंत्रसामुग्रीचा उपयोग करणाऱ्या खेडेगांवी उद्योगधंद्यांचे बाबतींत मुंबई सरकारचें धोरण काय राहील, हें त्यानें खेडेगांवांतील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या कार्यास हात घालण्यापूर्वी स्पष्टपणें जाहीर करणें अगत्याचें आहे. निदान संक्रमण काळांत तरी उपभोक्त्यांस लागणाऱ्या वस्तू तयार करणाऱ्या खेडेगांवी उपक्रमास प्रोत्साहन देण्यांत यावें, कारण कमी भांडवलांत त्यामुळें बरेंच मोठें स्थानिक उत्पादन उपलब्ध होईल आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या नियोजित प्रयत्नास त्याला अडथळा होण्याजोगा नाहीं, असें मुंबईच्या उद्योगपतींच्या योजनेंत मान्य करण्यांत आलेलें दिसतें. मुंबई सरकारास ही विचारसरणी मान्य आहे काय? मुंबई औद्योगिक आणि आर्थिक पहाणी समितीनें हिंदी आर्थिक संसारांतील उद्यम व खेडेगांवी उद्योगधंद्यांस निश्चित स्थान कोणतें आहे आणि मोठ्या आणि लहान प्रमाणावरील कापडाच्या धंद्यांचे परस्पर नातें कसें नियंत्रित करण्यांत यावें ह्याविषयीं सरकारकडून स्पष्ट खुलासा मागितला होता. खेडेगांवी उद्योगधंद्यांच्या वाढीची समाधानकारक योजना आखण्यापूर्वी ह्या दोन्ही बाबतींत सरकारनें आपलें धोरण जाहीर करणें अत्यावश्यक आहे.

आगामी नियोजनांत खेडेगांवी उद्योगधंद्यांची संघटना कोणत्या आर्थिक तत्त्वावर करावी, ह्याचाहि विचार करणें जरूर आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर सध्या ती आधारलेली आहे आणि त्यामुळें तीमध्यें कारागीर किंवा कामगार ह्यांचें जीवित बहुंशीं सावकार किंवा कारखानदार ह्यांचेवर अवलंबून आहे. ह्या संघटनेंत बहुतेक सर्व कामगारांची पैशाची पिळवणूक होते आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें तें हितकारक नाहीं. कारखान्यांतील कर्जबद्ध कामगार हा "रॉयल कमिशन ऑन लेबर"चे म्हणण्याप्रमाणें, कार्यक्षम कामगार होऊंच शकत नाहीं. कर्जानें जर्जर झालेल्या कारागिराचे बाबतींत हें जास्तच प्रमाणांत सत्य ठरतें, कारण काम पुरवणाराचें किंवा सावकाराचें धन करण्यासाठींच केवळ आपण कष्ट करीत आहोंत ह्याची त्यास सदैव जाणीव रहाते. अशा परिस्थितींत, उत्पादनांत सुधारणा अशक्यप्राय आहे. केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर सबंद जगांत सर्वत्र असाच अनुभव आलेला आहे. एक छपराखालीं कारागिरांना एकत्र आणून, सरकारी व्यवस्थेखालीं नाहीं तरी निदान सरकारी नियंत्रणाखालीं, त्यांस काम पुरवावें, अशी कांहींची सूचना आहे. उत्पादकांच्या सहकारी संघटनेपेक्षा ही व्यवस्था अधिक फलदायी होऊन यांत्रिक प्रगतीस ज्यास्त पोषक ठरते काय आणि तिचेमुळें कारागीर कार्यप्रवण होण्यास अधिक उत्तेजन मिळेल काय? असें असल्यास, त्याची संघटना कशी घडवून आणावी? आपली योजना अंमलांत आणण्याचे बाबतींत पुढचें पाऊल टाकण्यापूर्वी सरकारनें ह्याहि प्रश्नांचा काळजीपूर्वक विचार करून त्यांचें उत्तर दिलें पाहिजे.

M/s TRIO & Co.

HIGH CLASS FURNISHERS.

396 B. Sadashiv, Poona 2.

# दिवाळी

## व नवें वर्ष आपणांस सुखाचें जावो.

## ओगले ग्लास वर्क्स लि.

ओगलेवाडी ( औंध संस्थान )

जिल्हा सातारा

आमच्या ग्राहकांस

## दीपावली व नवें वर्ष

सुखाचें जावो !




## आयुर्वेद रसशाळा पुणें

## लि., पुणें नं. ४



## सारस्वत

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३०-९-१९४५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,५६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १,६४,००० |
| ठेवी | ... | रु. ५२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५७,००,००० |

**शेअर विक्री चालू आहे.**

सभासदांना जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट, अगर कॅश क्रेडिट देण्यांत येतें.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना—१९३५ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ८५,०६० |
| रिझर्व्ह फंड | रु. ११,६९० |
| इतर फंड्स् | रु. ८५६३-१३-१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९,६३,९९१-११—७ |

चेअरमन :

श्री. गणेश कोंडो गोडबोले, B. A. LL. B.

- गेलीं ७ वर्षे बँकेनें ६¼% प्रमाणें सभासदांस डिव्हिडंड दिलें आहे.
- माफक दरानें सोनें, माल व स्थावर मिळकत, सरकारी रोखे, शेअर्स वगैरेचे तारणावर कर्ज दिलें जातें.
- योग्य जामीन दिलेस कॅशक्रेडिट व लोन दिलें जातें.

सर्व प्रकारचे बिलांची वसुली व मुंबई, पुणें, किर्लोस्करवाडीचे चेकस व इतर बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A. LL. B.
मॅनेजर.

# प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांचें कार्यक्षेत्र

## समाजाच्या खालच्या थरापर्यंत विम्याचें बीज रुजविण्याचें महत्त्व

( लेखक:—श्री. गो. श्री. दिवाण, एम. ए., एफ. आय. ए. )

सर्व जगांमध्यें प्रगतिपर विचारसरणीचें सदासर्वकाळ एकच ध्येय असूं शकतें, व तें हें कीं, जगांतील सर्वसाधारण मनुष्यसमाजाचें राहणीचें मान कसें वाढेल; दारिद्र्य, बेकारी, अनारोग्य अशांसारख्या मनुष्यजातीचें अकल्याण करणाऱ्या गोष्टी नाहींशा कशा होतील; व एकंदरींत मानवी जीवन ही मनुष्यप्राण्याला भूषणावह अशी संस्था कशी बनेल. आपल्या देशापुरतेंच बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, येथील सर्व देशहितचिंतकांचा एकच हेतु आहे व तो हा कीं, सर्वसाधारण हिंदी मनुष्याची राहणी कशी सुधारेल. राजकीय सत्तेशिवाय इतका व्यापक हेतु सिद्धीस जाणें शक्य नाहीं हें जरी अर्थातच खरें असलें, तरी ह्या हेतूच्या सिद्ध्यर्थ हल्लींच्या राजकीय परिस्थितींतही जेवढा प्रयत्न करणें शक्य आहे, तेवढा करणें हितावहच ठरेल. सर्वसाधारण जनसमाजाची राहणी सुधारण्याचा मार्ग असा आहे कीं, मानवी जीवनास ज्या वस्तुनिष्ठ किंवा कृतिनिष्ठ सोयींची गरज आहे त्या सोयी पुरेशा प्रमाणांत उत्पन्न करून त्यांची गरजेप्रमाणें समाजाच्या निरनिराळ्या घटकांमध्यें योग्य प्रमाणांत वांटणी करावयाची. ह्या मार्गाच्या अवलंबनामध्यें विमा संस्थेच्या कार्यास एक विशिष्ट स्थान आहे. एखादी विशिष्ट गरज ज्यांना ज्यांना म्हणून वाटण्याचा संभव आहे त्यांच्याकडून वर्गणीच्या रूपानें पैसा घेऊन ज्यांना ज्यांना म्हणून ती गरज पुढें प्रत्यक्ष वाटेल त्यांना अशी गरज प्रत्यक्ष वाटण्याच्या वेळीं पैसा देऊन मदत करणें ही तर विमासंस्थेची अंतर्भूत कार्यपद्धति आहे; पण उत्पादित संपत्तीचा ओघ जेथें गरज आहे तेथें वळविणें अशा स्वरूपाच्या विमासंस्थेच्या वरील कामगिरीशिवाय दुसरीही एक कामगिरी विमासंस्था बजावते. विम्याची किंमत म्हणून विमेदारांकडून जमा केलेले हप्त्याचे पैसे कमीअधिक काळपर्यंत विमासंस्थेस अशा रीतीनें गुंतवतां येतात कीं त्यामुळें देशांतील उद्योगधंद्यांची भरभराट व्हावी व अशा रीतीनें देशांतील सर्व उत्पादित संपत्तीमध्यें वाढ व्हावी. संपत्तीच्या ओघाला इष्ट दिशेनें वळण लावणें व संपत्तीच्या उत्पादनालाही अप्रत्यक्ष रीत्या मदत करणें असें जें दुहेरी स्वरूपाचें कार्य विमासंस्था बजावते त्याचें, समाजाची राहणी सुधारण्याचा जो मूलग्राही व व्यापक प्रश्न आहे तो सोडवण्यामध्यें, असें महत्त्वाचें स्थान आहे.

### " उद्यांची तरतूद "

आपल्या देशामध्यें विमासंस्थेची म्हणण्यासारखी भरभराट अजून झाली नाहीं व जी कांहीं थोडी भरभराट दिसते ती समाजाच्या वरवरच्या वर्गामध्येंच बहुतांशीं आहे. समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत विमासंस्थेचें बीज रुजावयास आपल्या देशामध्यें अनेक दुर्लंघ्य अडचणी आहेत. ज्यांची आजचीच गरज पूर्ण भागत नाहीं असा जो जवळजवळ अर्धपोटी असलेला देशांत मोठा वर्ग आहे त्यांना उद्यांची तरतूद करण्यासाठी विमा उतरा असें म्हणणें म्हणजे त्यांच्या सांप्रतच्या स्थितींत हल्लींच्या समाजव्यवस्थेचा जो अन्याय प्रतीत होतो, त्या अन्यायाच्या जोडीला अपमानाच्या डागण्या देण्यासारखेंच होय. असा वर्ग सोडून जेथें जेथें " उद्यांची तरतूद " ह्या शब्दांचा अर्थ आकलन होण्यासारखी परिस्थिति आहे तेथें तेथें विमासंस्थेनें आपलें कार्यक्षेत्र पसरावें, विम्याच्या किंमतीच्या रूपानें वसूल झालेला पैसा अशा रीतीनें गुंतवावा कीं देशांत उद्योगधंद्यांची वाढ व्हावी. ह्या उद्योगधंद्यांमध्यें आज विमासंस्थेच्या कक्षेबाहेर असलेल्यांपैकीं अधिक लोकांना कामधंदा देऊन त्यांची आजची गरज एवढ्या तरी प्रमाणांत नाहींशी करावी कीं उद्यांची तरतूद करण्याची त्यांना स्वाभाविकच इच्छा व्हावी, व अशा रीतीनें आपल्या लोकोपयोगी कार्यानें आपलीहि भरभराट विमासंस्थेनें करून घ्यावी.

### खालच्या वर्गांत विम्याचा प्रसार

अशा प्रकारचें महत्त्वाचें कार्य विमासंस्थेनें करावें म्हणून १९३८ च्या विमाकायद्यानें प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांना पृथक् असें कार्यक्षेत्र निर्माण करून दिलें. प्रॉव्हिडंट कंपन्या ह्या गरीबांच्या विमा कंपन्या होत: इंग्लंडमध्यें ज्या मानानें इंडस्ट्रिअल ॲशुअरन्स ( कामकऱ्यांचा विमा ) ह्या संस्थेची भरभराट झाली आहे त्या मानानें, आपल्याकडील वेगळी परिस्थिति लक्षांत घेऊनही, आपल्या प्रॉव्हिडंट कंपन्यांची वाढ झाली नाहीं ही गोष्ट कबूल केली पाहिजे. किंबहुना आपल्याकडील प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स सोसायट्यांची स्थिति, कांहीं थोडे अपवाद सोडल्यास, अतिशय शोचनीय आहे. अशा सोसायट्यांच्या चालकांनीं समाजांतील साधारणपणें खालच्या परंतु विमा उतरतां येण्यासारखी सांपत्तिक स्थिति असलेल्या अशा वर्गांमध्यें विम्याचा प्रसार फारसा केल्याचें दिसून येत नाहीं. ज्यांना मोठ्या विमाकंपन्यांमध्यें विमा उतरण्याची ऐपत आहे व ज्यांनीं अशा प्रकारचा मोठ्या रकमेचा विमा उतरलेलाही आहे अशांनींच चालकांच्या भिडेखातर अगर अशाच कांहीं दुसऱ्या कारणांमुळें प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपनीमध्यें लहान रकमेचा विमा उतरावा; व अशासारख्यांनींच उतरलेल्या विम्यांची प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपन्यांच्या कामामध्यें बहुसंख्या असावी असेंच सकृद्दर्शनीं तरी वाटतें. वरच्या वर्गांतील मनुष्यांनीं प्रॉव्हिडंट कंपनींत विमा उतरण्यांत गैर असें कांहींच नाहीं; उलट असेंही म्हणतां येईल कीं अशा प्रकारचा विमा उतरून ह्या वर्गानीं प्रॉव्हिडंट कंपन्यांची कार्यक्षमता वाढवावी, व तेणेंकरून ह्या कंपन्यांकरवीं अप्रत्यक्ष रीत्या कां होईना संपत्तीचा ओघ खालच्या वर्गांत अधिक प्रमाणांत वहावा ह्याबद्दलची आपली नैतिक जबाबदारी पार पाडावी. तथापि प्रॉव्हिडंट कंपन्यांचें मुख्य कार्यक्षेत्र समाजाच्या वरच्या वर्गांमध्यें नसून तें त्याहून थोड्याश्या खालच्या वर्गामध्येंच आहे; व ह्या दुसऱ्या प्रकारच्या वर्गांमध्यें जितक्या प्रमाणांत विमासंस्थेचा प्रसार होईल तितक्या प्रमाणांतच प्रॉव्हिडंट कंपन्या यशस्वी झाल्या असें म्हणतां येईल. ह्या खालच्या वर्गाच्या विमाविषयक गरजा नक्की कोणत्या प्रकारच्या आहेत हें अभ्यासिलें पाहिजे व ह्या गरजानुरूप त्यांच्या आटोक्यांतील असेच विमाप्रकार प्रॉव्हिडंट कंपन्यांनीं अमलांत आणले पाहिजेत. अशा खालच्या वर्गांतील विमेदारांकडून विम्याच्या किंमतीचे हप्ते घरोघरीं जाऊन वसूल करण्याची पद्धत इंग्लंडप्रमाणें येथेंही जरूर पडेल; व कदाचित् केलेल्या कामावर टक्केवारीनें वेतन घेणाऱ्या प्रचारकांऐवजीं प्रॉव्हिडंट कंपन्यांमध्यें ठराविक पगार घेणारे प्रचारक अधिक उपयुक्त ठरतील. प्रॉव्हिडंट कंपन्यांनीं आपल्या कार्यक्षेत्राची रूपरेखा आंखावी; व आस्थेवाईक, चिकाटीचे व उच्च हेतूनें प्रेरित झालेले असे कार्यकर्ते हातांशीं धरून शास्त्रशुद्ध रीतीनें विम्याचा

प्रचार सालच्या वर्गात करावा. प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपन्यांची समाजाला गरज आहे; परंतु भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत नेहमींच ज्यांची गरज आहे अशाच संस्था काढल्या जातात असें नाहीं, तर ज्यांपासून तात्कालिक व पुरेसा फायदा मिळूं शकतो अशाच संस्था काढल्या जातात. मोठ्या विमा कंपन्या काढल्यापासूनही तात्कालिक फायदा मिळणें नेहमींच शक्य होतें असें नाहीं; व प्रॉव्हिडंट कंपन्यांपासून तर गुंतवलेल्या भांडवलावर व्याज मिळणें ही गोष्ट कालांतरानेंच शक्य होणारी आहे. हिंदुस्थान सरकारच्या विमाधिकाऱ्यांनीं १९४४ च्या विमाविषयक प्रतिवृत्तांत म्हटल्या-प्रमाणें विम्याच्या धंद्याची तुलना बालसंगोपनाशींच करतां येते. आईबाप निःस्वार्थीपणें बालसंगोपन करतात; परंतु जितक्या प्रमाणांत हें बालसंगोपन चांगल्या प्रकारचें होतें तितक्या प्रमाणांत मूल मोठें झालें म्हणजे आपल्या आईबापांचें व समाजाचेंही ऋण फेडतें. अगदीं ह्याचप्रमाणें प्रारंभीं अतिकसोशीनें सांभाळलेल्या विमा कंपन्या पुढें ऊर्जितावस्थेस येतात, व आपल्या भांडवलदारांस गुंतवलेल्या भांडवलावर योग्य मोबदला देतात; एवढेंच नव्हे तर आपल्या कार्यानें समाजाचें आर्थिक स्थैर्य उत्पन्न करण्यास व टिकविण्यास हातभार लावतात.

वरील लिखाणांचा हेतु असा आहे कीं विचारवंतांनीं प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांच्या कार्यक्षेत्राविषयीं आपल्या देशाची परिस्थिति लक्षांत घेऊन साधकबाधक चर्चा करावी; व ह्या कंपन्यांच्या वर सांगितलेल्या सत्या कार्याची कल्पना व्यवहार्य ठरल्यास धनिकांनीं व संपन्न अशा संस्थांनीं ती कल्पना सत्यसृष्टींत उतरविण्यास केवळ स्वहिताच्या दृष्टीनें नव्हे तर देशहिताच्या दृष्टीनेंही प्रेरित व्हावें.

## हिंदुस्थानांत साखरेस मागणी वाढली

### शुगर कंट्रोलरचा खुलासा

"१९४१ सालानंतर हिंदी लोकसंख्येंत कांहींहि वाढ झाली नाहीं ह्या आधारावर हिशेब केला तर ५,००० वस्तीवरील शहरांतील प्रत्येक मनुष्यास सालीना १२ शेर व खेड्यांतील मनुष्यास ३ शेर साखर ह्या वाटपानें हिंदुस्थानास दरसाल १५,००,००० टन साखर लागेल. युद्धापूर्वीच्या साखरेच्या खपाची सरासरी १० ते १५ लक्ष टनांची आहे. बिस्किटें, खाऊ इत्यादींच्या उत्पादनास लागणारी साखर हिशेबांतून वगळली तरी १९४४-४५ मध्यें नागरिकांच्या खाजगी वापरासाठीं १० लाख टनांवर साखर लागली. शहरांतील साखरेचा खप वाढत आहे.

"मुंबई प्रांतांतील साखरेचें उत्पादन १०,००० टनांनीं घटलें आहे, त्याचें कारण सरकारचें "अधिक धान्य पिकवा" हें धोरण होय. युद्धापूर्वी जेव्हां ऊंस मुबलक होता तेव्हांहि हिंदुस्थानांतील साखरेचें एकूण उत्पादन १२ लक्ष टनांपेक्षा अधिक नव्हतें. तेव्हां १५ लक्ष टनांचें उत्पादन आज शक्य होणार नाहीं."

### युद्धनिर्वासितांची हिंदुस्थानांत गर्दी

मलाया, ब्रह्मदेश इत्यादि पूर्वेकडील रणक्षेत्रांतून इकडे आलेल्या निर्वासितांची शिरगणती १९४३-४४ मध्यें करण्यांत आली तेव्हां अशा लोकांची संख्या साडेचार लक्ष असल्याचें आढळलें. सदरहू देशांतून आलेल्या फक्त हिंदी निर्वासितांच्या खर्चाची जबाबदारी हिंदुस्थान सरकारावर पडते आणि तत्प्रीत्यर्थ १९४३-४४ सालीं सुमारें तीन कोटि रुपये खर्च झाले.


कोल्हापूर इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था

# दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## कोल्हापूर

स्थापना १९१३ इसवी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ७५,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... | रु. ४५,६६० |
| रिझर्व्ह फंड | ... | रु. ६४,२३० |
| इतर फंडस | ... | रु. ६७,९७० |
| सरकारी रोख्यांत वगैरे | ... | रु. ७०,६५५ |

बँकिंगसंबंधीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेचीं तिमाही सांपत्तिक पत्रकें कायद्यानुसार सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध केलीं जातात. ठेवीच्या व्याजाचे दरासंबंधीं व विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

के. जी. राणे
ऑफि. मॅनेजर.

नारायणराव हणमंतराव साळुंखे
प्रेसिडेंट
दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

स्थापना सन १९२७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० दोन लक्ष | रुपये |
| भरलेलें भांडवल | ६९,१२०-०-० | रुपये |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०१,०५०-०-० | रुपये |
| खेळतें भांडवल | ८,३७,०००-०-० | रुपये |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासद, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर ३ टक्के व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, रेल्वे रसीदची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा.—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

# शेतकऱ्यांना हवामान-खात्याचें सहाय्य

( डॉ. एल्. ए. रामदास, पीएच. डी., शेतकी हवामानतज्ञ, ह्यांच्या "इंडिअन फार्मिंग" च्या जुलै महिन्याच्या अंकांतील लेखाचा डॉ. मो. वा. चिपळोणकर, डी. एस्सी. यांनी केलेला अनुवाद. )

" जें शेतकऱ्याला अवगत असतें पण ज्याचें त्याला वर्णन करतां येत नाहीं तें शेतकी हवामानशास्त्र " असें सर नेपिअर शॉ ह्यांनीं त्यासंबंधीं लिहितांना म्हटलें आहे. एकीकडे हवामानशास्त्रज्ञ शेतकऱ्याला कशा प्रकारची मदत करूं शकेल हें सांगणें व उलट-पक्षीं शेतकऱ्याच्या नेमक्या गरजा कोणत्या त्या हवामानशास्त्रज्ञाला सांगणें हें त्या दोघांना जोडणारा दुवा ह्या नात्यानें, शेतकी हवामानतज्ञाचें काम होय. असल्या मध्यस्थी कामाचा पहिला भाग म्हणजे शेतकऱ्याकडून अगर त्याच्या वतीनें बोलणाऱ्या शेतकीखात्याच्या अधिकाऱ्याकडून त्याच्या शेतीसाठी नक्की कोणत्या प्रकारच्या हवामानाची माहिती व त्याबद्दलच्या कोणत्या आगाऊ सूचना नेहमीं लागतात त्यासंबंधीं माहिती गोळा करणें हा होय. ह्यासाठी प्रस्तुत लेखकानें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतील व संस्थानांतील शेतकीखात्याच्या अधिकाऱ्यांना एक विस्तृत प्रश्नपत्रिका पाठवून त्यांचीं उत्तरें गोळा केलीं आहेत. त्या-संबंधींची कांहीं माहिती पुढें दिली आहे.

### प्रश्नपत्रिका

(१) जमिनीच्या पहिल्या नांगरणीचा काल व प्रकार कोणता?

(२) पीक कालव्याच्या पाण्यावरील आहे किंवा कसें?

(३) पेरणीची वेळ कोणती?

(४) लावणीची ( भाताच्या पिकाप्रमाणें ) वेळ कोणती?

(५) अंकुर फुटून वाढीचा पहिला काळ अदमासें कोणत्या दिवसापासून कोणत्या दिवसापर्यंत असतो?

(६) साधारणपणें कोणत्या दिवसांत पिकाची वाढ झपाट्यानें होते, व त्यास पूर्णावस्था केव्हां येते?

(७) रोपाला फूल कधीं धरतें?

(८) रोपाला दाणा येऊन त्याची वाढ साधारणपणें कोणत्या दिवसांत होते?

(९) पिकाची कापणी केव्हां करतात?

(१०) कापणीनंतर वाळण्यासाठी किती दिवस तें उघड्यावर पडून राहतें?

(११) चांगलें पीक येण्यास नेहमींच्या हवामानाचा अनुक्रम कशा प्रकारचा असावा लागतो तें द्या. तसेंच पिकासाठी सर्वांत उत्तम परिस्थिति, वेळोवेळीं लागणाऱ्या पावसाचें प्रमाण, उष्णतामान, दमटपणा, वारा, मळभ येणें इत्यादींसंबंधीं माहिती द्या.

(१२) वाढीच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थांमध्यें जास्तींत जास्त किती पाऊस एका दिवसांत पडला तरी पिकावर फारसा वाईट परिणाम होत नाहीं तें सांगा.

(१३) किती दिवस जास्त पाऊस पडत राहिला तरी पिकाची नासाडी होत नाहीं हें पिकाच्या तीन अवस्थांना अनुलक्षून निर-निराळें सांगा.

(१४) अवर्षणाचा जास्तींत जास्त किती काळ गेला तरी पिकावर फारसा अनिष्ट परिणाम होत नाहीं? हें तीन अवस्थांना निरनिराळें सांगा.

( १५ ) वर्षाच्या कोणत्या महिन्यांत पाऊस पडला तर तो भलत्याच वेळीं पडला असें मानलें जाईल? ह्या महिन्यांत कमींत-कमी पाऊस किती पडला तर तो पिकाला मारक होईल?

(१६) थंडी-( अ ) पिकाला कमींतकमी उष्णतामान कोणतें सहन होतें कीं ज्याहून कमी झालें तर तें त्याला नक्की बाधक होतें?

( ब ) कोणत्या महिन्यांत थंड दवामुळें ( गार लागल्यामुळें ) पिकाचें नुकसान होतें?

(१७) उन्हाळा-( अ ) जास्तींत जास्त उष्णतामान कोणतें कीं ज्याहून जास्त झाल्यास तें पिकाला नक्की अपायकारक होतें?

( ब ) कोणत्या महिन्यांत अशी उष्णता होते?

(१८) वारा-कोणत्या महिन्यांत सोसाट्याच्या वाऱ्यांनीं शेतां-तील उभीं पिकें पडण्याची भीति असते? उभ्या पिकांना वाऱ्याचा जास्तींत जास्त वेग किती सहन होतो?

(१९) अभ्राच्छादित आकाशामुळें नेमक्या कोणत्या दिवसांत पिकाला बाघ येऊं शकतो?

(२०) तुमच्या प्रांतांत गारांच्या वर्षावामुळें कोणत्या महि-न्यांत पिकावर अनिष्ट परिणाम होऊं शकतो? व हें अशा महि-न्यांतून किती वेळां होतें?

(२१) कोणत्या महत्त्वाच्या रोगामुळें पिकावर अनिष्ट परिणाम होतो? पिकाची वाढ होत असतांना कोणत्या हवेमुळें असे रोग जास्त पसरण्याचा संभव असतो?

(२२) पिकांचा नाश करणाऱ्या कीटकांच्या मुख्य सांथी कोणत्या? असल्या कीटकांच्या वाढीला व त्यापासून पिकाला उपद्रव होण्यास कशा प्रकारची हवा लागते व ती कोणत्या महि-न्यांत पडण्याचा जास्त संभव असतो?

(२३) या विषयासंबंधीं इतर कोणतीहि माहिती असल्यास ती येथें द्यावी.

वरील प्रश्नपत्रिकेला निरनिराळ्या प्रांतांतील व संस्थानांतील शेतकी अधिकाऱ्यांनीं धाडलेल्या उत्तरांमध्यें मुख्य मुख्य पिकां-संबंधीं खूपच माहिती भरलेली आहे. जिल्हेवार मिळालेल्या या माहितीस आणखी पुष्टि म्हणून सरकारी प्रायोगिक शेतावर तेथील प्रयोगांत आलेल्या निरनिराळ्या पिकांसंबंधीं मिळालेली जास्त अचुक माहिती गोळा केली जात आहे; आणि जरूर लागेल तस-तशी निरनिराळ्या जिल्हाधिकाऱ्यांकडूनही अशा प्रकारची माहिती मिळविली जाणार आहे.

आजपर्यंत मिळालेलीं उत्तरें बारकाईनें तपासलीं जात आहेत. बहुतेक सर्व उत्तरें अत्यंत उपयोगी असलीं तरी क्वचित् बाबतींत असें म्हणावेंसें वाटतें कीं, " शेतकी हवामान शास्त्र याचें शेत-कऱ्यासच काय पण शेतकी अधिकाऱ्याला सुद्धां वर्णन करतां येत नाहीं! " अर्थात् या उत्तरांत सांठविलेली जी माहिती आहे ती शेतकी अधिकाऱ्याच्या आजच्या शेतकीविषयक ज्ञानाची निदर्शक होय.

### हवामान व पिकें

आगामी हवामान कशा प्रकारचें असेल हें जर शेतकऱ्याला आधींच कळलें तर त्याचा खूपच फायदा होईल ह्याबद्दल मुळींच संशय नाहीं. उदाहरणार्थ, पावसाळा केव्हां सुरू होईल व सबंद पावसाळ्यांत दर दिवशीं पावसाचें मान कसकसें बदलत जाईल, केव्हां उघाड पडेल व परत केव्हां पावसाळी हवा सुरू होईल इत्यादि जर त्याला वेळींच ( आगाऊ ) कळतील तर तो त्या

मानानें आपलीं निरनिराळीं मशागतीचीं कामें (म्हणजे पेरणी-साठी वाफे तयार करणें, खत देणें, पेरणी करणें, तण काढणें, लावणी करणें, कापणी करणें, वाळवणें, घोपटणें इ. इ.) पिकाला कमींत कमी बाघ येईल व शेती जास्तींत जास्त किफायतशीर होईल अशा रीतीनें बरोबर वेळा साधून करूं शकेल. तसेंच, त्याच्या तुटपुंज्या मजुरीचा, खताचा व पाण्याचा व्यय जास्तींत जास्त फायद्या होईल अशा तऱ्हेनें तो करूं शकेल.

प्रत्येक पिकाच्या बाबतींत पेरणीपासून तों कापणी होऊन पीक पूर्णपणें हातांत पडेपर्यंतच्या काळांत कांहीं विशेष महत्त्वाचे क्षण असतात. खुद्द पेरणीची वेळ सुद्धा शेतकऱ्याला कांहीं कमी काळजीची असते असें नव्हे. कारण पेरणी झाल्याबरोबर जर पावसाच्या जोराच्या सरी आल्या तर सर्वच बीं वाहून जाण्याचा संभव असतो; किंवा पेरणी होऊन नुकत्या अंकुर फुटलेल्या शेताची सुद्धा त्यामुळें भयंकर नासाडी होते. तसेंच पेरणी झाल्यावर फार दिवस जर उघाड पडली तर उलट कोरड्या हवेमुळें पहिलें बीं करपून जातें व फिरून दुसरी पेरणी सुद्धा करावी लागते इत्यादि सर्व गोष्टींची त्याला पूर्ण जाणीव असते. म्हणून पेरणीच्या वेळीं असलेल्या हवामानावरून पिकाची प्रत, जात, व त्याचे दर, एकरीं प्रमाण इत्यादि गोष्टी प्रथमच ठरून जातात. पेरणी होणें, अंकुर फुटणें व पालवी येणें येथपर्यंतच्या म्हणजे पिकाच्या प्रथमावस्थेंत जर सर्व गोष्टी ठीक असल्या तर त्याला चांगलाच मुहूर्त लाभला असें म्हणावयास मुळीच हरकत नाहीं. त्यानंतर पिकाच्या दुसऱ्या अवस्थेंत (म्हणजे पालवी फुटून शेतें जोमांत वाढणें) तण काढणें व इतर मामुली कामासाठी मधून मधून उघाडीची फार आवश्यकता असते. याच अवस्थेंत पिकाची वाढ झपाट्यानें व जोरदार होत असल्याकारणानें मुबलक पाणी व सूर्यप्रकाश यांची फार गरज असते. यापुढची तिसरी अवस्था म्हणजे ज्यावेळीं रोपट्यांना फुलें येऊन दाणा धरला जातो ती होय. या अवस्थेंत अभ्रें येणें हें पिकाच्या दृष्टीनें फार वाईट असतें. ज्यावेळीं कणिस फुटून कोवळे दाणे बनूं लागतात त्यावेळीं ते फार नाजूक असल्यामुळें त्यांना गरम वारा सुद्धा सहन होत नाहीं; कारण त्यानें लगेच दाणे सुकून जातात. सबंद ऋतु चांगला जाऊन जरी कापणीची वेळ आली असली तरी प्रतिकूल हवामान केव्हांही घोक्याचेंच, कारण अशावेळींसुद्धा गारा किंवा पावसाची एकादी जोराची सर पिकाची अनन्वित नासाडी करूं शकते. आगाऊ घोक्याची सूचना मिळणें म्हणजे आधींपासूनचीच योग्य तयारी असण्यासारखें होय. म्हणून पाऊस येईल अशी नुसती शंका आली कीं अनुभवी शेतकरी तेव्हांच कापणीची घाई करतो. असेंरपर्यंत, म्हणजे कापणी होऊन खळ्यावर आलेल्या धान्याला, अचानक येणाऱ्या पावसाच्या एकट्या दुकट्या सरीची सुद्धा भीति असतेच.


पिकाची खराबी करणारे कीटक व कीड यांची वाढ विवक्षित हवामानावरच अवलंबून असते, आणि त्यांना तशी अनुकूल परिस्थिति मिळाल्यास पिकाच्या रोगाचा प्रसार फार लवकर होऊं शकतो. यांतच आणखी रोपट्यांचे रोग आणि टोळधाड यांचा समावेश केला म्हणजे शेतकऱ्याचे शत्रू किती आहेत याची पूर्ण कल्पना करतां येईल.

### हवामानावर आधारलेलें शेतकी वेळापत्रक

निरनिराळ्या प्रदेशांत कोणत्या पिकाला कोणतें हवामान लागतें, व त्याचे विशेष महत्त्वाचे काल कोणते हें त्या पिकावर आणि त्या प्रदेशावर अवलंबून असतें. शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांनीं दिलेल्या माहितीवरून आणि ठिकठिकाणच्या आज माहीत असलेल्या हवामानावरून शेतकी हवामानशास्त्रज्ञ वेगवेगळ्या पिकांसाठी हवामानावर आधारलेलीं शेतकी वेळापत्रकें करण्याच्या खटपटींत आहेत. तसें झाल्यास त्याचा उपयोग पुढें हवामानाचें भविष्य वर्तवणाऱ्या हिंदुस्थानांतील सात हवामान-केंद्रांच्या अधिकाऱ्यांना होईल. हीं सात केंद्रें मुंबई, कराची, लाहोर, दिल्ली, नागपूर, कलकत्ता व मद्रास या शहरीं आहेत.

## शेतकी हवामानाचें वेळापत्रक

प्रान्तः-मद्रास. जिल्हाः-सेलम. पीकः-भात (कालव्यावरील).




आकृति १ ली

अर्थात् आज तयार केलेलीं वेळापत्रकें हीं तात्पुरतीं व त्या दिशेनें सुरुवात करण्यासाठींच आहेत. जसजसा अनुभव येईल तसतसे त्यांत फेरफार करावे लागतील. येथें उदाहरणादाखल असल्या वेळापत्रकांपैकीं एक चित्ररूपानें आकृति १ मध्यें दिलें आहे. तें मद्रास इलाख्यांतील सेलम जिल्ह्यांतील कालव्याच्या पाण्यावरील भाताच्या पिकाचें होय. आगामी हवामानाचें अनुमान ठरवणाऱ्या अधिकाऱ्याला असल्या आकृतीवरून कोणत्या भागांतील, कोणत्या पिकाकरितां, कोणत्या वेळीं, कोणती माहिती आधी दिली पाहिजे हें चटकन् ध्यानांत येईल. अशा तऱ्हेनें हवामानशास्त्रज्ञ शेतकऱ्याच्या म्हणजे त्याच्या पिकाच्या गरजा लक्षांत घेऊन आपलीं पत्रकें व धोक्याच्या सूचना जाहीर करीत जाईल.

आज प्रत्येक शेतकरी आपआपल्या बुद्धीप्रमाणें आगामी हवामानासंबंधीं अंदाज करतो व त्या कारणानें सहाजिकच जवळजवळच्या शेतांमध्येंसुद्धां मशागतींचीं मुख्य मुख्य कामें निरनिराळ्या वेळीं केलेलीं दिसतात. पण यापुढें शेतकरी जसजसा हवामानासंबंधीं रोज ताज्या बातम्या ऐकूं लागेल तसतसा तो त्याबरहुकूम ( त्या अंदाजाला धरून ) आपलीं कामें करूं लागेल; आणि अशा तऱ्हेनें थोड्याच वर्षांत सर्व शेतकऱ्यांचीं निरनिराळीं मशागतीचीं कामें हवामानांतील फरकानुसार व अर्थात् पूर्वीपेक्षां जास्त सयुक्तिक ( मनाला पटणारीं ) अशीं होऊं लागतील.

### शेतकऱ्यासाठीं हवामानासंबंधीं बातम्या

सर्व लोकांसाठी हवामानासंबंधींचे अधिकृत अंदाज वर म्हटलेल्या निरनिराळ्या सात् प्रांतिक केंद्रांतून व शिवाय अलाहाबाद, आणि पेशावर येथून रेडिओद्वारां प्रसिद्ध केले जाणार आहेत. त्याचप्रमाणें ऑल इंडिया रेडिओचीं आणखी इतर केंद्रें असल्याकारणानें शेतकऱ्यांसाठी सर्व प्रांतांतील हवामानासंबंधींच्या बातम्या, भूमिजनांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून तेथून रोज प्रसृत केल्या जातील. या बातम्यांचा उत्तम तऱ्हेनें व वेळेवर प्रसार करण्यासाठी म्हणून हिंदुस्थानांतील सर्व खेड्यापाड्यांतून ठेवण्यासाठी अनेक रेडिओंची ( ग्राहक यंत्रांची ) आवश्यकता आहे. कारण हवामानासारख्या व इतरही बातम्या सर्व भूमिजनांना देण्याचा हाच एक सर्वांत उत्तम मार्ग होय.

### हवामानासंबंधींच्या पत्रकांचें व अंदाजांचें स्वरूप

हिंदुस्थानचें हवामानखातें शेतकऱ्यांना किती व कोणत्या प्रकारची मदत करूं शकतें हें सगळ्यांना समजण्यासाठी मुद्दाम एक पुस्तक तयार केलें गेलें असून तें लवकरच प्रसिद्ध होणार आहे. हवामान खात्याचीं पत्रकें वाचतांना कांहीं गोष्टी मुद्दाम लक्षांत ठेविल्या पाहिजेत, त्या अशाः—

( अ ) देशांतील निरनिराळ्या भागांतील हवामानाच्या सारखे सारखेपणामध्यें अगर सलगपणामध्यें ( Homogeneity ) बराच फरक असतो. उदाहरणार्थ, पावसाच्या बाबतींत, कोणत्याही एका पावसाळी हवेच्या कालावधींत एका भागापेक्षा दुसऱ्या भागांत पडणाऱ्या पावसाची वेळ व स्थळ हीं दोन्ही अगदीं भिन्न असूं शकतात. जसें सिंध, राजपुताना या भागांत एखाद्या विवक्षित दिवशीं जवळ जवळच्या ठिकाणीं पर्जन्यमानांत आढळणारा फरक कोंकण-मलबार किंवा बंगाल या भागांतील तशा ठिकाणांच्या फरकापेक्षा जास्त असेल. म्हणून पावसाळी हवा याचा अर्थ असल्या दोन भागांकरितां एकच धरतां येणार नाहीं.

( ब ) या शास्त्राच्या आजच्या स्थितींत रोजच्या हवामानाच्या नकाशावरून आगामी हवामानाचें, साधारणपणें ३६ ते ४८ तासांपर्यंतचेंच अनुमान करतां येतें व वातचक्रें, वादळें यांसारख्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या घडामोडींबद्दल फार तर ४८ ते ७२ तास आगाऊ सूचना देतां येते. पुढेंमागें सर्वसाधारण हवामानाचा अंदाज एक आठवड्यापुरतासुद्धां देणें शक्य होईल. पण त्याला अजून जास्त संशोधनाची जरूरी आहे. हिंदुस्थानचें हवामानखातें लवकरच ही गोष्ट हातीं घेणार आहे.

( क ) वीज, वादळें व गारांचा पाऊस यासारख्या घडामोडी कधीं कधीं फारच तुरळक व अर्धेमर्धेच होतात. त्यामुळें सहाजिकच त्यांचें नक्की ठिकाण व वेळ आधीं वर्तवणें नेहमी शक्य होत नाहीं. त्यांच्या बाबतींत ती घडून येण्याची शक्यता विवक्षित स्थळाऐवजीं अद्मासानें त्याच्या आसपासच्या मोठ्या प्रदेशापुरती फक्त दर्शवितां येते.

शेतकऱ्यांसाठी हवामानासंबंधींचीं पत्रकें व आगाऊ सूचना प्रसिद्ध करण्याचा प्रश्न आज प्रथमच हातीं घेतला जात आहे. यापूर्वी एवढा मोठा प्रयत्न कधींच केला गेला नव्हता. जेव्हां हवामानशास्त्रज्ञ व शेतकरी एकमेकांशीं पूर्णपणें समरस होतील तेव्हांच यांतून चांगल्या गोष्टींची निष्पत्ति होऊं शकेल; आणि म्हणूनच हिंदुस्थानचें हवामान खातेंहि येथील शेतकऱ्याला मदत करण्याची ही एक सुसंधि आहे अशा दृष्टीनें या प्रश्नाकडे बघत आहे.

### मुंबई प्रांतांत दुसरें सरकारी इंजिनिअरिंग कॉलेज

मुंबई प्रांतांत सध्या एकच इंजिनिअरिंग कॉलेज आहे. इंजिनिअरांस येत असलेल्या वाढत्या मागणीचा विचार करून प्रांतिक सरकारनें दुसरें कॉलेज स्थापण्याचें ठरवलें आहे. तें अहमदाबादेस काढण्यांत येणार आहे आणि त्या बाबतींतली योजना तयार करण्यासाठी एक सल्लागार समिती लवकर नेमली जाईल.

### मुंबईस कानडाचा गहू मिळणार

कॅनडाहून ९०,५०० टन गहू येत असून तो केवळ मुंबईच्या उपयोगासाठी देण्यांत यावयाचा आहे.

### हिंदी कपाशीखालील क्षेत्राचा अंदाज

गत सालाच्या मानानें चालू हंगामांतील हिंदी कपाशीचें क्षेत्र १२ टक्के कमी भरेल असा अधिकृत अंदाज आहे.




DAMODARDAS BHAGWANDAS

INDIA'S LEADING AGARBATTI MANUFACTURERS

**High Quality Products**
( Finest in the Market )

*761, Raviwar Peth. Poona 2.*

## अमेरिकेचे उधार–उसनवारीचे (लॅंड–लीज) प्रचंड व्यवहार

अमेरिका युद्धांत पडण्यापूर्वी आणि पडल्यानंतरहि त्या राष्ट्रास इंग्लंड, रशिया व चीन ह्या देशांस युद्धसामुग्रीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करीत रहाणें प्राप्त होतें. इंग्लंडला कच्चा माल आणि खाद्य पदार्थ नेहमीच परदेशांतून आयात करून नित्याच्या जीवनाची गरज भागवावी लागते. युद्धपरिस्थितींत ह्या बाबतींत त्या देशास अमेरिकेवर अधिकच अवलंबून रहावें लागलें. रशियाची उत्पादनशक्ति मोठी असली तरी त्यासहि जर्मन हल्ल्यास यशस्वी रीतीनें तोंड देण्यासाठी अमेरिकेच्या सहाय्याचें महत्त्व बऱ्याच काळपर्यंत तीव्रतेनें भासलें. चीनला तर स्वतःच्या लढाऊ साधनांच्या तुटपुंज्या पुरवठ्यामुळें अमेरिका व इंग्लंड यांच्या तोंडाकडे सहाय्यार्थ पहात रहाण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. तथापि अमेरिकेचें आर्थिक सामर्थ्य इतकें प्रचंड आहे कीं त्या राष्ट्रानें युद्धाबाबतची सर्व गरज भागवून मित्र राष्ट्रांस लढाऊ सामानाचा पुरवठा उदार हातांनीं केला. प्रारंभीं अमेरिकेनें पुरवलेल्या मालाची किंमत इंग्लंडनें रोसीनें दिली आणि स्वतःच्या अमेरिकेंत गुंतवलेल्या भांडवलाचा मोबद्लाहि दिला. पण या पद्धतीनें मालाचे पैसे देणें इंग्लंड व रशिया ह्यांस शक्य नव्हतें आणि जर्मनी व जपान यांच्याशीं युद्ध जणूं काय भागीदारीचें युद्ध अमेरिकेस चालवणें आवश्यक होतें. मित्र राष्ट्रांवर कर्जाचा जबर बोजाहि त्यास टाकतां येईना. त्या अडचणींतून मार्ग म्हणून अमेरिकेनें उधार–उसनवारीची व्यवस्था अमलांत आणली. ऋणको देशांनीं माल सवडीनें परत करावा असा तिचा अर्थ होता आणि त्यांत व्याजाचा प्रश्न नव्हता. तरीहि अमेरिकेच्या माल उसनवारीनें देण्याच्या शक्तीसही मर्यादा असल्यानें युरोपांतील युद्ध संपतांच हा व्यवहार पूर्वी ठरल्याप्रमाणें बंद झाला. तथापि, युद्ध समाप्त झालें तरी त्याच्या परिस्थितीचें शेपूट राहिलेंच आणि रोख पैसे टाकून किंवा कर्ज काढून अमेरिकन माल घेण्याची इंग्लंडची तयारी नव्हती. त्या कारणानें इंग्लंडची तारांबळ उडाली आणि अत्यंत आवश्यक असलेल्या अमेरिकन मालाची किंमत कशी द्यावयाची हा गंभीर प्रश्न उद्भवून त्यासंबंधांत वाटाघाटीस तात्काळ प्रारंभ झाला. उसनवारीनें अमेरिकेकडून घेतलेला माल परत केव्हां व कसा व्हावयाचा किंवा त्याच्या किंमतीची भरपाई कशी व किती मुदतीनें करावयाची हा पुढचा प्रश्न आहेच. बुटींत युद्धखर्च म्हणून उसनवारीचें येणें हिशेबांतून अमेरिकेनें काढून टाकावें अशी सूचनाहि पुढें आली आहे. मित्रराष्ट्रांचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच अमेरिकेच्या बरोबरीनें इंग्लंड व रशिया ह्या देशांनीं उसनवारीनें घेतलेल्या मालाचा विनियोग केला असल्यानें असा हिशेब केला जाणें योग्य व इष्ट आहे असा युक्तिवाद तिच्या मुळाशीं आहे. जगाची आर्थिक घडी पुन्हां नीट बसण्यासाठी आणि अमेरिकेच्या स्वतःच्या हिताचे दृष्टीनेंहि त्याचें समर्थन केलें जात आहे. युद्धकाळांतला मालपुरवठा निराळा आणि युद्धसमाप्तीनंतरचा व्यापारी व्यवहार निराळा आणि आतां इंग्लंडनें अमेरिकेकडून घेतलेल्या मालाची किंमत देण्याची व्यापारी पद्धतीच अवलंबणें सरळ आहे असें अमेरिकन लोकांचें म्हणणें आहे. निरनिराळ्या युद्धक्षेत्रांत अमेरिकेसहि उसनवारीनेंच इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान इत्यादि देशांनीं माल पुरवलेला आहे आणि हिशेबांत त्याची वजावाट अर्थातच होईल. अमेरिकेनें किती किंमतीचा व कोणता माल उसना दिला ह्याची माहिती बोधप्रद होण्यासारखी असल्यानें ती पुढें दिली आहे:–

### उसनवार आणि उलट–उसनवार

| उसनवार | (दशलक्ष डॉलर) | उलट उसनवार | (दशलक्ष डॉलर) |
|---|---|---|---|
| दारूगोळा व जहाजें | २०,६९१·६ | इमारती वगैरेचा भांडवली खर्च | १,१९५·८ |
| पेट्रोलियम | २,१९४·७ | अन्न व कापड | ४८९·४ |
| कारखान्यांत बनलेला माल | ८,६५७·७ | पेट्रोलियम, कोळसा | १,२०९·४ |
| शेतीचा माल | ५,९०६·५ | लष्करी सामुग्री | १,२०७·४ |
| जहाजें व इतर | ४,५८०·३ | जहाजें, वहातूक | १,०३२·९ |
| | | इतर | २०६·१ |
| | | कच्चा माल व अन्न यांची अमेरिकेकडे निर्यात | १६५·७ |
| एकूण | ४२,०२०·८ | एकूण | ५,६००·४ |

### देशांमधील वांटणी

| देशाचें नांव | उसनवार (दशलक्ष डॉलर) | उलट उसनवार (दशलक्ष डॉलर) |
|---|---|---|
| इंग्लंड | १३,४९८·७ | ३,७९६·९ |
| ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड | १,३७८·७ | ९८०·२ |
| हिंदुस्थान | २,२३१·४ (हिंदुस्थान व चीन) | ६१६·७ |
| चीन | | ३·७ |
| रशिया | ९,१२८·९ | २·१ |
| लॅटिन अमेरिका | २४५·४ | ... |
| फ्रेंच साम्राज्य | ४,८८७ (फ्रेंच साम्राज्य, बेल्जम व इतर देश) | २७२·० |
| बेल्जम " | | २६·१ |
| इतर देश " | | २·६ |
| एकूण | ३१,३६८·९* | ५,६००·४ |

* १०,६५१·८ दश लक्ष डॉलर्संची सामुग्री विशिष्ट देशांस अशी पुरवली नसल्यानें ती त्या आकड्यांतून वगळली आहे.

ऋणको देशांनीं उलट उसनवारीनें पुरवलेला माल वजा जातां सुमारें ३,६०० कोटि डॉलर्संची म्हणजे अजमासें १२,००० कोटी रुपये किंमतीची युद्धसामुग्री अमेरिकेनें मित्र राष्ट्रांस पुरवली आहे. ती परत येण्याचें अखेरीस कांहीं होवो, युद्धसमाप्तीनंतरचे आयात–निर्गतीचे व्यवहार व्यापारी देण्याघेण्याच्या पद्धतीनें झाले पाहिजेत असा आग्रह अमेरिकेनें धरणें स्वाभाविक आहे. अमेरिकेंतून येणाऱ्या मालाची किंमत इंग्लंडनें त्या देशांत अल्प व्याजाच्या दरानें कर्ज काढून भरावी अशी सूचना हा व्यवहार सौकर्यानें व्हावा अशा हेतूनें करण्यांत आली आहे.

---

### आभार

*ह्या अंक प्रसिद्ध करण्यांत सहाय्य करणारांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. जाहिरातींसाठी जागा आगाऊ राखून ठेवण्याविषयीं विनंति करण्यांत आली होतीच. उशीरां हातीं आलेल्या किस्येक जाहिरातींस, पृष्ठें वाढवूनहि, जागा मिळूं शकली नाहीं ह्याबद्दल दिलगिरी वाटते. त्याबद्दल स्वतंत्र व्यक्तिशः खुलाशाचीं पत्रें पाठविण्यांत आलीं आहेत.*

—व्यवस्थापक

## इंग्लंडची परराष्ट्रांतली प्राप्ति घटली

आंतरराष्ट्रीय व्यापार मूलतः आणि व्यवहारतः मालाच्या ऐन जिनसी देण्या-घेण्याच्या स्वरूपाचा असतो. त्यांत आयात व निर्गत होणाऱ्या मालाच्या किंमतीची वजावाट होऊन बाकी निघाल्यास तिची भरपाई सोनें किंवा कर्जे ह्यांच्या मार्गानें होत असते. आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या आढाव्यांत ऐन जिनसी मालाशिवाय एका देशानें दुसऱ्याकरितां केलेल्या कामाचाहि अंतर्भाव होतो. ह्या अडचणींची घटना देशांच्या नैसर्गिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर अवलंबून राहते. उदाहरणार्थ, युद्धापूर्वी हिंदुस्थान ऋणको देश होता. त्यानें इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जाचें व्याज, ब्रिटिश नोकरांचीं पेन्शनें, ब्रिटिश व्यापारी व औद्योगिक मंडळ्यांचे नफे ह्यांची भरपाई प्रतिवर्षी करावी लागत असे, आणि ती मालाच्या निर्गतीच्या स्वरूपांत होत असे. ह्या देशाच्या निर्गत व्यापाराची किंमत आयात व्यापाराच्या किंमती-पेक्षा अधिक असे आणि ह्या फरकांतून परराष्ट्रीय देणें भागवलें जाई. परराष्ट्रांतून येणाऱ्या मालाचा मोबदला त्याच्या किंमतीचा माल निर्गत करून द्यावा लागून अदृश्य देणीं चुकतीं होण्यास त्यांच्या किंमतीचा आणखी माल धनको राष्ट्रांकडे पाठवला जात असे. ही स्थिति आतां बदलली असून इंग्लंडलाच हिंदुस्थानचें देणें झालें आहे. लंडनमध्यें काढलेल्या हिंदी कर्जाची पूर्ण फेड होऊन तेथें साठलेल्या हिंदी शिलका हिंदु-स्थानला परत देण्याचा अवघड प्रश्न इंग्लंडपुढें उभा आहे.

ब्रिटिश लोकांनीं दुसऱ्या देशांस कर्जे दिलीं होतीं आणि त्यांमध्यें स्वतःचें भांडवल गुंतवलें होतें. तसेंच, त्यांचा बँकिंग, विमा व समुद्रावरील जहाजांची वहातुक ह्यांचेसंबंधांतील धंदा सर्व जगभर मोठ्या प्रमाणावर चालून त्यांतील फायद्याचें येणें मोठें निघत असे. ह्या सर्व बाबतींत दुसरे देश इंग्लंडचे ऋणको बनले होते आणि आपल्या देण्याची फेड ते ग्रेट ब्रिटनला आ-वश्यक असलेला कच्चा माल व खाद्य पदार्थ पाठवून करीत. इंग्लंडला लागणाऱ्या अन्नाचा पुरवठा ह्या रीतीनें मोठ्या प्रमाणांत बाहेरून होई आणि ब्रिटिश राष्ट्राच्या व्यापारी आढाव्यांत ह्या परदेशीय येण्यास महत्त्वाचें स्थान असे. ही स्थिति आतां पालटली आहे आणि सदरहु येण्यांत मोठी घट होऊन स्वतःचें आर्थिक बस्तान नीट बसवण्यासाठी इंग्लंडला आपला निर्गत व्यापार वाढवून त्याच्या मोबदल्यांत आवश्यक मालाची आयात होण्याची तरतूद करणें प्राप्त झालें आहे. परराष्ट्रांच्या लंडनमधील स्टर्लिंग शिलकांचा निकाल लावण्याची निकड आणि अमेरिकन मालाच्या आयातीचें अगत्य व त्यासंबंधांत चाललेल्या प्रदीर्घ वाटाघाटी ह्या सर्व अडचणींच्या गोष्टी इंग्लंडच्या बदललेल्या आर्थिक घटनेचीं लक्षणें आहेत. इंग्लंडचें ५,००० कोटि रुपयांचें भांडवल पूर्वी परदेशांत गुंतलें होतें आणि त्याचें व्याज व फायदा मालाच्या आयातीच्या स्वरूपांत ब्रिटिशांच्या घरीं चालून येत असे. ही प्राप्ति आतां पुष्कळच घटली आहे आणि असल्या इतर देण्यांतहि घट झाली आहे. ह्या इंग्लंडच्या वार्षिक येण्याचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत, त्यांवरून नवीन परिस्थिती-वर प्रकाश पडण्यासारखा आहे.

**इंग्लंडची परराष्ट्रांतील प्राप्ति**

**( दशलक्ष पौंड )**

| प्राप्तीचा उगम | १९३७ | १९३८ | युद्धोत्तर स्थिति |
|---|---|---|---|
| गुंतविलेलें भांडवल | २१० | २०० | १०० |
| जहाजांची वहातुक | १३० | १०० | ७५ |
| व्याज व कमिशन | ४० | ३५ | २५ |
| इतर | १० | ... | २० |
| एकूण | ३९० | ३३५ | २२० |

परदेशांत मालाची निर्गत वाढवणें, साम्राज्यांतर्गत सवलतीच्या व्यापाराची व्यवस्था दृढ करणें इत्यादि उपायांनीं स्वतःची आंतर-राष्ट्रीय व राष्ट्रीय आर्थिक स्थिति सुधारण्याची धडपड इंग्लंड करीत आहे आणि त्याबाबतींत त्याची अमेरिकेशीं स्पर्धा होत आहे. ह्याचें वर्म वरील आकड्यांवरून सूचित होईल.

अत्यंत गुणकारी—
कामगार ब्राह्मी तेल
व
माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

एक हजार रुपये
दर वर्षी रुपये एकशें चाळीस प्रमाणें फक्त पांच वर्षे हप्ते देऊन, म्हणजे एकंदर रुपये सातशें फक्त भरून
एक हजार रुपये
रकमेचा विमा ( नफ्यासह ) घेतां येईल.
विमा हप्त्यादाखल भरलेल्या रकमेवर इनकम टॅक्स माफ होतो.
—तपशील मागवा—
दि ट्रस्ट ऑफ इंडिया
अश्युअरन्स कं. लि., पुणें.
अध्यक्षः—श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडीत
मॅनेजरः—व्ही. एच. देशमुख, बी. ए.
शाखाः—मुंबई, नागपूर, सोलापूर, बेळगांव इ.

## हिंदी व्यापाराच्या विस्तारास उत्कृष्ट संधि

### जपानव्यात बाजारपेठा हस्तगत करा

चाळीस वर्षांमागें रशियाचा पराभव करून पूर्व एशियांत आपलें आर्थिक व राजकीय वर्चस्व स्थापण्यास जपाननें प्रारंभ केला. आधुनिक पद्धतीचे कारखाने आणि व्यापार ह्यांचा विस्तार पाश्चात्य राष्ट्रांच्या धर्तीवर त्यानें केला आणि पूर्वेकडील इंग्लंड बनण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें मनांत धरली. पूर्व एशियांत शांतता रहावी ह्या हेतूनें इंग्लंडनें जपानशीं मित्रत्वाचे व्यापारी तह व करार केले, त्यांचा त्या देशानें आपले हातपाय पसरण्यासाठीं पूर्ण उपयोग करून घेतला. विविध प्रकारचा स्वस्त माल खपण्यास दरिद्री हिंदुस्थानांत पुष्कळ वाव आहे हें ओळखून जपाननें त्या तऱ्हेचे अनेक जिन्नस इकडे पाठवण्याचा क्रम आरंभला आणि जपानची स्पर्धा येथील बाजारांत जाणवूं लागली. हिंदुस्थानचा कापूस स्वदेशीं नेऊन त्याचें बनवलेलें कापड इकडे पाठवण्यांत आणि हिंदी गिरण्यांशीं स्पर्धा करण्यांत जपाननें वाढतें यश संपादलें. हिंदुस्थानांत आखुड धाग्याच्या कापसाची पैदास मोठ्या प्रमाणांत होते. तो पिकवणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन जपानच्या मुठींत गेलें. हिंदी कापसास येथील गिरण्यांत पुरी मागणी न आल्यानें आणि त्याचा उठाव हवा तसा इतरत्र न होऊं शकल्यानें तो जपानलाच विकणें प्राप्त झालें. तुमचा कापूस आम्ही घेतों, पण आमचें कापड तुम्हीं घेतलें पाहिजे असा पेंच जपाननें हिंदुस्थानास घातला. जपानी कापडाची स्पर्धा हिंदी गिरण्यांस नको होती, आणि आपला कापूस तर हिंदुस्थानास जपानमध्यें खपवणें अगत्याचें होतें. ह्या अडचणींमधून मार्ग काढण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें जपानशीं व्यापारी करार करून ह्या देशानें घ्यावयाचें जपानी कापड आणि जपाननें घ्यावयाचा हिंदी कापूस ह्यांचें परस्पर प्रमाण ठरवून टाकलें.

त्या कराराचा गैरवाजवी फायदा घेण्यास जपाननें मागें पुढें पाहिलें नाहीं. करारांत आयात व्हावयाच्या कापडाची लांबी नमूद होती, रुंदी ठरली नव्हती. तेव्हां त्याची रुंदी वाढवून कापडाच्या एकूण आयातींत भर घालण्यांत आली. कापडाचे तुकडे व तयार कपडे पाठवण्यांत येऊं लागले. कृत्रिम रेशमाचा करारांत उल्लेख नव्हता म्हणून त्याच्या कापडाची आयात अधिक होऊं लागली. जपानच्या वर्चस्वाखालील उत्तर चीनमधील गिरण्यांत तयार झालेलें कापडहि जपानकडून येऊं लागलें. नाना प्रकारांच्या इतर जपानी मालाचीहि आयात त्याचबरोबर होऊं लागून त्यांचे संबंधांतील येथील धंद्यांस स्पर्धा जाचक झाली. हिंदुस्थानची जपानला होणारी निर्गत मात्र कापूस, ताग, लोखंड अशा थोड्या जातींच्या मालास मर्यादित होऊन राहिली. येथून तीस लक्ष गाठी कापूस (बहुतेक आखूड धाग्याचा) परदेशीं जात असे त्यांतला निम्म्याच्यावर एकट्या जपानला निर्गत होई. इकडून त्या देशास जाणाऱ्या मालाच्या किंमतीपेक्षां त्या देशांतून येणाऱ्या मालाची किंमत क्रमाक्रमानें अधिक होऊन हिंदी कपाशीच्या पिकाचा किफायतशीरपणा सर्वस्वी जपानच्या मिन्हाईवर अवलंबून राहिला. हिंद-जपान व्यापाराच्या ओघांत हें परिवर्तन कसें घडून आलें ह्याची कल्पना पुढें दिलेले एतत्संबंधीं तुलनात्मक आकडे देतील.

**युद्धापूर्वीचा हिंद-जपान व्यापार**
**(कोटि रुपये)**

| वर्ष | जपानी मालाची आयात | हिंदी मालाची जपानला निर्गत | आयातपेक्षां निर्गत अधिक (+) निर्गत कमी (−) |
|---|---|---|---|
| १९३४–३५ | २०·८ | २४·५ | +३·७ |
| १९३५–३६ | २१·८ | २१·८ | +०·०५ |
| १९३६–३७ | २१·२ | ३०·० | +४·४ |
| १९३७–३८ | २२·१ | १८·१ | −४·० |
| १९३८–३९ | १५·४ | १४·५ | −०·८ |
| १९३९–४० | १९·२ | १४·१ | −५·१ |
| १९४०–४१ | २१·५ | ९·१ | −१२·३ |
| १९४१–४२ | ११·७ | ४·७ | −७·० |

जपाननें चीनशीं युद्ध चालू केल्यामुळें १९३७–३८ च्या नंतर त्या देशाचा माल इकडे कमी येऊं लागला. पण त्यापेक्षां फार मोठ्या प्रमाणांत हिंदी मालाची जपानला होणारी निर्गत घटली ही वरील आकड्यांवरून स्पष्ट होत असलेली गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे. ज्यांची किंमत प्रत्येकीं दहा लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे अशा ३४ प्रकारांच्या जिनसा जपानी मालाच्या आयातीचे यादींत दाखल होत्या. कापसाचें कापड, लोकरीचा माल, रेशीम, काच, चिनी मातीचें सामान, विजेची सामुग्री, मुलांचीं खेळणीं इत्यादि अनेक वस्तु जपान ह्या देशांत पाठवीत असे आणि त्यांची देशी मालाशीं तीव्र स्पर्धा होई. आतां त्या जपानी मालाची आयात बंद झाली आहे आणि त्या तऱ्हांचे जिन्नस हिंदुस्थानांत बनवण्याची सुसंधि प्राप्त झाली आहे. एवढेंच नव्हे तर पूर्व व पश्चिम एशियांतील अनेक देशांत जपानी माल कित्येक वर्षें पूर्वीप्रमाणें खपवला जाणार नाहीं आणि त्याची जागा हिंदुस्थानांत बनलेल्या मालास घेतां येण्यासारखी आहे. हिंदुस्थान सरकार आणि हिंदी कारखानदार व व्यापारी ह्यांनीं ह्या बाजारपेठांची पहाणी करून आपला माल जेथें जेथें खपवतां येईल तेथें तेथें तो पाठवण्याची व्यवस्था पद्धतशीर रीतीनें करणें अगत्याचें आहे. ह्या सर्व लहानमोठ्या देशांत आर्थिक पुनर्घटना होणें अपरिहार्य असून त्यांच्याशीं होणाऱ्या व्यापाराची घडी पुन्हां नीट बसवली जाईल. ह्या व्यवस्थेंत हिंदुस्थाननें आपला योग्य वाटा घेतला पाहिजे. कारण त्या कामींहि आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणें अपेक्षितच आहे आणि प्रत्येक राष्ट्रानें आपापल्या हिताची जोपासना करणें स्वाभाविक व इष्ट आहे. युद्धकाळांत हिंदुस्थानमध्यें कित्येक नवीन उद्योगधंदे निघाले आहेत, त्यांच्या मालासहि ह्या परराष्ट्रीय व्यापारांत कोणतें स्थान आहे ह्याचा निर्णय करून त्यासंबंधांत विधायक धोरण आखण्याची ही वेळ आहे. ह्या बाबतींत सरकार, धंदेवाले व व्यापारी ह्यांचें पूर्ण सहकार्य झाल्यावांचून मात्र इष्ट हेतु साध्य व्हावयाचा नाहीं.

### क्विनीनचा तुटवडा

मार्च, १९४३ अखेर हिंदुस्थान सरकारच्या जवळचा क्विनीनचा साठा १,८९,००० पौंड इतका होता, तो १९४४ मार्च अखेर १,७१,००० पौंड झाला. युद्धपूर्व काळांत ह्या देशांत प्रतिवर्षीं २,१०,००० पौंड इतकें क्विनीन खपत असे, आणि त्याचें येथील वार्षिक उत्पादन ९०,००० पौंड असे. क्विनीनचा तुटवडा भरून काढण्यासाठीं सरकारनें बंगाल व मद्रास प्रांतांत रशियन पद्धतीची सिंकोनाची लागवड चालू केली आणि तिनें लवकरच २,४०० एकरांचें क्षेत्र व्यापलें. आणखी १,१०० एकरांची भर त्यांत टाकण्यांत येत असून ह्या क्विनीनच्या उत्पादनाचें पहिलें फळ १९४६ सालाच्या अखेरीस हातीं येईल.

## हिंदी लोकांस अमेरिकन नागरिकत्वाची सवलत

### मनोरंजक मुद्दे

हिंदी लोकांस अमेरिकेंत राहून तेथील नागरिकत्व संपादन करण्यास बंदी आहे ती उठून विशिष्ट मर्यादेंत तें दार खुलें करण्याच्या हेतूनें पुढें आणलेल्या कायद्याचा मसुदा अमेरिकन हाऊस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हजमध्यें मंजूर झाला आहे. हिंदुस्थानची युद्धांतली वर्णनीय कामगिरी आणि ह्या देशाशीं व्यापार वाढवण्यांत होणारा अमेरिकेचा फायदा ह्या गोष्टी प्रस्तुत बदललेल्या मनोवृत्तीच्या व धोरणाच्या मुळाशीं आहेत. त्याचे पुरस्कर्ते आणि विरोधक ह्यांनीं केलेल्या भाषणांत आलेले मुद्दे मनोरंजक असल्यानें ते त्रोटक रीतीनें आम्ही येथें देत आहों :—

मि. एव्हेरेस्ट डिक्सन—हिंदुस्थानांत अमेरिकन व्यापार वाढविण्यास पुष्कळ वाव आहे. तो देश आज नाहीं उद्यां स्वतंत्र होणार आणि त्याची गि-हाइकी अमेरिकेस महत्त्वाची ठरेल.

मि. सॅम्युअल डिकस्टाइन—बिलास अमेरिकन सरकारचाच नव्हे तर ब्रिटिश सरकारचाहि पाठिंबा आहे.

मि. ॲडॉल्फ सॅबाथ—हिंदी लोकांस अमेरिकेंत कमीपणानें लेखण्यांत येत नाहीं ह्याचा पुरावा पुढें मांडण्यांत आपला फायदा आहे.

मि. मेसन—मार्शल स्टालिन एशियांत रशियाचें वर्चस्व स्थापूं पहात आहे. हिंदुस्थान व चीन ह्या देशांशीं व्यापार वाढवून अमेरिकेनें त्यास पायबंद घालणें आवश्यक आहे. कम्युनिस्ट हस्तक रशियाभर अमेरिकेचें वजन कमी करूं पहात आहेत. हिंदुस्थान व चीन देशांस यंत्रसामुग्री हवी आहे ती त्यांच्या मालाच्या मोबदल्यांत मोठ्या प्रमाणावर अमेरिकेस पुरवतां येईल, ह्या दृष्टीनें पहातां नवीन बिल अत्यंत उपयुक्त आहे.

मि. मॅकगॉवन—अमेरिकन नागरिकत्वाच्या रक्षणासाठीं घातलेल्या निर्बंधांची तटबंदी अभेद्य राहिली पाहिजे. नाहींतर परकीयांच्या पुरानें अमेरिका वाहून जाईल. जपानला दिलेल्या सहाय्याचें बक्षिस काय मिळालें ? पर्ल हार्बरवर हल्ला !

मिसेस क्लेअरबूथ लूस—हिंदुस्थानचें युद्धसहाय्य बाजूस ठेवलें तरी आणि स्टर्लिंग शिलकांची किल्ली इंग्लंडनें स्वतःच्या हातीं ठेवली असली तरी त्या देशाच्या व्यापारांत अमेरिकेस हिस्सा मिळेल. शिवाय वर्णभेदाचा आरोप रशिया केल्यावांचून रहाणार नाहीं. त्यास जागा देतां कामा नये.

मि. इमॅन्युअल सेलर—हिंदुस्थाननें वीस लक्ष सैन्य उभें केलें. प्रसंगीं तें दीड कोटीपर्यंत जाऊं शकलें असतें. इंग्लंडशीं व्यापारी करार अमेरिका करूं पहात आहे. प्रस्तुत बिल नामंजूर झाल्यास त्यासाठीं अनुकूल वातावरण निर्माण होणार नाहीं.

मि. फ्रेडरिक स्मिथ—श्री. जे. आर. डी. टाटा हे कम्युनिस्टांचे शिरोमणि आहेत. श्री. ए. डी. श्रॉफ व सर आर्देशीर दलाल त्याच वर्गांत आहेत. (त्यांच्या "मुंबई योजने"तले कांहीं उतारे वक्ते वाचून दाखवतात.)

मि. लिऑनार्ड ॲलन—इंग्लंडला हिंदुस्थानला सहाय्य यावयास नको आहे आणि अमेरिकेकडून परस्पर काम करून घ्यावयाचें आहे. आपणांस हिंदी व्यापार कांहीं मिळणार नाहीं. हिंदुस्थानास मी मदत देण्यास तयार आहे. त्यासाठीं अमेरिकेनें हिंदूंस बायबल शिकवण्याकरितां मिशनरी त्या देशास पाठवावे !

मि. चार्लस लॉ फॉलेट—मि. टाटासारख्या भांडवलवाल्यांस कम्युनिस्ट बनवणें हास्यास्पद आहे. बिलाविरुद्ध अप्रस्तुत विधानें करणें गैर आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

( सहकारी कायद्यान्वियें नोंदलेली )

स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग

९, बँक हाऊस लेन, कोट मुंबई.

शाखा ४९

खेळतें भांडवल

रु. ५,७५,००,०००

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. एल. मेहता

मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि मिरज स्टेट बँक लि.

**—मिरज—**

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. २,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें... | | रु. १,००,००० |
| प्रत्येक शेअरचे रु. २०० प्रमाणें वसूल झालेलें | ... | रु. २०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. २,५०,०००चे वर |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ६२,००,०००चे वर |

**डायरेक्टर्स**

१ रावसा. वि. पां. बेडेकर, बी. एस्सी. बी. ई. (चेअरमन)
२ डॉ. कृ. गो. गोसावी, एल्. सी. पी. एस्.
३ रावसा. वि. स. आपटे, बी. ए., एलएल्. बी.
४ श्री. गो. वि. सखदेव
५ श्री. ब. ग. आगाशे

**शाखा**

● लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
● मोडनिंब व कुर्डूवाडी ( जि. सोलापूर )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

के. डी. शिराळकर
मॅनेजर.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

| अधिकृत भाण्डवल | विक्रीस काढलेलें व खपलेलें |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |

वसूल झालेलें रु. १२,५०,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. २,७०,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,४०,००,००० चे वर

★ बँकेच्या शेअर्सवरील डिव्हिडंडमध्यें क्रमशः वाढ होत आहे.

★ गतवर्षी शें. ४½ + ½ टके डिव्हिडंड देण्यांत आलें.

—ःशाखाः—

डेक्कन जिमखाना, खडकी, गिरगांव, मुंबई ( फोर्ट ), जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, फैजपूर ( पे-ऑफिस )

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

# श्रीलक्ष्मी सॅ. को. बँक लि., फलटण

( स्थापना १–२–१९२६ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. २,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... ... | रु. १,४५,२५० |
| वसूल भांडवल | ... ... | रु. ६१,१७० |
| फंड | ... ... | रु. १,०६,३६२ |
| ठेवी | ... ... | रु. १७,३७,१५३ |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. १९,०४,६८२ |

ठेवी—चालू, सेव्हिंगज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

कर्ज—जोडलेल्या सहकारी पतपेढ्या व बँकेचे भागीदार यांना सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज, कॅशक्रेडिट, ओव्हरड्राफ्ट वगैरे मिळतो.

विमा—हप्ते वेस्टर्न इंडिया, नेपच्यून, एशियन व कॉमनवेल्थ या कंपन्यांचे स्वीकारण्यांत येतात.

इतर—सर्व प्रकारचे बँकांचे व्यवहार होतात.

● ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि., व सर्व स्थानिक संस्था यांची बँकर्स आहे.

**★ ही दिपवाळी ★**

बँकेच्या सर्व हितचिंतकांना भाग्याची व आनंदाची होवो.

| | |
|---|---|
| श्री. ह. तळवलकर मॅनेजर. | वि. शं. क्षिरपे बी. ए., एलएल्. बी., वकील, चेअरमन. |

फलटण, दि. १५।१०।४५



# दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कं. लि.

मतदानाचा हक्क बजावणें हें सूज्ञ नागरिकांचें आद्य कर्तव्य पण हें जरी खरें असलें तरी आपल्या प्रेमानेंच वाढणाऱ्या स्वतःच्या कुटुंबाच्या भावी संरक्षणाचा हक्क तितकाच किंबहुना आर्थिक महत्त्वाचा नाहीं काय? विम्याच्या रूपानें आपल्या प्रिय जनांची सोय करणें क्रमप्राप्तच आहे. त्यांत आपणांस विविध मार्गदर्शन करण्यास योजनांनीं युक्त अशी विमेदारांची व अल्पावधींत विमाक्षेत्रांत प्रसिद्धीस आलेली विमा संस्था आपल्या सेवेस तयार आहे.

८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २

व. न. म्हैसूर
एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

## सरकारी योजनांचें दुष्काळी स्वरूप

( लेखकः—प्रा. द. गो. कर्वे, एम्. ए. )

युद्धविषयक कामगिऱ्यांत गुंतलेले लाखों लोक आतां बेकार होत आहेत. त्यांना निदान कांहीं दिवस तरी रोजगार मिळावा म्याकरतां सरकार ज्या योजना आंखीत आहे त्यांचें आर्थिक-दृष्ट्या थोडें पृथक्करण करणें जरूर आहे. कोणीकडून तरी उपाशास रोजमुरा देणें किंवा बेकारास कामाला लावणें एवढ्या-पुरतेंच ह्या योजनांचें उद्दिष्ट असतां कामा नये. अशा तुटपुंज्या अगर घाईनें केलेल्या योजनांत पैशाचा अपव्यय मात्र होतो. शिवाय, जर ह्या योजनांमुळें सध्यांच्या भावानें परदेशी यंत्र-सामुग्री व माल आणण्याची सरकारला जरूर उत्पन्न होत असेल तर त्या योजनांचा वास्तविक फायदा येथील लोकांना होण्याऐवजीं विलायतेंतील कारखानदार व मजूर ह्यांसच व्हावयाचा. गेल्या महायुद्धानंतर असा अनुभव आपल्याला आलेला आहे, आणि आज राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत नसल्यानें पुन्हां दोन-तीन वर्षांच्या संक्रमण कालांत सरकारतर्फे भारी खर्चाच्या परंतु बिन-हिशेबी अनेक योजना लोकांच्या गळ्यांत पडण्याची भीति आहे.

तसेंच, पैसा खर्च करावयाचा तोही अशा तऱ्हेनें करावा कीं त्यापासून येथील उद्योगधंद्यांच्या कार्यक्षमतेंत कायमची भर पडावी. उदाहरणार्थ, आगगाड्यांची वाढ अगर अद्ययावत् यांत्रिक साधनें ह्यांचा व्यवहारांत प्रसार ही गोष्ट कितीही इष्ट असली तरी भांड-वलाचा खर्च होतो त्या मानानें किफायतशीरपणांत किंवा रोज-गारांत वाढ होत नाहीं. त्यापेक्षां कालवे आणि पाणीपुरवठ्याच्या इतर योजना ह्यांवर अधिक लक्ष्य दिल्यास शेतीच्या धंद्याचा कायमचा फायदा होण्यासारखा आहे. जी गोष्ट आगगाड्यांची तीच रस्त्यांची. सध्यांहून अधिक चांगले आणि अनेक रस्ते पाहि-जेत हें खरें, पण कोणते रस्ते करावे आणि ते कोणत्या प्रकारचे असावे हें ठरवितांना खर्च आणि किफायतशीर उपयोग ह्यांची सांगड घातली पाहिजे. शिवाय, देशाच्या प्रत्येक भागांत स्थानिक माल कोणता उपलब्ध आहे हेंहि पाहिलें पाहिजे. सीमेंट अगर डांबर ह्यांचा उपयोग ज्या भागांत करणें जरूर आहे तेथेंच तो केला पाहिजे. नाहींतर ह्या वस्तूंच्या व्यापाऱ्यांच्या भलावणीमुळें निष्कारण खर्चाच्या योजना अवलंबिल्या जाऊन स्थानिक धंदे-वाल्यांच्या पोटावर पाय येणार आहे.

बेकारी निवारणार्थ सरकार ज्या योजना अंगिकारणार त्यांचें स्वरूप खाजगी व हिशेबी योजनांस पूरक असावें; मारक ठरूं नये. शेतकी, कारखाने, वहातुक, बांधकाम इत्यादि क्षेत्रांत खाजगी धंदेवाल्यांपुढें ज्या योजना आहेत त्यांच्या मार्गांत अडथळा न आणतां, आणि जरूर तेथें त्यांस न्याय्य मदत करून देशाच्या नित्याच्या आर्थिक प्रगतीस सरकारनें हातभार लावला पाहिजे. तसें न करतां उलट नवें भांडवल उभारणें, परदेशांहून यंत्रसामुग्री व इतर साधनें आणविणें, वहातुक नेहमींसारखी अनियंत्रित करणें आणि करांचा बोजा आगामी आर्थिक परिस्थिति ध्यानांत घेऊन कमी करणें ह्या बाबतींत अवास्तव नियंत्रणाचें किंवा प्रति-कूल धोरण सरकारनें स्वीकारल्यास देशाच्या आर्थिक प्रगतीस अडथळा उत्पन्न होईल, एवढेंच नव्हे तर बेकारी निवारणाच्या दृष्टीनेंहि सरकारकडून पुरेशी कामगिरी होणार नाहीं.

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक प्रगति खात्याचे मंत्रि सर आर्दे-शीर दलाल ह्यांस खाजगी धंद्यांच्या अधिकांत अधिक विस्ताराचें धोरण मान्य आहे असें त्यांच्या अलीकडील भाषणांवरून दिसतें. परंतु त्यांनीच सहकारी फडणवीस व वहातुक मंत्री ह्यांचें त्यांस कितपत सहाय्य मिळतें तें भांडवलाची उभारणी, उत्पादन साध-नांची आयात व वहातुकीवरील निर्बंधांचा शेवट आणि करांमध्यें सवलती ह्या बाबतींत येत्या सहामाहींत कोणतें धोरण अंगिकारिलें जातें त्यावरून ठरणार आहे.


## The Bank of Kolhapur, Ltd., Kolhapur.

(Incorporated in Kolhapur, in 1926, the liability of the members being limited.)

Under the Patronage of and largely supported by the Government of H. H. the Chhatrapati Maharaja of Kolhapur.

| | |
|---|---|
| Capital Authorised ... | Rs. 10,06,500/- |
| Capital Issued and Subscribed... | Rs. 5,06,500/- |
| Capital Called and Paid up ... | Rs. 2,02,600/- |
| Reserve Fund ... | Rs. 2,85,000/- |
| Working Funds about ... | Rs. 200,00,000/- |

Head Office :—Kolhapur.

Branches : (1) Inchalkaranji (S. M. C.) (2) Jayasingpur (S. M. C.) (3) Malkapur (Kolhapur State) (4) Peth Vadagaon (Kolhapur State) (5) Kolhapur-Gujari Peth. (6) Kolhapur-Shahupuri Peth.

Current Deposit and Savings Bank Accounts opened, and Fixed Deposits received on terms which may be ascertained on application.

Cash Credits, Loans and Overdrafts :—The Bank grants accommodation against approved securities

Safe Deposit Vault at Kolhapur (H. O.). Rates on application. Banking business of every description transacted.

The present Share Capital is being increased as under:—

| | |
|---|---|
| Capital Authorised ... | Rs. 40,06,500/- |
| Capital Issued and Subscribed... | Rs. 20,06,500/- |
| Capital Called and Paid up ... | Rs. 10,03,250/- |

Permission of the Kolhapur Government and of the Central Government of India is being obtained for the issue of New Shares.

*Manager.*

## पैसे गुंतवण्यास योग्य स्थान व संधि

श्री. राजेसाहेब मिरज ज्युनिअर
यांचे आश्रयाखालील

## कृष्णा शुगर मिल्स लि.

किनूर, व्हाया कुडची एम. एस. एम.
स्थापना १९४१ इ.

**साखर उत्पादनाचें काम दोन वर्षां-पासून सुरू होऊन लौकरच डिस्टि-लरीचें कामही सुरू होईल.**

मुदतीच्या ठेवी खालील दरानें घेतल्या जातात

| १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें |
|---|---|---|
| द. द. ४ | द. द. ५ | द. द. ६ |

मॅनेजिंग एजंटस
विंचूरकर आणि कंपनी

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

हेड ऑफिसः—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें
मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

| | |
|---|---|
| अधिकृत विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ४,५८,६४० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ४५,००,००० |

बँकेनें गतवर्षीं करमाफ ४ टक्के डिव्हिडंड वाटलें आहे.

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष | श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष

दि कॉमनवेल्थ अॅश्युअरन्स कं. लि. पुणें, दि सुप्रीम म्युच्युअल अॅश्युअरन्स कं. लि. पुणें व हिंद बेनिफिट प्रॉव्हिडंट इन्शुरन्स सोसायटी लि. मुंबई.

या कंपन्यांचे हप्ते घेतले जातात.

मद्रास, सोलापूर, नगर, बेळगांव, अहमदाबाद, मिरज, सांगली, कोल्हापूर, हुबळी, धारवाड व मुंबई वगैरे ठिकाणीं ड्रॅफ्टस दिले जातात.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.) बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बँक ऑफ औंध लिमिटेड.

(औंध संस्थानांत नियमित जबाबदारीची म्हणून स्थापन झालेली)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २,५०,००० |
| खपलेले व भरणा झालेलें .. | रु. १,४०,७०० |
| खेळतें भांडवल ... | रु. १२,००,००० |

मुख्य कचेरी : औंध

—शाखा—

आटपाडी, विचूद आर. एस. | कुंडल, ओगलेवाडी

संचालक मंडळ

श्री. ना. रामप्पा बाळाप्पा बिद्री, बी. ए., एलएल. बी. पंतप्रधान, औंध संस्थान
श्रीमंत ना. युवराज बापूसाहेब पंत, चीफ सेक्रेटरी, औंध संस्थान
श्री. ना. सखाराम भिमण्णा शेटे, व्यापारी दिग्रंची
श्री. शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर, डे. जनरल मॅनेजर, मे. किर्लोस्कर बंधु, लि. किर्लोस्करवाडी
श्री. माधवदास रामदास देवी, व्यापारी औंध
श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर, औंध.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

ही दिपवाळी आमचे विमेदार, भागीदार, एजंट व हितचिंतक यांना सुखदायी व आनंदाची जावो.

# दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें शहर

चेअरमनः—प्रि. व्ही. के. जोग, एम्. ए. | सेक्रेटरीः— अ. ना. गाडगीळ

★

आपण दीर्घायुषी आहांत अशी आपली खात्री आहे ना? मग आमचे कंपनीची धनार्जन विमा पॉलिसी घेणें आपणांस निश्चित आवडेल.

हप्ता वार्षिक रु. ६०—१५ ते ७४—७ प्रमाणें फक्त २० वर्षे भरल्यास

रु. १००० पश्चात् व रु. ४५०० हयातींत मिळण्याची सोय

★

—लिहा अगर भेटा—

आर. जी. फाटक, ७२८ नारायण पेठ, पुणें शहर. | अ. ना. गाडगीळ, सेक्रेटरी.

# दिवाळी

## ही मानसिक समाधानाचें दृश्य प्रतीक असते

◆ मानसिक समाधान विवंचना दूर झाल्यानें मिळतें. कुटुंबाच्या भवितव्याची व उतार वयांतील अडचणीची काळजी ही प्रत्येक तरुणास असते. या अडचणीचें निवारण झालें म्हणजे कुटुंबांत दिपवाळीच्या आनंदाची प्रभा प्रज्वलित होते.

आपला विमा

## औंध म्युच्युअल

विमा कंपनींत उतरा व समाधानाचा प्रदीप पाजळा.

आमच्या विमेदारांस व हितचिंतकांस दिपवाळी सुखाची जावो.

मॅनेजिंग डायरेक्टर,
दि औंध म्युच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें २.

## " वैद्यराज, अगोदर आपली प्रकृति सुधारा "

### पाश्चात्य राष्ट्रांचा उपदेश व वागणूक

( लेखक:— श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम, )

जीं राष्ट्रें जेते म्हणून जर्मनी व जपान यांना वाहवलेले म्हणून त्यांच्या आचारविचारांत आमूलाग्र ' सुधारणा ' घडवून आणण्याकरितां बसलीं आहेत त्यांना स्वतःच्या आचारविचारांत प्रथम सुधारणा करा म्हणून बजावण्याची वेळ आलेली आहे. भयंकर संहारक अस्त्रांच्या दुर्मांत बाकीच्या जगास कावूंत ठेवण्याची या विजयी राष्ट्रांची मनीषा उघड करून दाखविण्याची जरूरी नाहीं. केवळ जर्मनीवर व जपानवर विजय मिळविला म्हणून आपण सर्वगुणश्रेष्ठ असें मानण्याकडे झालेली प्रवृत्ति भ्रममूलक आहे. नैतिक मूल्यें म्हणून कांहीं चीज आहे याचा इंग्लंडला काय इतर सर्व गोऱ्या राष्ट्रांना विसर पडलेला दिसतो. यावेळेस रस्किन-सारखा माणूस असता तर त्यानें सर्व संहारक अस्त्रें निर्माण करणाऱ्या बुद्धिमान् शास्त्रज्ञांना सडसडीत सांगितलें असतें कीं, बाबांनों, तुमची सर्व हुशारी फोल आहे, इतकेंच नव्हे तर या सर्व जगाच्या नाशास ती कारणीभूत होणार आहे. यापेक्षां तुम्हीं शोध लावले नसतेत तरी जगावर मोठे उपकार झाले असते. शास्त्रज्ञांची बाजू घेऊन एकादा म्हणेल कीं शोधांनीं काय केलें ? आमच्या शोधांचा दुरुपयोग करा म्हणून कांहीं आम्ही सांगत नाहीं. त्याला उत्तर असें कीं तुमचे शोध लागताहेत केव्हां आणि आम्हीं त्यांचा दुसऱ्यांचा निःपात करण्याकरितां उपयोग करतो केव्हां याला जणूं तुमचे राज्यकर्ते टपून बसलेले असतात आणि तुम्हीं राजकर्त्यांच्या हातांखालील बाहुलीं बनून बसतां. तुमची संस्कृति इतकी कच्ची आहे कीं, शस्त्रसंभाराच्या मदांत तुमच्यांत असलेली किरकोळ माणुसकी केव्हांच नष्ट होऊन गेलेली आहे.

### वासनांना गवसणी

तिसऱ्या महायुद्धाच्या तडाख्यांतून जगाला वांचवावयाचें असेल तर प्रथम या विजयी राष्ट्रांनीं स्वतःचे आर्थिक विचार बदलले पाहिजेत. आपल्या गरजा म्हणजे चोजले, जितके वाढवावे तितके चांगले व ते पुरविण्याकरतां नाना तऱ्हेच्या वस्तू उत्पन्न करावयाच्या, सगळ्या जगाला तीच शिकवणूक द्यावयाची व त्याप्रमाणें उपभोग वाढला म्हणजे जग कृतार्थ झालें अशी सांगणारी पाश्चात्य अर्थविचारसरणी खणून काढण्यांत आली पाहिजे. न जातु कामः कामानाम् उपभोगेन शाम्यति। हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते॥ ही आमच्या हिंदवी संस्कृतीची शिकवणूक पाश्चात्यांनीं अंगिकारली तरच त्यांना तरणोपाय आहे. ' अनियंत्रित अर्थव्यवस्था ', तिच्यानें घोटाळे उत्पन्न होतात म्हणून ' आर्थिक नियोजन ' व त्यानेंहि श्रीमंतींत राहणें जमत नाहीं म्हणून साम्राज्यें आणि तीं मिळवण्याकरतां भयंकर युद्धें अशी ही पाश्चात्य राष्ट्रांची अर्थ नव्हे, अनर्थ परंपरा आहे. अतएव आपल्या वासनांना गवसणी घालण्याचें शिक्षण जनतेला द्या, भौतिक शास्त्रांचा उपयोग करून उत्पादन वाढवा व संपत्तीचें योग्य वांटप करा, वेगवान वाहनांचा उपयोग सर्व तऱ्हेचा दुष्काळ नाहींसा करण्याकडे करा, जगांतील रोगराई, अज्ञान हीं हटविण्याकरितांच ज्ञानाचा उपयोग आहे हें बिंबवून घ्या, हिंदुस्थान व चीन यांच्या तत्त्वज्ञानाकडे लक्ष द्या व त्यांच्या आध्यात्मिक विचारास मान देऊन ते आत्मसात् करा आणि साधी राहणी पत्करा असें विनय बाजूस ठेऊन पाश्चात्यांस स्पष्टपणें सांगणें भाग आहे.




डोंगरे यांच्या बालामृताने
अशक्त मुले सशक्त होतात
मालक : के. टी. डोंगरे कं. मुंबई ४

ग्राइप टोन
दांत येतेवेळीं देण्याचें
उत्कृष्ट टॉनिक




श्रीधूतपापेश्वर पनवेल लि.
आद्य औषधी कारखाना.

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड
आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
——कारखान्याच्या वाढीसाठीं ठेवी घेणें आहेत——

बेकारीचा प्रश्न सोडवा
विमा कंपनीपेक्षां अभिनव योजना
सुशिक्षित स्त्री-पुरुषांसाठीं : फक्त ५०० रुपये भांडवल गुंतविणारे स्त्री, पुरुष पाहिजेत
द. म. १००/१५० रु. मिळवून देणारा एक नवीन उद्योग म्हणजेच
फडके प्रॉडक्टस् आणि रेडसन प्रॉडक्टस्‌ची एजन्सी घेणें
नवीन सुधारणा, नवीन सवलती, अखंड उद्योग वंशपरंपरेनें करा. नोकरीची जरूरी नाहीं. अर्ज पाठवा. आपल्या घरीं आपल्या गांवीं राहून उद्योग करा—
हरिभाऊ भंडारे
खाजाव डेपो, १४८८ शुक्रवार, पुणें

नोगीचें
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व स्ट्रॉबेरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.
—साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें.

विमा–काम–बक्षिसें
'सह्याद्रि' प्रतिनिधींसाठीं बक्षिसांची अपूर्व योजना !
'सह्याद्रि' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती ! !
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.
–शाखा–
काळभोर आणि कं., पुणें.
अधिक माहितीसाठीं
लिहा अगर भेटा.
गो. ग. सौंदणकर
मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## अल्प बचतीच्या उत्तेजनार्थ मोहीम

आपल्या नित्याच्या खर्चांत बचत करून संसारांतील नेहमींच्या नडीअडीच्या प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून तो पैसा सुरक्षित रीतीनें बाजूस काढून ठेवण्याचें महत्त्व मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या जनतेस विशेष आहे. पोस्टांतील व बँकांतील ठेवी, आयुर्विम्याचे हप्ते, सरकारी कर्जरोख्यांत गुंतवण, सहकारी पद्धतीनें घरें विकत घेण्याची व्यवस्था इत्यादि मार्ग बचतीच्या सांठवणुकीसाठी उपयोगांत आणले जातात. परंतु समाजांतील ज्यांस बचतीची सवय अत्यंत आवश्यक व उपयुक्त असते त्या वर्गास तिचें महत्त्व समजत नाहीं आणि जीवितांतल्या धोक्यांचे संबंधांत दूरदर्शीपणानें अगाऊ तरतूद करणें त्यांचे हातून घडत नाहीं. हा शिक्षणाचा आणि सवय लावण्याचा प्रश्न आहे आणि म्हणून सहकारी चळवळींत त्यावर विशेष कटाक्ष असतो. सामान्य जनतेस बचतीची सवय लावणें हा वस्तुतः सामाजिक प्रगतीच्या कार्याचा एक भाग समजण्यांत आला पाहिजे आणि त्याचें बाळकडू शाळांतून विद्यार्थ्यांस मिळालें पाहिजे.

### ढालींसाठी चढाओढ

बचतीचें आणि सरकारी कर्जरोख्यांतील तिच्या गुंतवणुकीचें अगत्य युद्धपरिस्थितींत तीव्रतेनें प्रत्ययास आलें. ह्या काळांत चलनाचा सारखा विस्तार होत गेला आणि अनेक लोकांच्या हातांत पूर्वीच्या मानानें अधिक पैसा खेळूं लागला. दुसऱ्या बाजूनें वस्तू दुर्मिळ झाल्या आणि भलत्या किंमती देऊन त्या विकत घेण्याची आवश्यकता व मोह ह्यांचा लोकांच्या मनावर पगडा बसला. चलनविस्तार आणि तज्जन्य महागाई ह्यांस आळा घालण्यासाठी लोकांच्या हातांत खेळणारा पैसा सरकारकडे परत जाण्याची आवश्यकता सहाजिकच उत्पन्न झाली. कर वाढवून आणि आपले कर्जरोखे खपवण्याचा प्रयत्न करून सरकारनें खेळतें चलन शोषून घेण्याचा प्रयत्न चालू ठेवला. इंग्लंडसारख्या देशांतहि बचतीच्या मोहिमा लोकांच्या पुढाऱ्यांनीं काढल्या आणि कोट्यवधि रुपये ह्या उपायानें सरकारी तिजोरीकडे खेचून घेतले. हिंदुस्थान सरकारासहि मध्यम व कनिष्ठ आर्थिक स्थितींतल्या लोकांमध्यें बचतीविषयीं प्रचार व प्रयत्न करण्याची आवश्यकता भासली आणि त्यानें ह्यासंबंधांत मोहीम चालू केली. उत्तेजनार्थ चढाओढ लावून जेथें बचत अधिक यशस्वी होईल, त्या विभागास ढाली नजर करण्याची योजना सरकारनें अमलांत आणली. १९४४-४५ सालांत दरमाणशीं मासिक बचतीची अधिकांत-अधिक सरासरीची रकम ज्या प्रांतांत किंवा संस्थानांत बचत केली जाईल त्या टापूच्या नांवानें सोन्याच्या ढाली बक्षिसार्थ व्हाइसरॉयांनीं देऊं केल्या आणि त्या प्रत्यक्ष अर्पण करण्याचा समारंभ गेल्या ऑगस्टमध्यें दिल्लींत व्हाइसरॉइज हाउसमध्यें लॉर्ड वेव्हल ह्यांचे हस्तें झाला.

### मासिक सरासरी बचत

सरासरीच्या मासिक बचतीची दरमाणशीं रकम साडेतीन आणे निश्चित करण्यांत आली होती. ह्या हिशेबानें जिंकलेली ढाल दिल्ली प्रांताच्या वाट्यास आली. त्याच्या सरासरीच्या बचतीचा आकडा दरमहा दरमाणशीं सुमारें १४ आणे म्हणजे ठरवलेल्या रकमेच्या चौपट भरला. त्या प्रांताच्या लोकसंख्येच्या मानानें निश्चित करण्यांत आलेल्या प्रमाणास धरून चोवीस लक्ष रुपये जमावयास हवे होते, पण सुमारें ९६ लक्ष प्रत्यक्ष गोळा झाले. ह्यामुळें अखिल भारतीय चढाओढींतली ढाल दिल्ली प्रांतानें मिळवली. मध्यवर्ती सरकाराच्या कारभाराखालील टापूंसाठी दुसरी ढाल होती, तीहि दिल्लीनेंच जिंकली. बंगलोर व राजकोट येथील क्षेत्रांचे बचतीचे आकडे दिल्लीच्या खालोखाल पडले आणि ते अनुक्रमानें १२·७ व ११·१ आणे असे होते. तिसरी ढाल केवळ संस्थानांचेसाठी होती आणि ती पोरबंदरला मिळाली. तेथील मासिक सरासरी ६·७ आणे होती. फरीदकोट व खैरपूर ह्यांचा नंबर त्याच्याखालीं लागला. चौथी ढाल केवळ प्रांतांच्यासाठी होती आणि त्यांच्या चढाओढींत सिंधनें ढाल जिंकली. सिंधच्या सरासरीची रकम २·९ आणे होती. त्याच्याखाली मुंबईची २·३ आणे व पंजाबची १·६ आणे होती. व्हाइसरॉयांच्या सोनेरी ढालीशिवाय हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनीं १९४४-४५ सालीं प्रत्येक महिन्यांत कोणत्याहि प्रांतांत किंवा संस्थानांत अधिकांत अधिक दरमाणशीं बचत करण्याबाबत एक चांदीची ढाल बक्षिस म्हणून लावली होती. ती दिल्ली प्रांतानें तीन वेळां मिळवली.

### उपदेशाचें "ताकापुरतें रामायण"

युद्धाच्या विशिष्ट परिस्थितींत बचतीची खास खटपट सामान्य जनतेंत करण्यांत आली. ही परिस्थिति आतां बदलल्यानंतर आपल्या लहानमोठ्या प्राप्तीचा कांहीं अंश बाजूस काढून पुढें येणाऱ्या गरजांस व अडचणींस तोंड देतां यावें म्हणून तो पैसा सुरक्षितपणें गुंतवण्याची सवय सामान्य स्थितींतल्या लोकांस कायमची लागण्याची व्यवस्था केली जाणें अगत्याचें आहे. "सामाजिक आपत्तींपासून बचावा"च्या (स्पेशल सिक्यूरिटी) योजनांचा विचार इंग्लंडमध्यें झाला आहे त्याच्या मुळाशीं सरकारी प्रोत्साहन व सहाय आहे. प्रसिद्ध बीव्हरिज योजना ह्याच हेतूनें तयार करण्यांत आली आहे. तिच्या कर्त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन ह्या देशांतील लोकांसाठी एखादी योजना आखण्याचे कामीं सल्ला द्यावा अशी सूचना करण्यांत आली होती. पण सर वुइल्यम बीव्हरिज ह्यांनीं आपणांस तसें करण्यास फुरसत होणार नाहीं असें कळवलें आहे. हिंदुस्थानच्या परिस्थितीस व गरजांस अनुसरून प्रस्तुत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न होणें इष्ट आहे ह्याविषयीं दुमत होण्याचें कारण नाहीं. युद्धकालीन बचतीचा उपदेश युद्धोत्तर काळांत विसरला जाऊन त्याचें ताकापुरतें रामायण होणार नाहीं अशी खबरदारी मात्र घेण्यांत आली पाहिजे.

पायोनियर डाईंग हाऊस, दातेवाडी, पुणें.
पक्क्या रंगाचीं कामें करून मिळतात.
रंगाची गॅरंटी हेंच आमचें ध्येय.
आमचे ग्राहकांस नवीन वर्ष सुखाचें जावो.

नूतन वर्षाभिनंदन

पुन्हां उत्साहित होण्यासाठी—



भारत संतोष भुवनाची सार्वत्रिक जनसेवा

भारत संतोष भुवन — बॉम्बे संतोष भुवन

भारत संतोष भुवन — संतोष बोर्डिंग लॉज

व्यवस्थापक :

—अरुरकर बंधु—

के. बी. रेळे काळी टूथ पावडर

# दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड.

स्थापना १९१७ — ३०-९-४५ अखेर

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल ... | ९८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... | १,०४,००० |
| ठेवी ... | १४,९६,००० |
| हातांतील व बँकेंतील शिल्लक | १,२४,००० |
| सरकारी कर्जरोख्यामध्यें ... | ९,००,००० |
| कर्जें ... | ६,५३,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर,
मॅनेजिंग डायरेक्टर

# आमचा ५५ वर्षांचा अनुभव व विशेषता !

- १—दुष्प्राप्य औषधांचा संग्रह करण्यासाठीं संगठन आणि सुलभ साधन.
- २—जटिल व कठीण जडीबुटी व वनौषधी कुटून, दळून, चूर्ण विचूर्ण करणाऱ्या आद्यतम सामूहिक गोठवण.
- ३—सर्वोपरि परीक्षा परीक्षोत्तीर्ण अनुभवी एवं वयोवृद्ध वैद्यराज आणि अन्य सुयोग्य दक्ष निरीक्षकांचें निरीक्षण व सिद्धहस्त कामगारांची सोय.
- ४—पेटेन्ट आणि आयुर्वेदिक औषधें प्रचुर प्रमाणांत तयार होण्यानें स्वस्त व गुणकारी तयार होणें.
- ५—आमचें प्राचीन व प्रतिष्ठित नांव व प्रत्येक औषधाची शास्त्रोक्त क्रियाशुद्ध श्रेष्ठ आणि विशुद्ध होण्याची पूर्ण गॅरंटी आहे.

—परीक्षा करण्यासाठीं कॅटलॉग फुकट मागवा—

# सुखसंचारक कंपनी लि., मथुरा.

सुखसंचारक बिल्डिंग : : : सुखसंचारक पोस्ट ऑफिस, मथुरा.

## शेअर बाजार

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.

सरकारी कागदः—१९४२ सालापासून 'अर्था' मधून ३॥ टक्का कागद ९३–९४ होता तेव्हांपासून भरून ठेवण्यासंबंधीं वारंवार शिफारस केली होती. २२ आक्टोबर १९४५ रोजीं या रोख्यांचा भाव १०३–३ पर्यंत चढलेला आहे. ब्रिटिश व हिंदी सरकारचें युद्धोत्तर धोरण पैसा स्वस्त राखण्याकडे रहाणार हें निश्चित आहे. बेकारी टाळण्याला याच्याखेरीज उपाय नाहीं. नवे २॥ टक्के रोखे सरकार १००–१ ला विकत असून नुकत्याच परत झालेल्या सुमारें ४० कोट रुपयांच्या १९४५–५५ च्या रोख्यांतून मोकळा झालेला पैसा बाजारांत आल्यानें त्यांना व इतर मुदतीच्या रोख्यांना मागणी चांगलीच आहे. या कारणांनीं ३॥ टक्का कागद अजूनही थोडा चढावयास वाव आहे असें म्हणण्यांत धोका वाटत नाहीं. न चढला तरी गुंतविणारांचें भाव घटण्यामुळें नुकसान होणार नाहीं असा विश्वास वाटतो.

टाटा स्टीलः—व्याज बाद झाल्यापासून टाटा शेअर वर चढून तारीख २२ आक्टोबरला २३२१—४ आणे व ४२५ —८ आणे असे डिफर्ड व ऑर्डिनरी अनुक्रमें बंद राहिले होते. हे शेअर खरीदणें निश्चित धोक्याचें असून सटोडियांनीं तेजी तेजी म्हणून कितीहि रान उठविलें तरी ते घेण्याच्या फंदांत न पडणें श्रेयस्कर. ऑर्डिनरी ४०० च्या आसपास घ्यावयास ठीक आहेत. तसेंच डिफर्ड २१५० ला वाईट नाहींत. कंपनीच्या भांडवल वाढीच्या योजना अस्तित्वांत यावयास अजून नक्कीच कालावधि लागेल. तोवर नुसत्या आशेवर आज घेणारांची फसगत होईल असें वाटतें. बेंगाल स्टील कंपनीच्या उत्पादनांत १९४६ पर्यंत शंभर टक्के वाढ होणार असल्यानें घेण्यास खरोखरीच चांगले वाटतात. पुढें व्याजही वाढणें खात्रीनें शक्य आहे, म्हणून तो ३३।८ पर्यंत घ्यायला हरकत नाहीं. मात्र चालू भावावर चालू व्याज अगदींच बेताचें सुटेल. इंडियन आयर्न यंदाच्या तुटपुंज्या व्याजामुळें ४१ च्या भावांत टाकाऊ आहेत.

गिरण्याः—यंदा सरसकट गिरण्यांचीं व्याजें १९४२ च्या मानानें सरासरी ४०।५० टक्के खालीं आलीं आहेत. हीं पुढील ३।४ वर्षें कायम रहाण्यासारखीं आहेत. तेव्हां चालू भाव पुरेपूर वाटतात. १५ रु. व्याजाला नागपूर ३९५, गोकाक ३०५, उस्मानशाही ३३०, सिंप्लेक्स १४ रु. ला २९५ व १२ रु. ला बार्किंगहॅम ३६३ यांत तुलना करून कोणाचे भाव किती वर खाली यावेत हें पहाण्यासारखें आहे. चांगल्या गिरण्यांच्या भावावर ४॥ टक्के व्याज सुटत असेल तरच त्यांना हात लावणें बरें. नाहींतर थोडीफार भांडवली घट सोसावी लागेल. बहुतेक प्रसिद्ध गिरण्यांची ताळेबंदी मजबुती विशेष आहे त्यामुळें गुंतविणारांनीं लक्ष ठेऊन नेहमीचे प्रमुख शेअर जरूर उचलावेत. उत्तम व्यवस्था असलेले विष्णुसारखे शेअर कां हालत नाहींत याचें कारण गुंतविणारे बाहेर काढण्यास नाखूष असतात हें होय. या दृष्टीनें म्हैसूर व मिनर्व्हा लक्ष देण्याजोगे आहेत.

बँकाः—सरकारी रोख्यांच्या मजबुतीनें बँक शेअर्स सुद्धां टिकून राहतील. ते खालीं येण्याचा संभव विशेष वाटत नाहीं. बडोदा बँक वाढावयास हवा. नव्या युनायटेड कमर्शिअल संबंधानें 'अर्थां'त सुरवातीसच शिफारस केली होती. त्यावेळेस घेतलेल्यांना ७०।७२ भाव पडून बँकेनें भांडवल वाढवितांना तितकेच शेअर ५० ला दिले. सरासरी ६२-६५ पडली. आज यांचा भाव ८० पर्यंत आहे. हा शेअर घेऊन तिजोरींत भरून ठेवलाच पाहिजे. पुत्रपौत्र धन्यवाद देतील. रिझर्व्ह बँक मात्र ५ टक्क्यापेक्षां जास्त मिळेल या कल्पनेनें १५२ ला घेणें म्हणजे श्रीमंतीचें प्रदर्शनच होय.

विमाः—सट्टयाच्या भावांत कोठलाही विमा कंपनीचा शेअर मुळींच आकर्षक वाटत नाहीं. मर्कंटाईल ६० ला वाईट नाहीं.

इतरः—बेलापूरला उसापेक्षां धान्याकडे सरकारी सक्तीनें लक्ष देणें भाग पडल्यानें मंद दिवस आले आहेत. कंपनी ९ रु. व्याज देऊं शकेल किंवा नाहीं शंका वाटते. पण विकून टाकणें योग्य वाटत नाहीं. सिमेंट २१०-११ ला चांगला आहे. शिंयाची नुकतीच प्रसिद्ध झालेली माहिती कंपनी बरीच सुधारली असें दाखविते. पण ११ रु. व्याजाच्या मानानें सरकार सवतीसारखी वागवणूक देत असल्यानें युद्धोत्तर परदेशी कंपनीच्या चढाओढीखाली यांचा काय टिकाव लागेल या विचारानें शिंया ३७-३८ ला घेण्यासारखा नाहीं. केव्हां ना केव्हां बराच खाली यावा. टाटा ऑईलची परिस्थिति उत्तम आहे. कंपनी ३॥, ३॥ व्याज कायम राखील असें दिसतें. तेव्हां ७० ला हा शेअर चांगला वाटतो.

---


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें

### नोटीस

आमच्या बँकेंत कारकुनांच्या कांहीं नवीन जागा निर्माण करण्यांत आल्या असून त्या तावडतोब भरावयाच्या आहेत. तरी लायक उमेदवारांनीं अर्ज सत्वर पाठवावेत. उमेदवार निदान मॅट्रिक परीक्षा पास झालेले व हस्ताक्षर उत्तम असलेले पाहिजेत.

पुणें शहर — द. वि. चितळे,

ता. २५।१०।४५ — मॅनेजिंग डायरेक्टर.

★ पुण्यांतील सर्वांत जुनें व प्रख्यात ★

## पाटसकर यांचें कापडाचें व शिलाईचें दुकान

१ सरकारी मान्यतेचेः—दि डेक्कन क्लॉथ स्टोअर्स, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

—: ब्रँचेस :—

२ सरकारी मान्यतेचेः—दि न्यू पूना क्लॉथ स्टोअर्स, पुणें स्टेशनजवळ.

३ पाटसकर आणि कंपनी, बुधवार चौक, ४ पाटसकर आणि कंपनी, कुंटे चौक, हुजूरपागा बिल्डिंग.

या सर्व दुकानांमधून कोटिंग, शर्टिंग, त्याचप्रमाणें लुगडीं, खण, पातळें वगैरे सर्व प्रकारचें कापड मिळतें आणि शिलाई काम केलें जातें.

## यशाची गुरुकिल्ली

कोणत्याहि धंद्यांत यशस्वी होण्यासाठीं सतत व दीर्घकालपर्यन्त शारीरिक व मानसिक श्रम भरपूर करणें भागच असतें. असे श्रम करण्याला शरीर व मन निरोगी व कार्यक्षम ठेवलीं पाहिजेत. हिंदुस्थानसारख्या अतिशय उष्ण व लवकर थकवा आणणाऱ्या हवेंत प्रकृति नेहेमीं निरोगी, बुद्धि तीक्ष्ण, मेंदू शांत व तरतरीत राखण्याचा अनुभाविक उपाय

## पर्ल काढा

असा पुष्कळ धंदेवाइकांचा अनुभव आहे. शीतल, शक्तिवर्धक, शारीरिक व मानसिक आरोग्यदायक पर्लकाढा सर्व केमिस्टकडे मिळतो.

आपण वापरूनच खात्री करा.

—आनंदाचा—

## विमा उतरा!

दिवाळीचा आनंद दिवाळीबरोबरच संपून जातो हा नेहमींचा अनुभव आहे. तो आनंद पुढें टिकवितां येईल काय? दिवाळीच्या आनंदाचा संस्कार चित्तावर स्थिर राहावा, आणि त्याचा आस्वाद जीवनांत पुढें वेळोवेळीं घेण्यांत यावा असें वाटत असेल तर या दिवाळींत आमची पॉलिसी घ्या. यामुळें एक प्रकारें दिवाळीच्या आनंदाचाच विमा उतरल्यासारखें होणार आहे.

—विशेष माहितीसाठीं भेटा अथवा लिहा—

पुणें शाखा : १७९ बुधवार लक्ष्मीरस्ता, पुणें २.

मॅनेजर वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कं. लि. सातारा

दिवाळीकरितां खास पेढे वापरा

## तुळजाराम मोदी

मोतीचौक सातारा

आमचे ग्राहकांस नवीन वर्ष आनंदाचें जावो.

कुटुंबासह मुंबईस आल्यानंतर प्रथम चौकशी करा.

## माधवाश्रम

रेल्वे, ट्राम व चौपाटीपासून अगदींच नजीक.

माधवाश्रम बिल्डिंग ★ गिरगांव, मुंबई.

## कायद्याचे निवडक निवाडे

लेखकः—श्री. सदाशिव वामन दातार, बी. एससी., एलएल. बी.

### (१) जोड नांवावरील ठेवी

एखाद्या हिंदु गृहस्थानें आपल्या व आपल्या बायकोच्या नांवावर रकमा ठेवल्या व अशी व्यवस्था मान्य करून ठेविली कीं, त्यांच्यापैकीं कोणाहि एकाचे पश्चात् मागें हयात असलेल्या व्यक्तीस सदर रकमा याव्या तर सदर गृहस्थाचे मरणोत्तर या रकमा त्याच्या बायकोस देणगी (Gift) या स्वरूपांत मिळतात काय? असा प्रश्न प्रिव्ही कौन्सिलपुढील शंभूनाथ शिवपुरी विरुद्ध पुष्करनाथ वगैरे इसम या दाव्यांत उपस्थित झाला होता. न्यायमूर्तींचा निर्णय असा दिला गेला कीं, देणगी या स्वरूपांत अशा रकमा मयताचे पत्नीस मिळत नाहींत. या रकमांना मयताचे हितसंबंधांचा ट्रस्ट ( Resulting Trust in favour of the Deceased ) असें स्वरूप येतें. पत्नीस या रकमा कायम देणगीच्या स्वरूपांत मिळण्यासाठी अधिक निःसंदिग्ध आदेश दिले जाणें आवश्यक आहेत. हिंदूंच्या बाबतींत संयुक्त नांवावरील सवच मिळकतींना हा नियम लागू आहे. मग ज्या व्यक्तींच्या संयुक्त नांवावर सदर मिळकती असतील त्यांच्यांतील नातें पतिपत्नींचें असो, वा पितापुत्रांचें असो, अथवा इतर अन्य कोणतेंहि असो.

### (२) डिबेंचर्सची दुहेरी नोंदणी

एखाद्या कंपनीच्या स्थावर मिळकतीच्या तारणावरील डिबेंचर्स कंपनी-कायद्याप्रमाणें नोंदविलीं असतां त्याशिवाय भरीला तीं रजिस्ट्रेशनच्या कायद्याखालींहि नोंदणें आवश्यक असतें काय? असा प्रश्न के. रॉय अॅन्ड ब्रदर्स विरुद्ध रामनाथ दास या कलकत्ता हायकोर्टातील दाव्यांत निघाला होता.

दि ईस्ट बेंगाल शुगर मिल्स लि. या कंपनीच्या साखर कारखान्याचे बांधकामाचे मक्ते के. रॉय ब्रदर्स यांनीं घेतले होते. त्याचे पैसे त्यांस दिले न गेल्याकारणानें त्यांनीं एक लवादनिवाडा करून घेतला. पुढें कंपनीनें डिबेंचर्स काढून परदेशांतून यंत्रसामुग्री आणली. हीं डिबेंचर्स कंपनी कायद्याप्रमाणें नोंदविण्यांत आलीं होतीं, परंतु नोंदणी कायद्याप्रमाणें मात्र नोंदविलीं नव्हतीं. पुढें कंपनीचें काम संपुष्टांत ( Liquidation ) आलें. परंतु डिबेंचर्स होल्डर्सनीं आपला रिसीव्हरहि नेमिला नाहीं आणि कंपनीची मिळकतहि ताब्यांत घेतली नाहीं. त्या मिळकतीचा ताबा लिक्विडेटरनें घेतला व स्थावर-जंगम मिळकत दुसऱ्या एका कंपनीस विकून टाकली.

कंपनीचे डिबेंचर्स होल्डर्स जमा झालेल्या पैशावर प्रथम हक्क सांगू लागले. परंतु 'डिबेंचर्स नोंदणी कायद्याप्रमाणें नोंदविलेलीं नाहींत' ह्या मुद्यावर लिक्विडेटरनें त्यांचा हक्क अमान्य केला.

खालच्या कोर्टांत डिबेंचर्स-होल्डर्सचे बाजूनें निर्णय दिला गेला तेव्हां हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें. हायकोर्टानें डिबेंचर्स दोन्ही कायद्यांप्रमाणें नोंदविलीं जाणें आवश्यक आहेत असा निर्णय दिला.

### (३) कंपनी कायद्याखालील निर्णय व कोर्ट-फी

कंपनी कायद्याखाली जे निर्णय दिले जातात व ज्यांचेवरून कांहीं रकमा वसूल करण्याचे अधिकार प्राप्त होतात ते निकाल मागण्यासाठी करावयाचे अर्जांना कंपनी कायद्याप्रमाणें ठराविक फी भरावी कीं कोर्ट फीचे कायद्याप्रमाणें मागणी रकमेच्या आंकड्याप्रमाणें कमीअधिक ( Advalorem ) फी भरावी असा प्रश्न लाहोर हायकोर्टापुढील ऑफिशियल लिक्विडेटर, युनिव्हर्सल बँक विरुद्ध कुरेशी या प्रकरणांत निघाला होता.

युनिव्हर्सल बँक संपुष्टांत आल्यावर नेमल्या गेलेल्या ऑफिशिअल लिक्विडेटरनें कॉन्ट्रिब्यूटर्सची याद तयार करून ती मान्य करण्याचा अर्ज कोर्टाकडे ५ रुपयांच्या कोर्ट फीचें तिकीट लावून सादर केला. ती याद कोर्टानें मान्य केली व तींत श्री. कुरेशी यांचें नांव होतें. श्री. कुरेशी यांनीं याद दुरुस्त करून आपलें नांव यादींतून काढण्याचा हुकूम झाला व त्यांना २५० रुपये नुकसानभरपाई मिळाली. परंतु खालच्या कोर्टाच्या या निर्णयावर ऑफिशियल लिक्विडेटरकडून अपील करण्यांत आलें. त्यालाहि ५ रुपयांचें तिकीट लावण्यांत आलें होतें.

श्री. कुरेशी यांचे बाजूनें असा प्राथमिक मुद्दा उपस्थित करण्यांत आला होता कीं, श्री. कुरेशी यांचेविरुद्ध मागण्यांत यावयाची रक्कम २७०० रुपयांची आहे. जर अपिलाचा निकाल श्री. कुरेशी यांचेविरुद्ध लागेल तर त्यांचेविरुद्ध एवढ्या रकमेचा हुकूमनामा होईल. तेव्हां जेवढ्या रकमेची मागणी असेल तेवढ्या रकमेवरून ठरेल ती फी कोर्ट–फी कायद्याप्रमाणें भरल्याशिवाय अपील चालणार नाहीं.

हायकोर्टानें श्री. कुरेशी यांचें म्हणणें अमान्य केलें व कंपनी कायद्याप्रमाणें देण्यांत येणाऱ्या अशा निर्णयांना जरी दिवाणी कोर्टाच्या हुकूमनाम्याचें स्वरूप असलें व त्या हुकूमनाम्याची बजावणी जरी दिवाणी कोर्टाकडून होत असली तरी असे निर्णय कंपनी कायद्यांतील खास तरतुदी ( Special Provisions ) प्रमाणें दिले जातात तेव्हां त्या तरतुदीसाठी सदर कायद्यानें जी व्यवस्था ठरविली असेल तीच स्वीकारली गेली पाहिजे. कोर्ट फीचा फायदा त्यांना लागू नाहीं. असा निःसंदिग्ध निर्णय कोर्टानें दिला.


दि व्हलकन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

विनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—


भायखळा पुल, नं. २७ मुंबई.

पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,

पो० कराड, जि. सातारा.



## दि बँक ऑफ सिटिझन्स लि० बेळगांव.

( स्थापना : १९३७ )

★ मजबुती, शहाजोगपणा आणि सेवा ह्यांबाबत ★

**८ वर्षांची उत्कृष्ट प्रगति**

—जून अखेरच्या प्रगतीचा आढावा—

—आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | २,४१,७०० रु. |
| खेळतें भांडवल | ३७,००,००० रु. पेक्षां अधिक |
| ठेवी | ३१,६१,१०१ रु. |
| निवळ नफा ( ३०-६-४५ ) | ३५,६१३ रु. |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरीः-१५१४, मारुतीगल्ली, बेळगांव

शाखाः— अळणांवर, बैलहोंगळ, चिक्कोडी, धारवाड, हल्ल्याळ, हुबळी, खानापूर, नंदगड, निपाणी

**जी. डी. सराफ,**
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर.

—स्थापना १९१८—

हेड ऑफिसः—सोलापूर

—: शाखा :—

कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा, मोहोळ सेल शॉप

—चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. एच. व्ही. केळकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सोलापूर

—भांडवल—

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १,५०,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... | रु. १,३४,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस ... ... | रु. १,४४,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... ... | रु. १२,००,००० |
| सन १९४४-४५ चा नफा ... ... | रु. १८,४५६ |

मंजूर झालेलें डिव्हिडंड चार टक्के

हेड ऑफिसांत व शाखा ऑफिसांत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात. ठेवींचे दराबाबत व नियमाबाबत समक्ष ऑफिसांत चौकशी करावी अथवा अर्ज करून नियम मागवावेत.

**सी. एस. परांजपे**
मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें शहर

शाखा—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर-रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक ).

*चेअरमनः—श्री. के. व्ही. केळकर,* M. A., LL. B.

*व्हाइस चेअरमनः—श्री. वी. वी. साळवेकर,* M. L. A.

**एकूण खेळतें भांडवल रु. ३५ लाखांचेवर**

—: व्याजाचे दर :—

करंट ½ टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २½ टक्के.
कायम ठेवी २¾ ते ४½ टक्केपर्यंत ( मुदत ६ महिने ते ५ वर्षें )

शेअर विक्री चालू आहे.

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअरवर ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें.
- सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
- शॉर्ट टर्म डिपॉझिट्स स्वीकारली जातात.
- मुंबई, नगर, नाशिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्ट्स दिले जातात.

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नी. ना क्षीरसागर,
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक
म्हणजेच

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

स्थापना सन १९१०

हेड ऑफिसः—नगर शहर

—शाखा—

१ संगमनेर ( जि. नगर ), २ भिंगार ( ता. नगर )

**भांडवल**

| | |
|---|---|
| अधिकृत व काढलेलें भांडवल... | रु. २,००,००० |
| भरलेलें भांडवल ... | रु. १,५६,४१० |
| खेळतें भांडवल ... | रु. ४३,६२,०७५ |
| चालू ठेवी ... | रु. २७,८२,३०० |
| मुदत ठेवी ... | रु. ६,३४,६०० |
| सेव्हिंग्ज ठेवी ... | रु. ४,४९,४८७ |
| रिझर्व्ह फंड ... | रु. १,७१,१०८ |
| इतर फंड ... | रु. १,५४,४७० |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज, चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जे दिली जातात. तसेंच चेक, हुंडी वगैरेचा सर्व व्यवहार केला जातो.

जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

नगर,
तारीख २३-१०-४५

व्यं. श्री. चिंचोरकर
चेअरमन

यकृत ( Liver ) विकारांवर अप्रतिम गुणकारी

नगरचें **लिव्हरटोन** वापरा

तयार करणार—दि नगर फार्मास्युटिकल वर्क्स लि., अहमदनगर.

## दि नेपच्यून ॲशुअरन्स कं. लि., मुंबई

आयुष्य, आग व मोटार ह्यांच्या विम्याचें काम करणाऱ्या ह्या जुन्या व प्रमुख कंपनींतच विमा उतरा.

—:विश्वासू एजंट पाहिजेत:—

पु. ग. मराठे, चीफ एजंट, महाराष्ट्र ब्रँच
ना. स. मराठे, मॅनेजर, महाराष्ट्र ब्रँच

न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें.

[ कृषि आणि दुग्धव्यवसायामध्यें अपूर्व क्रांति ]

## डेक्कन ॲग्रिकल्चर ॲंड डेअरी फार्मिंग लिमिटेड, पुणें

( इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३ अन्वयें नोंदलेली )

कंपनीचीं वैशिष्टयें:—

(१) दुग्ध आणि तज्जन्य पदार्थांचा माफक भावांत भरपूर पुरवठा करणें.

(२) भाजीपाल्यांची आणि फळांची मोठ्या प्रमाणावर लागवड करून त्यांचा कंपनीचे आश्रयदात्यांस अत्यंत माफक भावांत दुधाच्या रतीबाप्रमाणें घरपोंच पुरवठा करणें.

(३) अव्वल जातींच्या दुभाळ आणि शेतीस उपयोगी पडणाऱ्या जनावरांची निपज करणें.

—मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील—

व्याजाचे दर

१ वर्ष : ५ टक्के, २ वर्षें : ५½ टक्के, ३ वर्षें : ६ टक्के.

अधीक माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मॅनेजिंग एजंट्स
( पी. के. ॲन्ड को. )
रा. नरहर गणपतराव पवार, बी. ए., बी. ई.
रा. दिगंबर वामन कुलकर्णी, बी. ए.

पत्ता:—११६ ए, शुक्रवार पेठ, पुणें २. अगर न्यू प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कं. लि., ४६ सरस्वति विलास, लक्ष्मी रोड, पुणें २.

आशापकर
टेलरिंग कॉलेज
दादर, मुंबई १४.
माहिती मोफत मागवा

## डब्ल्यू. आर. तळवलकर

लॅटिन चेंबर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

फोन ३०३६७ ] ग्रॅम [ PUMPENAMEL

—विक्रेते—

मे. किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी.
मे. ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी.
म्हैसूर ग्लास ॲण्ड इनॅमल वर्क्स लि.
त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि.
बॉंबे टिन प्रिंटर्स, मुंबई.
ओरिएंटल मेटल ॲण्ड प्रेसिंग वर्क्स, मुंबई.
"प्लेमेट" पुणें.

श्री

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

१८० सदाशिव पेठ, पुणें

## संचालक मंडळ

१ श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
पुणें, ( चेअरमन )

२ डॉ. वि. दा. फाटक,
एल. आर. सी. पी., एम. आर. सी. एस., लोणंद

३ दि. ब. नि. चिं. लिमये,
ॲडव्होकेट व सरकारी वकील, सोलापूर

४ डॉ. र. ग. ठकार,
एल. एम. ॲन्ड एस., पुणें २

५ श्री. अण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख
जमीनदार व व्यापारी, पुणें २

६ श्री. म. रा. तांबे,
बी.ए., एल.सी.ई., रि. चीफ अकौंटंट, बॉंबे कॉर्पो. दादर

७ श्री. रा. बा. भट,
पुणें ४

८ रा. ब. भा. ल. मोडक,
एम. सी. ई., एम. इन्स्ट. सी. ई.,
आय. एस. ई. ( रि. ), पुणें ४

९ श्रीमंत ग. वि. साळवेकर,
बी. ए., प्रो. सरदारगृह, मुंबई २

१० डॉ. रा. ह. भडकमकर,
एम. ए., एम. डी., पुणें ४

११ चंद्रशेखर गोविंद आगाशे,
पुणें २
( अधिकारपरत्वें )

**युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.**

**ही दिवाळी सिंडिकेटच्या भागीदारांस व ठेवीदारांस आनंदाची व भरभराटीची जावो.**

सी. जी. आगाशे आणि कं.
मॅनेजिंग एजंट्स.

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3344




# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १४ नोव्हेंबर, १९४५ अंक ४५

श्री———श्री———श्री———श्री———श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री———श्री———श्री———श्री———श्री

# विविध माहिती

### निवडणुकीसाठी पेट्रोल

येत्या निवडणुकीसाठी ज्यास्त पेट्रोल लागेल, त्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत आहे.

### डॉलर्स द्यावयास नकोत, म्हणून आगबोटींचा मार्ग बदलला

पनामा कालव्यांतून जाणाऱ्या आगबोटींना अमेरिकेस डॉलर्सच्या नाण्यांत पट्टी यात्री लागते, ती टाळण्यासाठी न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियाकडून येणाऱ्या आगबोटींनीं त्या कालव्यांतून येण्याचें टाळावें, अशी सूचना ब्रिटिश सरकारनें दिली आहे. न्यूझीलंडकडून येणाऱ्या आगबोटी ह्यापुढें केपहॉर्न मार्गें इंग्लंडकडे जातील. कांहीं प्रसंगीं त्यांस सुएझचा कालवाहि उपयोगांत आणतां येईल. ऑस्ट्रेलियाकडून येणाऱ्या, कोळशावर चालणाऱ्या आगबोटी केप ऑफ गुड होप मार्गें आणि तेलावर चालणाऱ्या आगबोटी सुएझ मार्गें प्रवास करतील. १९४० सालीं पनामा कालव्याचा उपयोग करणाऱ्या आगबोटींनीं एकूण २ कोटि, १२ लक्ष डॉलर्स पट्टी भरली, त्यापैकीं ब्रिटिश आगबोटींनीं ५० लक्ष व अमेरिकन आगबोटींनीं ७५ लक्ष डॉलर्स दिले. त्यावर्षी १०७३ ब्रिटिश आगबोटी त्या कालव्यांतून गेल्या.

### ब्रिटिश कोळसा बाजारपेठेस मुकणार

ब्रिटिश कोळशाची निर्गत फारच रोडावली आहे. वेल्समधील कोळसा युद्धापूर्वी मोठ्या प्रमाणावर युरोपकडे जात असे. आतां अमेरिकेनें ती बाजारपेठ मिळविली आहे. हिवाळ्यांत अमेरिका ६० लक्ष टन कोळसा युरोपांत पाठविणार आहे. त्यापैकीं फ्रान्स दरमहा ४ लक्ष टन व इटली ३ लक्ष टन कोळसा घेईल. वेल्समधील हीं पूर्वीचीं मोठीं गिऱ्हाइकें एकदां अमेरिकेनें मिळविलीं म्हणजे तीं पुन: ग्रेट-ब्रिटनला परत कशीं मिळणार?

### कूपर इंजिनिअरिंग लि.

मेसर्स वालचंद आणि कं. लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीनें गेल्या वर्षी २,१०,००० रुपयांचा घसारा काढून १,३७,२१४ रुपये नफा मिळविला. त्यांत गेल्या वर्षाचा शिलकी नफा ( १४,१०० रु. ) मिळविला म्हणजे १,५१,३१४ रुपये होतात. त्यांतून ७% करमाफ डिव्हिडंड देण्यास १,४७,००० रुपये लागले. मॅनेजिंग एजंटांनीं आपलें ३४,८४५ रुपयांचें हक्काचें वेतन घेतलें नाहीं. कंपनीचें वसूल भांडवल २१ लक्ष रु. असून १० लाखांचीं डिबेंचर्स आहेत. रिझर्व्ह व इतर फंड ३१¾ लाखांचे आहेत.

### हिंदी आर्थिक परिषद

वरील परिषदेचें येतें अधिवेशन लाहोर येथें प्रा. द. गो. कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर १९४५ मध्यें भरणार आहे. हिंदी आर्थिक परिषदेचे प्रा. कर्वे हे तिसरे महाराष्ट्रीय अध्यक्ष होत. ह्यापूर्वी प्रा. वा. गो. काळे हे १९२९ सालीं व प्रा. घ. रा. गाडगीळ हे १९४० सालीं अध्यक्ष होते.

### ब्रह्मी सरकारचें सिमला येथील ठाणें हालणार

ब्रह्मी सरकारचें सबंध ठाणें सिमल्यांतून लवकर हालणार आहे. त्यांत एकूण बडे, छोटे ८०० नोकर आहेत.

### ॲंग्लो-इंडियन मुलींचे इंग्रजांशीं विवाह

पांच हजार ब्रिटिश सैनिकांनीं—मुख्यत: लष्करी अधिकाऱ्यांनीं—ॲंग्लो-इंडियन तरुणींशीं विवाह केला आहे, असें त्या जमातीचे पुढारी, मि. फ्रँक अँथनी, ह्यांनीं बर्मिंगहॅम येथील आपल्या भाषणांत सांगितलें. ह्या मुली लवकरच पतिगृहीं जावयास निघतील.

### डॉलर व पौंड ह्यांची रुपयांत किंमत

हिंदी पुस्तक विक्रेत्यांनीं अमेरिकन व ब्रिटिश पुस्तकें व इतर प्रकाशनें ह्यांच्या रुपयांत कमाल किंमती किती आकाराव्या, ह्याचा तपशील प्रसिद्ध झाला आहे. आतां किंमती उतरविण्यांत आल्या आहेत.

### सर चिंतामणराव देशमुखांचें हिंदुस्थानांत पुनरागमन

हिंदुस्थानच्या रिझर्व बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, हे लंडनहून कराचीस २ तारखेस येऊन त्याच दिवशीं मुंबईस रवाना झाले. सर चिंतामणरावांचें विलायतेंत एक महिनाभर वास्तव्य होतें. ह्या अवधींत इंग्लंडमधील बँकांच्या होणाऱ्या युद्धोत्तर स्थितीचा त्यांनीं अभ्यास केला.

### हिंदुस्थान व विलायतमधील टेलिफोन

नोव्हेंबर महिन्याच्या १५ तारखेपासून, इंग्लंड व हिंदुस्थानमधील लढाईमुळें बंद केलेले सार्वजनिक टेलिफोनचें दळणवळण पुन्हां चालू होईल, असें समजतें.

### सिकंदराबाद

सिकंदराबाद हें निजाम सरकारास परत देण्याचें अनेकवार पुढें ढकलण्यांत आलें होतें. आतां १ डिसेंबर रोजीं तें निजाम सरकारकडे निश्चित परत जाईल.

### हिंदुस्थानांत खडी चेपणारे १,००० ब्रिटिश रूळ येणार

सर एडवर्ड बेंथाल, लष्करी वहातुकीचे मंत्री, ह्यांनीं नुकेच दिल्लींत वर्तमान पत्रांच्या बातमीदारांना सांगितलें, कीं वहातूक सल्लामंडळाच्या सूचनेनुरूप विलायतेंतून, रस्त्यावरील खडी चेपणारे १,००० रूळ मागविले आहेत. यांची किंमत अदमासे दोन कोटि रुपये होईल.

### नऊ कोट युरोपिअनांना भेडसावणारा दुष्काळ

"अनरा"च्या शेतकी अर्थशास्त्रप्रविणांच्या मतें या हिवाळ्यांत नऊ कोट युरोपिअन लोकांना जवळ जवळ उपास पडेल. झेकोस्लोवाकिया, ग्रीस, इटली, फ्रान्स, डेनमार्क, हॉलंड, बेलजम, युगोस्लाविया आणि नॉर्वे या देशांतील अन्न व त्याचें उत्पादन यांचें निरीक्षण करून डॉ. केस म्हणतात, कीं हा दुष्काळ शेतावर जगणाऱ्यांना जाणवणार नसून तो युरोपच्या मोठमोठ्या शहरांतूनच मुख्यत: जाणवेल.

आहार शास्त्र तज्ञांच्या मताप्रमाणें मनुष्याला कमीत कमी २,६५० कॅलरी उत्पन्न करणाऱ्या अन्नाची दररोज जरूरी आहे, परंतु या हिवाळ्यांत सरासरी १,२०० कॅलरी उत्पन्न होण्याइतकेंच अन्न त्या देशांतील युरोपिअन रहिवाशांना मिळूं शकेल. पूर्व व दक्षिण युरोपला जर या दुष्काळांतून वाचवावयाचें असेल तर १९४६ ची पिकें तयार होण्यापूर्वी ९० लक्ष टन धान्य त्या देशांना पुरवावें लागेल. 'अनरा'नें आतापर्यंत त्या देशांना एक लक्ष टन धान्य पाठविलें आहे.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, दमडेरे बोळाजवळ, पुणें २

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## मुंबई प्रांतांतली धान्यपुरवठ्याची परिस्थिति

### तुटवड्याच्या भीतीवर उपाययोजना

युद्धपरिस्थितींत आवश्यक झालेलीं विविध सरकारी नियंत्रणें दूर होऊन शांततेच्या काळांतील रोजच्या व्यवहारांच्या सुखसोयी आपणांस पुन्हां केव्हां अनुभवण्यास मिळणार अशी अधीर वृत्ति हिंदी जनतेंत दिसून आल्यास त्यांत नवल नाहीं. व्यापारी देवघेव व दुकानदारी ह्यांवरचीं नियंत्रणें उठवण्यांत यावीं अशी मागणी धंदेवाले लोक करीत आहेत. आणि शक्य तितक्या त्वरेनें विनिमय–स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा आपला प्रयत्न चालू आहे असें उत्तर सरकार देत आहे. मालाचा पुरवठा, वाटणी आणि किंमती ह्यांवर निर्बंधविमोचनाचा अनिष्ट परिणाम होऊन बाजारांत गोंधळ माजूं नये आणि सामान्य लोकांच्या निस्याच्या गरजा भागवण्याचे मार्गांत अडचणी उत्पन्न होऊं नयेत अशा बेतानें नियंत्रणें दूर केलीं जाणें आवश्यक आहे ह्यांत शंका नाहीं. मुंबई प्रांतांतील धान्याच्या पुरवठ्याचा व वाटणीचा प्रश्न घ्या. ह्या प्रांतांत उत्पन्न होणारें अन्नधान्य येथील जनतेस मामुली परिस्थितींतहि पुरें होत नाहीं आणि ही तूट बाहेरून धान्य आणून भरून काढावी लागते. ह्यामुळें युद्धकाळांत प्रांतिक सरकारनें अधिक धान्य पिकवलें जाण्याची, शक्य तेवढें धान्य बाहेरून आणण्याची व एकूण पुरवठ्याची योग्य वाटणी होण्याची व्यवस्था केली. सरकारच्या विधमानें धान्य जमा केलें जाऊन त्याचें वाटप रेशनिंगच्या पद्धतीनें होण्याचें अगत्य ह्यामुळेंच भासलें. कायद्याची सक्ती आणि नियंत्रणात्मक तजवीज ह्यांच्या पायावर अन्नधान्यांचा पुरवठा व त्यांची वाटणी ह्यांची उभारणी करणें प्राप्त झालें. सक्तीची धान्यवसुली आणि वाटणी केव्हांहि गैरसोयीची व जाचक वाटणारच; आणि निर्बंधविमुक्ती नियंत्रणात्मक योजनेपेक्षां व्यवहारतः जनतेस अधिक सोयीची वाटण्यासारखी परिस्थिति आज निर्माण झाली आहे काय ? हा महत्त्वाचा प्रश्न येथें उद्भवतो.

विशिष्ट मालाच्या व्यवहारावरील बंधनें दूर किंवा शिथिल करण्याबाबतचें धोरण ठरवणें ही प्रांतिक सरकाराच्या अधिकारांतील गोष्ट सर्वस्वी नाहीं हेंहि प्रस्तुत संबंधांत ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. निरनिराळ्या प्रांतांस धान्याचा योग्य वाटा मिळतो आहे कीं नाहीं हें पाहण्याचें काम मध्यवर्ती सरकारच करूं शकतें. स्वतःच्या गरजेपेक्षा अधिक धान्य पिकवणाऱ्या प्रांतांतून तुटीच्या विभागांत तें जाण्याची व्यवस्था करून सर्व देशभर अन्नसामुग्रीच्या किंमती योग्य प्रमाणांत रहातील अशी तजवीज राखण्याची जबाबदारी त्याची आहे. चालू वर्षी मुंबई प्रांतांत पाऊसपाणी चांगलें न झाल्यानें धान्य पुरवठ्याविषयींची परिस्थिति सुधारण्याऐवजीं ती बिघडली आहे. गुजराथेंत पुरांच्या आपत्तीमुळें पिकांचें उत्पादन तीस टक्के घटलें आहे. सातारा, विजापूर, सोलापूर आणि बेळगांव ह्या जिल्ह्यांत पाऊस अपुरा झाल्यानें खरीपाचें पीक वाळून गेलें आणि रबीच्या पिकांस धोका उत्पन्न झाला आहे. ह्या कारणानें नेहमीं धान्यानें समृद्ध असलेले जिल्हे तुटीच्या जिल्ह्यास सहाय देऊं शकणार नाहींत. ह्या अनपेक्षित संकटाच्या दृष्टीनें मुंबई प्रांतास गहूं वगैरे धान्यें अधिक प्रमाणांत पुरविण्याविषयीं येथील सरकारास मध्यवर्ती सरकारास विनंति करावी लागत आहे. बाहेरून गहू हिंदुस्थानांत येत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत आणि ह्या आयातीच्या मोठा ओघ मुंबई प्रांताकडे वळवला जाणें अगत्याचें झालें आहे. सबंध देशाच्या दृष्टीनें पहातां उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत कित्येक विभागांत धान्योत्पादनाची परिस्थिति प्रतिकूलच आहे. तथापि, 'मध्यवर्ती सरकारनें मुंबई प्रांतास मिळावयाचा वाटा अपेक्षेप्रमाणें वाढवल्यास येथील तूट जेमतेम भरून निघेल आणि सध्याचें धान्याचें रेशन कसेंबसें टिकवतां येईल इतकेंच. सध्याची सरकारी धान्यवसुली व नियंत्रित वाटणी ह्या संबंधांतील व्यवस्था आणखी एक वर्ष कायम रहाणें अपरिहार्य होणार आहे.

नियंत्रणें दूर होऊन अन्नसामुग्रीचा व्यवहार मामुली पद्धतीनें चालू होऊं शकण्याची आशा दुरावली असल्याचें एकूण परिस्थितीवरून दिसतें. स्वतःचा धान्यपुरवठा शक्य तितका वाढवून त्याची वाटणी कार्यक्षम करण्याची व्यवस्था ह्या प्रांतांत नमुनेदार रीतीनें अंमलांत आणली असल्याचें हिंदुस्थान सरकारास माहीत आहे. तेव्हां ह्या प्रांतास त्याच्या शक्तीच्या बाहेर असलेल्या कारणानें धान्याचा तुटवडा पडण्याची भीति उत्पन्न झाली असतां त्यास भरपूर सहाय देणें अगत्याचें आहे. लोकांस रेशनचें मिळणारें धान्य कित्येक वेळां खराब असतें अशा अनेक तक्रारी नित्य ऐकूं येतात. त्या दूर करण्याची खबरदारी सरकारनें घेतली, पाहिजे आणि धान्याची वसुली, त्याची जिल्हानिहाय वाटणी धान्याच्या किंमती, इत्यादींचे बाबतींत अनुभवानें दिसून आलेले दोष दूर करणें आवश्यक आहे. ह्या प्रांताच्या अनेक भागांत शेवटचे पाऊस पडले नाहींत, ह्यामुळें रबीच्या पिकांस त्यांस मुकावें लागणार आहे आणि जिल्ह्यांची एकमेकांशीं होणारी देवघेव मर्यादित प्रमाण धारण करणार आहे. प्रांतभर धान्याची वाटणी करण्याचें काम ह्या दृष्टीनें अवघड होईल. ह्या सर्व अडचणींच्या परिस्थितीच्या दृष्टीनें धान्याची वसुली व वाटणी ह्यांचे विषयींच्या योजना वेळींच आखल्या गेल्या पाहिजेत. प्रांतिक सरकार आणि जनतेचे प्रतिनिधी ह्यांनीं असल्या योजनांचा दोनतीन वर्षें अनुभव घेतला आहे आणि त्याचा योग्य उपयोग केला जाईल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं.

### जर्मन आणि जपानी लढाऊ कारखानदारीचें विसर्जन

जर्मन व जपानी लष्करी आक्रमणशक्ति नष्ट होण्यास ज्यांवर ती आधारली होती अशा मोठ्या कारखान्यांचें विसर्जन केलें जाणें अगत्याचें आहे, ह्या तत्त्वानुसार आखलेलें धोरण जेतीं राष्ट्रें पद्धतशीरपणानें आचरणांत आणीत आहेत. मोठमोठ्या जर्मन कारखान्यांतली यंत्रसामुग्री शक्य तोंवर उचलून मित्रराष्ट्रें स्वतःच्या उद्योगांकरितां बाहेर नेत आहेत. जपानमधील झाइबट्स ह्या प्रचंड औद्योगिक संघाचें विसर्जन केलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. युद्धापूर्वीच्या हुंडणावळीच्या दरानें ह्या संघाच्या मालमत्तेची किंमत सात कोटि रुपये भरेल.

### ब्रह्मदेशनिवासी हिंदी लोकांची परती

ब्रह्मदेशांतील चार लक्ष हिंदी रहिवाशी सध्या ह्या देशांत येऊन राहिले आहेत, त्यांच्या तिकडे परत जाण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत आहे असें समजतें. परंतु ही परती पुरी होण्यास बराच काळ लागेल असें दिसतें.

## हिंदी बँकांच्या व्यवहारावर सडेतोड टीका

चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया आणि चायना हिचे हिंदी विभागाचे मुख्य सल्लागार, मि. डी. लेडर्लो, ह्यांनी आपल्या एका ताज्या मुलाखतींत हिंदुस्थानामधील बँकांच्या कांहीं प्रकारच्या व्यवहारांवर कडक टीका करून त्यांच्या अनुचित धोरणाबद्दल नापसंती व्यक्त केली. विशेषतः नव्यानेंच स्थापन झालेल्या बँकांचे व्यवहारावर मि. लेडर्लो ह्यांचा विशेष रोख दिसला. सट्टेबाजांना कर्जे देण्याच्या पद्धतीचा त्यांनीं उल्लेख केला. किंमती वाढतील ह्या अपेक्षेनें कित्येक व्यापारी विशिष्ट प्रकारचा माल साठवीत जातात, परंतु एकाएकीं किंमती घसरल्या म्हणजे दिवाळें निघतें. दिवाळखोर व्यापारी तात्काळ पुनः नवे सट्टे करण्यास कसे तयार होऊं शकतात, ह्याबद्दल मि. लेडर्लो ह्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें. बँकांचें ह्या व्यापाऱ्यांस सहाय्य मिळत असलें पाहिजे, असाच त्याचा अर्थ आहे. बँकांच्या डिव्हिडंड वाटणीच्या पद्धतीवरहि त्यांनीं टीका केली. गंगाजळी निर्माण करणें हें प्रत्येक बँकेचें आद्य कर्तव्य आहे, ह्या त्यांच्या विधानाबद्दल दुमत होणें अर्थातच शक्य नाहीं. परंतु, "भांडवलाच्या किमान ४०% इतकी तरी गंगाजळी निर्माण झाल्याविना बँकांना डिव्हिडंड वाटण्यास परवानगी असूं नये" ही त्यांची सूचना अव्यवहार्य वाटते. आपली मजबुती वाढविणें आणि भागीदारांस वाजवी डिव्हिडंड देणें ह्या दोन गोष्टींपैकीं मजबुती निःसंशय अधिक महत्त्वाची आहे हें खरें असलें तरी मर्यादित प्रमाणांत डिव्हिडंट वाटण्यामुळें मजबुती वाढण्यास अप्रत्यक्ष सहाय होऊं शकतें, ही गोष्ट मि. लेडर्लो ह्यांच्या ध्यानांत येणें शक्य नाहीं. भांडवलाच्या ४०% इतका रिझर्व्ह निर्माण होईपर्यंत डिव्हिडंड अजीबात न वाटणें व्यवहार्य होणार नाहीं. अर्थात, रिझर्व्ह वाढविण्याकडे नव्या बँकांच्या चालकांनीं अधिक लक्ष पुरविलें पाहिजे हें उघड आहे.

कंपन्यांना त्यांच्याच शेअर्सचे तारणावर बँकांनीं कर्ज देऊं नये, ही मि. लेडर्लो ह्यांची सूचना योग्यच आहे, कारण कर्ज घेणाऱ्या कंपन्या अयशस्वी झाल्या तर त्यांच्या शेअर्सना किंमत उरणार नाहीं आणि बँकांना नुकसान सोसावें लागेल. व्यापारी बँकांना आपले पैशाचा मोठा भाग नेहमी तरता ठेवावा लागतो, ह्या दृष्टीनें दीर्घ मुदतीपर्यंत गुंततील अशा ठिकाणीं (उ. औद्योगिक उपक्रम), त्यांनीं पैसे गुंतविणें श्रेयस्कर नाहीं अशी मि. लेडर्लो ह्यांची सूचना आहे. विमा कंपन्यांना आपल्या पैशाच्या गुंतवणुकीचा तपशील प्रसिद्ध करावा लागतो, तशाच प्रकारची सक्ती बँकांवरहि करण्यांत यावी असा मि. लेडर्लो ह्यांचा आग्रह आहे. भागीदार व ठेवीदार ह्यांस त्यांचे पैसे सुरक्षितपणें गुंतविण्यांत आले आहेत किंवा नाहींत हें पहाण्याची त्यामुळें संधी मिळेल. विमा कंपन्यांच्या भागीदारांस व विमेदारांस अशी संधि आजहि मिळत आहे. तिचा त्यांस किती उपयोग होत आहे हें पहाणें येथें बोधप्रद होईल. "विदेशी एक्सचेंज बँकांकडे जाणारा व्यवहार स्वतःकडे घेऊन त्या बँकांचें उच्चाटण करण्याचा विचार करण्यापूर्वी, हिंदी बँकांनीं किती तरी अंतर तोडलें पाहिजे! जगभर ज्यांच्या व्यवहाराचें जाळें पसरलेलें आहे व ज्यांचा व्यवहार अनुभवसिद्ध वळणानें चालू आहे अशा एक्सचेंज बँकांचें काम त्यांचेकडून काढून घेऊन स्वतःसाठीं मिळविणें ही सोपी गोष्ट नाहीं" ह्या मि. लेडर्लो ह्यांच्या उद्गारांवरून ब्रिटिश बँकांचा आत्मविश्वास आणि त्यांची हिंदी बँकांबद्दल तुच्छता हीं दिसून येतात.


### दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

अत्यंत गुणकारी—

### कामगार ब्राह्मी तेल
व
### माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.

म. गो. कुलकर्णी

किराणा-भुसार मालाचे व्यापारी,

फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

### दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,७८,८५,५५० |

**मुख्य कचेरीः** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (माणिक चौक शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, जुनागड, कराची, कोइमतूर, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज (कच्छ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**न्यूयॉर्क एजन्ट्स :**—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते; सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

## स्फुट विचार

### राष्ट्रीय नियोजन समितीचें कार्य पुन्हां चालू

पंडित नेहरू ह्यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें एक राष्ट्रीय योजना तयार करण्यासाठी नियोजन समिति स्थापन होऊन तिनें बरेंच प्राथमिक स्वरूपाचें कामहि उरकलें होतें. युद्धामुळें हें कार्य पुढें चालूं शकलें नाहीं. तें आतां पुन्हां हातीं घेण्यांत आलें असून राष्ट्रीय समितीची सभा मुंबईमध्यें गेल्या आठवड्यांत झाली. हिंदुस्थान सरकारनें समितीस आपल्याजवळ असलेली महत्त्वाची माहिती पुरवण्याचें कबूल केलें आहे. युद्धपरिस्थितीमुळें घडून आलेले फेरबदल लक्षांत घेऊन नियोजनाचें कार्य कोणत्या पद्धतीनें पुढें चालवलें जावें ह्याविषयीं सूचना करण्याकरितां एक महिन्यामागें एक उपसमिति नेमण्यांत आली होती. सर्व लोकांस भरपूर काम मिळेल आणि त्यांच्यावर येणाऱ्या आर्थिक आपत्तींच्या निवारणाची सोय होईल अशी व्यवस्था करण्याचा प्रश्न तातडीनें हातीं घेतला जावा असा अभिप्राय तिनें व्यक्त केला आहे. शास्त्रीय व यांत्रिक शोधांस देण्यांत येणारें वाढतें महत्त्व, उद्योगधंद्यांचें केलें जाणारें सरकारी नियंत्रण, आंतरराष्ट्रीय सहकाराची भासणारी आवश्यकता, किंमती व मजुरीचे दर निश्चित करण्याची प्रथा, इत्यादि बाबतींत गेल्या पांच वर्षांत आर्थिक धोरण बदललें आहे. तें हिशेबांत घेतलें गेलें पाहिजे असें उपसमितीनें म्हटलें आहे. स्टर्लिंग शिलका, परकीय भांडवल आणि धंदे-व्यापारांत महत्त्वाचे दृष्टीनें प्रतवारी, ह्यांकडे तातडीनें लक्ष देण्यांत यावें अशीहि तिची सूचना आहे. औद्योगिक व शेतीविषयक उत्पादनांत वाढ आणि लोकांस कामाचा भरपूर पुरवठा ह्या बाबींवर तिनें विशेष जोर दिला आहे.

### मुंबई प्रांतांतील १९४३ मधील जनन-मृत्यु

मुंबई प्रांताच्या सार्वजनिक आरोग्य खात्याचा १९४३ सालाबाबतचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यामध्यें कांहीं बोधप्रद माहिती दिलेली आहे, तिचा येथें उल्लेख करण्यांत येत आहे. त्या वर्षी मुंबई प्रांतांत एकूण ७,१३,६४० अर्भकें जन्मास आलीं. हा आकडा १९४२ च्या मानानें ११,०८६ नीं कमी होता. मृत्युसंख्या त्याच सालीं ५,८२,५३१ इतकी होती. १९४२ मधला तत्सम आकडा ५,१६,५५८ होता. मृत्यूंचें प्रमाण दर हजार माणशीं १९४२ मध्यें २४·२६ आणि त्याची पंचवार्षिक सरासरी २५·५४ होती. पण १९४३ सालीं हें प्रमाण २३·३१ पर्यंत उतरलें. ताप, हगवण, दमा, महामारी ह्या रोगांनीं मृत्यु कमी झाल्यानें ही घट झाली. प्रांतांतील मृत्यु-संख्येंत अशीच घट कमी-अधिक प्रमाणांत १९३४, १९३७ व १९४० ह्या सालांत झाली होती. १९४२ मध्यें पुऱ्या झालेल्या दशवार्षिक मुदतींत प्रांतिक वार्षिक जननाची सरासरी ७,४२,६३८ इतकी होती. अलीकडे जन्मसंख्या घटली असली तरी जननाचें प्रमाण मोठेंच आहे असें आरोग्य खात्याच्या डायरेक्टरांचें मत आहे. ह्या दृष्टीनें पहातां जनन-मृत्यू व अर्भकांचे मृत्यू ह्यांच्या प्रमाणांत एकाच वेळीं १९४३ मध्यें घट झाली, ती समाधानकारक आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. पुढारलेल्या पाश्चात्य देशांच्या तुलनेनें विचार करतां हिंदुस्थानांतील जनन-मरणाचें प्रमाण फार मोठें आहे. आर्थिक जीवनांत सुधारणा, शिक्षणाचा प्रसार व आरोग्य साधनांचा वाढता पुरवठा हे ह्या परिस्थितीवरील उपाय आहेत. अर्भकांच्या मृत्यूंचें प्रमाण १९४३ मध्यें दर हजार जननांशीं १५७·३९ होतें. १९४२ मध्यें तत्सम आकडा १६०·५२ होता.

### कऱ्हाड अर्बन को. बँक लि.

३०-६-४५ अखेर वरील बँकेच्या सभासदांची संख्या ८६९ झाली आणि शेअर भांडवल ९८,२७० रुपये झालें. रिझर्व्ह फंड ३२ हजारांवर गेला. इतर फंडसचा आकडा ५७,५४२ रुपये आहे. म्हणजे बँकेचें स्वतःच्या मालकीचें भांडवल सुमारें १ लक्ष ८८ हजार रुपये आहे. बँकेकडे १२३/४ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें सुमारें ७३/४ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत, आणि तिचे ५ लक्ष रुपये रोखे वगैरेंत आहेत. सरकारी स्पेशल ऑडिटर मि. एस. सुंदरासन ह्यांनीं आपल्या अभिप्रायांत बँकेच्या यशस्वी कारभाराचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे आणि त्या यशास मुख्यतः तिचे चेअरमन श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे व त्यांचे सहकारी हे आहेत असें म्हटलें आहे. आसिस्टंट राजिस्ट्रारनीं आपल्या ता. ३०-५-४५ च्या अभिप्रायांतहि "मुंबई प्रांतांतील उत्कृष्ट रीतीनें चालविलेल्या मोजक्या अर्बन बँकांपैकीं ही एक आहे" असें नमूद करून श्री. देशपांडे व त्यांचे सहकारी डायरेक्टर्स ह्यांची प्रशंसा केली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २४,७०० रुपये नफा झाला. भागीदारांस ७१/२% डिव्हिडंड देण्यास ७,३०० रुपये लागले. बँकेच्या ह्या सुयशाबद्दल तिचे चेअरमन, डायरेक्टर व मॅनेजर-मॅनेजिंग डायरेक्टर श्री. म. वि. खंडकर ह्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

### जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि., भिवंडी

हरतऱ्हेच्या भाताच्या गिरण्या, साखर गाळण्याची यंत्रसामुग्री, टूल ग्राइंडर्स व त्यांचे सुटे भाग, इत्यादींचे कारखानदार, जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि., ह्यांचा ३० जून, १९४५ अखेरचा रिपोर्ट आमचेकडे आला आहे. कंपनीचें वसूल भांडवल ४,९८,९७५ रुपये असून तिचे रिझर्व्हज् ६५ हजारांवर आहेत. ठेवींची रकम १,३४,१०० रुपये आहे. कंपनी ४१/२ लक्ष रुपये किंमतीचे सरकारी रोखे धारण करीत आहे, ह्यावरून तिच्या भांडवलविषयक सुस्थितीची कल्पना येईल. अहवालाचे वर्षी कंपनीनें ५,४७,५१८ रुपयांचा तयार माल विकला आणि १,५३,६०५ रुपयांचा ठोक नफा मिळविला. खर्च वजा जातां व घसारा काढून ताळेबंदांत ६३,७९६ रुपयांचा नफा आला. भागीदारांस प्रेफेरन्स भागांवर ५% (कर वजा) आर्डिनरी भागांवर ६%+२% बोनस (कर वजा) डिव्हिडंड देण्यास २५,९५७ रुपये लागले आणि सुमारें ६४ हजार रुपये पुढील हिशेबांत ओढण्यांत आले त्यांतून इनकमटॅक्स, सुपरटॅक्स वगैरे देण्यांत येतील. वरील वृत्तांतावरून कंपनीच्या प्रगतीची कल्पना येईल. श्री. व्ही. पी. वर्दे हे कंपनीचे चेअरमन असून, मेसर्स दांडेकर इंजिनिअर्सकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. ह्या कारखान्याचे उत्पादक, श्री. गोपाळ गणेश दांडेकर, ह्यांच्या वयास नुकतेंच ६१ वें वर्ष लागलें, त्यानिमित्त भिवंडी येथें सन्मान समितीतर्फे त्यांचा मोठा सन्मान करण्यांत आला. श्री. दादासाहेबांनीं औद्योगिक क्षेत्रांत केलेल्या कामगिरीबद्दल त्यावेळीं त्यांचा गौरव करण्यांत आला. श्री. दांडेकर ह्यांस दीर्घायुरारोग्य चिंतितों.

डॉ. अंबेडकर मजुरांसाठी ७ बिलें आणणार

हिंदुस्थान सरकारचे मजूर मंत्री, डॉ. अंबेडकर, मजुरांच्या फायद्यासाठी विधिमंडळांत कांहीं कायदे पास करून घेणार आहेत. आगामी बजेटाच्या बैठकीच्या वेळीं मध्यवर्ती विधिमंडळांत ते खालील ७ बिलें आणणार आहेत:—

(१) कामाचे तास आठवड्यांत ४८ च असावेत.

(२) रेलवेवर सध्या आठवड्यांत ६० तास काम घेतात त्याऐवजीं दर आठवड्यांत फक्त ४८ तासच काम घ्यावें व दर आठवड्यास एक सुट्टी मिळून जास्तींत जास्त एक माणसाकडून आठवड्यांत घेण्यांत येणाऱ्या कामावर नियंत्रण असावें.

(३) माणशीं कमीत कमी किती पगार असावा ?

(४) पगाराच्या कायद्याची सुधारणा

(५) ट्रेड युनियनला मान्यता देणें.

(६) कामगारांना मिळणाऱ्या नुकसानभरपाईच्या बिलाची सुधारणा

(७) कारखान्यांतून कराव्या लागणाऱ्या कामाबद्दल सर्व प्रकारचे व सर्व साधारण कायम स्वरूपाचे नियम.

या सात बिलांव्यतिरिक्त कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्यांच्या सुखसोईबद्दल एक वटहुकूम ते काढविणार आहेत. त्याचप्रमाणें अभ्रकाच्या खाणींत काम करणारांच्या सुखसोईबद्दल एक बिल तयार होत असून तेंही येत्या अधिवेशनांत पुढें आणण्याचा त्यांचा विचार आहे. त्याचप्रमाणें चहा, कॉफी व रबराच्या मळ्यांतल्या मजुरांच्या सुखसोई करण्याबद्दलच्या बिलाचा विचार चालू आहे.

---

टॅरिफ बोर्ड युद्धजन्य कारखान्यांची चौकशी प्रथम करणार

हिंदुस्थान सरकारचे नागरी पुरवठा खात्याचे कंट्रोलर जनरल श्री. सी. सी. देसाई, यांची टॅरिफ बोर्डाचे सेक्रेटरी म्हणून झालेल्या नेमणुकीबद्दल अभिनंदन करण्यासाठी मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे सोमवारीं ताजमहाल हॉटेलमध्यें त्यांना खाना देण्यांत आला. या प्रसंगीं टॅरिफ बोर्डावर नेमणूक झालेल्याचीं नांवें लवकरच प्रसिद्ध होतील म्हणून त्यांनीं सांगितलें. टॅरिफ बोर्डाची पहिली बैठक १५ नोव्हेंबरला होईल व त्या वेळीं युद्धजन्य कारखान्यांच्या स्थितीचा विचार होईल. श्री. देसाई म्हणाले कीं, त्यांच्या खात्यानें नफेबाजीविरुद्ध व माल भरून ठेवून काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईमुळें जनतेला आतां पुष्कळ नित्योपयोगी माल मिळूं लागला आहे. परंतु कंट्रोल उठणार अशा बातम्या प्रसृत झाल्याबरोबर पुन्हा समाजविघातक कृत्यें करण्याकडे व्यापाऱ्यांची प्रवृत्ति दिसूं लागल्याबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला.

---

वीज आणि बंगाल व मद्रास सरकार

वीज उत्पन्न करणें आणि तिचा पुरवठा करणें ह्यांविषयींचा स्थानिक धंदा सध्या ज्या कंपन्यांचे हातांत आहे त्यांचेकडून स्वतःचे ताब्यांत घेण्याचें बंगाल व मद्रास सरकारांनीं ठरविलें आहे.

फ्रेंच कायदे मंडळाची निवडणूक

फ्रान्सच्या कायदे मंडळाच्या सभासदांची निवडणूक नुकतीच पार पडली आहे. तीमध्यें डाव्या म्हणजे जहाल गटांचे प्रतिनिधी संख्याधिक्यानें निवडून आले आहेत. तथापि, जनरल डी गॉल ह्यांच्या पुढारीपणास बाध येणार नाहीं असें म्हणतात.




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

नोगीचे
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

डोंगरे याच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
(स्वतःचे डेपो: मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली)
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत—


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा ( xd )
+ नागपूर मिल्स रु. ९ S दि. ६-११-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | रविवार* ४।११।४५ | बुधवार ७।११।४५ | गुरुवार ८।११।४५ | शुक्रवार ९।११।४५ | सोमवार १२।११।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २३६७—८ | २३७५—० | २३७०—० | २३८१—४ | |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४३२—० | ४३५—० | ४३४—० | ४३६—८ | |
| २२०१; १६९५ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २००८-१२ | २०१३-१२ | २००५-० | २०१३-१२ | |
| ७६५; ५३३ | ९---०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६२६—० | ६२५—८ | ६२३—० | ६२९—८ | |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५७७—० | ५८०—० | ५७९—० | ५९०—८ | |
| ४९८; ३६१ | ९-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४०८—८ | ४०६—८+ | ४०४—० | ४०८—० | |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३०४—० | ३०४—० | ३०६—० | ३०८—० | |
| ३९४; २८२ | ५-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०३—८ | ३१५—० | ३१०—० | ३१२—८ | |
| ३०५; २१८ | १२-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३१२—० | ३१९—० | ३१७—० | ३२०—८ | बाजार बंद |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४—०—९ | ४—१—९ | ४—१—६ | ४—३—६ | |
| २१-१४; १३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-५-० | १५-०-६ | १४-११-६ | १४-१५-० | |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | २-१५-० | ३—०—० | २-१५-३ | ३—०—६ | |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७१६—४ | ७२१—४ | ७१८-१२ | ७४१—४ | |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२९—० | २२९—८ | २२७—० | २२८—० | |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २३०—० | २३२—० | २३१—० | २३१—८ | |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५४२—८ | ५३७—८ | ५३२—८ | ५४२—८ | |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ४०—८ | ४०—१ | ४०—० | ३९-१३ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०१—३ | १०३—३ | १०३-२-६ | १०२-२-६ | |

*रविवार दि. ४-११-४५ ला नवीन 'मुहूर्त-दिन' म्हणून संध्याकाळीं ६-४५ ते रात्रीं ८ पर्यंत बाजार उघडा होता.
शुक्रवार दि. १६-११-४५ ला 'बकरीदनिमित्त सुटी.

### सोलापूर येथील सहकारदिन

ता. ३ रोजीं सोलापूर जिल्हा सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत, शहर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष रा. ब. अबदुलपूरकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा करण्यांत आला त्या वेळीं मॅनेजर श्री. सी. एस. परांजपे ह्यांनीं वाचून दाखविलेला मुख्य ठराव मंजूर करण्यांत आला. त्यावर श्री. भिडे, देशमुख, पाटील व पारखे ह्यांचीं भाषणें झालीं. बँकेचे चेअरमन, श्री. एच. व्ही. केळकर, बी. ए. एलएल. बी., ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी दिनाचें महत्त्व, मुंबई प्रांतांतील व सोलापूर जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा इतिहास, आतांपर्यंतची प्रगति, पुढील प्रगतीची दिशा, इत्यादींचें विवेचन केलें. बँकेनें, सेल युनियन्सनीं व कांहीं सोसायट्यांनीं चालविलेल्या रेशन दुकानांच्या व फेअर प्राइस दुकानांच्या, त्याचप्रमाणें सोलापूर येथील सहकारी दूध युनियनच्या कार्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते, ऑनररी डि. ऑर्गेनायझर व एक माजी चेअरमन श्री. एम. एम. गवाणे, बी. ए. एलएल. बी. ह्यांच्या ता. २ नोव्हेंबर रोजीं घडलेल्या निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव मंजूर करण्यांत आला. सभेच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत, सहकारी संस्थांनीं मान्यवर लोकांना व्यवस्थापक मंडळावर निवडावें, खर्च कमी करावा आणि पद्धतशीरपणें कारभार करावा असा सल्ला दिला.

### सोनें-चांदी बाजारांत वायद्याचे सवदे

मुंबईच्या सोनें-चांदी बाजारांत वायद्याच्या सवद्यांची बंदी सरकारनें केली होती, ती लवकरच उठवण्यांत येणार असल्याची बातमी आहे.

### हिंदुस्थानांतील लष्कराचें पूर्ण हिंदीकरण

हिंदी लष्करांत ह्यापुढें हिंदी अधिकाऱ्यांच्याच नेमणुका करण्यांत येऊन त्याच्या संपूर्ण हिंदीकरणाचें धोरण निश्चित अमलांत येत आहे अशी घोषणा सर क्लॉड ऑकिन्लेक, सर सेनापति, ह्यांनीं केली आहे. सर्व हिंदी अधिकारी उपलब्ध होईपर्यंत ब्रिटिश अधिकारी नेमले जातील, पण त्यांच्या नेमणुका सर्वस्वी हंगामी राहतील असें त्यांनीं सांगितलें.

### टारिफ बोर्डाची नेमणूक

युद्धकाळांत स्थापन झालेल्या हिंदी कारखान्यांचें संरक्षण अथवा मदत मागणारे अर्ज तपासण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें टारिफ बोर्डाची नेमणूक केली आहे. संरक्षण अथवा मदत मिळण्याच्या पात्रतेची कसोटी थोडी ढिली करण्यांत आली असल्याचें समजतें. सर आर. के. षण्मुखम चेट्टी हे ह्या टारिफ बोर्डाचे अध्यक्ष असून, मि. सी. सी. देसाई आणि प्रो. कुरेशी हे तिचे सभासद आहेत. ढाका युनिव्हर्सिटीचे प्रो. एच. एल. डे ह्यांची बोर्डावरील नेमणूक नुकतीच जाहीर झाली आहे.

लहान मुलांकरितां
आर्को
गोड -एरंडेल- वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

## वाढत्या हिंदी लोकसंख्येचा बागुलबोवा

एके दिवशीं एक अमेरिकन लष्करी अधिकारी माझे टेबलावर जेवण्यास बसला होता. तो म्हणाला, "मला काल झोप आली नाहीं. इंग्रज एकाएकी हिंदुस्थान सोडून गेले व आपल्या अमेरिकनांवर त्यांनीं हिंदुस्थानच्या कारभाराची जबाबदारी टाकली, असें मला स्वप्न पडलें. ह्यापेक्षां आणखी आपत्ती कोणती असणार? मी तेव्हांपासून अगदीं बेचैन होऊन गेलों आहे." हिंदी लोकसंख्येच्या वाढीपुढें इंग्रजांनीं हात टेकले आहेत. कोणत्याहि आर्थिक योजना त्यामुळें यशस्वी होऊ शकत नाहींत व हें गाडें पुढें कसें चालणार ह्याबद्दल सर्वांस चिंता वाटत आहे, असा ह्या स्वप्नाचा भावार्थ आहे. मि. जॉन फिशर ह्या अमेरिकेच्या हिंदुस्थानांतील प्रतिनिधीचे विचार संक्षेपानें येथें दिले आहेत.

"इंग्रजांनीं पूर्वी धरणें बांधलीं, रस्ते तयार केले, आरोग्य सुधारण्याचे प्रयोग केले व अशा रीतीनें दुष्काळ टाळण्याची खटपट केली. तिचा परिणाम लोकसंख्येची गति वाढण्यांत मात्र झाला. इंग्रजांच्या आर्थिक धोरणामुळें हिंदी जनतेचें जीवन जास्त सुखकर न होतां, उलट, लोकसंख्या मात्र वाढली. "मुंबई योजने" चा उद्देश लोकांच्या रहाणीचें मान सुधारणें हा आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणापेक्षां उत्पादनाचें प्रमाण जास्त राखणें हा तिचा हेतु आहे. रशियाचा दाखला ह्यासंबंधांत देण्यांत येतो, परंतु तो हिंदुस्थानास लागू पडणार नाहीं. कारण (१) पेट्रोल व कोळसा हीं येथें पुरेशीं नाहींत; (२) रशियन लोकांच्या रहाणीचे मानांत कपात करून तिचा उपयोग औद्योगीकरणासाठीं करतां आला; हिंदुस्थानांत लोकांवर जास्त बोजा टाकण्यास वावच राहिलेला नाहीं; (३) लोकांस स्वार्थत्याग करावयास लावावयाचा म्हटलें तरी त्यास आवश्यक असलेली शक्ति स्वतंत्र हिंदी सरकारास असणार नाहीं, आणि (४) रशियानें आपली योजना पार पाडली, त्यास सशक्त आणि काटक लोकांचें सहाय मिळालें. हिंदी जनतेंत नेटानें काम करण्याचें त्राणच उरलेलें नाहीं. जरी "मुंबई योजना" यशस्वी झाली तरी त्यामुळें लोकसंख्येच्या वाढीस आपोआप आळा बसण्याची अपेक्षा करणें चुकीचें होईल. हिंदु व मुसलमान लोकांत प्रजावाढीस नैसर्गिक व धार्मिक उत्तेजन मिळतें, तें शिक्षणानें नाहींसें करण्यास पिढ्यान्‌पिढ्या लागतील. "मुंबई योजने" मुळें लोकसंख्या वाढीस उत्तेजनच मिळावयाचें! हिंदी लोकसंख्येच्या प्रश्नावर तोडच नाहीं कीं काय? मला तरी ती कोठेंहि आढळली नाहीं. बाहेरून अब्जावधि रुपये किंमतीच्या यंत्रसामुग्रीची आयात करून औद्योगीकरण करावयाचें व अब्जावधि रुपये खर्चून खेडेगांवें सुधारावयाचीं म्हटलें, तरी कोणताहि देश अशी गुंतवण करण्यास तयार होणार नाहीं. हिंदुस्थानहि ती स्वीकारणार नाहीं. हिंदुस्थानास स्वतःच्या वाफेवरच आपलें पुनर्घटनेचें इंजन चालवावें लागेल व ही तशी वाफ पुरेशी पडणार नाहीं, हें उघडच दिसत आहे."


—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व शूसकरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

विमा—काम—बक्षिसें

'सह्याद्रि' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना!

'सह्याद्रि' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती!!

एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

| | | |
|---|---|---|
| —शाखा— | अधिक माहितीसाठी | गो. ग. सौंदणकर |
| काळभोर आणि कं., पुणें. | लिहा अगर भेटा. | मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक. |

पैसा आणि ज्ञान वाढवा!

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्‌भुत कथानक! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत — किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, नं. २७ मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २१ नोव्हेंबर, १९४५ अंक ४६

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

हेड ऑफिसः—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें
मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

| | |
|---|---|
| अधिकृत विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ४,५८,६४० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ४५,००,००० |

बँकेनें गतवर्षी करमाफ ४ टक्के डिव्हिडंड वाटलें आहे.

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष | श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष

दि कॉमनवेल्थ ॲश्युअरन्स कं. लि. पुणें, दि सुप्रीम म्युच्युअल ॲश्युअरन्स कं. लि. पुणें व हिंद बेनिफिट प्रॉव्हिडंट इन्शुरन्स सोसायटी लि. मुंबई.

या कंपन्यांचे हप्ते घेतले जातात.

मद्रास, सोलापूर, नगर, बेळगांव, अहमदाबाद, मिरज, सांगली, कोल्हापूर, हुबळी, धारवाड व मुंबई वगैरे ठिकाणीं ड्रॉफ्टस दिले जातात.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.) बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई

खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर

—शाखा—

स्थानिकः—१ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँट रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्लें, ७ माटुंगा.

इतरः—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४४ मधील प्रगति

नव्या कामांत ७० टक्के वाढ

खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

## १९४४ मधील प्रगति

—तुलनात्मक आंकडे—

१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु. वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु. वर

विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.

अध्यक्षः—श्री. सरदार जमनाथमहाराज पंडित

## सहकारी संस्थांस सूचना

"अर्थ"च्या प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या अंकांत सहकारी संस्थांस उपयुक्त माहिती व चर्चा आम्हीं देत असतों. ह्या महिन्याच्या शेवटच्या अंकाऐवजीं डिसेंबरच्या पहिल्या अंकांत वरील मजकूर प्रसिद्ध होईल.

# विविध माहिती

### निवडणुकीबद्दल सुट्टी

मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकीप्रीत्यर्थ सोमवार ता. २६ व मंगळवार ता. २७ हे सार्वजनिक सुट्टीचे दिवस म्हणून मुंबई सरकारनें जाहीर केले आहेत.

### "चिनी लोकांचा अपमान करूं नका"

"चीन हें एक मोठें राष्ट्र आहे, तेव्हां त्याचें महत्त्व केवळ शब्दांतच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतींतहि मान्य केलें पाहिजे. मलायामधील युरोपियनांनीं चिनी लोकांचा अपमान करण्याचें टाळलें पाहिजे.":— कर्नल व्हिक्टर पर्सेल, ह्यांचें रेडिओवरील भाषण.

### शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व

"शास्त्रीय संशोधनास योग्य तें महत्त्व दिलें नाहीं, तर हिंदुस्थानास आगामी जागतिक चढाओढींत कांहींच स्थान मिळणार नाहीं. हिंदी कारखानदारांनीं संशोधनाकडे अधिकाधिक लक्ष्य पुरविलें पाहिजे. ज्या सरकारी खात्यांत शास्त्रीय माहितीचीं माणसें लागतात, तेथें शास्त्रज्ञांचीच नेमणूक केली पाहिजे. उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेंत शास्त्रज्ञांना त्यांच्या महत्त्वाचे मानानें योग्य तें स्थान मिळालें पाहिजे.":—सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चचे डायरेक्टर, सर शांतिस्वरूप भटनागर, ह्यांचें भाषण.

### आर्थिक वृत्तपत्रांचें एकत्रीकरण

गेल्या महिन्यांत लंडन येथील दोन आर्थिक दैनिकांचें एकत्रीकरण झालें. त्यांचीं नांवें फिनॅन्शिअल न्यूज व फिनॅन्शिअल टाईम्स अशीं आहेत. दोन्हीं वृत्तपत्रें ५० वर्षांपेक्षा अधिक काळ चालू होतीं. लंडनमधील विविध बाजारांतील चढाओढी आतां कमी पडल्या आहेत, त्याचा वृत्तपत्रांचें प्रस्तुत एकत्रीकरण हा परिणाम आहे. फिनॅन्शिअल न्यूज लि. नें फिनॅन्शिअल लि. वर ताबा मिळविला असला, तरी फिनॅन्शिअल टाइम्सनें फिनॅन्शिअल न्यूजची गुडविल खरेदी केली आहे. फिनॅन्शिअल न्यूजच्या अधिकारी लोकांचे नियंत्रणाखाली फिनॅन्शिअल टाइम्स चालू राहिला आहे, असा ह्याचा अर्थ आहे.

### धनुष्यकोटी व पंबनमध्यें खणण्यांत येणारा कालवा.

पाक सामुद्रधुनी व मानारचें आखात ह्यांना जोडणारा ३० फूट खोल व पांच मैल लांब असा कालवा खोदण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. हिंदुस्थानाच्या वे किनाऱ्याकडून पश्चिम किनाऱ्यास जाण्यासाठी सध्या घालावा लागणारा लंकेभोंवतालचा ३५० मैलांचा वळसा यामुळें टळेल.

## कर्नाटकाची घटप्रभा

लेखकः—श्री. जे. जे. तवनप्पा, बेळगांव

परमपूज्य दे. भ. काका कालेलकर या गांधीवादी लेखकानें आपल्या "लोकमाता" अर्थात् भारतवर्षांतील नद्यांचें वर्णन या ग्रंथांत निसर्गहृदय व मानवीहृदय ह्यांचा सुंदर मेळ बसवून भावनामय लेखनशैलीनें काव्यमय गद्यांत नद्यांचें वर्णन केलें आहे.

कर्नाटक "लोकमाता" लेखकाची पुण्यभूमि व त्यांच्या वाडवडिलांची कर्मभूमि आहे. मार्कंडेय नदीचीं रताळीं त्यांनीं खाल्लीं आहेत व तिचें अमृततुल्य पाणी ते प्याले आहेत. ही नदी आतां लवकरच 'राकसकोप' येथें होऊं घातलेल्या धरणांत बाधित होऊन साऱ्या बेळगांव व तिच्या संस्थानी मुलखांतील उपनगरांतील वासीयांना आपला प्रसाद देणेस सुरुवात करील.

आचार्य काका कालेलकरांनीं "घटप्रभा व मलप्रभा ह्या आमच्याकडील कर्नाटकांतील नद्या स्वाभाविकपणेंच शेतकरी आहेत" असें म्हटलें आहे. परंतु अखेरीस त्यांनीं घटप्रभाच खरोखर जातीनें शेतकरी आहे असें म्हटलें आहे तें यथार्थ आहे.

मूर्ति लहान पण कीर्ति थोर या न्यायानें सह्याद्रीच्या राम घाटांत उगम पावून थोड्याशा प्रवासानंतर घटप्रभा नदी कर्नाटकांतच कृष्णेंत विलीन होते. गोकाकवरून मिरजेकडे प्रवास करणारे रेल्वे प्रवाशी खिडकींतून धुपधाळ (गोकाक) चें धरण कौतुकानें न्याहाळीत नाहींत ते क्वचितच. हिचे कालवे १६ लांब मैल असून या कालव्याच्या पाण्यावरच अरभावी येथील सरकारी शेतकी फार्म पोसले जातें. शहरवासीयांना हे कालवे जीवनसत्वांनीं समृद्ध असलेले वजनदार भरगच्च मोठ्या आकाराचे टोमॅटो गरिबांचे जीवनदाता फळें देतात. उन्हाळ्यांत गोड गोड थंडगार सरबतासाठीं पातळ सालींचें रसदार "आरोग्य फळ" कागदी निंबू देतात. घटप्रभेचा गोकाकचा धबधबा भूगोलाचा अभ्यास केलेल्यांना माहीत नाहीं असा साऱ्या हिंदुस्थानांत कोणीं नाहीं. हिंदुस्थानांत १९ व्या शतकांत जल-विद्युत् गृह १८८५ मध्यें अमेरिकनांनीं प्रथमच जें आद्य गृह सुरू केलें तो गोकाक धबधबा जल-विद्युत् गृह होय. धरणापासून अवघ्या एक दीड मैलावर धबधबा आहे. नदी लहान असल्यास स्वाभाविकच मोठें जल-विद्युत् गृह पाहिजे असल्यास पाटबंधाऱ्याच्या पाण्यास शेती मुकावी लागते यामुळें पांच हजार मजुरांना काम देणाऱ्या सुताच्या गिरणीस व 'गोकाक फॉल्स' गिरणगांव यांना पुरेल इतकीच इलेक्ट्रिसिटी मिळते.

कर्नाटकांतील अत्यंत सुपीक पण सदा सर्वकाळ दुष्काळपीडित विजापूर जिल्ह्याची जमीन पोसण्यासाठी घटप्रभेस दड्डी (बेळगांव) येथें प्रचंड धरण बांधून पाणी नेण्याची योजना ब्रिटिश सरकारनें १९०२ सालींच आखली होती, परंतु त्यांच्या सुप्रसिद्ध इतर कागदावरील कर्तबगारीप्रमाणेंच ही योजना फाइलींत धूळ खात पडली आहे.

सध्यां गव्हर्नरप्रणीत राजवटीनें "प्लॅनिंग फॉर बॅरेजेस कंट्रीसाईड" चें जें चोपडें प्रसिद्ध केलें आहे त्यांत पाटबंधाऱ्याच्या नकाशांत गोकाकच्या धरणाची वाढ करून दोन कालव्यांच्या रेषा मात्र संस्थानी हद्दीवरून विजापूर जिल्ह्याच्या हद्दींत ओढून ठेवल्या आहेत.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

अर्थ
वा. वं. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेमधील वाढती व्यापारी तेढ

### हिंदी बाजारपेठेसाठी स्पर्धा

युद्ध संपल्यानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारी देवघेवी पूर्ववत् सुरू होतील आणि युद्धकालांतील अडचणींचें निवारण होईल, अशी अपेक्षा होती. हिंदी कारखानदारांस कारखान्यांच्या उभारणीसाठीं व वाढीसाठी अमेरिकन यंत्रसामुग्री मिळूं शकेल, आणि युद्धोत्तर औद्योगिक प्रगतीस सत्वर चालना मिळेल अशी आशा वाटत होती. हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमधील सांचलेलें येणें ह्याबाबत उपयोगी पडेल, अशा विश्वासानें लोकांचे बेत रचले जात होते. परंतु प्रत्यक्ष ग्रेट ब्रिटनलाच युद्धोत्तर काळांत व्यापारविषयक अडचणी येणार हें स्पष्ट झाल्यापासून आणि अमेरिकेनें स्वाभाविकपणें आपली मदत मर्यादित करण्याचें ठरवल्यापासून, ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेमधील आर्थिक बाबींतला सलोखा थोडा कमी झालेला दिसतो. आतां तर ती तेढ वृत्तपत्रांतील चर्चेचा विषय होऊं लागला आहे. बिचाऱ्या हिंदुस्थानास त्या तेढीचीं कटु फळें भोगण्याची पाळी येणार काय ? अमेरिकेचा हिंदुस्थानाशीं व्यापार वाढूं नये ह्याबद्दल ग्रेट ब्रिटन दक्षता बाळगीत आहे आणि त्यासाठी शक्य तो प्रयत्न करीत आहे असें दिसतें. हिंदुस्थानास ह्या बाबतींत कांहींच करतां येण्याजोगें नाहीं, अशी नामुष्कीची परिस्थिति आहे.

अमेरिकन व्यापाऱ्यांना हिंदुस्थानाकडे यावयास पासपोर्ट मिळणें आतां अत्यंत कठीण होऊन बसलें आहे, अशी तक्रार अमेरिकेंत ऐकूं येऊं लागली आहे. आतांपर्यंत हिंदुस्थान सरकारचे अमेरिकेंतील एजंट जनरल सर गिरिजाशंकर बाजपाय, ह्यांस हे पासपोर्ट देण्याचा अधिकार होता, परंतु हा त्यांचा अधिकार एकाएकी काढून घेण्यांत आला आहे, असें समजतें. हिंदुस्थान सरकारच्या होम डिपार्टमेंटनें पासपोर्टचा अधिकार स्वतःकडे घेतल्याकारणानें, अमेरिकन व्यापाऱ्यांचे हिंदुस्थानांत प्रवेश मिळविण्यासाठी पासपोर्टचा खटाटोप करण्यांतच कित्येक महिने जातात आणि अशा रीतीनें अमेरिकनांवर एक प्रकारची बंदीच घालण्यांत आली आहे अशी अमेरिकेंत तक्रार करण्यांत आली आहे. " हिंदुस्थानास अमेरिकन भांडवल व माल तातडीन पाहिजे आहे, परंतु कोणताहि अमेरिकन हिंदुस्थानांत जाऊन आपला माल विकूं शकणार नाहीं, असा ग्रेट ब्रिटनचा जणूं निश्चयच आहे " असें अमेरिकन कॉंग्रेसचे सभासद मि. इमॅन्युएल सेलर ह्यांनीं आसिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. क्लेटम, ह्यांस लिहिलेल्या आपल्या पत्रांत म्हटलें आहे. ह्या ब्रिटिश धोरणास प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेंत ब्रिटिश व्यापाऱ्यांस येण्याची बंदी करावी अशी सूचना करण्यापर्यंत मि. सेलर ह्यांची मजल गेली आहे, ह्यावरून प्रस्तुत प्रकरणांत अमेरिकेंतील लोकमत किती प्रक्षुब्ध झालें आहे, ह्याची कल्पना येईल.

हिंदुस्थानास सुमारें ३,५०,००,००,००० डॉलर्स किंमतीचा ( ८७,५०,००,००० रुपयांचा ) माल कायदेशीरपणें अमेरिकेंत घेतां येण्याजोगा असला तरी फारच थोड्या डॉलर्सचा माल अमेरिकेंतून हिंदुस्थानाकडे येण्यास परवानगी मिळते. स्टर्लिंग-पौंड गटाच्या नियंत्रणामुळें, अमेरिकन डॉलर्स खर्चाला मिळविणें हिंदुस्थानास कठीण जातें आणि त्याचा अमेरिकन व्यापारावर परिणाम होतो ही गोष्ट स्पष्ट होऊन बराच काळ लोटला. परंतु, अमेरिकन मालाबरोबर अमेरिकन व्यापाऱ्यांसहि हिंदुस्थानांत प्रवेश मिळणें दुर्घट होणें, ही घटना अमेरिकनांस अपमानास्पद वाटत आहे. " अशा तऱ्हेची वागणूक ब्रिटिशांना खिलाडू (!) वृत्तीची वाटत असेल, तर आम्हांसहि तशीच खिलाडू वृत्ति दाखवितां येईल आणि ब्रिटिश व्यापाऱ्यांना अमेरिकेंत येण्यास प्रतिबंध आम्ही करूं शकतों " अशी भाषा मि. सेलर ह्यांनीं वापरली आहे. अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील व्यापारी संबंधांत कडवटपणा निर्माण होत आहे, ह्याचें हें लक्षण आहे आणि जागतिक शांतता व पुनर्घटना ह्यांच्या दृष्टीनें तें निश्चितपणें समाधानकारक नाहीं.

अमेरिकेंत ब्रिटिश धोरणाबद्दल माजलेल्या असंतोषाचे पडसाद तेथील वृत्तपत्रांतहि आढळून येतात. " हिंदी लोकांस उपयोगी पडण्याजोगी कोणतीहि जिन्नस शिल्लक ठेवूं नये अशी आसाममधील अमेरिकन लष्करावर अधिकृत रीत्या सक्ती करण्यांत आली ह्याचा प्रत्यक्ष, सबळ, सिद्ध करण्याजोगा पुरावा मांडतां येईल " असा उघड आरोप पॉल मेलन ह्यांनीं आपल्या एका लेखांत केला आहे; आणि त्यास अमेरिकाभर प्रसिद्धी मिळाली आहे. अमेरिकन वैद्यकीय उपचाराचें सामान हिंदी लोकांच्या हातीं लागूं नये, ह्यासाठी तें नष्ट करण्यांत येत आहे; रसायनें आणि औषधें पुरून टाकण्यांत येत आहेत आणि शस्त्रक्रियेचीं उपकरणें खास तयार केलेल्या ठिकाणीं पद्धतशीरपणें मोडून टाकण्यांत येत आहेत; डायरेक्ट करंटची वीज निर्माण करणारे जनरेटर्स निरुपयोगी करून टाकण्याचे प्रकार उघडकीस आले आहेत; ६,००० स्विस घड्याळांचा चुरा करण्यांत आला आहे आणि वैमानिकांचे उन्हाचे चष्मे स्टीम रोलराखाली चिरडून टाकण्यांत आले आहेत, अशा तऱ्हेचीं विधानें मि. मेलन ह्यांनीं केलीं आहेत. तीन मोटारी पावसाळ्यांत एका मिशनरी कँपमध्यें ठेवण्यांत आल्या होत्या. मिशनऱ्यांनीं त्या मागितल्या असतांना, डायनामाइटनें त्यांचा निकाल लावण्यांत आला असाहि एक आरोप आहे. ब्रिटिशांच्या आदेशानुसार हिंदुस्थानांतील अमेरिकन मालाची अशी वासलात लावण्यांत येत आहे, अशी ही तक्रार खरी आहे, का तो निव्वळ अमेरिकन प्रचार आहे ? हिंदी इस्पितळांसाठी अमेरिकन वैद्यकीय सामान व इस्पितळें हीं उपलब्ध करून मिळावींत ह्याविषयीं हिंदी पुढाऱ्यांचे प्रयत्न चालू असतांना दुर्मिळ व महाग अशीं उपचाराचीं साधनें पद्धतशीरपणें नष्ट करण्यांत येत आहेत ह्या आरोपास हिंदुस्थान सरकारनें तात्काळ उत्तर देणें आवश्यक आहे. बंगाल सरकार व अमेरिकन लष्करी अधिकारी ह्यांचेमध्यें एक करार झाला असून, त्याचे अन्वयें बंगाल सरकार अमेरिकन इस्पितळांचें सामान विकत घेणार असल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें, नाश करण्यांत येत असलेल्या मालाबद्दल व शिल्लकी मालाच्या उठावाबद्दल हिंदुस्थान सरकारचे पुरवठा मंत्री, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं खुलासा केला आहे. अमेरिकेचा माल हिंदुस्थानांत शिल्लक आहे, त्याचा उठाव कसा करावा, ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकार व अमेरिकन प्रतिनिधी ह्यांचेमध्यें करार झाला असल्याचें त्यांनीं सांगितलें आणि मालाचा नाश करण्यांत येत आहे, अशा अर्थाच्या उठलेल्या अफवांचा त्यांनीं इनकार केला. ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांच्या व्यापारी चढाओढीमुळें, प्रत्यक्ष हिंदुस्थानांत शिल्लक असलेला अमेरिकन माल आम्हांस मिळूं शकूं नये, हें चमत्कारिक दिसतें. अमेरिकन माल हिंदी लोकांस मिळूं दिला, तर त्या प्रमाणांत ब्रिटिश माल कमी खपेल, हा युक्तिवाद प्रस्तुत प्रकरणाच्या मुळाशीं तर नाहींना ? अमेरिकेंत ह्यासंबंधांत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांच्या बुडाशीं सत्याचा अंश नसून केवळ कडवटपणाच असेल, तर गोष्ट वेगळी. परंतु ह्या कडवटपणाचा हिंदी आर्थिक हितसंबंधांवर अनिष्ट परिणाम न होवो !

# राष्ट्रीय हमरस्ते व नवीन लोहमार्ग यांच्या सरकारी योजना

### रचना व व्यवस्था मध्यवर्ती सरकारकडे

युद्धोत्तर पुनर्घटनेच्या प्रांतोप्रांतींच्या कार्यास मदत म्हणून आणि सर्व देशभर जमिनीवरील वहातुकीची योजना एकसूत्री व व्यापक अशी आंखली जावी या हेतूनें हिंदुस्थानच्या मध्यवर्ती सरकारनें देशव्यापी वाहतुकीच्या राष्ट्रीय हमरस्त्यांची रचना कर-ण्याचें व व्यवस्था ठेवण्याचें कार्य स्वतःकडे घेतल्याचें शुक्रवार ता. २।११।४५ रोजीं भरलेल्या वाहतुक सल्लागार समितीच्या बैठकींत जाहीर केलें आहे.

### तात्पुरती व्यवस्था

वरील योजना हिंदुस्थानच्या राजकीय घटनाविषयक प्रश्नांच्या कोणत्याहि नवीन व्यवस्थेच्या आड येऊं देण्यांत येणार नाहीं, व तिची अंमलबजावणी १ एप्रिल १९४७ पासून व्हावयाची आहे. परंतु देशांतील आर्थिक मंदीस आळा घालण्यासाठीं अथवा कामगारांना कामाचा पुरवठा करण्यासाठी जर राष्ट्रीय हम-रस्त्यांच्या बांधणीचें वगैरे काम त्वरित हातीं घेणें आवश्यक ठरलेंच तर मध्यवर्ती सरकार चालू घटकेपासून त्या संबंधीची जबाबदारी आपल्याकडे घेणार आहे.

### योजनेचें उद्दिष्ट

ह्या नवीन व्यवस्थेमुळें प्रांतिक सरकारांच्या खर्चांत जी बचत होणार आहे, तिचा विनियोग जिल्ह्याजिल्ह्यांतील गांवोगांवींच्या रस्त्यांचें संवर्धन करण्याकडे व्हावयाचा असून, मध्यवर्ती सरकार-कडून पुनर्घटनेच्या एकंदर कार्यासाठी जी सर्वसामान्य मदत होणार आहे तिच्यापैकीं कांहीं पैसाहि या कार्यास लावला जाणार आहे.

### राष्ट्रीय हमरस्ते व त्यांची समरचना

राष्ट्रीय हमरस्ते म्हणजे प्रांतोप्रांतींच्या मोठमोठ्या शहरांना जोड-णारे देशव्यापी वहातुकीचे मार्ग होत. सध्यां त्यांची लांबी सुमारें १८,००० मैल असून त्यापैकीं अंदाजे १५,००० मैलांचा रस्ता ब्रिटिश हद्दींतून व सुमारें ३,००० मैलांचा रस्ता संस्थानी हद्दींतून जात आहे. संस्थानी हद्दींतून जाणाऱ्या रस्त्यांची जबाबदारी मध्यवर्ती सरकार घ्यावयास तयार नाहीं. परंतु जर एकादें संस्थान आर्थिक दृष्ट्या असमर्थ असेल व त्यामधून जाणारा रस्ता आंतर-प्रांतीय रस्त्यांना जोडणार असेल, तर तेवढ्यापुरती जबाबदारी मध्यवर्ती सरकार योग्य अटी ठरवून स्वीकारणार आहे.

राष्ट्रीय हमरस्त्यांची रचना, त्यांवरील पूल, त्यांची रुंदी व बांधणी यांचे दृष्टीनें सर्व देशभर सारखी ठेवण्यांत येणार आहे. मात्र वहातुकीचे कमी-अधिक प्रमाण व मोठमोठ्या शहरांचें व बाजार पेठांचें सान्निध्य यांना अनुसरून त्या त्या ठिकाणांना अनुकूल अशी बांधणी व रुंदी ठेवण्यांत यावयाची आहे.

### राष्ट्रीय हमरस्त्यांवर जकात नाहीं !

महत्त्वाची गोष्ट अशी कीं, ज्या मोटारवाहनांचे प्रांतिक करभार भरले गेलेले आहेत, त्यांना हमरस्त्यांवर कोणतेहि कर अथवा जकाती भराव्या लागणार नाहींत. ही सवलत फक्त मोटा-रींनाच देण्यांत आली आहे. शिवाय एकादा फार मोठ्या खर्चाचा पूल वगैरे बांधला असल्यास त्याचा खर्च निघून येण्यासाठी तात्पुरते कर बसवण्याचा अधिकार राखून ठेवण्यांत आला आहे व वरील करविषयक योजनांच्या दृष्टीनें आवश्यक त्या दुरुस्त्या मोटारींच्या कायद्यांत करण्यांत येणार आहेत.

### रेल्वे व मोटारी यांचें सहकार्य

रेल्वे वाहतुक व मोटार वाहतुक ही एकमेकांस मारक न होतां पूरक व्हावी व त्या दृष्टीनें मोटार वाहतुकीची व्यवस्था व नियंत्रण करण्यासाठींहि सरकार मोटारविषयक कायद्यांत दुरुस्त्या करणार आहे. मोटारवाल्यांना नवीन परवाने सुद्धां या योजनांना बाधक न होतील अशा रीतीनें देण्यांत येणार आहेत. रेल्वे व मोटारी यांच्यांत घातुक चढाओढ होऊं नये यासाठीं संयुक्त कंपन्या प्रस्थापित करण्यांत येणार आहेत.

### माल वहातुक

रेल्वे व मोटारी यांच्यांत माल वहातुकीच्या बाबतींत असें धोरण ठेवण्यांत येणार आहे कीं, सुमारें ५० ते १०० मैलां-पर्यंतच्या प्रादेशिक माल वहातुकी मोटारींतून व्हावयास हरकत घेण्यांत येणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर मोटारींचा सर्वत्र अप्रति-हत संचार लोहमार्ग नसलेल्या विभागांत मोठाच फायद्याचा व सार्वजनिक उपयोगाचा आहे असें मान्य करण्यांत आलें आहे. पण १०० मैलांपलीकडे मोटार वाहतुक विशेष कारणाशिवाय स्वीकारली जाणें योग्य नाहीं व म्हणून तीस परवाने सहसा दिले जाणार नाहींत.

### मुख्य रस्ते

हिंदुस्थानांतील प्रचलित हमरस्त्यांमध्यें जे खंड पडलेले आहेत, ते जोडण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत येणार आहे. उदाहणार्थ, मुंबई ते कलकत्ता मार्ग पुरा करण्याच्या दृष्टीनें संबळपूरपासून एक ३०० मैलांची सडक बांधणें आवश्यक आहे. तें काम आधीं सुरू करण्यांत येणार आहे.

### नवे लोहमार्ग

पुढील ७ वर्षांत ६० कोट रुपये खर्च करून सुमारें २,८०० मैल लांबीचे नवे लोहमार्ग तयार करण्यांत यावयाचे आहेत. सध्यां हिंदुस्थानांत असलेल्या रेल्वेमार्गांची लांबी एकूण ४१,००० मैल आहे. त्यामध्यें सुमारें ५,००० मैल लांबीची भर घालणाऱ्या योजना आंखण्यांत येत आहेत. रेल्वे वाहतुकीच्या नवीन योजनां-मध्यें नवीन रस्ते बांधणें, प्रचलित मार्गांवरील झिजलेली साधन-सामुग्री नवी बसवणें आणि छोट्या मापांच्या रुळांऐवजीं मोठ्या मापांचे रूळ बसवणें इत्यादि गोष्टींचाहि समावेश होतो.

सध्यां मुंबई व सिंध यांना जोडणारी मोठ्या मापाची रेल्वे सुरू करणें व दक्षिण हिंदुस्थान व उत्तर हिंदुस्थान यांमध्यें चालू असलेल्या छोट्या मापाच्या रेल्वे मार्गांची जुळवणूक करणें, या दोन योजना प्रामुख्यानें चर्चिल्या जात आहेत.

यापूर्वी हिंदुस्थानांत लोहमार्गांची जी वाढ झाली तिला कारणें म्हणून दाट लोकवस्तीचे विभाग व शहरें एकमेकांस जोडणें; व्यापारी पेठांचीं शहरें व उत्पादनाचीं अथवा आयातीचीं केंद्रें एकमेकांस जोडणें व दुष्काळी मुलुखांत मदत धाडण्यासाठीं वाहतुकीच्या सोयी करणें आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे राज-कीय प्रभुत्व अबाधित राखण्यासाठीं सोइस्कर सैन्यवाहतुकीची कडेकोट तयारी राखणें वगैरे बाबी विचारांत घ्याव्या लागत.

आतां नव्या युगांत जमिनीवरील सडका जर उत्तम परिस्थि-तींत राखल्या जातील तर केवळ लोहमार्गांवरच औद्योगिक प्रग-तीची मदार अवलंबून राहणार नाहीं. रेल्वेशिवाय इतर वाहतु-कीच्या साधनांकडूनहि महत्त्वाची कामगिरी कमी खर्चांत करवून घेता येऊं शकेल. यासाठीं नवीन जे लोहमार्ग बांधावयाचे ते शक्य तोंवर जेथें सडकांचा उपयोग चांगलासा होणार नाहीं अशा ठिकाणीं बांधण्याचा सरकारचा विचार आहे व म्हणून लोहमार्गा-संबंधींच्या पुढील योजना आंखण्याचें काम राष्ट्रीय हमरस्ते बांध-ण्यासंबंधींच्या योजना निश्चित झाल्यावरच हातीं घेण्यांत येणार आहे.

—स. वा. दातार.

# स्फुट विचार

### नॅशनल प्लॅनिंग कमिटीचे महत्त्वाचे ठराव

नॅशनल प्लॅनिंग कमिटीची सभा मुंबई येथें पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच भरली होती. कमिटीनें आर्थिक विषयांवर महत्त्वाचे अनेक ठराव मंजूर केले, त्यांत हिंदुस्थानांतील विदेशी भांडवल-गुंतवणुकी संबंधाचा ठराव महत्त्वाचा आहे. हिंदी शेती, खाणी व कारखाने ह्यांत बरेंच विदेशी भांडवल गुंतलें आहे, त्याचा परिणाम हिंदी आर्थिक व राजकीय जीवनावर विदेशी हितसंबंधाचा पगडा बसण्यांत झाला आहे आणि त्या कारणानें राष्ट्रीय प्रगतीस अडथळा आला आहे, असा अभिप्राय कमिटीनें व्यक्त केला. हिंदुस्थानाच्या औद्योगिक वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी भांडवलाची आवश्यकता आहे, परंतु सरकारनें उभारलेल्या कर्जाचे द्वारांच तें मिळविण्यांत यावें; हिंदी उपक्रमांत विदेशी भांडवलास मालकी हक्क व व्यवस्थेंत हात प्राप्त होणार नाहीं अशी दक्षता बाळगली पाहिजे, असा कमिटीचा आग्रह आहे. हिंदुस्थानाची पत फार मोठी असून, भांडवल मिळण्यास त्यास अडचण पडणार नाहीं, असा कमिटीस विश्वास आहे. हिंदी आर्थिक प्रगतीस बंधनकारक होणारीं घटना कायद्यांतील कलमें रद्द करण्याची कमिटीनें मागणी केली आहे. ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हिताचे रक्षणासाठी घातलेले हे निर्बंध दूर व्हावे, अशा विषयीं बोलणीं हिंदुस्थान सरकारचे नियोजन मंत्री सर आर्देशीर दलाल ह्यांनीं तीन महिन्यांपूर्वी इंग्लंडांत जाऊन केलीं, तीं निष्फळ झालीं असल्याचें सुप्रसिद्ध आहे. हिंदुस्थानाचें येणें पौंड स्टर्लिंगांतच इंग्लंडमध्यें साठलें असल्याकारणानें, इंपीरिअल प्रेफरन्स म्हणजे साम्राज्यांतर्गत देशांस प्राधान्य देण्याचें धोरण आपोआपच अंमलांत येऊं पहात आहे. त्याबद्दल कमिटीनें तीव्र नापसंती व्यक्त केली. ह्या स्टर्लिंगमधील शिलकांमुळें, हिंदुस्थानाचा बाहेरील जगाशीं संबंध तुटण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. ह्या शिलकांत आतां काट मारण्याची भाषा इंग्लंडमध्यें बोलली जात आहे. हिंदुस्थानाच्या वाजवी हक्कांची पायमल्ली सहन केली जाणार नाहीं, अशी त्याबाबत स्पष्ट सूचना कमिटीनें नमूद केली आहे.

---

### कापडावरील नियंत्रण कायम रहाणार

हिंदुस्थान सरकारचे डेप्युटी टेक्स्टाईल कमिशनर, श्री. बी. सी. पटेल ह्यांनीं आपल्या रेडिओवरील भाषणांत सरकारनें नियंत्रणें काढून घेण्यासंबंधाच्या व्यापारी वर्गांतील भीतीचा उल्लेख करून घाईनें सरकार कांहींच करणार नाहीं, असा खुलासा केला. सबंद जगांतच कापडाचा तुटवडा पडला असल्याकारणानें कित्येक वर्षें परदेशी कापडाची आयात होणार नाहीं. हिंदी उत्पादन मागणी पुरी पाडण्याइतकें नसल्याकारणानें कोणत्यातरी स्वरूपांत कापडाचें वाटप बराच काळ नियंत्रित रहाणार, असें त्यांनीं सांगितलें. कापड आणि सूत ह्यांच्या नियंत्रणामुळें त्यांच्या किंमती मर्यादेंत आल्या आहेत. मार्च १९४३ च्या मानानें आज कापडाची किंमत सुमारें निम्मी झाली आहे. युद्धापूर्वीच्या मानानें हिंदी उत्पादन ३०% वाढलें आहे. चांगल्या दर्जाच्या कापडास मागणी वाढली आहे. परंतु त्याचें उत्पादन मात्र अपुरें आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व गिरण्या तें कापड आज काढूं शकत नाहींत व त्यांस लागणारी यंत्रसामुग्री नवी बसवावयाची म्हटलें, तरी कांहीं वर्षें त्यासाठी थांबावें लागणार हें उघड आहे. जाडेंभरडें कापड व हातमागावरील कापड ह्यांचा पुरवठा सध्याच्या परिस्थितींत असमाधानकारक नाहीं, असें मत श्री. पटेल ह्यांनीं व्यक्त केलें. विशिष्ट प्रकारच्या कापडाचा हट्ट न धरतां जें उपलब्ध असेल तें कापड गिऱ्हाइकानें घ्यावें व पुढें नुकसान येईल, ह्या भीतीनें कापड साठविण्याची कुचराई न करतां मिळेल तें कापड दुकानदारांनीं साठवावें असा श्री. पटेल ह्यांचा गिऱ्हाइकांना व व्यापाऱ्यांना सल्ला आहे. विलायती कापड इतक्यांत येऊं लागणार नाहीं व कापड वाटपावरील नियंत्रण कांहीं काळ चालू रहाणार; तेव्हां आहे त्या परिस्थितीबद्दल तक्रार करूं नका आणि मिळेल त्यांत समाधान माना, असा त्याचा निष्कर्ष आहे.

---

### दुष्काळजन्य मृत्यू थांबविल्यानें जबाबदारी संपत नाहीं

हिंदुस्थानांतील तांदळाचें उत्पादन २३% वाढल्याखेरीज हिंदुस्थान तांदळाचे बाबतींत स्वयंपूर्ण होणार नाहीं, असें सर जॉन वुडहेड, ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतेंच सांगितलें. म्हणजे, तांदळाचें उत्पादन ८० लक्ष टनांनीं वाढलें पाहिजे, असा त्याचा अर्थ झाला. तांदूळ, गहूं, साखर इत्यादींचें दर एकरीं उत्पादन वाढविण्यास पुष्कळ वाव आहे, त्याचप्रमाणें मासे पकडण्याचा धंदाहि सुधारला पाहिजे, असें ते म्हणाले. १९३० मध्यें शेतकी मालाच्या किंमती खालीं जाऊन मंदी आली, तिची पुनरावृत्ति झाल्यास हिंदुस्थानाची प्रगति थंडावल्याविना रहाणार नाहीं असें मत त्यांनीं व्यक्त केलें. त्यावर उपाय म्हणजे किंमती स्थिर राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गहूं आणि तांदूळ ह्यांच्या किंमती ह्यासंबंधांत विशेष महत्त्वाच्या आहेत. दुष्काळामुळें मृत्यू घडून येऊं न देण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारनें गेलीं १०० वर्षें स्वीकारलेली आहे, ह्याची आठवण सर जॉन वुडहेड ह्यांनीं करून दिली आहे. केवळ मृत्यू टाळणें, एवढ्यानेंच भागत नाहीं; प्रत्येकास पुरेसें अन्न उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारनें पत्करली पाहिजे. शेतीच्या उत्पादनांत वाढ व औद्योगीकरण हे त्यावरील दोन उपाय आहेत. औद्योगीकरणामुळें खेडेगावी जनतेचें शेतीवरील अवलंबन कमी होईल व तेथील बेकारीस थोडा फार आळा बसेल. शेतीचें उत्पादन वाढविण्यास खताचा पुरवठा सुधारला पाहिजे, सुधारलेल्या जातींच्या बियांचा प्रसार केला पाहिजे आणि पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला पाहिजे, एवढेंच नव्हे तर सरकारनें मलेरियाचा उपद्रव थांबवून पिकें आणि गुरेंढोरें ह्यांचा संहार करणारे रोग ह्यांचाहि नायनाट केला पाहिजे असें सर जॉन ह्यांनीं सांगितलें.

---

### ब्रिटिश मालाचें स्वागत—अमेरिकन मालाच्या आयातीवर नियंत्रण

हिंदुस्थानांत परदेशांतून मालाची आयात लवकरच सुरू होईल. परंतु पौंड-स्टर्लिंग गटांतील देशांचा म्हणजे मुख्यतः ग्रेटब्रिटनचाच माल प्रथम येऊं लागेल. डॉलर्समध्यें पैसे देण्याचें हिंदुस्थानास आर्थिक सामर्थ्य असलें तरी राजकीय अधिकार नसल्याकारणानें, अमेरिकन मालाच्या आयातीवरील नियंत्रणें सत्वर दूर होणार नाहींत. पौंड-स्टर्लिंग गटांतील देशांजवळ निर्गत करण्यास पुरेसा माल नसल्याकारणानें, अमेरिकेचा माल हिंदुस्थानांत उतरण्यावर कडक नियंत्रणें असतांहि, त्या मालाची

आयात युद्धकाळांत कमालीची वाढली. १९४४-४५ मध्यें हिंदुस्थानानें जितका ब्रिटिश माल घेतला त्यापेक्षा १० कोटींचा जास्त माल अमेरिकेकडून घेतला. चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्ट्स, मि. इनिस, ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें ऑस्ट्रेलियांतून लोकरी माल व ग्रेट ब्रिटनमधून कपबशा, काचेचें सामान, इत्यादि येऊं लागण्यास फारसा अवकाश नाहीं. ब्रिटिश रेडिओहि येण्याच्या मार्गावर आहेत. कांहीं थोडे अमेरिकन रेडिओ व रेफ्रिजरेटर्स हिंदुस्थानांत येण्यास परवानगी दिली जाईल.

### डे. ए. सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज ह्यांचा रजत महोत्सव

डेकन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज ह्यांचा रजत महोत्सव ता. १७ नोव्हेंबर रोजीं पार पडला. महोत्सवास महात्मा गांधी व पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचे संदेश आले होते. त्यामुळें व मुख्य पाहुणे सर तेजबहादुर सप्रू ह्यांच्या उद्बोधक भाषणामुळें, समारंभांत भाग घेणारांचें मूळ संस्थापकांच्या भूमिकेकडे प्रामुख्यानें लक्ष वेधलें गेलें. सर तेजबहादुरांनीं, "न्यायमूर्ति रानडे ह्यांच्या इतका प्रभावी विचारप्रणेता गेल्या पन्नास वर्षांत झाला नाहीं" असे उद्गार काढून टिळक–आगरकर–गोखले ह्यांचा राष्ट्रीय बाणा व ध्येयनिष्ठा ह्याबद्दल आदर व्यक्त केला आणि डे. ए. सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज ह्यांच्यासारख्या स्वार्थत्यागाच्या भूमिकेवर चालविलेल्या शिक्षण संस्था सबंद हिंदुस्थानांत कोठेंहि आढळणार नाहींत, असें सांगितलें. आगामी महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचें त्यांनीं स्वागत केलें आणि शिक्षणांत स्थानिक भाषेच्या माध्यमाचें अगत्य प्रतिपादिलें. शिक्षणांचेबाबत स्वावलंबन आणि राष्ट्रीय वृत्ति ह्यांचा पाठ सबंध हिंदुस्थानास देणाऱ्या ह्या संस्थांनीं आतां बदलत्या आर्थिक परिस्थितीस अनुसरून शिक्षणाची व्यवस्था करावी, अशी त्यांनीं सूचना केली. प्रा. महाजनी ह्यांनीं, "मूळ संस्थापकांचें ध्येय आमच्यापुढें सतत कायम असून, त्या दिशेनें प्रगति करण्याचा आमचा प्रयत्न अखंड चालू राहील," असें सांगितलें. डे. ए. सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज ह्यांचे हातून आतांपर्यंतच्या लौकिकास साजेल अशी कामगिरी पार पडो, असें आम्हीं चिंतितों.

### शंभर वर्षांपूर्वींचीं रेल्वे उतारूंवरील कडक नियंत्रणें

सध्याच्या वाहतुकीवरील नियंत्रणाचे काळांत, लिव्हरपूल अँड मँचेस्टर रेल्वेचा १८३७ मधील नियम मनोरंजक वाटेल. प्रस्तुत नियम खालीलप्रमाणें होता:—"लिव्हरपूल ते मँचेस्टर प्रवास करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक उतारूनें, निघावयाच्या स्टेशनचे मास्तराकडे आगाऊ २४ तास अर्ज करून आपलें नांव, पत्ता, धंदा आणि प्रवासाचें कारण हीं त्यांत नमूद केलीं पाहिजेत. योग्य व कायदेशीर कारणासाठींच उतारू प्रवास करीत असल्याची खात्री करून घेतल्यावर स्टेशन मास्तर अर्जदारास तिकीट देईल"


—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

विमा—काम—बक्षिसें

'सह्याद्रि' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना!
'सह्याद्रि' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती!!
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

-शाखा- काळभोर आणि कं., पुणें. | अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा. | गो. ग. सौंदणकर मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

पैसा आणि ज्ञान वाढवा!

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, नं. २७ मुंबई.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
सिंदिया स्टीम रु. १–४–० दि. १९-११-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १२।११।४५ | मंगळवार १३।११।४५ | बुधवार १४।११।४५ | गुरुवार १५।११।४५ | सोमवार १९।११।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | बाजार बंद | २३८८–१२ | बाजार बंद | २३७१—४ | २३७६—४ |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ४३७—० | | ४३३—८ | ४३५—० |
| २२०१; १६९५ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | २०११—४ | | २००६—४ | २००५—० |
| ७६५; ५३३ | ९—–० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | | ६२८—० | | ६२३—० | ६२४—८ |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | | ५८३—८ | | ५८३—० | ५७८—८ |
| ४९८; ३६१ | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | | ४०५—८ | | ४०३—० | ४०५—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | | ३०९—० | | ३०६—८ | ३०६—८ |
| ३९४; २८२ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | | ३१४—० | | ३११—० | ३१०—० |
| ३०५; २१८ | १२–०–० S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | | ३१८—८ | | ३१४—० | ३१५—० |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | | ४–४—३ | | ४–४—० | ४–२—३ |
| २१-१४; १३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | १५–०–० | | १४–१३–० | १४–१३–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | | ३–०—६ | | ३–०—० | ३–०—० |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ७४८–१२ | | ७४३–१२ | ७४६—४ |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २३३—८ | | २३०—८ | २३१–१२ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २३२—० | | २३२—० | २३०—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ५२७—८ | | ५२५—० | ५१८–१२ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | ४०—१ | | ३९—९ | ३८—९xd |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०३—४ | | १०३—६ | १०३—६ |

शुक्रवार दि. १६–११–४५ ला 'बकरीद'निमित्त सुटी होती.

सोमवार दि. २९–१०–४५ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०२—५ | बरोडा | १६४–० | आंध्रा व्हॅली | १८३०–० | अलकॉक | ४५३–१२ |
| १९५१–५४ | १०१–१२–६ | सेंट्रल | ९४–८ | बॉम्बे ट्रॅम | १५३–८ | बॅाबे स्टीम | ६१७—८ |
| १९५७ | १००—११ | इंडिया | २१८–० | टाटा हायड्रो | २१८–० | न्यू इंडिया | ८८—० |
| १९६३–६५ | ९९–८ | इंपी० | २३४७–८ | टाटा पॉवर | १९४७–८xd | शिवराजपुर | ५५—० |
| १९६६–६८ | ९८—१२ | | ५७८–१२ | | | टाटा केमिकल | १७—४ |
| | | रिझर्व्ह | १५४—४ | | | टाटा ऑईल | ८२—८xd |
| | | युनियन | १०—३ | | | | |

# सहकारी दिन

## मुंबई

मुं. प्रां. सहकारी बँकेच्या नोकर वर्गाचें अभ्यास मंडळ, प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट आणि मुंबईतील सहकारी खात्याच्या कचेऱ्या ह्यांनीं ता. ३ रोजीं संयुक्तपणें सहकारी दिन सारस्वत बँकेचे चेअरमन श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा केला. मुख्य ठराव मांडतांना, इन्स्टिट्यूटचे सुपरिंटेंडेंट, श्री. आर. एम. तळपदे, ह्यांनीं आर्थिक व सामाजिक समता हें सहकारी चळवळीचें मुख्य ध्येय आहे असें सांगितलें. मोठ्यास लहानाची पिळवणूक करतां येऊं नये, अशीच सहकारी संघटना असल्याचें श्री. आर. एन. त्रिवेदी हे म्हणाले. आपल्या देशाच्या आर्थिक परिस्थितीस सहकार हाच उत्कृष्ट उपाय आहे, असा इं. को. असोसिएशनचे सेक्रेटरी श्री. रेणु ह्यांचा मुद्दा होता. सहकारी बाणा वाढविण्याचा आपण प्रयत्न करून त्यासाठी संघटना सुधारली पाहिजे असा अध्यक्षांनीं समारोप केला. मनुष्यजातीची संहारक शक्ति नियंत्रित करतां यावी, हा सहकारी चळवळीचा उद्देश आहे, असें आभारप्रदर्शन करतांना श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं सांगितलें.

## पुणें

पुणें सें. को. बँकेच्या विद्यमानें पुणें येथें ता. २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर अखेर सहकारी सप्ताह साजरा करण्यांत आला. त्यांत श्री. शं. रा. भागवत, श्री. म. वों. विद्वांस, श्री. य. वों. ओगले, श्री. के. व्ही. जोशी, प्रा. द. गो. कर्वे, इत्यादींचीं भाषणें झालीं. पुणें जिल्ह्यांत सात ठिकाणीं सभा भरविण्यांत आल्या, त्यांत भाग घेण्यासाठी मध्यवर्ती बँकेची कांहीं डायरेक्टर व अधिकारी मंडळी मुद्दाम गेली होती. ता. ३० ऑक्टोबरच्या स्त्रियांच्या सभेंत श्री. शांताबाई मेहेंदळे ह्यांनीं पुण्यांत स्त्रियांनीं चालविलेल्या सहकारी संस्थांस येत असलेल्या अडचणींबाबत विचार पुढें मांडले. ता. ३ नोव्हेंबर ह्या मुख्य दिवशीं सहकारी खात्याचे जॉइंट रजिस्ट्रार, श्री. पी. जे. चिन्मुळगुंद हे अध्यक्ष होते. प्रथम बँकेचे चेअरमन रा. सा. य. द. लोले ह्यांनीं जिल्ह्यांतील सहकारी चळवळीबाबत समालोचनात्मक भाषण करून बँकेनें पुढील वर्षासाठी आखलेल्या कार्यक्रमाविषयीं थोडक्यांत विवेचन केलें. नंतर प्रो. शं. रा. भागवत, श्री. दा. वा. पोतदार, सौ. इंदिराबाई देवधर व श्री. वि. ग. तिखे यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं सहकारी चळवळीवर निष्ठा ठेवून तिचे मार्फत शेतकरी व नागरिक यांनीं व्यवहार चालविल्यास त्यांतच त्यांचें कल्याण होईल असें इतर देशांतील अनुभवावरून प्रतिपादन केलें.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा
(४) बेलापूर. पे-ऑफिसः-खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : ३५,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

(शेड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस : पुणें शहर

**—भांडवल—**

| | |
|---|---|
| अधिकृत | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १२,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,००,००० वर |

नवीन विक्रीस काढलेलें रु.५ लाखांचें भांडवल सर्व खपलें. आतां विक्रीकरतां शेअर्स नाहींत.

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोसले, श्री. व्ही. एच. देशमुख.

—शाखा—

डेकन जिमखाना, खडकी, मुंबई (फोर्ट), गिरगांव, जळगाव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगाव, फैजपूर (पे ऑफिस)

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर






व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः— द. ना. हेंजीब



नोगीचे डोंगर छाप

शुद्ध निलगिरी तेल.

नोगी आणि कं. मुंबई ४



डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.



सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



## आशा

Asha

सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

(स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली)

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

दि आयडिअल इन्स्टिटयूट

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—



लहान मुलांकरितां

## आर्कों

गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :

मंगळवार पेठ, कोल्हापुर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434




# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २८ नोव्हेंबर, १९४५ अंक ४७

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

अत्यंत गुणकारी—

**कामगार ब्राह्मी तेल**
**व**
**माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.**

म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट*
**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवच्यीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | “ Cencobank ” | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती व निरा**

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



## सारस्वत
## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१–१०–१९४५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. | १,६०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. | १,६४,००० |
| ठेवी ... | रु. | ५४,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. | ५८,००,००० |

शेअर विक्री चालू आहे.

सभासदांना जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट, अगर कॅश क्रेडिट देण्यांत येतें.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

## विविध माहिती

### विजयदिन

युद्धांत विजयी झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ २४ डिसेंबर, १९४५ हा दिवस विजयदिन म्हणून पाळण्यांत येणार असुन त्या दिवशीं सार्वजनिक सुट्टी असल्याचें जाहीर झालें आहे.

### महाराष्ट्र कारखानदार संघाचें मुंबई केंद्र

महाराष्ट्र कारखानदार संघाचें मुंबई केंद्र रविवार ता. १८ रोजीं उघडण्यांत आलें. ह्या केंद्राचे श्री. पु. ग. मराठे ( न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर ) हे चेअरमन आहेत.

### हिंदुस्थान सरकार आणखी कर्ज उभारणार

१९७०-७५ मध्यें फेडावयाचें २४ कोटी रुपयांचें तीन टक्क्यांचे कर्जरोखे हिंदुस्थान सरकार बाजारांत आणीत आहे.

### काटकसर करून थोडथोडी शिल्लक टाकावयास शिका

स्थानिक सरकारनें वरील उद्देशानुसार एक आठवडा प्रचार केला. जनतेला काटकसरीची संवय लागावी व गरीबांतल्या गरीब माणसाला देखील थोडीफार शिल्लक टाकण्याची संवय जडावी, हा प्रस्तुत उपक्रमाचा उद्देश आहे.

### अमेरिकेचें जपान व्यापणारें सैन्य

अमेरिकेचे चार लक्ष, साठ हजार सैनिक सध्यां जपान व्यापून बसले आहेत. त्यांतून हळूहळू थोडेसें सैन्य कमी करण्यांत येणार आहे.

### तेलाच्या खाणी चालविण्यासाठी नवी लिमिटेड कंपनी

एक कोट रुपये भांडवलाची एक कंपनी सिमला येथें स्थापन झाली आहे. हिंदुस्थानांत राकेल तेल पैदा होण्यासारख्या जमिनींतून पेट्रोल, रॉकेल व जळणाचीं तेलें काढून ही कंपनी त्याचा व्यापार करील. खाणींना लागणारी यंत्रसामुग्री लवकर मिळावी याबद्दल खटपट चालू असून अमेरिकेंतून ह्या कामाचे वाकबगार लोक मिळविण्यांत येणार आहेत.

### कापडाचें रेशनिंग आणखी दोन वर्षें रहाणार

मि. पिअर्स, असिस्टंट कंट्रोलर, सिव्हिल सप्लाईज, ह्यांनीं कराची येथें एका मुलाखतींत नुकतेंच सांगितलें, कीं सिंध सरकार कराचींत येणाऱ्या परदेशी कापडापैकी ३० टक्के कापड सिंधसाठी ठेऊन घेईल व उरलेलें कापड पंजाब, बलुचिस्तान, वायव्य सरहद्दप्रांत व नवी दिल्ली यांत वाटून देण्यांत येईल. सध्याच्या परिस्थितीचा विचार करून मि. पिअर्सच्या मतें आणखी दोन वर्षें कापडाचें रेशनिंग चालू राहील. परदेशांतून इतक्यांतच मोठ्या प्रमाणावर कापड येणार नाहीं. कारण, अतिपूर्व व युरोपिअन देश ह्यांना त्या कापडाचा पुरवठा करावा लागेल व स्वदेशी गिरण्यांना अधिक कापडाचें उत्पादन करतां येणें शक्य नाहीं. त्यांच्या झिजलेल्या यंत्रांच्या ऐवजीं नवीं यंत्रें मिळण्यास फार दिवस लागतील.

### बक्षिस मिळविणाऱ्या बॉंडसच्या नंबरांचा निर्णय

हिंदुस्थान सरकारच्या पंचवार्षिक बिनव्याजी बक्षिसाच्या बॉंडसपैकी या सहामाहींतील बक्षिस मिळविणाऱ्या बॉंडसचे नंबर १५ जानेवारी १९४६ ला मुंबईंत जाहीर करण्यांत येतील. हे बॉंडस रिझर्व व इंपिरिअल बँकांतून मिळूं शकतात. सध्या शिल्लक असलेले बॉंडस खपल्यावर ही विक्री बंद करण्यांत येईल.

### जपानी बँकांची निरवा-निरव

३० सप्टेंबरपासून बंद केलेल्या जपानी बँकांपैकी कांहींच्या निरवानिरवीबद्दल जनरल मॅकऑर्थर लवकरच हुकूम काढणार आहेत. मिटसुइ, मिटसुबिशी, व सुमिटोमो या तीन कंपन्यांचा झाइबाटसु या नांवानें ओळखण्यांत येणारा संघ नोव्हेंबरांत विसर्जन करण्यांत यावयाचा होता. या तिन्ही बँकांची मालकी मिटसुइ घराण्यांत आहे. या घराण्यांत असलेले या तिन्ही बँकांचे शेअर बाजारांत आणण्यांत येतील व मिटसुइ हें नांवच नष्ट करण्यांत येईल. या नांवाखाली येणाऱ्या सर्व लहानमोठ्या कंपन्यांचे व्यवहारही अलग करण्यांत येतील.

### जनतेला १९४६ मध्यें पोलाद, सिमेंट, लाकूड व कोळसा अधिक मिळणार

रेलवे व इतर सर्व सरकारी खात्यांना व संस्थानांना लागणारें पोलाद पुरवून १९४६ मध्यें जनतेला पांच लक्ष पंच्यायशी हजार टन पोलाद पुरविण्याची सरकार व्यवस्था करणार आहे. १९४६ च्या पहिल्या सहामाहींत लोकांना दोन लक्ष एकाहत्तर हजार टन पोलाद मिळेल. लष्करी व इतर सर्व सरकारी खात्यांना सिमेंट पुरवून उरलेलें जनतेला देण्यांत येईल. साधारणपणें दरमहा १२५ पासून १३० हजार टन सिमेंट लोकांना देण्यांत येईल. त्याचप्रमाणें हल्लीं संरक्षण व इतर खात्याकडे लागणारे सहा लक्ष टन सागवानी लाकूडहि लोकांना देण्यांत येईल. कोळसाहि आतां हळू हळू अधिक मिळूं लागेल. १९४४ च्या पहिल्या नऊ महिन्यांपेक्षां १९४५ च्या गेल्या नऊ महिन्यांत १७ लाख टन कोळसा खाणींतून अधीक काढून देण्यांत आला, आणि १९४६ मध्यें अधिक मालाचे डबे मिळूं लागले म्हणजे जवळ जवळ ३ कोट टन कोळसा मिळूं शकेल व सरकारी खात्यांना व गिरण्यांना १६० लक्ष टन कोळसा देतां येईल. त्याचप्रमाणें विटा भाजण्याकरितां जरूरीच्या धंद्यांना पुरवूनहि अधिक कोळसा देण्याच्या प्रश्नाचाही सरकार विचार करीत आहे.

### विमा कंपन्यांचा स्तुत्य उपक्रम

मनुष्यप्राण्यास होणाऱ्या प्रमुख रोगांच्या कारणांचा अभ्यास करण्याकरितां अमेरिका व कॅनडा ह्यांतील १४३ आयुर्विमा कंपन्यांनीं १ कोटि, ९० लक्ष डॉलर्सचा एक संशोधन निधि निर्माण केला आहे. अमेरिकेंतील एकूण मृत्यूपैकीं एक तृतीयांशास कारणभूत होणाऱ्या काळजाच्या व इतर रोगांबाबत संशोधन करीत असलेल्या विद्यमान संस्थांस प्राधान्येंकरून सहाय करण्याच निधीचें धोरण राहील.

--एक्झिमाईट--
इसबावर रामबाण उपाय
--सोल सेलिंग एजंटस्--
दि पूना इंडस्ट्रियल एजन्सीज लि.
४७९, बुधवार, पुणें २.
ह्या पत्त्यावर मागणी करावी.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, दमडेरे बोळाजवळ, पुणें २

अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## कारखान्यांस लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती

### चढ-उतार दर्शविणारे इंडेक्स नंबर

किंमतीमधील तुलनात्मक चढउतार इंडेक्स नंबर्सच्या म्हणजे निदर्शक आकड्यांच्या सहायानें मोजण्यांत येतो व त्यासाठी रोजच्या उपयोगांतील विविध जिनसांच्या किंमतींची निवड करण्यांत येते. प्रारंभीं निवडलेली प्रत हीच पुढेंहि कायम राखावी लागते. ठराविक वेळीं किंवा ठराविक काळांत प्रत्येक जिनसाची प्रत्येक मणास किंवा टनास सरासरी किंमत किती होती, ह्याचा हिशेब करून तो निदर्शक आकड्यांचा पाया समजला जातो. म्हणजे, उदाहरणार्थ, ती किंमत १०० अशी मानली जाते आणि पुढें सरासरी किंमतींत बदल झाला म्हणजे त्याची ह्या १००शी तुलना करण्यांत येते. अशा तऱ्हेनें तुलनात्मक शतमानांचे निदर्शक आकडे तयार होतात. ज्या विशिष्ट वेळेस घेतलेल्या किंमती १०० आकड्याइतक्या समजल्या जातात, ती वेळ निवडतांना काळजी घ्यावी लागते; त्या वेळीं किंमती स्थिर असल्या म्हणजे तुलनेस सोइस्कर पडतें.

किंमती वाढत गेल्या म्हणजे इंडेक्स नंबरहि १०० पासून वर चढत जातो. अर्थात्, कांहीं जिनसांचे भाव वाढले तरी कांहीं जिनसांचे भाव पडणें अगदी शक्य असतें. ह्या चढ-उताराचा एकमेकावरील होणारा परिणाम हिशेबांत घेतला जाऊनच, असेरचे इंडेक्स नंबर तयार होतात. इंडेक्स नंबर हे शक्य तितके विश्वासार्ह व्हावेत एवढ्यासाठी, ज्या जिनसांच्या किंमती विचारांत घ्यावयाच्या त्या जिनसा प्रातिनिधिक स्वरूपाच्या असाव्यात, बऱ्याच जिनसांच्या किंमती हिशेबांत घ्याव्यात आणि घाऊक बाजारभावांचीच निवड करावी असें ठरलेलें आहे. कांहीं जिनसांचें महत्त्व इतरांपेक्षां ज्यास्त असतें आणि त्यांच्या किंमतीमधील चढ-उताराचा परिणाम विशेष परिणामकारक ठरतो ह्यासाठी अशा जिनसांस त्यांच्या महत्त्वाचे मानानें इंडेक्स नंबरच्या हिशेबांत प्राधान्य देण्याची पद्धति आहे. त्यांचें जितकें महत्त्व असेल, तितक्या पटीनें त्यांस गुणलें जातें. पायतणें किंवा चहा ह्यांच्या दहा पटीइतकें गव्हाचें महत्त्व असेल, धोतरें त्याच्या पाच पट महत्त्वाचीं असतील व साखरेचें महत्त्व तिपटी इतकें असेल, तर चहाचे मानानें त्यांच्या किंमती खालील प्रमाणें मांडल्या जातील:—

| | | | |
|---|---|---|---|
| गहू | ( १० ) | = | १,००० |
| धोतरें | ( ५ ) | = | ५०० |
| चहा | ( १ ) | = | १०० |
| साखर | ( ३ ) | = | ३०० |
| पायतणें | ( १ ) | = | १०० |
| | २० | | २,००० |

चहाची किंमत २०% वाढली, तर त्याचा इंडेक्स नंबर १०० चा १२० होईल, परंतु गव्हाची किंमतहि २०% वाढली, तर त्याचा इंडेक्स नंबर १,००० चा १,२०० होईल. गव्हाच्या विशिष्ट महत्त्वास अनुसरून त्यास १०० ऐवजीं १,००० इतकें मानण्यांत आलें व त्यामुळें एकूण वाढ मोजतांना, २० ऐवजी २०० हा आकडा आला. त्या प्रमाणांत, इंडेक्स नंबर किंमतीमधील परिणामकारक चढ वाढवून दाखवील, हें उघड आहे.

कारखान्यांत वापरण्यांत येणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमतीचे इंडेक्स नंबर तयार करून ते प्रत्येक आठवड्यास प्रसिद्ध करण्यास हिंदुस्थान सरकारनें आतां प्रारंभ केला आहे. ऑगस्ट, १९३९ असेर संपलेलें वर्ष हें तुलनेसाठी मूळ वर्ष धरण्यांत आलें आहे. एकंदर १९ जिनसांच्या किंमतींचा इंडेक्स नंबरमध्यें समावेश करण्यांत आला आहे. साच जिनसांच्या किंमतींचे इंडेक्स नंबर तयार होऊन प्रसिद्ध होऊं लागल्यास एक वर्ष लोटलें. आणखी तीन प्रकारच्या मालाचे इंडेक्स नंबर तयार करण्याचें कामहि आतां हातीं घेण्यांत येईल.

कपास, ताग, भुइमूग, इत्यादींस, त्यांच्या महत्त्वानुसार कच्च्या मालाच्या इंडेक्स नंबरमध्यें प्राधान्य देण्यांत आलें आहे. एकूण १०० च्या बेरजेंत कच्चें रेशीम, एरंडी, रबर, इत्यादींचें महत्त्व प्रत्येकीं १ मानलें, तर कच्च्या कपाशीस २८, कच्च्या तागास २२, भुइमुगास १२, कोळशास ६, असे गुण देण्यांत आले आहेत. त्यावरून, औद्योगिक कच्च्या मालांत कोणत्या कच्च्या मालाचें किती महत्त्व आहे, हें समजून येईल. ह्या सर्वांच्या किंमतीचा एकत्रित इंडेक्स नंबर ऑगस्ट, १९३९ असेर १०० मानला, तर तो मे, १९४५ मध्यें २३२·५; जून, १९४५ मध्यें २४४·५; जुलैमध्यें २४४·५ व ऑगस्टमध्यें २४२·४ असा झाला. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत तो २३८·१ झाला.

### रेलवेजचा पसारा

१९४६-४७ सालासाठी रेलवे स्टँडिंग कमिटीनें २३ कोट, ५७ लक्ष रुपये खर्च करण्याची मंजुरी दिली. यापैकी १९ कोट रुपये पुढें खर्च करण्यांत येतील. या रकमेपैकी ४ कोट, ५७ लक्ष रुपये खर्चून २० इंजिनें, १८१ बॉयलर्स, ९८३ पॅसेंजर गाडीचे डबे, २१९ मालगाडीचे डबे व एक आगबोट घेण्यांत येईल. यापैकी १४ बॉयलर्स व १२८ पॅसेंजरचे डबे हल्लीपेक्षां अधिक घेणार व बाकीची खरेदी हल्लींची मोडतोड झालेले डबे वगैरेंची तूट भरून काढण्यासाठी आहे. पॅसेंजर गाड्यांचे डबे बांधणें सागवानी लाकूड व खालचे पोलादी सापळे मिळण्यावर अवलंबून आहे. जुन्या पोलादी सापळ्यावरही कांहीं डबे बांधण्यांत येतील व अशावेळीं तिसऱ्या क्लासचे डबे आधी बांधण्यांत येतील. याचप्रमाणें १९४६-४७ सालामध्यें मशिनरी घेण्यासाठी कमेटीनें २१७ लक्ष रुपये मंजूर केले व सप्टेंबर १९४६ मध्यें सारा-सिराजगंज रेलवेचा फाटा सरकारनें बांधल्यास मिळविण्यास अनुमती देण्यांत आली.

### रेयॉन धागा तयार करणारी हिंदुस्थानांतील पहिली गिरणी

हिंदुस्थानांत रेयॉन धागा तयार करणारी एक गिरणी लवकरच मद्रासजवळ स्थापन करण्यांत येणार आहे. एका अमेरिकन फर्मकडे तिचें कंत्राट असून त्या फर्मचे तज्ञ गिरणीची उभारणी करतील व ते चालवितील. ह्या गिरणींत हिंदी इंजिनियर्सना गिरणी उभारण्याचें व चालविण्याचें शिक्षण देण्यांत येईल. ह्या गिरणीच्या उभारणीस मद्रास सरकारची मदत असून डॉलर एक्सचेंजचा फायदा मिळाल्यास या गिरणीमुळें दरवर्षी हिंदुस्थानांत येणाऱ्या १० लक्ष डॉलर्स किंमतीच्या रेयॉन धाग्याची आवक थांबेल. कारखान्याला लागणारी यंत्रसामुग्री सहा महिन्यांत हिंदुस्थानांत येऊन पोंचेल असा अमेरिकन फर्मच्या मुंबईमधील एजंटांचा अदमास आहे.

आमच्या वाचकांसाठीं

# सोपें केलेलें अर्थशास्त्र

[आमच्या वाचकांसाठी, अर्थशास्त्राच्या मुख्य तत्त्वांची सोप्या भाषेंत मांडणी करून त्यांचें सुबोध विवेचन करणारी प्रस्तुत लेखमाला आमचे मित्र, श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम, ह्यांनीं आमचे विनंतीवरून लिहिली आहे. रोजच्या वाचनांत येणाऱ्या आर्थिक घडामोडींचें आकलन चांगलें होण्यास ह्या लेखमालेच्या वाचनाचा उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे.]

लेखक:—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]


**प्राथमिक**—मनुष्य आपलें पोट भरण्याकरतां जो दैनंदिन उद्योग करतो त्याचा अभ्यास करणारें तें अर्थशास्त्र अशी अर्थशास्त्राची थोडक्यांत व्याख्या करतात. माणूस केवळ पोट भरून स्वस्थ रहात नाहीं. जीवन सुखावह व्हावें व सर्वांगीण उन्नति व्हावी याकरतां सामाजिक, राजकीय, धार्मिक, व वाङ्मयीन संस्थाही तो निर्माण करतो. पण ' आधी पोटोबा मग विठोबा ' या न्यायानें प्रथम पोटोबाला प्राधान्य' यावें लागतें व त्याच्या सर्वांगीण अभ्यासाकरतां, त्याची चिकित्सा परिपूर्ण करतां यावी येवढ्याकरता इतर गोष्टींचा विचार बाजूला ठेवून जो उद्योगाचा कारखाना माणूस चालू ठेवतो तेवढ्याचाच विचार करावा लागतो. हीच शास्त्रीय दृष्टि आणि ही कायम ठेवली तरच जे उद्योगाचे धागेदोरे लागेबांधे आहेत ते उलगडविणें व समजावून घेणें सुलभ होतें. पर्यायानें, असा अभ्यास करतांना व्यक्तिनिष्ठ भावनाविवशता अथवा विशिष्ट नीतीचा किंवा मूल्याचा आग्रह हीं दूर ठेवणें आवश्यक आहे. शास्त्र म्हटलें म्हणजे तें भावनाविरहितच असणार म्हणून कोणी अर्थजिज्ञासूवर कठोरतेचा अथवा राक्षसत्वाचा आरोप केला तर त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं.

**विषयस्वरूप**—प्रथमच सांगितलें कीं माणूस पोटाकरतां जो उद्योग करतो त्याचें शास्त्र तें अर्थशास्त्र. पण उद्योग म्हणजे काय? माणसें करतात त्या उद्योगाचा नमुना पहावयाचा झाला तर स्वतःच्या घरापासून बाजारपेठेपर्यंत एक चक्कर टाकली तर पांच पन्नास प्रकारचे उद्योग लोक करत असलेले आढळतील. कोणी दुकानदारी करतो आहे, कोणी नोकरीला निघाला आहे, कोणी मोलमजुरी करतोय, कोणी गिरणी चालवतो आहे, कोणी शाळा चालवतो आहे, एकादा घरमालक भाड्याची वसुली करतांना दिसेल, कोणी बँकेत शेअरवर मिळालेलें व्याज भरत असेल, तर एकादा निवृत्त सरकारी कचेरींतून नेमणूक आणावयास चालला असेल, सर्वांचा हेतु एक. पैसा मिळवणें. पैसा कशाला? एका विनोदी लोकगीतांत सांगावयाचें तर ' बायको करावयाला! बायको कशाला...पोरें व्हायला ' आणि मग ती सांभाळण्याकरता हा सगळा खटाटोप! संसाराला लागणारी सर्व सामुग्री पैशानें उपलब्ध होते. पैशाचा स्वयं असा उपयोग शून्यच असतो. एवंच माणूस स्वतःचें डोकें चालवून, हातपाय हालवून भोवताली व्यापारांतून आपल्या गरजा भागविणाऱ्या गोष्टी मिळविण्याच्या मार्गांत असतो.

पण गरज भागविण्याच्या क्रियेच्या मागें काय काय उपाधि लपलेल्या आहेत तें पहा. साधा एक साबण हवा म्हटलें तर कोणी तरी विकणारा दुकानदार पाहिजे, दुकानदार स्वतः कांहीं साबण तयार करीत नाहीं. तो एकाद्या कारखान्यांतून आणवतो व पैसा दोन पैसे नफा घेऊन गिऱ्हाइकाला विकतो. साबणाचा कारखाना गांवांत असला तरी त्याला हमाल, छकडा कांहीं तरी वाहन लागतें. परगांवाहून, परदेशांतून आणावयाचा तर त्याला आगगाडी, आगबोट इत्यादि पाहिजेत. म्हणजे वाहतूक उपलब्ध पाहिजे. वाहतुकीचीं साधनें निर्माण करणाऱ्यांचा विचार सोडून नुसतें साबण तयार करण्याकरतां लागणाऱ्या साधनांचा विचार करावयाचा तर त्याला कॉस्टिक सोडा, खोबरेल, सुगंध, रसायनें, त्यांच्या भट्ट्या, यंत्रें, इमारत, गुंडाळण्याकरतां कागद, वरची पेटी, त्याबरोबरच जाहिरात, एकादें आकर्षक चित्र इतकें सगळें आलें. पुन्हां कारखाना चालविण्यास लागणारें भांडवल पुरविणारा कारखानदार, तें देणारे सावकार, तयार करणारे मजूर, त्यांचें वेतन, कारखानदाराचा नफा, कर्जावरील व्याज, इत्यादि एक ना अनंत भानगडी त्या साबणाच्या एका वडीच्या मागें लपलेल्या असतात. म्हणजे हवी असलेली वस्तू तयार मिळण्याच्या अगोदर त्या साबणाच्या वडीला एका चक्रव्यूहांतून मार्ग काढावा लागतो. आणखी इतकें करून गिऱ्हाइकानें नाक लावून वडीला नापसंत ठरवून दुसऱ्या एकाद्या प्रकारचा साबण घेतला तर पहिल्याचे राहिलें सगळे जागच्या जागीं. अथवा पैसे असून गिऱ्हाइकानें साबण घ्यायचाच विचार रद्द केला तर सगळेंच थंड! म्हणजे इतक्यांचा परामर्श घ्यावयास हवा. प्रथम गिऱ्हाइकाची गरज, त्या गरजेचें उत्कट अनुत्कट स्वरूप, त्याच्या खिशांतील दाम, साबण, पर्यायानें कोठलीहि उपभोग्य वस्तु, त्याला लागणारी सामग्री व ती मिळण्याची शक्याशक्यता.


## स्प्रिंग टाईप "डुप्लीकेटर"

दर ताशीं ४०० प्रती प्रमाणें हजारों प्रती काढा!!




सर्व ऑफिसें, शाळा, कॉलेजें, बँका, विमाकंपन्या, कारखाने, म्युनिसिपालिट्या वगैरे

—सर्वच संस्थांना अत्यंत उपयुक्त—

किंमत रु. ८५-१२ फक्त. पॅकिंग, रेल्वे वगैरे खर्च निराळा.

आजच माहितिपत्रक मागवून ऑर्डर पाठवा.

कारखानदार:—

शेवडेजू कॅमेरा वर्क्स लि. बेळगांव

S. M. C.

## स्फुट विचार

### बंगाल सरकारचें साखरेच्या उत्पादनास उत्तेजन

कित्येक वर्षे स्वदेशी साखरेचें उत्पादन संयुक्त प्रांत आणि बहार ह्या प्रांतांत केंद्रीभूत झालेलें होतें. परंतु हळुहळू ह्या धंद्याचा विस्तार देशाच्या दक्षिण विभागांत झाला आणि त्यास जकातीचें संरक्षण मिळाल्यानें हिंदी साखरेचें एकूण उत्पादन पुष्कळ वाढलें. जाव्हाच्या साखरेची आयात बंद झाल्याकारणानें स्वदेशी साखरेस चांगलें उत्तेजन मिळालें. तथापि, युद्धजन्य परिस्थितीमुळें साखर महागली आणि तिची टंचाई होऊन रॅशनिंगमध्यें लोकांस पुरेसा माल मिळण्याची अडचण भासूं लागली. महाराष्ट्रांत गोदावरी व निरा कॅनॉलवर व लगतच्या संस्थानांत साखरेच्या कारखान्यांचा विस्तार झाला आहे, तसा म्हैसूर, हैद्राबाद व मद्रास ह्यांचे बाजूसहि झाला आहे. हिंदी साखरेचें उत्पादन आणि पुरवठा वाढवण्याचें अगत्य हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक सरकारें ह्यांस अलीकडे भासत आहे. उत्तर हिंदुस्थानांतील कारखानदारांस स्वतःची मिरासदारी मर्यादित व्हावयास नको असून मध्यवर्ती सरकारनें साखरेच्या सबंद धंद्याचें पद्धतशीर नियमन करावें अशी त्यांची मागणी आहे. प्रत्येक प्रांतिक सरकारनें स्वतःच्या कक्षेतील साखर कारखान्यांची बढती होण्याचा विशेष प्रयत्न करावा हेंहि स्वाभाविक आहे; प्रांतिक व स्थानिक आर्थिक हितसंबंधांची जोपासना करणें हें त्यांचें कर्तव्यच आहे. ह्या बाबतींत बंगाल सरकारनें अलीकडे केलेला उपक्रम लक्षांत घेण्यासारखा आहे आणि त्यावरून मोठमोठ्या देशी धंद्यांचें विकेंद्रीकरणाची प्रवृत्ति कशी वाढत आहे ह्याची कल्पना येते. बंगाल सरकारनें आपल्या प्रांताचे सोइस्कर गट पडून त्यांतील साखर कारखान्यांस पुरेसा स्थानिक ऊंस पुरवला जावा अशी व्यवस्था केली आहे. ह्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत गुळाकरितां ऊंस गाळला जाऊं नये असा हुकूम त्यानें काढला आहे. गुळास लागणारीं यंत्रें वगैरे १ डिसेंबरपावेतों कारखान्यावांचून इतरांनीं त्यांच्या टापूंत बाहेरून आणण्याची बंदीहि करण्यांत आली आहे. १९४५-४६ च्या हंगामांत शेतकऱ्यांस त्यांच्या उसाबद्दल दर मणी १ रु. २ आणे देणें कारखानदारास परवडावें म्हणून त्यांच्या साखरेची किंमत वाढवून देण्यांत आली आहे. बंगालमध्यें सध्या नऊ साखर कारखाने आहेत आणि सत्तर हजार टन साखर तयार करण्याची त्यांची शक्ति आहे. त्या प्रांतांतला साखरेचा खप मात्र दोन लक्ष टन आहे. गेल्या हंगामांत बंगाली कारखान्यांत फक्त बारा हजार टन साखर तयार झाली. हें उत्पादन चालू हंगामांत वाढावें ह्या हेतूनें वर निर्दिष्ट केलेली खास व्यवस्था बंगाल सरकारनें अंमलांत आणली आहे.

---

### एक्सचेंजच्या व्यवहारांतून हिंदी बँकांची हकालपट्टी ?

हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापारास भांडवल पुरविण्याचें व त्या व्यापाराची आर्थिक व्यवस्था पहाण्याचें काम एक्सचेंज बँका करतात. हा फलदायी व्यापार १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत मुख्यतः ब्रिटिश हातींच असल्याकारणानें, ब्रिटिश एक्सचेंज बँकांचें प्रस्थ फारच मोठें होतें. पुढें फ्रेंच, अमेरिकन, जपानी, डच वगैरे बँकांनींहि आपल्या शाखा हिंदुस्थानांत उघडल्या. अर्थात्, लंडन हें सर्व देशांचें एक प्रकारचें क्लिअरिंग हाऊस म्हणजे देवघेवी मिटविण्याचें मध्यवर्ती केंद्र असल्याकारणानें ब्रिटिश बँकांस नेहमीच प्राधान्य मिळे. युद्धकाळांत जपानी व डच बँकांचा व्यवहार आपोआपच बंद पडला. कांहीं अमेरिकन बँकांनीं आपला व्यवहार तात्पुरता बंद ठेवला त्यामुळें ब्रिटिश बँकांव्यतिरिक्त इतर विदेशी बँका हिंदुस्थानांत जवळ जवळ उरल्याच नाहींत, असें म्हटलें तरी चालेल. स्वतः एक्सचेंजचा व्यवहार करणारी एकहि हिंदी बँक नाहीं. हुंडणावळीचा व्यवहार करण्यास परवाने देण्याची पद्धति रिझर्व्ह बँकेनें सुरू केली, तिचे अन्वयें सर्व ब्रिटिश बँकांप्रमाणें कांहीं हिंदी बँकांसहि परवाने मिळाले. परंतु, हिंदी बँका एक्सचेंज बँक्स असोसिएशनच्या सभासद नव्हत्या. कित्येक नव्या जुन्या हिंदी बँकांनीं विदेशी एक्सचेंज बँकांस काम पुरवून त्यांचेकडून मोबदला म्हणून कमिशनमध्यें वाटा मिळविण्यास प्रारंभ केला. ह्याबाबत करार मुख्यतः ब्रिटिशेतर बँकांशींच होते आणि त्यांस मिळणाऱ्या जबर कमिशनमधून त्या बँका हिंदी बँकांस कांहीं हिस्सा सहज देऊं शकत. फारच थोड्या हिंदी बँकांचे लंडन अथवा न्यूयॉर्क येथें स्वतःचे एजंट आहेत; बहुतेक सर्व बँकांचा एक्सचेंजचा व्यवहार हिंदुस्थानांतील परदेशी बँकांच्या मार्फतच चाले. ह्या परिस्थितीचा फायदा घेण्याचें ब्रिटिश एक्सचेंज बँकांनीं ठरविलें आणि हिंदी बँकांच्या एक्सचेंजच्या व्यवहारांतील प्रवेशास आळा घालण्याचा जणुं निश्चय केला. बॉबे एक्सचेंज बँक्स असोसिएशननें एक ठराव करून, कोणत्याहि सभासद बँकेनें हिंदी बँकांस कमिशनमध्यें रीबेट देऊं नये, असें ठरविलें. ह्याविरुद्ध अमेरिकन बँकांनीं आपली तक्रार नमूद केली आहे, असें समजतें. हिंदी बँकांची एक्सचेंजच्या व्यवहारांतून अशी हकालपट्टी केली, म्हणजे सहाजिकच त्या बँकांच्या खातेदारांनां बँकांस जादा कमिशन तरी द्यावें लागेल किंवा आपलीं खातीं ब्रिटिश एक्सचेंज बँकांत उघडावीं लागतील. स्वाभाविकपणेंच, ब्रिटिश बँकांकडेच ते जातील आणि अशा रीतीनें ब्रिटिश बँकांची पकड आणखी बळकट होईल. हिंदी रिझर्व्ह बँकेनें ह्या व्यवस्थेस मान्यता कशी दिली? असा प्रश्न विचारण्यांत येत आहे. तिनें हिंदी बँकांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी अशी बँकेच्या गव्हर्नरास विनंति करणारें एक पत्र इंडियन मर्चंट्स चेंबरनें पाठविलें आहे.

---

### हिंदी पोलादास तेजी रहाणार

पोलादास असलेली युद्धजन्य मागणी आतां कमी पडली असली, तरी शांततेच्या काळांतील नागरी मागणी वाढूं लागली आहे आणि आणखी पांच वर्षेपर्यंत तरी पोलादाचा धंदा तेजींत राहील, असें मत टाटा कंपनीचे एक डायरेक्टर, डॉ. जॉन मथाइ, ह्यांनीं नुकतेंच व्यक्त केलें. नवीन मागणी मोठ्या प्रमाणावर येऊं लागेपर्यंत कदाचित पोलादाची किंमत उतरेल, परंतु लवकरच ती पुनः वाढेल. हिंदुस्थानांत पोलादाचा दर माणशी उठाव अत्यंत अल्प आहे. आर्थिक प्रगतीबरोबर पोलादाचा खपहि वाढत जाणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थानांत सध्या टाटा कंपनी व स्टील कॉर्पोरेशन ऑफ बंगाल ह्या पोलादाच्या दोन प्रमुख कंपन्या आहेत व त्यांचें वार्षिक उत्पादन १५ लक्ष टनांचें आहे. हिंदी पोलादाचें उत्पादन दुपटीइतकें वाढविण्याचा म्हणजे तें ३० लक्ष टनांपर्यंत नेण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. कोळशाची किंमत व मजुरीचे दर ह्यांत सध्या कमालीची वाढ झालेली आहे, परंतु दर टन पोलादास येणारा कोळशाचा व मजुरीचा खर्च येत्या कांहीं वर्षांत बराच उतरेल, अशी डॉ. मथाइ ह्यांची अपेक्षा आहे.

### मुंबई प्रांतास मध्यवर्ती सरकारची धान्याची मदत

गुजरातेंतील पूर व दक्षिणेकडील जिल्ह्यांतील अवर्षण ह्यांमुळें पिकांचा नाश झाल्याकारणानें मुंबई प्रांतास धान्याची तूट येणार आहे. ती भरून काढण्यासाठी मध्यवर्ती सरकारकडून ५ लक्ष टन धान्य मिळविण्याकरितां कमिशनर ऑफ सप्लाइज, मि. गोरवाला, हे दिल्लीस गेले होते. त्यांच्या आग्रहावरून, मध्यवर्ती सरकारनें १,४४,००० टन धान्य तात्काळ देऊं केलें असून १९४६ मध्यें आणखी धान्य देण्याचें मान्य केलें आहे. त्यामुळें, रेशनमध्यें कपात करण्याचें कारण उरणार नाहीं व चालू रेशनप्रमाणें येत्या वर्षभर धान्य मिळूं शकेल, असें समजतें.

---

### श्रीलक्ष्मी टेक्स्टाईल मिल्स लि., भोर

वरील पब्लिक लिमिटेड कंपनीची गिरणी भोर येथें असून, तिचेमध्यें सुमारें ४,००० चात्यांवर सूत काढण्यांत येतें. गिरणींतील यंत्रसामुग्री विजेवर चालते. भोर संस्थानांत ह्या गिरणीस मोनॉपोलीचे हक्क मिळालेले आहेत. गिरणींत तयार होणाऱ्या सुतास शेजारींच राजा रघुनाथराव मिल्सचें मोठें गिऱ्हाईक आहे. गिरणींतील चात्या आणखी वाढविण्याचा चालकांचा विचार आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १५ लक्ष रु. आहे, त्यांपैकीं ८½ लाखांचे भाग विक्रीस काढलेले व खपलेले आहेत. डायरेक्टर बोर्डांत श्री. सरदार संढेराव विंचुरकर, बिस्किट कारखानदार श्री. ग. रा. साठे, कापडाचे व्यापारी श्री. ह. रा. करंदीकर, पायोनियर डाइंग हाऊसचे श्री. दत्तोपंत फाटक, एस. एन. राजर्षी कंपनीचे श्री. माधवराव देसाई वगैरे जबाबदार व अनुभवी गृहस्थ आहेत. दि भोर मर्कंटाइल एजन्सी लि.कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. चालकांचें धोरण प्रगतिप्रिय असून, गिरणीच्या वाढीसाठी ते ठेवी स्वीकारत आहेत. जनतेचा त्यांस पाठिंबा चांगला मिळत असल्याचें समजतें. भोरमधील ह्या नव्या उपक्रमाचें आम्हीं स्वागत करतों व त्याची लवकरच भरभराट होवो असें इच्छितों.

---

### बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव

वरील बँकेचें भांडवल ३० जून १९४५ अखेर संपलेल्या वर्षांत २६½ लक्ष रुपयांचें ३७ लक्ष रुपयांवर गेलें. नफाहि २८,०९२ रुपयांवरून ३५,६२३ रुपयांवर गेला. अहवालाचे वर्षी बँकेनें बैलहोंगळ, हल्ल्याळ व हुबळी येथें तीन शाखा उघडल्या. म्हणजे, आतां बँकेच्या शाखांची संख्या १२ झाली आहे. बँकेनें दिलेल्या २२½ लक्ष रुपयांच्या कर्जांपैकीं १८ लाखांचीं कर्जें सोनें-चांदी व माल ह्यांचें तारणावर आहेत आणि बँक १०½ लक्ष रुपयांचे रोखे धारण करीत आहे. झालेल्या नफ्यापैकीं १३ हजार रुपये वेगवेगळ्या फंडांत टाकून बँकेची मजबुती वाढविण्याचें चालकांचें धोरण स्तुत्य आहे. कर-माफ ६% डिव्हिडंड देण्यासाठी १२,५७९ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. कॉन्ट्रॅक्टर व बँकर, श्री. बंडो रघुनाथ कुलकर्णी हे बँकेचे चेअरमन असून श्री. जी. डी. सराफ हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### साखरेचें उत्पादन

जनतेला साखर आणखी थोडी जास्त मिळेलसें वाटतें. कारण कीं, पुढील वर्षी साखर ११ लाख टन उत्पन्न होईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षी नऊ लक्ष, ऐशी हजार टन साखरेचें उत्पादन झालें होतें. साखरेच्या कारखान्यांतून साखरेच्या वहातुकीसाठी सध्यापेक्षा अधिक मालाचे डबे पुरविण्याची व्यवस्था करावी असें हिंदुस्थान सरकार, रेल्वे बोर्ड व संयुक्तप्रांत सरकार यांचा सहविचार होऊन ठरलें आहे.



व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

नोगीचें
डोंगर
छाप
'शुद्ध निलगिरी तेल.'
नोगी आणि कं. मुंबई ४

डोंगरे
यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात.

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड

आशा
Asha
सौंदर्य साधनें
विक्रीसंघटनेचा व्याप
पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते
कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.
( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )
वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना
दि आयडिअल इन्स्टिट्यूट
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.
—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—

लहान मुलांकरितां
आर्को
गोड —एरंडेल— वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

## मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा (xd)

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) + सिंदिया स्टीम रु. १–४–० दि. १९-११-४५

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १९।११।४५ | मंगळवार २०।११।४५ | बुधवार २१।११।४५ | गुरुवार २२।११।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २३७६—४ | २३८१—४ | २३७८–१२ | २४३३–१२ |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४३५—० | ४३५—८ | ४३६—० | ४४४—० |
| २०१; १६९५ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २००५—० | २००३–१२ | २००१—४ | २०३५—० |
| ७६५; ५३३ | ९——० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६२४—८ | ६२४—८ | ६२३—८ | ६३०—० |
| ६५३; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ५७८—८ | ५८१—० | ५८२—८ | ५८६—८ |
| ४९८; ३६१ | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४०५—० | ४०५—८ | ४०५—० | ४१०—० |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | ३०५—८ | ३०६—० | ३०६—८ | ३१०—० |
| ३९४; २८२ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३१०—० | ३१०—८ | ३०८—८ | ३१४—८ |
| ३०५; २१८ | १२–०–० S | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३१५—० | ३१५—० | ३१४–८ | ३१९—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४—३ | ४—३–६ | ४—४–० | ४–४–६ |
| २१-१४; १३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४–१२–६ | १४–१५ | १४–१४–६ | १५–९–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—०–० | ३—०–६ | ३—०–९ | ३–२–० |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७४६—४ | ७४६—४ | ७६४—४ | ७५६—४ |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | २३१—८ | २३२—० | २३२–१२ | २३४–१२ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २३०—० | २४१—८ | २४४—८ | २४४—० |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५१८–१२ | ५२२—८ | ५२०—० | ५२५—० |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३८–८+ | ३८–१० + | ३८—७ | ३८–१० |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—६ | १०३–११ | १०३–१३ | १०३–१४ |

गुरुवार दि. २२–११–४५ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०२—५–६ | बरोडा | १६६—० | आग्रा व्हॅली | १८४५–० | अलकॉक | ४५०—० |
| १९५१–५४ | १०१–१२–६ | सेंट्रल | ९६–१२ | बॉम्बे ट्रॅम | १५५–० | बॉंबे स्टीम | ६१५—० |
| १९५७ | १००—११ | इंडिया | २३३—० | टाटा हायड्रो | २१७–० | न्यू इंडिया | ८९–१२ |
| १९६३–६५ | ९९–११ | इंपी० | २३५७—८ | टाटा पॉवर | १९५७–८ | शिवराजपुर | ५७—० |
| १९६६–६८ | ९८—१२ | | ५८१—४ | | | टाटा केमिकल | १७—२ |
| १९७०–७५ | ९७—७–६ | रिझर्व्ह | १५७—० | | | टाटा ऑईल | ८३—० |
| | | युनियन | ११—० | | | | |

शुक्रवार २३ ते मंगळवार २७–११–४५ पर्यंत बाजार बंद होता.

शुक्रवार दि. ३०।११।४५ ला बाजार नेहमींप्रमाणें ४ वाजेपर्यंत उघडा राहील.

'साप्ताहिक वळण' या शुक्रवारीं बंद न होता तें दि. ५–१२–४५ ला पुरें होईल.

### कपाशीची किंमत स्थिर राखण्याचा प्रयत्न

कपाशीची किंमत स्थिर राखण्यासाठी इजिप्तचें सरकार बराच कपास स्वतः खरेदी करणार आहे. त्यासाठी मोठें कर्ज त्यास उभारावें लागेल.

### हिंदुस्थानांतील विमानांच्या वहातुकीचे दर कमी होणार नाहींत.

लढाईमुळें वाढविलेले हिंदुस्थानांतील विमानवहातुकीचे दर आणखी तीन वर्षें असेच रहातील. युद्धापूर्वी हे दर साधारणपणें रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या तिकिटाइतके होते.

### हिरे मिळवून देण्यास ब्रिटिश सरकारची मदत

पुढील वर्षी ना. आगाखानांच्या षष्ठ्यब्दि समारंभाचे वेळीं यांची हीरक तुला करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. हा समारंभ प्रथम मुंबईत २० मार्च १९४६ ला व नंतर १७ ऑगस्टला दारेसलाम येथें होणार आहे. ह्या समारंभासाठी लंडनमधील हिऱ्याचे व्यापारी सहा लक्ष कॅरेट हिरे देणार आहेत. म्हणजे ह्या हिऱ्यांचें वजन २६४ रत्तल होईल. ह्या समारंभाप्रीत्यर्थ ५६ लक्ष रुपयांचा हिंदुस्थानांत व आणखी ५६ लक्ष रुपयांचा पूर्व आफ्रिकेंत त्यांच्या जातभाईमध्यें दानधर्म करण्यांत येईल.

### गोरवाला साहेबांची दिल्लीची वारी

मुंबईचे फूड कंट्रोलर श्री. गोरवाला हे नुकतेच मुंबई इलाख्यांतील अन्नधान्याची तूट हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणण्यासाठी विमानानें दिल्लीस जाऊन आले.

### धान्याची तूट

गुजराथेंत पूर आल्यामुळें व सातारा आणि विजापूर ह्या जिल्ह्यांत पाऊस न पडल्यामुळें धान्यपैदास बेताचीच होणार आहे. हिवाळ्यांतील पीक देखील बेताचेंच येईल अशी भीति आहे. सर्व इलाख्यांत साधारणपणें पन्नास हजार टन धान्याची तूट पडेल असा अंदाज आहे.

### रेशनच्या धान्यामुळें त्वचारोग होतात काय ?

मुंबई सरकारच्या विनंतीनुरूप एका खास समितीने ह्याबद्दल वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या तक्रारी कितपत खऱ्या आहेत याची चौकशी केली. काळजीपूर्वक निरीक्षण केल्यानंतर समितीला असें दिसून आलें कीं, मुंबई व मुंबईच्या आसपास त्वचारोगांची सांथ नसून असलेली रोगराई रेशनिंगमध्यें मिळणाऱ्या धान्यामुळें उत्पन्न झाली नाहीं. ही रोगराई म्हणजे फक्त खरूज व गजकर्ण होय; आणि हे रोग होण्याचें कारण लोकांची अस्वच्छता व गर्दीच्या जागीं एकमेकांत पसरणारे ढेंकूण, उवा वगैरे जंतू हें होय.

### शेतीचें उत्पन्न व प्राप्तीवरील कर

( मद्रास हायकोर्टाचा एक निवाडा )

कालीकतच्या झामोरीनचा मलबारांत मोठा जमीनजुमला आहे, त्यापैकीं बहुतेक जमिनी कुळांकडे खंडानें आहेत. मलबार टेनन्सी कायद्याप्रमाणें एका वेळीं बारा वर्षांचे भाडेपट्टे करतां येतात परंतु कुळांना ते पुनः नवे करून घेण्याचा हक्क असतो. असे भाडेपट्टे नवीन करण्याच्या वेळीं ठरावीक देणगी झामोरीन यांस देण्याचा प्रघात आहे. अशा प्रघाताचे नांवाखालीं झामोरीन यांस विवादाचे वर्षी ३,५०० रुपयांचें जादा उत्पन्न मिळालें होतें. हें उत्पन्न समजावयाचें काय अशी विचारणा कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स, मद्रासकडून मद्रास हायकोर्टाकडे केली गेली होती.

ज्या अर्थी झामोरीन यांस ही जादा रक्कम शेतजमिनीचा मालक म्हणून मिळाली आहे व ज्या अर्थी नवे भाडेपट्टे करण्यापूर्वी कुळांना ती यावी लागली आहे त्या अर्थीं सदर उत्पन्न हें शेतकीचेंच उत्पन्न होय, असा निर्णय कोर्टानें दिला.

---

### रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकल बोर्डाची निवडणूक

रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम ( मुंबई ) विभागाच्या लोकल बोर्डावर सर जमशेटजी जिजीभाई, श्री. कस्तुरभाई लालभाई, सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, श्री. रामदास पोद्दार व सर सुलतान चिनॉय हे बिनविरोध निवडून आले.

### कानपूर येथील बँक बंद पडली

युद्धोत्तर काळांत हिंदी बँक बंद पडल्याचें पहिलें उदाहरण कानपूर येथें घडलें. कलकत्ता येथील एका बँकेच्या कानपूर शाखेनें तिचेवर काढलेल्या चेकचे पैसे देण्याचें नाकारलें. मुख्य कचेरीकडून खुलासा येईपर्यंत अधिक माहिती देण्याचें बँकेच्या अधिकाऱ्यांनीं नाकारलें.

### सार्वजनिक कामासाठीं चटकन जमीन मिळविण्याची सोय

मुंबईच्या गव्हर्नरांनीं कोठल्याहि वस्तीतील सध्या अथवा यापुढें, कांहीं जमीन सार्वजनीक कामासाठीं लागेल का याची पाहणी करण्याचा अधिकार घेणारा कायदा पास केला आहे. युद्धोत्तर होणाऱ्या सुधारणांसाठीं लागणाऱ्या जमिनी मिळविण्यांत होणारी दिरंगाई टाळण्यासाठीं अधिकाऱ्यांना पाहणी करण्याला निष्कारण वेळ लागूं नये एवढ्यासाठीं हा कायदा पास करण्यांत आला आहे.


—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

विमा—काम—बक्षिसें

' सह्याद्रि ' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना !
' सह्याद्रि ' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती ! !
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

-शाखा- काळभोर आणि कं., पुणें. | अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा. | गो. ग. सौंदणकर मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्‌भुत कथानक ! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो.

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, नं. १७ मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गानिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ५ डिसेंबर, १९४५ | अंक ४८

## —: साठे बिस्किटें :—

**ऑरेंज व क्रूसबरी**

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## विमा—काम—बक्षिसें

' सह्याद्रि ' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना !
' सह्याद्रि ' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती !!
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

| —शाखा— | अधिक माहितीसाठी | गो. ग. सौंदणकर |
|---|---|---|
| काळभोर आणि कं., पुणें. | लिहा अगर भेटा. | मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक. |

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें !—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

## बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत — किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, नं. २७ मुंबई.

# विविध माहिती

### लष्करी नोकरींतून खाली झालेल्या लोकांची सहकारी खात्यांत सोय

मुंबई सरकारनें लष्करी नोकरींतून मुक्त झालेल्यांची सहकारी खात्यांत सोय करण्याची योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेप्रमाणें हल्ली पुणें येथें असलेला सहकारी खात्याचे अधिकारी तयार करण्याचा वर्ग १५ नोव्हेंबर १९४६ पर्यंत चालविण्यांत येईल. ह्या खात्यांतील अधिकाऱ्यांच्या हाताखाली लष्करी नोकरींतून मुक्त झालेल्या लोकांना कमींत कमी सहा महिने सांगोपांग शिक्षण देण्यांत येईल. ज्यांचे मराठी सहावीपर्यंत शिक्षण झालें आहे किंवा तत्सम लष्करी सर्टिफिकेट आहे अशा शिपायांना महिना ४५ रुपये शिष्यवृत्ति व रहावयास मोफत जागा देण्यांत येईल. ज्या शिपायांना जरूर असणारें इंग्रजी भाषेचें ज्ञान आहे अथवा ज्यांची योग्य शैक्षणिक पात्रता आहे त्यांना आधीं खात्यांत कायम करण्यांत येईल व मग शिक्षण देण्यांत येईल. शिक्षण मिळत असतांना ज्या जागेवर त्यांची नेमणूक झाली असेल त्या जागेचा त्यांना पगार मिळेल व रहावयास दिलेल्या जागेबद्दल त्यांतून भाड्यादाखल पांच रुपये कापून घेण्यांत येतील.

### अमेरिकन लष्कराला नको असलेल्या जिनसांची विक्री

अमेरिकन लष्कराला नको असलेले पांच लक्षांहून अधिक तऱ्हेचे जिन्नस लवकरच हिंदुस्थानांत नागरी उपयोगासाठी विकण्यांत येतील. ह्या जिनसांमध्यें औषधें, औषधी उपकरणें, औद्योगिक यंत्रसामुग्री व हत्यारें, ट्रॅक्टर्स, कापड व खाण्याचे जिन्नस आहेत. शिवाय विमानें, चिलखती पत्रे व बुटांचे बंद हे देखील आहेत.

### सहकारी दिनानिमित्त सभा

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या शिक्षण समितीतर्फे सहकार दिन साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानी रा.जी. एम. एस. राणे होते. आपल्या भाषणामध्यें, इन्स्टिट्यूटचीं सर्व कार्ये व चळवळी पुनः चालू होतील अशी आशा त्यांनीं प्रदर्शित केली.

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची वार्षिक सभा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची वार्षिक सभा सोमवार ता. १७ डिसेंबर रोजीं इन्स्टिट्यूटच्या कचेरींत भरणार आहे. एक्झिक्युटिव्ह कमिटीचा ३० जून, १९४५ अखेरच्या वर्षाचा रिपोर्ट, हिशेब, १९४५-४६ चें अंदाजपत्रक, ऑनररी ऑडिटरची नेमणूक, बॉयलॉज दुरुस्ती, वगैरेंचा विचार सभेंत होईल.

### चितळे ॲग्रि. प्रॉडक्टस लि.

ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि. ( गूळ कंपनी )चें नांव बदलून आतां चितळे ॲग्रि. प्रॉडक्टस असें ठेवण्यांत आलें आहे. मॅनेजिंग एजन्सीच्या फर्मचें पहिलें नांव " मे. डब्ल्यू. डी. चितळे ॲण्ड कं." असें होतें तें ' चितळे बद्रर्स ' असें करण्यांत आलें आहे.

### औद्योगिक सहकारी सोसायट्यांची होनावर येथील परिषद

उत्तर कानडा जिल्ह्यांतील औद्योगिक सहकारी सोसायट्यांची एक परिषद होनावर येथें ता. ११ डिसेंबर रोजीं श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. एस. के कल्लापूर ह्यांच्या पुढाकारानें भरविण्यांत येणार आहे. उत्तर कानडा जिल्ह्यांतील खेडेगांवीं धंद्यांच्या वाढीचा विचार त्यांत मुख्यतः होईल.

### इंडियन खिश्चन को. ऑ. सोसायटी लि. पुणें, चा रौप्यमहोत्सव

इंडियन खिश्चन को. ऑ. सोसायटीचा रौप्यमहोत्सव ता. १ रोजीं प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं गोखले हॉलमध्यें साजरा करण्यांत आला.

### मुंबई इलाख्यांतील वेड्यांच्या इस्पितळांचा अहवाल

मानसिक रोगावर उपचार करणारीं मुंबई इलाख्यांत पांच इस्पितळें आहेत. त्यांतील येरवडा, ठाणें येथील इस्पितळें मोठीं असून रत्नागिरी, धारवाड व अहमदाबाद येथील त्या मानानें लहान आहेत. गेल्या वर्षांत ह्या सर्व इस्पितळांतून २,२५९ रोग्यांवर उपचार करण्यांत आला. या रोग्यांची निरनिराळ्या तऱ्हेनें करमणूक करण्यासाठीं व करमणुकीचीं उपकरणें घेण्यासाठीं २,००९ रुपये खर्च करण्यांत आले. या वर्षांत वरील रोग्यांपैकीं २३० रोगी साफ बरे झाले व ४५ सुधारले. या सर्व इस्पितळांचा खर्च चौदा लक्षांवर झाला असून मिळालेली फी वगैरे उत्पन्न वजा केल्यास बट्ट खर्च ९,५२,१५४ रुपये झाला. प्रत्येक रोग्यामागें माणशीं खर्च कमींत कमी ३२७ रु. धारवाडास व जास्तींत जास्त ५३७ रुपये येरवड्यास येतो.

### मुंबई इलाख्यांतील शिक्षणखात्याचा अहवाल

मुंबई इलाख्यांतील २१,१५२ शिक्षणसंस्थांतून १८,९५,८६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शिक्षणावर सहा कोट, सोळा लक्ष रुपये खर्च होत असून सरकार त्यापैकीं दोन कोट चाळीस लक्ष रुपये देतें. बाकीचा खर्च लोकल बोर्डें, नगरपालिका व फी इत्यादिकांच्या उत्पन्नामधून होतो. मुंबई इलाख्यांत २३ महाविद्यालयें व १,०१५ इंग्रजी शाळा आहेत. देशी भाषेंत शिक्षण देणाऱ्या १८,५२६ प्राथमिक शाळा आहेत. या शाळांखेरीज प्रौढ स्त्रीपुरुषांना शिक्षण देणाऱ्या ८१८ शाळा आहेत. शिक्षण कसें द्यावें हें शिकविणारीं ३१ ट्रेनिंग कॉलेजें किंवा संस्था आहेत. शिक्षा झालेल्या अल्पवयी मुलामुलींना शिक्षण देणारी धारवाड येथें सरकारी शाळा आहे. तींत गतवर्षीं २८५ विद्यार्थी होते.

पायोनियर डाईंग हाऊस
—दातेवाडी, पुणें—
पक्क्या रंगाचीं कामें करून मिळतात.
रंगाची गॅरंटी हेंच आमचें ध्येय.



अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

# लिमिटेड कंपन्यांच्या डायरेक्टरांवर नियंत्रण

## कार्यक्षमतेस बाध न येतां भागीदारांचें हितसंरक्षण

### ब्रिटिश कंपनी कायद्यांत सुचविलेली सुधारणा

जून १९४३ मध्यें ब्रिटिश सरकारनें मि. जस्टिस कोहेन ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमून तिचेकडे १९२९ च्या कंपनीकायद्यांत सुधारणा सुचविण्याचें कामें सोपविलें. कमिटीनें आपला रिपोर्ट कांहीं महिन्यांपूर्वी सरकारास सादर केला. मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या जॉइंट स्टॉक कंपन्यांचा व्यवहार भांडवल पुरविणाऱ्या भागीदारांच्या हितास पोषक तर व्हावाच व त्यासाठीं भागीदारांचें कारभारावर नियंत्रण असावें, परंतु तें प्रभावी करीत असतांना कारभाराच्या कार्यक्षमतेस निष्कारण बाध येऊं नये, अशा प्रकारची सुधारणा सुचविण्याची जबाबदारी कोहेन कमिटीवर होती. प्रत्येक प्रकारचा धंदा लिमिटेड कंपनीच्या स्वरूपांत स्थापन होऊन वाढत असल्याचें आपणांस दिसून येतें आणि हिंदुस्थानांतहि गेल्या कांहीं वर्षांत लिमिटेड कंपन्यांची लोकप्रियता वाढलेली आपणांस आढळून येतें. व्यक्तिशः कंपन्यांच्या कारभारासंबंधीं शक्य तेवढी माहिती भागीदारांस उपलब्ध करून देणें आवश्यक आहे; सहाजीकच कंपन्यांच्या कारभाराविषयींच्या प्रसिद्धीचा प्रश्न येथें उपस्थित होतो. ( १ ) कंपन्या चालविणारांवरील जबाबदारी वाढविण्याची आणि ( २ ) भागीदारांस आपलें मत प्रकट करण्यास व प्रभावी करण्यास संधी देण्याची अधिक चांगली व्यवस्था कायद्यांत केली पाहिजे, असा कोहेन कमिटीचा अभिप्राय आहे.

कोहेन कमिटीनें कंपनी कायद्यांत अनेक सुधारणा सुचविल्या आहेत. त्यांपैकीं डायरेक्टरांबाबत सुचविलेल्या सुधारणांचा विचार येथें करावयाचा आहे. डायरेक्टरांची पात्रता व त्यांचा कारभार ह्यांवरच लिमिटेड कंपन्यांचें यश अथवा अपयश हीं अवलंबून असतात, ह्या दृष्टीनें डायरेक्टरांवरील निर्बंध जाचक न करतां फक्त त्यांच्या विशिष्ट कृत्यांवर प्रसिद्धीचा झोत पाडण्यानें कार्यभाग चांगला साधेल, असा कोहेन कमिटीचा सिद्धांत आहे. विशेषतः ज्या बाबतींत डायरेक्टरांचे व भागीदारांचे आणि समाजाचे हितसंबंध परस्परविरोधी असण्याचा संभव आहे, अशा बाबींस प्रसिद्धी जितकी जास्त मिळेल तितकें चांगलें.

डायरेक्टर हेच स्वतःचा मेहनताना ठरवीत असल्याकारणानें त्या मेहनतान्याच्या एकूण रकमेवर भागीदारांचें नियंत्रण असणें आवश्यक आहे, अशी कोहेन कमिटीची सूचना आहे. व्यक्तिशः प्रत्येक डायरेक्टरास मिळालेली रकम वेगवेगळी दाखविण्याचें कारण नाहीं, परंतु (१) डायरेक्टरांना कंपनीचा कारभार चालविण्याबद्दल वेतन, (२) डायरेक्टरांना खर्चासाठीं दिलेली रकम, (३) डायरेक्टरांच्या पेन्शन स्कीमला दिलेली रकम, (४) डायरेक्टरांना दिलेलें पेन्शन व (५) डायरेक्टरची जागा सुटल्याबद्दल किंवा इतर कारणांसाठीं आजी किंवा माजी डायरेक्टरास दिलेली रकम, ह्या बाबींचा स्वतंत्र खुलासा करण्यांत आला पाहिजे, असें कमिटीनें सुचविलें आहे. कांहीं कंपन्या डायरेक्टरांना करमाफ फी किंवा पगार देतात, तें अनिष्ट असून, थांबविण्यांत आलें पाहिजे अशीहि कमिटीची सूचना आहे.

डायरेक्टरांस आपल्या स्वतःच्या विशिष्ट स्थानाचा स्वतःच्या फायद्यासाठीं आर्थिक उपयोग करून घेणें सहज शक्य असतें. आपल्या कंपनीमधील खासगी व अंतर्गत माहितीच्या आधारावर स्वतः तिच्या शेअर्सची खरेदी विक्री करणें किंवा ती माहिती दुसऱ्यास पुरविणें असले प्रकार कित्येक प्रसंगीं उघडकीस येतात. महाराष्ट्रांतील कंपन्यांचे भाग अद्याप स्टॉक एक्सचेंजवर नसल्याकारणानें, ह्या दुरुपयोगाचा अनुभव येथें प्रत्ययास येण्यास फारसा वाव नाहीं. म्हणून त्याचा विचार तूर्त करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु, कंपन्या इतर कंपन्या किंवा भागीदाऱ्या ह्यांचेशीं करार करतात. त्यांत डायरेक्टरांचा हितसंबंध असूं शकतो आणि अशा करारांत स्वतःसाठीं नफा काढणें त्यांस अगदी शक्य असतें. एकाद्या करारांत एकाद्या डायरेक्टराचा हितसंबंध असेल, तर ही गोष्ट त्यानें इतर डायरेक्टरांच्या नजरेस आणली पाहिजे, असें आजचा कायदाहि सांगतो. तथापि, तेवढ्यानें भागत नाहीं, असा अनुभव आहे. डायरेक्टर बोर्डांतील कोणत्याहि सभासदाचा एकाद्या करारांत हितसंबंध असेल, तर भागीदारांस सादर करावयाच्या रिपोर्टांत त्याचा उल्लेख करण्यांत यावा, अशी कोहेन कमिटीची शिफारस आहे. एवढ्यानेंहि डायरेक्टरांवर पुरेसें नियंत्रण बसणार नाहीं, असा त्यावर तज्ज्ञांचा अभिप्राय आहे.

कोणत्याहि कंपनीनें स्वतःच्या डायरेक्टरास कर्ज देऊं नये, ही कोहेन कमिटीची सूचना हिंदुस्थानांत आजहि प्रत्यक्ष अमलांत आहे. डायरेक्टरास काढून टाकावयाचें झाल्यास, त्याच्या निवृत्तीचे वेळीं त्यास पुनः न निवडणें भागीदारांच्या हातांत असतें आणि त्यास साधें मताधिक्य पुरतें. परंतु, इतर वेळीं डायरेक्टरास स्थानभ्रष्ट करावयाचें असल्यास, त्या ठरावास तीन चतुर्थांश मतें मिळालीं पाहिजेत. कोणत्याहि ठरावास साध्या मताधिक्याच्या ठरावानें काढून टाकतां यावें, असें कोहेन कमिटीनें सुचविलें आहे. आपला डायरेक्टर कितव्या वर्षी निवृत्त व्हावा हें प्रत्येक कंपनीनें ठरवून टाकलें पाहिजे आणि कंपनीनें तशी तरतूद केली नसेल तर स्वतःस ७० वें वर्ष लागल्यानंतर भरलेल्या कंपनीच्या वार्षिक सभेंत डायरेक्टरानें निवृत्त व्हावें, अशी कायद्यांत सुधारणा कमिटीनें सांगितली आहे.

कित्येक डायरेक्टरांची डायरेक्टरची जागा हें आजीव स्थान होऊन बसलेलें असतें. वयातीत झाल्यामुळें त्यांस सभांस हजर रहातां येत नाहीं व चाललेल्या चर्चेचें आकलनहि करतां येत नाहीं, अशीं कित्येक उदाहरणें दाखवितां येतील. वयाच्या अमक्याच वर्षी डायरेक्टराची पात्रता नष्ट होते, असें सांगतां येणार नाहीं; ७० वर्षे वयाच्या कांहीं डायरेक्टरांचा मेंदू तरुण डायरेक्टरांच्या मेंदूपेक्षां अधिक चलाख असूं शकतो. तेव्हां, ७० वें वर्ष निवृत्तीसाठीं योग्य असल्याचें जरी कोहेन कमिटीनें सांगितलें असलें, तरी त्या वयाच्या विशिष्ट डायरेक्टराची निवृत्ति विशेष ठराव करून थांबविण्याचा अधिकार डायरेक्टर बोर्डास असावा, असें त्या कमिटीनें सुचविलें आहे. अशा डायरेक्टराची बाब ही अपवादास लायक आहे, हें भागीदारांस समजावून सांगण्याची जबाबदारी डायरेक्टर बोर्डावर आहे, असा त्याचा अर्थ होतो.

### नवा शोध

एकाच रेडिओ लहरीवर चित्रें व आवाज पाठविण्याचा शोध लावल्याचें वेस्टिंग हाऊस इलेक्ट्रिक कॉर्पोरेशननें प्रसिद्ध केलें आहे.

## सहकारी कायद्यांत सुधारणा

### सरकारी देखरेख व हस्तक्षेप ह्यांच्या उच्चाटणाची आवश्यकता

लेखक:—श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम., चेअरमन, सारस्वत को. बँक लि., मुंबई.

सध्या सोसायट्यांचे सभासद आपल्या संस्थांच्या कारभारांत विशेष लक्ष घालीत नाहींत; रजिस्ट्रार व त्याचे दुय्यम अधिकारी हे आवश्यक ती देखरेख ठेवतीलच, अशी त्यांची अपेक्षा असते. कोणत्याहि लहानमोठ्या तक्रारीची दाद रजिस्ट्रारकडे मागण्याची त्यांची प्रवृत्ति असते. सहकारी चळवळ सरकारी असून प्रत्येक सोसायटीवर सरकारची प्रभावी देखरेख असल्याची अयाप सर्वसाधारण भावना आहे. ह्याकारणानें, सभासदांत अनास्था निर्माण होते व जनतेंतहि सहकारी संस्थांच्या निर्वेधपणासंबंधीं गैरवाजवी विश्वास निर्माण होतो. गैरवाजवी विश्वास म्हणण्याचें कारण असें कीं, सोसायटींत भानगड उपस्थित झाल्यास प्रत्येक घडीस सरकारी नियंत्रण व हस्तक्षेप असतांहि असें घडतें. सरकार घेणेंकऱ्यांबाबत कोणतीहि जबाबदारी पत्करण्यास तयार नसतें.

सहकारी चळवळीनें आतां विविध प्रकारचीं आर्थिक कामें हातीं घेतलीं आहेत, त्या सर्वांचें मार्गदर्शन सरकारी अधिकाऱ्यांनीं, ते कितीहि लायक असले तरी, करूं पहाणें संभवत नाहीं. सोसायटी चांगल्या तऱ्हेनें चालविण्याची संपूर्ण जबाबदारी सभासदांवर टाकून सहकारी चळवळीचें मार्गदर्शन व देखरेख प्रॉ. सहकारी इन्स्टिट्यूटसारख्या बिनसरकारी संघटनेस देणारी दुरुस्ती कायद्यांत करणें आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या सोसायट्यांचा समाधानकारक विचार सध्याचा सहकारी कायदा करूं शकत नाहीं. ह्यासाठीं, (१) भांडवल पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्थांसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टचे धर्तीवर एक कायदा, (२) अर्बन सोसायट्यांसाठी एक कायदा व (३) सर्व प्रकारच्या खेडेगांवी सोसायट्यांसाठी एक स्वतंत्र कायदा, असे तीन कायदे करण्यांत यावेत. विशिष्ट मताधिक्यानें सोसायटीस जॉइंट स्टॉक कंपनींत आपलें रूपांतर करतां यावें व जॉइंट स्टॉक कंपनीस सोसायटींत आपलें रूपांतर इच्छेप्रमाणें करतां यावें अशीहि कायद्यांत तरतूद असावी. सहकारी चळवळ व्यवहारी दृष्टीनें यशस्वी व्हावयाची असल्यास, तिचेवर सरकारी नियंत्रण असतां कामा नये. तिनें कायद्याचीं बंधनें पाळलीं म्हणजे पुरें. जनतेच्या हितरक्षणाचे दृष्टीनें आवश्यक तेवढीं कडक बंधनें घालण्यास अर्थातच हरकत नाहीं. जॉइंट स्टॉक कंपन्यांचा रजिस्ट्रार ज्याप्रमाणें कंपन्या रजिस्टर करतो व कागदपत्र नोंदतो, त्याप्रमाणेंच सहकारी सोसायट्यांच्या रजिस्ट्रारची भूमिका असणें जरूर आहे.

("इं. को. रिव्ह्यू" वरून)

### विजय साजरा करणारीं पोस्टाचीं तिकिटें

विजय साजरा करणारीं १½ आणा, ३½ आणे, ९ पै व १२ आणे किंमतीचीं नवी पोस्टाचीं तिकिटें हिंदुस्थान सरकारनें काढलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या दोन किंमतींचीं तिकिटें २ जानेवारी, १९४६ पासून पोस्टांत मिळूं लागतील.

### झेलम नदीवरील नवा पूल

गेलीं तीन वर्षें काश्मीर दरबारपुढें असलेले नवीन रस्त्याचे व झेलम नदीवर आणखी एक बांधण्यांत येणाऱ्या पुलाचे बेत पक्के करून झेलमवरील नवीन पूल बांधण्याबद्दल हुकूम देण्यांत आला आहे. हा झेलम नदीवर श्रीनगरमध्यें आठवा पूल होईल.


## धी जयशंकर मिल्स बार्शी, लिमिटेड

## नोटीस

नोटीस देण्यांत येत आहे कीं, धी जयशंकर मिल्स बार्शी, लिमिटेड, या कंपनीच्या भागीदारांची तेवीसावी सर्वसाधारण सभा, बार्शी येथें, कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, गुरुवार ता. २० डिसेंबर १९४५ रोजीं, दुपारीं २ वाजतां, (स्टॅण्डर्ड टाईम) खालीं नमूद केलेल्या कामांसाठीं भरविण्यांत येईल:—

१ तारीख ३० माहे सप्टेंबर सन १९४५ अखेरच्या वर्षाचा ऑडिटर यांनीं तपासलेला आढावा व नफातोटा पत्रक व डायरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

२ डेव्हिडंड मंजूर करणें.

३ रु. २०० च्या दिलेल्या देणगीस मंजुरी देणें.

४ श्री. रा. जिवराज हरिचंद शहा व श्री. विठ्ठल महालिंग फलफले हे डायरेक्टर पाळीप्रमाणें कमी होत आहेत व त्या जागांसाठीं नवीन निवडणूक करणें आहे. सदर कमी होणारे डायरेक्टर निवडणुकीस उभे राहण्यास लायक असून ते येत्या निवडणुकीकरितां उभे रहात आहेत.

५ चालूं सालाकरितां ऑडिटर नेमणें व त्यांची फी ठरविणें.

नोटीस:—आणखी अशीहि नोटीस देण्यांत येत आहे कीं, कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें, गुरुवार, ता. १३ डिसेंबर सन १९४५ पासून ते गुरुवार, ता. १० जानेवारी सन १९४६ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यांत येतील.

बार्शी, ता. ९ नोव्हेंबर १९४५

बोर्डाचे हुकूमावरून, झाडबुके आणि कंपनी एजंटस



## बँक ऑफ पूना लिमिटेड

**४५५ रविवार पेठ, फडके गेट, पुणें. २**

**पाडव्याचे मुहूर्तावर कामकाजास सुरवात झाली**

### —बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ शेठ दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हाईस चेअरमन
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर
४ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी
५ मि. फ्रामजी पेस्तनजी पोचा
६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी

सेव्हिंग्ज बँक खात्यावर १½ टक्का व चालू खात्यावर ½ टक्का व्याज दिलें जातें. मुदतीच्या ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. मुंबई व इतर प्रमुख शहरांवर चेक्स, ड्रॅफ्टस, हुन्ड्यांची व शेअर्सची खरेदीविक्री, रेल्वे रसीदीची वसुली वगैरे.

## सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात

# स्फुट विचार

## सहकारी बँकांच्या परिषदेचा महत्त्वाचा ठराव

प्रांतिक सहकारी बँकांची सातवी परिषद मुंबई येथें गेल्या महिन्याचे अखेरीस भरली होती आणि ह्या संस्थांच्या पुढें असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा तीमध्यें होऊन आवश्यक असे ठराव मान्य करण्यांत आले. शेतकरी कर्ज निवारण कायद्याची अंमलबजावणी ह्या प्रांतांत अनेक तालुक्यांत चालू झाली आहे आणि तिला अनुसरून कमी करण्यांत येणाऱ्या कर्जाच्या रकमांच्या हप्तेबंदींची फेड व चालू शेतकामासाठीं लागणाऱ्या पैशाचा पुरवठा ह्याबाबतची जबाबदारी सहकारी पतपेढ्या व मध्यवर्ती बँका यांचेवर मुख्यत्वेंकरून येऊन पडली आहे. हें काम सहकारी संस्थांनीं उचललें आहे आणि त्यासंबंधांत सरकारनें सहानुभूति दर्शवून सहायाचें आश्वासन दिलें आहे, हें सर्वथा योग्यच आहे. तथापि, हा अत्यंत महत्त्वाचा पण अवघड प्रयोग आहे ह्यांत संशय नाहीं. शेतकऱ्यांचीं कर्जें हलकीं होऊन त्यांची फेड कर्जदारांच्या ऐपतीच्या मर्यादेंत आणली तरी शेतीचा धंदा व शेतकऱ्यांचें जीवन ह्यांचेमध्यें इतकी अनिश्चितता असते कीं काटेकोर हिशेबाचा लगाम त्यांचे व्यवहारांत प्रभावी होणें कठिण आहे. शेतकरी कर्जदार सभासदांची पैशाची सोय तर व्हावी, पण ती बरोबर करणाऱ्या सहकारी पेढ्या व बँका ह्यांच्या चरितार्थांत व्यत्यय न येतां त्यांचा गाडा सुरळीतपणानें चालावा अशी पक्की व्यवस्था करण्याचें अगत्य ह्या कारणानें मान्य केलें जाणें अत्यंत आवश्यक आहे. ह्या कामीं सरकारनें सहकारी संस्थांस सढळ हातानें इष्ट तें सहाय केल्यावांचून शेतकरी कर्जनिवारणाच्या कायद्याचा हेतु सफल होणें अशक्य आहे हें येथें विसरून चालणार नाहीं. ह्या गोष्टीची जाणीव सहकारी बँकांनीं अनेकवेळां सरकारास करून दिली असून त्यांच्या परवाच्या परिषदेंत मुख्य ठराव ह्या विषयावरच झालेला आहे. शेतकरी आणि त्यांच्या सहकारी संस्था जगवण्याचा हा प्रश्न असल्यानें सरकारनें त्यांस द्यावयाच्या सहायाचे बाबतींत सर्वस्वी आपुलकीच्या दृष्टीनें त्याकडे पाहिलें पाहिजे. ह्यासंबंधांत परिषदेनें कित्येक विधायक सूचना केल्या आहेत त्यांचा स्वीकार सरकार करील अशी आम्हांस आशा आहे.

---

## परिषदेचे इतर ठराव

ज्या टापूंमध्यें प्रांतिक किंवा जिल्हा बँकांकडून कर्जनिवारण कायद्यासाठीं येणाऱ्या शेतकऱ्यांस पिकें काढण्यासाठीं हंगामी कर्जें मिळण्याची सोय नाहीं तेथें मल्टिपर्पज सोसायट्या व खरेदी-विक्री संघ ह्यांनीं ती सोय करावी असें परिषदेनें सुचवलें आहे. लांब मुदतीचीं कर्जें जुन्या देण्याच्या फेडीसाठीं किंवा कर्ज निवारणाच्या हप्तेबंदीसाठीं जिल्हा बँकांनीं देऊं नयेत. हें कार्य जमीन गहाणाच्या बँका करीत असल्यानें असलीं कर्जें त्यांनींच द्यावीं आणि जरूर तेथें तीं जिल्हा बँकांच्या मार्फत द्यावींत अशीहि परिषदेची शिफारस आहे. अलीकडे अर्बन बँकांकडील ठेवी वाढल्या आहेत आणि हा पैसा किफायतशीर पण सुरक्षित रीतीनें गुंतवला जाणें आवश्यक झालें आहे. ह्या बाबतींत त्यांस योग्य वाव दिला जावा ह्या हेतूनें ट्रस्टी सिक्यूरिटीज, रोकड व कर्जें ह्यांतील गुंतवणीचें प्रमाण काय रहावें ह्याविषयीं परिषदेनें शिफारस केली आहे. तसेंच, अर्बन बँकांच्या व्यवहाराचें क्षेत्र विस्तृत करण्यांत यावें असा अभिप्रायहि एका ठरावांत व्यक्त केलेला आहे. शेतीच्या मालावर तो विक्रीस पूर्ण तयार व्हावा म्हणून जरूर असलेले संस्कार करणें आणि औद्योगिक व्यवहारांस सहाय देणें ह्या कार्याकरितां खास सोसायट्या स्थापण्याची आवश्यकता भासूं लागली असून त्याकरितां औद्योगिक बँकहि काढण्याची कल्पना पुढें आली आहे. परिषदेनें ती उचलून धरली आहे. बँकांच्या नोकरांची लायकी, पगार, रजा इत्यादि बाबतींत त्यांनीं नियम करावे असें परिषदेच्या एका ठरावांत सुचवण्यांत आलें आहे. मुंबई शहरांतील विशिष्ट सोसायट्यांस त्यांना आपले हिशेब सरकारमान्य पण स्वतंत्र धंदेवाल्या ऑडिटर्सकडून तपासून घेण्याची मुभा दिली आहे. ह्या पद्धतीचा मुंबईच्या बाहेर विस्तार केला जावा असें मतहि परिषदेनें व्यक्त केलें आहे. नवीन सहकारी संस्था काढण्याचें काम सध्या सहकारी खातेंच मुख्यत्वें करून करतें. त्याचा उठाव त्वरित व्हावा ह्यासाठीं प्रांतिक इंस्टिट्यूटनें जिल्हा बँकांच्या सहायानें ह्या कार्यांत पुढाकार घ्यावा आणि त्याकरितां ह्या बँकांच्या उद्देशांत जरूर तो बदल केला जावा असेंहि एका ठरावांत सुचवण्यांत आलें आहे. अर्बन बँकांच्या डायरेक्टरांनीं कर्जांचे बाबतींत जामिनकीची जबाबदारी स्वतःवर घेऊं नये असा अभिप्राय परिषदेच्या मागील अधिवेशनांत नमूद करण्यांत आला होता, त्याची पुनरुक्ती करण्यांत आली असून तद्विषयक शंकेचें व मतभेदाचें निराकरण झालें आहे.

---

## सरय्या समितीचा रिपोर्ट तयार झाला

हिंदुस्थान सरकारनें सहकारी नियोजन समितीची नेमणूक कांहीं महिन्यांपूर्वी केली. तिचे अध्यक्ष मुंबई प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या हे आहेत. सहकारी संघटनेचा विचार अखिल भारतीय भूमिकेवरून केला जावा, ह्या दृष्टीनें प्रस्तुत समितीची नेमणूक झाली आणि तिचें काम आतां पुरें झालें आहे. सरकारास सादर करावयाचा आपला रिपोर्ट कमिटीनें तयार केला आहे. त्या रिपोर्टाचीं सुमारें २५९ पृष्ठें झालीं असून, त्यांत सबंध हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचा सर्वांगीण विचार करण्यांत आला आहे आणि युद्धोत्तर काळांत ही चळवळ भक्कम पायावर अधिष्ठित व्हावी ह्या दृष्टीनें सूचना केलेल्या आहेत असें समजतें. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या धर्तीवर एक सहकारी संशोधन केंद्र निर्माण करण्यांत यावें अशीहि समितीची एक शिफारस असल्याचें कळतें. शेतीचें उत्पादन, दूधपुरवठा, मालाचा उठाव, पतपेढ्या, औद्योगिक उत्पादन, खेडेगावी उद्योगधंदे, गृहमंडळ्या, विमा, इत्यादींची सहकारी संघटना व व्यवस्थापकांचें शिक्षण, वगैरे प्रश्नांचाहि समितीनें तपशीलवार विचार केला आहे.

---

## जनरल इन्शुअरन्स कंपन्यांपुढील प्रश्न

आग, मोटार, अपघात, इत्यादींच्या ( जनरल ) विम्याचें काम करणाऱ्या हिंदी विमा कंपन्यांपुढें खर्च कमी करण्याचा प्रश्न आतां प्रामुख्यानें उभा आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या संबंधांत कायद्याची तरतूद करावी, असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु, अशा कायद्याची वाट न पहातां, सहमतानें त्यांनीं आपण होऊन खर्च कमी करण्याचा निश्चय केला आहे. १९३९ पूर्वी जनरल विम्याचें काम करणाऱ्या १६ हिंदी कंपन्या होत्या. आतां त्यांची संख्या ५४ झाली आहे आणि युद्धजन्य फुगलेल्या किंमती उतरल्या म्हणजे त्यांस मिळणारें काम त्या प्रमाणांत स्वाभाविकच कमी होईल आणि हप्त्यांचें उत्पन्न उतरेल. प्रत्येक कंपनीस तिच्या आर्थिक पात्रतेप्रमाणें काम मिळेल ह्या दृष्टीनें उपलब्ध कामाची वांटणी करण्यांत यावी म्हणजे भरमसाट खर्च टळेल अशी सूचना विमा कंपन्यांच्या असोसिएशनच्या अध्यक्षांनीं केली आहे.

## सहकारी चळवळीच्या वाढीची दिशा

### ऋणविमोचन कायद्याचा परिणाम

लेखकः—रावसाहेब य. कृ. खोले, एल. एस. जी. डी., चेअरमन, पुणें सें. को. बँक लि.

शेतकरी समाजाचें आर्थिक जीवन सुधारण्याच्या दृष्टीनें त्यास कर्जमुक्त करण्यासाठीं सन १९३९ सालीं ऋण विमोचन कायदा आपल्या इलाख्यांत पास झाला व त्याची अंमलबजावणी आतां इलाख्यांतील बऱ्याच तालुक्यांना लागू करण्यांत आली आहे. या कायद्याचे उद्देश शेतकऱ्यांचें जुनें कर्ज कमी करून त्यास कर्जांतून ऋणमुक्त करावयाचें हें आहे. या कायद्यामुळें आर्थिक जीवनांत त्याचप्रमाणें सहकारी चळवळीचे दृष्टीनें बरीच क्रांति होईल असें दिसतें. सहकारी दिनानिमित्त पुणें येथें भरलेल्या जाहीर सभेंत मीं या प्रश्नाची चर्चा केलीच आहे. ऋणविमोचन कायद्याचा फायदा घेणाऱ्यांना यापुढें शक्य तें कर्ज सहकारी सोसायट्यांकडून अगर अधिकृत अशा सावकारांकडून मिळणार असून शेतीच्या मालाची विक्रीहि सहकारी संस्थांमार्फत होईल. परंतु यांत कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा विचार व्हावयास पाहिजे असें वाटतें. शेतकऱ्यास केवळ शेतीचे कामासाठीं कर्ज लागतें असें नाहीं तर त्यास त्याच्या जीवनोपयोगी व संसारास उपयोगी अशा अनेक बाबींसाठीं कर्ज लागतें व तें कर्ज त्यास यापुढें मिळणें कठीण होईल असें दिसतें. तसेंच त्याच्या शेतीच्या मालाची ठराविक आर्थिक किंमत मिळण्याची शक्यता त्यास कायद्यानें निर्माण झाल्याशिवाय या कायद्याप्रमाणें त्यास फायदा मिळेल असें वाटत नाहीं. या कायद्यामुळें मध्यवर्ती सहकारी संस्थेस कार्यक्षेत्र जरी निर्माण झालें असें मानलें तथापि त्याबाबत येणारी जबाबदारी सरकारनें मान्य केलेल्या संरक्षणापेक्षा जास्तच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. याशिवाय महत्त्वाचा असा मुद्दा कीं या कायद्यामुळें नाममात्र होणारे सभासद यांचा सहकारी चळवळीवर कितपत विश्वास असणार किंवा तीं मतें त्यांस किती रुचणार आहेत? सहकारी चळवळीच्या सुरवातीस ज्याप्रमाणें उत्साहाचे भरांत कांहीं संस्था निर्माण झाल्या व त्यांचे व्यवहारासंबंधी जे परिणाम बरेच दिवस भोगावे लागले तशी परिस्थिति निर्माण न होण्याची दक्षता सर्वांनींच घेतली पाहिजे. मध्यवर्ती सहकारी संस्थेजवळ जरी विपुल भांडवल असलें तरी तें ठेवीदारांचें आहे व ठेवीदारांचे संबंध लक्षांत घेतां त्यांचा पैसा सुरक्षितपणें गुंतवतां येईल असाच गुंतविला गेला पाहिजे.

सहकारी खातें व सहकारी चळवळींतील कार्यकर्ते यांचा दृष्टिकोन एक असावयास पाहिजे. सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांची कांहीं प्रसंगीं बरीच निराशा होते. सहकारी चळवळ ही पूर्णपणें धड बिनसरकारी लोकांची नाहीं व धड सरकारीहि नाहीं असा आक्षेप घेतला जातो व त्यांत बराच तथ्यांश दिसतो. यासाठीं अशी एक सूचना केवळ निराश भावनेनेंच सुचविली आहे कीं दुहेरी नियंत्रणाऐवजीं एकटें सरकारी संपूर्ण नियंत्रण असावें व त्यानें सहकारी चळवळीचें नेतृत्व व नियंत्रण पत्करावें. या बाबतींत असें म्हणावें लागतें कीं ही चळवळ लोकांचे हातांत संपूर्णपणें असावी. सरकारनें त्यास पाठिंबा देऊन तिचा विकास व विस्तार करण्याचा प्रयत्न करावा व त्याचप्रमाणें केवळ सहकारी खातें यासच ही चळवळ आपली आहे असें न वाटतां सरकारच्या सर्व खात्यांना या चळवळीसंबंधीं आपलेपणा वाटावयास पाहिजे अशी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई. मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:— द. ना. हेजीब

नोगींचे डोंगर छाप 'शुद्ध निलगिरी तेल.'
नोगी आणि कं. मुंबई ४

—एक्झिमाईट—
इसबावर रामबाण उपाय
—सोल सेलिंग एजंटस्—
दि पूना इंडस्ट्रियल एजन्सीज लि.
४७९, बुधवार, पुणें २.
ह्या पत्त्यावर मागणी करावी.

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

लहान मुलांकरितां आर्को गोड —एरंडेल— वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## शेअर बाजार

(श्री. द. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., शिवाजी नगर, पुणें ५)

२८-२९ तारखेस बाजारांत तेजीची भयंकर मोठी लाट येऊन गेली त्यास मुख्यतः कारण डॉ. जॉन मथाई ह्यांनीं काढलेले, ह्यापुढील ५-७ वर्षांमध्यें लोखंड-पोलादाला मागें पहाण्याचें कारण नाहीं, हे उद्‌गार कारणीभूत झाले. ह्याबरोबरच, बरीचशी मंडळी मंदीच्या व्यवहारामध्यें होती. त्यांना चढत्या भावामध्यें कापणें भाग पडल्यानें तेजीची परमावधि झाली. स्टीलबरोबर गिरण्यांसुद्धां बऱ्याच उचलल्या गेल्या. डाईंग २११३, सिंप्लेक्स ३३२, कोहिनूर ६५२, पोदार ३५७ असे चढले. लढाई चालू असतांना बॉंबहल्ल्याच्या भीतीमुळें टाटाचे भाव बरेच दबून होते; ती भीति आतां नाहींशी झालेली आहे. चलन-विकास एकसारखा चालूच आहे. परदेशी कारखानदारांपासून चढाओढीचें भय पुढील तीन-चार वर्षे तरी नाहीं. म्हणून, भाव तेजींत येऊन कायम टिकावेत असें मत व्यक्त केलें जात आहे. वास्तविक, हा विचार दोन-तीन महिन्यांपूर्वीहि होताच. त्यांत नवीन कांहीं नाहीं. तेजीला मथाईंचें भाषण निमित्तमात्र झालें आहे. सध्या इतके भाव वरती असतांना नव्या खरेदीचे भानगडींत पडूं नये, असें स्पष्ट सांगावेंसें वाटतें.

### आणखी कालवे खोदा

हिंदुस्थानांत कालव्यांचें महत्त्व किती मोठें आहे ह्याची मनोरंजक माहिती व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं दिल्ली येथील आपल्या भाषणांत नुकतीच सांगितली. हिंदुस्थानांतील पाटपाण्याखालील क्षेत्र ७ कोटी एकर आहे. अमेरिकेंतील तत्सम क्षेत्र त्याच्या एक तृतीयांशाइतकेंच आहे. अमेरिका, रशिया, मेक्सिको, जपान, इजिप्त, इटली, स्पेन, फ्रान्स, चिली व जावा ह्या देशांत कालव्यांची प्रगति पुष्कळच झालेली आहे. परंतु त्या सर्वांत जेवढें क्षेत्र कालव्याच्या पाण्यानें भिजतें त्यापेक्षां अधिक क्षेत्रास हिंदुस्थानांतील कालवे पाणी पुरवितात. हिंदुस्थानांतील कालवे एका रेषेंत सरळ एकापुढें एक असे लावले तर ते सबंध जगास तीनदां वेढा देतील. कालव्यांचे बाबतींत हिंदुस्थान किती पुढें आहे, हें ह्यावरून दिसून आलें तरी त्यांत अद्याप कितीतरी सुधारणा व्हावयास हवी आहे. धान्याचें उत्पादन वाढवून दुष्काळास आळा घालण्याचें कामीं त्यांची विशेष कामगिरी होण्याजोगी आहे. त्यास लागणारें द्रव्य मिळण्यास अडचण पडूं नये, असें व्हाइसरॉय म्हणाले,

---

### "कालव्याखालील क्षेत्रांत चाऱ्यासाठी ज्यास्त क्षेत्रास परवानगी द्या"

" शेतकऱ्यानें आपल्या जमिनीच्या सात अष्टमांश जागेंत अन्न-धान्य पेरलें पाहिजे, असें सरकारनें जाहीर केलें आहे. उरलेलें एक अष्टमांशाचें क्षेत्र बैल वगैरेंना लागणारा चारा करण्यासाठी पुरेसें पडणार नाहीं. फूड ॲक्ट करतांना ह्या गोष्टीचा पुरेसा विचार झालेला नाहीं. इतर विभागांपेक्षा कालव्याचे विभागांत शेतीस ज्यास्त बैलांची आवश्यकता असते व त्यास सुदृढ राखण्यासाठीं लुसर्नसारखा चाराहि लावावा लागतो. हें सर्व लक्षांत घेऊन कालव्याखालील प्रदेशास विशेष सवलत मिळावी.":- मुठा कॅनॉल इरिगेटर्स असोसिएशननें वरील प्रकारचा एका ठराव संमत करून सरकारकडे पाठविला आहे.

---

## कर्जनिवारण कायद्याचा प्रचार

### मोहोळ

तारीख १४-१०-४५ रोजीं मोहोळ येथें सायंकाळीं ६-३० वाजतां मे. एम्. व्हि. नाईक अव्वल कारकून तो मोहोळ यांचे अध्यक्षतेखाली कर्ज-निवारण कायद्यासंबंधीं मोठी सभा झाली. सभेंत मे. शेखसाहेब डि. को. ऑफिसर, ह्यांचें मुख्य भाषण झालें. तसेंच ता. १८-१०-४५ रोजीं अनगर तो माढा या गांवीं मे. शेखसाहेब डि. को. ऑफिसर यांनीं वरीलप्रमाणेंच सभा भरवून तेथील शेतकऱ्यांना माहिती दिली.

### माळशिरस तालुका

माळशिरस तालुक्यामध्यें गेले मे १९४५ ला कर्ज-निवारण कायदा लागू करणेंत आला. याची मुदत ता. ३१-१०-४५ ला संपली. या मुदतींत तालुक्यामध्यें एकूण २६५९ दावे तडतजोड बोर्डाकडे दाखल करणेंत आले. त्यामध्यें धनकोचे अर्ज १५०४ व रिणकोचे अर्ज ९३२ व कोर्टांकडून वर्ग होऊन आलेले दावे व दरखास्ती २२३ आहेत. याचें सर्व श्रेय मे. देशपांडे असि. रजिस्ट्रार सो., मे. भोसले मामलेदार सो., मि. पाटील ब्यांक इन्स्पेक्टर सो., मि. अवचट सुपरवायझर मि. माने व म्यानेजर चांगण नातेपुते सेल सोसायटी व इतर खात्याचे अधिकारी यांचेकडे आहे. शेवटच्या महिन्यांत शेतकऱ्यांना अर्ज देण्याची गैरसोय होऊं नये म्हणून नातेपुते सेल युनियननें आपला दोन पगारी माणसे माळशिरस कॉंग्रेस कचेरीमध्यें मोफत अर्ज लिहिणेस ठेविलीं व त्यांनीं फक्त रिणकोचे ३०० अर्ज लिहिले. याशिवाय शेवटच्या आठवड्यांत सुपरवायझिंग युनियननें निवडक ७ सेक्रेटरींना बोलावून त्यांचेकडून शेतकऱ्यांचे अर्ज लिहून देणेचें काम उत्तम तऱ्हेनें पार पाडलें. अशा तऱ्हेनें कॉंग्रेस आणि सहकारी संस्था यांनीं सहकार्यानें काम केल्यानें कोणत्याही शेतकऱ्यांना या तालुक्यामध्यें अर्ज देणेबाबत व लिहिणेबाबत गैरसोय भासूं दिली नाहीं.

### करंजाळी ( पेठ महाल )

करंजाळी येथें मे. दिवेकर, प्रांत ऑफिसरसो. पेठ महाल यांचे अध्यक्षतेखाली ता. २३-१०-४५ रोजीं कर्ज-निवारण कायदा प्रचार सभा झाली. सभेंत डॉ. देसाई, ऑडीटर व रि. ऑफिसर दि. ब. वंडेकर, रावसाहेब पी. जी. कुलकर्णी, इत्यादींचीं भाषणें झालीं.

---

### झाडूवाले व मजूर पुरविण्यास नकार

ब्रह्मी सरकारनें हिंदुस्थान सरकारपाशी रंगूनचे रस्ते झाडण्यासाठी दोन हजार झाडूवाले व आराकानमधील भातशेतीसाठी २५ हजार हिंदी मजूर मागितले होते. परंतु हिंदुस्थान सरकारनें ही मागणी पुरविण्याचें नाकारलें आहे.

### मद्रासच्या शर्यती व निवडणूक

मद्रास येथें मध्यवर्ती विधिमंडळाची निवडणूक १ डिसेंबर रोजीं झाली. त्यानिमित्त त्या दिवशीं होणाऱ्या घोड्यांच्या शर्यती बंद कराव्यात, अशी विनंती मद्रासच्या नगराध्यक्षानें मद्रास सरकारला केली होती. परंतु सकाळीं ७ वाजल्यापासून मतदान असल्यामुळें घोड्यांच्या शर्यती बंद करण्याची जरूर नाहीं असें मद्रास सरकारनें उत्तर दिलें.

### सर्व हिंदी खेड्यांसाठी रेडिओ

हिंदुस्थानांतील सात लक्ष खेड्यांना एक एक रेडिओ सेट व त्या रेडिओना बातम्या व करमणुकीचे कार्यक्रम पुरविण्यासाठी १३० रेडिओगृहें उभारण्याचा हिंदुस्थान सरकारचा बेत आहे.

### कापसाची पैदास कमी होणार

यंदाचे सालीं जगांत गेले बत्तीस वर्षांत झाली नव्हती इतकी कमी कापसाची पैदास होणार आहे. यंदाचे वर्षी जगांत फक्त दोन कोट सव्विस लक्ष गांठी कापूस पैदा होईल. १९४४ सालीं कापूस दोन कोट चव्वेचाळीस लक्ष गांठी झाला होता. पांच वर्षांपूर्वी हीच पैदास तीन कोट दहा लक्ष गांठी होती. हिंदुस्थानांत मात्र हीच पैदास गतवर्षापेक्षां तीन लक्ष पस्तीस हजार गांठी अधीक होईल.

## सहकारी दिनानिमित्त सभा

### साक्री

साक्री तालुका को–ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनिअनतर्फे साक्री येथील वेल्स लायब्ररीचे हॉलमध्यें ता. ३।११।१९४५ रोजीं माडणें येथील श्री. त्र्यंबक दिगंबर पाटील, तालुका ऑनररी ऑर्गनायझर व सहकारी चळवळींतील एक प्रमुख कार्यकर्ते यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा करण्यांत आला.

ईशस्तवन व स्वागतपर पद्य झाल्यानंतर कुमार मधुकर रामचंद्र शुक्ल (वय १२) यांचें शेंगाविक्री व तेल पुरवठा सोसायटी काढणें किती आवश्यक आहे या विषयावर मुद्देसूद असें भाषण झालें. त्यानंतर तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांपैकी श्री. सिताराम गोविंदप्पा व सुपरवायझिंग युनिअनचे सुपरवायझर श्री. रा. बा. शुक्ल यांचीं समयोचित भाषणें झालीं.

### वांगी

खानापूर तालुका को. ऑ. सुपरवायझिंग युनियनतर्फे वांगी येथें सहकारी दिन समारंभ मे. आप्पासो माधवराव पवार यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करणेंत आला. सदर मे. राजाराम बाळाजी पाटील चेअरमन, मे. इन्स्पेक्टरसाहेब मुं. को. ऑ. बँक शाखा किर्लोस्करवाडी, सदर युनियनचे सुपरवायझर मि. एम्. ए. फार्णे, मे. दादू रामा जाधव यु. क. मेंबर, मे. कोंडीबा दादासो. मोहिते वांगी सो. चे. कमेटी मेंबर वगैरे वक्त्यांचीं सहकार्यावर भाषणें झालीं.

### धुळें

राजवाडे मंडळाचे पटांगणांत मे. एम. सी. शाह, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्ज यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा करण्यांत आला.

मे. डि. को. ऑफिसर धुळें, मे. अ. रजिस्ट्रार धुळें, रावसाहेब रणसिंग, मे. एस. टी. मोरे, बार-ॲट-लॉ, श्री. भट वकील, श्री. मुधोळकर, श्रीमती सुशीलाबाई रानडे, व श्री. एम. आर. काळे, सिनिअर इन्स्पेक्टर यांनीं सहकारी चळवळीसंबंधीं भाषणें केलीं.

### माळशिरस

माळशिरस येथील चावडीसमोर सहकारी दिनाची सभा साजरी करणेंत आली. मि. अवचट सुपरवायझर, सहकारी चळवळीचे या तालुक्यांतील आद्य प्रवर्तक मे. नानासो. कुलकर्णी, मे. भोसले मामलेदार, मे. जोशी वकील व मे. तात्यासो. कुदळे यांचीं भाषणें झालीं.

### सांगोला

डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ को–ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन्स लि. सोलापूरच्या एज्युकेशनल कमिटीच्या व पंढरपूर व सांगोला तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियनचे विद्यमानें तारीख ३ रोजीं सांगोला येथें सहकारी दिन मे. पी. एन. उमरीसाहेब, कलेक्टर सोलापूर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला.

मे. डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह ऑफिसरसाहेब सोलापूर यांचें स्वागतपर भाषण झाल्यानंतर रा. फुगारे, चेअरमन पंढरपूर तालुका को-ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन यांनीं मुख्य ठराव मांडला. त्यावर रा. बेले, रा. ब. परिचारक, रावसाहेब पतंगे, बँक इन्स्पेक्टर श्री. जोशी, इत्यादींचीं भाषणें झालीं.

### पुणें जिल्हा व शिरूर तालुका को. सु. बोर्ड

एज्युकेशन कमिटी, पुणें जिल्हा को. सु. युनियन्स बोर्ड व शिरूरहवेली ता. को. सु. युनियन पुणें यांचेतर्फे मे. डब्ल्यू. डी. साळुंखे असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. पुणें यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा करणेंत आला. सदर प्रसंगीं मे. रावसाहेब य. द. सोले, चेअरमन, पुणें से. को. बँक, मे. रावबहादूर जी. एम. काळभोर, मे. एस. आर. पाळंदे, मे. ओगले, व मे. जे. टी. सावंत इनामदार, चेअरमन, एज्युकेशन कमिटी यांचीं समयोचित भाषणें झालीं.

---


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००

काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००

भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००

खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

शाखा व उपशाखा

| | |
|---|---|
| १ सातारा (जि. सातारा) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड ,, | २५ मालेगांव ,, |
| ३ किर्लोस्करवाडी ,, | २६ नांदगांव ,, |
| ४ कोरेगांव ,, | २७ घोटी ,, |
| ५ इस्लामपूर ,, | २८ सटाणा ,, |
| ६ शिराळें ,, | २९ येवलें ,, |
| ७ तासगांव ,, | ३० मनमाड |
| ८ वांई ,, | ३१ धुळें (जि. पश्चिम खानदेश) |
| ९ लोणंद ,, | ३२ दोंडाईचें ,, |
| १० भिवंडी (जि. ठाणें) | ३३ नंदुरबार ,, |
| ११ कल्याण ,, | ३४ साक्री ,, |
| १२ पालघर ,, | ३५ शहादें ,, |
| १३ अकलूज (जि. सोलापूर) | ३६ शिरपूर ,, |
| १४ अहमदनगर (,, अहमदनगर) | ३७ शिंदखेडें ,, |
| १५ बेलापूर रोड ,, | ३८ तळोदें ,, |
| १६ कोपरगांव ,, | ३९ नरडाणा |
| १७ पाथर्डी ,, | ४० दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी ,, | ४१ गोध्रा ,, |
| १९ शेवगांव ,, | ४२ झालोद ,, |
| २० श्रीरामपूर ,, | ४३ पनवेल (जि. कुलाबा) |
| २१ बेलापूर (गांव) ,, | ४४ नडियाद (जि. खेडा) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद ,, |
| २३ नाशिक (जि. नाशिक) | ४६ बोरसाड ,, |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.





REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख १२ डिसेंबर, १९४५ अंक ४९

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

नवीन शेअर विकण्याकरतां एक्झॅमिनर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली, ह्यांचेकडे अर्ज केला असून पत्रव्यवहार चालू आहे.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री—श्री—श्री—श्री—श्री

## विविध माहिती

### कपाशीची लागवड तीन टक्के कमी

गतवर्षाचे मानानें यंदा हिंदी कपाशीच्या लागवडींत तीन टक्के घट झाली, असा अंदाज आहे. म्हणजे, यंदा फक्त एक कोटि, पंचवीस लक्ष एकर जमीनींत कापूस पेरण्यांत आला आहे.

### संरक्षणखातें संपुष्टांत येणार

हिंदुस्थान सरकार आपलें संरक्षण खातें बंद करून त्यांतील काम लष्करी व गृहमंत्र्यांना वाटून देणार आहे.

### कालव्याच्या कामाचें अमेरिकेंत शिक्षण

पुढील पांच वर्षे हिंदुस्थान सरकार आपले ५० लोक कालव्यांचे शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेंत व कानडांत पाठविणार आहे.

### बेव्हिन स्कीम चालू रहाणार

युद्धासाठी हिंदुस्थानांतून निवडक मुलांना विलायतेस धाडून देत असलेलें यांत्रिक शिक्षण बेव्हिन स्कीमप्रमाणें युद्धोत्तरकाळींही चालू राहील.

### रशियाची मोटार उत्पादनाची पंचवार्षिक योजना

रशिया येत्या पांच वर्षांत आपलें मोटार उत्पादन इतकें वाढविणार आहे कीं त्याचा परिणाम ब्रिटननें व अमेरिकेनें व्यापलेल्या जगांतल्या बाजारपेठेवर होईल असें वाटतें. या पंचवार्षिक योजनेंत हल्ली रशियांत होत असलेलें मोटार उत्पादन तिप्पट, कदाचित चौपटहि होईल असा अंदाज आहे.

### भीषण हिंवाळ्यासाठी बर्लिनची तयारी

हिंवाळ्यामुळें जमिनीचें आकुंचन होण्यापूर्वीच प्रेतें पुरण्यासाठी खड्डे खणावयास बर्लिनमध्यें सुरवात झाली आहे! कारण हा हिंवाळा बर्लिनला अतिशय भीषण जाणार आहे. ह्या हिंवाळ्यांत बर्लिनमध्यें कमींत कमी एक लक्ष लोक भुकेनें, थंडीनें, रोगराईनें व आत्महत्या करून मरतील असा अंदाज आहे.

### नवीन मध्यवर्ती विधिमंडळ

नवीन मध्यवर्ती विधिमंडळाची पहिली अंदाजपत्रकाची बैठक नवी दिल्ली येथें २१ जानेवारी १९४६ ला सुरू होईल. निवडून आलेल्या सभासदांनीं आपलीं बिलें व ठराव पाठविण्यास सुरवात करावी अशी सूचना आली आहे.

### नवीन नाणीं

युद्धामुळें निकल व पितळ यांच्या मिश्रणापासून तयार केलेलीं अर्धा आणा, एक आणा, व दोन आणे किंमतीचीं नाणीं समाधानकारक नाहींत असें आढळून आल्यामुळें यापुढें सरकार युद्धापूर्वी दोन आणे व एक आणा ज्या मिश्रणापासून तयार करीत असें तशीच पांढऱ्या रंगाचीं तयार करण्यांत येतील असें सरकारनें जाहीर केलें आहे. हल्लींचें पाव आण्याचें नाणें आहे तसेंच राहील. नवी नाणीं निघालीं तरी जुनीं नाणीं झिजून जाईपर्यंत चालू राहतीलच.

### ब्रह्मदेश व चीन ह्यांना जोडणारा स्टिलवेल रस्ता

जवळ जवळ १५ कोट डॉलर्स खर्च करून अमेरिकन सरकारनें युद्धांत तयार केलेला ब्रह्मदेश व चीन यांना जोडणारा स्टिलवेल रस्ता ब्रह्मी सरकारला नजर करण्यांत येणार आहे.

### इंजिनांची आवक

ऑक्टोबर १९४५ ला पुऱ्या होणाऱ्या सालमजकुरीं हिंदुस्थान सरकारनें अमेरिका व कानडामधून ब्रॉडगेज रेलवेचीं २७५ इंजिनें आणविलीं. अमेरिकेंतून आणविलेलीं इंजिनें उधार-उसनवार पद्धतीनें आलीं असून या प्रत्येक इंजिनाची किंमत जवळ जवळ एक लक्ष रुपये आहे. हीं सर्व इंजिनें मालगाड्या खेचणारीं आहेत.




व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

--एक्झिमाईट--
इसबावर रामबाण उपाय
—सोल सेलिंग एजंटस्—
दि पूना इंडस्ट्रियल एजन्सीज लि.
४७९, बुधवार, पुणें २.
ह्या पत्त्यावर मागणी करावी.

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.

लहान मुलांकरितां आर्को गोड -एरंडेल- वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

अर्थ
वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## ग्रेट ब्रिटन पुढील बिकट आर्थिक प्रश्न

### अमेरिकेचें कर्ज व इंपीरिअल प्रेफरन्सचें धोरण

इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सचे अध्यक्ष, सर चार्लस लिडबरी ह्यांनीं लंडनमध्यें इन्स्टिटयूटच्या सभेंत भाषण केलें, त्यांत "डॉलर्स किंवा पौंड ह्यांपैकीं कोणत्याहि स्वरूपांत असलेल्या ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय कर्जाची कधींहि फेड केली जाणार नाहीं; कारण त्याची फेड करतांच येणार नाहीं" असें रोखठोक सांगितलें! गेल्या महायुद्धानंतर देणीं लादण्यांत आलीं तीं भागविण्याचें साधन नसल्यामुळेंच १९३० मध्यें जागतिक आर्थिक आपत्ति उद्भवली आणि त्यापासून आपण आतां शहाणपण शिकलों असलों तरी आतांचें युद्धविषयक खर्चामुळें निर्माण झालेलें देणें त्याचप्रकारचें आहे; त्याची फेड कधींच करतां येणार नाहीं, हें त्यांनीं स्पष्ट केलें. गेल्या खेपेस अमेरिकेचें देणें अखेर भागवितां आलें नाहींच आणि देणेदारांवर कठीण प्रसंग ओढवला. त्यांतून देणें टाळणें अगर नाकारणें हाच एक मार्ग उरला. ज्या कर्जाच्या डोंगरामुळें उत्पादनशक्तींत कांहींमात्रहि वाढ झाली नाहीं, त्याची परतफेड कशी शक्य होणार? मग, ह्या देण्याच्या फेडीबद्दल घोटाळ्याच्या व भ्रामक योजना उगीच कां आखीत बसतां? असा त्यांचा सरळ सवाल आहे. तथापि हिंदुस्थानासारख्या दरिद्री सावकाराचें येणें बुडालें, तर त्याचें कसें भागणार? ग्रेट ब्रिटनसारखें राष्ट्र देणेंकरी बनलें तरी स्वातंत्र्य रक्षणाची त्यानें ती किंमत दिली असें म्हणतां येईल. हिंदुस्थानास आपल्या रास्त येण्यांत गैरवाजवी काट मान्य करावी लागल्यास तें कोणत्याच दृष्टीनें समर्थनीय ठरणार नाहीं.

### व्हेनिसच्या अवस्थेची आठवण

निर्गत व्यापार रोडावल्यास ग्रेट ब्रिटनची परिस्थिति पूर्वीच्या व्हेनिस सारखी होईल, असें सर चार्लस ह्यांनीं विधान केलें. युद्धें व नवे शोध ह्यांमुळें वैभवशाली व्हेनिसचा व्यापार बंद पडतांच तें शहर खालावलें व प्रवाशांच्या केवळ कुतूहलाचें तें एक स्थान बनलें. मोठालीं व्यापारी केंद्रें अल्प काळांतच बसलीं असल्याचीं कित्येक उदाहरणें आहेत. ग्रेट ब्रिटनचें अस्तित्वच निर्गत व्यापारावर अवलंबून आहे आणि ब्रिटिशांनीं कसून मेहनत करून निर्गत पूर्वीपेक्षांहि वाढविली नाहीं तर त्यांचें रहाणीचें मान खालीं उतरून अगदी कनिष्ठ स्थितीस पोचल्याविना राहणार नाहीं, असा सर चार्लस ह्यांनीं इशारा दिला आहे. युद्धापूर्वी ग्रेट ब्रिटन पश्चिम युरोपमध्यें जर्मनीशीं स्पर्धा करूनहि जेवढा माल विकीत असे, तितका जर्मनीचा नायनाट होऊनहि आज विकतां येण्याजोगी युरोपची परिस्थिति नाहीं. ब्रिटिश निर्गतीपैकीं तिसरा हिस्सा निर्गत पश्चिम युरोपकडे होत असे, हें लक्षांत घेतलें म्हणजे ब्रिटिश निर्गत व्यापाराच्या अडचणींची कल्पना येईल. व्हेनिसच्या पूर्ववैभवाच्या ऱ्हासाचें चित्र ब्रिटिशांना दिसूं लागत असल्यास नवल नाहीं. कोपऱ्यांत मुळूमुळू रडत बसण्याचा ब्रिटिशांचा इतिहास नाहीं; कष्ट करून संपन्न होण्याची त्यांचेमध्यें उमेद व ताकद आहे, असें सर चार्लस ह्यांचें म्हणणें आहे.

### ग्रेट ब्रिटनवरील गंडांतर

ग्रेट ब्रिटननें आपल्या रहाणीचें मान इतकें उच्च कसें राखल आहे? सबंद जगांतून कच्चा माल गोळा करून व त्याचा पक्का माल बनवून त्याची स्वतःच्या मालकीच्या आगबोटींतून निर्गत करावयाची आणि ह्या किफायतशीर व्यवहारांत उरणाऱ्या वाढाव्यांतून केवळ आवश्यकच नव्हे तर चैनीच्याहि जिनसा हकानें उपलब्ध करून घ्यावयाच्या, हा ब्रिटिशांचा पिढिजात धंदा होऊन बसला आहे. सबंध जगाच्या डोक्यावर अधिष्ठित होण्याचा ग्रेट ब्रिटनचा जणूं काय हक्कच प्रस्थापित झालेला आहे. परंतु आतां परिस्थिति पालटली आहे आणि जादा सुखसोयींस मुकण्याची पाळी ब्रिटिशांवर आली आहे. आयात करावयाच्या मालाची किंमत कशी याव-याची हा ग्रेट ब्रिटन पुढील सध्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्धापूर्वीच्या मानानें पांचपट माल निर्गत केला तर आवश्यक ती दीडपटीइतकी खरी वाढ त्याच्या प्रत्यक्ष हातीं पडेल. ही गोष्ट अशक्य नाहीं, परंतु त्याची आवश्यकता निर्माण होणें हें त्या राष्ट्रावरील मोठें गडांतरच होय असें सर चार्लस ह्यांनीं सांगितलें आणि अमेरिका, हिंदुस्थान, रशिया व चीन ह्यांतील औद्योगिक प्रगतीचा उल्लेख करून त्यामुळें ब्रिटिश व्यापारासहि वाढीस जागा निर्माण होईल अशी आशा व्यक्त केली.

### "इंपीरिअल प्रेफरन्स हा आमचा जन्मसिद्ध हक्क"

ह्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी ग्रेट ब्रिटनमध्यें इंपीरिअल प्रेफरन्सचा पुरस्कार करण्यांत आला आहे. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांनीं एकमेकांच्या मालास जादा सवलती व प्राधान्य द्यावींत, असा त्याचा अर्थ आहे. अमेरिकेलाहि आपला निर्गत व्यापार वाढवावयाचा असल्याकारणानें अशा तऱ्हेच्या ब्रिटिश गटास त्याचा विरोध आहे. खुल्या व्यापारानेंच जागतिक शांतता व हित प्राप्त होतील, असें अमेरिकन पुढारी म्हणतात. शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिशांचा युक्तिवाद हाच होता, ह्याची आठवण येथें झाल्याविना रहात नाहीं. अमेरिकेचें आर्थिक सामर्थ्य इतकें मोठें आहे, कीं त्या देशाची घडी विघडली तर सबंद जगावर आपत्ती ओढवेल; तेव्हां खुला व्यापार आतां जागतिक हिताचा नाहीं, असें मि. एमरी ह्यांनीं इन्स्टिटयूट ऑफ एक्सपोर्टच्या लंडन येथील सभेंत नुकतेंच सांगितलें. इकडे रशिया पूव युरोपावर आपली आर्थिक पकड बसवूं पहात आहे. अशा परिस्थितींत ग्रेट ब्रिटननें आपल्या साम्राज्याचें संघटन वाढवून, त्यांतील देशांच्या विशिष्ट गरजा भागविल्या पाहिजेत व आपल्या गटामार्फत सर्वांचा उद्धार केला पाहिजे, अशी विचारसरणी ऐकूं येत आहे. "बाहेरील मनुष्याशीं इंपीरिअल प्रेफरन्सविषयीं चर्चाहि करण्यास आम्हीं तयार नाहीं; आमच्या घराची ती किल्ली आम्हीं दुसऱ्याच्या हातीं देणार नाहीं. आमचा तो जन्मसिद्ध हक्क आम्हीं थोड्याशा फायद्यासाठीं विकणार नाहीं" असें मि. एमरी ह्यांनीं टाळ्यांच्या गजरांत स्पष्ट केलें. इंपीरिअल प्रेफरन्सचें धोरण थोडेंसें ढिलें केल्यानें स्टर्लिंग गटाचा बाहेरील जगाशीं व्यापार वाढणार असेल तर आम्हीं तसें करण्यास तयार आहों, असें ब्रिटिश मुख्य प्रधान मि. ॲटली ह्यांनीं पार्लमेंटांत नुकतेंच जाहीर केलें आहे.

### अमेरिकेचें ग्रेटब्रिटनला कर्ज

ग्रेट ब्रिटनला अमेरिकेनें १४ अब्ज, ६६ कोटि रुपयांचें कर्ज देण्याचें अखेर मान्य केलें आहे आणि त्यासंबंधींतील करारावर दोन्हीं राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या आहेत. कर्जाच्या वार्षिक परतफेडीस ३१ डिसेंबर, १९५१ पासून प्रारंभ होईल,

व्याजाचा दर २% राहील व ग्रेट ब्रिटनला परतफेडदाखल एकूण १९ अब्ज, ८९ कोटि रुपये अमेरिकेस द्यावे लागतील. कर्जाच्या रकमेपैकीं १२ अब्ज, ५० कोटींचा विनियोग ग्रेटब्रिटनला अमेरिकेंत माल खरेदीकडे, युद्धोत्तर काळांतील व्यापारी देण्या-घेण्यांतील तफावत भागविण्याकडे, आणि सोनें व डॉलर्स ह्यांचा आवश्यक तो निधि राखण्याकडे करतां येईल. लेंड-उसनवार पद्धतीनें अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला माल पुरविला त्याची किंमत २ अब्ज, १६ कोटि रुपयांवर तोडण्यांत आली आहे आणि अशा रीतीनें एकूण कर्जाची रकम १४ अब्ज, ६६ कोटि झाली आहे. पहिलीं पांच वर्षे व्याज आकारण्यांत येणार नसल्याकारणानें ग्रेट ब्रिटनला कर्जावर फक्त १·६२% व्याजच पडणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारावरील वैयक्तिक सरकारी बंधनें उठण्यास ह्या कर्जाच्या योजनेचा परिणाम व्हावा, अशी अपेक्षा आहे. सुमारें तीन महिने चाललेल्या अँग्लो-अमेरिकन वाटाघाटींतून वरील योजना बाहेर पडली आहे. तिच्या मुळाशीं अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांच्या सहकार्याची भूमिका आहे आणि जगाचें नेतृत्त्व त्यांचेकडे रहाण्यांत त्याचा परिणाम व्हावा अशी अपेक्षा आहे. अमेरिकेच्या सहायाचे मोबदल्यांत मुद्दलाची परतफेड व व्याज हें तर ग्रेट ब्रिटनला द्यावें लागेलच-परंतु त्याबरोबर आपलें इंपीरिअल प्रेफरन्सचें धोरणहि सोडून द्यावें लागेल. हें धोरण सोडण्यांत होणारा फायदा ज्यास्त मोठा आहे, म्हणूनच इंपीरिअल प्रेफरन्स कांहीं काळ मागें घेण्यांत येईल हें उघड आहे.

---

### धी जयशंकर मिल्स बार्शी, लिमिटेड
### (वार्षिक सभा ता. २९।१२।४५)

३० सप्टेंबर सन १९४५ रोज अखेर वर्षात, वरील कंपनीचे कामकाजांत रु. २,१२,५२५-१४-३ नफा झाला आहे. बिल्डिंग अॅण्ड मशिनरी डिप्रिसिएशन फंडांत रु. ४४,०५०, टूल्स अॅण्ड इम्प्लीमेन्ट्स डिप्रिसिएशन फंडांत रु. १,००० व वर्कमेन्स वेलफेअर फंडांत रु. २,९०३ ह्याप्रमाणें ४७,९५३ रुपयांचा विनियोग करून व करांकरितां व आवश्यक ठेवीकरितां रु. १,२५,००० ची तरतूद करून तारीख ३० सप्टेंबर सन १९४५ अखेर वर्षाकरितां प्रत्येक शेअरास रु. ४ म्हणजे शेकडा चार रुपये प्रमाणें डिव्हिडंड, (टॅक्स कापून न घेतां) देण्यासाठीं रु. ३९,४५३ लागतील. अहवालाचे वर्षांत, टेक्स्टाईल कंट्रोल बोर्डानें पुन्हां सुताच्या किंमती पुष्कळशा कमी केल्या; आणि गेल्या वर्षाच्या नफ्याशीं तुलना करितां, कंपनीच्या नफ्यांत बरीचशी घट येण्याला तें एक प्रमुख कारण आहे. अहवालाचे वर्षांहि सर्व कामगारांना व नोकरांना, जादा महागाईभत्ता दिलेला आहे. तसेंच, त्यांना एक महिन्याच्या मूळ मजुरीच्या अगर पगाराच्या रकमे इतकी रक्कम व्हिक्टरी बोनस म्हणून देण्यांत आली आहे.

कंपनीचें वसूल भांडवल रद्द केलेल्या शेअर्सवर आलेल्या रकमा धरून सुमारें १२ लक्ष रुपये आहे. बिल्डिंग आणि मशिनरी घसारा फंडांत सुमारें ५ लक्ष रुपये आहेत. हिंदुस्थान सरकारकडे १,४८,४६९ रुपयांची आवश्यक ठेव ठेवण्यांत आली आहे. करासाठीं दोन लाखांवर रुपयांची तरतूद आहे. कंपनीकडे सुमारें ४½ लाखांच्या ठेवी आहेत. इमारती, यंत्रें, रेल्वे सायडिंग, फर्निचर, वीज इन्स्टॉलेशन वगैरेचा कायम भांडवली खर्च सुमारें १४ लक्ष रुपयांचा ताळेबंदांत मालमत्तेचे खातीं असून स्टोअर व स्पेअर पार्टस सुमारें १½ लाखांचे आहेत. स्टॉक इन ट्रेडची किंमत ६½ लक्ष रुपये भरते. डायरेक्टरांच्या फी खातीं फक्त १,००० रुपये खर्च झालेला आहे ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी झाडबुके आणि कं. कडे आहे आणि रा. ब. गणपत रामलिंग झाडबुके हे अधिकार परत्वें कंपनीचे डायरेक्टर आहेत.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—शाखाः—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिसः-खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : ३५,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः—
नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.
गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

हेड ऑफिसः—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें
मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

| | |
|---|---|
| अधिकृत विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ४,५८,६४० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ४५,००,००० |

बँकेनें गतवर्षी करमाफ ४ टक्के डिव्हिडंड वाटलें आहे.

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष | श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष

दि कॉमनवेल्थ अॅश्युअरन्स कं. लि. पुणें, दि सुप्रीम म्युच्युअल अॅश्युअरन्स कं. लि. पुणें व हिंद बेनिफिट प्रॉव्हिडंट इन्शुरन्स सोसायटी लि. मुंबई.

या कंपन्यांचे हप्ते घेतले जातात.

मद्रास, सोलापूर, नगर, बेळगांव, अहमदाबाद, मिरज, सांगली, कोल्हापूर, हुबळी, धारवाड व मुंबई वगैरे ठिकाणीं ड्रॅफ्टस दिले जातात.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.) बी. कॉम., एलएल. बी. मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

### टारिफ बोर्डाच्या कामास प्रारंभ

हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या टारिफ बोर्डानें १३ उद्योगधंद्यांकडून त्यांच्यासंबंधीं तपशीलवार माहिती मागविली आहे, ती टारिफ बोर्डाकडे ३१ डिसेंबरपूर्वी पोंचली पाहिजे. उत्पादन, आयात, खप, उत्पादन खर्च, आयात होणाऱ्या मालाची किंमत, त्यावी लागणारी जकात आणि उद्योगधंद्यांस भासणाऱ्या अडचणी ह्या सर्वांचा त्या माहितींत अंतर्भाव करण्यांत यावा. उद्योगधंद्यांस दिलेल्या संरक्षणाच्या मुदतीनंतर तो धंदा जागतिक स्पर्धेत कसा टिकाव धरूं शकेल हेंहि बोर्डाच्या निदर्शनास आणलें पाहिजे. ह्या १३ उद्योगधंद्यांसंबंधीं आपली प्रश्नपत्रिका टारिफ बोर्ड लवकरच प्रसिद्ध करणार आहे.

---

### दि बँक ऑफ कोंकण लि.

वरील बँक मालवण येथें नुकतीच स्थापन झाली. तिची स्टॅच्युटरी सभा १७, नोव्हेंबरमध्यें झाली. ३० सप्टेंबर अखेर, बँकेनें विक्रीस काढलेलें सर्व भांडवल (५ लक्ष रुपये) खपून २,४६,३८७ रु. ८ आ. इतकें भांडवल वसूल झालें. बँकेकडे सुमारें ७० हजार रुपयांच्या ठेवी आल्या. शेअर विक्रीवर बँकेनें एक पैहि कमिशन दिलें नाहीं. बँकेनें २ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविले असून कर्ज देण्यासहि प्रारंभ केला आहे. श्री. एम. वाय. भांडारकर, बी. एजी. हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### गुळाचें वाटप

मुंबई सरकार व हिंदुस्थान सरकारचे गूळ कंट्रोलर यांनीं विचारविनिमय करून सध्याची गुळाच्या वाटपाची पद्धत सुधारली पाहिजे असें ठरविलें आहे. १४ नोव्हेंबरपासून मुंबई झोनमध्यें (म्हणजे मुंबई इलाख्यांत, कोल्हापूरसह दक्षिण संस्थानांत, बडोदें संस्थानांत व गुजराथेंत) गूळ पाठविण्यास परमिटची जरूर नाहीं. पश्चिम हिंदुस्थानांतील संस्थानांत गूळ पाठविण्यास मात्र परमिटची जरूर राहील, कारण ह्या संस्थानांना गूळ किती पुरवावा ह्याची खास व्यवस्था करण्यांत आली आहे. नाशिक, पुणें, अहमदनगर, सोलापूर, सातारा आणि बेळगांव ह्या गूळ उत्पन्न करणाऱ्या जिल्ह्यांत कोठारामध्यें एका बंगाली मण गुळाची किंमत १४ रुपये राहील. कोल्हापुरांतल्या उत्तम गुळाची किंमत गोडाऊनमध्यें दर बंगाली मणास १६ रुपये अशी आहे.

### चीनमधील जपान्यांची शस्त्रें काढून घेतलीं

चीनमधील १० लक्ष, ८२ हजार जपानी शिपायांना निशस्त्र करून २३ लक्ष इतर जपान्यांबरोबर एका कँपमध्यें डांबून टाकलें आहे. संपूर्ण चीनच्या हद्दींत १२ लक्ष, ८५ हजार जपानी सैनिक आहेत व त्यांत ३३ हजार फोर्मोसा बेटांतील असून शिवाय कोरिआमधील ४ लक्ष, ७६ नागरिक आहेत.

### नागासाकीवर टाकलेल्या अणुबाँबनें अजून माणसें मरत आहेत

नागासाकीवर टाकलेल्या अणू बाँबनें पहिल्या धडाक्यास तर ३० पासून ४० हजार माणसें मेलींच पण अद्यापहि त्याच्या परिणामामुळें आठवड्यांतून तीन ते चार माणसें मरतात.

### जर्मनीचें लष्करी खचीकरण

जर्मनीमधील काउब्यूरेन येथील बिनधुराच्या दारूचा कारखाना जर्मनीच्या लष्करी खची-करणाच्या अमेरिकन सरकारनें आखलेल्या बेतानुसार नुकाच उडवून देण्यांत आला. हा कारखाना उडवून देण्यासाठी १४ फार मोठें स्फोट करावे लागले.

### परदेशांतून आलेला गहू

आक्टोबर २१ ला संपणाऱ्या आठवड्यांत हिंदुस्थानांत पंधरा हजार टन गहू आयात झाला.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,९७,१७,९०० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,४८,५८,९५० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | १,७९,०८,९५० रु. |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
- भद्र (मुख्य ऑफिस)
- एलिस ब्रिज
- स्टेशन ब्रँच
- माणेक चौक

अमृतसर
अंधेरी (मुंबई शेजारीं)
बांद्रे (मुंबई शेजारीं)
भुज (कच्छ)
मुंबई
- बुलियन एक्सचेंज
- कुलाबा
- काळबादेवी
- मलबार हिल

कलकत्ता
- क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य ऑफिस)
- बडा बझार
- चौरंगी स्क्वेअर

कोइमतूर
हैद्राबाद (सिंध)
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
- किंग्जवे
- इतवारी बझार

पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
वेरावळ

लंडन एजन्ट्स : दि वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (चेअरमन), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

वुइल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टींचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट

अत्यंत गुणकारी—

## कामगार ब्राह्मी तेल
व
## माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.

म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २

# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज-वजा (xd)
बॉम्बे बर्मा रु. ७-८-० दि. ३१-१२-४५
असो. सीमेंट रु. ७-०-० दि. १४-१-४६
बेलापूर रु. ८-०-० दि. १५-१-४६
सिंप्लेक्स रु. ४-०-० दि. १४-१-४६

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार ३।१२।४५ | मंगळवार ४।१२।४५ | बुधवार ५।१२।४५ | गुरुवार ६।१२।४५ | शुक्रवार ७।१२।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २५८०—० | २६००—० | २५८२—८ | २५६३-१२ | २५९०—० |
| ४३५; ३६९ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४६८—८ | ४७२—० | ४७०—० | ४६६—८ | ४७१—८ |
| २२०१; १६९५ | २५-०-०† | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २१६०—० | २१७७—८ | २१६१—४ | २१४६—४ | २१७६—४ |
| ७६५; ५३३ | ९—-० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६५१—० | ६६१—० | ६६१—० | ६५८—० | ६६५—० |
| ६५३; ४७५ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६३८—० | ६४१—० | ६३१—० | ६२२—० | ६३०—० |
| ४९८; ३६१ | ९-०-०S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४२३—० | ४२४—० | ४२४—८ | ४२५—० | ४२६—० |
| ३७७; २६५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | ३२४—० | ३२३—० | ३२०—० | ३१८—० | ३१८—० |
| ३९४; २८२ | ५-०-०† | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३२४—० | ३२४—० | ३२०—० | ३१७—० | ३२१—० |
| ३०५; २१८ | ४-०-०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३३१—८ | ३३४—० | ३३१—० | ३१६—८ | ३३१—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-१३ | ४-१० | ४—७-६ | ४—७-० | ४—७-० |
| २१-१४;१३-४-६ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६-१२ | १६-१२ | १५—५-० | १६—२-० | १६—४-० |
| ४-९; २-७ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—६-० | ३—५-६ | ३—३-० | ३—२-० | ३—२-६ |
| १२७०; ६३० | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७८७—८ | ७८२—८ | ७७३-१२ | ७६८-१२ | ७७०—० |
| २५४; २१६ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३८—० | २३७—८ | २३५—८ | २३५—० | २३५—८ |
| २५९; २१९ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४०—० | २३९—८ | २३९—० | २३६—८ | २३६—० |
| ५७५; ३७६ | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५५०—० | ५५७—८ | ५६२—८ | ५७५—० | ५८२—८ |
| ३८; २९-२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३९—८ | ३९—० | ३८—८ | ३८-१० | ३९—२ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३-१० | १०३—९ | १०३-८-३ | १०३-७-६ | १०३-६-६ |

### ब्रिटनचीं नवीन जंगलें

दोन कोट पौंड खर्चून पुढील पांच वर्षांत ब्रिटनमध्यें नवीन जंगलांची लागवड करण्यांत येईल असें शेतकी मंत्र्यांनीं हाऊस ऑफ कॉमन्स सभेंत सांगितलें. या कामीं वीस हजार लोक लागतील. तीन लक्ष पासष्ट हजार एकर जमिनींत लक्षावधी झाडांची लागवड करण्यांत येईल. गेल्या दोन्ही महायुद्धांत खर्ची पडलेलें सागवानी लांकूड अशा रीतीनें भरून काढण्याचा हा बेत आहे.

### फ्रान्सला अमेरिकेकडून मिळालेलें मोठें कर्ज

अमेरिकेनें फ्रान्सला ५५ कोटि डॉलर्सचें कर्ज दिलें. व्याजाचा दर २⅜ टक्के असून फेडीची मुदत ३० वर्षांची आहे. या कर्जांतून फ्रान्सला अमेरिकन माल घेतां येईल.

### जगानें युद्धादाखल काय गमावलें?

अमेरिकन आकडे शास्त्रज्ञांच्या मतें ताज्या महायुद्धांत २८८ अब्ज पौंडांचा दारूगोळा व इतर युद्धोपयोगी माल खर्ची पडला व ३७ अब्ज पौंड किंमतीची मालमत्ता नष्ट झाली.

### लढाईनंतर हिंदुस्थानाला येणारें पहिलें रशियन जहाज

काळ्या समुद्रावरील ओडेसा बंदरांतून सुवेझ कालव्यामधून कलकत्त्यास येण्यास युद्धोत्तर काळांतील पहिलें रशियन व्यापारी जहाज निघालें, अशी मास्कोची बातमी आहे.

### शांघायमधील ब्रिटिशांची मालमत्ता

शांघायमधील ब्रिटिश मालमत्ता चिनी सरकार आपल्या ताब्यांत घेत आहे ह्या बातमीमुळें लंडनमध्यें फार काळजी वाटत आहे.

### मुंबई इलाख्यांतील ग्रामीणांसाठी रेडिओ कार्यक्रम!

मुंबई सरकारचा ग्रामीणासाठी सुरू केलेला रेडिओ कार्यक्रम सध्या प्राथमिक अवस्थेंत आहे तो लवकरच पूर्णत्वानें सुरू करण्यांत येईल. प्रथम या कामासाठी ८०० सेट घेऊन प्रोग्राम सुरू करावा असा बेत होता, परंतु लढाईमुळें बॅटरीजचा तुटवडा पडल्याकारणानें हें जुळलें नाहीं. हल्लीं जवळ जवळ ३०० खेड्यांना रेडिओ सेट देण्यांत आले आहेत.

### विणकरांच्या मालकीची सुताची गिरणी

मुंबई इलाखा हातमाग कामगार विणकर संघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक पुणें येथें ता. ४ रोजीं श्री. बाबूराव वाळवेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. विणकरांचे शेअर्स घेऊन फक्त हातमागासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सुताच्या पुरवठ्यासाठीं विणकरांच्या मालकीची एक सुताची गिरणी काढण्यांत यावी, असें सभेंत ठरलें. मध्यवर्ती असेंब्लींतील सरकारनियुक्त जागांपैकीं दोन तरी जागा विणकरांना देण्यांत याव्या, अशी मागणी करण्याचेंहि ठरलें.

### कामावरून खाली झालेल्यांसाठी संयुक्तप्रांत सरकारची खटपट

कानपूर येथील चीफ कंट्रोलर ऑफ फॅक्टरी अकौंटसच्या ऑफिसमधून लवकरच शिक्षण घेतलेले ४,००० कारकून, हिशेबनीस व गॅझेटेड अधिकारी कामावरून खाली होतील. संयुक्तप्रांत सरकारच्या रिजनल डायरेक्टर ऑफ रीसेटलमेंट ह्यांनीं याबाबत संयुक्तप्रांतांतल्या सर्व उद्योगधंद्यांतल्या प्रमुखांना कळविलें आहे कीं ह्या सर्व खाली झालेल्या लोकांना त्यांनीं नोकऱ्या द्याव्यांत, कां कीं ह्या सर्व तरुण लोकांना हिशेब ठेवण्याचें खास शिक्षण दिलेलें आहे.

# स्फुट विचार

## महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या अडचणी

बेलापूर कंपनीचा ३० सप्टेंबर, १९४५ अखेरचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून महाराष्ट्रांतील इतर साखरकंपन्यांच्या अहवालांत काय आढळेल, ह्याचा सहज अंदाज करतां येईल. हें वर्ष साखर कारखान्यांस चांगलें गेलें नाहीं; शेतकामास पुरेसे लोक मिळाले नाहींत; खताचा पुरवठा अगदी वक्तशीर नव्हता; लागवडीचा दर्जा त्यामुळें युद्धपूर्व पातळीपर्यंत पोचूं शकला नाहीं, वगैरे गाऱ्हाणीं प्रस्तुत अहवालांत नमूद केलेलीं आहेत. मुंबई सरकारच्या हुकुमावरून, उसाच्या क्षेत्रांत धान्य पेरण्याची पाळी आली त्यामुळें १९४५-४६ मधील उसाचें क्षेत्र आकुंचित झालें आहे. धान्याच्या पिकांकडे उसाकडील मजूर यावे लागले त्यामुळें माणसांचा तुटवडा ज्यास्तच भासला. उसाचा पुरवठा वक्तशीर रास्ततां आला नाहीं, त्यामुळें कारखान्याची कार्यक्षमता थोडी कमी झाली. १९४५-४६ मध्यें कापावयाचा ऊंस पूर्वीइतका समाधानकारक नाहीं. वरील सर्व बाबी कमी-अधिक प्रमाणांत महाराष्ट्रांतील इतर साखरकारखान्यांसहि लागू आहेत. बेलापूर कंपनीचा नफा पूर्वीच्या वर्षी १२ लक्ष, ५५ हजार रुपये होता तो १९४४-४५ मध्यें ९ लक्ष, ९४ हजारांवर आला आणि त्यामुळें डिव्हिडंडचा दरहि थोडा उतरावा लागला आहे.

## बँकांचें राष्ट्रीयकरण—इंग्लंड व फ्रान्स

बँक ऑफ इंग्लंडच्या राष्ट्रीयकरणाच्या कायद्याचा मसुदा कॉमन्स सभेमध्यें अद्याप तपशीलवार चर्चिला जावयाचा आहे. परंतु, फ्रान्समधील प्रमुख बँकांवर तेथील सरकारनें अधिकार बजावण्यास प्रारंभहि केला आहे. फ्रेंच नॅशनल असेंब्लीनें ५२१ विरुद्ध ३५ एवढ्या मोठ्या मताधिक्यानें बँक ऑफ फ्रान्स व आणखी चार प्रमुख मोठ्या बँका ह्या सरकारी मालकीच्या करण्याचें ठरविलें. हा कायदा मंजूर होऊन कांहीं तास लोटण्यापूर्वीच फ्रेंच सरकारनें त्या बँकांचा ताबा घेतला. वस्तुतः कायद्याप्रमाणें १ जानेवारी, १९४६ पासून त्या बँका सरकारी मालकीच्या होतील. आणखीहि दोन प्रमुख बँका सरकारी मालकीच्या कराव्या असा असेंब्लीमध्यें आग्रह धरण्यांत आला होता, परंतु व्यापारी बँकांवर अधिक कडक नियंत्रण ठेवण्याचें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आल्यावरून तो आग्रह मागें घेण्यांत आला. बँक ऑफ फ्रान्सच्या भागीदारांस, यावयाच्या बदली रोख्यांवर फक्त २% व्याज मिळावयाचें आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें एकट्या बँक ऑफ इंग्लंडवरच सरकारी ताबा यावयाचा आहे; बाकीच्या बँकांस सरकार आज हात लावीत नाहीं. बँक ऑफ इंग्लंडच्या राष्ट्रीयकरणाच्या तपशीलास : भांडवलदार वर्गाचा फारसा विरोध नाहीं, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. बँकांचें फ्रान्समधील राष्ट्रीयकरण त्यामानानें कितीतरी पटीनें सार्थ व दूरगामी परिणाम करणारें आहे.

## मालाच्या विक्रीवर कर बसणार

मालाच्या विक्रीवर कर बसविण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. एप्रिल, १९४६ पासून हा कर अंमलांत येईल. ७ डिसेंबरच्या गॅझिटांत हा कर बसविणाऱ्या बाॅम्बे सेल्स टॅक्स बिलाचा मसुदा प्रसिद्ध करण्यांत आला आहे आणि त्या बिलासंबंधीं सूचना मागविण्यांत आल्या आहेत; ७ जानेवारीपूर्वी अशा सूचना सरकारकडे पोचल्या पाहिजेत. मद्रास, पंजाब, बंगाल व बिहार ह्या प्रांतांत माल विक्रीवरील कर अंमलांत आहे, त्याच धर्तीवर आतां मुंबई सरकार कर बसविणार आहे. 'प्रत्यक्ष गिऱ्हाइकास विकल्या जाणाऱ्या मालावर हा कर आकारण्यांत येईल आणि ज्यांची वार्षिक उलाढाल १०,००० रुपयांपेक्षा अधिक आहे अशांचीं नांवें रजिस्टर करून त्यांचेमार्फत तो गोळा केला जाईल. नोंदलेल्या दुकानदारास, त्याच्या सर्टिफिकेटांत नमूद केलेला माल किरकोळीनें विकण्यासाठी विकत दिला तर त्यावर कर घेतला जाणार नाहीं. रुपयास अर्धा आणा ह्या दरानें कराची आकारणी केली जाईल. खाद्यधान्य, स्वस्त कापड आणि मध्यवर्ती अथवा प्रांतिक सरकारच्या जकातीस पात्र असलेले आगपेट्या, साखर, दारू, अफू, बीज इत्यादि जिन्नस ह्यांवर कर द्यावा लागणार नाहीं. मुंबई प्रांताबाहेरील लोकांना विकलेल्या मालावरहि कराची आकारणी होणार नाहीं. युद्धोत्तर पुनर्घटनेच्या भांडवली व चालू खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी मुंबई प्रांतास उत्पन्न वाढविणें भाग आहे आणि त्याकरितां प्रस्तुत कराचा अवतार होत आहे.

## हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील येण्यास काट बसणार काय ?

ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांचेमध्यें कर्जविषयक करार होण्याचें ठरलें, त्याचा परिणाम हिंदुस्थानसारख्या देशावर काय होणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्ध जिंकण्यासाठी अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला माल पुरविला त्याचा अंशतः मोबदला ग्रेट ब्रिटननें जागतिक शांतता प्रस्थापित करण्यास व राष्ट्रांचें स्वातंत्र्य अबाधित राखण्यास मोठा हातभार लावून दिला आहे, हा युक्तिवाद हिंदुस्थानासहि लागू करण्यांत येईल असें दिसतें. ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानाचें यावयाचें देणें कागदी हिशेबांत मोठें दिसलें तरी त्या देण्याच्या कांहीं भागास काट मारण्यास हरकत नाहीं, असें ब्रिटिश सरकार लवकरच हिंदुस्थान सरकारास सुचवील आणि ह्या दोन्ही सरकारांच्या सहमतानें योग्य तो निर्णय करण्यांत येईल. हिंदुस्थानानें भयंकर स्वार्थत्याग सोसून आणि नियंत्रित दरानेंच माल विकून ब्रिटिशांची गरज भागविली; तेव्हां त्यानें निर्माण झालेल्या लंडनमधील येण्यांत काट मारण्यास वास्तविक जागा नाहीं, असें मत श्री. मनु सुभेदार ह्यांनीं व्यक्त केलें आहे. ब्रिटिश सरकारची व ब्रिटिश नागरिकांची हिंदुस्थानांत पुष्कळ मालमत्ता आहे, तिची किंमत कित्येक अब्ज रुपये भरेल. ही मालमत्ता हिंदुस्थानांत विकून टाकून त्याची पौंडांत किंमत ब्रिटिशांना देऊन टाकली म्हणजे हिंदुस्थानांतील चलनवाढीसहि आळा बसेल, असें त्यांनीं सुचविलें. ही गोष्ट यापूर्वीच करावयास हवी होती, असें ते म्हणाले. हिंदुस्थानच्या वाजवी हक्कांची पायमल्ली सहन केली जाणार नाहीं, अशी स्पष्ट सूचना नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें गेल्याच महिन्यांत नमूद केलेली आहे. ह्या संबंधांतील समाधानकारक निर्णय लोकमतानुवर्ती सरकारच घेऊं शकेल हें उघड आहे. इजिप्तची परिस्थिति हिंदुस्थानासारखीच आहे.

## व्हाइसरॉयांचें भाषण

व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं ब्रिटिश व्यापारी संघाच्या वार्षिक सभेंत कलकत्ता येथें भाषण करून, हिंदी राजकीय परिस्थितीवर मत व्यक्त केलें. हिंदी लोकांनींच स्वतःच्या प्रगतीचा प्रश्न सोडवला पाहिजे, ब्रिटिश सरकार हिंदुस्थानास स्वातंत्र्य देण्यास केव्हांहि तयार आहे परंतु ही प्रगति शांतता व सलोखा ह्यांस बाध न येतां घडून आली पाहिजे असें ते म्हणाले. कोणत्याहि योजनेंतून हिंदी संस्थानांस वगळतां येणार नाहीं; हेंहि त्यांनीं सांगितलें. आर्थिक प्रश्नांचाहि त्यांनीं उल्लेख केला, त्यांत राज्यघटनेंत सांगितलेले आर्थिक संरक्षक निर्बंध घटना बदलल्याविना काढून टाकतां येणार नाहींत, हा मुद्दा महत्त्वाचा होता.

## जपानचें आर्थिक व औद्योगिक भवितव्य

### परराष्ट्रीय व्यापाराचा प्रश्न

जपानच्या पराभवामुळें त्या देशास कोरिआ, फोर्मोसा इत्यादि वसाहतींस मुकावें लागून त्याचे मँच्यूरिया व चीन ह्यांतील खास हक्कहि संपुष्टांत आले आहेत. जपानी बेटांपलीकडे त्याची राजकीय सत्ता आतां उरणार नाहीं. ग्रेट ब्रिटनच्या सर्वां पट ह्या प्रदेशांत ८ कोटि जपान्यांस उदारनिर्वाह चालवावा लागेल. युद्धापूर्वी, जपान तयार माल निर्गत करून कच्चा माल त्याचे विनिमयांत मिळवीत असे. आपल्या साम्राज्यांतर्गत देशांकडून तो तांदूळ, साखर, सोयाबिन, इ. खाद्य पदार्थहि आणवीत असे. ही आयात बंद झाल्यामुळें जपानचा अन्नाचा पुरवठा अपुरा पडणें अपरिहार्य आहे. जपान हा प्रदेश डोंगराळ आहे व त्या बेटांत लागवडीची वाढ होण्यास फारसा वाव नाहीं. शेतीचें उत्पादन आणखी सुधारण्यास कूस नाहीं. जपाननें आपले कारखाने पुष्कळ वाढविले, परंतु त्यांस लागणारा कपास, रेशीम, कागदाचा रोंधा, लोखंड, तेलें, कातडी, रबर इत्यादि कच्चा माल बाहेरून आणावा लागे. कोळशाचीहि आयात करावी लागे. अशा रीतीनें, जपानमधील वाढत्या लोकसंख्येचें रहाणीचें मान औद्योगीकरणावर अवलंबून होतें आणि औद्योगीकरण होण्यास बाहेरील कच्च्यामालाच्या पुरवठ्याची आवश्यकता होती. आशियांतील गरीब जनतेस जपानच मुख्यत्वेंकरून स्वस्त तयार माल पुरवीत असे आणि आशियांतील देशांस यंत्रसामुग्री विकण्यासहि जपाननें प्रारंभ केला होता. अशा रीतीनें, परराष्ट्रीय व्यापार हा जपानी राष्ट्राच्या आर्थिक जीवितास अवश्य होऊन बसला होता.

### विजयी राष्ट्रांचा स्वार्थ कशांत आहे?

जपानला आतां अन्नाचे बाबतींत शक्य तेवढें स्वयंपूर्ण बनावें लागेल आणि त्यासाठी शेती व मासेमारी ह्यांकडे अधिक लक्ष द्यावें लागेल. परंतु, त्यामुळें प्रत्यक्ष उत्पादनांत मोठी भर पडण्याची आशा नाहीं. रशियानें उत्तरेकडील समुद्रांत मच्छेमारी करण्यास जपानला प्रतिबंध केला तर त्या धंद्याची परिस्थिति आशाजनक ठरणार नाहीं. जपानला अन्न मिळविण्यासाठी आपल्या पक्क्या मालाचा निर्गत व्यापार पद्धाक्यानें वाढवावा लागेल, परंतु त्याचा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या उद्योगधंद्यांवर स्वाभाविकच परिणाम होईल. युद्धापूर्वीची परिस्थिति पुनः निर्माण होणें मग अपरिहार्य होईल. पराभूत जपानला हें करण्यास संधी देणें विजयी राष्ट्रांच्या हिताचें होईल काय? आणि ती दिली नाहीं तर होणारे दुष्परिणाम कसे टाळतां येतील? जपानी लोकांवर उपासमारी लादणें पाश्चात्य राष्ट्रांच्या अंतिम फायद्याचें होणार नाहीं व जपानी स्वस्त मालाची निर्गत थांबविली तर आशियांतील गरीब लोकांना तशा प्रकारचा माल ब्रिटिश व अमेरिकन राष्ट्रें पुरवूं न शकल्यामुळें त्यांचे हाल झाल्याविना राहणार नाहींत. जपानच्या भवितव्याचा प्रश्न पाश्चात्य राष्ट्रांना स्वार्थाच्या भूमिकेवरूनच सोडवावा लागेल.

### ग्रेट ब्रिटनची लोकसंख्या घटण्याची भीति

ग्रेट ब्रिटननें एक परस्थांना तरी इंग्लंडांत येऊन रहिवाशी होऊं द्यावें अथवा युद्धापूर्वी असलेला आपला जननाचा उच्चांक गांठावा; नाहींतर ग्रेटब्रिटनची लोकसंख्या शंभर वर्षांत १ कोटि ४० लक्षांनीं कमी होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. तज्ज्ञांच्या मतें हा लोकसंख्येचा ऱ्हास लवकर विवाह करून किंवा हल्लीच्या मृत्यूंची सरासरी सुधारूनहि टळणार नाहीं. याला त्यांनीं एकच उपाय सुचविला आहे आणि तो म्हणजे कुटुंबांत आईबापांनीं अधिक मुलें होऊं देणें, हा होय.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

अधिकृत भाण्डवल रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें रु. २५,००,०००
वसूल झालेलें रु. १२,५०,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. २,७०,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,४०,००,००० चे वर

★ बँकेच्या शेअर्सवरील डिव्हिडंडमध्यें क्रमशः वाढ होत आहे.

★ गतवर्षी शें. ४½ + ½ टक्के डिव्हिडंड देण्यांत आलें.

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, गिरगांव, मुंबई (फोर्ट), जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, फैजपूर (पे-ऑफिस)

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ११ |

मुख्य कचेरी:—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा: डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती व निरा

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निकाल

### प्राप्तीवरील कराचे आकारणींत कोर्ट खर्चाला सूट

कराची आकारणी करण्यासाठी वार्षिक प्राप्तीचा आंकडा ठरवितांना व्यक्तीच्या उत्पन्नांतून त्या व्यक्तीस स्वतःच्या बचावासाठी स्वतःविरुद्ध लावलेल्या एकाद्या दाव्याच्या कामीं जो खर्च करावा लागत असेल, तो वजा घालता येईल काय ? असा प्रश्न मुंबई, हायकोर्टांतील एका प्रकरणांत नुकताच निघाला होता. त्याची हकीगत अशी.

सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांच्या १९४० ते ४१ या सालच्या उत्पन्नाचा आंकडा ठरवावयाचा होता. १२ नोव्हेंबर १९३५ रोजीं सर पुरुषोत्तमदास रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागांतील स्थानिक मंडळावर डायरेक्टर म्हणून निवडून आले. परंतु थोड्याच दिवसांत श्री. शामदासानी दावा आणला कीं, सर पुरुषोत्तमदास यांची निवड दोषास्पद ठरवून आपणांस त्यांच्या जागीं डायरेक्टर म्हणून निवडून आल्याचें जाहीर करावें. या दाव्याचा निकाल सर पुरुषोत्तमदास यांचे बाजूचा लागून त्यांची डायरेक्टर म्हणून झालेली निवड कायदेशीर ठरली. या कामीं सर पुरुषोत्तमदास यांना एकूण ७,५०० रुपये खर्च आला. तो खर्च आपल्या उत्पन्नांतून वजा घातला जावा असा मुद्दा सर साहेबांनीं त्या वर्षी मांडला.

प्राप्तीवरील कराच्या अधिकाऱ्यांचा या मुद्याला विरोध होता. प्राप्तीवरील कर आकारणीची रक्कम काढतांना प्राप्ति होण्यासाठी करावे लागलेले खर्च वजा घालता येतात खरें पण ते खर्च भांडवली स्वरूपाचे खर्च नव्हे, तर चालू खर्च असावे लागतात असें त्या अधिकाऱ्यांचें म्हणणें होतें.

कोर्टाचा निकाल कराधिकाऱ्यांच्या विरुद्ध लागला. उत्पन्नाची बाब मूलतः पैदा करण्यासाठी जो खर्च होतो त्याला भांडवली खर्च म्हणतात. सर पुरुषोत्तमदासांना जो खर्च करावा लागला तो त्यांच्या डायरेक्टरशिपमुळें, त्यांना मिळणारी फीची रक्कम अबाधित राखण्यासाठी तीवर आलेलें गंडांतर दूर करतांना आला. उत्पन्नाची बाब मूलतः पैदा करण्यासाठी नव्हे, तर ती बाब कायम राखण्यासाठी खर्च आला म्हणून सदर खर्च भांडवली खर्च समजता येणार नाहीं, तर उत्पन्न आबाधित राखण्यासाठीं करावा लागलेला चालू खर्चच समजणें भाग आहे व म्हणून ता वर्षाच्या एकूण उत्पन्नांतून वजा करून कर आकारणीची रक्कम ठरवावी लागेल असा कोर्टानें निर्णय दिला.

स. वा. दातार

---

### अँग्लो इंडियनांची मागणी

हिंदुस्थानला नवीन मिळणाऱ्या स्वायत्ततेंत अँग्लो इंडियन जमातीला खास संरक्षण मिळालें पाहिजे 'असें त्यांचे पुढारी मि. फ्रँक ॲंथनी यांचें म्हणणें आहे. या जमातीसाठी नामदार व्हाइसरॉय यांच्या कौन्सिलमध्येंहि एक जागा असावी असेंहि मागणें आहे. लष्करी नोकरींतून रिकाम्या होणाऱ्या २० ते ४० हजार लोकांना आजपर्यंतच्या खर्चिक पद्धतीनें रहातां येईल अशाच नोकऱ्या मुलकी खात्यांत मिळाव्या अशी त्यांची मागणी आहे. कारण त्यांचे मतें या जमातीची लष्करी कामगिरी स्पृहणीय असून त्यांची रहाणी खर्चाची आहे.

---


**THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, LTD., POONA 2.**

# NOTICE.

The Eleventh Annual General Meeting of the Shareholders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona 2, will be held on Sunday the 30th December, 1945 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business:—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September, 1945.

(2) To sanction the payment of a Dividend for the above mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By order of the Board of Directors,
**C. G. AGASHE & Co.,**
*Managing Agents.*

Poona, 8th December, 1945.

*Note*:—The Transfer Books of the Company will be closed from 18th December, 1945 to 7th January, 1946 (Both days inclusive). The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra, Ltd., Poona, on and after the 7th of February, 1946.

---

भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें
—आदर्श ठिकाण—

**चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स् लिमिटेड**

मॅनेजिंग एजंटस:—चितळे ब्रदर्स
रजिस्टर्ड ऑफिस—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठीं कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठीं आजच वरील पत्त्यावर लिहा.

---

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग
कंपनी, लिमिटेड
३७६ शुक्रवार, पुणें २

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात
दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर

१९४४ मधील प्रगति
—तुलनात्मक आंकडे—
१९४३ सालीं पूर्ण झालेलें काम ८,००,००० रु.वर
१९४४ सालीं पूर्ण झालेलें काम ११,००,००० रु.वर
विमा हप्त्यांचें उत्पन्न १९४४ सालीं १,८३,००० रुपयांचे वर झालें. खर्चाचें प्रमाण उतरलें आहे व त्या प्रमाणांत लाइफ फंडांत वाढ झाली आहे.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया
ॲशुअरन्स कं. लि. पुणें.

मॅनेजर, व्ही. एच. देशमुख, बी. ए.
अध्यक्ष:—श्री. सरदार जगन्नाथमहाराज पंडित

—: साठे बिस्किटें :—
ऑरेंज व श्रूसबरी
आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

विमा—काम—बक्षिसें
'सह्याद्रि' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना!
'सह्याद्रि' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती!!
एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

-शाखा-
काळभोर आणि कं., पुणें.

अधिक माहितीसाठी
लिहा अगर भेटा.

गो. ग. सौंदणकर
मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

पैसा आणि ज्ञान वाढवा !
श्रीमंत कसें व्हावें!—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्‌भुत कथानक! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

बिनचूकच्या माहितीनें
मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो
प्रत्यक्ष माहिती मोफत — किंमत ४ आणे
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
मांयखळा पुल, नं. २७ मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास.' भांबुर्डा, घ. नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख १९ डिसेंबर, १९४५ | अंक ५०

## —: साठे बिस्किटें :—

**ऑरेंज व क्रीमक्रीम**

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## विमा—काम—बक्षिसें

'सह्याद्रि' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना !

'सह्याद्रि' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती !!

एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

-शाखा- काळभोर आणि कं., पुणें. | अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा. | गो. ग. सौंदणकर मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

## विविध माहिती

### सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.

सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें हिंदुस्थानांत ८,००० टनांचें जहाज बांधण्यास सुरुवात केली असून त्यास अंदाजें ३० ते ३२ लक्ष रुपये खर्च येणार आहे. हिंदुस्थानांत तयार होणारें हें पहिलेंच जहाज असून त्याची लांबी ४०० ते ४१५ फूट असेल. बांधकाम विजगापट्टम येथील सिंदिया कंपनीचे शिपयार्ड-मध्यें चालू आहे.

### कागद न मिळाल्यास इजिप्तमधील वर्तमानपत्रें बंद पडणार

ब्रिटिश सरकारनें योग्य वेळीं कागदाचा पुरवठा न केल्यास इजिप्तमधील वर्तमानपत्रें व मासिकें जानेवारी १९४६ पासून बंद ठेवावीं लागतील. इजिप्तला मिळणारा पांच हजार टन कागद वहातुकीच्या जहाजांच्या टंचाईमुळें अद्याप मिळाला नाहीं.

### मासळीसाठी लॉर्ड पेथिक लॉरेन्स रांगेत उभे

भारतमंत्री लॉर्ड पेथिक लॉरेन्स मासळी घेण्यासाठी सरे परगण्यांतील आपल्या शेरी या खेडेगांवीं रांगेमध्यें उभे राहिलेले दाखविणारें एका चित्र लंडनच्या एका वृत्तपत्रांत छापलें आहे.

### मध्यवर्ती विधिमंडळ

फेब्रुवारी १८ ते २० रेलवे बजेट मध्यवर्ती मंडळापुढें वाद-विवादासाठी येईल. फेब्रुवारी २२ आणि २५ ते २७ या दिवशीं बजेट ग्रँटवर मतदान होईल. फेब्रुवारी २८ रोजीं सर्वसाधारण बजेट सभासदांपुढें ठेवण्यांत येईल, ४ मार्चला त्यावर चर्चा होईल व मार्च ८ व ९ तारखेला ग्रँटसवर मतदान होईल.

### लष्करांतून कमी झालेल्या लोकांची आय. सी. एस.मध्यें जाण्याची तयारी

लष्करी नोकरींतून खाली झालेल्या २,००० लोकांनीं आय. सी. एस., पोलिस व पोलिटिकल खात्यांत असणाऱ्या २०० जागांसाठी अर्ज केले आहेत.

### चीनमधील अमेरिकन हितसंबंध

गेल्या महायुद्धांत जर्मनी व जपान या राष्ट्रांचा पराभव होऊन ब्रिटिश व फ्रेंच साम्राज्यशाही खिळखिळी झाल्यामुळें अमेरिकेला चीनमध्यें व्यापारी साम्राज्यशाही स्थापण्याला रान मोकळें झालें आहे असें कम्युनिस्ट पार्टीच्या एका अमेरिकन मासिकानें लिहिलें आहे.

### वीज जास्त वेळ देतां येईल

इंजनें चालविण्यास लागणाऱ्या तेलाच्या तुटवड्यामुळें, मुंबई प्रांतांतिल तेलावर चालणाऱ्या विद्युत्गृहांनीं विजेचा पुरवठा दररोज किती वेळ करावा, हें १९४२ सालापासुन सरकारनें नियंत्रित केलें होतें. आतां तेलाचा पुरवठा थोडा सुधारला आहे, त्यामुळें जास्त वेळ वीज देण्यास परवानगी देण्यांत आली आहे. उदाहरणार्थ, जळगांवास पूर्वी १२½ तासांची परवानगी होती, आतां तेथें २२ तास वीज देतां येईल. महाड, बारामती, जुन्नर, वाई, इत्यादि ठिकाणीं ६ तासांऐवजीं १२½ तास वीज पुरविण्यास आतां परवानगी आहे.

### भांडवल उभारणीवरील निर्बंध

कोणत्याहि बारा महिन्यांच्या एका अवधींत पांच लक्ष रुपयांची भांडवल उभारणी करावयाची असल्यास त्यास हिंदुस्थान सरकारच्या परवानगीची आवश्यकता नाहीं; असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. बँका व विमा कंपन्या ह्यांस मात्र भांडवल उभारणीसाठी सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल.


दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई

खेळतें भांडवल : २ कोटि रुपयांवर

—शाखा—

स्थानिकः—१ दादर, २ गिरगांव, ३ सँट रोड, ४ जव्हेरी बाजार, ५ शींव, ६ विलेपार्ले, ७ माटुंगा.

इतरः—८ अमरावती, ९ अहमदनगर, १० बेळगांव, ११ बडनेरा, १२ दिल्ली, १३ देवळाली, १४ धुळें, १५ इचलकरंजी, १६ जळगांव, १७ कोल्हापूर, १८ करंजा, १९ लोणंद, २० मिरज, २१ महाड, २२ मालेगांव, २३ नागपूर, २४ नाशिक शहर, २५ नाशिक रोड, २६ नंदुरबार, २७ पुणें शहर, २८ सांगली, २९ सोलापूर, ३० सिन्नर, ३१ संगमनेर, ३२ चांदा, ३३ अकोला, ३४ कोपरगांव, ३५ पेण, ३६ मलकापूर, ३७ अहमदाबाद.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर, पुणें शाखा.

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

पायोनियर डाईंग हाऊस

—दातेवाडी, पुणें—

पक्क्या रंगाचीं कामें करून मिळतात.

रंगाची गॅरंटी हेंच आमचें ध्येय.




अर्थ

वा. व. ७ रु. ( ट. स. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## अन्याय्य कर्जांचा डोंगर, हें स्वार्थत्यागाचें फळ !

अँग्लो-अमेरिकन कर्जविषयक कराराचा मसुदा तयार होऊन त्यावर ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्या दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्या असल्या तरी प्रस्तुत करारास त्या राष्ट्रांच्या विधिमंडळांची मान्यता मिळाल्याविना बंधनकारक स्वरूप प्राप्त होणार नाहीं. अशा तऱ्हेची ब्रिटिश कॉमन्स सभेची मान्यता मिळविण्याकरितां फडणवीस, सर ह्यू डाल्टन ह्यांनीं त्या सभेंत ठराव मांडला आणि त्या ठरावावर भाषण करतांना कर्जविषयक कराराची पार्श्वभूमि व त्यांच्या वाटाघाटी ह्यांचा तपशील सांगितला. ब्रिटिश प्रतिनिधींनीं तीन महिने कसून प्रयत्न करून अमेरिकेकडून शक्य तेवढ्या सवलती मिळविल्या आणि त्याबाबत चाललेल्या वाटाघाटी मोडण्याचाहि अनेकवार प्रसंग उद्भवला. करारानें बद्ध होणाऱ्या दोन्ही पक्षांना त्यातील अटी पसंत पडल्या पाहिजेत आणि जेव्हां त्या दोन पक्षांपैकीं एकाची भूमिका प्रबळ असते तेव्हां दुसऱ्यास आपला मुद्दा विवक्षित मर्यादेपलीकडे जाऊन जोरानें मांडतां येत नाहीं. त्याची बाजूच पडती असते. अँग्लो-अमेरिकन कराराची छाननी अमेरिकन विधिमंडळ व ब्रिटिश विधिमंडळ हीं आपापल्या दृष्टिकोनानें करणार हें उघड आहे. अशा परिस्थितींत ब्रिटिश प्रतिनिधींनीं वाटाघाटींत आपल्या देशास अधिकाधिक सवलती मिळविल्या आहेत आणि आतां त्या अपुऱ्या आहेत असें म्हणण्यास वावच उरलेला नाहीं. कर्जविषयक करारावर कॉमन्स सभेंत मतमोजणी करण्यांत आली तर विरोधी पक्ष करारास विरोध करणार नाहीं असें सर जॉन अँडरसन ( माजी सर्वपक्षीय सरकारचे फडणवीस ) ह्यांनीं सांगितलें, ह्याचा अर्थच तो आहे.

ग्रेट ब्रिटननें अमेरिकेकडून प्रथम मदतीसाठी ग्रँट किंवा बिनव्याजी कर्ज मागितलें, परंतु हें व्यावहारिक होणार नाहीं आणि अमेरिकन काँग्रेस अशा व्यवस्थेस कधींच मंजुरी देणार नाहीं असा त्या मागणीस रोखठोक जबाब मिळाला. ग्रेट ब्रिटनच्या इच्छेचे मानानें त्यास अमेरिकेनें फारच थोडें दिलें, परंतु त्यास उपाय काय? आणि दिलेलें घ्यावयाचें नाहीं म्हटलें तर दुसरें काय करतां येणार ? अँग्लो-अमेरिकन करारास आपण मान्यता दिली नाहीं तर रोटी वगैरे वगळून बाकी कोणतेंच अन्न आपणांस पुरेसें मिळणार नाहीं आणि कपास व तंबाखू तर फारच कमी प्रमाणांत मिळूं शकेल आणि ह्याचा लोकांचे मनावर अत्यंत निराशाजनक परिणाम होईल असें मि. डाल्टन ह्यांनीं सांगितलें. आतां आपण अत्यंत भयंकर आणि भीतिदायक काळांत प्रवेश करीत आहों आणि त्या वेळीं अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांचें सहकार्य कायम रहाण्यास प्रस्तुत करार उपयुक्त होईल असें ते म्हणाले. ग्रेट ब्रिटनला अमेरिकेचें सहाय्य ह्या कठीण प्रसंगीं मिळवितां आलें नाहीं, तर त्याची परिस्थिति फार बिकट होईल असा त्याचा अर्थ आहे.

युद्ध जिंकून जागतिक हितासाठी ग्रेट ब्रिटननें प्रचंड स्वार्थत्याग केला, परंतु त्याचें त्याला फळ काय मिळालें ? कर्जाचा डोंगर ! इतिहासकार ह्या घटनेवर कडक टीका केल्याविना रहाणार नाहींत, असे उद्गार मि. डाल्टन ह्यांनीं काढले. ब्रिटिश लोकांच्या मनांत, प्रस्तुत कर्जाविषयीं कोणते विचार घोळत आहेत आणि त्या लोकांवर अन्याय झालेला आहे अशी त्यांची भावना कशी झालेली आहे, ह्याचें प्रतिबिंब वरील उद्गारांत आढळतें. अमेरिकेनें युद्धसहाय्य कांहीं थोडें केलेलें नाहीं. ग्रेट-ब्रिटनचे हितसंबंध युद्धांत किती तरी अधिक पटीनें गुंतलेले होते, हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. ब्रिटिश स्वार्थत्यागाचें अपेक्षेइतकें चीज झालें नाहीं व अमेरिकेच्या अटी ब्रिटिशांना निमूटपणें मान्य कराव्या लागल्या, ही त्यांची स्वाभाविक भावना आहे.

अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला द्यावयाच्या कांहीं कर्जाचा विनियोग स्टर्लिंग गटांतील देशांचे देणें फेडण्याकडे करतां यावा, अशी ब्रिटिश मागणी होती तिला अमेरिकन प्रतिनिधींनीं मुळींच सहानुभूति दर्शविली नाहीं. ग्रेट ब्रिटनचें स्टर्लिंग गटांतील देशांचें देणें अजूनहि वाढत चाललेलें आहे, कारण ब्रिटिश निर्गतींतून त्यास आयात मालाचे पैसे देतां येण्याजोगी अद्याप परिस्थिति नाहीं. हिंदुस्थान, इजिप्त इत्यादि स्टर्लिंग गटांतील देशांचें ग्रेट ब्रिटननें देणें फेडावयाचें आहे, त्यांत काट सुचविण्यांत येणार आहे. ज्या स्वार्थत्यागाचें पुरेसें चीज अमेरिकेनें केलें नाहीं, तें करण्यास ह्या देशांना संधि मिळणार आहे. हिंदुस्थाननें आपल्या येण्यांत अवास्तव काट मान्य करूं नये, अशी येथील पुढाऱ्यांची भूमिका आहे. ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांच्या सरकारांनीं सहमतानें हा प्रश्न सोडवावयाचा आहे. परंतु, अँग्लो-अमेरिकन कराराचे वाटाघाटींत ग्रेट ब्रिटनची एका अर्थानें भूमिका कमजोर होती; दुसऱ्या दृष्टीनें हिंद-ब्रिटन वाटाघाटींत हिंदुस्थानची भूमिकाहि कमजोर रहाणार हें उघड आहे.

ह्या संबंधांतील खरा निर्णय राष्ट्रीय सरकारच करूं शकेल आणि आजच्या राज्यघटनेंत तें कांहीं शक्य नाहीं. हिंद-ब्रिटन वाटाघाटींत भाग घेण्यास कांहीं बिनसरकारी लोकांनाहि आमंत्रण दिलें जाईल, असें समजतें. हिंदुस्थान सरकारचे फडणवीस, सर आर्किबाल्ड रौलँडस ह्यांच्याकडेच अर्थात हिंदी प्रतिनिधींचें नेतृत्व राहील. ग्रेट ब्रिटन प्रत्यक्ष फेडूं शकेल, एवढ्या रकमेवरच त्या देशानें हिंदुस्थानाचें द्यावयाचें देणें तोडावें लागेल, ह्या भूमिकेवर प्रस्तुत प्रतिनिधि मंडळ वाटाघाटी करील, हें उघड आहे. दरिद्री हिंदुस्थानास त्याच्या येण्यांत कपात सहन होणार नाहीं आणि दरमाणशीं मोठें उत्पन्न असणाऱ्या कॅनडा किंवा ऑस्ट्रेलिया ह्यांचा दाखला येथें लागू पडणार नाहीं. हिंदी राष्ट्राच्या शीघ्र औद्योगीकरणास कोणत्याहि प्रकारचा बाध येणार नाहीं, ह्या दृष्टीनेंच हिंदुस्थान सरकारनें प्रस्तुत विषयाकडे पाहिलें पाहिजे. हिंदी लोकमत न अजमावतां करारानें बद्ध होण्यांतील अडचणींचा विचार सरकारनें वेळींच करणें जरूर आहे.

---

### अमेरिकेचें कर्ज नाकारलं तर ?

' अमेरिकेचें कर्ज घेण्याचें ग्रेट ब्रिटननें नाकारलें, तर लँकेशायरच्या गिरण्या चालू शकणार नाहींत. अमेरिकन कपाशीऐवजी इजिप्तची कपास त्यांना वापरावी लागेल, ती तात्काळ मिळणारहि नाहीं. त्यामुळें कापड कमी तयार होईल व कपडे अपुरे पडतील. मग निर्गतीची भाषाच नको. ' :—डॉ. डाल्टन, ब्रिटिश फडणवीस.

### अमेरिकेचें कर्ज स्वीकारलें तर ?

' ग्रेटब्रिटननें अमेरिकेचें कर्ज स्वीकारलें, तर रशिया वगळून बाकीच्या सबंध जगावरील आर्थिक सत्ता अमेरिकेच्या हातीं जाईल. लंडनचें आर्थिक केंद्र म्हणून असलेलें महत्त्व नष्ट होईल. अमेरिकेंत बाहेरील मालाची आयात मोठ्या प्रमाणावर होऊं शकेल अशा तऱ्हेचें जकातींचे धोरण आखण्याची त्या देशावर जबाबदारी नाहीं. प्रस्तुत करार हा ग्रेट ब्रिटनचा सर्वांत मोठा आर्थिक पराभव आहे ' :—मि. रॉबर्ट बूथबी, पार्लमेंटचे सभासद.

## रेल रोड को-ऑर्डिनेशन व मोटार धंद्याचें भवितव्य

लेखकः—श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी., सातारा

मुंबई सरकारच्या रेल रोड को-ऑर्डिनेशनच्या स्कीममुळें सर्व मोटारवाले अगदी बेचैन झाले आहेत व आपलें पुढें काय होणार याची भ्रांत व भीति सर्वांना पडली आहे. सरकारची तात्पुरती योजना तर सुरू जहाली आहेच. पुणें-मुंबई, पुणें-नगर वगैरे ठिकाणीं रेल्वेच्या मोटारीही सुरू जहाल्या आहेत व त्यामुळें तेथें पूर्वी चालू असलेल्या मोटारींचें उत्पन्न घटत आहे व आज कित्येक वर्षें या धंद्यावर उपजीविका करणाऱ्यांची परिस्थिति गंभीर होत चालली आहे.

### सरकारी योजना

कायमच्या योजनेकरतां मुंबई सरकारनें इलाख्याचे ११ झोन्स पाडले आहेत व प्रत्येक झोनवर एकेक कंपनी स्थापन होणार आहे. या कंपन्यांचे प्रमोटर्स व म्यानेजिंग डायरेक्टर्स यांची निवडही जहाली आहे. हल्लीच्या मोटार कंपन्यांच्या गाड्या घेण्याकरितां व्हॅल्यूएशन बोर्ड स्थापनेबाबत नोटिसाहि निघाल्या आहेत. नवीन कंपनींत एकंदर शेअर भांडवलापैकीं ३५ टक्के मुंबई सरकारचे, ३० टक्के रेल्वे बोर्डाचे, २५ टक्के हल्लीच्या मोटार वाल्यांचे व १० टक्के प्रमोटर्स लोकांचे असे शेअर्स रहाणार आहेत. या शिवाय प्रत्येक बी पार्ट मागें रु. १००० किंवा रु. १००० चे शेअर्स मोटार मालकास मिळणार असल्याचें समजतें. वरील योजना गेल्या जून मध्यें प्रसिद्ध होतांच मी तावडतोब या योजनेंतील सर्व दोष मि. टी. टी. कोठावाला प्रॉव्हिन्शियल मोटार ट्रान्स्पोर्ट कंट्रोलर यांचे नजरेस पत्रद्वारें आणले. त्यांनीं त्या बाबत मला भेटीस बोलाविलें व ही भेट ता. २५-६-४५ रोजीं जहाली. ही योजना मोटार मालकांचें फार नुकसान करणारी आहे, असें मीं त्यांना पटविलें. पण ही योजना मागें घेतां येणें शक्य नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

### मुंबई प्रांतिक मोटार युनियन्स कॉंग्रेसचें दुटप्पी धोरण

ही मोटार युनियन्स कांग्रेस मुंबई प्रांतांत मोटार मालकांचे तर्फें चळवळ करणारी संस्था आहे. वरील मि. कोठावाला यांचें उत्तरानें माझें समाधान जाहलें नाहीं म्हणून मी या मोटार कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना भेटून या बाबत कांहीं चळवळ करणें आवश्यक आहे असें पटविलें. चळवळ म्हणजे एक तर स्कीम अजीबात मान्य न करतां पूर्णपणें त्या विरुद्ध चळवळ करावयाची किंवा आहे ती स्वीकारून जास्त फायदा मिळणेंकरतां भांडावयाचें. मग स्कीम झिडकारल्यामुळें वाटेल त्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी त्यास तयारी दाखवयाची. या गोष्टीस साताऱ्यांतील सर्व मोटार-वाले तयार होते व त्यांनी ता. ४-२-१९४५ रोजीं जेव्हां मोटार कॉंग्रेसचे पुढारी सातारा येथें आले होते तेव्हां या बाबत त्यांना स्पष्ट बजावलें होतें. जून १९४५ मध्यें स्कीम प्रसिद्ध जहालेनंतर आमचे मोटार कॉंग्रेसच्या पुढारी लोकांनीं स्कीम राबविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं नवीन कंपन्यांचे प्रमोटर्सकरतां अर्जही मोटारवाल्यांचेकडून देवविले. याप्रमाणें मोटार कॉंग्रेसनें स्कीम मान्य केली व प्रमोटर्सचे अर्जांवर मोटार मालकांच्या सह्याही घेतल्या. पुढें प्रमोटर्सची निवडही जहाली. मि. कोठावाला यांनीं सर्व जिल्ह्यांतून फिरून ही स्कीम समजावून सांगितली. ते जेव्हां सातारा येथें आले तेव्हां या बाबत काय करावयांचे असा सवाल आम्ही आमच्या मोटार कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना केला तेव्हां त्यांनींही योजना राबवावयाची आहे, तुम्हीं खुशाल मान्यता द्या असें सांगितलें व त्याप्रमाणें आम्ही सातार-वाल्यांनीं मान्यता दिली. पुढें प्रमोटर्स बाबत मतमोजणी झाली, त्यांत कांहींची निवड न झाल्याकारणानें पुढाऱ्यांनीं लगेच स्कीम वाईट म्हणून प्रचारास सुरवात केली. प्रत्यक्ष मोटार मालक हे अशिक्षित असलेमुळें त्यांना इतका दूरवर विचार नाहीं. त्यामुळें पुढाऱ्यांनीं कलाटणी देतांच तेही फिरले. साताऱच्या मोटार-वाल्यांनीं मात्र आपलें धोरण कायम ठेवलें आहे.

### हुबळी येथील मोटार परिषद

मुंबई प्रांतिक मोटार कांग्रेसचे ३ रें अधिवेशन ता. ८ व ९ डिसेंबर १९४५ रोजीं हुबळी येथें जहालें. मी स्वतां तेथें हजर होतों. अर्थात या पुढारी म्हणविणाऱ्यांनीं प्रथमपासूनच आपल्या बदललेल्या पविड्याचा प्रचार करण्यास सुरवात केली. परिषद् जहाली, ठराव पास जहाले. पुढें काय ? परिषदेंतील मुख्य ठरावानुसार ही योजना फेटाळली आहे व ती पुढें ढकलण्याबाबत सरकारला विनंती करण्यांत आली आहे. वरील धोरण बदलण्याबा-बतचा पुरस्कार करताना श्री. आर. व्ही. कुलकर्णी, सेक्रेटरी साऊथ डेकन रीजनल युनियन यांनीं सांगितलें कीं, जून १९४५ मध्यें ९३ कलमा खाली राज्यकारभार चालू असलेमुळें आपणासच त्रास जहाला असता. पण त्या बाबत माझें असें म्हणणें कीं, तुमचा सरकारशीं झगडा करण्याची तयारी आहे. मग हालअपेष्टांस कां भितां ? व आपलें तत्त्व कां सोडतां ? त्यांनीं दुसरा आक्षेप असा घेतला कीं पुढें येणारे सरकारनें म्हणजे कांग्रेस सरकारनें आम्हांस लेखी आश्वासन दिल्यास सर्व लोक विरोध करण्यास तयार आहेत. पण हें त्यांचें म्हणणें चूक आहे. कारण ही मागणी एकाहि मोटारवाल्यानें केली नाहीं. पुढें येणारें सरकार आपलें आहे व तें अनंत परींनीं हल्लीच्या नोकरशाहीपेक्षां विश्वसनीय आहे ही गोष्ट सांगण्याची जरूरी नाहीं.

### (राजकीय) कांग्रेस पुढाऱ्यांचीं भाषणें

परिषदेचे अध्यक्ष श्री मिनू मसाणी होते. तसेच सभेंत श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. करमरकर वगैरे यांचीं भाषणें जहालीं. या सर्वांच्या भाषणांत त्यांनीं रोड ट्रान्स्पोर्टचें महत्व सांगितलें. परंतु मोटारवाल्यांचे बाजूनें कोणीही आश्वासन दिलें नाहीं. कॉंग्रेस अधिकारारूढ जहाल्यास सर्वांना न्याय मिळेल असें त्यांनीं सांगितलें व त्यावद्दल कोणालाही शंका नाहीं. तर उलट श्री. काकासाहेबांनीं स्पष्ट इशारा दिला कीं, मोटारवाल्यांना हे २५ टक्के शेअर्स देऊन त्यांची सरंजामी कां उत्पन्न करावी ? ते पुढें म्हणाले कीं, मोटारवाल्यांनीं मि. ब्रिस्टोच्या सुरीनें मरण्यापेक्षां श्री. काकासाहेबांच्या सुरीने मेलेलें काय वाईट ? ठीक आहे. पण मला धंद्याच्या दृष्टीनें बोलावयाचें जहाल्यास असें सांगावयाचें कीं मि. ब्रिस्टो हे मोटारवाल्यांना थोडे जिवंत ठेवीत आहेत पण श्री. काकासाहेब पूर्ण सुरी फिरवीत आहेत.

### मोटार मालकांना इशारा

मी पक्का राजकीय कॉंग्रेसचा आहे व सर्व राजकीय पुढाऱ्यां-बद्दल मला अतिशय आदर आहे. मी मोटार कॉंग्रेसमध्येंही आज-पर्यंत होतो. पण वरील दुटप्पी धोरणामुळें मी त्यांचेशीं माझा संबंध सोडून दिला आहे. कॉंग्रेस सरकार आल्यास मोटार माल-कांना निश्चित न्याय मिळेल व श्री काकासाहेबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्या रास्त मागण्यांचा विचार केला जाईल व तें अगदी मान्य आहे. कारण श्री भुलाभाई देसाई यांनीं सांगितलेप्रमाणें कॉंग्रेसला केवळ थोड्या मोटार मालकांना जगवा-वयाचें नाहीं. ४० कोटी जनतेच्या भाकरीचा प्रश्न सोडवावयाचा आहे. याबाबत दोन मुद्दे लक्षांत घेणें जरूर आहे. (१) को-ऑर्डि-

(पान ४५२ पहा)

# स्फुट विचार

## ब्रेटन वुड्स् करार

कर्जविषयक अँग्लो-अमेरिकन कराराच्या अंमलबजावणीशी ब्रेटनवुड्स् करार आणि त्यांतील इंटरनॅशनल मोनेटरी फंड व इंटरनॅशनल बँक ह्यांचा फार निकटचा संबंध असल्यानें, त्या संबंधांतील हिंदुस्थानाच्या परिस्थितीचा खुलासा येथें करणें आवश्यक आहे. चलन व हुंडणावळ ह्याविषयीं आंतरराष्ट्रीय सहकार्य घडून यावें, हा प्रस्तुत मोनेटरी फंडाचा उद्देश आहे आणि हिंदुस्थानानें त्यांत मूळ सभासद म्हणून दाखल होण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर ही आहे. ब्रेटनवुड्स् कराराबाबत मध्यवर्ती असेंब्लीचा सल्ला घेण्यांत येईल, असें तेव्हांचे फडणवीस सर जेरेमी राइस्मन ह्यांनीं आश्वासन दिलें होतें. परंतु असेंब्लीचें त्यानंतर अधिवेशनच भरलें नाहीं त्यामुळें मध्यवर्ती विधिमंडळाचा अधिकृत सल्ला सरकारास मिळूं शकणार नाहीं. तथापि हिंदी व्यापारी प्रातिनिधिक मंडळांपैकीं प्रमुख तिघांचा सल्ला हिंदुस्थान सरकार घेणार आहे. आतांच हिंदुस्थानानें सभासदत्व पत्करल्यास त्याला एक्झिक्यूटिव्ह कमिटीवर जागा मिळूं शकेल व पुढें उपस्थित होणाऱ्या प्रश्नांच्या महत्त्वाच्या प्राथमिक चर्चेत भाग घेतां येईल, असा हिंदुस्थानच्या सभासदत्वास पाठिंबा देणाऱ्यांचा मुख्य मुद्दा आहे. हिंदुस्थानाचा त्यामुळें आंतरराष्ट्रीय दर्जा वाढेल, हिंदुस्थान एकाकी आहे असा त्याचेवरील संभाव्य आरोप टळेल, वगैरेहि मुद्दे पुढें मांडण्यांत येत आहेत. ब्रेटन वुड्स कराराला मान्यता देणें आर्थिकदृष्ट्या फारसें फायद्याचें नसलें तरी व्यवहार व धोरण ह्या दृष्टीनें तो करार स्वीकारला पाहिजे, असेंच ग्रेटब्रिटनमधील तज्ज्ञांचें मत आहे. अमेरिकेची मैत्री व उदार वृत्ती टिकविण्यासाठी द्यावयाची ती किंमत आहे. अमेरिकन कर्ज मिळालें तरच ग्रेटब्रिटन ब्रेटनवुड्स् करारांतील जबाबदाऱ्या पत्करूं शकेल, हें ब्रिटिश फडनवीस ह्यांनीं नुकतेंच स्पष्ट केलें आहे.

## "कर्जात काट होणार, मग तें वाढवूं तरी नका"

सर चुनिलाल भाईचंद मेहता ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भाषण केलें. त्यांत त्यांनीं अँग्लो–अमेरिकन आर्थिक कराराची पार्श्वभूमि समजावून सांगितली. युद्ध संपून गेल्यानंतरहि अजून हिंदुस्थान ग्रेट ब्रिटनला येथें माल खरेदी करूं देत आहे. त्यामुळें हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमधील येणें फुगत चाललें आहे. हिंदुस्थानाच्या येण्यांत पुढें काट मारावयाची जर आहे, तर तें आज फुगविण्यांत हिंदुस्थानाचें नुकसानच नाहीं काय? असा सरळ प्रश्न त्यांनीं विचारला आहे. रिझर्व्ह बँकेनें ठराविक मर्यादेपलीकडे स्टर्लिंग पौंडांतील आपली शिल्लक वाढवूं देऊं नये; बँकेच्या सेंट्रल बोर्डानें त्याप्रमाणें स्पष्ट ठराव करावा आणि त्याचा सल्ला हिंदुस्थान सरकारनें मानला नाहीं, तर त्याहिपुढें जाऊन धैर्यानें योग्य ती योजना करावी, असें सर चुनिलाल ह्यांनीं सांगितलें.

## शेअर दलालांना सल्ला

गुजराथ स्टॉक अँड शेअर एक्सचेंजचा रौप्य महोत्सव शेठ कस्तुरभाई लालभाई त्यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच साजरा झाला. उद्योगधंद्यांस लागणारें भांडवल शेअर्सच्या स्वरूपांत उभारून लिमिटेड कंपन्या स्थापन केल्याविना मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे काढणें आतां अशक्य झालें आहे. अशा शेअर्सची उभारणी व खरेदी-विक्री करण्याचें शेअर बाजार हें मुख्य साधन आहे. शेअर बाजाराचें महत्त्व व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांचे संबंधांत फारच मोठें आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीस शेअर बाजाराचें अधिकाधिक सहाय मिळावें ह्या दृष्टीनें शेठ कस्तुरभाई ह्यांनीं आपल्या भाषणांत कांहीं सूचना केल्या. दलालांनीं योग्य तो अभ्यास करून आपल्या गिऱ्हाइकांना त्यांच्या हिताचा सल्ला द्यावा आणि वेगवेगळे धंदे, त्यांची व्यवस्था व त्यांचें भवितव्य ह्याविषयीं गिऱ्हाइकांस नेहमी माहिती देत रहावी असें ते म्हणाले. शेअर बाजारांतील सट्टेबाजीचें उच्चाटण करण्याचा त्यांचा सल्ला आहे. अर्थात, शेअर बाजारांतील कसलेल्या सट्टेबाजांवर त्याच कांहींहि परिणाम होणार नाहीं.: लोकांनीं आपले पैसे फक्त गिरण्यांच्या शेअर्समध्येंच न गुंतवितां लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांच्या शेअर्सकडेहि त्यांनीं लक्ष पुरवावें व त्या धंद्यांच्या जोपासनेचें श्रेय घ्यावें, अशीहि शेठ कस्तुरभाईंची सूचना आहे.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

ऑक्टोबर १९४४ ते सप्टेंबर १९४५ ह्या बारा महिन्यांच्या कारभारांत वरील कंपनीस घसारा व मॅनेजिंग एजंटांचें कमिशन ह्यांची तरतूद करून १,०२,८०२ रु. निवळ नफा झाला. ऑर्डिनरी भागांस १०% व प्रेफरन्स भागांस ५% डिव्हिडंड कायम ठेवण्यांत आलें आहे. कंपनीच्या कारखान्यांत १,००० एकरांत होणाऱ्या उसाचीच साखर होऊं शकते. त्याची 'क्रशिंग कपॅसिटी' वाढविण्यासाठी साखर करण्याचीं मोठीं यंत्रें विकत घेणें जरूरीचें झालें आहे आणि त्याकरितां ७० लक्ष रुपयांचे शेअर्स विक्रीस काढावे, असें संचालकांचें मत आहे. कंपनीकडील ठेवींची रक्कम २५ लक्ष रुपयांची आतां ४३½ लक्ष रुपये झाली आहे. नवीन शेअर्समध्यें त्यापैकीं बऱ्याच रकमेचें रूपांतर होणें अगदी संभवनीय आहे.

## ब्रिटिश पायतणांची निर्गत

ब्रिटिश पायतणांची निर्गत वाढविण्याचा विचार चालूं आहे परंतु ह्या वाढीस फारसा वाव नाहीं, असें दिसतें. युद्धापूर्वी इतकी निर्गत शक्य दिसत असली तरी दक्षिण आफ्रिका, इजिप्त, पॅलेस्टाइन, हिंदुस्थान, इत्यादि ठिकाणचें उत्पादन युद्धकाळांत पुष्कळच वाढलें असल्याकारणानें आणि दक्षिण अमेरिकेंतील देशहि पायतणांचें उत्पादन करूं लागल्याकारणानें, सरकारी सहायावाचून हा ब्रिटिश धंदा १९३० च्या उच्च स्थानास पोचण्याचा संभव नाहीं. युरोपांतील देश व जपान ह्यांची स्पर्धा बंद पडली आहे आणि जगांतील सर्व ठिकाणच्या दुकानांतील पायतणांचीं कपाटें रिकामी झाली आहेत. तथापि, ह्या अनुकूल परिस्थितीचा फायदा ब्रिटिश कारखानदारांस मिळणें ब्रिटिश सरकारच्या मदतीवर अवलंबून आहे. ब्रिटिश कातडी पायतणांच्या निर्गतीचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेतः—

| वर्ष | पायतणांच्या जोड्या ( लक्ष ) | किंमत ( लक्ष पौंड ) |
|---|---|---|
| १९३० | १०८ | ४० |
| १९३१ | ८३ | २९ |
| १९३२ | ७७ | २४ |
| १९३३ | ६३ | १९ |
| १९३४ | ५३ | १६ |
| १९३५ | ४५ | १४ |
| १९३६ | ४४ | १५ |
| १९३७ | ५१ | १६ |
| १९३८ | ४४ | १५ |
| १९३९ | ४० | १४ |

## हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या मार्गांतील अडचणी

मराठा चेंबरचे एक सल्लागार, प्रा. द. गो. कर्वे ह्यांची लाहोर येथें भरणाऱ्या २८ व्या हिंदी आर्थिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्याप्रीत्यर्थ चेंबरच्या कार्यकारी मंडळानें त्यांचा ता. १९ रोजीं सत्कार केला. चेंबरचे कार्याध्यक्ष, श्री. द. वा. पोतदार, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत प्रा. कर्वे ह्यांच्या कामगिरीचा थोडक्यांत व मुद्देसूदपणें परिचय करून दिल्यावर श्री. आ. रा. भट व श्री. दत्तोपंत फाटक ह्यांचीं प्रा. कर्वे ह्यांच्या गौरवपर भाषणें झालीं. न्यायमूर्ति रानडे ह्यांची उज्वल परंपरा चालविण्याचें महत्कार्य प्रा. काळे ह्यांनीं अंगिकारलें व त्यांचे सच्छिष्य प्रा. कर्वे ह्यांनीं ती परंपरा राखली आहे, असें श्री. भट ह्यांनीं सांगितलें. प्रा. कर्वे ह्यांच्या उत्तरानंतर श्री.श्री. वा. काळे ह्यांनीं आभारप्रदर्शन केल्यावर अल्पोपहारानंतर सभेचें काम संपलें.

### प्रा. कर्वे ह्यांचें भाषण

प्रा. कर्वे हे आपल्या भाषणांत म्हणाले, "रानडे, टिळक, आगरकर, ह्यांनीं दिलेली स्फूर्ति व केलेला स्वार्थत्याग हीं एवढी मोठीं आहेत कीं, त्यांनीं घालून दिलेला धडा केवळ गिरविला तरी मोठें कार्य होऊं शकतें. भोंवतालच्या परिस्थितींस अनुसरूनच अर्थशास्त्रज्ञांच्या कार्याचें तेज पडूं शकतें आणि विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट मतें आणि तत्त्वें ह्यांचा उदय होतो. हिंदी राजकीय परिस्थिति ज्या प्रमाणांत आपणांस अनुकूल होईल, त्या प्रमाणांत हिंदी अर्थशास्त्रज्ञांची उपयुक्तता वाढेल. भरमसाट चलनवाढीवर वीस प्रमुख हिंदी विचारी अर्थशास्त्रज्ञांनीं आपले विचार व्यक्त करणारें एक पत्रक काढून तें हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांकडे धाडलें, त्याची साधी पोंच सुद्धां आली नाहीं, ह्या एका उदाहरणावरून अर्थशास्त्रज्ञांस भोंवतालच्या परिस्थितीचा आधार कां हवा, हें स्पष्ट होईल. ह्या पुढील काळांत हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या मतांस अधिकाधिक महत्त्व मिळत जाईल, हें उघड आहे. रानडे प्रभृति थोर पुढाऱ्यांनीं ह्या पूर्वी केलेल्या कार्याची महति किती मोठी आहे, हें वरील गोष्टींवरून कळून येईल."

### ब्रिटननें काढलेलें अमेरिकेचें कर्ज

हिंदुस्थान सरकारचे पूर्वीचे व्यापार मंत्री श्री. एन. आर. सरकार हे ब्रिटनला मिळालेल्या अमेरिकन कर्जाबद्दल बोलतांना म्हणाले कीं, या कर्जानिमित्तानें ब्रिटननें हिंदुस्थानच्या केलेल्या देण्यांत सूट मागणें अगदीं अयोग्य आहे. या हिंदुस्थानच्या देण्यांत सूट मागतांना असा मुद्दा पुढें आणण्यांत येतो कीं युद्धांत हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर नेलेल्या हिंदी सैन्याचा सर्व खर्च ब्रिटननें सोसला व हिंदुस्थानच्या संरक्षणाचा भार उचलला; परंतु ते म्हणाले कीं, हा समज चुकीचा आहे. या सैन्याचा उपयोग हिंदुस्थानच्या संरक्षणाकरितां न होतां शाही राज्याच्या व वसाहतींच्या संरक्षणासाठीं व ब्रिटनचा जगांतला दबदबा वाढवण्याकडे करण्यांत आला असें ते म्हणाले.



व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

नोगीचें डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.

लहान मुलांकरितां आर्को गोड —एरंडेल— वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा ( xd )
बॉम्बे बर्मा रु. ७–८–० दि. ११–१२–४५
असो. सीमेंट रु. ७–०–० दि. १४—१–४६
बेलापूर रु. ८–०–० दि. १५—१–४६
सिंप्लेक्स रु. ४–०–० दि. १४—१–४६

| १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार १०।१२।४५ | मंगळवार ११।१२।४५ | बुधवार १२।१२।४५ | गुरुवार १३।१२।४५ | शुक्रवार १४।१२।४५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३१५; १९१६ | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २५४२—८ | २५५८–१२ | २५७२—८ | २५४५—० | २५५५—० |
| ४३५; ३६९ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४६०—० | ४६४—८ | ४६९—० | ४५८—० | ४६३—८ |
| २२०१; १६९५ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २१४५—० | २१५८–१२ | २१५७—८ | २१४२—८ | २१३८–१२ |
| ७६५; ५३३ | ९—–० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६५६—८ | ६६४—० | ६६४—० | ६६०—० | ६६५—० |
| ६५१; ४७५ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ६२०—८ | ६२३—८ | ६२४—० | ६२१—० | ६२०—० |
| ४९८; ३६१ | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४१७—० | ४२१—८ | ४२२—० | ४२०—० | ४१९—८ |
| ३७७; २६५ | १५–०–० | एप्रिल | फिनले | १०० | ३१९—८ | ३१९—० | ३१८—८ | ३२०—० | ३१८—८ |
| ३९४; २८२ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३२०—० | ३१९—० | ३१९—० | ३१९—० | ३१७—८ |
| ३०५; २१८ | ४–०–० † | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२४—८ | ३२७—८ | ३२८—० | ३२४—० | ३२३—८ |
| ५-१०-६; ३-६ | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ४—७ | ४—७ | ४—७ | ४–१०–६ | ४—८–६ |
| २१-१४;१३-४-६ | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६—१ | १६—२ | १६—६ | १६—६ | १६–५–० |
| ४-९; २-७ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—३ | ३—३ | ३—३ | ३—४ | ३–३–६ |
| १२७०; ६३० | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७२६—८ | ७७३–१२ | ७७१—४ | ७७२—८ | ७७०—० |
| २५४; २१६ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३५—४ | २३५—८ | २३७—८ | २३६—८ | २३६—८ |
| २५९; २१९ | ९–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २३५—० | २३६—० | २४०—० | २४०—० | २३९—८ |
| ५७५; ३७६ | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५७६—४ | ५८०—० | ५७६—४ | ५७७—८ | ५७७—८ |
| ३८; २९-२ | १–४–० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | ३९—० | ३९—० | ३८–१५ | ३९—० | ३८–१३ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—९ | १०३—९ | १०३—८ | १०३—८ | १०३–८–० |

शुक्रवार दि. १४–१२–४५ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०२—०–० | बरोडा | १६३—८ | आंध्रा व्हॅली | १८३०—० | अलकॉक | ४४०—० |
| १९५१–५४ | १०१–११–६ | सेंट्रल | १०२—८ | बॉम्बे ट्रॅम | १५१–४ | बॉंबे स्टीम | ६२६—४ |
| १९५७ | १००–१०–६ | इंडिया | २२६—८ | टाटा हायड्रो | २१५–० | न्यू इंडिया | ९३—४ |
| १९५९–६१ | ९९–१५–० | इंपी० | २४४७—८ | टाटा पॉवर | १९४२–८ | शिवराजपुर | ५८—४ |
| १९६३–६५ | ९९—८–० | | ६०५—० | | | टाटा केमिकल | १८–१४ |
| १९६६–६८ | ९८–१०–० | रिझर्व्ह | १५६—० | | | टाटा ऑईल | ८२—० |
| १९७०–७५ | ९७—८–० | युनियन | ११–१२ | | | | |

' नाताळानिमित्त ' शनिवार दि. २२ पासून बाजार बंद आहे.
चालू वळण शुक्रवार दि. २१–१२–४५ ला पुरे होऊन त्याची पटावट ४ जानेवारी १९४६ ला होईल.


# ठेवी घेणें आहेत

**श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर**

**अधिकृत भांडवल १५ लाख**

**खपलेलें भांडवल ८॥ लाख**

मिलसची एकूण जिंदगी रु. १० लाखांची असून, मशिनरी रु. ६ लाख, इमारत रु. ३ लाख व कच्चा–पक्का माल रु. १ लाखाचा आहे. गिरणीसाठीं आणखी मशिनरी खरेदी होत असून चात्याहि वाढविण्यांत येणार आहेत.

कंपनीच्या वाढत्या व्यापासाठीं ठेवी घेणें आहेत. व्याजाचा दर १ वर्ष ५ टक्के, २ वर्षें ५॥ टक्के.

**माहितीपत्रक व ठेवीच्या अर्जाचा नमुना मागवा**

**पायोनियर डाइंग हाऊस,**

**८१४ सदाशिव, पुणें २.**


**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड.**
**९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड पुणें २**

## नोटीस

ता. ४ फेब्रुवारी, १९४६ नंतर सिंडिकेटच्या भागीदारांना त्यांचीं डिव्हिडंड वॉरंटस् रवाना करण्यांत येतील. तरी ज्या भागीदारांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं आपले बदललेले पत्ते सिंडिकेटचे ऑफिसांत कळविण्याबद्दल विनंति आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.
मॅनेजिंग एजंटस




### खतें घालून माशांची लागवड

हिंदुस्थानांत खाद्य-पदार्थ अधिक पिकविण्याच्या मोहिमेंत मच्छीमारीस महत्त्वाचें स्थान आहे. पाण्यांतील माशांची संख्या कशी वाढवावी याबाबत पाश्चात्य देशांत कांहीं प्रयोग चाललेले आहेत त्या संबधांत इंपीरियल केमिकल इंडस्ट्रिजनें काढलेल्या पत्रकांतील पुढील माहिती या दृष्टीनें महत्त्वपूर्ण आहेः—

मोठ्या प्रमाणावर माशांची संख्या वाढवावी असा संकल्प शास्त्रज्ञांनीं अजून केलेला नाहीं व तसें करणें आतां तरी शक्य दिसत नाहीं. तरीपण प्रयोगावरून असें दिसून येतें कीं जसें खत घालून पीक अधिक निघूं शकतें तसेंच पाण्यांत खत घातल्यास मासेहि अधिक निघतात. प्रत्येक माशाची मादी हजारों अंडीं घालते पण त्यांतील फारच थोडे मासे मोठे होईपर्यंत जगतात. याचें कारण मुख्यतः खाण्याची कमतरता होय असें दिसतें. ज्याप्रमाणें जमिनीवरील जनावरांची पैदास कुरणांच्या वाढीवर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें माशांची वाढ समुद्रांतील वनस्पतींवर अवलंबून आहे. मात्र ह्या वनस्पती म्हणजे तळाशीं उगवणाऱ्या वनस्पती नाहींत. या वनस्पती पाण्यांत अर्धवट तरंगत असतात व त्यांस फायटोप्लँक्टन असें सर्व साधारण नांव आहे. यांवर कांहीं लहान कृमि जगतात व त्यांवर लहान मासे जगतात. हे मासे मोठ्या माशांचें खाद्य होत. फायटोप्लँक्टन वाढविण्यास पाण्यांत नायट्रेट व फॉस्फेट खत शास्त्रज्ञांनीं टाकलें. लवकरच तळ्यांतील माशांची संख्या दुप्पट झाली व कांहीं माशांचें वजन २५ पटींनीं वाढलें! आर्थिक दृष्टीनें हें कितपत परवडतें याचा अंदाज पत्रकांत दिलेला नाहीं परंतु शास्त्रीय दृष्टीनें प्रयोग यशस्वी झाले आहेत हें निश्चितपणें पत्रकावरून दिसतें. हेच प्रयोग आतां अधिक मोठ्या प्रमाणावर चालू आहेत.

( पान ४४८ वरून चालू )

नेशन व (२) नॅशनलायझेशन. येणाऱ्या कांग्रेस सरकारला जर नुसते को-आर्डिनेशन करावयाचे असल्यास ते निश्चितपणे कांहीं मध्यवर्ती मार्ग काढून मोटार मालकांचे नुकसान होऊ देणार नाहीं. म्हणजे या धंद्यांत हल्लीचे मोटार मालक राहूं शकतील. परंतु कांग्रेस सरकारच्या निवडणूकीच्या जाहिरनाम्याप्रमाणें त्यांस वहातुकीच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण करावयाचे आहे. सार्वजनिक उपयोगी मूलग्राही धंदे देशाचे व्हावेत याबद्दल कोणाचें दुमत असण्याचें कारण दिसत नाहीं. आज मोटार मालकापुढे हल्लीच्या सरकारला तोंड देण्याचा प्रश्न आहे. गाड्यांचे व्हॅल्युएशनबाबत सरकारकडून पत्रेही आली आहेत. तेव्हां सत्याग्रह करून सरकारी योजना धुडकाऊन लावण्याचा प्रयत्न करून पुढील अनिश्चित भवितव्यावर अवलंबून रहाणें हा एक मार्ग आहे. किंवा आज धंदा व राजकारण यांची सांगड न घालता धंद्याचे दृष्टीनें काय मिळतें तें घ्यावयाचे व जास्त मिळविण्याकरितां सरकारशी झगडा करावयाचा हा दुसरा मार्ग आहे. कारण आज आपण मिळते त्याचा स्वीकार केला तरी त्यामुळें पुढे येणाऱ्या कांग्रेस सरकारला मोटार मालकांचे जास्त हित करण्यास कांहीं अडकाठी नाहीं. लोकतंत्र राज्यव्यवस्था आल्यास त्यांनीं प्रमोटर्स रद्द करणे, त्यांचे शेअर्स हल्लीच्या मोटार मालकांना वर्ग करणे, म्यानेजींग डायरेक्टर्सचे पगार कमी करणे वगैरे मार्गांनीं त्यांना कोआर्डीनेशन करतां येऊन हल्लीच्या मोटारमालकांचे हित करतां येईल. अथवा सर्वच धंद्याचे राष्ट्रीयकरण करतां येईल. आज मोटार मालकापुढें परिस्थिती फार कठीण आहे या दृष्टीने वरील सर्व मुद्दे लक्षांत घेऊन ते योग्य त्या दिशेने जातील अशी मला आशा आहे.


**पैसा आणि ज्ञान वाढवा !**

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
मायखळा पुल, नं. १७ मुंबई.

**झारापकर**
**टेलरिंग कॉलेज**
दादर, मुंबई १४.
माहिती मोफत मागवा

सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



**आशा**

Asha

**सौंदर्य साधनें**

विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई—गोवा—बंगलोर—दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

**दि आयडिअल इन्स्टिट्यूट**
४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

——कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.——


**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.





REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख २६ डिसेंबर, १९४५ अंक ५१





## सारस्वत
### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[ स्थापना १९१८ ]

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३०-११-१९४५

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. २,७०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,६७,००० |
| ठेवी ... | रु. ५३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ५९,००,००० |

शेअर विक्री चालू आहे.

सभासदांना जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या शेअरवर सवलतीच्या दरानें कर्ज, ओव्हरड्राफ्ट, अगर कॅश क्रेडिट देण्यांत येतें.


बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

स्प्रिंग टाईप
## " डुप्लीकेटर "
दर ताशीं ४०० प्रती प्रमाणें हजारों प्रती काढा ! !




सर्व ऑफिसें, शाळा, कॉलेजें, बँका, विमाकंपन्या, कारखाने, म्युनिसिपालिट्या वगैरे

—सर्वच संस्थांना अत्यंत उपयुक्त—

किंमत रु. ८५-१२ फक्त. पॅकिंग, रेल्वे वगैरे खर्च निराळा.

आजच माहितीपत्रक मागवून ऑर्डर पाठवा.

कारखानदार:—

शेवडेजू कॅमेरा वर्क्स लि. बेळगांव

S. M. C.

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### कलकत्ता स्टॉक एक्सचेंजनें पंडित नेहरूंना दिलेली थैली

पंडित जवाहरलाल नेहरूंना कलकत्ता स्टॉक एक्सचेंज असोसिएशननें नुकतीच एक लक्ष रुपयांची थैली अर्पण केली. कॉंग्रेस पुढाऱ्याला दिलेली त्या स्टॉक एक्सचेंजच्या इतिहासांतील ही पहिलीच थैली होय. पंडित नेहरू सभासदांना उद्देशून म्हणाले, "स्टॉक एक्सचेंजमध्यें माझ्या आयुष्यांत आज मी प्रथमच पाय टाकीत आहें." त्यांच्या मनांत या ठिकाणीं सट्टेबाजी ऊर्फ जुगार चालतो असें म्हणावयाचें होतें परंतु "येथें नसलों तरी इतरत्र मीहि एक प्रकारचा जुगारच खेळतों" असें ते म्हणाले.

### विलायतमध्यें हिंदी अत्तराची आवड उत्पन्न करण्याचा प्रयत्न

सुमारें ३०० रुपये किंमतीचें हिंदी अत्तराचें एक लहानसें पार्सल नुकतेंच विलायतेस पोचलें. १९३९ नंतर परदेशांत अत्तर पाठविण्याला ही पहिल्या प्रथमच परवानगी मिळाली. विलायतेंतील स्त्रियांमध्यें हिंदी अत्तराची आवड उत्पन्न करण्याकडे ह्या पार्सलाचा उपयोग केला जाईल.

### सरकारी बक्षिसांचे रोखे

याउप्पर पंचवार्षिक बक्षिसाचे सरकारी रोखे हिंदुस्थान सरकार बाजारांत आणणार नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे.

### हिंदुस्थान व अमेरिका ह्यांतील व्यापारी करार

हिंदुस्थान व अमेरिका ह्या देशांत एक व्यापारी करार करावा अशी अमेरिकन सरकारनें नुकतीच हिंदुस्थान सरकारला सूचना केली आहे.

### रशियाची चवथी पंचवार्षिक योजना

रशियाची नवी पंचवार्षिक योजना आखून तयार आहे. उद्योगधंदे, घरें, शिक्षण, मोटारींचें उत्पादन, आरोग्य, रस्ते, कालवे, आगबोट बांधणी, शेती, विजेचें उत्पादन इत्यादि सर्व महत्त्वाच्या बाबींचा तीमध्यें समावेश केलेला आहे.

### सिनेमाची कच्ची फिल्म

१५ डिसेंबरपासून सिनेमाच्या कच्चा फिल्मवरील निर्बंध उठल्याकारणानें आतां सिनेमा कंपन्यांनीं अमूक एक लांबीचे प्रचार पट काढलेच पाहिजेत ही अट काढून घेण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें युद्धकालीं ट्रेलर्स काढण्याला जी बंदी होती तीहि दूर करण्यांत आली आहे, मात्र त्याची लांबी ३०० फुटांहून अधिक नसावी म्हणजे झालें. कोणत्याहि चित्रपट कार्यक्रमांत दाखविण्यांत येणाऱ्या फिल्म्सची लांबी १४,५०० फुटांहून अधिक असूं नये हा निर्बंध अद्याप आहेच. या साडेचवदा हजार फूट लांबींतच एकाहून अधिक निरनिराळया जातीच्या फिल्म्स असल्या तरी चालतील. केवळ जाहिरातीवजा फिल्म्स घेण्याला मात्र अद्याप बंदी आहेच.

### परदेशांत विद्याभ्यासासाठी सरकारी शिष्यवृत्त्या

१९४६-४७ सालांत मध्यवर्ती सरकारच्या २५३ व प्रांतिक सरकारच्या ३४७ अशा एकंदर ६०० शिष्यवृत्त्या परदेशांत जाऊन अभ्यास करण्यासाठी देण्यांत येणार आहेत. यंदाप्रमाणें या शिष्यवृत्त्या फक्त यांत्रिक शिक्षणासाठीच नसून युद्धोत्तर उपयुक्त अशा दुसऱ्या विषयांना देखील या शिष्यवृत्त्या देण्यांत येतील.

### उसाची लागवड एक टक्का कमी

उसाची लागवड गतवर्षी ४० लक्ष, २४ हजार एकरांत झाली होती ती यंदा फक्त ३९ लक्ष, ८८ हजार एकरच आहे. म्हणजे यंदाचे सालीं शेकडा एक इतकें लागवडीचें प्रमाण घटलें.


भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें
—आदर्श ठिकाण—

**चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स् लिमिटेड**

मॅनेजिंग एजंटस:—चितळे ब्रदर्स
रजिस्टर्ड ऑफिस—वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारत.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षें | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

**ठेवी घेणें आहेत**

**श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लि., भोर**

अधिकृत भांडवल १५ लाख
खपलेलें भांडवल ८॥ लाख

मिल्सची एकूण जिंदगी रु. १० लाखांची असून, मशिनरी रु. ६ लाख, इमारत रु. ३ लाख व कच्चा–पक्का माल रु. १ लाखाचा आहे. गिरणीसाठी आणखी मशिनरी खरेदी होत असून त्याहि वाढविण्यांत येणार आहेत.

कंपनीच्या वाढत्या व्यापासाठी ठेवी घेणें आहेत. व्याजाचा दर १ वर्ष ५ टक्के, २ वर्षें ५॥ टक्के.

माहितीपत्रक व ठेवीच्या अर्जाचा नमुना मागवा

**पायोनियर डाइंग हाऊस,**
८१४ सदाशिव, पुणें २.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



अर्थ

वा. व. ४ रु. ( ट. ख. माफ. ) किरकोळ अं. २ आणे.

## हातमागाच्या धंद्याचें भवितव्य

### सहकारी संघटनेचें महत्त्व

हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन गेल्या चाळीस वर्षांत ७००% वाढलें असलें तरी हातमागाच्या धंद्याचें महत्त्व अद्याप कायम आहे. कापडाच्या एकूण हिंदी मागणीपैकी चौथा हिस्सा मागणी हातमागाचें कापड पुरी पाडतें आणि गिरण्यांतील वाढत्या उत्पादनानें फक्त परदेशी कापडाची हकालपट्टी केलेली आहे. हातमागावरील कापडाचा खप अद्याप कायमच आहे. एकूण सुमारें २ लक्ष हातमाग सबंद हिंदुस्थानांत चालू आहेत आणि त्या धंद्यावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें १ कोटि लोक आज अवलंबून आहेत. हातमागावरील कापडाच्या किंमतीपैकी ४०% किंमत मजुरीचीच असते; गिरणीच्या कापडांत मजुरीची किंमत २५% भरते. त्याकारणानें गिरण्यांतील उत्पादन मोठें असलें तरी त्यावर चरितार्थ त्या मानानें थोड्या लोकांचाच चालतो. यांत्रिक शक्तीनें चालणाऱ्या मागांची संख्या आतां वाढत आहे. १९४१ सालीं ती ११,००० होती. हातमागांतील गैरसोयी नष्ट होऊन गिरणींतील सोई ह्या भागांत उपलब्ध होतात हा त्यांचा मुख्य फायदा आहे.

महायुद्धास प्रारंभ झाल्यानंतर जपानी सुताची आयात बंद पडली आणि हिंदी गिरण्यांनीं स्वतःच मोठ्या प्रमाणावर सूत वापरण्यास प्रारंभ केला. युद्धापूर्वी हातमागांवर दरसाल १८० ते १९० कोटि वार कापडाचें उत्पादन होत असे, तें १९४१ नंतर १५० कोटि वारांवर आलें. १९४१–४२ मध्यें एकूण ८२ लक्ष पौंड सुताची आयात झाली होती; १९४३–४४ मध्यें ती फक्त ६ लक्ष पौंड भरली. ह्या आकड्यांवरून हातमागांची कुचंबणा कशी झाली, हें स्पष्ट दिसून येईल. सरकारनें हातमागाच्या कापडाची किंमत नियंत्रित केली नाहीं, म्हणून कोष्टी लोक जिवंत राहूं शकले. पॉवरलूम्सच्या कापडावरहि किंमतीचें नियंत्रण नाहीं. २५ पेक्षा ज्यास्त पॉवरलूम्सच्या गटांस तें लागू आहे, परंतु असे गट फारसे नाहींत. हातमागांस सुताचा पुरवठा पुरेसा व वक्तशीर होऊं शकला नाहीं, त्या कारणानें रोज सरासरीनें ८ वार कापड विणणाऱ्या मागावर २ वार कापडहि मिळणें दुरापास्त झालें. सुताच्या वाटपाची योजना प्रारंभीं फारच दोषास्पद होती, परंतु ती आतां सुधारण्यांत येत आहे. युद्धकाळांत हातमागांस सरकारी पुरवठा खात्याच्या बऱ्याचशा ऑर्डरी मिळाल्या आणि उत्पादन वाढविण्यासाठीं इतर तऱ्हेनेंहि थोडेंबहुत सहाय झालें.

युद्धोत्तर काळांत हातमागाचा धंदा सुस्थितींत कसा राखतां येईल, ह्याविषयीं कांहीं प्रांतांत तुरळकपणें प्रयत्न चालू आहेत. मुंबई, मद्रास व हैद्राबाद येथील अशा प्रयत्नांची थोडक्यांत माहिती ' ईस्टर्न एकॉनॉमिस्ट ' नें दिली आहे. विणकरांची खरी अडचण त्यांच्या कापडाच्या किफायतशीर विक्रीच्या संघटित व्यवस्थेची आहे. प्रत्यक्ष विणकर व गिऱ्हाइक ह्यांचेमधील मध्यस्त दलाल ज्या प्रमाणांत कमी होतील, त्या प्रमाणांत विणकरांस चांगल्या किंमतीचा फायदा मिळूं शकेल हें उघड आहे. त्याचप्रमाणें, विणकर लोकांना भांडवलाचा पुरवठाहि नीट होणें आवश्यक आहे. मद्रास प्रांतांतील " प्रांतिक हँडलूम वीव्हर्स को. सोसायटी " नें गिरण्यांकडून गठानें सूत विकत घेऊन तें सभासद-सोसायट्यांस पुरविण्यास प्रारंभ केला आहे. प्रांतिक सोसायटीनें प्रांतांत विक्रीचीं ३२ केंद्रें उघडलीं आहेत, त्यांचेमार्फत विक्रीची व्यवस्था केली आहे. त्याचप्रमाणें छपाई व रंगणी ह्यांचीं खातींहि तिनें स्थापन केलीं आहेत. थ्रो शटलच्या ऐवजी फ्लाय शटल वापरल्यानें उत्पादन लवकर होऊं शकतें. त्या दृष्टीनेंहि मद्रास प्रांतांत प्रयत्न चालू आहेत. विणकरांची सहकारी पद्धतीनें संघटना करून, उत्पादन व विक्री हीं सावकार आणि दलाल ह्यांचे कचाट्यांतून सोडविलीं, तर विणकरांची स्थिति सुधारण्यास पुष्कळच मदत होईल.

## मुंबई शेतकरी कर्जविमोचन कायद्यांत सुचविण्यांत आलेली सुधारणा

बॉम्बे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ ॲक्ट ( १९३९ ) यामध्यें पुढीलप्रमाणें दुरुस्ती करण्याचा मुंबई सरकारनें आपला विचार जाहीर केला आहे.

ऋणाईत शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार करून सूट वजा घालून निश्चित केलेलें, जें कर्ज ( Adjusted Debt ) असतें त्याची फेड करण्यासाठी सध्या दोन मार्ग आहेत. ( १ ) ऋणाईत शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करून ठरविलेल्या वार्षिक हप्त्यांनीं अथवा ( २ ) त्या कर्जाचे रकमेचे ऐवजीं लॅन्ड मॉर्गेज बँकेचे कर्जरोखे सावकारास देऊनहि फेड सध्या होऊं शकते.

लॅन्ड मॉरगेज बँकेचे कर्जरोखे स्वीकारावयास सावकार फारसे तयार नसल्याचें आढळून आलें आहे. कारण असे कर्जरोखे द्यावयाचे तर मूळ कर्जाची रक्कम आणखी अधिक प्रमाणांत वाटली जाते, व ऋणाईत शेतकऱ्यांच्या स्थावर मिळकतीच्या निम्म्या आकड्यावर आणून ठेविली जाते. शिवाय या कर्जरोख्यांचे पैसेहि तात्काळ मिळूं शकत नाहींत.

लॅन्ड मॉरगेज बँका या शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्यासाठींच स्थापन करण्यांत आल्या आहेत. तेव्हा ऋणाईत शेतकऱ्यांच्या स्थावर मिळकतीच्या निम्म्या किंमतीवर कर्जाचा आकडा निश्चित करण्यांत आलेले सर्व निवाडे लॅन्ड मॉरगेज बँकेनें स्वीकारावे व स्वतः अशा कुळांची सावकार होऊन खाजगी सावकारांच्या इच्छेप्रमाणें त्यांना निवाड्याप्रमाणें ठरविलेली रक्कम बँकेनें रोख द्यावी अथवा रोख्याच्या रूपानें द्यावी अशा सूचना सरकारकडे पाठविण्यांत आल्या. त्यावरून चौकशी केली असतां सरकारला कळून आलें कीं लॅन्ड मॉरगेज बँका या गोष्टीस तयार आहेत.

प्रचलित कायद्याप्रमाणें ऋणाईत शेतकऱ्यांच्या स्थावर जंगम मिळकतीच्या किंमतीच्या साठ टक्के त्याची कर्जनिवारण करण्याची शक्ति मानली जाते व या प्रमाणांत त्याचें कर्ज वाटलें जातें. म्हणजे मिळकत शंभर रुपये किंमतीची असेल तर सावकारांच्या कर्जफेडीकडे जास्तींत जास्त साठ रुपये येऊं शकतात.

नवीन सुचविण्यांत आलेल्या योजनेचा फायदा घेऊन जर सावकाराला आपल्या कर्जाबाबत तावडतोब रोख रक्कम हवी असेल तर वरील आकडा आणखी दहा टक्क्यांनीं कमी करण्यांत येईल व पन्नास अथवा पन्नासहून कमी आकड्यांवर आणला जाईल. व त्या आकड्यांप्रमाणें सावकारास त्याच्या पसंतीनुसार बँकेचे कर्जरोखे अथवा रोख रक्कम मिळेल.

### ऐक्य दीपावलि विशेषांक

सातारा येथील ऐक्य साप्ताहिकानें ३६ पृष्ठांचा वरील जादा अंक प्रसिद्ध केला आहे त्यांत सातारा जिल्ह्याच्या औद्योगिक परिस्थितीचें व आकांक्षांचें उत्कृष्ट चित्र उमटलेलें आहे. सातारा जिल्ह्यांतील मोटार धंदा ह्या लेखांत श्री. रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम; सी. ए. आय. बी., ह्यांनीं सातारा जिल्ह्यांतील त्या धंद्याची उत्कृष्ट माहिती दिली आहे. जिल्ह्यांतील १८ कंपन्यांच्या या मोटार धंद्यावर ६२५ कुटुंबांचें व इतरत्र स्थापन झालेल्या परंतु त्या जिल्ह्यांत काम करणाऱ्या ७ कंपन्यांवर २०० कुटुंबांचें जीवित अवलंबून आहे, ह्यावरून ह्या धंद्याचा व्याप आणि त्याचें महत्त्व हीं लक्षांत येतील. मोटारवाल्यांचें संघटन लिमिटेड कंपन्यांचे स्वरूपांत झालें त्यामुळें त्यांचें अतोनात नुकसान झालें आहे; ही संघटना व एकीकरण पार्टनरशिप ॲक्टाप्रमाणें झाली असती तर मोटारवाल्यांचा खरोखरच फायदा झाला असता, हा श्री. गोडबोले ह्यांचा योग्यवेळीं दिलेला सल्ला मानला गेला नाहीं. हा धंदा वाढीस लावण्याच्या कामीं ज्यांनीं आपलें आयुष्य घालविलें, अशा हजारो कुटुंबांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न आज उभा आहे. श्री. गोडबोले ह्यांच्याच दुसऱ्या एका लेखांत सातारा जिल्ह्यांतील बँकिंगच्या धंद्याचा परामर्श घेण्यांत आला आहे. ह्या जिल्ह्यांत बँकिंगचा धंदा वाढविण्यास अद्याप पुष्कळ वाव आहे आणि व्यापारी दृष्ट्या सहकारी बँकांपेक्षा जॉइंट स्टॉक बँकांचाच उपयोग ज्यास्त होतो, असें आपलें मत त्यांनीं नमूद केलें आहे. वरील दोन लेख सातारा जिल्ह्याबाहेरील लोकांसहि उपयुक्त व मार्गदर्शक होतील. सातारा जिल्ह्याच्या औद्योगिक माहितीनें परिपूर्ण असा ऐक्याचा विशेषांक चालू आर्थिक संक्रमणकाळांत काढून त्या साप्ताहिकाच्या चालकांनीं विशेष औचित्य दाखविलें आहे.

---

### सहकार पत्रिका

( सांगली संस्थान सहकारी इन्स्टिट्यूटनें चालविलेलें त्रैमासिक ) वर्ष १ लें, अंक १ ला. या मासिकांत मुख्यत: सांगली संस्थानांतील सहकारी चळवळीची माहिती देण्यांत येईल. त्याचप्रमाणें ब्रिटिश इलाख्यांत व इतर संस्थानांमध्यें सहकारी चळवळींत जो नवेपणा असेल तो सांगली संस्थानांतील कार्यकर्त्यांच्या नजरेस आणणें, नमुनेदार सहकारी संस्थांची माहिती देणें, शेतकी, ग्रामोद्योग वगैरे सहकाराशीं संलग्न असणाऱ्या विषयांची सहकार्याच्या दृष्टीनें कार्यकर्त्यांच्या पुढें माहिती ठेवणें, सहकारी चळवळींत ज्यांनीं थोर कार्यकर्ते म्हणून कीर्ति मिळविली आहे अशांच्या चरित्रांची माहिती कार्यकर्त्यांना पुरविणें, कार्यकर्त्यांच्या कार्यात जर कांहीं अडचणी उत्पन्न होतील, तर त्यांचा निरास करून मार्गदर्शन करणें इत्यादि कार्ये या त्रैमासिकाकडून व्हावींत असें योजिलें आहे. प्रस्तुत अंकांत टाचणें आणि टिपणें, सहकार म्हणजे काय, युद्धोत्तर पुनर्घटनेंत सहकाराचें स्थान, कंझुमर्स सोसायट्या, पंजाबांतील ग्रामोद्धाराचे अनुभव, ऋणमुक्ततेच्या योजना, इत्यादि विषयांवर लेख आले आहेत. सांगली सहकारी इन्स्टिट्यूटनें सुरू केलेल्या ह्या उपक्रमाबद्दल आम्ही तिचें अभिनंदन करतों.

---

### को. पीपल्स बँक लि., लिंब

१९४४–४५ सालीं ह्या बँकेनें ३३ लक्ष रुपयांचा व्यवहार केला. बँकेंत ठेवींचीं १०० खातीं सुरू असून २० हजारांच्या ठेवी आहेत. सरकारी सेंटर दुकानाचें काम बँकेचे सेक्रेटरी श्री. अभ्यंकर ह्यांनीं चांगलें चालविलें. बँक 'ब' वर्गांत आहे. श्री. त्रिंबक महादेव ठाकूर, प्रेसिडेंट ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेचें निष्ठापूर्वक काम चालू असून त्यामुळें लिंबसारख्या लहान गांवासहि बँकिंगचा फायदा मिळत आहे. बँकेस ९५७ रु. नफा मिळाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड दिलें.

## मि. वजाहत हुसेन ह्यांचा मृत्यु

( ले:–श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई., जे. पी., चेअरमन, मुं. प्रां. सहकारी बँक लि. )

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर, मि. वजाहत हुसेन, हे ता. ४ डिसेंबर रोजीं आकस्मिकपणें मरण पावले. त्यांच्या मृत्यूमुळें हिंदी बँकिंग क्षेत्र व सहकारी चळवळ ह्यांचा एक खरा मित्र व सल्लागार नाहींसा झाला आहे. ते योग्य तो सल्ला देण्यास नेहमी तत्पर असत आणि दुसरी बाजू नेहमी आदरपूर्वक ऐकून घेत. सहकारी चळवळींत ते मन:पूर्वक लक्ष घालीत. सहकारी रजिस्ट्रारांची १४ वी परिषद मुंबई येथें भरली होती तिचे ते अध्यक्ष होते. ह्या परिषदेंत चर्चिल्या गेलेल्या प्रश्नांचीं उत्कृष्ट टाचणें त्यांनीं आपल्या नेतृत्वाखालीं रिझर्व्ह बँकेच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याकडून तयार करवून घेतलीं होतीं. हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या कोऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटीपुढील प्रश्नांच्या मूळ तयारींत व चर्चेंत त्यांनीं आपुलकीनें मदत केली. हिंदी शेतकऱ्यांबद्दल त्यास अत्यंत जिव्हाळा वाटे. सहाजीकच, बँकेचे डेप्युटि गव्हर्नर म्हणून शेतकींच्या भांडवलविषयक व सहकारी प्रश्न त्यांचेपुढें येत, त्यांचेकडे ते केवळ कारभारविषयक किंवा तांत्रिक दृष्टीनें कधींच पहात नसत. मोठ्या मनानें व सहानुभूतिपूर्वक ते त्या प्रश्नांचा विचार करीत. गाजावाजा न करतां काम करणारे, कार्यक्षम अधिकारी व सालस गृहस्थ ह्या तीनहि दृष्टींनें ते आदर्श होते.


चितळेवाडी येथें गुळाचे घाऊक सौदे

**–गुळावरील वहातूक बंदी उठली–**

**ठिकठिकाणच्या**

# गूळ व्यापाऱ्यांसाठी खास सोय

चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि., चितळेवाडी येथें ठिकठिकाणच्या गुळाच्या व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं गुळाचे सौदे रोज केले जातात. कंपनीच्या गुळाचा कारखाना फार मोठा असून खास सवलतीच्या दरानें व्यापाऱ्यांना एकजात मोठ्या प्रमाणावर गूळ पुरविण्याची सोय केली आहे.

**बाहेरच्या व्यापाऱ्यांस क्रेडीटवर व सवलतीनें माल**

कंपनीस परिचित नसलेल्या बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांनीं आपापल्या ठिकाणच्या प्रसिद्ध बँकांकडून आपल्या पतीबद्दल शिफारसपत्रें आणल्यास व्यापाऱ्यांस क्रेडीटवर व सवलतीनें माल देण्याची व्यवस्था केली जाईल.

**वाहतुकीची खास सोय**

चितळेवाडी येथें घाऊक सौदे केल्यास नीरा, लोणंद, अकलूज, नातापुता, डिक्सळ, पंढरपूर, सोलापूर ह्यांपैकीं कोणत्याही ठिकाणीं व्यापाऱ्यांना मालाची डिलिव्हरी दिली जाईल.

चितळेवाडीस नीरा, लोणंद अगर पंढरपूरमार्गें मोटार बसनें जातां येतें व सर्व बसेस चितळेवाडी येथें थांबतात.

पत्ता:—चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि.,
पोस्ट:—चितळेवाडी
( जि. सोलापूर )

## स्फुट विचार

### हिंदी आयुर्विम्याच्या कामांत वाढ

गेल्या वर्षी म्हणजे १९४४ सालीं हिंदी आयुर्विमा कंपन्यांनीं नवीन काम मिळविण्याचे कामीं पुष्कळच प्रगति केली आहे. १९४३ चे मानानें त्यांनीं १,४९,००० ज्यास्त पॉलिसी दिल्या, व ३२½ कोटि रुपये अधिक रकमेचे विमे उतरले. त्यांचें वार्षिक हप्त्यांचें उत्पन्न १९४३ मधील तत्सम उत्पन्नापेक्षा १ कोटि, ६४ लक्ष रुपयांनीं ज्यास्त आहे. १९४४ चेच आकडे सांगावयाचे म्हणजे, हिंदी आयुर्विमा कंपन्यांनीं त्या सालीं ५ कोटि, १२ लक्ष रुपये हप्ते देणाऱ्या ९५ कोटि, २० लक्ष रुपये किंमतीच्या ४,३२,००० पॉलिसींचें काम पुरें केलें. कंपन्यांच्या लाइफ फंडावर, मुळाशीं इनकम टॅक्स वजा धरतां, ३·६४% व्याज पडलें १९४३ सालीं ३·८८% व्याज सुटलें होतें. व्यवस्थेचा खर्च मात्र २७·९% वरून ३१·२% वर गेला. हिंदुस्थानांतील युद्धकाळांतील विम्याच्या कामांत दिसून येणारी ही वाढ अशीच कायम टिकणार नाहीं; युद्धोत्तर औद्योगीकरणानंतर मात्र विमाव्यवसाय पुनः तेजींत येईल, अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानांतील व्याजाचे दर ३% पेक्षा खालींच रहाण्याचा संभव आहे, कारण ह्यापुढें व्याजाच्या दरावरील नियंत्रण कायम राखण्याचें सरकारी धोरण दिसतें, असें सांगून आयुर्विमा कंपन्यांस लागू करण्यांत आलेला प्राप्तीवरील कराचा दर कमी करावा ह्या त्या कंपन्यांच्या मागणीस सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें पाठिंबा दिला आहे. विमा व्यवसायाच्या राष्ट्रीयकरणास त्यानें आपला स्पष्ट विरोध दर्शविला आहे. आयुर्विमा कंपन्यांपुढें येणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांची सुपरिंटेंडेंटनें आपल्या विमावार्षिकांत चर्चा केली आहे.

---

### सहकारी विमा सोसायट्यांवरील निर्बंध

सहकारी विमा सोसायट्यांची अखिल भारतीय परिषद मुंबई येथें श्री. माधवलाल एम. भट्ट, जे. पी., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सहकारी विमा सोसायट्यांपुढील प्रश्नांची चर्चा केली. हिंदुस्थान सरकारच्या विमा कायद्याप्रमाणें विमा कंपन्यांवर पैसे गुंतविण्याचे संबंधांत कडक निर्बंध आहेत, सहकारी विमा सोसायट्यांनाहि त्या कायद्यान्वयें नोंदवावें लागतें आणि हे निर्बंध त्यांसहि लागू होतात. सहकारी कायद्याचेहि निर्बंध त्यांस पाळावे लागतात आणि ह्या दोन्ही निर्बंधांमुळें सहकारी विमा सोसायट्यांची कुचंबणा होते, असें श्री. भट्ट ह्यांनीं प्रतिपादन केलें. इतर विमा कंपन्यांचे बरोबरीनें त्यांस काम करावयाचें म्हटलें म्हणजे निर्बंधांत जास्त कडकपणा उपयोगी नाहीं, असा त्याचा अर्थ आहे. ह्यासंबंधांत मुंबई सरकारनें पुढाकार घेऊन निर्बंध ढिले करण्यास आरंभ केलेलाच आहे.

---

### इनकम टॅक्सची आकारणी

सहकारी विमा सोसायटीस जो नफा होतो, त्यास वास्तविक नफा म्हणणें चुकीचें आहे. काटेकोरपणें हिशेब करून जेवढा हप्ता घ्यावयास पाहिजे त्यापेक्षा थोडा मोठा हप्ता घेतल्यामुळें उरलेला तो वाढावा असतो. इंडियन इनकम टॅक्स ॲक्टाच्या ६० व्या कलमानें ही गोष्ट मान्य केलेली दिसते, परंतु रोख्यांवरील व्याज व डिव्हिडंड ह्यांच्या उत्पन्नास करमाफी लागू नाहीं. विमा व्यवहारांतील नफा ठरविण्याचे नियम इनकमटॅक्स ॲक्टाचे परिशिष्टांत देण्यांत आले आहेत, त्याप्रमाणें निघणाऱ्या नफ्यासच केवळ कर माफ होतो. सहकारी सोसायट्यांनीं रोख्यांत गुंतविलेली रकम ही त्यांच्या नफ्याची किंवा जादा पैशाची रकम असते असें गृहीत धरून चालण्यांत येतें. सहकारी विमा सोसायट्यांनीं रोख्यांत पैसे गुंतविणें हा त्यांच्या धंद्याचा आवश्यक भागच असतो आणि हे पैसे हप्त्यांच्या रूपानें जमा झालेले असतात. रोख्यांत कांहीं ठराविक किमान प्रमाणांत पैसे गुंतविण्याचें त्यांचेवर विमा कायद्यानेंच बंधन घातलेलें असतें. श्री. भट्ट ह्यांनीं सहकारी विमा सोसायट्यांवरील बंधनें उठविण्याची मागणी करतांना वरील प्रकारें खुलासा केला. रहाण्याच्या घरांचा सध्या मोठा तुटवडा पडला आहे, तो भरून काढण्यासाठी सहकारी गृहमंडळांच्या स्थापनेचें परिषदेनें स्वागत केलें व त्या मंडळांना योग्य व्याजाच्या दरानें कर्जें देऊन सहाय करण्याची विमा सोसायट्यांस शिफारस केली.

---

### सहकारी संस्थांचे जमाखर्च व त्यांची तपासणी *

सहकारी संस्थांचे जमाखर्च वक्तशीर, पद्धतशीर व नीटनीटके ठेवण्यांत यावे ह्या दृष्टीनें मार्गदर्शन करण्यासाठी प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या प्रोत्साहनानें वरील पुस्तक श्री. नि. दा. वैद्य ह्यांनीं लिहिलें आहे. सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांना ह्या विषयाचें निदान प्राथमिक स्वरूपाचें तरी ज्ञान मिळविणें साध्य व्हावें, हा श्री. वैद्य ह्यांचा हेतु आहे. पुस्तकाचीं एकूण सहा प्रकरणें आहेत. पहिल्या प्रकरणांत जमाखर्चशास्त्राचीं मूलतत्त्वें व शेतकी पतपेढ्यांनीं ठेवण्याचीं जमाखर्चाचीं पुस्तकें ह्यांची माहिती देण्यांत आली आहे. दुसरें प्रकरण शेतकी पतपेढ्यांच्या वार्षिक जमा–खर्चासंबंधींचें आहे. दलालीनें खरेदी–विक्री व इतर व्यवहार करणाऱ्या संस्थांचे जमाखर्च तिसऱ्या प्रकरणांत वर्णिले आहेत. किरकोळ मालविक्री करणारीं सहकारी दुकानें व अर्बन बँका ह्यांच्या हिशेबांचा विचार केल्यानंतर अखेरच्या प्रकरणांत सहकारी संस्थांच्या जमाखर्चाच्या तपासणीची छाननी केलेली आहे. तिचें आकलन करून संस्थांचे कार्यकर्ते तपासणी अधिकाऱ्यांचें काम शक्य तितकें सुलभ करतील, अशी लेखकास आशा आहे. सर्वच नमुन्याच्या सहकारी संस्थांच्या जमाखर्चाची माहिती पुस्तकांत देतां येणें शक्य नव्हतें, परंतु कांहीं प्रातिनिधिक संस्थांच्या जमाखर्चाचें विवेचन इतर संस्थांच्या चालकांसहि मार्गदर्शक झाल्याविना रहाणार नाहीं.

---

### सहकारी तत्त्वावर साखर कारखाने ?

डेक्कन कॅनॉलवरील शेतकरी बागायतदारांची परिषद प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १७ रोजीं भरली होती. तीमध्यें मान्य झालेल्या ठरावांत खालील ठराव महत्त्वाचा आहे:—

"हल्ली फॅक्टरी एरियामधील चाऱ्या सोडून बाकी मोकळ्या असलेल्या चाऱ्यांवर साखर कारखाने काढावेत, असें जर सरकारचें धोरण असेल तर साखर कारखाने सहकारी तत्त्वावर स्थानिक शेतकऱ्यांनींच संघ करून काढावेत व त्यांस जरूर तें उत्तेजन व मदत करणेबद्दल सरकार व सहकारी खातें यांना विनंति करावी."

*लेखकः–श्री. नि. दा. वैद्य, बी. ए., जी. डी. सी. ए. प्रकाशकः—मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट. पृ. सं. १२४ किं. २½ रु.

## वाडा पेटा को. प. व सेल यु. लि.

ठाणें जिल्ह्यांतील ही एक नमुनेदार युनियन प्रथम १९४२ सालांत रजिस्टर झाली असून तीचें अनुकरण जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांनीं केलें आहे.

सदर युनियनचें रूपांतर बँकिंग युनियनमध्यें करण्याचें मागील सभेंत ठरलें असून ती आक्टोबर १९४५ अखेर रजिस्टर होऊन येईल अशी चालकांची इच्छा आहे. युनियनचें शेअर भांडवल रु. २१,२२५ असून ठेवी रु. ५०,६९६ आहेत. निव्वळ नफा रु. ७२२७ झाला आहे.

## येवला येथील सहकारी अडत दुकान

मुंबई प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या येवला शाखेनें तालुक्यांतील शेतकऱ्यांचा माल किफायतशीर रितीनें विकण्याकरितां व त्यांना बीं-बियाणें, पेंड, खतें, नांगर, चरक इत्यादि शेतीचीं उपकरणें योग्य वेळीं व योग्य भागांत पुरविण्याकरितां, 'सहकारी अडत दुकान ' उघडलें असून त्याचा पानसुपारी समारंभ येवला येथें बँकेचे ऑफिसांत रविवार ता. २८-१०-४५ रोजीं सकाळीं १० ते १२ वाजेपर्यंत करण्यांत आला. सभेमध्यें बँकेचे नाशिक विभागाचे सीनियर इन्स्पेक्टर श्री. एम. डी. चावडा व येवले शाखेचे इन्स्पेक्टर श्री. जी. एम. जोशी यांनीं सदर ' अडत दुकानाची उपयुक्तता' पटविणारीं भाषणें केलीं.

## रिफ्रेशर ट्रेनिंग क्लास निफाड

निफाड येथें ता. ९।१०।४५ ते ता. १५।१०।४५ अखेर सात दिवसांचा सेक्रेटरीज रिफ्रेशर ट्रेनिंग क्लास मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें आखावयाचें ठरलें व त्याप्रमाणें सदर रिफ्रेशर ट्रेनिंग क्लासचा उद्घाटन समारंभ मे. दि. ब.आर. व्ही. वंडेकर, डिस्ट्रिक्ट ऑनररी आर्गनायझर, को. सो. नासिक यांचे हस्तें मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडला

## श्री. वाणी ह्यांचीं व्याख्यानें

मे. डी. आर. वाणी, एज्युकेशनल सुपरवायझर नाशिक यांचीं ता. ५ नोव्हें. ४५ व ता. १० नोव्हें. ४५ रोजीं मिलिटरी स्कूलच्या विद्यार्थ्यांपुढें अनुक्रमें ' सहकार्य " व " सहकारी सोसायट्या " या विषयांवर व्याख्यानें झालीं.

## मालेगांव विभाग सहकारी कार्यकर्त्यांची परिषद

सदर परिषद ता. १७।११।४५ रोजीं मे. आसि. रजिस्ट्रार सो. को. सो. धुळें यांचे अध्यक्षतेखालीं पार पडली. या परिषदेस खात्याचे व बँकेचे निरनिराळे अधिकारी, तालुका सुपरवायझिंग युनियन्सचे चेअरमेन, खरेदी विक्री संघांचे चेअरमेन व सुपरवायझर्स मिळून ४० चे वर प्रतिनिधी हजर होते.

## येवला तालुक्यांतील शेतकऱ्यांची सहकारी परिषद

ही परिषद ता. १८।११।४५ रोजीं मे. व्ही. जी. पाटील, तालुका ऑनररी आर्गनायझर, को. सो. साकोरा यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडली. सहकारी चळवळीशिवाय शेतकऱ्यांच्या सन्या प्रगतीसाठी दुसरा कोणताही असा सर्व श्रेष्ठ मार्ग नाहीं याकरितां या चळवळीमार्फतच उन्नति करून घेण्याचे सर्वानुमतें ठरून योग्य मार्गदर्शनाकरितां व निरनिराळ्या योजना अंमलांत आणणेसाठी तालुक्यांतील पुढाऱ्यांची एक कमिटी नेमली गेली.

## हरसूल ( पेठ महाल ) येथील सभा

मे. मीर सो. असि. राजि. हेट रिलिफ पुणें यांचे अध्यक्षतेखालीं ता. २६-१०-४५ रोजीं हरसूल येथें सभा घेण्यांत आली. सभेंत मे. देसाई ( ऑडिटर व आर. ओ. ) व मे. चावड ( सि. इन्स्पे. ) यांचीं भाषणें झालीं.

—: साठे बिस्किटें :—

ऑरेंज व श्रूसबरी

आतां स्थानिक ग्राहकांस अल्प प्रमाणांत मिळूं लागलीं. युद्धसमाप्ति झाली असल्याकारणानें परगांवचे ग्राहकांसहि हळू हळू मिळूं शकतील.

—साठे बिस्किट कं., पुणें २

विमा—काम—बक्षिसें

' सह्याद्रि ' प्रतिनिधींसाठी बक्षिसांची अपूर्व योजना !

' सह्याद्रि ' विमेदारांना किमान हप्ते व भरपूर सवलती !!

एजन्सी व पॉलिसी अत्यंत फायदेशीर.

-शाखा- काळभोर आणि कं., पुणें. | अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा. | गो. ग. सौंदणकर मॅ. डिरेक्टर, सह्याद्रि विमा कं. नासिक.



नोगी आणि कं. मुंबई ४



## कर्जनिवारण बोर्डाकडे अर्ज

नासिक जिल्ह्यांतील दिंडोरी, पेठ, कळवण व सटाणा या चार तालुक्यांना कर्जनिवारण कायदा ता.१ मे १९४५पासून लागूं करण्यांत आला होता. ता. ३१ आक्टोबर ४५ रोजीं संपणाऱ्या सहामाहींत सटाणा व दिंडोरी येथें या कामासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या बोर्डांकडे अनुक्रमें १४,३०५ व ८,५०४ असे एकूण २२,८०९ अर्ज सादर करण्यांत आलेले आहेत.

## नाशिक

ता. ३ नोव्हें. ४५ रोजीं मे. एम. जे. दिक्षित, एम. ए., बी. एससी., रिटायर्ड कलेक्टर यांचे अध्यक्षतेखालीं मे. दि. ब. आर. व्ही. वंडेकर, डिस्ट्रिक्ट ऑर्गनायझर को. सो. यांचे बंगल्यावर मोठ्या थाटानें "सहकारी–दिन" पार पाडला. मे. डी. आर. वाणी एज्युकेशनल सुपरवायझर, मे. दि. ब. आर. व्ही. वंडेकर डि. एच. ओ., को. सो. नाशिक, मे. सिनीयर इन्स्पेक्टर, मु. मॅ. को. बँक लि. नाशिक, मे. रूरल डेव्हलपमेंट इन्स्पेक्टर नाशिक यांचीं समयोचित भाषणें झालीं.

## करमाळा ता. को. ॲग्रि. परचेस व सेल युनिअन लि., जेऊर

वरील संस्थेची द्वितीय वार्षिक साधारण सभा रविवार, ता. ३० डिसेंबर रोजीं सायंकाळीं ५ वाजतां जेऊर येथें भरणार आहे. यूनिअननें केलेल्या कामगिरीचें वर्णन वार्षिक रिपोर्टांत दिलेला आहे. अहवालाचे सालीं यूनियनला ४,७७३ रु. निवळ नफा झाला.

## कराड व पाटण तालुका सुपरवायझिंग यूनिअन लि.

ह्या संस्थेची वार्षिक साधारण सभा ता. ३०-१०-४५ रोजीं युनियनचे ऑफिसमध्यें युनियनचे चेअरमन श्री. व्यंकटराव पवार, बी. ए., एलएल. बी., वकील यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सातारा जिल्ह्यांतील ज्या तालुक्यांना कर्जनिवारण कायदा लागू करण्यांत आला नाहीं त्यांना त्वरित लागू करण्यांत यावा अशी सर्वानुमतें मागणी करण्यांत आली आणि ज्या तालुक्यांना कर्जनिवारक कायदा लागू करण्यांत आला आहे, अशा तालुक्यांतील लोकांनीं तावडतोब बोर्डांकडे अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत ता. ३१।१०।४५ ही होती ती. आणखी वाढवून मिळावी अशाबद्दलहि मागणी करण्यांत आली. १९४५–४६ सालाकरितां युनिअनचे चेअरमनचे जागीं श्री. रघुनाथराव पाटील, एलएल. बी., वकील या होतकरू व तरुण कार्यकर्त्याची निवड करण्यांत आली.

## दि कमर्शियल बँक लि., कोल्हापूर.

(३० जून, १९४५ अखेरचा आढावा)

अहवालाचे वर्षी बँकेनें इचलकरंजी व हुपरी येथें शाखा उघडल्या. खेळत्या भांडवलांत १० लाखांचेवर वाढ होऊन तें २२½ लक्ष रुपयांवर गेलें. त्यांपैकी ५० हजार रुपयांचे भाग भांडवल असून २१ हजारांचे फंड्स आहेत व २१½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. हातांत व बँकांत ९½ लक्ष रुपये आहेत. लोन्स, कॅश क्रेडिट्स व बिल डिस्कौंट ह्यांत १२ लक्ष रुपये गुंतविलेले आहेत. निवळ नफा १९,७५७ रु. उरला. भागीदारांस द. सा. द. शे. ८½ करमाफ डिव्हिडंड व प्रत्येक शेअरला ०–३–० बोनस मिळालें. श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे जमीनदार, हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. एस. जी. दाभोळकर, बी. ए., एलएल. बी., हे चेअरमन आहेत.

## डोळ्यांची बँक

ही बँक संपत्तीचें माहेरघर असलेल्या न्यूयॉर्क शहरीं गेल्या वर्षी अस्तित्वांत आली. ह्या बँकेचे कोणीहि शेअर होल्डर नसून सर्व देणगीदारच आहेत.

घड्याळाच्या काचेसारखा आपल्या बुबुळावर एक अतिशय पातळ असा पारदर्शक पदार्थ असतो. ह्यामधून बुबुळाला उजेड दिसतो आणि हा पारदर्शक पदार्थ बिघडला म्हणजे आपणांस दिसेनासें होतें. ह्याला उपाय म्हणजे त्यांतील हा पदार्थ बिघडलेला नाहीं असा दुसरा डोळा बसविणें हा होय. असला डोळा मिळण्याचें एकच ठिकाण म्हणजे नुकताच मरण पावलेला माणूस किंवा जन्मण्यापूर्वी मृत्यू पावलेलें बालक. न्यूयॉर्कमधील इस्पितळांनीं असले डोळे गोळा करून वरील बँकेस पुरविण्याची व्यवस्था केली आहे. अर्थात्, हे डोळे मृतानें आधीं मृत्युपत्र करून दिल्यास किंवा त्याच्या नातेवाईकांनीं दिल्यास किंवा इस्पितळांतील बिनवारशी प्रेतांचे मिळाल्यासच उपलब्ध होतात.

## को. सेक्रेटरीज परीक्षा

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे घेण्यांत येणाऱ्या को. सेक्रेटरीज परीक्षांचा दिवस सोमवार, २९ एप्रिल १९४६ असा जाहीर झाला आहे. सहकार सहकारी कायदा व सहकारी हिशेब आणि सेक्रेटरीचें कामकाज ह्या विषयांची परीक्षा उमेदवारांस द्यावी लागेल. परीक्षेची फी ३ रु. आहे. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका स्थानिक भाषांतून काढल्या जातील आणि इन्स्टिट्यूटच्या शिक्षण समितीनें नेमलेले परीक्षक त्या तपासतील. जिल्हा शिक्षण समित्यांनीं परीक्षा घेण्याची सर्व पूर्वतयारी (परीक्षेची जागा, उत्तरें लिहिण्याच्या वह्या, शाई, टिपकागद ह्यांची व्यवस्था) करावयाची आहे. त्याचा खर्च इन्स्टिट्यूट देणार आहे. उमेदवारांची यादी व फी हीं इन्स्टिट्यूटकडे २५ फेब्रुवारीपर्यंत पोचलीं पाहिजेत.

## सहकारी विषयावरील निबंधास बक्षीस

"मुंबई शहर व उपनगरें ह्यांतील कंझूमर्स कोऑपरेशन" ह्या विषयावर बॉंबे कोऑपरेटर्स एज्युकेशन कमिटीनें निबंध मागविले आहेत. त्याची लांबी ३० टाइप केलेले कागद इतकी असावी. २८ फेब्रुवारी १९४६ ही निबंध धाडण्याची शेवटची तारीख आहे. सर्वोत्कृष्ट निबंधास १०० रुपयांचें बक्षीस दिलें जाईल.

## बॉंबे को. क्वार्टर्लीचा ताजा अंक

बॉंबे को. क्वार्टर्लीच्या डिसेंबर, १९४५ च्या अंकांत सर जनार्दनराव मदन ह्यांचें "भावी ग्राम संघटना" ह्या विषयावरील रेडिओवरील भाषण उद्धृत केलें आहे. मध्यपूर्वेतील शेतकीविषयक सहकारी चळवळ हा डॉ. मॅन ह्यांचा लेखहि त्यांत आला आहे. इतरहि कांहीं लेख, पुस्तक परीक्षणें, संपादकीय स्फुटें, सहकारी बातम्या, वगैरेहि अंकांत आहेत.

## उसाच्या लागवडीसाठी एक कोट, वीस लक्ष रुपयांची पंचवार्षिक योजना

हिंदी मध्यवर्ती साखर कमिटीला येत्या पांच वर्षांत खर्च करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें एक कोट, वीस लक्ष रुपये दिले आहेत. या रकमेचा उपयोग उसाची लागवड वाढविण्याकडे करण्यांत येईल.

## जगद्व्याळ व्यापाराची बोलणीं

अमेरिकन सरकारनें हिंदुस्थानासह १४ राष्ट्रांच्या प्रतिनिधींना सर्व जगभर अनिर्बंध व्यापार कसा वाढेल याचा विचार करण्यासाठीं एका गोलमेज परिषदेस बोलाविलें आहे.

### पुणें जिल्हा को-सुपरवायझिंग यूनियन्स बोर्ड लि.

हा बोर्डास सहा तालुका यूनियन्स सामिल असुन त्यांना २४१ सोसायट्या सामील आहेत. '१९४४-४५ मध्यें सोसायट्यांची संख्या १२ नें वाढली. बोर्डाचा ऑडिट वर्ग "ब" आहे. ४७ सोसायट्यांनीं धान्य वाटपाचें काम हातीं घेतलें आहे. सामील यूनियन्सपैकी पुरंदर ता. को. सु. यूनियनला ऑडिट वर्ग "अ" मिळाला आहे. कर्ज निवारण कायद्याच्या प्रचाराचें जरूर तें कार्य यूनियन सुपरवायझर मार्फत करण्यांत आलें. बोर्डाचे चेअरमन, मे. जयवंतराव तुकाराम सावंत, इनामदार, ह्यांनीं वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला आहे.

### नळवाडी येथील सोसायटीची सभा

नळवाडी को. थ्रिफ्ट ॲन्ड क्रेडिट सोसायटीची पहिली साधारण सभा ता. १७-१०-४५ रोजीं रात्रीं १०-३०. वाजतां नळवाडी येथील चावडींत मे. ऑडिटर साहेब नाशिक यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें व थाटानें पार पडली. सदर प्रसंगीं मे. एज्युकेशनल सुपरवायझर (मे. डी. आर. वाणी) यांनीं सोसायटी स्थापनेसंबंधीं घडलेला प्राथमिक इतिहास सांगितला व इतर ठरावहि समजावून सांगितले. तसेंच मे. असि. डी. सी. ओ. यांनीं जमलेल्या मंडळीस कर्ज निवारणकायद्यासंबंधीं माहिती दिली. सभेस मेंबर्स व इतर गांवांतील मंडळी मिळून २५० लोक हजर होते.

### जळगांव येथील सहकार दिन

जळगांव येथील सहकारी दिन पू. खा. सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. एस. ए. घाटगे, बी. ए., एलएल. बी., जिल्हाधिकारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. मे. गुणवंतराव देशमुख ह्यांनीं मुख्य ठराव मांडला. अ. रजिस्ट्रार मे. धर्माधिकारी, लँड मॉर्गेज बँकेचे चेअरमन रावसाहेब व्ही. एस. सामंत, रावसाहेब रूपचंद लाठी, कर्जनिवारण कायद्याचे अ. रजिस्ट्रार मे. मीर, पू. खा. सेंट्रल को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर मे. देशमुख इत्यादींचीं भाषणें झालीं. त्यानंतर बक्षिस कमिटीनें निवडलेल्या १८ पगारदार कार्यकर्त्यांना रोख बक्षिसें व जिल्ह्यांतील कार्यक्षेत्रांत बक्षिस कमिटीनें निवडलेल्या १८ सहकारी संस्थांना चांदीच्या फिरत्या ढाली अशीं वांटण्यांत आलीं. सभेस ३०० लोक हजर होते.

### भिवंडी येथील सेक्रेटरीज रेफ्रेशर ट्रेनिंग क्लास

ठाणा डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग युनिअन्सच्या विद्यमानें भिवंडी येथें सेक्रेटरीज रेफ्रेशर ट्रेनिंग क्लास तारीख २२।११।४५ पर्यंत आठ दिवसांचा घेण्यांत आला. या क्लासला माहिती देण्यास मे. परुळेकरसाहेब, डि. सी. ओ., मे. प्रधानसाहेब सब ऑडिटर, भिवंडी बँकेचे अधिकारी यांचें फार सहाय्य झालें. या क्लासचा समारोप तारीख २९।११।४५ रोजीं श्री. दाजीसाहेब ऊर्फ एम. बी. कुंठे, चेअरमन परचेस व सेल युनिअन भिवंडी यांचे अध्यक्षतेखालीं भिवंडी सुपरवायझिंग युनिअनचे ऑफिसांत झाला.

### महाड को. अर्बन बँक लि.

वरील बँकेचें शेअर भांडवल १९४४-४५ सालीं ७,६३५ रुपयांनीं वाढलें. हल्लीची संकल्पित भांडवलाची मर्यादा ४० हजार रुपये आहे ती ६० हजार रु. करण्याचा बँकेचा प्रयत्न आहे. भागांस मागणी चांगली आहे. ठेवी, कर्जें इत्यादि सर्व बाबतींत वाढ दिसून येते. अहवालाचे वर्षी ६,१०० रु. निवळ नफा झाला. ६% नफा वाटणीस २,०२१ रु. लागले.





व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः— द. ना. हेजीब

लहान मुलांकरितां **आर्को** गोड -एरंडेल- वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

**पैसा आणि ज्ञान वाढवा !**

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापारांत नक्की यश मिळतें किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक सौख्याचें सुंदर विवेचन करतें किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**बिनचूकच्या माहितीनें**

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, नं. २७ मुंबई.

प्रगतिपथावरील नवा
**मैलाचा — दगड**

सन १९४४ मधील प्रगति
नव्या कामांत ७० टक्के वाढ
खर्चाचें प्रमाण फक्त ११%

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ मांपुडां घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' मांपुडां, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.